म. ग्रं. सं. ठाणे.
विषय इतिहास
सं. क्र. ८७८

REFBK-0003679

[ पुणें, भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृतग्रंथमाला क्र. १२ वा ]

राजवाडे-लेखसंग्रह-भाग १ ला.

# ऐतिहासिक प्रस्तावना

REFBK-0003679

[ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १-२२ मधील ]

लेखक

पुरातत्त्वभूषण इतिहासाचार्य

## विश्वनाथ काशिनाथ राजवाडे

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. )

शके १८५० ]          किंमत रु. ३          [ सन १९२८

प्रकाशक व मुद्रक

रा. रा. शंकर नरहर जोशी.

स्थळ—
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव

पुणें, भार

# प्रस्ताव

तरांत मराठी भाषेंत इतिहासशास्त्र,भाषाशास्त्र आणि समाजशास्त्र ह्यांची स्थापना
ाव्या व शास्त्रीय रीत्या पण स्वकीय साधनाधारें गतिमान करण्याची थोर
णारे महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पुरुप पुरातत्त्वभूषण इतिहासाचार्य कै० विश्वनाथ
ावाडे हेच एक होत. रा. राजवाडे यांनीं आपल्या प्रखर व अगाध बुद्धि-
तुलनीय अशा अविश्रांत परिश्रमानें ह्या तीनहि विषयांसंबंधानें निबंधग्रंथां-
वविध व विपुल सारस्वत निर्माण केलें आहे त्यावरून हें वरील म्हणणें कोणा-
पटण्यासारखें आहे. रा. राजवाडे यांची स्वेतिहासविषयक कामगिरी तर
पूर्वच आ. आणि ह्यापैकींच म्हणजे 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें'
ीं जे २२ खंड प्रसिद्ध केले आहेत, त्यांतीलच राजवाडे यांच्या प्रस्तावनां-
प्रस्तुत ग्रंथांत एकत्र केला आहे. हे इतिहासाचे खंड त्यांतील ऐतिहासिक
ें विशेषतः प्रस्तावनांमुळें इतके विख्यात झाले आणि इतिहासाची
करून इतिहासशास्त्राची प्रस्थापना करते झाले. इतिहासज्ञ कै० वासु-
मिरज ह्यांनींहि इतिहाससाहित्याचे ११।१२ भाग प्रसिद्ध केले आहेत.
्या प्रत्येक भागास प्रकरणशः प्रस्तावनाहि जोडली आहे. रा. खरेशास्त्री
राजवाडे यांच्या प्रत्येक खंडास प्रस्तावना आहे असें नाहीं. शिवाय, खरे
या प्रस्तावना म्हणजे त्या त्या भागांत छापलेल्या कागदपत्राधारें बनविलेला
तिहास असून रा. राजवाडे यांच्या प्रस्तावना म्हणजे प्राधान्यानें इतिहासादि
मीमांसाप्रबंध होत. रा. राजवाडे यांच्या पहिल्या तीन खंडांच्या प्रस्तावना,
छापलेल्या कागदांतून निघणाऱ्या ऐतिहासिक वृत्तांतासंबंधानें जरी असल्या तरी
न इतिहासशास्त्रविषयक निरनिराळ्या अंगोपांगांचेंहि विवेचन त्यांत बरेंच आलेलें
६, ८, १०, ११ ह्या खंडांच्या प्रस्तावनांमध्यें तर उघडच इतिहासशास्त्राची
ादाहरण व तुलनात्मक चर्चा आहे. इतिहासाच्या आर्य व पाश्चात्य व्याख्यां-
इतिहासाची व्याप्ति, त्याचीं साधनें, त्यांची प्रसिद्धी,इतिहासलेखनांतील गुणदोष
ाहासासंबंधाचीं एतद्देशीय संस्थानीक, वतनदार, जहागीरदार, सरदार यांज-
बदारी इ०इ० बाबींपर्यंतचा ऊहापोह ह्या चारहि खंडांच्या प्रस्तावनांत सविस्तर
परिणामकारक अशा भाषेनें केला आहे.रा. राजवाडे यांची भाषा इतकी अंतःकर-
ी,इतकी कळवळ्याची व इतकी तेजस्वी आणि शास्त्रीय आहे की तशी अन्यत्र दिसतच
ांप्रत रा. राजवाडे यांच्याच परिश्रमाचें फल म्हणून स्वेतिहासासंबंधाची आस्था व
ी परिश्रम करण्याची वृत्ति महाराष्ट्रीय जनतेंत थोडी पण सर्वत्र दिसूं लागली आहे.अशा
प्रस्तावनांचें स्वतंत्र पुस्तक केल्यानें इतिहासाच्या अभ्यासास योग्य मार्ग मिळून

सहाय्य होणारें असल्यामुळें आणि मित्रत्वाच्या नात्यानेंहि, रा. राजवाडे यांच्या खंडांतील प्रस्तावनांचें हें स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. रा. राजवाडे यांच्या ह्या प्रस्तावनांचे बाबतींत कांहींचें असेंहि म्हणणें असण्याचा संभव आहे कीं सदर प्रस्तावना पुनर्मुद्रित करतांना त्यांत दुरुस्ती करून, भर घालून टीपा द्यावयास हव्यात. पण असे करणें एक तर ज्यांच्या प्रस्तावना त्यांनींच करणें योग्य व आवश्यक; आणि दुसरें असें कीं, रा. राजवाडे यांच्या ह्या प्रस्तावना-लेखांत इतके प्रमुख व विविध विषयांचे उल्लेख आलेले आहेत कीं, त्यांस टीपा देऊन स्पष्टीकरण करवावयाचे म्हणजे दुसरा एकेक स्वतंत्र लेखच जोडणें भाग होईल, आणि शिवाय ह्यासंबंधानें मतभिन्नता व शंकाकुशंकाहि राहणारच. संशोधन व त्याची चिकित्सा हीं वाढत्या प्रमाणांत यापुढें चालू राहणार असल्यामुळे राजवाड्यांचे हे लेख जसेच्या तसेंच छापणें हें आमच्या मतें इष्ट होय. सर्वांग संपूर्ण असा महाराष्ट्राचा इतिहास अद्याप बनावयाचा आहे. अशा स्थितींत जुन्या नवीन प्रसिद्ध होणाऱ्या माहितीनें रा. राजवाडे यांच्या विधानांत बदल करावा लागेल हें जाणत्या वाचकास सांगितलें पाहिजे असें नाहीं.

रा. राजवाडे यांच्या ह्या प्रस्तुत ग्रंथास शेवटीं सविस्तर सूचिहि जोडिल्यामुळें ग्रंथाची उपयुक्तता वाढली आहे. सूचिसंबंधानें सामान्यतः येथें असें सुचवावयाचें आहे कीं, संपूर्ण ग्रंथ न वाचतां ग्रंथाचा उपयोग करण्याचें साधन म्हणजे ग्रंथाची सूची असा कित्येकांचा समज आहे. तो बरोबर नाहीं. ग्रंथ तोंडपाठ असण्याइतका फायदा सूचीमुळें मिळतो हें खरें. पण ग्रंथांत काय आहे हें सांगणारी जशी अनुक्रमणिका तसें वाचलेलें वेळीं व नेमकें सांपडण्याची सोय म्हणजे सूची होय. ह्या पुस्तकास जोडलेली सूची इतिहाससंशोधक रा. शंकरराव जोशी वाईकर यांजकडून करवून घेतली आहे. त्यांचा येथें साभार उल्लेख करणे इष्ट आहे. रा. राजवाडे यांचे इतरहि ऐतिहासिक, भाषाविषयक व सामाजिक असे दुर्मिळ व निरनिराळ्या ठिकाणीं असलेले छोटेमोठे निबंध विषयवार व ग्रंथरूपानें एकत्रित प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत. व ह्यापुढें तसे लेख प्रसिद्ध करण्याचा आमचा विचारहि आहे. ह्या कामीं पुणें–भा. इ. सं. मंडळानें सहाय्य देण्याचें योजिलें असून हा ग्रंथहि मंडळाच्या पुरस्कृत–ग्रंथमालेंत नमूद केला ह्याबद्दल आह्मी मंडळाचे आभारी आहों.

रामनवमी श. १८५० }

**शंकर नरहर जोशी**
व्यवस्थापक चित्रशाळा, पुणें.

# पुरस्कार.

सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचें थोडक्यात वर्णन करणें 'तर महाराष्ट्र-इतिहास-संशोधक परंपरेचे **संस्थापक**' असें करितां येईल. त्यांनींच गोरस इतिहाससंशोधन प्रत्यक्ष करून दाखवून आणि तें क्षणिक कीर्तीचा लोभ सोडून देशी भाषेंतच करण्याचा कटाक्ष ठेवून महाराष्ट्राची अमोघ पैतृक संपत्ति ' दिव्यं ददामि ते चक्षुः ' असें म्हणून महाराष्ट्रास पहाण्यास समर्थ केलें.

त्यांचे वरेचसे लेख त्यांच्या ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' या मालेच्या खंडांना प्रस्तावना म्हणून प्रसिद्ध झाले. पहिलाच खंड त्यांनीं जो प्रसिद्ध केला त्यांत पानिपतावरील रोमहर्षण युद्धाची वीरकरुण कथा खुद्द भाऊसाहेब पेशवे, गोविंदपंत बुंदेले इत्यादि तेथल्या प्रमुख खेळग्यांच्याच हातांनीं लिहिलेल्या पत्रांवरून त्यांनीं विशद करून सांगितली. मूळ कागदपत्र प्रसिद्ध करतांना एकंदर त्यांत आलेल्या प्रश्नांचीच चर्चा तेवढी करावी असा दंडक राजवाडे यांनीं पाळिला नाहीं तर मराठी इतिहासासंबंधींच्या अनेक आनुषंगिक प्रश्नांचाहि त्यांनीं तेथें प्रसंगाप्रसंगानें आपल्या ओजस्वी लेखणीनें परामर्ष घेतला. अशा त्यांच्या प्रस्तावना म्हणजे वास्तविक पहातां **ऐतिहासिक प्रबंधच** होत. ज्याला इंग्रजींत **थेसिस** म्हणजे आपल्या भाषेंत **प्रबंध** असें म्हणतां येईल, अशा स्वरूपाचे व योग्यतेचे राजवाडे यांचे लेख आहेत.

खऱ्या विद्येची जातिवंत चाड असणाऱ्या कोणाही विद्वत्परिषदेनें हे प्रबंध पाहून संतोष प्रदर्शित केला असता आणि त्यांच्या कर्त्यांचे यथोचित गौरव व संभावनाहि केली असती. परंतु परकीयांच्या मुखानें व भाषेनें बोलण्याची विकृति जडलेलीं आमचीं विद्यापीठें या कामीं स्वभावतःच असमर्थ होतीं. उपेक्षेचा कहर विम्मेपणानें सोसून राजवाडे यांनीं अविरत उद्योगानें आणि अचाट बुद्धिपरिश्रमानें आपला कर्मयोग तीन तपें आचरून अखेर खुद्द उपेक्षक विद्यापीठाच्या एका उपदेशकाकडून **आदर्श** म्हणून मान्यता मिळविल्याचा चमत्कार ताजाच आहे. ( मुंबई विद्यापीठ पदवीप्रदान समारंभ. शके १८४९ )

अद्यापिहि राजवाडे यांची योग्यता व कामगिरी यांची परीक्षा पुष्कळांस व्हावयाची आहे. त्यांचे ग्रंथ आतां दुर्मिळ आहेत ते पुनर्मुद्रित करून जनतेपुढें यावे असा हेतु राजवाडे-स्मारकमंडळाचा आहे. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे तर राजवाडे एक संस्थापकच होते. अर्थात् त्यांचें यथोचित स्मारक करणें म्हणजे मंडळानें त्यांचें कार्य पुढें चालविणें होय. त्यांतच त्यांच्या उज्वल व मार्गदर्शक लेखांचें पुनर्मुद्रणहि येत. पुण्याच्या चित्रशाळेचें राजवाडे यांजवर अकृत्रिम प्रेम प्रथमपासूनच होतें. आणि त्यांच्या म० इ०

सा चा ४ था खंड प्रसिद्ध करून आणि तदनंतर अलीकडे राधामाधवविलासचंपू आणि महिकावतीची बखर हे त्यांचे सप्रस्ताव ग्रंथ प्रसिद्ध करून आपली त्यांजवरील प्रीति चित्रशाळेनें विशेषच अभिव्यक्त केली होती.

खुद्द राजवाडे विद्यमान असतां त्यांच्या सर्व लिखाणांचे खंड प्रसिद्ध करण्याच्या निदान तीनचार योजना त्यांचे पुढें मांडण्यांत आल्या होत्या. त्यांत चित्रशाळेचीहि एक होती आपले ग्रंथ आपण राष्ट्रास समर्पण केले आहेत असें राजवाडे अलीकडे आपल्या ग्रंथांवर मुद्दाम छापवीत; आणि खरेंच आहे, त्यांनीं जें केलें तें राष्ट्रांत ' मोहावरणघाती इतिहास प्रदीप ' उजळावा या अत्युदात्त हेतूनेंच केलें. या योजनांपैकीं एखादी कायम होण्यापूर्वीच राजवाडे यांनीं एकाएकीं हा लोक सोडला.तेव्हां पाहिली वाट तेवढी पुरे झाली असें समजून चित्रशाळेनें धडाडीनें हें पुनर्मुद्रण कार्य हातीं घेतलें आणि त्यांच्या मृत्यूनंतर सुमारें सत्रा वर्षांच्या आंतच ५०० पृष्ठांचा हा ऐतिहासिक प्रस्तावना-खंड प्रसिद्धहि होत आहे ही गोष्ट चित्रशाळेस भूषणावह आहे.

मूळ लेखकाची संहिता बदलावी असें कोणी म्हणणार नाहीं; म्हणून मूळ लेखांतील विधानें,माहिती जेथें चुकीची दिली गेली असेल किंवा छापतांना चुकली असेल किंवा अपुरी वा सदोष असेल तर ती तशीच ठेवावी कीं काय हा प्रश्न आहे.आमचे मतें संहिता तशीच ठेवून टीपांतून योग्य ती शुद्धिपुष्टीची जोड द्यावयास हवी. हें काम अवघड आहे आणि तें प्रस्तुत खंडांत केलेलें नाहीं. परंतु पुढेंमागें व्हावयास हवेंच हवें. राजवाडे यांनीं शेंकडों विषयां[illegible] लिखाण केलें आहे नवीन माहितीची भर पडली कीं मागील लिहिणें तेवढ्यापुर[illegible] हरताळावयासच पाहिजे खुद्द राजवाडे यांनींच पूर्वीं लिहिलेलीं विधानें नवी साहित्य प्रगट झाल्यावर त्यांची खात्री झाली तशी बदललीं आहेत. असें केल्यास ज्या नव्या वाचकांपुढें हा खंड जाईल ते त्यांतील माहिती राजवाडे यांचे नांवावर देऊन फसतील आणि सहजगत्या फसवितीलहि. याचसाठीं टीपा पाहिजेत. जीं मागील मतें व माहिती पुढील नवीन माहिती व मतें यांच्या साहाय्यामुळेंच फिरविलीं असतील किंवा फिरवावयास हवीं, तीं तशीं टीपांत दर्शित केलीं पाहिजेत. जुनी परंतु चुकीची ठरलेलीं विधानें किंवा मतें यांची जबाबदारी व दूषण व्यर्थ राजवाड्यांचे थोर नांवास लागू नये. एतदर्थ हा परिश्रम केलाच पाहिजे. तो झाला नाहीं म्हणून वाचकांनीं तरी एतद्विषयीं **पूर्ण सावधगिरी** बाळगावी असें येथें सुचवितों.

शेवटीं राजवाडे-लेखसंग्रहाचा हा पहिला खंड भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत दाखल करण्याविषयीं चित्रशाळाचालकांनीं उत्सुकता दाखवून राजवाडे स्मारकाच्या या श्रेयांत मंडळास अंशभाक् केलें याबद्दल चित्रशाळाचालक यांचे मनापासून आभार मानून हा पुरस्कार समाप्त करूं.

चैत्र शुद्ध १०।५०
पुणें

**दत्तो वामन पोतदार**
चिटणीस, भा. इ. सं मंडळ-पुणें.

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्ताव | | | १—२ |
| पुरस्कार | | | ३—४ |
| खंड | १ | प्रस्तावना | १—१२३ |
| ,, | २ | ,, | १२४—१४६ |
| ,, | ३ | ,, | १४७—२११ |
| ,, | ४ | ,, | २१२—३०० |
| ,, | ५ | ,, | ३०१—३०२ |
| ,, | ६ | ,, | ३०३—३६७ |
| ,, | ८ | ,, | ३६८—४५० |
| | | व उपोद्घात | ४५०—४५३ |
| ,, | ११ | ,, | ४५४—४६३ |
| ,, | १० | ,, | ४६४—४७१ |
| सूची | | | १—३३ |
| खंड १ ते २२ ची यादी | | | ३३ |

## इतिहाससंशोधक पुरातत्त्वभूषण
## विश्वनाथ काशिनाथ राजवाडे.



जन्म. आषाढ शुा ८ शके १७८६ } ता. १२-७-१८६४

{ मृत्यु—मार्गशीर्ष वा। शके १८४८ ता ३१-१२-१९२६.

शास्त्रज्ञान तुझें अनंत म्हणुनी वाखाणिती पंडित ।
शास्त्राचें जनकत्व मी परि तुझ्याठायीं असें मानित ।।
भाषा वा इतिहास वा बहुपरी भिन्ना समाजस्थिती ।
यांची निर्मुनि शास्त्रमार्ग बरवा त्वां लाविली संगती ।। १ ।।
आर्यांचा इतिहास वास्तव तुवां अज्ञां जनां दाविला ।
ठेवा तात सुतास तेविं अमुतें प्रस्तावनेचा दिला ।।
आहे जों इतिहासशास्त्र तंवरी कीर्ती तुझी स्थायिक ।
चारित्र्यें तुझिया तुझ्यासम जगा लाभोत संशोधक ।। २ ।।

मुकुंदराय

# प्रस्तावना ( खंड १ ला ).

## १. पूर्वजांच्या इतिहासाची आस्था महाराष्ट्रांत अलीकडील तीस पस्तीस वर्षांत नव्यानें झाली आहे.

( अ ) यूनिव्हर्सिटी स्थापन होण्याच्यापूर्वी दादोबा पांडुरंगादि जी मंडळी झाली त्यांचा काल शालोपयोगी लहानमोठीं पुस्तकें रचण्यांत गेला. इतिहासाचीं साधनें शोधून काढण्याच्या कामीं हळहळ दाखविण्यापलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं. तरी पूर्वजांचा खरा इतिहास असावा अशी इच्छा त्यावेळीं त्या लोकांना झाली हें ह्या हळहळीवरून अनुमानतां येतें.

(ब) डॉक्टर भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण मंडलीक, उमियाशंकर याज्ञिक, कृष्ण शास्त्री गोडबोले इत्यादि मंडळींनीं त्या कालीं हिंदुस्थानच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाविषयीं बरेंच लिहिलें आहे; परंतु, महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासाकडे, फार तर राहूं द्याच पण थोडें देखील, लक्ष्य देण्यास ह्या मंडळीला फुरसत झाली नाहीं.

( क ) यूनिव्हर्सिटी स्थापन झाल्यानंतर, यूरोपखंडांतील देशांचे प्राचीन व अर्वाचीन इतिहास वाचून इतिहासाविषयीं स्पष्ट व उदात्त कल्पना नव्या विद्वानांना याव्या हें साहाजिक होतें. ( १ ) ह्या नवीन कल्पनांचें प्रथम फल म्हटलें म्हणजे नीळकंठराव कीर्तने यांची ग्रांट्डफ्वरील टीका होय. कीर्तन्यांना अस्सल कागदपत्र न मिळाल्यामुळें यद्यपि त्यांनीं केलेली टीका तांत्रिक आहे तत्रापि ग्रांट्डफ्च्या ग्रंथांत दोष व न्यूनें आहेत हें दाखविण्यास तिचा उपयोग झाला आहे. हिंदु लोकांच्या भित्रेपणाविषयीं व हिंदुस्थानांतलि निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र अस्तित्वाविषयीं ह्या टीकाकाराचें म्हणणें सयुक्तिक व सशास्त्र आहे. इतकेंच कीं, ही टीका अत्यंत त्रोटक आहे. १८६७ पासून पुढें डेक्कन कॉलेजांत व कदाचित् एल्फिन्स्टन कॉलेजांत मराठ्यांच्या इतिहासाची आस्था बाळगणारी कांहीं मंडळी निपजत चालली होती असें दिसतें. ( २ ) कीर्तन्यांच्या टीकेनंतर विविधज्ञानविस्तारांतून एक बखर, एक राजनीति व एक काशीराजाचें भाषांतर अशीं तीन जुनीं बाडें बाहेर पडलीं. ( ३ ) त्यानंतर रा. साने, मोडक, चिपळोणकर व ओक ह्यांच्या अवाढव्य ( काव्य ) इतिहाससंग्रहाला सुरवात झाली. ( ४ ) पुढें लवकरच प्रभू लोकांच्या इतिहासाचीं साधनें थोडींबहुत जगापुढें आलीं. ( ५ ) नंतर कांहीं कालानें बडोदें येथें शिवराजाच्या दोन बखरी छापल्या गेल्या. ( ६ ) पुढें भारतवर्षाला प्रारंभ झाला व ( ७ ) अलीकडे वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं ऐतिहासिक लेखसंग्रहाला सुरवात केली आहे. येणेंप्रमाणें साठपासष्टांत इतिहासाच्या आस्थेची जी एक लाट उसळली ती अजून म्हणजे

१८९८ ताहि चढत्या प्रमाणावर आहे व पुढेंहि अशीच चढती राहील असा तर्क आहे. कारण, आतांपर्यंत जो साधनसंग्रह छापला गेला आहे तो जो अजून छापावयाचा राहिला आहे त्याच्या मानानें अगदींच थोडा व तुटपुंजा आहे.

## २. महाराष्ट्रांत स्वदेशाच्या इतिहासाची आस्था अठराव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकाच्या पाहिल्या चतुर्थांत बरीच होती व तत्समाधानार्थ बखरी निर्माण झाल्या.

हिंदुस्थानांत इतिहास काय तो दोन भाषांत लिहिलेला आढळतो; एक फारशींत व दुसरा मराठींत. कारण, इतिहास लिहून ठेवण्यासारखीं कृत्यें हिंदुस्थानांत मुसुलमानांच्या व मराठ्यांच्या हातूनच काय तीं म्हणण्यासारखीं घडलीं आहेत. शीख, रजपूत, मवास व पाळेगार ह्यांनींहि धुंडावे व बखेडे बरेच केले आहेत. त्यांचे गद्यपद्य इतिहास अधून मधून पहाण्यांत येतात; परंतु, संगतवार इतिहास ज्यांचा अभिमानानें सांगतां येईल अशीं व्यवस्थित प्रौढीला पोंचलेलीं राष्ट्रें म्हटलीं म्हणजे एक मराठ्यांचें व दुसरें मुसुलमानांचें. इराण, तुराण, अफगानिस्थान व अरबस्थान ह्या देशांतील मुसुलमानांना इतिहासाची गोडी पूर्वींपासूनच आहे. मुसुलमानांच्या सहवासानें, त्यांच्या तवारिखा पाहून, मराठ्यांनींहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. सध्यांपर्यंत छापून प्रसिद्ध झाल्या आहेत त्या सर्वांत बडोदें येथें छापलेली चिटणिशी बखर अगदीं जुनी आहे. त्याच्या अगोदर लिहिलेलीं कोणतीहि बखर उपलब्ध नाहीं. त्याच्यापुढें मात्र पुष्कळ बखरी लिंहिल्या गेल्या. खुद्द पेशव्यांच्या येथें बखरनवीस असत. त्यांचा धंदा जुने कागदपत्र पाहून बखरी सजाविण्याचा असे. खुद्द पेशव्यांना वाचण्याकरितां ज्या बखरी लिहिल्या जात असत त्यांतील मजकूर कालानुक्रमानें लिहिलेला असे. ह्या बखरींच्या गांवोगांव ज्या नकला होऊन गेल्या त्यांत नांवांचा व तारखांचा घोटाळा होण्याचा संभव असे. कांहीं बखरी प्रांतोप्रांतीच्या माहितगार मंडळींनीं कर्णोपकर्णी ऐकून लिहिलेल्या आहेत. त्यांत मोठमोठे प्रसंगहि वाकडेतिकडे व पौराणिक तऱ्हेनें व बाष्कळ रीतीनें वर्णिलेले आहेत. पेशव्यांच्या येथील बखरींतलि मजकूर कालानुक्रमानें लिहिला जात असे असें म्हणण्यास मजजवळ आधार आहे. दुसऱ्या माधवरावाची आजी ताई साठी म्हणून होती. तिच्या वंशजांनीं आपलें दफ्तर मला दाखविलें. त्यांत सवाईमाधवराव आठ वर्षांचे असतांना त्यांना वाचण्याकरितां एक लहानशी बखर साळबाईच्या तहापर्यंत लिहिलेली आहे. तिच्यांतील मजकूर बहुतेक कालानुक्रमानें लिहिलेला आहे. गेल्या शतकांत व पंचवीस तीस वर्षांपाठीमागें ह्या शतकांत महाराष्ट्र देशांत बखरी लिहिण्याचा व वाचण्याचा सपाटा फार असे. अक्षर चांगलें झालें म्हणजे मुलाकडून एक तरी बखर लिहवून घेण्याचा परिपाठ सार्वत्रिक असे. गांवोगांव व खेड्यापाड्यानें सुद्धां ब्राह्मणांच्या येथें व पाटील कुळकर्ण्यांच्या येथें बखरी सांपडण्याचा संभव असे. आजपर्यंत महाराष्ट्रांत खालील बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत.—

१ शहाजी महाराज भोसले यांची कैफियत ( पत्रें व यादी ४३८ ).
२ चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र.
३ ,, ,, संभाजी महाराजांची बखर.
४ ,, ,, थोरले राजाराम महाराज यांची बखर.
५ ,, ,, ,, ,, शाहूमहाराज यांची बखर.
६ ,, ,, धाकटे रामराजे यांची बखर.
७ ,, ,, शाहूमहाराज यांची बखर चतुर्सिंगाचे हकीकतीसह.
८ चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर.
९ सभासदविरचित शिवछत्रपतींचें चरित्र.
१० शिवदिग्विजय.
११ शिवप्रताप.
१२ भूषणकविकृत शिवराजभूषणकाव्य.
१३ पुरुषोत्तमकविकृत शिवकाव्य.
१४ मराठी साम्राज्याची छोटी बखर.
१५ पेशव्यांची बखर सोहनीकृत.
१६ बाळाजी विश्वनाथ यांची कैफियत ( पत्रें व यादी ४९४ ).
१७ बाजीराव बल्लाळ यांची कैफियत ( पत्रें व यादी ४९५ ).
१८ नारायणराव पेशवे यांची बखर.
१९ पांडुरंगकृत नारायणराव पेशवे यांचें ओवीबद्ध चरित्र.
२० भाऊसाहेबांची बखर.
२१ भाऊसाहेबांची कैफियत.
२२ रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर.
२३ साष्टीची बखर.
२४ विंचुरकरांची बखर.
२५ दाभाड्यांची हकीकत.
२६ गायकवाडांची हकिकत.
२७ खर्ड्याच्या स्वारीची बखर.
२८ ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र.
२९ जयराम स्वामींचें चरित्र.
३० रामदासस्वामींचें चरित्र.
३१ होळकरांची कैफियत.
३२ नागपूरकर भोसल्यांची कैफियत.
३३ मल्हारराव रामरावकृत राजनीति.
३४ संभाजी महाराजकृत राजनीति.
३५ पंतप्रधान ह्यांची शकावली.
३६ कंपनीप्रतापमंडनम्.
३७ गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत.
३८ पंतप्रतिनिधींची कैफियत.
३९ काशीराजाची बखर ( भाषांतर ).
४० पोवाडे.
४१ नानाची बखर.
४२ अमात्य बावडेकर यांची कैफियत.

### ३. परंतु एकंदरींत येथून तेथून सर्व बखरींत कालविपर्यासाचा दोष ओतप्रोत भरला आहे.

कोणतीहि बखर घ्या, तींत कालाचा विपर्यास झाला नाहीं असें क्वचितच आढळेल. पुराणांतील कल्पित कथांच्या संसर्गानें, मुद्रणकलेच्या अभावामुळें व ऐतिहासिक सत्यासत्यतेसंबंधीं लोकांत असलेल्या औदासीन्यामुळें हा दोष ह्या बखरनविसांच्या बखरींतून शिरला आहे. रामरावणी कथांच्या श्रवणानें विचारांत अतिशयोक्तींचें प्राबल्य फार झालें व

कालाच्या पौर्वापर्याचें महत्त्व ह्या बखरनविसांच्या अगदींच लक्ष्यांतून गेलें. कालविपर्यासाचा दोष अत्यंत कमी म्हटला म्हणजे " भाऊसाहेबांच्या बखरींत " अतिच कमी आहे; व अत्यंत जास्त पहावयाचा असल्यास " पेशव्यांच्या बखरींत " अमूप आहे. ह्या दोन आद्यंताच्या मध्यें इतर सर्व बखरींचें वर्गीकरण दोषांच्या न्यूनाधिक्याच्या प्रमाणानें करितां येईल.

## ४. निरनिराळ्या प्रसंगांचें अन्योन्य महत्त्व ह्या बखरींतून मुळींच दाखविलें नाहीं व क्षुल्लक गोष्टींचा निरर्थक पाल्हाल मात्र केला आहे.

[ अ ] ( १ ) शिवाजीची सूर्यवंशापासून उत्पत्ति, ( २ ) शिवाजीच्या मरणसमयीं त्याच्या कोठारांतील दाण्यागल्याची याद, ( ३ ) भाऊसाहेबाच्या बखरींतील मलकाजमानीचें रडगाणें इत्यादि कथा कमजास्त कल्पित असून क्षुल्लक आहेत. त्यांचा अन्यदृष्ट्या कितीहि उपयोग असला तरी इतिहासदृष्ट्या फारच थोडा आहे.

[ ब ] ( १ ) शिवाजीच्या पूर्वीच्या व त्याच्या वेळच्या मुसुल्मानी राज्यांची माहिती, ( २ ) शिवाजीच्या कोणत्याहि मोहिमेचा संगतवार वृत्तांत, ( ३ ) शिवाजीच्या किंवा पेशव्यांच्या गृहस्थितीची चोख हकीकत ह्या बखरींतून बिलकुल मिळण्यासारखी नाहीं. जी कांहीं थोडीबहुत माहिती दिली आहे ती इतकी असंबद्ध, परस्परविरोधी, संदिग्ध व प्रायः अविश्वनीय आहे कीं, इतर साधनांच्या साहाय्यावांचून त्यांपैकीं कोणतीहि एक खरी मानणें मोठें संकटाचें आहे.

[ क ] अस्सल कागदपत्रांच्या साहाय्याव्यतिरिक्त ह्या बखरी वाचूं गेलें असतां एक प्रकारची चमत्कारिक चूक होते. ह्या बखरींतून जो मजकूर खरा असतो तो त्यांत असलेल्या खोट्या मजकुरापासून विलग काढून घेतां येत नाहीं. सारांश, केवळ ह्या बखरींवर भिस्त ठेवून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्यास, सत्यासत्यतेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळें, तो वायफळ जाण्याची बहुतेक खात्री आहे. पुष्कळ बखरींतून एकच मजकूर एकसारिखा आल्यास, बहुमताच्या न्यायानें, तो खरा मानण्याचीहि ह्या बखरींच्या संबंधानें सोय नाहीं. पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींच्या अभावाचें साधारणत्व ह्या बखरींतून सांपडतें; परंतु, तेवढ्यावरून त्या गोष्टी झाल्याच नाहींत असें विधान करणें मोठें धोक्याचें काम होईल. तात्पर्य, एक अस्सल चिटोरें सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे. ह्या संबंधानें विचार करितां Majority of documents वर फारशी भिस्त ठेवितां येत नाहीं. कांकीं विश्वासार्ह अस्सल कागदाच्या एका चिटोऱ्यावर जितका विश्वास ठेवितां येतो तितका स्वदेशीय व विदेशीय बखरकारांच्या व बखरवजा इतिहासांच्या भाकड कथांवरती अर्थात् ठेवितां येत नाहीं.

ही स्थिति ह्या बखरींची झाली.

५. परंतु, काव्येतिहाससंग्रहांत व इतरत्र छापलेल्या पत्रांची किंमत फारच निराळ्या प्रकारची म्हणजे अत्यंत महत्त्वाची आहे.

ह्या महत्त्वाचें कारण सर्वांच्या सहज ध्यानांत येण्याजोगें आहे.

६. ह्या पत्रांच्या साहाय्यानेंच बखरींतील मजकुराच्या खरे-खोटेपणाचा निर्णय व्हावयाचा आहे; बखरींतील काल-विपर्यासाचा परिहार हींच पत्रें करितील; व बखरींत जी माहिती दिली नाहीं ती हींच पत्रें देतील.

( अ ) काव्येतिहाससंग्रहांत एकंदर ५०१ पत्रें व यादी आहेत. पैकीं नं २० च पत्र व नं. १ चें पत्र हीं एकच असल्यामुळें खरोखर ५०० च पत्रें आहेत. १ शहाजीच्या कारकीर्दीसंबंधीं, २ शिवाजीच्या कारकीर्दीतील, १ राजारामाच्या कारकीर्दीतील, ५ बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील, २६ बाजीराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील, १५९ बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील, ३२ माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीतील २३४ माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील, २१ बाजीराव रघुनाथाच्या कारकीर्दीतील, २ इंग्रजींतील, ३ शकावली, ७ वंशावली, १ हिशेबी, ७ किरकोळ, मिळून ५०१ पत्रें व यादी होतात. पैकीं ४३८, ४९४, ४९५ ह्या लहान लहान बखरी आहेत. तिन्ही शकावलीपैकीं दोन मोठ्या विश्वसनीय आहेत असें नाहीं. वंशावळींतहि बहुत अपूर्णता आहे. बाकी राहिलेलीं पत्रें मात्र पूर्णपणें विश्वसनीय व अस्सल आहेत; परंतु, तीं संगतवार अशीं फारच थोडीं असल्यामुळें त्यांचाहि इतिहासाच्या कामीं उपयोग म्हटला म्हणजे रचनेपेक्षां पुराव्याच्या रूपानें विशेष होण्यासारिखा आहे. शहाजी, शिवाजी, राजाराम, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ, माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील पहिलीं सहा वर्षे व पुढलीं दहा वर्षे, बाजीराव रघुनाथ व अव्वल इंग्रजी ह्यासंबंधीं पत्रें मुळींच नाहींत म्हटलें असतां चालेल. अर्थात् ह्यांच्या कारकीर्दीसंबंधीं माहिती ह्या संग्रहांत प्रायः नाहीं. बाकी राहिले बाळाजी बाजीराव व माधवराव नारायण; पैकीं माधवराव नारायणाच्या कारकीर्दीतील साळबाईच्या तहाच्या वेळचीं. एकदोन वर्षे अलीकडचीं व महिना दोन महिने पलीकडचीं, अशीं पत्रें काव्येतिहाससंग्रहांत सुमारें १८० आहेत. माधवराव नारायणाची बाकीची कारकीर्द बहुतेक रिकामीच आहे. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीसंबंधीं पत्रें पहातां उदगीरच्या व पानिपतच्या मोहिमेसंबंधीं एकादें दुसरेंच जुजबी पत्र ह्या संग्रहांत सांपडतें. उदगीरच्या लढाईसंबंधीं १७० वें पत्र व पानिपतच्या लढाईसंबंधीं ५३, १७१ व १७५ एवढींच काय तीं पत्रें आहेत. पैकीं १७१ कुशलार्थाचेंच आहे. ५३ वें पत्र नाना फडणविसानें आत्मचरित्र म्हणून लिहिलेलें आहे. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीसंबंधीं एकंदर १५९ पत्रें आहेत म्हणून वरती सांगितलेंच आहे. त्यांतून हीं चार वजा करितां बाकी राहिलेलीं १५५ पत्रें इ० स०

१७४० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतील कांहीं ठळक ठळक प्रसंगांसंबंधीं आहेत. सर्वांत १७५२ सालचीं पत्रें फार आहेत म्हणजे सुमारें २० आहेत, ५१ सालचीं सुमारें १४ आहेत, ५४ सालचीं १४, ५५ सालचीं १०, ४७ सालचीं १०, ५९ सालचीं ६, ५६, ५७, ६० व ६१ सालांचीं पांच पांच, ४० व ५८ सालांचीं चार चार. ४६ सालचीं ३, ४१ चीं ३, ५३ चीं २, ४८ चें १ व ४२, ४३, ४४, ४९ व ५० ह्या सालांचीं मुळींच नाहींत. ह्या सालवारी पत्रांची एकंदर संख्या ११७ होते. १५९ पैकीं बाकी ४२ राहिलीं. तीं विशेष महत्त्वाचीं नसल्यामुळें त्यांचे सालवारी वर्गीकरण केलें नाहीं.

( ब ) ऐतिहासिकलेखसंग्रहांत बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंतचीं एकंदर ३२ पत्रें आहेत. हा संग्रह सबंध छापून झाल्यावर ह्यांत माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, रघुनाथ बाजीराव, माधवराव नारायण व अंशतः बाजीराव रघुनाथ इतक्यांच्या कारकीर्दींचा एकदेशीय इतिहास येईल. आजपर्यंत माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दींतील सुमारें तीनशें पत्रें ऐतिहासिकलेखसंग्रहांत आलीं आहेत.

( क ) भारतवर्षांत आजपर्यंत एकंदर ४९ पत्रें छापिलीं आहेत. पैकीं लेखांक १९, ३९, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९ हीं आठ पत्रें बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतलि आहेत. लेखांक १९ हें पत्र विविधज्ञानविस्तारांत व लेखांक ४० हें पत्र थोरले शाहूच्या चरित्रांत पूर्वींच छापिलेलें आहे. ह्या मासिकपुस्तकांतील पत्रांतून व बखरींतून मोडी वाचनाच्या चुका अतोनात झाल्या आहेत. पत्रांना टीपा दिल्या आहेत त्याहि ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत.

### ७. तेव्हां पुढील दहा वीस वर्षांतील इतिहासजिज्ञासूंचें पहिलें काम म्हटलें म्हणजे अस्सल कागदपत्रें शोधून काढून तीं छापण्याचें आहे.

ऐतिहासिक कागदपत्र महाराष्ट्रांत शेंकडों ठिकाणीं आहेत. हिंदुस्थानांतहि पुष्कळ ठिकाणीं आहेत. हिंदुस्थानच्या बाहेर म्हणजे अफगाणिस्थान, इराण इत्यादि देशांत व लिस्बन, पॅरिस, लंडन व आम्स्टर्डाम इत्यादि शहरांत मराठ्यांच्यासंबंधीं कागदपत्र सांपडण्यासारिखे आहेत. ब्रिक्स्, ग्रांट्डफ्, म्याकेंझी इत्यादि गृहस्थांनीं विलायतेंत नेलेले कागदपत्र लंडन येथें जाऊन शोधिले पाहिजेत. सध्यां मिरजमळा येथें माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, रघुनाथ बाजीराव व माधवराव नारायण यांच्या कारकीर्दींतील पत्रें उपलब्ध झालीं आहेत. मेणवली येथें माधवराव नारायणाच्या सबंद कारकीर्दीसंबंधीं पत्रें शाबूत आहेत. शिवाजी, संभाजी, राजाराम व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या कारकीर्दीसंबंधीं अजून कांहींच उपलब्ध झालें नाहीं. मुख्यतः शिवाजी महाराजासंबंधीं पत्रें सांपडलीं पाहिजेत. महाराजांना जाऊन कांहीं फार काळ झाला नाहीं. सव्वा दोनशें वर्षें अद्यापि व्हावयाचीं आहेत. शिवाजी महाराज व त्यांचे सरदार व मुत्सद्दी यांनीं लिहिलेलीं पत्रें लक्षावधि असलीं पाहिजेत. शिवाजी महाराजांचा पसारा केवढा ! त्यांचा पराक्रम कसला अकटोविकट आणि त्यांचें धोरण किती लांबवर ! तेव्हां त्यांच्या अद्भुत चरित्रपटाच्या लाखों

भाग्यांचा यथास्थित उलगडा करण्यास त्यांचा व त्यांच्या मुत्सद्यांचा पत्रव्यवहार सांपडला पाहिजे. पहिल्या बाजीरावासंबंधीं व बाळाजी बाजीरावाच्या १७५० पर्यंतच्या कारकीर्दीसंबंधीं म्हणजे शाहूमहाराजांच्या सबंद कारकार्दीसंबंधीं देखील अद्याप प्रायः कांहींच सांपडलें नाहीं असेंच म्हणणें भाग पडतें. तसेंच, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, रघोजी भोसले, फत्तेसिंग भोसले, गोविंद हरी पटवर्धन, मुरारराव घोरपडे, संभाजी राजे कोल्हापुरकर, दमाजी गायकवाड, दाभाडे, यशवंतराव पवार, यमाजी शिवदेव, गमाजी यमाजी, बाबूजी नाईक बारामतीकर, आंग्रे, अंताजी माणकेश्वर, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव इत्यादि पुरुषांचे पत्रव्यवहार सांपडल्यावांचून इतिहासाची गुंतागुंत नीट उलगडावयाची नाहीं. माझ्या मतें खालीं दिलेल्या स्थळीं बारीक शोध केला असतां उपयोग होईल.

१ अयोध्या. २ काशी. ३ अलीगड. ४ पानिपत. ५ चरखारी. ६ बुंदी. ७ कोटा. ८ भोपाळ. ९ ग्वालेर. १० जयपूर ११ जोधपूर. १२ इंदूर. १३ देवास. १४ धार. १५ उज्जनी. १६ महेश्वर. १७ ओंकार. १८ बऱ्हाणपूर. १९ नागपूर. २० अल्जपूर. २१ अमदाबाद. २२ बडोदें. २३ मालेगांव. २४ विंचूर. २५ नाशीक. २६ जव्हार. २७ अल्लीबाग. २८ मुंबई. २९ औरंगाबाद. ३० अहमदनगर. ३१ पेडगांव. ३२ हैद्राबाद. ३३ बीड. ३४ पैठण. ३५ सातारा. ३६ वाई. ३७ ओझर्डें ३८ तासगांव. ३९ कोल्हापूर. ४० तालीकोट ४१ सांवतवाडी. ४२ सावनूर. ४३ गुत्ती. ४४ बेदनूर. ४५ श्रीरंगपट्टण. ४६ ह्मैसूर. ४७ तंजावर. ४८ मद्रास. ४९ उदेपुर. ५० आनंदवल्ली. ५१ सासवड. ५२ हिंवरें. ५३ कोरेगांव. ५४. कोपरगांव. ५५ अकोळनेर. ५६ जुन्नर. ५७ खेड. ५८ चास. ५९ वाफगांव ६० चाफळ. ६१ लिंब. ६२ टेंभुर्णी. ६३ विजापूर. ६४ औंध. ६५ महाड. ६६ काळेगांव. ६७ मुधोळ. ६८ कितूर. ६९ गुलबुर्गा. ७० तळेगांव. ७१ चिंचवड. ७२ सागर. ७३ दिल्ली. ७४ निर्मळ. ७५ वारंगळ. ७६ बेदर. ७७ अक्कलकोट. ७८ जत. ७९ फलटण. ८० पुणें. ८१ चांभारगोंदें. ८२ पंढरपूर. ८३ कायगांव. ८४ सुरत. ८५ वसई. ८६ पन्हाळा. ८७ निपाणी. ८८ कागल. ८९ शिरें. ९० रामनाथ. ९१ मलखेड. ९२ कल्याण ९३ भिंवडी. ९४ जेजुरी. ९५ रामदुर्ग. ९६ भरतपुर. ९७ कर्णोल. ९८ कडाप्पा. ९९ जिंजी. १०० चांदवड. १०१ पाटस. १०२ इचलकरंजी, १०३ भोर. १०४ बारामती. १०५ कऱ्हाड. १०६ मलकापूर. १०७ वरिवाल्हे. १०८ धावडशी. १०९ सोनोरी. ११० पेण. १११ पांडववाडी. ११२ बावधन. ११३ सुपें.

ह्या व अशाच आणखी इतर स्थळीं कांहींना कांहीं तरी कागदपत्र हटकून सांपडेल. ह्यांपैकीं कांहीं स्थळीं तर मोठमोठीं दफ्तरेंच आहेत. तीं कित्येक ठिकाणीं संस्थानिकांच्या ताब्यांत आहेत व कित्येक ठिकाणीं जहागीरदार व इनामदार ह्यांच्या ताब्यांत आहेत. ह्या दफ्तरांतील जमीनजुमला व मानपान ह्या संबंधींचे जे कागदपत्र, सनदा वगैरे असतील त्यांच्याशीं इतिहासज्ञांना फारच थोडें कर्तव्य आहे. इतिहासज्ञांची उडी म्हटली

म्हणजे राजकीय, दरबारी, यौद्धिक, औद्योगिक, कार्षिक, व्यापारीक, नैय्यायिक, लौकिक-व्यावहारिक इत्यादि कागदपत्रांवर विशेष असणार. तेव्हां असला पत्रव्यवहार इतिहास-जिज्ञासूंच्या स्वाधीन करण्यास दफ्तरांच्या मालकांस कोणतीच हरकत वाटूं नये. इ. स. १८०० पूर्वीचा कोणताहि पत्रव्यवहार दाखविण्यास हिंदुस्थानांतील कोणत्याहि मराठ्या संस्थानिकाला किंवा जहागीरदाराला कांहींच अडचण नाहीं. स्वतः आपापलीं दफ्तरें छापून काढिल्यास त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असेंच होईल. निदान, जी बाहेरची इतिहासजिज्ञासु मंडळी त्यांच्याकडे येतील त्यांना तीं तफ्तरें दाखविल्यास इतिहासज्ञ त्यांचे उपकार कालावधि विसरणार नाहींत. शिवाय हीं दफ्तरें दाखविण्यांत व प्रसिद्ध करण्यांत त्यांचे फायदे आहेत.

[ १ ] विस्मृतीच्या सर्वव्यापी अंधारांत ते व त्यांचीं घराणीं गुप्त होऊन जाणार नाहींत. शिवाजीराजे उदयास येण्यापूर्वी मुसुलमानांची सत्ता महाराष्ट्रांत निरनिराळ्या स्थलीं दीडशें, दोनशें व तीनशें वर्षे होती. त्या कालीं महाराष्ट्राच्या कांहीं भागांत मराठ्यांचेंहि राज्य होतें. दक्षिणेंत मुसुलमान येण्यापूर्वी जाधव, शेलार, चालुक्य, राष्ट्रकूट, आंध्रभृत्य, शालिवाहन इत्यादि राजकुलें आळीपाळीनें बारा पंधराशें वर्षे राज्य करीत होतीं; परंतु, ह्या सर्व मराठी राजांचा व पातशाहांचा इतिहास त्यांच्या नांवांपलीकडे फारसा कांहींच माहीत नाहीं. त्यांचीं नांवें देखील लोपून जावयाचीं; परंतु, पुराणें, ताम्रपट व तवारिखा आहेत म्हणून तीं तरी अद्याप ऐकूं येतात. महाराष्ट्रांतील संस्थानिकांच्या व जहागीरदारांच्या पूर्वजांच्या नांवांचीहि हीच दुर्दशा होण्याची वेळ आली आहे. तेव्हां ती टाळावयाची असल्यास ह्या संस्थानिकांनीं व जहागीरदारांनीं आपापलीं दफ्तरें होईल तितकी त्वरा करून स्वतः प्रसिद्ध करावीं किंवा प्रसिद्धीकरितां इतिहासशोधकांच्या स्वाधीन करून टाकावीं.

[ २ ] त्यांच्या पूर्वजांचे पराक्रम ऐकून त्यांच्या घराण्याविषयीं महाराष्ट्रांतील लोकसमूहास आदर व पूज्यता वाटूं लागेल. सध्यां, अमुक एका घराण्याचे पूर्वज मोठे होते ह्या पलीकडे कांहींच माहिती नसते. ह्या निर्गुण मोठेपणाचें सामान्य जनास ध्यान करितां येत नाहीं. तेव्हां हें मोठेपण सगुण व साकार झालें असतां म्हणजे ह्या मोठ्या पुरुषांनीं कोणकोणते पराक्रम केले ह्याची तारीखवार अशी भरपूर माहिती मिळाली असतां, लोकांना त्यांच्या मोठेपणाची व्यवस्थित कल्पना येईल.

[ ३ ] त्यांच्या घराण्याचा लोकांना आदर वाटूं लागला म्हणजे त्यांचें स्वभावसिद्ध धुरीणत्व सर्वत्र मान्य होईल.

[ ४ ] व आपण लोकसमुहाचे धुरीण आहों, असें ह्या संस्थानिकांना व जहागीरदारांना वाटूं लागलें म्हणजे ते, पूर्वजांच्याच नांवानें नव्हे, तर स्वतःच्या गुणांनीं लोकादरास पात्र होण्यास तयारी करूं लागतील.

हे अमूल्य फायदे ह्या दफ्तरांच्या प्रसिद्धीकरणापासून त्यांच्या मालकास होण्यासारिखे आहेत. इतर लोकांस व संपूर्ण देशास फायदे काय होतील हें सर्वत्र मशहूर असल्यामुळें त्यांचें येथें संकीर्तन करीत नाहीं.

## ८ ह्यांच हेतु मनांत धरून मी हीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत.

प्रस्तुत ग्रंथांत एकंदर ३०४ पत्रें आहेत. तीं सर्व १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतील म्हणजे शाहूराजाच्या मृत्यूपासून (१५ डिसेंबर १७४९ पासून) पानिपतची लढाई होऊन दहा अकरा महिन्यांपर्यंतच्या (नोव्हेंबर १७६१) अवधींतील आहेत. १७५० तील ३, १७५१ तील ११, १७५३ तील ७, १७५४ तील २०, १७५५ तील ८, १७५६ तील १, १७५७ तील ७०, १७५८ तील ५, १७५९ तील २३, १७६० तील १२५ व १७६१ तील ३१ अशीं ह्या पत्रांची सालवारीनें गणना करितां येईल. विषयवारीनें गणना केली तर १७५० तील ३ पत्रांपैकीं लेखांक १ दिल्लींतील पातशाहाशीं झालेल्या तहासंबंधीं आहे; लेखांक २ रघुनाथरावाच्या १७५० तील खानदेश-गुजराथेंतील मोहिमेसंबंधीं आहे व लेखांक २६ शाहूराजाच्या नांवानें बाळाजी बाजीरावानें पाठविलेलें आज्ञापत्र आहे. हें आज्ञापत्र शाहूच्या मृत्यूनंतर लिहिलेलें असून त्याच्यावर शाहूराजाच्या नांवाचा शिक्का आहे; परंतु, ह्याच्याच जोडीला, काव्येतिहाससंग्रहांतील ३३४ वें पत्र आहे. हें ३३४ वें पत्र २९ सप्टेंबर १७५१ त लिहिलें आहे. असें असून त्याच्यावर शाहूराजाच्या नांवाचा शिक्का आहे; १७५१ तील ११ पत्रें १७५१ त सलाबतजंग व नानासाहेब ह्यांच्यात झालेल्या झटापटींच्या अगोदरचीं आहेत. १७५२ तील एकहि पत्र नाहीं. १७५३ तील ७ पत्रांपैकीं लेखांक १४, १५, १६, १७, १८ हे लेखांक भालकीचा तह झाल्यानंतर नानासाहेब व बूसी ह्यांच्यांत उत्पन्न झालेल्या स्नेहाविषयीं आहेत. व लेखांक २७, २८ रघुनाथराव गुजराथेहून थालनेरास आल्यावरचीं आहेत. १७५४ तील २० पत्रांपैकीं लेखांक १९, २०, २१, २२, २३, २४ हीं मुसाबुसी व सलाबतजंग ह्यासंबंधीं आहेत. व लेखांक २९ पासून लेखांक ४२ मुद्धां रघुनाथरावांच्या १७५४ तील हिंदुस्थानांतील मोहिमेसंबंधीं आहेत. लेखांक ४१ त सफदरजंगाच्या मृत्यूचें वर्तमान आहे. १७५५ तील ८ पत्रांपैकीं लेखांक ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४९ व ५० हीं पत्रें रघुनाथराव व जयाप्पा रजपुताना व हिंदुस्थान ह्या प्रदेशांत असतांना लिहिलेलीं आहेत. लेखांक ४८ हें पत्र १७५५ तील नसून १७५८ तील आहे. ह्या पत्राचा सन चार आहे. दिल्लीस व दिल्लीभोंवतालच्या प्रांतांत पातशाहाच्या सिंहासनारोहणापासून सन मोजण्याची चाल असे. अलमगीर पातशाहा १७५४ च्या जुलैंत सिंहासनारूढ झाला ( पत्रें व यादी ३२ व keene. ) त्यावेळीं सुहुर्सन खमसखमसैन होता. तेव्हांपासून चवथें साल म्हटलें म्हणजे समानखमसैन येतें. त्या सालच्या जमादिलावलांत हें पत्र लिहिलें आहे. जमादिलावलाच्या २० तारखेला अबदालीचा एलची दिल्लीच्या पातशाहाला भेटावयाला आला होता म्हणून पत्रकार लिहितो; त्याअर्थी हें पत्र २० तारखेनंतर लिहिलें आहे हें उघड आहे. तेव्हां ह्या पत्राची तारीख २१ जमादिलावल, सन चार म्हणजे समानखमसैन धरावी हें सयुक्तिक आहे. म्हणजे इ. स. १७५८ च्या १ फेब्रुवारीला हें पत्र लिहिलें असावें असें होतें. ही दुरुस्त झालेली तारीख घेतली म्हणजे १०० व

१०४ ह्या टिपा काढून टाकणें जरूर आहे. तसेंच १०२ टिपेंतलि ५ व ६ ह्या ओळींतील ' हे ' पासून ' गेला ' पर्यंतचें वाक्य ह्याच टिपेंतलि १७५७ सालासंबंधींच्या मजकुराच्या पुढें नेलें पाहिजे. १७५६ तील लेखांक १२० हें एकच पत्र आहे; तें गुजराथेंतील कांहीं गडबडीसंबंधीं आहे. ही गडबड झाल्यानंतर १७५६ च्या दसऱ्यानंतर रघुनाथरावदादा व सदाशिव रामचंद्र गुजराथेंतील दंगा मोडण्यास गेले व पुढें लवकरच सदाशिव रामचंद्राला गुजराथेंत ठेवून रघुनाथरावदादा १७५७ च्या जानेवारींत माळव्यांत आले. ( लेखांक ५२ ). १७५७ तील ७१ पत्रांपैकीं लेखांक ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५८, ५९, ६०, ६१, ६३, ६६, ६७, ६९, ७०, ७१ व ७२ रघुनाथरावाच्या हिंदुस्थानांतील स्वारीसंबंधीं आहेत. लेखांक ५६, ५७ व ६२ श्रीरंगपट्टणच्या स्वारीसंबंधीं आहेत. १७५७ तील बाकीचीं सर्व पत्रें म्हणजे लेखाक ११९ पर्यंत व सुद्धां शिंदखेडच्या मोहिमेच्या अगोदरचीं आहेत. १७५७ तील लेखांक १२१ हें पत्र बाळाजी बाजीरावाचें आहे. १७५८ तील ५ पत्रांपैकी लेखांक १२२, १२३, १२४, व १२५ रघुनाथरावासंबंधीं आहेत व लेखांक १३२ गोविंदपंत बुंदेल्यासंबंधीं आहे. १७५९ तील २३ पत्रांपैकीं लेखांक १२६ ताराबाईसंबंधीं आहे, १२७ पेशव्यासंबंधीं आहे, १२८ कावडीसंबंधीं आहे, लेखांक १२९, १३० व १३१ हिंदुपतीसंबंधीं आहेत, लेखांक १३३ पासून लेखांक १४८ पर्यंत व सुद्धां शिंद्यांच्या, रोहिल्यांच्या व अबदालीच्या अंतरवेदींतील झटापटीं-संबंधीं आहेत व लेखांक १४९ उदगीरच्या मोहिमेसंबंधीं आहे. १७६० तील १२५ पैकीं लेखांक १५० पासून लेखांक १६६ पर्यंत व सुद्धां सर्व पत्रें उदागीरच्या मोहिमेसंबंधीं व अबदालीशीं शिंदेहोळकरांच्या झटापटी झाल्या त्यासंबंधीं आहेत. १७६० तील बाकींचीं पत्रें पानिपतच्या मोहिमेसंबंधीं आहेत. लेखांक २८७ हें पत्र होळीच्या पोळीच्या तंट्या-संबंधीं आहे. १७६१ तील व १७६३ तील पत्रें पानिपतच्या लढाईनंतरचीं भाऊसाहेबाच्या तोतयासंबंधीं वगैरे आहेत. येणेंप्रमाणें सुमारें ३०४ पत्रें ह्या ग्रंथांत छापिलीं आहेत.

लेखांक ३ पासून लेखांक २५ सुद्धां पत्रें पैठणास वाण्याच्या दुकानीं मिळालीं. लेखांक २६ पासून ( लेखांक ४८ खेरीज करून ) लेखांक ५० सुद्धां पत्रें मिरज येथील वासुदेव शास्त्री खरे ह्यांनीं दिलीं. लेखांक १, २, ४८ व लेखांक ५१ पासून लेखांक १२२ सुद्धां पत्रें वाई येथील गोविंदराव भानू यांच्या येथील आहेत. लेखांक १२२ पासून लेखांक ३०४ सुद्धां सर्व पत्रें वाई येथील दादासाहेब येरंडे यांच्या दफ्तरांतील आहेत. दादासाहेब येरंडे यांचे पूर्वज जनार्दनपंत येरंडे ह्यांना नानासाहेबांनीं, गोविंद बल्लाळ, बुंदेलखंडांतील पेशव्यांचे मामलतदार, यांजवर दरखदार म्हणजे तपासनवीस म्हणून पाठविले होते येरंडे हे १७५७ पासून १७६१ पर्यंत बुंदेलखंड व अंतरवेद ह्या प्रदेशांत होते. त्या अवधींत हीं पत्रें त्यांच्याजवळ आलीं तीं त्यांनीं देशीं परत आल्यावर वाई येथें आपल्या वाड्यांत ठेवून दिलीं. तीं १७६१ पासून १८९७ एप्रिलपर्यंत त्यांच्या वाड्यांतील एका अंबारांत एका कातड्यानें मढविलेल्या पेटाऱ्यांत शाबूत, कोरीकरकरीत, जशींच्या तशीं पडून होतीं. ह्या पेटाऱ्यांत एकंदर सुमारें ७०० पत्रें होतीं; त्यांपैकीं १८२ पत्रें पानिप

नच्या मोहिमेसंबंधीं वगैरे आहेत. बाकीं राहिलेली पत्रें माधवरावाच्या कारकीर्दीतील हिंदुस्थानांतील घडामोडीसंबंधीं खासगी व जमीन महसुलासंबंधीं आहेत.

ह्या सर्व पत्रांच्या तारखा प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रीवरून ठरवून टाकिलेल्या आहेत. पत्रांतील कठीण शब्दांचे अर्थ प्रायः दिलेले नाहींत. कारण, अलीकडील २० वर्षांत काव्येतिहाससंग्रहाशीं महाराष्ट्रवाचकांचा बराच परिचय झाला असल्यामुळें तें काम आतां न केलें असतां चालण्यासारिखें आहे. शिवाय, आमचे एक मित्र सतराव्या व अठराव्या शतकांतील ऐतिहासिक लेखांतून आलेल्या कठिण शब्दांचा कोश तयार करीत आहेत व तो लवकरच छापून तयार होईल असा अजमास आहे. हीं पत्रें वाचणारास महाराष्ट्राचा स्थूल इतिहास माहीत आहे असें गृहीत धरिलें आहे. पत्र कोणीं कोणास लिहिलें आहे हें पत्रांतूनच लिहिलेलें असतें व पत्र केव्हां लिहिलेलें आहे हें प्रत्येक पत्राच्या मथळ्यावरील तारखेवरून समजून येईल. हीं सर्व पत्रें १७५० पासून १७६२ च्या मधील अवधींतील असल्यामुळें तीं कोणकोणत्या प्रसंगाला अनुलक्षून आहेत हें सहज कळून येण्यासारिखें आहे. शिवाय, ह्या ग्रंथांतील बहुतेक पत्रें संगतवार लागलेलीं आहेत. तेव्हां अमुक एक पत्र अमुक एका प्रसंगाला अनुलक्षून आहे हें समजण्याला अडचण यावी असें नाहीं. तरी वाचकांना संगतवार पत्रांचेंहि अनुसंधान सहज व्हावें म्हणून इ. स. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या सर्व मोहिमांचे तक्ते खालीं देतों. ह्या तक्त्यांच्या, इतर इतिहासांच्या व पत्रांखालीं दिलेल्या टिपांच्या साहाय्यानें पत्रांचें अनुसंधान कळण्यास वास्तविक पाहिलें तर हरकत पडूं नये.

## तक्ता पहिला.

### नाना, भाऊ व विश्वासराव ह्यांच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| सन. | महिना. | स्थल. | तपशील. |
|---|---|---|---|
| १७४९ | डिसेंबर. | सातारा. | १५ डिसेंबर शाहूचा मृत्यु. |
| १७५० | जानेवारीपासून एप्रिल पर्यंत. | सातारा. | प्रतिनिधीचें व यमाजी शिवदेवाचें बंड. |
| | मे पासून अक्टोबरपर्यंत. | पुणें. | भाऊ रामराजाला घेऊन प्रतिनिधीवर जातात. ताराबाई कांहीं महिने पुण्यास, भाऊ सातारा, पंढरपूर, सांगोलें, मंगळवेढे इत्यादि ठिकाणीं जातात. भाऊंचा व कोल्हापूरकरांचा संबंध. |
| | नोव्हेंबरपासून डिसेंबर पर्यंत. | पुणें. | भाऊ भांडारकवठ्यावरून पुण्यास. |
| १७५१ | जानेवारी | गंगातीर. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | फेब्रुवारी. मार्च. | खंदार, इंदूर, कलबुर्गे व रायचूर. | भाऊ, रामचंद्र बावा व नाना सलाबतजंगावर स्वारी करितात. सलाबतापासून दोन लाख रुपये तुंगभद्रेवर घेऊन साताऱ्याकडे येऊं लागतात. |
| | एप्रील. | नजीक सातारा, वडूत, वऱ्या, गेंड्याचा माळ. | नाना पुरंदरे गेंड्याच्या माळावर दमाजींचा पराभव करितो. इतक्यांत नानासाहेब साताऱ्याजवळ येऊन पोंचतात. |
| | मे पासून आगष्ट पर्यंत. | पुणें. | |
| | सप्टेंबर पासून डिसेंबर पर्यंत. | खेड, घोडनदी, कुकडी नदी. | सलाबतजंग व बुसी पुण्यावर चालून येतात. त्यावर नाना, दादा, भाऊ, रामचंद्रबावा, महादोबा पुरंदरे, एकबोटे व बाबूराव फडणीस चालून जातात. |
| १७५२ | जानेवारी ते मार्च. | जुन्नर. नाशीक. त्रिंबक. | |
| | एप्रिल ते आगष्ट. | पुणें. | शिंदे व होळकर गाजुद्दिनाला घेऊन अवरंगाबादेला येतात. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर. | भालकी. | भाऊ, नाना व रामचंद्रबावा निजामावर चाल करितात. भालकीची लढाई. |
| १७५३ | जानेवारी ते जून | हरपन्हळी. चित्रदुर्ग, श्रीरंगपट्टण. | नाना, भाऊ व रामचंद्रबावा श्रीरंगपट्टणावर स्वारी करितात. (का० सं० पत्रें व यादी १४). |
| | जुलै ते डिसेंबर. | पुणें. | |
| १७५४ | जानेवारी ते मे. | होळीहोन्नूर. | भाऊ मोर्चांत तीन दिवस. रामचंद्रबावा |
| | जून ते नोव्हेंबर. | पुणें. | |
| | डिसेंबर. | कृष्णातीर. | |
| १७५५ | जानेवारी. फेब्रुवारी. | कृष्णातीर. | महादोबा पुरंदरे व माधवराव पानशी बिदनूरच्या स्वारीवर पुढें जातात. व मे-जूनमध्यें पुण्यास परत येतात. |
| | मार्च. | नाशीक. त्रिंबक. | नानासाहेब सिंहस्थाकरितां व सलाबताला दरडावण्याकरितां कायगांवटोक्यावरून नाशिकास जातात. |

| | | | |
|---|---|---|---|
| | एप्रिल ते अक्टोबर. | पुणें. | |
| | नोव्हेंबर. | कृष्णातीर. | |
| | डिसेंबर. | घटप्रभातीर. | |
| १७५६ | जानेवारी ते जून. | सावनूर. | नाना, दादा, भाऊ, मल्हारराव, जानोजी व मुधोजी भोसले, विठ्ठल शिवदेव, बुसी व सलाबत हे मुजफरजंग, मुरारराव व सावनूरकर नबाब ह्यांना सावनूर येथें कोंडतात. भाऊ मोर्चांत. माधवराव हजर. दादा पुढें कितुरास. गोपाळराव पटवर्धन पुढें सोंध्यास. |
| | जुलै ते डिसेंबर. | पुणें. | |
| १७५७ | जानेवारी ते जून. | कृष्णातीर. श्रीरंगपट्टण. | श्रीरंगपट्टणची स्वारी. बळवंतराव मेहेंदळे व गोपाळराव पटवर्धन दुसऱ्या बाजूनें आधींच श्रीरंगपट्टणास येतात. भाऊ मोर्चांत. |
| | जुलै ते आक्टोबर. | पुणें. | विश्वासराव, दत्ताजी, भाऊ व महादजी निजामावर स्वारी करितात. पुढें नाना मदतीला येतात. शिंदखेडची लढाई. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर. | सलाबताचा प्रांत. | |
| १७५८ | जानेवारी ते एप्रिल. | सलाबताचें राज्य. | विश्वासरावाला शिंदखेडच्या लढाईंत मदत न केल्याबद्दल भोसल्यावर दोष ठेवून त्याच्यावर चालून जातात. |
| | मे ते अक्टोबर. | पुणें. | |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | कोकण. | |
| १७५९ | जानेवारी, | पुळ्याचा | गोपाळराव पटवर्धन श्रीरंगपट्टणास. |
| | फेब्रुवारी. | गणपती. | |
| | मार्च ते नोव्हेंबर. | पुणें. | उदगीरच्या मोहिमेची तयारी. |
| | | पेडगांव. | |
| | | नगर. | |
| | डिसेंबर. | सलाबताचें राज्य. | उदगीरची मोहिम. |
| | | उदगीर. | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७६० | जानेवारी ते मार्च. | उदगीर. | उदगीरची लढाई. दादा, भाऊ, विश्वासराव. मेहेंदळे, इब्राईमखान, गोपाळराव पटवर्धन वगैरे वगैरे. |
| | एप्रिल ते डिसेंबर. | हिंदुस्थान. पानिपत. | पानिपतच्या मोहिमेला भाऊ व विश्वासराव जातात. दादा निजामावर कांहीं वेळ टेहेळणी करितात. गोपाळराव पटवर्धन कर्नाटकाची बाजू संभाळितात. नाना नोव्हेंबरपर्यंत पुण्यास. |
| १७६१ | जानेवारी. | पानिपत. | नाना अवरंगाबादेवरून खेचीं वाड्यांत जातात. |
| | फेब्रुवारी ते जून. | नाशीक. पुणें. | नाना पुण्यास येऊन २३ जूनला समाप्त. भाऊ व विश्वासराव पानिपतच्या गर्दीत समाप्त. माधवराव व गोपिकाबाई पुण्यास. |

## तक्ता दुसरा.

### जयाप्पा, मल्हारराव, दत्ताजी व जनकोजी ह्यांच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| सन. | महिना. | स्थल. | तपशील. |
|---|---|---|---|
| १७४९ | डिसेंबर. | सातारा. | |
| १७५० | जानेवारी ते मार्च. | सातारा. | |
| | एप्रिल ते डिसेंबर. | राजपुताना, जयपूर. | ( का. स. पत्रें व यादी १६१ ) |
| १७५१ | जानेवारी, फेब्रुवारी. | दिल्ली. | |
| | मार्च ते जून. | रोहिलखंड. | कादरगंजाची लढाई. |
| | जुलै ते सप्टेंबर. | माळवा. सैंधें. | |
| | आक्टोबर ते डिसेंबर. | दिल्ली. | महादजी शिंदे व तुकोजी होळकर कोरे गांवास. |
| १७५२ | जानेवारी ते जून. | झांशीं. दिल्ली. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | जुलै ते डिसेंबर. | नर्मदा. अवरंगाबाद. भालकी. | जयाप्पा व मल्हारराव गाजुद्दिनाला घेऊन दक्षिणेंत येतात. गाजुद्दिन सप्टेंबरांत मरतो. भालकीची लढाई. |
| १७५३ | जानेवारी ते मे. | चांभारगोंदें. वाफगांव. | दत्ताजी २३ मे १७५३ पर्यंत श्रीगोंद्यास (पत्रें व यादी ३४०) रहातो. दत्ताजी श्रीगोंद्यास. होळकर हिंदुस्थानांत जातो. |
| | जून ते डिसेंबर. | रजपुताना. | जयाजी थेट हिंदुस्थानांत जातो. दत्ताजी सप्टेंबरांत रघुनाथरावास थालनेरास भिळतो व सर्व मिळून रजपुतान्यांत जातात. |
| १७५४ | जानेवारी ते मे. | कुंभेर. | |
| | जून ते जुलई. | कुंभेर. मथुरा. | जयाप्पा जुलैंत नागोराकडे जातो. मल्हारराव रघुनाथरावाबरोबर. दत्ताजी व जनकोजी जयाप्पाबरोबर नागोरास जातात. |
| | आगष्ट | कृष्णगड. | |
| | आक्टोबर. | मेडतें. | मल्हारराव रघुनाथरावाबरोबर |
| | नोव्हेंबर. | नागोर. | दिल्लीस व रोहिलखंडांत. |
| | डिसेंबर. | | |
| १७५५ | जानेवारी ते जून. | नागोर. | ३० जूनला जयाप्पा मारला जातो. होळकर रघुनाथरावाबरोबर दिल्ली-रजपुतान्यांत. |
| | जुलै ते डिसेंबर. | नागोर. | दत्ताजी व जनकोजी नागोरचा वेढा चालवितात. अंताजी माणकेश्वर मदतीस. होळकर रघुनाथरावाबरोबर पुण्याहून सावनुरास. |
| १७५६ | जानेवारी ते मार्च. | नागोर, बुंदीकोटा. | |
| | एप्रिल ते जून. | बुंदीकोटा. | मल्हारराव सावनुरास. |
| | जुलै ते डिसेंबर. | चांभारगोंदें. | जनकोजी व दत्ताजी देशीं येतात. |
| | | | मल्हारराव सावनुराहून माळव्यांत जातो. |
| १७५७ | जानेवारी ते जुलै. | चांभारगोंदें. | मल्हारराव रघुनाथरावाबरोबर हिंदुस्थानांत जातो. |
| | आगष्ट ते डिसेंबर. | सलबताचें राज्य. | दत्ताजी व जनकोजी शिंदखेडच्या मोहिमेंत विश्वासरावाबरोबर, होळकर रघुनाथरावाबरोबर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गोदावरी तीर. | |
| | | औरंगाबाद. | |
| | | शिंदखेड. | |
| —१७५८ | जानेवारी ते मे. | सलाबताचें राज्य. | |
| | | चांभारगोंदें. | |
| | आगष्ट ते डिसेंबर. | माळवा. रजपुताना. | होळकर रघुनाथरावाबरोबर माळव्यात येतो. रघुनाथराव पुण्यास जातो. |
| १७५९ | जानेवारी फेब्रुवारी. | दिल्ली. | |
| | मार्च ते एप्रिल. | सतलजनदी. | माबाजी शिंदे लाहोरास जातो. |
| | | लाहोर. | |
| | | शुक्रताल. | रोहिले व सुजाउद्दवला यांशीं लढाई. |
| | मे ते नोव्हेंबर. | रोहिलखंड. | होळकर जयपुराजवळ. |
| | | अंतरवेद. | |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर. | सरहिंद. | |
| | | पानिपत. | अबदालीशीं दत्ताजी जनकोजी लढतात. |
| | | दिल्ली. | |
| | | दिल्ली, | दत्ताजी अबदालीशीं लढतो. दत्ताजीचा मृत्यु. |
| १७६० | जानेवारी ते एप्रिल. | भरतपूर, सबलगड, | होळकर व जनकोजी अबदालीशीं लढतात. एप्रिलांत अबदाली यमुनेच्या पलीकडे जातो व सरदार अलीकडे जातात. |
| | मे ते डिसेंबर. | पानिपतची मोहीम. | |
| १७६१ | जानेवारी. | पानिपत. | जनकोजीचा मृत्यु. |
| | फेब्रुवारी. | | होळकर पानिपताहून माळव्यांत येतो. |

## तक्ता तिसरा.

### रघुनाथरावाच्या १७५० पासून १७६१ पर्यंतच्या हालचालींचा तक्ता.

| | | |
|---|---|---|
| १७४९ | डिसेंबर | सातारा. |
| १७५० | जानेवारी ते | खानदेश. |
| | जून. | गुजराथ. |
| | जुलै ते नोव्हेंबर. | पुणें. |

| | | |
|---|---|---|
| | डिसेंबर, | खानदेश. |
| १७५१ | जानेवारी ते जून. | गुजराथ. |
| | जुलै ते आगष्ट. | पुणें. |
| | सप्टेंबर, आक्टोबर. | खानदेश. |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | जुन्नर. कुकडी नदी. कोरेगांव. |
| १७५२ | जानेवारी ते जून. | खानदेश. बागलाण. वऱ्हाड. |
| | जुलै ते नोव्हेंबर. | भालकीची मोहीम. सलाबतजंगाचें राज्य. अवरंगाबाद. |
| | डिसेंबर. | खानदेश. |
| १७५३ | जानेवारी ते जून. | गुजराथ. पेटलाद. अमदाबाद. |
| | जुलै ते सप्टेंबर. | थालनेर. |
| | आक्टोबर ते डिसेंबर. | माळवा, रजपुताना. |
| १७५४ | जानेवारी. ते मे. | कुंभेर. |
| | जून ते डिसेंबर. | दिल्ली. |
| १७५५ | जानेवारी, फेब्रुवारी. | रोहिलखंड. |
| | मार्च ते मे. | रजपुताना. |
| | जून ते आगष्ट. | माळवा, खानदेश. पुणें. |
| | सप्टेंबर, आक्टोबर. | पुणें. |
| | नोव्हेंबर, | गलगलें ( गळतगें ), |
| | डिसेंबर. | कृष्णातीर. |
| १७५६ | जानेवारी ते जून. | सावनूर. कितूर. |
| | जुलै ते सप्टेंबर. | पुणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| | आक्टोबर. | खानदेश. | सदाशिव रामचंद्र गुजराथेंत |
| | नोव्हेंबर. | गुजराथ. | आमदाबादेकडे जातात. |
| | डिसेंबर. | थाळनेर, बऱ्हाणपूर. | |
| १७५७ | जानेवारी ते मे. | इंदूर, जयपूर. | |
| | जून ते डिसेंबर. | दिल्ली, रोहिलखंड, अंतरवेद. | |
| १७५८ | जानेवारी ते मार्च. | सरहिंद, दिल्ली. | |
| | एप्रिल ते जून. | लाहोर. | |
| | जुलै ते आक्टोबर. | रजपुताना, माळवा, खानदेश. पुणें. | |
| | नोव्हेंबर, डिसेंबर. | पुणें. | |
| १७५९ | जानेवारी ते नोव्हेंबर. | पुणें. | |
| | डिसेंबर. | पेडगांव. | |
| १७६० | जानेवारी ते मे. | उदगीर. | |
| | जून ते | सलाबताचें राज्य | |
| | नोव्हेंबर. | पुणें. | |
| | डिसेंबर. | वऱ्हाड. | |
| १७६१ | जानेवारी ते मार्च. | बऱ्हाड, गोदातीर. | |
| | एप्रिल ते आक्टोबर. | पुणें. | |

## स्पष्टीकरण.

१ बाळाजी बाजीराव, २ सदाशिव चिमणाजी, ३ रघुनाथरावदादा, ४ विश्वास-राव, ५ जयाप्पा, ६ दत्ताजी, ७ जनकोजी, ८ मल्हारराव, ९ विठ्ठल शिवदेव, १० नारो शंकर, ११ साबाजी शिंदे, १२ गोविंदपंत बुंदेले, १३ गणेश संभाजी, १४ गोपाळराव

गणेश, १५ गोपाळराव बापूजी, १६ अंताजी माणकेश्वर, १७ यशवंतराव पवार, १८ सदाशिव रामचंद्र, १९ गोविंद हरी, २० गोपाळराव गोविंद, २१ बळवंतराव मेहेंदळे, २२ महादाजी अंबाजी, २३ इब्राईमखान गारदी, २४ रघोजी भोसले, २५ जानोजी भोसले, २६ मुधोजी भोसले, २७ मानाजी आंग्रे, २८ राघोजी आंग्रे, २९ त्रिंबकराव विश्वनाथमामा, ३० नाना पुरंधरे, ३१ दमाजी गायकवाड, ३२ कोन्हेर त्रिंबक एकबोटे, ३३ केदारजी गायकवाड, ३४ बापूजी खंडेराव चिटणीस, ३५ वामोरीचे नागोराम, ३६ समशेरबहादर व ३७ रघोजी करांडे हे इतके लोक उत्तम सेनापति होते. ह्यांपैकीं प्रत्येकानें निरनिराळ्या वेळीं स्वतंत्र सैन्याचें आधिपत्य घेऊन मोहिमा सर केल्या आहेत. तेव्हां ह्या प्रत्येकाच्या मोहिमांचे सालवार तक्ते देतां आले असते तर फार उपयोगाचें झालें असतें. परंतु, अस्सल ऐतिहासिक लेखांच्या कोताईमुळें तसें सध्यां करितां येत नाहीं. सध्यां बाळाजी बाजीराव, सदाशिव चिमणाजी, रघुनाथरावदादा, विश्वासराव, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी व मल्हारराव यांच्या मोहिमांचेच तेवढे तक्ते वरतीं दिले आहेत. त्यावरून १७५० पासून १७६१ पर्यंत मराठ्यांच्या हिंदुस्थानभर एकंदर ठळक ठळक मोहिमा झाल्या किती, त्यांचा बहुतेक नक्की आंकडा खालीं काढून दाखविला आहे.

१७४९ च्या डिसेंबरांत शाहूराजे वारले. १७५० च्या जानेवारींत रामराजे राज्यावर आले. मार्चएप्रिलांत प्रतिनिधि व त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव ह्यांनीं बंड केलें. तें मोडण्यास भाऊसाहेबांनीं सांगोल्यावर ( १ ) स्वारी केली ही स्वारी १७५० च्या सप्टेंबरांत संपली. ( धा. रा. च. ५ ). शाहूराजाच्या मरणसमयीं शिंदे, होळकर देशीं आले होते; ते १७५० च्या एप्रिलपर्यंत साताऱ्यास होते. पुढें हिंदुस्थानांत बागलाण, खानदेश इत्यादि प्रदेशांतून जातांना त्यांनीं, नासरजंग आर्काटाकडे गुंतला आहे असें पाहून, त्याचे घोडप वगैरे किल्ले ( २ ) काबीज केले. १७५० च्या जानेवारींत रघुनाथरावांनीं गुजराथेवर आपली पहिली (३) स्वारी केली व जुलैंत ते खानदेशांत प्रकाशाजवळ आले ( लेखांक २).

नासरजंग १७५० च्या डिसेंबरांत मारला गेला. मुसफरजंगाचीहि तीच व्यवस्था १७५१ च्या जानेवारींत झाली. नंतर बूसी व रामदासपंत ह्यांच्या साहाय्यानें सलाबतजंग मसनदीवर आला. तो कडप्पाहून अवरंगाबादेस परत येत असतांना बाळाजीनें अवरंगाबादेवर १७५१ च्या जानेवारींत ( ४ ) स्वारी करून ( पत्रें व यादी १६१ ) व तेथून १५ लाख खंडणी घेऊन सलाबताला रायचूरपाशीं कृष्णेवर मार्चांत गांठिलें व गाजूद्दिन येण्याची भीति दाखवून त्याच्यापासून सडकून मुलूख हबकणार तों साताऱ्यास दमाजी येऊन पोहोंचल्याची वार्ता आल्यामुळें दोन लाखांची चिरीमिरी ( Malleson's The French in India. P. 275 ) घेऊन त्याला साताऱ्यास यावें लागलें ( पत्रें व यादी १६८ ). इकडे नाना पुरंधरे, नागोराम मेघश्याम व बापूजी खंडेराव ह्या त्रिवर्गांनीं दमाजीला गेंज्याच्या माळावर ( ५ ) वठणीस आणिलें व ताराबाईच्या पक्षाचे हातपाय मोडून टाकिले. हिंदुस्थानांत जयाप्पा, मल्हारराव व साबाजी ह्यांनीं ( पत्रें व यादी १६८ )

वाजिराच्या विनंतिवरून रोहिलखंडांत (६)स्वारी करून कादरगंजाजवळ दहा हजार रोहिला बुडविला व वजीर फत्तेच्या मसनदीवर वसविला ( पत्रें व यादी १६२ ). मार्चांत कृष्णेवर दिलेल्या त्रासाचा सूड उगविण्याकरितां सलाबत बुसीला घेऊन कोरेगांवापर्यंत आला; तेव्हां त्याला तोंड देण्यास पेशव्यांस ( ७ ) स्वारी काढणें भाग पडलें.

१७५२ च्या जुलैंत शिंदे होळकर गाजुद्दिनाला ( अ ) घेऊन नर्मदेवर आले. इकडून बाळाजीहि औरंगाबादेवर सप्टंबरांत ( ८ ) चाल करून गेले. डिसेंबरपर्यंत सलाबताच्या राज्यांत राहून त्यांनीं भालकी येथें सलाबताला यथास्थित चोपलें. शिंदे होळकरांनीं ( ब ) खानदेशाच्या बाजूनें, बाळाजीनें नगरच्या बाजूनें व जानोजी भोसल्यानें अलजपूर-बाळापुरच्या ( क ) बाजूनें सलाबताला कोंडून टाकिलें. तेव्हां तो तहाच्या गोष्टी बोलूं लागला. रघुनाथरावदादांचाहि हात ( ड ) ह्या मोहिमेंत होता. मानाजी आंग्र्यानेंहि तुळाजीवर ( ९ ) स्वारी केली.

१७५३ च्या जानेवारींत रघुनाथरावदादा भालकीहून निघाले ते थेट गुजराथेंत ( १० ) अमदाबादेवर गेले; होळकर माळव्यांत गेले; शिंदे देशीं मेपर्यंत राहिले; जानोजी गाविलगडावर ( ११ ) गेला; व बाळाजी बाजीराव ( १२ ) श्रीरंगपट्टणावर तसेंच चालून गेले ( पत्रें व यादी १४ ). १७५३ च्या जून-जुलैंत दादा थालनेरास आले; नाना श्रीरंगपट्टणाहून पुण्यास आले; होळकर इंदुरास जाऊन बसले; व शिंदे श्रीगोंद्याहून निघून रघुनाथराव दादास मिळण्यास थालनेरास सप्टंबरांत गेले. दादांनीं १७५३ च्या सप्टंबरापासून डिसेंबरपर्यंत ( १३ ) माळव्यांतील मवाशीलोक व संस्थानिक ताळ्यावर आणिले.

१७५४ च्या जानेवारींत बाळाजी बाजीराव ( १४ ) होळीहोन्नूरच्या स्वारीस गेले; रघुनाथराव दादांनीं ( १५ ) कुंभेरीस वेढा दिला; व जानोजी ( १६ ) निजामअल्लीवर चालून गेला. १७५४ च्या ३ जुलैस बाळाजी पुण्यास आले; व कुंभेरीहून दादा दिल्लीस गेले; जयाप्पानें ( १७ ) मेडत्याकडे स्वारी केली व विठ्ठल शिवदेवानें सप्टंबरांत ( १८ ) ग्वालेरीस वेढा घातला.

१७५५ च्या जानेवारींत बाळाजी बाजीराव ( १९ ) विदनूरच्या स्वारीस निघाले, कृष्णेपर्यंत गेले व तेथें महादाजी अंबाजी पुरंधऱ्यावर स्वारी सोपवून सिंहस्थाकरितां टोक्यावरून नाशकास परतले ( पत्रें व यादी १६ ). १७५५ त दादा दिल्ली, रोहिलखंड, कुमाऊ, काशी, प्रयाग, जयनगर, रजपुताना इत्यादि ठिकाणीं ( २० ) स्वारी करून आगस्टांत पुण्यास आले. जयाप्पानें नागोरास ( २१ ) वेढा दिला. जानोजीनें निजामावर ( २२ ) स्वारी केली. दत्ताजीनें नागोरचा वेढा संपवून ( २३ ) बुंदीकोट्याच्या राणीस १७५६ त मदत केली.

१७५६ च्या जानेवारींत बाळाजी बाजीरावानें, सदाशिव चिमणाजी, जानोजी भोसले, मुधोजी भोसले, विठ्ठल शिवदेव, महादोबा पुरंधरे, मल्हारराव होळकर इत्यादि

मंडळीसह सावनुराला ( २४ ) वेढा दिला. रघुनाथरावदादा हिंदुस्थानांतून १७५५ च्या आगस्टांत पुण्यास येऊन, तेथून गलगल्यास आपलें लग्न करून, बाळाजीस सावनुरास मिळाले व तेथून निघून त्यांनीं चितूरावर ( २५ ) स्वारी केली. मानाजीनें संभाजीवर विजयदुर्गास ( २६ ) स्वारी केली. १७५६ च्या सप्टेंबर-आक्टोबरांत रघुनाथराव दादांनीं सदाशिव रामचंद्राला घेऊन गुजराथेवर स्वारी केली.

१७५७ च्या जानेवारींत बाळाजी बाजीरावानें श्रीरंगपट्टणावर ( २७ ) स्वारी केली. गोपाळराव पटवर्धनानें सोंधेबिदनूर प्रांतांतून श्रीरंगपट्टणाला ( २८ ) जबरदस्त शह दिला व बळवंतराव मेहेंदळ्यानें गुतीकडून चिक्कक्रुष्णराजाला चेपिलें. १७५६ च्या नोव्हेंबर-डिसेंबरांत व १७५७ च्या जानेवारी-जुनांत विश्वासराव व दत्ताजी ह्यांनीं सलाबतजंगावर ( २९ ) स्वारी केली. १७५७ च्या जुलैंत बाळाजी पुण्यास आले व नंतर सप्टेंबरांत त्यांनीं निजामावर स्वारी करून विश्वासरावाच्या हातून सलाबताचा शिंदखेडास ( ३० ) पराभव करविला. १७५७ त रघुनाथरावांनीं गुजराथेंतून हिंदुस्थानांत ( ३१ ) स्वारी केली.

१७५८ त रघुनाथरावांनीं लाहोरास ( ३२ ) स्वारी केली. बाळाजी बाजीराव व विश्वासराव ह्यांनीं निजामावर ( ३३ ) टेहळणी केली व जानोजी भोंसल्याला वठणीस आणिलें.

१७५९ त गोपाळराव पटवर्धनानें श्रीरंगपट्टणावर ( ३४ ) स्वारी केली. दत्ताजीनें रोहिलखंड व लाहोर या प्रदेशावर ( ३५ ) स्वारी केली आणि मानाजी व राघोजी आंग्रे यांणीं कांसे, उंदेरी इत्यादि शामळाच्या स्थलांवर ( ३६ ) चाल केली.

१७६० त भाऊंची उदगीरची ( ३७ ) मोहीम झाली. दत्ताजीचें अबदालीशीं ( ३८ ) युद्ध झालें. मल्हाररावाचें अबदालीशीं ( ३९ ) युद्ध झालें व पानिपतची ( ४० ) मोहीम झाली.

१७६१ त पानिपतचीं शेपटें. ( ४१ ) जानोजी भोंसले, गोपाळराव पटवर्धन, रघुनाथराव, त्रिंबकराव विसाजी कृष्ण, बाळाजी गोविंद इत्यादींनीं मराठ्यांची उध्वस्त झालेली सत्ता स्थापण्यास केलेले प्रयत्न. ( ४२ ) कोळ्यांचीं कोळवणांत बंडें.

येणेंप्रमाणें एकंदर बेचाळीस मोहिमांचे उल्लेख, काव्येतिहास संग्रहांतील पत्रांतून, ऐतिहासिक संग्रहांतील पत्रांतून व मीं सध्यां छापिलेल्या पत्रांतून सांपडतात. ह्याखेरीज आणखी कांहीं मोहिमा १७५० पासून १७६१ पर्यंत झाल्या नाहींत असें मात्र कोणीं समजू नये. गुजराथेंत दमाजी गायकवाड, खिलीस अंताजी माणकेश्वर, बुंदेलखंडांत गोविंदपंत बुंदेले, अंतर्वेदींत गोपाळराव गणेश, गणेश संभाजी व गोपाळराव बापूजी इत्यादि मंडळी ह्या अकरा वर्षांत काय करीत होती ह्याचा बिलकूल पत्ता नाहीं. तसेंच जानोजी भोंसले, रघूजी करांडे, विसाजी कृष्ण बिनिवाले मुरारराव घोरपडे, कोल्हापूरकर इत्यादि दक्षिणेंतील सरदार नक्की काय करीत होते ह्याचाहि बहुतेक बिलकूल पत्ता नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचें सध्यां मुख्य भांडार म्हटलें म्हणजे ग्रांट् डफचा इतिहास होय. ह्या इतिहासांत

ह्या सरदारांच्या कृत्यांचा वृत्तांत मुळींच दिलेला नाहीं; ह्यावरून तीं कृत्यें क्षुल्लक होतीं असा ग्रह होण्याचा संभव आहे. परंतु तसा ग्रह होऊं देणें अगदीं चुकीचें आहे. ग्रांट् डफ्च्या ग्रंथांत ह्या दहा वर्षांतील घडामोडींची, विस्तृत तर राहुंद्याच परंतु, साधारण समाधानकारक अशी देखील माहिती दिलेली नाहीं. त्यानें लहान सहान मोहिमा तर सोडून दिल्या आहेतच; परंतु, कांहीं मोठमोठ्या मोहिमा देखील गाळिल्या आहेत. त्या त्यानें मुद्दाम गाळल्या आहेत असा म्हणण्याचा भाग नव्हे; तर मिळालेल्या कागदपत्रांचा योग्य उपयोग त्याच्या हांतून झाला नाहीं. जे लेख त्याला मिळाले होते त्यांचें व्यवस्थित वर्गीकरण आणि त्यांची बारीक फोड व उकल त्याच्या हांतून झाली नाहीं. त्यामुळें व कांहीं जरूरीचे कागदपत्र त्याला न मिळाल्यामुळें ह्या मोहिमा त्यानें गाळल्या असें दिसतें. वर दिलेल्या बेचाळीस मोहिमा अगदीं ठळक ठळक आहेत. त्यांपैकीं ग्रांट् डफ्नें कोणकोणत्या गाळल्या आहेत किंवा त्या झाल्या हें माहीत असून अस्सल लेखांच्या कोताईमुळें कोणकोणत्या मोहिमांचा निव्वळ नामसंकीर्तनापलीकडे जास्त उल्लेख त्यानें केला नाहीं किंवा व्यवस्थित वर्गीकरण न केल्यामुळें कोणकोणत्या मोहिमांची त्यानें गफलत केली आहे तें खालीं लिहितों.

रघुनाथरावाच्या ( १ ) १७५०, ( २ ) १७५१, ( ३ ) १७५२, ( ४ ) १७५३ व ( ५ ) १७५६ ह्या सालांतील गुजराथ व खानदेश ह्या प्रांतावरील मोहिमा ग्रॅन्ट् डफनें अजीबात गाळल्या आहेत. रघुनाथरावाची १७५३ ची अमदाबादेवरील मोहीम त्यानें १७५५ सालांत नेली आहे. १७५५ सालांत रघुनाथराव दिल्लीस होते हें त्याला माहीत नव्हतें; हें पुढील पत्रांतील टीपांत सविस्तर सिद्ध करून दाखविलें आहे ( टीप १६१ ). रघुनाथरावाची १७५४ (जानेवारी–जून) तील रजपुतान्यांतील ( ६ ) स्वारीची ( कुंभेरीचा वेढा इ. ) व १७५४ ( सप्टेंबर–डिसेंबर ) तील रोहिलखंड, कुमाऊ, ह्या प्रदेशांवरील (७) मोहिमेची हकीकत त्यानें दिली नाहीं. रघुनाथरावाच्या १७५७ तील (८)दिल्लीवरील व १७५८ तील (९) लाहोरावरील मोहिमांचा त्यानें त्रोटक व तोहि बराच चुकीचा वृत्तांत दिला आहे. रघुनाथराव वस्तुतः १७५७ त माळव्यांत गेला असून तो १७५६ च्या शेवटीं गेला असें डफ् म्हणतो. रघुनाथराव १७५७ च्या जूनांत व सप्टेंबरांत दिल्लीस होता हें १५३ व्या टीपेंत स्पष्टपणें दाखवून दिलें आहे. अबदाली १७५५ त दिल्लीस आला, मथुरा वगैरे शहरें त्यानें त्याच सालीं घेतलीं, मग लवकरच काबुलाला तो परत गेला व १७५७ च्या सप्टेंबरांत तो दिल्लीस येऊन बसला, इत्यादि भ्रामक विधानें त्यानें केलीं आहेत. तींहि मीं १५३ व्या टीपेंत खोडून काढलीं आहेत. तसेंच १७५४ व १७५५ आणि १७५७ व १७५८ रजपुताना, माळवा, बुंदेलखंड, काशी, प्रयाग, अयोध्या, व अंतर्वेद इत्यादि प्रदेशांतील संस्थानिक, पाळेगार, मवासी इत्यादि मंडळीवरहि रघुनाथरावानें स्वाऱ्या केल्या आहेत, त्यासंबंधीं माहिती ग्रँट्डफ्च्या ग्रंथांत नाहीं. जयाप्पाच्या (१०) नागोरच्या वेढ्यासंबधा तर त्यानें फारच आश्चर्यकारक चुकी केली आहे. नागोरचा वेढा १७५५ त चालला होता व जयाप्पा तो वेढा चालला असतांना ज्येष्ठ वद्य ७ मीला म्हणजे ३० जून १७५५ ला

मारला गेला अशी वास्तविक गोष्ट आहे. असें असून ग्रँन्टडफ्नें जयाप्पाच्या मृत्युचें साल १७५९ धरलें आहे व मधील चार वर्षांत जयाप्पासारिख्या चळवळ्या शिपायानें केलें काय ह्याचा हिशेब अर्थात् कांहींच दिला नाहीं. हीहि चूक मीं १६१ व्या टीपेंत जयाप्पाच्या मृत्यूच्या तारखेसुद्धां दाखवून दिली आहे. एकंदरींत रघुनाथराव दादांच्या बहुतेक सर्व स्वाऱ्यासंबंधीं, ग्रँट्डफचें अज्ञान आश्चर्य करण्यासारखें आहे जयाप्पाच्या मारवाडांतील मोहिमेसंबंधीं, त्याच्या मृत्यूसंबंधीं व त्याच्या मृत्यूनंतर दत्ताजीनें मारवाडांत केलेल्या खटपटींसंबंधीं ग्रँट्डफच्या ग्रंथांत एक अक्षरहि सांपडण्यासारिखें नाहीं. हें जयाप्पाच्या व रघुनाथरावाच्या मोहिमांविषयीं झालें.

१७५२ च्या डिसेंबरांत भालकीची लढाई व तह झाल्यानंतर १७५३ च्या जानेवारींत भालकीहून बाळाजी बाजीराव श्रीरंगपट्टणच्या ( ११ ) स्वारीस गेले. ग्रँट्डफ्नें भालकीच्या तहापर्यंत बरीवाईट हकीकत दिली आहे. पुढें १७५३ च्या जानेवारींत, तो म्हणतो, शिंदे, होळकर हिंदुस्थानांत गेले व बाळाजी बाजीराव पुण्यास परत आले. परंतु, हीं दोन्ही विधानें विश्वसनीय नाहींत. शिंदे १७५३ च्या मेपर्यंत देशीं चांभारगोंद्यास राहिले. ( पत्रें व यादी ३४० ). होळकर मात्र हिंदुस्थानांत गेले. बाळाजी बाजीराव पुण्यास न जातां, भालकीहून थेट श्रीरंगपट्टणास गेले ( पत्रें व यादी १४). काव्येतिहास संग्रहांतील पत्रें, यादी वगैरेंतील नंबर १४ हें पत्र शके १६७४ च्या पौषांतल्या वद्य सप्तमीला ( पौष बहुल पंचमी म्हणून तेथें चुकून पडलें आहे ) म्हणजे २५ जानेवारी १७५३ ला लिहिलें आहे. हें पत्र हरपन्हळीच्या मुक्कामाहून लिहिलें आहे. अर्थात् काव्येतिहास संग्रहकार सुचवितात त्याप्रमाणें हें पत्र कनाटकच्या म्हणजे श्रीरंगपट्टणच्या स्वारींत असतां बाळाजी बाजीरावानें लिहिलें आहे. ह्यावरून उघड आहे कीं, १७५३ च्या जानेवारींत श्रीरंगपट्टणची स्वारी सुरू झाली. ही स्वारी ग्रँट्डफ्नें अजीबात गाळली आहे. भालकीचा तह झाल्यावर सबंद १७५३ सालभर बाळाजी बाजीरावाच्या हालचालींचा त्यानें बिलकुल हिशेब दिला नाहीं. १७५४ त होळीहोन्नूरची स्वारी बाळाजीनें केली एवढें मात्र त्यानें पुढें लिहिल आहे. १७५३ तील श्रीरंगपट्टणची स्वारी त्याच्या लक्षांतून अजीबात गेली. ही स्वारी कांहीं लहानसहान नव्हती. ही १७५३ च्या जानेवारीपासून जूनपर्यंत चालली होती. ही स्वारी त्याला माहीतच नव्हती तेव्हां त्यान तिचीं कारणें व परिणाम दिले नाहींत हें स्पष्टच आहे. १७५४ तील होळीहोन्नूरच्या स्वारीचा त्यानें थोडासा उल्लेख केला आहे. ती स्वारी करण्यास कारणें काय झालीं हें त्यानें मुळींच सांगितलें नाहीं. १७५४ च्या जूनांत होळीहोन्नूरच्या मोहिमेहून परत आल्यावर रघुनाथरावदादाला बाळाजीनें गुजराथेंत पाठविलें म्हणून ग्रँट्डफ् म्हणतो. परंतु, १७५४ च्या जानेवारींत रघुनाथराव कुंभेरीच्या वेढ्यास लागले होते हें ह्या पुस्तकांतील १६१ व्या टीपेंत सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे; त्याअर्थीं १७५४ च्या जूनानंतर रघुनाथराव गुजराथेंत गेला हें ग्रँन्टडफचें म्हणणें निव्वळ चुकीचें आहे हें उघड आहे. होळीहोन्नूरच्या स्वारीहून बाळाजी १७५४ च्या जूनांत पुण्यास आले म्हणून ग्रँन्टडफ् म्हणतो, परंतु तेंहि चूकच आहे. कारण पत्रें व

यादींतील नंबर १५ च्या पत्रांत ' कर्नाटक, कचेश्वराहून शके १६७६ 'च्या ज्येष्ठ शुद्ध १३ स आपण पुण्यास आलों. ' म्हणून बाळाजी लिहितो. म्हणजे १७५४ च्या ३ जुलैला बाळाजी पुण्यास आला असें होतें. १७५४ च्या पावसाळ्यानंतर म्हणजे १७५४ च्या आक्टोबरांत रघुनाथराव गुजराथेच्या स्वारीस निघाला व त्यानें अमदाबाद १७५५ च्या एप्रिलांत घेतली, असें ग्रॅन्ट्डफ्नें चुकीचें गणित केल्यामुळें रघुनाथरावाची १७५३ तील गुजराथेंतील मोहीम, १७५४ तील कुंभेरीचा वेढा व १७५५ तील दिल्ली, रोहिलखंड ह्या प्रदेशांतील मोहिमा, ग्रँटडफ्ला मुळींच सोडून द्याव्या लागल्या. कुंभेरीचें नांव त्यानें एका ठिकाणीं काढिलें आहे; परंतु तें भीतभीतच काढिलें आहे व त्या पॅरिग्राफावर टीप देतांना रघुनाथरावाच्या हिंदुस्थानांतील मोहिमांसंबंधीं आपल्याला चांगली माहिती मिळाली नाहीं म्हणून प्रांजलपणें कबूल केलें आहे. परंतु, ह्या प्रांजलपणांत थोडासा हटवादीपणाहि दाखविला आहे. अमदाबाद १७५३ त घेतली किंवा १७५५ त घेतली ह्याचा टीपेंत निर्णय करतांना १७५५ हें साल त्यानें पसंत केलें आहे. ह्या निर्णयामुळें रघुनाथरावाच्या हालचालींचा खरा नकाशा त्याला काढितां आला नाहीं.तो कसा काढितां आला नाहीं तें पुढील दोन चार वाक्यांत स्पष्ट करून दाखवितों.ग्रॅन्टडफ्च्या मताप्रमाणें रघुनाथरावानें १७५५ च्या एप्रिलांत अमदाबाद घेतली. नंतर तो अमदाबादेहून निघाला असल्यास हिंदुस्थानांत जाण्यास थालनेरच्याच मार्गानें आला पाहिजे. थालनेरास येण्यास रघुनाथरावाला जून महिना अवश्य झालाच असला पाहिजे व सबंध पावसाळा थालनेरास रहाणें त्याला भाग पडलें असलें पाहिजे. नंतर १७५५ च्या सप्टेंबरांत तो हिंदुस्थानांत गेला असला पाहिजे व नंतर कुंभेरीचा वेढा व रोहिलखंडाची स्वारी त्यानें केली असली पाहिजे. ह्या इतक्या सर्व खटाटोपी करून, ग्रँट्डफ् म्हणतो, तो १७५६ सालच्या अगोदर म्हणजे १७५५ च्या डिसेंबरांत देशीं पुण्यास आला. परंतु, हे सर्व ग्रँट्डफ्चे तर्क झाले. कारण, रघुनाथराव १७५६ च्या आगष्टांत पुण्यास आले; हें सप्रमाण सिद्ध करण्यांत येतें. ह्याला पुरावा काव्येतिहाससंग्रहांतल्या पत्रें व यादी वगैरेंतील ४५१ वें पत्र आहे तेथें अंताजी माणकेश्वर लिहितो कीं, दादासाहेबांच्या स्वारीनें नरवरच्या घाटानें येऊन आपल्या सैन्याची झडती घेतली. १७५५ च्या मार्च–एप्रिलांत बाळाजी बाजीराव नाशिक ऊर्फ गुलचनाबाद येथें असतांना अंताजी माणकेश्वर त्यांना ससैन्य भेटला. तेथें त्यांना बाळाजी बाजीरावानें हिंदुस्थानांत जाण्यास सांगितलें. हिंदुस्थानांत जातांना वाटेंत दादासाहेबांची स्वारी नरवरच्या घाटानें परत येतांना त्याला भेटली. ह्यावरून रघुनाथराव १७५५ च्या डिसेंबरांत पुण्यास आले म्हणून ग्रँट्डफ् म्हणतो तें खोटें असून रघुनाथराव जुलै–आगष्टांत पुण्यास आले हें निःसंशय खरें आहे हें सिद्ध आहे. १७५५ त बाळाजी बाजीरावानें व महादाजी पंत पुरंधऱ्यानें बेदनूरची स्वारी केली. बाळाजी कृष्णेपर्यंत जाऊन मध्येंच नाशकाला सिंहस्थाकरितां जाण्यास परतले, ते सलाबतजंगाच्या राज्यांतून कायगांवटोक्यावरून ( पत्रें व यादी १६ ) नाशकास गेले. कायगांवटोक्यावरून बाळाजीला जाण्यास एक कारण झालें, तें हें कीं, सलाबतजंगानें जानोजी भोसले व

रघोजी करांडे यांच्यावर स्वारी करण्याचा घाट घातला होता तो इकडून शह देऊन जागच्या जागींच बसवून टाकावा. ह्या ( १२ ) डावपेंचाचें वर्णन ह्या पुस्तकांतलि लेखांक ६५ त केलें आहे. हें राजकारण ग्रँट्डफ्ला माहीत नव्हतें. नाशकाहून बाळाजी बाजीराव पुण्यास १७५५ च्या एप्रिल–मेंत आले व १७५५ च्या नोव्हेंबरांत सावनूरच्या स्वारीस निघाले; म्हणजे सरासरी सहा महिने ते पुण्यास होते. असें असून सबंध वर्षभर ते पुण्यास स्वस्थ बसून होते म्हणून डफ् आपल्या इतिहासाच्या १९ व्या भागाच्या प्रारंभीं लिहितो तें त्याला हा मधील डावपेंच माहीत नव्हता म्हणून त्यानें लिहिलें हें उघड आहे. १७५६ च्या जानेवारींत बाळाजी सावनुरास जाऊन पोहोंचला व सावनुरच्या वेढ्यास सुरवात झाली. सावनूरची स्वारी १७५६ च्या जानेवारीपासून जूनपर्यंत चालली होती. मध्येच रघुनाथराव-दादा सावनुरास येऊन मिळाले व तेथून त्यांनीं कितूरास ( १३ ) स्वारी केली. ही स्वारी ग्रँटडफ्ला माहीत नव्हती. सावनूरची स्वारी चालू असतां गोपाळराव पटवर्धनानें सोंध्यास (१४) स्वारी केली (ऐतिहासिक लेखसंग्रह २, ३ ). हीहि स्वारी ग्रँट्डफ्ला माहीत नव्हती. गोपाळराव सोंध्याहून निघून बंकापुराजवळ हनगळ येथें उतरला व सबंद पावसाळा तेथेंच काढून पुढें उघाड झाल्यावर त्यानें श्रीरंगपट्टणाकडे मोर्चा वळविला, तों १७५७ फेब्रुवारी आला. १७५७ च्या मार्चांत गोपाळराव श्रीरंगपट्टणापासून दहाबारा कोसांवर होता (लेखांक ५७, ६२). १७५७ तील श्रीरंगपट्टणाच्या (१५) स्वारीचें सर्व श्रेय गोपाळरा-वास देणें रास्त आहे. परंतु, गोपाळरावाचें नांव सुद्धां ग्रँट्डफ्ला माहीत नव्हतें. मग त्यानें ह्या स्वारींत बहुत मेहनत घेतली हें त्याला कोठून ठाऊक असणार? गोपाळरावाच्या श्रीरंग-पट्टणावरील १७५९ च्या (१६) स्वारीसंबंधीं देखील ग्रँट्डफ्नें असेंच मौनव्रत धारण केलें आहे. हें इतकें बाळाजीबाजीरावाच्या स्वाऱ्यांसंबंधीं झालें. ह्याखेरीज कोळवणांतलि काळ्यांचीं बंडें वगैरेसंबंधीं त्याच्या ग्रंथांत माहिती नाहीं हें मुद्दाम सांगितलें पाहिजे असें नाहीं.

ग्रँट्डफ्नें अजीबात सोडून दिलेल्या मोहिमांचा येथवर विचार झाला. आतां ज्या मोहिमांचीं उल्लेख व वर्णनें त्यानें केलीं आहेत त्यासंबंधीं माझें म्हणणें काय आहे तें सांगतों. १७५० पासून १७६१ पर्यंत ज्या मोहिमांची माहिती ग्रँट्डफ्नें दिली आहे त्या सर्वांत पानिपतच्या मोहिमेचें वर्णन त्याच्या त्या वेळच्या माहितीप्रमाणें त्यानें बरेंच विस्तृत दिलं आहे. त्याच्याहिपेक्षां कीननें पानिपतचें वर्णन बरेंच सांगोपांग दिलें आहे. परंतु, ह्या दोन्ही ग्रंथकारांनीं काशीराजावरती सर्वस्वीं भिस्त ठेवल्यामुळें त्यांचीं वर्णनें एकदेशीय व अपूर्तीं झालीं आहेत. तीं अपूर्तीं व एकदेशीय कशीं झालीं आहेत ह्याच विवेचन मीं पुढें केलें आहे. तेव्हां सध्यां ह्या मोहिमेला सोडून दुसऱ्या मोहिमांकडे वळतों. उदगीरच्या मोहि-मेचें व युद्धाचें वर्णन डफ्नें त्याच्या नित्याच्या नेमाप्रमाणें त्रोटक परंतु बरें केलें आहे. पानिपतच्या लढाई खेरीजकरून १७५० पासून १७६१ पर्यंत झालेल्या बाकी कोणत्याहि लढाईची तारीख देण्याच्या भानगडींत ग्रँट्डफ् पडला नाहीं; त्याप्रमाणें ह्याहि लढाईची तारीख त्यानें दिली नाहीं. ग्रँट्डफ्च्या वर्णनाशीं मीं छापिलेलीं पत्रें ताडून पाहिलीं असतां वाचकांना कांहीं तफावत व बरीच नवीन माहिती दिसून येईल. शिंदखेडच्या मोहिमेसंबंधीं

ह्या ग्रंथांत सरासरी ७० पत्रें छापिलीं आहेत. त्यांत लढाई होण्याच्या अगोदर झालेल्या कारस्थानाची बारीक हकीकत आहे. त्या हकीकतीशीं ग्रँटडफ्ची हकीकत ताडून पाहिली असतां कांहीं तफावत व बरीच नवीन माहिती दिसून येईल. ग्रँट्डफ्नें ह्या मोहिमेची प्रस्तावना बरी केली आहे; परंतु, खुद्द लढाईचें वर्णन मुळींच दिलेलें नाहीं. पानिपत, उदगीर व शिंदखेड ह्या तीन मोहिमांखेरीज नामसंकीर्तनापलीकडे ग्रँट्डफ्नें कोणत्याच मोहिमेचें वर्णन केलें नाहीं. अमक्या वर्षी अमुक मोहिम झाली व तींत अमुक अमुक व्यक्तींचा प्रमुखपणें संबंध येतो ह्या व्यतिरिक्त त्याच्या ग्रंथांत जास्त कांहींएक सांपडावयाचें नाहीं. हा असा प्रकार होणें एका प्रकारें अपरिहार्यच होतें. १७५० पासून १७६० पर्यंत ठळक ठळक अशा बेचाळीस मोहिमा झाल्या हें वरतीं सांगितलेंच आहे. ह्या प्रत्येकीचें यथास्थित वर्णन देऊं म्हटल्यास ग्रँट्डफ्च्या बखरीएवढी बखरहि पुरणार नाहीं. ह्याचा दाखला पाहिजे असल्यास ग्रांट्डफ्नें केलेलें पाणिपतच्या लढाईचें वर्णन घ्या. ग्रांट्डफ्च्या इतिहासाचा संबंध २१ वा भाग म्हणजे ग्रांट्डफ्च्या मुंबईच्या आवृत्तींचीं १५ पृष्ठें ह्या मोहिमेनें व्यापून गेलीं आहेत. लहानमोठ्या मोहिमांची सरासरी काढून दर मोहिमेस १० पृष्ठें धरिलीं तर ४२ मोहिमांस ४२० पृष्ठें लागतात. तेव्हां १७५० पासून १७६१ पर्यंतच्या मराठ्यांच्या हालचालींचा वृत्तांत मुंबई-आवृत्तीच्या ५० पृष्ठांत आणावयाला बऱ्याच मोहिमा न कळत गळाल्या असतांहि राहिलेल्या मोहिमांची त्रोटकच हकीकत देणें ग्रांट्डफ्ला भाग पडलें. तशांत, मराठ्यांच्या हालचाली एकाच विवक्षित प्रदेशांत होत नसून, एकाच कालीं, स्वदेश, कोंकणकिनारा, गुजराथ, खानदेश, त्या वेळचें निजामाचें राज्य, म्हैसूर, रजपुताना, दिल्ली, अंतरवेद, नागपूर, अयोध्या, काशी, प्रयाग, बुंदेलखंड इत्यादि निरनिराळ्या प्रांतांत होत असत. त्यामुळें दृष्टि फांकून जाऊन, दरवर्षी एकाच मोसमांत होणाऱ्या निरनिराळ्या मोहिमांचें व्यवस्थित आकलन होऊन वर्णन करितां येण्याचें काम केव्हांहि मोठ्या श्रमाचें व कुशलतेचें होण्याचा संभव आहे. तशांत त्याच्या हातून, मिळालेल्या कागदपत्रांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. ह्या व इतर कारणांनीं ग्रांट्डफ्च्या हातून जशी इमारत मराठ्यांच्या इतिहासाची मराठ्यांच्या दृष्टीनें उठावी तशी उठली नाहीं. ह्याला मुख्य कारण ग्रांट्डफ्नें स्वीकारलेली पद्धत किंवा खरें म्हटलें असतां पद्धतीचा अभाव होय. अर्थात् १७५० पासून १७६१ पर्यंत बाळाजी बाजीरावानें जो अवाढव्य खटाटोप केला त्याचें ग्रांट्डफ्च्या संक्षिप्त पद्धतीनें यथास्थित वर्णन होणें अगदींच अशक्य होतें. ह्या ग्रांट्डफ्च्या संक्षिप्त पद्धतीचें स्वरूप पुढील विवेचनांत स्पष्ट करून दाखवितों.

## विवेचन पहिलें.

कोणत्याहि संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटला म्हणजे तो अनेक दृष्टींनीं केला पाहिजे. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण, व तत्सिद्ध्यर्थ केलेल्या अंतःस्थ व बहिःस्थ खटपटी इतक्या सर्वांच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमानें यथास्थित, बांधेसूत, पद्धतवार व सप्रमाण

विचार केला जाऊन तो पुनः आत्मिक व भौतिक रीत्या झाला म्हणजे राष्ट्राचें चरित्र समग्र कळलें, असें होतें. येथें आत्मिक व भौतिक हे शब्द कोणत्या अर्थाचे वाचक आहेत तें सांगितलें पाहिजे. धर्म, नीति, विद्या, राजकारण, इत्यादि राष्ट्राच्या चरित्राचीं जीं निरनिराळीं अंगें सांगितलीं त्यांचा विचार दोन तऱ्हेनें करितां येईल. हीं अंगें कार्याच्या रूपानें फलित झालेलीं पाहून त्या फलित रूपांचें पद्धतवार वर्णन करण्याची एक तऱ्हा आहे व हींच अंगें कारणरूपानें असलेलीं पहाणें म्हणजे वर सांगितलेल्या फलित कार्यांचीं कारणें म्हणून त्यांचा विचार करणें म्हणजेच दुसऱ्या तऱ्हेचा अंगीकार करणें होय. पहिल्या तऱ्हेला मी भौतिक म्हणतों व दुसरीला आत्मिक म्हणतों. भौतिक पद्धतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्मांतील निरनिराळ्या पंथांचें जीवनवृत्तांत द्यावयाचे; म्हणजे ते पंथ किती आहेत, त्यांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं, निरनिराळ्या पंथांच्या कलहांचें स्वरूप काय होतें इत्यादि बाह्य रूपांचीं वर्णनें करावयाचीं; आणि आत्मिक पद्धतीनें कोणत्याहि धर्माचा विचार करावयाचा म्हणजे त्या धर्माचीं मूलतत्त्वें काय आहेत, आत्म्याच्या अनेक वृत्तींतून कोणत्या वृत्तीचें त्या धर्मांत प्राधान्य आहे, इत्यादि अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा भौतिक पद्धतीनें कलाकौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे त्याच्या शाखा किती आहेत, निरनिराळ्या शाखांचा संकर किती झाला व शाखांचीं स्थलांतरें कोठें कोठें झालीं हें सांगावयाचें आणि आत्मिकरीत्या कलाकौशल्याचा विचार करावयाचा म्हणजे आत्म्याच्या कोणत्या वृत्तीपासून कलाकौशल्याचा उगम होतो वगैरे अंतःस्थ व गूढ प्रश्नांचा उलगडा करावयाचा. त्याचप्रमाणें भौतिक पद्धतीनें कोणत्याहि राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे त्या राष्ट्रांत झालेल्या अंतःस्थ कलहांचीं व बहिःस्थ कलहांचीं वर्णनें द्यावयाचीं; म्हणजे राष्ट्रांतील बंडांचीं, निरनिराळ्या पक्षांच्या, वर्गांच्या व जातींच्या चढाओढींचीं व परराष्ट्रांशीं झालेल्या लढायांचीं वर्णनें द्यावयाचीं आणि आत्मिक पद्धतीनें राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा विचार करावयाचा म्हणजे अंतःस्थ व बहिःस्थ कलहांच्या उत्पत्तीचीं कारणें, त्या राष्ट्रांतील एकंदर लोकसमूहांत आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तीपैकीं कोणत्या वृत्तीचें विशेष प्राबल्य आहे त्याचा सूक्ष्म विचार, त्या राष्ट्रांतील मोठमोठ्या तटांच्या पुरुषांच्या राजकीय मतांचें सशास्त्र दर्शन इत्यादि प्रश्नांची चर्चा करावयाची. राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितींचा भौतिक व आत्मिकदृष्ट्या जो विचार त्यासच राष्ट्राचा राजकीय इतिहास म्हणतात. धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य ह्यांतील एक किंवा अनेक अंगांचें प्राबल्य किंवा दौर्बल्य होऊन राष्ट्राच्या राजकीय चरित्रावर त्यांचे आघात व परिणाम होऊं लागले म्हणजे त्यांचाहि विचार राष्ट्राच्या राजकीय इतिहासांत करावा लागतो. येणेंप्रमाणें कोणत्याहि राष्ट्राचा सर्वांगांनीं संपूर्ण असा राजकीय इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे तो भौतिक व आत्मिक अशा दोनहि पद्धतींनीं लिहिला पाहिजे आतां प्रस्तुतच्या विवेचनाचा विषय जो ग्रांट्‌डफ्‌चा इतिहास त्याची पद्धत पाहिली तर निव्वळ भौतिक आहे व सर्वत्र ग्राह्य होण्यासारिखें आहे असें वाटतें. आत्मिकरीत्या मराठ्यांच्या इतिहासाचा

विचार करण्याच्या खटपटींत पडण्याची आपली इच्छा नाहीं व योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं असें ग्रांट्डफ् आपल्या इतिहासाच्या प्रस्तावनेंत स्वतःच प्रांजलपणें व विनयानें कबूल करितो. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी ग्रांटडफ्नें शाळा सोडिली. तोंपर्यंत व्याकरणभूगोलादि विद्यासंपत्ति जी कांहीं मिळाली ती घेऊन तो हिंदुस्थानांत आला व तेवढ्यावरती आपल्या लष्करी व मुलकी खाला लिहिणेंसवरणें त्याच्या वरिष्ठांच्या मताप्रमाणें तरी त्यानें मोठ्या बहादुरीनें केलें. पुढें पेशवाई बुडत असतां व बुडाल्यावर पुणें व सातारा येथील अवाढव्य दफ्तरें त्याच्या हातांत आलीं व त्याला मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची स्फूर्ति झाली. परंतु, उदार शिक्षणाचा म्हणजे प्राचीन इतिहासादि विद्यांचा जो कांहीं योग्य संस्कार मनुष्याचें मन उदात्त, शाग्र, ग्राहक व मार्मिक करण्यास लहानपणींच लागतो तो ह्या इसमाला झाला नसल्या कारणानें, आत्मिकरीत्या मराठ्यांच्या इतिहासाचें विवेचन करण्याचें तर त्याला सोडून द्यावें लागलेंच; परंतु, भौतिक पद्धतीनेंहि जें मराठ्यांच्या इतिहासाचें वर्णन त्यानें केलें आहे तेंहि अनेक प्रकारें व्यंग आहे. कालविपर्यासाचा दोष, मोठमोठ्या मोहिमांचें अज्ञान व सापेक्षदृष्ट्या कोणत्या प्रसंगाला किती महत्त्व द्यावें ह्याची नुमज, इतर मराठी बखरींप्रमाणेंच याच्याहि इतिहासांत दिसून येते. १७५० पासून १७६१ पर्यंत झालेल्या रघुनाथरावाच्या मोहिमांच्या कालाचा ग्रांट्डफ्नें कसा विपर्यास केला आहे व त्यामुळें तो कसा गोत्यांत पडत गेला आहे हें मीं मागें नुकतेंच दाखवून दिलें आहे. त्यानें मोहिमा कोणकोणत्या गाळिल्या आहेत ह्याचाहि निर्देश मागें झाला आहे व त्या वेळच्या मराठ्यांच्या अवाढव्य प्रयत्नांच्या मानानें त्या वेळच्या इंग्रजांचा प्रयत्न अगदींच क्षुद्र असून त्यांच्या वर्णनानें आपल्या इतिहासाची संकुचित जागा सापेक्ष दृष्टीनें ग्रांटडफ्नें किती अडविली आहे, हें सुरत, विजयदुर्ग, बाणकोट इत्यादि ठिकाणीं इंग्रजांनीं केलेल्या वळवळीचे पवाडे वाचून कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारिखें आहे. ह्या वळवळींसंबंधानें ग्रांट्डफ्चें स्वतःचेंहि मत वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेंच आहे. तो म्हणतो, इंग्रज महाराष्ट्राचे पुढें धनी झाले म्हणून त्यावेळचीं हीं त्याचीं कृत्यें सविस्तर वर्णिलीं पाहिजेत. म्हणजे इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील इतिहासाच्या महासमुद्रांत शेवटीं मराठ्यांच्या इतिहासाचा लोप होणार हें मत दृष्टीपुढे ठेवून त्यानें मराठ्यांचा इतिहास लिहिला. त्यामुळें शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला प्रारंभ झाल्यापासून म्हणजे इ० स० १६४६ पासून १७९६ पर्यंतच्या १५० वर्षांचा इतिहास त्यानें ४७५ पावणें पांचशें पृष्ठांत आटोपून पुढील २२ वर्षांच्या हकीकतीला २०० दोनशें पृष्ठें दिलीं आहेत. पहिल्या १५० वर्षांतील मराठ्यांच्या खटाटोपी किती अवाढव्य होत्या ह्याचा विचार केला तर पुढील २२ वर्षांना त्यानें जितकीं पृष्ठें दिलीं आहेत त्यांच्या मानानें त्या १५० वर्षांना १२०० पृष्ठें तरी निदान देणें जरूर होतें. परंतु, इतकी विस्तृत माहिती दिल्यास ती आपल्या इंग्रजी वाचकांस रुचणार नाहीं हें ध्यानांत धरून त्यानें आपल्या इतिहासाची रचना केली ( Duff's preface ). इतिहास लिहिण्यांत त्याचा मुख्य हेतु आपल्या देशबांधवांना मराठ्यांच्या संबंधीं ठोकळ व त्यांतल्या त्यांत समाधानकारक

माहिती देण्याचा होता. मराठ्यांचा इतिहास कसा तरी ओरबाडून जो त्यानें काढिला त्या मुख्य कारण हेंच आहे. त्यानें मराठ्यांचा इतिहास लिहिला तो मराठ्यांच्याकरितां लिहिल नसून आपल्या देशबांधवांकरितां लिहिला आहे. मराठ्यांच्या पराक्रमांचें कौतुक वाटण्या त्याला कांहींच कारण नव्हतें. मराठ्यांचें बहिःस्वरूप मोठ्यांत मोठें होतें केवढें व तें त कसकसें होत गेलें एवढें त्याला दाखवून द्यावयाचें होतें. व तें काम त्यानें समाधानकारक के आहे असें त्याच्या देशबांधवांचें मत आहे. मराठी बखरींच्यापेक्षां त्याचा इतिहास जास व्यवस्थित आहे हें इकडील लोकांसहि मान्य आहे; परंतु, स्वतंत्र इतिहास ह्या नात्या त्या ग्रंथांची किंमत महाराष्ट्रांतील इतिहासज्ञ निराळी करितात. कां कीं, ( १ ) ग्रांट्डफ् आपला इतिहास मुख्यत्वें मराठी बखरी, मुसलमानी तवारिखा, सरदारांनीं दिलेल्या कैफियत व अशाच स्वरूपाचीं इतर टिपणें, ह्यांची संगति जुळवून तयार केला आहे. ह्या बहुतेक बखर तवारिखा व कैफियती कमजास्त प्रमाणानें अविश्वसनीय आहेत व त्यांच्या आधारावर र लेला मराठ्यांचा कोणताहि इतिहास, अपूर्ण व अविश्वसनीय होण्याची बहुतेक खात्री आ ( २ ) पुणें व सातारा येथील दफ्तरें व दुसरीं अवांतर कागदपत्रें ग्रांट्डफ्ला मिळा होतीं हें खरें आहे. परंतु, त्याचा त्यानें योग्य उपयोग करून घेतला नाहीं. काव्येतिहा संग्रहांतील पत्रें, ऐतिहासिक लेखसंग्रहांतील पत्रें व मीं सध्यां छापिलेलीं पत्रें हीं सर्व मिळ १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींतलि अशीं सुमारें ४५० साडेचारशें होता त्यांवरून ह्या अकरा वर्षांतलि ग्रांट्डफ्च्या इतक्या चुका दाखवून देतां येतात; त्याअ निदान ह्या अकरा वर्षांसंबंधीं तरी ग्रांट्डफ्नें पुणें व सातारा येथील दफ्तरांचा योग्य उ योग करून घेतला नाहीं असें बिनदिक्कत म्हणतां येतें. ( ३ ) योग्य शिक्षणाच्या अभाव मुळें कोणताच इतिहास लिहिण्याची व विशेषतः मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची ग्रांट्डफ् योग्यताच नव्हती पुणें व साताऱ्यांतल्यासारखी भरपूर माहितीनें भरलेलीं अव्वाढव्य दफ जेम्स् मिल्ल, गिबन, मोम्सेन, इन्ह, गिझो इत्यादिसारख्या शोधकांच्या हातीं पडलीं अस तर, त्यांचें त्यांनीं बावनकशी सोनें करून दाखविलें असतें. ( ४ ) तो विदेशीय असल्य कारणानें मराठ्यांच्या पराक्रमांचा पाल्हाळ तर राहूं द्याच, परंतु, सविस्तर व सा माहिती देण्याची त्याला हौस नव्हती. विदेशीय लोकांना मराठ्यांच्या हालचाल सामान्य ठोकळ ज्ञान झालें म्हणजे आपलें काम झालें, अशी ग्रांट्डफ्ची समजूत हो ( ५ ) त्यानें आपला इतिहास भौतिक पद्धतीनें लिहिलेला आहे व तोहि अनेक प्र अपूर्ण झाला आहे. ह्यामुळें त्याच्या इतिहासाला, कीर्तनें म्हणतात त्याप्रमाणें, अपूर्ण अ मराठ्यांच्या मोहिमांचा नामनिर्देशात्मक इतिहास असें म्हटलें असतां चालेल. ग्रांट्डफ् इतिहासाला मोहिमांचाहि इतिहास म्हणतां येत नाहीं, कारण, मराठ्यांनीं ज्या शेक मोहिमा केल्या, त्यांपैकीं फारच थोड्यांचा म्हणजे एकाचाच त्यानें कांहींसा सविस्तर वृत्त दिलेला आहे. बाकीच्यांचा वृत्तांत कांहींच दिला नाहीं. तेव्हां ' मराठ्यांच्या मोहिमा इतिहास' असेंहि नांव ह्या इतिहासाला शोभत नाहीं. ह्या इतिहासाला "इंग्रजांना मराठ्य कांहीं माहिती देणाऱ्या वृत्तांताचें इतिहासवजा पुस्तक " असें नांव दिलें असतां चाले

ग्रांटडफ्चा इतिहास अपूर्ण व जुनापुराणा होण्याचीं हीं अशीं कारणें आहेत. हीं दाखवून दिलीं नसतीं तरी देखील चालण्यासारिखें होतें. कारण, ग्रांटडफ्च्या ग्रंथांत चुका आहेत असा संशय आल्याचीं चिन्हें अलीकडील १०।२० वर्षांतील लिहिण्यांत व बोलण्यांत थोडथोडीं दिसूं लागलीं होतीं. परंतु, कोणींहि स्पष्टपणें ग्रांटडफ्च्या ग्रंथांत अमुक अमुक चुका आहेत असें दाखवून दिलें नव्हतें. ह्या एवढ्याच कारणाकरितां मला हे दोष दाखवून देण्याचें कंटाळवाणें काम निरुपायानें करावें लागलें आहे. शिवाय, आणीकहि एक आनुषंगिक कारण झालें. तें असें कीं, ग्रांटडफ्नें आपला इतिहास भौतिकपद्धतीनें लिहिला असल्याकारणानें वाचकांचा मराठ्यांच्या कृत्यासंबंधीं कांहीं एक चमत्कारिक ग्रह होऊन जातो. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला प्रारंभ होण्यापासून तों नाना फडणिसांच्या अखेरीपर्यंत मराठ्यांनीं शेंकडों मोहिमा हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतून केल्या. इ. स. १६४६ पासून १७९६ पर्यंत एकाहि वर्ष कोठेंनाकोठें तरी मुलूखगिरी केल्याशिवाय मराठ्यांनीं सुनें जाऊं दिलें नाहीं. ग्रांटडफ्च्या ग्रंथांतील ह्या मुलूखगिऱ्यांची कोरडी जंत्री पाहिली व त्यानें ह्या मुलुखगिऱ्यांची केलेली थट्टा वाचली म्हणजे वाचक क्षणभर स्तब्ध होऊन आपआपल्याशींच विचार करितो कीं, काय हो हा चमत्कार आहे! एक सारिखें दीडशें वर्षे एक वर्षावीहि खळ पडूं न देतां ह्या सैतानांनीं सर्व हिंदुस्थानभर केवळ हुतुतू कीं हो घातला! शेतें, वाड्या, गांवें, शहरें, जाळून व पोळून प्रांताचे प्रांत ह्या राक्षसांनीं उध्वस्त करून टाकिले! लढाईच्या वेळेस शत्रूला हातघाईस आणण्यास संस्कृत राष्ट्रें हीं असलीं कृत्यें कधीं कधीं किंवा वारंवारहि करितात; परंतु त्यांत त्यांचा कांहीं तरी स्तुत्य हेतु असतो. ह्या मराठ्यांचा मात्र प्रकार कांहीं विलक्षणच! हेतु म्हणावा तर लूट मिळविण्याखेरीज दुसरा कांहींच नाहीं! ह्या मोहिमेचा पत्ता त्या मोहिमेला नाहीं! कांहीं कारण नसतां, पावसाळा झाल्यावर ह्या दुष्टांनीं पुण्याहून जें तडक निघावें तें कांहींनीं श्रीरंगपट्टणावर घाला घालावा, कांहींनीं अमदाबादेवर झांप टाकावी, कांहींनीं अवरंगाबादेला बुचाडावें व कांहींनीं खुद्द दिल्लीच्या पातशाहाच्या मानगुटीस बसावें! एका काळीं ह्या दरोडेखोरांनीं हिंदुस्थानचें सार्वभौमत्व पटकावून बसण्याचा प्रसंग आणिला होता; परंतु, बरोखर देवाचीच करणी! म्हणून हा अघोर प्रसंग हिंदुस्थानच्या निरुपद्रवी प्रजेवर आला नाहीं. हे असले विचार कल्पक वाचकांच्या मनांत ग्रांटडफ्चा इतिहास वाचून येतात, हें निकॉले, गोपाळराव हरी देशमुख इत्यादींच्या लिहिण्यावरून ध्यानांत येण्यासारिखें आहे. ह्या असल्या विचारांचा पगडा अजूनाहि गेला नाहीं, हेंहि सप्रमाण सिद्ध करून दाखवितां येईल. मराठ्यांच्या अमदानींत जिकडे तिकडे दंगेधोपे, लढाया व मुलूखगिऱ्या ह्यांचा सुळसुळाट होऊन शांतता म्हणून माहित नव्हती असें प्रतिपादन केलेलें अद्यापहि अनेक लोकांच्या तोंडून ऐकूं येतें. ह्याला कारण ग्रँटडफ्चा इतिहास व त्याची भौतिक पद्धति हीं होत. अज्ञ किंवा नवख्या प्रेक्षकाच्या दृष्टीला भासणाऱ्या मराठ्यांच्या ह्या सैरावैरागतीला कांहीं व्यवस्थित धोरण होतें किंवा नव्हतें, १६४६ पासून १७९६ पर्यंत ह्या महाराष्ट्रांतील लोकसमूहांत कोणत्या विचाराचें प्राधान्य होतें व परराष्ट्रांशीं मराठ्यांच्या ज्या लढाया होत

त्यांना कांहीं सयुक्तिक व समाधानकारक कारणें होतीं किंवा नव्हतीं ह्या गोष्टींचा आस्थिकरीत्या ग्रांटडफ्नें विचार न केल्यामुळें ह्या असल्या मतांचा प्रसार झाला आहे. पद्धति, धोरण, विचार व नीति मराठ्यांच्या कृत्यांत होती किंवा नव्हती ह्याचा ग्रांटडफ्नें विचार न केल्यामुळें व त्याच्याखेरीज मराठ्यांचा दुसरा इतिहास अद्यापपर्यंत लिहिला गेला नसल्यामुळें ह्या दुराग्रहाचें साम्राज्य सध्यां झालें आहे. परंतु ह्या दुराग्रहांना जागा असण्यास, माझ्या मतें, बिलकुल कारण नाहीं. मराठ्यांच्या कृत्यांना कांहीं धोरण होतें हें सप्रमाण दाखवितां येतें; ह्याच प्रश्नाचा विचार पुढील विवेचनांत केला आहे.

## विवेचन दुसरें.

पंधराव्या व सोळाव्या शतकांत आणि सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्राची स्थिति फारच विपन्न झाली होती. त्या वेळचें वर्णन करितांना समर्थ म्हणतातः—" तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ यवनांनीं हिंदु धर्माचा उच्छेद करून टाकिला तेव्हां " देव, धर्म, गो, ब्राह्मण ह्यांचें संरक्षण करण्यास " शिवाजी राजे अवतीर्ण झाले व त्यांनीं यवनांच्या सर्वोच्छेदक गतीचा प्रतिरोध केला. ह्या महत्कृत्याला अनुलक्षून समर्थ शिवाजीराजास लिहितात कीं, " तुम्हीं झाला म्हणून महाराष्ट्र धर्म कांहीं तरी राहिला; " व पुढें सप्रेम विनवणी करितात कीं, " आपण धर्मस्थापनेची कीर्ति उत्तरोत्तर अशीच संभाळिली पाहिजे. " धर्मस्थापनेची कीर्ति संभाळण्यास काय करावें म्हणाल तर " अमर्याद फितवेखोर लोकांचा संहार करावा; न्यायसीमा उल्लंघूं नये; नेटके बंद बांधावे; तुरंग, शस्त्र आणि स्वार जमवावे " आणि सर्वांत पहिलें काम काय करावें तर " मराठा तितका मेळवावा; आणि जिकडे तिकडे महाराष्ट्रधर्म वाढवावा " आपला महाराष्ट्रधर्म वाढविण्यास आणखी उपाय कोणते तर " बहुत लोक मेळवावे । एक विचारें भरावें । कष्टें करून घसरावें । म्लेंच्छावरी ॥ " आणि इतकें करून झाल्यावर मग, " आहे तितकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें । महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥ " समर्थांच्या ह्या उक्तींवरून कळून येईल कीं, सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांचीं मनें एका जबर कल्पनेनें भारून गेलेलीं होतीं. ती कल्पना कोणती तर महाराष्ट्रधर्माची स्थापना करणें ही. ही कल्पना सफल करण्याचें अवघड काम शिवाजीनें केलें. शिवाजीच्या एकंदर चरित्राची गुरुकिल्ली हीच कल्पना होय. ही कल्पना ध्यानांत ठेवून मग शिवाजीच्या व त्याच्या अनुयायांच्या कृत्यांचा विचार करावा म्हणजे त्या कालीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत जिकडे तिकडे मराठे निष्कारण धांवतांना परकीय इतिहासकारांना जे दिसतात ते मनांत कांहीं विशिष्ट हेतु धरून शिस्तवार मोहिमा करीत आहेत असें भासूं लागतील. शिवाजीला चोर व त्याच्या अनुयायांना गनीम म्हणून यवनांनीं टोपणनांवें दिलीं. त्यांचा वाच्यार्थ घेण्याची जी परकीय इतिहासकारांना खोड लागली आहे ती ते टाकून देतील व देव, धर्म आणि स्वराज्य ह्यांची स्थापना करणाऱ्या पृथ्वीवरील महापुरुषांच्या मालिकेंत ह्या पुण्यश्लोक व परमप्रतापी पुरुषाला आडे-

वेढ न घेतां गोवूं लागतील. आतां हा महाराष्ट्रधर्म म्हणजे काय ? ख्रिस्तीधर्म, महमुदी-धर्म, यहुदीधर्म, ह्यांच्यासारिखाच हा महाराष्ट्रधर्म आहे कीं काय ? तर तो तसा नाहीं. महाराष्ट्रधर्म म्हणजे हिंदुधर्मच कीं नाहीं ? तर महाराष्ट्रधर्म म्हणजे हिंदुधर्महि केवळ नव्हे. महाराष्ट्रधर्माची व्याख्या हिंदुधर्माहूनहि जास्त व्यापक आहे. महाराष्ट्रांत त्या काळीं चालणारा हिंदुधर्म व भरतखंडांतील इतर प्रांतांत चालणारा हिंदुधर्म ह्यांच्यांत महदंतर होतें. त्या काळीं भरतखंडांत सर्वत्र यवनांचें राज्य होतें व त्या राज्याच्या अंमलाखालीं महाराष्ट्रेतर प्रांतांत प्रजा आपला हिंदुधर्म म्हणजे व्रतें, उद्यापनें, उपासना, पूजा इत्यादि धर्माचार यवनांकडून कमजास्त त्रास पोंहचत असतांहि, निमूटपणें चालवीत असत. महाराष्ट्रांतील प्रजा मात्र इतकी सोशीक नव्हती. देव फोडणाऱ्या, विजापूर, अहमदनगर, खानदेश, जुन्नर, कोंकण वगैरे प्रांतांवर अंमल करणाऱ्या यवनांनीं मराठ्यांना एका बाजूनें अगदीं सतावून सोडिलें होतें व दुसऱ्या बाजूनें त्यांच्यांतील प्रमुख सरदारांना व मुत्सद्यांना मोठमोठ्या मानाच्या जागा दिल्या होत्या. त्यामुळें त्या वेळच्या मराठ्यांत यवनांविषयीं संताप व तो परिहार करण्याचें सामर्थ्य हीं एकाच वेळीं उत्पन्न झालीं. धर्म भ्रष्ट करणाऱ्या, गाई मारणाऱ्या व ब्राह्मणांचा छळ करणाऱ्या यवनांविषयीं द्वेषबुद्धि महाराष्ट्रांत दामाजी-पंताच्या वेळेपासून धुमसत होती व ती शिवाजीमहाराज अवतीर्ण व्हावयाच्या कालीं तर अत्यंत उत्कट झाली होती. यवनांचा उच्छेद करावयाचा हें त्या कालीं महाराष्ट्रांतील हिंदुधर्माचें एक कलम होऊन गेलें होतें. यवनांचा उच्छेद करावयाचा एवढाच त्या वेळच्या मराठ्यांचा हेतु नव्हता तर धर्माची स्थापना करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावयाचा त्यांचा मुख्य हेतु होता. हा उत्तमोत्तम हेतु साध्य होण्यास नुसता यवनांचा उच्छेद करून काम भागण्यासारिखें नव्हतें, तर स्वराज्याची स्थापना करणें जरूर होतें. तेव्हां स्वराज्याची स्थापना करणें हेंहि एक महाराष्ट्रांतील हिंदुधर्माच मुख्य कलम होऊन बसलें. स्वराज्याची स्थापना करण्यास दोन गोष्टी केल्या पाहिजेत असें शिवाजीच्या लक्ष्यांत आलें. मराठ्यांचें एकीकरण केलें पाहिजे ही एक गोष्ट व त्यांचें धुरीधरण म्हणजे पुढारपण स्वीकारिलें पाहिजे ही दुसरी गोष्ट. कोणत्याहि वेळीं “ बहुत लोक मेळवून एक विचारें भरल्या ” शिवाय स्वराज्यस्थापनेची तयारी होत नसते व एवढेंच करून काम भागत नाहीं; तर एक विचारानें भरलेल्या लोकांचें धुरीणत्वहि पत्करण्यास व तें पत्करून इष्ट हेतु तडीस नेण्यास महापुरु-षांनीं सिद्ध व्हावें लागतें. “ बहुत लोक मेळवून एक विचारें भरण्याचे ” काम शिवाजीनें संतमंडळीकडून करविलें. ह्या वस्तुस्थितीला अनुलक्षून समर्थ म्हणतातः—“ब्राह्मणमंडळ्या मेळ-वाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ ” ह्या एक विचारानें भरलेल्या मंडळ्यांचें पुढारपण शिवाजीनें व त्याच्या मुत्सद्यांनीं स्वीकारिलें; आणि स्वरा-ज्याची स्थापना करण्याचें अतिमानुष कृत्य घडवून आणिलें. येणेंप्रमाणें महाराष्ट्रेतर प्रांतां-तील हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मणप्रतिपाल + स्वराज्यस्थापना + एकीकरण+धुरीधरण म्हणजे महाराष्ट्रांतील हिंदुधर्म होतें अशी त्या काळीं समजूत होती. ह्याच समजुतीला महाराष्ट्रधर्म म्हणून समर्थांनीं संज्ञा दिली आणि ह्या धर्माची स्थापना व प्रसार करण्या-

करितां शिवाजी महाराज व त्यांचे अनुयायी ह्यांनीं प्राणांचा व वित्ताचा अपरंपार व्यय केला. महाराष्ट्रेतर प्रांतांतील हिंदुधर्मास सहिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास व महाराष्ट्रांतील हिंदुधर्मास जयिष्णु हिंदुधर्म म्हटल्यास ह्या दोन्ही धर्मांतील भेद उत्कटतेंकरून स्पष्ट होईल. दामाजीपंताच्या वेळचा स्तब्ध विठोबा सहिष्णु हिंदुधर्माची मूर्ति आहे व समर्थांचा उड्डाण करणारा मारुति जयिष्णु हिंदुधर्माची पताका आहे. सारांश, १६४६ पासून १७९६ पर्यंत ह्या कल्पनेला मराठे साक्षात् स्वरूप देत होते व बरोबर १५० वर्षें ह्या कल्पनेच्या धोरणानें मराठे चालले होते. महाराष्ट्र धर्माची ही कल्पना मराठ्यांच्या ह्या १५० वर्षांतील हालचालींची केवळ प्राणभूत आहे. आतां ह्या कल्पनेचा निरनिराळ्या काळीं कसकसा आविष्कार झाला तें सांगतों.

( अ ) स्वराज्यस्थापना हें एक महाराष्ट्रधर्मांतील मुख्य अंग. तत्साधनार्थ शिवाजीमहाराजांचे सर्व प्रयत्न चालले होते. दुर्दैवानें शिवाजी महाराजांचा अस्सल लेख अद्यापर्यंत एखादा दुसराच उपलब्ध आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४११ वें पत्र शिवाजीमहाराजांनीं १६५९ त लिहिलें आहे. त्यांत राज्य आक्रमिण्याकरितां परराज्यांतील देसाई, देशपांडे यांस ते काय काय लालुचा दाखवून बांधून घेत असत हें अंशतः कळण्यासारिखें आहे. ह्या पत्राचा सबंद उतारा खालीं देतों.

तहनामा राजश्री खेमसावंत व लखमसावंत देसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवई कारभारी येऊन ठराव करून दिला. सुरू सन तिस्साखमसैन अलफ.

प्रांत मजकूरचे महाल वगैरे चालत आहेत. आकार होईल त्याचा ऐवज दरसाल निम्मे हुजूर पावता करावा. निम्मा आकार राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे आणि ज्या वेळेस हुजूर चाकरीस बोलाविले जातील तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल. तेव्हां येत असावें. ... कलम १.

किल्ले फोंडो प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्यांच्या कुमकेस जात असावें. .. .. कलम १.

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधान करावें. ... ... ... .. ...कलम १.

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजरून कारकून व लोक राहतील ते ठेवून त्यांच्या नेमणुकीबद्दल हुजूर अम्मल पैकीं पावतें करावें. ... ... ... ... ...कलम १

प्रांतमजकूरची देशकत वतनें तुमचीं व बहादूर किताब अजरामत चालेल. त्यांतील किल्ले, कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. ... .. .. कलम १

शके १५८० विलंबीनामसंवत्सरे फाल्गुन वद्य ७ एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे. मोर्तब.

हा तहनामा १६५९ च्या मार्चांत झाला आहे. ह्याचा उल्लेख 'ग्रांटडफनें १६५९ सालच्या हकीकतीखालीं केला आहे. ह्यांत स्वराज्यसाधनाचें कलम आहे. शिवाजीनें मुधोळच्या घोरपड्यांस पाठविलेलें एक विस्तीर्ण पत्र मजजवळ आहे त्यांतही हाच हेतु दर्शित केला आहे.

( ब ) स्वराज्य, गनीमाई, सरदेशमुखी व चौथाई ह्या मागण्या मोंगलाईंतून मागण्याचा शिवाजीनें परिपाठ ठेविला. ह्यांत स्वराज्यसाधनाचा बराच इतिहास गर्भित आहे. आपण मोंगलाच्या राज्यांतील प्रांताचे सरदेशमुख आहोंत, मोंगलाच्या अमलांतील प्रांत पूर्वीं मराठ्यांच्या स्वराज्यांत मोडत होता व मोंगल लोक मराठ्यांना गनीम म्हणत त्याअर्थीं गनीमाइचा पैसा त्यांच्यापासून चोपून घेऊन उणें अक्षर बोलल्याची आठवण जन्मोजन्म त्यांना व्हावी, इत्यादि अर्थ ह्या शब्दापासून ध्वनित होतात.

( क ) महाराष्ट्रधर्मांत म्हणजे महाराष्ट्रसंस्थांत अष्टप्रधानघटित राज्यव्यवस्थेचाहि अंतर्भाव होतो. राष्ट्राच्या कल्पनेंत राष्ट्रभाषेचाहि समावेश होतो. शिवाजीराजे अवतीर्ण होईतोंपर्यंत दक्षिणेंतील मुसुलमानांच्या संसर्गानें जावली, शृंगारपूर इत्यादि स्थलींच्या मराठ्या-राजांच्या दरबारीं व शिवाजी राजाच्या पराक्रमाला सुरुवात होऊन त्यांच्या अभिषेककालपर्यंत खुद्द शिवाजीच्या दरबारीं देखील निरुपायानें फारसी व मुसुलमानी भाषेंतील शब्दांचाच प्रचार उत्कटत्वेंकरून सर्वत्र चालत असे. ह्या परदेशीय प्रचारामुळें स्वराज्याची व स्वराष्ट्राची शुद्ध कल्पना मराठ्यांच्या मनांत गढूळ व अस्पष्ट अशी असण्याचा संभव होता. म्हणून शिवाजीनें फारशी शब्द टाकून त्यांच्या ऐवजीं संस्कृत व महाराष्ट्र शब्दांचा उपयोग करण्याचा परिपाठ घातला.

येणेंप्रमाणें स्वराज्य साधून महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा विचार शिवाजीच्या राजनीतींत प्रधान होता. संभाजीराजालाहि महाराष्ट्रधर्म पसरविण्याचा उपदेश समर्थांनीं केला आहे. राजाराम व त्याच्या वेळचे मुत्सद्दी व सेनापति ह्यांनींहि हा स्वराज्यसाधनाचा कित्ता उत्तम गिरविला. पुढें शाहूमहाराज आले. त्यांनीं १७०७ पासून १७१४ पर्यंत जो प्रांत ताराबाईच्या हातून त्यांना मिळाला तेवढ्याची व्यवस्था करून नंतर १७१४ त बाळाजी विश्वनाथास स्वराज्यसाधन करण्याकरितां मतलबाची खालील याद करून दिली.

१ स्वराज्य थोरले कैलासवासी स्वामींचे वेळेप्रो रायगड व वरकड कोट देखील करून घेणें—ठाणीं मागून घेणें. .. .. ..कलम.

१ खटाव १ आकलूज १ कासेगांऊं १ मंगळवेढें. १ मिरज. १ पेडगांव १ जुन्नर किल्ले समत. १ चौल समत किल्ले. १ सांगोलें. १ नाझरे. १ चाकण. १ बेळगाऊं. १ कल्याण भिवंडी समत किल्ले . . कलम.

१ नबाब बहलोलखानाची दौलत फत्तेसिंग याबाचे नांवें करून घेणें. ... . कलम.

१ मातुश्री व मदनसिंग देखील कबिले व दुर्गाबाई सेवक लोक मागोन घेणें. कलम.

१ पेशजी मतलब लिहून दिल्हे आहेत त्याचे फर्मान सनदा करून घेऊन येणें ... ... ... . .. कलम.

१ कोंकणपट्टी देखील राजपुरी चौथ सर-

१ त्रिंबक मागोन घेणें... ... कलम.

१ तोफा दर संस्थानीं घेतील त्यांची चौथाई करून घेणें. ... ... कलम.

१ चांदाचें राज्य कान्होजी भोंसले यांनीं साधिलें आहे तें स्वराज्यांत करून घेणें. ... ... ... .. ... कलम.

१ सहा सुभे खेरीज गुजराथ, माळवा साधेल तेथवर साधणें ... ...कलम.

देशमुखी, स्वराज्य व वरकड साधेल त्यांचे फर्मान पृथकाकारें करून घेणें......कलम

१ सरदेशमुखी इनाम दरमहालास एक गांव करून घेणें.... ... ... कलम

१ चंदीप्रांतीं राज्यगडकोट देखील करून घेणें. ... ... ... ... ... कलम

१ जयसिंग पालकर येथील तरी मागून घेणें. ... . . ... ... ... कलम

ह्या यादींतील मतलबाचें साधन करण्याकरितां बाळाजी विश्वनाथ १७१८ त हुसेन-अल्लीबरोबर दिल्लीस गेला. १७१९ च्या फेब्रुवारींत व मार्चांत वर दिलेल्या यादींतील स्वराज्याच्या मतलबाच्या सनदा सय्यदबंधूंकडून त्यानें करून घेतल्या; त्या सनदा घेऊन तो साताऱ्यास परत आला व थोड्याच दिवसांत म्हणजे १७१९ च्या आक्टोबरांत मरण पावला. बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूचा सन १७२० अक्टोबर असावा असें ग्रांटडफ म्हणतो तें मला अनेक कारणांकरितां ग्राह्य दिसत नाहीं. पुढें १७२० च्या एप्रिलांत बाजीरावाला पेशवाई मिळाली. त्या वेळीं बाळाजी विश्वनाथाला दिलेली यादी शाहूनें बाजीराव बल्लाळाला दिली ( भारतवर्षांतील पत्रें व यादी ४० ).* कारण, कीं बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून जे फर्मान घेऊन आला त्यांची अंमलबजावणी करण्यास तो जगला नाहीं. तेव्हां बाजीरावाला पेशवाई देतांना साधावयाच्या राहिलेल्या मतलबांची याद जशीच्या तशीच शाहूनें त्याच्या स्वाधीन केली. बाजीरावाच्या कारकीर्दींतील पहिलीं देहा अकरा वर्षें ह्या यादींतील मतलब साधण्यांत गेलीं. १७३१ साच्या सुमाराला बाजीरावानें वरील यादींतील कलमें सर्व साधिलीं. येथपर्यंत म्हणजे १७३१ पर्यंत स्वराज्यसाधनार्थ मराठ्यांच्या सर्व खटपटी झाल्या. ह्या पुढें आतां मराठ्यांच्या राजनीतीनें दुसरें स्वरुप धारण केलें. तें स्वरुप म्हणजे हिंदुपदबादशाहीची स्थापना करणें हें होय. हिंदुपदबादशाहीची स्थापना करण्याची प्रस्तावना बाजीरावानें शाहूपुढें केलेली सर्वश्रुत आहेच. १७३१ पासून १७४० पर्यंत बाजीरावाची सर्व खटपट ह्याच स्थापनेच्या प्रीत्यर्थ झाली. दक्षिणेस तुंगभद्रा, उत्तरेस यमुना, पश्चिमेस समुद्र व पूर्वेस निजामुल्मुल्काचा प्रांत व पूर्वसमुद्र ह्या वाढत्या हिंदुपदबादशाहीच्या सीमा झाल्या. हें एवढें काम करून

---

* भारतवर्षांत छापिलेल्या पत्रें व यादींतील ४० वें पत्र व काव्येतिहाससंग्रहांत छापिलेल्या थोरल्या शाहूमहाराजांच्या चरित्रांतील ४० व्या पृष्ठावरील याद अक्षरशः एकच आहेत. भेद म्हणून एवढाच कीं, चरित्रांतील याद बहुतेक शुद्ध छापलेली आहे व भारतवर्षांतील याद येथून तेथून चुकांनीं ओथंबलेली आहे. तुलना करण्याकरितां भारतवर्षांतील याद जशीच्या तशीच येथें देतों.

यादी मतलब घेणें म्हणोन शाहूमहाराज यांणी बाजीराव बल्लाळ यांजकडे पाठविली तीः—

तच्या ११ वर्षांतील बाळाजी बाजीरावाच्या धोरणाचें खालीं लिहिल्याप्रमाणे पृथक्करण करितां येतें. ( अ ) हिंदुस्थानांत पश्चिमोत्तर दिशेनें उत्तर रजपुताना, अंतर्वेद, रोहिलखंड, मुल्तान, लाहोर, ठठ्ठा व भकर ह्या प्रांतांत अंमल बसवावयाचा ( लेखांक १ ). ( ब ) हिंदुस्थानांत पूर्वेकडे काशी, प्रयाग, अयोध्या, बंगाला इत्यादि प्रदेशांवर मोहीम करावयाची ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ३६२, ३७३, ३८७, ३८८. प्रस्तुत ग्रंथांतील लेखांक ३१, ३७, ३९ इत्यादि ). ( क ) दक्षिणेंत पूर्वेकडे सलाबतजंगाचा प्रदेश घ्यावयाचा; ऐन कर्नाटकांत श्रीरंगपट्टणाला हिंदुराजांच्या ताब्यांत तें होतें तोंपर्यंत अंकित करून टाकावयाचें व पुढें मुसुलमानांच्या ताब्यांत गेल्यावर जिंकून घ्यावयाचें. ( ड ) कोंकणांत सुरत, जंजिरा वगैरे ठिकाणें खालसा करावयाचीं. ( ई ) खुद्द महाराष्ट्रांत सातारची व कोल्हापुरची गादी एक करावयाची. ( फ ) आणि सरदारांची व्यवस्था लावावयाची. येणेंप्रमाणें बाळाजी बाजीरावाच्या राजनीतीचें धोरण सहा प्रकारचें होतें. पैकीं (अ), (ब), ( क ), ( ड ) आणि ( फ ) ह्या प्रकारांची माहिती ह्या पुस्तकांत, काव्येतिहाससंग्रहांत व ऐतिहासिकलेखसंग्रहांत छापलेल्या पत्रांतून बरीच आली आहे. त्यावरून त्यावेळच्या महाराष्ट्रमुत्सद्यांच्या मनांत कांहीं विशिष्ट हेतु होते व तत्सिद्ध्यर्थ त्यांचे व्यवस्थित प्रयत्न चालले होते हें स्पष्ट दिसून येईल. पश्चिमोत्तर दिशेकडील प्रदेश दिल्लीच्या पातशहानें १७५० त मराठ्यांना बहाल करून टाकिले. तेव्हां १७६१ पर्यंत त्यांत अंमल बसविण्याचा उद्योग करणें त्यांना अवश्यच झालें होतें. लेखांक १ त अबदालीला तंबी देण्याचें वचन मराठ्यांनीं १७५० त पातशहाला दिलें होतें. तेव्हांपासूनच अबदालीचा व मराठ्यांचा सामना होणार हें ठरून गेल्यासारिखें होतें. रघुनाथरावानें १७५८ त लाहोर घेतलें, त्यामुळें अबदाली चवताळला व मराठ्यांच्या अंगावर पानिपतचा घोर प्रसंग आला असें ग्रांट्डफ् म्हणतो, तें फारसें विश्वसनीय नाहीं. हें १७५० तच अबदालीला तंबी देण्याचा मराठ्यांनीं पत्कर घेतला होता ही गोष्ट ध्यानांत धरिली म्हणजे कळून येईल व रघुनाथरावाला विनाकारण दोष देण्यांत अर्थ नाहीं अशी खात्री होईल. पूर्वेकडील काशी व बंगाला हे प्रदेश घेण्याचा बाळाजीचा १७४२ पासूनच प्रयत्न चालला होता. १७४७ त स्वतः बाळाजी काशींत जाऊन आला. १७५२ च्या डिसेंबरांत भालकीचा तह झाल्यावर जयाप्पा १७५३ च्या मेंत हिंदुस्थानांत जावयास निघाला त्यावेळीं काशीचें काम उरकून घ्यावयाची कामगिरी बाळाजीनें जयाप्पाला सांगितली होती. पुढें जयाप्पा कुंभेरचा वेढा झाल्यानंतर काशीकडे जाणार तों त्याला नागोरची कामगिरी आली व काशीचें काम तसेंच तहकूब ठेवून यावें लागलें. तरी देखील विजेसिंगाचे पारपत्य केल्यावर काशीकडे जाण्याचा त्याचा उत्कट मनोदय होता. लेखांक ३१ त १७५४ च्या मार्चांत बाबूराव महादेवाला जयाप्पा लिहितो, " तुमचा उपराळा करून श्रीचें काम शेवटास न्यावें यापरतें दुसरें अधिकोत्तर नाहीं ". पुढें १७५४ च्या आगष्टांत जयाप्पा पुनः लिहितो, " त्यांचें पारपत्य यथायुक्त करून श्रीक्षेत्रांत अंमल खुलासा करणें हे गोष्ट चित्तांत फारशी आहे. " जयाप्पा १७५५ त वारल्यानंतर १७५९ त

दत्ताजीला काशी, प्रयाग व बंगाल ह्या प्रांतांवर स्वारी करण्यास बाळाजीनें सांगितलें; परंतु, अबदालीच्या गडबडीमुळें तें काम तसेंच राहिलें व पुढें कधीं श्री मराठ्यांच्या हातांत आली नाहीं. दक्षिणेंत सलावतजंगावर १७५१, १७५२, १७५७ व १७६० ह्या सालीं पुण्याकडून व १७५३, १७५४ व १७५५ ह्या सालांत खानदेश, अलजपूर, येलगंदल वगैरे प्रांतांच्या रोखें मराठ्यांनीं सलावतावर स्वाऱ्या केल्या व त्याच्या हातांतून " बहुतेक सगळी दक्षिण १७६० त मोकळी केली " ( लेखांत १६६ ). १७५१ त चार लाखांचा मुलूख, १७५२ त पन्नास लाखांचा मुलूख, १७५७ त पंचवीस लाखांचा मुलूख व १७६० त साडेएकसष्ट लाखांचा मुलूख सलावतापासून बाळाजीनें घेतला. शिवाय १७५५।५६ त पंधरा लाखांचा मुलूख परशुराम महादेवाच्या हस्तें मिळाला. तो निराळाच ( लेखांक ६५ ). तसेंच जानोजी भोसल्यानेंहि पाईनगंगेच्या अलीकडे आपलें घोडें वरेंच ढकलिलें होतें. सारांश, १७६० त सलावताजवळ तेलंगणाचा पट्टा तेवढा उरला होता. बाकीचा सर्व मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत आला होता. १७५९ पर्यंत बहादूरभेंडा, बेदनूर, होळीहोन्नूर, सावनूर, सोंधें वगैरे ठिकाणचे पाळेगार बहुतेक सर्व पादाक्रांत करून पेशव्यांनीं म्हैसूरचें राज्य बहुतेक संपुष्टांत आणिलें. पुढें तें संस्थान हैदरअल्लीच्या ताब्यांत गेलें. तेव्हां तें अजीबात खालसा करावें असा सदाशिवरावभाऊचा मनोदय होता. परंतु, अबदालीच्या गडबडीमुळें तें काम लांबणीवर टाकणें भाग पडलें. कोंकणांत शामळाची कासें, उंदेरी वगैरे स्थलें व तुळाजीचें विजयदुर्ग वगैरे किल्ले बाळाजीनें घेऊन, बहुतेक सर्व कोंकणपट्टी सोडवून घेतली. येणेंप्रमाणें १७६० पर्यंत, लाहोर, मुलतान, ठठ्ठा, भकर, अंतर्वेद, रोहिलखंड, कटक, नागपूर, माळवा, गुजराथ, काठेवाड, खानदेश, औरंगाबाद, विजापूर, कोंकण व किल्ले कोपलपर्यंत सर्व मुलूख मराठ्यांच्या साक्षात् अमलाखालीं बाळाजीच्या राजनीतीनें आणिला. येथपर्यंत मजल आणून ठेपल्यावर महाराष्ट्रधर्माचा प्रसार आणीक करावयाचा तों अबदालीची धाड आली आणि कांहीं कालपर्यंत आहे तेंच राखण्याच्या खटपटींत पेशव्यांस पडावें लागलें. ती खटपट १७६१ च्या पुढली असल्यामुळें तिचा विचार मी येथें करीत नाहीं. इतकेंच सांगून ठेवितों कीं, ह्याहि खटपटींत व्यवस्थित धोरण होतें ( भारतवर्षांतलि पत्रें, यादी वगैरे ८. कलमें ३।४।८।११ ). हें इतकें महाराष्ट्रधर्माचा प्रसार व ब्राह्मणपदबादशाहीची प्रस्तावना व विस्तार करण्याकरितां मराठ्यांनीं काय काय खटपटी केल्या तत्संबंधीं झालें. आतां पुढील विवेचनांत साताऱ्च्या छत्रपतींची व्यवस्था करण्यांत पेशव्यांचें काय धोरण होतें त्याचा विचार करितों.

## विवेचन चवथें.

महाराष्ट्रधर्माचा म्हणजे संस्थांचा प्रसार व ब्राह्मणपदबादशाहीची स्थापना करणें हें बाळाजीच्या राजनीतीचें सर्वस्व होतें. ह्या मतलबाच्या सिद्ध्यर्थ महाराष्ट्रांत व महाराष्ट्राच्या बाहेर त्याचे प्रयत्न चालले होते. पैकीं महाराष्ट्राच्या बाहेर त्यानें काय खटपटी केल्या त्याचे

दिग्दर्शन वरील विवेचनांत केलें आहे. आतां खुद्द महाराष्ट्रांत त्यानें काय 'खटपट केली तें सांगतों. बाळाजी विश्वनाथापासून बाळाजी बाजीरावासुद्धां सर्व पेशव्यांचा मुख्य हेतु स्वत:चें महत्त्व सर्वांहून अधिक वाढविण्याचा होता. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर चंद्रसेन जाधव शाहूचा सेनापति झाला. त्याला बाळाजी विश्वनाथानें प्रथम पिटून लाविलें. नंतर त्यानें बहिरोपंत पिंगळ्याला एकीकडे मारिलें व आपण मुख्य प्रधानकीचा अधिकार म्हणजे मराठ्यांचें धुरीणत्व मिळविलें. बाजीरावाचे मुख्य प्रतिस्पर्धी म्हटले म्हणजे श्रीपतराव प्रतिनिधि, त्रिंबकराव दाभाडे व रघोजी भोंसले हे होत. ह्यांपैकीं पहिल्या दोघांचें महत्त्व १७३१ च्या आंत त्यानें पूर्णपणें नाहींसें केलें व पुढील ९ वर्षें मराठ्यांचें धुरीणत्व अनन्यसामान्यत्वेंकरून चालविलें. रघोजीचें प्रस्थ कांहीं राहिलें होतें तें बाळाजी बाजीरावानें १६ जानेवारी १७४४ त मोडून त्याला आपला स्नेही केलें. शाहूच्या मृत्यूनंतर १७५० सालीं बाळाजीचे ल्हानसहान प्रतिस्पर्धीहि वर डोकें करूं लागले व कांहीं वेळ त्याचे स्नेही सुद्धां त्याच्याविरुद्ध उठले. ताराबाई, जगजीवनराव प्रतिनिधी, यमाजी शिवदेव, बाबूराव बारामतीकर, दमाजी गायकवाड व दाभाडे ह्यांना जागच्याजागीं बसविण्यांत बाळाजीला १७५० पासून १७५३ पर्यंत खटपट करावी लागली. ह्या अवधींत सदाशिव चिमणाजी व रामचंद्रबाबा शेणवई ह्यांना देखील प्रतिस्पर्धेच्या पिशाचिकेनें सोडिलें नाहीं. खुद्द रामराजाहि बाळाजीविषयीं उदासीन राहूं लागला. तेव्हां पहिल्या दोघांना मायावीपणानें फितवून बाळाजीनें रामराजावर आपला सर्व राग काढिला. सातारच्या छत्रपतीविषयीं बाळाजी बाजीरावाच्या मनांत फारशी प्रेमबुद्धि कधींच नव्हती. खुद्द शाहूमहाराजांशींहि बाळाजी बाजीरावाचें वर्तन धरसोडीचेंच होतें. परंतु बाळाजी बाजीरावानें हें धरसोडीचें वर्तन प्रथम घालून दिलें असें मात्र कोणीं समजूं नये. १७४० त चिमाजीआप्पा कोंकणांत असतां कांहीं राऊत गोवळकोंड्याकडे पाठवून द्यावे म्हणून शाहूनें चिमाजीला लिहिलें. तें चिमाजीला मान्य न होऊन चिमाजीचा व शाहूचा बराच खटका उडाला ( भारतवर्ष पत्रें व यादी ३८ ). बाळाजी बाजीरावानें पेशवाईचीं वस्त्रें १७४० त घेतलीं. तीं त्याला महत्प्रयासानें प्राप्त झालीं. कांकीं रघोजी भोसल्यानें बाबूजीनाईक बारामतीकराला पेशवाई देवविण्याचा घाट घातला होता. परंतु महादोबा पुरंधरे व गोविंदराव चिटणीस ह्यांच्या विद्यमानें बाळाजीनें कशीतरी पेशवाई मिळविली. ह्यावेळीं जो त्रास झाला त्याचा सूड बाळाजीनें अंतस्थ रीतीनें उगवून घेतला. इहिदे आर्बैन रौद्री नामसंवत्सरीं म्हणजे इ० स० १७४० सालीं कोल्हापूरचे संभाजी महाराज सातान्यास आले असतां त्यांच्याशीं बाळाजी बाजीरावानें एक गुप्त करार केला. त्यांत खालील कलम आहे:—

" शाहूमहाराज यांचा जीवात्मा आहे तों बाह्यात्कारी त्यांचे सेवक, अंतर्यामीं स्वामींचे. शाहूमहाराज यांणीं कैलासवास केल्यावर दोहीं राज्यांवर स्वामींची ( सत्ता ) आणि आम्हीं सेवक स्वामींचे " ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे ४२८।४२९ ). ह्याप्रमाणें शाहूवर सूड उगविल्यानंतर, त्यानें रघोजीचा समाचार घेतला. १७४३ त रघोजीचा पराभव करून १७४४ त रघोजी सातान्यास आला असतां शाहूकडून रघोजीला हिंदुस्थानांतील प्रांतांची

वांटणी करून देवविली ( भारतवर्ष, ४६।४७।४८।४९ ). रघोजीच्या गर्वाचा परिहार केल्यावर त्यानें बाबूजीनाईकावर दृष्टि फिरविली. नाईक, सोंधें बिदनूर, सावनूर वगैरे संस्थानिकांच्या प्रांतांत जाऊन चौथ सरदेशमुखी गोळा करीत असे. सावनूरच्या पठाणाला व इतर संस्थानिकांना आंतून फूस देऊन नाईकाचें सर्वस्वीं नुकसान करण्याचें बाळाजीनें आरंभिलें. ( का. पत्रें, यादी वगैरे ६७।६८।७७।७८ ). बाळाजीनें शाहूला, रघोजीला व बाबूजी नाईकाला हा असा त्रास दिला. शिवाय, शाहूचें कर्ज फेडण्यास बाळाजी विलंब लावूं लागला. शाहूच्या राण्यांचींहि कर्जें फेडण्यास बाळाजी अळमटळम करी. तेव्हां शाहूला बाळाजीचा राग अर्थात्च आला व १७४७ त बाळाजीचा अधिकार काढून घेण्याचा त्यानें विचार केला. ह्या प्रसंगाला अनुलक्षून भारतवर्षांतील नंबर ४५ चें पत्र आहे. * त्यावरून बाळाजीला निरोप देण्याचा शाहूचा विचार होता हें स्पष्ट होतें. शाहूला ह्यावेळीं बहुतेक वेड लागण्याचा समय येऊन तो पुढें दोन वर्षांनीं १७४९ साच्या डिसेंबराच्या १५ तारखेला मरण पावला. शाहूच्या मरणापूर्वीं तीन महिने बाळाजी साताऱ्यास येऊन बसला होता व महाराजांच्या मरणोत्तर गादीवर कोणास बसवावें ह्या खटपटींत निमग्न होता. सातारच्या गादीला त्यावेळीं हक्क सांगणारे दोन पुरुष होते. ( १ ) पहिला हक्कदार, ताराबाईचा नातू रामराजा व ( २ ) दुसरा, कोल्हापूरचा संभाजी राजा. पैकीं संभाजी राजाकडे बाळाजीचा १७४० पासून ओढा होता हें वर सांगितलेंच आहे. परंतु, तो शाहूमहाराजांना पसंत नव्हता. राजाराम महाराजांचा वडील पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा ह्यात आहे असें शाहूला नुकतेंच कळलें होतें. तेव्हां त्याला दत्तक देऊन राज्य चालवावें असें शाहूचें साग्रह व सशास्त्र म्हणणें पडलें. त्यावेळीं बाळाजीला शाहूनें एक चिठ्ठी लिहिली आहे ती खालीं देतों

राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान पंडित यांस

आज्ञा:—

तुम्ही फौज धरनें. आज्ञा केली त्याच्या दैवी नाहीं.

---

* ह्या पत्रांत भारतवर्षकार, नाईक कोण म्हणून विचारतात ते हे बाबूजीनाईक बारामतीकर होत. भाऊंनीं १७४६ अक्टोबरपासून १७४७ च्या मेपर्यंत सावनुरावर व बहादूरभेंड्यावर स्वारी केली ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी ६८ ). त्यावेळीं ते सोंधें बिदनूर प्रांताजवळ असल्याकारणानें गोंवेंकरांना सहजासहजीं भीति वाटून सांत्रतांकडील पोर्टुगीज लोकांचा शह चुकेल अशी बाळाजीची अटकळ होती ( पत्रें, यादी वगैरे ७७।७८ ). सावनूरचा नवाब सोंध्याकडे आला म्हणजे सदाशिवरावभाऊला शह बसून गोंवेंकरांचा शह उडून जाईल असें बाळाजीचें म्हणणें होतें. ह्यासंबंधीं बोलणें करीत बाळाजी साताऱ्यास असतांना हें पत्र लिहिलें आहे. शाहूनें बाळाजीची स्वामिभक्ति पहाण्याच्या इच्छेनें त्याला निरोप देण्याचें म्हणजे काढून टाकण्याचें ढोंग केलें म्हणून शाहूमहाराजांच्या बखरींत लिहिलें आहे. परंतु, शाहूचें हें ढोंग नसून मनःपूर्वक करणें होतें हें स्पष्ट आहे.

महाराजास दुखनें झालें. नाहीं*; वरें होत नाहीं. राज्यभार चालला पाहिजे. तरी पुढें वंश* बसवन. कोल्हापुरचें न करनें. चिटणिसास सर्व सांगितलें तसें करनें. वंस होईल त्याच्या आज्ञेंत चालनें. राजमंडळ चालवनें. चिटणीस स्वामीचे इसवासू. त्याच्या विचारें राज्य राखनें. वंस होईल तो तु ( ह्यास **अंतर ) करनार नाहीं. सुदन असा.*

ह्या चिठ्ठीवरून बाळाजीवर शाहूचा फारसा विश्वास होता असें दिसत नाहीं. रघोजी भोंसले व दाभाडे ह्यांना बोलाविलें असतां ते येऊं पावले नाहींत. तेव्हां "फौज धरनें" त्यांच्या दैवीं नाहीं अशी शाहूची खात्री झाली. त्यांना सामर्थ्य असतें व अक्कल असती तर ते महाराजांच्या आज्ञेबरहुकूम केव्हांच येऊन पावते. ते आले नाहींत तेव्हां बाळाजीच्या स्वाधीन फौजेचा ( १ ) अधिकार देण्याखेरीज शाहूला गत्यंतरच राहिलें नाहीं. बाळाजीचा ओढा संभाजीराजाकडे विशेष. तेव्हां ( २ ) त्याला बिलकुल आणूं नये असें शाहूनें लिहून ठेविलें. ( ३ ) वंश आहे तोच चालवावा म्हणजे राजारामाचा पुत्र जो शिवाजी त्याचा मुलगा रामराजा ह्याला गादीवर बसवावें ही शाहूची तिसरी आज्ञा होती. तसेंच ( ४ ) सरदार लोकांचेंहि पूर्वीप्रमाणेंच चालवावें अशी शाहूची चवथी आज्ञा होती. ह्या चार आज्ञांपैकीं फौजेचा अधिकार मिळविण्याकरितां बाकींच्या तीन आज्ञा मनांतून नसतांहि बाळाजीनें मान्य केल्या व पुढें समयानुसार रामराजाचें व सरदारांचें महत्त्व कमी करण्यास कमी केलें नाहीं व कोल्हापुरच्या संभाजीशीं पुढील दहा वर्षें मोठें प्रेमाचें वर्तन ठेविलें. इतकेंच नाहीं; तर रामराजा जिवंत असतां नवा राजा करावा असा त्यानें पुढें १७६१ त घाट घातला ( लेखांक २८९ ). बाळाजीची संभाजीराजावर किती ममता होती हें काव्येतिहासांतील ३३५ व्या पत्रावरून कळून येईल. संभाजीराजा १७६० च्या डिसेंबरांत वारला. त्यानंतर १७६१ च्या जूनच्या ९ तारखेला हें पत्र लिहिलें आहे. त्यांत संभाजीशीं बाळाजीचा केवढा स्नेह होता तें जिजाबाईनें मोठ्या सलगीनें ध्वनित

---

* ही चिठ्ठी काव्येतिहाससंग्रहांत छापलेली प्रसिद्ध आहे. विराम चिन्हें देऊन ती मीं येथें छापिली आहे. ( * ) नाहींच्या बद्दल कांहीं, 'वंश' ह्याबद्दल वंस, ** ह्या फुल्यांबद्दल 'ह्यास अंतर' शब्द असावे असें सुचाविणें मला योग्य वाटतें. मूळ लेखाची जशीच्या तशी नकल काव्येतिहाससंग्रहांत छापिलेली नाहीं. कारण, झालें, वंश, इत्यादि शब्द मूळांत जाले, वंस, असे लिहिले असले पाहिजेत. अस्सल लेख जशाचा तसा मिळाल्यास अनेक शंकांचें निवारण होईल. ( १ ) अक्षर शाहूचें आहे कीं नाहीं तें कळेल. ( २ ) कागदावरून व शाईवरून लेख बनावट आहे कीं काय त्याचा निर्णय होईल. ( ३ ) व मूळ लेखांतील अक्षरें जशींच्या तशींच काय आहेत तीं कळतील. चिटणीसांच्या बखरींतील हकीकतीवरून हा लेख अस्सल असावा असें बव्हशीं म्हणण्यास हरकत नाहीं. इतकेंच कीं बखर लिहिणाऱ्याच्या पूर्वजाच्या हातांत ही चिठ्ठी शाहूनें दिली असल्यामुळें, तिच्या खरेपणाविषयीं थोडा संशय येतो.

केलें आहे व स्पष्ट लिहिलेंहि आहे. कोल्हापुरची व सातारची गादी एक करावी व सर्व सत्ता आपल्या हातीं ठेवावी हा बाळाजींच्या मनांतला द्विविध हेतु होता. ही एकी करण्याची कल्पना शाहूराजाच्या डोक्यांत शिरली नाहीं, त्यामुळें 'करवीरचें न करनें' म्हणून बाळाजीला त्यानें आज्ञा केली. हा हेतु साध्य झाला असतां मराठ्यांचें राज्य एकछत्री झालें असतें अशी बाळाजीची योजना होती. परंतु, शाहूच्या हट्टामुळें व अज्ञानामुळे बाळाजीला हा आपला फार दिवसांचा हेतु एकीकडे ठेवावा लागला आणि शाहूच्या आज्ञा त्या वेळेपुरत्या तरी शिरसा मान्य कराव्या लागल्या. ह्या आज्ञा मान्य करण्यांत बाळाजीचें अतोनात नुकसान झालें. दोन्हीं राज्यें एक होण्याची आयती संधि येत होती ती गेली ती गेलीच; परंतु, स्वतःची सत्ता कायम ठेवण्यास त्याला नंतर तीन वर्षे एकसारखी धडपड करावी लागली. कारण, रामराजा राज्यावर आल्यानें ताराबाईचें महत्त्व अतिशय वाढलें. १७०० त राजाराम महाराज वारल्यावर ह्या बाईनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व शाहूच्या विरुद्ध वागून सर्वांचा द्वेष जोडिला होता. शाहूराजे १७०७ त मोंगलांच्या कह्यांतून सुटल्यावर त्यांच्याशींहि १७१२ पर्यंत ह्या बाईनें वाद मांडिला होता. १७३० त ह्या बाईला शाहूनें धरून सातारा येथें कैदेंत ठेविलें. १७४९ पर्यंत ही साताऱ्यास प्रतिबंधांत होती. पुढें हिचा नातू जो रामराजा त्याला गादी मिळावी असें शाहूनें ठरविलें. तेव्हां हिचें महत्त्व वाढून आपल्या नित्याच्या स्वभावाप्रमाणें हिनें बाळाजींशीं प्रतिस्पर्धा मांडली; दादोबा प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांचें खूळ माजविलें; बाबूजी नाईकांस भर दिली; सलाबतजंगाचा दिवाण जो रामदासपंत त्याच्याशीं राजकारण केलें; बाळाजीची पेशवाई रामदासपंताचे भावास देण्याचा बेत केला; महादोबा पुरंदऱ्याला देखील फितविलें (का० पत्रें, यादी वगैरे-३५९); व त्याच्या करवीं रामचंद्रबाबा शेणवई व सदाशिव चिमणाजी ह्यांचें व बाळाजीचें वाकडें आणिलें; दमाजीला साताऱ्यास बोलाविलें; उमाबाई दाभाडीणीस चढी लाविलें; खुद्द शिंदेहोळकरांच्याहि बुद्धीचा भेद करून पाहिला व रघोजीला मोंगलाकडे जाण्यास भर दिली. हा खेळ एकसारखा १७५० पासून १७५२ पर्यंत चालला होता व तो चालत असतां रामराजा ताराबाईच्या मुठींत राहून बाळाजीच्या धडपडीकडे उदासीनपणें पहात होता. रामराजा उदासीन राहिला तो कांहीं मतलब साधावा अशा हेतूनें राहिला असा अर्थ नव्हे. तर, त्याच्या नैसर्गिक कर्तृत्वहीनतेमुळें त्याला हें औदासिन्य पत्करावें लागलें. रामराजा खुळा आहे अशी इतर लोकांप्रमाणें बाळाजींची खात्री झाली होती. त्याच्याविषयीं कोणाच्याच मनांत आदरबुद्धि नव्हती. गयाळ म्हणून ताराबाई त्याचा द्वेष करी. कर्तृत्वहीन म्हणून सरदारांचें त्याच्या ठिकाणीं प्रेम नसे आणि प्रतिस्पर्धी म्हणून कोल्हापुरकर त्याचा मत्सर करी. एवंच रामराजा कोणालाच हवा असें वाटत नव्हतें. शाहूराजाची इच्छा म्हणून बाळाजीनें रामराजाला पानगांवाहून आणिला व गादीवर बसविला. त्याला कांहीं तरी राजकारण करून काढून टाकावें अशी बाळाजीची इच्छा होती असें जरी खास म्हणतां येत नाहीं तत्रापि त्याचें महत्त्व होईल तितकें कमी करण्याच्या इच्छेनें बाळाजीनें त्याचा शिक्का तीन वर्षे चालू केला नाहीं. ह्या ग्रंथांतील

१७५० तील ३० जानेवारीच्या ( लेखांक २६ ) पत्रावर, काव्येतिहाससंग्रहांतील १७५१ च्या २९ सप्टेंबरच्या ( ३३४ पत्रें, यादी वगैरे ) पत्रावर, १७५२ च्या १२ एप्रिलच्या ( पत्रें, यादी वगैरे ३७४ ) पत्रावर व १७५२ च्या १५ आक्टोबरच्या ( पत्रें, यादी वगैरे ३९५ ) पत्रावर शिक्का शाहूराजाचाच आहे. ह्यावरून रामराजाला शाहूराजाच्या इच्छेबरहुकूम बाळाजीनें यद्यपि मान्य केलें होतें, तत्रापि त्याचा शिक्का चालविण्यांत तीन वर्षे तो धरसोड करीत होता असें दिसतें. अर्थात् दुसरा राजा करावयाचा म्हणजे संभाजीला सातान्यास आणावयाचा त्याचा बेत होता असें अनुमान करण्यास प्रवृत्ति होते. नाहींतर शाहूच्या मृत्यूनंतर तीन वर्षे शाहूचा शिक्का चालविण्याच्या कामीं धरसोड करण्यांत बाळाजीचा कांहींच मतलब नव्हता असें होईल. तसेंच परराष्ट्रांशीं केलेल्या तहांतहीं साताऱ्च्या छत्रपतींचें नांव १७५० सालापासून १७६१ पर्यंत कोठेंहि नाहीं. जेथें तेथें बाळाजी बाजीरावाचेंच नांव प्रमुखलेलें दिसतें ( लेखांक १।६५।१२९।१३०।१४५ ). पुढें १७५३ च्या व १७५४ च्या शेवटीं ताराबाईचीं धुसपुस बाळाजीनें मोठ्या युक्तीनें बंद केली व रामराजाला निव्वळ बाहुलें करून सोडिलें. साताऱ्च्या छत्रपतीचें महत्त्व समूळ नाहींसें केल्यावर आणीक एक गोष्ट बाळाजीस करावयाची राहिलीच होती. ती गोष्ट म्हणजे कोल्हापुरची व साताऱ्ची गादी एक करून मराठ्यांचें राज्य एकछत्री करणें ही. ह्या हेतूच्या साधनार्थ १७४० त संभाजीशीं त्यानें गुप्त करार केला. १७५० त हा हेतु साध्य होण्याचा समय आला असतां शाहूच्या हट्टामुळें तो फसला गेला. तरी पुढें अशीच एकादी संधि येईल ह्या आशेनें बाळाजीनें संभाजीशीं पूर्वीचा स्नेह कायम ठेविला ( का० पत्रें, यादी वगैरे ३३५ ). कारण संभाजीहि वृद्ध झाला असून लवकरच मरणासन्न होईल असा संभव होता. हा संभव ज्यावेळीं केव्हां खरा ठरेल त्यावेळीं संभाजीचा वारस जो रामराजा त्याला कोल्हापुरची गादी मिळून साताऱ्चें व कोल्हापुरचें राज्य एक करण्याचा फारा दिवसांचा हेतु साध्य होईल असा बाळाजीचा बेत होता. परंतु, ज्या हट्टानें व अज्ञानानें १७४९ त शाहूला पछाडिलें त्याच हट्टानें व अज्ञानानें १७६० त संभाजीला गांठिलें व त्यानें मरणापूर्वी खानवटकर भोसल्यांच्या कुळांतील एक मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें. पुढें १७६२ त जिजाबाईनें ह्या मुलाला दत्तकहि घेतलें. संभाजीच्या ह्या कृत्यानें बाळाजीचा बेत ह्यावेळीं दुसऱ्यांदा फसला. परंतु एवढ्यानें नाउमेद होऊन बाळाजी स्वस्थ बसला नाहीं. खानवटकरांच्या घराण्यांतील जो मुलगा जिजाबाई दत्तक घेणार होती त्यालाच रामराजाच्या मांडीवर देऊन रामराजास वनवासास जावयास सांगावें असा बाळाजीचा ह्यावेळीं मनोदय होता ( लेखांक २८९ व चिटणिसांची बखर ). ह्या खानवटकरांच्या कुळांतील नवा राजा करण्यांत मतलब असा कीं पुढें मागें कोणतीहि एक गादी निपुत्रिक झाली असतां ज्या गादीवरील वंश हयात असेल त्याला निपुत्रिक गादीवर हक्क सांगतां यावा व हीं दोन्हीं राज्यें एक व्हावीं. पानिपतची लढाई झाल्यावर नवा राजा करण्याचा बाळाजीचा बेत होता ( लेखांक २८९ ). परंतु बाळाजीला पुढें मृत्यूनें लवकरच गांठिल्यामुळें तो बेत तसाच राहिला. असो. महाराष्ट्रांत अव्वल प्रतीचें घराणें म्हटलें म्हणजे साताऱ्च्या छत्रपतीचें. त्यांचें

महत्त्व कमी करण्यास बाळाजीनें वर सांगितलेल्या खटपटी केल्या. येणेंप्रमाणें. बाहेर मेहनत करून बाळाजीनें १७६० त बहुतेक हिंदुस्थान व बहुतेक सर्व दक्षिण जिंकून टाकिली व आंत मेहनत करून साताऱ्चे छत्रपती व त्यांचें राजमंडळ ह्यांस बहुतेक संपुष्टांत आणून आपलें वर्चस्व सर्वत्र स्थापित केलें व ब्राह्मणपदबादशाहीची कल्पना खरी करून दाखविण्याचा प्रसंग जवळ आणून ठेविला. पानपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर त्या यशाच्या दराऱ्याच्या जोरावर सर्व भरतखंड महाराष्ट्रमय त्यानें करून टाकिलें असतें व बाळाजी विश्वनाथाचा वंश ब्राह्मणपदबादशाहीचा आधारस्तंभ झाला असता. तसेंच पानिपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर ह्या दुर्बल छत्रपतींचा मागमूसही न रहातां, असा तर्क करण्यास जागा आहे. कारण पेशव्यांचें महत्त्व १७५० पासून १७६१ पर्यंत जसजसें वाढत चाललें तसतसें छत्रपतींचें कमी कमी होत चाललें हें विवेचनावरून दिसून येण्यासारिखें आहे. अर्थात् पेशव्यांचें महत्त्व १७६१ त झेनिथाला जाऊन पोंचलें असतें तर छत्रपतींचें महत्त्व नाडिराला जाऊन बुडलें असतें ह्यांत संशय नाहीं. साताऱ्च्या छत्रपतींना पुढें पुढें कोणी अगदीं विचारीत नाहींसें झालें ह्याचा दाखला पाहिजे असल्यास नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत उत्तम पहावयास मिळतो. आम्ही पेशव्यांचे सेवक, आम्हास छत्रपतींशीं कर्तव्य नाहीं असें नाना फडणवीस लिहितो. ह्यावरून छत्रपतीविषयीं इतरांच्या मनांत किती आदरबुद्धि होती ह्याचें अनुमान करितां येईल. परंतु मराठ्यांच्या दुर्दैवानें तो सुयोग जुळून आला नाहीं. सामान्य नीतीच्या दृष्टीनें पहातां ह्या दुर्बल छत्रपतींचें महत्त्व बाळाजीनें संपुष्टांत आणिलें हें बरेंच गर्हणीय आहे. परंतु बुद्धीनें व शक्तीनें बलिष्ठ अशा पुरुषाच्या किंवा पुरुषांच्या हातांत कोणत्याहि राष्ट्राचीं सूत्रें असणें मोठें हितकर असतें ह्या राजनीतीच्या धोरणानें बाळाजीच्या प्रयत्नांचा विचार केल्यास झालें तें योग्यच झालें असें म्हणणें प्राप्त होतें. इतकेंच कीं जें झालें तें पानिपत येथील घोर संकटामुळें पूर्णपणें झालें नाहीं. एवढेंच नव्हे; तर जें झालें तें अंशतः न झाल्यासारिखेंच झालें. हें पाहून मन किंचित् उद्विग्न होतें. उद्विग्न होण्याचें कारण असें आहे कीं, ही पानिपत येथील विपत्ति पर्यायानें व परंपरेनें मराठयांच्या राष्ट्राच्या नाशास कारण झाली. ती कशी झाली व तिचीं कारणें प्रस्तुत ग्रंथांत छापिलेल्या पत्रांच्या आधारानें काय होतीं त्याचा पुढील विवेचनांत सविस्तर प्रपंच केला आहे.

## विवेचन पांचवें.

दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या विवेचनांवरून दिसून येईल कीं मराठ्यांनीं १७६१ पर्यंत जीं जीं कृत्यें केलीं त्या सर्वांत एकच धोरण होतें. महाराष्ट्रधर्म वाढविणें हा मुख्य मुद्दा होता. हा मुद्दा अस्पष्ट रीतीनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या मनांत होता असा बिलकुल प्रकार नाहीं महाराष्ट्रधर्माची कल्पना व तत्साधनार्थ योजिलेल्या उपायांचें व्यवस्थित स्वरूप तत्कालीन मुत्सद्यांच्या, विचारी पुरुषांच्या व सेनापतींच्या मनांत स्पष्टपणें आविर्भूत झालेलें दिसतें. हिंदुधर्माची प्रस्थापना, गोब्राह्मणांचा प्रतिपाळ, स्वराज्याची स्थापना, मराठ्यांचें

१७५० तील ३० जानेवारीच्या ( लेखांक २६ ) पत्रावर, काव्येतिहाससंग्रहांतील १७५१ च्या २९ सप्टेंबरच्या ( ३३४ पत्रें, यादी वगैरे ) पत्रावर, १७५२ च्या १२ एप्रिलच्या ( पत्रें, यादी वगैरे ३७४ ) पत्रावर व १७५२ च्या १५ आक्टोबरच्या ( पत्रें, यादी वगैरे ३९५ ) पत्रावर शिक्का शाहूराजाचाच आहे. ह्यावरून रामराजाला शाहूराजाच्या इच्छेबरहुकूम बाळाजीनें यद्यपि मान्य केलें होतें, तत्रापि त्याचा शिक्का चालविण्यांत तीन वर्षें तो धरसोड करीत होता असें दिसतें. अर्थात् दुसरा राजा करावयाचा म्हणजे संभाजीला साताऱ्यास आणावयाचा त्याचा बेत होता असें अनुमान करण्यास प्रवृत्ति होते. नाहींतर शाहूच्या मृत्यूनंतर तीन वर्षें शाहूचा शिक्का चालविण्याच्या कामीं धरसोड करण्यांत बाळाजीचा कांहींच मतलब नव्हता असें होईल. तसेंच परराष्ट्रांशीं केलेल्या तहांतहीं साताऱ्च्या छत्रपतींचें नांव १७५० सालापासून १७६१ पर्यंत कोठेंहि नाहीं. जेथें तेथें बाळाजी बाजीरावाचेंच नांव प्रमुखलेलें दिसतें ( लेखांक ११६५।१२९।१३०।१४५ ). पुढें १७५३ च्या व १७५४ च्या शेवटीं ताराबाईचीं धुसपुस बाळाजीनें मोठ्या युक्तीनें बंद केली व रामराजाला निव्वळ बाहुलें करून सोडिलें. साताऱ्च्या छत्रपतींचें महत्त्व समूळ नाहींसें केल्यावर आणीक एक गोष्ट बाळाजीस करावयाची राहिलीच होती. ती गोष्ट म्हणजे कोल्हापुरची व साताऱ्ची गादी एक करून मराठ्यांचें राज्य एकछत्री करणें ही. ह्या हेतूच्या साधनार्थ १७४० त संभाजीशीं त्यानें गुप्त करार केला. १७५० त हा हेतु साध्य होण्याचा समय आला असतां शाहूच्या हट्टामुळें तो फसला गेला. तरी पुढें अशीच एकादी संधि येईल ह्या आशेनें बाळाजीनें संभाजीशीं पूर्वीचा स्नेह कायम ठेविला ( का० पत्रें, यादी वगैरे ३३५ ). कारण संभाजीहि वृद्ध झाला असून लवकरच मरणासन्न होईल असा संभव होता. हा संभव ज्यावेळीं केव्हां खरा ठरेल त्यावेळीं संभाजीचा वारस जो रामराजा त्याला कोल्हापुरची गादी मिळून साताऱ्चें व कोल्हापुरचें राज्य एक करण्याचा फार दिवसांचा हेतु साध्य होईल असा बाळाजीचा बेत होता. परंतु, ज्या हट्टानें व अज्ञानानें १७४९ त शाहूला पछाडिलें त्याच हट्टानें व अज्ञानानें १७६० त संभाजीला गांठिलें व त्यानें मरणापूर्वी खानवटकर भोसल्यांच्या कुळांतील एक मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें. पुढें १७६२ त जिजाबाईनें ह्या मुलाला दत्तकहि घेतलें. संभाजीच्या ह्या कृत्यानें बाळाजीचा बेत ह्यावेळीं दुसऱ्यांदा फसला. परंतु एवढ्यानें नाउमेद होऊन बाळाजी स्वस्थ बसला नाहीं. खानवटकरांच्या घराण्यांतील जो मुलगा जिजाबाई दत्तक घेणार होती त्यालाच रामराजाच्या मांडीवर देऊन रामराजास वनवासास जावयास सांगावें असा बाळाजीचा ह्यावेळीं मनोदय होता ( लेखांक २८९ व चिटणिसांची बखर ). ह्या खानवटकरांच्या कुळांतील नवा राजा करण्यांत मतलब असा कीं पुढें मागें कोणतीहि एक गादी निपुत्रिक झाली असतां ज्या गादीवरील वंश हयात असेल त्याला निपुत्रिक गादीवर हक्क सांगतां यावा व हीं दोन्हीं राज्यें एक व्हावीं. पानिपतची लढाई झाल्यावर नवा राजा करण्याचा बाळाजीचा बेत होता ( लेखांक २८९ ). परंतु बाळाजीला पुढें मृत्यूनें लवकरच गांठिल्यामुळें तो बेत तसाच राहिला. असो. महाराष्ट्रांत अव्वल प्रतीचें घराणें म्हटलें म्हणजे साताऱ्च्या छत्रपतींचें. त्यांचें

महत्त्व कमी करण्यास बाळाजीनें वर सांगितलेल्या खटपटी केल्या. येणेंप्रमाणें. बाहेर मेहनत करून बाळाजीनें १७६० त बहुतेक हिंदुस्थान व बहुतेक सर्व दक्षिण जिंकून टाकिली व आंत मेहनत करून साताऱ्चे छत्रपती व त्यांचें राजमंडळ ह्यांस बहुतेक संपुष्टांत आणून आपलें वर्चस्व सर्वत्र स्थापित केलें व ब्राह्मणपदबादशाहीची कल्पना खरी करून दाखविण्याचा प्रसंग जवळ आणून ठेविला. पानपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर त्या यशाच्या दराऱ्याच्या जोरावर सर्व भरतखंड महाराष्ट्रमय त्यानें करून टाकिलें असतें व बाळाजी विश्वनाथाचा वंश ब्राह्मणपदबादशाहीचा आधारस्तंभ झाला असता. तसेंच पानिपतच्या लढाईंत पेशव्यांस यश येतें तर ह्या दुर्बल छत्रपतींचा मागमूसही न रहातां, असा तर्क करण्यास जागा आहे. कारण पेशव्यांचें महत्त्व १७५० पासून १७६१ पर्यंत जसजसें वाढत चाललें तसतसें छत्रपतींचें कमी कमी होत चाललें हें विवेचनावरून दिसून येण्यासारिखें आहे. अर्थात् पेशव्यांचें महत्त्व १७६१ त झेनिथाला जाऊन पोंचलें असतें तर छत्रपतींचें महत्त्व नाडिराला चाऊन बुडलें असतें ह्यांत संशय नाहीं. साताऱ्च्या छत्रपतींना पुढें पुढें कोणी अगदीं विचारीत नाहींसें झालें ह्याचा दाखला पाहिजे असल्यास नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत उत्तम पहावयास मिळतो. आम्ही पेशव्यांचे सेवक, आम्हास छत्रपतीशीं कर्तव्य नाहीं असें नाना फडणवीस लिहितो. ह्यावरून छत्रपतीविषयीं इतरांच्या मनांत किती आदरबुद्धि होती ह्याचें अनुमान करितां येईल. परंतु मराठ्यांच्या दुर्दैवानें तो सुयोग जुळून आला नाहीं. सामान्य नीतीच्या दृष्टीनें पहातां ह्या दुर्बल छत्रपतींचें महत्त्व बाळाजीनें संपुष्टांत आणिलें हें बरेंच गर्हणीय आहे. परंतु बुद्धीनें व शक्तीनें बलिष्ठ अशा पुरुषाच्या किंवा पुरुषांच्या हातांत कोणत्याहि राष्ट्राचीं सूत्रें असणें मोठें हितकर असतें ह्या राजनीतीच्या धोरणानें बाळाजीच्या प्रयत्नांचा विचार केल्यास झालें तें योग्यच झालें असें म्हणणें प्राप्त होतें. इतकेंच कीं, जें झालें तें पानिपत येथील घोर संकटामुळें पूर्णपणें झालें नाहीं. एवढेंच नव्हे; तर जें झालें तें अंशतः न झाल्यासारिखेंच झालें. हें पाहून मन किंचित् उद्विग्न होतें. उद्विग्न होण्याचें कारण असें आहे कीं, ही पानिपत येथील विपत्ति पर्यायानें व परंपरेनें मराठ्यांच्या राष्ट्राच्या नाशास कारण झाली. ती कशी झाली व तिचीं कारणें प्रस्तुत ग्रंथांत छापिलेल्या पत्रांच्या आधारानें काय होतीं त्याचा पुढील विवेचनांत सविस्तर प्रपंच केला आहे.

## विवेचन पांचवें.

दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या विवेचनांवरून दिसून येईल कीं मराठ्यांनीं १७६१ पर्यंत जीं जीं कृत्यें केलीं त्या सर्वांत एकच धोरण होतें. महाराष्ट्रधर्म वाढविणें हा मुख्य मुद्दा होता. हा मुद्दा अस्पष्ट रीतीनें त्यावेळच्या मुत्सद्यांच्या मनांत होता असा बिलकुल प्रकार नाहीं महाराष्ट्रधर्माची कल्पना व तत्साधनार्थ योजिलेल्या उपायांचें व्यवस्थित स्वरूप तत्कालीन मुत्सद्यांच्या, विचारी पुरुषांच्या व सेनापतींच्या मनांत स्पष्टपणें आविर्भूत झालेलें दिसतें. हिंदुधर्माची प्रस्थापना, गोब्राह्मणांचा प्रतिपाळ, स्वराज्याची स्थापना, मराठ्यांचें

एकीकरण व त्यांचे पुढारपण, हीं जीं महाराष्ट्रधर्माचीं मुख्य अंगे त्यांचा उच्चार शिवाजी राजाच्या तरुणपणीं जसा स्पष्टपणें झालेला दिसतो तसाच खर्ड्यांच्या लढाईनंतर नाना फडणिसानें निजामाशीं केलेल्या तहांतहि दिसून येतो. ह्या तहांत धर्म, गोब्राह्मण व स्वराज्य ह्यांच्या संरक्षणार्थ कलमें आहेत. तेव्हां १६४६ पासून १७९६ पर्यंत महाराष्ट्रधर्माची प्रसृति होत असतां मराठ्यांचें पुढारपण वेळोवेळीं निरनिराळ्या जातींनीं घेतलें. प्रथम स्वराज्याची शुद्ध कल्पना उत्पन्न झाली. तत्साधनार्थ मराठ्यांचें पुढारपण शिवाजी, राजाराम, शाहू व अनुषंगानें बाळाजी विश्वनाथ ह्यांनीं घेतलें. ह्या चार पुरुषांच्या प्रयत्नानें ज्याला स्वराज्य म्हणून प्रथम संज्ञा दिली गेली तो सर्व प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत आला. स्वराज्याचें साधन केल्यावर मराठ्यांच्या वाढत्या पराक्रमाला स्वराज्यांतर्गत प्रदेश संकुचित भासूं लागला व तो उफाड्यानें स्वराज्याच्या मर्यादेच्या बाहेर पसरूं लागला. म्हणजे सार्वभौमत्वाची कल्पना त्यावेळीं अवश्य होऊन तिचा स्पष्ट उच्चार बाजीरावानें शाहूपुढें करून दाखविला. ह्या कालापासून हिंदुपदबादशाहीची प्रस्तावना झाली. हिंदुपदबातशाहीची प्रस्तावना बाजीरावाच्या पुढारपणाखालीं झाली हें जरी खरें आहे, तरी ती शाहूराजाच्या सल्ल्यानें झाली म्हणून तिला मी हिंदुपदबातशाही हें नांव दिलें आहे. शाहूराजा वारल्यानतर किंवा वारण्याच्यापूर्वीं देखील सातारच्या छत्रपतींचें तेज मावळत जाऊन महाराष्ट्राचें पुढारपण पेशव्यांच्या हातांत आलें. म्हणून बाळाजी बाजीरावाच्या उत्तरार्धापासून ब्राह्मणपदबादशाहीचा प्रारंभ झाला म्हणून मी म्हटलें आहे. ब्राह्मणपदबातशाही म्हणजे हिंदुपदबादशाहीच होय. १७५० पर्यंत ह्या बादशाहीची प्रस्तावना भोसल्यांच्या कुळाच्या नांवानें होत असे. आतां ती पेशव्यांच्या कुळाच्या नांवानें होऊं लागली. पहिलीस भोंसलेकुलबादशाही अथवा मराठपदबादशाही व दुसरीस भटकुलबादशाही किंवा ब्राह्मणपदबादशाही म्हटल्यास चालेल. नांव पाहिजेल तें द्या. वस्तुस्थिति ध्यानांत आली म्हणजे झालें. महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रराज्य जिकडे तिकडे करण्याचा प्रयत्न ह्या कालीं मराठ्यांचा चालला होता. प्रसंगोपात्त ह्या प्रयत्नाचा पुढाकार कधीं महाराष्ट्रांतील मराठ्यांनीं व कधीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनीं केला. हेतु पाहिला तर दोघांचाहि एकच होता. महाराष्ट्रांतील मराठ्यांनीं व ब्राह्मणांनीं दोघांनीं मिळून महाराष्ट्रधर्माचा व राज्याचा प्रसार करण्याचें काम चालविलें होतें. ह्या कामीं येणाऱ्या यशापयशाचा वांटा ह्या दोघांनाहि सारखा घ्यावा लागे. इ. स. १६४६ पासून १६८० पर्यंत शिवाजीच्या पुढाराखालीं मराठ्यांस उत्तरोत्तर यशच येत गेलें. १६८९ पासून १७०७ पर्यंत मराठ्यांना अवरंगजेबाशीं लढावें लागलें. शिवाजीच्या वेळीं आलेल्या संपत्तीं व त्याच्या पश्चात् आलेल्या विपत्तीचे वांटेकरी ब्राह्मण व मराठे हे दोघेहि झाले. त्या मरणप्राय संकटांतून निघून मराठ्यांनीं पेशव्यांच्या पुढारपणाखालीं समुद्रवलयांकित पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळविण्याचा सुमुहूर्त १७६० च्या सुमारास आणिला. परंतु १७६१ सालीं अबदालीशीं युद्ध होऊन मराठ्यांचा कधींहि झाला नव्हता असा पराभव पानिपत येथें झाला. ह्याहि गंडांतरांतून निभावून थोडक्याच कालांत त्यांनीं आपली पूर्वीची सत्ता बहुतेक कायम केली; परंतु पूर्वीची भक्ती जी ह्यावेळीं बिघडली ती पुनः कधीं नीट

सावरतां आली नाहीं. १७६० त सर्व हिंदुस्थानाला म्हणजे उत्तरेस मुल्तान, लाहोर, ठठ्ठा, भकर, रोहिलखंड, अंतर्वेद, काशी, प्रयाग, अयोध्या व बंगाला; दक्षिणेस श्रीरंगपट्टण, तंजावर व रामेश्वर आणि पूर्वेस तैलंगण व पूर्वसमुद्र इतक्या प्रदेशांवर मराठ्यांची सत्ता कायम करावयाची असा सदाशिवरावभाऊचा व बाळाजी बाजीरावाचा बेत होता. परंतु १७६१ नंतर पश्चिमोत्तरेकडील मुल्तान, लाहोर, ठठ्ठा, भकर व पूर्वोत्तरेकडील प्रयाग, अयोध्या व बंगाला; दक्षिणेकडील श्रीरंगपट्टण व रामेश्वर व पूर्वेकडील तैलंगण व पूर्वसमुद्र, हे प्रांत मराठ्यांच्या ताब्यांत पुढें कधींच आले नाहींत. १७६० पर्यंत मराठ्यांचें पाऊल एकसारिखें पुढें पडत चाललें होतें तें १७६१ पासून यमुना व तुंगभद्रा ह्या दोन नद्यांच्या आंत आलें. हें जें आंत पाऊल आलें हीच पानिपत येथील पराभव केवढा भयंकर होता त्याची उत्तम साक्ष आहे. प्रस्तुतच्या विवेचनांत ह्या पराभवाचा विचार करावयाचा आहे. पानिपत येथील पराभवाचीं अनेकांनीं अनेक कारणें कल्पिलीं आहेत; त्यापैकीं मुख्य मुख्य कारणांचा येथें निर्देश करितों व त्यांपैकीं खरें कारण कोणतें ह्याचा उलगडा ह्या ग्रंथांत व इतरत्र छापिलेल्या पत्रांच्या साहाय्यानें होईल तितका करून दाखवितों.

( १ ) पेशव्यांनीं छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें स्वामिद्रोहाच्या पापानें पेशव्यांचा क्षय झाला.

( २ ) छत्रपतींची सत्ता संपुष्टांत आणिल्यामुळें मराठा व ब्राह्मण सरदारांचीं मनें पेशव्यांविषयीं कलुषित झालीं.

( ३ ) मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत सत्तेचें केंद्रीभवन झालेलें नव्हतें, त्यामुळे निरनिराळ्या सरदारांना आपापली सत्ता स्वतंत्रपणें स्थापण्याची दुरिच्छा झाली.

( ४ ) जातिभेदामुळें मराठ्यांची एकी होण्याचा कधींच संभव नव्हता व कांहीं अघटित कारणांनीं कांहीं वेळ एकी झालीच तर ती लयास जाऊन व जातीजातींत मत्सर उत्पन्न होऊन सर्वत्र बेबंदशाही माजण्याचा संभव होता. तोच प्रकार १७६१ च्या अगोदर थोडाबहुत होऊन पानिपत येथें मराठ्यांचा मोड झाला.

( ५ ) भरतखंडांत सर्व हिंदूलोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना पसरली नव्हती.

( ६ ) ब्राह्मणांच्या पोटजातींत भेद झाला होता.

( ७ ) सदाशिवरावभाऊचें वर्तन उद्दाम व सान्निपातिक होतें.

( ८ ) त्यानें इब्राईमखानाच्या तोफखान्यावर भिस्त ठेवून मोगलाई रीतीचा अंगीकार केला.

( ९ ) मराठ्यांची जुनी गनीमी रीत त्यानें सोडून दिली.

( १० ) मराठ्यांच्या अंगीं पूर्वीचा काटकपणा राहिला नव्हता. त्यांच्यामध्यें चैनबाजीचा प्रवेश झाला होता.

( ११ ) सडे जाऊन युद्ध करण्याचें सोडून सदाशिवरावभाऊनें कबिलेबुणगे बरोबर घेतले.

( १२ ) त्यानें दिल्लीचें तख्त फोडून तद्देशीयांचें वैर संपादिलें.

( १३ ) सुजाउद्दौल्यानें अबदालीशीं तह करून करून देतों म्हणून थाप देऊन मराठ्यांचा विश्वासघात केला.

( १४ ) गिलच्यांच्या धिप्पाड व अर्बुज शरीरांपुढें मराठ्यांच्या ठेंगण्या व हलक्य मूर्तींचा टिकाव लागला नाहीं.

( १५ ) सदाशिवरावभाऊनें रघुनाथरावदादासारख्या अनुभवलेल्या शिपायाला ह्या मोहिमेचें सेनापतित्व दिलें नाहीं. सदाशिवरावभाऊला लढाईचा सराव नव्हता.

( १६ ) मल्हारराव होळकर माळव्याच्या अलीकडे खाशांनीं येऊं नये म्हणून सांगत असतां भाऊनें त्याचा उपदेश ऐकिला नाहीं.

( १७ ) लाहोरास जाऊन अबदालीची धाड मुद्दाम बोलावून आणण्यांत रघुनाथरावाचा मूर्खपणा झाला.

( १८ ) अबदालीसारख्या अनुभवलेल्या शिपायापुढें सदाशिवरावभाऊसारख्या नवशिक्या सरदाराचें कांहीं एक चाललें नाहीं.

इत्यादि कारणें पानिपतास मराठ्यांचा मोड होण्यास झालीं म्हणून ग्रंथोग्रंथीं लिहिलेलें आढळतें. ह्या कारणांत तथ्य कितपत आहे व मराठ्यांचा मोड होण्याचीं खरीं कारणें कोणतीं ह्याचा विचार करणें जरूर आहे.

(अ) स्वामिद्रोहोत्पन्न पापाचे दैवी परिणाम काय झाले असावे त्याचा तलास लावण्याचें काम धर्मशास्त्र्यांकडे सोंपवून, त्या पापाचे मानवी परिणाम काय झाले ह्याचा विचार करणें उपयोगाचें आहे. बाळाजी बाजीरावानें सातारच्या छत्रपतींना शून्यवत् करून टाकिलें ही गोष्ट सर्वस्वीं खरी आहे. परंतु, सातारच्या छत्रपतींना शून्य होऊन बसण्याखेरीज अन्य गति शक्य नव्हती हीहि गोष्ट तितकीच खरी आहे. शाहूराजा वयातींत होऊन राज्य करण्यास अयोग्य झाला. त्याच्या मृत्यूनंतर रामराजा गादीवर आला. तो बुद्धीनें मंद, राजपदाला अयोग्य व मतलबाला अजागरूक असा होता. अशाचा बडीजाव करीत बसण्यांत व अशाच्या हातीं राज्यसूत्रें ठेविण्यांत राष्ट्राचें हित कांहींच साधणें शक्य नव्हतें. तेव्हां आत्यंतिक राष्ट्रहित साधण्याची ज्याच्या अंगीं कर्तबगारी विशेष त्याच्या हातांत सूत्रें जाणें स्वाभाविक व अपरिहार्य होतें. येणेंप्रमाणें बाळाजीच्या हातांत राज्याचीं सर्व सूत्रें गेलीं व सातारचे छत्रपति, त्यांचें राजमंडळ व त्या सर्वांना मुठींत ठेवूं पाहणारी ताराबाई ही साताऱ्यांत भिकार तंटे करीत बसलीं. खर्चाकरितां साठ सत्तर लाखांचा मुलूख त्यांच्या नांवानें तोडून दिला होता; परंतु, त्यांतील उत्पन्न व्यवस्थेनें काढून घेण्याचीहि ऐपत त्यांच्यांत नव्हती. १७५५ त तर आपला खर्च पेशव्यांनीं चालवावा व उत्पन्नाची व्यवस्था वाटेल तशी बघून घ्यावी ( चिटणीस बखर ) अशी तोड त्यांनीं काढिली. ह्यामुळें छत्रपतींचें, राजमंडळाचें व विशेषतः ताराबाईचें जें कांहीं थोडेसें स्थानिक महत्त्व होतें तेंहि गेलें. ह्यापुढें ताराबाईला व रामराजाला बाळाजीच्या ओंजळीनें पाणी पिणें भाग पडलें. हें कर्म ताराबाईनें आपल्या हातानें आपल्या अंगावर ओढून घेतलें व घरांत बसून थिटे, देवस्थळे इत्यादि पुराणिकांच्या उपदेशानें बाळाजीच्या नांवानें मात्र

खडे फोडण्यास तिनें प्रारंभ केला. ताराबाईच्या ह्या तोंडच्या वडबडीनें १७५३ च्या पुढें बाळाजीचें कांहींच नुकसान झालें नाहीं. सरदारांपैकीं–ब्राह्मण अगर मराठे–कोणींहि तिच्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. अर्थात् ताराबाईचा पुरस्कार करून बाळाजीचें वाकडें करण्यास १७५३ च्यापुढें कोणीच धजला नाहीं. पानिपतच्या मोहिमेच्या वेळीं तर ताराबाईचें व रामराजाचें स्मरणहि कोणास राहिलें नाहीं. १७५१ त ताराबाईचा कड घेऊन भांडणारा दमाजी गायकवाड १७६० त पेशव्यांच्या बाजूनें पानिपतच्या मोहिमेंत हजर होता. येणेंप्रमाणें पानिपतीयुद्धांत ताराबाईच्यामुळें पेशव्यांचें कांहींएक नुकसान झालें नाहीं. मराठा सरदारांपैकीं भोसल्यांखेरीज बहुतेक सर्व सरदार व ब्राह्मणांपैकींहि प्रतिनिधीखेरीजकरून बहुतेक सर्व सरदार पानिपतांत हजर होते. रामराजाला व ताराबाईला पेशव्यांनीं शून्यवत् करून सोडिलें म्हणून कोणी सरदार पेशव्यांच्या विरुद्ध गेल्याचा दाखला तर कोठें मिळत नाहींच; परंतु, कोठें ध्वनि देखलि काढिलेला आढळत नाहीं. आतां मराठ्यांपैकीं कांहीं सरदार व ब्राह्मणांपैकीं कांहीं सरदार पानिपतच्या मोहिमेंत पेशव्यांच्या उलट गेल्याचे दाखले सांपडतात. परंतु, त्या उलट जाण्याचा संबंध छत्रपतींच्या शून्यावस्थेशीं मुळींच नसून, इतर कारणांशीं आहे. ह्या कारणांचें स्पष्टीकरण पुढल्या कलमांत केलें आहे.

( ब ) पेशव्यांच्या हातीं सर्व सत्ता आली त्यावेळीं मुख्य सरदार व मामलतदार म्हटले म्हणजे, शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, भोसले, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव, गोविंद बल्लाळ, गोपाळराव पटवर्धन, नारो शंकर, मानाजी आंग्रे, सदाशिव रामचंद्र शेणवई, रामचंद्र गणेश कानडे, त्रिंबकराव विश्वनाथ पेठे, मेहेंदळे, पुरंधरे, चिटणीस, पायगुडे, थोरात वगैरे होत. हे सर्व सरदार पेशव्यांचे नोकर असत. उत्पन्नाच्या संबंधानें ह्या सरदारांची गणना मामलतदार म्हणून होत असे. ह्यांनीं आपापल्या प्रांतांतील वसूल उत्पन्न करून, खासा, कारकून व शिबंदी यांचा खर्च वारून बाकी राहील तो पैसा रसद म्हणून पुण्यास पोंचवावा असा करार असे. ह्यांपैकीं कित्येक मामलतदारांना लहानमोठ्या फौजा बाळगाव्या लागत. ह्या फौजांच्या खर्चाकरितां जे निव्वळ मामलतदार असत त्यांना महालांतून रोकड रक्कम मिळे व जे सरदार असत त्यांना सरंजामाला महालांतील कांहीं प्रांत स्वतंत्र तोडून दिलेला असे. ह्याप्रमाणें मुलकी व लष्करी अशा दोन नात्यांनीं पेशव्यांशीं सरदारांचा संबंध येई. सरदारांनीं मोंगलाईंतलि एखादा प्रांत काबीज केला म्हणजे त्याची सरकार व सरदार ह्या दोघांत कांहीं प्रमाणानें वांटणी होत असे. ( १ ) सरदारांना आपापल्या प्रांताचा हिशोब वर्षाच्या वर्षास खडान् खडा द्यावा लागे. ( २ ) सरदारांच्या ताब्यांतील प्रांतातील संस्थानिक, जमीदार व रयत ह्यांना सरदार–मामलतदाराविरुद्ध तक्रार करावयाची असल्यास संस्थानिकांना खुद्द पुण्याच्या दरबारांत जाऊन दाद मागतां येत असे आणि जमीदार व रयत ह्यांना पेशव्यांनीं पाठवून दिलेल्या दरखदारांना भेटून आपलीं गाऱ्हाणीं सांगतां येत. ( ३ ) सरदार–मामलतदारांकडून येणाऱ्या वार्षिक रसदेची रक्कम दरवर्षी नवीन ठरविली जात असे. रयतेकडून जास्त उत्पन्न मामलतदार घेतात असें दरखदाराच्या नजरेस आल्यास रसदेची रक्कम वाढविली जात असे. ( ४ ) सरकारी मोहि-

( १३ ) सुजाउद्दौल्यानें अबदालीशीं तह करून करून देतों म्हणून थाप देऊन मराठ्यांचा विश्वासघात केला.

( १४ ) गिलच्यांच्या धिप्पाड व अवजड शरीरांपुढें मराठ्यांच्या ठेंगण्या व हलक्या मूर्तींचा टिकाव लागला नाहीं.

( १५ ) सदाशिवरावभाऊनें रघुनाथरावदादासारख्या अनुभवलेल्या शिपायाला ह्या मोहिमेचें सेनापतित्व दिलें नाहीं. सदाशिवरावभाऊला लढाईचा सराव नव्हता.

( १६ ) मल्हारराव होळकर माळव्याच्या अलीकडे खाशांनीं येऊं नये म्हणून सांगत असतां भाऊनें त्याचा उपदेश ऐकिला नाहीं.

( १७ ) लाहोरास जाऊन अबदालीची धाड मुद्दाम बोलावून आणण्यांत रघुनाथरावाचा मूर्खपणा झाला.

( १८ ) अबदालीसारख्या अनुभवलेल्या शिपायापुढें सदाशिवरावभाऊसारख्या नवशिक्या सरदाराचें कांहीं एक चाललें नाहीं.

इत्यादि कारणें पानिपतास मराठ्यांचा मोड होण्यास झालीं म्हणून ग्रंथोग्रंथीं लिहिलेलें आढळतें. ह्या कारणांत तथ्य कितपत आहे व मराठ्यांचा मोड होण्याचीं खरीं कारणें कोणतीं ह्याचा विचार करणें जरूर आहे.

(अ) स्वामिद्रोहोत्पन्न पापाचे दैवी परिणाम काय झाले असावे त्याचा तलास लावण्याचें काम धर्मशास्त्र्यांकडे सोंपवून, त्या पापाचे मानवी परिणाम काय झाले ह्याचा विचार करणें उपयोगाचें आहे. बाळाजी बाजीरावानें साताऱ्च्या छत्रपतींना शून्यवत् करून टाकिलें ही गोष्ट सर्वस्वीं खरी आहे. परंतु, साताऱ्च्या छत्रपतींना शून्य होऊन बसण्याखेरीज अन्य गति शक्य नव्हती हीहि गोष्ट तितकीच खरी आहे. शाहूराजा वयातींत होऊन राज्य करण्यास अयोग्य झाला. त्याच्या मृत्यूनंतर रामराजा गादीवर आला. तो बुद्धीनें मंद, राजपदाला अयोग्य व मतलबाला अजागरूक असा होता. अशाचा बडीजाव करीत बसण्यांत व अशाच्या हातीं राज्यसूत्रें ठेविण्यांत राष्ट्राचें हित कांहींच साधणें शक्य नव्हतें. तेव्हां आत्यंतिक राष्ट्रहित साधण्याची ज्याच्या अंगीं कर्तबगारी विशेष त्याच्या हातांत सूत्रें जाणें स्वाभाविक व अपरिहार्य होतें. येणेंप्रमाणें बाळाजीच्या हातांत राज्याचीं सर्व सूत्रें गेलीं व साताऱ्चे छत्रपति, त्यांचें राजमंडळ व त्या सर्वांना मुठींत ठेवूं पाहणारी ताराबाई ही साताऱ्यांत निकार तंटे करीत बसली. खर्चाकरितां साठ सत्तर लाखांचा मुलूख त्यांच्या नांवानें तोडून दिला होता; परंतु, त्यांतील उत्पन्न व्यवस्थेनें काढून घेण्याचीहि ऐपत त्यांच्यांत नव्हती. १७५५ त तर आपला खर्च पेशव्यांनीं चालवावा व उत्पन्नाची व्यवस्था वाटेल तशी बघून घ्यावी ( चिटणीस बखर ) अशी तोड त्यांनीं काढिली. ह्यामुळें छत्रपतींचें, राजमंडळाचें व विशेषतः ताराबाईचें जें कांहीं थोडेसें स्थानिक महत्त्व होतें तेंहि गेलें. ह्यापुढें ताराबाईला व रामराजाला बाळाजीच्या ओंजळीनें पाणी पिणें भाग पडलें. हें कर्म ताराबाईनें आपल्या हातानें आपल्या अंगावर ओढून घेतलें व घरांत बसून थिटे, देवस्थळे इत्यादि पुराणिकांच्या उपदेशानें बाळाजीच्या नांवानें मात्र

खडे फोडण्यास तिनें प्रारंभ केला. ताराबाईच्या ह्या तोंडच्या बडबडीनें १७५३ च्या पुढे बाळाजीचें कांहींच नुकसान झालें नाहीं. सरदारांपैकीं–ब्राह्मण अगर मराठे–कोणींहि तिच्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. अर्थात् ताराबाईचा पुरस्कार करून बाळाजीचें वाकडें करण्यास १७५३ च्यापुढें कोणीच धजला नाहीं. पानिपतच्या मोहिमेच्या वेळीं तर ताराबाईचें व रामराजाचें स्मरणहि कोणास राहिलें नाहीं. १७५१ त ताराबाईचा कड घेऊन भांडणारा दमाजी गायकवाड १७६० त पेशव्यांच्या बाजूनें पानिपतच्या मोहिमेंत हजर होता. येणेंप्रमाणें पानिपतीयुद्धांत ताराबाईच्यामुळें पेशव्यांचें कांहींएक नुकसान झालें नाहीं. मराठा सरदारांपैकीं भोसल्यांखेरीज बहुतेक सर्व सरदार व ब्राह्मणांपैकींहि प्रतिनिधीखेरीजकरून बहुतेक सर्व सरदार पानिपतांत हजर होते. रामराजाला व ताराबाईला पेशव्यांनीं शून्यवत् करून सोडिलें म्हणून कोणी सरदार पेशव्यांच्या विरुद्ध गेल्याचा दाखला तर कोठें मिळत नाहींच; परंतु, कोठें ध्वनि देखिल काढिलेला आढळत नाहीं. आतां मराठ्यांपैकीं कांहीं सरदार व ब्राह्मणांपैकीं कांहीं सरदार पानिपतच्या मोहिमेंत पेशव्यांच्या उलट गेल्याचे दाखले सांपडतात. परंतु, त्या उलट जाण्याचा संबंध छत्रपतींच्या शून्यावस्थेशीं मुळींच नसून, इतर कारणांशीं आहे. ह्या कारणांचें स्पष्टीकरण पुढल्या कलमांत केलें आहे.

(ब) पेशव्यांच्या हातीं सर्व सत्ता आली त्यावेळीं मुख्य सरदार व मामलतदार म्हटले म्हणजे, शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, भोसले, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव, गोविंद बल्लाळ, गोपाळराव पटवर्धन, नारो शंकर, मानाजी आंग्रे, सदाशिव रामचंद्र शेणवई, रामचंद्र गणेश कानडे, त्रिंबकराव विश्वनाथ पेठे, मेहेंदळे, पुरंधरे, चिटणीस, पायगुडे, थोरात वगैरे होत. हे सर्व सरदार पेशव्यांचे नोकर असत. उत्पन्नाच्या संबंधानें ह्या सरदारांची गणना मामलतदार म्हणून होत असे. ह्यांनीं आपापल्या प्रांतांतील वसूल उत्पन्न करून, खासा, कारकून व शिबंदी यांचा खर्च वारून बाकी राहील तो पैसा रसद म्हणून पुण्यास पोंचवावा असा करार असे. ह्यांपैकीं कित्येक मामलतदारांना लहानमोठ्या फौजा बाळगाव्या लागत. ह्या फौजांच्या खर्चाकरितां जे निव्वळ मामलतदार असत त्यांना महालांतून रोकड रक्कम मिळे व जे सरदार असत त्यांना सरंजामाला महालांतील कांहीं प्रांत स्वतंत्र तोडून दिलेला असे. ह्याप्रमाणें मुलकी व लष्करी अशा दोन नात्यांनीं पेशव्यांशीं सरदारांचा संबंध येई. सरदारांनीं मोंगलाईंतलि एखादा प्रांत काबीज केला म्हणजे त्याची सरकार व सरदार ह्या दोघांत कांहीं प्रमाणानें वांटणी होत असे. (१) सरदारांना आपापल्या प्रांताचा हिशोब वर्षाच्या वर्षास खडान् खडा द्यावा लागे. (२) सरदारांच्या ताब्यांतील प्रांतातील संस्थानिक, जमीदार व रयत ह्यांना सरदार–मामलतदाराविरुद्ध तक्रार करावयाची असल्यास संस्थानिकांना खुद्द पुण्याच्या दरबारांत जाऊन दाद मागतां येत असे आणि जमीदार व रयत ह्यांना पेशव्यांनीं पाठवून दिलेल्या दरखदारांना भेटून आपलीं गाऱ्हाणीं सांगतां येत. (३) सरदार–मामलतदारांकडून येणाऱ्या वार्षिक रसदेची रक्कम दरवर्षी नवीन ठरविली जात असे. रयतेकडून जास्त उत्पन्न मामलतदार घेतात असें दरखदाराच्या नजरेस आल्यास रसदेची रक्कम वाढविली जात असे. (४) सरकारी मोहि-

मास पेशवे सांगतील तेव्हां सरदारांना आपापल्या सरंजामी फौजा घेऊन जावें लागे. ( ५ ) सरदारांच्या जहागिरींची तगारी बहाली पेशव्यांच्या खुषीवर असे. ( ६ ) तथापि ह्या जहागीरी वंशपरंपरेनें चालणाऱ्या असत. ( ७ ) जहागिरदार निपुत्रक झाल्यास दत्तक कायम करण्याचा अधिकार पेशव्यांचा असे. ( ८ ) एखाद्या सरदाराची वावगी वर्तणूक दिसल्यास त्यास बर्तर्फ करण्याचा अधिकार पेशव्यांस असे. ( ९ ) परराष्ट्रांशीं किंवा संस्थानिकांशीं तहरह पेशव्यांच्या नांवानें, संमतीनें व आज्ञेप्रमाणें सरदारांना करावा लागे. १७५० पासून १७६१ पर्यंत ( सध्यां ह्या अकरा वर्षांचाच विचार ह्या प्रस्तावनेंत चालला आहे हें ध्यानांत धरून ) पेशव्यांचा सरदारांशीं हा असा संबंध होता हें ह्या अकरा वर्षांतलि घडामोडींसंबंधीं जे कांहीं कागदपत्र उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून दिसून येतें. ह्या कागदपत्रांत साताऱ्च्या छत्रपतींच्यासंबंधीं एक अक्षरहि नाहीं. पेशवे आपले मुख्य आहेत व आपलें बरें वाईट काय पाहिजे तें करण्याचा अधिकार सर्वस्वीं पेशव्यांच्या हातांत आहे असा सरदारमंडळांत सर्वत्र ग्रह झाला होता. साताऱ्च्या राजमंडळांतील प्रतिनिधी, सचिव, दाभाडे, सुमंत, राजाज्ञा वगैरे सरदार क्षुल्लक असून पेशव्यांच्या शिंदे, होळकर, विंचूरकर इत्यादि सरदारांप्रमाणें व पुरंधरे, फडणीस, मुजुमदार इत्यादि मुत्सद्यां-प्रमाणें वजनदार पुरुष त्या राजमंडळांत एकहि नव्हता. तेव्हां त्यांचा विचार करण्याचा येथें जरूरच राहत नाहीं. शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड, विंचूरकर, राजेबहादर, बुंदेले वगैरे सरदारांच्या मामलतदारांच्या वर्तनांचा तेवढा येथें विचार करावयाचा आहे. वर नमूद केलेल्या ९ बंधनांनीं ह्या सरदारांच्या व मामलतदारांच्या हालचाली नियमित करून टाकि-लेल्या होत्या. कोणतेंहि मुलकी किंवा लष्करी लहानमोठें काम करावयाचें असल्यास सर-दारांना व मामलतदारांना पेशव्यांची परवानगी घ्यावी लागे. राज्याचीं सर्व सूत्रें पेशव्यांच्या हातांत एकीभूत झालीं हो ी. मोहिमा, तह, महालांची जमा व त्यांचा खर्च ह्या सर्वांची व्यवस्था पुण्याहून होत असे. सरदारांना स्वतंत्र हालचाल कोठेंच करितां येण्याची सवड सदाशिवरावभाऊनें व बाळाजी बाजीरावानें ठेविली नव्हती. त्याकालीं सत्तेचें केंद्रीभवन पेशव्यांच्या ठायीं पूर्णपणें होत चाललें होतें. हा केंद्रीकरणाचा उद्योग बाळाजी बाजीरावानें १७४० पासून सुरू केला. १७४४ त त्यानें रघोजी भोंसल्याची हालचाल मर्यादित केली. १७४६ त बाबूजी नाईक बारामतीकराला त्यानें घरीं बसविलें. १७५० त प्रतिनिधि व यमाजी शिवदेव ह्यांची, १७५१ त दाभाडे व दमाजी गायकवाड ह्यांची व १७५३ त ताराबाईची रग जिरवून त्यानें साताऱ्च्या छत्रपतींचें महत्त्व कमी केलें. सारांश, १७५३ च्या पुढें मराठ्यांच्या हालचालींचीं सर्व सूत्रें बाळाजीच्या हातीं केंद्रीभूत झालीं. पेशव्यांच्या हातीं झालेल्या सत्तेच्या ह्या केंद्रीभवनाच्या विरुद्ध बरीच खटपट ह्यापुढें कांहीं सरदारांनीं, मामतदारांनी व मुत्सद्यांनीं केली. हीं खटपट सत्तेचें केंद्रीभवन झालें नव्हतें म्हणून करितां आली अशी गोष्ट नसून, सत्तेचें केंद्रीभवन फार झालें व तें तत्कालीन कांहीं सरदारांना असह्य झालें म्हणून ती करितां आली. होळकर, शिंदे वगैरे सरदाराचें पारडें पुढें फार जड होईल म्हणून ह्या वेळेपासून बाळाजीनें व सदाशिवरावभाऊनें त्यांना योग्य बंधनांनीं जखडून

टाकण्याचा बेत केला. हा बेत तडीस नेत असतां पेशव्यांनां त्यांच्या स्वतःच्या सरदारांकडून अडथळे येऊं लागले. पूर्वींच्या राजमंडळांतील सरदारांच्या शत्रुत्वाच्या ऐवजीं आतां पेशव्यांच्याच सरदारांकडून पेशव्यांना त्रास पोहोंचूं लागला. १७५० किंवा १७५३ सालापर्यंत बाळाजीनें, दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधि, यमाजी शिवदेव, ताराबाई व भोंसले ह्यांचें महत्व कमी करण्याचा उद्योग केला. १७५० पासून पुढें पेशव्यांना आपल्याच सरदारांचे डावपेंच, कृत्रिमपणा, फितवेखोरी व उद्दामपणा ह्यांना आळा घालण्याचें काम पतकरावें लागलें. बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिवरावभाऊच्या अधिकाराखालीं सरदारांना स्वातंत्र्य फारच थोडें राहिलें होतें. तेव्हां केंद्रप्रवण न होतां स्वतंत्र होण्याचा उद्योग निरनिराळ्या हेतूंनीं प्रोत्साहित होऊन निरनिराळ्या सरदारांनीं केला. बाळाजी बाजीराव असेतोंपर्यंत ( कदाचित् खड्यांची लढाई होईतोंपर्यंत देखील ) हा उद्योग सफल झाला नाहीं. परंतु ह्या दुरुद्योगाचे हानिकर परिणाम पेशव्यांना पानिपत येथें व इतरत्र सोसावे लागले हें सोदाहरण सिद्ध करितां येण्यासारखें आहे. ह्या दुरुद्योगाच्या खटपटीसंबंधानें, मल्हारराव होळकर, अंताजी माणकेश्वर, लक्ष्मण शंकर, बापूजी महादेव व दामोदर महादेव आणि गोविंदपंत बुंदेले, वगैरे गृहस्थांचीं नांवें प्रमुखत्वानें उल्लेखितां येतात. १७५० पासून १७६० पर्यंत ह्या इसमांच्या उद्योगाचें त्रोटक वर्णन खालीं देतों.

१७४६।१७४७ त मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे बुंदेलखंडांत कालिंजर, जैतपूर, अजेगड वगैरे स्थलीं लढत होते ( का. पत्रें, यादी वगैरे ६२, ६९, ७४ ). ह्या स्थलीं दाखविलेल्या शौर्याबद्दल मल्हाररावाची बाळाजीनें बहुत स्तुति केली आहे. १७४९ त मल्हारराव होळकर साताऱ्यास बाळाजीचा पाठिंबा करण्याकरितां आला होता. १७५० त मल्हाररावाचें व जयाप्पाचें वितुष्ट पडलें होतें असें लेखांक २ वरून कळतें. ह्यावेळीं ताराबाईनें मल्हाररावाला आपल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु मल्हाररावानें बाळाजीचा पक्ष सोडिला नाहीं ( का. पत्रें, यादी वगैरे ३५९ ). १७५१ त सलाबतानें बाळाजीला कुकडी नदीवर नाडिलें त्यावेळीं बाळाजीनें मल्हाररावाची पायधरणी केली. तेव्हां मल्हाररावानें जयाप्पाच्या द्वारा बाळाजीकडे शपथपूर्वक बेलभंडार पाठविला ( का. पत्रें, यादी वगैरे ३६३ ). १७५२ च्या आगष्टांत मल्हारराव व जयाप्पा दक्षिणेस आले व १७५२ च्या डिसेंबरांत ते भालकीच्या लढाईत हजर होते. पुढें १७५४ त कुंभेरीस मल्हाररावाचें व जयाप्पाचें वाकडें आलें. जयाप्पावर मारेकरी घालण्याची प्रथम सूचना मल्हाररावानेंच केली म्हणून कित्येकांनीं शंका काढिली आहे. ह्या वेळेपासून मल्हारराव, शिंद्यांचा व पेशव्यांचा द्वेष करूं लागला. १७५७ त मल्हाररावानें लटकींच लचांडें काढून रघुनाथरावास त्रास दिला ( लेखांक ५२, ६७, ७१ ). पेशव्यांची सत्ता अपरंपार झाली हें पाहून ह्यावेळीं मल्हाररावानें नजीबखानाचें संरक्षण केलें आणि दत्ताजीस व जनकोजीस पेशव्यांच्या विरुद्ध जाण्याचा इतिहासप्रसिद्ध उपदेश केला. ह्याच वेळीं रसदेच्या पैशासंबंधानें मल्हाररावाचें व पेशव्यांचें वैमनस्य आलें. १७५९ त दत्ताजीचें व अबदालीचें युद्ध चाललें असतां मल्हारराव जयपूरप्रांतीं लहानसहान गढ्या घेत बसला व दत्ताजीला त्यानें मदत केली नाहीं.

दत्ताजीला मदत करण्यास जाण्याविषयीं बाळाजी बाजीरावानें मल्हाररावाला बरींच पत्रें पाठविलीं ( लेखांक १५६, १५७, १६१ ). परंतु, दत्ताजी बडाडच्या ( १० जानेवारी १७६० ) लढाईंत पडून जनकोजी कोटपुतळीस पळून येईतोंपर्यंत ( १२ जानेवारी १७६० ) मल्हाररावानें जयपूरप्रांत सोडिला नाहीं ( लेखांक १५३ ). ह्या दहा पंधरा वर्षांच्या हालचालीवरून मल्हारराव होळकराच्या मनाची स्थिति ताडतां येते. १७५० पासून हळूं हळूं त्याचें मन शिंद्याविषयीं व पेशव्यांविषयीं कलुषित होत चाललें होतें. १७६० त तर ह्या कलुषतेचा कळस होऊन होळकराची मदत मिळाली नाहीं म्हणून दत्ताजीचा नाश झाला. " दोन्ही सरदार एकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारपत्य होईल, " म्हणून रघुनाथराव, सदाशिव चिमणाजी व बाळाजी बाजीराव वारंवार लिहीत ( लेखांक १५२ वगैरे ) असतां मल्हाररावानें त्यांचा हुकूम अमलांत आणण्याचें होतां होईल तितकें लांबणीवर टाकिलें. ( टीप २१५ पहा ). सारांश, १७६० च्या प्रारंभीं शिंद्यांविषयीं व पेशव्यांविषयीं होळकराच्या मनांत द्वैतभाव अत्युत्कट भरला होता, ह्यांत संशय नाहीं. ह्या द्वैतभावाला सातारचे छत्रपती मुळींच कारण झाले नाहींत. पेशव्यांची सत्ता वाढून आपली सत्ता संपुष्टांत येत आहे व शिंदे ह्या संपुष्टीकरणाला मदत करीत आहेत ह्या भीतीपासून मल्हाररावाच्या मनांत हा द्वैतभाव उत्पन्न झाला.

अंताजी माणकेश्वर हा लफंगा गृहस्थ १७५५ त हिंदुस्थानांत जाऊन ( का. पत्रें, यादी ४५१ वगैरे ) दत्ताजी शिंद्यास नागोरास मिळाला. १७५६, १७५७ व १७५८ हीं तीन सालें तो दिल्लीस होता ( लेखांक ५२, ५७, ६३ व का. पत्रें, यादी वगैरे ३३७, ३४१ ). तेथील बादशाही कारस्थानांत त्याचा बराच हात असे. बहुत मर्दपणा व काबीलपणा करून दाखवून, पेशव्यांकडून सरदारी मिळवावी ही त्याची मुख्य आकांक्षा होती. परंतु, अब्रूची दरकार टाकून पैशाची अफरातफर करण्याची संवय या गृहस्थाला असल्यामुळें पेशव्यांची ह्याच्यावर गैरमर्जी असे. ह्यानें १७५७ त अबदालीला चांगला हात दाखविला. परंतु अबदालीची फौज भारी त्यामुळें ह्याचा फारसा उपाय चालला नाहीं. पेशव्यापाशीं अंताजीची पत मुळींच नव्हती.

बापूजी महादेव व दामोदर महादेव हे पेशव्यांच्या तर्फे दिल्लीप्रांतांत मामलतदार होते. ह्यांच्यावरहि पैशाच्या बाबतींत पेशव्यांची गैरमर्जी होती ( लेखांक ६९ ). नारो शंकराचा भाऊ लक्ष्मण शंकर ह्याचीहि पत पेशव्यांजवळ फारशी नव्हती ( लेखांक ५९ ).

गोविंद बल्लाळ खेर ह्याला बाजीरावानें १७३३ त बुंदेलखंडाचा सुभेदार केलें म्हणून कोठें कोठें लिहिलेलें आढळतें तीं निव्वळ गप्प आहे. गोविंद बल्लाळ १७३९-४० त लहानसा कमावीसदार म्हणून बुंदेलखंडांत कदाचित् आला असावा. त्यावेळीं बुंदेलखंडांतील मुख्य अधिकार नारो शंकराचा भाऊ लक्ष्मण शंकर याजकडे होता. काव्येतिहाससंग्रहांतल्या पत्रें, यादींतील नंबर ११ च्या पत्रांत बुंदेलखंडासंबंधानें गोविंद बल्लाळाचा मुळींच उल्लेख केला नसून लक्ष्मण शंकराचें नांव प्रमुखपणें उल्लेखिलें आहे. हें पत्र १७४० च्या २९ सप्टेंबराला लिहिलें आहे. गोविंदपंत १७४६ व १७४७ तहि फारसा महत्त्वास चढला

नसून सामान्य कमाविसदारच होता. हें पत्रें, यादींतील ६२, ६९, ७४, ९५, ९९ ह्या पत्रांवरून उघड होतें. हीं पत्रें १७४६।१७४७ त लिहिलेलीं आहेत ( ह्या पत्रांच्या तारखा प्रस्तावनेच्या शेवटीं दिल्या आहेत ). बुंदेलखंडांतील जैतपूर, कालिंजर, अजेगड वगैरे स्थलें ज्याअर्थी शिंदे, होळकर १७४६।१७४७ त घेत होते त्याअर्थी गोविंद बल्लाळाचें महात्म्य बुंदेलखंडांत त्यावेळीं फारसें वाढलें नव्हतें हें स्पष्ट आहे. गोविंद बल्लाळ त्यावेळीं साधा कमाविसदार नसून जर लढवय्या शिपाई असतां तर बुंदेलखंडांतील लढायासंबंधानें त्याचें नांव वर उल्लेख केलेल्या पत्रांतून अवश्य येतें. १७४६।१७४७ पर्यंत सबंद बुंदेलखंड मराठ्यांच्या हातांत आलें नव्हतें. ह्या सालीं जैतपुरची लढाई होऊन कालिंजर वगैरे ठिकाणें मराठयांच्या ताब्यांत आलीं व पुढें लवकरच सरदारांच्या व पेशव्यांच्या वांटण्या झाल्या आणि पेशव्यांच्या वांटणीची व सरदारांच्या वांटणीची कमावीस गोविंदपंताला मिळाली. तेव्हांपासून गोविंदपंताच्या हातीं सर्व बुंदेलखंडाचा अंमल येऊन त्याचा अधिकार बराच वाढला व तो कांहीं म्हणण्यासारखी फौजहि ठेवूं लागला. गोविंदपंताच्या कैफियतीच्या प्रारंभीं व सागरच्या कैफियतीच्या शेवटीं दिलेले संवत् खरे आहेत हें वरील संदर्भावरून ध्यानांत येईल. संवत् १७९६ म्हणजे १७३९।४० पर्यंत बुंदेले हिस्सा बिनतक्रार देत गेले. तोंपर्यंत लक्ष्मण शंकराकडे बुंदेलखंडाची कमावीस होती. पुढें बुंदेले हिस्सा देण्यास तक्रार करूं लागले तेव्हां संवत् १७९८ त म्हणजे १७४१, १७४२ त गोविंदपंताच्या हवालीं बुंदेलखंडाची कमाविस पेशव्यांनीं केली. पुढें जैतपूरची लढाई झाल्यावर संवत् १८०२ त म्हणजे १७४६ त बुंदेलखंडाची बुंदेल्यांनीं कायमची वांटणी करून दिली व संवत् १८०३ त म्हणजे १७४७ त गोविंदपंताची बुंदेलखंडांतील मातबर मामलतींची कारकीर्द सुरूं झाली. ह्यावेळेपासून म्हणजे १७४७ पासून गोविंदपंताच्या भरभराटीस प्रारंभ झाला. १७३३ त गोविंदपंत बुंदेलखंडांत आले हें अनेक ग्रंथांवरून सिद्ध आहे, म्हणून रा. पारसनीस म्हणतात तो त्यांचा केवळ गैरसमज आहे. बाजीराव १७४० त वारल्यावर बुंदेले हिस्सा देण्यास तक्रार करूं लागले. त्यावेळीं गोविंदपंताची नेमणूक बुंदेलखंडाच्या कमविसीवर झाली. ह्यासंबंधानें बाजीरावाच्या मुत्यूचा सन १७३९ म्हणून भारतवर्षकार देतात तोहि चुकला आहे. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें यादींतील ११ वें पत्र १७४० च्या २९ सप्टेंबराला चिमाजीअप्पानें लिहिलें आहे. ह्याच संग्रहांतलि ४९ व्या पत्रांत १७४१ च्या जानेवारींत बाजीरावाला मरून आठ महिने न झाले तोंच चिमाजी अप्पा वारले म्हणून बाळाजी बाजीराव धावडशीच्या स्वामीस लिहितो, ह्यावरून बाजीराव १७४० च्या मेंत वारला हें स्पष्ट आहे. असो. इ. स. १७४७ च्या पुढें गोविंदपंत फौजफाटा ठेवून बुंदेलखंडांत अंमल बसवूं लागला. १७५४ त गोविंद बल्लाळ बराच वजनदार मामलतदार झाला होता ( लेखांक ३६ ). ह्या वेळीं अंतर्वेद व बुंदेलखंड ह्या प्रांतांतील पेशव्यांच्या व सरदारांच्या वांटणीचा मुलूख त्याच्याकडे कमाविशीनें होता ( लेखांक ६१ ). लेखांक ६१ ( १४ मार्च १७५७ ) त जनकोजी शिंद्यानें बाळाजी गोविंदाला कमावीसदार म्हणून हुकूम केला आहे. लेखांक ६० त रघुनाथरावदादा गोविंद बल्लाळाला मातब्बर माम-

लतदार म्हणून म्हणतो व त्याचा मुलगा जो बाळाजी गोविंद त्याला अगरूर म्हणून नांवे ठेवितो. लेखांक ५४ त रघुनाथरावदादा गोविंद बल्लाळाची गणना लहान थोर वगैरेंत करितो. १७५७ त " आपल्या मुलुखांतील चौकशीचा मजकूर पेशव्यांच्या मनांत होता " असें लेखांक ५४ वरून दिसतें. ह्यावरून १७५७ त आपल्या मुलुखांतील मामलतदार जे गोविंदपंत वगैरे मंडळी त्यांच्याविषयीं पेशव्यांना संशय येऊं लागला होता, हें उघड आहे. १७५७ त खेतसिंगाकडील वकील रघुनाथरावदादाकडे गेले असतां बाळाजी गोविंदाला मोठी भीति पडली व गोविंदपंताला ही बातमी तावडतोब कळवा म्हणजे ते पुण्यास " जी खबरदारी करणें ती करतील " अशी त्यानें आपल्या कारकुनांना सक्त ताकीद केली. कां कीं, खेतसिंगाचे वकील रघुनाथरावाला स्वतंत्रपणें जाऊन भेटले असतां आपलीं कारस्थाने बाहेर पडतील अशी बाळाजी गोविंदाला भीति पडली होती. गोविंदपंत आपल्या मामलतींत पैशाची अफरातफर करतो असा संशय पेशव्यांना आल्यावरून येरंडे व कानिटकर हे दोन दरखदार १७५७ त पेशव्यांनीं गोविंदपंतावरोबर दिले. त्यांनीं गोविंदपंताविरुद्ध खालील नऊ तक्रारी आणिल्या ( लेखांक १४१ ).

( १ ) मागील जमा आहे त्यापैकीं सोडून देऊन जमा करितात.
( २ ) शिबंदीप्यादाचा खर्च जास्त वाढविला. पांच प्यादे होते तेथें पंचवीस ठेविले.
( ३ ) फौज मन मानेल तशी ठेवून खर्च बहुत करतात.
( ४ ) जेथें शिबंदी बहुत नलगे ते परगणे शिद्याकडे देतात व बहुत शिबंदी लागती ते परगणे सरकारांत ठेवितात.
( ५ ) भेटी व नजराणे अंतस्ते घेतात.
( ६ ) महालांचा दाखला दाखवीत नाहींत.
( ७ ) ह्यांच्या दहशतीमुळें रयत किंवा जमीदार कोणी आम्हांस भेटत नाहीं
( ८ ) कलमरुजुवात होत नाहीं.
( ९ ) कारभारी मान मानेल ते मिळवितात.

ह्या नऊ तक्रारी सदाशिवरावभाऊंनीं पाहून त्या गोविंदपंताचा पुणें येथील वकील बाबूराव नरसी यास दाखविल्या. बाबूरावानें तक्रारींचीहि याद जशीच्यातशीच गोविंदपंताकडे पाठविली. ती पाहून गोविंदपंतांचें धाबें दणाणून गेलें व तो येरंडे व कानिटकर यांची आपल्यास संभाळून घ्या म्हणून विनवणी करूं लागला. ह्यासंबंधानें लेखांक १३३ पासून लेखांक १५० पर्यंत व सुद्धां पत्रें वाचण्यासारखीं आहेत. त्यांत गोविंदपंत पैशाची अफरातफर करीत असे ह्याची शाबिती गोविंदपंतानें आपली आपणच करून घेतली आहे. येरंडे हिशेब समजावून देण्याकरितां गोविंदपंताला आपल्याकडे बोलावित असतां गोविंदपंत निरनिराळ्या सबबी काढून भेटायला येण्याचें कसें लांबणीवर टाकीत होता हेंहि ह्या पत्रांवरून व पत्रांखालीं दिलेल्या टिपांवरून कळून येईल. येरंडे दाने सालें बुंदेलखंडांत राहिले; परंतु, गोविंदपंताचे मंडळीनें त्यांना एक जमीदार अगर पाटील भेटूं दिला नाहीं ( लेखांक १४२ ). मागील तीन सालांचा हिशोब त्यांस न दाखवितां हिशोबाचे रुमालहि गोविंदपंत आपल्या

बरोबर घेऊन गेला ( लेखांक १५० ) आणि संशय येऊन येरंडे जेव्हां गोविंदपंताचा जामदारखाना जप्त करूं लागले तेव्हां त्यांच्यावर रागवावयालाहि गोविंदपंतानें कमी केलें नाहीं ( लेखांक १३४ ). गोविंदपंताच्या प्रांतांत आपली कांहींच दाद लागत नाहीं असें पाहून येरंडे पुण्यास जाऊं लागले तेव्हां गोविंदपंत कांहींसा नरम आला व नम्रतेच्या गोष्टी बोलूं लागला. " दरबारी नानाप्रकारें नालिशी, चुगली करितात " त्यानें आपलें नुकसान होतें असें त्यानें येरंड्यांना कळविलें व त्याच पत्रीं रयतेकडे आपण कसर ठेवीत होतों हें कबूल केलें ( लेखांक १३८ ). मोहिमेहून परत आलों म्हणजे तीन सालांचा हिशोब व रयतेकडील बाकी दाखवून देण्यास आपण तयार आहों म्हणून त्यानें येरंड्यांना लिहिलें; कारण, " दरबारचा रंग पाहिला, खावंद चौकशी करूं लागला, तेव्हां पैसेयाचा लोभ धरून मेळविली अब्रू गमाविणें " योग्य नाहीं असें त्यास उमजून आलें. तेव्हां आपल्यास संभाळून घ्यावें म्हणून त्यानें येरंड्यांची खुशामत करण्यास आरंभ केला. " मी येथें गुंतलों नसतों तर सर्व जमीदार तुम्हास भेटते; कामकाज सर्व सुतीं लागतें; तें न जालें; याजकरितां तुम्हासहि वाईट लागलें; तुमचें मनीं संशय आला; ( कां कीं ) दोन वर्षें झालीं, कांहींच परगण्याचें अवसान न सांपडे; हेंहि खरेंच ! तुम्हांस तरी काय शब्द ! " तेव्हां " जर तुम्हांस आमचें बरें करणें तर तुम्हीं देशास प्रस्तुत न जाणें " कारण " श्रीमंत स्वामींची मर्जी एक प्रकारची जाली. " ही असली खुशामत करून गोविंदपंतानें येरंड्याला १७६० च्या एप्रिलपर्यंत थोपवून धरिलें. पुढें खुद्द सदाशिवरावभाऊ हिंदुस्थानांत येऊं लागले तेव्हां येरंड्यांना गोविंदपंताविरुद्ध गाऱ्हाणीं सांगण्यास दक्षिणेंत जाण्याची जरूरच पडली नाहीं. १७६० च्या एप्रिलपासून १७६१ च्या जानेवारीपर्यंत सदाशिवरावभाऊ हिंदुस्थानांत होते, त्या अवधींत येरंड्याप्रमाणेंच सदाशिवरावभाऊलाहि गोविंदपंतानें असेंच फसविलें. ह्यासंबंधानें लेखांक २०१, २११, २१६, २१७ अ, २२४, २२७, २२९, २३०, २३७, २३९, २४२, २५७, २५९ हीं पत्रें अवश्य वाचण्याची शिफारस मी वाचकांस करितों. त्यावरून गोविंदपंताच्या नीचपणाची इयत्ता वाचकांना स्वतःच ठरवितां येईल. बायाबापड्यांना ( लेखांक ६० ), देवाब्राह्मणांना ( लेखांक १९३ ) व खुद्द स्वतःच्या धन्याला ( लेखांक २६८ ) हि फसविण्याला व बुचाडण्याला ह्या मनुष्यानें कमी केलें नाहीं. सारांश, पैशाची अफरातफर करून गोविंदपंतानें पेशव्यांची गैरमर्जी संपादिली व प्रत्याघातन्यायानें तो त्यांचा द्वेष करूं लागला.

येणेंप्रमाणें हिंदुस्थानांत मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार-मामलतदारांच्या उद्योगाचा वृत्तांत १७६० पर्यंत आणून पोहोंचविला आहे. पुढील कलमांत पानिपतच्या मोहिमेचें अत्यंत संक्षिप्त वर्णन देऊन त्यांत ह्या गृहस्थांनीं व विशेषतः गोविंदपंत बुंदेल्यानें काय काय दुष्कृत्यें केलीं त्याचें दिग्दर्शन करितों.

( क ) १७४८ त अबदालीनें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. त्या स्वारींत यद्यपि तो दिल्लीपर्यंत आला नाहीं व त्याचा सरहिंदास मीरमनू व सफदरजंग यांनीं पराभव केला, तत्रापि त्याच्या सर्वनाशक शक्तीचा त्यांना चांगलाच अनुभव येऊन चुकला. अबदा-

लीपुढें टिकाव धरण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानांत दिल्लीचा पातशाहा किंवा त्याचे अमीर ह्यांच्यांत बिलकूल राहिलें नव्हतें. तेव्हां दक्षिणेंतील सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे ह्यांच्या हातून अबदालीचें पारपत्य झाल्यास पहावें या हेतूनें सफदरजंगानें ह्या दोघा सरदारांशीं अबदालीला तंबी देण्याबद्दल करार केला. त्यांत लाहोर, मुल्तान, रोहिलखंड व रजपुताना ह्या चार मुलुखांची चौथ त्यानें मराठ्यांना देण्याचें कबूल केलें; अशा अटीवर कीं त्यांनीं अबदाली, रोहिले, रजपूत व सिंध प्रदेशांतील अमीर ह्यांना तंबी द्यावी व दिल्लीच्या पातशहाचें परचक्रापासून व राज्यांतील अमीरांपासून संरक्षण करावें. ह्या कराराच्या अन्वयें मराठ्यांनीं १७५१ त रोहिल्यांशीं लढाई केली. मराठे रोहिल्यांशीं लढाई करीत असतां अबदाली १७५१ च्या जानेवारींत पंजाबांत आला व त्यानें मुलतान व लाहोर हे दोन प्रांत काबीज केले. १७५२ त हे प्रांत मराठ्यांनीं अबदालीपासून हिसकावून घ्यावयाचे; परंतु त्या सालीं शिंदेहोळकरांना गाजुद्दिनाला घेऊन दक्षिणेंत यावें लागल्यामुळें तें काम त्यावेळीं त्यांना करितां आलें नाहीं. १७५४ व १७५५ त मल्हारराव, जयाप्पा व रघुनाथराव कुंभेर, नागोर, दिल्ली, रोहिलखंड ह्या प्रदेशांत अंमल बसाविण्यांत गुंतले होते, त्यामुळें त्यावर्षीं लाहोराकडे त्यांना दृष्टि फेकतां आली नाहीं. पुढें १७५७ त अबदाली थेट दिल्लीपर्यंत चालून येऊन त्यानें आग्रा, मथुरा वगैरे शहरें लुटलीं. त्याचा हेतु दक्षिणेंतहि चालून येण्याचा होता ( लेखांक ६५ व ६३ ). परंतु, ती निवळ गप्प होती. बाळाजी बाजीराव रघुनाथरावाला अबदालीवर १७५७ च्या जानेवारींत पाठवून देऊन आपण स्वतः श्रीरंगपट्टणास गेला. " अबदालीची गडबड दिवसेंदिवस अधिक ऐकत असतां आपला मुलूख खालीं टाकून आपण श्रीरंगपट्टणास गेला " हें योग्य केलें नाहीं म्हणून लेखांक ६५ त शहानवाजखान बाळाजी बाजीरावास दोष देतो. ह्यावरून एवढें मात्र स्पष्ट दिसतें कीं बाळाजी बाजीराव अबदालीची फारसी तमा धरीत नव्हता. रघुनाथरावाचेंहि अबदालीविषयीं असेंच मत होतें. लवकरच त्याचें पारपत्य करितों म्हणून १७५७ त रघुनाथरावानें वारंवार उद्गार काढिले आहेत ( लेखांक ५४, ६६, ६७, ७१ ). परंतु रघुनाथराव दिल्लीस जाऊन पोहोंचण्यापूर्वींच म्हणजे १७५७ च्या जुलैपूर्वीं म्हणजे १७५७ च्या एप्रिलांत अबदाली अफगाणिस्थानास परत गेल्यामुळें दादांची व अबदालीची गांठ पडली नाहीं. अबदाली १७५७ च्या सप्टेंबरांत दिल्लीस होता म्हणून कीन वगैरे मंडळी म्हणतात तें निराधार आहे, हें १५३ व्या टिपेंत मीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. १७५७ च्या जुलैंत रघुनाथरावदादा दिल्लीस गेले व रोहिलखंड, दिल्ली, रजपुताना वगैरे प्रदेशांची व्यवस्था लावून १७५८ त त्यांनीं लाहोर प्रांत जिंकून घेतला. हा प्रांत जिंकण्याचा १७५० तच मराठ्यांचा विचार होता; परंतु अनेक अडथळे येऊन तें काम १७५८ त साधलें गेलें. हें काम १७५७ तच साधावयाचें; परंतु, मल्हारराव होळकरानें अनेक लचांडें काढून तें १७५८ पर्यंत होऊं दिलें नाहीं ( लेखांक ६७ ). ह्याच वेळीं मल्हाररावानें नजीबखानाचें साधन करून ठेविलें ( लेखांक ४८ ); त्यामुळें रघुनाथरावाच्या तडाख्यांतून नजीब वाचला. नाहीं तर मराठ्यांच्या कुशींतील ही ब्याद त्याच वेळीं नाहींशी झाली असती.आपण दिल्लीस

असे तोंपर्यंत अबदाली परत न आल्यास, सुजाउद्दौल्याचे काशी, प्रयाग वगैरे प्रांत घेऊन मुबलक पैसा उगवित्र्याचाहि रघुनाथरावाचा विचार होता ( लेखांक ७१ ). परंतु लाहोरावर स्वारी केल्यामुळें रघुनाथरावाच्या हातून हा विचार पार पडला नाहीं. काशी व कांहीं खंडणी देण्याचीं गोड अभिवचनें देऊन सुजाउद्दौल्यानें रघुनाथरावाला देशीं लावून दिलें ( का० पत्रें, यादी ३७३, ३८७ ). १७५७ व १७५८ तल्या स्वारींत बाळाजी बाजीरावानें रघुनाथरावाला खालील कामें नेमून दिलीं होतीं. ( १ ) रजपुतान्यांतील संस्थानिकांची व्यवस्था लावावयाची. ( २ ) दिल्लीच्या पातशहाची व्यवस्था लावावयाची. ( ३ ) अबदालीचें पारपत्य करावयाचें. ( ४ ) रोहिलखंडांतलि रोहिल्यांची व्यवस्था लावावयाची. ( ५ ) काशी, प्रयाग, बंगाला वगैरे प्रांतांवर पूर्वेकडे स्वारी करून मातब्बर पैका मेळवावयाचा. ( ६ ) सरकारी मुलुखांतलि मामलतदारांची चौकशी करावयाची. (७) दामोदर महादेव, बापूजी महादेव, लक्ष्मण शंकर, गोविंदपंत बुंदेले, नारो शंकर, अंताजी माणकेश्वर वगैरे मंडळी पैशाची अफरातफर करितात त्यांची तगीरी वहाली करावयाची. ( ८ ) नजीबखानाला नाहींसा करावयाचा व ( ९ ) जिंकिलेल्या प्रदेशांतून पैसा मिळवून पुढें मोहिम करावयाची. ह्या कामांपैकीं कांहीं कामें रघुनाथरावानें अर्धीमुर्धीं केलीं व कांहीं मुळींच करावयाची सोडलीं. रजपुतान्यांतील माधोसिंग, विजेसिंग वगैरे संस्थानिकांच्या मामलती विल्हेस लावण्याच्या कामीं मल्हाररावानें रघुनाथरावदादाला बरेच अडथळे आणिले (लेखांक ७१, ६६ ). कां कीं, ह्या मंडळीला मल्हाररावाची आंतून फूस होती. सहारणपूर, जालापूर वगैरे ठिकाणचे रोहिले रघुनाथरावाला शरण आले. परंतु, नजबिखान रोहिला दादासाहेबाच्या हातीं लागला नाहीं. १७५७ त पातशाहाला व गाजुद्दिनाला फसवून नजीबखान अबदालीला मिळाला होता. रघुनाथराव दिल्लीस आल्यावर ह्या लुच्याचें शासन करणार तों तो दिल्लींतून मोठ्या शिताफीनें पळून गेला. पुढें त्यानें मल्हाररावाला अंतस्थ रीतीनें पैसा देऊन रघुनाथरावाचा राग कसा तरी टाळला ( लेखांक ४८ ). लाहोरास जाऊन जाहानखान व अबदालीचा पुत्र तैमूरशाहा यांना रघुनाथरावानें घालवून दिलें व मराठ्यांचा अंमल त्या प्रांतांत बसविला; परंतु अबदालीचा कायमचा बंदोबस्त त्याच्या हातून झाला नाहीं ( का. पत्रें, यादी ३४१ ). आपण गेल्यावर पाठीमागून अबदाली लाहोरास येईल म्हणून अंताजी माणकेश्वरानें दादासाहेबाला सुचविलें होतें. ( का. पत्रें, यादी ३४१ ). परंतु पावसाळ्यामुळें दादाला देशीं लवकर जाणें भाग पडलें व अबदालीचा कायमचा बंदोबस्त करण्याचें, मामलतदार व मुत्सद्दी यांची चवकशी करण्याचें व पूर्वेकडे स्वारी करण्याचें काम तहकूब ठेवून तो पुण्यास परत आला. ह्या स्वारींत मिळकत काडीचीहि न करितां रघुनाथराव एक कोट रुपये कर्ज करून आला. ह्या कर्जाचें ओझें बाळाजी बाजीरावाला फारसें वाटलें नाहीं ( टीप २५४ पहा ). बाळाजी बाजीरावाला रघुनाथरावाचा जो राग आला तो वरील नऊ कामें त्यानें केलीं नाहींत म्हणून आला. माधोसिंग, बिजेसिंग वगैरे संस्थानिकांचा कल अबदालीकडे आहे; दामोदर महादेव, लक्ष्मण शंकर वगैरे मंडळी रयतेंत फितूर करितात; अंतस्थ नजराणा घेऊन मल्हारराव नजीबखानाला आश्रय देतो; काशी.

प्रयाग देण्याच्या सुजाउद्दौला नुसत्या थापा मारितो; गोविंदपंत वगैरे मल्मलतदार पेशाची अफरातफर करतात; वगैरे कथा पेशव्यांच्या मुत्सद्दीमंडळांत प्रसिद्ध असून व त्यांचा प्रतिकार करण्याकरितां रघुनाथरावाला मुद्दाम पाठविलें असून, त्याच्या हातून जेव्हां तें काम झालें नाहीं, तेव्हां रघुनाथरावाच्या नाकर्तेपणाचा नानासाहेबाला व भाऊसाहेबाला वीट आला व पुढें कोणत्याहि महत्त्वाच्या नाजूक प्रसंगीं रघुनाथरावावर कामगिरी सोंपविण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची खात्री झाली. रघुनाथरावाच्या ह्या नाकर्तेपणाबद्दल ह्या दोघांनी कांहीं कालपर्यंत एक चकार शब्दहि काढिला नाहीं. पुढें वेळ आली तेव्हां मात्र आपल्या मनांतील आशय भाऊसाहेबानें रघुनाथरावाला बोलून दाखविला व बाळाजी बाजीरावानें भाऊसाहेबाचें समर्थन केलें. ह्या प्रकारचा उल्लेख पुढील वर्णनांत येईल.

१७५८ च्या जुलैंत रघुनाथराव पुण्यास आला. ह्याच सुमाराला दत्ताजीची रवानगी हिंदुस्थानांत झाली. १७५८ च्या डिसेंबरपर्यंत दत्ताजीचा व जनकोजीचा काल रजपुतान्यांतील मवासांची व संस्थानिकांची व्यवस्था लावण्यांत गेला. नंतर ते दिल्लीस गेले. तेथे १७५९ च्या जानेवारी फेब्रुवारीपर्यंत राहून बाळाजी बाजीरावानें सांगितलेल्या कामगिऱ्या करण्याच्या उद्योगास ते लागले. ह्या कामगिऱ्या येणेंप्रमाणें होत्या:—( १ ) लाहोरचा बंदोबस्त करून तेथून पैसा पाठवणें. ( २ ) नजीबखानाला तंबी देणें. ( ३ ) सुजाउद्दौल्याकडून काशी प्रयाग घेणें व बंगल्यावर स्वारी करणें. ( ४ ) सुजाउद्दौल्याला अगर गाजुद्दिनाला वजिरी देऊन कसे तरी पन्नास लाख रुपये काढणें. ( ५ ) अंताजी माणकेश्वराला दिल्लीच्या कामांतून काढून टाकणें. पैकीं पहिल्या कामास म्हणजे लाहोरचा बंदोबस्त करण्यास दत्ताजी शिंदे १७५९ च्या मार्चांत गेला व सतलज नदीवर एप्रिलांत जाऊन पोहोंचला ( का. पत्रें, यादी ३६२ ). तेथून साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी ह्या दोन सरदारांना लाहोराकडे पाठवून दत्ताजी स्वतः नजीबखानाला तंबी देण्याकरितां व सुजाउद्दौल्यावर स्वारी करण्याकरितां १७५९ च्या जून महिन्याच्या सुमाराला कुंजपुऱ्यास आला. कुंजपुऱ्यावर यमुना उतरून अंतर्वेदींत गेला व गोविंदपंत बुंदेल्याला इटाव्याकडून नजीबखानास पायबंद देण्यास त्यानें हुकूम केला. १७५९ च्या सप्टेंबरपर्यंत अंतर्वेदींतील नजीबाचा मुलूख घेऊन दत्ताजीनें २२ अक्टोबराला शुक्रतालास गंगानदी ओलांडिली व खुद्द रोहिलखंडांत प्रवेश केला. गोविंदपंत बुंदेल्यानेंहि ह्याच सुमाराला गंगा उतरून जलालाबादेनजीक ठाणें दिलें ( लेखांक १३८ ). वरून दत्ताजी व खालून गोविंदपंत ह्यांच्या कचाटींत सांपडल्यामुळें नजीबखानाची ह्यावेळीं बहुतेक गाळण उडून गेली. तो, त्याचा मुलगा व त्याचे साथीदार—दुंदेखान, सादुल्लाखान व हफीज रहिमत—ह्यांचा दोन चार लढायांत पराजय झाला; नजीबखानाच्या पुलापर्यंत मराठ्यांनीं रोहिल्यांचे गांव जाळले व नजीबखानाच्या पुलच्या दोन नावा तोडून त्याचा पूल केवळ निरुपयोगी करून टाकिला. ही अशी जबर तंबी मिळाल्यावर नजीबखानानें हफीज रहिमतखानाच्या द्वारें वरकरणी सलूखाचें बोलणें लाविलें ( लेखांक १३९ ) व आंतून सुजाउद्दौल्याचें सूत्र सिद्ध करून ठेविलें. मराठे आपलाहि मुलूख पुढें मागें बळकाविणार या रागानें, लखनौहून रामगंगेस पूल बांधोन

सुजाउद्दौला व उमरार्गार गोसावी दाहा बारा हजार सैन्यानिशी जलालाबादेस येऊन पोहो-चले. गोविंदपंत जलालबादेच्या आसपास असून त्यानें सुजाउद्दौल्याला कांहीं एक अडथळा केला नाहीं. मराठ्यांची फौज संख्येनें अतीच कमी असल्यामुळें, सुजाउद्दौला नजीबखाना-च्या मदतीस येतो असें ऐकून, गंगेच्या अलीकडे आली व कांहीं फौज व बुणगे यावयाचे राहिले होते त्यांपैकीं कित्येक नजीबखान बाहेर निघाला अशी खोटीच दहशत खाऊन गंगेच्या अलीकडे येतांना पाण्यांत बुडून मेले, कित्येक वाहवले व कित्येक मारले गेले. ह्या प्रसंगाचें वर्णन करितांना गोविंदपंतानें दत्ताजीच्या व्यवस्थेची थट्टा केली आहे ( लेखांक १४१ ). मराठ्यांची फौज १७५९ च्या ७ नोव्हेंबरला गंगेअलीकडे आली; तों थोडक्याच दिवसांत अशी बातमी आली कीं अवदाली लाहोरास येऊन पोहोंचला. १७५८ च्या मेंत रघुनाथरावानें तैमूरशहाला हाकून दिल्यापासून अवदाली हिंदुस्थानांत येणार होताच. परंतु बलुचिस्थानांत नासीरजंगानें बंड केलें होतें तें मोडून शिकारपूरच्या वाटेनें हिंदुस्थानांत येण्यास त्याला १७५९ चा नोव्हेंबर महिना लागला. अवदाली ज्याअर्थी १७५९ च्या नोव्हेंबरांत लाहोरास आला त्याअर्थी १७५९ च्या सप्टेंबरांत तो अनूप शहरीं आला म्हणून कीन म्हणतो ( Fall of the Mogul Empire p. 41 ) तें अविश्वनीय आहे हें उघड आहे. दत्ताजीच्या मनांत नजीबखानाला पक्की तंबी पोहोंचवावयाची होती, परंतु, अबदाली-च्या येण्यामुळें दत्ताजीला तें काम तसेंच ठेवून द्यावें लागलें व तो लवकरच शुक्रतालास आला. रोहिले व सुजाउद्दवला यांना दबकाविण्याकरितां गोविंद बल्लाळाचा पुत्र बाळाजी गोविंद ह्यास ठेवून दत्ताजीनें यमुनेकडे मोर्चे वळविले ( लेखांक १४२ ). शुक्रतालाहून कुच करून दत्ताजी यमुना कुंजपुऱ्यावर उतरला व अवदालीशीं टक्कर देण्याची तयारी करूं लागला. लाहोरास आल्यावर शीख लोकांची व अवदालीची एक मोठी लढाई झाली. साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी हीं दोन पथकें दत्ताजीनें १७५८ त पंजाबांत ठेविलीं होतीं. तीं दोन्हीं महिना पंधरा दिवसांच्या अंतरानें दत्ताजीला येऊन मिळालीं. लाहोरास अब-दाली आला त्याचवेळीं साबाजी शिंदे दत्ताजीस शुक्रताल येथें येऊन मिळाला. त्रिंबक बापुजी अवदालीच्या पुढें सरकत सरकत सरहिंदापर्यंत आला. तेथें त्याची व गव्हारांची लढाई जुंपली. त्या लढाईंत त्रिंबक बापूजीचें पथक गव्हारांनीं सर्वस्वीं नागविलें. त्रिंबक बापूजीच्या पथकांतील माणसें–उघडीं बोडकीं अशीं–दत्ताजीच्या सैन्यास नोव्हेंबरच्या २३ व्या तारखेला मिळालीं ( लेखांक १४६ ). कुंजपुऱ्याहून दत्ताजी निघाला तों त्याची व अब-दालीची सन्निधता दहा कोसांच्या अंतरानें ७ डिसेंबरीं झाली (लेखांक १५५). ह्या सुमारास गेरंड्यांना भेटावयास जाण्याकरितां गोविंदपंत दत्ताजीपाशीं निरोप मागूं लागला. ह्याचा राग येऊन दत्ताजी अबदालीला रेटण्यास एकटाच निघाला व गोविंदपंताला. आपले कबिले बुणगे दिल्लीकडे घेऊन जाण्यास त्यानें सांगितलें ( लेखांक १४७ ). इतर कांहीं मंडळी-बरोबर गोविंदपंत बुंदेल्याला दत्ताजीनें पुढें अबदालीच्या तोंडावर पाठविलें म्हणून भाऊ-साहेबाच्या बखरीच्या आधारावर रा० नातू महादजीच्या चारित्रांत ( पृष्ठ ४९ ) लिहितात, तो खरा प्रकार नसून, गोविंदपंत मागें राहिला. ह्या प्रसंगासंबंधानें लिहित असतां गोविंद-

पंतानें फारच चमत्कारिक शब्द वापरिले आहेत. अवदालीची व दत्ताजीची " आज लढाई अगर प्रातःकाळीं होईल " असें येरंड्यांना कळून गोविंदपंत पुढें म्हणतो " ईश्वर ज्यास यश देईल त्यास सुखें देऊं ! " ह्या वाक्यावरून व विशेषतः " सुखें " ह्या शब्दावरून गोविंदपंताची दत्ताजीच्या ठायीं कितपत भक्ति होती तें स्पष्ट ध्यानांत येण्यासारखें आहे (लेखांक १४७). गोविंदपंत कबिले बुणगे घेऊन पाठीमागें राहिला त्यांत गाजुद्दिन वजीराहि होता. १० नोव्हेंबराच्या सुमाराला अलमगीर पातशहाला ठार मारून गाजुद्दिन नोव्हेंबराच्या १४।१५ तारखेला मराठ्यांच्या सैन्यांत सामील झाला होता (लेखांक १४३). त्याला घेऊन गोविंदपंत मथुरेकडे गेला व दत्ताजी अबदालीची टेहळणी करीत राहिला. दत्ताजीच्या व अबदालीच्या दोन चार झटापटी होऊन २४ डिसेंबरीं एक मोठें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांना यश आलें (लेखांक १५७). ३ जानेवारी १७६० ला अंतर्वेदींत शिरून अबदाली शुक्रतालीं रोहिल्याला मिळाला व तेथून त्यानें दिल्लीचा रोंख धरिला (लेखांक १६४). इकडे कुंजपुऱ्याहून दत्ताजी शिंदेहि दिल्लीस यमुनेच्या दक्षिणतीरीं येऊन पोहोंचला. अबदाली व दत्ताजी ह्यांच्यामध्यें यमुनेचें पात्र तेवढें राहिलें होतें. १० जानेवारी १७६० ला अबदालीचें व दत्ताजीचें दिल्लीजवळ बडाऊंच्या घाटीं मोठें तुंबळ युद्ध झालें व त्यांत मराठ्यांचा पराजय होऊन दत्ताजी शिंदे रणांत राहिला (लेखांक १६५). जनकोजी तेथून पळून कोटपुतळीस आला व तेथें १२ जानेवारी १७६० ला त्याची व मल्हारराव होळकराची गांठ पडली (लेखांक १५३ व १६५). १७५९ च्या नोव्हेंबर महिन्यांत अंतर्वेदींत शुक्रतालीं रोहिल्याशीं लढत असतां जेव्हां अबदाली आल्याची बातमी आली तेव्हांच दत्ताजीनें मल्हाररावाला मदतीस येण्याकरितां पत्रें पाठविलीं होतीं. परंतु बलवडा, झिलाडा वगैरे भिकार ठिकाणें जयनगर प्रांतीं घेत बसून मल्हाररावानें दोन महिने व्यर्थ दवडिले. पेशव्यांनींहि मदतीस जाण्याबद्दल मल्हाररावाला वारंवार पत्रें पाठविलीं (लेखांक १६१). " मल्हाररावांनीं आधीं काम कोणतें करावें, मग कोणतें करावें, माधोसिंगाचा मजकूर काय ? जेव्हां म्हटलें तेव्हां पारपत्य होतें तो विचार त्यांनीं न केला " (लेखांक १५७), ह्याप्रमाणें दोष देऊन, पुढें लेखांक १५८ त " मल्हाररावांस वारंवार पत्रें रवाना केलीं आहेत, परंतु, त्याचे प्रकृतीस तुम्ही जाणता, " म्हणून पेशव्यांनीं मल्हाररावांचा दुष्ट हेतुहि उघड करून दाखविला. मल्हारराव, शिंद्यांना जर १७५९ च्या नोव्हेंबरांत मिळाला असता तर रोहिले व सुजाउद्दौला यांचें पारपत्य होऊन अबदाली एकटा राहता व त्याचें पारपत्य ह्या दोघां सरदारांना सहजासहजीं करितां आलें असतें. रघुनाथरावदादाचेंहि असेंच मत होतें (लेखांक १५२). " दोन्ही सरदार एकत्र असलियास उत्तम रीतीनें पठाणाचें पारपत्य होईल; पठाणांत कांहीं फार बल नाहीं व त्यांना मागील वर्षीं दहशतहि खादली आहे. सारांश, एकदिल फौज असलिया तें काम सहजांत आहे, " असें रघुनाथरावानें लिहून पाठविलें. परंतु मल्हाररावाच्या मनांत शिंद्याविषयीं अढी पक्की बसली होती. शिंदे पेशव्यांच्या मतानें चालतात; नजीबखानाला मारून टाकून पेशव्यांचें राज्य निष्कंटक करून टाकण्याचा शिंद्याचा आत्मघाती प्रयत्न आहे; हिंदुस्थानांत एखादा तरी " खळी "

ठेवण्याचा आपला विचार शिंद्यांना पसंत नाहीं; इत्यादि कुकल्पना मनांत धरून मल्हार-रावानें शिंद्यांना साहाय्य करण्याचें लांबणीवर टाकिलें व शिंद्यांचा सर्वस्वीं नाश झाल्यावर कोटपुतळीस जनकोजीस येऊन तो भेटला ( टीप २१५ ). परंतु त्याच्या येण्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. जी गत शिंद्यांची झाली तीच मल्हाररावाची झाली. मार्च महिन्याच्या ४ किंवा ५ व्या तारखेस मल्हाररावाचे सरदार शेट्याजी खराडे, त्याचा पुत्र शिवाजी खराडे, रामाजी यादवाचा पुत्र आनंदरावराम व गंगाधर यशवंत चंद्रचूड ह्यांची व अबदालीची गांठ पडली व चंद्रचूडाखेरीज बाकीची सर्व मंडळी ठार झाली. मल्हारराव होळकर स्वतः मागेंच राहिला होता. ह्या मागें मागें रहाण्याच्या कामीं गोविंदपंत बुंदेल्याशीं मल्हार-रावाचें साम्य चांगलें जुळतें. ह्यावेळीं मल्हाररावाचें वय ६४ वर्षांचें व गोविंदपंताचें सुमारें तितकेंच असावें. दोघेहि वयस्कर झाले असून तरुणपणची तडफ त्यांच्या अंगीं राहिली नव्हती. जेथें जातील तेथें माघार घेण्याचा त्यांचा विचार फार असे. लढाईच्या कामीं त्यांचा उत्साह जरी थंडा होत चालला होता तरी द्वेष, मत्सर, कुढामात्र, स्वामिद्रोह व मित्रद्रोह करण्याच्या कामीं ह्या दोघां म्हाताऱ्यांचें पाऊल सारखें पुढें होतें. द्वेष व मत्सर ह्या गोड व तिखट दुर्गुणांना भुलून जाऊन ह्या दोघांनीं दत्ताजीचें व पेशव्यांचें अतोनात नुकसान केलें. असो. शिंद्यांप्रमाणें मल्हाररावाची दुर्दशा झाल्यावर मेच्या सुमाराला शिंदेहोळकर केरौलीच्या आसपास राहिले व अबदाली यमुनेच्या उत्तरतीरीं अंतर्वेदींत अनुपशहरीं जाऊन बसला.

शिंद्यांच्या पराजयाची बातमी १७५९ च्या डिसेंबरांत व १७६० च्या जानेवारींत पेशव्यांना पोहोंचली, त्यावेळीं पेशवे उदगीरच्या मोहिमेंत गुंतले होते. शिंद्यांची अबदालीशीं युद्धें १७५९ च्या जूनच्या अगोदर झालीं व त्याच्या अगोदर त्यांनीं पेशव्यांना मदतीस येण्याविषयीं पत्रें पाठविलीं वगैरे भ्रामक विधानें रा. नातू ह्यांनीं महादजीच्या चरित्रांत (पृष्ठें ५४-५५ ) केलीं आहेत. त्यांचें निरसन २४५ व्या टीपेंत मी साधार केलें आहे. येथें फक्त १७५८ त दत्ताजी हिंदुस्थानांत गेल्यापासून सदाशिवरावभाऊनें व बाळाजी बाजीरावानें १७६० च्या मार्च-एप्रिलपर्यंत केलें काय त्याचें दिग्दर्शन करितों.

१७५७ त शिंदखेडच्या लढाईत विश्वासरावाला मदत न केल्याबद्दल जानोजी भोसल्यावर बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी चालून गेले ते १७५८ च्या एप्रिल मेंत पुण्यास आले. १७५८ च्या जून पासून सप्टेंबरपर्यंत ते पुण्यास होते. १७५८ च्या जुलैंत रघुनाथराव लाहोराहून पुण्यास आला. पुढें बाळाजी बाजीराव अक्टोबरांत कोंकणांत पुळ्याच्या गणपतीस गेला, तो १७५९ च्या मार्चांत पुण्यास आला. तोंकालपर्यंत पुण्यांत सदाशिवरावभाऊ कारभार पहात होता. १७५९ च्या मार्चांत गोपाळराव गोविंद श्रीरंगपट्टणाकडे मोहिम करीत होता; दत्ताजी शिंदा दिल्लीहून लाहोराकडे चालला होता व कोंकणांत मानाजी आंग्रे व रघोजी आंग्रे, कांसे, उंदेरी वगैरे शामळाचीं स्थळें घेण्यांत गुंतले होते (का. पत्रें, यादी ६१, ७६,, १०२ ). बाकी हिंदुस्थानांत व दक्षिणेंत बरकांती शांतता विराजत होती. ह्यावेळीं सदाशिवरावभाऊच्या व बाळाजी बाजीरावाच्या मनांत कांहीं प्रचंड कल्पना खेळत होत्या. सर्व हिंदुस्थान व सर्व

दक्षिण महाराष्ट्र साम्राज्यांत अंतर्भूत करण्याचा त्यांचा मनोदय होता. हें अवाढव्य कृत्य पुढाले वर्षीं म्हणजे १७६० त उरकावयाचा निश्चय करून त्यांनीं दत्ताजीला लाहोरचा बंदोबस्त करून काशी, प्रयाग व बंगाला ह्या प्रांतांवर पूर्वेकडे स्वारी करावयास सांगितलें; दत्ताजी प्रयागास पोहोचतो न पोहोंचतो तोंच रघुनाथरावानें १७५९ च्या सप्टेंबरांत दक्षिणेंतून बंगाल्यांत दत्ताजीला जाऊन मिळावें, तो प्रांत आसमुद्र जिंकून टाकावा व सुजाउदौल्यानें मदत केल्यास त्यापैकीं अर्धा प्रांत त्यास द्यावा, असें ठरविलें ( का० पत्रें. यादी ३६२, ३७३, ३८७, ३८८ ). हिंदुस्थानची व्यवस्था दत्ताजी, जनकोजी व रघुनाथराव यांजकडे सोंपवून, दक्षिणची व्यवस्था करण्याचें काम सदाशिवरावभाऊ, बाळाजी बाजीराव व विश्वासराव ह्या तिघांनीं आपल्याकडे घेतलें. दक्षणेंत ह्या वेळीं मराठ्यांना दोन प्रतिस्पर्धी होते:—एक सलाबतजंग व दुसरा श्रीरंगपट्टणचा कुंभार राजा व त्याचा सरदार हैदरअल्ली. ह्या दोघांची रग जिरविली म्हणजे आसमुद्र दक्षण मोकळी झाली. गोपाळराव पटवर्धनाला लिहितां लिहितां बाळाजी बाजीराव म्हणतो, "पन्नास हजार फौज जमा करून अगदीं मोगल दक्षिणेंत होता कीं नव्हतासा करूं " ( ऐतिहासिक लेखसंग्रह १५ ). तसेंच १७६० च्या फेब्रुवारींत गोविंद बल्लाळाला सदाशिव चिमणाजी लिहितो, " कर्नाटकची स्वारी न झाली; तिकडेहि अबदालीचा पेंच; पैका मिळायाचें झालें नाहीं; नाहीं तरी सारी दक्षण मोकळी होती " ( लेखांक १६६ ). १७६० त सेतुबंधापर्यंत दक्षण मोकळी करावयाची असा पेशव्यांचा बेत होता. हा बेत करण्यांत परदेश जिंकण्याच्या उच्छृंखल मनोवृत्तीचें प्राबल्य यत्किंचितहि नसून सर्व घटना, योग्य असा सारासार विचार करून पेशव्यांनीं जुळवून आणिली होती. श्रीरंगपट्टणचें हिंदूराज्य कलंडण्याच्या बेतांत आलें होतें; सलाबतजंग अर्धाअधिक पेशव्यांनीं गिळलाच होता व हिंदुस्थानांत क्षुद्र नजीबखानाखेरीज म्हणण्यासारखा शत्रू मराठ्यांना राहिला नव्हता. दक्षण मोकळी करण्याकरितां होणाऱ्या स्वारीचे सदाशिवरावानें दोन भाग केले. पहिल्या भागांत सलाबतजंगाचा चुराडा करण्याचें ठरविलें व दुसऱ्या भागांत तसेंच पुढें कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टण घेण्याचें योजिलें. सलाबतजंगावर स्वारी करण्यास पेशव्यांस एक कारण होतें. तें हें कीं, शिंदखेडची लढाई झाल्यावर निजामअल्लीनें पेशव्यांस दहा लाखांची जहागीर व नगर व परांडा असे दोन किल्ले देण्याचा करार केला असून तो करार अमलांत आणण्याचा निजामअल्ली अनमान करूं लागला ( लेखांक १५४ )., यास्तव १७५९ च्या दसऱ्यास डेरेदाखल होऊन फौजा जमा करणें सदाशिवरावभाऊला प्राप्त झालें. सर्व फौज जमा होईतोंपर्यंत म्हणजे १७५९ च्या नोव्हेंबरपर्यंत सदाशिवरावभाऊ पुण्याजवळ गारपिरावर डेरे देऊन होता ( टीप २३१ पहा ). विसाजी कृष्णानें कविजंगाशीं फितूर करून नगरचा किल्ला १० अक्टोबर १७५९ ( लेखांक १४७ ) ला घेतला अशी बातमी भाऊला तेथें कळली ( टीप २१७ पहा ). नोव्हेंबरांत भाऊला दगा करण्याचा विचार मुजफरखानानें केला; परंतु तो फसला ( लेखांक २३१ ). नंतर, भाऊ, दादा, नाना व विश्वासराव निजामावर निघाले ( टीप २१९ पहा ). नाना नगरास गेले व भाऊ, दादा व विश्वासराव

राक्षसभुवनाकडे गेले ( लेखांक १४९ ). करार केलेली जाहागीर देण्यास मोगल ह्या वेळीं राजी झाला; परंतु आतां तें बोलणें पेशवे कबूल करीतना ( लेखांक १४९ ); तेव्हां लढणें हाच मोंगलाला शेवटचा उपाय राहिला व उदगीरची मोहीम सुरू झाली. ९ जानेवारीलि भाऊसाहेब परळीजवळ गेले त्यावेळीं त्यांजवळ पंचवीस हजार सैन्य व दहा हजार गाडदी होते व निजामअल्लीपाशीं दहा हजार फौज व दहा हजार गाडदी होते. सलाबतजंगाची व त्याचा दिवाण निजामअल्ली यांची ह्या वेळेस फारच हलाखी होती. बसालतजंग फुटून कर्नाटकास गेला; मुसाबूसी १७५८ च्या जूनांत पांडिशेरीस गेला व इब्राईमखान पेशव्यांचा चाकर झाला ( लेखांक १५४ ). उदगिरीजवळ १७६० च्या १९ व २० जानेवारीलि मोगलांशीं दोन युद्धें झालीं, त्यांत मोंगल अगदीं नरम आला ( लेखांक १६० ), परंतु त्याचें पक्कें पारपत्य १७६० च्या फेब्रुवारींत उत्तमोत्तम झालें ( लेखांक १६५ ). ह्या लढाईचें सविस्तर वर्णन विस्तारभयास्तव मी येथें देत नाहीं. कारण, तें ह्या ग्रंथांतील लेखांक १५१ पासून १६७ पर्यंतच्या पत्रांत ज्यांनीं साक्षात् ती लढाई मारिली त्यांनीं स्वतःच केलें आहे. लढाईनंतर जो तह झाला त्यांत निजामाचा बहुतेक प्रांत पेशव्यांनी घेतला ( टीप २४१ पहा ). दक्षिण घेण्याचा येथपर्यंत पहिला भाग झाला. ह्यापुढें खरें पाहिलें तर सदाशिवरावभाऊनें दुसऱ्या भागाला म्हणजे श्रीरंगपट्टणावर स्वारी करण्याच्या उद्योगाला लागावयाचें; परंतु, तें काम त्याला तसेंच टाकून द्यावें लागलें. कां कीं, उदगीरची मोहीम सुरू होऊन पंधरा दिवस होतात न होतात तों दत्ताजी शिंद्याच्या पराजयाचीं वर्तमानें आलीं. हिंदुस्थान गडबडलें आहे, संस्थानिकांचा अबदालीकडे फितूर आहे, वगैरे बातम्या लागोपाठ येऊं लागल्या. तेव्हां उदगीरची मोहीम हातीं घेतल्यामारखी यथास्थितपणें शेवटास लावून श्रीरंगपट्टणाकडे न जातां हिंदुस्थानांत सरदारांच्या साहाय्याला जाणें पेशव्यांस भाग पडलें. १७५९ च्या मार्चांत दक्षिण सबंद मोकळी करण्याचा जो बूट पेशव्यांनीं योजिला होता तो तसाच अर्धा टाकून हिंदुस्थानांतील सरदारांची पडती बाजू सावरण्याची पेशव्यांस तयारी करावी लागली. ह्या कामाकरितां सदाशिवरावभाऊ व बाळाजी बाजीराव रंगपंचमीला म्हणजे ७ मार्च १७६० ला पडदूर येथें भेटले ( लेखांक १६८ ) व तेथें आठ रोजपर्यंत हिंदुस्थानांत कोणीं जावें याबाबत खलबत झालें. हिंदुस्थानांत दादांनीं जाऊं नये वगैरे पुष्कळ बाबींची शहानिशा १७५९ च्या दसऱ्यास पुण्यासच झाली वगैरे भ्रामक विधानें अनेकांनीं केलीं आहेत. त्यांचा विचार २५४ व्या टिपेंत व २४५ ब, ह्या टिपेंत सविस्तर केला आहे. त्या टीपांकडे वाचकांचें लक्ष्य पोहोंचवून, प्रस्तुत अर्थाकडे वळणें रास्त दिसतें. पडदूर येथील खलबतांत सदाशिवरावभाऊनें हिंदुस्थानांत जावें असा सिद्धांत झाला. असा सिद्धांत होण्याचें मुख्य कारण रघुनाथरावाचा नाकर्तेपणा हें होय. ह्या नाकर्तेपणाचें स्वरूप मागें दाखविलेंच आहे. सदाशिवरावभाऊनें ह्या नाकर्तेपणाची ओळख राघोबाला ह्या वेळीं दिली. ती त्याला मर्माग्रीं झणाणून त्यानें आपण होऊन हिंदुस्थानांत जाण्याचें नाकारलें ( ऐतिहासिकलेखसंग्रह नं. १४ ). बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिवरावभाऊच्या मनांत रघुनाथरावानें

जाण्याचें नाकारावें असेंच होतें. कारण, ह्या वेळीं प्रसंग फार विकट होता. माधोसिंग, विजेसिंग, पृथुसिंग, नजीबखान, मल्हारराव, गोविंदपंत व अबदाली असल्या गृहशत्रूंच्या व परशत्रूंच्या पुढें राघोबासारख्या भोळ्या सांबाचा टिकाव क्षणभरहि न लागता. असल्या चांडाळचौकडीचा खरपूस समाचार घेण्यास सदाशिवरावभाऊसारखाच पंचतंत्री मुत्सद्दी हवा होता. तेव्हां हिंदुस्थानांत त्याची रवानगी करून देण्यांत बाळाजी बाजीरावानें आपल्या विचारशक्तीचा केवळ गौरव केला असेंच कबूल करणें भाग पडतें.

बाळाजी बाजीरावानें सदाशिवरावभाऊची जी निवड केली ती यथायोग्य होती. कारण, सदाशिवरावभाऊ जसा उत्तम मुत्सद्दी म्हणून नांवाजला गेला होता तसा लढवय्या सरदार म्हणूनहि त्याचा चांगला लौकिक होता. १७४७ त सदाशिवरावभाऊनें बहादूरभेंड्याची स्वारी केली ( का० पत्रें, यादी ६८ ). १७५० त यमाची शिवदेवाचें बंड त्यानें स्वतः जाऊन मोडिलें. १७५१ च्या मार्चांत बाळाजीनें सलावताला तुंगभद्रेवर अडविलें त्या वेळीं भाऊ त्याच्याबरोबर होता. १७५१ च्या नोव्हेंबरांत सलावत बुसीला घेऊन कोरेगांवास आला तेव्हां भाऊ लढाईंत हजर होता. १७५२ च्या डिसेंबरांत भालकीची लढाई झाली तींत तो होता. १७५३ च्या जानेवारींत श्रीरंगपट्टणची स्वारी झाली तींतहि भाऊ व रामचंद्रबाबा शेणवई हे दोघे होते. १७५४ च्या होळीहोन्नूरच्या स्वारींत भाऊ तीन दिवस मोर्च्यांत होता. १७५५ च्या सावनूरच्या स्वारींत भाऊ हजर होता. १७५७ च्या श्रीरंगपट्टणच्या स्वारींत भाऊ मोर्च्यांत होता. १७५८ च्या जानोजी भोसल्यावरील टेहळणींत भाऊ होता. १७६० त उदगीरची लढाई भाऊ व विश्वासराव ह्या दोघांनीं चालविली. सारांश, भाऊला लढाईचा सराव सारखा तेरा वर्षें होता. रघुनाथरावाचा पहिली मोहीम १७५० त झाली म्हणजे १७६० पर्यंत रघुनाथरावाला लढाईचा सराव सरासरी दहा वर्षें होता. रघुनाथरावाची तडफ व भरारी ह्या गुणांबद्दल जशी ख्याति होती तशी भाऊची युक्ति व दूरदर्शीपणा ह्यांबद्दल प्रसिद्धी होती. रघुनाथराव फार मेहनत करून थोडें फल मिळवी; सदाशिवरावभाऊ थोड्या युक्तीनें फार लाभ करून घेई. रघुनाथरावानें लाहोरापर्यंत भटकून शत्रु व बरेंच कर्ज पैदा केलें. सदाशिवराभाऊनें जवळच्या जवळ सलाबतजंगावर स्वाऱ्या करून दीडदोनकोटींचा मुलूख मिळविला व शहानवाजखान, सय्यदलष्करखान व मुसाबुसी अशांचा स्नेह जोडिला. दत्ताजी शिंदे, नाना पुरंदरे, महीपतराव चिटणीस असले सज्जन सदाशिवरावाच्या प्रीतींतले व मल्हारराव होळकर, सखारामपंत बोकील व सखाराम हरी असले दुर्जन रघुनाथरावाच्या मर्जींतले. तात्पर्य, सदाशिवरावभाऊ व रघुनाथरावदादा ह्या दोघांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. हें बाळाजी बाजीराव १७४२ पासून जाणून होता ( टीप ११३ पहा ). महादोबा पुरंधऱ्यानेंहि भाऊसाहेबाविषयीं असेंच मत दिलें आहे ( र० या० पाणिपतची बखर, पृष्ठ ८ ).

१७६०च्या १५ मार्चाला सदाशिवरावभाऊनें पडदुराहून हिंदुस्थानास जाण्यास कुच केलें ( टीप २५६ पहा). देशीं व कर्नाटकांत सलाबतजंग व हैदर ह्यांच्यावर दबाव राखण्याकरितां रघुनाथरावदादा, गोपाळराव पटवर्धन, विसाजी कृष्ण बिनीवाले वगैरे सरदार ठेवून

नाना पुरंधरे, बळवंतराव मेहेंदळे, महीपतराव चिटणीस या मंडळींसह भाऊ व विश्वासराव पन्नास हजार फौज घेऊन ४ एप्रिलास बऱ्हाणपुरास येऊन पोहोंचले; १० एप्रिलाच्या सुमारास हांडियास आले व तेथून दरमजल मधील वाटेनें म्हणजे शिहूर, भोपाळ, सीरोंज, अरूण, मालन, पहारी, कलेधार, नरवर, ग्वालेर, ढवळपूर या मार्गानें आग्र्याकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. समशेर बहादूर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, मानाजी धायगुडे, दिल्लीच्या कामांतून काढून दत्ताजीनें दक्षिणेंत पाठविलेला अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर वगैरे बारा तेरा हजार फौज, देशची वीस हजार फौज व गाडदी आठ हजार ह्याप्रमाणें पडदुराहून निघतेवेळीं फौज भाऊसाहेबाबरोबर होती. दमाजी गायकवाड, इब्राईमखान गार्दी स्वतः, संताजी वाघ वगैरे मंडळी पुढें गेली होती ती रस्त्यानें येऊन मिळाली. आपण दरमजल हिंदुस्थानांत येऊन पोहोंचतो असें गोविंदपंत बुंदेल्याला पडदुराहून १५मार्चाला लिहून सदाशिवरावभाऊनें त्याला दोन चार गोष्टी अवश्य करण्याचें सुचविलें ( लेखांक १६७ ). सुजाउद्दौल्याला आपल्या बाजूला वळवून घ्यावें, ही पहिली सूचना होती. १७५९ च्या डिसेंबरांत अबदाली शुक्रतालीं रोहिल्यास मिळाल्यावर सुजाउद्दौला रोहिल्यांना सोडून अयोध्येस गेला. कारण, सुजाउद्दौल्याचें व अबदालीचें पिढीजात वांकडें होतें. सुजाउद्दौल्याचा बाप जो सफदरजंग वजीर त्यानें १७५० त मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे ह्यांना अबदालीला तंबी देण्याकरितां बोलाविलें होते. ह्याच सफदरजंगानें १७४८ त अबदालीचा सरहिंदास पराजय केला होता. १७५१ त अहमदखान बंगषाचा कादरगंजास पराभव करून फत्तेच्या मसनदीवर ज्याला शिंदे, होळकरांनीं बसाविलें तो सफदरजंग म्हणजे सुजाउद्दौल्याचा बापच होय ( का. पत्रें, यादी १६२ व लेखांक १७३ ). त्यावेळीं सफदरजंगानें मराठ्यांचे हे उपकार स्मरून त्यांना काशी व प्रयाग हीं दोन क्षेत्रें देण्याचें वचन दिलें होतें परंतु, १७५४ च्या जुलैंत बाबूराव महादेवाला श्रीक्षेत्र ताब्यांत घेण्याकरितां पेशव्यांनीं पाठविलें असतां त्याला सफदरजंग अडथळा करूं लागला ( लेखांक २९ ). तेव्हां त्याच्यावर नागोरचें काम झाल्यावर स्वारी करण्याचा जयाप्पाचा विचार होता ( लेखांक ३७ ). पुढें सफदरजंग १७ अक्टोबर १७५४ स वारला ( लेखांक ४१ ) व त्याचा मुलगा सुजाउद्दौला नवाब झाला. १७५५ च्या पुढें सुजाउद्दौल्यावर स्वारी करावयाची तों मध्येंच जयाप्पा नागोरास आटोपला. १७५७ त रघुनाथरावाची हिंदुस्थानांत स्वारी झाली. त्यावेळां काशींत अंमल बसविण्याचा विचार होता; परंतु, १७५८ च्या मेपर्यंत रघुनाथराव लाहोरास गुंतल्यामुळें त्याच्या हातून तें काम झालें नाहीं. बारा लाख रुपये घेऊन सुजाउद्दौल्याला रघुनाथरावानें व विठ्ठल शिवदेवानें सोडून दिलें. १७५९ त दत्ताजीला काशी, प्रयाग व बंगाला हे प्रांत जिंकण्याची कामगिरी नानासाहेबानें सांगितली. त्याप्रमाणें दत्ताजी १७५९ च्या मेंत अंतर्वेदींत शिरला व नजबिखानाला तंबी देऊन सुजाउद्दौल्यावर जाणार तों सुजाउद्दौल्यानें नजीबखानाशीं स्नेह करून मराठ्यांवर चाल केली. इतक्यांत इकडे अबदालीचा शह आला. त्यामुळें नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांना तसेच ठेवून ( लेखांक १५७ ) दत्ताजीनें अबदालीकडे तोंड वळविलें. आपल्यावरचें संकट गेलें असें पाहून सुजाउद्दौला

अयोध्येस आला. त्याच्याकडे अबदालीनें किंवा मराठ्यांनीं तीन महिने म्हणजे १७५९ च्या डिसेंबरापासून १७६० च्या मार्चपर्यंत ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं. परंतु, हिंदुस्थानांत येण्याचें जेव्हां सदाशिवरावभाऊचें ठरलें तेव्हां त्यानें गोविंदपंताला सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्यास सांगितलें. आपला आमचा स्नेह वडिलोपार्जित आहे; सरदारांनीं व चिरंजीवांनीं आपले ठायीं ममतेंत अंतर केलें नाहीं; अबदालीची जड हिंदुस्थानचे पातशाहींत रुतों देणें अयोग्य आहे, वगैरे कानगोष्टी सांगोन सुजाउद्दौल्याला आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न करावा; पातशहाजादा, अल्लीगोहर व पट्टण्याचा सुभेदार जाफर अल्लीखान, ह्यांना अनुकूल करून घ्यावें; हिंदुपत वगैरे बुंदेले व यमुनापारचे रजपूत संस्थानिक ह्यांना चाकरीस सिद्ध करावें; अबदालीकडील बारीक बातमी काढून पाठवावी व वीस पंचवीस लाख रुपये तावडतोब हिंदुस्थानांत स्वारी आली म्हणजे पाठवून द्यावे;इतक्या कामगिऱ्या हिंदुस्थानच्या रस्त्यावर असतांना सदाशिवरावभाऊनें गोविंदपंताला सांगितल्या. मुद्दाम गोविंदपंतालाच ह्या कामगिऱ्या सांगण्याचें कारण असें कीं, शिंदेहोळकर ह्या वेळीं अबदालीशीं झगडण्यांत गुंतले होते व तें काम करून ते अगदीं थकून गेले होते. शिंदेहोळकरांच्या खालोखाल म्हणण्यासारखा वजनदार माणूस हिंदुस्थानांत गोविंदपंतच होता. यद्यपि गोविंदपंताला सरंजामी सरदारी प्राप्त झाली नव्हती व तो कोणत्याहि प्रांताचा सुभेदार नव्हता, तत्रापि मातबर मामलतदार म्हणून त्याची अलीकडे दहा पांच वर्षें बरीच प्रासिद्धि झाली होती. त्याला सरकारांत रसद चौदा लाखांची भरावी लागत असून, त्याची वार्षिक मिळकत सामान्य नव्हती ( लेखांक १३२ ). तो दहा हजार फौज बाळगीत असून तत्प्रीत्यर्थ पंचवीस लाख रुपये सरकारांतून खात असे ( लेखांक २४३ ). इतकेंहि करून त्याची गणना मामलतदारांतच होत असे ( लेखांक २४२ ). सरदारांत आपली गणना व्हावी एतत्प्रीत्यर्थ त्याचे सर्व प्रयत्न चालले होते. मख्त्याच्या कमाविशी करून त्यानें सरकारचा फायदा करून दाखविला होता. फौज जवळ ठेवून एखाद्या सरदाराप्रमाणें त्यानें अंतर्वेदींत अंमल बसविला होता ( लेखांक २४४ ). अंतर्वेदींतील रोहिले सरदार व सुजाउद्दौला ह्यांच्याशीं तो चांगला स्नेह ठेवून असे. काशीकडे कोणी सरदार अगर विद्वान् ब्राह्मण जावयाचा असला म्हणजे त्याला गोविंदपंताच्या साहाय्याची जरूर पडे व गोविंदपंत तें मोठ्या उत्सुक्तेनें देई. सारांश, कऱ्हाडे लोकांचे ठायीं सर्वत्र साखर पेरून आपलें हित करून घेण्याचा जो एक मोहक गुण आहे तो गोविंदपंताचे अंगीं अमूप होता. गोविंदपंताचें हें बाह्य स्वरूप झालें. गोविंदपंताचें अंतःस्वरूप फारच निराळें होतें. मख्त्याच्या कमाविशी करून त्यानें सरकारचा नफा करून दाखविला होता खरा; परंतु, मख्त्याची कमाविस जाऊन गोविंदपंताला जेव्हां बुंदेलखंड व अंतर्वेद ह्या प्रांतांची बिनमख्त्यांची म्हणजे प्रांताचें जें कसोशीनें रास्त उत्पन्न येईल त्याचा भरणा सरकारांत करावयाचा व नोकरी केल्याबद्दल अमूक एक वेतन घ्यावयाचें अशा तऱ्हेची कमाविस करण्याची पाळी आली, तेव्हां गोविंदपंताला मख्त्याच्या वेळेस खरोखर उत्पन्न केवढें मोठें येत असे व तो सरकारांत मख्ता किती कमी देत असे हें पेशव्यांना कळून आलें ( लेखांक २४२ ).

त्यावेळीं १७५७ त गोविंदपंताबरोबर गोविंदपंताच्या प्रांतांतील उत्पन्नाची चवकशी करण्याकरितां व त्याचे मागील हिशेब तपासण्याकरितां पेशव्यांनीं येरंडे व कानिटकर हे दरखदार पाठवून दिले. चवकशी करण्याच्या कामीं गोविंदपंत व त्याचे मुत्सद्दी ह्यांनीं दरखदारांना आणवतील तिकडे अडथळे आणिले. जमीदारांची व त्यांची भेट होऊं दिली नाहीं; कुळें व मामलतदार ह्यांच्यामध्यें कसर काय निघते तें त्यांना दाखविलें नाहीं व जमाबंदीचे खर्डे व हिशेब त्यांच्या दृष्टीस पडूं दिले नाहींत. यद्यपि गोविंदपंतानें दरखदारांना धाब्यावर बसाविण्याची इतकी मेहनत केली तत्रापि पुण्याच्या फडांत सदाशिवरावभाऊ व रामचंद्रबाबा शेणवई ह्यांच्या हाताखालीं कामें केलेल्या ह्या कारकुनांना गोविंदपंताचीं सर्व बिंगे कळून आलीं. प्रांतांची जमा कमी करून कशी दाखवितात; वाईट महाल सरकारांत कसे ठेवितात; अंतस्थ नजराणे कसे घेतात व फौजेचा खर्च वाढवून कसा दाखवितात वगैरे बिंगें त्यांनीं सरकारांत कळविलीं. हीं बिंगें पुण्यांत १७५७ तच सदाशिवरावभाऊला कळून चुकलीं होतीं. १७५७ त गोविंदपंताची बुंदेलखंडांत रवानगी करतांना त्याला सदाशिवरावभाऊनें उत्पन्नाचे नवीन अजमास व बेहेडे करून दिले ( लेखांक २३७ शेवट ). त्यांत गोविंदपंताच्या प्रांतांतून जास्ती जमा किती व्हावी ह्याचा ठोकळ अजमास होता. गोविंदपंताच्या प्रांतांत जाऊन ह्या अजमासाप्रमाणें जमेचा व खर्चाचा बारीक तपशील लावण्याकरितां सदाशिवरावभाऊनें येरंडे व कानिटकर यांना पाठविलें. त्यांची व्यवस्था गोविंदपंतानें कशी केली तें वर सांगितलेंच आहे. दरखदार येऊन कमाविशीनें मामलतीची सुरुवात झाल्यापासून गोविंदपंतानें निराळेंच वर्तन आरंभिलें. १७५७ त पुण्याहून निघतांना प्रांतांची व्यवस्था उत्तम ठेवितों म्हणून पेशव्यांना त्यानें ज्या लांब लांब गोष्टी सांगितल्या होत्या त्या सर्व एकीकडे ठेवून तो प्रांतांचें कमी उत्पन्न करून दाखविण्याच्या खटपटीस लागला ( लेखांक २३९ ). रयतेला दिलदिलासा देण्याचें काम त्यानें सोडून दिलें; कुळांनीं लावणीसंचणी करावी ह्याकरितां मरल्याच्या वेळीं तो त्यांना तगाई देत असे ती त्यानें बंद केली व येरंडे व कानिटकर ह्यांना न भेटतां तो अंतर्वेदींत निघून गेला. हातानें सरकारचें असें नुकसान करून तोंडानें मात्र सरकारचा नफा होईल तितका करून देईन असें येरंड्यांना लिहिण्यास त्यानें कमी केलें नाहीं. " ज्याप्रमाणें श्रीमंत स्वामींची मर्जी त्याप्रमाणें मजला करणें आणि तुमची खुषी तेंच मजला करणें, " असा त्यानें येरंड्यांना व पेशव्यांना लिहिण्याचा पाठ ठेविला ( लेखांक १४२ ). परंतु ह्या त्याच्या गोड भाषणांना पेशवे भुलले नाहींत. योग्य वेळ आली म्हणजे गोविंदपंताची मामलत काढून टाकावयाची असा त्यांनीं अंतस्थ बेत केला. ह्या अंतस्थ बेताची कुणकुण गोविंदपंताच्या कानावर गेली होती ( लेखांक २४२ ). परंतु प्रसिद्धपणें त्याचा पुकार त्यांनीं कधींच केला नव्हता. येणेंप्रमाणें दोघांचींहि मनें परस्परांविषयीं संशयग्रस्त झालीं होतीं. प्रसिद्धपणें एकमेकांचें नुकसान करण्याची दोघांचींहि इच्छा नव्हती; परंतु, अंतस्थ रीतीनें एकमेकांचें नुकसान करण्याचे प्रयत्न दोघांचेहि चालू होते. गोविंदपंत उत्पन्नाच्या बाबतींत नुकसान करून दाखवील हें पेशवे जाणून होते. ह्याच्याहि पलीकडे जाऊन राजकारणांत तो कांहीं घोटाळा

करील हें मात्र कांहीं काळपर्यंत त्यांच्या स्वप्नींहि नव्हतें. परंतु पेशव्यांचें हें अज्ञान फारच हानिकारक होतें. कारण, सरकारचें उत्पन्न गोविंदपंतानें कमी तर केलेंच; परंतु एवढेंच करून तो थांबला नाहीं. तर पेशव्यांच्या मर्जीतला जो दत्ताजी शिंदे त्याचेंहि १७५९ व १७६० तील रोहिल्यांच्या व अबदालीच्या लढाईंत नुकसान केलें; अशा भीतीनें कीं; पेशव्याप्रमाणें दत्ताजीहि आपली कमावीस आपल्याकडून काढून टाकील. गोविंदपंतानें केलेल्या दत्ताजींच्या नुकसानाचा व हानीचा पत्ता पेशव्यांना बिलकूल नव्हता. कारण, रोहिल्यांशीं व अबदालीशीं दत्ताजीचें युद्ध चाललें असतांना, लढाईची दत्ताजीसंबंधीं वगैरे बातमी पेशव्यांना गोविंदपंतच देत असे. तींत रोहिल्यांना आपण दिलेली फूस, ऐन अबदालीशीं लढाई होण्याच्या प्रसंगीं आपण मागितलेला निरोप, प्रत्यक्ष लढाईपासून दूरदूर राहण्याची आपली इच्छा, वगैरे स्वकृत दुष्कर्मांचें वर्णन गोविंदपंतानें केलें नाहीं, हें उघडच आहे. ह्या वेळीं पेशव्यांना पाठविलेल्या पत्रांत, अबदालीचें वर्चस्व, मराठी सैन्याची दुर्दशा, शिंद्यांची हानि वगैरे प्रसंगांची माहिती देऊन मदतीला तावडतोब सैन्य पाठवून द्यावें, अशी गोविंदपंतानें सविनय प्रार्थना केली. त्यावरून गोविंदपंताला शिंद्यांविषयीं फार कळकळ वाटते अशी पेशव्यांची समजूत झाली. दत्ताजीला गोविंदपंताचा राग आला होता. गोविंदपंतानें सुजाउद्दौल्याकडून व नजीबखानाकडून लांच खाल्ला होता, दत्ताजीला यश आलें काय किंवा अबदालीला आलें काय, गोविंदपंताला त्याची फिकीर नव्हती ( लेखांक १४७ ), वगैरे प्रकरणें पेशव्यांना माहीत नव्हतीं. वृद्ध गोविंदपंत, दत्ताजीला व जनकोजीला साहाय्य करून आपण हिंदुस्थानांत येईतोंपर्यंत आपली बाजू संभाळीत आहे अशी पेशव्यांची समजूत होती. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून बाळाजी बाजीरावानें व रघुनाथरावानें उदगीरच्या मोहिमेंतून गोविंदपंताला स्नेहाचीं व आश्वासनाचीं पत्रें पाठविलीं. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून सदाशिरावभाऊनेंहि पडदूर वगैरे ठिकाणांहून वर लिहिलेल्या कामगिऱ्या करण्यास गोविंदपंताला लिहिलें. त्या त्यानें कशा बजाविल्या तें पुढें दिसून येईल.

१७६० च्या २८ एप्रिलास सदाशिवराव सीहोरास आला ( लेखांक १७४ ). तेथून त्यानें माधोसिंग, बिजेसिंग, कोटेवाले राणाजी वगैरे रजपूत संस्थानिकांना येऊन मिळण्याविषयीं पत्रें व वकील पाठविले. हे सर्व संस्थानिक दोन्ही डगरीवर हात ठेवून होते. जिकडे जोर दिसेल तिकडे त्यांचा जाण्याचा विचार होता. सदाशिवराव जवळ आल्याकारणानें मराठ्यांना येऊन मिळण्याचा त्यांनीं रुकार दिला. परंतु, आंतून अबदालीकडे त्यांचा ओढा होता. सीहोरच्या आसपासच्या कांहीं दंगेखोर मवासांचें पारपत्य करून मराठे खेचीवाड्यांत अरूण येथें १४ मेला आले. तेथील अहिरांचें बंड मोडून भाऊनें नरवराच्या दिशेनें कुच केलें. ह्यावेळीं अबदाली अंतर्वेदींत अनुपशहरीं होता. त्यानें जहानखान व नजीबखान ह्यांना मराठ्यांच्या ताब्यांतील अंतर्वेदींतील इटावें शहराकडे दवाव टाकण्याकरितां व सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्याकारितां पाठविलें. अंतर्वेदींत ह्यावेळीं गोविंदपंताचा पाराशर दादाजी नामेंकरून कोणी पथक्या होता. त्याच्या सैन्याचें व यवनांच्या सैन्याचें युद्ध झालें, त्याची सर्व फौज उठोन गेली ( लेखांक १८१ ) व सकुराबादचें ठाणें यव-

नांच्या हातीं पडलें ( लेखांक २०९ ). ह्याच सुमाराला बक्षी व सुमेरसाचा पुत्र रतनसा ह्यांनीं बुंदेलखंडांत बंड केलें ( लेखांक १८४ ). काशींतहि कोंकणस्थ व कऱ्हाडे यांचें भांडण लागलें ( लेखांक १८५ ). गोविंदपंताच्या ताब्यांतलि जे बुंदेलखंड, अंतर्वेद व कडाकुरा प्रांत त्यांच्यांत कांहीं ठिकाणीं हीं अशीं बंडें अधून मधून होत होतीं. हीं बंडें मोडून जेणेंकरून सरकाराकिफायत होईल तें काम करणें म्हणून शिंदे, होळकर व सदाशिवरावभाऊ ह्यांनीं गोविंदपंताला हुकूम केला. सुजाउद्दौला, मलकाजमानी, अलीगोहर व मीरजाफरखान ह्यांच्यांशीं राजकारण करून ह्यांना मराठ्यांच्या बाजूला आणण्याचा प्रयत्न करा म्हणून गोविंदपंताला मागें सदाशिवरावभाऊनें सांगितलेंच होतें. तेव्हां आंत व्यवस्था ठेवून बाहेर राजकारणें करण्याचें दुहेरी काम गोविंदपंतावर येऊन पडलें. तीं दोन्हीं कामें त्यानें अर्धीमुर्धीं केलीं. रतनसाला मायेंत घेऊन अंतर्वेदींतील अंमल गोविंदपंतानें आठ पंधरा दिवस कसा तरी राखला ( लेखांक १८७ ). अलीगोहराला पातशहा करावयाचा व त्याची वजिरी सुजाउद्दौल्याला द्यावयाची असें वचन दिल्यास सुजा मराठ्यांना मिळण्यास तयार आहे म्हणून गोविंदपंतानें सदाशिवरावभाऊस लिहिलें. तेव्हां शामजी रंगनाथ यास भाऊनें सुजाकडे वकिलीस पाठवून दिलें ( लेखांक १८९ ) व आपण मालन, पाहारीवरून ग्वालेरीकडे कुच केलें. सदाशिवराव ग्वालेरीस ३० मेला आला ( लेखांक १९४ ). तो सरदारांच्या म्हणजे शिंदेहोळकरांच्या सांगण्यावरूनच आला ( लेखांक १८०, १८७ व टीप २७० ). सरदारांनींहि लक्ष्मीनारायणाच्या हस्तें सुजाउद्दौल्याकडे बोलणें लाविलेंच होतें. ह्याच सुमाराला नजीबखान व जहानखान यांणीं इटाव्यास वेढा घातला ( लेखांक १९४ ) व अंतर्वेदींतील ठाणेदार दूरच्या अवाईनेंच आपलीं ठाणीं सोडून पळून जाऊं लागले. तेव्हां गोविंदपंतानें सदाशिवरावाला इटाव्याकडे काहीं सैन्य पाठवून देण्यास विनंति केली. सदाशिवरावानें गोविंदपंताला असें लिहून कळविलें कीं केवळ दूरची अवाई ऐकून तुमचे ठाणेदार ठाणीं टाकून पळतात ही शरमेची गोष्ट आहे; अशा पळपुट्या ठाणेदारांचें उत्तम प्रकारें पारपत्य करून ते अब्रूनें दम धरून झुंजतलि अशी व्यवस्था तुम्हीं अवश्य करावी; म्हणजे दुसऱ्या ठाणेदारांस वचक बसून ते झुंझून मरतील परंतु पळणार नाहींत ( लेखांक १९५ ). अशी ताकीद करून २ जूनला भाऊ ग्वालेरहून निघाला तो ४ जूनला ढवळपुरच्या खालीं पांच चार कोंस चमेल नदीवर आला ( लेखांक १९६ ); ८ जूनला चमेलीच्या उत्तर तीराला गेला व ११ जूनला वोडशियास जाऊन पोहोंचला ( लेखांक २०२ ). आग्र्याला तावडतोब जाऊन लागण्याचा भाऊचा विचार होता; परंतु, गंभीरनदीस पाणी फार आल्यामुळें दहा पंधरा दिवस त्याला मध्येंच कुचंबावें लागलें. जूनच्या शेवटीं त्यानें गंभीर नदी ओलांडिली व ६ जुलैला त्याची व शिंदेहोळकराची भेट झाली. ह्या भेटींत पुढें काय करावयाचें ह्याचा भाऊनें व सरदारानीं विचार केला. त्याचें वर्णन देण्याच्यापूर्वी सुजाउद्दौला, अलीगोहर, मीरजाफरअली, नजीबखान, महंमदखान बंगष, हाफीज रहिमतखान, वगैरे मंडळी काय करीत होती तें सांगितलें पाहिजे.

करील हें मात्र कांहीं काळपर्यंत त्यांच्या स्वप्नींहि नव्हतें. परंतु पेशव्यांचें हें अज्ञान फारच हानिकारक होतें. कारण, सरकारचें उत्पन्न गोविंदपंतानें कमी तर केलेंच; परंतु एवढेंच करून तो थांबला नाहीं. तर पेशव्यांच्या मर्जीतला जो दत्ताजी शिंदे त्याचेंहि १७५९ व १७६० तील रोहिल्यांच्या व अबदालीच्या लढाईत नुकसान केलें; अशा भीतीनें कीं; पेशव्याप्रमाणें दत्ताजीहि आपली कमावीस आपल्याकडून काढून टाकील. गोविंदपंतानें केलेल्या दत्ताजीच्या नुकसानाचा व हानीचा पत्ता पेशव्यांना बिलकूल नव्हता. कारण, रोहिल्यांशीं व अबदालीशीं दत्ताजीचें युद्ध चाललें असतांना, लढाईची दत्ताजीसंबंधीं वगैरे बातमी पेशव्यांना गोविंदपंतच देत असे. तींत रोहिल्यांना आपण दिलेली फूस, ऐन अबदालीशीं लढाई होण्याच्या प्रसंगीं आपण मागितलेला निरोप, प्रत्यक्ष लढाईपासून दूरदूर राहण्याची आपली इच्छा, वगैरे स्वकृत दुष्कर्मांचें वर्णन गोविंदपंतानें केलें नाहीं, हें उघडच आहे. ह्या वेळीं पेशव्यांना पाठविलेल्या पत्रांत, अबदालीचें वर्चस्व, मराठी सैन्याची दुर्दशा, शिंद्यांची हानि वगैरे प्रसंगांची माहिती देऊन मदतीला ताबडतोब सैन्य पाठवून द्यावें, अशी गोविंदपंतानें सविनय प्रार्थना केली. त्यावरून गोविंदपंताला शिंद्यांविषयीं फार कळकळ वाटते अशी पेशव्यांची समजूत झाली. दत्ताजीला गोविंदपंताचा राग आला होता. गोविंदपंतानें सुजाउद्दौल्याकडून व नजीबखानाकडून लांच खाल्ला होता, दत्ताजीला यश आलें काय किंवा अबदालीला आलें काय, गोविंदपंताला त्याची फिकीर नव्हती ( लेखांक १४७ ), वगैरे प्रकरणें पेशव्यांना माहित नव्हतीं. वृद्ध गोविंदपंत, दत्ताजीला व जनकोजीला साहाय्य करून आपण हिंदुस्थानांत येईतोंपर्यंत आपली बाजू संभाळीत आहे अशी पेशव्यांची समजूत होती. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून बाळाजी बाजीरावानें व रघुनाथरावानें उदगीरच्या मोहिमेंतून गोविंदपंताला स्नेहाचीं व आश्वासनाचीं पत्रें पाठविलीं. ह्याच समजुतीवर भिस्त ठेवून सदाशिरावभाऊनेंहि पडदूर वगैरे ठिकाणांहून वर लिहिलेल्या कामगिऱ्या करण्यास गोविंदपंताला लिहिलें. त्या त्यानें कशा बजाविल्या तें पुढें दिसून येईल.

१७६० च्या २८ एप्रिलास सदाशिवराव सीहोरास आला ( लेखांक १७४ ). तेथून त्यानें माधोसिंग, विजेसिंग, कोटेवाले राणाजी वगैरे रजपूत संस्थानिकांना येऊन मिळण्याविषयीं पत्रें व वकील पाठविले. हे सर्व संस्थानिक दोन्ही डगरीवर हात ठेवून होते. जिकडे जोर दिसेल तिकडे त्यांचा जाण्याचा विचार होता. सदाशिवराव जवळ आल्याकारणानें मराठ्यांना येऊन मिळण्याचा त्यांनीं रुकार दिला. परंतु, आंतून अबदालीकडे त्यांचा ओढा होता. सीहोरच्या आसपासच्या कांहीं दंगेखोर मवासांचें पारपत्य करून मराठे खेचीवाड्यांत अरुण येथें १४ मेला आले. तेथील अहिरांचें बंड मोडून भाऊनें नरवराच्या दिशेनें कुच केलें. ह्यावेळीं अबदाली अंतर्वेदींत अनुपशहरीं होता. त्यानें जहानखान व नजीबखान ह्यांना मराठ्यांच्या ताब्यांतील अंतर्वेदींतील इटावें शहराकडे दबाव टाकण्याकरितां व सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्याकरितां पाठविलें. अंतर्वेदींत ह्यावेळीं गोविंदपंताचा पाराशर दादाजी नामेंकरून कोणी पथक्या होता. त्याच्या सैन्याचें व यवनांच्या सैन्याचें युद्ध झालें, त्याची सर्व फौज उठोन गेली ( लेखांक १८१ ) व सकुराबादचें ठाणें यव-

नांच्या हातीं पडलें ( लेखांक २०९ ). ह्याच सुमाराला बक्षी व सुमेरसाचा पुत्र रतनसा ह्यांनीं बुंदेलखंडांत बंड केलें ( लेखांक १८४ ). काशींतहि कोंकणस्थ व कऱ्हाडे यांचें भांडण लागलें ( लेखांक १८५ ). गोविंदपंताच्या ताब्यांतलि जे बुंदेलखंड, अंतर्वेद व कडाकुरा प्रांत त्यांच्यांत कांहीं ठिकाणीं हीं अशीं बंडें अधून मधून होत होती. हीं बंडें मोडून जेणेंकरून सरकाराकिफायत होईल तें काम करणें म्हणून शिंदे, होळकर व सदाशिव-रावभाऊ ह्यांनीं गोविंदपंताला हुकूम केला. सुजाउद्दौला, मल्काजमानी, अलीगोहर व मीरजाफरखान ह्यांच्यांशीं राजकारण करून ह्यांना मराठयांच्या बाजूला आणण्याचा प्रयत्न करा म्हणून गोविंदपंताला मागें सदाशिवरावभाऊनें सांगितलेंच होतें. तेव्हां आंत व्यवस्था ठेवून बाहेर राजकारणें करण्याचें दुहेरी काम गोविंदपंतावर येऊन पडलें. तीं दोन्हीं कामें त्यानें अर्धीमुर्धी केलीं. रतनसाला मायेंत घेऊन अंतर्वेदींतील अंमल गोविंदपंतानें आठ पंधरा दिवस कसा तरी राखला ( लेखांक १८७ ). अलीगोहराला पातशहा करावयाचा व त्याची वजिरी सुजाउद्दौल्याला द्यावयाची असें वचन दिल्यास सुजा मराठयांना मिळण्यास तयार आहे म्हणून गोविंदपंतानें सदाशिवरावभाऊस लिहिलें. तेव्हां शामजी रंगनाथ यास भाऊनें सुजाकडे वकिलीस पाठवून दिलें ( लेखांक १८९ ) व आपण मालन, पाहारीवरून ग्वालेरकिडे कुच केलें. सदाशिवराव ग्वालेरीस ३० मेला आला ( लेखांक १९४ ). तो सरदारांच्या म्हणजे शिंदेहोळकरांच्या सांगण्यावरूनच आला ( लेखांक १८०, १८७ व टीप २७० ). सरदारांनींहि लक्ष्मीनारायणाच्या हस्तें सुजाउद्दौल्याकडे बोलणें लाविलेंच होतें. ह्याच सुमाराला नजीबखान व जहानखान यांणीं इटाव्यास वेढा घातला ( लेखांक १९४ ) व अंतर्वेदींतील ठाणेदार दूरच्या अवाईनेंच आपलीं ठाणीं सोडून पळून जाऊं लागले. तेव्हां गोविंदपंतानें सदाशिवरावाला इटाव्याकडे कांहीं सैन्य पाठवून देण्यास विनंति केली. सदाशिवरावानें गोविंदपंताला असें लिहून कळविलें कीं केवळ दूरची अवाई ऐकून तुमचे ठाणेदार ठाणीं टाकून पळतात ही शरमेची गोष्ट आहे; अशा पळपुट्या ठाणेदारांचें उत्तम प्रकारें पारपत्य करून ते अब्रूनें दम धरून झुंजतलि अशी व्यवस्था तुम्हीं अवश्य करावी; म्हणजे दुसऱ्या ठाणेदारांस वचक बसून ते झुंजून मरतील परंतु पळणार नाहींत ( लेखांक १९५ ). अशी ताकीद करून २ जूनला भाऊ ग्वालेरहून निघाला तो ४ जूनला ढवळपुरच्या खालीं पांच चार कोस चमेल नदीवर आला ( लेखांक १९६ ); ८ जूनला चमेलीच्या उत्तर तीराला गेला व ११ जूनला वोडशियास जाऊन पोहोंचला ( लेखांक २०२ ). आग्र्याला तावडतोब जाऊन लागण्याचा भाऊचा विचार होता; परंतु, गंभीरनदीस पाणी फार आल्यामुळें दहा पंधरा दिवस त्याला मध्येंच कुचं-बावें लागलें. जूनच्या शेवटीं त्यानें गंभीर नदी ओलांडिली व ६ जुलैला त्याची व शिंदे-होळकराची भेट झाली. त्या भेटींत पुढें काय करावयाचें ह्याचा भाऊंनीं व सरदारानीं विचार केला. त्याचें वर्णन देण्याच्यापूर्वी सुजाउद्दौला, अलीगोहर, मीरजाफरअली, नजीबखान, महंमदखान बंगष, हाफीज रहिमतखान, वगैरे मंडळी काय करीत होती तें सांगितलें पाहिजे.

पड्दुराहून निघतेवेळींच सुजाउद्दौल्याशीं स्नेह करण्यास भाऊनें गोविंदपंतास लिहिलें होतें. अबदालीचें व सुजाचें पिढीजाद वाकडें होतें. नजीबखानाचें व सुजाचेंहि फारसें चांगलें कधींच नव्हतें. १७५९ च्या नोव्हेंबरांत तो नजीबखानाला मिळाला. ह्याचें कारण असें होतें कीं मराठे आपल्यावर स्वारी करणार ही त्याला भीती होती. नाहीं तर नजीब-खानाला तो मुळींच मिळाला नसता. दत्ताजी अंतर्वेदींतून यमुनेच्या बाजूला परतल्याबरोबर सुजा नजीबखानाला सोडून आपल्या प्रांतांत निघून आला. आपला प्रांत सुरक्षित राहील किंवा नाहीं एवढीच काय ती सुजाउद्दौल्याला काळजी होती. तिचें निवारण झाल्या-बरोबर सुजानें नजीबाला सोडून दिलें. नजीबाला सोडून सुजाला दोन अडीच महिने झाले नाहींत तोंच गोविंदपंताच्या द्वारें मराठ्यांचें सुजाशीं बोलणें लागलें. ह्यावेळीं गोविंदपंताला सुजाशीं स्नेह दृढ व कायमचा करण्यास उत्तम संधी आली होती. नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांच्यामध्यें गोविंदपंताचा प्रांत होता. तो जिंकून घेईतोंपर्यंत नजीबाशी स्नेह दृढ करण्यास गोविंदपंताला पुष्कळ वेळ होता व स्पर्धा कोणाचीच नव्हती. तेवढ्या वेळांत गोड बोलून व जरब दाखवून सुजाला आपल्या बाजूला ओढून घेण्यास सदाशिवरावानें गोविंदपंताला हुकूम केला होता. तुमचा आमचा स्नेह पूर्वापारचा आहे,तुमच्या वडिलावर आम्ही उपकार केले आहेत, तुमच्यावरहि सरदारांची व रघुनाथरावाची ममता आहे, चकत्याची पात-शाही कायम ठेवून तुम्हाला वजीर करण्याची आमची इच्छा आहे, तुमच्यासारख्या मात-बर माणसाखेरीज चकत्याच्या पातशाहीचा बंदोबस्त होऊन येणार नाहीं ( लेखांक १७३ व टीप २६१ ), नजीबखान मात्रागमनी आहे व तो तुम्हांला थापा देऊन अबदालीकडे नेऊन फसवील, पैशाकरितां अबदाली तुमची इज्जत घेईल व मग तुम्ही पस्ताव्यांत पडाल, चकत्याच्या पातशाहींत अबदालीचा हात पडणें इष्ट नाहीं, हिंदुस्थानच्या पातशाहीची व्यवस्था लावण्यास हिंदुस्थानांत तुम्हाला व आम्हांलाच तेवढा अधिकार व हक्क आहे, तुम्ही अबदालीला मिळाला तर आमचें जन्माचें वैर संपादाल, तुम्ही आमचेकडे आल्यास अबदालीला जिंकल्यावर तुम्हाला बराच प्रांत व मुख्य वजिरी देऊं, न आल्यास तुमचें सर्वस्वीं नुकसान होईल, वगैरे गरमनरम गोष्टी बोलून व वाटतील त्या योग्य सवलती देण्याचें कबूल करून सुजाला आपल्या बाजूला कसें तरी करून ओढून घ्यावें म्हणून सदाशि-वरावाचें आग्रहपूर्वक सांगणें होतें.सुजाच्या मनांत मराठ्यांना मिळावयाचें नसल्यास,निदान त्यानें अबदालीला तरी मिळूं नये एवढें तरी काम करावेंच करावें म्हणून सदाशिवरावाची गोविंदपंताला इशारत होती. सुजाउद्दौल्याला मराठ्यांच्या बाजूला ओढण्यांत फारच फायदा होता. सुजाउद्दौल्याचा प्रांत रोहिल्यांच्या प्रांताला लागून असल्यामुळें सुजाच्या प्रांतांतून रोहिल्यांच्या प्रांतांत दंगा करण्यास मराठ्यांना चांगली सोय झाली असती; सुजाच्या प्रांतां-तून अबदालीला दाणावैरणहि पोंहोचली नसती व सुजाकडून अबदालीला पैशाची मदतहि झाली नसती. शिवाय, सुजाउद्दौल्यासारखा मातब्बर मुसुलमान सरदार अबदालीला मिळाला नसता म्हणजे अहमदखान बंगष, हाफीज रहिमतखान वगैरे लहान सहान संस्थानिकहि अबदालीला चिकटून राहिले नसते. सुजाउद्दौल्यासारखा मातब्बर मुसुलमान मराठ्यांच्या

बाजूला आणिला म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व मुसुलमानांना मराठ्यांविषयीं विश्वास उत्पन्न होऊन त्यांचीहि मदत मराठ्यांना झाली असती. असे मोठमोठे फायदे सुजाच्या स्नेहापासून मराठ्यांना होण्यासारखे होते; व ह्याच कारणांकरितां गोविंदपंताला सदाशिवरावभाऊनें शेंकडों वेळां ह्यासंबंधीं लिहिलें. गोविंदपंताचा सुजाशीं कित्येक वर्षांचा स्नेह होता-आपण वाटेल तें काम करून देऊं म्हणून गोविंदपंतानें पुण्यांत भाऊला आश्वासनें दिलीं होतीं. तेव्हां हें सुजाचा स्नेह जुळवून आणण्याचें काम गोविंदपंत घडवून आणील अशी भाऊला आशा होती. सुजाशीं स्नेह करण्यापासून केवढा फायदा होईल हें अबदालीहि जाणून होता. सुजा आपल्याला मिळाला म्हणजे बाकीचे सर्व मुसुलमान संस्थानिक आपल्या बाजूला अवश्य आलेच पाहिजेत ह्याची अबदालीला पूर्ण खात्री होती. परंतु सुजाच्या व अबदाली-च्यामध्यें गोविंदपंताचा प्रांत व त्याची फौज असल्यामुळें सुजाशीं बोलणें करण्याचीच अबदालीला प्रथम अडचण आली. ही अडचण काढून टाकण्याकरितां १७६० च्या मेंत जहानखान व नजीबखान ह्यांना त्यानें गोविंदपंतावर पाठवून दिलें. गोविंदपंताची परीक्षा पहाण्याची हीच वेळ होती. ह्यावेळीं जयापजयाचीं सर्व सूत्रें गोविंदपंताच्या हातीं होतीं. नजीबखानाची व सुजाउद्दौल्याची भेट हरएक प्रयत्न करून गोविंदपंतानें होऊं द्यावयाची नव्हती. कोळजळेश्वरांहून निघून गोविंदपंताचीं ठाणीं मारून सकुराबाद, इटावें वगैरे स्थळें घेत घेत सुजाउद्दौल्याला बिठूर वगैरे ठिकाणीं जाऊन भेटावें असा नजीबखानाचा बेत होता. हा बेत हाणून पाडण्याचें गोविंदपंताचें काम होतें; परंतु, दुःखाची गोष्ट कीं, हें काम गोविंदपंतानें मनापासून केलें नाहीं. इटावें प्रांतांतील सकुराबाद वगैरे ठिकाणचे गोविंदपंताचे ठाणेदार आपापलीं ठाणीं यवनांच्या देखत सोडून देऊन पळून येऊं लागले. स्वतः गोविंदपंत मागें मागेंच राहू लागला. सुजाउद्दौल्याला पाठीशीं घालून नजीबाची व त्याची भेट प्राण गेला तरी होऊं द्यावयाची नाहीं हा जो निश्चयाचा व जोराचा प्रयत्न गोविंदपंतानें करावयाचा तो त्यानें केला नाहीं. इतकेंच नव्हे; तर वेळ होता त्या वेळीं सुजाशीं देखील त्यानें मळमळीतच बोलणें केलें. सुजा बोलून चालून मराठ्यांच्या स्नेहाविषयीं उदासीन होता. चार महिन्यापूर्वीं मराठे आपल्यावर स्वारी करणार होते ही गोष्ट त्यानें इतक्या थोड्या अवधींत विसरून जावी हें अशक्य होतें. अबदाली व नजीब ह्यांच्याकडून कोणी बोलावला आलें नाहीं तोंपर्यंत मराठ्यांच्या बाजूचे आपण आहोंत असाच त्यानें बोलण्याचा क्रम ठेविला; परंतु गोविंदपंताच्या प्रांतांतून नजीबखान व जहानखान जेव्हां बिठूरास आले तेव्हां तो त्यांना भेटण्यास गंगा उतरून आला ( लेखांक १९९ ). त्यावेळीं मराठ्यांचा वकील शामजी रंगनाथ सुजापाशीं होता. त्याच्या हस्तें सदाशिवरावाला त्यानें लिहून पाठविलें कीं गोविंदपंतानें इटावें प्रांतांत नजीबखानाला येऊं दिलें नसतें व त्या प्रांतांतील ठाणीं कायम राखून ठेविलीं असतीं म्हणजे अर्थात् नजीबखान इकडे आलाहि नसता व आपल्याला त्यांना भेटणेंहि जरूर न पडतें ( लेखांक २०५ ). ह्याच पत्रांत त्यानें आणखी असेंहि कळविलें कीं, जर गोविंदपंत इटावें प्रांतांत पुन्हां अंमल बसवील तर आपण फौजेसुद्धां त्याच्या साहाय्याला येऊं व नंतर गोविंदपंतासह जहानखान व नजीबखान यांजवर

चाल करून जाऊं. परंतु गोविंदपंताच्या हातून हें पुन्हां अंमल बसाविण्याचें काम त्यावेळीं झालें नाहीं. त्यानें सदाशिवरावभाऊला आपल्या मदतीला सैन्य पाठवून देण्याची विनंति केली; परंतु, गोविंदपंताच्या मदतीला सैन्य पाठविण्याची ह्यावेळीं भाऊची सोय नव्हती. तो व गोविंदपंताचा प्रांत यांजमध्यें दोन पूर आलेल्या नद्या वहात होत्या. शिवाय सरदारांना भेटून त्यांची सल्ला घेतल्यावांचून सैन्याची फोडाफोड करावी हेंहि त्याला योग्य वाटेना. ह्याजवर गोविंदपंतानें असें लिहून पाठविलें कीं, आपण जवळ आल्याखेरीज सुजाउद्दौल्याला मराठ्यांना येऊन मिळण्याचें धैर्य होत नाहीं; तेव्हां आपण जलद आग्र्याजवळ येऊन पोहोंचावें; म्हणजे दहशत पडून जहानखान व नजीबखान इटाव्या प्रांतांतून परत अबदालीकडे जातील व सुजाउद्दौला एकटाच राहून आपल्याला येऊन सामील होईल. हें म्हणणें पसंत पडून सदाशिवराव बहुत जलदी करून गंभीर नदीच्या तीरीं येऊन पोहोंचला. तेथें त्याला अशी बातमी कळली कीं नजीबखानाच्या उपदेशावरून सुजाउद्दौला अबदालीकडे जाणार व मराठ्यांना येऊन मिळण्याचा त्याचा विचार नाहीं. तेव्हां त्यानें असा बेत केला कीं, सरदार, जाट व आपण आग्र्याला जाऊन यमुना उतरून नजीबखान व अबदाली ह्यांच्यामध्यें उतरावें व दोघांचेंहि निरनिराळ्या दिशेनें पारपत्य करावें. अबदाली ह्यावेळीं अनुपशहरीं होता. नजीबखान व सुजाउद्दौला बिठूरास होते व गोविंदपंत त्या दोघांच्यामध्यें इटाव्याजवळ होता. अबदालीजवळ तीस हजार फौज, नजीबखान व सुजाउद्दौला ह्यांजवळ वीस हजार फौज व गोविंदपंताजवळ सरासरी आठ दहा हजार फौज होती. आग्र्याजवळ यमुना उतरून पश्चिमेकडून गोविंदपंताला मिळता घेऊन प्रथम नजीबखान, जहानखान व सुजाउद्दौला ह्यांचें पारपत्य करावें व नंतर अबदालीची खोड मोडावी असा भाऊचा बेत होता. ह्याकरितां त्यानें गोविंदपंताला आपल्या प्रांतांतील सर्व नावा यमुनेच्या दक्षिणतीरीं सुरक्षित आणून जमवून ठेवावयाला सांगितलें व आपण गंभीर नदी उतरून सरदारांना ६ जुलैला त्यांनीं सांगितलें त्या रस्त्यानें जाऊन मिळाला. सुजाउद्दौला नजीबखानाच्या उपदेशावरून अबदालीला खास जाऊन मिळणार अशी बातमी तेथें सदाशिवरावाला कळली तेव्हां रामाजी अनंत व नारो शंकर ह्यांना पूर्वीं सुजाउद्दौल्याकडे भाऊनें पाठविलें होतें त्यांना त्यानें अर्ध्याच रस्त्यावरून परत बोलाविलें व यमुना उतरून अंतर्वेदींत शिरण्याचा बेत तडीस नेण्याचा प्रयत्न केला. अबदालीवर चालून जाण्याचा हा पहिला बूट होता. अबदालीचें कांहीं सैन्य पूर्वेस अनुपशहराकडे होतें व कांहीं सैन्य नजीबखान व जहानखान यांच्याबरोबर सुजाउद्दौल्याकडे बिठुरास गेलें होतें; तेव्हां अबदाली व नजीबखान प्रत्येकीं भाऊपेक्षां बलानें कमी होता हें स्पष्ट होतें; तेव्हां ह्या वेळीं अकस्मात् मध्यें उतरून अबदालीचें पारपत्य करण्याचा जो भाऊनें बूट काढिला होता तो सर्वोत्कृष्ट होता यांत संशय नाहीं. हा बूट सिद्धीस नेण्याकरितां सदाशिवरावानें तीन हजार जाट व मानाजी पायगुडे वगैरे सरकारी पथकें यमुनेच्या पलीकडे पाठवून सकुराबादेस मराठ्यांचें ठाणें बसविलें. इतक्यांत सुजाउद्दौला व नजीबखान हे अबदालीकडे अनुपशहरास जात आहेत असें कळलें. खरें म्हटलें असतां गोविंदपंतानें ह्या दोघांना मध्येंच

वाटेंत अडवून ठेवावयाचें; परंतु, गोविंदपंताच्या ह्यावेळच्या सर्व हालचाली हयगयीच्या, चुकारपणाच्या व दिरंगाईच्या होत्या. त्यानें सुजाउद्दौल्याला सुरक्षितपणें जाऊन दिलें इतकेंच नव्हे, तर यमुनेच्या दक्षिणतीराला नावा जमवून ठेवावयाच्या त्याहि वेळेवर जमविल्या नाहींत. १२ जुलैला सरदार, जाट व सदाशिवराव भाऊ आग्र्याला आले त्या वेळीं यमुना उतरून पलीकडे अंतर्वेदींत जातां येणें अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली. सुजाउद्दौला व नजीबखान जे निसटून गेले ते थेट अबदालीला शिकंदऱ्यास जाऊन भेटले. गोविंदपंताच्या हयगयीमुळें व गैदीपणामुळें सदाशिवरावभाऊच्या हातची ही पहिली शिकार गेली. भाऊच्या मनांत स्वदेश पाठीशीं घालून अबदालीला यमुनेंत रेटून बुडवावयाचें होतें; परंतु तें ह्यावेळीं साधलें नाहीं.

सुजाउद्दौल्याशीं राजकारण न करण्यांत व नजीबखानाला न अडविण्यांत गोविंदपंताचें वर्तन फारच गैरफायद्याचें झालें. गोविंदपंताचें इतर बाबींसंबंधानेंहि वर्तन असेंच तोट्याचें होतें. पंचवीस लाख रुपयांचा भरणा, स्वारी हिंदुस्थानांत आली म्हणजे तावडतोब करण्याबद्दल गोविंदपंताला सदाशिवरावानें पडदुराहून लिहिलें होतें; परंतु, तेंहि काम त्यानें अद्यापपर्यंत बजाविलें नाहीं. गारा पडून देशाची धूळधाण झाली; यवनांच्या येण्यामुळें रयत लावणीसंचणी करीत नाहीं; बुंदेलखंडांतील व अंतर्वेदींतील संस्थानिक बंडें करून पैसा देत नाहींत वगैरे सबबी सांगून सदाशिवरावाला वाटेस लावण्याचा त्याचा इरादा होता. खरें म्हटलें असतां, बुंदेलखंडांत व गोविंदपंताच्या ताब्यांतील अंतर्वेदींतील कडाकुरा वगैरे प्रांतांत यवनांचा कांहींच दंगा नव्हता ( लेखांक २३९ ).अद्यापपर्यंत संस्थानिकांनींहि फारशीं कोठें बंडें केलीं नव्हतीं. रतनसा हिंदुपति ह्यांनीं बंडें केलीं, त्यांना गोविंदपंताचीच फूस होती ( लेखांक २१६ ). सारांश, गोविंदपंतांच्या ह्या सबबींत कांहींच तथ्य नव्हतें. यदाकदाचित् दैवी, मानवी आपत्तींनीं गोविंदपंताच्या प्रांताचें उत्पन्न बुडालें होतें, अशी कल्पना केली, तत्रापि मातब्बर मामलतदार म्हणून गोविंदपंताची पत फार मोठी होती. त्यानें आजपर्यंत पैसाहि चांगला कमाविला होता व हिंदुस्थानांत सरकारस्वारी आल्यास पैशाची होईल तितकी मदत करूं वगैरे आश्वासनें त्यानें पेशव्यांना १७५७ त दिलीं होतीं. त्याप्रमाणें ह्यावेळीं त्याच्या हातून कांहींच घडून येईना. सदाशिवरावभाऊनें त्याला चुचकारून, दरडावून, स्तुति करून, रागें भरून, टोंचून, खोचून, नानाप्रकारें लिहिलें; परंतु काम न करण्याचें आपलें व्रत त्यानें कांहीं सोडलें नाहीं. पेशव्यांचें साहाय्य युक्तीनें, प्रयुक्तीनें, बहाण्यानें व शिताफीनें न करण्याचा उद्योग त्यानें साधेल तितका केला. बोलण्यांत व लिहिण्यांत मात्र गोड शब्द वापरण्याला कसूर केली नाहीं. पैसे लवकरच पाठवून देतों, सांगाल काम तें तावडतोब करितों, वगैरे मायन्यादाखल वाक्यांनीं सजविलेलीं पत्रें त्यानें सदाशिवरावभाऊला सतत लिहिलीं ( लेखांक २०६, २६४ ). त्यामुळें भाऊचें मन गोविंदपंताविषयीं नरम राहिलें. बाकी गोविंदपंताचें हें कुचराईचें वर्तन सदाशिवरावभाऊच्या ध्यानांत आलें नाहीं असें नाहीं. ह्या गृहस्थाच्या हातून कामें नीट होऊन येत नाहींत हें भाऊ जाणून होता. त्याला त्यानें ह्याच वेळीं काढून टाकावयाचें; परंतु,तसें

एकदम करणें दुरापास्त होतें. मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे ह्यांच्या खालोखाल वजनदार माणूस म्हणजे गोविंदपंतच होता. गोविंदपंताला काढिलें म्हणजे त्याच्या जागीं ह्या सरदारांपैकीं कोणी तरी त्याच्या प्रांतांत पाठविणें जरूर होतें. परंतु हे दोघे सरदार गेल्या लढाईत अगदीं हैराण झाले होते. तेव्हां त्यांना आपल्या जवळच ठेवणें भाग होतें. शिवाय, ह्या सरदारांच्या सैन्याला घेतल्याशिवाय आपल्याला अबदालीशीं बरोबरीच्या नात्यानें सामना करतां येईल अशी भाऊची समजूत नव्हती. ह्याकरितां गोविंदपंताला एकाएकीं तोडणें भाऊला प्रशस्त वाटेना. तशांत गोविंदपंत अगदींच कांहीं उपयोगीं पडणार नाहीं असें भाऊचें मत नव्हतें. यवनांच्या द्वेषानें,शिपाईगिरीच्या नैसर्गिक तडफेनें, लोकांच्या लज्जेनें व धन्यावरील स्वामिभक्तीनें प्रोत्साहित होऊन गोविंदपंत आपली बाजू संभाळील असा भाऊचा तर्क होता. थोडें कडक बोललें, थोडासा धाक दाखविला म्हणजे गोविंदपंत ताळ्यावर येईल व सांगितलेली कामगिरी बजावील असा भाऊचा अंदाज होता. ह्याच तर्कावर व अंदाजावर भिस्त ठेवून सदाशिवरावभाऊनें गोविंदपंताला अंतर्वेदींत राहूं देऊन त्याच्याकडे आणीक कांहीं कामगिऱ्या सोपविल्या.

यमुनानदीला पाणी अतिशय आल्यामुळें व जड सामान नेण्यास नावा वेळेवर न मिळाल्यामुळें सदाशिवरावभाऊला यमुना उतरून अबदालीचें पारपत्य करण्याचें साधलें नाहीं. तेव्हां त्यानें शत्रूच्या पारपत्याची दुसरी योजना केली. अबदाली, नजीबखान व सुजाउद्दौला हे ह्यावेळीं दिल्लीजवळ यमुनेच्या उत्तरतीराला शिकंदऱ्यावर जाऊन बसले होते. त्यांच्या पाठीला गंगानदी असून ताडाला यमुना नदी होती. डाव्या बाजूला सकुराबादपर्यंत जाटांचीं, मराठ्यांचीं व गोविंदपंताचीं ठाणीं बसलीं होतीं. उजव्या बाजूला मात्र वेळ पडल्यास सरहिंदाकडे निसटून जाण्यास त्यांना मार्ग होता. सदाशिवरावाला यमुना उतरतां आली असती तर त्यानें अबदालीला पूर्वेकडून पश्चिमोत्तरेकडे रेटीत नेलें असतें. आतां सदाशिवरावाच्या मनांत अशी योजना आली कीं यमुनेच्या दक्षिणतीरानें मथुरा, दिल्ली, कुंजपुरा ह्या शहरांवरून जाऊन पश्चिमोत्तरेकडून यमुना उतरून अंतर्वेदींत यावें व अबदालीला पूर्वेकडे कोळजळेश्वर, सकुराबाद वगैरे ठाण्यावरून रेटीत गोविंदपंताच्या अंगावर नेऊन सोडावें. ह्या योजनेच्या साधनार्थ सदाशिवराव स्वतः मथुरेच्या दिशेनें चालता झाला व गोविंदपंतानें कोळजळेश्वर ऊर्फ अलीगडपर्यंत मराठ्यांचीं ठाणीं बसवावीं, अबदालीच्या भोंवतालच्या मुलूख वैराण करावा, रोहिल्यांच्या मुलुखांत सोरमच्या घाटानें उतरण्याची अवाई घालावी व सुजाउद्दौल्याच्या प्रांतांत दंगे माजवावे असें त्यानें ठरविलें. सदाशिवराव १६ जुलैला मथुरेस आला (लेखांक २१७). तेथून शिंदे, होळकर व बळवंतराव गणपत यांस त्यानें दिल्लीस पुढें रवाना केलें व स्वतः ३० जुलैला त्या शहरीं जाऊन पोहोंचला (लेखांक २२४). दिल्लीशहर बळवंतराव मेहेंदळ्यानें अगोदरच सर केलें होतें (लेखांक २२३). आंतील किल्ला घ्यावयाचा राहिला होता तो सदाशिवरावभाऊ आल्यावर १ आगष्टाला मराठ्यांच्या हातीं पडला. याकूबअलीखान म्हणून अबदालीचा कोणी सरदार किल्ल्यांत होता, तो एकटाच इतर लोकांना टाकून नावेंतून पळून गेला

( लेखांक २४६ ). किल्ल्याच्या आंत अबदालीकडील लोक होते त्यांस कौल देऊन हत्यारांसुद्धां बाहेर काढून दिलें व पावसाळा सुरू झाला म्हणून मराठे दिल्लीभोंवतीं सुमारें दोन महिने तळ येऊन राहिले. मराठ्यांनीं दिल्ली घेतली ही बातमी हिंदुस्थानांत लवकरच पसरली. दिल्ली शहर म्हणजे चकत्यांच्या पातशाहीचें मुख्य ठिकाण. तें मराठ्यांनीं अबदालीच्या लोकांपासून हिसकावून घेतलें ह्या गोष्टीनें मराठ्यांचा दरारा पूर्वी होता त्यापेक्षांहि आतां ज्यास्त वाढला व त्याच मानानें अबदालीचा कर्मा झाला. खुद्द अबदालीच्या सैन्यांत व त्याच्या साथीदारांत फूटफाट होऊं लागली. हफीजरहिमतखान, अहमतखान बंगष, सादुल्लाखान, फजुल्लाखान वगैरे रोहिल्यांचीं राजकारणें भाऊकडे पूर्वीपासूनच लागलीं होतीं. ह्या लोकांना मराठ्यांनीं दिल्ली घेतल्यापासून अबदालीच्या बलाचा व सामर्थ्याचा संशय येऊं लागला व ते त्याच्यापासून विभक्त होण्याची खटपट करूं लागले. कित्येक गिलचे व अफरीदी लोकहि अबदालीला सोडून निघाले ( लेखांक २३३ ). सुजाउद्दौल्यालाहि आपण अबदालीला मिळालों ह्या गोष्टीचा खेद वाटूं लागला. अबदालीनें सुजाउद्दौल्यावर मारेकरी घातले व त्याच्यापाशीं तो खर्चाकरितां पैसा मागूं लागला. नजीबखानानें सुजाउद्दौल्याला अबदालीकडे आणिला, त्यांतील मुख्य हेतु सुजाकडून पैसे काढावयाचे हा होता ( लेखांक २०४ ). सुजापाशीं अबदाली जेव्हां पैसा मागूं लागला तेव्हां त्या तरुण व उल्लू मनुष्याला नजीबखानाच्या कुंटणपणाचें व अबदालीच्या मतलबाचें इंगित कळलें ( लेखांक २४६ ). सुजाउद्दौल्याला तेव्हांपासून अबदालीच्या संगतीचा अगदीं वीट आला. आपली आई, सदाशिवरावभाऊ, मल्हारराव होळकर, वगैरे मंडळींनीं अबदालीला न मिळण्याविषयीं आपल्याला आग्रहपूर्वक सांगितलें असून आपण त्यांचें ऐकिलें नाहीं हा मूर्खपणा केला व नजीबखानासारख्या मात्रागमनी लुच्चाच्या नादीं लागून फसलों असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें. ह्याकरितां तोहि सदाशिवरावाशीं सख्याचें बोलणें करूं लागला. ह्याप्रमाणे अबदालीला ह्यावेळीं त्याच्या सर्व साथीदारांनीं सोडून देण्याचा उद्योग आरंभिला. अबदालीनें शहाजादा अलीगोहर व मीरजाफरअली, पटण्याचा सुभेदार, ह्यांनाहि आपणाकडे मिळवून घेण्याचा प्रयत्न पूर्वीपासून चालविला होता. परंतु अलीगोहरानें त्यांजकडे जाण्याचें अनेक कारणांकरितां नाकारिलें ( लेखांक २२७ व २१९ ). सारांश, अबदालीची ह्यावेळीं अगदीं विपन्न स्थिति झाली होती. नजीबखानाच्या नादीं लागून व्यर्थ संकटांत मात्र पडलों असें अबदालीला वाटूं लागल. हिंदुस्थानची पातशाही मिळवून देण्याच्या नजीबखानाच्या गप्पांना भुलून आपण आपला सर्वस्वीं नाश करून घेण्याच्या पंथाला लागलों असें अबदालीच्या प्रत्ययास आलें. खरें पाहिलें असतां अबदालीला हिंदुस्थानच्या कारस्थानांत ढवळाढवळ करून लभ्यांश लुटीखेरीज कांहींच नव्हता. त्याला हिंदुस्थानांत कायमचें राहावयाचें नव्हतें. त्याचें हिताहित हिंदुस्थानांत यत्किंचित्‌हि नसून त्याचें सर्व कांहीं खैबरखिंडीच्या पश्चिमेकडे गुंतलें होतें. हिंदुस्थानांत स्वारी करून, दोन चार महिने राहून, मिळेल ती लूट घेऊन विलायतेस निघून जाण्याचा त्याचा परिपाठ असे. ह्या खेपेला नजीबखानाच्या आग्रहाला मान देऊन

तो हिंदुस्थानांत राहिला. परंतु त्या राहण्यापासून कांहीं फायदा नाहीं, हें त्याला दिवसेंदिवस जास्त अनुभवास येऊं लागलें. त्याचे लोकहि हिंदुस्थानांत दहा महिने राहून कंटाळून गेले होते. कांहींनीं तर अफगाणिस्थानचा रस्ता सुद्धां सुधारला. कांहीं सदाशिवरावाच्या चिठ्या घेऊन गोविंदपंताकडे इटाव्याच्या बाजूला मराठ्यांना जाऊन मिळाले ( लेखांक २३३, २३७, २४२, २४४ ). येणेंप्रमाणें स्वकीय व परकीय अशा दोन्ही लोकांनीं त्याला सोडण्याचा क्रम जेव्हां आरंभिला तेव्हां मराठ्यांशीं स्नेह करून स्वदेशास आपणहि सुरक्षित निघून जावें असा अबदालीनें निश्चय केला ( लेखांक २३६ व २४६ ). स्नेहाचें बोलणें करण्याकरितां भाऊकडे त्यानें वकीलहि पाठविले. परंतु त्याजकडील राजकारणाचा आपल्या मनाप्रमाणें बनाव बसण्याला बराच अवधि लागेल हें पाहून भाऊनें त्याच्या वकिलांच्या बोलण्याकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं (लेखांक २३७). अबदालीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष्य करण्याजोगीच भाऊची ह्यावेळीं स्थिति होती. अबदालीच्यापेक्षां सर्वतोप्रकारें श्रेष्ठ असें सैन्य भाऊजवळ होतें. अबदालीनें कधीं पाहिला नाहीं असा तोफखाना भाऊच्याबरोबर होता. ज्या शिंद्यांना सहा महिन्यापूर्वी अबदालीनें नाडिलें होतें त्यांच्याबद्दल यथेच्छ सूड उगविण्याची भाऊच्या मनांत सोत्कंठ ईर्षा होती. शहाजादा अलीगोहर याचाहि कल भाऊकडेच येण्याचा होता. तशांत अबदालीच्या सैन्यांत फूटफाट झाली होती व आणीक होण्याचा संभव होता ( लेखांक २२४ ). तेव्हां अशा वेळीं अबदालीला सोडावयाचा नाहीं असा भाऊनें निश्चय केला. अबदालीनें मनाप्रमाणें तह केल्यास मात्र त्याला देशीं सुखरूप जाऊं द्यावयाचें; नाहीं तर अंतर्वेदींत कोंडून किंवा आंत तडफडून यमुना उतरून अलीकडे आल्यास बाहेरून गांठून त्याला तंबी द्यावयाची असा व्यूह भाऊनें रचिला ( लेखांक २५८ ). हा व्यूह तडीस नेण्यास लागणारीं साधनें भाऊजवळ जय्यत तयार होतीं.

भाऊ आगष्टपासून अक्टोबरपर्यंत दिल्लीस होता. हे तीन महिने पावसाळ्याचे असल्यामुळें सैन्याची हालचाल करणें बरेंच अडचणीचें होतें. तशांत दिल्लीस राहून भाऊला बरींच कामें उरकावयाचीं होतीं. अबदाली, नजीबखान, सुजाउद्दौला ह्यांच्याशीं तहाचीं बोलणीं भाऊनें येथूनच चालविलीं; अबदालीच्या सैन्यांत फूटफाट करण्याचें राजकारण येथूनच रचिलें; व दिल्लीच्या पातशाहीची व्यवस्थाहि येथेंच राहून केली. अलमगीर पातशहाचें सूत्र आंतून अबदालीकडे आहे असें समजून आल्यावरून १७५९ च्या नोव्हेंबरांत गाजुद्दिन वजिरानें त्याला ठार मारिलें व त्याच्या जागीं कामबक्षाचा पुत्र शहाजहान यास पातशाहा केलें. ह्या शहाजहानाचें राज्य, म्हणींतल्याप्रमाणें, औट घटकेचेंच होतें. १७६० च्या जानेवारींत अबदालीनें दिल्ली घेतली त्यावेळीं ह्या राजश्रींचें राज्य संपलें. त्या वेळेपासून सदाशिवरावानें दिल्ली आगस्टांत घेतली, तोंपर्यंत तख्तावर कोणी पातशाहा नव्हता. अलमगिराचा पुत्र अलीगोहर हा भिऊन १७५९ च्या नोव्हेंबरांत जो पट्टण्यास पळून गेला तो इकडे पुन्हां परत येईना. अबदालीनें व सदाशिवरावभाऊनें दोघांनींहि त्याला बोलावणीं पाठविलीं; परंतु, कोणाकडेहि येण्याची आपली खुषी नाहीं असें त्यानें

साफ कळविलें. पुढें भाऊनें जेव्हां दिल्ली घेतली त्यावेळीं त्यानें मराठ्यांच्या बाजूला यण्याचा कल दाखविला. मराठ्यांचा वकील शिऊभट त्यावेळीं अलीगोहरापाशीं होता ( लेखांक २२७ ). ह्या वकिलाच्या उपदेशानें अलीगोहर मराठ्यांच्या बाजूला आला; परंतु, लढाइचा कायमचा निकाल झाल्यावांचून आपली दिल्लीस येण्याची खुषी नाहीं असें त्यानें कळविलें ( लेखांक २१९ ), व आपला पुत्र जवानबख्त यास भाऊकडे पाठवून दिलें. ह्या जवानबख्ताला सदाशिवरावभाऊनें नाना पुरंधरे व आप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें १० अक्टोबर १७६० रोजीं वलीहद केलें व अलीगोहराला शहाअलम हें नांव देऊन त्याच्या नांवचे गजशिक्के चालविले ( लेखांक २५८ व २५९ ). दिल्लीच्या तमाम लोकांनीं नजरा केल्या व सर्वत्र खुशहाली झाली. सुजाउद्दौला व नजीबखान ह्यांच्या मनांत अबदालीला पातशाहा करावयाचें होतें व वजीरी, बक्षीगिरी आपसांत वाटून घ्यावयाची होती (लेखांक २३६ ). बाबरशहा चकते यानें स्थापिलेल्या तैमुरियाच्या पातशाहीविषयीं ह्या दोघांच्या मनांत यत्किंचित्‌हि भक्ति नव्हती. नजीबखान व सुजाउद्दौला दिल्लीच्या पातशाहीच्या संरक्षणार्थ भांडत नव्हते. मराठ्यांशीं लढण्यांत त्यांचा मुख्य हेतु आपापल्या जहागिरी जतन कराव्या व पातशाहींत हवा तसा धांगडधिंगा घालता यावा, हा होता. अबदालीच्या हातांत दिल्ली शहर दहा महिने होतें; परंतु, त्यानें दिल्लीच्या तख्तावर चकत्यांच्या कुळांतील कोणी पातशाहा मुद्दाम बसविला नाहीं. स्वतःला पातशाही मिळाली तर पहावें ह्या हेतूनें अबदालीनें तख्त रिकामें ठेविलें. परंतु, अबदालीचा हा हेतु अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें समूळ विध्वंसून टाकिला. सुजाउदौल्याची वजिरी मिळविण्याची व नजीबखानाची बक्षीगिरी पटकावण्याची आशाहि सदाशिवरावाच्या ह्या कृत्यानें विफल झाली. आगष्टपासून अक्टोबरपर्यंत सुजाउद्दौला मराठ्यांशीं सलूख करण्याच्या मिळमिळीत गोष्टी बोलत होता; व अबदालीला सोडून जाण्याचाहि आस्ते आस्ते त्याचा विचार होत चालला होता; परंतु, तो विचार त्यानें आतां सोडून दिला आणि अबदालीची व नजीबखानाची कांस बळकट धरिली. १० अक्टोबर १७६० पासून अबदाली, नजीबखान व सुजाउद्दौला मराठ्यांच्या विरुद्ध एकसूत्रानें चालूं लागले. दिल्लीच्या तख्तावर मराठ्यांच्या मनांत विश्वासरावाला बसवावयाचें आहे वगैरे ज्या बाजारगप्पा त्यावेळीं चोहोंकडे पसरल्या होत्या त्याहि अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें जागच्या जागीं बसवून टाकिल्या. चकत्याच्या कुळांतील कोणी तरी औरस पुरुष दिल्लीच्या तख्तावर बसवावयाचा व त्याची वजिरी आपण स्वतः करावयाची असा भाऊचा ह्यावेळी बेत होता. सातारच्या छत्रपतींची पेशवाई करून पेशव्यांनीं महाराष्ट्रांतील सर्व सत्ता जशी आपल्या हातांत घेतली तशीच दिल्लीच्या पातशाहाची वजिरी करून सर्व हिंदुस्थानची सत्ता कायदेशीर रीतीनें, विशेष बोभाट न होतां व लोकांचीं मनें न दुखवितां मिळवावयाची असा सदाशिवरावाचा विचार होता. हा हेतु यवनांच्या ध्यानांत आल्याबरोबर ते आपले पूर्वीचे तंटे विसरले व एकजुटीनें मराठ्यांशीं सामना करण्यास सिद्ध झाले.

इकडे सदाशिवरावभाऊनेंहि ज्या ज्या योजना करावयाच्या त्या त्या केल्या. यमु-

तो हिंदुस्थानांत राहिला. परंतु त्या राहण्यापासून कांहीं फायदा नाहीं हे त्याला दिवसें-दिवस जास्त अनुभवास येऊं लागलें. त्याचे लोकहि हिंदुस्थानांत दहा महिने राहून कंटाळून गेले होते. कांहींनीं तर अफगाणिस्थानचा रस्ता सुद्धां सुधारला. कांहीं सदाशिव-रावाच्या चिठ्या घेऊन गोविंदपंताकडे इटाव्याच्या बाजूला मराठ्यांना जाऊन मिळाले ( लेखांक २३३, २३७, २४२, २४४ ). येणेंप्रमाणें स्वकीय व परकीय अशा दोन्ही लोकांनीं त्याला सोडण्याचा क्रम जेव्हां आरंभिला तेव्हां मराठ्यांशीं स्नेह करून स्वदेशास आपणहि सुरक्षित निघून जावें असा अबदालीनें निश्चय केला ( लेखांक २३६ व २४६ ). स्नेहाचें बोलणें करण्याकरितां भाऊकडे त्यानें वकीलहि पाठविले. परंतु त्याजकडील राज-कारणाचा आपल्या मनाप्रमाणें बनाव बसण्याला बराच अवधि लागेल हें पाहून भाऊनें त्याच्या वकिलांच्या बोलण्याकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं (लेखांक २३७). अबदालीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष्य करण्याजोगीच भाऊची ह्यावेळीं स्थिति होती. अबदालीच्यापेक्षां सर्वतोप्रकारें श्रेष्ठ असें सैन्य भाऊजवळ होतें. अबदालीनें कधीं पाहिला नाहीं असा तोफ-खाना भाऊच्याबरोबर होता. ज्या शिंद्यांना सहा महिन्यापूर्वीं अबदालीनें नाडिलें होतें त्यांच्याबद्दल यथेच्छ सूड उगविण्याची भाऊच्या मनांत सोत्कंठ ईर्षा होती. शहाजादा अलीगोहर याचाहि कल भाऊकडेच येण्याचा होता. तशांत अबदालीच्या सैन्यांत फूटफाट झाली होती व आणीक होण्याचा संभव होता ( लेखांक २२४ ). तेव्हां अशा वेळीं अबदालीला सोडावयाचा नाहीं असा भाऊनें निश्चय केला. अबदालीनें मनाप्रमाणें तह केल्यास मात्र त्याला देशीं सुखरूप जाऊं द्यावयाचें; नाहीं तर अंतर्वेदींत कोंडून किंवा आंत तडफडून यमुना उतरून अलीकडे आल्यास बाहेरून गांठून त्याला तंबी द्यावयाची असा व्यूह भाऊनें रचिला ( लेखांक २५८ ). हा व्यूह तडीस नेण्यास लागणारीं साधनें भाऊ-जवळ जय्यत तयार होतीं.

भाऊ आगष्टपासून अक्टोबरपर्यंत दिल्लीस होता. हे तीन महिने पावसाळ्याचे असल्या-मुळें सैन्याची हालचाल करणें बरेंच अडचणीचें होतें. तशांत दिल्लीस राहून भाऊला बरींच कामें उरकावयाचीं होतीं. अबदाली, नजीबखान, सुजाउद्दौला ह्यांच्याशी तहाचीं बोलणीं भाऊनें येथूनच चालविलीं; अबदालीच्या सैन्यांत फूटफाट करण्याचें राजकारण येथूनच रचिलें; व दिल्लीच्या पातशाहीची व्यवस्थाहि येथेंच राहून केली. अलमगीर पात-शाहाचें सूत्र आंतून अबदालीकडे आहे असें समजून आल्यावरून १७५९ च्या नोव्हेंबरांत गाजुद्दिन वजिरानें त्याला ठार मारिलें व त्याच्या जागीं कामबक्षाचा पुत्र शहाजहान यास पातशाहा केलें. ह्या शहाजहानाचें राज्य, म्हणींतल्याप्रमाणें, औट घटकेचेंच होतें. १७६० च्या जानेवारींत अबदालीनें दिल्ली घेतली त्यावेळीं ह्या राजश्रींचें राज्य संपलें. त्या वेळेपासून सदाशिवरावानें दिल्ली आगस्टांत घेतली, तोंपर्यंत तख्तावर कोणी पातशाहा नव्हता. अलमगिराचा पुत्र अलीगोहर हा भिऊन १७५९ च्या नोव्हेंबरांत जो पट्टण्यास पळून गेला तो इकडे पुन्हां परत येईना. अबदालीनें व सदाशिवरावभाऊनें दोघांनींहि त्याला बोलावणीं पाठविलीं; परंतु, कोणाकडेहि येण्याची आपली खुषी नाहीं असें त्यान

साफ कळविलें. पुढें भाऊनें जेव्हां दिल्ली घेतली त्यावेळीं त्यानें मराठ्यांच्या बाजूला यण्याचा कल दाखविला. मराठ्यांचा वकील शिऊभट त्यावेळीं अलीगोहरापाशीं होता ( लेखांक २२७ ). ह्या वकिलाच्या उपदेशानें अलीगोहर मराठ्यांच्या बाजूला आला; परंतु, लढाईचा कायमचा निकाल झाल्यावांचून आपली दिल्लीस येण्याची खुषी नाहीं असें त्यानें कळविलें ( लेखांक २१९ ), व आपला पुत्र जवानबख्त यास भाऊकडे पाठवून दिलें. ह्या जवानबख्ताला सदाशिवरावभाऊनें नाना पुरंधरे व आप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें १० अक्टोबर १७६० रोजीं वलीहद केलें व अलीगोहराला शहाअलम हें नांव देऊन त्याच्या नांवचे गजशिक्के चालविले ( लेखांक २५८ व २५९ ). दिल्लीच्या तमाम लोकांनीं नजरा केल्या व सर्वत्र खुशहाली झाली. सुजाउद्दौला व नजीबखान ह्यांच्या मनांत अबदालीला पातशाहा करावयाचें होतें व वजीरी, बक्षीगिरी आपसांत वाटून घ्यावयाची होती (लेखांक २३६ ). बाबरशहा चकते यानें स्थापिलेल्या तैमुरियाच्या पातशाहीविषयीं ह्या दोघांच्या मनांत यत्किंचित्हि भक्ति नव्हती. नजीबखान व सुजाउद्दौला दिल्लीच्या पातशाहीच्या संरक्षणार्थ भांडत नव्हते. मराठ्यांशीं लढण्यांत त्यांचा मुख्य हेतु आपापल्या जहागिरी जतन कराव्या व पातशाहींत हवा तसा धांगडधिंगा घालता यावा, हा होता. अबदालीच्या हातांत दिल्ली शहर दहा महिने होतें; परंतु, त्यानें दिल्लीच्या तख्तावर चकत्यांच्या कुळांतील कोणी पातशाहा मुद्दाम बसविला नाहीं. स्वतःला पातशाही मिळाली तर पहावें ह्या हेतूनें अबदालीनें तख्त रिकामें ठेविलें. परंतु, अबदालीचा हा हेतु अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें समूळ विध्वंसून टाकिला. सुजाउदौल्याची वजिरी मिळविण्याची व नजीबखानाची बक्षीगिरी पटकावण्याची आशाहि सदाशिवरावाच्या ह्या कृत्यानें विफल झाली. आगष्टपासून अक्टोबरपर्यंत सुजाउद्दौला मराठ्यांशीं सलूख करण्याच्या मिळमिळीत गोष्टी बोलत होता; व अबदालीला सोडून जाण्याचाहि आस्ते आस्ते त्याचा विचार होत चालला होता; परंतु, तो विचार त्यानें आतां सोडून दिला आणि अबदालीची व नजीबखानाची कांस बळकट धरिली. १० अक्टोबर १७६० पासून अबदाली, नजीबखान व सुजाउद्दौला मराठ्यांच्या विरुद्ध एकसूत्रानें चालूं लागले. दिल्लीच्या तख्तावर मराठ्यांच्या मनांत विश्वासरावाला बसवावयाचें आहे वगैरे ज्या बाजारगप्पा त्यावेळीं चोहोंकडे पसरल्या होत्या त्याहि अलीगोहराला पातशाहा करून सदाशिवरावानें जागच्या जागीं बसवून टाकिल्या. चकत्याच्या कुळांतील कोणी तरी औरस पुरुष दिल्लीच्या तख्तावर बसवावयाचा व त्याची वजिरी आपण स्वतः करावयाची असा भाऊचा ह्यावेळीं बेत होता. सातारच्या छत्रपतींची पेशवाई करून पेशव्यांनीं महाराष्ट्रांतील सर्व सत्ता जशी आपल्या हातांत घेतली तशीच दिल्लीच्या पातशाहाची वजिरी करून सर्व हिंदुस्थानची सत्ता कायदेशीर रीतीनें, विशेष बोभाट न होतां व लोकांचीं मनें न दुखवितां मिळवावयाची असा सदाशिवरावाचा विचार होता. हा हेतु यवनांच्या ध्यानांत आल्याबरोबर ते आपले पूर्वीचे तंटे विसरले व एकजुटीनें मराठ्यांशीं सामना करण्यास सिद्ध झाले.

इकडे सदाशिवरावभाऊनेंहि ज्या ज्या योजना करावयाच्या त्या त्या केल्या. यमु-

नेच्या दक्षिणतीराला कुंजपुऱ्यास अबदालीचा समदखान म्हणून कोणी सरदार सुमारें वर्ष-भर पांच सहा हजार सैन्यासह ठाणें देऊन बसला होता. पश्चिमोत्तरेकडून यमुना उतरून अंतर्वेदींत अबदालीच्या अंगावर जावयाला किंवा त्या बाजूनें अबदालीला बाहेर काढावयाला स्थळ म्हटलें म्हणजे हें कुंजपूरच होतें. हें स्थळ घेऊन सारंगपुरास यमुना उतरून अंतर्वेदींत शिरण्यास मार्ग होता ( लेखांक २५८ ). तेव्हां कुंजपुऱ्याकडे सदाशिवरावानें बळवंतराव मेहेंदळ्यास व सरदारांस पाठवून दिलें व स्वतः आपण त्यांच्या पाठीमागून त्याच रोखानें चालला. अबदालीला उजवी स्वतः घालण्याचा विचार करून डावीकडून त्याला शह देण्यास भाऊनें गोविंदपंतास हुकूम केला. भाऊनें गोविंदपंताला कामगिरी मोठी महत्त्वाची सांगितली होती. अबदाली, नजीबखान, सुजाउद्दौला शिकंदऱ्यावर गोळा झाले होते. भाऊ दिल्लीवरून यमुनेच्या दक्षिणतीरानें जसजसा उत्तरेस जाऊं लागला तसतसा अबदालीहि यमुनेच्या उत्तर तीरानें कुंजपुऱ्याकडे रोख करून चालला. कुंजपुऱ्यास जाऊन आपलें तोंड धरून ठेवावयाचा भाऊचा बेत आहे हें अबदाली समजला. तेव्हां अबदालीच्या उत्तरेकडच्या गतीला प्रतिरोध करावा म्हणून गोविंदपंताला भाऊनें खालील कामगिऱ्या पूर्वीप्रमाणें पुन्हां सांगितल्या. गोविंदपंतानें सोरमच्या घाटीं गंगा उतरून रोहिलखंडांत जाण्याची अवाई घालावी; कोळजळेश्वराच्या बाजूनें येऊन अबदालीच्या पाठीमागें पायबंद द्यावा; अंतर्वेद, रोहिलखंड व सुजाउद्दौल्याचा प्रांत ह्या प्रदेशांतील गांवें, खेडीं, शहरें, शेतें लुटावीं, जाळावीं व पोळून फस्त करावीं; व तेथील जमीदार व गडकरी ह्यांच्याकडून दंगा करवावा; ह्या इतक्या कामगिऱ्या अवश्य व तावडतोब गोविंदपंतानें कराव्या असा भाऊचा हुकूम होता. सर्वांत अबदालीच्या पाठीमागचा मुलूख वैराण करून, अबदालीला रसद पोहोंचूं देऊं नये अशी भाऊची साग्रह व सोत्कंठ गोविंदपंताला विनवणी होती. किरकोळ गढ्या घेत बसून व्यर्थ काल हरण करूं नये अशीहि सूचना भाऊनें पंताला केली. रसद बंद होऊन अंतर्वेदींत अबदालीला फाके पडूं लागले म्हणजे तो तडफडून यमुनेच्या अलीकडे येईल किंवा गोविंदपंताच्या अंगावर उलटून जाईल अशी भाऊची अटकळ होती. भाऊ कुंजपुऱ्याकडे गेल्यामुळें फारकरून तो कुंजपुऱ्याच्या दिशेनेंच कुच करील असा भाऊचा तर्क होता. तो कुंजपुऱ्याकडे आला तर गोविंदपंतानें त्याच्या पाठोपाठ येऊन मागील व भोंवतालचा मुलूख वैराण करावा व त्याची रसद मारावी अशी भाऊची इच्छा होती. तो गोविंदपंतावर उलटून धांवून गेला तर सदाशिवराव यमुना उतरून त्याच्या पाठीवर चालून जाण्यास तयार होता. येणेंप्रमाणें अबदालीला दोहींकडून बतंग करून पिसाळवून सोडावयाचा भाऊचा इरादा होता व ह्या कामीं गोविंदपंतानें नेटानें व उत्साहानें मेहनत करावी अशी भाऊची विनवणी होती. ह्यावेळीं मोहिमेची सर्व गुरुकिल्ली गोविंदपंताच्या हातांत होती. रान उठवून व अडवून शिकार सदाशिवरावाच्या हातांत बिनचूक आणून सोडण्याचें काम गोविंदपंताचें होतें. सारांश, ह्या मोहिमेंत जयापजय येणें सर्वथा गोविंदपंताच्या हुशारीवर व चलाखीवर अवलंबून होतें.

भाऊ दिल्लीहून निघाले ते १५ अक्टोबराच्या सुमाराला कुंजपुऱ्यास आले. हें स्थल

फार मजबूत असून नाकेबंदीचें होतें. आंत समतखान म्हणून अबदालीचा सरदार पांच सात हजार फौजेसुद्धां होता. कुंजपुऱ्याची गढी सोडून डावाडोल होऊन मराठ्यांच्या सैन्याला दमवावयाचा समतखानाचा विचार होता. मराठ्यांच्या सैन्याला अंगावर घेऊन आपण पळत सुटावें व अबदालीनें पाठीमागून येऊन मराठ्यांना कचाटींत धरावें अशी समतखानाची योजना होती ( लेखांक २५८ ). परंतु, बळवंतराव मेहेंदळे व जनकोजी शिंदे यांनीं त्वरा करून गढीभोंवती वेढा घातल्यामुळें व समतखानाची दोन हजार फौज बाहेर पळून जात होती ती वाटेंतच लुटल्यामुळें ( लेखांक २५५ ) ही समतखानाची योजना जागच्या जागींच जिरली. सदाशिवराव आल्यावर मराठ्यांनीं कुंजपुरा १७ अक्टोबरला घेतला व आंतील पांच सहा हजार प्यादा लुटला ( टीप ३१६ ). कुंजपुरा घेतल्यावर भाऊच्या मनांत पूर्वीं ठरल्याप्रमाणें सारंगपूरच्या घाटानें यमुना उतरून अबदालीवर जावयाचें होतें. त्याप्रमाणें यमुना उतरण्याकरितां सदाशिवरावानें कुंजपुऱ्याच्या उत्तरेस कुच करण्याचा घाट घातला; तों अशी बातमी आली कीं अबदाली बागपताजवळ यमुना उतरून अलीकडे दक्षिणतीराला आला. ह्या वेळच्या अबदालीच्या व सदाशिवरावाच्या हालचाली वाचकांच्या स्पष्ट ध्यानांत याव्या म्हणून दिल्लीपासून कुंजपुऱ्यापर्यंतच्या कांहीं गांवांचीं अंतरें देणें जरूर आहे. दिल्लीपासून उत्तरेस यमुनेच्या तीरीं बागपत २० मैल, सोनपत २६ मैल, गणोर ३६ मैल, संभाळकिया ४५ मैल, पानिपत ५४ मैल व कुंजपुरा ७८ मैल आहे. अबदाली बागपतास अक्टोबरच्या २५ तारखेला उतरला व २८ अक्टोबरास गणोरावरून संभाळकियास येऊन पानिपताच्या रोखानें तीन कोस पुढें आला. ह्याच सुमाराला भाऊ कुंजपुऱ्याहून निघून पानिपतास अबदालीच्या समोर येऊन पोहोंचला ( लेखांक २६१ ). भाऊनें कुंजपुरा घेऊन समतखानाला जमीनदोस्त केल्यामुळें व तेथून अबदालीचें तोंड दाबिल्यामुळें अंतर्वेदींतून कोठून तरी बाहेर पडणें अबदालीला जरूर होतें. कुंजपुऱ्याच्या बाजूचे सर्व घाट मराठ्यांनीं धरल्याकारणानें तिकडच्या बाजूला कुच करण्याची अबदालीची सोय नव्हती. दिल्लीस नारो शंकर व सबळगडास सुरजमल जाट असल्यामुळें आणि शिकोराबाद, इटावें, आग्रा वगैरे यमुनेच्या अलीकडील व पलीकडील ठाणीं मराठ्यांच्या ताब्यांत असल्याकारणानें दिल्लीच्या दक्षिणेसहि अबदालीचा पाड लागण्यासारखा नव्हता. दिल्लीपासून कुंजपुऱ्यापर्यंतचेहि यमुनेचे सर्व घाट मराठ्यांच्या हातांत होते. त्यांतल्या त्यांत पानिपतापर्यंत भाऊचा दबाव विशेष होता. पानिपताच्या अलीकडे संभाळकियापासून बागताच्या पलीकडे कांहीं कोसपर्यंत मराठ्यांचीं लहान लहान ठाणीं होतीं. त्यांपैकीं एखादें फोडल्याशिवाय यमुनेच्या अलीकडे येणें अबदालीला शक्य नव्हतें. भाऊच्या भीतीमुळें अंतर्वेदींत राहणें तर त्याला अत्यंत धोक्याचें होतें. तेव्हां बागपताजवळ मोठ्या कष्टानें अबदाली यमुना उतरला व मोठ्या सावधगिरीनें पानिपताचा त्यानें रोख धरिला. ह्यावेळीं अबदाली सदाशिवरावाच्या कचाटींत चांगला सांपडला होता. तोंडावर सदाशिवरावभाऊची सर्वप्रकारें सज्ज झालेली फौज पानिपतास उभी होती व पाठीमागें दिल्लीस नारो शंकर सहा सात हजार लोकां-

र्नेशीं अवदालीला पायबंद देण्यास तयार होता. यमुनेच्या उजव्या तीराला अवदालीला मराठ्यांनीं ह्याप्रमाणें अगदीं वतंग करून टाकिलें होतें. एक बाजू मात्र अवदालीला मोकळी राहिली होती. ती बाजू यमुनेच्या पलीकडील नजीबखानाच्या ताब्यांतील अंतर्वेद व रोहिलखंड हे प्रांत होत. ह्या प्रांतांतून अवदालीला पायबंद देण्याचें काम सदाशिवराव-भाऊनें गोविंदपंताकडे सोपविलें होतें. त्यानें तें काम कसें बजाविलें तें पाहूं.

अवदाली बागपतास यमुना उतरेपर्यंत म्हणजे २५ अक्टोबरपर्यंत यवनांचें सैन्य दिल्लीसमोर शिकंदऱ्यापासून मिरतापर्यंत पसरलें होतें. त्यांना दाणागल्ला वगैरे रसद भोंवतालच्या प्रांतांतून व रोहिलखंडांतून मिळत असे ती लागभाग पाहून मारण्याचें काम गोविंदपंताचें होतें. तसेंच नवीजखान व सुजाउद्दौला ह्यांच्या प्रांतांतील ठाणीं घेण्याचें व तेथें दंगा माजवून ह्या दोघां यवनसरदारांचीं चित्तें व्यग्र करण्याचें काम गोविंदपंतावर सोपविलेलें होतें. जाटाचे लोक सकुराबादेस वसले होते त्यांना मदतीस घेऊन हीं कामें जरूर करावीं, म्हणजे फार उपयोग आहे म्हणून सदाशिवराव गोविंदपंताला एक-सारिखें लिहीत होता ( लेखांक २४४ ). ह्यावेळीं अवदालीची रसद बंद करणें हें अत्यंत महत्त्वाचें व जरूरीचें काम होतें. गोविंदपंतानें हें काम टाकून निराळेंच एक काम कर-ण्याचा डौल घातला. तालगांव, तिरव, कनोज, खेरनगर, भुजाजंग, खतलाख, मोहना, वरगांव, गुलोली वगैरे विठुराकडील लहान सहान गढ्या घेत बसून अंतर्वेदींतील यवनांच्या सैन्याला शह देण्याच्या जरूरीच्या कामीं गोविंदपंतानें पूर्ण हयगय केली ( लेखांक २५८ ). किरकोळ गढ्या घेत बसून महिन्यांचे महिने व्यर्थ दवडण्यांत व मुख्य कामाला अडथळा आणण्यांत मतलब नाहीं; तावडतोब भाऊसाहेबांच्या मदतीला जाऊन अवदालीला शह देण्यांतच खरा पराक्रम आहे; वगैरे सूचना गोविंदपंताला कित्येकांनीं केल्या. परंतु, किर-कोळ गढ्या घेतल्याशिवाय अव्वल काम हातीं घेतां येत नाहीं ह्या सबबीवर अवदालीला शह देण्याचें गोविंदपंतानें नाकारिलें ( लेखांक २५० ). त्यामुळें अवदालीच्या सैन्यांत दाणावैरणीची टंचाई मुळींच भासली नाहीं. अबदालीचा मार्ग भाऊनें कुंजपुऱ्यास अडवि-ल्यामुळें अवदाली अंतर्वेदींत कोंडला गेला होता. फक्त रसद बंद करून त्याला घाबरा करण्याचें तेवढें राहिलें होतें. एवढें काम जरूर करावें म्हणून गोविंदपंताला सदाशिवरावाचा सक्त हुकूम होता. ह्या हुकुमाप्रमाणें गोविंदपंतानें अवदालीच्या पिछाडीस दंगा केला असता म्हणजे अवदाली समूळ उडाला असता. अबदाली २३ अक्टोबरपासून २५ अक्टो-बरपर्यंत बागपताजवळ यमुना उतरत होता, त्यावेळीं त्याच्या पाठीवर जर पंतानें शह दिला असता तर मोठें काम होऊन येतें. परंतु, अबदालीला गोविंदपंताच्या हातून यत्किंचि-त्हि उपसर्ग लागेना ( लेखांक २६० ). अवदाली यमुना उतरून बागपत गणोरावरून संभाळकियास आला तेव्हां भाऊनें गोविंदपंताला अबदालीची रसद मारण्यास पुन्हां हुकूम केला. " तुम्हीं जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून अबदालीस रसद न पोहोंचे, फौजेस शह पडे, ऐसें करावें. गिलच्यांचा पेच तिकडे नाहीं. यास्तव लांब लांब मजलींनीं येणें. या कामास दिरंग न लावणें. हें काम मागेंच करावें ऐसें होतें याउपरि

तपशील न लावणें. गडमुक्तेश्वर, शामळी वगैरे नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन मुलकाचा बोभाट होय असें जरूर करणें. वारंवार लिहिलें जाऊन अजून तुम्ही उमरगडीच आहां हें अपूर्व आहे! आतांहि लिहिलेप्रमाणें न झालें तरी मर्दुमीचें काम होत नाहींसेंच झालें! ईरे धरून तडकन येऊन काम करणें." ह्याप्रमाणें सदाशिवरावानें गोविंदपंताला नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेस लिहिलें (लेखांक २६१). ह्यावेळीं भाऊच्या व अबदालीच्या सैन्यांमध्यें अंतर दोन चार कोसांचें होतें. मराठ्यांचें भय अबदालीला इतकें पडलें होतें कीं, तो फार वाताबेतानें हालचाल करीत होता. चाळीस कोंस पन्नास कोंस धांवून जाण्याची हिंमत अबदालीच्या अंगीं राहिली नव्हती. यमुनेच्या अलीकडे आल्याकारणानें ह्यावेळीं अबदालीच्या लष्करांत महागाई फार झाली (टीप ३२१). ती गोविंदपंताच्या पराक्रमानें झाली नसून यमुनेच्या पाण्यामुळें झाली होती. सारांश, अबदालीची हलाकी ह्यावेळीं फार झाली होती. ह्याच सुमाराला अबदालीचें व मराठ्यांचें एक युद्ध झालें. त्यांत मराठी फौज विजयी झाली (लेखांक २६२). यवनांचें पारपत्य करण्याचा हुरूप ह्यावेळीं सदाशिवरावाच्या व मराठी सैन्याच्या अंगांत अतोनात भरला होता व तो दोन्ही सैन्यांची एकंदर परिस्थिति पाहतां सर्वथैव रास्त होता. अबदालीला आपण खास गिळणार अशी सदाशिवरावभाऊला पूर्ण खात्री वाटत होती (लेखांक २६१). ही खात्री खरी ठरण्यास एक गोष्ट मात्र होणें जरूर होतें. ती गोष्ट ही कीं, गोविंदपंतानें अंतर्वेदीच्या व रोहिलखंडाच्या बाजूनें अबदालीची रसद बंद केली पाहिजे होती. ह्यासंबंधानें सदाशिवरावानें गोविंदपंताला नोव्हेंबरच्या ४ थ्या तारखेला येणेंप्रमाणें लिहिलें:—"कार्यावरी आज्ञेप्रमाणें जातों, ऐशा गोष्टी रिकाम्या (मात्र) लिहितां. निदर्शनास यांतील एकहि येत नाहीं. यामुळें तुमच्या कर्तृत्वाची तारीफ वाटते ते कोठपर्यंत लिहावी! लिहितां लिहितां भागलों! हें तुमच्या कर्तृत्वास उत्तम नाहीं. अबदालीची आमची गांठ पाणिपताजवळ पडली आहे. तोफखान्याच्या आराबा रचून लढाई करावयास तयारी केली आहे. त्याच्यानें इकडे तिकडे जाववत नाहीं व कांहीं करवत नाहीं. पावणे दोन कोंस दीड कोंसाची तफावत आहे. पेंढारी व लुगारे राऊत वगैरे नित्य उंटें, घोडीं, तट्टें, बैल आघाडीपिछाडीवरी जाऊन गोटापासून घेऊन येतात. त्यांचे कोणी पाठीवरहि निघत नाहीं. याप्रमाणें आहे. तुम्हीं पत्र पावतांच अंतर्वेदींतून पटपटगंजावरी यांच्या पिछाडीस येऊन पोहोंचणें. सावकाश याल तरी ठीक नाहीं. लांबलांब मजलीनें येणें. रसद त्याजकडे जावयाची आढळेल ते लुटणें, दबाव पाडणें, म्हणजे चहूंकडून घाबरा होईल. हेहि युक्त तुम्हांस बहुत वेळ लिहिली. परंतु तुम्ही येत नाहीं. सारीच डोळेझांक करतां. परंतु असा समय चाकरी करून दाखवावयाचा पुढें कदापि येणें नाहीं. या हंगामी जो आपले शक्तीपेक्षां चाकरी अधिक करून दाखवील त्याचे रूप आहे. हें दूरदेशीं ध्यानांत आणून सर्व गोष्टी लिहिल्याप्रमाणें करणें. ऐवज पाठवणें. तुम्हीं येणें. लहानसहान गढ्यामुळें गुंतोन मोठ्या कामाच्या उपयोगांतून जाल असें करून न घेणें. तुम्हीं दरमजल बागपतचे सुमारें अंतर्वेदींतून येऊन रसद मारणें. नजीबखानाचा

मुलूख जाळून लुटून फस्त करणें. दोन चार हजार चांगली निवडक फौज लांब लांब मजली करून लिहिलेप्रमाणें रोहिलियांच्या मुलखांत दंगा करणें व रसद बंद करणें. कांहींच न झालें तरी परिच्छिन्न तुम्हांवर शब्द येईल. वारंवार लिहावयाची, आपले अबरूची ईरे धरून काम बजावून आणणें. या दिवसांत तुम्ही येऊन लिहिलेप्रमाणें पावला असतां तर किती काम होतें. अजून तरी करून दाखवणें. गंगापार जमीदारांकडून दंगा करवणें. गोपाळराव गणेश फौजसुद्धां गंगापार उतरून जमींदार सामील करून सुजाउद्दौला, रोहिले यांचा अंमल उठवावा. याप्रमाणें करणें. मसलत मोठी. या दिवसांत ज्यास जें लिहावें त्याप्रमाणें होऊन न येई मग तुम्ही आमचे कामाचे काय? याउपरि आज्ञेची व चाकरी करून दाखवावयाची सीमा झाली!" ह्याप्रमाणें टोंचून व खोंचून लिहून गोविंदपंताची कानउघाडणी सदाशिवरावानें केली (लेखांक २६४). नारो शंकरानें नोव्हेंबरच्या ३ ऱ्या तारखेस अशाच अर्थाचें एक पत्र गोविंदपंतास लिहिलें (लेखांक २६३). तरीहि गोविंदपंतानें आपला दिरंगाईचा व सुस्तपणाचा क्रम सोडिला नाहीं. अबदालीचें पूर्णपणें पारपत्य करण्याची ही तर ऐन वेळ होती. सदाशिवरावानें मुद्दाम उत्तरेकडे कुंजपुऱ्यास जाऊन अबदालीला दिल्ली येथील सैन्याच्या व आपल्या पानिपतयेथील सैन्याच्या मध्यें धरिलें होतें. अबदालीला समूळ चीत करण्यास २५ अक्टोबरपासून १५ नोव्हेंबरपर्यंत उत्तम संधि होती. ह्या अवधींत अबदालीच्या लष्करांत अत्यंत महर्गता होती; मराठ्यांनीं २ नोव्हेंबराला अबदालीचा सामान्यसा पाडाव केला होता व अबदालीहि मराठ्यांचें अकटोविकट सैन्य पाहून भयभीत झाला होता. ह्यासंबंधानें ५ नोव्हेंबरला कोल्हापूर येथील जोशीराव यांचा पूर्वज कृष्ण जोशी संमेश्वरकर लिहितो:—" श्रीमंतांनीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय झालें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक यवनाचे समक्ष उभे राहून, नित्य शेंपन्नास यवन मारून उंट घोडीं आणितात. दोन हत्ती पेंढारी यांणीं काल आणिले. यवनाच्या सैन्यांत महर्गता झाली आहे. आमच्या सैन्यांत सवंगाई आहे. आणखी दोन चार दिवसांत यवन चालोन तोफांवरी येईल तरी क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. सर्व सैन्यास उत्साह आहे कीं अबदाली व नजीबखान व सुजाउद्दौला आठा चौं दिवसांत क्षयास जातील. अबदाली शहानशाहा म्हणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत. परंतु तो दो कोसांवरी येऊन, आठ दिवस बसोन, कांहीं पराक्रम होत नाहीं. यासुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं. युद्ध करावें तरी परिणाम नाहीं. उगेंच बसावें तरी भक्षावयास नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे (लेखांक २६५)." ह्याप्रमाणें अबदालीची दुःस्थिति होती. तिचा पूर्णपणें नफा घेण्याचा सदाशिवरावाचा विचार होता. परंतु, एका गोविंदपंताच्या कुचराईमुळें सर्व कांहीं बिघडण्याच्या रंगास येण्याचीं चिन्हें दिसत होतीं. गोविंदपंताच्या कुचराईसंबंधानें नारो शंकर ७ नोव्हेंबराला लिहितो:—" दाजीवा! आणीक सर्व कामें एकीकडे ठेवून, रात्रीचा दिवस करून दाखवावयाचा प्रसंग असतां, तुम्ही यावयास ढील करतां, यावरून काय म्हणावें? पत्र

पावतांच जेथें असाल तेथून कुच करून दुमजला येऊन पोहोंचणें. तुम्हांपाशीं दहा हजार फौज असोन पंचवीस लाख रुपये खात असतां, खावंदास कामाची निकड असतां, तुम्ही लटके बहाणे करून मुलखांत रहावें हे गोष्टी तुम्हांस योग्य नाहीं! खावंद वारंवार लिहितात, तुम्ही गडीकोटांचे बहाणे लिहितां, हा सेवकलोकांचा धर्म नव्हे (लेखांक२४३)." भाऊसाहेबानें अबदालीचें पारपत्य करण्याची आपल्याकडून होईल तितकी उत्तम तयारी केली होती. इब्राईमखानाच्या तोफखान्याचा मजबूत आधार असल्यामुळें भाऊनें स्वतः मोगलाइ पद्धतीनें लढण्याचा विचार केला व गोविंदपंतास गनीमी तऱ्हेनें शत्रूस भंडावून सोडण्यास सांगितलें ( लेखांक २६०,२४४, टीप ३१७ ). गोविंदपंताच्या गनीमी लढाईची वाट भाऊनें बरेच दिवस पाहिली व शेवटीं १५ नोव्हेंबरला येणेंप्रमाणें गोविंदपंतास लिहिलें:— " लिहिलेप्रमाणें एकहि काम होऊन न आलें. फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें, त्याचें सार्थक केलें! अजून तरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोहोंचणें " (लेखांक २६८). परंतु गोविंदपंत वेळेवर कसचा येऊन पोहोंचतो! त्याच्या मनांत भाऊचा पक्का अंत बघावयाचा होता व त्याशिवाय त्याला दुसरें गत्यंतर नव्हतें. आजपर्यंत केलेलीं सर्व पापें झांकण्याची सोय मराठ्यांवर कांहींतरी भयंकर विपत्ति आल्यावांचून लागण्यासारखी नाहीं हें पंतमजकूर जाणून होता. तेव्हां भाऊला मदत न करण्याची व्यवस्था आपल्याकडून जेवढी होईल तेवढी हा इसम करून चुकला. इकडे भाऊनें मात्र आपली हिंमत शेवटपर्यंत सोडिली नाहीं. आपल्या सैन्यांतील लोक एकदिलानें लढतील याची भाऊला शंका नव्हती. शिवाय यवनांनीं कधीं पाहिला नव्हता असला तोफखाना भाऊच्या पदरीं होता. सारांश, भाऊ सैन्याच्या उपकरणांच्या बाबतींत अबदालीहून सर्वप्रकारें श्रेष्ठ होता. परंतु एका गोष्टींत १५ नोव्हेंबरच्या पुढें भाऊचें व्यंग पडूं लागलें. तें हें कीं, अबदालीला रसद अंतर्वेदींतून यथेच्छ मिळूं लागली व भाऊची रसद दिल्लीकडून येण्याचें मान दिवसेंदिवस कमी होत चाललें. अबदालीला उठवून लढाईला आणण्याचा भाऊनें वारंवार प्रयत्न केला. परंतु, अबदाली चिरडीस जाऊन आपल्या गोटाच्या बाहेर स्वतः बरेच दिवस पडला नाहीं. अबदालीच्या मनांत निराळाच डाव होता. जी विपत्ति अबदाली १५ नोव्हेंबराच्यापूर्वीं स्वतः भोगीत होता तीच किंवा त्याहूनहि भयंकर अशी विपत्ति आतां मराठ्यांना भोगण्याची पाळी आली. तेव्हां उपासमारीनें मराठ्यांना पूर्ण जेरीस आणून मग त्यांचें यथेच्छ पारपत्य करण्याचा अबदालीनें बेत केला.

भाऊ या वेळीं अबदालीच्या कचाटींत पक्का सांपडला. १५ नोव्हेंबरपासून १४ जानेवारी १७६१ पर्यंत मराठी सैन्याची आस्ते आस्ते उपासमार होत चालली होती. तरी भाऊची उमेद व हिंमत जशी होती तशीच होती. २३ नोव्हेंबराला अबदालीचें व भाऊचें पाहिलें म्हणण्यासारखें युद्ध झालें. ( टीप ३२३ नानाफडणिसाचें पत्र ). त्याच्या अगोदर ८ नोव्हेंबराला कृष्ण जोशी संगमेश्वरकर गोळा लागून ठार झाला होता. २३ नोव्हेंबरच्या लढाईत जनकोजी शिंद्यांच्या हस्तें अबदालीचा पराजय झाला. त्यांजकडील सहाशेंपावेतो माणूस जाया झालें व आपल्याकडील दोन अडीचशेंपर्यंत झालें. आपल्या सैन्यानें त्यांच्या

लोकांना त्यांच्या गोटांत नेऊन घातलें. पुढें दुसरें युद्ध ७ डिसेंबरीं अस्तमानीं झालें ( नानाचें पत्र ). त्यांतहि अबदालीचाच पराजय झाला. त्याजकडील दीड हजार माणूस त्यांच्याच आराब्यापुढें पडलें होतें. आपल्या आराब्यापुढें त्याजकडील माणूस किती पडले होते त्याचा नानाफडणिसानें आंकडा दिला नाहीं. आपल्याकडील सुमारें दीडशें माणूस ठार व पांच सहाशें जखमी झालें होतें. ह्यावरून ह्याहि लढाईत मराठ्यांना जय मिळाला होता हें स्पष्ट आहे. परंतु ह्या लढाईत एक मोठी हानि झाली. बळवंतराव मेहेंदळे ठार झाला. त्यामुळें तिकडील लोकांना बहुत समाधान झालें. आपली मदत नसतांहि, उलट आपण होईल तितकी कुचराई केली असतांहि भाऊसाहेबांचें सैन्य उत्तरोत्तर विजयीच होत चाललें आहे हें ऐकून व नारो शंकरादि मंडळीनें तोंडांत शेण घातलें तेव्हां गोविंदपंताच्या मनांत कांहीं निराळी भावना होऊन, पंतमजकुरांनीं चार लाख रुपये घेऊन दिल्लीचा रस्ता धरिला. गोविंदपंताला दिल्लीकडे येण्यास दुसरेंहि एक कारण झालें. श्रीमंत नानासाहेब पेशवे स्वतः पंचवीस तीस हजार फौज घेऊन भाऊच्या साहाय्यास कुच करून निघाले व सुमारें ब्ऱ्हाणपुऱ्यापर्यंत आले, ही वातमी गोविंदपंताला कळली. तेव्हां श्रीमंतापाशीं अब्रू राहावी ह्या हेतूनें गोविंदपंत २२ डिसेंबराच्या सुमाराला दिल्लीस आला. आणिलेली रक्कम नारो शंकराच्या स्वाधीन करून पंतांनीं पानिपतच्या रोखानें गाजुद्दिनगराकडे कुच केलें. परंतु त्या शहाराजवळ अबदालीचा सरदार अताईखान ह्यानें गोविंदपंताला २२ डिसेंबरीं गाठून ठार केलें ( लेखांक २७२ ). कोणत्याहि हेतूनें कां होईना गोविंदपंताच्या हातून ह्यावेळीं अबदालीची रसद बंद केली गेली असती तरी देखील भाऊचें हित झालें असतें. परंतु, राजीखुशीनें ज्याच्या हातून पूर्वी हित झालें नाहीं त्याच्या हातून धन्याच्या भितीनें, लोकांच्या लज्जेनें किंवा फलाच्या आशेनें आतांहि हित होऊंच नये असाच ईश्वरी संकल्प होता असें दिसतें. गोविंदपंत जिवंत होता तोंपर्यंत अबदालीला कदाचित् शह बसेल व मराठ्यांना कदाचित् रसद मिळेल अशी आशा करण्यास जागा होती. गोविंदपंत वारल्यावर ह्या कादाचित्कत्वाचाहि लोप होऊन बाहेरून साहाय्य मिळण्याचा मराठ्यांना फारच थोडा संभव राहिला. २ जानेवारी १७६१ रोजीं पाराशरदादाजी हजार पांचशें स्वार व दीड लाख खजिना घेऊन दिल्लीहून पानिपताकडे जावयास निघाला ( लेखांक २८१ व टीप ३२४ ). तो चार जानेवारीला अबदालीच्या लष्करांत चुकून गेला. तेथें कांहीं स्वार मारले गेले, कांहीं मराठ्यांच्या लष्कराकडे निसटले व कांहीं दिल्लीकडे परत आले. हा मराठ्यांना साहाय्य करण्याचा दुसरा व शेवटला प्रयत्न झाला.

येथें पानिपतच्या मोहिमेसंबंधीं ह्या पुस्तकांतील अस्सल पुरावा संपला. ह्यापुढें पानिपतास मराठ्यांचें काय झालें तें बखरींवरून व तवारिखांवरून ढोबळ रीतीनें कळण्यासारखें आहे. १७६१ च्या १४ जानेवारीला झालेल्या पानिपतच्या शेवटल्या युद्धासंबंधीं ( टीप ३२४ ) आजपर्यंत अस्सल असें एकहि चिटोरें उपलब्ध झालें नाहीं. आरळ्याचा कुळकर्णी नारो भगवंत ह्याची ग्रांट डफ्नें घेतलेली जबानी मात्र अस्सल समजण्यास हरकत

नाहीं. परंतु ती पानिपतच्या युद्धाच्या एका शेवटल्या क्षुल्लक प्रसंगासंबंधीं असल्यामुळे युद्धाच्या हकीकतीवर प्रकाश पाडण्यास तिचा विशेष उपयोग नाहीं. अस्सल पुराव्याची कांहीं तरी कसोटी जवळ असल्याशिवाय बखरींतलि किंवा तवारिखेंतील अमुक मजकूर विश्वसनीय आहे व अमुक नाहीं हें सांगणें निव्वळ पक्षपाताचें व आग्रहाचें होईल. पानिपतच्या शेंवटच्या युद्धांत विश्वासराव मरेपर्यंत मराठ्यांना जय मिळाला किंवा नाहीं: विश्वासराव वारल्यावर भाऊच्या मनांत परत जावयाचें असतां, जेव्हां अबदाली चाल करून आला तेव्हां भाऊला निरुपायानें त्याला तोंड देणें भाग पडलें किंवा नाहीं; मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड ह्यांनीं लढण्याच्या कामीं कांहीं कसूर केली किंवा कसें: वगैरे वरेच प्रश्न सोडवावयाचे आहेत; परंतु अस्सल कागदपत्र एखादें सुद्धां जवळ नसल्यामुळें व्यर्थ, किंवा फार झालें तर किंचित् संभाव्य असा निर्णय काढण्याच्या कोरड्या खटपटींत पडण्याची माझी इच्छा नाहीं व कांहीं फायदाहि नाहीं. शिवाय खुद्द लढाईसंबंधीं अस्सल कागदपत्रें पुढें मागें बाहेर येण्याचा संभव नाहींच असें नसल्यामुळें मी त्या वादांत सध्यां शिरत नाहीं. बाकी तो वाद बराच महत्त्वाचा व मनोरंजक होण्याचा संभव आहे.

ह्या विवेचनाच्या आतांपर्यंतच्या भागावरून एवढें स्पष्ट आहे कीं, पानिपतच्या मोहिमेचें अपयश जर कोणाच्या माथीं मारावयाचें असेल तर त्या शिक्षेला गोविंदपंत बुंदेले हाच सर्वथैव पात्र आहे. अबदालीच्या पेंचामुळें गोविंदपंताला भाऊकडे येतां आलें नाहीं असा बिलकूल प्रकार नव्हता. मुद्दाम बहाणे करून व सबबी सांगून ह्या गृहस्थानें भाऊला मदत करण्याचें टाळिलें व आपल्या ह्या देशावर महत् संकट आणिलें. गोविंदपंतानें सदाशिवरावभाऊला मदत तर केली नाहींच, परंतु सुजाउद्दौला, अबदाली, अलीगोहर, मीरजाफर ह्या लोकांकडील बातमी देखील जी वेळोवेळ पाठविली ती पुष्कळदां खोटी असे. खरी बातमी काढावयाचाहि ह्या नीच गृहस्थानें प्रयत्न केला नाहीं. लेखांक २२६ त गोविंदपंत लिहितो कीं अबदाली शुक्रतालावर जाऊन छावणी करणार आहे. परंतु ही बातमी खरी नव्हती. वास्तविक प्रकार असा होता कीं अबदाली शिकंदऱ्यावरच होता. लेखांक २२७ त गोविंदपंत लिहितो कीं मीरजाफर, मिरन व रामनारायण ह्यांना खातरजमेचें पत्र पाठवावें. परंतु वास्तविक प्रकार असा होता कीं जुलैंत मिरन वीज पडून मेला, मीरजाफर मेला किंवा कलकत्त्यास गेला ह्याचा पत्ता नव्हता व पाटणा येथलि सर्वाध्यक्षत्व रामनारायणाकडे आलें होतें. दोन्ही पत्रांत केलेल्या चुका गोविंदपंताला सदाशिवरावानें दाखवून दिल्या आहेत. येणेंप्रमाणें गोविंदपंताच्या ह्या खोटेपणाचा हा असा वृत्तांत आहे. दुसरा अपराधी इसम म्हटला म्हणजे मल्हारराव होळकर होय. ह्याच्या कृत्यांची याद मागें मीं १७६० पर्यंत आणून पोहोंचविली आहेच. तींत १७५४ व १७५५ त जयाप्पाला दगा करण्यासंबंधीची त्यानें केलेली सूचना व १७६०त दत्ताजीला साहाय्य करण्यास केलेला दिरंग ह्यांचा उल्लेख झालाच आहे. आतां पानिपतच्या मोहिमेंत ह्यानें कांहीं स्वदेशाच्या अहिताचीं कृत्यें केलीं आहेत किंवा कसें तें पाहावयाचें आहे नजीबखान, सुजाउद्दौला.

माधोसिंग, बिजेसिंग व सुरजमल जाट ह्यांच्याशीं मल्हाररावाचें रहस्य वाजवीहून फाजील होतें हें सर्वप्रसिद्ध आहे व ह्या ग्रंथांतूनहि त्याचा अधूनमधून उल्लेख आला आहे. लेखांक २०२ त "अबदालीस खूब तंबी करावी; मल्हाररावाचा या गोष्टीविशीं संशय न आणावा; तेहि याच कामावर तयार आहेत" म्हणून सदाशिवरावभाऊनें सुजाउद्दौल्याला लिहिलें आहे. ह्यावरून एक गोष्ट निष्पन्न होते. ती ही कीं अबदालीस तंबी देण्याचा मल्हाररावाचा निश्चय झाला नव्हता किंवा इच्छा नव्हती असा संशय येण्यास सुजाउद्दौल्याला कारण झालें होतें. मल्हाररावाच्या मनांत नजीबखानाला राखावयाचें फार पूर्वीपासूनच होतें. अबदालीला तंबी द्यावयाची म्हणजे नजीबखानाला तंबा व्हावयाचीच. तेव्हां अबदालीचें पारपत्य करण्याची इच्छा मल्हाररावाची नव्हती असा संशय दृढ होण्यास कांहीं कारणें आहेत हें स्पष्ट आहे. प्रस्तुत ग्रंथांत मल्हाररावासंबंधी पत्रव्यवहार बहुतेक मुळींच नसल्यामुळें, मल्हाररावाविरुद्ध साक्षात् पुरावा कांहींच आणितां येत नाहीं. परंतु मल्हाररावाच्या पूर्वीच्या वर्तनावरून व लेखांक २०२ तील सुजाउद्दौल्याच्या संशयावरून ह्या गृहस्थानें पानिपतच्या मोहिमेंत व युद्धांत कुचराई केली असावी असा बळकट तर्क करितां येतो. पानिपतच्या मोहिमेंत कुचराई केल्याबद्दल आणि अबदालीशीं व नजीबखानाशीं अंतस्थ रीतीनें व्यवहार केल्याबद्दल पहिल्या माधवरावानें मल्हाररावाचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड यास तोब्याखालीं बडविलें होतें हें सुप्रसिद्ध आहे. ह्या आख्यायिकेवर जरी विशेष भिस्त ठेविली नाहीं तत्रापि मल्हाररावाच्या स्वामिभक्तीविषयीं व देशभक्तीविषयीं विकल्प घेतां येतो हें निर्विवाद आहे. सुरजमलजाट दिल्लीस मराठ्यांच्या सैन्यांतून रुसून सबलगडास गेला व आपल्या मुलाला भाऊकडे पाठवून देण्याचा त्यानें विचार केला ह्या गोष्टींचा उल्लेख ह्या ग्रंथांतील पत्रांत आला आहे ( लेखांक २५९, २३४ २४४, २१६, २१५ ). सुरजमलजाट मराठ्यांच्या विरुद्ध गेला नाहीं व अबदालीलाहि त्यानें मदत केली नाहीं. परंतु अबदालीच्या विरुद्धहि पण तो गेला नाहीं. गोविंदपंताच्या बरोबरीनें किंवा खालोखाल कुचराई करणारे गृहस्थ म्हटले म्हणजे गोपाळराव गणेश बर्वे व गणेश संभाजी खांडेकर हे होत. पहिले रघुनाथरावदादाचे निकट संबंधी होते. ह्यांनीं अंतर्वेदींत राहून अबदालीला पायबंद देण्याचें काम केलें नाहीं. हे गोविंदपंतांच्या दिमतीला असल्यामुळें गोविंदपंताच्या हुकुमाप्रमाणें ह्यांना वागावें लागलें असेल हें उघड आहे. गणेश संभाजीचें पाऊल गोपाळराव गणेशाच्या थोडें पुढें होतें. त्यानें अंतर्वेदींत अबदालीला पायबंद देण्याचें काम तर केलें नाहींच; उलट बुंदेलखंडांत पृथुसिंग वगैरे संस्थानिकांशीं ह्याच वेळीं भांडणतंटे उपस्थित करून सदाशिवरावाला ह्या संस्थानिकांकडून कांहीं साहाय्य करून घ्यावयाचें तें देवविलें नाहीं ( लेखांक २५६, २५७ ). गोपाळराव गणेश व गणेश संभाजी हे दोघे इसम रघुनाथरावाच्या पुढ्यांतील होते. ह्यांना कदाचित् सखाराम बापूची शिकवणी असल्यास न कळे.

येथपर्यंत गोविंदपंतादि मंडळींच्या कृत्यांचा विचार झाला. आतां सदाशिवरा[illegible] वर्तनांत कांहीं कमीपणा दिसतो कीं काय तें पाहूं. १५ नोव्हेंबर १७६० पर्यंत [illegible] भाऊच्या

[illegible] [illegible]वरावाचें

वर्तन जसें असावें तसेंच होतें. गोविंदपंत अवदालीच्या पाठीमागून येऊन त्याची रसद बंद करील ह्या आशेवर भाऊ पानिपतास तळ देऊन बसला हें रास्त होतें. परंतु १५ नोव्हेंबराच्या सुमाराला गोविंदपंतावर विश्वास व भिस्त ठेवण्यांत अर्थ नाहीं हें भाऊला पक्कें कळून चुकलें होतें. यद्यपि भाऊच्या सैन्याचा जोर अवदालीपेक्षां जास्त होता, तत्रापि दाणागल्ला मिळण्याच्या दिवसेंदिवस कमी होत जाणाऱ्या संभवामुळे सदाशिवरावभाऊनें आवदलीशीं मोठ्या कडाक्याचें युद्ध मुद्दाम करून त्याचा शह टाळावयाचा होता किंवा त्या प्रकारानें शह टळत नसल्यास त्याची फळी फोडून दिल्लीकडे निघून यावयाचें होतें. ह्यापैकीं पहिल्या मार्गाचा अवलंब भाऊनें १५ नोव्हेंबरापासून ७ डिसेंबरपर्यंत करून पाहिला. ह्या अवधींत अवदालीशीं दोन बरींच मोठीं युद्धें झालीं परंतु ह्या दोन्हीं युद्धांत स्वतः अवदाली लढाईला मुळींच आला नाहीं व त्याची वदनक्षी जी व्हावयाला पाहिजे होती तीहि झाली नाहीं. मराठ्यांना ह्या दोन्ही युद्धांत जय मिळाला हें निर्विवाद आहे; परंतु त्या जयापासून अवदालीचें फारसें नुकसान न होतां मराठ्यांचाहि मोठासा नफा झाला असें नाहीं. मराठ्यांची जी १५ नोव्हेंबरला स्थिति होती तीच किंवा त्याहून अधिक निकृष्ट अशी दशा ७ डिसेंबराच्या पुढें झाली. ह्या वेळीं दुसऱ्या मार्गाचा अवलंब, म्हणजे अबदालीची फळी फोडून दिल्लीकडे जावयाचा प्रयत्न, भाऊनें करणें जरूर होतें व कित्येक सरदारांनीं ही सूचना केली देखील होती. ती अमलांत आणण्याचें सामर्थ्य भाऊच्या अंगीं नव्हतें असें नाहीं. भाऊ जर सडा असता व कबिल्या बुणग्यांनीं त्याच्या हालचाली जखडल्या नसत्या तर अबदालीची फळी फोडून जाणें अशक्य नव्हते. बुणग्यांचें लटांबर टाकून निघून जाणें शोभण्यासारखें नव्हतें हें कबूल आहे; परंतु, एकंदर सारासार विचार करितां बुणग्यांना सोडून किंवा त्यांना पानिपतच्या गढींत ठेऊन देशावर येणारी आत्यंतिक हानि टाळण्याकरितां, सदाशिवरावानें जर अबदालीची फळी फोडून दिल्लीकडे कुच केलें असतें, तर त्याला कोणी त्यावेळीं किंवा पुढें मागें दोष देतें असें वाटत नाहीं. जसजसे जास्त दिवस लोटूं लागले तसतशी अबदालीची फळी फोडून जाण्याची भाऊची हिंमत कमी होत चालली व दाणागल्ल्याच्या टंचाईमुळें मराठ्यांचें शरीरसामर्थ्यहि खालावत चाललें. अन्नापाण्यावांचून उपाशीं मरण्यापेक्षां व शत्रूच्या पुढें मृत्यूची स्वस्थ वाट बघत बसण्यापेक्षां फळी फोडून निघून जाणें सर्वस्वीं रास्त होतें. परंतु, तें त्या वेळीं साध्य होतें किंवा नाहीं हें कळण्यास कोठें आधार नाहीं. भाऊनें कबिले बुणगे बरोबर घेतले ही कदाचित् चूक केली असें नारो शंकरानें ध्वनित केलें आहे ( लेखांक २४३ ) व त्यासंबंधानें " निदान " हा शब्द उपयोजिला आहे. आतां भाऊला स्वतःला कबिल्या बुणग्यांची अडचण वाटत होती किंवा नव्हती हें निश्चयात्मक सांगतां येण्यास कांहींच आधार नाहीं. इतकें मात्र खास विधान करितां येतें कीं २३ डिसेंबरपर्यंत भाऊची हिंमत काडीमात्रहि खचली नव्हती. गोविंदपंत वारल्यावर समाधानार्थ बाळाजी गोविंदाला भाऊनें जें २३ डिसेंबरीं पत्र पाठविलें त्यांत " आम्ही आहों, सर्व नीट करूं " ह्या धीराच्या व आश्वासनाच्या शब्दावरून अबदालीचें भय सदाशिवरावाला विशेष वाटत होतें असें दिसत नाहीं ( लेखांक २७२ ). २३ नोव्हेंबरी व ७ डिसेंबरीं झालेल्या युद्धाच्या अनुभवावरून पुढेंहि युद्ध झाल्यास पराजय येईल असें भाऊस वाटत नव्हतें असें ह्या पत्रांतील धीराच्या

व आश्वासनाच्या गोष्टीवरून अनुमान काढण्यास जागा आहे. शत्रूची फळी फोडून दिल्लीकडे निघून जाण्याचा भाऊनें प्रयत्न केला नाहीं त्याचें तरी हेंच कारण असावें. धीराच्या व आश्वासनाच्या मोठमोठ्या गोष्टी भाऊ बोलत असतां ज्याअर्थीं त्याचा १४ जानेवारी १७६१ ला पराभव झाला त्याअर्थीं त्याचें वर्तन धीराचें व शांतपणाचें नसून उद्दामपणाचें व सान्निपातिक होतें असा कोणी कोणी तर्क काढितात. परंतु हा तर्क अवास्तव आहे. शांतपणाबद्दल भाऊची पूर्वीपासून ख्याती होती. सबंद १७६० सालभर गोविंदपंताचें वर्तन किती राग आणण्याजोगें होतें हें आतांपर्यंत दाखवून दिलें आहे. परंतु गोविंदपंताला लिहितांना भाऊच्या हातून एकहि वावगा शब्द पडलेला सांपडावयाचा नाहीं. शिंदेहोळकरांच्याहि मर्जीच्या बाहेर भाऊ कधीं गेला नाहीं. त्यांनीं सांगितल्या रस्त्यानेंच तो आग्र्याकडे गेला. सुरजमल जाटाचें व भाऊचें वाकडें आलें होतें हें खरें आहे; परंतु तें देखील भाऊनें बाहेर कोणाला दिसूं दिलें नाहीं. सारांश भाऊच्या हातून उद्दामपणाचें वर्तन होणें केवळ अशक्य होतें.

२३ डिसेंबरपर्यंत, कदाचित् ४ जानेवारी १७६१ पर्यंत, भाऊच्या हालचालींचा व डावपेंचाचा वृत्तांत दिला आहे. आतां भाऊचा प्रतिस्पर्धी जो अवदाली त्यानें डावपेंच काय केले त्यांचाहि निर्देश केला पाहिजे. १७६० च्या मेंत अवदाली अनुपशहरीं जाऊन बसला. तेव्हांपासून २५ अक्टोबरपर्यंत तो अंतर्वेदींत अनुपशहर व शिकंदरा ह्या दोन ठाण्यांना सोडून कोठें गेला नाहीं. सुजाउद्दौला वगैरे साथीदार मिळवून आणण्याचें काम नजीबखानानें केलें. आगष्टसप्टेंबरांत अवदालीची तर फारच हलाखी झाली होती. त्याच्या गोटांत सर्वत्र फुटाफुट होत चालली होती. सदाशिवरावाला अक्टोबरांत गोविंदपंतानें जर यथास्थित मनापासून मदत केली असती तर अवदाली अगदीं ठार बुडाला असता. अवदालीनें आपण होऊन अमुक एक डावपेंच केला व तो सदाशिवरावाला भोंवला असें कदाचित्च उदाहरण सांपडेल. गोविंदपंताचा आळशीपणा व कुचराई अवदालीच्या कामास आली. दिल्ली व पानिपत ह्यांच्यामध्यें अवदाली सांपडला असतां त्याला कोंडून टाकण्याचें व घाबरवून सोडण्याचें सर्वस्वीं गोविंदपंताच्या हातांत होतें. तें गोविंदपंतानें करावयाचें टाकल्यापासून अवदालीचा फायदा अतोनात झाला. अवदालीनें अमूक एक डाव योजिला व त्यामुळें सदाशिवराव फसला असा प्रकार मुळींच झाला नाहीं. मराठ्यांच्या लष्करांत दुही झाली ती अवदालीच्या पथ्यावर पडली. ह्या दुहीचा अवदालीनें चांगला फायदा करून घेतला. मराठे आपल्यापेक्षां जोरदार आहेत हें अवदाली जाणून होता. तेव्हां मराठे उपासमारीनें अर्धमेले होऊन जात तोंपर्यंत त्यांच्याशीं युद्ध करावयाचें नाहीं हा जो फेबियन डावपेंच तो अवदालीनें चांगला उपयोजिला ह्यांत संशय नाहीं. १४ जानेवारी १७६१ च्या युद्धांत अवदालीनें कोणते पेच केले ते अस्सल पुराव्याच्या अभावामुळें निर्देशितां येत नाहींत. परंतु ती लढाई होईतोंपर्यंत अवदालीनें आपण होऊन अमूक एक योजना केली असेंहि पण सांगतां येणें शक्य नाहीं. शत्रूच्या युक्तीपेक्षां मराठे गोविंदपंतांच्या व मल्हाररावाच्या कुचराईमुळें ही मोहीम हरले हा सिद्धांत मात्र सर्वत्र मान्य व्हावा असा दिसतो.

ह्या विवेचनाच्या प्रारंभीं पानिपतच्या युद्धाची व त्याच्या परिणामाची एकंदर १८ कारणें दिलीं होतीं. त्यांपैकीं कांहींच्या तथ्यातथ्याचा निवाडा करण्याचीं साधनें वर दिलीं आहेत. बाकीं राहिलेल्या कारणां ( ४,५,६,१०,१४ ) चा पानिपतच्या मोहिमेशीं विशेष संबंध आहे असें मला वाटत नाहीं.( १ ) जातिभेदाचा प्रश्न त्यावेळीं मुळीं उद्भवलाच नव्हता. ( २ ) ब्राह्मणांच्या पोटभेदांतहि परस्पर वैमनस्य वाढून पानिपत येथें मराठ्यांचा पराभव झाला असें विधान करण्यास अद्यापपर्यंत कांहींच आधार पुढें आला नाहीं. रघुनाथरावदादा, सखारामबापु, महादोबा पुरंधरे, गोपाळराव पटवर्धन, गोपाळराव गणेश. गोविंद बल्लाळ, मल्हारराव होळकर, ह्यांचा १७५० पासून १७६२ पर्यंतचा आणखी बराच खाजगी पत्रव्यवहार सांपडल्यावांचून ह्या प्रश्नाचा उलगडा यथास्थित व्हावयाचा नाहीं व तोंपर्यंत त्यासंबंधीं मूकव्रत आचरणेंच श्रेयस्कर होईल. ( ३ ) हिंदुस्थानांत त्यावेळीं राष्ट्रियत्वाची आधुनिक कल्पना सर्वत्र पसरली नव्हती हें खरें आहे. ती पसरविण्याचाच तर मराठ्यांचा मुख्य प्रयत्न होता. महाराष्ट्रधर्माची पताका घेऊन मराठे १६४० त जे निघाले ते तिला आस्ते आस्ते हिंदुस्थानांत सर्वत्र हिंडवीत असतां त्यांच्यावर १७६१ त हा घोर प्रसंग आला. हा प्रसंग येण्याच्यापूर्वीं कित्येक प्रांतांत महाराष्ट्रधर्माचा प्रसार झाला होता व कित्येक प्रांतांत व्हावयाचा होता. उत्तरेकडील प्रांतांत तो झाला नव्हता म्हणून तर तत्रस्थ हिंदूलोकांनीं यवनांचें साहाय्य केलें व मराठ्यांचा द्वेष केला. हा द्वेष कां झाला त्याचा विचार पुढील विवेचनांत करितों. परंतु पुढील विवेचनाला प्रारंभ करण्यापूर्वीं मराठ्यांच्या काटपणासंबंधीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं अनन्यसामान्यत्वेंकरून एखादा जर कोणता गुण असेल तर तो त्यांच्या अंगचा काटकपणा हा होय. विलास आणि मराठा ह्या दोन अर्थांची व्याप्ति मागेंहि कधीं झाली नाहीं व पुढेंहि कधीं होईल असा रंग दिसत नाहीं. साधी रहाणी आणि उच्च विचार हे दोन गुण मराठ्यांच्या स्वभावाचे मुख्य घटक होत. पैकीं उच्च विचाराचा विसर मराठ्यांना अधून मधून कधीं पडला असेल; परंतु साधी रहाणी मराठ्यांनीं आजपर्यंत कधींहि सोडलेली इतिहासांत माहीत नाहीं. साध्या रहाणीची, काटकपणाची व विलासपराङ्मुखतेची संवय मराठ्यांच्या अंगीं १७५० पासून १७६१ पर्यंत कितपत होती हें पहावयाचें असल्यास त्यावेळच्या पुढाऱ्यांच्या हालचालींचें प्रेक्षण करावें म्हणजे झालें. मागें बाळाजी बाजीराव. सदाशिव चिमणाजी, रघुनाथ बाजीराव, विश्वासराव, जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी, वगैरे पुढाऱ्यांच्या हालचालींचे तक्ते दिले आहेत त्यावरून विलास करण्याला ह्या पुरुषांना किती वेळ सांपडत असेल त्याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. बाळाजी बाजीराव विलासी व आळशी होता म्हणून ग्रांटडफ् वगैरे लोक म्हणतात त्यांत बिलकूल तथ्य नाहीं. बाळाजी बाजीरावाचा सालवार इतिहास ग्रांटडफला माहीत नव्हता; त्यामुळें ज्या वर्षांचा इतिहास माहीत नसेल त्या वर्षीं बाळाजी बाजीराव विलास करीत असे असा डफचा अंदाज आहे. परंतु. मागें दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल कीं १७५० पासून १७६१ च्या जूनपर्यंत एकाहि वर्षीं पावसाळ्याखेरीज बाळाजी पुण्यास नव्हता. प्रत्येक वर्षाचे आठ महिने बाहेर

काढण्याचा त्याचा परिपाठ असे. १७३८ पासून १७५० पर्यंतहि बाळाजी एकसारखा हिंडत होता हें दाखवून देण्यास साधनें आहेत. इ.स.१७३८।३९ हीं दोन सालें बाळाजी साताऱ्यास होता. १७४० च्या मार्चएप्रिलांत बाळाजी पुण्यास होता (का. पत्रें, यादी ५८) शाहूमहाराज यांच्या चरित्रांत (पृष्ठ १६१ राजश्री गोगटे म्हणतात कीं, बाळाजी १७४० च्या एप्रिलांत साताऱ्यास होता; परंतु तें काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें यादी ५८ वरून बरोबर नाहीं. १७३९ च्या १७ एप्रिलास बाळाजी साताऱ्यास होता (का. पत्रें, यादी ४५). १७४० च्या एप्रिलपासून जूनपर्यंत बाळाजी कोंकणांत आंग्रयाच्या मदतीला गेला होता (का. पत्रें, यादी ५८). १७४० च्या नोव्हेंबरपासून १७४१ च्या एप्रिलपर्यंत बाळाजी निजाम, भोसले ह्यांच्या राज्यांत व हिंदुस्थानांत गेला होता. १७४१ च्या जुलैपासून अक्टोबरपर्यंत बाळाजी साताऱ्यास होता. १७४१ च्या नोव्हेंबरपासून १७४२ च्या सप्टेंबरपर्यंत तो धारेस होता. १७४२ च्या अक्टोबरपासून १७४३ च्या जूनपर्यंत जयपूर, काशी, प्रयाग, बंगाला वगैरे प्रांतांत होता. १७४३ च्या जूनपासून सप्टेंबरपर्यंत पुण्यास होता. १७४३ च्या अक्टोबरांत स्वारी साताऱ्यास जाऊन १७४४ च्या एप्रिलमेंत पुण्यास आली. १७४४ च्या नोव्हेंबरांत नाशिकावरून कोंकणांत शिरून डिसेंबरांत पुण्यास आला. १७४५ च्या जानेवारींत भेलशावर स्वारी करून आगष्टांत पुण्यास आला. १७४५ च्या नोव्हेंबरांत साताऱ्यास जाऊन तेथून १७४६ च्या मार्चांत निरोप घेऊन स्वारी पंढरपुरास गेली (का. पत्रें, यादी ६८) व जूनांत पुण्यास आली. तेथून तो कोंकणांत सप्टेंबरांत जाऊन १७४७ च्या मार्चएप्रिलांत पुण्यास आला. १७४७ च्या डिसेंबरांत खानदेश, बेदर वगैरे निजामाच्या प्रांतांत जाऊन १७४८ च्या मार्चएप्रिलांत पुण्यास आला. १७४८ च्या सप्टेंबरांत हिंदुस्थानांत मकसुदाबाद, प्रयाग वगैरेवर स्वारी करून. १७४९ च्या आगष्टांत साताऱ्यास आला. १७४९ च्या डिसेंबराच्या १५ व्या तारखेस शाहूराजा वारला. त्यावेळीं बाळाजी साताऱ्यास होता व पुढें १७५० च्या जानेवारींत नवा राजा करून एप्रिलांत बाळाजी पुण्यास आला. रा. गोगटे वगैरे मंडळी शाहूच्या मृत्यूचें साल १७४८ देतात. परंतु, ती चूक आहे. १७५० च्या पुढील बाळाजीच्या हालचालींचा तख्ता मागें दिलाच आहे. ह्यावरून इतकें समजून येईल कीं १७३८ पासून १७६१ पर्यंत बाळाजी सबंद वर्षभर अमुक एक ठिकाणीं सतत कधींच राहिला नाहीं. सदा चोहोंकडे फिरण्यांत त्याचा वेळ गेला. हीच स्थिति बाकीच्या पुढाऱ्यांची व सामान्य सैनिकांची होती. पावसाळ्यांत छावणींत असतांना या लढवय्यांना विलास करण्यास कितपत सोय व साधनें असत तें समजण्यास मजजवळ सामग्री नाहीं. पावसाळाखेरीज करून बाकीचे आठ महिने सर्व हिंदुस्थानभर घिरट्या घालण्यांत हाडांचीं काडें ह्या पुढाऱ्यांना व शिपायांना करावीं लागत हें सिद्ध करण्यास हवीं तितकीं साधनें आहेत.

आतां आणखी एका मुद्याचा विचार करून हें विवेचन संपवितो. गिलज्यांच्या धिप्पाड व अर्बुज शरीरांपुढें मराठ्यांच्या लहान व वामनमूर्तींचा टिकाव लागला नाहीं म्हणून एक आक्षेप आहे. गिलज्यांच्या लांबीरुंदीपेक्षां मराठ्यांच्या शरीराचें क्षेत्रफळ कदा-

चित् लहान असेल; परंतु लढाईंत ह्या क्षेत्रफळावरच मोठी भिस्त असते असें नाहीं. जर्मन, फ्रांक ह्या रानटी लोकांच्या लांबीरुंदीपेक्षां सीझराच्या रोमन सैनिकांची उंची व रुंदी, कमी असे. परंतु, फ्रांक लोकांच्या पाव अर्धा फूट उंचीचा वचपा रोमनलोक भयंकर रीतीनें भरून काढीत हें प्रसिद्ध आहे. तोच प्रकार मराठ्यांचा होता. कर्नाटकांतील राठ व धिप्पाड शेतकरी, मथुरा वृंदावनांतील गलेलठ्ठ बैरागी, पंजाबांतील उंच, धिप्पाड व ढिसूळ शीख, रजपुतान्यांतील रुंद छाताडाचे व भरगच्च मासाचे राठोड, ह्यां सर्वांना लहान्या परंतु कांटक मराठ्यांनीं वेळोवेळां चीत केलें होतें. त्या मराठ्यांना अर्बुज गिलज्यांचें किंवा पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि मनुष्याचें भय मागें कधीं वाटलें नाहीं व पुढें कधीं वाटणार नाहीं. १४ जानेवारी १७६१ च्या लढाईंत मराठ्यांचा पराजय झाला म्हणून जर गिलज्यांच्या धिप्पाडपणाचे पोवाडे गावयाचे असतील तर २३ नोव्हेंबर व ७ डिसेंबर १७६० च्या लढायांत मराठ्यांचा जय झाला म्हणून गिलज्यांच्या धिप्पाडपणाचें क्षुल्लकत्वहि वर्णन करणें जरूर आहे. तात्पर्य, शरीराच्या लहानमोठेपणाचा परिणाम पानपतच्या लढाईंत कांहींच झाला नाहीं. कां कीं मराठी सैन्यांत येथून तेथून सर्व मराठेच होते असा प्रकार बिलकुल नाहीं. मराठे सैन्य पंचमेळ असे. परदेशी, मराठे, मुसुलमान, आहीर, अडारु आरब, रजपूत, वगैरे सर्व प्रकारचे लोक मराठी सैन्यांत असत.

## विवेचन सहावें.

मराठ्यांचें हिंदुस्थानांत कार्य काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या व तिसऱ्या विवेचनांत बहुतेक उल्लेखिलेंच आहे. ह्या विवेचनांत त्याचा निर्देश आणखी विस्तृत करून दाखवितों. मराठ्यांचें हिंदुस्थानांत मुख्य कार्य म्हटलें म्हणजे महाराष्ट्रधर्माचा प्रसार करणें हें होय. समर्थांनीं ज्याला महाराष्ट्रधर्म म्हणून संज्ञा दिली तो केवळ हिंदुधर्मच नव्हे. महाराष्ट्रधर्मांत स्वराज्यस्थापनेचा व गोब्राह्मणप्रतिपालनाचाहि अंतर्भाव होतो. हिंदुधर्म, स्वराज्य व गोब्राह्मण-प्रतिपालन ह्या तीन गोष्टींची स्थापना करावयाची म्हटलें म्हणजे राष्ट्रांतील लोकांची एकी झाली पाहिजे व त्या एकीचा पुढाकार करण्यास कर्त्या लोकांनीं पुढें सरसावलें पाहिजे. हीहि गोष्ट त्यावेळच्या मराठ्यांच्या स्पष्टपणें ध्यानांत आली होती. मराठ्यांखेरीज हिंदुस्थानांतील इतर लोकांच्या ध्यानांत ही गोष्ट अगदींच आली नव्हती असें नाहीं. हिंदुधर्माची स्थापना व गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलें पाहिजे ही कल्पना शीख लोकांच्या व बुंदेल्यांच्या डोक्यांत अकबराच्या वेळेपासून, कदाचित् त्याच्याहि पूर्वीं, आली होती असें म्हणण्यास आधार आहे. परंतु ही कल्पना साक्षात् सिद्ध करून दाखविण्यास जी तडफ, जो निश्चय, जी जूट व जें पुढारपण लागतें त्याचें अस्तित्व ह्या लोकांच्या ठायीं होतें असें इतिहासावरून दिसत नाहीं. सुदैवानें ह्या गुणांचें अस्तित्व त्या काळीं मराठ्यांच्या अंगीं होतें व म्हणूनच त्यांच्या हातून स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन झालें. १६४६ पासून १७०७ पर्यंत महाराष्ट्रधर्माची शुद्ध कल्पना महाराष्ट्रांत विराजत होती. तोंपर्यंत हिंदुधर्माचा, स्वराज्याचा व गोब्राह्मणांचा छल अवरंगझेबाच्या हातून होत होता. त्याच्यापुढें हा छल बंद झाला, स्वराज्याची स्थापना झाली आणि गोब्राह्मणांची व हिंदु-

धर्माची दीन दशा कायमची संपली. १७२० च्या सुमारास महाराष्ट्रांत महाराष्ट्रधर्माची पूर्ण स्थापना झाली व महाराष्ट्रांतील हिंदुधर्माला व गोब्राह्मणांना कोठूनहि भीतीचें कारण उरलें नाहीं. सारांश, स्वराज्याच्या स्थापनेमुळें महाराष्ट्रांतील लोकांना सुखाचे दिवस दृष्टीस पडले. परंतु महाराष्ट्राबाहेरील प्रांतांतील लोकांना महाराष्ट्रांतील लोकांच्या सुखाचें वाटेकरी हा वेळपर्यंत होतां आलें नाहीं. खरें म्हटलें असतां अवरंगझेबाच्या कारकीर्दींत यवनांच्या सत्तेला उतरती कळा लागली होती; तेव्हां मराठ्यांच्याप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर लोकांनीं उठाव करून आपल्या प्रांतांत स्वराज्याची स्थापना करून धर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें. परंतु हा पराक्रम त्या लोकांच्या हातून झाला नाहीं. कां कीं, त्या लोकांच्या अंगीं स्वराज्यस्थापनेस एकजूट, पुढारपण वगैरे जे उदात्त गुण लागतात ते नव्हते. शिवाजीच्या प्रोत्साहनानें बुंदेलखंडांत छत्रसालानें कांहीं वेळ यवनांच्याविरुद्ध कंबर बांधिली होती हें खरें आहे. परंतु, मराठ्यांच्याप्रमाणें टिकाव धरून बसण्याइतका चिवटपणा बुंदेल्यांच्या अंगीं नसल्यामुळें स्वराज्याचें बीं त्या प्रांतांत जसें रुजावें तसें रुजलें नाहीं. महाराष्ट्राबाहेरील हिंदुस्थानांतील इतर प्रांतांची ही अशी स्थिति होती. स्वतः त्या लोकांच्या अंगीं स्वधर्माचें संरक्षण व स्वराज्याची स्थापना करण्याचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां ह्या लोकांना यवनांच्या कचाटींतून सोडवून आपल्या अमलाखालीं आणावें व हिंदुधर्माचें व गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावें असा महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांचा त्यावेळीं विचार झाला. १७२० च्या पुढें मराठ्यांनीं आपल्या सत्तेचें जाळें जें सर्वत्र हिंदुस्थानभर पसरिलें त्याचें मुख्य कारण हा विचार होय. १६४६ पासून १७९६ पर्यंत कोणताहि महत्त्वाचा तह घेतला असतां त्यांत स्वराज्याचें व स्वधर्माचें कलम नाहीं असें बहुशः व्हावयाचें नाहीं.

मराठ्यांची सत्ता सर्व हिंदुस्थानभर पसरण्यास वर सांगितलेला विचार मुख्य कारण झाला. ह्या विचारानें प्रोत्साहित होऊन मराठ्यांनीं यवनांच्या हातून १७६० च्या सुमाराला बहुतेक सर्व हिंदुस्थान सोडविलें. परंतु सोडविलेल्या प्रांतांत आपली सत्ता कायम करण्यास जे उपाय योजिले पाहिजेत ते १७२० पासून १७६० पर्यंत योजिले गेले नाहीत. खुद्द महाराष्ट्रांत १६४० पासून १७०७ पर्यंत स्वराज्यस्थापनेच्या वेळीं जे उपाय योजिले गेले त्यांचा उपयोग महाराष्ट्रेतर प्रांतांत १७२० पासून १७६० पर्यंत जे मुत्सद्दी झाले त्यांनीं केला नाहीं. स्वराज्यस्थापनेची कल्पना महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांच्या मनांत जेव्हां प्रथम आली तेव्हां यवनांच्यासंबंधीं द्वेष व स्वधर्मासंबंधीं प्रेम महाराष्ट्रांतील सामान्य जनांच्या मनांत भरवून देण्याकरितां कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्थांच्या द्वारें कित्येक पिढ्या प्रयत्न चालले होते. त्यांच्या योगानें महाराष्ट्रांतील लोकमत जागृत झालें व सर्व लोकांची एकजूट बनविण्याचें बिकट कृत्य साध्य होणें शक्य झालें. पुढें शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची मुहूर्तमेढ १६४६ त रोविल्यावर निराळेंच एक संकट उद्भवलें. तें हें कीं, महाराजांच्या सेवकसमुदायांत म्हणजे मुत्सद्दीमंडळांत व सेनानायकांत परस्पर मत्सरभाव उत्पन्न होऊं लागला व स्वामिहित व देशहित साधण्याच्या कामीं व्यत्यय येऊं

लागले ( समर्थाचा सेवाधर्म, दासबोध ). तेव्हां समर्थांसारिख्या थोर विभूति पुढें येऊन त्यांनीं ह्या स्वामिद्रोहरूपी व देशद्रोहरूपी रोगांचें उत्पाटन केलें ( सेवाधर्म, दासबोध ). आयुष्याची इतिकर्तव्यता काय, स्वामिद्रोह व देशद्रोह केल्यापासून आपलेंच अहित आपण कसें करितों, वगैरे विषयांची चर्चा करून, कुचर सेवकांना ताळ्यावर आणण्यास, सुचर सेवकांची भक्ति दृढ करण्यास, लोकांचे विचार सन्मार्गास लावण्यास व राजाला नीतीनें वर्तन करविण्यास, समर्थांसारख्या थोर, विचारी महापुरुषांच्या ग्रंथांचा अत्यंत उपयोग झाला. महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापण्याच्या कामीं मराठ्यांच्या शौर्याचें व मराठ्यांच्या जुटीचें जितकें सहाय्य झालें तितकेंच, किंबहुना त्याहूनहि जास्त, सहाय्य समर्थांच्या उपदेशाचें झालें. राष्ट्रांतील लोकांना दिशा दाखविण्यास असल्या महात्म्यांची आवश्यकता सदा असते. समर्थ १६८१ त वारले. तदनंतर पंचवीस तीस वर्षे समर्थांच्या उक्तींचा नाद महाराष्ट्रांतील लोकांच्या कानांत घुमत होता. त्या नादाच्या गुंगींत मराठ्यांनीं १७२० पर्यंत स्वराज्याची स्थापना केली. पुढें बाजीराव बल्लाळानें व बाळाजी बाजीरावानें हिंदुपदपातशाहीची स्थापना करण्याच्या इरायानें बहुतेक सर्व हिंदुस्थान देश पादाक्रांत केला. त्यावेळीं च्या मुत्सद्यांवर तिहेरी जोखीम आलें. पूर्वी शिवाजी व रामदास यांच्या वेळीं ( १ )सामान्य जनांचीं मनें तयार करावयाचीं व ( २ ) सेवकलोकांत मत्सर शिरूं द्यावयाचा नाहीं एवढें दुहेरीच जोखीम त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व विचारी पुरुषांच्या शिरावर होतें. आतां ( १ ) सातारच्या महाराजांचें सूत्र राखावयाचें, ( २ ) राजमंडळांतील व इतर सरदारांची मनधरणी करावयाचें ( ३ ) व जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घ्यावयाचें तिहेरी काम बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्या मुत्सद्यांना अवश्य झालें. ह्या तिहेरी कामाचें पहिलें कलम म्हणजे शाहूराजाचें सूत्र राखण्याचें काम ह्या मुत्सद्यांनीं उत्तम साधिलें. त्या कामीं धावडशी येथील भार्गवराम बोवांचें साहाय्य पेशव्यांना चांगलें झालें. भार्गवरामाचें शाहूवर वजन फार असून बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्यांच्याकडेहि पोटच्या पोराप्रमाणें त्याचा ओढा असे. त्यामुळें शाहूचें मन न दुखवितां पेशव्यांचें हित करून देणें धावडशीकर स्वामीला शक्य झालें. ज्याप्रमाणें शाहूराजाचें सूत्र ब्रह्मेंद्रानें राखिलें त्याप्रमाणें सरदारांची मनधरणी करण्यास न जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें मराठ्यांच्याकडे वळवून घेण्यास पेशव्यानीं कांहीं व्यवस्था केली होती असें दिसत नाहीं. कांयगांवकर वासुदेव दीक्षित टोक्यास व काशीस राहून सलाबताच्या राज्यांत व काशीकर ब्राह्मणांत कांहीं खटपट करीत असत; परंतु त्यांच्या खटपटीहूनहि अवाढव्य खटपट करणारे व विचार पसरविणारे महापुरुष मराठ्यांच्या वाढत्या समाजांत एक जूट उत्पन्न करण्यास हवे होते. कानडे, तेलंग, द्रवीड, गुजराथी, बुंदेले, रांगडे, पुरभय्ये, शीख वगैरे लोकांच्या मनांत महाराष्ट्रधर्माविषयीं प्रेम उत्पन्न करण्याकरितां कोणत्याहि संस्था पेशव्यांनीं स्थापलेल्या दिसत नाहींत किंवा त्या कामीं कोणा महापुरुषाचें सहाय्य घेतलेलेंहि आढळत नाहीं. ह्यामुळें तरवारीच्या जोरावर व मुत्सद्यांच्या युक्तिवर भिस्त ठेवून पेशव्यांना हिंदुस्थानांत आपली सत्ता चालवावी

लागे. मुसुलमानाप्रमाणें पेशवेहि परकीय आहेत असा दुजा भाव जिंकलेल्या प्रदेशांत कायम राही व परशत्रू आला असतां पेशव्यांचें जूं झुगारून देण्यास तेथील लोक तयार असत. आपली सत्ता किती अस्थिर आहे ह्याचा अनुभव पेशव्यांना पानिपतच्या मोहिमेंत पहिल्यांदां आला व तो मोठा भयानक आला. त्या वेळीं हिंदुस्थानांतील यच्चयावत् लोक मराठ्यांच्या विरुद्ध झाले. पानिपतची शेवटची लढाई होईतोंपर्यंत ह्या लोकांचा द्वेष पुरता कळून आला नाहीं हें कबूल आहे. सदाशिवराव विजयी झाला असता तर तो द्वेष कधीं कळूनहि न येता हेंहि कबूल आहे. परंतु, अपजय आला असतां हे सर्व लोक आपल्याला खाऊन टाकतील हें समजत असूनहि पेशव्यांनीं त्याचा उपशम करण्याची कांहीं एक खटपट केली नाहीं हेंहि कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जिंकलेल्या लोकांचीं मनें आकर्षून घेण्यास व नवीन वळणावर नेण्यास पेशव्यांनीं व्यवस्थित प्रयत्न केले नाहींत हा त्यांचा मोठा दोष होता. परंतु तो दुसऱ्या एका दोषाच्या मानानें केवळ क्षुद्र आहे असें दृष्टोत्पत्तीस येईल. मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले वगैरे कपटी, कुचर व स्वामिद्रोही सरदारांना ताळ्यावर व वठणीस आणण्यास पेशव्यांनीं कांहींच व्यवस्था केली नाहीं. ह्या सरदारांची स्वामिभक्ति कायम असती म्हणजे जिंकिलेल्या प्रदेशांतील लोकांना जुलमानें वागवूनहि आपली सत्ता पेशव्यांना कायम ठेवितां आली असती. कदाचित् प्रथम प्रथम लहानसहान बंडें झालीं असतीं; परंतु, घरांतल्या घरांत भेद होऊन नाश होण्यापेक्षां तीं बंडें झालेलीं पुरवलीं असतीं. ह्यासंबंधानें रघुनाथरावदादानें एक मार्मिक वाक्य लेखांक २ त लिहिलें आहे. तो म्हणतो " स्वजनविरोध व परराज्यांतील कलहाचें मूळ अजीपासूनच लागलें आहे. " सारांश, शिवाजीप्रमाणेंच बाळाजी बाजीरावानें व सदाशिव चिमणाजीनें हें स्वजनविरोधाचें बंड आधीं मोडून टाकिलें पाहिजे होतें. सरदारांची मनधरणी करण्याचें काम केवळ दपटशानें किंवा गोड बोलण्यानें भागण्याजोगें नव्हतें. त्याला रामदासासारखेच तिऱ्हाईत गृहस्थ सरदारांची कानउघाडणी करण्यास, हिंदुपदपातशाहीची दिशा दाखवून देण्यास व स्वामिभक्तीचें शिक्षण लावण्यास ह्या वेळीं हवे होते.

परंतु १७५० पासून १७६१ पर्यंतच्या अवधींत रामदासासारिख्यांचा टाहो कांहीं उपयोगीं पडला असता किंवा कसें ह्याची शंकाच आहे. शिवाजीच्या वेळीं रामदासाला कांहीं मर्यादित विवक्षित प्रदेशांत उपदेश द्यावयाचा असल्यामुळें त्याचें बोलणें सर्वांना ऐकूं जाणें शक्य होतें. आतां महाराष्ट्रसाम्राज्याची मर्यादा बहुतेक आसमुद्र पसरली होती. मराठ्यांचे सरदार हिंदुस्थानांतील दूरदूरच्या प्रदेशांत वर्षेच्यावर्षे वास्तव्य करून राहिले होते. त्यांना स्थानिक प्रीतीनें व स्थानिक द्वेषानें पछाडलेले होते. त्यांची व पेशव्यांची भेट दहा दहा पांच पांच वर्षांनींहि झाली तर होत असे. अशांचीं मनें सन्मार्गी राखण्यास पेशव्यांच्या वतीनें शेंकडो रामदास वेळोवेळीं टोले मारण्यास त्यांजवळ राहिले पाहिजे होते. ज्यावेळीं एकहि रामदास मवंद महाराष्ट्रसाम्राज्यांत नव्हता त्यावेळीं शेंकडों रामदास असण्याची अपेक्षा करणें प्राय: दुरापास्त होतें. सारांश, सरदारांच्या उच्छृंखलवृत्तीला आळा घालतां येण्याजोगीं साधनें त्याकाळीं पेशव्यांच्या जवळ नव्हतीं असेंच कबूल करणें ओघास येतें

सरदारांच्याप्रमाणें जिंकलेल्या प्रांतांतील लोकांचीं मनें आकर्षून घेण्याचीहि साधनें पेश-व्यांच्या जवळ नव्हतीं. कथा, पुराणें, यात्रा वगैरे संस्था सतराव्या शतकांतल्याप्रमाणें अठराव्या शतकांतहि चालू होत्या. परंतु, सतराव्या शतकांतला जिवंतपणा अठराव्या शतकांतलि कथापुराणांत राहिला नव्हता. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राजकारणाला सरदारांचीं व प्रजेचीं मनें उपयोगीं पडण्यास योग्य जेणेंकरून होतील अशी—ग्रंथ, व्याख्यानें वगैरे–साधनसंपत्ति पेशव्यांनीं तयार न केल्यामुळें हिंदुस्थानांतील मराठे सरदार व तद्देशीय संस्थानिक व सामान्यजन पानिपतच्या मोहिमेच्या अगोदर व नंतर मराठ्यांच्याविरुद्ध उठले ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. ग्रंथसमूहाचा, धर्मव्याख्यानांचा, साधुसंताचा व यात्राजत्रांचा उपयोग राष्ट्रांतील लोकांच्या मनाला नीट वळण देण्यास केवढा मोठा होतो ही गोष्ट शहाजी व शिवाजी ह्यांच्या मनांत जशी बिंबली होती तशी बाळाजी बाजीरावाच्या व सदाशिव चिमणाजीच्या मनांत भरलेली दिसत नाहीं. शिवाजी व बाळाजी ह्यांच्यामधील महदंतर हेंच होय. राज्यें मिळविण्यास जसा तोफांचा व शिपायांचा उपयोग होतो तसा तीं कायम राखण्यास व जतन करण्यास व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाहि होतो.

हें तत्त्व पेशव्यांच्या ध्यानांत कां आलें नाहीं ह्याचें कारण शोधण्यास फारसें लांब जावयास नको. त्या वेळीं महाराष्ट्रांत विद्येची व शिक्षणाची स्थिति कशी होती ह्याचा विचार केला असतां ह्या कारणाची अटकळ बांधितां येण्यासारखी आहे. त्या वेळच्या विद्येचे स्थूल मानानें तीन भाग करितां येतील:—( १ ) वैदिक, ( २ ) शास्त्रीय व ( ३ ) व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दश ग्रंथांचें पठन करीत ; षट्शास्त्रांचा जिम्मा शास्त्रीपंडितांनीं घेतला होता: व ब्राह्मणवैश्यादि इतरजन व्यवहाराला उपयोगीं जें ज्ञान तें ज्ञान संपादन करीत. वैदिक व शास्त्रीपंडित ह्यांना राजाश्रय असे व व्यावहारिक शिक्षणाच्या शाळेंतील पंतोजींना लोकाश्रय असे. व्यवहाराशिक्षणांत अक्षरांचे कित्ते, संसारचोपडी, बराबर्दीगणित, मराठ्यांच्या व मुसुलमानांच्या बखरी व तवारिखा, विक्रमबत्तीशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, लटकचाळिशी भारत, भागवत व रामायण ह्या " इतिहासग्रंथांतील " आख्यानांच्या मराठी बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्चाच्या पद्धति भूमापन, पत्रें लिहिण्याचे मायने, मराठी कविता, वगैरेचा समावेश होत असे. पुरुषांप्रमाणें अत्यंत कुलीन स्त्रियानांहि लिहितां वाचतां येत असे. व्यवहाराशिक्षण बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्चप्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. गृहस्थ, ब्राह्मण व मराठे ह्यांचे धंद्याच्या मानानें तीन वर्ग करितां येतील:—(१) स्वतःची शेतवाडी पहाणारे, ( २ ) कारकुनी धंदा करणारे, ( ३ ) व शिपायगिरीचा पेशा स्वीकारणारे. ह्या तिन्ही धंद्यांतील लोकांना वर सांगितलेल्या व्यवहाराशिक्षणाच्या पलीकडे माहिती म्हटली म्हणजे वयपरत्वें येणाऱ्या जगाच्या अनुभवाखेरीज जास्त कांहीं एक नसे. कारकुनांना व शिपायांना हिंदुस्थानचें भूज्ञान स्वतः हिंडून जें कांहीं मिळे त्यापलीकडे बिलकूल नसे. हिंदुस्थानाव्यतिरिक्त इतर देशांचें भूज्ञान ह्या लोकांना कांहींच नसे. निपाणीजवळ भोज येथील कुळकर्ण्याच्या येथें मला एक अठराव्या शतकांतील पृथ्वीचा नकाशा सांपडला. त्यांत सप्तसमुद्रात्मक पृथ्वी शेषाच्या मस्तकावर दिली असून, चीन, इंग्लंड, रावणाची लंका वगैरे

दशांच्या दिशा स्थूल मानानें बरोबर दाखविल्या आहेत व हिंदुस्थान चतुष्कोणाकृति काढिला असून तासगांव हिंदुस्थानचा मध्य धरिला आहे. परंतु हें भूगोलज्ञान सामान्य जनांचें झालें. स्वतः पेशवे व त्यांचे सरदार ह्यांचें भूगोलज्ञान ह्या लोकांच्यापेक्षां अर्थात् जास्त विस्तृत व व्यवस्थित असे. फिरंगी, फराशिस, वलंदेज, डिंगमार, आफ्रुंदोर, दुराणी, तुराणी, अरब, गिलच्ये, हबशी, शामळ, तुर्क, यवन, इराणी, शिद्दी, इंग्रज, मोरस, आफरीदी, वगैरे अठरा टोपीवाल्यांचे देश, व हिंदुस्थानांतील राजांचे छपन्न देश पेशव्यांना व त्यांच्या मुत्सद्यांना कित्येक नांवानें व कित्येक स्वदृष्टीनें माहीत होते. देशोदेशींचे वकील पेशव्यांच्या दरबारीं मोठ्या इतमानानें राहत असत ( का. पत्रें, यादी वगैरे १३४ ). त्यांजपासूनहि, त्यांच्या देशांची माहिती पेशव्यांना मिळत असण्याचा अवश्य संभव आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचे नकाशे पेशव्यांजवळ असत. लढाया झाल्या म्हणजे तह ज्याअर्थी होत त्याअर्थी पेशव्यांजवळ नकाशे असत हें मुद्दाम सांगण्यांत विशेष मुद्दा आहे, असें नाहीं. महाराष्ट्रांत बखरी वाचण्याचा व लिहिण्याचा प्रघात फार असे. तेव्हां मराठ्यांच्या व यवनांच्या इतिहासाचें ज्ञान महाराष्ट्रांत बहुशः सार्वत्रिक होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पाणिपतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव यानें त्या बखरीच्या १९ व्या पृष्ठावर मराठ्यांच्या सर्वव्यापी सत्तेचा प्रसार कसकसा होत गेला व सर्व हिंदुस्थान हिंदुमय करून टाकण्याचा मराठ्यांचा मनोदय होता वगैरे गोष्टी अवदालीच्या तोंडून वदविल्या आहेत. त्यावरून इतिहास व भूगोल ह्यांचें ज्ञान रघुनाथ यादवाला थोडें थोडकें नव्हतें असें दिसून येतें. रूमशाम म्हणजे कुस्तुंतुनिया येथें इ० स० १७३० पासून १७५४ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महमदाचेंहि नांव रघुनाथ यादवाला माहीत होतें. ( र. या. पा. ब. पृ. १९, टीप ) असें त्यावरून ठरतें. भूगोल व इतिहास ह्यांची माहिती बाळाजी बाजीरावाला व सदाशिव चिमणाजीला आपल्या कामापुरती यथास्थित होती ह्यांत संशय नाहीं. परंतु युरोपांत तत्कालीन दरबारांतून म्हणजे पंधरावा लुई, वडा फ्रेडरिक, दुसरा जॉर्ज ह्यांच्या दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचें व इतिहासाचें जें ज्ञान त्यावेळीं होतें त्याच्या मानानें पेशव्यांच्या दरबारचें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान अगदींच क्षुद्र होतें हें कबूल करणें योग्य आहे. कपिल, कणाद वगैरे पुराण मुनींनीं प्रणीत शास्त्रांच्या व्यतिरिक्त युरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रांचा गंधहि पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाला, विद्यापीठें, विद्वत्सभा, अजबखानें, वादसभा, शोधसभा, पृथ्वीपर्यटणें , वगैरे युरोपियन संस्था पेशव्यांच्या राज्यांत नव्हत्या इतकेंच नव्हे; तर त्या दुसरीकडे कोठें आहेत किंवा काय ह्यांचाहि पत्ता महाराष्ट्रांत कोणाला नव्हता. ह्या नकारात्मक वाक्यांचा इत्यर्थ एवढाच कीं १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्यांची संस्कृति यूरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृतीहून कमी दर्जाची होती. ती कोणकोणत्या गोष्टींत तशी होती त्याचा अंशतः निर्देश वर झालाच आहे. एक दोन विशेष मुद्यांचा विचार पुढें करितों.

अठराव्या शतकांतील पश्चिम युरोपांतील संस्कृतीची व महाराष्ट्रांतील संस्कृतीची तुलना करूं पाहतां शेंकडों भेद दृष्टीस पडतात. पैकीं कांहींचाच उल्लेख करणें येथें इष्ट आहे.

(१) मराठ्यांच्या संस्कृतींत प्रथम व्यंग म्हटलें म्हणजे त्यांना छापण्याची कला माहीत नव्हती व ती माहीत करून घेण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्नहि केला नाहीं. १४९८ च्या ११ मेला गामानें हिंदुस्थान शोधून काढिलें. तेव्हांपासून १७६० पर्यंत फिरंग्यांच्या व मराठ्यांच्या मुलाखती अनेक ठिकाणीं झाल्या. गोमांतक, सावंतवाडी, वसई, कोची, दाभूळ, दिव, दमण वगैरे स्थलीं मराठ्यांच्या फिरंग्यांशीं गांठी पडलेल्या आहेत. वलंदेज ( डच् ) व डिंगमार ( डेन ) ह्या लोकांनाहि मराठे ओळखत असत. मुसाबूसी वगैरे फेंच लोकांशीं तर मराठ्यांची चांगलीच घसट असे. मुंबई, सुरत, बाणकोट, विजयदुर्ग, राजापुरी, दाभोळ वगैरे ठिकाणीं इंग्रजांचीहि जानपछान मराठ्यांना झाली होती. मुंबईंतलि परभू, शेणवई, पारशी, भाटे व वाळुकेश्वरचे छत्रे, भातखंडे वगैरे ब्राह्मण पुजारी व बैरागी इंग्लिश लोकांशीं हरहमेश दळणवळण ठेवीत. कित्येकांना चांगलें इंग्रजी लिहितां व बोलतां येत असे. त्यांनीं छापील पुस्तकें पाहिलीं होतीं ह्यांत संशय नाहीं. नानाफडणिसाच्या दफ्तरांत छापील इंग्रजी नकाशे अद्यापहि आहेत. मोरोबादादाच्या घरच्या पुस्तकालयांत एक इंग्रजी चोपडी होती असें त्याच्या पुस्तकाच्या यादीवरून कळतें. असें असून म्हणजे यूरोपांतलि सर्व देशचे लोक त्यांच्या दारीं ऊभे असून मराठ्यांनीं छापण्याची कला कशी घेतली नाहीं ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांत योग्य कल्पनांचें बीं पेरण्यास ह्या कलेचाच प्रवेश महाराष्ट्रांत झाला पाहिजे होता. घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, कोल्हापूरकर, सांवत, आंग्रे वगैरे सरदारांच्या पदरीं फिरंगी, फराशिस, इंग्रज वगैरे वरेच देशचे लोक पेशवाई जाईतोंपर्यंत व पुढें देखील होते; असें असून ज्याअर्थी मराठ्यांनीं ही कला उचलली नाहीं त्याअर्थी त्यांच्या ग्राहकशक्तीच्या कीर्तीला बराच कमीपणा येतो हें निर्विवाद आहे. ( २ ) मुद्रणकलेसारखा उघड उघड डोळ्यावर येणारा गुण ज्या लोकांच्या ध्यानांत आला नाहीं त्यांचें भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान कोतें असावें ह्यांत मोठें नवल नाहीं. ( ३ ) परंतु ज्या वस्तूंची मराठ्यांना दर घडीस अत्यंत जरूर लागत असावी असा आपण तर्क करितों त्यांपैकींहि कांहीं वस्तू मिळविण्याची मराठ्यांनीं इच्छा दर्शविली नाहीं व प्रयत्न केला नाहीं. धुळपांना व आंग्र्यांना लोहचुंबकाची व तारवें बांधण्याच्या गोद्यांची जरूर विशेष होती. या दोन्ही गोष्टी त्यांनीं इंग्रजांच्या गलबतांतून व मुंबईंत पाहिल्या होत्या. परंतु, त्या स्वतः बनविण्याची उत्कट इच्छा त्या प्रांतांतलि लोकांना किंवा पुणें येथलि मुत्सद्यांना झाली नाहीं हें मोठ्या कष्टानें कबूल करावें लागतें. ह्या इतक्या बाबींत मराठ्यांचें पाऊल मागें होतें. परंतु ( ४ ) एका बाबींत त्यांनीं आपली ग्राहकशक्ति चांगली दाखविली होती. ती बाब म्हटली म्हणजे कलेच्या तोफा व कवायती सैन्य ठेवण्याची तयारी ही होय. ह्या कामीं युरोपियन लोकांची श्रेष्ठता मराठ्यांनीं पाहिली होती. तेव्हां केशवराव पानशी, इब्राईमखान आणि मुजफरखान गाडदी ह्या इसमांकडून त्यांनीं ह्या बाबतींत प्रावीण्य संपादण्याचा प्रयत्न केला ही अभिनंदनीय गोष्ट आहे. उदगीरच्या लढाईंत तोफा मारून माराठ्यांनी मोंगलाला खालीं पाडिलें व तोफा मारूनच अबदालीलाहि चीत करण्याचा त्यांचा विचार होता. हा विचार बहुशः सफल झाला असता;

परंतु, गोविंदपंत बुंदेल्यानें व मल्हारराव होळकरानें हरामखोरी केल्यामुळें ह्या सफलतेस दिरंग लागला. आतां हे गाडदी मराठ्यांना कितपत मानवले तें पाहण्यासारखें आहे. १७५० त सलाबतानें व १७५१ त मराठ्यांनीं गाडदी ठेवण्यास प्रारंभ केला. १७५३ त गाड्यांचा मुख्य जो बुसी त्यानें सलाबताला निर्माल्यवत् केलें. १७५९ त श्रीरंगपट्टणांतील गाड्यांचा मुख्य जो हैदर त्यानें श्रीरंगपट्टणची गादी बळकावली. १७६१ त बाळाजीच्या मृत्यूच्या दिवशीं पुण्यांत गाडदी दंगा करणार होते ( लेखांक २८६ ). १७७३ त गाड्यांनीं नारायणरावास ठार मारिलें. येणेंप्रमाणें यूरोपियन कवाईत शिकलेले गार्दी लोक हिंदुस्थानांतील देशी राजांना चांगलेसे मानवले नाहींत हें उघड आहे. विदेशी लोकांचीं पथकें प्रसंगानुसार धन्याच्या उरावरहि बसण्यास मागें पुढें पहात नाहींत ह्याचा अनुभव प्रिटोरियन गाड्यांनीं रोमच्या पातशाहांस व जानिझारींनीं तुर्कस्थानच्या पातशाहांस जसा आणून दिला तसा मराठ्यांसहि लवकरच आणून दिला. इंग्रजांच्या हातीं महाराष्ट्र गेलें नसतें तर ह्या गार्द्यांच्या हातांत तें पुढें मागें गेल्याशिवाय राहिलें नसतें असा माझा तर्क आहे. ह्या गाड्यांचें स्तोम महाराष्ट्रांत पुढें पुढें तर फारच वाढलें. बहुतेक सर्व लहानमोठ्या सरदारांच्या पदरीं गाडदी असत. खुद्द नानाफडणिसाच्या मेणवलीस गाड्यांचा पाहरा असे. देशी शिपाई टाकून विदेशी शिपाई जवळ ठेवण्यांत मोठीशी मुत्सद्देगिरी होती असें नाहीं !

## विवेचन सातवें.

पानिपतच्या लढाईचे परिणाम काय झाले ? तर ( १ ) प्रथम मराठ्यांचें पाऊल आंत आलें. ( २ ) नजीबखानाला आपला प्रांत व दिल्लीचें कांहीं वेळ पुढारपण मिळालें. ( ३ ) होळकराची पेशव्यांचीं धोत्रें बडविण्याची भीति नाहींशी झाली. ( ४ ) सुजाउद्दौल्याला अयोध्या, काशी, प्रयाग वगैरे प्रांतांत मराठ्यांचा उपद्रव पुन्हां झाला नाहीं. ( ५ ) रोहिलेहि मराठ्यांच्या कचाटींतून सुटले. ( ६ ) जानोजी भोसल्याचें कांहीं वेळ वजन वाढलें. ( ७ ) गायकवाड जिवंत राहिले. ( ८ ) जंजिऱ्याच्या हबशाला दम आला. (९) दिल्लीच्या पातशहाचें दैन्य दुणावलें. ( १० ) स्वामिभक्त शिंद्यांना गेलेली सत्ता पुन्हां स्थापण्याची दुबार मेहनत पडली. (११) पुंड, पाळेगार व मवासी ह्यांना दंगे करण्यास अवधि मिळाली. ( १२ ) सलाबतजंगाचा प्रधान निजामअल्ली ह्याला गेलेला प्रांत मिळवण्याचा हुरूप आला. ( १३ ) मराठ्यांच्या ताब्यांत श्रीरंगपट्टण जावयाचें राहून हैदरअल्लीला तेथें आपली सत्ता स्थापितां आली. ( १४ ) रजपुत संस्थानिकांना कांहींएक न मिळतां उलट पुढें मराठ्यांकडून जाच मात्र जास्त झाला. ( १५ ) साताऱ्याच्या छत्रपतींचें नांव समूळ नाहींसें व्हावयाचें तें झालें नाहीं. ( १६ ) साताऱ्याची व कोल्हापूरची गादी जोडण्याचें काम तहकूब झालें. ( १७ ) पश्चिमोत्तर प्रदेशांत शीख लोकांची सत्ता रुजून वाढीस लागली. ( १८ ) बंगाल्यांत व मद्रासेंत इंग्रजांची सत्ता कायमची स्थापिली गेली. १७६१ च्या पुढें हिंदुस्थानची पातशाही मिळविण्याची चढाओढ इंग्रज व मराठे ह्यांच्यामध्यें लागली. तिची आस्ते आस्ते वाढ १७९६ पर्यंत होत होती. नानाफडणिसाच्या शहाणपणानें इतर संस्थानांप्रमाणें

मराठ्यांना इंग्रजांनीं गिळलें नाहीं इतकेंच कायतें श्रेय नानाच्या मुत्सद्देगिरीला देतां येतें. परंतु, इंग्रजांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून श्रेष्ठ होती. ही गोष्ट लक्ष्यांत आणिली असतां एवढें देखील श्रेय मिळविणें म्हणजे मोठीच कर्तबगारी करणें होय असें निःपक्षपातानें कबूल करणें भाग पडतें. व ( १९ ) अबदालीला पानिपतच्या मोहिमेपासून कांहींएक फायदा झाला नाहीं. मराठ्यांची हानि झाली खरी; परंतु, अबदालीच्यांतहि फारसा राम राहिला नाहीं. जर त्याच्या अंगीं कांहीं सामर्थ्य राहिलें असतें तर तो बाबराप्रमाणें हिंदुस्थानांत रहाता. परंतु पानिपतची लढाई झाल्याबरोबर त्यानें तडक विलायतेचा रस्ता धरिला. तो दिल्लीचा पातशाहाहि झाला नाहीं; त्याला पंजाबांतील प्रांतहि मिळाला नाहीं व त्याला म्हणण्यासारखी लूटहि मिळाली नाहीं. एवंच अबदालीनें हिंदुस्थानांत येऊन कांहींच साधिलें नाहीं ! ! ! मग त्यानें हा खटाटोप कशाकरितां केला ? स्वार्थ त्यानें कोणता साधला ? परमार्थ त्याला कोणता लाधला ? " ते के न जानीमहे " म्हणून कोणी संस्कृत कवि आश्चर्यानें उद्गार काढतो ते खरे आहेत. ( २० ) गोविंदपंताच्या पुत्रांना किंवा अनुयायांना पानिपतच्या मोहिमेंत व लढाईंत कुचराई केल्याबद्दल कांहींएक प्रायश्चित मिळालें नाहीं. योग्य चाकरी न केल्यास पुढें लढाई झाल्यानंतर फार कठीण जाईल वगैरे धमकीचीं पत्रें सदाशिवरावानें गोविंदपंताला लिहिलीं होतीं. परंतु गोविंदपंताची हरामखोरी बाळाजी बाजीरावाला माहीत नसल्यामुळें, १६ जानेवारी १७६१ ला म्हणजे पानिपतची लढाई होऊन तीन दिवसांनीं व गोविंदपंत वारल्यापासून २५ दिवसांनीं बाळाजी बाजीरावानें गंगाधरपंताला समाधानाचें पत्र पाठविलें, त्यांत गोविंदपंताची तारीफ केली होती. ( मराठ्यांचे पराक्रम, पृष्ठ १४७ ). ह्यावरून असें दिसतें कीं सदाशिवरावभाऊनें व नारो शंकरानें मोहीम होत असतांना गोविंदपंताला पाठविलेलीं पत्रें १६ जानेवारी १७६१ पर्यंत पेशव्यांच्या नजरेस पडलीं नाहींत. पुढेंहि कधीं हीं पत्रें पेशव्यांच्या नजरेस पडलीं नाहींत. पानिपतची मोहीम चालू असतां सदाशिवराव भाऊचीं, नारो शंकराचीं, बाळाजी बाजीरावाचीं व इतर लोकांचीं गोविंदपंताला आलेलीं सर्व पत्रें येरंड्यांच्याजवळ राहिलीं. हीं पत्रें येरंड्यांच्या हातांत येण्याचें कारण नक्की काय असावें तें कळत नाहीं. परंतु गोविंदपंताच्या विरुद्ध पुरावा म्हणून येरंड्यांनीं त्यांचा तावा घेतला असावा असा तर्क करणें साहजिक आहे. पानिपतची मोहीम झाल्यावर, खरें म्हटलें असतां, गोविंदपंत बुंदेल्याचें कृष्ण कारस्थान बाहेर पडावयाचें. परंतु येरंड्यांची गोविंदपंताच्या चिरंजीवांनीं मूठ दाबिली म्हणा किंवा रघुनाथरावदादा व सखारामपंत बोकिल ह्यांच्या अंतस्थ मसलतीनें म्हणा, गोविंदपंताचें हें बंड बाहेर पडलें नाहीं. नाहीं तर, मल्हाररावासारख्याचाहि समाचार घेण्यास ज्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं त्या माधवरावानें गोविंदपंताच्या वंशजांना शिक्षा दिल्यावांचून सोडिलें असतें असें संभवत नाहीं. गोविंदपंताच्या वर्तनाची चौकशी करण्यास बाळाजी बाजीरावास स्वास्थ्यहि नव्हतें व वेळहि नव्हता. पानिपत येथील भयंकर वृत्त ऐकून बाळाजीच्या मनानें पराकाष्ठेची धास्ती घेतली व तेव्हांपासून कामकाज बघण्याला त्याचें मन घेईना. ह्या अवधींत बहुतेक सर्व कारभार रघुनाथरावदादा व सखारामबापू ह्या दोघांनीं आवरला

होता. ह्या दोघांनीं सदाशिवरावभाऊला विघ्नें आणण्याचें काम चालविलें होतें असा बळकट संशय घेण्यास कारणें आहेत ( ऐतिहासिक लेखसंग्रह, २५, ७१ ). ह्या विघ्नें आणण्याच्या खटपटींत गोविंदपंत व त्यांचे चिरंजीव आणि येरंडे हे, एकेक किंवा सर्व मिळून एकाच वेळीं, किंवा एका पाठीमागून एक, समयानुसार, निरनिराळ्या कार्याकरितां निरनिराळ्या कारणांनीं प्रोत्साहित होऊन, सदाशिवरावाच्या विरुद्ध गेले असावे व पुढें केलेलीं कारस्थानें गोपन करणें सर्वांनाच इष्ट व सोयीचें वाटलें असावें असा संशय येतो. उत्तरेकडील सरदारांचीं मनें कलुषित करण्यास कारण कांहीं अंशीं सखारामबापू झाला असें म्हणण्यास आधार आहे. तसेंच, बाळाजी बाजीराव ज्या दिवशीं दिवंगत झाले त्या दिवशीं गार्दांचा दंगा होणार होता ( लेखांक २८६ ); त्यांत रघुनाथरावाचें व सखारामबापूचें अंग असावें असा संशय येतो. रघुनाथरावानें हा दंगा जागच्या जागीं जिरविला असें जरी पत्रांत लिहिलें आहे तत्रापि हीच गोष्ट रघुनाथरावाच्या विरुद्ध पुराव्याच्या रूपानें आणितां येण्याजोगी आहे. सखारामाचीं कारस्थानें अशींच भूल पाडणारीं असत. आपणच दंगा करवावयाचा, आपणच तो मोडण्याचें श्रेय घ्यावयाचें व घटकेंत आपणच राजनिष्ठ बनावयाचें, हे सर्व खेळ सखारामाचे होत ! ह्यावेळचीं सखारामबापूचीं व रघुनाथरावाचीं पत्रें जर पुढें मागें कोठें सांपडलीं तर त्यांत ह्यासंबंधीं उल्लेख अवश्य निघेल असें भविष्य करून ठेवण्यास हरकत नाहीं. असो. सखारामाच्या कारस्थानानें गोविंदपंताच्या चिरंजीवांचा बचाव झाला, हाच संशय दृढ होतो. गोविंदपंताच्या विरुद्ध पुराव्याचीं पत्रें येरंड्यांनें जीं दडवून व लपवून वाई येथें आपल्या वाड्यांत ठेविलीं तीं हा कालपर्यंत कोणाच्या दृष्टीस पडलीं नाहींत. पेशव्यांच्याहि तीं दृष्टीस पडलीं नाहींत व ग्रांटडफच्याहि नाहींत. त्यामुळें गोविंदपंताचा संशय कोणालाच आला नाहीं. अर्थात् पानिपतच्या मोहिमेचें मुख्य सूत्र कोठें होतें व खरें स्वरूप काय होतें तेंहि आजपर्यंत कळलें नव्हतें. सध्यां ह्या ग्रंथांत छापलेल्या पत्रांच्या द्वारें ह्या स्वरूपाच्या कांहीं भागाचा उलगडा झाला आहे. राहिलेल्या भागांचा उलगडा, मल्हाररावाचा, रघुनाथरावदादाचा व सखाराम भगवंताचा ह्या वेळचा पत्रव्यवहार सांपडे तोंपर्यंत, व्हावयाचा नाहीं. ( २१ ) रघुनाथरावदादाचें व सखारामबापूचें खरें स्वरूप बाहेर पडण्यास संधि मिळाली. सखारामबापूच्या सल्ल्यानें रघुनाथरावानें माधवरावांशीं लढाई आरंभून राज्याधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला. सखाराम कलिपुरुष आहे अशी गोपाळराव पटवर्धनाची खात्री झालेली होती. परंतु, बाळाजी बाजीरावाचा सखारामावरती पूर्ण विश्वास होता. तो किती अस्थानीं होता हें पानिपतची लढाई झाल्यानंतर स्पष्टपणें कळून आले.

## विवेचन आठवें.

१७५० पासून १७६१ पर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासाचा थोडाबहुत उलगडा करण्याचा अल्प प्रयत्न मागील सात विवेचनांत केला आहे. त्यावरून असें मत होतें कीं काव्येतिहाससंग्रह, ऐतिहासिकलेखसंग्रह व प्रस्तुतचा ग्रंथ ह्या तीन पुस्तकांत जो पत्रव्यवहार सांपडला आहे तो अत्यंत त्रोटक आहे. ह्या दहा वर्षांत मराठ्यांचा खटाटोप

३६७८

केवढा अवाढव्य होता हें दाखविण्यास त्याचा उपयोग झाला आहे हें खरें आहे. परंतु, ह्या खटाटोपाचा व त्याच्या निरनिराळ्या अंगांचा सविस्तर, सकारण व विश्वसनीय वृत्तांत देतां येण्यास अद्यापि पुष्कळच आणखीं पत्रव्यवहार सांपडला पाहिजे. तो कोठें व कोणापाशीं सांपडेल ह्याचा खुलासा खालीं करतों. ह्या ग्रंथाच्या शेवटीं व्यक्तींच्या नांवांचें एक विल्हेवार परिशिष्ट दिलें आहे. त्या व्यक्तींच्या राहण्याच्या स्थलांचा शोध काढून त्यांचीं दफ्तरें तपासलीं पाहिजेत. इनाम कमिशनच्या वेळीं महाराष्ट्रांतील बहुतेक गांवचीं दफ्तरें इंग्रजसरकारानें तपासलीं आहेत. त्यांतील सनदा वगैरे कामाचे कागद वगळून बाकीचे सर्व किंवा बहुतेक कागद अद्याप जसेच्या तसेच आहेत ते तपासण्याचें काम त्या त्या प्रांतांतील व गांवांतील शोधक लोकांनीं केलें पाहिजे. किंवा एखादी इतिहासाच्या साधनांची शोध करणारी मंडळी स्थापण्यांत येऊन तिच्या सभासदांनीं हें काम करण्याचें पत्करिलें पाहिजे. शोध करणारे गृहस्थ इतिहासज्ञ आसल्यावांचून दफ्तरें नीट तपासलीं जाणार नाहींत. खुद्द दफ्तरांच्या मालकांना आपल्या दफ्तरांत काय आहे हें माहीत नसण्याचा बहुत संभव असतो. शिवाय कोणी शोधक त्यांच्याकडे शोध करावयास गेल्यास त्याला नकारात्मक उत्तर देण्याची इतिहासाच्या औदासीन्यामुळें त्यांना संवय लागलेली असते. कोठें कोठें इतिहासाचें महत्त्व जाणणारे दफ्तरांचे मालक आढळतात. आपण स्वतः दफ्तर पाहून इतिहासाच्या उपयोगी कागद काढून देऊं म्हणून त्यांचा आग्रह असतो. परंतु शोधकांनीं स्वतःच दफ्तर पहावें हें उत्तम. इतिहासाला उपयोगी कागदपत्र टाकून देण्याचें व निरुपयोगी पत्रें दिसावयाला चांगलीं दिसतात म्हणून दाखविण्याचें व्यसन कित्येकांना लागलेलें माझ्या पाहण्यांत आहे. ह्याकरितां होईल तितकें करून शोधकांनीं स्वतः रुमाल, कागद व गळाठा तपासावा हें विशेष फायद्याचें आहे.

## विवेचन नववें.

पहिल्या विवेचनांत ग्रांटडफच्या पद्धतीचा किंवा पद्धतीच्या अभावाचा विचार करून मराठ्यांचा इतिहास भौतिक व आत्मिक अशा दोन्ही पद्धतींनीं लिहिला असतां सर्वांगांनीं संपूर्ण होईल म्हणून सांगितलें आहे. हा सर्वांगांनीं संपूर्ण असा इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे अगोदर नानातऱ्हेची तयारी झाली पाहिजे. प्रथम धर्म, नीति, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानू, राजकारण, मोहिमा वगैरे प्रकरणासंबंधीं अस्सल कागदपत्र शुद्ध छापले गेले पाहिजेत. त्यांवरून त्या त्या प्रकरणांतील प्रसंगांचा कालनिर्णय केला पाहिजे व नंतर मराठ्यांच्या इतिहासाची इमारत रचण्यास हात घातला पाहिजे. ही पूर्वीची मेहनत होण्याच्या अगोदर मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला असतां तो नानातऱ्हेनें अपूर्ण व अविश्वसनीय होण्याची बहुतेक खात्री आहे. आजपर्यंत मराठ्यांचा इतिहास आपआपल्या मतीप्रमाणें संपूर्ण अथवा अंशतः लिहिण्याचा प्रयत्न कांहीं लोकांनीं केला आहे. शिवाजी, संभाजी, शाहू, बाजीराव, नाना फडणिस, हरिपंत फडके, परशुराम भाऊ पटवर्धन, बापू गोखले, अहिल्याबाई होळकर, मल्हारराव होळकर, गोविंदपंत बुंदेले, महादजी शिंदे, रामदासस्वामी, जयरामस्वामी, वगैरे ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें

आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालीं आहेत. तसेच मराठ्यांच्या समग्र चरित्राचे इतिहासहि कित्येक बाहेर पडले आहेत. परंतु, ह्या चरित्रांपैकीं व इतिहासांपैकीं फारच थोड्यांत ऐतिहासिक शोध करून व्यवस्थित रीतीनें प्रसंगांच्या व पुरुषांच्या महत्त्वाप्रमाणें लिहिण्याचा प्रयत्न केलेला दृष्टीस पडतो. जीं कांहीं इतिहासाचीं साधनें आजपर्यंत छापलीं गेलीं आहेत त्यांच्या आधारावर हीं पुस्तकें तयार केलेलीं आहेत. आजपर्यंत मिळालेलीं साधनें कामाला पुरेशीं आहेत अशी बहुतेक ग्रंथकारांची तृप्ति झालेली दिसते. बखरींतून सांपडणारा मजकूर ग्रांटडफच्या ग्रंथांतून सांपडणारा आहे; तेव्हां तो ग्रंथकार सर्वस्वीं विश्वसनीय आहे असाहि कित्येकांचा ठाम ग्रह झालेला वाचण्यांत येतो (लक्ष्मणराव चिपळोणकरकृत मराठ्यांचा इतिहास, प्रस्तावना). ग्रांटडफच्या ग्रंथांतून मिळणाऱ्या माहितीपेक्षां जास्त माहिती काव्येतिहाससंग्रहांतील पत्रांत आली असून डफच्या ग्रंथांत बहुतेक सर्व महत्त्वाच्या गोष्टी आल्या आहेत इतकेंच नव्हें, तर कित्येकांचा बारीक पाल्हाळहि त्यानें केला आहे असेंहि एका ग्रंथकाराचें म्हणणें आहे (नातूकृत महादजीचें चरित्र, प्रस्तावना). सर्व बखरींचा एकीकृत आधार घेतला असतां तो विश्वासार्ह होतो असेंहि ह्या ग्रंथकारानें प्रतिपादिलें आहे. परंतु, हीं सर्व विधानें भ्रामक आहेत हें मीं ह्या प्रस्तावनेंत १७५० पासून १७६१ सालापर्यंतच्या इतिहाससंबंधानें तरी साधार दाखवून दिलें आहे. माझ्या मतें, ग्रांटडफचा ग्रंथ बहुत प्रकारें अपूर्ण आहे इतकेंच नव्हें, तर कित्येक ठिकाणीं तो अविश्वसनीयहि आहे. त्यानें मराठ्यांच्या इतिहासांतील बहुतेक प्रसंगांचें वर्णन दिलें आहे अशी बिलकुल गोष्ट नाहीं. आपल्या ग्रंथाचे पहिले सोळा भाग बखरवजा समजावे म्हणून तो स्वतः लिहितो. १७५० पासून १७६१ पर्यंतचा ग्रांटडफच्या ग्रंथाचा भाग बखरींपेक्षां थोडासा बरा आहे, परंतु ह्यापेक्षां जास्त शिफारस त्या ग्रंथाची करितां येत नाहीं म्हणून मागें मीं सिद्ध करून दाखविलें आहे. असें असून त्याचा ग्रंथ बहुतेक पूर्ण आहे म्हणून जे कित्येक लोक म्हणतात तो केवळ गैर समजुतीचा प्रकार आहे. तसेंच ग्रांटडफचा ग्रंथ आधाराला घेऊन ज्यांनीं ज्यानीं म्हणून चरित्रें किंवा इतिहास लिहिले आहेत त्यांचीहि किंमत ग्रांटडफच्या बरोबरच करणें रास्त आहे. आजपर्यंत जितकीं म्हणून चरित्रें किंवा इतिहास मराठींत लिहिले गेले आहेत तितक्यांची व्यवस्था ही अशी आहे. अशी जर व्यवस्था आहे तर मग मराठ्यांचा इतिहास लिहावा तरी कसा असा प्रश्न साहजिक उद्भवतो. ह्याला उत्तर असें आहे कीं मराठ्यांचा इतिहास शास्त्रीय पद्धतीनें लिहिला तरच त्याला कांहीं किंमत देतां येईल. इतिहास लिहिण्याला प्रस्तुतची संधि महाराष्ट्रांतील लोकांना मोठी उत्तम आली आहे. इतिहास उत्तम तऱ्हेनें कसा लिहितां येईल ह्याची फोड युरोपांतील शास्त्रयांनीं करून ठेविलेली आहे. ह्या फोडीचा फायदा करून घेऊन मराठ्यांच्या इतिहासाची इमारत उभारली पाहिजे. युरोपांत सतराव्या व अठराव्या शतकांत इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं ज्या चुक्या केल्या त्याच जर आपण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं करूं लागलों तर एकोणिसाव्या शतकांतील युरोपाशीं आपला परिचय व्यर्थ झाला असें होईल. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनीं खालील कलमें लक्ष्यांत बाळगिलीं पाहिजेत. (१) कोणताहि

पूर्वग्रह घेऊन इतिहासें किंवा चरित्रें लिहावयास लागूं नये. आतापर्यंत लिहिलेल्या बहुतेक चरित्रांतून हा दोष ढळढळीत दिसून येतो. महादजी शिंदे, गोविंदपंत बुंदेले, परशराम-भाऊ पटवर्धन, बापू गोखले, पहिला बाजीराव, वगैरे सर्व सेनानायक एकासारखे एक अप्रतिम योद्धे होते असा त्या त्या ग्रंथकारांचा सांगण्याचा झोंक असतो. आतां पहिल्या बाजीरावाच्या बरोबरीला ह्यांपैकीं एकहि योद्धा बसवितां येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच बाजीरावाच्या खालोखाल महादजीच्या तोडीचा ह्यांत एकहि सेनापति नाहीं. परशरामभाऊ पटवर्धन दुय्यम प्रतीचा सेनानायक होता असें मला वाटतें. गोविंदपंत बुंदेले व बापू गोखले हे कनिष्ठ प्रतींचे सेनापति होत, हें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील. बापू गोखल्यानें तर कोण्याएका गोऱ्याचें सर्टिफिकेट घेऊन ठेविलें होतें! सर्टिफिकेल्या सेनापतींची किती किंमत करावयाची तें मुद्दाम फोड करून सांगितली पाहिजे असें नाहीं! हें सेनापतित्वा-संबंधीं झालें. कित्येकांचा पूर्वग्रह मराठे सर्व प्रकारें श्रेष्ठ होते असें दाखविण्याचा असतो; कित्येकांचा ह्याच्या उलट असतो. तेव्हां पूर्वग्रहांना टाळा देणें ही मुख्य गोष्ट होय. (२) भरपूर अस्सल माहिती मिळाल्याशिवाय चरित्र किंवा इतिहासाचा भाग लिहिण्याचा खटाटोप करूं नये. (३) तशांतूनहि लिहावयाचा संकल्पच असेल तर आपल्याला माहिती कोणती नाहीं तें स्पष्ट लिहावें. अस्सल भरपूर लेखसंग्रह जवळ असल्यावांचून जो कोणी इतिहास लिहावयाला जाईल त्याला माहिती नाहीं असा शेरा पुष्कळच प्रसंगां-संबंधीं द्यावा लागेल. (४) अस्सल भरपूर माहितीवरून कांहीं सिद्धांत काढावयाचा तो काढावा. हें चवथें कलम पहिल्या कलमाचेंच एका प्रकारचें रूपांतर आहे अशी समजूत होण्याचा संभव आहे; परंतु, तसा प्रकार नाहीं. पहिल्या कलमांत पूर्वग्रहप्रधान पद्धतीचा निर्देश केला आहे. व ह्या चवथ्या कलमांत पश्चाद्ग्रहप्रधानपद्धतीचा निर्देश केला आहे. पूर्वग्रह मनसोक्त काढिलेलाच असतो. पश्चाद्ग्रह अस्सल भरपूर आधारांतून जाल्या जो निघेल तोच घ्यावयाचा असतो. अलीकडे जे इतिहास व चरित्रग्रंथ लिहिले गेले आहेत त्यांत ह्या पूर्वग्रहाच्या पद्धतीचें प्राधान्य विशेष दिसून येतें. कित्येक ग्रंथांतून ह्या दोन्ही पद्धतींची भेसळ झालेली आढळून येते. उदाहरणार्थ, एका ग्रंथांतील शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानात्मक राज्यपद्धतीविषयीं क्लप्ति पहा. ह्या क्लप्तींत तीन सिद्धांत ठरवावयाचे आहेत. (अ) शिवाजीची राज्यपद्धति अष्टप्रधानात्मक होती; (ब) ती मुसुलमानांच्या राज्यपद्धतीहून निराळी होती; (क) व युरोपांतील क्याबिनेट गव्हर्नमेंटसारखी ती होती. ह्या क्लप्तींतील पहिला भाग म्हणजे (अ) तेवढा बहुवंशीं पश्चाद्ग्रहोत्पन्न म्हणजे साधार आहे. शिवाजीच्या ज्या बखरी व एक दोन अस्सल कागद-पत्र आजपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या आधारावर शिवाजीची राज्यपद्धति (अष्ट) प्रधानात्मक होती असें विधान करण्यास कांहीं एक हरकत नाहीं. आतां त्या प्रधानांची संख्या आठ होती किंवा त्याहून जास्त होती ह्या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४०४ हें पत्र शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळचा कान आहे. ह्या पत्रांत मुख्य प्रधान, अमात्य, सचीव, सेनापति, पंडितराव, न्यायाधीश

चिटणीस, सुमंत, बक्षी, सेनाधुरंधर, अशा अकरा अधिकाऱ्यांची प्रधानांत गणना केली आहे. ( इ ) युद्धादि प्रसंग किंवा ( फ ) राजपत्रांवर चिन्ह करण्याचा अधिकार ज्यांना असेल ते प्रधान होत असा ह्या कानूजावल्यांतील मायन्याचा आशय दिसतो. ह्या आशायाप्रमाणें वर दिलेले अकरा अधिकारी प्रधान ठरतात. परंतु ह्या कानूजावल्यांच्या शेवटल्या कलमांत ह्या प्रधानमंडळाला अष्टप्रधान म्हणून संज्ञा दिली आहे. तेव्हां अष्टप्रधान ही संज्ञा विशिष्ट संख्यावाचक नसून केवळ समुदायवाचक आहे असा सिद्धांत काढणें अवश्य होतें. ह्या सिद्धांताला पोषक असें शिवाजीच्या कारकीर्दींतील दुसरें एखादें पत्र अद्यापपर्यंत उपलब्ध नाहीं. परंतु, राजारामाच्या कारकीर्दींत अष्टप्रधानांत एकंदर नऊ असाम्या होत्या असें राजारामाच्या बखरीवरून ठरतें. तसेंच शाहूमहाराजांच्या कारकीर्दींतहि नऊ असाम्या होत्या असें काव्येतिहाससंग्रहांतील ४०५ पत्रावरून कबूल करावें लागतें. अष्टप्रधानांची संख्या शिवाजीच्या पुढें आठच नव्हती हें ह्या दोन आधारांवरून सिद्ध आहे, व तोच प्रकार शिवाजीच्या वेळींहि होता, हें ४०४ पत्रावरून उघड आहे. हा वाद आठ ह्या संख्येपुरताच आहे. बाकी शिवाजीची राज्यपद्धति ( अष्ट ) प्रधानात्मक होती हा सिद्धांत साधार आहे हें निर्विवाद आहे. ( ब ) आतां ही राज्यपद्धति शिवाजीनें अजीबात नवीन शोधून काढिली किंवा मुसुलमानापासून घेतली किंवा पूर्वींच्या संस्कृत नीतिशास्त्रांतून घेतली? माझ्या मतें शिवाजीनें ही राज्यपद्धति मुसुलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्यांचीं नांवें मुसुलमानांच्या दरबारांतलि आहेत. त्यांना मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सचिव, सुमंत वगैरे संस्कृत नांवें शिवाजीनें दिलीं.बाकी शिवाजीची पद्धति मुसुलमानांच्या पद्धतीचेंच हुबेहूब अनुकरण होतें. ( क ) ही अष्टप्रधानात्मक पद्धत प्रस्तुतच्या युरोपांतील क्याबिनेट पद्धतीप्रमाणें तर नव्हतीच; परंतु, सतराव्या शतकांतील यूरोपांतलि कित्येक देशांतील क्याबिनेट पद्धतीप्रमाणें ती कांहींशी होती. शिवाजीच्या पद्धतींत व सतराव्या शतकांतील युरोपियन पद्धतींत अंतर असें आहे कीं शिवाजीचे न्यायाधीश व पंडितराव ह्या दोन प्रधानांखेरीज बाकीचे सर्व प्रधान लढाया करीत व युरोपांतील प्रधानांना हा शिपायागिरीचा धंदा बहुशः माहीत नसे. सारांश, शिवाजीच्या प्रधानमंडळींचें साम्य यूरोपांतील कोणत्याहि शतकांतलि क्याबिनेटशीं नाहीं. शिवाजीनें केवळ मुसुलमानांचा कित्ता गिरविलेला आहे. तेव्हां ह्या क्लप्तींत सूचित होणारी ( ब ) आणि ( क ) हीं कलमें पूर्वग्रहात्मक होत हें उघड आहे. सत्यासत्य पद्धतींची भेसळ होते ती ही अशी होते. ह्या भेसळीला फार जपलें पाहिजे. ( ५ ) उपमान प्रमाणावर कोणताहि सिद्धांत ठरवूं नये. हीं पांच कलमें लक्ष्यांत ठेवून इतिहासरचना केली असतां ती सन्मान्य होईल ह्यांत संशय नाहीं. मराठ्यांच्या राष्ट्राच्या जीवनचरित्राचा अभ्यास अनेक दिशांनी केला पाहिजे. ( १ ) मराठ्यांचा सामाजिक इतिहास, ( २ ) मराठ्यांचा राजकीय इतिहास, ( ३ ) मराठ्यांच्या धर्माचा इतिहास, ( ४ ) मराठ्यांच्या संस्कृतीचा इतिहास,(५) मराठ्यांच्या भाषेचा इतिहास, ( ६ ) मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास, ( ७ ) मराठ्यांच्या लष्कराचा इतिहास, (८ ) मराठ्यांच्या आरमाराचा इतिहास, (९ ) मराठ्यांच्या

कायदेकानूंचा इतिहास, ( १० ) मराठयांच्या किल्ल्यांचा इतिहास, ( ११ ) मराठयांच्या जमीनमहसुलाचा इतिहास वगैरे शाखांचा सशास्त्र व सोपपात्तिक असा अभ्यास झाला पाहिजे. मराठयांच्या राजकीय इतिहासाचा सध्यां येथें विचार चालला आहे, तेव्हां त्याचे विभाग सशास्त्र किती करितां येतील तें स्थूलमानानें सांगतों. ( १ ) इ. स. १६४६ पर्यंत शिवाजीच्या पूर्वींचा इतिहास. ( २ ) १६४६ पासून १६८० पर्यंतचा स्वातंत्र्यार्थ लढाईचा इतिहास. ( ३ ) १६८० पासून १७०७ पर्यंतच्या स्वातंत्र्यार्थ लढाईच्या शेपटाचा इतिहास ( ४ ) १७०७ पासून १७३१ पर्यंतचा स्वराज्यस्थापनेचा व हिंदुपदवादशाहीचा इतिहास. ( ५ ) १७३१ पासून १७६१ पर्यंतचा ब्राह्मणपदवादशाहीचा इतिहास. (६) १७६१ पासून १७९६ पर्यंतचा ब्राह्मणपदवादशाहीच्या जगवणुकेचा इतिहास.( ७ ) १७९६ पासून १८१८ पर्यंतचा महाराष्ट्रसाम्राज्याच्या ऱ्हासाचा इतिहास. ( ८ ) १८१८ पासून १८९८ पर्यंतचा महाराष्ट्राच्या अवनतीचा इतिहास. मराठयांच्या इतिहासाच्या ह्या विभागांबरोबर महाराष्ट्राच्या भूज्ञानाचाहि अभ्यास झाला पाहिजे.

## विवेचन दहावें.

सतराव्या व अठराव्या शतकांत महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं स्थितीपेक्षां गतीचेंच प्राबल्य विशेष होतें. पावसाळ्याचे चार महिने खेरीजकरून बाकीचे आठ महिने मराठे पुण्याहून दाही दिशांभर पसरत असत. अठराव्या शतकांत मराठयांच्या गतीचें मुख्य केंद्र पुणें शहर होतें. मुसुलमानांच्या कारकीर्दीतहि पुण्याचें ठिकाण मोहिमांची सुरवात करण्यास सोईचें समजलें जात असे व त्याच्या ह्या सोयीस्कर स्थानावरून त्यांनीं त्याला मोहिमाबाद असें अन्वर्थक नांव दिलें होतें. सातारा व सासवड हीं स्थलें सोडून पेशव्यांनीं आपलें ठाणें पुण्यास दिलें त्याचें तरी मुख्य कारण हेंच. हिंदुस्थानांत, कोंकणांत, गुजराथेंत, श्रीरंगपट्टणास व निजामाच्या राज्यांत जाण्यास पुण्याच्या मैदानांतून अनेक रस्ते फुटतात. त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य मार्गांचा व मुक्कामांचा येथें तपशील देतों.

( १ ) पुणें ते नाशीकः—पुणें, भांबुरी, भोसरी, मोसें, चाकण, खेड, पेठ, लिंगदेव, भोगूर, गोवर्धन, त्रिंबक, नाशीक.

( २ ) पुणें ते वसई, ठाणें, पनवेलः—पुणें, पुनावळें, तळेगांव, नाणें, माह्ल, कुसूरघाट, भिऊपुरी वैजनाथ, नासरापूर, दाहिवली, बदलापूर, कल्याण, वसई, परशीक, ठाणें, तळेगांव, वडगांव, कार्लें, बोरघाट, खालापूर, चौक, पनवेल, मुंबई.

( ३ ) पुणें ते नागोठणेंः—पुणें, भांबुर्डें, मुळशी, भोरकस, भोरप, पाली, नागोठणें, अलीबाग, चौक, रेवदंडा.

( ४ ) पुणें ते रायगडः—पुणें, खडकवासलें, खामगांव, पाद्र्याचा घाट, येल्याची पेठ, वोचाघोळी, रायगड, महाड, तळें, घोसाळें, गावेल, श्रीवर्धन, बाणकोट.

(५) पुणें ते वाईः—पुणें, कात्रज, शिवापूर, भोर, अंबेडखिंड, वाई, बावधन, सातारा.

(६) पुणें ते पुरंधरः—पुणें, बोपदेवघाट, सासवड, पुरंधर.

(७) पुणें ते साताराः—पुणें, बोपदेवघाट, सासवड, जेजूरी, दहीगांव, माहुली, सातारा.

(८) पुणें ते कोल्हापूरः—पुणें, जेजूरी, कोरेगांव, न्हावी, पुसेसावळी, वाळवें, कोल्हापूर, निपाणी, संकेश्वर, बेळगांव, शहापूर.

(९) पुणें ते पंढरपूरः—पुणें, मोंढवें, थेऊर, पाटस, मोरगांव, होळमुरूम, सांगवी, अकलूज, पंढरपूर, सांगोलें, मंगळवेढें, विजापूर.

(१०) पुणें ते श्रीरंगपट्टणः—पुणें, पंढरपूर, विजापूर किंवा सांगोलें, जत, गलगलें, बागलकोट, हुनगुंद, किल्ले, कोपल, आनजी, हरिहर, चित्रदुर्ग, शिरें, नागमंगळ, श्रीरंगपट्टण.

(११) पुणें ते सावनूरः—पुणें, पंढरपूर, आसंगी, कवतगी, गळतगें, बागलकोट, वदामी, कुरुतकोटी, लक्ष्मेश्वर, सावनूरबंकापूर.

(१२) पुणें ते नगर, औरंगाबादः—पुणें, कोरेगांव, रांजणगांव, घोडनदी, जातेगांव, खेरगांव, अहमदनगर, कायगांवटोकें, सातारा, औरंगाबाद.

(१३) पुणें ते दिल्लीः—पुणें, औरंगाबाद, अजंटा, बऱ्हाणपूर, हांडिया, सीहूर, सीरोंज, नरवर, ग्वालेर, ढवळपूर, आग्रा, मथुरा, दिल्ली, पानपत, कुरुक्षेत्र.

(१४) पुणें ते उज्जैनः—पुणें, नाशीक, मालेगांव, सेंधवें, महेश्वर, इंदूर, उज्जैन.

(१५) पुणें ते भडोच, सुरत, बडोदें, अमदाबादः—पुणें, नाशीक, बागलाण, खानदेशच्या बाऱ्या, कासारवारी वगैरे.

(१६) पुणें ते नागपूरः—पुणे, औरंगाबाद, दाभाडी, जाफराबाद, बाळापूर अलजपूर, नागपूर.

(१७) पुणें ते धारूरः—पुणें, गारपीर, थेऊर, करखंब, साळूमाळूचें पारगांव, वाळकी, मांडवगण, आडळगांव, भोसेगांव, सिंगवी, फकराबादधानोरें, बारशी, खर्डे, पानगांव, गारदौंड, पेडगांव, परिंडा, बीड, धारूर.

(१८) पुणें ते भागानगरः—पुणें, सुपें, बारामती, तुळजापूर, कल्याण, बेदर, भालकी, उदगीर, गोवळकोंडा, भागानगर.

पुण्याहून फुटणाऱ्या मोठमोठ्या मार्गांपैकीं कांहींचा हा ठोकळ तपशील आहे. ह्या मार्गांवरून माणसें, बैल, घोडीं, उंटें, हत्ती, पालख्या, मेणे वगैरे वाहनांचा रिघाव यथास्थित होत असे. माकाडामानें १७८० च्या पुढें शोधून काढिलेली खडीच्या सडका करण्याची युक्ति मराठ्यांना त्यावेळीं म्हणजे १७६० त माहीत नव्हती हें सांगावयाला नकोच.

परंतु त्यावेळच्या इंग्लंडांतील व युरोपांतील रस्त्यांची स्थिति लक्ष्यांत आणिली असतां हिंदुस्थानांतील रस्ते उत्तम होते असेंच म्हणावें लागते. पेशव्यांच्या राज्यांत सरकारी डाकेचा कारखाना मोठा असे. सरकारी डाकेबरोबरच खासगी लोकांचींहि पत्रें जात असत. डाकेच्या व रस्त्याच्या बाबींत १७६० त युरोपखंड हिंदुस्थानाच्या फारसें पुढें होतें असें नाहीं. सरकारी डाकेपेक्षां सावकारी डाक जलद पोहोंचत असे. सध्यांच्यापेक्षां त्यावेळीं महाराष्ट्रांतील लोक भरतखंडाच्या सर्व प्रांतांत जास्त प्रवास करीत असत. कोंकणकिनाऱ्यानें गलबतांतूनहि सफरी कोंकणांतील लोकांस कराव्या लागत. द्वारकेपासून गोकर्णापर्यंत तराडी व महागिऱ्या सारख्या चालू असत. परंतु किनारा सोडून पांच पंचवीस कोसांच्या पलीकडे जाण्यास मराठी तारवें फारशीं धजत नसत.

## विवेचन अकरावें.

पानिपतची मोहीम १५ मार्च १७६० ला सुरू झाली व १४ जानेवारी १७६१ ला संपली. ह्या दहा महिन्यांचा सविस्तर वृत्तांत मीं छापिलेल्या पत्रांखेरीज इतरत्र कोठें सांपडण्यासारखा नाहीं. ( १ ) पानिपतच्या बखरींत नुसत्या पानिपतच्या लढाईचा कमजास्त विश्वसनीय असा वृत्तांत दिला आहे. ( २ ) भाऊसाहेबाच्या कैफियतींत सदाशिवराव आंबेपडदुराहून निघाल्यापासून पानिपतची लढाई होईतोंपर्यंत त्रोटक वृत्तांत आहे. ( ३ ) भाऊसाहेबाच्या बखरींत १७५४ पासून १७६१ जानेवारीपर्यंत हकीकत आहे. त्यांत ९० पासून १३२ पृष्ठांपर्यंतचा मजकूर पानिपतच्या मोहिमेसंबंधीं व खुद्द लढाईसंबंधीं आहे. ( ४ ) काशीराजाच्या बखरींत सुजाउद्दौल्याकडील पानिपतच्या मोहिमेचें वर्णन आहे. ( ५ ) मराठयांच्या पराक्रमकारानें छापिलेल्या पानिपतच्या अपूर्ण बखरींत पानिपतच्या लढाईचा बनावट वृत्तांत आहे. ह्या पांच बखरी पानिपतच्या लढाईसंबंधीं आजपर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. पैकीं पराक्रमकारांची बखर बनावट असल्यामुळें ( टीप २९० पहा ) तिचा विचार करण्याचें येथें कारण नाहीं. बाकीच्या ४ बखरींपैकीं काशीराजाच्या बखरीवरून, आजपर्यंत जे स्वदेशी व विदेशी इतिहासकार झाले त्यांनीं, पानिपतच्या लढाईचें वर्णन केलें आहे. ग्रांटडफचा देखील मुख्य आधार काशीराजाचीच बखर आहे. रा. नातू ह्यांनीं मात्र कोठें इतर बखरींचा उपयोग केला आहे. परंतु त्यांचा देखील कल इंग्रजइतिहासकारांच्या मताला मान देऊन, काशीराजाच्याच वृत्तांताकडे वळण्याचा दिसतो. तेव्हां काशीराजाच्या बखरीची ग्राह्याग्राह्यता ठरविणें अत्यंत जरूर आहे. काशीराजाच्या बखरींतील खालील गोष्टी इतिहासाला धरून नाहींत असें ह्या ग्रंथांतील पत्रांवरून कळून येण्यासारिखें आहे. ( १ ) बाळाजी बाजीराव ख्यालीखुशालींत मग्न असे. १७३८ पासून १७६१ पर्यंत वर्षांतून आठ नऊ महिने बाळाजी पुण्याच्या बाहेर असे हें मीं मागें दाखवून दिलें आहे. ( २ ) सदाशिवरावाला रामचंद्र मल्हाराची लहानपणापासून शिक्षा होती म्हणून काशीराज म्हणतो; परंतु, सदाशिवरावाची व रामचंद्र मल्हाराची गांठ १७५० त पडली. त्यापूर्वी भाऊला बाळाजीची शिक्षा होती. ( ३ ) रघुनाथरावाच्या लाहोरच्या स्वारींत जनकोजी शिंदे होता म्हणून काशीराज लिहितो; तेंहि निराधार आहे.(४) उदगीरची लढाई

काशीराजाला माहीत नव्हती असें दिसतें. (५) भाऊ उद्दाम झाला म्हणून काशीराजाचें म्हणणें आहे; परंतु, ह्या ग्रंथांत भाऊचीं गोविंदपंताला गेलेलीं पत्रें किती सौम्यपणानें लिहिलेलीं आहेत हें पाहिलें म्हणजे उद्दामपणाचा आरोप भाऊवर आणणें मुष्कील होतें. (६) दत्ताजी शिंदे नजीबखानाशीं युद्ध करीत असतां रणांत पडला व त्यावेळीं अबदाली दूर अंतर्वेदींत होता अशी काशीराजाची माहिती आहे; परंतु, ती ह्या ग्रंथांतील लेखांक १६५ वगैरेंवरून निराधार आहे हें कळून येईल. (७) भाऊनें दिल्लीस तळ दिल्यावर सुजाउद्दौला अबदालीला मिळाला म्हणून काशीराज म्हणतो; परंतु, भाऊ दिल्लीस येण्याच्या अगोदर सुजा अबदालीला मिळाला होता हें पांचव्या विवेचनांत दाखवून दिलें आहे. (८) कुंजपुरा घेतल्यावर भाऊ दिल्लीशहरास परत आला व तेथें दसऱ्यास त्यानें आपल्या सैन्याची गणती केली असें काजीराज लिहितो; परंतु, कुंजपुऱ्यास गेल्यावर भाऊ दिल्लीस कधीं आलाच नाहीं हें मागें दाखविलेंच आहे. (९) संभाळकिया येथलि लढाईत अबदाली विजयी झाला म्हणून काशीराजाचें म्हणणें आहे; परंतु, त्या लढाईत मराठे शेर झाले म्हणून कृष्ण जोशी लिहितो. (१०) गणपतराव मेहेंदळ्याच्या अगोदर गोविंदपंत वारला म्हणून काशीराज लिहितो; परंतु, ती चूक आहे हें ह्या ग्रंथांतील ३२३ टिपेवरून कळून येईल. येणेंप्रमाणें काशीराजाच्या बखरींतील अग्राह्य भाग आहे. त्यानें स्वदृष्टीनें जेवढें पाहिलें तेवढें बहुशः खरें आहे. बाकीचे सर्व इतर अस्सल आधार असल्यावांचून विश्वसनीय धरवत नाहीं.

(ब) रघुनाथयादवकृत पाणिपतची बखरहि मोठ्या कसोशीनें पारखून घेतली पाहिजे. ही बखर शके १६८४ चित्रभानुनामसंवत्सरे माहे फाल्गुन शुद्ध ५ मंदवारीं पुणें येथें संपविली म्हणून रघुनाथ यादव म्हणतो. परंतु फाल्गुन शुद्ध ५ मीला मंदवार नसून शुक्रवारच आहे. त्याअर्थी मितीवर विश्वास ठेववत नाहीं. बखरीला प्रारंभ २५ जमादिलाखरीं म्हणजे १७६३ च्या १० जानेवारीला केला म्हणून बखरीच्या प्रारंभीं लिहिलें आहे. म्हणजे ही बखर सजवावयाला ४१ दिवस लागले असें होतें. ह्या बखरींतलि लढाईची तारीख चुकली आहे. भाऊ व विश्वासराव रणांत पडल्यावर मग बाळाजी बाजीराव पुण्याहून उत्तरेकडे निघाले असें रघुनाथ यादव दफात्यावरून लिहितो म्हणून म्हणतो. परंतु बाळाजी बाजीराव पानिपतच्या लढाईच्या अगोदर हिंदुस्थानास जाण्यास पुण्याहून निघाले हें निर्विवाद आहे. तेव्हां रघुनाथ यादवानें दफात्याचा नीट उपयोग केला नाहीं असें म्हणावें लागतें. माहितीपेक्षां वर्णनानें ही बखर जास्त फुलविलेली आहे.

(क) कांहीं लहान सहान चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची कैफियत बहुतेक पूर्णपणें विश्वसनीय आहे.

(ड) बऱ्याच चुका गाळल्या असतां भाऊसाहेबांची बखर बहुतेक बरीच विश्वसनीय आहे. भाऊसाहेबाचा तोतया निर्माण व्हावयाच्या अगोदर म्हणजे १७६३ च्या अगोदर ही बखर लिहिली आहे. तुंगारप्रतीच्या शेवटीं १७१२ शकाच्याबद्दल १७१३ पाहिजे म्हणजे संवत्सराचें नांव, तिथि व चंद्र बरोबर होतात.

## विवेचन बारावें.

कोल्हापूर येथील प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रीचा उपयोग मला अतिशय झाला. ह्या जंत्रींत चूक म्हणून फारशी कोठें नाहीं. कधीं कधीं तिथींचे वार व मुसुलमानी तारखांचे वार जंत्रींत व ऐतिहासिक पत्रांत निराळे सांपडतात. प्रो. मोडक ह्यांच्या जंत्रींतील तिथी, तारखा व वार जर ठाम बरोबर असतील तर पत्रांतील तीथि, वार व तारीख मोडकांच्या जंत्रींत जेथें जेथें जमत नाहींत तेथें तेथें एकच अनुमान करणें प्राप्त होतें. तें हें कीं, प्रो. मोडकांनीं ज्या जंत्रीवरून व पंचांगावरून आपली जंत्री रचिली ती जंत्री व तीं पंचांगें पत्रें लिहिणाऱ्यांच्याजवळ जीं पंचांगें होतीं त्यांच्याहून निराळीं असावीं. क्षय व वृद्धि ह्या तिथि निरनिराळ्या प्रांतांतील पंचांगांत निरनिराळ्या दिवशीं कदाचित् असूं शकतील; परंतु, इतर तिथी निरनिराळ्या प्रांतांतील पंचांगांत निरनिराळ्या वारीं कां असाव्या ह्याचें कारण समजत नाहीं. तसेंच तारखांचे वारहि निरनिराळ्या पंचांगांत कां बदलावे तेंहि नीट समजत नाहीं. उदाहरणार्थ कांहीं पत्रांच्या तारखा खालीं देतों.

( १ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १७७ व्या पत्रांत फाल्गुन शुद्ध चतुर्थी बुधवारीं आहे म्हणून लिहिलें आहे. प्रो. मोडकांच्या जंत्रींत चतुर्थी गुरुवारीं आहे. त्यावरून मथळ्यावरील इंग्रजी तारीख १७ फेब्रुवारी म्हणून मांडली आहे. पत्र ज्याअर्थी बुधवारीं चतुर्थ प्रहरीं म्हणजे सध्यांच्या दुपारच्या तीनपासून सहा वाजेपर्यंतच्या कालांत केव्हां तरी लिहिलें आहे त्याअर्थी बुधवार हा वार खरा व बुधवारचीच इंग्रजी तारीख घेतली पाहिजे. तसेंच बुधवारीं चतुर्थी होती हेंहि कबूल केलें पाहिजे.

( २ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १७९ व्या पत्रांत फाल्गुन वद्य ७ ला मंदवार आहे; परंतु, जंत्रींत रविवार आहे.

( ३ ) ऐतिहासिकलेखसंग्रहांतील १५१ व्या पत्राच्या तिसऱ्या ओळींत १७ जमादिलाखरीं मंगळवार सांगितला आहे; १५३ व्या पत्रांत १८ जमादिलाखरीं मंगळवार सांगितला आहे व ह्याच १५३ व्या पत्रांत अमावास्येला गुरुवार लिहिला आहे. १५३ वें पत्र गुरुवारीं लिहिलें आहे, ह्यांत संशय नाहीं; कारण " कालीं " बुधवार होता म्हणून पत्र लिहिणारा पुढें लिहितो. गुरुवारीं अमावास्या होती किंवा नाहीं एवढीच शंका आहे. १७ व १८ तारखा चुकल्या आहेत हें निर्विवाद आहे.

(४) काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे ८ त आषाढ वद्य ५ ला रविवार व १० ला शुक्रवार आहे; जंत्रींत ह्या दोन्ही तिथींस अनुक्रमें सोमवार व शनवार आहे. उत्तर चोवीस रमजान शनवारीं लिहिलें आहे. पत्र शुक्रवारीं २३ रमजानला आलें. शुक्रवारीं पेशव्यांच्या पंचांगांत १० मी होती.

( ५ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी १७ च्या पैवस्तींत ज्येष्ठ शुद्ध १५ सोमवारीं आहे; जंत्रींत पूर्णिमेचा क्षय आहे

( ६ ) काव्येतिहाससंग्रह, पत्रें व यादी ४२९ त ३९३ पृष्ठाच्या खालून ३ ऱ्या ओळींत शके १६८२ साधारणनाम संवत्सरीं फाल्गुन शुद्ध ३ ला मंदवार दिला आहे;

जंत्रींत रविवार आहे. पत्रांतल्याप्रमाणें शनवारीं दोन प्रहरीं दिवसा ३ होती. तेव्हां रविवारी जो तृतीयेचा शेष राहिला असेल त्याच्या जोरावर रविवारीं ३ या होऊं शकेल कीं काय ?

( ७ ) काव्येतिहाससंग्रह,पत्रें व यादी ४३० त चैत्र शुद्ध ३ ला इंदुवासर दिला आहे; जंत्रींत मंगळवार आहे.

( ८ ) भारतवर्ष, पत्रें, यादी वगैरे ३१ त मार्गशीर्ष शुद्ध १२ स दोनप्रहरीं मंदवार दिला आहे; जंत्रींत १२ शुक्रवारीं आहे. ह्याच पत्रांत आणीक पांच ठिकाणीं सन, शक, राजशक, तिथि, वार, तारीख वगैरे दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहींना कांहींतरी मूळपत्रांत किंवा लेखांकाच्या नकलेंत किंवा संपादकाच्या नजरचुकीनें चुकलें असल्यामुळें ह्या तीथवारां-संबंधीं माझें कांहींच म्हणणें नाहीं. हें मासिकपुस्तक मोठ्या अव्यवस्थितपणें संपादिलें जात असल्यामुळें ह्याच्यांतील आंकड्यांवर विश्वास ठेववत नाहीं.

पत्रांतील व जंत्रींतील फरक दाखविण्याकरितां आणीकहि पुष्कळ दाखले देण्यांत येतील; परंतु, एवढ्यावरच काम भागण्यासारखें असल्यामुळें जास्त विस्तार करीत नाहीं. प्रो. मोडकांनीं इ० स० १७२८ पासून १८९४ पर्यंत जंत्री तयार केल्यामुळें ह्या अवधींतील मराठ्यांच्या कागदपत्रांचा अभ्यास करणाऱ्यांस मोठी सोय झाली आहे. जर प्रो. मोडक इ०स० १५०० पासून १७२८ पर्यंत दुसरी एक जंत्री छापतील तर त्या वेळच्याहि कागदपत्रांचा अभ्यास करण्यास एक उपकरण तयार झाल्यासारखें होईल. शहाजी, शिवाजी, राजाराम व शाहू ह्यांच्या वेळची जंत्री अवश्य पाहिजे आहे. तींत दिल्ली येथील जुलुसी सनाच्या तारखा आल्यास फार उपयोग होईल.

ह्या पुस्तकाच्या टिपेंत व प्रस्तावनेंत काव्येतिहाससंग्रह, ऐतिहासिकलेखसंग्रह व भारत-वर्ष ह्या तीन मासिकपुस्तकांतील कांहीं लेखांचा उपयोग केला आहे. ज्या लेखांचा मला परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें उपयोग झाला आहे त्यांचे सन मी प्रो. मोडक यांच्या जंत्री-वरून ठरवून टाकिले आहेत. ते बरोबर ठरले आहेत किंवा नाहींत हें तपासण्याचें काम

## काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी.

जेथें पैवस्तीखेरीज दुसरी तारीख काढण्यासारखी नाहीं तेथें पैवस्तीचीच तारीख समजावी.

| पत्रें व यादी. | सन. | टीका. |
|---|---|---|
| २ | २२ एप्रिल १७५१ | शिवराम गोविंद भिडे औरंगाबादेस १७५१त होता(लेखांक१०). |
| ३ | २७ जुलै १७५१ | |
| ४ | ११ सप्टेंबर १७५१ | |
| ५ | १ जुलै १७५२ | चंद्र २९ साबान. |
| ६ | २१ जुलै १७५२ | पैवस्तींत शके १६७६ बद्दल १६७४ पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | २५ जुलै १७५२ | ११ रमजान=१२ जुलै १७५२. हें पत्र पुढील पत्राची पुरवणी आहे. |
| ८ | २५ जुलै १७५२ | मोडकांच्या जंत्रींत आषाढ वद्य ५ स सोमवार आहे व १० स शनिवार आहे. |
| १० | १३ नोव्हेंबर १७४० | |
| ११ | २९ सप्टेंबर १७४० | |
| १२ | २० जानेवारी १७५१ | |
| १३ | २७ जुलै १७५२ | |
| १४ | २५ जानेवारी १७५३ | गुरुवारीं बहुल सप्तमी आहे, पंचमी नाहीं. वद्य ७=१९ रबिलावल गुरुवार. पत्र रात्रौ लिहिलेलें आहे. |
| १५ | ३ जून १७५४ | |
| १६ | २७ फेब्रवारी १७५५ | |
| १७ | २३ जून १७५५ | सोमवारीं पूर्णिमा किती घटकांनीं लागली ? |
| १८ | १ सप्टेंबर १७५५ | |
| १९ | जानेवारी १७५२ | रामदासपंत १७५२ च्या एप्रिलांत वारला व त्रिंबक १७५१च्या डिसेंबरांत त्रिंबक सूर्याजीनें घेतला. |
| २० | पाहिलें पत्र पहा. | |
| २१ | ३ फेब्रुवारी १७६१ | माघ वद्य १ ला २६ जमादिलाखर नाहीं; १४ रजब आहे; मितीची व रवान्याची तारीख निराळी असेल. |
| २२ | १२ मे १७६१ | जंत्रींत ६ सवालीं ९ मी आहे. |
| २३ | जानेवारी १७५२ | |
| २४ | सप्टेंबर १७५१ | |
| २५ | २४ जुलै १७३५ | ह्या पत्रांत बाळाजी बल्लाळ प्रधान म्हणून बाजीरावानें आपल्यास म्हटलें आहे. तेव्हां बाजीरावाचें पाळण्यातील नांव बाळाजी होतें असें दिसतें. बाळाजींतील ळाचा लोप केला तर बाजी रहातें. |

| | | |
|---|---|---|
| २६ | २४ डिसेंबर १७४१ | १७४२ च्या सिंहस्थाच्या आधींचें हें पत्र आहे. यमुनेच्या घांटीं बाळाजीस पोहोंचलें. |
| २७ | २० मार्च १७५४ | |
| २८ | २७ मार्च १७५३ | चैत्रशुद्ध १५ मंगळवारीं :१३ जमादिलाखर नाहीं; १२ जमादिलाखर आहे. |
| २९ | ४ डिसेंबर १७६९ | |
| ३० | ६ डिसेंबर १७६९ | |
| ३१ | १७ अक्टोबर १७५४ | पैवस्तींत शके १६७५ वद्दल शके १६७६ पाहिजे. |
| ३२ | १ आगस्ट १७५४ | |
| ३३ | ३ सप्टेंबर १७६३ | |
| ३४ | ८ सप्टेंबर १७५८ | ४ मोहरमच्या पुढें आश्विन शुद्ध ४ आली पाहिजे. |
| ३५ | ३० मार्च १७५७ | पैवस्तींत चैत्र शुद्ध एकादशी पाहिजे; प्रतीपदा चुकून पडली आहे. |
| ३६ | २८ मार्च १७५७ | |
| ३८ | २७ नोव्हेंबर १७६१ | मित्ती व रवान्याच्या तारखा निराळ्या. |
| ३९ | ११ आगष्ट १८०२ | |
| ४० | १६ फेब्रुवारी १७४३ | फाल्गुन शुद्ध तृतीयेला सौम्यवासर म्हणजे बुधवार शके १६६४ त येतो. |
| ४१ | २९ आगष्ट १७४४ | भाद्रपद शुद्ध तृतीयेला सौम्यवासर म्हणजे बुधवार शके १६६६ त येतो. ब्रह्मेंद्र इ. स. १७४५ च्या २६ जुलैला वारला. |
| ४३ | ११ जानेवारी १७३८ | |
| ४४ | ८ जानेवारी १७३८ | बागस=महमदखान बंगष. |
| ४५ | १७ एप्रिल १७३९ | तोबेयास कुलीखान=नादीरशहा. |
| ४७ | २४ एप्रिल १७४१ | |
| ४८ | १९ जानेवारी १७४३ | |
| ४९ | १४ जानेवारी १७४१ | |
| ५० | २१ आगष्ट १७६१ | |
| ५१ | २४ अक्टोबर १७४६ | ९५ वें पत्र पहा. |
| ५२ | ११ जून १७७४ | हा नारोशंकर राजेबहादर नसावा. |

| | | |
|---|---|---|
| ५५ | ४ फेब्रुवारी १७३९ | |
| ५६ | १३ मे १७३९ | अंत्रींत वद्य १ चा लोप आहे. |
| ५७ | १५ जून १७३९ | |
| ५८ | १० एप्रिल १७४० | ३ मोहोरमबद्दल २३ मोहोरम पाहिजे. दशमीला ३ तारीख अशक्य. |
| ६० | २९ मे १७४५ | |
| ६१ | २२ मे १७५९ | |
| ६२ | १७ जुलै १७४६ | |
| ६३ | १५ जुलै १८१२ | |
| ६४ | १९ अक्टोबर १८१४ | |
| ६५ | १३ जून १७६६ | |
| ६६ | ९ जुलै १७५७ | |
| ६७ | १६ डिसेंबर १७४६ | शुद्ध प्रतिपदेच्याबद्दल वद्य प्रतिपदा पाहिजे. वद्य प्रतिपदेच्या दुपारीं दिवसा छ १४ जिल्हेज होता, त्या दिवशीं जगजिवनाला प्रातिनिधी मिळाली. शुद्ध प्रतिपदेला मुसुलमानी १४ तारीख कधींहि नसते. |
| ६८ | ६ एप्रिल १७४७ | |
| ६९ | ७ जून १७४६ | |
| ७० | इ. स. १८१२ | बाबासाहेब म्हणजे बाजीराव बल्लाळ नव्हे; बाबासाहेब म्हणजे यशवंतराव होळकर. पत्रें, यादी ६३ व ९३ पहा. ६३ वें पत्र १८१२ तील आहे ह्यांत संशयच नाहीं. त्या पत्रांतील बाळाजी लक्ष्मण, खंडो महादेव व सखाराम जगजीवन, हीं नांवें ह्या पत्रांत आलीं आहेत. तेव्हां हा मल्हारराव दुसरा होय, थोरला नव्हे. होळकरांची कैफियत पहा. सदाशिव माणकेश्वराला हें पत्र लिहिलें आहे. ह्या माणकेश्वराचें नांव ४४१ ह्या पत्रांत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७१ | १९ डिसेंबर १७५६ | शिंदखेडच्या लढाईच्या अगोदरचें पत्र आहे. |
| ७३ | २१ अक्टोबर १७४६ | |
| ७४ | ८ जून १७४६ | |
| ७६ | २२ एप्रिल १७५९ | ६१ वें पत्र पहा. |
| ७७ | २१ फेब्रुवारी १७४७ | सदाशिवरावभाऊ ५ डिसेंबर १७४६ त बहादूर भेंड्याच्या स्वारीस गेले ते ३ मे १७४७ त पुण्यास परत आले. ग्रांट्डफ्च्या म्हणण्याप्रमाणें ही स्वारी १७४६ त सुरू झाली. ग्रांटडफ् चुकला आहे म्हणून ऐतिहासिकलेखसंग्रहकार म्हणतात (ऐतिहासिक लेखसंग्रह, नं. ब) ती चूक आहे. |
| ७८ | २२ फेब्रुवारी १७४७ | |
| ७९ | ३० एप्रिल १७४७ | |
| ८० | ३१ जुलै १७५२ | |
| ८१ | २५ नोव्हेंबर १७४७ | |
| ८२ | २९ आगष्ट १७४६ | |
| ८३ | १९ एप्रिल १७५९ | |
| ८४ | १० अक्टोबर १७५९ | |
| ८५ | ९ आगष्ट १७५२ | |
| ८६ | १७४८ | |
| ८९ | १७४१—१७४९ | |
| ९२ | नोव्हेंबर १७४७ | |
| ९३ | २७ जुलै १८१२ | ६३,७० पत्रें पहा. |
| ९४ | १४ जुलै १७६९ | माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीत १७६८ व १७६९ त म्हैसुरावर स्वारी झाली त्यावेळचें हें पत्र आहे. काव्येतिहाससंग्रहकार हें पत्र बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतील समजतात; पण ती त्यांची चूक आहे. कारण श्रावणांत रबिलाखर बाळाजी बाजी- |

| | | |
|---|---|---|
| | | रावाच्या कारकीर्दींत १७४० पासून १७६१ पर्यंत कधींच आला नाहीं. मल्हारराव रास्ते बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत होता व आनंदराव रास्ते माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दींत होता. |
| ९५ | २८ अक्टोबर १७४६ | |
| ९६ | ४ डिसेंबर १७५९ | हें पत्र १३ रबिलावलीं रवाना केलें. तेव्हां त्याच्यांत १४ रबिलावल येणें अशक्य आहे. १४ रबिलावलाबद्दल १२ रबिलावल पाहिजे. कां कीं १२ रबिलावलींच शनवार पडतो; १४ रबिलावलीं पडत नाहीं. ह्या ग्रंथांतील टीप २३१ पहा. |
| ९७ | २२ अक्टोबर १७४६ | |
| ९८ | ३० मे १७६० | |
| ९९ | १० एप्रिल १७४६ | |
| १०० | २५ मार्च १७४१ | बाजीराव व चिमाजीअप्पा वारल्यावरचें हें पत्र आहे. |
| १०१ | २ जानेवारी १७६७ | |
| १०२ | १० डिसेंबर १७५२ | कार्तिक वद्याच्या पुढें ३ सफर येऊन कार्तिक वद्य द्वितीयेला गुरुवार येतो तो १७५२ च्या डिसेंबरांतच येतो. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत इतर वर्षी कधींच येत नाहीं. |
| १०३ | कदाचित् १७४५ | तारखेबद्दल व वर्षाबद्दल अगदींच संशय आहे. |
| १०४ | ८ मे १७४५ | ६० वें पत्र पहा. |
| १०६ | २३ आगस्ट १७६१ | |
| ११० | १७५८ | हें पत्र गोपाळराव बापूजींचें आहे. |
| ११३ | ५ एप्रिल १७६९ | |
| ११४ | १७३२ | हें येसाजी आंग्र्याचें पत्र आहे. ह्या पत्रांतलि बराच मजकूर चिटणिशी |

| | | |
|---|---|---|
| ७१ | १९ डिसेंबर १७५६ | शिंदखेडच्या लढाईच्या अगोदरचें पत्र आहे. |
| ७३ | २१ अक्टोबर १७४६ | |
| ७४ | ८ जून १७४६ | |
| ७६ | २२ एप्रिल १७५९ | ६१ वें पत्र पहा. |
| ७७ | २१ फेब्रुवारी १७४७ | सदाशिवरावभाऊ ५ डिसेंबर १७४६ त बहादूर भेंड्याच्या स्वारीस गेले ते ३ मे १७४७ त पुण्यास परत आले. ग्रांट्डफ्च्या म्हणण्याप्रमाणें ही स्वारी १७४६ त सुरू झाली. ग्रांटडफ् चुकला आहे म्हणून ऐतिहासिकलेखसंग्रहकार म्हणतात ( ऐतिहासिक लेखसंग्रह, नं. ब ) ती चूक आहे. |
| ७८ | २२ फेब्रुवारी १७४७ | |
| ७९ | ३० एप्रिल १७४७ | |
| ८० | ३१ जुलै १७५२ | |
| ८१ | २५ नोव्हेंबर १७४७ | |
| ८२ | २९ आगष्ट १७४६ | |
| ८३ | १९ एप्रिल १७५९ | |
| ८४ | १० अक्टोबर १७५९ | |
| ८५ | ९ आगष्ट १७५२ | |
| ८६ | १७४८ | |
| ८९ | १७४१—१७४९ | |
| ९२ | नोव्हेंबर १७४७ | |
| ९३ | २७ जुलै १८१२ | ६३,७० पत्रें पहा. |
| ९४ | १४ जुलै १७६९ | माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीत १७६८ व १७६९ त म्हैसुरावर स्वारी झाली त्यावेळचें हें पत्र आहे. काव्येतिहाससंग्रहकार हें पत्र बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील समजतात; पण ती त्यांची चूक आहे. कारण श्रावणांत रबिलाखर बाळाजी बाजी- |

| | | |
|---|---|---|
| | | रावाच्या कारकीर्दीत १७४० पासून १७६१ पर्यंत कधींच आला नाहीं. मल्हारराव रास्ते बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत होता व आनंदराव रास्ते माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दींत होता. |
| ९५ | २८ अक्टोबर १७४६ | |
| ९६ | ४ डिसेंबर १७५९ | हें पत्र १३ रबिलावलीं रवाना केलें, तेव्हां त्याच्यांत १४ रबिलावल येणें अशक्य आहे. १४ रबिलावलाबद्दल १२ रबिलावल पाहिजे. कां कीं १२ रबिलावलींच शनवार पडतो; १४ रबिलावलीं पडत नाहीं. ह्या ग्रंथांतील टीप २३१ पहा. |
| ९७ | २२ अक्टोबर १७४६ | |
| ९८ | ३० मे १७६० | |
| ९९ | १० एप्रिल १७४६ | |
| १०० | २५ मार्च १७४१ | बाजीराव व चिमाजीअप्पा वारल्यावरचें हें पत्र आहे. |
| १०१ | २ जानेवारी १७६७ | |
| १०२ | १० डिसेंबर १७५२ | कार्तिक वद्याच्या पुढें ३ सफर येऊन कार्तिक वद्य द्वितीयेला गुरुवार येतो तो १७५२ च्या डिसेंबरांतच येतो. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत इतर वर्षीं कधींच येत नाहीं. |
| १०३ | कदाचित् १७४५ | तारखेबद्दल व वर्षाबद्दल अगदींच संशय आहे. |
| १०४ | ८ मे १७४५ | ६० वें पत्र पहा. |
| १०६ | २३ आगस्ट १७६१ | |
| ११० | १७५८ | हें पत्र गोपाळराव बापूजींचें आहे. |
| ११३ | ५ एप्रिल १७६९ | |
| ११४ | १७३२ | हें येसाजी आंग्र्याचें पत्र आहे. ह्या पत्रांतलि बराच मजकूर चिटणिशी |

| | | |
|---|---|---|
| | | बखरींत आहे. तसेंच ४२८।४२९ पत्रांतीलहि मजकूर चिटणीसांच्या बखरींत आहे. ह्यावरून अस्सल कागद पाहून चिटणीसांनीं बखर लिहिली असें अनुमान होतें. सामर्थ्याप्रमाणें त्यांनीं उपयोग केला. |
| १३२ | १७४७ | हें पत्र सदाशिव चिमणाजीनें लिहिलें आहे. |
| १३३ | १७५७ | |
| १३४ | १४ एप्रिल १७५५ | |
| १४४ | १७५१ | ऐतिहासिक लेखसंग्रह नं. २ पहा. ४२२ व्या पत्राच्या शेवटच्या ओळी पहा. |
| १६१ | २७ मार्च १७५२ | |
| १६२ | २२ मे १७५१ | " मराठ्यांच्या पराक्रम "कारानें ह्यांतलि मजकूर अज्ञानानें गोविंदपंत बुंदेल्याला लाविला आहे. |
| १६३ | १० जून १७५१ | |
| १६६ | २४ मे १७३३ | बाजीराव बल्लाळाच्या चरित्रकर्त्यानें १७३८ सालचा वृत्तांत देतांना ह्या पत्राचा उतारा घेतला आहे ! |
| १६७ | १३२७ फेब्रुवारी | |
| १६८ | ३१ मार्च १७५७ | २७ रविलाखरीं साताऱ्याजवळ गेंड्याच्या माळावर लढाई झाली नागोराम मेघःशामाचें नांव धाकट्या रामराजाच्या चरित्राच्या ९ व्या पृष्ठावर आलें आहे. |
| १६९ | डिसेंबर १७२६ | १६७ वें पत्र पहा. १६७ वें व १६९ वें हीं दोन्हीं पत्रें अंबाजीपंत पुरंधऱ्याला एक शाहूनें व एक बाजीरावानें अशीं लिहिलीं आहेत. गुजराथेंत पेशव्यांच्या वतीनें कंठाजी कदम बांडे असे व सेनापती दाभाडे यांच्या वतीनें पिलाजी गायकवाड असे. पेशवे व सेनापति यांचें वांकडें; तेव्हां कंठाजी |

| | | |
|---|---|---|
| | | व पिलाजी यांचेंहि वांकडेंच. त्या दोघांचें खंबायतेस १७२६त खडाजंगी युद्ध झालें. त्याला अनुलक्षून हीं दोन्हीं पत्रें आहेत. |
| १७० | ८ फेब्रुवारी १७६० | ह्या पत्रांत उदगीरची लढाई जिंकल्याची बातमी बाळाजी बाजीरावानें महिपतराव त्रिंबकाला लिहिली आहे. काव्येतिहाससंग्रहकारांच्या मतें हें पत्र १७५९ सालचें असावें असें दिसतें. परंतु, उदगीरच्या लढाईनंतर ५ दिवसांनीं हें पत्र लिहिलें असल्यामुळें १७६० हेंच ह्या पत्राचें साल होय. |
| १७१ | १९ एप्रिल १७६० | |
| १७२ | ३० मार्च १७५१ | हें पत्र गेंडयाच्या माळावरील लढाईला अनुलक्षून सदाशिव चिमणाजीनें नाना पुरंधऱ्याला लिहिलें आहे. भाऊ बाळाजीबरोबर निजामाला तुंगभद्रेवर आडवीत होते. ह्या पत्रांत " ह्या " म्हणून शब्द दोनदां आला आहे. ती मोडी वाचनाची चूक आहे. " बरोबर " हा शब्द संक्षिप्त रीतीनें मोडींत " ब॥ " असा लिहितात व तो हुबेहुब " ह्या " सारखा दिसतो. काव्येतिहाससंग्रहकारांच्या मतें हें पत्र १७५० त लिहिलें असावें. परंतु, तसा प्रकार नाहीं. हें पत्र १७५१च्या मार्चांतच लिहिलें आहे. १६८ वें पत्र नाना पुरंधऱ्याला लिहिलें आहे तें पहा. १७५० सालीं रामदासपंताचें कारस्थान मुळींच नव्हतें. १७५१ च्या जानेवारींत रामदास सलाबताचा दिवाण झाला. तोंपर्यंत रामदासपंताचें नांव इतिहासांत माहीत नाहीं. |

| | | |
|---|---|---|
| १७३ | ११ मे १७५१ | हें पत्र १७२ व्या पत्रानंतर १२ दिवसांनीं पाठविलें आहे. |
| १७४ | मे १७५० | सांगोल्याच्या स्वारीच्या वेळचें पत्र. बाबा म्हणजे रामचंद्रबाबा नव्हे, महादोबा पुरंधरे होत. ३५९ पत्र पहा. |
| १७५ | ७ मार्च १७६१ | |
| १६४ | मे १७५० | सांगोल्याच्या स्वारीस जातां वेळचें पत्र. |
| ३३४ | २९ सप्टेंबर १७५१ | |
| ३३५ | ९ जून १७६१ | हें पत्र कोल्हापूरच्या गादीवर दत्तक बसविण्यासंबंधीं आहे. बाळाजीला " समेटी " करावयाची होती–दोन्हीं गाद्यांची. |
| ३३६ | १६ डिसेंबर १७५१ | |
| ३३७ | ३१ मार्च १७५८ | |
| ३३८ | जानेवारी १७५५ | |
| ३४० | २८ मे १७५३ | |
| ३४१ | ५ मे १७५८ | |
| ३४३ | मे १७५५ | |
| ३४६ | २४ नोव्हेंबर १७५६ | |
| ३४७ | १५ सप्टेंबर १७५६ | |
| ३४८ | ३० सप्टेंबर १७५६ | |
| ३४९ | ७ सप्टेंबर १७५६ | |
| ३५० | १७ आगष्ट १७५६ | |
| ३५१ | १८ सप्टेंबर १७५५ | |
| ३५२ | ३० आगष्ट १७५५ | |
| ३५३ | मे १७५१ | |
| ३५४ | २२ मे १७५१ | |
| ३५५ | ७ मार्च १७५२ | |
| ३५६ | १७५६ | |
| ३५७ | ३ सप्टेंबर १७५४ | |
| ३५८ | ११ जून १७५१ | |
| ३५९ | जानेवारी १७५१ | |
| ३६० | १९ आगष्ट १७५४ | |

| | | |
|---|---|---|
| ३६१ | १७५६ | |
| ३६२ | २१ मार्च १७५९ | |
| ३६३ | १२ फेब्रुवारी १७५२ | |
| ३६४ | १० जून १७५१ | |
| ३६५ | १२ जून १७५९ | |
| ३६६ | ८ जुलै १७५९ | |
| ३६७ | २२ आक्टोबर १७५२ | |
| ३६८ | २१ जानेवारी १७६० | |
| ३६९ | ८ अक्टोबर १७५१ | ३९२ पत्र पहा. |
| ३७० | ५ सप्टेंबर १७५४ | |
| ३७१ | २१ सप्टेंबर १७५६ | |
| ३७३ | २४ फेब्रुवारी १७५९ | |
| ३७४ | १२ एप्रिल १७५२ | |
| ३७५ | ८ मे १७६१ | |
| ३७६ | ३ सप्टेंबर १७५४ | |
| ३७७ | ४ मे १७५८ | |
| ३७८ | ३० नोव्हेंबर १७५७ | |
| ३७९ | २२ फेब्रुवारी१७६० | |
| ३८० | ३ सप्टंबर १७५४ | |
| ३८१ | ६ फेब्रुवारी १७५३ | |
| ३८२ | ३१ जुलै १७५५ | |
| ३८३ | १९ जुलै १७५२ | |
| ३८४ | २४ मे १७५२ | |
| ३८५ | २३ मे १७५१ | |
| ३८६ | २९ सप्टेंबर १७५५ | |
| ३८७ | २ मे १७५९ | |
| ३८८ | २४ डिसेंबर १७५८ | |
| ३८९ | ६ अक्टोबर १७५२ | |
| ३९० | जुलै १७५९ | ३३६ वें पत्र पहा. |
| ३९१ | ८ अक्टोबर १७५१ | |
| ३९२ | ७ अक्टोबर १७५१ | |
| ३९३ | १५ नोव्हेंबर १७५४ | |
| ३९४ | १२ फेब्रुवारी १७५२ | |

| | |
|---|---|
| ३९५ | १५ अक्टोबर १७५२ |
| ३९६ | ३१ मे १७५२ |
| ३९७ | ३१ मे १७५२ |
| ३९८ | २० आगष्ट १७५४ |
| ३९९ | ४ सप्टेंबर १७५४ |
| ४०३ | १७ एप्रिल १७५८ |

शके १६८० च्या चैत्रांत फसली सन ११६७ होता. त्या अर्थी ह्या पत्रांतील सर्व सन फसली आहेत हें उघड आहे. ११६७ फसली धरला तर इ. स. १७५८ येतो; १७५१ येत नाहीं. ११६७ सुरूसन धरला तर इ. स. १७६६ येतो. पत्रांत भाऊसाहेब म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे तो सदाशिवराव भाऊ पेशवे नव्हे. तो अकोळनेरचा इनामदार रामाजी अनंत दाभोळकार होय. ११६१ फसलींत म्हणजे १७५१।५२ ह्या सालीं निजामाची व पेशव्यांची लढाई कोरेगांव, जुन्नर, अकोळनेर, नगर, कायगांव, औरंगाबाद ह्या रोखानें होत होती हें प्रसिद्ध आहे. ११६२ फसलींत म्हणजे इ. स. १७५३ च्या जानेवारींतील भालकीच्या तहांत जो प्रांत पेशव्यांना मिळाला त्यांत अकोळनेर होतें असें दिसतें. १७५४ त दाभोळकर जयाप्पा शिंद्याबरोबर हिंदुस्थानांत होता.

| | |
|---|---|
| ४२८चा काहीं भाग | १७४० |
| ४२९ ,, | १७४० |
| ४३९ | १७३९ |
| ४४२ | २१ मे १७४८ |
| ४५१ | १७५६ |

नागोरचा वेढा दत्ताजीनें संपविल्यावेळीं हें पत्र लिहिलें आहे. वैशाख-

मासीं म्हणजे सिंहस्थांत म्हणजे १७५५ च्या एप्रिलांत नाशकास अंताजी माणकेश्वर बाळाजी बाजीरावास भेटला.



| | | |
|---|---|---|
| अ | १३ मे १७३९ | माघशुद्ध १०=६ फेब्रुवारी १७३९ =१७ फेब्रुवारी (डफ). वैशाखशुद्ध ८=५ मे १७३९=१६ मे १७३९ (डफ). १७५२, २ सप्टेंबरपर्यंतच्या ग्रांटडफच्या सर्व तारखा ११ दिवसांनीं पुढें आहेत. |
| ब | ६ एप्रिल १७४७ | हें पत्र काव्येतिहाससंग्रहांत छापिलें आहे (६८). |
| १ | ९ फेब्रुवारी १७५४ | |
| २ | १ नोव्हेंबर १७५५ | कार्तिक शुद्ध २=५ नोव्हेंबर १७५५. |
| ३ | २१ मे १७५६ | २१ साबान म्हणजेच नंबर चारांतील वैशाखवद्य ८ भृगुवार. |
| ४ | २१ मे १७५६ | |
| ५ | ४ फेब्रुवारी १७५७ | |
| ६ | २३ मे १७५५ | |
| ७ | २४ मे १७५५ | १७५७ त अधिकमास आश्विन होता म्हणून १७५७ हें साल ह्या दोन पत्रांचें नव्हें. १७५५ त अधिक मास ज्येष्ठ आहे म्हणून १७५५ हेंच साल खरें आहे. |
| ९ | २२ आगष्ट १७५२ | |
| १० | २३ आगष्ट १७५२ | |
| ११ | २८ फेब्रुवारी १७५८ | |
| १२ | ४ एप्रिल १७५८ | |
| १३ | २०\|२१ मार्च १७६० | |
| १४ | २०\|२१ मार्च १७६० | |
| १५ | १ एप्रील १७६० | |
| १६ | ४ एप्रिल १७६० | |

| | | |
|---|---|---|
| १७ | २एप्रिल१७६० | चैत्रवद्य द्वितीया गुरुवाराबद्दल चैत्र वद्य नवमी गुरुवार पाहिजे. चैत्रवद्य७ म्हणजेच नंबर १८ तील २० साबान. चैत्रवद्य ८ मीला २१ साबान आहे. किल्ला मंगळवारीं घेतला हें खचित आहे. |
| १८ | १८ एप्रिल १७६० | |
| १९ } २० } | ३१ मार्च किंवा १ एप्रिल १७६० | |
| २१ | १९ मार्च १७६० | |
| २२ | २२ मे १७६० | |
| २३ | ११ नोव्हेंबर १७६० | |
| २४ | नोव्हेंबर १७६० | |
| २६ | ९ जानेवारी १७६१ | |
| २७ | २० नोव्हेंबर १७६० | |
| २८ | २५ जानेवारी १७६१ | |

## भारतवर्ष.

| लेखांक | | |
|---|---|---|
| १ | १३ डिसेंबर १७६१ | |
| २ | ८ जानेवारी १७६२ | |
| ७ | १७७९ | धाकटे माधवराव पेशवे व हैदर यांजमध्यें हा तहनामा झाला. हा तहनामा १७८० त झाला नाहीं; १७७९ त झाला. |
| ९ | २८ सप्टेंबर १७६७ | १७६६ सालाचा ह्या यादीशीं कांहींएक संबंध नाहीं. |
| १८ | १५ आगस्ट १७६३ | |
| १९ | २८ डिसेंबर १७६० | हें पत्र विविधज्ञानविस्तारांत छापलें आहे. ह्या मासिकपुस्तकांत तें पुन्हां छापून अशुद्धें व मोडी वाचनाच्या चुका अतोनात ठेविल्या आहेत. |
| ३१ | | पत्रांत अति चुका आहेत. सन शकांच्या चुकांची कमाल आहे |

| | | |
|---|---|---|
| ३५ | एप्रिल, मे १७०७ | |
| ३९ | १७४१ | |
| ४० | | हें पत्र काव्येतिहाससंग्रहांत छापलें आहे. ह्या पत्रासारखें पत्र कधीं कोठें छापलें गेलें नसेल! मोडी वाचनाचा सराव जास्त पाहिजे. |
| ४२ | | बेदनूरच्या वकिलांस तरी कशावरून? |
| ४३ | | मोडी वाचनाच्या चुक्या. |
| ४५ | १७४७ | टीपा चुकीच्या. |
| ४८ | १७४४ | मोडी वाचनाच्या चुक्या. |
| ५० | १४ मार्च १७५७ | ,, ,, इतर चुक्या विस्तारभयास्तव देत नाहीं. |

" पत्रें यादी " वगैरे असे शब्द जेथें आले आहेत तेथें तीं पत्रें, यादी वगैरे काव्येतिहाससंग्रहांतील आहेत असें समजावें.

" लेखांक " असा शब्द जेथें आला आहे तेथें प्रस्तुत पुस्तकांतील पत्रांचे अंक समजावे. इतर उल्लेख स्पष्ट आहेत.

परिशिष्टांना पाउणशें शंभर पृष्ठें बारीक टाइपाचीं लागत असल्यामुळें व जाहीर केलेल्या किंमतींत तीं देणें अशक्य असल्यामुळें तीं ह्या भागांत दिलीं नाहींत. ह्याच अवधींतील घडामोडीसंबंधीं आणीक कांहीं पत्रव्यवहार छापावयाचा आहे त्या बरोबर हीं परिशिष्टें दिलीं जातील.

# प्रस्तावना खंड २ रा.

१. प्रस्तुत शकावलींत खमसअशर सालापासून म्हणजे इ० स० १७१४ च्या मेपासून इहिदेसितैनच्या जमादिलाखरापर्यंत म्हणजे १७६१ च्या जानेवारीपर्यंत घडलेल्या ठळक ठळक प्रसंगांच्या मित्या दिल्या आहेत. शिवाय प्रथमारंभीं १७१४ च्या आधींच्या कांहीं प्रसंगांचाही क्वचित् धरसोडीचा उल्लेख केला आहे.

२. ह्या शकावलींत प्रायः पेशव्यांच्या मोहिमांचाच तेवढा निर्देश केला असल्यामुळें, इतर सरदारांच्या मोहिमांची माहिती हींत फारशी सांपडावयाची नाहीं. पेशव्यांच्या देखील सर्व मोहिमांच्या मित्या हींत दिल्या आहेत असें नाहीं. बाळाजी विश्वनाथाची बहुतेक कारकीर्द विन मित्यांचीच ह्या शकावलींत सांपडेल. आतां इतकें खरें आहे कीं, बाळाजी विश्वनाथाच्या कांहीं हालचालींच्या मित्या ह्या शकावलींत दिल्या आहेत; परंतु ह्या मित्या इतक्या थोड्या आहेत कीं, सबंध माहिनेच्या माहिने बाळाजी विश्वनाथ कोठें होता व काय करीत होता, ह्यांचा नक्की पत्ता अद्यापि लागावयाचाच आहे. समाधान एवढेंच मानावयाचें कीं, आतांपर्यंत ग्रांटडफादि बखरकारांच्या ग्रंथांत जेथें जेथें मुळींच कांहीं माहिती नव्हती, किंवा जी कांहीं थोडीबहुत माहिती दिलेली आहे, ती जेथें जेथें असंबद्ध, परस्परविरोधी व अपूर्ती होती, तेथें तेथें ह्या शकावलींतील मित्यांच्या साहाय्यानें जास्त तपशिलावर, संगतवार व निश्चयात्मक माहिती मिळण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील मित्यांना ज्या टीपा दिल्या आहेत, त्यांच्याकडे लक्ष पोहोंचविलें असतां माझ्या म्हणण्याचा अर्थ उघड होईल.

३. शकावलीच्या कर्त्याला पेशव्यांचें सर्व दप्तर खुलें असून, बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील मित्या त्यानें इतक्या थोड्या कां दिल्या असा प्रश्न साहजिक उद्भवतो. त्याला उत्तर असें आहे कीं, पेशव्यांच्या दफ्तरांतील जीं दफातीं शकावलीकर्त्याला पहावयाला मिळालीं, त्यांतच मुळीं बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीच्या मित्या थोड्या आहेत, अथवा खरें म्हटलें असतां, मुळींच नाहींत. एक तर बाळाजी विश्वनाथाच्या वेळीं दफातीं ठेवण्याची वहिवाट मुदलांतच नव्हती असें तरी म्हटलें पाहिजे; किंवा दफातीं ठेवण्याची वहिवाट होती असें समजल्यास—आवकजावकाचें दफातें ठेविल्याशिवाय कोणताही कारखाना व विशेषतः राजकीय कारखाना चालणें अशक्य आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां हाच समज जास्त संभवनीय ठरतो—तीं दफातीं कोणत्या तरी कारणानें नाहींशीं झालीं असावीं असें म्हणणें अवश्य होतें. कसेंही असो, ह्या शकावलींत बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील मित्या फारच थोड्या व अपूर्या आहेत ह्यांत बिलकूल शंका नाहीं. ह्यास दहापांच प्रत्यंतरें देतां येण्यासारखीं आहेत. तिसऱ्या खंडांतील ४५३ व्या लेखांकांत "इसलामपुरास बाळाजी विश्वनाथ होते" असें लिहून, नंतर पुढें "थोरले

पंतप्रधान दिल्लीहून सातारेस आलेवर महाराजांनीं दक्षिणप्रांतीं मोहीम सांगितली, " वगैरे मजकूर दिला आहे. ह्या लेखांकांत कोल्हापुरच्या संभाजीच्या व सातारच्या शाहूच्या कांहीं झटापटींचें वर्णन आहे व त्यांत बाळाजी विश्वनाथाच्या हालचालींचाही सहजासहजीं उल्लेख केला आहे. त्या उल्लेखावरून असें दिसतें कीं १७१७ त सय्यदांशीं तह केल्यावर बाळाजी इसलामपूर व वाळव्याकडे कांहीं वेळ होता. आणि तेथून १७१८ त तो दिल्लीस गेला व दिल्लीहून परत आल्यावर पुन्हां कोल्हापूरकरांवरील मोहिमेंत तो सामील झाला. शकावलींत सय्यदांशीं तह होण्यापूर्वींच्या बाळाजी विश्वनाथाच्या कोल्हापुरावरील मोहिमांचा बिलकुल उल्लेख नाहीं; दिल्लीहून परत आल्यावरच्या मोहिमेचा मात्र लहानसा उल्लेख आहे. शकावलीच्या ३८ व्या पृष्ठावर 'बेहे येथें स्वारी करून' इतकाच अपूर्ण उल्लेख आहे. शकावलीकर्त्याला मिळालेलीं दफातीं अपूर्तीं होतीं ह्याला दुसरा पुरावा तिसऱ्या खंडांतील १३५ व्या लेखांकाचा आहे. ह्या लेखांकांत १७१९ त सुमंत पदावर महादाजी गदाधर व न्यायाधिकारी सखो विठ्ठल होते असा उल्लेख आहे. प्रधानमंडळांत वेळोवेळीं झालेल्या फेरबदलाचा निर्देश शकावलींत तर केला नाहींच; इतकेंच नव्हे तर विशेषनामांचाहि नीट निर्देश केला नाहीं. शकावलीच्या २१ व्या पृष्ठावर महादाजी गदाधर ह्या नांवाबद्दल महादाजी गंगाधर व सखो विठ्ठल ह्या नांवाबद्दल शिवो विठ्ठल असें लिहिलें आहे व तें अर्थात् चुकलें आहे. दफात्यांच्या अपूर्णतेची तिसरी साक्ष तिसऱ्या खंडांतील लेखांकाची आहे. ह्या लेखांकांत " फत्तेसिंग बावा भोंसले तुळजापुराजवळ भारी फौजेनिशीं " १७१७ त " होते " म्हणून लिहिलें आहे. १७१७ त फत्तेसिंग भोंसले लहान पोर असावा अशी शकावलीकर्त्याची, इतर सर्व लेखकांप्रमाणें समजूत असल्यामुळें, त्याचा उल्लेख त्यानें १७२६ तील कर्नाटकच्या स्वारीच्या आधीं केव्हांही केला नाहीं. परंतु लेखांक ४५३ वरून १७१७ त फत्तेसिंग भारी फौजेचें सेनापतित्व करण्यास योग्य होता असें स्पष्ट दिसत असल्यामुळें, त्याच्या नांवाचा अनुल्लेख शकावलीकर्त्याला मिळालेल्या साधनांच्या अपूर्तेपणाचाच परिणाम होय, असें म्हणावें लागतें. सारांश, बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीसंबंधीं शकावलीकर्त्याची माहिती बरीच अपूर्ती आहे ह्यांत संशय नाहीं. ग्रांट्डफच्या माहितीपेक्षां ती जास्त आहे. परंतु आधुनिक जिज्ञासूला जितकी विस्तृत माहिती मिळावी अशी अपेक्षा आहे तितकी ती नाहीं हें स्पष्ट आहे.

४. शकावलींतील अपूर्णता केवळ दफात्यांच्या अभावाचा किंवा अपूर्तेपणाचाच परिणाम आहे असें नाहीं. तत्कालीन कर्त्या पुरुषांच्या वरिष्ठकनिष्ठतेसंबंधींही ह्या लेखकांची कल्पना कोती होती असें दिसतें. तिसऱ्या खंडांतील ४५३ व्या लेखांकावरून १७०७ पासून १७२० पर्यंत शाहूमहाराजांनीं स्वतः बऱ्याच मोहिमा कोल्हापूरच्या संभाजीवर केलेल्या असाव्या असें स्पष्ट सिद्ध होतें; परंतु शाहूचें नांव शकावलीकर्त्यानें मोहिमेसंबंधीं कोठेंहि काढिलेलें नाहीं. संभाजीवर शाहूनें स्वतः स्वाऱ्या केल्या; परंतु मोंगलावरती शाहू स्वतः कां गेला नाहीं, ह्याचाही उल्लेख त्यानें केला नाहीं. शाहू पातशहाचा व पातशहाच्या अंमलदारांचा मिंधा होता व त्यामुळें मोंगलावर स्वतः जाण्या-

पेक्षां सरदारांना पाठविणें त्याला योग्य दिसलें, वगैरे संबंध शकावलीच्या लेखकाला समजलेले नव्हते. तसेंच, इतिहासाची व्याप्ति मोहिमांच्या पलीकडे नाहीं अशीही ह्या लेखकाची समजूत असावी असें वाटतें. प्रत्येक मोहिमेंतील निरनिराळ्या प्रसंगांच्या मित्या ह्या लेखकानें दिल्या असत्या तरीदेखील त्याच्या उद्योगाचें चीज झालें असतें; परंतु आकुंचित अशा दृष्टीनें इतिहासाचें अवलोकन करण्याचें त्याच्या नशीबीं आल्यामुळें प्रस्तुत शकावली नानाप्रकारें अपूर्ण उतरली आहे.

५. ग्रंथकर्त्याचें ज्ञान अत्यंत विस्तृत असल्यानें जितके वाचक वुचकळ्यांत पडतात तितकेच त्याचें ज्ञान आकुंचित असल्यानेंही तोच चमत्कार होतो. 'मोहरम महिन्यांत बारामतीवर लढाई झाली' असें ४४ व्या पृष्ठावर, 'भडवुंजा मोंगलाचा पराजय केला,' व 'करीमवेगाशीं युद्ध जुन्नर मुक्कामीं झालें' असें ४६ व्या पृष्ठावर लिहिलें आहे. बारामतीवर कोणाशीं लढाई झाली, भडवुंज्या व करीमवेग हे कोण होते, ह्यांचा निर्देश लेखकानें केला नाहीं. पुढें जेव्हां एखादें अस्सल पत्र सांपडेल व त्यांत ह्या नांवांचा उल्लेख येईल, तेव्हां ह्या तीन प्रसंगांचा साद्यन्त अर्थ कळेल. तोंपर्यंत साशंक स्थितींतच वाचकानें राहिलें पाहिजे. सारांश, वाचकांचीं मनें शंकाकुल करणाऱ्या अशा मित्या ह्या शकावलींत बऱ्याच आहेत.

६ कोणत्याहि शकावलींत मित्यांचाच समूह तेवढा देण्याचा परिपाठ असल्यामुळें, सांगोपांग इतिहासाशीं तिची तुलना करणें बरोबर होणार नाहीं. काल, स्थल व व्यक्ति ह्या तीन घटकांच्या संमेलनानें ऐतिहासिक प्रसंगाची निष्पत्ति होते. पैकीं कालाचा प्रामुख्यानें निर्देश करणें कोणत्याहि शकावलीचें मुख्य प्रयोजन असतें. ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे, प्रस्तुत शकावली इतिहासकाराला फारच उपयोगाची वाटेल. दफात्यांत निरनिराळ्या सालाखालीं जी जी मिति ग्रंथकर्त्याला महत्त्वाची अशी दिसली ती ती त्यानें ह्या शकावलींत उतरून घेतली आहे. दसऱ्यापासून आगोठीपर्यंत प्रत्येक वर्षी पेशवे कोठें कोठें केव्हां केव्हां होते ह्याचा तपशील देण्याचा ह्या शकावलींत प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न बाळाजी विश्वनाथाच्या व कारकीर्दीसंबंधानें फारच तुटपुंजा आहे. परंतु बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील मित्या बऱ्याच भरपूर अशा दिल्या आहेत. ह्या मित्यांवरून, व ह्या मित्यांशीं स्वतंत्र पत्रांतील मित्यांची सांगड घातली असतां असें दिसून येतें कीं, ग्रांटडफनें बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील बऱ्याच मित्यांचा घोटाळा केला आहे. मित्यांचा घोटाळा झाला म्हणजे प्रसंगांच्या पौर्वापर्याचा घोटाळा होतो; व येथून तेथून सर्व हकीकत चिताड होऊन जाते. एक मिति चुकली असतां ती चार प्रकारची अडचण करते. (१) जेथें ती मिति हवी असते तेथें ती नसते (२) जेथें ती नको असते तेथें ती येते; (३) जेथें ती चुकून आणलेली असते तेथील खऱ्या प्रसंगाचें उच्चाटण ती करते; (४) व जेथून ती आणलेली असत तें स्थळ रिकामें टाकावें लागतें किंवा एखाद्या निराळ्याच प्रसंगानें भरून काढावें लागतें. येणेंप्रमाणें एका मितीच्या अव्यवस्थित मांडणीनें हा असा चतुर्विध घोटाळा

होतो. बाळाजी विश्वनाथाच्या, बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील कोणत्या मित्यांसंबंधानें ग्रांट्डफनें हा असा घोटाळा करून ठेविला आहे, तें ह्या तिन्ही पेशव्यांच्या कारकीर्दीचें नवीन माहितीप्रमाणें अत्यंत त्रोटक वर्णन देऊन स्पष्ट करून दाखवितों.

७. अवरंगझेब बादशाहा १७०७ च्या फेब्रुवारीच्या २० व्या तारखेस वारला. त्यावेळीं परसाजी भोसले नागपुराकडे, चिमणाजी दामोदर दक्षिणवऱ्हाडांत, कठसिंग कदमराव खानदेशांत, खंडेराव दाभाडे गुजराथेंत, कान्होजी आंग्रे कोकणांत, उदाजी चव्हाण मिरजेकडे, हिंदुराव घोरपडे कर्नाटकांत, दमाजी थोरात बार्शीपानगांवकडे, धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर व मानसिंग मोरे उत्तर व दक्षिण पाईन घाटांत व स्वराज्यांत, ताराबाईच्या म्हणजे मराठ्यांच्या वतीनें मोंगलाच्या म्हणजे अवरंगझेबाच्या विरुद्ध लढत होते. ह्याखेरीज प्रांतोप्रांतींचे बहुतेक सर्व मराठे एकजुटीनें मोंगलाची सत्ता हाणून पाडण्यास जिवापाड मेहनत करीत होते. ही जूट इतकी कांहीं बेमालूम जमली होती कीं, तिनें अवरंगझेबासारख्याहि मुत्सद्यांस हताश करून सोडिलें. तीस वर्षे सारखी मेहनत करून दक्षिण जिंकण्याचे अवरंगझेबाचे विचार जागच्या जागीं जिरून गेले; आणि दुःखानें, पराभवानें व चिंतेनें करपून जाऊन तो दुर्दैवी पातशाहा समाप्त झाला. समाप्तीच्या सुमारास मराठ्यांना जास्तच जोर आला व त्यांनीं पातशाही प्रांतांत आपला अंमल बसविण्याचा जास्तच हुरूप धरला. हा हुरूप विझविण्यास मराठ्यांची एकजूट फोडणें एवढाच एक उपाय राहिला होता. तो तोडगा अवरंगझेबानें मरतां मरतां करून ठेविला. त्यानें शाहूला स्वराज्यांत जाण्यास परवानगी द्यावी असा बूट काढिला; व तो बूट त्याच्या मरणोत्तर अमलांत आला. शाहूच्या सुटकेनें मराठ्यांची एकजूट फुटली व त्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला.

८. १७०७ च्या मार्चांत शाहु माळव्यांतील अजमशहाच्या लष्करांतून निघाला. व मेच्या सुमारास खेडाजवळ आला. ताराबाईकडील मराठ्यांचा व शाहूचा त्या स्थळीं युद्धासारखा कांहीं प्रसंग झाला व त्यांत ताराबाईकडील बरेंच सैन्य शाहूला येऊन मिळालें. उत्तरेकडील परसोजी भोसले, चिमणाजी दामोदर व खंडेराव दाभाडे व दक्षिणेकडील धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर व मानसिंग मोरे असे प्रमुख प्रमुख सरदार खेडाजवळ एकत्र झाले. मोंगलांची कांहीं कालपर्यंत मराठ्यांच्या उपद्व्यापी पराक्रमापासून सुटका झाली. महाराष्ट्राच्या उत्तरेस, पश्चिमेस व दक्षिणेस मराठ्यांनीं मोंगली प्रांत काबीज करण्याचा जो प्रयत्न चालविला होता, तो कांहीं वेळ थंडा पडला व आपसाआपसांत यादवी करण्यास त्यांनीं आपली सर्व मेहनत खर्ची घातली. अप्पाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे, रामचंद्र नीळकंठ अमात्य, खेम सावंत, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे, शंकराजी नारायण सचिव व परशरामपंत प्रतिनिधि ताराबाईच्या पक्षाला मिळाले; आणि परसोजी भोसले व धनाजी जाधव वगैरे सरदारांनीं शाहूचा पक्ष स्वीकारिला. ही मराठ्यांची यादवी १७३१ पर्यंत चालली व तोंपर्यंत त्यांना मोंगलांच्या प्रांताकडे दृष्टि फेकण्यास फारशी फुरसत सांपडली नाहीं.

९. शाहु मोंगलांच्या लष्करांतून निघाला तो स्वतंत्र एकटा असा निघाला नाहीं; त्यानें आपल्याबरोबर एक पातशाहि सुदर्शन घेतलें. मोंगलाच्या लष्करांतून सुटतांना स्वराज्याची पातशाही सनद शाहु आपल्याबरोबर घेऊन आला. मुख्यतः ह्या सनदेच्या जोरावर म्हणजे पादशहाचा मांडलिक ह्या नात्यानें शाहु स्वराज्याला हक्क सांगण्यास आला. वारस ह्या नात्यानें शाहूचा राज्यावर हक्क होताच. परंतु तो हक्क मराठमंडळांत कितपत मानला जातो ह्याचा त्याला संशय होता. वऱ्हाडांत आल्यावर, परसोजी भोसले, चिमणाजी दामोदर, नेमाजी शिंदे, अमृतराव कदम बांडे, खंडेराव दाभाडे, वगैरे मराठे सरदारांस जहागिरींची लालुच दाखवून त्यानें वश करून घेतलें. ह्याच लालुचीला भुलून धनाजी जाधव, मानसिंग मोरे, हैबतराव निंबाळकर, वगैरे दक्षिणेकडील सरदार शाहूच्या पक्षाला मिळाले. १६८९ पासून १७०७ पर्यंतच्या धामधुमींत परसोजी भोसले, धनाजी जाधव, वगैरे सरदार पातशाहींतील काबीज केलेल्या प्रांतांतून स्वतंत्रपणें अधिकार करावयास व उत्पन्न खावयास शिकलेले होते. अवरंगझेब पातशहाच्या मरणानंतर ताराबाईचें राज्य निष्कंटक होऊन आपला स्वतंत्र अधिकार रहाणार नाहीं, अशी भीति ह्या सरदारांस वाटूं लागली व जहागिरी देऊं करणाऱ्या शाहूचा पक्ष स्वीकारणें त्यांस फायद्याचें दिसलें. येणेंप्रमाणें शाहूच्या येण्यापासून मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत दोन नवीन तत्त्वें शिरलीं:—(१) भोसल्यांना दिल्लीच्या पातशहाचें अंकितत्व प्राप्त झालें, व (२) सरंजामी जहागिरींची पद्धत महाराष्ट्रांत व महत्तर राष्ट्रांत नव्यानेंच रुढवली

१०. दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी पंतसचिव वगैरे जे सरदार ताराबाईला धरून राहिले, त्यांना दिल्लीपतीचें अंकितत्व बिलकूल पसंत नव्हतें व जहागिरी मिळविण्याचीही विशेष हांव नव्हती. शिवाजीनें व राजारामानें घालून दिलेला कित्ता त्यांना सर्वस्वीं गिरवावयाचा होता. ताराबाईला व तिच्या ह्या सरदारांना यश येतें, तर 'शिवाजीनें स्थापिलेल्या स्वराज्याचें फारच हित होतें. परंतु शाहूला मिळालेल्या बड्या बड्या सरदारांच्या पुढें, ताराबाईसारख्या स्त्रीचें व ह्या लहान सरदारांचें तेज फारसें पडलें नाहीं; व महाराष्ट्र राज्यव्यवस्थेंत बेबंदशाहीचें बीज अप्पलपोटेपणाच्या तडाक्यांत कायमचें पेरलें गेलें. ताराबाईच्या पक्षाला मिळणारे सरदार दुहेरी कचाटींत सांपडले. राज्याच्या खऱ्या वारसाविरुद्ध उठल्याचा एक आरोप त्यांच्यावर लादला जाई, व पातशाही सनदा न जुमानण्याचेंहि पाप त्यांच्या पदरीं पडे. शाहूचे बखरकार ह्या सरदारांना पुंड, बंडखोर वगैरे ज्या संज्ञा देतात, त्या ते ह्या पातशाही सनदांच्या जोरावर देतात.

११. धनाजी जाधव वगैरे सरदारांच्या साहाय्यानें १७०७ च्या जूनांत शाहू चंदनवंदनाखालीं येऊन उतरला; व तेथून त्यानें साताऱ्याच्या किल्ल्यावरील परशराम त्रिंबक प्रतिनिधि वगैरे ताराबाईकडील सरदारांशीं बोलणें लावलें. हे सरदार लवकर वश होतील असें दिसेना. सबब वाई येथील शेखमिरे ह्यांचा फितुर करून शाहूनें तो किल्ला १७०७

च्या डिसेंबरांत काबीज केला, व पुढें एका महिन्यानें म्हणजे १७०८ च्या जानेवारींत ते राज्याभिषिक्त झाला. परशराम त्रिंबक कैदेंत असल्यामुळें गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधिपद मिळालें; बहिरोपंत पिंगळ्यास पेशवाई मिळाली; सखो विठ्ठलास न्यायाधिशी व होनो अनंत यास सेनाकर्तेपद प्राप्त झालें. धनाजी जाधव यास सेनापतिपद व हैबतराव निंबाळकरास सरलष्करपद मिळालें. सचिव अमात्य वगैरे जे सरदार ताराबाईबरोबर साताऱ्याहून पन्हाळ्याकडे गेले त्यांचे हुद्दे अर्थातच शाहूनें काढून घेतले.

१२. साताऱ्यास राज्यव्यवस्थेची अशी विल्हेवाट लाविल्यावर, शाहूनें बहिःशत्रूंकडे आपली दृष्टि फेकिली. शाहूचा पहिला शत्रु म्हटला म्हणजे कोल्हापुरचा शिवाजी व त्याचे सरदार हे होत. ह्या सरदारांनीं पुण्यापासून कोल्हापूरपर्यंतचा प्रदेश व सर्व कोंकणपट्टी अडवून टाकिली होती. ह्या प्रदेशांत दंगा करण्याचें व्रत त्यांनीं बरींच वर्षे पतकरलें होतें. शाहूचा दुसरा शत्रु म्हटला म्हणजे दक्षिणेंतील मोंगल अधिकारी होत. दिल्लीच्या पादशाहानें शाहूस सोडून दिलें खरें. परंतु पातशाहाच्या अंमलदारांनीं स्वराज्यांतील बराच प्रांत शाहूस घेऊं दिला नाहीं. तेव्हां स्वराज्यांतील जेवढा प्रांत मोगल अंमलदारांनीं बळेंच हाताखालीं घातला होता, तोहि सोडविणें शाहूस भागच होतें. येणेंप्रमाणें १७०८ च्या पावसाळ्यानंतर शाहूस चोंहोकडे शत्रूंना तोंड देणें प्राप्त झालें. १७०८ च्या आक्टोबरापासून १७१० च्या जूनापर्यंत शाहू पन्हाळा, रांगणा, कोल्हापूर, इस्लामपूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणीं छावणी देऊन होता. [ खंड ३, लेखांक ६४ ]. ह्या अवधींत धनाजी जाधवानें तुळजापुराकडे, परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, चिमणाजी दामोदर, खंडेराव दाभाडे ह्यांनीं वऱ्हाड, खानदेश, गुजराथ वगैरे प्रांतांत अंमल बसविण्याचा उद्योग चालविला होता; परंतु शाहूच्या राज्याची स्थिरता कोल्हापूरच्या शिवाजीला गप्प बसविण्यावर विशेष होती. शाहूचे सर्व सरदार मोंगलांच्या प्रांतांत मोहिमा करण्यास एका पायावर तयार असत. परंतु कोल्हापूरच्या शिवाजीवर व ताराबाईवर जाण्यास कोणीहि सरदार धजत नसे. हें अलीकडील काम ते शाहूच्याच अंगावर लोटून देत. १७०८ पासून १७१० च्या जूनापर्यंत शाहू पन्हाळ्याकडे स्वतः छावणी करुन बसला होता, ह्यांतील अर्थ हा आहे. १७१० च्या जूनांत धनाजी वारणातीरीं वारल्यावर शाहूनें सेनापतिपद त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव यास दिलें; परंतु ह्या मनुष्याचें लक्ष शाहूकडे बिलकुल नव्हतें. त्यानें लवकरच ताराबाईकडे व मोंगलाकडे संधान बांधिलें, व शाहूचा पक्ष अगदीं दुर्बल करून सोडिला. १७१० च्या जूनापासून १७११ च्या आगस्टापर्यंतचा शाहूचा काल फारच संकटाचा गेला. शाहूपाशीं म्हणण्यासारखें फारसें सैन्य राहिलें नाहीं. शाहूचें राज्य आधारहीन होतें कीं काय अशी भीति पडली. अशा वेळीं नवीन सैन्य तयार करून बाळाजी विश्वनाथानें शाहूची बाजू उत्तम राखिली. ह्या सेवेबद्दल होनो अनंताचें सेनाकर्तेपद शाहूनें बाळाजी विश्वनाथास दिलें.

१३. बाळाजी विश्वनाथास सेनाकर्तृत्व मिळाल्यापासून शाहूच्या सुदैवाला प्रारंभ झाला. १७११ त चंद्रसेन जाधवाचा हैबतराव निंबाळकरानें पराभव केला. १७१२

च्या मेंत कोल्हापूरचा शिवाजी वारला. १७१२ च्या नोव्हेंबरांत शंकराजीपंत सचिवानें जलसमाधि घेतली. सारांश १७१२ च्या शेवटीं व १७१३च्या प्रारंभाला ताराबाईचा पक्ष अगदीं बुडाल्यासारखा झाला. १७१३ त कृष्णराव खटावकर व कान्होजी आंग्रे साताऱ्यावर चाल करून आले. कृष्णरावावर प्रतिनिधि व आंग्र्यावर बहिरोपंत पिंगळे यांस शाहूनें पाठविलें. पेशव्यांच्या मदतीनें प्रतिनिधीनें कृष्णरावाची समजूत काढिली. आंग्र्यानें बहिरोपंत पिंगळ्यास कैद केलें. तेव्हां बाळाजी विश्वनाथानें आंग्र्यावर चालून जाऊन पिंगळ्याला सोडविलें व तह करून आंग्र्याला शाहूच्या बाजूला वळविलें. ह्या कामगिरीबद्दल बाळाजी विश्वनाथास शाहूनें मुख्य प्रधानकी किंवा पेशवाई १७१३ च्या नोव्हेंबराच्या १६ व्या तारखेस दिली. ह्याच वर्षी पेशव्यांचा दक्षिणेकडील प्रतिस्पर्धी जो निजामउल्मुलुख यास दक्षिणेची सुभेदारी मिळाली.

१४. बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली तेव्हां शाहूनें त्याला बऱ्याच कामगिऱ्या सांगितल्या. आंग्र्याशीं समेट केल्यानें कोकणांत स्वस्थता झाली. शंकराजीपंत सचिव वारल्यावर साताऱ्याच्या व पुण्याच्या मधील मावळ प्रांतांत कांहीं बखेडा उरला नाहीं. कृष्णराव खटावकराला इनाम देऊन कृष्णेच्या पलीकडील माण देशांत शांतता झाली. येणेंप्रमाणें स्वराज्यांतील साताऱ्याभोंवतील कांहीं प्रांत अगदीं निर्धास्त झाला. ह्या निर्धास्त प्रांतांच्या पलीकडील टापूंत अंमल बसविण्याचें काम अद्याप राहिलें होतें. पुण्यापासून जुन्नरापर्यंतचा प्रदेश व कऱ्हाडापासून बेळगांवापर्यंतचा प्रदेश शत्रूच्या हातांतच होता. खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, माळवा, पेडगांव, अक्कलकोट, तंजावर, कर्नाटक, कोल्हापूर, वगैरे प्रांतांत अद्याप अंमल बसवावयाचाच होता. सारांश साताऱ्याभोंवतील कांहीं तालुक्यापलीकडे शाहूचा अंमल बसवायाचें काम अद्याप सबंद उरकावयाचें राहिलेंच होतें. हें काम १७१४ पासून १७२० पर्यंत बाळाजी विश्वनाथ करीत होता. त्यांत त्याला बरेंच यश आलें.

१५. १७०७ पासून १७१४ पर्यंत ग्रांट डफनें दिलेला वृत्तांत व मीं ह्या वर दिलेला त्रोटक वृत्तांत ह्यांत मितीसंबंधानें व मजकुरासंबंधानें बरीच तफावत वाचकांस दिसून येईल. अमुक स्थलीं ग्रांट डफ चुकला आहे असें प्रत्येक स्थळीं म्हणण्याचें विशेष प्रयोजन दिसलें नाहीं. १७१४ पासून १७२० पर्यंतच्या वृत्तांतांतहि प्रायः हाच क्रम स्वीकारणें इष्ट दिसतें.

१६. १७१४ च्या मार्च एप्रिलापर्यंत कृष्णराव खटावकराची व्यवस्था लावण्यांत बाळाजीचा काळ गेला. गुदस्त सालीं आंग्र्याच्या तहांत शिद्याचा कांहीं प्रांत शाहूकडे आला, त्यामुळें आंग्र्याचें व शिद्याचें युद्ध लागलें तेव्हां आंग्र्याचे कुमकेस बाळाजी विश्वनाथ जाऊन शिद्याशीं तह १७१५ च्या ३० जानेवारीस झाला. पुढें पुणें प्रांतांत अंमल बसवून बाळाजी साताऱ्यास आला, तों दमाजी थोरातानें नारो शंकर सचिव यास अटकेंत ठेविलें असें कळलें. सचिवाला सोडविण्याच्या खटपटींत पेशव्यांना पुरंदर किल्ला मिळाला. ह्याच अवधींत रावरंभाजी निंबाळकर फितून मोंगलांकडे गेला. त्या मोंग-

लांचा पराभव खंडेराव दाभाडे यानें वेदम केला. इतक्यांत १७१६ च्या सप्टेंबरांत पेशवे स्वारीस निघाले असतां, दमाजी थोरातानें त्यांस पुरंधराखालीं जाधवाच्या वाडीस पकडलें. तेथून सुटून, १७१७ च्या आरंभीं खंडेराव दाभाडे यास सेनापतिपद देऊन खंडेरावानें पराजित केलेल्या सय्यदांशीं तहाचें बोलणें करण्यास बाळाजी गेला. तहाचें बोलणें कायम केल्यावर बाळाजीनें दमाजी थोराताचें पारिपत्य केलें व १७१७ जूनमध्यें सचिवाची सुटका केली. १७१७ च्या आक्टोबरांत बाळाजी इसलामपुराकडे कोल्हापुर-करांवर गेला होता. [ खंड ३, लेखांक ४५३ ] तेथून १७१८ आक्टोबरापर्यंत देशाचा बंदोवस्त करून स्वारी सय्यदांच्या साहाय्यास दिल्लीस निघाली. तेथें नवीन पातशहा स्थापून १७१९ च्या जूनांत साताऱ्यास तो परत आला. १७१९ च्या आक्टोबरांत स्वारीस निघून इसलामपुराकडे गेला व बेहें येथें लढाई करून १७२० च्या २ एप्रिलास वारला.

१७. सय्यदांशीं तह करून शाहूचा दरारा वाढला. परंतु कोल्हापुरकरांच्या बाजूचे चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर वगैरे सरदार जास्त जास्त प्रबल होत चालले. त्यांनीं सय्यदांचा शत्रु जो निजामुन्मुलूख त्याचा पक्ष स्वीकारिला. शाहू, बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोसले, चिमणाजी दामोदरजी, कान्होजी आंग्रे व सय्यद बंधू असा एकपक्ष झाला; व कोल्हापूरचा संभाजी, अमात्य, चंद्रसेन जाधव, निंबाळकर, चव्हाण व निजामुन्मुलूख असा दुसरा पक्ष झाला. ह्या दोन पक्षांची चढाओढ म्हणजेच १७२० पासून १७३१ पर्यंतचा इतिहास होतो. त्यांत शाहू-कडील बाजीराव हें पात्र प्रमुख आहे व दुसऱ्या पक्षाकडील निजामुन्मुलूख हें पात्र प्रमुख आहे. शाहू व बाजीराव ह्यांचे हितसंबंध अगदीं एक होते. संभाजीचे व निजामुन्मुलु-खाचे हितसंबंध अगदीं भिन्न होते. संभाजीला आपला वाटा मिळावा एवढीच आकांक्षा होती. निजामुन्मुलुखाला दक्षिणेंत राज्य स्थापावयाचें होतें. हें कार्य साधण्याच्या हेतूनें निजामुन्मुलुखानें संभाजीस हातीं धरिलें होतें. जाधव व निंबाळकर हे जहागि-रीच्या आशेनें निजामुन्मुलुखाला मिळाले. त्यांच्या ऐपतीजोगी जहागीर संभाजीकडून मिळणें अशक्य असल्यामुळें, ते निजामाचे पूर्ण हस्तक बनले. शाहू व बाजीराव यांच्या मनांत निजामुन्मुलूख संभाजी, जाधव, निंबाळकर, सय्यद, दिल्लीचा पातशाहा ह्या सर्वांस संपुष्टांत आणून सर्वत्र महाराष्ट्र-धर्माची व महाराष्ट्रराज्याची स्थापना करावयाची होती. शाहू राज्यावर येण्याचे वेळीं निरनिराळ्या सरदारांना ज्या जहागिरीच्या लालुची दाख-विल्या होत्या, त्या सतत चालविण्याचा शाहूचा बेत नव्हता असें म्हणण्यास पुरावा आहे. परसोजी भोसले, खंडेराव दाभाडे, कान्होजी आंग्रे यांच्या सरंजामी जहागिरींची पुढील ४० वर्षांत काय काय व्यवस्था झाली ही गोष्ट लक्षांत घेतली असतां वरील विधानाची सत्यता दिसून येईल. १७०७ त सरंजामी जहागिरींची मुसलमानी पद्धत शाहूस जी स्वीकारावी लागली, ती १७३१ पुढें हळूहळू सोडून देण्याचा, त्यानें व त्याचे प्रमुख मुत्सद्दी जे बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं प्रयत्न केला. दिलेल्या

जहागिरी परत घेण्याची मुख्य सत्तेची इच्छा व मिळालेल्या अवाढव्य जहागिरी जाऊं न देण्याची सरदाराची मनीषा ह्या दोन प्रेरणांच्या हिसकाहिसकींत मराठ्यांच्या उत्कर्षाचीं वीजें सांपडण्यासारखीं आहेत. ज्या सरदाराची जहागिरी परत घेण्याचा प्रयत्न करावा तो सरदार मुख्य सत्तेच्या विरुद्ध नानाप्रकारें उठे; शत्रूंच्या व इतर सरदारांच्या साहाय्यानें आपलें अस्तित्व कायम करी, व तें करण्यास फसल्यास क्वचित् नष्ट किंवा सामर्थ्यहीन होऊन जाई. नष्ट झाला, सामर्थ्यहीन झाला किंवा कायम राहिला तत्रापि त्याची स्थिति त्याला व इतर सरदारांना धड्यासारखी होई व मुख्य सत्ता दुर्बळ करण्याचा निदान विशेष प्रवळ न होऊं देण्याचा, प्रयत्न ते हमेषा करीत.

१८. १७२० च्या १७ एप्रिलास बाजीरावास प्रधानपद प्राप्त झालें. ह्या वेळीं तो खानदेशांत किंवा वऱ्हाडांत अलमअलीच्या साहाय्यास गेला होता, अथवा खरें म्हटलें असतां, बाळाजी विश्वनाथानें त्यास पाठविलें होतें. बाळाजी विश्वनाथाच्या व शाहूच्या बहुतेक स्वाऱ्यांत बाजीराव हजर असे. बाळाजी विश्वनाथ दमाजी थोरातावर चाल करून गेला तेव्हां बाजीराव त्याच्याबरोबर होता. दमाजी थोरातानें दगा कसा केला, ह्याची आठवण शाहूनें बाजीरावाला एका पत्रांत केली आहे ( शकावली पृष्ठ ६६ ). बाळाजी विश्वनाथाबरोबर बाजीराव दिल्लीस गेला होता. तेथून परत आल्यावर बाळाजीपंत नानांनीं त्याला खानदेशांत सय्यदांचा हस्तक जो अलमअलीखान त्याचें साहाय्य करण्यास ठेवून दिलें. १७२० च्या जुलैंत अलमअलीचा निजामुन्मुलुखानें बाळापूर येथें पराभव केला. ह्या लढाईंत बाजीराव होता किंवा नव्हता ह्याचा दाखला अद्याप मिळालेला नाहीं. १७२० पावसाळा छावणींत काढून त्या सालाच्या आक्टोबरांत निजामुन्मुलुखाच्या कोण्या एका हस्तकाचा बाजीरावानें बारामतीजवळ पराभव केला. हा पराक्रम करून १७२० च्या नोव्हेंबरांत बाजीरावानें साताऱ्यास पेशवाईचीं वस्त्रें महाराजांच्या हातून घेतलीं. बाजीराव उपेक्षणीय पुरुष नाहीं, अशी पक्की खातरी होऊन निजामानें बाजीरावाची भेट सावर्डिया येथें घेतली, परंतु तिच्यापासून विशेष कांहीं निष्पत्ति झाल्याचें आढळत नाहीं. १७२१ च्या आगस्टापर्यंत बाजीराव विजापूर प्रांतांत होता. १७२१ च्या सप्टेंबर—आक्टोबरांत भडवुंज्या मोगलांशीं पुरंदरास लढाई झाली व नंतर १७२२ प्रारंभीं करीमबेगाशीं युद्ध झालें. निजामाच्या ह्या दोघांही सरदारांचा पराभव करून बाजीराव १७२२ मेंत सुप्यास व जुलैंत साताऱ्यास गेला. ह्या अवधींत निजामुन्मुलुख दिल्लीस जाऊन पातशाहींत ढवळाढवळ करूं लागला. १७२२ च्या सप्टेंबरांत निजामुन्मुलुखाचे सरदार अर्काटाकडे स्वारीस निघणार अशी बातमी आली. निजामाच्या पाठीवर शह देण्यास बाजीराव १७२२ च्या नोव्हेंबरांत अवरंगाबादेस गेला. तेथें ऐवजखानाचा पराभव करून स्वारी वऱ्हाणपुरास गेली. १७२३ च्या जानेवारींत बाजीरावाची हांडिया प्रांतांतील अनूपसिंगाशीं भेट जाहाली. १७२३ च्या फेब्रुवारींत खुद्द निजामुन्मुलुखाची मुलाखत करून स्वारी बाघेलखंडाकडे गेली. तेथून १७२३ च्या जुलैंत साताऱ्यास येऊन खंडेराव दाभाडे, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ ह्यांच्या साहाय्याला बाजीराव

१७२३ च्या डिसेंबरांत गेला. १७२३ च्या डिसेंबरांत अंबाजीपंत पुरंधरे, मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे व नंतर बाजीराव यांनीं माळव्यांत व बुंदेलखंडांत स्वारी केली. हैदराबादकर मोंगलांनीं उत्तर व दक्षिण पाईन घाटांत गडबड केली, ती बंद करण्याकरितां १७२३ च्या सप्टेंबरापासून १७२४ च्या जुलैपर्यंत खंडेराव दाभाडे, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ गुंतले होते. हैदराबादकर मोंगल कंबरजखान व निजामुन्मुल्ख ह्यांचा युद्धप्रसंग १७२४ च्या पावसाळ्यानंतर सुरू झाला. ह्या प्रसंगीं बाजीरावानें निजामाचें साहाय्य करून कंबरजखानाचा साखरखेडलें येथें पराभव १७२४ च्या आक्टोबरांत केला. तेथून बाजीराव माळव्यांत जाऊन १७२५ च्या एप्रिलास साताऱ्यास आला. १७२५ च्या सप्टेंबरांत फत्तेसिंग भोसले, त्रिंबकराव दाभाडे, रघूजी भोसले, प्रतिनिधि व बाजीराव त्रिचनापलीपर्यंत कर्नाटकांत स्वारी करून १७२६ च्या मेंत परत आले. ह्या अवधींत चिमणाजी बल्लाळ व कान्होजी भोसले निजामावर चाल करून गेले. निजामानें शाहूच्या विरुद्ध संभाजी प्रतिनिधि वगैरेंच्या मनांत विकल्प आणून युद्धाची तयारी केली होती. बाजीराव कर्नाटकांत गेला असें पाहून निजामानें हा डाव आरंभिला होता. परंतु शाहूनें माळव्यांतून उदाजी पवार, कंठाजी कदम, पिलाजी गायकवाड ह्यांस फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ ह्यांच्या साहाय्यास बोलाविलें व बाजीरावासहि परत येण्यास पत्रें पाठविलीं. १७२६ च्या सप्टेंबरांत बाजीराव व खंडेराव दाभाडे पंढरपुरच्या रोखें निजामावर गेले. कान्होजी भोसल्याचा ऐवजखानानें बालाघाटांत पराभव केला. त्याच्या मदतीस चिमाजीअप्पा गेले. बाजीरावानें अवरंगाबादेकडून शह दिला. ( का. सं. १६७ व १६९. ) निजामावरील ही स्वारी संपवून बाजीराव १७२७ जुलैंत साताऱ्यास गेला. १७२७ च्या आगस्टांत बाजीराव पुन्हां निजामावर गेला. निजामाला अनेक झुकांड्या देऊन त्याचा पराभव बाजीरावानें १७२८ च्या फेब्रुवारीस पालखेड येथें केला. नंतर १७२८ च्या ६ मार्चास मुंगी येथें तह करून बाजीराव जुलैंत साताऱ्यास आला. ह्या तहांत निजामुन्मुलुखाची व कोल्हापूरच्या संभाजीची कायमची फारकत झाली. १७२८ च्या आक्टोबरांत बाजीराव तुळजापुराकडे व खानदेशांत स्वारीस निघाला व चिमाजीअप्पा माळव्यांत दयाबहादरावर गेला. चिमाजीअप्पा माळव्यांतून १७२९ च्या मार्चांत परत आला व बाजीराव चिमाजीअप्पाच्या जागीं माळव्यांत गेला. बाजीरावानें अहमदखान बंगषाचा पराभव जैतपुरीं ३० मार्चास व कायमखा बंगष याचा पराभव ४ मे १७२९ रोजीं केला व १७२९ च्या जुलैंत साताऱ्यास परत आला. १७२९ च्या आक्टोबरांत चिमाजी गुजराथेंत व माळव्यांत स्वारीस निघाला, तो १७३० च्या मार्चांत ढवळकें लुटून पायागड घेऊन जुनांत देशीं परत आला. १७२९ त खंडेराव दाभाडे वारला व सेनापतिपद त्रिंबकराव दाभाड्यास १७३० च्या जानेवारींत मिळालें. १७२९ च्या आगस्टापासून १७३० च्या फेब्रुवारीपर्यंत बाजीराव सुपें, पुणें वगैरे ठिकाणीं देशींच होता. १७३० च्या फेब्रुवारींत उंब्रजेस जाऊन कोल्हापूरकरांशीं लढाई वगैरे होऊन स्वारी आगस्टांत पुण्यास आली. १७३० च्या सप्टेंबरांत बाजीराव व चिमाजीअप्पा

निजामुन्मुलूख व त्रिंबकराव दाभाडे यांजवर चालून गेले. १७३१ च्या फेब्रुवारींत दाभाड्याचा डभईस पराभव करून एप्रिलांत बाजीराव देशीं परत आला. चिमाजीअप्पा ग्वालेरीपर्यंत हिंदुस्थानांत जाऊन मांडोगडची स्वारी करून जूनांत देशीं परत आले. १७३१ च्या एप्रिलांत संभाजीशीं तह झाला. १७३१ च्या डिसेंबरपर्यंत दोघे बंधू पुणें व सातारा येथें देशींच होते. १७३२ च्या जानेवारी—फेब्रुआरींत बाजीराव कुलाब्यास गेला होता. तेथून माळव्यांत जाऊन स्वारी आगोठीस देशीं आली. १७३२ च्या जानेवारीपासून जुलैपर्यंत फत्तेसिंग भोसले निजामावर गेले होते. १७३२ च्या डिसबरांत बाजीराव निजामाच्या भेटीस गेला, तो १७३३ च्या मार्चांत परत आला. १७३२ च्या आक्टोबरांत चिमाजीअप्पा बुंदेलखंडांत जाऊन चापानेर सर करून, १७३३ च्या जुलैंत परत आला. १७३३ च्या मार्चांत बाजीराव व फत्तेसिंग भोसले कोंकणांत जंजिऱ्यावर गेले ते डिसेंबरांत परत आले. चिमाजीअप्पा १७३४ च्या मार्चांत कोंकणांतून परत आला. १७३४ च्या जानेवारींत बाजीराव खानडौरावर दिल्लीपर्यंत चालून जाऊन जुलैंत परत आला. चिमाजी १७३४ च्या मार्चापासून जुलैपर्यंत वऱ्हाड खानदेशांत होता. १७३४ च्या नोव्हेंबरपासून १७३५ च्या जुलैपर्यंत पिलाजी जाधवाची स्वारी हिंदुस्थानांत कमरुद्दीन वजिरावर झाली. १७३४च्या जुलैपासून १७३५ फेब्रुवारीपर्यंत पुणें, सातारा वगैरे स्थलीं राहून बाजीरावाची स्वारी १७३५ च्या फेब्रुवारींत कुलाब्यास गेली. ह्याच स्वारीस गोवळकोटची स्वारी असें म्हणतात. ह्या स्वारीहून पेशवे आगोठीस परत आले. १७३४ च्या जुलैपासून १७३६ च्या मार्चापर्यंत चिमाजी देशींच होता. १७३५ च्या नोव्हेंबरांत बाजीराव हिंदुस्थानांत अजमीरपर्यंत जाऊन १७३६ च्या जुलैंत परत आला. १७३६ च्या मार्चांत चिमाजी कोंकणांत जाऊन १७३६ च्या जूनांत परत आला. १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव पुनः हिंदुस्थानच्या स्वारीस निघाला तो १७३७ च्या जुलैंत परत आला. हीस भेळशाची स्वारी म्हणतात. चिमाजीअप्पा १७३६ च्या मार्चापासून जुलैपर्यंत कोंकणांत होते. बरोबर मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे व पवार होते. १७३७ च्या आक्टोबरापासून १७३८ च्या जुलैपर्यंत बाजीरावानें भोपाळची स्वारी केली. १७३७ च्या नोव्हेंबरापासून १७३८ च्या जुलैपर्यंत चिमाजी तारापूर–साष्टीकडे होता. १७३८ च्या नोव्हेंबरांत चिमाजी व बाजीराव वसईच्या स्वारीस निघून १७३९ च्या मार्चांत बाजीराव खानदेशांतून नागपुराकडे आवजी कवड्याचा सूड उगविण्याकरितां जात असतां नादीरशहानें दिल्ली लुटल्याची खबर आली. चिमाजी वसई सर करून व बाजीराव दिल्लीच्या पातशहाच्या मदतीची तयारी करण्याकरितां १७३९ च्या जुलैंत देशीं परत आले. बाजीराव व चिमाजीअप्पा नासरजंगावर १७३९ च्या नोव्हेंबरांत जाऊन त्याला १७४० च्या मार्चांत पक्का नरम आणून, बाजीराव अवरंगाबादेवरून खानदेशाकडे गेला व चिमाजी बाळाजी बाजीरावाला घेऊन कोंकणांत मानाजी आंग्र्याच्या साहाय्यास गेला. बाजीराव २८ एप्रिल १७४० त रघूजी भोंसल्याचें पारपत्य केल्याशिवाय व हिंदुस्थानची निरवानिरव केल्याशिवाय वारला. ही बातमी चिमाजीअप्पास कोंकणांत कळली.

१९. बाजीरावाच्या स्वाऱ्यांचा वीस वर्षांचा नामनिर्देश वरील पारिग्राफांत केला आहे. ह्या स्वाऱ्या १ निजामुन्मुलुखानें बळकाविलेला प्रांत, २ नर्मदेच्या पलीकडील प्रांत, ३ गुजराथ, ४ साष्टी, ५ जंजिरा, ६ कोल्हापूरकरांचा प्रांत, व ७ कर्नाटक इतक्या प्रदेशांवर केलेल्या आहेत. ह्यांत १ शाहू, २ फत्तेसिंग, ३ बाजीराव, ४ चिमाजीअप्पा, ५ खंडेराव दाभाडे, ६ त्रिंबकराव दाभाडे, ७ पिलाजी गायकवाड, ८ दमाजी गायकवाड, ९ कंठाजी कदम बांडे, १० मल्हारराव होळकर, ११ राणोजी शिंदे, १२ उदाजी पवार, १३ कान्होजी भोसले, १४ रघूजी भोसले, १५ दावळजी सोमवंशी, १६ अंबाजी त्रिंबक पुरंधरे, १७ बाजी भिमराव रेटरेकर, १८ पिलाजी जाधवराव, १९ आनंदराव सोमवंशी, २० श्रीनिवासराव प्रतिनिधि, २१ कान्होजी आंग्रे, २२ मानाजी आंग्रे, २३ संभाजी आंग्रे, २४ तुळाजी आंग्रे, २५ यशवंतराव दाभाडे, २६ मुरारराव घोरपडे, २७ उदाजी चव्हाण, २८ राणोजी भोसले, २९ फोंड सावंत भोसले, ३० सवाई कटासिंग, ३१ कृष्णाजी पवार, ३२ खंडोजी माणकर, ३३ रामचंद्र हरि पटवर्धन, ३४ गोविंद हरि पटवर्धन, ३५ आवजी कवडे, ३६ शंभूसिंग जाधवराव, ३७ सयाजी गुजर, ३८ यशवंतराव पवार, व ३९ व्यंकटराव घोरपडे. ह्या इतक्या सरदारांनीं १७२० पासून १७४० पर्यंत स्वतंत्र अशा स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्या प्रत्येकाच्या ह्या वीस वर्षांतील हालचालींचा सालवारीनें निर्देश करतां येण्यास जितकी माहिती पाहिजे तितकी अद्याप मिळाली नाहीं. बाजीराव, चिमाजीअप्पा, फत्तेसिंग, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, खंडेराव दाभाडे, कान्होजी आंग्रे, पिलाजी जाधवराव, वगैरे अत्यंत प्रमुख अशा सरदारांच्या देखील हालचालींचा नकाशा सालवारीनें देतां येणें शक्य नाहीं. त्यांतल्यात्यांत बाजीराव, चिमाजीअप्पा, फत्तेसिंग भोसले, त्यांच्यासंबंधीं ह्या शकावलींत व इतरत्र इतरापेक्षां बरीच माहिती सांपडते. त्यावरून वरील पारिग्राफांत ह्या तीन सरदारांच्या मोहिमांचा निर्देश केला आहे. निर्देशावरून ग्रांट डफ कोठें कोठें चुकला आहे तें कळून येईल. विशेष ठोकळ अशा चुका १७२० पासून १७४० पर्यंतचा इतिहास लिहितांना डफनें कोठें कोठें केल्या आहेत तें पुढें सांगतों.

२० [ १ ] दिल्लीहून आल्यानंतर बाळाजी विश्वनाथ सासवडास कांहीं महिने स्वस्थ बसला व नंतर वारला असें ग्रांट डफ म्हणतो. ( Duff, Chap. 13, P.209 ). परंतु तिसऱ्या खंडांतील लेखांक ४५३ वरून व ह्या शकावलीच्या ३८ व्या पृष्ठावरून वेहे येथें स्वारी करून आल्यावर तो वारला हें स्पष्ट आहे. [ २ ] खंडेराव दाभाडे १७२१ च्या सुमारास वारला म्हणून डफ म्हणतो. ( Duff, chap. 13, P. 209 ) परंतु ह्या शकावलीच्या ६० व्या पृष्ठावर त्र्यंबकराव दाभाडे यास सेनापतिपदाचीं वस्त्रें १७३० च्या जानेवारीस झालीं असें लिहिलें आहे. १७२१ च्या सुमारास खंडेराव दाभाडे वारला असता तर त्याच सुमारास त्र्यंबकराव दाभाड्यास वस्त्रें मिळालीं पाहिजे होतीं. शिवाय १७३० पर्यंतच्या स्वाऱ्यांत खंडेराव दाभाड्याचें नांव वारंवार येतें. ग्रांट डफनें खंडेरावाची समाप्ति

१७२१ त केल्यामुळें, १७३० पर्यंतच्या त्याच्या सर्व हालचाली त्यास गाळाव्या लागल्या. १७२६ तलि श्रीरंगपट्टणावरलि स्वारींत व १७२७ तील निजामावरील स्वारींत खंडेराव होता. [ ३ ] १७२० च्या एप्रिलपासून नोव्हेंबरपर्यंत बाजीराव कोठें होता ह्याचा पत्ता ग्रांट डफला नव्हता ( Duff, chap. 13, P. 209 ); त्याचा उलगडा प्रस्तुत प्रस्तावनेंत मीं केला आहे. [ ४ ] १७२० तलि बारामतीवरील लढाई व १७२१ तलि पुरंदर व जुन्नर येथील लढाया, डफला माहीत नव्हत्या. [ ५ ] १७२१ तलि बाजीरावाची विजापुरकडील स्वारी डफच्या पुस्तकांत नाहीं. विजापुराकडे दंगा झाला होता म्हणून तो लिहितो (Duff, 210). परंतु बाजीरावाच्या स्वारीमुळें ही गडबड झाली होती हें त्यास माहीत नव्हतें. [ ६ ] निजामाच्या सरदारांची १७२२ तलि अर्कॉटावरील स्वारी डफच्या पुस्तकांत नाहीं. [७] १७२२ तलि ऐवजखानचा पराभव, १३२३ तलि अनूपाशिंगाची भेट व बाधेलखंडांतील बाजीरावाची स्वारी डफला माहीत नव्हती. [८] १७२३ तलि मल्हारराव होळकराच्या बुंदेलखंडांतील स्वारीचा पत्ता डफला नव्हता. [ ९ ] हैदराबादेंतील कंवरजखानावरील फत्तेशिंग भोसल्याच्या स्वारीचा वृत्तांत डफच्या ग्रंथांत नाहीं. [ १० ] १७२६च्या श्रीरंगपट्टणच्या स्वारीचा वृत्तांत डफ बहुतेक मुळींच देत नाहीं, तो ह्या शकावलींत बराच दिला आहे. [ ११ ] १७२६ च्या नोव्हेंबरच्या, १७२८ तलि पालखेडच्या लढाईपर्यंतच्या उलाढालीची हकीकत डफ देत नाहीं, तिचा ह्या प्रस्तावनेंत निर्देश केला आहे. [ १२ ] चिमाजीअप्पा १७२८ च्या नोव्हेंबरांत गुजराथेंत गेला म्हणून डफ म्हणतो. परंतु तसा प्रकार नसून त्यावेळीं चिमाजी दयाबहादरावर माळव्यांत गेला होता. [ १३ ] अहमदखान बंगष व कायमखा बंगष यांचा पराभव बाजीरावानें १७२९ मेंत केला. ग्रांट डफनें बंगषांचा पराभव १७३३ त करविला आहे ( Duff, 227 ). १७२८ पासून १७३४ पर्यंतचा डफचा सर्व वृत्तांत येथूनतेथून चुकला आहे. [ १४ ] छत्रसालाची पहिली भेट १७२९ त झाली असून ती ग्रांट डफनें १७३३ त घातली आहे. [ १५ ] १७३० तलि चिमाजी अप्पाच्या पायागडच्या स्वारीचा पत्ता डफला बिलकुल नव्हता. [ १६ ] १७३१ तील मांडोगडची चिमाजीची स्वारी डफला माहीत नव्हती. [ १७ ] १७३२ त बाजीराव कोंकणांत गेला होता ह्या गोष्टीचा उल्लेख डफ करीत नाहीं. [ १८ ] १७३३ च्या एप्रिलांत बाजीरावानें छत्रसालाची दुसऱ्यांदा भेट घेतली. हीच पहिली भेट असें ग्रांट डफ समजतो. ह्याच भेटींत छत्रसालानें बाजीरावाला तृतीयांश राज्य व मस्तानी दिली असावी. मस्तानीला पहिला पुत्र केव्हां झाला ह्याची मिति कळली असतां,छत्रसालानेंच मस्तानीला बाजीरावाला दिली ह्याचा निश्चय होईल. [ १९ ] कान्होजी आंग्रे १७२८ च्या सुमारास वारला म्हणून डफ म्हणतो ( Duff, 230 ) परंतु कान्होजी १७२९ च्या जुलैंत वारला हें निश्चित आहे ( खंड ३, लेखांक ३२७ व ३२८ ). [ २० ] शेखोजी आंग्र्याला ग्रांट डफ सखाजी म्हणतो व तो कान्होजीनंतर लवकरच वारला म्हणून लिहितो. परंतु शेखोजी १७३३ च्या सप्टेंबरांत वारला ( शकावली पृ० ६९ ). [ २१ ] १७३४ जानेवारीपासून जुलैपर्यंत बाजीरावानें खानडौरावर हिंदुस्थानांत स्वारी केली. ही स्वारी

ग्रांट डफनें १७३६ सालांत घातली आहे. [ २२ ] १७३४ च्या नोव्हेंबरापासून १७३५ च्या जुलैपर्यंत पिलाजी जाधवानें कमरुद्दीन वजिरावर स्वारी केली. ह्या स्वारीचा पत्ताच ग्रांट डफला नव्हता. [ २३ ] १७३५ च्या फेब्रुवारींत बाजीराव कोंकणांत गोवळकोटच्या स्वारीस गेला होता. १७३२ पासून १७३५ पर्यंत तीन वर्षे जंजिऱ्यावर मोहीम चालली होती. तींत बाजीराव दोनदां गेला व तींतून परत आला. ह्याचा नीट उलगडा डफला करतां आला नाहीं. हा उलगडा नीट न करतां आल्यामुळें १७३४ तील खानडौरावरील स्वारी १७३६ त न्यावी लागली व १७३६ तील स्वारी अजीबात गाळावी लागली. [ २४ ] १७३५ नोव्हेंबरापासून १७३६ जुलैपर्यंत बाजीरावानें अजमीर–पुष्करावर स्वारी केली. ही स्वारी डफनें गाळली आहे. [ २५ ] १७३६ च्या नोव्हेंबरापासून १७३८ जुलैपर्यंत बाजीरावानें भेलशावर स्वारी केली. हिचा वृत्तांत डफनें दिला नाहीं. [२६] फत्तेसिंग भोसल्यानेंहि १७१७ पासून १७४२ पर्यंत निजामावर, चंद्रसेन जाधवावर, कोल्हापूरकरांवर, कर्नाटकांत व कोंकणांत एकसारख्या २५ वर्षें स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्यांचाहि निर्देश डफनें फारसा व सालवार कोठें केला नाहीं. [ २७ ] दमाजी व पिलाजी गायकवाड, कंठाजी कदम बांडे, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, उदाजी पवार, कान्होजी भोसले व रघोजी भोसले यांच्याहि १७४० पर्यंतच्या स्वाऱ्यांचा सालवार निर्देश डफनें केला नाहीं. [ २८ ] कान्होजी आंग्र्याच्या समुद्रावरील युद्धांचाही १७०७ पासून १७२९ पर्यंतचा इतिहास डफनें बहुतेक बिलकुल दिला नाहीं.

२१. १७२० पासून १७४० पर्यंत ग्रांट डफनें काय काय ढोबळ चुका करून ठेविल्या आहेत व कोणकोणत्या प्रसंगाचा वृत्तांत अजीबात गाळला आहे त्याचा तपशील हा असा आहे. धावडशीकर स्वामींचीं पत्रें, पेशव्यांच्या रोजनिशा, पेशव्यांचीं चिटणिशी पत्रें, सुमारें २५ बखरी व कित्येक तवारिखा इतकी सामुग्री जवळ असून डफनें ह्या अशा चुका कशा केल्या ह्याचें आश्चर्य वाटतें. मिळालेल्या पत्रांच्या मित्यांकडे नीट व बारीक लक्ष न दिल्यामुळें, रोजनिशांचा जितका चोख अभ्यास करावा तितका न केल्यामुळें व बखरी व तवारिखा ह्यांवर फाजील विश्वास ठेविल्यामुळें, डफच्या हातून हा गोंधळ झाला आहे. मराठ्यांच्या इतिहासांत शिवाजीच्या पराक्रमाच्या खालोखाल, कदाचित् कित्येक बाबतींत शिवाजीच्या पराक्रमाच्या तोडीचीं, अद्भुत कृत्यें बाजीराव बल्लाळाच्या हातून घडलेलीं आहेत. ह्या महापुरुषाच्या अचाट व अद्भुत कृत्यांचें रसभरित वर्णन देण्यास प्रासादिकच इतिहासकार पाहिजे, व साद्यंत वर्णन देतां येण्यास मुबलक जागा पाहिजे; परंतु बिनचुक वर्णन देण्यास ह्या दोन्ही गोष्टींची अपेक्षा नाहीं. पहिले दोन गुण तर डफच्या ग्रंथांत नाहींत ही सर्वमान्य गोष्ट आहे; परंतु तिसराहि गुण ह्या ग्रंथांत नाहीं हें वर दाखविलेल्या चुकांवरून निश्चयानें म्हणण्यास बिलकुल शंका वाटत नाहीं. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या इतिहाससंबंधानें ग्रांट डफ विशेष विश्वास ठेवण्यालायक लेखक नाहीं हें मीं पहिल्या खंडांत सिद्ध करून दाखविलें आहे. १७२० पासून १७४० पर्यंतच्या इतिहाससंबंधानें तर डफवर फारच थोडा विश्वास ठेविला पाहिजे असें आतां ह्या

खंडांत म्हणण्याची पाळी आली आहे. १७०७ पासून १७२० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील यादवीचाही डफला यथातथ्य अंदाज झाला नाहीं. शाहूचे व ताराबाईचे डावपेंच, निरनिराळ्या सरदारांचे लपंडाव, कित्येकांचा अप्पलपोटेपणा, कित्येकांची एकनिष्ठा, मोंगलांचे दुटप्पी वेत, त्यांवर बाळाजी विश्वनाथाचे व धनाजी जाधवाचे शहप्रतिशह ह्या सर्वांचें वर्णन देतांना अलंकारद्वेष्ट्या अशा एखाद्या साध्या लेखकाचाहि लेख प्रसंगानें चमत्कृतिजनक व्हावा; परंतु अंगीकृत विषयाचें रहस्य यथास्थित न कळल्यामुळें, डफचें लिहिणें येथून तेथून सारखेंच नीरस असें वठलें आहे. कालाचा चोख निर्णय न केल्यामुळें, कार्यकारणसंबंध व प्रसंगाचें पौर्वापर्य ह्या लेखकाच्या जसें ध्यानांत यावें तसें आलें नाहीं. त्याचें सर्व लिहिणें तुटक, व हीनसत्व असें भासूं लागलें आहे. जोंपर्यंत मूळ अस्सल लेखांचा अभ्यास आपल्या इकडे सुरू झाला नव्हता, तोंपर्यंत ग्रांटडफची खरी किंमत करतां येणें शक्यच नव्हतें. परंतु नीळकंठराव कीर्तन्यांच्या टीकेपासून व काव्येतिहाससंग्रहकारांच्या यत्नापासून त्या ग्रंथाची खरी किंमत व खरी परीक्षा हळू हळू होत चालली आहे. मराठ्यांच्या इतिहासाची रचना नवीन पद्धतीनें करणें जरूर आहे असा परिणाम ह्या परीक्षेपासून झाला आहे.

२२. बाजीराव, चिमाजीअप्पा व फत्तेसिंग भोसले यांच्या स्वाऱ्या व त्यांच्यासंबंधानें ग्रांटडफनें केलेल्या चुका ह्यांचें स्पष्टीकरण येथपर्यंत झालें. आतां हे तीन पुरुष १७२० पासून १७४० पर्यंत कोठकोठें होते ह्याचे तक्ते पुढें देतों, म्हणजे हें स्पष्टीकरण जास्त पूर्ण होईल.

## तक्ता पहिला.

### बाजीराव बल्लाळाच्या हालचालींचा तक्ता.

| साल. | महिना. | | | स्थल. |
|---|---|---|---|---|
| १७२० | | | | |
| | एप्रिल ते जून | ... | ... | वऱ्हाड, खानदेश. |
| | जुलै | ... | ... | बाळापूर. |
| | सप्टेंबर | ... | ... | सासवड. |
| | आक्टोबर | ... | ... | बारामती. |
| | नोव्हेंबर | ... | ... | सातारा. |
| | डिसेंबर | ... | .... | मोगलाई. |
| १७२१ | जानेवारी ६ | ... | ... | सावर्डिया. |
| | फेब्रुवारी ते आगष्ट | ... | ... | विजापूर. |
| | सप्टेंबर-आक्टोबर | .... | ... | सातारा. |
| | नोव्हेंबर | ... | ... | पिंपरी, पुरंदर. |
| | डिसेंबर | ... | ... | जुन्नर. |
| १७२२ | जानेवारी | ... | ... | जुन्नर. |

| साल. | महिना. | स्थल. |
|---|---|---|
| १७२२ | फेब्रुवारी ते मे ... ... | मोगलाई, कुरकुंब, सुपें. |
| | जुलै ते सप्टेंबर ... ... | सातारा. |
| | आक्टोबर ... ... | सासवड, सुपें. |
| | डिसेंबर ... ... | मोगलाई. |
| १७२३ | जानेवारी ... ... | बऱ्हाणपूर, हांडे, पिंपळोद. |
| | फेब्रुवारी ... ... | बदकशा, झावाब. |
| | मार्च ... ... | बोरगांव, अशेर. |
| | एप्रिल ते जून ... ... | बाघेलखंड. |
| | जुलै ते आक्टोबर ... ... | सातारा. |
| | नोव्हेंबर ... .... | वांई, धोम, महाबळेश्वर, प्रतापगड, सातारा. |
| | डिसेंबर .... ... | माळवा. |
| १७२४ | जानेवारी ते जुलै ... ... | उज्जैन, बुंदेलखंड. |
| | जुलै ते आगष्ट ... ... | सातारा. |
| | सप्टेंबर ते आक्टोबर ... | मोगलाई, साखरखेडलें. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर ... | बऱ्हाणपूर, माळवा. |
| १७२५ | जानेवारी ते मार्च ... ... | माळवा. |
| | एप्रिल ते सप्टेंबर ... ... | सातारा, माहुली, अपशिंगें. |
| | | सातारा, पुणें. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर... ... | कर्नाटक, सुरापूर, चित्रदुर्ग, गदग, लक्ष्मेश्वर. |
| १७२६ | जानेवारी ते फेब्रुवारी ... | वेदवटी. |
| | फेब्रुवारी-मे .... ... | श्रीरंगपट्टण, त्रिचनापल्ली, अर्काट. |
| | जून-सप्टेंबर ... ... | सातारा, पुणें. |
| | सप्टेंबर-डिसेंबर ... ... | पंढरपूर, विजापूर. |
| १७२७ | जानेवारी-जुलै ... ... | मोगलाई. |
| | जुलै-आगष्ट ... ... | सातारा. |
| | आगष्ट-डिसेंबर ... ... | औरंगाबाद, खानदेश, गुजराथ. |
| १७२८ | फेब्रुवारी ... ... | पालखेड. |
| | मार्च ... ... | मुंगी. |
| १७२८ | जुलै ते सप्टेंबर ... ... | सातारा. |
| | आक्टोबर ते डिसेंबर ... | तुळजापूर, खानदेश. |
| १७२९ | जानेवारी-फेब्रुवारी ... ... | खानदेश, नेमाड-बऱ्हाणपूर. |
| | मार्च ते जुलै ... ... | माळवा, जैतपूर, धामोरा. |

| | | |
|---|---|---|
| | जुलै ते डिसेंबर ... | ... सातारा, सुपें, फलटण, पुणें. |
| १७३० | जानेवारी ... | ... पुणें. |
| | फेब्रूवारी ते जुलै ... | ... उंबरज. |
| | जुलै ते आक्टोबर ... | ... उंबरज, सातारा, पुणें. |
| | आक्टोबर ते डिसेंबर | ... खानदेश. |
| १७३१ | जानेवारी ते मार्च ... | ... गुजराथ, डभई. |
| | एप्रिल ... | ... सातारा. |
| | मे ... | ... सातारा. |
| | जून ते डिसेंबर ... | ... सातारा, पुणें. |
| १७३२ | जानेवारी ते मार्च ... | ... कुलाबा. |
| | मार्च ते जुलै ... | ... माळवा. |
| | जुलै ते आक्टोबर ... | ... सातारा. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर ... | ... मोंगलाई. |
| १७३३ | जानेवारी ते मार्च ... | ... मोंगलाई, निजामाशीं भेट. |
| | मार्च ते डिसेंबर ... | ... कुलाबा, जंजिरा. |
| १७३४ | जानेवारी ते जुलै ... | ... माळवा, दिल्ली, आग्रा |
| | जुलै ते डिसेंबर ... | ... सातारा, पुणें. |
| १७३५ | फेब्रूवारी ते जुलै ... | .. जंजिरा, गोवळकट. |
| | जुलै ते आक्टोबर ... | ... सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर ... | ... खानदेश, माळवा. |
| १७३६ | जानेवारी ते जुलै ... | ... अजमीर, पुष्कर. |
| | जुलै ते आक्टोबर ... | ... सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर ... | ... खानदेश, माळवा. |
| १७३७ | जानेवारी ते जुलै .. | ... भेळशाची स्वारी. |
| | जुलै ते सप्टेंबर .. | ... सातारा, पुणें. |
| | आक्टोबर ते डिसेंबर | ... खानदेश, माळवा. |
| १७३८ | जानेवारी ते जुलै .. | ... भोपाळची स्वारी. |
| | जुलै ते सप्टेंबर .. | .. सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर . | ... उत्तर कोंकण. |
| १७३९ | जानेवारी ते मार्च . | .. ठाणें, वसई, तारापूर. |
| | एप्रिल ते जुलै .. | .. खानदेश, वऱ्हाड. |
| | जुलै ते आक्टोबर . | .. सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर . | .. खानदेश. |
| १७४० | जानेवारी ते एप्रिल. | .. खानदेश. |
| | २८ एप्रिल . | . समाप्ती. |

## तक्ता दुसरा.

### चिमणाजी बल्लाळाच्या हालचालींचा तक्ता.

| | | |
|---|---|---|
| १७२० | एप्रिल ... | .. सातारा. |
| १७२३ | सप्टेंबर ते डिसेंबर ... | ... कंब्रजखानावर स्वारी, हैदराबाद, पंढरपूर, तुळजापूर. |
| १७२४ | जानेवारी ते जुलै ... | ... कंब्रजखानावर स्वारी. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर ... | ... निजामावर स्वारी. |
| १७२५ | नोव्हेंबर ते डिसेंबर ... | ... निजामावर स्वारी. |
| १७२६ | जानेवारी ते जुलै ... | ... निजामावर स्वारी. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर ... | ... निजामावर स्वारी. |
| १७२७ | जानेवारी ते जुलै ... | ... निजामावर स्वारी. |
| १७२८ | आक्टोबर-डिसेंबर ... | ... माळवा. |
| १७२९ | जानेवारी ते एप्रिल ... | ... माळवा, दयाबहादूरावर स्वारी. |
| | आक्टोबर-डिसेंबर ... | ... खानदेश, गुजराथ. |
| १७३० | जानेवारी ते जुलै ... | ... ढवळकें, पायागड. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर ... | ... खानदेश, माळवा. |
| १७३१ | जानेवारी ते जुलै ... | ... माळवा, ग्वालेर. |
| | जुलै ते डिसेंबर ... | ... उंब्रज, सातारा, पुणें. |
| १७३२ | अक्टोबर ते जुलै ... | ... माळवा, चांपानेरची स्वारी. |
| १७३३ | | |
| | सप्टेंबर ते डिसेंबर ... | ... कोंकण, जंजिरा. |
| १७३४ | जानेवारी ते मार्च ... | ... कोंकण, जंजिरा. |
| | मार्च ते जुलै ... | ... खानदेश, वऱ्हाड. |
| १७३५ | ... | ... देशीं. |
| १७३६ | मार्च ते जुलै ... | ... कोंकण. |
| १७३७ | मार्च ते जुलै ... | ... कोंकण. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर... | ... ठाणें, तारापूर. |
| १७३८ | जानेवारी ते जुलै ... | ... साष्टी. |
| | नोव्हेंबर डिसेंबर .. | ... साष्टी. |
| १७३९ | जानेवारी–जुलै ... | ... साष्टी. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर ... | ... खानदेश. |
| १७४० | जानेवारी–एप्रिल .. | ... कोंकण, साष्टी. |

## तक्ता तिसरा.

### फत्तेसिंग भोसल्याच्या हालचालींचा तक्ता.

| साल. | महिना. | स्थल. |
| --- | --- | --- |
| १७१७ पासून १७२५ | ... ... ... | चंद्रसेन जाधव, कंव्रजखान व निजामुन्मुलूख ह्यांच्या प्रांतांत. |
| १७२६ | ... ... ... | कर्नाटक. |
| १७२७ ते १७३२ | ... ... ... | निजाम व संभाजी. |
| १७३३ ते १७३६ | ... ... ... | जंजिरा. |
| १७३७ ते १७४० | ... ... ... | चंद्रसेन जाधव व निजाम यांचा प्रांत. |
| १७४० | ... ... ... | श्रीरंगपट्टणची स्वारी. |

२३. ह्या तीन तक्त्यांपैकीं बाजीराव बल्लाळाच्या हालचालींचा तक्ता १७२० पासून १७४० पर्यंत सबंध भरला आहे. कोणत्याहि वर्षाच्या सप्टेंबरापासून जुलईपर्यंत बाजीराव कोठें होता हें ह्या तक्त्यावरून स्पष्ट कळून येतें. चिमाजीअप्पाची १७२३ पासूनची हालचाल दुसऱ्या तक्त्यांत दिली आहे, व तिसऱ्या तक्त्यांत फत्तेसिंगाच्या हालचालींचा नुसता सालवारीनें निर्देश केला आहे. बाकी राहिलेल्या सरदारांच्या हालचालींचा पत्ता अद्याप संगतवार तर लागला नाहींच; परंतु कांहीं अपवाद खेरीजकरून अमुक सरदार अमक्या स्थळीं अमुक वर्षी होता असें निश्चयानें म्हणण्यापुरतीहि माहिती मिळालेली नाहीं. ह्या शकावलीपासून फायदा एवढाच झाला आहे कीं, १७२० पासून १७४० पर्यंतच्या पेशव्यांच्या हालचालींच्या मित्या तेवढ्या बिनचुक मिळाल्या आहेत. अमुक मोहिम अमुक महिन्यांत सुरू झाली एवढें ह्या मित्यांपासून समजतें. ह्यापेक्षां जास्त माहिती ह्या शकावलीपासून मिळणार नाहीं. मोहिमांचीं विशिष्ट कारणें, मोहिमांवर गेलेल्या सैन्याची संख्या, मोहिमांचे टप्पे, मोहिमांत झालेल्या युद्धांच्या स्थलांचीं नांवें, युद्धांची तपशीलवार हकीकत, मोहिमा संपल्यावर झालेल्या तहनाम्यांच्या नकला वगैरे बाबींची उपलब्धि अद्यापि व्हावयाचीच आहे. ग्रांट डफच्या ग्रंथांतहि ही माहिती बहुतेक बिल्कुल नाहीं. हें शेवटलें विधान किंचित् जास्त खुलें करून दाखवितों. १७२६ तील श्रीरंगपट्टणच्या स्वारीच्या माहितीचा आदि, मध्य व अंत्य डफनें येणेंप्रमाणें केला आहे:—

In 1726 the पेशवा was with a very large army under फत्तेसिंग भोसले, which proceeded into the Carnatic, plundered the Districts, and levied a contribution from श्रीरंगपट्टण. ह्या वर्णनांत खालील दोष आहेत. ( १ ) ह्या स्वारीला कारण काय झालें तें दिलें नाहीं. ( २ ) ह्या स्वारीला मुळीं कारणच कांहीं नसावें असा एकंदर वाक्याचा बोध होतो. ( ३ ) मोठें सैन्य म्हणजे किती मोठें ह्याचा कांहीं एक अंदाज होत नाहीं. ( ४ ) कर्नाटकांत पूर्वेस कीं पश्चिमेस सैन्य गेलें ह्याचा पत्ता नाहीं. ( ५ ) लुटणें हा शब्द वापरून मराठ्यांच्या संबंधीं तिरस्कार व्यक्त केला आहे. ( ६ ) Districts म्हणजे प्रांत कीं संस्थानें ह्याचा निर्णय केला नाहीं. ( ७ ) Levy शब्द घालून मराठ्यांचा जुलूम व्यक्त केला आहे. ( ८ ) १७२६ हा आंकडा घालून स्वारीची खरी मिति चुकविली आहे. आतां ह्या स्वारीचें खरें कारण असें आहे. १७२० पासून निजामावर मराठ्यांच्या स्वाऱ्या एकसारख्या चालल्याच होत्या. त्यात १७२२ त व १७२३ त निजामुन्मुल्ख किंवा त्याचे सरदार कर्नाटकांत अर्काट, त्रिचनापल्लीवर जाणार अशी बातमी आली. त्रिचनापल्लीस मुरारराव घोरपडे व तंजावरास तुळजाजी राजे असल्यामुळें त्यांना मदत करणें जरूर होतें. १७२४ त निजामाशीं बाजीरावाचें किंचित् सख्य होणार तों १७२५ त त्याशीं मराठ्यांचें पुनः वांकडें आलें व चोहोंकडून युद्धाला सुरुवात झाली. कान्होजी भोंसले उत्तरेकडून, कंठाजी कदम बांडे व गायकवाड पश्चिमेकडून, चिमाजीअप्पा भागानगराकडून असा चोहोंबाजूंनीं निजामावर मराठ्यांनीं अगदीं दंगा उसळून दिला. निजामाच्या सुभेदारींत कर्नाटकचाहि प्रांत अवरंगझेबाच्या स्वारीपासून होताच. तेव्हां त्या प्रांतांत जाऊन निजामाला शह देण्याचा मराठ्यांनीं बेत केला व त्या बेताचा परिणाम ही स्वारी झाली. शिवाय सोंधें, बिदनूर, सुरापूर, गदग, लखमेश्वर, श्रीरंगपट्टण वगैरे संस्थानिकांकडून मराठ्यांच्या खंडण्या आज कित्येक वर्षेपर्यंत राहिल्या होत्या, त्या उगविण्याचाहि ह्या मोहिमेंतील एक हेतु होता. फत्तेसिंगाला १७१३ त जहागीर दिली त्यावेळीं कर्नाटकाचा अधिकारहि त्याला सोंपिला होता. ह्या कारणाकरितां मोहिमेचें आधिपत्य वरकरणी तरी त्याच्याकडे आलें होतें. नाहींतर तें निःसंशय बाजीरावाकडे आलें असतें ह्या स्वारीची कांहीं हकीकत शकावलीच्या ५३ व्या पृष्ठावर दिली आहे. त्यावरून बाकीच्या दोषांचें निरसन करण्याचें थोडेंबहुत साधन मिळण्यासारखें आहे. ह्या स्वारीचा परिणाम काय झाला, स्वारीच्या शेवटीं संस्थानिकांशीं तह काय काय झाले, वगैरे हकीकत डफनें न दिल्यामुळें, १७२६ पासून १७४० पर्यंत पुढें कर्नाटकाकडे मराठ्यांनीं ढुंकूनसुद्धां कां पाहिलें नाहीं तें समजेनासें होतें. १७२६ पासून १७४० पर्यंत मराठ्यांनीं कर्नाटकाकडे ढुंकूनसुद्धां कां पाहिलें नाहीं त्याचें खरें कारण येणेंप्रमाणें आहे फत्तेसिंग भोंसले, श्रीनिवासराव प्रतिनिधि, बाबूजी नाईक बारामतीकर व रघोजी भोंसले ही सर्व मंडळी बाजीरावाच्या विरुद्ध होती १७२५ च्या सुमाराला हा विरोध इतका कांहीं विकोपाला गेला कीं, शाहूमहाराजांना मध्यें पडून प्रतिनिधींचें व पेशव्यांचें एकसूत्र जुळवून देणें भाग पडलें. पुढें १७२५ च्या

आगोठीनंतर श्रीरंगपट्टणावर जेव्हां मोहीम करावयाचें ठरलें, तेव्हां केवळ महाराजांच्या आग्रहास्तव बाजीरावाला फत्तेसिंगाच्या आधिपत्याखालीं ह्या मोहिमेस जावें लागलें. मोहिमेचें कार्य जसें निवटावें तसेंच बहुतेक निवटलें; परंतु मराठ्यांच्या सैन्याचे ह्या स्वारींत अतोनात हाल झाले. त्याचें सर्व अपेश, अर्थात्, फत्तेसिंग भोंसले, श्रीनिवासराव प्रतिनिधि व रघोजी भोंसले ह्यांच्या माथ्यावर फुटलें. शाहूला ह्या लोकांच्या कर्तृत्वाचा व ऐपतीचा अंदाज कळला, व बाजीरावावर त्याचा विश्वास व लोभ जास्तच बसला. यद्यपि असा प्रकार झाला, तत्रापि शाहूनें ह्या अपेशी लोकांना अजीबात सोडून दिलें असा प्रकार झाला नाहीं. फत्तेसिंग तर शाहूचा मानीव पुत्र होता व त्याच्यावर त्याचा अत्यंत लोभ असे. प्रतिनिधि व रघोजी भोसले फत्तेसिंगाच्या विश्वासांतले पडले, त्यामुळें त्यांचीहि बाजू बरीच सांवरली गेली. ह्या सर्व गोष्टी बाजीराव पूर्णपणें जाणून होता. फत्तेसिंगाला दुखवावयाचें नाहीं व त्याच्या कामांत पडावयाचें नाहीं असा बाजीरावानें पुढें बेत केला. बाजीरावानें १७२६ च्या नंतर कर्नाटकाचें नांव काढलें नाहीं त्याचें कारण हें असें आहे. कर्नाटकच्या स्वारींचीं सुखें फत्तेसिंगाला पक्कीं कळून चुकलीं होतीं. म्हणून तोहि तिकडील स्वारीच्या छंदांत पुनः १७४० पर्यंत पडला नाहीं. ह्या दोन कारणांनीं १७२६ च्या पुढें कर्नाटकावर मराठ्यांची स्वारी झाली नाहीं. स्वारी न होण्याचें तिसरेंहि एक कारण आहे. कर्नाटकची मुख्य किल्ली निजामाच्या हातांत होती. त्यालाच वठणीस आणिलें म्हणजे कर्नाटक जिंकल्यासारखेंच झालें, ह्या समजुतीवर भिस्त ठेवून बाजीरावानें १७२६च्या पुढें निजामावर ज्या स्वाऱ्या केल्या त्या सर्व खानदेशांत व माळव्यांत केल्या. बाजीरावाची ही क्लृप्ति कांहीं वावगी नव्हती; परंतु तिच्यापासून एक तोटा झाला. एकसारखें चवदा वर्षेंपर्यंत कर्नाटकाकडे कोणी ढुंकूनहि न पाहिल्यामुळें, निजामुन्मुलुखाला त्या प्रांतांत आपली सत्ता जास्त स्थिर करतां आली, व मराठयांना त्या प्रांतांत कोणी ओळखीनासें झालें. १७३९ त मराठयांच्या नर्मदेपलीकडील उपद्व्यापाला कंटाळून, निजामुन्मुलुखानें त्यांची खोड मोडण्याकरितां जेव्हां नादिरशहाला दिल्लीस आणिलें, तेव्हां बाजीरावानें निजामावर एकंदर तीन स्वाऱ्या काढिल्या. एक स्वारी निजामाच्या प्रांतांवर खानदेशांतून चिमाजी अप्पाच्या हातून करविली. दुसरी स्वतः हिंदुस्थानांत करण्याचा बेत केला, व तिसरी फत्तेसिंग व रघोजी भोसले यांच्याकडून निजामाच्या कर्नाटक प्रांतांत करविली. १७४० तील कर्नाटकांतील स्वारीचें हें मुख्य कारण आहे. ही स्वारी चिमाजी अप्पाच्या हातूनहि झाली असती. परंतु फत्तेसिंगाच्या कामांत पडावयाचें नाहीं हा बाजीरावाचा कृतसंकल्प होता. १७४० पुढें कर्नाटकची व्यवस्था शाहूनें रघोजी भोंसल्याकडे सांगितली, रघोजीचें व बाळाजी बाजीरावाचें फारसें नीट नव्हतें. १७४४ त रघोजीची बाळाजीनें व्यवस्था लाविली. नंतर इतरत्र स्थिरस्थावर झाल्यावर बाळाजी बाजीरावानें आपल्या प्रख्यात अशा कर्नाटकच्या स्वाऱ्या सुरू केल्या, सदाशिव चिमणाजीनें बहादूरभेंड्यावर स्वारी १७४६ च्या हिवाळ्यांत केली. तीच कर्नाटकावरील १७६० पर्यंतच्या स्वाऱ्यांचा श्रीगणेशाय नमः होय. बाजीरावाच्या कारकीर्दींत कर्नाटकावर एकापेक्षां जास्त

स्वाऱ्या कां झाल्या नाहींत, व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत कर्नाटकावर एकसारख्या स्वाऱ्यावर स्वाऱ्या कां झाल्या, ह्याची कारणपरंपरा ही अशी आहे. मराठयांच्या मोहिमांना कारणांची बिलकुल जरूर लागत नसे, प्रांतांची लुटालूट करणें हें एकच कारण त्यांच्या प्रयत्नांना बस्स असे, अशी जेथें भावना, तेथें ऐतिहासिक कार्यकारणांची मूळपीठिका शोधीत बसण्याची उठाठेव करण्याचें प्रयोजनच रहात नाहीं; परंतु ही उठाठेव केल्याशिवाय मराठयांच्या इतिहासाची फोड यथास्थित होणें अशक्य आहे. १७२६ च्या श्रीरंगपट्टणच्या स्वारीनंतर बाजीरावानें किंवा चिमाजीअप्पानें कर्नाटकांत स्वाऱ्या केल्या असत्या तर, (१) निजामुन्मुलुखाची सत्ता त्या प्रांतांत स्थिर झाली नसती, (२) निजामुन्मुलुखाचे हस्तक, जे अर्काटचे नवाब ते पार नाहींसे झाले असते, (३) तंजावरच्या मराठयांना जोर आला असतां, (४) मद्रासेंतील इंग्रजांना व पांडिचेरींतील फ्रेंचांना अर्काटच्या नवाबांच्या द्वारा कर्नाटकांत ढवळाढवळ बहुशः करतां आली नसती, व (५) श्रीरंगपट्टणचें राज्य नष्ट होऊन हैदरासारखा नवीन शत्रु उद्भवला नसता. आकिलिसाच्या रागानें ग्रीस देशावर जशी संकटपरंपरा ओढवली, त्याप्रमाणें बाजीरावाच्या फत्तेसिंगावरील व प्रतिनिधीवरील रागानें कर्नाटकांत ही नवीन कार्यपरंपरा उद्भवून महाराष्ट्रावर पुढें संकटपरंपरा कोसळली. बाजीरावाच्या व फत्तेसिंगाच्या दुहीचा हा असा परिणाम झाला.

२४. बाजीराव व फत्तेसिंग ह्यांच्या मनांत एकमेकांविषयीं यद्यपि विकल्प आलेला होता, तत्रापि त्यांनीं एकमेकांविरुद्ध झुंझण्याचा उद्योग आरंभिला नाहीं. बाजीरावाच्या इतर प्रतिस्पर्ध्यांची गोष्ट याहून निराळी होती. कोंकणांतील आंग्र्यांनीं, गुजराथेंतील दाभाड्यांनीं, वऱ्हाडांतील भोंसल्यांनी व कोल्हापूरच्या राजांनीं शाहूच्या व बाजीरावाच्या विरुद्ध युद्धप्रसंग केलेले इतिहासांत विदितच आहेत. ह्या युद्धप्रसंगांचीं मूळ कारणें, व जवळचे व दूरवरचे परिणाम, ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत दिले नाहीत. कारणें व परिणाम ह्यांचे खुलासे सुज्ञ वाचकांनीं आपले आपणच करून घ्यावे अशी डफची प्रतिज्ञाच आहे (Duff's History, preface). डफची दुसरी प्रतिज्ञा अशी आहे कीं, इतिहासांतील प्रसंगांचे खरेखुरे, तपशील देण्याला मात्र आपल्याकडून कसूर होणार नाहीं. पैकीं ह्या दुसऱ्या प्रतिज्ञेंत कितपत अर्थ आहे ह्याचा खुलासा मी वारंवार करीत आलों आहें. ग्रांट डफचा तपशील अनेक ठिकाणीं विश्वसनीय व प्रमाणबद्ध नसतो ह्या विधानाची सत्यता सिद्ध होऊन चुकली आहे. कारणें व कार्यें ह्यांची जी ही ग्रांट डफनें ताडातोड केली, तीच त्याच्या विपत्तीच्या मूळाशीं आहे. कारण व कार्य ह्यांचा घटस्फोट करून इतिहास लिहूं पहाणें अशास्त्र आहे इतकेंच नव्हे, तर तें अशक्य आहे. अनेक कार्यें पुढें आलीं व त्यांतून आधींचीं कोणतीं, मागूनचीं कोणतीं व समकालीन कोणतीं ह्याचा उलगडा करण्याचा प्रसंग आला, म्हणजे मग कारणांचें महत्त्व कळूं लागतें. अशा प्रसंगी कारणांकडे पाहिलेंच नाहीं, म्हणजे डफच्या इतिहासासारखा इतिहास तयार होतो. कारणाशिवाय कार्यांचे वर्णन देईन हें म्हणणेंच मुळीं असंबद्ध आहे. आश्चर्य हेंच कीं, तें जगापुढें मांडण्यास हा लेखक तयार झाला.

२५. कार्यकारणांची ताडातोड केल्यामुळें ग्रांट डफला मराठ्यांच्या इतिहासाचें रहस्य बिलकुल कळलें नाहीं व कालाचा निर्णय बरावर न केल्यामुळें सामान्य अशी गोष्ट जी कालाचें पौर्वापर्य तेंहि समजलें नाहीं, ह्या प्रकरणाचा विचार येथपर्यंत केला. आतां ह्यापुढें १७४० पासून १७६१ पर्यंतच्या मित्यांसंबंधानें माझें म्हणणें काय आहे तें सांगतों. १७५० पासून १७६१ पर्यंतचे तक्ते पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत मीं दिले आहेत. तिसऱ्या खंडांतील पत्रांचा विचार करतांना १७४० पासून १७५० पर्यंतच्या अवधींतील प्रसंगांचा ऊहापोह करावयाचा आहे, त्यावेळीं ह्या अवधींतील मित्यांचाही छडा लावतां येईल.

# प्रस्तावना खंड ३ रा.

१ ह्या खंडांत एकंदर ५६८ लेखांक छापिले आहेत. पैकीं, लेखांक १३९ चाफळ येथून, लेखांक १६६ पुणें येथील धडफळे यांजकडून, लेखांक १६७ चाकणाहून, लेखांक १७० वाईंतील अयाचितांकडून, लेखांक ५५४ पुणें येथील हसबनिसांकडून, लेखांक ८ व ४७ वाईंतील शेखमिऱ्यांकडून, लेखांक [ १४४, १४५, १५७ ] साताऱ्यांतील शिरक्यांकडून, लेखांक [ १३६, १६७, १६८, १६९ ] काव्येतिहाससंग्रहकारांच्या दप्तरांतून, लेखांक [ ९९, १००, १०१, १०६, १०७, १०९, १३४ ] पांडववाडींतील कोल्हटकरांकडून, लेखांक [ १८३–२३४ ] वाईंतील कोल्हटकरांकडून, लेखांक [ २३७, २३८, २३९, २४०, २४१, ४५३ ] वाळव्याच्या थोरातांकडून, लेखांक [ १३७, १३८, १४०, १४१, १४२, १४४, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५ ] बावधनच्या खेरांकडून, लेखांक [ १२१, १२२, १२३, १२४, १२५, १२७, १३३, १३४ ] वाईंतील शांताश्रमाच्या मठांतून, लेखांक [ ५६–६४, ६७–७४, ७६, ७७, १७२ ] ओझर्ड्याच्या पिसाळांकडून, लेखांक [ १४६, १४७, १७१ ] वाईंतील गोविंदराव भानूंकडून, लेखांक [ ३७०–५५३ ] कायगांवकर दीक्षितांकडून, व बाकीचे लेखांक ब्रह्मेंद्रस्वामीचे धावडशी व पिंपरी येथील शिष्य जे भागवत त्यांजकडून, मिळाले. लेखांक ७५ लेखांक ७४ चाच अंश आहे व लेखांक १६७ दुबार पडला आहे. बाकीचे लेखांक किरकोळ आहेत. लेखांक ५६८ काव्येतिहास–संग्रहकारांच्या दप्तरांतील आहे.

२ ह्या पत्रांत ब्रह्मेंद्रस्वामींचीं २३६, कायगांवकर दीक्षितांसंबंधीं १८४, कोल्हटकरांचीं ५९, व खेरांचीं २३ पत्रें विशेष नांवाजण्यासारखीं आहेत. ब्रम्हेंद्रस्वामींच्या पत्रांत आंग्र्यासंबंधीं, दीक्षितांच्या पत्रांत बाळाजी बाजीरावासंबंधीं, कोल्हटकरांच्या पत्रांत नागपूरकर भोसल्यासंबंधीं व खेरांच्या पत्रांत गोविंदपंत बुंदेल्यासंबंधीं माहिती आहे. लेखांक १५७ त थोरले शिवाजी महाराज यांची मुलगी राजकुवरबाई हिचा उल्लेख आहे. ह्या मुलीच्या नवऱ्यास दाभोळची देशमुखी शिवाजीनें देऊं केली होती, असें ह्या लेखांत म्हटलें आहे. लेखांक १४४ त ‘ चंदीच्या प्रसंगें व मसलतेच्या प्रसंगें व समजाविशीं निमित्यें वतनाचे कागद ज्यानें जसें मागितलें तसें दिल्हे ’ म्हणून उल्लेख आढळतो. संकटसमयीं समजाविशीनिमित्य म्हणजे आगाऊ पगारानिमित्य शिपाई लोकांस राजारामानें वाटतील तीं वतनें करून दिलीं असा ह्या उल्लेखाचा अर्थ होतो. लेखांक १६७ त दाभाड्यांच्या व लेखांक ८ त शेखामिऱ्यांच्या पूर्वस्थितीचें वर्णन आहे. लेखांक ६४ त ‘ एका जातीच्या दोन जाती पाहिल्या ’ असे शब्द बाटलेल्या सूर्याजी पिसाळानें काढिले आहेत. लेखांक १०७ त मोरो जिवाजी सेनाखासकील याचें नांव आलें आहे. ग्रांट डफनें आपल्या इतिहासाच्या १४ व्या भागाच्या एका टिपेंत सेनाखासखेल ह्या शब्दाचा Leader of the Sovereign tribe असा अर्थ केला आहे. खैल म्हणजे घोडेस्वारांची पलटण, खास म्हणजे स्वतःची, व सेना म्हणजे फौज मिळून राजाच्या स्वतःच्या घोडेस्वारांच्या

पलटणाचा मुख्य असा ह्या शब्दाचा खरा अर्थ आहे. हा शब्द संस्कृत आहे असें डफ समजतो. परंतु हा शब्द मिश्र आहे. गायकवाडांना ही पदवी मिळण्यापूर्वी ती इतर कित्येकांना मिळाली होती, हें ह्या पत्रावरून स्पष्ट होतें. १७१३ च्या नोव्हेंबरांत परशराम त्रिंबक प्रतिनिधी कोल्हापूरच्या शिवाजीला जाऊन मिळाला होता असें लेखांक २३९ वरून दिसतें. ह्याच लेखावरून कोल्हापूरचा शिवाजी १७१२ त वारला नसावा असा संशय येतो. लेखांक २३४ व २३८ वरून परशराम त्रिंबक प्रतिनिधी शाहू किंवा शिवाजी ह्या दोघांकडे नसून १७०८ त कैदेंत होता असें ठरतें. लेखांक २३८ त वर्णिलेला ‘ कदीम राज्यांत बहुत कंष्टमेहनत करणारा सुंदर तुकदेव ’ कोण होता व त्यानें कामगिऱ्या काय केल्या ह्याचा पत्ता अद्याप लागला नाहीं. लेखांक ५६ त राजारामानें आपल्या नांवापुढें छत्रपति हा शब्द लावला आहे. लेखांक ६४ त १७१० पर्यंतचे शाहूचे कांहीं मुक्काम दिले आहेत. १७०७ च्या मेंत शाहू घोडनदीजवळ तुळापुरास होता. १७०८ च्या जानेवारींत साताऱ्यास, पुढें पन्हाळयास, नंतर पंचगंगेवर, नंतर रांगण्यास, पुढें वर्षभर म्हणजे १७०९ च्या मेपर्यंत कोल्हापूरप्रांतीं छावणीत, १७०९ च्या मेंत पुरंधरास ( लेखांक ६२ ), व पुढें १७१० त वंदनगडास शाहू होता. १७०६ त वांईप्रांत मराठ्यांच्या हातीं आला असें लेखांक १०१ वरून समजतें. सय्यदाशीं तह बाळाजी विश्वनाथानें १७१८ च्या आगस्टापूर्वी केला असें लेखांक ९९ व १०० यांवरून ठरतें. लेखांक १०९ तील पोवाडा १७२५।१७२६ तील कर्नाटकांतील स्वारीच्या सुखाचें वर्णन करतो. लेखांक १३४ वरून १७०४ त जावलीप्रांत मराठ्यांकडे होता. असे नानाप्रकारचे उल्लेख ह्या खंडांतील ५५४ लेखांकांत आले आहेत. ते शोधक व जिज्ञासू अशा इतिहासकाराला मराठ्यांच्या इतिहासाच्या रचनेस अत्यंत उपयोगीं पडतील. त्या सर्वांचा निर्देश येथें करूं गेल्यास फारच विस्तार होईल. सबब प्रस्तुत प्रस्तावनेंत त्यांपैकीं कांहींचाच तेवढा परिचय वाचकांस करून देऊन, संगतवार अशीं जी ब्रह्मेंद्रस्वामींचीं व कायगांवकर दीक्षितांचीं पत्रें, त्यापासून इतिहासरचनेस काय उपयोग झाला तें सांगतों.

३ ब्रह्मेंद्रस्वामीच्या २३६ पत्रांपैकीं १० पत्रें कान्होजीचीं, २५ पत्रें सेखोजीचीं, २९ पत्रें संभाजीचीं, १३ पत्रें तुळाजीचीं, १५ पत्रें मानाजीचीं, व बाकीचीं मथुराबाई, संतूबाई, लक्ष्मीबाई, गिरजाबाई, बाकाजी नाईक महाडीक, रघुनाथ हरी, गणेश बल्लाळ वगैरेचीं आहेत. ह्या खंडांतील २४७ व्या लेखांकाची मिति ३१ आक्टोबर १७३० व २५५ व्या लेखांकाची मिति १९ एप्रिल १७३२ अशी हवी आहे. लेखांक २३ हें पत्र जयसिंग जाधवाचें नसून जयसिंग आंग्र्याचें आहे व हें १७४० त लिहिलें नसून १७३२ त लिहिलें आहे. ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रांत ब्रह्मेंद्रासंबंधीं माहिती बरीच असून, शिवाय आंग्र्यासंबंधींही माहिती थोडी नाहीं. ह्या माहितीशीं इतरत्र सांपडणाऱ्या माहितींची सांगड घालून आंग्र्यासंबंधीं देववेल तेवढी माहिती पुढें देतों.

४ पनवेल, राजमाची, पेण, चेऊल, बाणकोट, महाड, अलीबाग, दाभोळ, सुवर्णदुर्ग, संगमेश्वर, वगैरे कोंकणांतील शहरांशीं आंग्र्यांचा संबंध इ० स० १६८० पासून


१८४० पर्यंत आहे. कोंकणांशीं भोंसल्यांचा संबंध १६४० पासून सुरू होऊन ह्याकालपर्यंतहि चालला आहे असें म्हटलें असतां चालेल. १६४० पर्यंत ह्या प्रांतांतील निरनिराळ्या प्रदेशांशीं दिल्लीचे पातशहा, विजापूरचे पातशहा, अहमदनगरचे पातशहा, गुजराथचे पातशहा, पोर्तुगीज लोक, जंजिऱ्याचे शिद्दी, जव्हारचे कोळी, ठाणें, कल्याण, चेऊल व देवगड येथील मराठे राजे यांचा संबंध आलेला आहे. १३१८ त देवगिरी घेतल्यावर कोंकणाशीं मुसलमानांचा संबंध सुरू झाला. १५१२ त चेऊल येथें वखार बांधल्यापासून पोर्तुगीज लोकांचा व १६३८ त राजापूर येथें वखार बांधल्यापासून इंग्रजांचा परिचय कोंकणांतील लोकांना करावा लागला. १३१८ च्या पूर्वी यादव, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे दक्षिणेंतील घाटावरील राजांच्या अमलाखालीं कोंकण होतें असें ताम्रपटावरून दिसतें. सारांश अलीकडील हजार बाराशें वर्षे कोंकण साक्षात् देशावरील राजांच्या किंवा त्यांचे अंकित जे मांडलिक त्यांच्या अमलाखालीं आहे. ह्या अवधींत कोंकणांत स्वतंत्र राजा असल्याचें आढळत नाहीं. पौराणिक वीरपुरुष परशुराम ह्याच्या वेळीं कोंकण स्वतंत्र असल्यास न कळे. कान्हेरी, मंडपेश्वर, घारापुरी, कुडें, चिपळूण, दाभोळ, वगैरे ठिकाणच्या लेण्यांवरून असें दिसतें कीं कोंकणांत कांहीं काल बौद्धांचें ठाणें होतें. येणेंप्रमाणें अलीकडील अडीच हजार वर्षांचा इतिहास जाणण्याचीं जीं कांहीं तुटपुंजीं व असमाधानकारक साधनें उपलब्ध आहेत, त्यांवरून पाहतां कोंकण बहुतेक सदासर्वदा कोंकणेतर राजांच्याच अंमलाखालीं असल्याचें आढळून येतें. कोंकणांत एखादा स्वतंत्र व बलिष्ठ राजा होऊन त्यानें घाटावरचे प्रांत जिंकल्याचें उदाहरण एकहि नाहीं. कोंकणस्थ असा शककर्ता राजा म्हटला म्हणजे एवढा परशुरामच होय. परंतु तो पौराणिक कालांतील असल्यामुळें ऐतिहासिक कालांतील गोष्टींचा विचार करतांना त्याला विशेष महत्त्व देण्याचें प्रबळ कारण दिसत नाहीं.

५ उत्तरेकडून, पूर्वेकडून, व दक्षिणेकडून चालुक्य, यादव, राष्ट्रकूट, विजयानगरकर, सोंधेकर, दिल्लीकर, अमदाबादकर, अहमदनगरकर, बेदरकर, दौलताबादकर, सातारकर, कोल्हापूरकर वगैरे देशावरील राजांनीं कोंकणप्रांत वेळोवेळीं हाताखालीं घातलेला प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें पश्चिमेकडूनही शक, यवन, पोर्तुगीज, इंग्रज, हबशी वगैरे समुद्रापलीकडील परदेशस्थ लोकांनाहि हा प्रांत काबीज करण्याची आवश्यकता भासली आहे. ह्या प्रांताचें उत्पन्न विशेष नसून प्रत्येक महत्त्वाकांक्षी किंवा आकांक्षाहीन चक्रवर्ती राजाला तो आक्रमण करावा असें कां वाटावें ह्याचें अनेक इतिहासकारांना गूढ पडलेलें आहे. ह्या गूढाचें इंगित असें आहे कीं वास्तविक कोंकण म्हणून जो निरुपद्रवी प्रांत आहे त्याला सह्य पर्वताचें सान्निध्य आहे. ह्या पर्वताच्या दऱ्यांत व खोऱ्यांत देशावरील चक्रवर्ती राजांच्या अंमलाला कंटाळलेल्या उपद्व्यापी पुरुषांना हमेषा आश्रय मिळतो. तो नाहींसा करून आपली सत्ता निष्कंटक करण्याच्या इच्छेनें तीं दरीखोरीं ह्या सम्राटांना जिंकावीं लागतात, व तीं जिंकण्याच्या कामांत निरुपद्रवी व सालस अशा कोंकणप्रांतालाहि संगतिदोषाचें प्रायश्चित्त मिळतें. ह्या दऱ्याखोऱ्यांत आंगरवाडी म्हणून एक वाडी आहे. तेथूनच आंग्रे ह्यांची अर्वाचीन काळची मूळ पिढी उत्पन्न झाली म्हणून सांगतात.

६ आंग्रे यांची वंशावळ अशी आहे:—

- सेखोजी
  - तुकोजी
    - कान्होजी ( १६०२–१६५१ ) — बायका: १ लक्ष्मीबाई, २ गाहिनाबाई
      - १ सेखोजी ( १६५१–१६५५ )
      - २ संभाजी ( १६५५–१६५७ )
      - १ मानाजी ( १६५७–१६८० )
        - १ राघोजी ( १६८०–१७१५ ) — बायका: १ आनंदीबाई, २ नर्मदाबाई
          - १ मानाजी ( १७१५–१७२१ ) आणि ( १७३६–१७३९ )
            - सघोजी ( १७३९–१७६० ).
          - २ कान्होजी
          - ३ जयसिंग
        - २ महिमानजी
        - ३ चिमाजी
        - ४ हिरोजी
        - ५ धोंडजी
        - ६ तुकोजी
        - ७ कृष्णाजी
        - ८ रामाजी
        - ९ तुळाजी
        - १० सुभानजी
      - एसाजी
        - बाबूराव ( १७२२–१७३५ )
        - मैनाबाई
      - तुळाजी
      - धोंडजी

ही वंशावळ मजजवळील व इतर पत्रांतील उल्लेखांवरून रचिली आहे. कान्होजीला पांच मुलगे होते असें डफ. म्हणतो ( History, P. 231 ), तें अर्थात् चूक आह. प्रो. फॉरेस्ट यांनीं Selections from the Bombay Secretariat, Maratha Series, Vol. 1 ह्या पुस्तकाच्या ६६० पृष्ठावर आंग्र्यांची वंशावळ येणेंप्रमाणें दिली आहे:—




काव्येतिहाससंग्रहांतील ११९ व्या लेखांत येसाजी आंग्र्यानें मानाजीला व संभाजीला चिरंजीव म्हटलें आहे. ह्यावरून वरील वंशावळ सबंध चुकली आहे हें स्पष्टच होतें. शिवाय दवलतराव शिंद्याची आई मैनाबाई हिचा मुलगा संभाजी होय असें वंशावळींत दाखविलें आहे. तें इतकें गचाळ आहे कीं, त्यावर टीका करण्याची जरूर नाहीं. प्रो. फॉरेस्ट यांनीं दिलेल्या दुसऱ्या कित्येक वंशावळी अशाच अविश्वसनीय आहेत.

प्रो. फॉरेस्ट यांच्या ह्या पुस्तकांतील अस्सल पत्रांखेरीज बाकीचा एकूनएक भाग असाच कमजास्त अप्रमाण आहे. आंग्र्यांचें घराणें शकपाळ कुळींतील असून अस्सल मराठा आहे. कुलाबा गझेटियरांत आंग्र्यांचें मूळ आफ्रिकेंतील आहे असा खोडसाळ उल्लेख केला आहे; परंतु शहाण्णव कुळींत आंग्रे यांचें घराणें प्रसिद्ध असल्यामुळें ह्या उल्लेखाला यत्किंचित्‌ही मातबरी देतां येत नाहीं. शिवाय आंग्रे यांचे शरीरसंबंध भोंसले, शितोळे, दाभाडे, गायकवाड, थोरात, शिंदे, तिखोडे, बरगे, अलक, दिनकरराव, मोहिते वगैरे अस्सल मराठ्यांशीं झालेले असल्यामुळें गझेटियरकारांचें हें विधान सर्वस्वीं आगंतुक, अप्रमाण व निराधार आहे. शकपाळ हें आडनांव महाराष्ट्रांत फार प्रसिद्ध असून शिवाजीच्या एका पवाड्यांत ह्या नांवाचा उल्लेख केलेला आढळतो.

५ संभाजीच्या कारकीर्दींत कान्होजी आंग्रे फिरतें आरमार घेऊन कोंकण किनाऱ्याचा बंदोबस्त करीत होता, असा उल्लेख चेऊलच्या बखरींत सांपडतो. म्हणजे इ. स. १६८० पासून १६८९ पर्यंतच्या कालांत कान्होजी उदयास येत चालला होता असें दिसतें. १६८० पूर्वी कान्होजी शिवाजीच्या आरमारांत असला पाहिजे हें उघड आहे. संभाजीच्या वेळीं माणकोजी मराठे, उदाजी पडवळ, सुभानजी खराटे व भिवजी गुजर, खांदेरी, सागरगड, राजकोट व कुलाबा ह्या चार बंदरी किल्ल्यावर अंमलदार होते. बंदरी किल्ल्यावरील अंमलदार आरमारांतलि सरदार असलेच पाहिजेत. कान्होजी आंग्र्याकडे ह्यावेळीं कोणता बंदरी किल्ला होता तें समजत नाहीं.

१६८९ त संभाजीचा वध झाल्यावर कोंकणपट्टींतील बराच भाग अवरंगझेबाच्या ताब्यांत गेला; परंतु मराठ्यांकडेहि थोडाथोडका भाग राहिला असें नाहीं. १६८९ नंतर माणकोजी मराठे, उदाजी पडवळ व सुभानजी खराटे आपले अंमल सोडून प्रचळगडास गेले. त्यांच्या जागीं भिवजी गुजर व कान्होजी आंग्रे हे दोघे राहिले. मुख्य सत्ता उध्वस्त झाली असतां स्वतःच्या कर्तबगारीनें शत्रूला तोंड देणाऱ्या अनेक मराठा सरदारांपैकीं कान्होजी असल्यामुळें, त्याला उदयास येण्यास ही वेळ उत्तमोत्तम मिळाली. राजकोट, सागरगड व पाली ह्या स्थलीं मोंगलांचा अंमल बसला; व कुलाबा, खांदेरी व उंदेरी येथें मराठ्यांनीं आपला तळ दिला. दुतर्फा अंमल सुरू झाला. शके १६११ त लढाई होऊन व १६१३ त ह्या दोन्ही सत्ताधाऱ्यांमध्यें तह होऊन दुतर्फा अंमल कायम झाला. ह्या दुतर्फा अंमलासंबंधाचें भांडण म्हणजेच मराठे व शिद्दी यांच्यामधील भांडण होय. शिद्याला दिल्लीच्या पातशहाचें जोंपर्यंत पाठबळ होतें, तोंपर्यंत मराठ्यांना तो फारसा जुमानित नसे. इ. स. १७०० च्या पुढें दिल्लीच्या पातशहाचा जोर कमी कमी होत गेला व शिद्दी कोंकणपट्टींत एकटाच राहिला. तेव्हांपासून शिद्याची सत्ता क्षीण होत होत १७३७ त तीं अर्धमेली झाली व १७५९ त केवळ धुगधुगी धरून राहिली. १६९८ त कान्होजी आंग्र्याचें व शिद्याचें मोठें कडाक्याचें युद्ध झालें. त्यापुढें १७१३ पर्यंत विशेष कांहीं नमूद करून ठेविण्यासारखें कोठें लिहिलेलें आढळत नाहीं. १७१३ पर्यंत आंग्रे ताराबाईच्या पक्षाला चिकटून होता. परंतु शिद्याशीं युद्ध सुरू झाल्यावर शाहूच्या पक्षाला येऊन मिळणें त्याला सोईचें दिसलें. पुढें आंग्र्यांचा व शिद्द्याचा १७१५ त बाळाजी विश्वनाथानें तह करून दिला. १७१४ तील शाहूशीं तह व १७१५ तील शिद्यांशीं तह यांचीं कलमें दुसऱ्या खंडांत दिलीं आहेत. तेव्हां त्यांची येथें पुनरुक्ति करीत नाहीं. १७१५ त वसईपासून सावंतवाडीपर्यंत पूर्ण स्वतंत्र किंवा अंशतः परतंत्र असे अधिकारी येणेंप्रमाणें होते. ( १ ) वसई, ठाणें व चेऊल या प्रांतांत पोर्तुगिज लोक; ( २ ) मुंबईस इंग्रज लोक; (३) जंजिऱ्यास हवशी; ( ४ ) अलीबागेस आंग्रे; ( ५ ) सावंतवाडीस सावंत; ( ६ ) मालवणापासून पन्हाळ्यापर्यंतच्या प्रदेशांत कोल्हापूरकर; ( ७ ) व गोंव्यास पोर्तुगिज. आंग्र्यांच्या व्यतिरिक्त स्वतंत्र असे ५ सत्ताधारी ह्यावेळीं कोंकणांतील निरनिराळ्या भागांत असल्यामुळें, शाहूराजाच्या वतीनें आंग्र्यास वेळोवेळीं ह्या पांच लोकांशीं युद्धप्रसंग पडत. त्यांतल्या

त्यांत, पोर्तुगीज, इंग्रज व शिद्दी ह्यांच्याशीं आंग्र्यांचा संबंध विशेष येई. १७१७ त इंग्रजांचें सक्सेस नांवाचें मोठें तारूं आंग्र्यानें धरिलें, व मुंबईकर इंग्रजांना तो अपमान निमूटपणें सहन करावा लागला. कोंकणच्या किनाऱ्यावर मराठ्यांचा पूर्ण हक्क व अधिकार असल्यामुळें त्या किनाऱ्याच्या लगतच्या पाण्यांत परदेशचीं जीं जीं तारवें गैरपरवाना येत, तीं तीं आंग्र्यांना धरून ठेवणें भाग पडे. हा कायदेशीर हक्क बजावण्याच्या कामांत कान्होजी आंग्रे फार दक्ष असल्यामुळें मुंबईच्या इंग्रजांचा व साष्टींतील पोर्तुगीजांचा त्याच्यावर विशेष लोभ नसे. शाहू राजाच्या वतीनें कोंकणकिनारा व्यवस्थित ठेवण्याबद्दल कान्होजी आंग्रे इतर सरंजामी सरदारांप्रमाणें छत्रपतींना पेशकश दरवर्षी देत असे. बाळाजी विश्वनाथाच्या सरंजामी पद्धतींत कान्होजी आंग्रे आल्यामुळें त्यांचें परराष्ट्रापासून निवारण व स्वराष्ट्रांत अंतर्भाव मोठा नामी झाला होता. परंतु ही सुरक्षितता कान्हाजाला मनापासून आवडत होती असें दिसत नाहीं. शाहूराजाच्या व पेशव्यांच्या आज्ञा न जुमानण्याकडे कान्होजीची प्रवृत्ति असे, तत्रापि छत्रपतींना व पेशव्यांना वरकरणी तरी तो चिकटून असे. छत्रपतींना धरून राहिलें असतां केवढा फायदा होतो हें, १७१५ त बाळाजी विश्वनाथाच्या साहाय्यानें त्यानें शिद्याला बहुतेक नष्ट केलें, त्यावेळीं त्याच्या चांगलें प्रचीतीस आलें. छत्रपतींनाहि आंग्र्यांचा उपयोग थोडाथोडका होत नसे. पोर्तुगीज, इंग्रज, डच वगैरे दर्यावर्दी लोकांना तोंड देण्यास कान्होजीची सदा तयारी असे. १७१७ त इंग्रजांनीं विजयदुर्ग घेण्याचा प्रयत्न केला. तो हाणून पाडून इंग्रजांचें सक्सेस हें गलबत कान्होजीनें मारिलें. १७१९ त खांदेरीवर इंग्रजांनीं हल्ला केला. तेथेंहि कान्होजीनें त्यांना यथास्थित चोप दिला. १७२० त इंग्रज व पोर्तुगीज ह्या दोघांनीं मिळून कान्होजीची विजयदुर्गाजवळ पाण्यांत गांठ घेतली. परंतु कांहीं गलबतें जाळून टाकण्यापलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं. ग्रांटडफनें आपल्या इतिहासाच्या १२ व्या भागांत छापिलेलें पत्र ह्या विजयदुर्गाजवळील लढाईला अनुलक्षून आहे. हें पत्र देतांना डफ कान्होजीला चांचा म्हणून नांवें ठेवितो; परंतु हा दोष सर्वथैव अवास्तव आहे. राष्ट्राराष्ट्रांत लढाई सुरू असल्यावर, आपलीं गलबतें शत्रूच्या हातांत गेलीं किंवा शत्रूनें आपलें नुकसान केलें म्हणून चरफडून त्याला चांचा म्हणणें केव्हांहि गैरशिस्तच आहे. १७२२ त इंग्रजांनीं कुलाब्यावर हल्ला केला; परंतु तेथेंहि त्यांना विजयदुर्गीचाच अनुभव आला. १७२४ त कान्होजीनें विजयदुर्गास डच लोकांचीहि अशीच राळ उडवून दिली. १७२७ त इंग्रजांचें डार्बी नांवाचें गलबत कान्होजीनें गारद केलें. कान्होजीचा हा तडाका असा एकसारखा हमेष चालला होता. कान्होजीच्या पुढें बाहेरच्या लोकांची कोंकणच्या किनाऱ्यावरील बंदरांकडे किंवा किल्ल्यांकडे नुसती बघण्याची देखील छाती नव्हती. इंग्रज, डच, पोर्तुगीज, हबशी, शामल, ह्या सर्वांना वचकांत ठेवणारा पुरुष मोठा दर्यावर्दी योद्धा समजला पाहिजे. छत्रपतींच्या आश्रयास असल्यामुळें, इतर शत्रूंपासून भीतीचें कारण न राहून, कान्होजीला हा वेळपर्यंत दर्यांतील आगंतुकांची विचारपूस निर्भीडपणें करतां आली. कान्होजीनें व कान्होजीच्या चिरंजीवांनीं छत्रपतींचा आश्रय असाच एकनिष्ठपणें चालविला असता, तर दर्या-

किनाऱ्यावर मराठ्यांचें नांव असेंच विजयी रहातें. परंतु दुर्दैवानें कान्होजींच्या व त्याच्या संततीच्या हातून छत्रपतींचें व त्यांच्या सरदारांचें सूत्र नीट राखण्याचें काम शिस्तवार न झाल्यामुळें व छत्रपतींच्या सरदारांकडून व महापुरुषांकडूनहि आंग्र्यांचें वर्तन ज्या रीतीनें सुधरवून घेतलें पाहिजे होतें त्या रीतीनें न घेतल्यामुळें, आंग्र्यांचा, सरदारांचा व छत्रपतींचा क्षय झाला. हा प्रकार कसा झाला, त्याचें निवेदन पुढील कथाभागांत केलें आहे.

६ १७२६ च्या एप्रिलांत शामळानें निजामुन्मुलुखाच्या चिथावणीवरून पालगडा खाली येऊन दंगा केला. ( शाहू महाराजांची रोजनिशी पृ. ७. ) निजामुन्मुलुखाचें व मराठ्यांचें ह्यावेळीं युद्ध सुरू झाल्यामुळें निजामाच्या हुकुमाबरहुकूम शामळानें कोंकणांत दंगा आरंभिला. निजामुन्मुलूख दिल्लीच्या पादशहाच्या विरुद्ध असल्याकारणानें व शामळ दिल्लीच्या पातशहाचा नोकर असल्याकारणानें शामळाचें हें कृत्य अगदीं गैरशिस्त होतें. दिल्लीच्या पातशहाचे हुकूम अमलांत आणण्याचा पत्कर बाळाजी विश्वनाथानें १७१९ त घेतल्यामुळें शामळाचा हा गैरशिस्त दंगा हटविणें मराठ्यांस प्राप्त झालें. नियमाप्रमाणें दंगा हटविण्याचें काम शाहूनें कान्होजी आंग्र्यास सांगितलें. आपापल्या प्रांतांतील दंग्याधोप्याचें निवारण सरंजामी सरदारांनीं होतां होईल तों आपलें आपण करावें व शत्रू आपल्या शक्तीच्या अतोनात बाहेर आहे असें वाटल्यास हुजुरून सैन्याची मागणी करावी, असा शिरस्ता बाळाजी विश्वनाथानें घालून दिलेल्या सरंजामी पद्धतीच्या कलमांत नमूद होता. ह्या कलमान्वयें कान्होजीनें हबशांचा दंगा मोडून काढला पाहिजे होता. परंतु आपल्या एकट्याच्यानें तें काम होणें शक्य नाहीं; हुजुरून सैन्य पाठवून द्यावें, असा मसुदा कान्होजीनें शाहूस लिहून पाठविला. ( रोजनिशी पृष्ठ ६१. ) दसरा झाल्यावर म्हणजे १७२६ च्या सप्टेंबर-आक्टोबरानंतर हुजुरून सैन्य पाठवून देऊं, तोंपर्यंत स्वामींचीं स्थळें रक्षावीं, असें उत्तर शाहू महाराजांनीं वरील मसुद्यास दिलें. स्वामींचीं स्थळें स्वामींनीं रक्षावीं. व आपल्यास ह्या मामलयापासून मुक्त करावें, असेंहि कान्होजीनें शाहूस विशदर्थे म्हणजे स्पष्ट लिहून पाठविलें होतें. ज्याअर्थी स्थळें स्वामींचीं आहेत त्याअर्थी साहित्यहि स्वामींसच करणें जरूर आहे, हा मुद्दा मान्य करून, कोंकण प्रांताचें संरक्षण कांहीं काळपर्यंत करावें अशी शाहूनें कान्होजीस आग्रहपूर्वक विनंती केली व खमस व सीत दुसाला चोवीस हजार रुपये कान्होजीकडे येणें राहिले होते ते ताबडतोब पाठवून देण्यास हुकूम सोडला. रुपये पाठविण्याचा हुकूम आमलांत आणण्याचें तहकूब करून कान्होजीनें कोंकण प्रांताचें संरक्षण करण्याची विनंती मात्र मान्य केली व हबशांशीं लढण्याचा उपक्रम जारीनें हातीं घेतला. हबशांच्या व आंग्र्यांच्या जागोजाग चकमक्या बसल्या व एकमेकांचीं गांवें लुटण्याचा दोघांनीं धूमधडाका चालविला. ह्या लढाईत हबशाला इंग्रज सामील असल्यामुळें इंग्रजांच्याहि गलबतांवर कान्होजीची दृष्टि होतीच. १७२६ तील ही लढाई ऐन रंगात कोठें येते न येते तों मध्यंतरीं एक चमत्कारिक उपाख्यान घडून आलें. १७२६ च्या सप्टेंबरांत पावसाळा संपल्यानंतर ब्रह्मेंद्रस्वामी कर्नाटकांत भिक्षार्थ स्वारीस निघाला. जातांना हबशानें सावनूरच्या नबाबाकडून आपला एक हत्ती

प्रांतोप्रांतींच्या राजांच्या तडाक्यांतून संभाळून घेऊन येण्यास स्वामीला विनंति केली. शिरस्त्या-प्रमाणें ही विनंति ब्रह्मेंद्रानें मान्य केली. अशी दहा पांच फालतू कामें बगलेंत घालून बाहेर पडण्याची स्वामीला जन्माची खोडच होती. लग्नें, मुंजी, जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे बाबी ठरविण्यांत, विकण्यांत व विकत घेण्यांत आपला हातखंडा आहे, अशी स्वामीला घमेंड असे. आपल्याला कोणी फसवूं शकणार नाहीं असाहि स्वामीचा बाणा असे. हातीं घेतलेल्या कामांत आपल्याआड येण्याचें कोणास सामर्थ्य नाही, अशीहि अहंता स्वामीच्या ठायीं वसत होती. ह्या अहंतेच्या भरांत दंग होऊन स्वामी कर्नाटकांत दिग्विजय करण्यास व हबशांचा हत्ती घेऊन येण्यास निघाला. प्रांतोप्रांतींच्या सरकारांची दस्तकें घेतल्यास हत्ती सुरक्षित आणितां येईल अशी सल्ला हबशानें दिली. “ परंतु तुमचे काय हत्ती असतील ते समागमें येतील, कोणाचें दस्तकाचें प्रयोजन नाहीं. ” असें स्वामीनें हबशास फुशारकीचें उत्तर दिलें. ( चरित्र पृष्ठ १४ ). सामान्य कायदे सामान्य माणसास लागू, आपल्यासारख्या अलौकिक महापुरुषास कायद्यांचें बिलकुल बंधन नाहीं, असें ध्वनित करण्याचा परमहंसांचा मनोदय होता. शत्रू असो, मित्र असो, यवन असो, मराठा असो, इंग्रज असो, किंवा पोर्तुगीज असो, वाटेल त्यांचीं कामें, लढाई असो अगर नसो, करावयाची असा स्वामीचा बेगुमान स्वभाव असे. हबशांशीं लढाई चालली असतांना आंग्र्यांची परवानगी विचारल्यावांचून, यवनाचा हत्ती सुरक्षित आणण्याचा उद्योग कितपत यशस्कर होईल ह्याची स्वामीस बिलकुल शंका नव्हती. १७२६ च्या हिंवाळ्यांत कर्नाटकांत भिक्षा मागून १७२७ च्या प्रारंभीं स्वामी हत्तीसमागमें कोंकणांत उतरले व कांहीं लोकांबरोबर हबशांचा हत्ती हबशांकडे दस्तकावांचून मार्गस्थ करते झाले. माखजनच्या मेटापर्यंत हत्ती सुरक्षित आला. परंतु त्या मेटावर कान्होजी आंग्र्याची चौकी होती तेथें हत्तीला मज्जाव झाला. विशाळगडच्या घांटावर हत्तीला येतांना अटकाव झालाच होता. परंतु स्वामींच्या शिफारशविरून किल्लेदारानें हत्ती पुढें जाऊं दिला. परंतु हत्ती हबशांचा आहे व त्याला दस्तक नाहीं असें कळल्याबरोबर, माखजनच्या मेटावरील आंग्र्यांच्या चौकीदारांनीं हत्ती पकडून ठेविला. इतक्यांत, जवळच हबशांचे चौकीदार होते त्यांस बातमी लागून ते हत्तीचा कबजा घेण्यास आले. आंग्र्यांच्या लोकांची व हबशांच्या लोकांची लढाई झाली. हबशांचे लोकांनीं माघार खाल्ली व हत्ती जयगडच्या किल्ल्यांतील आंग्र्यांच्या सैनिकांनीं आपल्याबरोबर नेला. ही बातमी सिद्दीसातास गोवळकोटास कळली. स्वामीनें आपला हत्ती आंग्र्यांच्या हातीं कांहीं-तरी निमित्त करून जाऊं दिला अशी भलतीच कल्पना करून घेऊन त्या बेहोष यवनानें एक चमत्कारिक प्रयोग केला. गेलेला माल वकिलाच्या मार्फत यादी पाठवून परत आणण्याचा, किंवा लढाई संपेतोंपर्यंत वाट पाहण्याचा, किंवा शत्रूला लढाई देऊन आपला हत्ती पकडण्याचा साधा व सरळ मार्ग सोडून सिद्दीसातानें ब्रह्मेंद्रस्वामीचें परशरामचें गांव व देवालय लुटून फस्त केलें आणि गांवांतील व देवळांतील बायकामाणसांची अब्रू घेतली. हा दुर्घट प्रसंग १७२७ च्या फेब्रुवारींत शिवरात्रीस झाला ( खंड ३, लेखांक १ ). ह्या यवनी प्रयोगाची दुर्वार्ता व हत्ती नेल्याची बातमी ब्रह्मेंद्रास बहुतेक एकदमच कळली;

आंग्र्यानें हत्ती नेला व सिद्दयानें गांव लुटलें, हा दुहेरी घात स्वामीच्या हृदयाला दुभंग करता झाला. बिगरपरवाना हत्ती आणिला म्हणून आंग्रे रागावणार व तो गमावला म्हणून स्वामीच्या नांवानें सिद्दी हाका मारणार अशा विवंचनेंत ब्रह्मेंद्र पडला. ह्या बाहेरच्या विवंचनांहूनहि महत्तर अशी जी देवालयोद्ध्वंसनाची घरचीं विवंचना, तिनें तर स्वामीच्या काळजाचा भेदच केला. एका चुकीचा, एका घमेंडीचा, एक दस्तक न नेल्याचा हा सर्व खेळ झाला ! सर्व अनर्थ कान्होजीनें केला. हवशांचा हत्ती आणावयास सावनुरास जावें किंवा न जावें ह्याची रवा ब्रह्मेंद्रानें जर आधींच कान्होजीला विचारली असती, तर हें तिहेरी संकट कशास ओढवतें ? परंतु होणाराला उपाय काय ? शेवटीं ओढवलेल्या प्रसंगाची परीक्षा करतां स्वामीस एक रामबाण उपाय सुचला. स्वामीनें आपल्या झोळींतून शिव्यांचें व शापांचें अमोघ अस्त्र काढिलें. " हत्ती सोडून देणें, नाहींतर तुझें कल्याण होणार नाहीं. " असा शापसंवलित मसुदा ब्रह्मेंद्रानें कान्होबाकडे पाठविला. झाली मजा येवढी बस झाली असा विचार करून व स्वामीच्या मसुद्याचा आदर करून, हत्ती बेदिक्कत सोडून देणें म्हणून सरखेलांनीं हुकूम सोडिला. हवशांचा हत्ती स्वामीनें हवशांकडे पाठविला. जंजिरेकर हवशी याला सिद्दीसाताचें हें दुष्कृत्य कळतांच त्यानें त्याला नशेदपत्र पाठवून स्वामींची जिनगी स्वामीकडे पाठवून देण्यास सांगितलें. यद्यपि स्वामींची चजिवस्त स्वामीला मिळाली, तत्रापि देवस्थानाचा जो उद्ध्वंस झाला होता तो कांहीं कोणत्याहि उपायानें नीट होण्यासारखा नव्हता. तशांत सिद्दीसातानें स्वामींवर अनेक बालांटें घेतलीं ( पारसनीसकृत चरित्र, पृ. २६ टीप ). जंजिरेकर हवशांचें सिद्दीसात ऐकत नाहीं, स्वतः सिद्दीसात आपल्यावर तुफानें घेतो, व कान्होजी आंग्रा आपली मस्करी करतो, अशा त्रिविध अडचणींत स्वामी ह्या वेळीं सांपडला. सर्व लोकांनीं आपल्याला मान द्यावा, ही जी स्वामीची मनापासूनची इच्छा, तिचा ह्या वेळीं सर्वस्वीं भंग झाला. राजपुरीकरखानानें हुजूर मुलाखतीस आल्यास स्वामीस दोन गांवें इनाम देण्याचें अभिवचन दिलें. खानाच्या ह्या बोलण्यावर स्वामीचा विश्वास बसेना व खानाच्या भेटीस जाण्याचें त्याला अनुकूल पडेना. याकुतखान व सिद्दीसात ह्यांच्यावरील स्वामीचा विश्वास उडाल्यामुळें, त्याच्या प्रांतांतील परशराम ह्या गांवीं रहाणें स्वामीस शहाणपणाचें वाटेना. कान्होजीसारख्या थट्टेखोर व पाताळयंत्री माणसावर तर स्वामीचा विश्वास बिलकूल बसेना. तेव्हां यवनांसारख्या बोलून चालून दुष्ट माणसांच्या व कान्होजीसारख्या आंतल्या गांठीच्या मतलबी मराठ्याच्या सहवासांत आपल्यासारख्या सीध्या व साध्या माणसाचा बोज रहाणार नाहीं, अशी पक्की खात्री होऊन स्वामीनें कोंकणत्याग करून वरघांटीं जाण्याचा विचार केला. हा विचार कान्होजीस कळतांच, स्वामीस भिवविण्याची त्यानें एक नवीनच शकल काढिली. कान्होजीनें स्वामीस वरघांटीं न जाण्याची शपथ घातली ( खंड ३, लेखांक १८० ). शाप, शिव्या, शपथा, मंत्र, तंत्र, भुतें, खेतें, ह्यांचा प्रभाव स्वामीच्या मनावर अतिशय असल्यामुळें, वरघांटीं जाण्याचा विचार स्वामीस कांहीं दिवस तहकूब ठेवावा लागला. परंतु आपल्याला कोंकणांत ठेऊन घेण्यांत

कान्होजीचा कांहींतरी अंतस्थ मतलब असावा, अशी स्वामीस भीति पडली. दिवसेंदिवस ह्या भीतीचा पगडा अनिवार होऊन " गोठण्याहून स्वार होऊन स्वामी सावंतवाडी व गोवें ह्या प्रांताकडे गेले ( खंड ३, लेखांक १७६ )." वरघांटी न जाण्याची कान्होजीची शपथ सुटली नसल्यामुळें, त्यानें कर्नाटकांत गुर्त्ताकडे जाण्याचा बहाणा केला. कोणीकडून तरी कोंकणपट्टीच्या बाहेर होतां होईल तों लवकर पडण्याचा स्वामीचा मनोदय होता. कोंकणांतील दुष्टांचा व धूर्तांचा सहवास क्षणभरहि न व्हावा हा त्यांचा मुख्य विचार होता. तदनुरूप गोव्याहून तो कोल्हापुरास गेला, तों वाटेंतील दगदर्गानें त्याला ज्वराची व्यथा झाली, ( खंड ३, लेखांक १७५ ). कर्नाटकांत जाण्याचा रोख सोडून देण्यास ही सबब समर्पक आहे, असें पाहून, त्यानें पालीवरून धावडशीचा रस्ता धरला. शपथेला भीक न घालतां स्वामी कांहीं तरी बहाणा करून वरघांटीं जाणार हें कळून चुकल्याबरोबर कान्होजीनें आपण घातलेली आण मोकळी केली. [ खंड ३, लेखांक १८० ]. येणेंप्रमाणें शपथेच्या कचाटींतून सुटल्यावर स्वामी धावडशीस येऊन सुखरूप पोहोंचला. तेथें त्याची व शाहू महाराजांची गांठ पडली. कोंकणांत झालेली सर्व हकीकत त्यानें शाहूला इत्थंभूत सांगितली, व कान्होजीला छत्रपतींच्या भेटीचें साद्यंत वर्णन लिहून पाठविलें. शाहूनें आपली भेट किती मर्यादेनें व निष्ठेनें घेतली, ती हकीकत लिहून कान्होजीला दरडाविण्याचा स्वामीचा बेत होता. स्वामीच्या ह्या लिहिण्याचा अर्थ कान्होजी समजला व ' जो कोणी स्वामीस न मानी, तोच अविवेकी आहे, ' असें वरकांतीं नम्रतापूर्वक उत्तर त्यानें त्यास पाठविलें. जंजिऱ्याचा हबशी अविवेकी, स्वामीला न मानणारा आहे, व आपण स्वतः स्वामीचे एकनिष्ठ सच्छिष्य आहों, असा हें पत्र लिहिण्यांत कान्होजीचा मनोदय होता. 'स्वामींनी ते प्रांतीं जाऊन, सर्व जनांचा उद्धार करून पुन्हां आगमनाचाहि अविलंबेंच विचार केला पाहिजे,' असें स्तवन करून कान्होजीनें स्वामीस अगत्यपूर्वक गोंजारण्याचा प्रयत्न केला; परंतु ह्या गोंजारण्यानें स्वामीच्या हृदयांत मार्दवाचा प्रादुर्भाव न होतां कठोरपणाचाच उद्गम विशेष झाला. हत्तीमुळें पंचवीस हजार रुपयांची चीजवस्त गेली, तुमच्याकडील व्याजाचा हिशेब येणेंच आहे, वगैरे दुःखाच्या गोष्टी लिहिण्याचा आविर्भाव करून गेल्या दोन महिन्यांतील गोष्टी आपण विसरलों नाहीं, व आपण आमचे कर्जदार आहां, हा अर्थ स्वामीनें कान्होजीस पर्यायानें लिहिला [ खंड ३, लेखांक १७९ ]. ह्या अर्थाच्या मननानें नरम होण्याचें एकीकडेच ठेवून कान्होजीनें स्वामीची थट्टाच आरंभिली. ' स्वामी तो परमहंस, सुखदुःखातीत, फलाण्यामुळें फलाणें झालें, हत्तीमुळें फलाणें गेलें, हा मोघ मनुष्यास न व्हावा यास्तव श्रुतिस्मृति प्रवर्तल्या, कोणाचें काय गेलें, व कोणी नेलें, ' असा शास्त्रार्थ सांगून कान्होजीनें स्वामीची निर्भर्त्सना केली. ' भटांस दिली वोसरी, तों भट हातपाय पसरी ' असेंही मर्मभेदक वाक्य कान्होजीनें स्वामीला लिहिलें. स्वामीचें प्रस्थ दहा वीस वर्षे कोंकणांत माजूं दिल्यानें स्वामी आपल्याला जुमानीनासा झाला, व दस्तकावांचून शत्रूचा माल प्रांतांतून नेऊं लागला, हा स्वामीचा अत्याचार आहे, असें ध्वनित करण्याचा कान्होजीचा हेतु होता. कान्होजीचा हेतु नीट ध्यानांत न आल्यामुळें, व

हत्तीच्या ह्या प्रकरणाची हास्यप्रचुर हकीकत यथास्थित उलगडतां न आल्यामुळें, कान्होजीचें हें पत्र माथ्या विनोदाचें असावें, असा रा. पारसनीस यांस भास झाला ( पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, पृष्ठ ३३, टीप ). अंगीं विशेष कर्तृत्वशक्ति, राजकारणकौशल व सारासार विचार नसणारीं माणसें जेव्हां कार्यकर्त्या पुरुषांच्या राजकारणांत लुडबुड करूं पहातात, तेव्हां त्यांच्या पदरांत जशास तशी संभवना पडल्यास त्याबद्दल यमनियमादि अष्टांगसिद्धि झालेल्या परमहंसांनीं, कान्होजीच्या म्हणण्याप्रमाणें, खरोखरीच खेद मानून घेऊं नये. परंतु हत्तीमुळें झालेल्या नुकसानीबद्दल, दिलेल्या कर्जाबद्दल व हत्तीमुळें झालेल्या अपमानाबद्दल स्वामीला आमृत्यु किती वाईट वाटत होतें, ह्याचे दाखले स्वामींच्या अनेक पत्रांतून आहेत. [ खंड ३, लेखांक २९४, २९६, २९७, ३००, ३३९; पारसनीसकृत ब्र. लेखांक ३१५, ३२२, ३२८, वगैरे ]. हा शोक ब्रह्मेंद्रानें स्वीकारिलेल्या वृत्तीला अगदीं विसंगत होता.

७. हें हत्तीचें प्रकरण १७२७ च्या फेब्रुवारींत घडलें. स्वामी १७२८ च्या मार्चांत धावडशीस जो आला तो बहुतेक कायमचा आला. ह्यापूर्वी बरींच वर्षे स्वामी धावडशीस येऊनजाऊन होता. १७१७ च्या जानेवारींत व १७१६ च्या हिंवाळ्यांत स्वामी देशावर होता. ( पा. ब्र. लेखांक ११४ ). १७२१ पासून १७२५ पर्यंत बहुतेक प्रत्येक वर्षी स्वामी देशावर येत असे ( खंड ३, लेखांक १७, १८ ). लिंब येथलि विहिरीचें काम १७२१ पासून १७२५पर्यंत चाललें असतांना विरुबाईनें ब्रह्मेंद्रापाशीं पाथरवटांची मागणी केलेली आहे. १७१६ त देशावर आल्यावर बाळाजी विश्वनाथानें ब्रह्मेंद्रास पिंपरी हें गांव इनाम दिलें; ब्रह्मेंद्र स्वामींच्या बखरींत पिंपरी हें गांव बाळाजी विश्वनाथानें ब्रह्मेंद्रास सन सीत अशरीनांत दिलें म्हणून जें म्हटलें आहे, (ब्र. ब. पृ. १३) तें चूक आहे. सीत अशरीन ह्या अक्षरांबद्दल सीत अशर अशीं अक्षरें हवीं आहेत. सीत अशर सालांत म्हणजे १७१६ च्या हिंवाळ्यांत ब्रह्मेंद्र वरघाटीं आला होता हें पारसनीसकृत ब्रह्मेंद्र स्वामींच्या पत्रव्यवहारांतील लेखांक ११४ व टीप ह्यावरून उघड आहे. येसशेट सोनारानें ४१ मोहरांची पारख सबा अशरच्या १८ जमादिलाखरीं म्हणजे १७१७ च्या एप्रिलांत केली. ह्या ४१ मोहरांचा हवाला बाजीरावानें वाडीच्या म्हणजे नरसोबाच्या वाडीच्या मुक्कामीं बाळाजी विश्वनाथापासून घेतला. बाळाजी विश्वनाथ त्यावेळीं कोल्हापूरकरांच्या विरुद्ध त्या प्रांतीं लढत होता. तेथें ब्रह्मेंद्राची व त्याची गांठ पडून ब्रह्मेंद्रानें आपली भिक्षा वाडीस बाळाजी विश्वनाथाच्या स्वाधीन केली. ११४ पत्राच्या टीपेंत रा. पारसनीस सबा अशरीन ज्यास म्हणतात, तें खरोखर सबा अशर साल होय. तसेंच सीत अशरीनांतील तांकीदपत्रांवरून पिंपरी हें गांव त्याच समयास स्वामीस मिळालें, अशी पारसनीसांची समजूत आहे. ( पा. ब्र. च. पृ. १८ ). परंतु ती सर्वस्वीं चुकीची आहे. शिवाय सीत अशरीनचा २९ मोहरम व राजशक ५२ ची भाद्रपद बहुल १३ पारसनीस म्हणतात त्याप्रमाणें इ. सन १७२६ त पडत नसून १७२५ च्या २८ सप्टेंबर व २६ आगष्ट ह्या तारखांस प्रत्येकीं पडते. बाळाजी विश्वनाथाकडून पिंपरी गांव मिळाल्या-

नंतर १७२१ त शाहूनें स्वामीस धावडशी गांव इनाम दिलें. तेथें असतांना विरुबाईनें ब्रह्मेंद्रापाशीं पाथरवट मागितले ( खंड ३, लेखांक १७, १८ ). १७२८ च्या मार्चांत धावडशीस आल्यावर स्वामीनें आपलीं दुःखें शाहू महाराजांस सांगितलीं. शिवाय स्वामींच्या संकटांचा वृत्तांत बाजीरावास परस्परें कळलाच होता. ( पा. ब्र. च. पृ. ३० ) आपल्या परमपूज्य गुरूचीं गाऱ्हाणीं ऐकून त्यांचा परिहार करण्याची इच्छा दोघांची होती. परंतु कान्होजी जिवंत असे तोंपर्यंत आंग्र्याला तंबी पोहोंचण्याचा संभव फारच थोडा होता. स्वामीचा छल आंग्र्यानें इतका दुरून, अप्रत्यक्ष रीतीनें व चतुराईनें केला होता कीं, त्याला राजरोस रीतीनें नांवें ठेवण्यास बिलकूल जागा नव्हती. स्वामीजवळ परवाना नसल्या-मुळें हत्ती अडकावून ठेवणें लढाईच्या नियमांना सर्वस्वीं अनुसरूनच होतें. आपला हत्ती आंग्र्यानें अडविला म्हणून स्वामींच्या देवालयाची व गांवाची राखरांगोळी करणें मात्र हबशाला केव्हांहि शोभण्यासारखें नव्हतें. हिंदूंच्या धर्माची व त्यांच्या धर्मगुरूची अशी मानखंडणा शाहू महाराजासारख्या राजाला व बाजीरावासारख्या लढवय्याला बिलकूल खप-ण्यासारखी नव्हती. तेव्हां हबशाशीं लढाई करून गोब्राह्मणांचा प्रतिपाल करण्यास शाहूला व बाजीरावांला ही सबब उत्तम सांपडली. अर्थात् १७२६ त जें युद्ध सुरूं झालें होतें, तें १७२८ त शाहूनें तसेंच चालू ठेविलें. इकडे ब्रम्हेंद्रस्वामी १७२७ च्या पाव-साळ्यांत समाधिप्रीत्यर्थ कोंकणांत उतरला. तेथें सिद्दीसात याणें स्वामीच्या गांवांत अतोनात उपद्रव चालविला होता ( पा. ब्र. च. पृ. २७ ). तो सहन न होऊन स्वामीनें आपली चीजवस्त व कारकून मंडळी देशावर पाठवून दिली व आपण स्वतः पुढें कांहीं महिन्यांनीं घांटावर आला. १७२८ च्या पावसाळ्यांत समाधीस कोंकणांत जाऊन पुन्हां स्वामी लवकरच देशावर आला. १७२९ च्या जूनांतही स्वामी कोंकणांत गेला होता. त्यावेळीं स्वामीची व कान्होजीची शेवटची गांठ पडली. १७२६ त ज्या पालगडाखालीं हबशाशीं युद्ध सुरूं झालें, तो पालगड १७२९ त मरतां मरतां कान्होजीस प्राप्त झाला. ( पा. ब्र. ले. ३२८ ). हा किल्ला कान्होजीस आपल्या आशीरवादानें मिळाला अशी ब्रह्मेंद्रानें आपली समजूत करून घेतली. आशीरवादाव्यातिरिक्त वाचिक मदतीखेरीज किल्ला मिळवून देण्याच्या कामीं इतर कोणतीहि मदत स्वामीनें केल्याचें दिसत नाहीं. उलट शाहू महाराज व बाजीराव पेशवे ह्यांच्या मनांत आंग्र्याविषयीं विकल्प भरवून देण्याची मात्र खटपट परमहंसांनीं केली होती हें स्पष्ट आहे. १७२९ तील जूनांत ब्रह्में-द्राची व कान्होजीची जी भेट झाली, तींत स्वामीच्या कर्जाचा हवाला कान्होजीनें जय-सिंग आंग्र्यावर म्हणजे सेखोजी आंग्र्यावर दिला ( खंड ३, लेखांक २९४ ). सेखोजी आंग्रे, हा सरदार आपल्या बापाप्रमाणेंच शूर असून कर्तृत्वाची आवडहि त्याच्या अंगीं सामान्य नव्हती. भारदस्तपणा व शालीनता हे दोन गुण सेखोजीच्या ठायीं विशेष होते. सेखोजीचा सख्खा भाऊ संभाजी हा जातीचा हूड असून, वडिलांशीं भक्तिहीन, बरोबरी-च्यांशीं तुसड व कनिष्ठांशीं मगरूर रहाण्यांत त्याला विशेष गोडी वाटत असे. कान्हो-जीच्या मरणोत्तर सेखोजीस सरखेली मिळाली. ह्याचें वैषम्य वाटून संभाजी रुसून सुवर्ण-

दुर्गास निघून गेला. ही बातमी ब्रह्मेंद्रास कळल्याबरोबर त्यांनें आपल्या कपटनाटकास सुरवात केली. दोघांचेंही गोमटें व्हावें, चांगलें व्हावें, अशी आपली इच्छा आहे, असें सेखोजीस लिहून, संभाजीच्या मनांत सखोजीविषयीं वांकडें भरविण्याचा स्वामीनें प्रयत्न केला. १७२९ च्या जुलईंत कान्होजी वारल्यावर, मोगलांशीं व शामळांशीं लढाई सुरू असतां, कोल्हापूरच्या संभाजीवर शाहूनें १७२९ च्या हिंवाळ्यांत स्वारी केली व सेखोजीस पन्हाळ्याखालीं ( शाहू महाराजांची रोजनिशी, रकाना ४२ ) आणि संभाजीस विशाळगडाखालीं चौक्या बसविण्यास सांगितलें ( रोजनिशी, रकाना, ४७ ). महाराजांचा हुकूम दोघांनीही अंमलांत आणिला. परंतु शाहूराजाचा हुकूम अंमलांत आणतांना, सेखोजी व संभाजी हे दोघे बंधू एकजुटीनें न वागतां विभक्तपणें आपापली कामगिरी बजावीत आहेत असें ब्रह्मेंद्रासारख्या बारीक पहाणाऱ्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. सेखोजीला सरखेल हा किताब होता, ह्यांचें वैषम्य वाटून संभाजीनें आपल्या नांवाचा एक नवीन शिक्का काढिला. अंतस्थ व बहिस्थ शत्रूंना जिंकून आपला उत्तरोत्तर उत्कर्ष होत जाणार अशा अर्थाचा हा शिक्का होता. नवीन शिक्का काढण्याची ही बुद्धि संभाजीला ब्रह्मेंद्रस्वामींचे हस्तक दत्ताजी कनोजे व बकाजी नाईक ह्यांनी सुचविली असावी असा अंदाज आहे. वडील भाऊ, सेखोजी मराठ्यांच्या सर्व आरमाराचा अधिपति असतांना, संभाजी आपल्याला आरमाराचा सरसुभेदार म्हणवूं लागला व कुलाब्याच्या दक्षिणेस सुवर्णदुर्गास मुख्य ठाणें करून राहण्यांत त्याला विशेष अभिमान वाटला ( खंड ३, लेखांक २६७ ). १७३१ च्या फेब्रुवारींत संभाजी महाराज कोल्हापूरकर व शाहूमहाराज सातारकर ह्यांची कऱ्हाडाजवळ जखीणवाडीस मुलाखत होऊन तह झाल्यावर, सेखोजीस व संभाजीस छत्रपतींनीं साताऱ्यास बोलाविलें ( रोजनिशी १४१ ). ह्या दोघा भावांमधील वैमनस्य मोडून टाकावें, असा ह्या बोलावण्यांत छत्रपतींचा हेतु होता. परंतु बंधुविरोधाचा इतका कांहीं कळस झाला होता कीं, सेखोजीस व संभाजीस एकदम साताऱ्यास येणें अशक्य झालें. संभाजी तह होण्याच्या सुमारास १७३१ त व सेखोजी १७३२ च्या मार्चांत परस्परें साताऱ्यास गेले. ( रोजनिशी १४० व लेखांक २५२ ). दोघे बंधु एकदम साताऱ्यास न जाण्याचें कारण ब्रह्मेंद्रस्वामीच होता. दत्ताजी कनोजे नामेंकरून कोणी मनुष्य ब्रह्मेंद्रस्वामींच्या प्रतीतींतील होता. बेकायदा आगळीक केल्यावरून व संभाजीच्या तर्फे सेखोजीविरुद्ध फितूर केल्यावरून, सेखोजीनें त्या दत्ताजी कनोजास नोकरीवरून दूर केलें.

कनोजा ब्रह्मेंद्रस्वामींकडे फिर्याद घेऊन गेला. तेव्हां ब्रह्मेंद्रानें त्याला संभाजी आंग्र्यांकडे शिफारसपत्र देऊन पाठविलें, "आणि तुमच्या कामाकरितां ह्याचा घात झाला, तेव्हां तुम्हीं ह्यास अवश्यमेव आश्रय दिला पाहिजे." अशी लिहून संभाजीस आज्ञा केली. संभाजीनें ही आज्ञा शिरसा मानिली असती, परंतु लौकिकांत केवळ गौण दिसेल ह्या भीतीनें ती मानण्याचें त्यानें मोठ्या दिलगिरीनें नाकारिलें ( लेखांक २६६ ). शिवाय ह्यावेळी ह्या दोघां भावांचा समेट होण्याचा संभव होता. तेव्हां ब्रह्मेंद्राची आज्ञा एकदम अमलांत

आणणें संभाजीस किंचित् कठिणच पडलें. असो. पुढें लवकरच संभाजीची व संखोजीची तडजोड झाली. ह्या दोघां भावांमधील भांडण कांहीं वेळ स्तब्ध झालें, व ब्रह्मेंद्रस्वामींचा हा डावपेंच त्यावेळेपुरता तसाच पडून राहिला.

८ सातारकर छत्रपतींचा कोंकणपट्टींत आंग्र्यांच्या हस्तें जो अंमल चालत असे, त्याविरुद्ध १७३० च्या सुमारास पांच चार राष्ट्रें खटपट करीत असत. मुंबईकर इंग्रज, राजपुरीकर शामळाला मदत करीत असत. चेऊलकर फिरंगी रिकाम्या फुशारकीनें हिंदू लोकांना त्रास देत. कोल्हापूरकर छत्रपति मात्सर्यानें दक्षिण कोंकणांत ढवळाढवळ करीत. वाडीकर सावंत कोणीकडे कांहीं तरी मेहनत करीत, व राजपुरीकर शामळ त्वेषानें मराठ्यांशीं लढत असत. खरें पाहिलें, तर राजपुरीकर शामळ दिल्लीच्या पातशाहाचे पुरातन सेवक होत. दिल्लीचा पातशाहा तर मराठ्यांच्या कचाटींत पूर्णपणें येत चालला होता. अशा वेळीं मराठ्यांशीं सख्य करून त्यानें आपली सुरक्षितता कायम ठेवावयाची हा शहाणपणाचा मार्ग होता. परंतु मुसलमान लोकांच्या अंगीं दिसून येणारा जो आडदांड हेकटपणा त्यानें हट्टास पेटून राजपुरीकर शामळ मराठ्यांस, १७२६ पासून अथवा त्याच्याहि पूर्वीं बरींच वर्षें, एकसारखा त्रास देत होता. त्याला मुंबईकर इंग्रज आणि चेऊल व वसई येथील फिरंगी मदत करीत असत. मुंबईकर इंग्रजांचा मुंबईच्या बेटाखेरीज इतरत्र अंमल नसल्यामुळें, त्यांना पाण्यावर गांठून तंबी देण्याखेरीज इतर उपाय नव्हता. हा उपाय आंग्र्यांनीं उत्तम तऱ्हेनें चालविला होता. ह्या त्रिकूटांतील शिल्लक राहिलेले जे शामळ व फिरंगी त्यांची मात्र कोंकण किनाऱ्यावर बरीच मालमत्ता असे. अर्धें चेऊल शहर व साष्टी बेट फिरंग्याकडे होतें. शामळाकडे तर उत्तर कोंकणांतील बरेच परगणे होते. ह्या परगण्याशेजारील जो मराठ्यांचा प्रांत त्याची व्यवस्था श्रीनिवासराव प्रतिनिधीकडे असे. तेव्हां शामळाशीं लढण्याचा मक्ता त्याजकडेस शाहूमहाराजांनीं सोंपविला, व फिरंग्यांवर मोहीम करण्यास पिलाजी-जाधवराव यांस सांगितलें. पिलाजी जाधवराव व श्रीनिवासराव प्रतिनिधी साताऱ्यास बाजीरावाविरुद्ध मसलत करीत असत, तेव्हां त्यांचा रोग साताऱ्याहून उखडून काढण्यास ही कामगिरी सांगण्याची शक्कल बाजीरावानें शोधून काढिली. १७२९ च्या जूनांत गड्डेकोट येथें पिलाजी जाधवराव याची सरदारी बाजीरावानें तगीर केली होती. तेव्हांपासून १७३० च्या मेपर्यंत पिलाजी घरींच बसून होता. त्यास १७३० च्या मेंत कोळवणांत फिरंग्यावर पाठविलें ( शकावली पृष्ठ ५९ ) व त्याच सुमारास श्रीनिवासरावास कुलाबा—रत्नागिरीकडे रवाना केलें. लढाईचा सराव नसल्यामुळें, श्रीनिवासराव कोंकणांत केवळ माशा मारीत बसला ( खंड ३, लेखांक २४९ ). पिलाजी जाधवरावानें मात्र गेल्याबरोबर कोहज किल्ला सर केला ( शकावली पृ. ६४ ). श्रीनिवासरावास मदत करण्यास सेखोजी आंग्र्याला शाहूराजाची आज्ञा होती; परंतु श्रीनिवासरावाचा स्वभाव तऱ्हेवाईक पडल्यामुळें सेखोजीचें व त्याचें पटेना. १७३० व १७३१ अशीं सबंध दोन सालें कोंकणांत राहून प्रतिनिधीच्या हातून शामळाचें पारिपत्य जेव्हां यत्किंचित्‌हि होईना,

तेव्हां सेखोजी व संभाजी आंग्र्यास शाहूनें साताऱ्यास बोलाविलें. साताऱ्यास जाण्याच्या पूर्वी सेखोजींची व बाजीरावाची गांठ १७३२ च्या जानेवारींत कुलाब्यास पडली. (खं० ३, लेखांक २४४ व शकावली, पृ ६३ ). ह्या मुलाखतींत बाजीरावाचें व सेखोजींचें पूर्ण सौरस्य झालें. अर्थात्, श्रीनिवासराव प्रतिनिधींच्या विरुद्ध वागण्याची, निदान त्याला मदत न करण्याची सल्ला बाजीरावाकडून सेखोजीस मिळाली. १७३१ त दाभाड्याचा डभईस पराभव केल्यापासून प्रतिनिधींचा पक्ष साताऱ्यास दुर्बळ होत चालला होता. तो सेखोजीच्या व बाजीरावाच्या ह्या १७३२ तलि भेटीनें अगदींच पंगू झाला. १७३२ च्या मार्चांत श्रीनिवासरावानें अंजनवेलीस मोर्चे लाविले ( खंड ३, लखांक ३०५ ). त्याच्या साहाय्यास सेखोजीनें बकाजी नाईक महाडीक यास पाठविले ( कित्ता ). बकाजी नायकाचें व सिद्दीसाताचें चिपळूणाजवळ मोठ्या कडाक्याचें युद्ध झालें. बकाजीनें सिद्दीसाताला कुल मारून काढून किल्ल्यांत घालवून दिलें. सिद्दीसाताची अशी तारांबळ केल्यावर, बकाजी नायकाच्या मनांत गोवळकोटास मोर्चे देऊन तो जागा एकदम घ्यावी असें होतें इतक्यांत पंतप्रतिनिधींची स्वारी गोवळकोटासन्निध येऊन पोहोंचली. गोवळकोटास येऊन पोहोंचण्याच्या अगोदर प्रतिनिधींची व सिद्दीसाताची काशी बंदरावर मुलाखत झाली ( खंड ३, लेखांक ३३० ). बकाजी नायकाकडून पराभव पावल्यावर, सिद्दीसातानें प्रतिनिधींची काशी बंदरावरहि मुलाखत घेतली. तींत त्यानें असें बोलणें घातलें कीं, आंग्र्यास तुम्ही येथून घालवा, म्हणजे लढाईची गोष्ट सोडून देऊन, शाहू राजाच्या भेटीस मी साताऱ्यास येतों व आपल्या म्हणण्याप्रमाणें सर्व कांहीं करून देतों. सिद्दीसाताच्या ह्या थापांना भुलून, प्रतिनिधीनें बकाजी नायकाशीं असें बोलणें लाविलें कीं तुम्हां आम्हीं मिळून गोवळकोट घेऊं. परंतु हें बोलणें बकाजीस मान्य होईना. प्रतिनिधींचें युद्धकौशल्य कितपत आहे हें बकाजीस पूर्ण कळलें होतें. बकाजीच्या साहाय्यानें गोवळकोट घ्यावा व म्यां प्रतिनिधीनें लढून गोवळकोट घेतला अशी सर्वत्र ख्याती व्हावी, असा प्रतिनिधींचा बेत होता. तो अर्थात्च बकाजीस मान्य झाला नाहीं. व तो प्रतिनिधीस सोडून कुलाब्यास सेखोजीपाशीं परत आला. बकाजी निघोन गेल्याबरोबर, सिद्दीसातानें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. साताऱ्यास येण्याच्या ज्या नरम गोष्टी तो आतांपर्यंत बोलत होता त्या त्यानें अजीबात सोडून दिल्या व प्रतिनिधीशीं दोन चार तुंबळ युद्धें घेतलीं. त्यांत प्रतिनिधी केवळ हैराण झाला. पुढें पावसाळा सुरू झाल्यामुळें गोवळकोट घेण्याचें काम पुढील सालावर टाकून देणें भाग पडलें.

९ १७३२ तील ह्या कोंकणांतील मोहिमेच्या वृत्तांतावरून, प्रतिनिधींच्या हातून झामळास तंबी पोहोंचणें शक्य नाहीं, हें शाहू महाराजांस पक्कें कळून चुकलें. सेखोजी आंग्रे व बकाजी नाईक महाडीक यांचें व प्रतिनिधींचें सौरस्य नसल्यामुळें त्यांच्याहि हातून तें काम होऊन येईल अशी शाहूची खात्री नव्हती. ती गोवळकोटची मसलत फसल्यामुळें, प्रतिनिधींच्याच कर्तृत्वशून्यतेचा तेवढा अंदाज शाहूस करतां आला असें नाहीं; तर आंग्र्यांच्या संबंधींहि त्याच्या मनांत विकल्प आले. राजाच्या मनांत आंग्र्यासंबंधीं विकल्प

यावा हाच ब्रह्मेंद्रस्वामींचा हेतु होता. अप्रत्यक्ष रीतीनें हा हेतु साध्य होत असतां सेखोजीच्या मनांत बाजीरावाच्या विरुद्ध भावना उत्पन्न करण्याचा स्वामीनें प्रयत्न केला. तळेगांवकर दाभाडे व सेखोजी आंग्रे यांचा शरीरसंबंध पूर्वापरचा होता. १७३१ च्या एप्रिलांत त्रिंबकराव दाभाड्यास बाजीरावानें लढाईंत मारलें असतां, स्वामीनें ती बातमी तावडतोब सेखोजीस कळविली व " मारत्याची सर्व पृथ्वी आहे " म्हणून एक दुःखप्रदर्शक व निंदात्मक वाक्य जातां जातां सहज पत्रांत नमूद करून ठेविलें ( खंड ३ लेखांक २४९ ). आपण लिहिलेलें वाक्य वाचून सेखोजीच्या मनांत काय भावना होते व बाजीरावाविषयीं तो काय उद्गार काढतो हें काढून घेण्याचा स्वामींचा विचार होता. " स्वामींनीं जो प्रकार लिहिला तो उचितच ! त्रिंबकराऊ निधन पावले हे गोष्टी भावी अर्थानुरूप जाहली ! " अशा अर्थाचें पत्र सेखोजीनें स्वामीस लिहिलें. झाला प्रकार तो केवळ निंद्य होय, विरुद्ध बाजूच्या सर्व सरदारांना जमीनदोस्त करण्याचा बाजीरावाचा विचार आहे, हा ध्वनि सेखोजीच्या ह्या लिहिण्यापासून व्यक्त होतो. सेखोजीनें असेंच लिहावें, असा स्वामींचा मनोदय होता.येणेंप्रमाणें हें लिहिणें बाजीरावास दाखवून त्याच्या मनांत सेखोजीच्याविषयीं विकल्प आणण्याची स्वामींची मसलत पूर्णपणें तडीस गेली. सेखोजीचें आपल्याविषयीं खरें मत काय आहे, हें स्वामींच्या द्वारां कळून आल्यामुळें, बाजीरावानें आंग्र्यांशीं अत्यंत कुटिलपणाचें वर्तन ठेविलें. १७३२ च्या जानेवारींत भेट झाली तेव्हां वरकांती पूर्ण सौरस्य ठेवून, बाजीरावानें सेखोजीस प्रतिनिधीच्या विरुद्ध वागण्याची सल्ला दिली. ही सल्ला अमलांत आणिल्यामुळें शाहूराजाच्या मनांत सेखोजीविषयीं विकल्प कसा आला हें मागें नमूद केलेंच आहे. ह्या अशा कपट नाटकानें सेखोजीविषयीं शाहूच्या व बाजीरावाच्या मनांत विकल्प उत्पन्न केल्यावर सेखोजीला छळण्याचे स्वामीनें निराळेच खासगी उपाय योजिले. ( १ ) दत्ताजी कनोजा म्हणून सेखोजीच्या अप्रीतींतील एक माणूस होता. त्याला पुन्हां नोकरीवर ठेवावयास सेखोजीस हुकूम केला व संभाजीस दत्ताजी कनोजाचा कड घेण्यास सांगितलें. ( २ ) असोले येथील देशमुखी कृष्णंभट देसाई म्हणून स्वामींच्या प्रीतींतील मनुष्य होता त्यास देण्यास सांगितली. ( पा. ब्र. च. ले. ३२८; खंड ३, लेखांक २५४ ) व संभाजीस कृष्णंभटाचा पक्ष उचलण्याचा आग्रह केला ( खंड ३, लेखांक २६५ ). ( ३ ) शंकरभट उपाध्या मुरूडकर ह्याची महाजनकी बापू बागलास द्यावी असा स्वामीनें हट्ट धरिला. ( पा. ब्र. च. ले. ३२८ ). ( ४ ) गोठणें येथील खाजणांतील शेतास इस्तावा वीस वर्षें माफ करावा म्हणून गैरशिस्त मागणी केली. ( खंड ३, लेखांख २५७ ) स्वामींच्या ह्या गैरशिस्त आग्रहाच्या मागण्या सेखोजीनें एकोनएक नाकारिल्या. ह्याचें वैषम्य वाटून आपलें कर्ज तावडतोब फेडावें असा सेखोजीच्या पाठीमागें स्वामीनें लकडा लाविला ( खंड ३, लेखांक २९४ वगैरे ) व मागचीं सर्व उष्टीखरकटीं काढून सेखोजीस शिव्याशाप, मुबलक पाठवून दिले. स्वामींच्या शिव्याशापाचें सेखोजीला व त्याच्या आईला अत्यंत भय वाटत असे. परंतु शाहुराजापाशीं व बाजीरावापाशीं चुगल्या करून परमहंस कोणत्या संकटांत आपल्याला पाडतात त्याचें भय त्यांना अतोनात वाटे. राजा

आपला बहुत सन्मान करतो ( खंड ३ लेखांक २५२ ) व बाजीराव आपला शब्द केवळ झेलीत असतो ( पा.ब्र.च.ले. ३१० ), वगैरे स्वतःच्या बढाईचा प्रकार लिहून सेखोजीला भिवविण्याची ही स्वामीला खोड असे. सारांश आपलें कर्ज दिलें नाहीं, हत्तीमुळें कोंकण-त्याग करावा लागला, आपल्या आज्ञा सेखोजी मानीत नाहीं, वगैरे नानाप्रकारचे डाव मनांत धरून स्वामीनें सेखोजीचें मन पराकाष्ठेचें अस्वस्थ करून सोडलें.

१० इतक्यांत १७३२ चा पावसाळा संपून कोंकणांतील मोहीम करण्याचे दिवस बरेच लोटले. शाहूमहाराजांना तर शामळाचें पारपत्य करण्याची बेसुमार उत्कंठा लागून राहिली. केवळ आंग्र्यांच्या किंवा प्रतिनिधींच्या हातून ही कामगिरी उलगडून येईल असा रंग दिसेना. तेव्हां शाहूनें बाजीरावाला व फत्तेसिंग भोसल्याला कोंकणच्या मोहिमेवर जाण्यास आज्ञा केली. ते १७३३ च्या एप्रिलांत कोंकणांत उतरले. बाजीराव बल्लाळ कोंकणांत उतरल्याबरोबर तीन वर्षे खितपत पडलेल्या ह्या मोहिमेच्या मंदगतीस आळा पडून, शत्रूला तंबी पोंहोचविण्याचें काम जारीनें सुरू झालें. रायगड, मंडणगड, विजयगड, गोवळकोट, अंजनवेल, उंदेरी, व जंजिरा अशीं मोठमाठी बिकट स्थळें शामळाच्या हातांत होतीं ( काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे १६६ ). त्या सर्वांवर एकदम हल्ला करण्याचा बाजीरावानें बेत केला. उंदेरीवर व इंग्रजांवर सेखोजी आंग्र्यास पाठविलें ( रोजनिशी, रकाना ६१ ). बाणकोट व मंडणगड ह्यांच्यावर बकाजी नाइकास धाडिलें ( पा ब्र. च. ले. २०३ ). प्रतिनिधि व आनंदराव सोमवंशी ह्यांच्याकडे अंजनवेलीची कामगिरी सोंपविली ( रोजनिशी, रकानें ५९ व ६० ). व स्वतः बाजीराव व फत्तेसिंग शामळाच्या जंजिऱ्याला शह देऊन बसले ( रोजनिशी, रकाना ५९ ). ह्यावेळीं जंजिऱ्याच्या आंतील खानजाद्यांची स्थिति फारच विचित्र झाली होती. बाजीराव कोंकणांत उतरण्याच्यापूर्वी जंजिऱ्याचा मुख्य सिद्दी रसूल याकूदखान १७३३ च्या फेब्रूवारींत मरण पावला होता. सिद्दी रसूल याकूबखान याचे पूर्वज, अहमदनगर येथील निजामशाही पातशहांच्या वेळेस आफ्रिकाखंडांतील इजिप्त देशाच्या आग्नेयीस सोमाली लोकांचा देश आहे तेथून अरबी समुद्रांतून कोंकणच्या किनाऱ्यावर आले व कालान्तरानें दंडाराजपुरीजवळील जंजिऱ्याचे अधिपति झाले. हे जंजिऱ्याचे अधिकारी इजिप्त देशाच्या जवळून आले म्हणून त्यांस हबशी अशी संज्ञा प्राप्त झाली; ते आफ्रिकेंतून आले म्हणून त्यांस सिद्दी असें नांव मिळालें; व त्यांचा मूळ देश सोमाली लँड, अथवा सामल किंवा शामळ देश असल्यामुळें त्यांस शामळ ह्या नांवानें मराठे लोक ओळखूं लागले. येणेंप्रमाणें हबशी, सिद्दी व शामळ ह्या तीन नांवांनीं ते दर्यावर्दी लोक कोंकणांत नांवजले गेले. अहमदनगरची पातशाही अस्तंगत झाल्यावर जंजिरेकर सिद्दी दिल्ली येथील चकत्यांच्या पातशाहीचे मांडलिक बनले व औरंगजेबाच्या कारकीर्दीत सिद्दी रसूल ह्याचा पूर्वज सिद्दी कासीम यास याकूदखान हा किताब मिळाला. १७०६ त सिद्दी कासीम याकूदखान मरण पावल्यावर त्याच्या पश्चात् सिद्दी रसूल याकूदखान गादीवर आला. ह्या सिद्दी रसूलानें १७३३ च्या फेब्रूवारीपर्यंत राज्य केलें.

ह्याच्या कारकीर्दीत मराठ्यांशीं हमेशा लढाया चालूच होत्या. त्या सर्व लढायांत कान्होजी आंग्र्याच्या कारकीर्दीत १७२६ त जी लढाई सुरू झाली व जी चालू असतां ब्रह्मेंद्र-स्वामींची कोंकणांतून उचलबांगडी झाली ती विशेष प्रख्यात आहे. ही लढाई १७२६ त सुरू होऊन, १७३३ च्या फेब्रुवारींत तर ऐन रंगांत येत चालली होती. सात वर्षें सारखें लढून सिद्दी रसूल पादाक्रांत होण्याचीं चिन्हें बिलकुल दिसेनात. कान्होजी आंग्रे, सेखोजी आंग्रे, संभाजी आंग्रे, बकाजी नाईक महाडीक, श्रीपतराव प्रतिनिधि, जिवाजी खंडेराव चिटणीस, यशवंतराव महादेव, पिलाजी जाधवराव, वगैरे अनेक दुय्यम प्रतीच्या माणसांनीं सिद्दयाची रग जिरविण्याची वेळोवेळ खटपट केली. परंतु एकाचें मत दुसऱ्याला पसंत नसल्यामुळें, ह्यांपैकीं एकालाहि म्हणण्यासारखें यश कधींच आलें नाहीं. सिद्दी सात, सिद्दी अंबर, सिद्दी संबूल, सिद्दी याकूब, सिद्दी बिलाल, सिद्दी मसूद वगैरे जंजिरेकर सिद्दयांच्या स्नेह्यांनीं व सुभेदारांनीं मराठ्यांचे बहुतेक प्रयत्न निष्फळ करून टाकिले व कोंकणांतील हिंदू लोकांना भ्रष्ट करण्याचा तडाका चालविला. सात वर्षें लढून ह्या लहान माणसांच्या हातून कार्यसिद्धि लवकर होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत असें पाहून शाहूराजानें बाजीराव बल्लाळाला १७३३ च्या प्रारंभीं जंजिऱ्यावरील मोहीम हातीं घेण्याचा हुकूम केला. बाजीरावाच्या सद्दीचा जोर विशेष म्हणा किंवा जंजिरेकर हबशाचें दैव फिरलें म्हणा, जंजिऱ्यावर स्वारी करण्याचा बाजीरावाला हुकूम होण्याला व सिद्दी रसूल याकूदखान मरण्याला एकच गांठ पडली. सिद्दी रसूल याकूदखान पिढीजाद मालक असल्यामुळें व सिद्दी सात, अंबर, संबूल, याकूब वगैरे सुभेदार त्यानेंच नेमिले असल्यामुळें त्याच्या हयातींत ह्या सरदारांत परस्पर उघडपणें विरोध करण्यास कोणीहि धजला नाहीं. सिद्दी रसूल संपल्यावर मात्र, परस्परविरोधास उघडपणें बाहेर येण्यास जागा झाली. सिद्दी रसूल याच्या सरदारांपैकीं, गुहाघर येथील बाटलेला पाटील याकूबखान ऊर्फ शेखजी याचें व सिद्दी रसूल याचें पूर्वीपासूनच चित्त शुद्ध नव्हतें ( खंड ४ था, पेशव्यांची बखर, पृष्ठ ३९ ). सिद्दी रसूलाच्या मृत्यूनंतर, शेखजीची द्रोहबुद्धि विकास पावून, त्याचें व बाकीच्या सरदारांचें वाकडें आलें. सिद्दी रसुलाचा वडील मुलगा सिद्दी अबदल्ला शेखजीच्या बाजूचा होता, ही गोष्ट इतर सरदारांस न आवडून, त्यांनीं बाजीराव राजपुरीला येण्याच्या दिवशींच सिद्दी अबदल्ला यास ठार केलें ( काव्येतिहाससंग्रह, पत्र १६६ ). सिद्दी रसूल याचा दुसरा एक मुलगा आपल्या बापाच्या प्रेताचें दफन करण्यास फेब्रुवारींत जंजिऱ्यांतून दंडाराजपुरीस आला होता तो आपल्या वडील भावाची ती दुवार्ता ऐकून राजपुरीसच राहिला. ह्या मुलाला म्हणजे अबदुल रहिमान याला यशवंतराव महादेव यांणीं वश करून ठेविला होता. हें वर्तमान शेखजीस कळतांच तोही अबदुल रहिमानास येऊन मिळाला. पंतप्रातिनिधि यांनीं शेखजीस अगोदर फितविलें होतेंच. तशांत खाशापैकीं एक मुलगा आपल्या पक्षाला मिळालेला पाहून शेखजीला जास्तच हुरूप आला व त्यानें बाजीरावास हरएक प्रकारची मदत करण्याचा पत्कर घेतला. इकडे जंजिऱ्यांतील सरदारांनीं सिद्दी रसुलाच्या सिद्दी हसन नांवाच्या मुलास गादीवर बसविलें, व मराठ्यांशीं टक्कर देण्याची तयारी केली. येणें-

प्रमाणें हबसाणांतील हवशांत दोन परस्परविरुद्ध तट उत्पन्न झाल्यामुळें बाजीरावाचें काम बरेंच सोपें झालें. सिद्दी संबूल व सिद्दी अंबर अफलानी हे दोघे खुद्द जंजिऱ्यांत होते. अंजनवेल, उंदेरी, विजयगड, गोवळकोट, मंडणगड, व रायगड वगैरे सर्व गड कडेकोट तयारी करून मराठ्यांशीं सामना देण्यास सिद्ध झाले. शेखजीनें बाजीरावास जंजिऱ्यांत प्रवेश करण्यास खोकरींची वाट दाखविली. एवढें एक काम केल्यावर, पुढें चार महिने कोणतेंही काम आपल्या हातून होणार नाहीं असा शेखजीनें मध्येंच वहाणा केला. हा वहाणा स्वतःचें महत्त्व वाढविण्याच्या इच्छेनें केलेला असो, अगर प्रतिनिधि वगैरेंच्या चिथावणीवरून केलेला असो, बाजीरावानें हातीं घेतलेलें काम तडक चालविलें. १७३३ च्या २५ मेला मंडणगड सर झाला. याच महिन्यांत बिरवाडी, अष्टमी, अश्राधार, आंतोणें, नागाठणें, तळें, घोसाळें, निजामपूर वगैरे महालांतही अंमल बसला. श्रीपतराव प्रतिनिधीनें १७३३ च्या ८ जूनास रायगड किल्ला घेतला. येणेंप्रमाणें हवशाचें एक एक ठाणें सर होत होत, १७३३ च्या २२ आगष्टास, जंजिरा व अंजनवेल ह्याखेरीज बहुतेक सर्व ठाणीं बाजीरावाच्या ताब्यांत आलीं (रोजनिशी, रकाना ५९). जंजिऱ्यांतील हबशांपैकीं सिद्दी रहीण यानें खुद्द बाजीरावाशीं जंजिऱ्याच्या बाहेर येऊन सामना केला; परंतु त्यांतच तो ठार झाला (शकावली, पृष्ठ ६८).बाजीरावानें खुषकीवरून मोर्चे लावून जंजिऱ्यावर तोफांचा मार चालविला व मानाजीनें समुद्रांतून बरीच मारगिरी केली. जंजिऱ्यांतील हबशांस सुरतेच्या सिद्दी मसुदाकडून व मुंबईच्या इंग्रजांकडून मदत मिळत होती, तीहि ह्याच सुमारास बंद झाली. ही बाहेरची मदत बंद झाल्याबरोबर, सिद्दी अंबर, सिद्दी संबूल वगैरे जंजिऱ्यांतील हबशी अंजनवेल, गोवळकट वगैरे ठिकाणीं पळून गेले व जंजिरा अबदुल रहिमान ह्याच्या तर्फेनें बाजीरावाच्या ताब्यांत आला. अबदुल रहिमान ह्याला ५॥ महालांचा वसूल देण्याचा व त्याच्याकडून रायगड, तळें, घोसाळें, अवचितगड आणि बीरवाडी हे किल्ले मराठ्यांनीं घेण्याचा संकेत ठरला. १७३३ च्या डिसेंबरांत ही अशी व्यवस्था करून बाजीराव साताऱ्यास परत आला. ' सिद्दी अबदुल रहिमान हा तह करण्यास सिद्ध झाला, जंजिरा हस्तगत झाला नाहीं' वगैरे वाक्यांचा प्रयोग राजश्री पारसनीस यांनीं ब्रह्मेंद्र स्वामीच्या चरित्रांत केला आहे. त्यावरून अबदुल रहिमान हा बाजीरावाचें म्हणणें हा वेळपर्यंत मान्य करीत नव्हता असा मतलब रा० पारसनीस यांच्या लिहिण्यांत दिसून येतो. परंतु तो मतलब गैरसमजुतीचा आहे. अबदुल रहिमान हा बाजीरावाच्या बाजूला पहिल्यापासूनच होता व त्याच्याशीं जर्विस म्हणतो त्याप्रमाणें १७३३च्या फेब्रुवारींत, १७३३ च्या डिसेंबरांत व १७३६ त झालेल्या तहाचीं कलमें आधींच करार करून ठेविलेलीं होतीं.१७३३च्या ६ फेब्रुवारीस अबदुल रहिमान ह्याच्याशीं तह झाला असें जर्विस म्हणतो तें रा० पारसनीस यांस संशयात्मक दिसतें; परंतु हा संशय निर्मूल आहे, हें वरील हकीकतीवरून स्पष्ट आहे. रा. पारसनीस यांनीं ह्या जंजिरेप्रकरणाची जी हकीकत दिली आहे ती बहुतेक चुकलेली आहे, व ती हकीकत देतांना जीं पत्रें त्यांनीं 'ग्रंथमालें'तून नमूद केलीं आहेत तींही अयोग्य स्थलीं केलीं आहेत. कालाचें पौर्वापर्य ध्यानांत धरून हकीकत लिहिली तरच ती

बरोबर येते ही गोष्ट विसरून ह्या प्रकरणाची एक बखर त्यांनीं तयार केली आहे. उदाहरणार्थ, प्रतिनिधि व सिद्दी सात ह्यांची भेट काशी बंदरावर १७३२ च्या २८ एप्रीलास झाली होती. ती १७३० त झाली असें रा. पारसनीस समजतात. शेखजीला १७३० त फोडिलें असें रा. पारसनीस लिहितात; परंतु तशी गोष्ट नसून हा मनुष्य १७३३ त मराठ्यांना वश झाला. हबशी प्रकरण १७३० पासून १७३६ पर्यंत चाललें होतें असें चरित्रकारांचें म्हणणें आहे. खरें पाहिलें तर हें प्रकरण १७२६ पासूनच सुरूं झालें होतें. बाजीराव १७३५ त कोंकणांत उतरला, १७३३ त गोवळकोटास प्रतिनिधीचा पराभव झाला, वगैरे भाकड हकीकत ग्रांट डफनें आपल्या बखरीं दिली आहे, ती चुकली आहे, हें आतांपर्यंत दिलेल्या वर्णनावरून उघड आहे. कान्होजीला पांच मुलगे होते वगैरे हकीकत ग्रांट डफ व पारसनीस देतात; परंतु तींतही बिलकुल तात्पर्य नाहीं.

११. १७३३ च्या दिसेंबरांत अबदुल रहिमान याची जंजिऱ्यांत यद्यपि स्थापना झाली, तत्रापि सिद्दी अंबर, सिद्दी संबूल, व सिद्दी सात ह्या मंडळीनें अंजनवेल, गोवळकोट वगैरे ठाणीं लढविण्याचा उपक्रम सोडिला नाहीं. हा कालपर्यंत जंजिरा म्हणजे मराठ्यांना मोठें दुरधिगम्य स्थल वाटत असे. तो भ्रम मोडण्याचें महत्कृत्य करून, मोहिमेचें बाकीचें सटरफटर काम बाजीरावानें पूर्वींप्रमाणें इतर सरदारांच्या अंगावर टाकून दिलें व साताऱ्यास जातांना चेऊलास १७३४ च्या ४ जानेवारीस आंग्रयांची स्थापना केली ( रोजनिशी, रकाना १४२ ). १७३३ च्या सप्टंबरांत उंदेरीस इंग्रजांशीं लढत असतां सेखोजी आंग्रे एकाएकीं मृत्यू पावला ( रोजनिशी, रकाना ६१ ). सेखोजी आंग्र्यानंतर संभाजी आंग्र्याला सरखेलीचें पद प्राप्त झालें. सेखोजी जिवंत असतांना, संभाजीला सेखोजीच्या विरुद्ध जाण्याचा उपदेश करून व त्याची नाना प्रकारें मनधरणी करून ब्रह्मेंद्रस्वामीनें सेखोजीचें पारडें फारसें जड होऊं दिलें नाहीं. सेखोजी वारल्यानंतर—सेखोजी आपल्या अभिश्रापानें वारला असें स्वामी वारंवार म्हणत असे ( पा० ब्र० च० पृ० ३०३ )—संभाजी आपल्या धोरणानें चालेल अशी स्वामीला आशा होती. परंतु स्वामीची ही आशा लवकरच खोटी ठरली. ब्रह्मेंद्रानें सेखोजीकडून अंतप्रभूला काढून कृष्णंभटाला देशमुखी, वारंवार दपटशा व अभिश्राप देऊन एकदाची कशी तरी देवविली होती. हा देशमुखीचा कागद अमलांत येणार इतक्यांत सेखोजी आंग्रे वारला. तेव्हां सेखोजीनें दिलेला हुकूम अमलांत आणण्यास स्वामीनें संभाजीला पत्र लिहिलें. संभाजीनें या पत्राचा सत्कार निराळ्याच प्रकारानें केला. कान्होजीनें अंतप्रभूस देशमुखी दिली होती, ती सेखोजीनें स्वामीच्या आग्रहास्तव कृष्णंभटास दिली, परंतु खरें पाहिलें तर, अंतप्रभूची देशमुखी खरी, तेव्हां कान्होजीनें दिलेला निकाल अमलांत आणावा व सेखोजीचा निकाल रद्द करावा असा आपला हेतू आहे, असें संभाजीनें स्वामीस उत्तर पाठविलें ( खंड ३, ले. २९० ). शेवटीं स्वामीचा कोप अगदीं उतास जातो असा प्रसंग बेतल्यावर कृष्णंभटास निम्मी देशमुखी मोठ्या मिनतवारीनें मिळाली ( खंड ३, ले. ३४० ). " संभूनें जयसिंगाचा शिक्का लटका केला, तरी देव त्याला बघून घेईल, " असे उद्गार ब्रह्मेंद्रानें यावेळीं काढिले आहेत (पा. ब्र. च. पृ. ३०३)

बाजीराव साताऱ्यास निघून गेल्यावर, संभाजीनें अंजनवेलीस मोर्चे लाविले ( रोजनिशी, रकाना ६२ ). अंजनवेलीस मोर्चे लावण्याच्या कामांत बहुत दिवस जाणार हें ओळखून, संभाजीनें कुलाब्यास घरची व्यवस्था पाहाण्यास आपले भाऊ धोंडजी व मानाजी यास ठेवून दिले. धोंडजीकडे प्रांताची व्यवस्था पाहाण्याचें काम नेमून दिलें व मानाजीस कुलाब्याच्या आरमाराचा अधिकार सांगितला ( काव्येतिहाससंग्रह, ले. ११९ ). ही व्यवस्था चार सहा महिने चालली नाहीं तों संभाजी आंग्रे व मानाजी आंग्रे ह्यांच्यांत तेढ उत्पन्न झाली. कारभारसंबंधें नानाप्रकारचे आरोप ठेवून, संभाजीनें धोंडजीस कुलाब्याच्या बाहेर काढून दिलें व मानाजीस दुरुक्तीचें भाषण करून जीवन्मुक्त करण्याचा विचार केला. मानाजी आंग्रे ब्रह्मेंद्रस्वामीच्या व बाजीरावाच्या वतीचा आहे, तो आपल्याविरुद्ध राजकारण करतो, अशा प्रकारचे संशय संभाजीच्या पोटांत येऊं लागल्यामुळें, संभाजीचें वर्तन हें असें एक प्रकारचें झालें होतें. कुलाब्यांत राहून आपला जीव सुरक्षित नाहीं, हें जाणून मानाजी रेवदंड्यास फिरंग्यांच्या आश्रयाला गेला व तेथेंच कांहीं दिवस स्वस्थ राहिला. १७३४ च्या जुलैच्या सुमाराला संभाजी आंग्र्यावर आभाळ कोसळतें कीं काय अशी स्थिति झाली म्हणून लेखांक ३४० त लक्ष्मीबाई आंग्रे लिहिते त्यावरून मानाजीनें संभाजीवर बरेंच काहूर आणिलें होतें हें स्पष्ट आहे. मानाजी पळून गेल्यावर संभाजी विजयदुर्गाकडे निघून गेला. इतक्यांत मानाजीनें हल्ला करून कुलावा काबीज केला. हें वर्तमान ऐकतांच संभाजी आपल्या सर्व आरमारासह कुलाब्यावर धांवून आला ( खंड ४, पेशव्यांची बखर, पृ. ४१ ). ते समयीं मानाजी आंग्रे यानें बाजीरावास कुमक करण्याविषयीं निकडीचीं पत्रें पाठविलीं. संभाजीचा स्वभाव तऱ्हेवाईक पडल्यामुळें तो बाजीरावास, ब्रह्मेंद्रस्वामीस व शाहूराजास अत्यंत अप्रिय झालेला होता. आपल्या पश्चात् अंजनवेल वगैरे ठाणीं सर करण्याचें काम संभाजीच्या हातून झालें नाहीं ह्यामुळें बाजीरावाचा राग संभाजीवर होता. १७३४ च्या पावसाळ्यांत ब्रह्मेंद्रस्वामी कोंकणांत गेला असतां त्याची पासोडी, बंदूक व निशाण संभाजीनें थट्टेनें किंवा अपमान करण्याच्या हेतूनें हिसकावून घेतल्यामुळें स्वामीचाही क्रोध संभाजीवर विशेष झाला होता ( पा. ब्र. च. ले. ३१३ ) व मानाजीशीं भांडून थळची चौबुर्जी शामळाच्या हातीं जाऊं दिल्याबद्दल शाहूराजाची इतराजी त्याजवर झाली होती ( काव्येतिहाससंग्रह, ले. ११९ ). शिवाय, संभाजी व मानाजी ह्या दोघांमधील वैमनस्य वाढवून आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न इंग्रेज व फिरंगी ह्यांनीं चालविलाच होता. संभाजीच्या आरमाराचें भय इंग्रेजांना इतकें कांहीं झालें होतें कीं, आंग्र्यांच्या कुलांत गृहकलह वाढवून, त्याची शक्ति कमी करण्याचाच उपाय इंग्रेजांना योजणें भाग पडलें. अंजनवेल व गोवळकोट हे दोन किल्ले शामळाचे घ्यावयाचे राहिले होते. शामळाला इंग्रेजाची पाण्यांतून मदत होत असल्याकारणानें, व संभाजी व मानाजी ह्यांच्यांतील वैमनस्य वाढत चालल्याकारणानें, अंजनवेल व गोवळकोट एका सबंध वर्षांतहि मराठ्यांच्या हातीं पडलीं नाहींत. तशांत थळची चौबुर्जीही शामळांनीं मध्येंच पटकाविली. ही अशी पिच्छेहाट होत आहे असें पाहून, मानाजीच्या विनवणीवरून व वस्तुस्थितीच्या

निकडीवरून बाजीराव १७३५ त कोंकणांत उतरला. बाजीराव येण्याच्या पूर्वीं १७३५ च्या जानेवारींत अंजनवेल मराठ्यांच्या ताब्यांत आली. १७३४ च्या प्रारंभीं उदाजी पवारानें सिद्दी अंबर अफवानी ह्याचा पराभव व शिरच्छेद रायगडाखालीं वाडीपाचाड येथें केला ( पा. ब्र. च. ले. २७८ ) ह्या पलीकडे १७३४ च्या सबंध सालांत मराठ्यांच्या हातून विशेष कांहींएक झालें नाहीं. संभाजीचें व मानाजीचें वाकडें असल्यामुळें व मानाजीच्या हातांतील आरमाराचा उपयोग इंग्रेज व फिरंगी ह्यांना बंद करण्याकडे होत नसल्यामुळें, अंजनवेल मराठ्यांच्या ताब्यांत हा वेळपर्यंत आली नाहीं. बाजीराव आपल्या साहाय्यास येणार असें कळल्यावरोवर मानाजीनें अंजनवेल घेण्याची खटपट केली व त्यांत वर सांगितल्याप्रमाणें त्यास यश आलें. इतक्यांत १७३५ च्या फेब्रुवारींत बाजीराव कोंकणांत येऊन पोहोंचला. बाजीराव १७३५ च्या फेब्रुवारीपासून एप्रिलपर्यंत कोंकणांत होता. तेवढ्या अवधींत राजमाची, कुलाबा, खांदेरी, कोहाळा वगैरे किल्ले मानाजीच्या हस्तें घेववून बाजीरावानें संभाजीचा अगदीं पाणउतारा करून सोडला व मानाजीशीं तह करून राजमाची वगैरे ठाणीं सरकारांत घेतलीं. मानाजीस वजारतमाब असा किताब देऊन व संभाजीस सरखेलीचें पद कायम करून ह्या दोघां भावांमधील तंटा बाजीरावानें मिटविल्यासारखें केलें. मानाजीला कुलाब्याचें ठाणें देऊन व संभाजीस विजयदुर्गास स्थापून कोंकणांत स्वस्थता उत्पन्न करण्याचा प्रयत्न बाजीरावानें केला. मानाजी व संभाजी यांमधील हा तह अलीबागेजवळील नवदरें या ठिकाणीं झाला ( शकावली, पृ. ७२ ). मानाजीला प्रोत्साहन देण्यास व संभाजीची रग जिरविण्यास ब्रह्मेंद्रस्वामीच कारण झाला. " कुलाब्यास जाऊन, तेथील बंदोबस्त करून वरकडही जें कार्य होणें असेल तें होईल " हें वाक्य पारसनिसांनीं छापिलेल्या ब्रह्मेंद्रस्वामीच्या १३० व्या पत्रांत आहे. वरकड कार्य म्हणजे संभाजीची खोड मोडण्याचें कार्य. पारसनीस यांनीं ह्या १३० व्या पत्राची तारीख १३ जानेवारी १७३७ दिली आहे. खरी तारीख ५ फेब्रुवारी १७३५ आहे.

१२. संभाजीच्या व मानाजीच्या दुहीमुळें सिद्दी सात, सिद्दी संबूळ वगैरे हबशांचें पारिपत्य होण्याचें काम जें तहकूब झालें होतें, तें नवदरें येथील तहानें पुनः जारीनें सुरू होण्याला सवड झाली. संभाजीला व मानाजीला विवक्षित प्रांत व विवक्षित अंमल मिळाल्यामुळें आपसांत दुही होऊन इंग्रज, फिरंगी, शामळ व सावंत वगैरे शत्रूंना सवलत मिळत असे ती बंद झाली. १७३५ च्या एप्रिलांतील नवदरें येथील तहाच्या कालापासून पुढें दीड वर्ष गोवळकोटास मराठे मोर्चे लावून बसले होते. १७३५ च्या आगस्टांत सूर्याजी चव्हाण कोंकणराव ह्यास गोवळकोटाच्या कामगिरीस पाठविलें होतें (रोजनिशी, रकाना ६७). १७३५ च्या जूनांत सिद्दी सातानें अगदीं मर्यादा सोडून मराठ्यांच्या प्रांताला बेसुमार उपद्रव देण्याचा उपक्रम स्वीकारला ( खंड, ३. ले. २७० ). संभाजी आंग्र्यानें हबशाला शासनाक्रान्त करण्याचा बेत केला होता, परंतु तो त्याचा बेत मनांतल्या मनांतच राहिला असें दिसतें. मानाजीचा द्वेष व स्पर्धा करण्यांतच संभाजीचा बहुतेक हुरूप आटून गेला. हबशानें उपव्याप अत्यंत केला आहे असें ऐकून चिमाजी अप्पा १७३६ च्या

मार्चांत कोंकणांत उतरला व रेवासेजवळ चरई येथें सिद्दी साताचा उद्ध्वंस १९ एप्रिल १७३६ त करता झाला. उंदेरीचा किल्लेदार सिद्दी याकूबहि ह्या लढाईंत ठार झाला (शकावली, पृ. ७३ ). चिमाजी अप्पा कोंकणांतून १७३६ च्या मेंत वरघाटीं आल्यावर, १७३६ च्या अक्टोबरांत उदाजी पवारानें गोवळकोटाची मोर्चेबंदी चालविली होती ( रोजनिशी, रकाना ७० ). परंतु आतां हबशांच्या अंगांत विशेष जोर राहिला नव्हता. जंजिऱ्यांत १७३३ त दोन पक्ष पडले होते हें मागें सांगितलेंच आहे:—सिद्दी अबदुल रहिमान ह्याचा एक पक्ष व सिद्दी अंबर, सिद्दी संबूल व सिद्दी सात ह्यांचा दुसरा पक्ष. पैकीं ह्या दुसऱ्या पक्षांतील सर्व मंडळी १७३६ सालांत पार होऊन, तो पक्ष अजीवात नष्ट झाला. अर्थात् मराठ्यांचा आश्रित जो सिद्दी अबदुल रहिमान तोच तेवढा एकटा राहिल्यामुळें १७३३ तील तहाचीं कलमें अमलांत येण्यास कोणताच प्रतिबंध राहिला नाहीं. १७३७ त अबदुल रहिमानानें हा तह दुसऱ्यांदा मान्य करून, मराठ्यांच्या संमतीनें जंजिऱ्याचें अधिपत्य स्वीकारलें. येणेंप्रमाणें १७२६ त ज्या लढाईचा प्रारंभ झाला व जींत शाहू महाराजांना इतर सर्व युद्धांपेक्षां विशेष काळजी वाटली, ती लढाई १७३७ त कायमची बंद झाली. अबदुल रहिमानानें १७३७ पासून १७४० पर्यंत सुखासमाधानानें राज्य केलें. तोंपर्यंत मराठ्यांना जंजिऱ्याच्या सिद्द्यांकडून कांडीमात्रहि त्रास पोहोंचला नाहीं.

१३. आंग्रे, हबशी, सावंत, कोल्हापूरकर, इंग्रज व फिरंगी इतक्या मंडळींची कोंकणांतील निरनिराळ्या भागांवर सत्ता होती असें पूर्वी सांगितलेंच आहे. पेशव्यांना कोंकणांत एकछत्री राज्य करावयाचें म्हणजे ह्या सहाहि लोकांना संपुष्टांत आणणें जरूर होतें. १७३१ च्या तहांत कोल्हापूरच्या महाराजांना साळशीच्या पलीकडील प्रांत तोडून दिल्यामुळें, उत्तर कोंकणांत ढवळाढवळ करण्याला त्यांना कांहींच कारण राहिलें नाहीं. कान्होजी केवळ बहुतेक स्वतंत्र राजा ह्या नात्यानें कोंकणांत अंमल चालवीत असे. सेखोजी व संभाजी, संभाजी व मानाजी ह्यांच्यांतील दुहीचा फायदा घेऊन व नवदरें येथील तहांतील कलमांनीं आंग्र्यांची सत्ता दुभंग करून, आंग्र्यांचें स्वातंत्र्य पेशव्यांनीं केवळ नामशेष करून टाकिलें. जंजिरेकर हबशाशीं बारा वर्षें युद्ध करून व त्यांचे सर्व प्रबल सरदार मारून, सिद्दी अबदुल रहिमान ह्याला पेशव्यांनीं केवळ ताटाखालचें मांजर करून सोडिलें. वाडीचे सावंत इतके दुर्बल होते कीं, नुसत्या कागदी दपटशानेंच ते हमेषा ताळ्यावर येत असत. येणेंप्रमाणें, आंग्रे, हबशी, सावंत व कोल्हापूरकर ह्या सर्वांची १७३७ पर्यंत कोंकणसंबंधानें यथास्थित व्यवस्था लाविल्यावर इंग्रज व फिरंगी ह्या दोन परद्वीपस्थ लोकांचा परामर्ष घेण्याचा मराठ्यांनीं प्रयत्न केला. जंजिरेकर हबशाशीं युद्ध सुरू असतां,इंग्रज व फिरंगी यांनीं शामळाला मदत करून मराठ्यांना बराच त्रास दिला होता. मुंबईच्या क्षुद्र, ओसाड व लोकग्रस्त बेटाखेरीज कोंकणांत इंग्रजांची विशेष सत्ता नसल्यामुळें, इंग्रजाहून दिसण्यांत तरी विशेष बलिष्ठ अशा फिरंगी लोकांची विचारपूस करणें पेशव्यांना ह्या वेळीं अगत्याचें वाटलें. विशेष अगत्य वाटण्यास कारण येणेंप्रमाणें झालें. कल्याण वगैरे स्थलावरून साष्टींत पेशव्यांच्या सैन्याचा उपद्रव न व्हावा म्हणून, १७३६ त वसई येथील फिरंग्यांनीं ठाण्याच्या

कोटाची मजबुती आरंभिली. मजबुती करण्यांत मुख्य हेतु असा कीं, साष्टी बेटांतील सर्व हिंदु लोक ख्रिस्ती करून टाकावे. ह्या दुष्ट बेताची कुणकुण खंडोजी माणकर वगैरे साष्टीतील पुढाऱ्यांस कळतांच ते चिमाजी अप्पाला १७३६ च्या एप्रिलांत रेवास येथें जाऊन भेटले व साष्टींतील हिंदु लोकांचें संरक्षण करण्यास चिमाजीला त्यांनीं भीड घातली. साष्टावर स्वारी करण्यास ह्या लोकांच्या भीडेचीच जरूर होती असें नाहीं. फिरंगी लोकांनीं हबशाला सहाय्य केलें होतें इतकेंच नव्हे, तर आंग्र्यांच्या भांडणांतहि त्यांचें अंग असे. फिरंग्यांचा हा लुत्रेपणा मोडून काढण्याचा पेशव्यांचा पूर्वीपासूनच बेत होता. तशांत साष्टींतील लोकांचाहि ह्या कामीं विशेष आग्रह दिसून आला. तेव्हां १७३७ त ठाण्यास अवश्यमेव येण्याचें अभिवचन चिमाजीनें साष्टीकरांस दिलें. पुढें १७३६ च्या पावसाळ्यांत बाजीरावाचीहि मुलाखत साष्टीकरांनीं घेतली व तेथेंहि साष्टीवर मोहीम करण्याचें कायमचें ठरलें. १७३६ च्या हिवाळ्यांत रामचंद्र हरि पटवर्धन यास ठाण्याच्या मोहिमेस पुढें पाठवून, खुद्द चिमाजी अप्पा १७३७ च्या मार्चांत कोंकणांत उतरला. रामचंद्र हरि, रामाजी महादेव व खंडोजी माणकर हे ठाण्याजवळ घोणसाळियावर जमा झाले व तेथून त्यांनीं ठाण्यावर तोफांचा मारा केला. ह्या तोफांचा आवाज बदलापुरावरून ऐकून, चिमाजी अप्पा ठाण्यावर रातोरात चालून गेला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ठाण्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत आला. ही हकीकत १७३७ च्या २७ मार्चाला घडली. रामचंद्र हरि, रामाजी महादेव व खंडोजी माणकर ह्यांनीं ठाण्याकडे ही अशी दंगल मांडिली असतां, शंकराजीपंत, गंगाजी नाईक व मोरोजी शिंदे यांणीं खुद्द वसईजवळ पापडी, माणिकपूर, व बहादुरपुरा या ठिकाणीं फिरंग्यांचा पराभव करून वसईच्या कोटाखालीं गोळीचे टप्यावर मोर्चे दिले. ( साष्टीची बखर, पृ. १३ व पा. ब्र. च. ले. ४७ ). "वानरें व वेसावें ह्या स्थळांस फौजा पाठवाव्या म्हणून बुगाजी नाईक मागत होते." मांडवी, तांदुळवाडी, टकमक, वेशावें, काळदुर्ग, मनोहर व बेलापूर, इतकीं स्थळें ह्या पहिल्या मोहिमेंत सर झालीं. नंतर लौकरच १७३७ च्या जुलैंत चिमाजी अप्पा पर्जन्यकाळानिमित्त पुण्यास गेला.

१४. इकडे फिरंग्यांना पेशव्यांनीं ह्याप्रमाणें शह दिला असतां, तो पेंच काढून टाकण्याच्या इच्छेनें, फिरंग्यांनीं संभाजी आंग्र्याला मानाजी आंग्र्यावर स्वारी करण्याची भर दिली. १७३४ त संभाजीच्या भयानें मानाजी फिरंग्यांकडे आश्रयार्थ गेला होता. त्यावेळीं कुलाब्यास आपली स्थापना झाल्यास, कांहीं प्रांत आपण तुम्हास देऊं असा करार मानाजीनें आपल्याशीं केला होता असें फिरंग्यांचें म्हणणें पडलें. पुढें १७३५ त मानाजीची स्थापना कुलाब्यास झाल्यावर फिरंगी कराराप्रमाणें मानाजीपाशीं मुलूख मागूं लागलें. तें मागणें मानाजीला विशेष आदरणीय वाटलें नाहीं. तेव्हां फिरंग्यांनीं संभाजीकडून मानाजीवर स्वारी करविण्याचा घाट घातला व तो घाट १७३७ च्या एप्रिलांत अंमलांत आणिला. चिमाजी अप्पा साष्टीकडे गुंतल्यामुळें व बाजीराव हिंदुस्थानांत असल्यामुळे, मानाजी एकटा निराश्रित असा सांपडेल व त्याचा सहजासहजीं चुराडा करतां येईल अशी अटकळ फिरंग्यांनीं बांधिली होती. कुलाब्यावर स्वारी केली असतां, चिमाजी अप्पाजी

मार्चांत कोंकणांत उतरला व रेवासेजवळ चरई येथें सिद्दी साताचा उद्ध्वंस १९ एप्रिल १७३६ त करता झाला. उंदेरीचा किल्लेदार सिद्दी याकूबहि ह्या लढाईंत ठार झाला (शकावली, पृ. ७३). चिमाजी अप्पा कोंकणांतून १७३६ च्या मेंत वरघाटीं आल्यावर, १७३६ च्या अक्टोबरांत उदाजी पवारानें गोवळकोटाची मोर्चेबंदी चालविली होती (रोजनिशी, रकाना ७०). परंतु आतां हबशांच्या अंगांत विशेष जोर राहिला नव्हता. जंजिऱ्यांत १७३३ त दोन पक्ष पडले होते हें मागें सांगितलेंच आहे:—सिद्दी अबदुल रहिमान ह्याचा एक पक्ष व सिद्दी अंबर, सिद्दी संबूल व सिद्दी सात ह्यांचा दुसरा पक्ष. पैकीं ह्या दुसऱ्या पक्षांतील सर्व मंडळी १७३६ सालांत पार होऊन, तो पक्ष अजीबात नष्ट झाला. अर्थात् मराठ्यांचा आश्रित जो सिद्दी अबदुल रहिमान तोच तेवढा एकटा राहिल्यामुळें १७३३ तील तहाचीं कलमें अमलांत येण्यास कोणताच प्रतिबंध राहिला नाहीं. १७३७ त अबदुल रहिमानानें हा तह दुसऱ्यांदा मान्य करून, मराठ्यांच्या संमतीनें जंजिऱ्याचें अधिपत्य स्वीकारलें. येणेंप्रमाणें १७२६ त ज्या लढाईचा प्रारंभ झाला व जींत शाहू महाराजांना इतर सर्व युद्धांपेक्षां विशेष काळजी वाटली, ती लढाई १७३७ त कायमची बंद झाली. अबदुल रहिमानानें १७३७ पासून १७४० पर्यंत सुखासमाधानानें राज्य केलें. तोंपर्यंत मराठ्यांना जंजिऱ्याच्या सिद्द्यांकडून कांडीमात्रहि त्रास पोहोंचला नाहीं.

१३. आंग्रे, हबशी, सावंत, कोल्हापूरकर, इंग्रज व फिरंगी इतक्या मंडळींची कोंकणांतील निरनिराळ्या भागांवर सत्ता होती असें पूर्वी सांगितलेंच आहे. पेशव्यांना कोंकणांत एकछत्री राज्य करावयाचें म्हणजे ह्या सहाहि लोकांना संपुष्टांत आणणें जरूर होतें. १७३१ च्या तहांत कोल्हापूरच्या महाराजांना साळशीच्या पलीकडील प्रांत तोडून दिल्यामुळें, उत्तर कोंकणांत ढवळाढवळ करण्याला त्यांना कांहींच कारण राहिलें नाहीं. कान्होजी केवळ बहुतेक स्वतंत्र राजा ह्या नात्यानें कोंकणांत अंमल चालवीत असे. सेखोजी व संभाजी, संभाजी व मानाजी ह्यांच्यांतील दुहीचा फायदा घेऊन व नवदरें येथील तहांतील कलमांनीं आंग्र्यांची सत्ता दुभंग करून, आंग्र्यांचें स्वातंत्र्य पेशव्यांनीं केवळ नामशेष करून टाकिलें. जंजिरेकर हबशाशीं बारा वर्षें युद्ध करून व त्यांचे सर्व प्रबल सरदार मारून, सिद्दी अबदुल रहिमान ह्याला पेशव्यांनीं केवळ ताटाखालचें मांजर करून सोडिलें. वाडीचे सावंत इतके दुर्बल होते कीं, नुसत्या कागदी दपटशानेंच ते हमेषा ताळ्यावर येत असत. येणेंप्रमाणें, आंग्रे, हबशी, सावंत व कोल्हापूरकर ह्या सर्वांची १७३७ पर्यंत कोंकणसंबंधानें यथास्थित व्यवस्था लाविल्यावर इंग्रज व फिरंगी ह्या दोन परद्वीपस्थ लोकांचा परामर्ष घेण्याचा मराठ्यांनीं प्रयत्न केला. जंजिरेकर हबशाशीं युद्ध सुरूं असतां,इंग्रज व फिरंगी यांनीं शामळाला मदत करून मराठ्यांना बराच त्रास दिला होता. मुंबईच्या क्षुद्र, ओसाड व लोकग्रस्त बेटाखेरीज कोंकणांत इंग्रजांची विशेष सत्ता नसल्यामुळें, इंग्रजाहून दिसण्यांत तरी विशेष बलिष्ठ अशा फिरंगी लोकांची विचारपूस करणें पेशव्यांना ह्या वेळीं अगत्याचें वाटलें. विशेष अगत्य वाटण्यास कारण येणेंप्रमाणें झालें. कल्याण वगैरे स्थलावरून साष्टींत पेशव्यांच्या सैन्याचा उपद्रव न व्हावा म्हणून, १७३६ त वसई येथील फिरंग्यांनीं ठाण्याच्या

कोटाची मजबुती आरंभिली. मजबुती करण्यांत मुख्य हेतु असा कीं, साष्टी बेटांतील सर्व हिंदु लोक ख्रिस्ती करून टाकावे. ह्या दुष्ट बेताची कुणकुण खंडोजी माणकर वगैरे साष्टीतील पुढाऱ्यांस कळतांच ते चिमाजी अप्पाला १७३६ च्या एप्रिलांत रेवास येथें जाऊन भेटले व साष्टींतील हिंदु लोकांचें संरक्षण करण्यास चिमाजीला त्यांनीं भीड घातली. साष्टावर स्वारी करण्यास ह्या लोकांच्या भीडेचीच जरूर होती असें नाहीं. फिरंगी लोकांनीं हबशाला सहाय्य केलें होतें इतकेंच नव्हे, तर आंग्र्यांच्या भांडणांतहि त्यांचें अंग असे. फिरंग्यांचा हा लुत्रेपणा मोडून काढण्याचा पेशव्यांचा पूर्वींपासूनच बेत होता. तशांत साष्टींतील लोकांचाहि ह्या कामीं विशेष आग्रह दिसून आला. तेव्हां १७३७ त ठाण्यास अवश्यमेव येण्याचें अभिवचन चिमाजीनें साष्टीकरांस दिलें. पुढें १७३६ च्या पावसाळ्यांत बाजीरावाचीहि मुलाखत साष्टीकरांनीं घेतली व तेथेंहि साष्टीवर मोहीम करण्याचें कायमचें ठरलें. १७३६ च्या हिवाळ्यांत रामचंद्र हरि पटवर्धन यास ठाण्याच्या मोहिमेस पुढें पाठवून, खुद्द चिमाजी अप्पा १७३७ च्या मार्चांत कोंकणांत उतरला. रामचंद्र हरि, रामाजी महादेव व खंडोजी माणकर हे ठाण्याजवळ घोणसाळियावर जमा झाले व तेथून त्यांनीं ठाण्यावर तोफांचा मारा केला. ह्या तोफांचा आवाज बदलापुरावरून ऐकून, चिमाजी अप्पा ठाण्यावर रातोरात चालून गेला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं ठाण्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत आला. ही हकीकत १७३७ च्या २७ मार्चाला घडली. रामचंद्र हरि, रामाजी महादेव व खंडोजी माणकर ह्यांनी ठाण्याकडे ही अशी दंगल मांडिली असतां, शंकराजीपंत, गंगाजी नाईक व मोरोजी शिंदे यांणीं खुद्द वसईजवळ पापडी, माणिकपूर, व बहादुरपुरा या ठिकाणीं फिरंग्यांचा पराभव करून वसईच्या कोटाखालीं गोळीचे टप्पावर मोर्चे दिले. ( साष्टीची बखर, पृ. १३ व पा. ब्र. च. ले. ४७ ). " वानरें व वेसावें ह्या स्थळांस फौजा पाठवाव्या म्हणून बुगाजी नाईक मागत होते. " मांडवी, तांदुळवाडी, टकमक, वेसावें, काळदुर्ग, मनोहर व बेलापूर, इतकीं स्थळें ह्या पहिल्या मोहिमेंत सर झालीं. नंतर लौकरच १७३७ च्या जुलैंत चिमाजी अप्पा पर्जन्यकालानिमित्त पुण्यास गेला.

१४. इकडे फिरंग्यांना पेशव्यांनीं ह्याप्रमाणें शह दिला असतां, तो पेंच काढून टाकण्याच्या इच्छेनें, फिरंग्यांनीं संभाजी आंग्र्याला मानाजी आंग्र्यावर स्वारी करण्याची भर दिली. १७३४ त संभाजीच्या भयानें मानाजी फिरंग्यांकडे आश्रयार्थ गेला होता. त्यावेळीं कुलाब्यास आपली स्थापना झाल्यास, कांहीं प्रांत आपण तुम्हास देऊं असा करार मानाजीनें आपल्याशीं केला होता असें फिरंग्यांचें म्हणणें पडलें. पुढें १७३५ त मानाजीची स्थापना कुलाब्यास झाल्यावर फिरंगी कराराप्रमाणें मानाजीपाशीं मुलूख मागूं लागले. तें मागणें मानाजीला विशेष आदरणीय वाटलें नाहीं. तेव्हां फिरंग्यांनीं संभाजीकडून मानाजीवर स्वारी करविण्याचा घाट घातला व तो घाट १७३७ च्या एप्रिलांत अंमलांत आणिला. चिमाजी अप्पा साष्टीकडे गुंतल्यामुळें व बाजीराव हिंदुस्थानांत असल्यामुळे, मानाजी एकटा निराश्रित असा सांपडेल व त्याचा सहजासहजीं चुराडा करतां येईल अशी अटकळ फिरंग्यांनीं बांधिली होती. कुलाब्यावर स्वारी केली असतां, चिमाजी अप्पाजी

साष्टीवरील मिठी सैल पडेल असाहि फिरंग्यांचा अंदाज होता. परंतु फिरंग्यांचे हे दोन्ही अंदाज खोटे ठरले. वोडशाच्या स्वारीहून १७३७ च्या एप्रिलांत परत येत असतां मानाजीवरील संकटाची व फिरंग्यांच्या प्रतिशहाची बातमी बाजीरावास कळली. त्याबरोबर एका क्षणाचाही विलंब न लावतां बाजीराव कोंकणांत उतरला आणि संभाजीला व फिरंग्यांना त्यानें केवळ बाजारबुणग्याप्रमाणें हाकून लाविलें (शकावली, पृ० ७६). ह्या संभाजीच्या मानाजीवरील स्वारीसंबंधीं एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. मानाजीवर स्वारी करण्यास संभाजीला फिरंग्यांचें साहाय्य होतें. परंतु संभाजीच्या मनांत मानाजीवर स्वारी करण्याचा विचार उत्पन्न करण्यास मुख्य कारण ब्रह्मेंद्रस्वामी होता. रा. पारसनीस यांनीं छापिलेल्या पत्रांपैकीं लेखांक ३१४ त संभाजीस स्वामी लिहितो, "तूं जमाव तारवें घेऊन येणें, कुलाबा घेऊं, त्याचा हिसाब काय आहे?" हा उपदेश करून संभाजीस स्वामी कानगोष्ट सांगतो कीं, ह्या गोष्टीसंबंधीं "कोणास भ्र कळों न देणें" एवढीच कानगोष्ट सांगून स्वामी राहिला नाहीं. मानाजीच्या पत्रांचा आपण आदर करीत नाहीं, असेंहि स्वामीनें संभुसिंगाला लिहिलें. संभुसिंगाला असें प्रोत्साहन दिल्यावर स्वामी मानाजीस ३२८ व्या लेखाकांत लिहितो, "संभाजी आंगरे यांच्या मनामध्यें जे आम्हीं कुलाब्यास येऊन तुम्हास श्रापावें, परंतु त्याकडील माणसें व कागद आम्हीं माघारे फिरविले." स्वामी आपल्याला साहाय्य आहे अशा श्रद्धेनें संभाजीनें मानाजीवर स्वारी केली व त्या कामीं त्याची अगदीं नाचक्की झाली. नाचक्की झाल्यावर स्वामीनें संभाजीस कोंकणचा स्वतंत्र राजा म्हणून बहुमानानें पत्र पाठविलें आहे (खंड ३, ले. २७३). आंग्र्यांच्या कुळाचा नाश करावा, आंग्रे आपलें कर्ज फेडीत नाहींत म्हणून त्यांचा सूड उगवावा, वगैरे खुनस मनांत ठेवून स्वामीनें हें कपटनाटक चालविलें होतें हें उघड आहे.

१५. १७३७ च्या जुलैंत चिमाजी अप्पा पुण्यास गेल्यावर, शंकराजीपंत, गंगाजी नाईक, मोरोजी शिंदे वगैरेनीं माहिमास मोर्चे लाविले. १७३७ च्या नोव्हेंबरांत माहिमच्या मोर्चांत फिरंगी व मराठे यांची लढाई होऊन, महादजी केशव, वाघोजीराव खानविल्कर वगैरे मंडळी ठार झाली, व रामचंद्र हरि पटवर्धन यांस उजव्या हातावर जबर जखम झाली. माहिमास हा असा प्रकार झाल्यावर फिरंग्यांनीं ठाण्यावर चालून येण्याचा बूट काढून धारावीवर हल्ला केला. ही बातमी चिमाजी अप्पास बऱ्हाणपुरास कळली. तेथून निघून १७३८ च्या फेब्रुवारींत अप्पा कोंकणांत उतरला व ठाण्यास मजबुती करून राहिला. धारावीजवळ मुरद्यास फिरंगी व मराठ्यांची लढाई होऊन फिरंग्यांचा पूर्ण पराभव झाला. तों इतक्यांत पाऊसकाळ आला म्हणून ठाण्याची व धारावीची बळकटी करून चिमाजी अप्पा पुण्यास १७३८ च्या जूनांत दाखल झाले. नंतर शिबंदीचा खर्च फार पडतो, याजकरितां फिरंगी समूळ पुढील वर्षी खणून काढावा असा चिमाजीनें व बाजीरावानें बेत ठरविला व १७३८ च्या अक्टोबरांत मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे वगैरे मंडळीस कोंकणांत पुढें पाठवून, चिमाजीहि लवकरच त्यांना सामील झाला. फिरंगी ठाण्यावर पुनः चाल करून आला, व मल्हारजी होळकरानें पुनः त्याला मारून काढिला.

माहिम, केळवें, साळासुवें, खतलवाडी, नारगोळ, डहाणू, तारापूर, अशेरी, वज्राबाई वगैरे ठाणीं काबीज करण्याच्या पूर्वी मराठ्यांनीं खुद्द वसईच्या किल्यास १७३९ च्या ६ फेब्रुवारीस वेढा दिला. १७३९ च्या १५ मार्चास वांद्र्याचा कोट जमीनदोस्त केला. व्यंकटराव नारायण घोरपडे यानें गोंव्याजवळ फोंड्याचा व मर्दनगडचा किल्ला ह्याच सुमारास घेतला. पुढें लवकरच मट व धारावी हीं बंदरें मराठ्यांनीं काबिज केलीं, व वसईच्या भोंवतीं खुषकीवरून शंकराजी नारायण यानें व पाण्याचे बाजूनें मानाजी आंग्रे यानें वेढा दिला. साष्टींतील हालचालींसंबंधीं स्वतंत्र पत्रव्यवहार दुसऱ्या एका खंडांत निराळाच छापावयाचा असल्यामुळें, ह्या वेढ्याची सविस्तर हकीकत येथें देत नाहीं. येथें इतकेंच नमूद करून ठेवितों कीं, राजश्री पारसनीस व ग्रांट डफ ह्यांनीं ह्या मोहिमेची जी हकीकत दिली आहे, ती बरीच अविश्वसनीय व धरसोडीची आहे. उदाहरणार्थ, खुद्द वसईचाच किल्ला घेतल्याची ग्रांट डफ व पारसनीस यांनीं जी तारीख दिली आहे ती अजीबात चुकली आहे. पारसनीसमुद्रित ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रव्यवहारांतील ५२ व्या लेखांकांत वैशाख शुद्ध अष्टमीस फिरंगी कौलास आले, व वैशाख शुद्ध पौर्णिमेस ते किल्ला सोडून निघून गेले असें लिहिलें आहे. वैशाख शुद्ध अष्टमी म्हणजे ५ मे १७३९ व वैशाख शुद्ध पौर्णिमा म्हणजे १२ मे १७३९. ५ मे १७३९ स फिरंगी कौलास आले व पुढें सात दिवसांनीं १२ मेला ते किल्ला सोडून गेले. १६ मे १७३९ फिरंगी कौलास म्हणजे Capilulation स आले व पुढें सात दिवसांनीं म्हणजे २३ मे १७३९ ते किल्ला सोडून गेले असें डफ आपल्या इतिहासाच्या १५ व्या भागांत लिहितो. ग्रांट डफनें १६ मे ही तारीख मुंबईच्या सेक्रेटेरियटांतील परेराच्या व चिमाजी अप्पाच्या तहनाम्यावरून घेतली आहे. हा तहनामा Selections from the Bombay Secretariat, Vol. 1, च्या ४१ व ४२ पृष्ठावर प्रो. फारेस्ट ह्यांनीं छापिला आहे व त्यावर १६ मे १७३९ ही तारीख आहे. परंतु ही तारीख नव्या पद्धतीची आहे जुन्या पद्धतीची नाहीं. पोर्तुगाल देशांत नव्या पद्धतीच्या तारखा चालत असल्यामुळें प्रो. फारेस्ट यांनीं छापिलेलीं पोर्तुगीज सरदारांचीं पत्रें त्यावेळच्या इंग्रजी पत्रांच्या तारखाहून ११ दिवसांनीं पुढें आहेत. ही गोष्ट डफच्या ध्यानांत न आल्यामुळें ५ मे १७३९ ह्या तारखेच्या ऐवजीं ११ आंकड्यांनीं अधिक असलेली १६ मे १७३९ ही तारीख डफनें दिली आहे. डफच्या बाकीच्या सर्व तारखा जुन्या इंग्रजी पद्धतीच्या आहेत. वसईच्या कौलाची किंवा Capitulation ची पोर्तुगीज तारीख तेवढी त्यानें गरसमजुतीनें स्वीकारिली आहे, व तिची नक्कल रा. पारसनीस यांनीं, आपण स्वतः छापिलेल्या पत्रांतील तिथींकडे लक्ष न देतां, अंधपरंपरा न्यायानें केली आहे. तसेंच वसईला वेढा ६ फेब्रुवारी १७३९ स दिला म्हणजे माघ शुद्ध दशमीस दिला. रा. पारसनीस माघ शुद्ध दशमी म्हणजे ७ जानेवारी समजतात. खरें पाहिलें तर माघ शुद्ध दशमी म्हणजे ६ फेब्रुवारी १७३९ आहे. ग्रांट डफ पोर्तुगीज पद्धतीची ११ दिवसांनीं आधिक जी १७ फेब्रुवारी तारीख ती देतो. तात्पर्य ग्रांट डफ व पारसनीस ह्या दोघांना कालाचें महत्त्व

बिलकुल कळत नाहीं असें दिसतें. वसईच्या कौलाची तारीख जर १६ मे खरी धरली, तर रा. पारसनीसांनीं छापिलेल्या पत्रांतील तिथी खोटी होण्याची निश्चिती आहे व तिथी खोटी ठरली म्हणजे पत्राच्या खरेपणाविषयींही संशय येतो. ह्या गोष्टी ऐतिहासिक पत्रव्यवहार छापणाऱ्यांनीं ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. इंग्रज लेखक चुकला म्हणून आपणहि गचाळपणें चुकावें हें केव्हांहि फायद्याचें नाहीं.

१६. वसईच्या वेढ्यांत मराठ्यांचें ५००० माणूस ठार व जाया झालें असें चिमाजी अप्पानें ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेल्या पत्रांत नमूद केलें आहे. ह्या सर्व वेढ्यांत फिरंग्याचें ८०० माणूस ठार झालें अशी कित्येकांची समजूत आहे व मराठ्यांचें ५००० माणूस ठार झालें त्या अर्थी पोर्तुगीज लोकांनीं मराठ्यांची रग चांगलीच जिरविली असें कित्येक लोक समाधान करून घेतात. परंतु हें समाधान केवळ भ्रामक आहे. खरा प्रकार असा होता कीं, शेवटला सुरुंग उडून हल्ला केला. त्या एकाच वेळीं फिरंग्यांचें ८०० माणूस ठार व जखमी झालें. " पोर्तुगीज लोक शेवटच्या पराभवाचे वेळेच्या नुकसानीची गणती देतात. " असें पोर्तुगीज रिपोर्टावरून डफ लिहितो. ६ फेब्रुवारीपासून ५ मे पर्यंत पोर्तुगीजांचे किती लोक ठार झाले ह्याचा कोठें आंकडा पहाण्यांत आला नाहीं. परंतु एका शेवटल्या हल्ल्यांतच जर फिरंग्यांचे ८०० लोक गेले तर सबंध वेढ्यांत व मोहिमेंत किती गेले असतील ह्याचा सामान्य अंदाज होण्यासारखा आहे. प्रो० फारेस्ट यांनीं छापिलेल्या पत्रांवरून वसईंतील फिरंग्यांची काय दशा झाली होती तें कळण्यासारखें आहे. दुर्दशेनें विपन्न झालेल्या लोकांस अंगावरील शस्त्रासह चिमाजी अप्पानें जाऊं दिलें ह्यावरून फिरंग्यांना व फिरंग्यांचा कड घेऊन बोलणाऱ्यांना फुशारकी मारण्यास कितपत जागा रहाते ह्याचा उलगडा स्पष्ट शब्दांनीं करून दाखविला पाहिजे असें नाहीं.

१७. वसई व साष्टी हीं दोन बेटें मराठ्यांच्या ताब्यांत गेलीं हें पाहून, मुंबईंतील इंग्रजांचेंहि धाबें दणाणून गेलें. द्वेषानें व मत्सरानें वसईच्या वेढ्यांत फिरंग्यांना इंग्रजांनीं योग्य वेळीं साहाय्य केलें नाहीं, त्यामुळें इंग्रजांच्या ह्या कोत्या वर्तनाला जागा ठेवण्यास पोर्तुगीज सरकाराला जागा झाली. वसई घेतल्यावर मुंबईवर गदा येईल ह्या भीतीनें त्यावेळच्या मुंबईच्या गव्हर्नरानें चिमाजी अप्पाकडे कप्तान इंचबर्डास नरमाईचें बोलणें करण्यास पाठवून दिलें. व्यापाराच्या सवलतींखेरीज इंग्रजांचें विशेष कांहीं मागणें नसल्यामुळें, चिमाजी अप्पानें कप्तान इंचबर्डाचें म्हणणें कबूल केलें. चौल व मरोळ हीं दोन ठाणीं वसई सोडून जातांना फिरंग्यांनीं इंग्रजांना कागदोपत्रीं बहाल करून टाकिलीं व मराठ्यांकडून मिळाल्यास घ्यावीं असा आशीर्वादही दिला. परंतु सबंध हत्ती गिळल्यावर हीं शेपटें मराठ्यांच्या हातून सुटतील अशी खात्री नसल्यामुळें, इंग्रजांनीं ह्या दोन ठाण्यांविषयीं चकार शब्दहि काढिला नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं हीं दोन्हीं ठाणीं मराठ्यांच्या हातीं पडलीं. चेऊल शहरच्या स्थितीविषयीं येथें थोडा विस्तार करणें जरूर आहे. चेऊल शहरांत पूर्वीं आंग्रे, सिद्दी व फिरंगी अशा तीन लोकांचा अंमल असे. जंजिऱ्याच्या मोहिमेंत सिद्दी याचा चेऊल शहरांतील भाग आंग्रे यांस मिळाला व वसईंतील युद्धांत फिरं-

ग्याचाहि भाग मराठ्यांना प्राप्त झाला. येणेंप्रमाणें १७३९ त सबंध चेऊल शहर मराठ्यांच्या हातीं आलें.

१८. सावंत, कोल्हापूरकर, आंग्रे, हबशी, फिरंगी व इंग्रज ह्या लोकांनीं आजपर्यंत कोंकणांत जो धुडकूस चालविला होता तो १७३९ त पेशव्यांनीं बंद केला. १७३९ त कोंकणांत निवळ पेशव्यांचें एकछत्री राज्य सुरू झालें. फिरंग्यांचा तर केवळ नायनाट होऊन गेला. हबशी पेशव्यांचा एक लहानसा मांडलिक बनून राहिला. इंग्रजांनीं मुंबईंत राहून उदीम करण्याचें पत्करिलें. येणेंप्रमाणें कोंकणांत सर्वत्र सामसूम झालें. जर कांहीं कोठें कोंकणांत गडबड होण्याचा संभव राहिला असला तर तो संभाजी व मानाजी आंग्रे ह्यांच्या घरांतील तंट्यासंबंधानेंच काय तो रहाण्यासारखा होता. संभाजी आंग्रे सरखेल ह्याच्या मनामध्यें मानाजी आंग्रे वजारतमाब ह्याच्या ताब्यांत असलेला कुलाब्याचा वडिलोपार्जित किल्ला घ्यावयाचा होता. ह्या कामीं ब्रह्मेंद्रस्वामींची वरकरणी सल्ला संभाजीला असावी असा अंदाज आहे ( खंड ३, ले. २८४ ). शाहूमहाराजांचीहि संभाजीला फूस असावी असा संशय घेण्यास कारण आहे ( कित्ता ). बाजीरावाचें महत्त्व वाढत चाललेलें शाहूराजाला खपेनासें होऊन संभाजीकडून पेशव्यांच्या वतीचा जो मानाजी त्याजवर स्वारी करवावी असा शाहूचा बेत होता. त्याप्रमाणें १७४० च्या जानेवारी–फेब्रुवारींत बाजीराव व चिमाजी अप्पा औरंगाबादप्रांतीं आहेत असा समय पाहून संभाजीनें मानाजीवर चालून घेतलें ( खंड ३, ले. २८४ व पा. ब्र. च. ले. ५६ ). अलीबाग, हिराकोट, थळचाकोट, राजकोट, सागरगड, वगैरे जागा संभाजीनें फत्ते केल्या. ह्या उत्पातांची बातमी लागतांच चिमाजी अप्पा व बाळाजी बाजीराव १७३९ च्या एप्रिलांत पालीवरून कुलाब्यास मानाजीच्या साहाय्यास आले. हिराकोटास तुळाजी आंग्र्या धरला गेला व संभाजी मोठ्या संकटानें समुद्रांतून पळून गेला. मानाजीला साहाय्य केल्याबद्दल पाल व मीरगड हे दोन किल्ले पेशव्यांनीं घेतले. संभाजीचा पाडाव करण्याच्या कामीं १७३९ तील तहाप्रमाणें इंग्रजहि मानाजीच्या व पेशव्यांच्या कुमकेस पाण्यांतून आले होते. १७४० तील ह्या उत्पातानंतर संभाजीनें १७४२ त मरेतोंपर्यंत फारशी हालचाल केली नाहीं. १७४० च्या नोव्हेंबरांत ब्रह्मेंद्रस्वामींच्या शिफारशीवरून तुळाजी आंग्र्याची बेडी बाळाजी बाजीरावानें काढून टाकिली ( पा. ब्र. च. ले. १४० व १५४ ). तुळाजीची शिफारस स्वामीनें अशा करतां केली कीं संभाजीनंतर मानाजी आंग्र्याला एखादा शह देतां येण्यास आपल्या हातीं साधन असावें. १७४० च्या सप्टेंबरांत बाजीरावाशीं व चिमाजी अप्पाशीं स्नेहभावानें वागत जावें असा उपदेश स्वामीनें मानाजीस केला. ह्यावर ही अद्भुत वार्ता आपण कोठून ऐकिली म्हणून मानाजीनें स्वामीस उलट प्रश्न विचारिला. लोकांच्या चित्तांत संशय उत्पन्न कसे करावे, संशय उत्पन्न झाल्यावर ते खरे कसे भासवावे, ही विद्या ब्रह्मेंद्राला उत्तम अवगत होती. मानाजीच्या मनांत भय उत्पन्न केल्यावर, बंधमुक्त तुळाजीलाहि स्वामीनें भेवडविण्याचा प्रयत्न केला. १७४२ त संभाजी वारल्यावर, आपल्याच शापानें तो मेला असें स्वामीनें जगजाहीर केलें ( पा. ब्र. च. ले. ३२२ ). हें

जगजाहिर केल्यावर सरखेली पद तुळाजीस करून देण्याचा पत्कर स्वामीनें घेतला. तुळाजीला असें अभिवचन दिल्यावर, मानाजीला सरखेलीचें पद मिळावें असेंहि बोलणें स्वामीनें सकवारबाईजवळ लाविलें. ही बातमी तुळाजीस कळल्यावर त्यानें स्वामीस ह्यासंबंधीं पत्र लिहिलें व स्वामीच्या ह्या कृत्रिमपणाबद्दल बहुत खेद दर्शविला. ( पा. ब्र. च. ले. १०० ). पुढें तुळाजीला कसेंबसें आपल्या बापाचें सरखेलीचें पद मिळालें. तें मिळाल्याबरोबर तुळाजीला स्वामीनें कर्जाचा तगादा लाविला व शिव्या श्राप देण्यास आरंभ केला. आपला हत्ती नेल्यामुळें कान्होजी मेला; आपल्या आज्ञा न ऐकिल्यामुळें सेखोजी आटपला; व आपला अपमान केल्यामुळें संभाजी नरकांत बुडाला; वगैरे मागील गोष्टींचीं आठवण तुळाजीस देऊन, आपलें कर्ज तावडतोब फेडण्यास तुळाजीस स्वामीनें हुकूम केला ( पा. ब्र. च. ले. ३२२ ). तो हुकूम अमलांत आणण्याइतकें सामर्थ्य तुळाजीच्या अंगीं नव्हतें. द्रव्य, वस्तभाव वगैरे सरखेलांकडे कान्होजीच्या वेळीं आपण ठेवीत होतों, ह्याची साक्षहि स्वामीनें आंग्र्यांचा प्रसिद्ध कारकून व मुत्सद्दी रघुनाथ हरि प्रभू यांजकडून पटविली व तुळाजीस अशी भीति घातली कीं, आपलें कर्ज उगवावयास पेशवे बळकट आहेत ( खंड ३, ले. ३५५ ). ह्याच सुमारास स्वामीनें नागोजी आंग्र्याकडून तुळाजीवर स्वारी कराविली ( पा. ब्र. च. ले. ७९ ). ह्या धमकावणीचा परिणाम काय होतो. तें पहाण्यास स्वामी ह्यापुढें फार दिवस वाचला नाहीं. १७४५ च्या २६ जुलैस दरवर्षाप्रमाणें समाधीस बसला असतां स्वामी एकाएकीं ब्रह्मरूप झाला. निर्वाणसमयीं छत्रपतीकडील कोणी सरदार आपल्याकरितां पालखी घेऊन आला आहे असा स्वामीला भास झाला. स्वामीच्या लौकिकी वृत्तीला हा भास अनुरूपच होता.

१९. कान्होजी आंग्र्याच्या उदयापासून संभाजी आंग्र्याच्या मृत्यूपर्यंत म्हणजे सरासरी इसवी सन १६८० पासून १७४२ पर्यंत कोंकणपट्टीतील राजकारणाचा वृत्तांत येथपर्यंत दिला आहे. ग्रांटडफ वगैरे लेखकांनीं ह्या ६२ वर्षांचा इतिहास, व विशेषतः १७२६ पासून १७४२ पर्यंतचा इतिहास इतका अस्पष्ट व भ्रामक रचिला आहे कीं, प्रस्तुत उपलब्ध झालेल्या साधनांचा उपयोग करून घेण्याची सुसंधि ज्यांना सुदैवानें मिळाली आहे त्यांना य लेखकांचे लेख अत्यंत असमाधानकारक वाटतात. आंग्रे, सिद्दी, पेशवे, छत्रपति, इंग्रज व फिरंगी ह्यांच्या हालचालींची सालवार जंत्री प्रथम रचून नंतर ती यथावकाश आपल्या इतिहासांत ग्रांटडफनें जर गोंविली असती, तर त्याचें लिहिणें सध्यां जितकें टाकाऊ वाटतें तितकें खचित वाटलें नसतें. सध्यां उपलब्ध झालेला ब्रह्मेंद्रस्वामीचा बहुतेक पत्रव्यवहार ग्रांटडफच्या पहाण्यांत यद्यपि आलेला होता, तथापि तो पत्रव्यवहार तारीखवार लावून त्याची सूक्ष्म छान करण्याची मेहनत त्यानें न घेतल्यामुळें, त्याचें सर्व लिहिणें आधुनिक टिकाकाराच्या आक्षेपास यथान्याय पात्र झालेलें आहे. बहुतेक अस्सल पत्रांवरून नुसता चंद्र आणि वार दिला असल्यामुळें त्यांची नक्की तारीख ठरविणें मुष्कील पडतें, ही ग्रांटडफची तक्रार आहे. [ Duff Chap, XV note. ] व हेंच त्याच्या इतिहासाचें मूळ व मुख्य व्यंग आहे. नाणीं, ताम्रपट, शिलालेख ह्यांची छान जितक्या बारकाईनें

व काळजीनें केली जाते, तितक्याच बारकाईनें व काळजीनें ऐतिहासिक लेखांचीहि छान होणें अत्यंत आवश्यक आहे. ही छान कशी करावी हें डफला माहीत नसल्यामुळें, त्याच्या हातांत हा पत्रव्यवहार पडून मराठ्यांचा इतिहास जाणूं पाहाणाऱ्या शोधक वाचकांना विशेषशी माहिती मिळण्याचा संभव राहिला नव्हता. अलीकडील दोन वर्षांत रा. पारसनीसांनीं ब्रह्मेंद्रस्वामीचीं सुमारें ३७५ पत्रें शोधून काढून ही छान करण्याचा सुप्रसंग आणून दिला आहे. रा. पारसनीसांनीं ह्या ३७५ पत्रांपैकीं बऱ्याच पत्रांच्या तारखा ठरविल्या नसल्यामुळें, व ज्या कित्येक पत्रांच्या तारखा त्यांनीं आपल्यामतें ठरविल्या आहेत त्यांपैकीं कांहीं चुकल्या असल्यामुळें, त्यांच्या हातून कोंकणांतील आंग्रे, सिद्दी वगैरेंच्या हालचालींचा वृत्तांत नीट रीतीनें उतरला नाहीं. शिवाय त्यांनीं ह्या पत्रांना ज्या टीपा दिल्या आहेत, त्यांपैकीं बऱ्याच टीपा ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत. ह्या तीन अडचणींमुळें रा. पारसनीस यांची मजल ग्रांट डफच्यापुढें फारशी गेली नाहीं. हवशी व आंग्रे ह्यांच्या राजकारणांतील गुंतागुंत आपल्याला नीट उलगडली नाहीं, असें रा. पारसनीस स्वतःच कबूल करतात ( चरित्र, पृष्ठ ४५, टीप ). आतां त्यांना ही गुंतागुंत नीट उलगडली नाहीं इतकेंच नव्हे, तर तत्कालीन वस्तुस्थितीचा विपर्यासहि यांच्या हातून सडकून झालेला आहे. हा विपर्यास होण्याला मुख्य कारण रा. पारसनीसांचे पूर्वग्रह होत. ( १ ) मराठ्यांच्या तत्कालीन राजकारणाचा मुख्य चालक ब्रह्मेंद्र होता हा त्यांचा पहिला पूर्वग्रह आहे. ह्या मुख्य पूर्वग्रहापासून त्यांनी आणखी दोन आनुषंगिक पूर्वग्रह काढिले आहेत. ते पूर्वग्रह हे:—( अ ) जंजिऱ्याच्या मोहिमेला ब्रह्मेंद्र कारण झाला व ( २ ) वसईच्या मोहिमेलाहि तोच कारण झाला. ब्रह्मेंद्र कारण कसा झाला व ह्या कारणीभवनाचें स्वरूप काय होतें ह्याचा मात्र उलगडा त्यांनीं कोठें केला नाहीं. 'स्वामींनीं राजकारण सिद्धीस नेण्याकरितां कसकशीं सूत्रें फिरविलीं हें समजण्यास मार्ग नाहीं' असें त्यांचें स्वतःचेंच मत आहे ( चरित्र, पृ. ८६ ). सारांश, मराठ्यांच्या राजकारणाचीं मुख्य सूत्रें ब्रह्मेंद्रस्वामी फिरवीत होता; परंतु तीं कशीं फिरवीत होता हें सांगतां येत नाहीं, असा सदर लेखकाच्या लिहिण्यांतील मतितार्थ आहे. ह्या मतितार्थांत कितपत तात्पर्य आहे ह्या गोष्टीची शहानिशा करणें जरूर आहे.

२०. ब्रह्मेंद्रस्वामी मराठ्यांच्या राजकारणाचीं मुख्य सूत्रें फिरवीत होता किंवा नाहीं हें पहावयाचें म्हटलें म्हणजे ह्यावेळचें मराठ्यांच्या राजकारणाच्या विस्ताराचें स्वरूप साद्यन्त ध्यानांत आणिलें पाहिजे. त्यावेळच्या मराठ्यांच्या राजकारणाचें रूप दोन प्रकारचें होतें. अंतस्थ व्यवस्था ठेवण्याचें राजकारण करणें हें एक रूप व सर्व भरतखंड हिंदुपदबादशाहींत आणणें हें दुसरें रूप. पैकीं पहिलें रूप कालान्तरानें बनत बनत कसें बनलें हें पहाणें मोठें मनोवेधक आहे. शहाजीच्या पूर्ववयांत जी एक लहानशी जहागीर होती, ती शिवाजीनें १६४६ त विजापूरच्या पातशाहींतून फोडून स्वतंत्र संस्थानाच्या पदवीस आणून सोडिली. विजापूरच्या पातशाहींतून स्वतंत्र झालेलें हें मावळांतील शकल वाढत वाढत १६७४ त सह्याद्रीच्या पृष्ठवंशाच्या पूर्वेस व पश्चिमेस बागलणापासून फोंड्यापर्यंत वीस पासून तीस

मैलांच्या अंतरानें पसरलें. ह्या प्रसाराला स्वराज्यस्थापन अशी संज्ञा आहे. ह्यावेळीं राजा व अष्टप्रधान हींच काय तीं राज्याचीं अंगें होतीं. शिवाजीचें महाराष्ट्र त्यावेळीं वंशपरंपरेनें चालणारें व अष्टप्रधानोपदिष्ट असें एकसत्तात्मक राज्य होतें. शिवाजीच्या नंतर २७ वर्षांनीं शाहू राज्यासनीं आल्यावर ह्या एकसत्तात्मक राज्यांत मांडलिक उर्फ सरंजामी सरदार उत्पन्न झाले. सरंजामी सरदारांनीं आपापल्या प्रांतांतील मुल्की, दिवाणी व लष्करी व्यवस्था पाहून छत्रपतींना पेषकष देऊन रहावें असा निर्बंध बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत पडला. सरंजामी सरदार उत्पन्न व्हावयाला व शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेर मराठ्यांची सत्ता पसरण्याला एकच गांठ पडली. स्वातंत्र्यार्थ लढाईचा निकाल औरंगझेबाच्या मृत्युसमयीं मराठ्यांच्या तर्फेनें लागल्यावर, मराठ्यांच्या शक्तीचा जोर स्वराज्याला पुरून परराज्यांत वावरूं लागला. मोंगलांची पिछेहाट झाल्यावर मराठ्यांची पेषामद व्हावी हें पराकाष्ठेची मेहनत करून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचें कुलक्रमागत व्रतच आहे. मोंगलांच्या प्रांतांत मराठ्यांची ही पेषामद मोठी चमत्कारिक झाली. राजाराम महाराज जिंजीस असतांना व राजाराम महाराज मृत्यु पावल्यावर खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोसले, चिमणाजी दामोदर, कान्होजी आंग्रे वगैरे सरदार बहुतेक स्वतंत्रपणें मोंगलांच्या प्रांतांत व मोंगलांनीं जिंकिलेल्या स्वराज्यांतील प्रांतांत अम्मल चालवीत होते. राज्यावर येण्याच्या समयीं व नंतर आपल्या पक्षाला वळकटी यावी या हेतूनें शाहूनें ह्या बहुतेक स्वतंत्र सरदारांना आपल्या राज्याचे बहुतेक स्वतंत्र असे सरंजामी सरदार अथवा मांडलिक केले. मोंगलांच्या प्रांतांत अंमल करणाऱ्या ह्या सरदारांस सरंजाम दिल्यावर स्वराज्यांतील अष्टप्रधान व इतर योद्धे यांसहि सरंजाम देणें शाहूस भाग पडलें. फितूर झालेल्या जाधव, निंबाळकर वगैरे सरदारांना निजमुन्मुलुखानें सरंजाम दिल्यामुळें, तितक्याच योग्यतेची लालुच आपल्याहि सरदारांना देण्याशिवाय दुसरी सोय शाहूजवळ राहिली नाहीं. सरदारांना सरंजामी करून टाकिल्यावर अष्टप्रधानांच्या उरावर शाहूनें एक मुख्य प्रधान अथवा पेशवा म्हणून अधिकारी नेमिला. येथून पुढें पेशवा मुख्य व अष्टप्रधान गौण असा प्रकार झाला. अष्टप्रधानांतील बरीच मंडळी ताराबाईच्या पक्षाची असल्यामुळें शाहूला ही तोड काढावी लागली. येणेंप्रमाणें मराठ्यांच्या राज्यपद्धतींत सरंजामी सरदारीचा नवीन प्रवेश झाला, व तींतून अष्टप्रधानपद्धतीचा हळूं हळूं लोप होत गेला. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत मराठी राज्यपद्धतीला, वंशपरंपरेनें चालणारी, एक प्रधानघटित मांडलिकसंस्थानोपवर्ति, संयुक्त लष्करी एकसत्तात्मक पद्धति अशी संज्ञा तंतोतंत लागू पडते. सारांश, शाहू व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या कारकीर्दीत संयुक्त साम्राज्याचें स्वरूप महाराष्ट्र राज्यपद्धतीला येत चाललें होतें, अथवा खरें म्हटलें असतां, आलेंच होतें. महाराष्ट्राच्या ह्या संयुक्त साम्राज्याचें रूप एका आधुनिक राष्ट्राच्या संयुक्त साम्राज्याच्या रूपासारखेंच होतें. इंग्लंड व इंग्लंडच्या वसाहती ह्यांचा जो संयोग सध्यां बनत चाललेला आपण पहात आहों तोच संयोग महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील सरंजामी सरदारांचीं संस्थानें ह्यांचा त्यावेळीं बनत होता. भेद इतकाच कीं, इंग्लंडांत प्रतिनिधिनिक्षिप्त व बहुप्रधानघटित, वंशपरंपरेनें चालणारी एक सत्ता आहे

आणि महाराष्ट्रांत त्या वेळीं एकप्रधानघटित अथवा पंतप्रधानघटित वंशपरंपरेनें चालणारी एक सत्ता होती. युनायटेड स्टेट्स, क्यानडा, ट्रान्सव्हाल ह्यांनीं जशी इंग्लंडच्या विरुद्ध आजपर्यंत वेळोवेळीं खटपट केली, त्याप्रमाणेंच आंग्रे, दाभाडे वगैरेंनीं महाराष्ट्राच्या विरुद्ध केली. वसाहतींतील संस्थानांचें हितसंबंध इंग्लंडच्या हितसंबंधांशीं गोवून टाकण्याचा ब्रिटिश मुत्सद्दी ज्याप्रमाणें सध्यां प्रयत्न करीत आहेत त्याप्रमाणेंच शाहू व बाळाजी विश्वनाथ यांनीं नवीन उत्पन्न झालेल्या सरदारांचे हितसंबंध आपल्या हितसंबंधाशीं गोवून टाकिले. सरदेशमुखी, बाबती, साहोत्रा वगैरे बाबींची वांटणी सरदारांच्या संस्थानांतून व जिंकलेल्या प्रांतांतून छत्रपति व सरदार ह्यांच्यामध्यें त्यांनीं अशी करून टाकिली कीं मुख्य सत्तेचा स्पर्श सरदारांच्या सदा अनुभवास यावा व सरदारांच्या हालचाली सदा मुख्य सत्तेच्या देखरेखीखालीं रहाव्या. बाळाजी विश्वनाथाच्या ह्या शिस्तीलाच ग्रांटडफ ब्राह्मणाचा कावा म्हणून दूषण देतो ( Duff, chap. xll ). कोणतेंहि राष्ट्र संयुक्त संस्थानाच्या पदवीला येऊन पोहोंचलें म्हणजे संयोगांतर्गत संस्थानाचे हितसंबंध मुख्य सत्तेच्या हितसंबंधाशीं गोवून टाकणें अत्यंत अवश्यक कसें होतें ह्याचा अनुभव डफला नसल्यामुळें मुत्सद्देगिरीच्या ह्या धोरणाला तो ब्राह्मणांचा कावा म्हणून दूषण देतो. परंतु संयुक्त साम्राज्याचें ओझें डोक्यावर येऊन पडलेल्या डफच्या नातवांना बाळाजी विश्वनाथाच्या ह्या धोरणाचा अर्थ जास्त उदात्त रीतीनें करतां येईल यांत संशय नाहीं. प्रसिद्ध इतिहासतत्त्ववेत्ते कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांनीं बाळाजी विश्वनाथाच्या ह्या सरंजामी पद्धतीचे गुणानुवाद मोठ्या भारदस्त शब्दांनीं गायिले आहेत व ते, तत्कालीन वस्तुस्थिति लक्षांत घेतां, सर्वथैव यथायोग्य आहेत. शिवाजीनें रचिलेल्या अष्टप्रधानघटित राज्यपद्धतीचें अनुकरण हिंदुस्थानांत ब्रिटिश मुत्सद्यांनीं केलें आहे असें ह्या तत्ववेत्त्याचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या साम्राज्याच्या हितार्थ बाळाजी विश्वनाथानें रचिलेली सरंजामी राज्यपद्धति, ब्रिटिश साम्राज्याशीं वसाहतींतील संस्थानांचे हितसंबंध जखडून टाकण्यास ब्रिटिश मुत्सद्यांनीं योजिलेल्या पद्धतीसारखीच आहे. बाळाजी विश्वनाथाच्या सरंजामी पद्धतींतील कांहीं कलमें येणेंप्रमाणें होतीं. ( १ ) आपापल्या ताब्यांतील प्रांतांत सरदारांनीं मुलकी व लष्करी अधिकार चालवावे. ( २ ) प्रांतांतील उत्पन्नाचे हिशेब सरकारच्या सरदारांना दाखवून सरकारांत रुजू करावे. ( ३ ) छत्रपति हुकूम करतील त्या मोहिमेस सरदारांनीं जावें. ( ४ ) सरकारच्या हुकुमाशिवाय परराष्ट्रांशीं तह किंवा लढाई करूं नये. ( ५ ) ठरविलेली पेषकष सरकारांत दरवर्षीं भरणा करावी. ( ६ ) सरंजामी सरदारी वंशपरंपरा नसून सरकारास वाटेल त्यास देतां यावी. ( ७ ) छत्रपतींनीं दिलेले किताब नांवापुढें चालवावे. ( ८ ) राज्याच्या बाबी प्रथम वसुलांतून काढून ठेवाव्या. ( ९ ) वसुलाच्या बाबी सरदारांनीं देशपरत्वें ठरवाव्या. ( १० ) येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर जकात बसवावी. ह्या पद्धतींतील हीं दहा कलमें मुख्य आहेत. ह्या पद्धतीअन्वयें, दाभाडे, आंग्रे, बांडे, भोंसले, वगैरे सरदारांशीं करारनामे बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत ठरले होते. ह्या कलमांतील कराराच्या विरुद्ध जो जाईल त्याचें पारिपत्य करणें छत्रपतींच्या अधिकारांतील होतें.

२१. महाराष्ट्राच्या सिंहासनावर शाहूच्या आरोहणानें ज्याप्रमाणें सरंजामी सरदारांची उत्पत्ति झाली, त्याप्रमाणेंच अवरंगझेबाच्या मरणानें मराठ्यांच्या संयुक्त सत्तेची अथवा साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा झाली. अवरंगझेबाची व अवरंगझेबाच्या सैन्याची वाताहत केल्यावर त्याच्या साम्राज्याचा उपभोग घेण्याचा प्रयत्न मराठ्यांनीं करावा, ही गोष्ट ओघांतीलच होती. पातशाहीचा उपभोग घेण्याचा प्रयत्न कसकसा होत गेला ह्याचाहि वृत्तान्त मोठा मनोरंजक आहे. १७०७ त दिल्लीच्या पातशाहांचा मांडलिक ह्या नात्यानें शाहू प्रथम महाराष्ट्रांत आला. शाहू महाराष्ट्रांत येण्याच्या अगोदर जाधव, दाभाडे, बांडे, आंग्रे, भोंसले, वगैरे सरदारांनीं अवरंगझेबाच्या भोंवतालील वऱ्हाड, खानदेश, गुजराथ, कोंकण, मिरज वगैरे प्रांतांत अंमल बसवून चौथाई व सरदेशमुखी वगैरे बाबी वसूल करण्याचा उपक्रम चालविलाच होता. शिवाजीच्या स्वराज्याच्या बाहेरील मोंगलांच्या प्रांतात अंमल बसविण्याचा हा जो उद्योग तोच मराठ्यांचें साम्राज्य स्वराज्याच्या बाहेर पसरविण्याचा ओनामा होय. स्वराज्याच्या बाहेर उद्योग करणाऱ्या ह्या सरदारांना आपल्या पक्षाकडे ओढून घेऊन, शाहूनें मराठ्यांचें साम्राज्य पसरविण्याच्या व्रताचाहि स्वीकार केला. परंतु हा स्वीकार शाहूनें मोठ्या नाजूक युक्तीनें केला. १७१८ त सय्यद बंधूंना साहाय्य करण्याकरितां जेव्हां बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेला, तेव्हां खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, कोंकण व विजापूर ह्या प्रांतांत मराठ्यांनीं मिळविलेला मुलूख दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या सनदेबरोबर पातशहाकडून बहाल व्हावा अशी अट सय्यदांकडून शाहूनें कबूल करून घेतली. चिनकुलीचखानाचा म्हणजे निजामुन्मुलुखाचा पक्ष दुर्बल करण्यास, सय्यदांचा मराठ्यांना ही अट बहाल करण्यांत फायदाच होता. गुजराथ, वऱ्हाड, बंगाला, ओढ्या, माळवा, औरंगाबाद, विजापूर, कोंकण वगैरे प्रांतांत जेथें जेथें सय्यदांचे शत्रू असतील तेथें तेथें त्यांना मराठ्यांकडून तंबी बसावी हा तर सय्यदांचा मुख्य हेतु होता. दिल्लीच्या पातशहाच्या हुकुमानें त्या त्या प्रांतांतील मुसलमान सुभेदारांशीं आपण भांडत आहोंत असा राजरोस हक्क सुभेदारांचे प्रांत जिंकण्यांत मराठ्यांनाहि सांगतां आला. ह्यावेळीं पातशहानें नेमिलेले मुसलमान सुभेदार दिल्लीपतीचे शत्रू म्हणून नांवाजले गेले व मराठे आज्ञाधारक सेवक म्हणून दुनियेंत प्रसिद्ध झाले. निजामुन्मुलूख, सरबुलंदखान, जंजिरेकर, दयाबहादूर वगैरे सुभेदारांशीं मराठ्यांचीं जीं युद्धें झालीं तीं मराठे दिल्लीपतीचे सेवक ह्या नात्यानेंच झालीं. सारांश, मराठ्यांचें साम्राज्य दिल्लीपतीची सेवा करतां करतांच वाढलें.

२२. ब्रह्मेंद्रस्वामीच्या हयातींत मराठ्यांच्या राजकारणाचें अंतःस्वरूप व बहिःस्वरूप हें असें दोन प्रकारचें होतें. आतां ब्रह्मेंद्रस्वामी मराठ्यांच्या राजकारणाचा मुख्य सूत्रधार होता हा जर ग्रह खरा धरला तर सरंजामी सरदारीची पद्धत व साम्राज्य-वर्धनाचा उपक्रम ह्यांच्या मूळाशीं ब्रह्मेंद्र असला पाहिजे. परंतु ह्या दोन पद्धती बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत अंमलांत येत असतांना, ब्रह्मेंद्र कोंकणांत व कोंकणच्या आसपास परशराम येथील देवालय बांधण्याकरितां भिक्षा मागत हिंडत होता. साम्राज्य पसरविण्याचा उपक्रम शाहूच्या राज्यारोहणाच्या अगोदर अवरंगजेब जिवंत असतांनाच होत चालला होता हें

वर दाखवून दिलें आहे. तसेंच सरंजामी सरदारीची पद्धत शाहूला स्वपक्षपुष्टीकरणार्थ स्वीकारावी लागली, ह्याचेंहि स्पष्टीकरण वर केलें आहे. तेव्हां ह्या वेळच्या मराठ्यांच्या राजकारणाचीं हीं मुख्य रूपें घडविण्यांत स्वामीचें अंग बिलकुल नव्हतें हें उघड आहे.

२३. सरंजामी सरदारीची पद्धति व साम्राज्याची स्थापना ह्यांच्या मुळाशीं यद्यपि ब्रह्मेंद्रस्वामी नसला, तत्रापि ह्या दोन्ही संस्था वर्धमान स्थितींत असतांना त्यांच्यावर स्वामीच्या प्रतिभेचे ठसे उमटले जाण्याचा संभव आहे असें कोणाचें म्हणणें पडेल. परंतु बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या राजकारणांत ब्रह्मेंद्राचा म्हणण्यासारखा प्रवेश झालेला दिसत नाहीं. कां कीं, १७२७ च्या पूर्वीं स्वामीचा पत्रव्यवहार मुदलांतच फारसा नव्हता किंवा कदाचित् असलाच तर तो प्रस्तुत कालीं आपल्याला अनुपलब्धीमुळें नसल्यासारखाच आहे. त्यामुळें १७२७ च्या पूर्वींचा स्वामीच्या मुत्सद्दीपणाचा माग लावण्यास कांहींच साधन उरलें नाहीं. १७२७ त स्वामी धावडशीस कायमचा रहावयास आल्यानंतरचा जो पत्रव्यवहार उपलब्ध झाला आहे त्यावरून मात्र, स्वामीच्या प्रतिभेचा ठसा मराठ्यांच्या राजकारणावर कितपत उमटला आहे, तें समजण्यास उत्तम सोय झाली आहे. ह्या पत्रव्यवहारावरून मराठ्यांच्या राजकीय चरित्राच्या प्राणभूत अशा ज्या-सरंजामी सरदारी व साम्राज्यस्थापना-दोन संस्था त्या वर्धमान होत असतां त्यांत स्वामीनें कांहीं फेरबदल करण्याची मसलत दिली होती असें ओढून ताणून म्हणण्यालाहि यत्किंचित् पुरावा सांपडत नाहीं. गुजराथ, खानदेश, वऱ्हाड, माळवा, विजापूर ह्या प्रदेशांत मराठ्यांच्या ज्या खटपटी १७२० पासून १७४० पर्यंत बाजीरावाच्या कारकीर्दींत झाल्या, त्याशीं ब्रह्मेंद्राच्या मसलतीचा कांहीं संबंध होता असें म्हणण्यास एका अक्षराचाहि आधार मिळणें मुष्कील आहे. १७४० पासून १७४५ पर्यंत बाळाजी बाजीरावानें हिंदुस्थानांत व इतरत्र ज्या खटपटी केल्या त्यांच्यांशीं तर स्वामीचा काडीचा संबंध नव्हता. कां कीं, बाजीरावाच्या कारकीर्दींत स्वामीला जो मान मिळत असे तो बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत मिळत नव्हता. तेव्हां स्वामीच्या मसलतीचा ठसा जर कांहीं कोठें उमटला असेल तर तो हिंदुस्थानच्या राजकारणांत किंवा दक्षिणच्या राजकारणांत उमटला नाहीं हें निश्चित आहे. दक्षिण व हिंदुस्थान वगळून बाकी राहिलेलें जें कोंकण, तेथील राजकारणांत स्वामीचा कांहीं हात होता हें मात्र प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. आतां कोंकणच्या मसलतींत स्वामीचा हात होता ह्या विधानाचा अर्थ स्वामी कोंकणच्या मसलतीचा सूत्रधार होता असा करण्यांत तात्पर्य नाहीं. कां कीं, १७२६ त जंजिऱ्याच्या हबशाशीं जें युद्ध सुरू झालें, तें ब्रह्मेंद्र वरघाटीं येण्याच्या पूर्वीं झालेलें होतें, हें ध्यानांत धरिलें पाहिजे. तसेंच हें युद्ध १७२६ त निजामुन्मुलुखाशीं सुरू झालेल्या युद्धाचा भाग होता, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. शिवाय हबशाशीं युद्ध सुरू असतांना, त्याचा हत्ती सावनुराहून आणण्याचा पत्कर स्वामीनें ज्याअर्थीं घेतला होता त्याअर्थीं लढाई सुरू होतांना ब्रह्मेंद्राचा व हबशाचा स्नेह होता हें सिद्ध आहे. अर्थात् ब्रह्मेंद्र जंजिरेकर हबशाच्या युद्धाचा मूळ सूत्रधार होता असें विधान बिलकुल करतां येत नाहीं. आपला हत्ती स्वामीनें आंग्र्यां-

च्या हातांत जाणूनबुजून जाऊं दिला अशी गैर समजूत करून घेऊन हबशानें जेव्हां ब्रह्मेंद्राच्या देवालयाचा उध्वंस केला, तेव्हां हबशाचा सूड उगविण्याच्या इच्छेनें स्वामी साताऱ्यास आला व हबशाचा नाश करण्यास शाहूस व बाजीरावास प्रोत्साहन देता झाला. स्वामीच्या देवालयाचा उध्वंस हबशानें केला नसता, तत्रापि त्याचें पारिपत्य करणें शाहूस आवश्यकच झालें होतें. निजामुन्मुल्ख व कोल्हापूरकर संभाजी ह्यांचा हस्तक जो हबशी त्याचा पाडाव करणें हें त्यावेळच्या युद्धाचें एक अंगच होतें. सारांश, प्रासंगिक प्रोत्साहनाव्यतिरिक्त स्वामीचा हबशाच्या युद्धाशीं फारसा संबंध नव्हता. हबशाच्या युद्धानंतरचें दुसरें मोठें कोंकणांतील युद्ध म्हटलें म्हणजे वसईची मोहीम होय. ह्याहि युद्धाचीं मूळ सूत्रें स्वामीनें हलविलीं असें म्हणण्यास पुरावा नाहीं. कारण कीं, वसईच्या मोहिमेचा बूट खंडोजी माणकर, मोरोजी शिंदे वगैरे साष्टींतील मसलती पुरुषांनीं चिमाजी आप्पा कोंकणांत १७३७ त उतरण्यापूर्वीच काढिला होता. वसईच्या मोहिमेची बारीक पूर्वपीठिका साष्टीच्या बखरींत बरीच इत्थंभूत दिली आहे, तींत ब्रह्मेंद्रस्वामीचा दुरूनहि उल्लेख केलेला नाहीं. १७३७ त चिमाजी आप्पा कोंकणांत साष्टीकडे गेला, त्यावेळीं मात्र ब्रह्मेंद्रानें वसई तुम्हांस खास मिळेल, असा आशीर्वाद वारंवार दिला. ह्या आशीर्वचनाव्यतिरिक्त ब्रह्मेंद्रानें वसईची मोहीम फत्ते होण्यास कांहीं साहाय्य केलें होतें असें दिसत नाहीं. सारांश, मराठ्यांच्या साम्राज्याच्या मूलस्थापनेशीं किंवा वर्धमानस्थितीशीं सूत्रधार ह्या नात्यानें ब्रह्मेंद्राचा कांहीं एक संबंध नव्हता असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

२४. हबशाच्या युद्धाशीं किंवा वसईच्या मोहिमेशीं सूत्रधार ह्या नात्यानें ब्रह्मेंद्राचा कांहीं एक संबंध नव्हता हें जरी खरें आहे, तथापि आंग्र्यांची सत्ता दुभंग करण्याच्या कामीं स्वामीनें आपल्याकडून बरीच मेहनत घेतली होती, हें आतांपर्यंत दिलेल्या कोंकणच्या हकीकतीवरून उघड आहे. हत्तीच्या प्रकरणावरून व कर्जावरून कान्होजीचें व स्वामीचें तेढें कसें आलें, सेखोजी, संभाजी, मानाजी व तुळाजी ह्यांचीं मनें स्वामीनें परस्परांविषयीं कशीं कलुषित केलीं, त्यांना कोणकोणत्या धास्त्या घातल्या वगैरे प्रकरणांचें वर्णन मागें दिलेंच आहे. ह्या वर्णनावरून स्वामीची सर्वाभूतांच्या ठायीं कितपत समबुद्धि होती, हें वरवर वाचणाऱ्या वाचकांसहि कळून येण्यासारखें आहे. खरें म्हटलें असतां, आंग्र्यांचा नाशच पहाण्याची जर स्वामीची इच्छा होती, तर स्वामीनें कांहीं एक खटपट केली नसती तरी देखील चालण्यासारखें होतें. आंग्रे आपल्या कर्मानेंच मरत होते. छत्रपतींच्या व बाजीरावाच्या विरुद्ध जाण्याचा आंग्र्यांचा जन्मस्वभावच होता व त्यांचे पाय लंगडे करावे असा शाहूचा व बाजीरावाचा विचारच झाला होता. संयुक्त साम्राज्यांतील सरंजामी सरदार छत्रपतींच्या किंवा त्यांच्या मुख्य प्रधानाच्या हेतूंच्या विरुद्ध जेव्हां जात, तेव्हां त्यांस तंबी पोहोंचविणें, त्यांचीं मनें ताळ्यावर आणणें किंवा तीं ताळ्यावर येत नसल्यास त्यांची सत्ता कमी करणें, हें त्यावेळच्या मराठ्या मुत्सद्यांचें कर्तव्य होऊन बसलें होतें. ह्या कर्तव्यकर्मास सादर होऊन बाजीरावानें श्रीपतराव प्रतिनिधि, त्र्यंबकराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, पिलाजी जाधवराव, दमाजी थोरात वगैरे मंडळींचें वेळो-

वेळीं शासन केलें. अशा वेळीं ब्रह्मेंद्रस्वामीसारख्या मनुष्याचें कर्तव्य कांहीं निराळ्याच प्रकारचें असलें पाहिजे होतें. महाराष्ट्र साम्राज्यांतील मुख्य सत्तेच्या केंद्रीकरणार्थ बाजीरावानें आरंभिलेल्या कर्तव्यात्मक निष्ठुर कृत्यास ब्रह्मेंद्रानें साहाय्य निराळ्या प्रकारचें केलें पाहिजे होतें. कार्यकर्त्या पुरुषांच्या निष्ठुर वर्तनाचे जे भयंकर आघात होतात, ते प्रतिपक्षाच्या हृदयांत खोल घरें करतात व त्याचे परिणाम फार दूरवर पसरतात. अशा वेळीं आघाताचा भयंकरपणा सौम्य करण्यास भारदस्त मध्यस्थ लागत असतात. ब्रह्मेंद्रासारख्या उदासीन पुरुषाचें हें मध्यस्थीचें काम होतें. तो उदासीन पुरुषच जर भ्रांतचित्त झाला, तर भोंवतालील राजकीय वातावरण क्षुब्ध झाल्यास नवल कसचें ? प्रस्तुत खंडांत छापिलेलीं आंग्र्यांचीं पत्रें किंवा रा. पारसनिसांनीं छापिलेलीं त्यांचीं पत्रें पहावीं तर त्यांत सेखोजी, संभाजी, तुळाजी, मानाजी, मथुराबाई, लक्ष्मीबाई, आपल्यावर स्वामीनें मेहेरनजर करावी, छत्रपतींचें मन आपल्याविषयीं प्रसन्न करावें, पेशव्यांचें व आपलें सौरस्य करून द्यावें, अशा विनवण्या परम नम्रतेनें करीत आहेत असें दृष्टोत्पत्तीस येतें. ह्या विनविण्यांचा परामर्ष स्वामी कसा काय घेतों हें पहावयास जावें तों निराळाच चमत्कार पहाण्याचा प्रसंग येतो. क्षुल्लक कारणावरून रागास पेटणें, शिव्या श्राप देणें, बंधुविरोध माजविणें, अभद्र शब्दांचा उच्चार करणें, असले अनन्वित प्रकार परमहंसाचे चाललेले पहाण्यांत येतात. संभाजी व तुळाजी आंग्रे मूर्खांतले मूर्ख व दुष्टांतले दुष्ट होते हें कबूल आहे. त्यांचें शासन छत्रपति व पेशवे राजरोस रीतीनें करीत होते. असें असतां ब्रह्मेंद्रस्वामी ज्याअर्थीं खासगी द्वेषाचें व वैराचें निर्यातन करण्याच्या बुद्धीनें आंग्र्यांचा नाश करण्यास प्रवृत्त झाला, त्याअर्थीं मराठ्यांच्या वाढत्या साम्राज्यांतील सरंजामी सरदारांना मुख्य सत्तेचे आधारस्तंभ बनविण्याच्या पुढारपणाच्या कामगिरीस स्वामीची लायकी फार कमी दर्जाची होती असें म्हणणें भाग पडतें. महाराष्ट्र त्यावेळीं संयुक्त सत्तेचें स्वरूप धारण करीत होतेंच. प्रत्येक सरंजामी सरदार आपापल्या ठिकाणीं साधेल तितकें स्वातंत्र्य उपभोगण्याचा प्रयत्न करी. गुजराथेंत दाभाडे, खानदेशांत बांडे, वऱ्हाडांत भोंसले व कोंकणांत आंग्रे मुख्य सत्तेच्या विरुद्ध नाना युक्तींनीं जात. अशा प्रसंगीं एकीचें माहात्म्य व दुहींचें दौर्बल्य, ह्या सरदारांच्या मनावर ठसवून मुख्य सत्तेशीं निष्ठापूर्वक वर्तन करण्याचा उपदेश स्वामीसारख्या निरिच्छ पुरुषानें करावयाचा. परंतु तसें कांहींएक न करितां, इतर सामान्य अप्पलपोट्या मनुष्याप्रमाणें स्वामी आंग्र्यांचा खासगी द्वेष करून जास्तच दुही माजवूं लागला, हें राष्ट्रांतील पुढाऱ्यांचें गुरुत्व पावलेल्या पुरुषाला अगदीं शोभण्यासारखें नव्हतें. कामक्रोधादि षड्रिपूंना जिंकून यमनियमादि अष्टांगासिद्धि संपादिल्याचा आव ज्या पुरुषानें घालावा तोच जर क्षणोक्षणीं कामक्रोधांच्या आधीन होऊं लागला, तर श्रेष्ठ पुरुषाचें अनुकरण करणारे सामान्य जन तमोवृत्तीचे मूर्तिमंत पुतळे बनल्यास आश्चर्य कोणतें ? राष्ट्रांतील पुढाऱ्यांची व श्रेष्ठ पुरुषांची दानत धुतल्या तांदुळासारखी असली तरच इतर सामान्य जनांची नीतिमत्ता मर्यादेंत रहाते. पुढारी व श्रेष्ठ पुरुष कामक्रोधांनीं विकृत होऊन परस्परांना पाण्यांत पाहूं लागले व असें तामसी वर्तन ठेवूनहि त्यांचा बडीजाव दिवसेंदिवस वाढतच आहे असें कांहीं कालपर्यंत दिसलें म्हणजे त्यांचें अनुकरण करण्याची इच्छा भोंव-

तालील मंडळीला व पुढील पिढीला अवश्यमेव होते व कालांतरानें सर्वत्र बजबजपुरी माजून राष्ट्राचा विलय होतो. ब्रह्मेंद्रस्वामींनें आंग्र्यांशीं जें लावालावीचें नीच वर्तन केलें व ज्या नीच वर्तनाला भिऊन आंग्रे, दाभाडे वगैरे सरदारांना स्वामीचा दरारा भयंकर वाटला, त्याचेंच अनुकरण पुढील पिढींतील रघुनाथराव, सखारामबापू, सखाराम हरि, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, तुळाजी आंग्रे, गोविंदपंत बुंदेले, पटवर्धन, वगैरे मंडळींनीं केलें. ह्या दुसऱ्या पिढीचें अनुकरण भोसल्यांचे दिवाण देवाजीराव, महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरे नाना फडणिसाच्या समकालीन तिसऱ्या पिढींतील पुढाऱ्यांनीं केलें. व ह्या तिसऱ्या पिढीचें अनुकरण दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर, बाळोबा कुंजीर वगैरे सरसकट सर्व मराठा व ब्राह्मण सरदारांनीं केलें. सारांश, भगवीं वस्त्रें पांघरून कृष्णकर्में करण्याचा, परस्परांत वैमनस्यें माजविण्याचा, ज्यांनीं विश्वास ठेविला त्यांचे गळे कापण्याचा धडा महाराष्ट्रांत ब्रह्मेंद्रस्वामींनें प्रथम घालून दिला व तो धडा पुढील एकेका पिढीनें जास्त जास्त गिरविला. महाराष्ट्राच्या नाशाला जी कारणपरंपरा साधनीभूत झाली, तिची पूर्वपिठिका ही अशी आहे.

२५. ब्रह्मेंद्रस्वामीच्या हयातींत जी ही कारणपरंपरा सुरू झाली, तिचा अर्थ उत्कटत्वेंकरून मनांत भरण्यास दुसऱ्या एका कारणपरंपरेशीं तिची तुलना करून दाखविल्यास उत्तम होईल. शिवाजीच्या कारकीर्दींत रामदासस्वामींनें नीतिमत्तेचा, देशाभिमानाचा, परस्पर विश्वासाचा व राजनिष्ठेचा धडा घालून दिला. तो १६४६ पासून १६८० पर्यंत शिवाजीनें, शिवाजीच्या मुत्सद्यांनीं व शिवाजीच्या सरदारांनीं मनोभावानें गिरविला. पुढें संभाजी गादीवर येऊन त्यानें करूं नयेत अशीं अनान्वित कर्म केलीं. त्यांचीं फळेंहि तो लवकरच पावला; परंतु त्याच्या गैदी व तामसी वर्तनानें वडिलोपार्जित स्वराज्य अवरंगझेबाच्या हातांत बहुतेक गेल्यासारखेंच झालें. शिवाजीनें, रामदासानें व तत्समकालीन मुत्सद्यांनीं व सरदारांनीं घालून दिलेला नितिमत्तेचा, देशाभिमानाचा, परस्पर विश्वासाचा व राजनिष्ठेचा धडा पुढील पिढी कितपत गिरविते ह्याची परीक्षा ह्यावेळीं झाली. राजारामानें देशत्याग केला. शाहू शत्रूच्या हातांत सांपडला, सर्व स्वराज्य मोंगलांनीं पादाक्रांत केलें, व अवरंगझेबानें नानाप्रकारचीं आमिषें दाखविलीं; परंतु ह्या संकटपरंपरेंतील एकाचीहि पर्वा न करतां ह्या पुढील पिढींतील मुत्सद्यांनीं व सरदारांनीं स्वातंत्र्यार्थ लढण्याची पराकाष्ठा केली, व स्वातंत्र्य मिळविण्याचा पण शेवटास नेऊन आपलें पुढारपण व श्रेष्ठत्व सार्थ करून दाखविलें. ह्यावरून लक्षांत एवढेंच घ्यावयाचें कीं, जाज्वल्य नितिमत्ता आपला गुण सहसा विसरत नाहीं. आतां ह्या नीतिमत्तेच्या धड्याच्या जोडीला दुसऱ्या बाजीरावाच्या वेळची नीतिमत्ता अथवा अनीतिमत्ता घ्या. १७९६ पासून १८१८ पर्यंत बाजीरावाच्या कारकीर्दींत दंगेधोपे, परस्पर मत्सर, देशद्रोह, यादवी, भ्रष्टाचार वगैरे सर्व कांहीं प्रकार होऊन, शेवटीं भरतखंडांतील मराठ्यांची सत्ता नष्ट होण्याचा वेळ आला. दुष्ट, भ्रष्ट, भेकड, अविश्वासी, कर्तृत्वशून्य असा जो बाजीराव त्याचा जर द्वेष सर्व सरदारांना झाला होता तर त्याला काढून किंवा दाबांत ठेवून मराठ्यांची संयुक्त सत्ता राहिली नसती

असें नाहीं. शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पटवर्धन वगैरे सरदारांची इभ्रत संयुक्त-सत्ता तोलून धरण्याइतकी नव्हती अशी कांहीं गोष्ट नव्हती. महाराष्ट्रांतील शिलेदार, सुख-वस्तू लोक, साधू, संत, भिक्षुक, शास्त्री कोठें पळून गेले होते अशांतलाहि प्रकार नव्हता; परंतु परस्पर विश्वास, देशाभिमान वगैरे जे राष्ट्रीय नीतिमत्तेचे मुख्य घटक त्यांची सर्वत्र वाण पडल्यामुळें ह्या सरदार, शिलेदार व मुत्सद्दी मंडळींनीं बाजीराव ब्रह्मवर्तास गेलेला सुखानें पाहिला. ब्रह्मेंद्रस्वामीनें घालून दिलेला चुगल्या करण्याचा, भांडणें लावण्याचा, विश्वासघात करण्याचा धडा दोन पिढ्या गिरविल्याचा हा परिणाम झाला. अवरंगझेबाच्या वेळीं ज्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं स्वातंत्र्यार्थ जिवापाड मेहनत घेतली, त्याच राष्ट्रांतील मंडळी बाजीरावाच्या वेळीं केवळ स्तब्ध व उदासीन राहिली. रामदासी व भार्गवरामी धड्याचे हे असे निरनिराळे परिणाम झाले. १७९५ त नाना फडणिसाच्या कारकीर्दींत जी टोलेजंग इमारत भक्कम असावी असें वाटलें, ती त्याच्यानंतर दहा पांच वर्षांत अशी एकाएकीं डबघाईस कशी आली ह्याचें कित्येकांना आश्चर्य वाटतें; परंतु ह्या राष्ट्राची राष्ट्रीय नीतिमत्ता ब्रह्मेंद्रस्वामीपासून दोन तीन पिढ्या बिघडत बिघडत बाजीरावाच्या कारकीर्दींत पूर्णपणें नासून गेली ही गोष्ट जर लक्ष्यांत घेतली तर आश्चर्य वाटण्याचें कांहीं एक कारण राहणार नाहीं. नाना फडणिसाच्या कारकीर्दींत महादजी शिंदे, तुकाजी होळकर, फत्तेसिंग गायकवाड, भोसले, पटवर्धन वगैरे महाराष्ट्र साम्राज्यांतील सरदारानीं संयुक्त सत्तेला न जुमानतां परराष्ट्रांशीं तह करण्याचा अभ्यास केला व संयुक्त सत्तेची शकलें बहुतेक अर्धी मुर्धी करून ठेविलीं. नाना फडणिसासारख्या नीतिमान मुत्सद्याचें दडपण गेल्यावर ही अनीतिमत्ता पूर्णपणें अनियंत्रित झाली व ब्रह्मेंद्रस्वामीनें लाविलेल्या रोपास, कडू फळें आलीं.

२६. हबशाच्या लढाईशीं, किंवा वसईच्या मोहिमेशीं, किंवा इतर कोठीलहि मसलतीशीं ब्रह्मेंद्राचा जर म्हणण्यासारखा संबंध नव्हता, तर तो पुढारी ह्या पदवीला कधींच पोहोंचला नव्हता व त्याच्या अंगच्या दुर्गुणांचा वर वर्णन केला इतका प्रभाव होण्याचा संभव मुळींच नव्हता अशी शंका आणतां येण्याजोगी आहे. आंग्रे, दाभाडे वगैरे एक दोन सरदारांशींच कायतो स्वामीचा निकट संबंध होता व त्यांच्यांशीं केलेल्या दुर्वर्तनाचा इतका दूरवर परिणाम पोहोंचेल हें संभवत नाहीं असेंहि कित्येकांचें म्हणणें पडेल. ह्या शंकांवर उत्तर असें आहे कीं, यद्यपि लढाया, मोहिमा, वगैरे मसलतींशीं स्वामींचा संबंध नव्हता, व ह्या नात्यांनीं यद्यपि त्याला पुढारी ही संज्ञा देतां येणें मुष्कील आहे, तथापि बाजीराव, चिमाजी अप्पा, शाहूमहाराज वगैरे महाराष्ट्रांतील अत्यंत श्रेष्ठ पुरुषांचें गुरुत्व स्वामीस प्राप्त झाल्यामुळें त्याच्या शब्दाला व हालचालींना एका प्रकारचें महत्त्व आलेलें होतें. शाहू-महाराज, बाजीराव व चिमाजी अप्पा ह्यांची कृपादृष्टि करून घेणें ज्यांस इष्ट असे, त्यांना ब्रह्मेंद्रस्वामीचे पाय धरणें उपयोगाचें होईल असें वाटण्याचा संभव असे. बाकी ब्रह्मेंद्र-स्वामीची आराधना सदाच सफल होत असे असा मात्र नियम नव्हता. (१) सयाजी कनोजा म्हणून स्वामीच्या प्रीतींतलि एक माणूस होता. त्याला सेखोजी आंग्र्यानें १७३० त

कामावरून दूर केलें. ह्या मनुष्याला ब्रह्मेंद्रानें संभाजीकडे, बाजीरावाकडे व चिमाजी आप्पाकडे शिफारस करून पाठविलें. परंतु ह्या शिफारसीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पुढें बाळाजी बाजीराव पेशवाईवर आल्यानंतर स्वामीनें कनोजाचें गाऱ्हाणें त्याजकडे नेलें ( पा. ब्र. च. ले. २८९ व ७२ ) व नोकरीचें आश्वासन मिळविलें. ( २ ) सात शेणवयाला गोव्याकडे नेमावें म्हणून स्वामीनें शिफारस केली ( पा. ब्र. च. ले. ३८ ) परंतु ती साधक बाधक प्रमाणें दाखवून पेशव्यांनीं अमान्य केली. ( ३ ) मानाजी आंग्र्यावर लोभ करावा म्हणून स्वामीनें चिमाजी अप्पास लिहिलें ( पा. ब्र. ता. ले. १३२ ). सुधें वर्तल्यास त्यावर लोभ करूं म्हणून चिमाजीनें उत्तर दिलें. स्वामीच्या शिफारसीचा फारसा उपयोग झाला नाहीं असे आणीकहि दाखले स्वामीच्या पत्रव्यवहारांत पुष्कळ आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, स्वामीची शिफारस योग्य असल्यास तिचा आदर पेशवे करीत असत. रा. पारसनिसांनीं छापिलेल्या १२५ वगैरे लेखांकांत योग्य शिफारसीचा आदर केलेला दृष्टीस पडतो. स्वामींच्या शिफारशींची अशी जरी व्यवस्था असे तत्रापि फलद्रूप होणाऱ्या शिफारशींकडेच तेवढें लक्ष देण्याची गरजू मनुष्यांची जी सार्वत्रिक चाल आहे, तिला अनुसरून अनेक सरदार व सरदारांच्या बायका प्रसंगविशेषीं स्वामींच्या मध्यस्थीचा उपयोग करून घेत असत. स्वामींचें मुख्य महत्त्व म्हटलें म्हणजे हेंच होतें. ह्याच महत्त्वाच्या जोरावर स्वामी पुष्कळ लोकांना टाकून बोले व छत्रपतींनीं माझा असा मान ठेविला, पेशव्यांनीं माझा तसा बडीजाव केला, वगैरे गोष्टी सांगून तो चोहोंकडे आपली छाप बसवी. राधाबाई पेशवीण, राधाबाई थोरातीण, उमाबाई दाभाडीण, लक्ष्मीबाई आंग्री वगैरे सरदारस्त्रियांच्या पत्रांत स्वामीची छाप ह्या बायांच्या मनावर केवढी बळकट बसली होती हे उत्तम तऱ्हेनें पहावयास मिळतें. संभाजीला शापून भस्म करून टाकिला, तुळाजीच्या पायांत बेडी अडकविली, शिद्दी सातासारखा दैत्य मारिला, कान्होजी आंग्र्याला नरकांत घातला, वीरुबाईची गत काय झाली ( पा. ब्र. च. ले. २९१ ) वगैरे दहशती घालून सरदारांना पत्रें लिहिण्याचा व भिवडविण्याचाहि स्वामीचा परिपाठ असे. त्यामुळें स्वामी कोण्या वेळीं काय करील अशी भीति मनांत बाणून त्याला बहुतेक लोक फार करून नमूनच असत. राजाला किंवा बाजीरावाला सांगून आपल्याविषयीं त्यांचीं मनें कलुषित करील किंवा मंत्रतंत्रानें अथवा तपोबलानें आपलें अनिष्ट चिंतील, ही दुहेरी भीति स्वामीसंबंधानें बहुतेक लोकांच्या मनांत असे. देवभोळेपणानें भारून गेलेलीं हीं माणसें स्वामीचा राग होऊं नये म्हणून त्याला परम निष्ठेचीं पत्रें लिहीत व पेशव्यांच्या व छत्रपतींच्या विरुद्ध जाण्याचे नाना प्रकारचे उघड किंवा लपून डावपेंच करीत. हें डावपेंच सुरू झाले म्हणजे पेशव्यांना व छत्रपतींना त्यांना ताळ्यावर आणणें जरूर पडे व वैमनस्याचें बीज कायमचें रोविलें जाई. ह्या लोकांची ही अशी विपन्न स्थिति झाली म्हणजे स्वामी त्यांना शिव्या शाप देण्याला तयारच असे. मांडलिक सरदारांशीं स्वामीचा कार्यक्रम असा अरेरावीपणाचा असे.

२७. इतर सरदारांशीं स्वामी यद्यपि मानभावीपणानें, उर्मटपणानें व बेपर्वाईनें वागे, तथापि छत्रपति व बाजीराव, ह्यांच्याशीं त्याचें वर्तन फारच निराळ्या प्रकारचें असे. छत्र-

पतीशीं अदबानें व बाजीरावाशीं मित्रत्वानें वागण्याचा स्वामीचा परिपाठ असे. महाराष्ट्रांतील त्यावेळच्या ह्या सूत्रधारांशीं ह्या अशा रीतीनें वागल्याशिवाय इतर सरदारांवर शिरजोरपणा स्वामीला करतांच आला नसता. बाजीराव जें जें करी तें तें स्वामीला उत्तमच वाटे व तसें वाटतें असें दाखविण्याशिवाय दुसरी सोयच नव्हती. बाजीराव ही व्यक्ति इतकी स्वतंत्र आचाराची व स्वतंत्र विचाराची होती कीं, ब्रह्मेंद्रासारख्या जोग्याला त्याच्या सूत्रानेंच चालणें जरूर पडे. बाजीरावाचा ज्यांच्याशीं स्नेह त्यांच्याशीं स्वामी स्नेहानें वागे व बाजीरावाच्या शत्रूंशीं स्वामी वाकून राही. उदाहरणार्थ श्रीपतराव प्रतिनिधीशीं स्वामीची वागणूक कोणत्या प्रकारची होती तें पहा. रा. पारसनिसांनीं छापिलेल्या लेखांक १, २, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२०, ह्या पत्रांत स्वामींची कांहींना कांहीं तरी तक्रार प्रतिनिधीच्या विरुद्ध आहे, व प्रतिनिधीनें ती कांहीं ना कांहीं तरी सबब लढवून फेटाळून टाकिली आहे. उमाबाई दाभाडणीशींहि स्वामीचें वर्तन असेंच मानभावीपणाचें होतें. त्र्यंबकराव दाभाडे व कृष्णाजी दाभाडे ह्या चुलत भावांत भांडणतंटे उपस्थित करून कृष्णाजीला बाजीरावाच्या पक्षाला ओढणारा स्वामीच होता. त्र्यंबकराव डभईच्या लढाईत पडल्याची वार्ता स्वामीला प्रथम कृष्णाजी दाभाड्यानें कळविली आहे ( पा. ब्र. च. ले. १८८ ). बाजीरावाचा शत्रू बाबूजी नाईक बारामतीकर ह्याची नालस्ती स्वामीनें पारसनिसांच्या ३०० व्या लेखांकांत केली आहे. सारांश ज्याच्यावर भोंकण्यास स्वामीला बाजीरावानें विनंति करावी, त्याच्यावर तुटून पडण्यास गुरूमहाराज एका पायावर तयार असत. बाजीरावाचें गुरुत्व संपादून स्वामीला जें श्रेष्ठपण मिळालें होतें, त्याची फेड स्वामी हरहमेष करी. शाहूमहाराजांचें प्रेम बाजीरावावर रहावें ह्या हेतूनें स्वामी वारंवार छत्रपतींच्या दर्शनास जात असे. 'सातारा दुष्टबुद्धि जे आहेत, त्यांचें राजास कळूं येतें' ( पा. ब्र. च. ले, २६८ ); 'येथें तो अवघे पाच सा पातकी आहेत, उमाबाईकडे अवघे झाले आहेत' ( पा. ब्र. च. ले. २८७ ); 'राजश्रीजवळ तुमची फारसी शिफारस केली, किल्येक तुमच्या स्वहिताच्या गोष्टी सांगितल्या' ( पा. ब्र. च. ल. २९ ); वगैरे उताऱ्यांवरून छत्रपतींचें सूत्र राखण्याच्या कामीं बाजीरावाला स्वामीचा किती उपयोग होत असे तें उत्तम व्यक्त होतें. ब्रह्मेंद्र व बाजीराव ह्यांचे गुरुशिष्याचें नातें होतें; परंतु ब्रह्मेंद्र बाजीरावाचा किती मिंधा होता हें ह्या उताऱ्यावरून उत्तम लक्ष्यांत येतें. शिव्या, शाप, स्तुति, निंदा वाटेल तें काम करण्यास बाजीरावाप्रीत्यर्थ ब्रह्मेंद्र तयार असे. अट एवढीच कीं, आपल्याला सर्व लोकांनीं भिऊन असावें, व आपल्याला कर्तुमकर्तुं सामर्थ्य आहे अशी सर्वत्र समजूत व्हावी. आपण किती मोठे आहोंत हें समजण्याइतकी नाजूक दृष्टि कोणाला नसलीच,—बहुतेक लोकांना ती नसावी अशी स्वामीची समजूत असे—तर स्वामी स्वतःच्या गुणांचें वर्णन जोरदार शब्दांनीं त्या मठ्ठ लोकांच्या डोक्यांत आपलें वैभव ठासण्याचा मनोरम प्रयत्न करी. स्वामीचें हें आत्मश्लाघापटुत्व एखाद्या वेळीं अशा कांहीं थरास जाऊन पोहोंचे कीं, आत्मश्लाघेवरून परनिंदेवरही स्वामी वेळ पडल्यास घसरत असे. आत्मश्लाघेचे दाखले स्वामीच्या पत्रांतून

कामावरून दूर केलें. ह्या मनुष्याला ब्रह्मेंद्रानें संभाजीकडे, बाजीरावाकडे व चिमाजी आप्पाकडे शिफारस करून पाठविलें. परंतु ह्या शिफारसीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. पुढें बाळाजी बाजीराव पेशवाईवर आल्यानंतर स्वामींनें कनोजाचें गाऱ्हाणें त्याजकडे नेलें ( पा. ब्र. च. ले. २८९ व ७२ ) व नोकरीचें आश्वासन मिळविलें. ( २ ) सात शेणवयाला गोव्याकडे नेमावें म्हणून स्वामींनें शिफारस केली ( पा. ब्र. च. ले. ३८ ) परंतु ती साधक बाधक प्रमाणें दाखवून पेशव्यांनीं अमान्य केली. ( ३ ) मानाजी आंग्र्यावर लोभ करावा म्हणून स्वामींनें चिमाजी अप्पास लिहिलें ( पा. ब्र. ता. ले. १३२ ). सुधें वर्तल्यास त्यावर लोभ करूं म्हणून चिमाजीनें उत्तर दिलें. स्वामीच्या शिफारसीचा फारसा उपयोग झाला नाहीं असे आणीकहि दाखले स्वामीच्या पत्रव्यवहारांत पुष्कळ आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, स्वामीची शिफारस योग्य असल्यास तिचा आदर पेशवे करीत असत. रा. पारसनिसांनीं छापिलेल्या १२५ वगैरे लेखांकांत योग्य शिफारसीचा आदर केलेला दृष्टीस पडतो. स्वामींच्या शिफारशींची अशी जरी व्यवस्था असे तत्रापि फलद्रूप होणाऱ्या शिफारशींकडेच तेवढें लक्ष देण्याची गरजू मनुष्यांची जी सार्वत्रिक चाल आहे, तिला अनुसरून अनेक सरदार व सरदारांच्या बायका प्रसंगविशेषीं स्वामींच्या मध्यस्थीचा उपयोग करून घेत असत. स्वामीचें मुख्य महत्त्व म्हटलें म्हणजे हेंच होतें. ह्याच महत्त्वाच्या जोरावर स्वामी पुष्कळ लोकांना टाकून बोले व छत्रपतींनीं माझा असा मान ठेविला, पेशव्यांनीं माझा तसा बडीजाव केला, वगैरे गोष्टी सांगून तो चोहोंकडे आपली छाप बसवी. राधाबाई पेशवीण, राधाबाई थोरातीण, उमाबाई दाभाडीण, लक्ष्मीबाई आंग्री वगैरे सरदारस्त्रियांच्या पत्रांत स्वामीची छाप ह्या बायांच्या मनावर केवढी बळकट बसली होती हे उत्तम तऱ्हेनें पहावयास मिळतें. संभाजीला श्रापून भस्म करून टाकिला, तुळाजीच्या पायांत बेडी अडकविली, शिद्दी सातासारखा दैत्य मारिला, कान्होजी आंग्र्याला नरकांत घातला, वीरुबाईची गत काय झाली ( पा. ब्र. च. ले. २९१ ) वगैरे दहशती घालून सरदारांना पत्रें लिहिण्याचा व भिवविण्याचाहि स्वामीचा परिपाठ असे. त्यामुळें स्वामी कोण्या वेळीं काय करील अशी भीति मनांत बाणून त्याला बहुतेक लोक फार करून नमूनच असत. राजाला किंवा बाजीरावाला सांगून आपल्याविषयीं त्यांचीं मनें कलुषित करील किंवा मंत्रतंत्रानें अथवा तपोबलानें आपलें अनिष्ट चिंतील, ही दुहेरी भीति स्वामीसंबंधानें बहुतेक लोकांच्या मनांत असे. देवभोळेपणानें भारून गेलेलीं हीं माणसें स्वामीचा राग होऊं नये म्हणून त्याला परम निष्ठेचीं पत्रें लिहीत व पेशव्यांच्या व छत्रपतींच्या विरुद्ध जाण्याचे नाना प्रकारचे उघड किंवा लपून डावपेंच करीत. हें डावपेंच सुरू झाले म्हणजे पेशव्यांना व छत्रपतींना त्यांना ताळ्यावर आणणें जरूर पडे व वैमनस्याचें बीज कायमचें रोविलें जाई. ह्या लोकांची ही अशी विपन्न स्थिति झाली म्हणजे स्वामी त्यांना शिव्या श्राप देण्याला तयारच असे. मांडलिक सरदारांशीं स्वामीचा कार्यक्रम असा अरेरावीपणाचा असे.

२७. इतर सरदारांशीं स्वामी यद्यपि मानभावीपणानें, उर्मटपणानें व बेपर्वाईनें वागे, तथापि छत्रपति व बाजीराव, ह्यांच्याशीं त्याचें वर्तन फारच निराळ्या प्रकारचें असे. छत्र-

पतींशीं अदबीनें व बाजीरावाशीं मित्रत्वानें वागण्याचा स्वामीचा परिपाठ असे. महाराष्ट्रांतील त्यावेळच्या ह्या सूत्रधारांशीं ह्या अशा रीतीनें वागल्याशिवाय इतर सरदारांवर शिरजोरपणा स्वामीला करतांच आला नसता. बाजीराव जें जें करी तें तें स्वामीला उत्तमच वाटे व तसें वाटतें असें दाखविण्याशिवाय दुसरी सोयच नव्हती. बाजीराव ही व्यक्ति इतकी स्वतंत्र आचाराची व स्वतंत्र विचाराची होती कीं, ब्रह्मेंद्रासारख्या जोग्याला त्याच्या सूत्रानेंच चालणें जरूर पडे. बाजीरावाचा ज्यांच्याशीं स्नेह त्यांच्याशीं स्वामी स्नेहानें वागे व बाजीरावाच्या शत्रूंशीं स्वामी वाकून राही. उदाहरणार्थ श्रीपतराव प्रतिनिधीशीं स्वामीची वागणूक कोणत्या प्रकारची होती तें पहा. रा. पारसनिसांनीं छापिलेल्या लेखांक १, २, २१४, २१६, २१७, २१८, २१९, २२०, ह्या पत्रांत स्वामींची कांहींना कांहीं तरी तक्रार प्रतिनिधींच्या विरुद्ध आहे, व प्रतिनिधीनें ती कांहीं ना कांहीं तरी सबब लढवून फेटाळून टाकिली आहे. उमाबाई दाभाडणीशींहि स्वामीचें वर्तन असेंच मानभावीपणाचें होतें. त्र्यंबकराव दाभाडे व कृष्णाजी दाभाडे ह्या चुलत भावांत भांडणतंटे उपस्थित करून कृष्णाजीला बाजीरावाच्या पक्षाला ओढणारा स्वामीच होता. त्र्यंबकराव डभईच्या लढाईत पडल्याची वार्ता स्वामीला प्रथम कृष्णाजी दाभाड्यानें कळविली आहे ( पा. ब्र. च. ले. १८८ ). बाजीरावाचा शत्रू बाबूजी नाईक बारामतीकर ह्याची नालस्ती स्वामीनें पारसनिसांच्या ३०० व्या लेखांकांत केली आहे. सारांश ज्याच्यावर भोंकण्यास स्वामीला बाजीरावानें विनंति करावी, त्याच्यावर तुटून पडण्यास गुरुमहाराज एका पायावर तयार असत. बाजीरावाचें गुरुत्व संपादून स्वामीला जें श्रेष्ठपण मिळालें होतें, त्याची फेड स्वामी हरहमेष करी. शाहूमहाराजांचें प्रेम बाजीरावावर रहावें ह्या हेतूनें स्वामी वारंवार छत्रपतींच्या दर्शनास जात असे. 'सातारा दुष्टबुद्धि जे आहेत, त्यांचें राजास कळूं येतें' ( पा. ब्र. च. ले, २६८ ); 'येथें तो अवघे पाच सा पातकी आहेत, उमाबाईकडे अवघे झाले आहेत' ( पा. ब्र. च. ले. २८७ ); 'राजश्रीजवळ तुमची फारसी शिफारस केली, कित्येक तुमच्या स्वहिताच्या गोष्टी सांगितल्या' ( पा. ब्र. च. ल. २९ ); वगैरे उताऱ्यांवरून छत्रपतीचें सूत्र राखण्याच्या कामीं बाजीरावाला स्वामीचा किती उपयोग होत असे तें उत्तम व्यक्त होतें. ब्रह्मेंद्र व बाजीराव ह्यांचे गुरुशिष्याचें नातें होतें; परंतु ब्रह्मेंद्र बाजीरावाचा किती मिंधा होता हें ह्या उताऱ्यावरून उत्तम लक्ष्यांत येतें. शिव्या, श्राप, स्तुति, निंदा वाटेल तें काम करण्यास बाजीरावाप्रीत्यर्थ ब्रह्मेंद्र तयार असे. अट एवढीच कीं, आपल्याला सर्व लोकांनीं भिऊन असावें, व आपल्याला कर्तुमकर्तुं सामर्थ्य आहे अशी सर्वत्र समजूत व्हावी. आपण किती मोठे आहोंत हें समजण्याइतकी नाजूक दृष्टि कोणाला नसलीच,—बहुतेक लोकांना ती नसावी अशी स्वामीची समजूत असे—तर स्वामी स्वतःच्या गुणांचें वर्णन जोरदार शब्दांनीं त्या मठ्ठ लोकांच्या डोक्यांत आपलें वैभव ठासण्याचा मनोरम प्रयत्न करी. स्वामीचें हें आत्मश्लाघापटुत्व एखाद्या वेळीं अशा कांहीं थरास जाऊन पोहोंचे कीं, आत्मश्लाघेवरून परनिंदेवरही स्वामी वेळ पडल्यास घसरत असे. आत्मश्लाघेचे दाखले स्वामीच्या पत्रांतून

इतके पसरले आहेत कीं, सदर पत्रें सहज चाळणाऱ्याला देखील ते थोड्याशा श्रमानें उपलब्ध होण्यासारखे आहेत.

२८. स्वामींच्या चरित्राचें वरील वर्णन वाचून कित्येकांना अशी जिज्ञासा उत्पन्न होण्याचा संभव आहे कीं, बाजीरावाची इतकी मनधरणी करण्यांत स्वामींचा हेतू तरी असा काय होता ? ह्या प्रश्नाला उत्तर देतांना एक गोष्ट सांगून ठेवणें जरूर आहे. ती ही कीं, स्वामीमजकूरांनीं नांवाला मात्र परमहंसत्वाची दीक्षा घेतली होती. बाकी त्यांच्या आत्म्यावर वासनांच्या गोधडींचीं जाड पटलें बसलेलीं होतीं. दिल्ली आग्र्यापर्यंत बाजीरावांचे गुरू म्हणून कीर्ति व्हावी ( पा. ब्र. च. ले. ३२० ). सर्व मराठमंडळांत मान मिळावा, सर्वांनीं आपणास भिऊन असावें, ही स्वामींच्या मनांतील पहिली जबरदस्त आकांक्षा होती. ही मानसिक आकांक्षा तृप्त झाल्यावर, स्वामींचा हेतू, पुष्कळ द्रव्य संपादन करून व अनेक गांवें इनाम मिळवून शरीरसुखाचीं साधनें वाढवावीं असा होता. बाजीरावाच्या व छत्रपतीच्या जोरावर, सरदारांना दहशत घालून स्वामी हजारों रुपयांची भिक्षा कमवी, नानाप्रकारचीं वस्त्रें व भूषणें मिळवीं व परोपरीचीं खाद्यपेयें संग्रह करी. कायमची व हंगामी मिळून स्वामींची वार्षिक प्राप्ति पंचवीस हजारांच्या खालीं नव्हती. ह्यापैकीं बराच भाग स्वामी अडल्यावेळीं बाजीरावाला कर्जाऊ देत असे. इतर सरदारांना भय घालणें, त्यांचीं गृहछिद्रें शोधून काढणें, प्रतिपक्षांची निंदा करणें बाजीरावाची शिफारस करणें व छत्रपतींचें सूत्र राखणें, ह्या पंचविध सेवेखेरीज ब्रह्मेंद्रस्वामी बाजीरावाची द्रव्यसेवाहि करी. बाजीराव ब्रह्मेंद्रस्वामींचा जर कोणत्याहि एका गोष्टींत मिंधा असला तर तो ह्या द्रव्यसेवेंतच विशेष होय. स्वामीनें कर्जाच्या फेडीविषयीं तगादा केला म्हणजे बाजीराव गोगलगाईप्रमाणें त्याच्यापुढें मऊ होऊन जाई. कर्जानें भंडावून गेल्याविषयीं स्वामीला बाजीरावानें जीं पत्रें धाडलीं आहेत तीं इतर सावकारांच्या तगाद्याला अनुलक्षून आहेत असा कित्येकांचा व विशेषतः ग्रांटडफचा समज आहे. परंतु हीं पत्रें व ह्या पत्रांतील विनवण्या खुद्द स्वामींच्या तगाद्यानें वेडावून जाऊन स्वामीलाच लिहिलेल्या आहेत, हें सदर पत्रांतील मजकूराकडे बारीक लक्ष दिलें असतां समजून येण्यासारखें आहे. इतर सावकारांचे तगादे सदोदित चालू असतां, स्वामींचा तगादा येऊन पोहोंचला म्हणजे स्वामींच्या हृदयाला पाझर फुटण्याकरितां बाजीरावानें हीं पत्रें लिहिलेलीं आहेत. रा० पारसनीस यांनीं छापिलेलीं लेखांक ३०, ३१ आणि ३२ हीं पत्रें बाजीरावाच्या ओढगस्तीसंबंधीं आहेत. "कर्जाचे ऐवजीं पांच हजार रुपये पाठवणें" म्हणून लेखांक ३० त स्वामी बाजीरावास लिहितो. रुपये पुढें पावते करूं, म्हणून बाजीरावानें उत्तर दिलें आहे. लेखांक ३१ व ३२ यांत शिलेदारांच्या देण्यासंबंधानें काय अपेष्टा होतात ह्याचेंच वर्णन बाजीराव करतो. शिलेदारांचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चाललें असतां, स्वामीनेंहि आपल्या पैक्याचीहि मागणी केली. उंटाला एकादेवेळीं काडीचेंहि ओझें फार होतें, त्याप्रमाणें बाजीरावाला स्वामीचीहि मागणी अत्यंत निष्ठुरतेची वाटली. अशा महत् विवंचनेंत असतांना स्वामीला बाजीरावानें हें पत्र लिहिलें आहे. बाजीरावाला वेंगवण्याची

स्वामी अशीच एखादी संधि पहात असे. अन्य वेळी डौलानें व तोऱ्यानें वागणारा बाजीराव अशा वेळीं अगदीं गयावया होऊन जाई. ज्याच्यापुढें सर्व जग चळचळ कांपे तो बाजीराव नम्रतेच्या गोष्टी बोलूं लागावा, एवढेंच स्वामीला हवें असे. ज्या स्वामीनें बाजीरावाची इतर प्रसंगीं वाटेल ती अंगेजणी करावी, त्याच स्वामीनें बाजीरावाला इतकें नमवावें, हें महत्वाकांक्षी व ढोंगी मानवी स्वभावाला अनुरूपच आहे. लाखों रुपये ज्यांचें देणें त्यांचे तगादे उंबरठ्यावर आले असतां नम्रतेचें एक वाक्यहि ज्या पुरुषाच्या तोंडून कल्पांतीहि निघावयाचें नाहीं, त्या बाजीरावाला स्वामीसारख्या मनुष्यापुढें रडगाणें गाऊन दीनतेच्या गोष्टी बोलण्यास कमीपणा वाटत नसे. परमहंसत्वाचा दर्जाच असा कांहीं आहे कीं त्यापुढें वाटेल त्यानें आपलें वाटेल तें गुह्य विनबोभाट बोलावें. शिवाय बाजीरावाचें व ब्रह्मेंद्राचें नातें गुरुशिष्यत्वाचें असल्यामुळें व परस्परांना परस्परांची जरूर असल्यामुळें, एकमेक एकमेकांचा कमीपणा गोपन करीत व एकमेक एकमेकांवर पूर्ण विश्वास ठेवीत. एकाच धंद्यांतील माणसें अन्योन्यहितार्थ एकमेकांवर विश्वास कसा ठेवतात हें ह्या दोघांच्या चरित्रावरून शिकण्यासारखें आहे. ब्रह्मेंद्र कितीहि चुकला तरी त्याच्यावरील आपला विश्वास ढळूं द्यावयाचा नाहीं असा बाजीरावाचा कृतसंकल्प होता. ह्याचें एक मासलेवाईक उदाहरण देतों. १७३७, १७३८, व १७३९, हीं तीन सालें वसईवरील मोहीम चालली होती. बाजीरावाचें गुरुत्व स्वामीकडे असल्यामुळें, बाजीरावाच्या मोहिमेंना ब्रह्मेंद्र आशीर्वाद देत असे. पेशव्यांनीं शरीरद्वारा मेहनत करावी व ब्रह्मेंद्रानें ईश्वरावर संकट घालून मोहिमेस यश आणावें असा श्रमविभाग असे. उपासना व आशीर्वाद हीं मोहिमा फत्ते करण्याचीं स्वामीचीं दोन जबरदस्त आयुधें असत. त्याप्रमाणें १७३७ तील वसईवरील मोहिमेस स्वामीनें आपला आशीर्वाद, वसई लवकरच फत्ते होईल, असा दिला. परंतु त्या सालीं वसई लवकर फत्ते होईल असा रंग दिसेना. पुढें १७३८ त चिमाजी पुन्हां वसईवर गेला; परंतु त्यावेळींहि वसई फत्ते होण्याचा योग जुळून आला नाहीं. वसईचें काम फत्ते होई तें करणार स्वामी समर्थ आहेत, म्हणून बाजीरावानें स्वामीस १७३८ च्या १० जानेवारीस लिहिलें होतें ( पा. ब्र. च. ले. ११६ ). धारावी, ठाणें वगैरे स्थलींच १७३८ चा मोसम गेल्यामुळें वसई ह्या वर्षींहि सई झाली नाहीं. तेव्हां फिरंग्याशीं तह करून घेण्याचें बाजीरावाला ब्रह्मेंद्रानें सुचविलें; परंतु बाजीरावानें तो उपदेश अमान्य केला ( पा. ब्र. च ले. ३७ ). ह्यावर १७३९ च्या १२ व १५ जानेवारीस बाजीरावानें वसईच्या आशीर्वादाची स्वामीस दुबार आठवण करून दिली ( पा. ब्र. च. ले. ११९ व ३९ ). ह्या दुबार आठवणीनें चिरडीस जाऊन, वसई न आली तर या राज्यांत राहील त्याचें संन्यासपण लटकें, अशी ईरेची प्रतिज्ञा स्वामीनें केली ( पा. ब्र. च. ले. २९१ ). व शिमगी पौर्णिमे अलीकडे म्हणजे १७३९ च्या १२ मार्चाच्या अगोदर वसई सई होईल,म्हणून १७३९ च्या ४ फेब्रुवारीस आभिवचन दिलें ( पा. ब्र. च. ले. ५१ ). त्याप्रमाणें १७३९ च्या ६ फेब्रुवारीस म्हणजे माघ शुद्ध दशमीस वसईस चिमाजीनें मोर्चे लाविले ( पा. ब्र. च. ले. ५२ ). पुढें महिन्याभरानें १७३९ ची

१२ मार्च म्हणजे शिमगीपौर्णिमा ती आली; तरीहि वसई सई झाली नाहीं, व स्वामींचें भाकीत खोटें ठरलें. इतकें झालें तरी पेशव्याची स्वामीवरील श्रद्धा रेसभरही कमी झाली नाहीं. शेवटीं ५ मे १७३९त वसई सर झाली, व चिमाजीनें ब्रह्मेंद्राच्या भुलोवाला नवसाच्या १२५ पुतळ्या पाठवून दिल्या. ब्रह्मेंद्रस्वामीचा आशीर्वाद तीन वर्षे खितपत पडला असतांहि पेशव्यांची त्याजवरील श्रद्धा कायम राहिली, हीच ब्रह्मेंद्रस्वामीच्या वजनाची खरी गुरूकिल्ली आहे.

२९. छत्रपती व त्यांच्या राण्या ह्यांच्याशीं स्वामींचें वर्तन अदबीचें असे. ब्रह्मेंद्रस्वामी भार्गवाचा अवतार आहे ह्या कल्पनेनें शाहूच्याहि मनांत ब्रह्मेंद्राविषयीं पूज्यबुद्धि असे. भार्गवरामाचा व क्षत्रियांचा पौराणिक संबंध छत्रपतीला पूर्ण अवगत असल्यामुळें, ब्रह्मेंद्राशीं शाहू आदबशीर प्रेमानें वागे. छत्रपतींपेक्षां छत्रपतींच्या राण्यांशीं ब्रह्मेंद्राचा संबंध विशेष असे. शाहूला पुत्रोत्सवाचें सुख माहीत नसल्यामुळें, त्याला व त्याच्या राण्यांना पुत्रसंतानाचा आशीर्वाद ब्रह्मेंद्र दरवर्षीं देत असे. एकदां तर स्वामींनें "पुत्रसंतान व्हावें ऐसें वोशध" सगुणाबाई राणीला भावार्थें प्रातःकाळीं घेण्यास दिलें (पा. ब्र. च. ले. २६३). ह्या आशीर्वादाचा व वोशधाचा बिलकुल उपयोग झाला नाहीं हें प्रसिद्धच आहे. तत्रापि शाहूचा व राण्याचा त्याजवरील विश्वास तिळमात्रहि कमी झाला नाहीं. ह्या पुत्रसंतानाच्या आशीर्वादिक देणगीशिवाय राण्यांशीं स्वामीचें इतरहि दळणवळण असे. शाहूच्या राण्या सर्व प्रकारच्या राजकारणांत लहानसहान ढवळाढवळ करीत असत. त्या ढवळाढवळींत स्वामीहि लुडबुड करावयाचा प्रयत्न करी. राजकीय प्रसंगासंबंधानें अष्ट प्रधानांशीं किंवा शाहूशीं राजरोस रीतीनें ब्रह्मेंद्र व्यवहार करण्यास फारसा धजत नसे. अशा संबंधानें स्वामी शाहूच्या राण्यांचेंच द्वार पहात असे. १७३३ त व १७३४ त कोंकणांत हबशाशीं युद्ध चाललें असतांना, मुंबईचा इंग्रज शामळाला मदत करून मराठ्यांना बरीच अडचण करी. ह्या अडचणीची वार्ता ऐकून इंग्रजाला बंद करण्याचा बूट ब्रह्मेंद्राच्या मनांत आला. हा बूट, खरें पाहिलें तर, स्वामींनें बाजीरावाला किंवा शाहूला कळवावयाचा. परंतु आपल्या सूचनेचा आदर परमार्थानें कोणी करील अशी खात्री नसल्यामुळें, स्वामींनें सखवारबाईकडे ह्या विषयासंबंधीं बोलणें काढिलें. मुंबईकर इंग्रजाची व आपली मैत्री आहे, असें एक दोन इंग्रजांची व स्वामींची गांठ पडल्यावरून स्वामीस वाटत होतें. ह्या औट घटकेच्या मैत्रीवरून इंग्रज आपला हुकूम ऐकेल असेंहि ह्या नवाशिक्या मुत्सद्याचें मत होतें. हें मत दोन तीन वेळां स्वामींनें सखवारबाईपुढें मांडलें (पा. ब्र. च. ले. ९ व १०) व दोन्ही तिन्ही वेळां, इंग्रजांना सांगून पहा, असें उत्तर तिनें त्याला दिलें. वास्तविक रीत्या काम करूं लागण्यास एवढें आश्वासन बस होतें. परंतु नाकर्त्या मनुष्याप्रमाणें स्वामींनें पुन्हां तोच प्रश्न खुलसटपणानें सखवारबाईपुढें नव्यानें ठेविला (पा. ब्र. च. ले. १०२). ह्या ताज्या दमानें मांडिलेल्या जुन्या प्रश्नाला सखवारबाईनें किंचित् झणझणीत उत्तर दिलें. तें, स्वामीची राजकारणप्रसंगांत कितपत पत होती ह्याचें उत्तम निदर्शक

आहे. सखवारबाईनें लिहिलें कीं, ह्या राज्यभाराच्या गोष्टी आहेत; केवळ आमच्यासारख्या पडतपोशीच्या स्त्रियांच्या करवीं छत्रपतीवांचून ह्या गोष्टी होतात असा अर्थ नाहीं; तेव्हां राजश्री स्वामींच्या ( शाहूच्या ) आज्ञेनें जें कर्तव्य तें केलें पाहिजे; महालतर्फेनें म्हणजे आमच्यासारख्या स्त्रियांशीं बोलून तें काम होत नाहीं. ( पा. ब्र. च. ले. १०२ ). सखवारबाईनें छत्रपतीकडे जाण्यास सांगितल्यावर, इंग्रजांच्या मैत्रीचा उपयोग करून घेण्याचा स्वामीचा प्रयत्न फारसा पुष्ट झाला नाहीं असा संशय येतो. कां कीं १७३९ त कप्तान इंचबर्डाशीं करार होई तोंपर्यंत इंग्रज हबशाला व फिरंग्याला मदत करीत होता हें सुप्रसिद्ध आहे. १७३४ त स्वामीची इंग्रजाशीं मैत्री जर उपयोगाची झाली असती तर १७३५, १७३६ व १७३७ ह्या सालांत इंग्रजानें हबशांना मदत केली नसती.

३०. असो. मराठ्यांच्या राजकारणांत स्वामीचें महत्त्व कितपत होतें, ह्या गोष्टीची शहानिशा येथपर्यंत झाली. तीवरून इतकें कळून आलें कीः—सूत्रधार ह्या नात्यानें मराठ्यांच्या राजकारणांत ब्रह्मेंद्राचा बिलकुल संबंध नव्हता; मराठ्यांच्या राजकारणाची अंतर्व्यवस्था किंवा बहिर्व्यवस्था म्हणजे सरंजामी सरदारीची पद्धति किंवा संयुक्त साम्राज्याची पद्धति ह्यांच्या उत्पत्तीशीं स्वामीचा दुरूनहि परिचय नव्हता; मराठ्यांच्या कोंकणांतील राजकारणाशीं स्वामीचा जो कांहीं संबंध झाला तो प्रधान स्वरूपाचा नसून सर्वस्वीं गौण प्रकारचा होता; हा संबंध यद्यपि गौण प्रकारचा होता तत्रापि त्याचे परिणाम अत्यंत हानिकारक झाले; ती हानि भौतिक नव्हती, नैतिक होती; शाहू व बाजीराव ह्यांचें गुरुत्व स्वामीला प्राप्त झाल्यामुळें ह्या हानीचें स्वरूप फारच भयंकर झालें; ‘ यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ’ या न्यायानें स्वामीच्या दुर्गुणांचें अनुकरण इतर सरदार करूं लागले; त्यावेळच्या ह्या सरदारांचें अनुकरण पुढील दोन तीन पिढ्यांनीं केलें; व भूमितिश्रेढीनें चाललेलें हें अनुकरण मराठ्यांच्या राष्ट्राच्या नाशास कारणीभूत झालें.

३१. ब्रह्मेंद्रस्वामीच्या हालचालींचें खरें स्वरूप हें असें आहे. ब्रह्मेंद्रस्वामीचा पत्रव्यवहार आज मिळाला आहे तितका जर मिळाला नसता तर ह्या स्वरूपाचें खरें चित्र जसें रेखडतां यावें तसें खचित आलें नसतें. आजपर्यंत लोकांचा असा समज होता कीं, ब्रह्मेंद्रस्वामी राष्ट्रांचा उद्धार करणारे जे थोडे महापुरुष ह्या महाराष्ट्रांत झाले त्यांपैकींच एक होता. ह्या गैरसमजानें कित्येकांनीं ब्रह्मेंद्रस्वामीची श्रीसमर्थ रामदासस्वामीशीं तुलना केली आहे. परंतु हे तुलना करणारे लोक असा विचार मनांत आणीत नाहींत कीं ह्या आपल्या राष्ट्रांत रामदास स्वामींसारखे महात्मे जर पिढ्यानापिढ्या उत्पन्न झाले असते, तर आपली नैतिक व अर्थात् राजकीय अवनति झाली नसती. शिवाय हे तुलना करणारे लोक हेंहि विसरतात कीं कोणत्याहि ऐतिहासिक पुरुषाच्या गुणदोषांचें जें चित्र काढावयाचें असतें. तें दस्तऐवजी पुराव्यावरून काढावयाचें असतें. रा. पारसनिसांनीं ब्रह्मेंद्रस्वामीचें जें चरित्र स्वामीच्या पत्रव्यवहाराला जोडलें आहे, त्यांत ह्या दोन्ही गोष्टींचा त्यांनीं विचार केलेला दिसत नाहीं. रा. पारसनिसांनीं छापिलेले दस्तऐवज पहावे तर त्यांत स्वामीचें जें चरित्र दृश्यमान होत आहे, तें सदर गृहस्थांनीं लिहिलेल्या चरि-

त्राशीं बिलकुल जमत नाहीं. एखाद्या बगल्या वाकिलानें एखाद्या कुळाचा कज्जा घ्यावा, न्यायाधीशापुढें आपल्या कुळाच्या नालस्तीचे तेवढे दस्तऐवज रुजू करावे आणि तोंडानें मात्र कुळाच्या साळसूतपणाचे पोवाडे गावे, तशांतलाच प्रकार प्रस्तुत इतिहासपटूचा झाला आहे ! बाजीराव चिमाजी अप्पा, शाहूमहाराज वगैरे मोठे-मोठे लोक, आपण ईश्वरांश आहांत, आपण कर्तेकरविते आहांत, आपले आम्ही चरणरज आहों वगैरे बहुमानार्थी मायने स्वामीला उद्देशून लिहितात, त्याअर्थी स्वामी खरोखरच महापुरुष असावा मराठयांच्या राजकारणाचा सूत्रधार असावा,अशी रा. पारसनीस यांची समजूत झालेली दिसते; परंतु ज्या पुरुषाला गुरु केला, त्याला परम दैवत समजण्याची जी आपल्या देशांत वरी किंवा वाईट चाल आहे, तिच्या अनुरोधानें ह्या लोकांनीं हे मायने लिहिले आहेत, ही गोष्ट जर त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेविली असती, तर ह्या दस्तऐवजांतील मजकुराचा खरा अर्थ समजण्याच्या मार्गाला लागण्याची त्यांना एक उत्तम सोय झाली असती. शिवाय ज्या नायकाचें किंवा नायिकेचें चरित्र लिहावयाला घ्यावयाचें तो नायक किंवा ती नायिका रणपटु, विद्यापटु, दानपटु, शौर्यपटू अथवा सर्वगुणपटु दाखविणें आपलें कर्तव्य आहे असें ह्या इतिहासपटूला वाटत असल्यामुळें, त्याच्या हातून हे असले बगल्या वाकिलाचें अर्धवट मासले लोकांच्या पुढें मांडले जातात. रा. पारसनिसांनीं अस्सल लेख छापिले नसते आणि स्वामीचें चरित्र लिहिलें असतें, व त्यांत स्वामी सर्वगुणसंपन्न होता असें विधान केलें असतें, तरीदेखील मनुष्यमात्राच्या ठायीं सर्वगुणसंपन्नत्वाचा आरोप केलेला पाहून सदर विधान अवास्तव आहे, असें म्हटल्यावांचून रहावतेंना. रा. पारसनिसांनीं तर अस्सल लेख छापून सर्वगुणसंपन्नतेचा समारोप स्वामीवर केलेला आहे. त्यामुळें क्लाईव्ह, वारन हेस्टिंग्स वगैरे आंग्लराजकार्यधुरंधरांच्या मेकाले वगैरेंनीं काढिलेल्या मलिन चरित्रपटांवर सफेतीचा हात फिरविणाऱ्या कित्येक आधुनिक इंग्लिश इतिहासपटूंचें स्मरण होतें. ब्रिटिश संयुक्त साम्राज्याच्या हिंदुस्थानांतलि भागाचे जे मूळ संस्थापक होते, ते नैतिकदृष्टया फार हलक्या दर्जाचे होते असें बर्क, मेकाले वगैरे, राष्ट्रांच्या खऱ्या हिताचें इंगित जाणणाऱ्या लेखकांचें मत होतें. यद्यपि हें मत खरें आहे, तत्रापि सध्याच्या ब्रिटिश साम्राज्याच्या इभ्रतीला व नीतिमत्तेला कमीपणा आणणारें हें मत आहे असें कित्येक आधुनिक अँग्लोइंडियनांना वाटून त्यांनीं उपरिनिर्दिष्ट सफेती देण्याचा उद्योग केलेला आहे. वर्क व मेकाले ह्यांच्या लेखांपुढें ह्या सफेतीवाल्यांचें कितपत तेज पडेल तें पडो; इतकें मात्र म्हटल्यावांचून रहावत नाहीं, कीं ही खोटयाचें खरें करून दाखविण्याची सोफिस्टांची युक्ति साक्रेटिसाच्या वेळीं जितकी तिरस्करणीय वाटत होती तितकीच सध्यांहि वाटते. रा. पारसनिसांच्यासंबंधानेंहि हाच न्याय लागू पडतो. ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रांत स्वामींचें वर्तन राष्ट्रीय नीतिमत्तेच्या दृष्टीनें अत्यंत गर्हणीय होतें, ह्याचे दाखले पदोपदीं सांपडण्यासारखे आहेत. असें असून ब्रह्मेंद्र नीतिमत्तेचा केवळ पुतळा होता म्हणून रा. पारसनीस वर्णन करतात ! तेव्हां असा वस्तुविपर्यास करण्यांत त्यांचा हेतू काय असावा बरें ? आपले पूर्वज मोठे होते, शूर होते,

कर्तृत्ववान् होते, नीतिमान् होते, अशी अभिमानाची प्रौढी मिरविण्यांत मौज आहे खरी; परंतु ते सर्वगुणसंपन्न होते, त्यांच्यांत दोष बिलकुल नव्हते, ते नीतीचे केवळ पुतळे होते, वगैरे देवांना साजणाऱ्या गुणांचा आरोप त्यांजवर करणें म्हणजे मनुष्यस्वभावाची अग्राहासानें थट्टा करणेंच आहे. वर्तमान व भावी पिढयांना आपल्या पूर्वजांचे गुणदोष कळावे, कोणत्या गुणांच्या जोरावर ज्यांनीं राष्ट्राची उन्नति केली, व कोणत्या दोषांच्यामुळें ते राष्ट्राच्या अवनतीला कारण झाले, हें ज्ञान त्यांस व्हावें, हा तर इतिहास लिहिण्याचा प्रधानहेतु आहे. तो एकीकडे सारून काल्पनिक वर्णनें लिहिण्यांत तात्पर्य काय? ब्रह्मेंद्रस्वामी नीतिमान् होता, गोविंदपंत बुंदेले स्वामिनिष्ठ होता, महादजी शिंदे महाराष्ट्रसाम्राज्याभिमानी होता, वगैरे वर्णनें वाचलीं म्हणजे वाचकांच्या मनांत कारणांचा विपर्यास उत्पन्न होतो व तो भलत्याच विचारसरणीचा अवलंब करतो. तो म्हणतो, एवढे नीतिमान्, स्वामिनिष्ठ व अभिमानी पुरुष राष्ट्रांत असतांना, ज्याअर्थी पानिपतासारखें संकट आलें व १८१८ तल्यासारखी क्रांति झाली, त्याअर्थी आपल्या ह्या देशाची भवितव्यताच बलीयसी, दुसरें कांहीं नाहीं! ही दैववादाची विचारसरणी मोठी घातुक आहे. ह्या सरणीचा मनावरती एकदां पगडा बसला म्हणजे प्रयत्नाची दिशा—जी राष्ट्रांच्या उन्नतीचा केवळ प्राण आहे—तिची वाढच खुंटते. क्लाईव्ह, हेस्टिंग्स, वगैरे लोकांची काल्पनिक चरित्रें लिहिण्यांत इंग्रज लेखकांना काय फायदा वाटत असेल तो असो, आपल्या इकडे असल्या चरित्रांना अजिबात फांटा देणें अत्यंत जरूर आहे. शनिमाहात्म्य, बुधबावन्नी, गुरुचरित्र, शिवलीलामृत वगैरे काल्पनिक व दैववादी पुस्तकांचा आपल्या इकडे भरणा कमी आहे असें नाहीं. त्यांतच ऐतिहासिक काल्पनिक चरित्रांची भर घालण्यांत फायदा कोणता?

३२. ब्रह्मेंद्रस्वामींचें खरें स्वरूप रा. पारसनीसांस ओळखतां न आल्यामुळें किंवा त्यांनीं तें ओळखण्याचा प्रयत्न न केल्यामुळें, ब्रह्मेंद्रस्वामी व रामदासस्वामी हे दोघेहि त्यांना सारख्याच योग्यतेचे भासले. हा भास खरोखर आभासच आहे हे ह्या दोघा पुरुषांची तुलना करून स्पष्ट करून दाखवितों. (१) राष्ट्रीय व वैयक्तिक ह्या दोन्ही नीतींच्या दृष्टीनें ब्रह्मेंद्राचें आंग्र्यांशीं वर्तन अत्यंत निंद्य होतें. रामदासस्वामींनीं असें निंद्य वर्तन कोणाहि सरदाराशीं केलें नाहीं. (२) पाटील, महार, कारकून वगैरे लहानसहान माणसांशीं ब्रह्मेंद्र क्षुल्लक कारणावरून भांडत असे. रामदासस्वामींना भांडण हा पदार्थ माहीतच नव्हता. (३) महत्त्वाकांक्षा हा ब्रह्मेंद्राचा मुख्य हेतु होता. निजामुन्मुलुखाला भेटावें, इंग्रजाशीं मैत्री करावी, शाहूनें पालखी आणावी, वगैरे मानाची हाव भार्गवरामास अतिशय होती. रामदासस्वामींस ही हाव बिलकूल नव्हती. (४) इस्टेट करण्याचा ब्रह्मेंद्राला नाद होता. रामदासांना इस्टेटीची वार्ताहि नव्हती. (५) ब्रह्मेंद्राला, पुण्यांतील काळबोवासारखी अचकटविचकट शिव्या देण्याची संवय होती. रामदासांना तो प्रकार माहित नव्हता. (६) ब्रह्मेंद्राला हठयोग व समाधि ह्यांची आवड असे. रामदासांनीं ही तालीम केली नाहीं. (७) पाऊस पाडणें, शाप देणें, संतानार्थ औशध

देणें, भुतें काढणें, वगैरे बीरविद्या ब्रह्मेंद्राजवळ असे. ह्या ढोंगाची उपासना रामदास तुच्छ मानीत असत. ( ८ ) ब्रह्मेंद्र खुनशी व तिरसट स्वभावाचा असे. रामदास केवळ शांतीची मूर्ति असे. ( ९ ) सुवासिक तैलें, उत्तम प्रावरणें व चमचमीत भोजन यांचा ब्रह्मेंद्र भोक्ता होता. रामदासस्वामींना ही देहसंतर्पणाची चाड नव्हती. ( १० ) ब्रह्मेंद्र, व्होल्टेयराप्रमाणें, व्याजबट्टा व सावकारी करी. रामदासांना ह्या व्यवसाय करण्यास वेळ नव्हता. ( ११ ) ब्रह्मेंद्र इतर साधूंचा मत्सर करी. रामदास सर्व स्वामींचा स्नेही असे. ( १२ ) ब्रह्मेंद्र छत्रपतीपाशीं इनाम गांवें मागे. रामदासांनीं शिवाजीनें समर्पिलेलें राज्य परत केलें. ( १३ ) ब्रह्मेंद्र लहान सहान शिफारसी करी. रामदासांना ह्या क्षुल्लक गोष्टींत पडणें आवडत नसे. ( १४ ) ब्रह्मेंद्राला एक वाक्य सरळ व शुद्ध लिहितां येत नसे. रामदास मराठी सारस्वताचे उस्ताद आहेत. ( १५ ) समर्थांनीं रामदासी पंथ काढून भरतखंडांत बाराशें मठ स्थापिले. ब्रह्मेंद्राचा पंथहि नाहीं व शिष्यहि नाहीं. ( १६ ) रामदासस्वामी उत्तम कवि, स्पष्टवक्ता, व नेमस्तकार्यकर्ता होता. ब्रह्मेंद्र ह्यांपैकीं एकहि नव्हता. ( १७ ) रामदास सृष्टिसौंदर्याचा भोक्ता होता. चाफळाइतकी धावडशी सुंदर नाहीं. ( १८ ) रामदासाच्या शिवाजीनें सुंदर यवनी, मातुःश्री म्हणून परत पाठविलेली आहे. यवनी ठेवणारा बाजीराव ब्रह्मेंद्राचा आवडता शिष्य होता. ( १९ ) रामदास भगवीं वस्त्रें लेई, ब्रह्मेंद्र पुरभय्यी टोपी व मलमली झगा वापरी. असे आणीकहि कित्येक भेद दाखवितां येतील. परंतु सर्वांत मोठा भेद म्हटला म्हणजे राष्ट्रीय नीतिमत्ता वाढविण्याचा बाणा रामदासांच्या सर्व संस्थांत, लेखांत, भाषणांत व वृत्तींत दिसतो व ब्रह्मेंद्राच्या दिसत नाहीं. रामदासांच्या सर्व व्यवसायांचें मुख्य धोरण म्हटलें म्हणजे महाराष्ट्रधर्म होय. ह्या महाराष्ट्रधर्माचें नांवदेखील ब्रह्मेंद्राला माहीत नव्हतें. ब्रह्मेंद्राच्या वेळीं हें नांव लोपत चाललें होतें असा कदाचित् संशय येईल. परंतु तसा प्रकार नाहीं. रा. करंदीकर आणि सहस्रबुद्धे यांनीं छापिलेल्या शाहूराजाच्या रोजनिशींतील शाहूच्या एका पत्रांत महाराष्ट्रधर्म हा शब्द आलेला आहे. सदर ठिकाणीं इंग्रजी भाषांतरकारानें महाराष्ट्रधर्म म्हणजे Religion of महाराष्ट्र असें भाषांतर केलें आहे. परंतु तें बराबर नाहीं. त्या स्थलीं महाराष्ट्रधर्म या शब्दाचा अर्थ मराठ्यांचें कर्तव्य असा स्पष्ट आहे. शाहू छत्रपतीला महाराष्ट्रधर्म माहीत असावा व ब्रह्मेंद्राला नसावा ह्यावरून ब्रह्मेंद्राच्या राजकीय ज्ञानाचा अंदाज करतां येतो.

३३. ब्रह्मेंद्रस्वामींच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण येथपर्यंत झालें. रा. पारसनीस यांनीं हें आविष्करण केलें असतें म्हणजे मला हा खटाटोप करण्याची जरूरच पडली नसती. परंतु मराठ्यांच्या इतिहासांतील एका भागाचा विपर्यास होत आहे हें पाहून हा खटाटोप करणें अवश्य झालें. खरें म्हटलें असतां, हें काम महाराष्ट्रांतील टीकाकारांचें होतें. परंतु रा. पारसनीस यांचें हें काल्पनिक चरित्र बाहेर पडून चार पांच महिने लोटले असतांहि कोणी टीकाकार खरा प्रकार उघडकीस आणण्यास पुढें आला नाहीं. ह्यावरून असें म्हणावें लागतें कीं, महाराष्ट्रांत सध्यां जी इतिहाससंबंधीं जागृति होत असलेली दिसत

आहे ती केवळ वरकरणी आहे. वाटेल त्यानें वाटेल तें लिहिलें तरी तें चटसारें खपून जातें. खरें कोणतें, खोटें कोणतें, हें निवडण्याची ताकत महाराष्ट्रसमाजांत नाहीं; किंवा सत्यासत्य निवडण्याची ताकत असून केवळ औदासीन्यानें व दुर्लक्षानें हा प्रकार होतो; अथवा इतिहासाच्या पुनरुज्जीवनाची बाल्यावस्था आहे अशी समजूत करून घेऊन कोणतेंहि ऐतिहासिक पुस्तक जसें पुढें येईल तसें केवळ प्रोत्साहनबुद्धीनें गोड मानून घेण्याची थोरपणाची संवय उत्कृष्ट वाटते; ह्या तिहींपैकीं कोणता प्रकार खरा असेल तो असो. इतकें मात्र निश्चयानें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हे तिन्ही प्रकार ऐतिहासिक ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाला हानिकारक आहेत व परंपरेनें राष्ट्राच्या प्रगतीला प्रतिबंधक आहेत. अनधीत व अनधिकारी लेखकांनीं वाटेल त्या गप्पा माराव्या आणि त्या महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रकारांनीं खऱ्या मानून त्यांचा जयजयकार करावा, ही महाराष्ट्रांतील टीकाकारांच्या विवेचनशक्तीला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. कोणत्याहि राष्ट्राला अत्यंत प्राणभूत विषय म्हटला म्हणजे त्या राष्ट्राचा इतिहास होय. त्या प्राणभूत इतिहासाची हेळसांड होऊं देणें व ती होत असतांना तिचा जयजयकार करणें म्हणजे आपल्याच हातानें आपल्याच पायावर धोंडा घालून घेण्यासारखें आहे. ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रव्यवहाराला रा. पारसनीस यांनीं जोडलेलें चरित्र, दिलेल्या टीपा व लावलेल्या मिती पाहून प्रस्तुतस्थलीं इतिहासाच्या साधनांच्या संशोधनाचें काम अत्यंत नालायक हातांत पडलें आहे अशी माझी खात्री झाली. नंतर थोड्याच दिवसांनीं ह्या पत्रव्यवहारावर निर्भीड व सणसणीत टीकेमुळें महाराष्ट्रांत अग्रगण्यत्व पावलेलें जें केसरीपत्र त्यांत आलेली टीका वाचली. ती टीका वाचून ऐतिहासिक विषयावर टीका करण्याचेंहि काम प्रस्तुतप्रसंगीं तितक्याच नालायक हातांत पडलें आहे असें म्हणण्याची पाळी आली. ब्रह्मेंद्रस्वामीचें मराठ्यांच्या राजकारणाचें सूत्रधारित्व, त्याचा Moral force, (नैतिक प्रेरणा)त्याची नीतिमत्ता वगैरे वस्तुविपर्यस्त प्रकरणाचा ऊहापोह सदर वर्तमानपत्रांत केलेला पाहून परीक्षणार्थ पुस्तकांतील एक अक्षरहि न वाचतां त्यावर मत ठोकून देणें व त्यासंबंधीं चार नवे सिद्धान्तहि सांगणें किती सोपें काम आहे हें माझ्या प्रत्ययास आलें! असत्यरूपी गुरुतरशिलांचा भेद करून त्यांच्या ठिकऱ्या उडविण्याचें ज्याचें कुलव्रत, तोच जर त्या शिलांना कवटाळूं लागला, तर भ्रांतचित्तत्वाचा त्याजवर आरोप केल्यास नवल कसचें! वस्तुतः इतिहासाच्या कामांत निर्भीड व स्पष्टवक्तेपणाच्या टीकेची अत्यंत जरूर आहे. तसेंच अशा प्रकरणांत निर्भीड व स्पष्टवक्तेपणाच्या टीकेची जितकी जरूर आहे त्याहिपेक्षां अधिकारी टीकेची विशेष जरूर आहे. निर्भीड, स्पष्टपणाची व अधिकाराची टीका जर ह्या विषयासंबंधानें झाली नाहीं, तर वर्तमान व भावी पिढ्यांची दिशाभूल होईल आणि सद्गुणांचा वाईट परिणाम होतो, दुर्गुणांचा विजय होतो, सद्गुणापासून दुर्गुणांची उत्पत्ति होते, असले विपर्यस्त विचार समाजांत पसरूं लागतील. अवास्तव इतिहासाच्या वाचनापासून वाईट परिणाम कसे होतात ह्याचें एक उदाहरण देतों. शिवाजी लहानपणीं दरवडे घालीत असे व पुढें दरवडे घालतां घालतां तो राज्यपद पावला, असे अवास्तव व

विपर्यस्त वर्णन ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत लिहून ठेविलें आहे. हेंच वर्णन शाळांतून चालणाऱ्या कित्येक इंग्रजी व मराठी शालोपयोगी पुस्तकांत नमूद केलेलें सर्वत्र प्रसिद्ध आहे. तेव्हां ह्या असल्या लिहिण्याला जितका खो घालतां येईल तितका घातला पाहिजे. ऐतिहासिक पत्रव्यवहार शुद्ध व अस्सल बरहुकूम छापून व त्यांतील पुराव्याला धरून जर रा. पारसनीस लिहितील तर त्यांचें लिहिणें उपयोगाचें होईल. ऐतिहासिक पत्रव्यवहार नुसता अस्सलबरहुकूम जरी त्यांनीं छापिला व चरित्रें, प्रस्तावना, टीपा वगैरे भानगडींत ते पडले नाहींत, तरी देखील त्यांच्या हातून मोठेंच काम साधल्यासारखें होईल. परंतु हा सुविचार पसंत न पडून ते जर आपला उद्योग सध्यां चालवीत आहेत त्याच धर्तीवर पुढें चालवितील व महाराष्ट्रांतील टीकाकार त्यांच्या लिहिण्याचा, इतिहासाच्या प्रेमानें जयजयकार करतील, तर वर्तमान व भावी पिढ्यांची दिशाभूल केल्याच्या श्रेयाला ते धनी होतील.

३४. रा.पारसनिसांनीं छापलेल्या पत्रव्यवहारांपैकीं बऱ्याच पत्रांना तारखा दिल्या नाहींत. कित्येक पत्रांच्या तारखा चुकलेल्या आहेत व कित्येक पत्रांवरील टीपा ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत, असें मागें मीं म्हटलें आहें. अर्थात् सदर पत्रव्यवहारांतील खऱ्या तारखा देणें व टीपा सुधारणें अत्यंत अवश्यक झालें आहे. ज्या पत्राला पारसनिसांनीं तारीख दिली नाहीं तेथें कोरी जागा सोडली आहे.

## पत्रव्यवहार.

| लेखांक पा० ता० | खरी तारीख. | टीका. |
|---|---|---|
| १ | आक्टोबर १७३२ | लेखांक २१८ पहा. हें पत्र १७२४।२५ सालचें नाहीं. |
| २ | ८ एप्रिल १७३० | |
| ३ | २३ डिसेंबर १७३५ | |
| ४ | १७ नोव्हेंबर १७३३ | |
| ५ | १६ जून १७४५ | |
| ६ | १७४३ | लेखांक २९० पहा. |
| ७ | १९ फेब्रुवारी १७२९ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ८ | १७ आगस्ट १७३७ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ९ | जून १७३४ | |
| १२ | जून १७४० | चिमणाजी १७४० त वारला. |
| १७ | १७३२ | |
| १८ | १८ जानेवारी १७३२ | |
| १९ | ७ एप्रिल १७१७ | लेखांक ११४ पहा. 'राजश्री व चिरंजीवांच्या' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बद्दल ‘ राजकीय ’ असा पाठ पाहिजे. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २१ | | २८ जानेवारी १७४० | |
| २२ | | ४ फेब्रुवारी १७४० | |
| २३ | | १७४२ | |
| २४ | | ५ मे १७३९ | ह्यावेळीं बाजीराव वऱ्हाडांत व चिमाजी वसईस होता. |
| २५ | | ४ नोव्हेंबर १७४० | |
| २६ | २ एप्रिल १७३१ | २ एप्रिल १७३१ | रा. पारसनीस लिहितात कीं, त्र्यंबकरावास सेनापति पद १७२१ त मिळालें. परंतु तें खोटें आहे. खंड २ प्रस्तावना पहा. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २८ | २१ जून १७३४ | २ जुलै १७३३ | माळशिरसाच्या सनदा अर्बा सल्लासीनांत दिल्या. |
| २९ | २७ जून १७३४ | १६ जून १७३५ | पिलाजी जाधवराव हिंदुस्थानच्या स्वारीहून आल्यावर हें पत्र लिहिलें आहे. टांकण घोडा म्हणजे हिमालयांतील किंवा इतर पहाडांतील खुजा घोड्याची जात आहे. |
| ३० | ८ एप्रिल १७३५ | १ जून १७३० | निजाम, कोल्हापूरकर, प्रतिनिधि, फत्तेसिंग, बाबूजी नाईक, वगैरे मंडळी १७३० त बाजीरावाविरुद्ध झाली त्यावेळचें हें पत्र आहे. |
| ३१ | | २८ मार्च १७३६ | दुसऱ्या दिवशीं पत्र साताऱ्यासहि पोहोंचूं शकतें. अंतर ५ मैल. |
| ३२ | | एप्रिल १७३८ नंतर | भोपाळच्या मोहिमेच्या नंतरचें पत्र. लेखांक ११७ पहा. श्रीरंगपट्टणची स्वारी १७२५ |

विपर्यस्त वर्णन ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत लिहून ठेविलें आहे. हेंच वर्णन शाळांतून चालणाऱ्या कित्येक इंग्रजी व मराठी शालोपयोगी पुस्तकांत नमूद केलेलें सर्वत्र प्रसिद्धच आहे. तेव्हां ह्या असल्या लिहिण्याला जितका खो घालतां येईल तितका घातला पाहिजे. ऐतिहासिक पत्रव्यवहार शुद्ध व अस्सल बरहुकूम छापून व त्यांतील पुराव्याला धरून जर रा. पारसनीस लिहितील तर त्यांचें लिहिणें उपयोगाचें होईल. ऐतिहासिक पत्रव्यवहार नुसता अस्सलबरहुकूम जरी त्यांनीं छापिला व चरित्रें, प्रस्तावना, टीपा वगैरे भानगडींत ते पडले नाहींत, तरी देखील त्यांच्या हातून मोठेंच काम साधल्यासारखें होईल. परंतु हा सुविचार पसंत न पडून ते जर आपला उद्योग सध्यां चालवीत आहेत त्याच धर्तीवर पुढें चालवितील व महाराष्ट्रांतील टीकाकार त्यांच्या लिहिण्याचा, इतिहासाच्या प्रेमानें जयजयकार करतील, तर वर्तमान व भावी पिढयांची दिशाभूल केल्याच्या श्रेयाला ते धनी होतील.

३४. रा. पारसनिसांनीं छापलेल्या पत्रव्यवहारांपैकीं बऱ्याच पत्रांना तारखा दिल्या नाहींत. कित्येक पत्रांच्या तारखा चुकलेल्या आहेत व कित्येक पत्रांवरील टीपा ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत, असें मागें मीं म्हटलें आहें. अर्थात् सदर पत्रव्यवहारांतील खऱ्या तारखा देणें व टीपा सुधारणें अत्यंत अवश्यक झालें आहे. ज्या पत्राला पारसनिसांनीं तारीख दिली नाहीं तेथें कोरी जागा सोडली आहे.

## पत्रव्यवहार.

| लेखांक पा० ता० | खरी तारीख. | टीका. |
|---|---|---|
| १ | आक्टोबर १७३२ | लेखांक २१८ पहा. हें पत्र १७२४।२५ सालचें नाहीं. |
| २ | ८ एप्रिल १७३० | |
| ३ | २३ डिसेंबर १७३५ | |
| ४ | १७ नोव्हेंबर १७३३ | |
| ५ | १६ जून १७४५ | |
| ६ | १७४३ | लेखांक २९० पहा. |
| ७ | १९ फेब्रुवारी १७२९ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ८ | १७ आगस्ट १७३७ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ९ | जून १७३४ | |
| १२ | जून १७४० | चिमणाजी १७४० त वारला. |
| १७ | १७३२ | |
| १८ | १८ जानेवारी १७३२ | |
| १९ | ७ एप्रिल १७१७ | लेखांक ११४ पहा. 'राजश्री व चिरंजीवांच्या' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बद्दल ‘ राजकीय ’ असा पाठ पाहिजे. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २१ | | २८ जानेवारी १७४० | |
| २२ | | ४ फेब्रुवारी १७४० | |
| २३ | | १७४२ | |
| २४ | | ५ मे १७३९ | ह्यावेळीं बाजीराव वऱ्हाडांत व चिमाजी वसईस होता. |
| २५ | | ४ नोव्हेंबर १७४० | |
| २६ | २ एप्रिल १७३१ | २ एप्रिल १७३१ | रा. पारसनीस लिहितात कीं, त्र्यंबकरावास सेनापति पद १७२१ त मिळालें. परंतु तें खोटें आहे. खंड २ प्रस्तावना पहा. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २८ | २१ जून १७३४ | २ जुलै १७३३ | माळशिरसाच्या सनदा अर्बा सल्लासीनांत दिल्या. |
| २९ | २७ जून १७३४ | १६ जून १७३५ | पिलाजी जाधवराव हिंदुस्थानच्या स्वारींहून आल्यावर हें पत्र लिहिलें आहे. टांकण घोडा म्हणजे हिमालयांतील किंवा इतर पहाडांतील खुजा घोड्याची जात आहे. |
| ३० | ८ एप्रिल १७३५ | १ जून १७३० | निजाम, कोल्हापूरकर, प्रतिनिधि, फत्तेसिंग, बाबूजी नाईक, वगैरे मंडळी १७३० त बाजीरावाविरुद्ध झाली त्यावेळचें हें पत्र आहे. |
| ३१ | | २८ मार्च १७३६ | दुसऱ्या दिवशीं पत्र साताऱ्यासहि पोहोंचूं शकतें. अंतर ५ मैल. |
| ३२ | | एप्रिल १७३८ नंतर | भोपाळच्या मोहिमेच्या नंतरचें पत्र. लेखांक ११७ पहा. श्रीरंगपट्टणची स्वारी १७२५ |

विपर्यस्त वर्णन ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत लिहून ठेविलें आहे. हेंच वर्णन शाळांतून चालणाऱ्या कित्येक इंग्रजी व मराठी शालोपयोगी पुस्तकांत नमूद केलेलें सर्वत्र प्रसिद्धच आहे. तेव्हां ह्या असल्या लिहिण्याला जितका खो घालतां येईल तितका घातला पाहिजे. ऐतिहासिक पत्रव्यवहार शुद्ध व अस्सल बरहुकूम छापून व त्यांतील पुराव्याला धरून जर रा. पारसनीस लिहितील तर त्यांचें लिहिणें उपयोगाचें होईल. ऐतिहासिक पत्रव्यवहार नुसता अस्सलबरहुकूम जरी त्यांनीं छापिला व चरित्रें, प्रस्तावना, टीपा वगैरे भानगडींत ते पडले नाहींत, तरी देखील त्यांच्या हातून मोठेंच काम साधल्यासारखें होईल. परंतु हा सुविचार पसंत न पडून ते जर आपला उद्योग सध्यां चालवीत आहेत त्याच धर्तीवर पुढें चालवितील व महाराष्ट्रांतील टीकाकार त्यांच्या लिहिण्याचा, इतिहासाच्या प्रेमानें जयजयकार करतील, तर वर्तमान व भावी पिढ्यांची दिशाभूल केल्याच्या श्रेयाला ते धनी होतील.

३४. रा.पारसनिसांनीं छापलेल्या पत्रव्यवहारांपैकीं बऱ्याच पत्रांना तारखा दिल्या नाहींत. कित्येक पत्रांच्या तारखा चुकलेल्या आहेत व कित्येक पत्रांवरील टीपा ऐतिहासिक माहितीला धरून नाहींत, असें मागें मीं म्हटलें आहें. अर्थात् सदर पत्रव्यवहारांतील खऱ्या तारखा देणें व टीपा सुधारणें अत्यंत अवश्यक झालें आहे. ज्या पत्राला पारसनिसांनीं तारीख दिली नाहीं तेथें कोरी जागा सोडली आहे.

## पत्रव्यवहार.

| लेखांक पा० ता० | खरी तारीख. | टीका. |
|---|---|---|
| १ | आक्टोबर १७३२ | लेखांक २१८ पहा. हें पत्र १७२४।२५ सालचें नाहीं. |
| २ | ८ एप्रिल १७३० | |
| ३ | २३ डिसेंबर १७३५ | |
| ४ | १७ नोव्हेंबर १७३३ | |
| ५ | १६ जून १७४५ | |
| ६ | १७४३ | लेखांक २९० पहा. |
| ७ | १९ फेब्रुवारी १७२९ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ८ | १७ आगस्ट १७३७ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ९ | जून १७३४ | |
| १२ | जून १७४० | चिमणाजी १७४० त वारला. |
| १७ | १७३२ | |
| १८ | १८ जानेवारी १७३२ | |
| १९ | ७ एप्रिल १७१७ | लेखांक ११४ पहा. 'राजश्री व चिरंजीवांच्या' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बद्दल ' राजकीय ' असा पाठ पाहिजे. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २१ | | २८ जानेवारी १७४० | |
| २२ | | ४ फेब्रुवारी १७४० | |
| २३ | | १७४२ | |
| २४ | | ५ मे १७३९ | ह्यावेळीं बाजीराव वऱ्हाडांत व चिमाजी वसईस होता. |
| २५ | | ४ नोव्हेंबर १७४० | |
| २६ | २ एप्रिल १७३१ | २ एप्रिल १७३१ | रा. पारसनीस लिहितात कीं, त्र्यंबकरावास सेनापति पद १७२१ त मिळालें. परंतु तें खोटें आहे. खंड २ प्रस्तावना पहा. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २८ | २१ जून १७३४ | २ जुलै १७३३ | माळशिरसाच्या सनदा अर्बा सल्लासीनांत दिल्या. |
| २९ | २७ जून १७३४ | १६ जून १७३५ | पिलाजी जाधवराव हिंदुस्थानच्या स्वारींहून आल्यावर हें पत्र लिहिलें आहे. टांकण घोडा म्हणजे हिमालयांतील किंवा इतर पहाडांतील खुजा घोड्याची जात आहे. |
| ३० | ८ एप्रिल १७३५ | १ जून १७३० | निजाम, कोल्हापूरकर, प्रतिनिधि, फत्तेसिंग, बाबूजी नाईक, वगैरे मंडळी १७३० त बाजीरावाविरुद्ध झाली त्यावेळचें हें पत्र आहे. |
| ३१ | | २८ मार्च १७३६ | दुसऱ्या दिवशीं पत्र साताऱ्यासहि पोहोंचूं शकतें. अंतर ५ मैल. |
| ३२ | | एप्रिल १७३८ नंतर | भोपाळच्या मोहिमेच्या नंतरचें पत्र. लेखांक ११७ पहा. |
| | | | श्रीरंगपट्टणची स्वारी १७२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नोव्हेंबरापासून १७२६ च्या मेपर्यंत झाली. रा. पारसनीस ही मोहीम १७२७ च्या फेब्रुवारीस झाली म्हणून समजतात तें खोटें आहे. |
| ३८ | | १७४० | बारदेश १७३९ त घेतल्यावरचें पत्र ( Forrest, Siege of Bassein, PP. 55—60 ). |
| ३९ | | फेब्रुवारी १७३९ | |
| ४१ | | | रघोजीनें अमदावादेकडे स्वारी केली नसून अलाहाबादेकडे स्वारी केली. |
| ४३ | ४ मे १७२९ | २४ एप्रिल १७३० | |
| ४४ | | १४ एप्रिल १७३१ | हें पत्र १७३४ किंवा १७३७ सालचें नसून १७३१ तील आहे. १७३४ त चिमाजी खानदेशांत होता. लेखांक २७ त ‘ निजामानें गडबड केली तरी तुम्हीं मागें शह देणें ’ म्हणून बाजीरावानें चिमाजीस लिहिलें आहे. १७३७ च्या एप्रिलांत चिमाजी कोंकणांत होता. लेखांक ४७ पहा. |
| ४५ | | १९ आगष्ट १७३८ | ह्यावेळीं बाजीराव जेजुरीस होता. |
| ५२ | १३ मे १७३९ | १२ मे १७३९ | लेखांक ५२ व ५३ ह्या दोन्ही पत्रांच्या तारखांबद्दल रा० पारसनीस फारच बुचकळ्यांत पडले आहेत. दोन्ही पत्रें वैशाख वद्य प्रतिपदेला लिहिलीं असून लेखांक ५३ त लेखांक ५२ काल लिहून |

पाठविला असें म्हटल्यामुळें पारसनीस घोटाळ्यांत पडले इतकेंच नव्हे, तर मित्ती घालण्यांत पेशव्यांची चूक झाली असें त्यांच मत झालें; परंतु पेशवे चुकण्यापेक्षां पारसनीस चुकण्याचा संभव जास्त आहे. खरें पाहिलें तर, ह्या दोन पत्रांच्या तारखांत बरीच माहिती सांठलेली आहे. एक तर, क्षय असो वा वृद्धि असो, पेशव्यांच्या पंचांगांत प्रत्येक तिथीचा आदि व अंत कोणत्या दिवशीं कोणत्या घटकेस व पळास होत असे तें लिहिलें जात असे हें कळतें. व दुसरें असें कीं, चिमाजीनें पोर्तुगीज वसई सोडून गेल्यावर एक दोन घटकांनीं लेखांक ५२ हें पत्र लिहिलें आहे, असें समजतें. लेखांक ५२ व ५३ ह्या पत्रांच्या तारखा १३ मे व १४ मे अनुक्रमें असाव्या असें रा. पारसनीस लिहितात. त्याअर्थी त्यांना ह्या पत्रांतील तारखांचें रहस्य बिलकुल कळलें नाहीं हें उघड आहे. वैशाख वद्य प्रतिपदा शनिवारीं सूर्योदयानंतर एक अवर व २१ मिनिटांनीं लागली व आदितवारीं सूर्योदयापूर्वी एक अवर संपली. अर्थात् शनवारीं सूर्योदयाला पूर्णिमा होती व आदितवारीं

सूर्योदयाला द्वितीया होती. तेव्हां मोडकांच्या जंत्रींत प्रतिपदेचा क्षय दिला आहे तो रास्तच आहे. परंतु प्रतिपदा, शनिवारीं सूर्योदयानंतर १ आ० २१ मिनिटांनीं लागून रविवारीं सूर्योदयापूर्वी १ अवर संपली व त्या अवधींत चिमाजीनें स्वामीला हीं दोन्हीं पत्रें लिहिलीं. पोर्तुगीज लोकांनीं वसई शनवारीं सूर्योदयापूर्वी मध्यरात्रीनंतर कराराप्रमाणें इंग्रजी बाराव्या तारखेस व पोर्तुगीज २३ व्या तारखेस सोडिली. पोर्तुगीजांनीं वसई सोडिल्याबरोबर सूर्योदयाच्या सुमारास मराठे किल्ल्यांत शिरले. किल्ल्यांत शिरल्यावर चिमाजीनें लेखांक ५२ हें पत्र प्रतिपदा लागल्यावर लिहिलें. व "काल वैशाख शुद्ध १५ स फिरंगी झाडून गेला" असें विधान केलें. फिरंग्यांची २३ वी तारीख शनवारीं सूर्योदयापूर्वी मध्यरात्रीस लागली; त्यामुळें ती तारीख लागतांच फिरंगी किल्ला सोडून गेले. तसेंच मराठ्यांची पूर्णिमा शनवारीं सूर्योदयानंतर एक दीड तासांनीं संपल्यावर त्यांनीं किल्ल्यांत प्रवेश वद्य प्रतिपदेला केला. फिरंग्यांनीं पूर्णिमेच्या आंत किल्ला सोडल्यामुळें व चिमा-

जीनें प्रतिपदेच्या प्रारंभीं पत्र लिहिल्यामुळें, व मराठ्यांचा दिवस सूर्योदयाला सुरू होत असल्यामुळें, चिमाजीनें लेखांक ५२ त काल हा शब्द योजिला आहे. लेखांक ५३ हें पत्र चिमाजीनें रविवारीं पहाटेस प्रतिपदा संपण्यापूर्वी लिहिलेलें आहे व त्यांत शनवारीं सूर्योदयीं लिहिलेलें पत्र काल लिहिलें असें म्हटलें आहे. रा० पारसनीस माघ शुद्ध दशमी म्हणजे ७ जानेवारी १७३९ समजतात तें चूक आहे. तसेंच अष्टमी म्हणजे चार मे समजतात तेंहि चूक आहे. लेखांक ५२ व ५३ हीं दोन्हीं पत्रें वद्य प्रतिपदेला लिहिलीं. वद्य प्रतिपदेस इंग्रजी १२ व १३ अशा दोन तारखा होत्या. शनवारीं सूर्योदयापासून मध्यरात्रीपर्यंत १२ वी तारीख होती व त्यापुढें १३ वी तारीख लागली. अर्थात् ५२ व्या लेखांकाची तारीख १२ मे १७३९ शनवार अशी आहे. व ५३ व्या लेखांकाची तारीख १३ मे १७३९ रविवार इंग्रजी अशी आहे. हें पत्र ह्या खंडांत अगोदर छापिलेलें होतेंच. रा. पारसनिसांच्या मोडी वाचनाच्याहि चुका ह्या पत्रांत बऱ्याच झाल्या आहेत. ( १)

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मोर्चेच लाविले ह्याबद्दल मोर्चे चालविलें; ( २ ) सोडून बद्दल पाडून; ( ३ ) कसकरलें बद्दल कचकरले; ( ४ ) आगीचा पुतळा बद्दल आगीचा पुला; वगैरे पाठ पाहिजे होते. |
| ५३ | १४ मे १७३९ | १३ मे १७३९ | |
| ६१ | १९ एप्रिल १७४२ | ९ एप्रिल १७४३ | |
| ६६ | | एप्रिल १७४४ | जनार्दनपंतांचें लग्न २० एप्रिल १७४४ स झालें. |
| ६७ | १४ एप्रिल १७४४ | १४ एप्रिल १७४४ | हें पत्र जनोबाच्या लग्नानंतर लिहिलें नाहीं; आधीं लिहिलें आहे. |
| ७१ | | १८ जुलै १७४४ | लेखांक ६७ व ६८ पहा. लेखांक ६७ च्यानंतर व ६८ च्या पूर्वी हें पत्र लिहिलें आहे. |
| ७२ | | २५ नोव्हेंबर १७४१ | |
| ७३ | | ८ मार्च १७४१ | |
| ७४ | | ३१ जुलै १७४१ | |
| ७६ | १२ सप्टेंबर १७३९ | ९ सप्टेंबर १७४२ | लेखांक ६४ पहा. |
| ७७ | २६ मार्च १७४० | २३ मार्च १७४३ | लेखांक ८१ पहा. |
| ७९ | २४ १७४२ | १४ जून १७४२ | |
| ८२ | | २२ मार्च १७४३ | |
| ८३ | | १९ जानेवारी १७४३ | |
| ८४ | | २७ जानेवारी १७४३ | हीं तिन्हीं पत्रें बाळाजी बाजीराव हिंदुस्थानच्या स्वारीहून परत येण्याच्या अगोदर लिहिलीं आहेत. |
| १०० | | १७४२ | |
| १०१ | | जुलै १७३४ | |
| १०२ | | जुलै १७३४ | |
| १०८ | | १७४२ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११२ | | १७३२ | |
| ११४ | | एप्रिल १७१७ | लेखांक १९ पहा. |
| ११५ | ७ मार्च १७३५ | ४ एप्रिल १७३५ | २२ जिल्काद म्हणजे ५ एप्रिल. |
| १२० | | जून १७३९ | |
| १२१ | | १४ नोव्हेंबर १७३२ | १७३३ त निजामाला भेटण्याच्या पूर्वींचें पत्र. |
| १२३ | | २४ आक्टोबर १७३९ | लेखांक १३९ पहा. |
| १२५ | | १२ आक्टोबर १७३९ | लेखांक १३९ पहा. |
| १३० | १३ जानेवारी १७३७ | ५ फेब्रुवारी १७३५ | लेखांक ११५ पहा. |
| १३७ | १९ जुलै १७३९ | ७ जुलै १७४० | लेखांक ५६ पहा. |
| १३८ | ९ सप्टेंबर १७३९ | २९ सप्टेंबर १७४० | हें पत्र बाजीरावाच्या मृत्यूनंतर लिहिलें आहे. |
| १४० | १५ आक्टोबर १७३९ | ३ आक्टोबर १७४० | लेखांक १३७ पहा. |
| १४८ | १५ डिसेंबर १७३८ | २५ डिसेंबर १७३८ | |
| १५२ | | १४ फेब्रुवारी १७३९ | लेखाक १४५ पहा. |
| १६४ | | ६ मे १७४२ | लेखांक २१४ पहा. |
| १६५ | | ८ फेब्रुवारी १७४१ | हें पत्र चिमणाजीपंत वारल्यावर लिहिलें आहे. चिमणाजी कृष्ण भागवत केव्हां वारला ? रा. पारसनीस म्हणतात, तो १३ मे १७४१ रोजीं म्हणजे ज्येष्ठ वद्य ४ दुर्मतीनामसंवत्सरीं वारला. आतां ज्येष्ठ वद्य ४ ला त्या वर्षी १३ मे ही तारीख नसून २३ मे ही तारीख आहे. ज्येष्ठ वद्य ४ ही तिथी काव्येतिहाससंग्रहांतील ब्रह्मेंद्रस्वामीच्या बखरींतून पारसनिसांनीं घेतली आहे. त्या बखरींत खालील वाक्य आहे. “सन इहिदे अर्बैन ज्येष्ठ वद्य ४ छ १७ शके १६६३ |

दुर्मतिनामसंवत्सरीं जमा-
दिलावलीं चिमणाजी कृष्ण
यांस देवाज्ञा झाली. " ह्या
वर्षी ज्येष्ठांत जमादिलावल
महिना नसून रबिलावल
महिना आहे व ज्येष्ठ वद्य
४ थीला छ १७ नसून छ
१८ आहे. तेव्हां बखरींतील
ही तारीख अगदीं अविश्वस-
नीय आहे. ही अविश्वसनीय
तारीख खरी धरून रा०
पारसनीस ह्या खंडांतील २२ व
लेखांकाची मीं दिलेली तारिख
खोटी ठरवूं पहातात. ह्या
पत्राची २२ आगस्ट १७४०
ही तारीख मीं दिली आहे.
चिमणाजी कृष्ण १७४१
च्या १३ मेस वारला अशी
खोटी समजूत करून घेऊन
रा० पारसनीस २२ आगस्ट
१७४० ही तारीख खोटी
आहे असें प्रतिपादन करतात.
ते म्हणतात, ह्या २२ व्या
लेखांकांत जर चिमणाजी
कृष्ण वारल्याची हकीकत
आहे व चिमणाजी कृष्ण जर
१७४१ त वारला, तर हें
पत्र १७४० च्या आगष्टां-
तील कसें असूं शकेल ? ह्या-
वर माझें असें म्हणणें आहे
कीं, हा २२ वा लेखांक रा०
पारसनीसांना स्वतंत्र मिळाला
असून तो त्यांनीं नीट वाचला
नाहीं. नीट वाचला असता

तर त्यांनीं अशीं भ्रामक विधानें केलीं नसतीं. ह्या बाविसाव्या लेखांकांत दोन विधानें केलीं आहेत. (१) चिमणाजी कृष्ण वारल्याचें एक विधान, व (२) चिमणाजी बल्लाळ पेशवे ह्यांस चिरंजीव म्हटल्याचें दुसरें विधान. तात्पर्य, हें पत्र लिहिलें त्या वेळीं चिमणाजी अप्पा पेशवे जिवंत होता व चिमणाजी कृष्ण वारला होता. आतां चिमणाजी बल्लाळ पेशवे १७४० च्या १७ डिसेंबरीं वारला हें प्रसिद्ध आहे. अर्थात् १७४० च्या १७ डिसेंबरच्या अगोदर व १७४० च्या २२ आगस्टाच्या अगोदर चिमणाजी कृष्ण भागवत वारला असला पाहिजे. तेव्हां रा० पारसनीस यांनीं स्वामीच्या पत्रव्यवहाराला जोडलेल्या बखरवजा चरित्राच्या १२३ व्या पृष्ठावर मीं दिलेली तारीख खोटीं करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो केवळ हास्यास्पद आहे. ह्यासंबंधानें ह्या तिसऱ्या खंडांतील लेखांक ८४रा० पारसनिसांनीं पहावा. त्यांत १७४० च्या ६ आगस्टास जगन्नाथपंताची नेमणूक बाळाजी बाजीरावानें ३०० रुपये केली आहे. अर्थात् चिमणाजीपंत ह्यावेळीं वारला

| | | |
|---|---|---|
| १६६ | १७४२ | होता. ह्या पत्राच्या टीपांत गप्पांचा भाग विशेष आहे. रा० पारसनीस हें पत्र १७३७ च्या अगोदरचें समजतात व भास्करराम १७३७ त मारला गेला म्हणून लिहितात; परंतु हें त्यांचें शुद्ध अज्ञान आहे. |
| १६७ | १७४२ | |
| १६८ | १७४२ | |
| १८२ | १५ सप्टेंबर १७३३ | रा० संभाजी आंग्रे ज्याअर्थी १७४२ च्या जानेवारींत वारला त्याअर्थी हें पत्र १७३३ तील आहे. |
| १८३ | १६ फेब्रुवारी १७३१ | ह्या पत्रांत १७३१ तील थोराताच्या दंग्याचा उल्लेख आहे. |
| १८४ | १७४५ | हें पत्र ताराबाईच्या हुकुमावरून दमाजी गायकवाडानें अद्वैतेंद्रास लिहिलें आहे; रा० पारसनीस लिहितात त्याप्रमाणें समाधिस्थ परमहंसास लिहिलें नाहीं. |
| १८५ | २४ फेब्रुवारी १७३२ | ह्याहि पत्राच्या टिपेंत गप्पा आहेत. |
| १८७ | १० आक्टोबर १७३७ | |
| १९० | १७३२ | अमदाबादेवरील स्वारी १७३४ त झाली नसून १७३२ त झाली. |
| १९४ | १७४२ | |
| १९५ २१ म १७३९ | ११ मे १७३९ | |
| १९७ | | ह्या पत्राच्या टिपेंत ब्रह्मेंद्र फक्त ताक पिऊन रहात असे म्हणून पारसनीस लिहितात. परंतु स्वामीला चमचमीत |

| | | |
|---|---|---|
| | | भोजनाचे पदार्थ लागत त्याचे दाखले आहेत. |
| २०१ | ३ एप्रिल १७२७ | हें पत्र मीं पूर्वी छापिलें आहे. |
| २०२ | १७३० | सेखोजी १७३६ त वारला नसून १७३३ त वारला. |
| २०३ | २५ जून १७३३ | |
| २०४ | डिसेंबर १७४४ | आपाजी हें संभाजीचें टोपण नांव नव्हे. आपाजी म्हणजे मानाजी आंग्रे. लेखांक २०५ पहा. लेखांक २०५ हें पत्र १७४४ त लिहिलें आहे, त्या-वेळीं संभाजी मरून दोन वर्षे झालीं होतीं. |
| २१२ | १७३५ | शाहू महाराजांची रोजनिशी पहा. |
| २१४ | ६ मे १७४२ | वैशाख शु॥ १३=१२ रा॥ वल लेखांक १६४ पहा. |
| २१८ | ८ आक्टोबर १७३२ | |
| २२० | २९ आगस्ट १७३१ | |
| २३२ | १६ नोव्हेंबर १७४१ | लेखांक १५५ पहा. |
| २३३ | २९ एप्रिल १७४१ | |
| २३८ | १८ जानेवारी १७४४ | |
| २३९ | १९ जून १७४४ | ‘ अविनयभाव ’ याबद्दल ‘ अविनाभाव ’ पाहिजें. |
| २४० | २२ नोव्हेंबर १७३८ | |
| २४१ | २२ नोव्हेंबर १७३८ | हें पत्र रा. पारसनीस १७३३ च्या सुमाराचें समजतात. परंतु २१ जुलूस म्हणजे १७३८ हें साल येतें. १७३३ पासून पुढें स्वामी कोंकणांत समाधीस गेला नाहीं. तेव्हां-पासून पांच वर्षे होत आलीं. त्यावेळीं अबदुल रहमान या-कुतखान हा तख्तावर होता. |

| | | |
|---|---|---|
| २४२ | १ सप्टेंबर १७४४ | २६ जुलूस म्हणजे इ० स० १७४४. रा. पारसनीस हें पत्र १७३८ तील समजतात. १२ वर्षें म्हणजे १७३२ पासून धरलीं पाहिजेत. हें पत्र व ३ न्या खंडांतील १०४ लेखांक एकच आहेत. |
| २४३ | १५ जुलै १७४४ | लेखांक २४२ पहा. |
| २४५ | २० एप्रिल १७३६ | रा. पारसनीस ह्या पत्राचें साल १७३५ देतात तें अर्थात् चूक आहे. |
| २४७ | २६ आगस्ट १७३१ | |
| २४९ | १५ एप्रिल १७३२ | |
| २५० | २२ जून १७३२ | |
| २५१ | ३१ आगस्ट १७३१ | |
| २५२ | २५ मे १७३७ | |
| २५३ | ५ सप्टेंबर १७२७ | |
| २५५ | १७४० | |
| २५६ | १७४० | |
| २५७ | १७४० | |
| २६८ | १७३५ | |
| २६९ | १७३५ | |
| २७६ | १७३६ | |
| २७७ | १७३३ | |
| २७८ | जून १७३६ | |
| २८० | १७३३ | |
| २८१ | १७३६ | |
| २८३ | १७३६ | |
| २९१ | १७४१ | |
| ३०२ | १७३० | हें पत्र मालोजी पवारास लिहिलेलें आहे. |
| | १७३३ | लेखांक १८८ पहा. |
| ३१० | १७४० | |
| ३११ | १७३६।३७ | |
| ३१४ | | |

| | | |
|---|---|---|
| ३२० | | १७३६।३७ |
| ३२१ | | १७३१ |
| ३२२ | | १७४४ |

ह्या पत्रावर रा. पारसनीस ह्यांस एक अर्धवट शिक्का उमटलेला सांपडला. त्यांत " लस्य मुद्रा जयति सर्वदा " अशीं अक्षरें होतीं. त्यावरून सदर इतिहासपटूनें असा तर्क केला कीं, हा स्वामीच्या शिक्याचा एक अपूर्ण भाग असावा! व पुढें अशी स्तुत्य जिज्ञासा दर्शविली कीं, हा शिक्का संपूर्ण सांपडल्यास इतिहासाचें मोठें हित होईल. ह्या जिज्ञासेपुढें मिस्तर पिक्विक् यांची मठ्याच्या थडग्यावरील अक्षरांत रोमन इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा केवळ फिकी पडते!!! रा. पारसनीस यांनीं मीं छापिलेलीं कान्होजी आंग्र्यांचीं पत्रें पाहिलीं असतीं म्हणजे रा. पारसनीस ह्यांच्या स्तुत्य जिज्ञासेचें थोडेंबहुत समाधान झालें असतें.

कान्होजींच्या पत्रांवर सही मुद्रा आहे:—

श्री शाहूनृपतिप्रीत्या तुकोजी तनुजन्मनः ।।

कान्होजी सरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा ॥

ह्यांतील दुसऱ्या ओळीचा कांहीं उपयोग झाल्यास इतिहासपटूंनीं करून घ्यावा.

| | | |
|---|---|---|
| ३३० | २३ जून १७३३ | |
| ३५२ | २८ एप्रिल १७३१ | |
| ३६५ | १७४० | |
| ३६७ | १७३१ | |
| ३६९ | | यमाजी बद्दल एसाजी पाहिजे. हें एसाजी आंग्यास पत्र आहे. |

## चरित्र.

| | | |
|---|---|---|
| १८ १७२६ | १४ आगस्ट १७२५ | राजशक ५२, विश्वावसु, भाद्रपद बहुल १३ गुरुवार. |
| १८ टीप | २७ सप्टेंबर १७२५ | २९ मोहरम सु॥ सीत अशरीन. |
| २८ | २२ मार्च १७२८ | २१ साबान सु॥ समान अशरीन. |
| ४९ १७३३ | १० मे १७३२ | २५ जिल्काद. |

३५. ब्रह्मेंद्रस्वामींच्या व कायगांवकर दीक्षितांच्या पत्रांवरून ऐतिहासिक माहिती काय मिळते ती दाखविण्याची प्रतिज्ञा ह्या प्रस्तावनेच्या आरंभीं केली होती. त्या प्रतिज्ञेप्रमाणें ब्रह्मेंद्रस्वामींच्या पत्रव्यवहाराचा खल येथपर्यंत झाला. हा खल करतांना रा० पारसनीस यांनीं छापिलेल्या ब्रह्मेंद्राच्या पत्रांचाहि विचार केला. ब्रह्मेंद्रस्वामींचीं जीं आज सहाशें पत्रें उपलब्ध होऊन प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांपैकीं निम्यांत, तेल, तूप, चंदन, केशर, किनखाप, घोंगडी, दुलई, घंटा, नगारा, वगैरे जिनसांची मागणी स्वामीनें त्यावेळच्या मोठमोठ्या लोकांजवळ केलेली आहे. ह्या मागण्या स्वामीनें कधीं स्वतंत्र पत्रांतून केल्या आहेत व कधीं इतर मजकूर लिहितांना शेवटीं केल्या आहेत. क्षुल्लक मागण्यांचीं हीं असलीं कांहीं पत्रें छापिलेलीं पाहून अशी तक्रार निघाली कीं हीं असलीं पत्रें छापून काय ऐतिहासिक ज्ञान मिळणार ? ऐतिहासिक पत्रव्यवहार छापणाऱ्यांनीं क्षुल्लक व निरुपयोगी चिटोरीं छापूं नये, अशी इशारत करणारा कांहीं जागरूक वाचकसमूह महाराष्ट्रांत आहे हें पाहून मला बरेंच समाधान वाटलें. तक्रार खरी असो अगर खोटी असो. तक्रार तरी करण्याइतकी काळजी ऐतिहासिक पत्रव्यवहारासंबंधानें लोकांना वाटते ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. आतां तक्रार करणाऱ्यांनीं एवढी मात्र गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, तक्रार करणाऱ्या लोकांप्रमाणें मलाहि क्षुल्लक व निरुपयोगी चिटोरीं छापण्याचा तिटकाराच आहे. उगाच कांहीं तरी भारुडा छापून कोणाला भिवडवायाचें आहे, किंवा फसवाव-

याचें आहे, किंवा वेळ मारून न्यावयाची आहे, किंवा प्रौढी मिरवावयाची आहे, अशांतला प्रकार नाहीं. असा खेळ करण्याला वेळहि नाहीं, कारणहि नाहीं व फाजील पैसाहि नाहीं. अठराव्या शतकांतील मराठ्यांचा पत्रव्यवहार इतक्या प्रमाणानें उपलब्ध होत आहे कीं, क्षुल्लक व निरूपयोगी चिटोरीं छापण्याची कांहीं जरूरच नाहीं. अत्यंत महत्त्वाचा व उपयोगाचा पत्रव्यवहारच छापतां छापतां जेथें नाकींनव येत आहेत, तेथें क्षुल्लक व निरुपयोगी चिटोरीं छापीत बसण्याचें साहस होणार कसें? ब्रह्मेंद्रस्वामीचीं तेलातुपाचीं पत्रें ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचीं वाटलीं म्हणूनच छापिलीं आहेत. ब्रह्मेंद्रस्वामी निरिच्छ होता, परमहंस होता, सूत्रधार होता, राजकार्यकुशल होता, वगैरे नानाप्रकारच्या कल्पना आजपर्यंत प्रचलित होत्या. त्या कितपत खऱ्या आहेत हें दाखवितांना हीं तेलातुपाचीं पत्रें छापणें अवश्यक झालें. पत्रव्यवहारावरूनच जर मनुष्याच्या स्वभावाची व कर्तृत्वाची पारख करावयाची असेल——व ऐतिहासिक पुरुषांच्या स्वभावाची पारख इतर कोणत्याहि साधनानें इतकी चांगली करतां येणें अशक्य आहे——तर त्या पत्रव्यवहारांत कोणत्या गोष्टीला किंवा इच्छेला विशेष प्राधन्य दिलें आहे तें पाहिलें पाहिजे. ब्रह्मेंद्रस्वामीच्या आवक व जावक अशा सहाशें पत्रांत ज्यांत कांहीं जिनसांची मागणी केली नाहीं अशीं ५० हि पत्रें नाहींत. खरबुजें, कलिंगडीं, द्राक्षें, नारळ, वस्त्रें, पात्रें, गांवें, भिक्षा, कर्जें, व्याजें ह्यांची मागणी ह्या सहाशें पत्रांतून केलेली आहे. निवळ राजकीय महत्त्वाचीं अशीं स्वामीला पाठविलेलीं पत्रें दहा विसांहून जास्त नाहींत. कित्येक राजकीय पत्रें इतर लोकांना आलेलीं स्वामीनें मागून आणविलेलीं आहेत. सारांश "**जिनसांची मागणी**" हा स्वामीच्या हृदयांतील मोठा हव्यास होता. मागणीचें जो समाधान करील तो प्रिय व न करील तो अप्रिय, असा स्वामीचा कायदा असे. स्वामीच्या दफ्तराप्रमाणें इतरहि पांच पन्नास दफ्तरें मीं पाहिलीं आहेत. फडणीस, पुरंधरे, हिंगणे, थोरात, पंत राजाज्ञा, फडके, रास्ते, पटवर्धन, वगैरेंचीं चिटणिशी दफ्तरें पहावीं तर त्यांत राजकीय कारभाराचे शेंकडों कागद सांपडतात. नानाफडणिसाच्या दफ्तरांतील ३०,००० पत्रांपैकीं एकहि पत्र राजकीय नाहीं असें नाहीं; व एकाहि पत्रांत राजकीय दृष्ट्या क्षुल्लक किंवा निरुपयोगी मजकूर लिहिलेला सांपडावयाचा नाहीं. परंतु स्वामीचीं पत्रें पहावीं तर त्यांत राजकारणेतर मजकूरच विशेष आढळतो. त्या राजकारणेतर मजकुराचें स्वरूप काय, स्वामीच्या हव्यासाची दिशा कोणती, वगैरे गोष्टींच्या सिद्धीस पुरावा असावा म्हणून हीं तेलातुपाचीं पत्रें छापिलीं आहेत. त्यांच्याकडे यथार्थ दृष्टीनें पहाण्याची संवय लावून घेतल्यास तक्रारीस जागा रहाणार नाहीं.

३६. हें ब्रह्मेंद्र प्रकरण आटोपल्यावर कायगांवकर दीक्षितांच्या पत्रांकडे वळावयाचें. परंतु १७४० पासून १७६१ पर्यंतचा आणखी कांहीं पत्रव्यवहार छापावयाचा आहे. त्यावेळीं त्या पत्रांची उपयुक्तता दाखविली जाईल. येथें इतकेंच नमूद करून ठेवितों कीं, दीक्षितांचा पत्रव्यवहार फारच महत्त्वाचा आहे.

---

# प्रस्तावना खंड ४ था.

१ ह्या ग्रंथांत खालील प्रकरणें छापिलीं आहेतः—

( १ ) नारायणव्यवहारशिक्षा.

( २ ) सवाई माधवराव आठ वर्षांचे असतांना त्यांच्याकरितां तयार केलेली पेशव्यांची बखर.

( ३ ) पेशवाईच्या अखेरची अखबार.

( ४ ) रमास्वयंवर.

( ५ ) शक १७३८ सालची हकीकत.

( ६ ) पेशव्यांची वंशावळ.

२ नारायणव्यवहारशिक्षेच्या मला चार लेखी प्रती मिळाल्याः—सवाई माधवरावाची आजी ताईसाठी हिच्या वंशजांच्या दप्तरांतून दोन, सातारा येथील सुभेदार जोशी यांजकडून एक, व पुणें येथील भाऊसाहेब बिनीवाले यांजकडून एक. पैकीं पहिल्या तीन एकाच मूळाच्या निरनिराळ्या प्रती आहेत. बिनीवाल्यांच्या प्रतींत मात्र खालील श्लोक जास्त आहेत.

श्लोक.

गोपालकृष्णकृपया व्यवहारशिक्षा
गोविंदकृष्णमनसोत्थितधर्मदीक्षा ॥
यो वै तया चरति जिष्णुरिवात्र लोके
हर्म्यें तु तस्य कमलासनकीर्तिलाभः ॥ १ ॥

इति लाभशिक्षा.

अथ पालनशिक्षा.

योग्यायोग्यविचारवस्तुविषये संसाररूपज्ञतां
स्थैर्यास्थैर्यविवेकमंत्ररचनासंचारकालज्ञतां ॥
साध्यासाध्यबलाबलेषु कुशलं शिक्षागुणज्ञप्रभो
लाभस्यप्रतिपालनं कुरु सदा लाभाच्च भाग्योदयः ॥ २ ॥

इति पालनशिक्षा.

अथ नाशसंरक्षणशिक्षा.

अहंकारबुद्ध्या न जानाति रूपं
न पात्रेषु दानं कुपात्रेषु सख्यम् ॥
अशिक्षोवरश्चात्ममालिन्यलिप्तो
व्यवस्थाविशून्यो गतः शेषलाभः ॥ ३ ॥

इति नाशसंरक्षणशिक्षा.

साष्ट्यांच्या व सातारा येथील प्रतींत ह्या श्लोकांची जागा सोडलेली आहे. तेव्हां हे श्लोक मूळ प्रतींत असले पाहिजेत हें उघड आहे. हा ग्रंथ शके १७११ सौम्यनाम संवत्सरे माघ शुद्ध पंचमीला सवाई माधवरावाकरितां लिहिला. त्या वेळीं सवाई माधवरावाचें वय सोळा वर्षांचें होतें. गोपाळकृष्णाच्या कुळांत गोविंदकृष्णाच्या मनांत ह्या ग्रंथाची प्रथम कल्पना आली. तीवरून नारायणानें हा ग्रंथ निर्मिला, असें ग्रंथाच्या नांवावरून, उपोद्घातावरून व वरच्या श्लोकावरून दिसतें. हा ग्रंथ शिक्षात्मक आहे, शास्त्रात्मक नाहीं. शास्त्रात्मक ग्रंथांत कोणत्याहि विषयाची उपपत्ति दिलेली असते. शिक्षात्मक ग्रंथांत व्यवहारांत वागावें कसें ह्याविषयीं आज्ञा सांगितलेल्या असतात. नीतिशास्त्रांत नीतीच्या मूलतत्त्वांची उपपत्ति दिलेली असते. नीतिशिक्षेंत व्यवहारांत वर्तन करण्याच्या आज्ञा सांगितलेल्या असतात. नारायणव्यवहारशिक्षा हा ग्रंथ शिक्षात्मक आहे हें त्याच्या नांवावरूनच ठरतें. ह्यांत व्यवहारोपयोगी अनुभवजन्य हितोपदेश सांगितला आहे. लाभ, पालन व नाशसंरक्षण असे या ग्रंथाचे तीन भाग केले असून प्रत्येक भागाचे गुण दिले आहेत. हे गुण अगदींच अभिनवनिर्मित आहेत असें नाहीं. नारदनीति, कणिकनीति यक्षप्रश्न, पंचतंत्र, हितोपदेश वगैरे शिक्षाग्रंथांतून बरींच वचनें घेतलेलीं वाचकांच्या दृष्टीस पडतील. परंतु ह्या ग्रंथाचा मुख्य उगम हेमाडपंताच्या नांवावर विकली जाणारी जी एक बखर प्रसिद्ध आहे ती होय. ह्या ग्रंथांत व हेमाडपंताच्या बखरींत भेद असा आहे कीं, हेमाडपंती बखरीपेक्षां ही शिक्षा व्यवस्थित आहे. नारायणशिक्षेंत लाभाचीं कलमें ३५, पालनाचें कलम १ व नाशसंरक्षणाचें कलम १, अशीं एकंदर ३७ कलमें आहेत. लाभाच्या ३५ कलमांचे १९६ गुण, पालनाच्या एक कलमाचे १२ गुण, व नाशसंरक्षणाच्या १ कलमाचे १० गुण सांगितले आहेत. गुण म्हणजे ध्यानांत ठेवण्यासारखीं वाक्यें अथवा म्हणी. ह्या म्हणींपैकीं कांहीं म्हणी नारायणशिक्षेच्या आधीं झालेल्या बऱ्याच ग्रंथांत सांपडतात. उदाहरणार्थ पालनाच्या कलमांतील नववा गुण ' महाराची खिचडी उतरावी, आपली चढवावी ' ही म्हण भाऊसाहेबांच्या बखरींत आली आहे. भाऊसाहेबांच्या बखरींत ' महाराची ' ह्याबद्दल ' महाराजाची ' असें चुकून पडलें आहे. तसेंच बडोदे येथें छापलेल्या ' शिवप्रताप ' नामक बखरीच्या चोविसाव्या पृष्ठावर ' परेंगित जाणावें, ' ' मर्म लोपवावें ' वगैरे म्हणी आल्या आहेत. ह्यावरून असें दिसतें कीं पूर्वीच्या बखरींतील व लोकव्यवहारांतील बऱ्याच म्हणी नारायणशिक्षेंत गोविल्या असाव्या. हा ग्रंथ नानाफडणिसानें सवाई माधवरावाकरितां शके १७११ त लिहविला. ह्यांतील कलमांचा अर्थ गुरुमुखानें सवाईमाधवराव प्रत्यहीं प्रातःकाळीं ऐकत असत अशी आख्यायिका आहे. ह्या ग्रंथाची एक प्रत मीं ग्वालेरीस पाहिली. ह्यावरून असें दिसतें कीं हा ग्रंथ महाराष्ट्रमंडळांत त्या वेळीं बराच प्रचलित होता.

( ३ ) " शके १७०४ पर्यंतची पेशव्यांची बखर " हें या ग्रंथांतील दुसरें प्रकरण आहे. ही बखर सवाई माधवरावाकरितां नानाफडणिसांनीं चिटणिसांकडील बाळाजी गणेश ह्या कारकुनाकडून लिहविली. ही बखर, एक दोन क्षुल्लक अपवाद काढून टाकिले असतां, येथून तेथून पूर्णपणें विश्वसनीय आहे. सवाई माधवराव आठ वर्षांचे असतांना

त्यांच्याकरितां ही बखर लिहिली असल्यामुळें, अर्थातच ही अत्यंत त्रोटक आहे. परंतु कालाचा किंवा स्थलाचा किंवा प्रसंगाचा विपर्यास झालेला या बखरींत क्वचित् सांपडेल, किंबहुना सांपडणारच नाहीं. ह्या बखरीच्या एकंदर पांच प्रती मिळाल्याः—पुणें येथील ताई साठी इच्या वंशजांकडून एक, काव्येतिहाससंग्रहकारांच्या दप्तरांतील दोन व वसई येथील दिवेकर यांजकडून दोन. पैकीं साठ्यांची बखर व दिवेकरांची एक बखर पूर्ण आहेत. बाकीच्या तिन्ही बखरी अपूर्ण आहेत. ही बखर शके १७०४ शुभकृत् संवत्सरीं लिहिली. हींत सवाई माधवरावाच्या लग्नाचा ताजा उल्लेख आहे.

ह्या बखरींतील बरेच प्रसंग बखरनविसानें स्वतः पाहिले असल्यामुळें व ज्यांनीं ते प्रसंग स्वतः पाहिले त्यांच्याकरितां व त्यांच्या आज्ञेवरून ही सजविली असल्यामुळें, ही बखर विश्वासपात्र आहे. अधून मधून पेशव्यांची स्तुति केलेली आहे, तीं देखील मर्यादित असून, तींत पक्षपातात्मक किंवा अप्रस्तुत असें एकहि वाक्य आढळावयाचें नाहीं. ही बखर त्रोटक नसून विस्तृत असती म्हणजे इतिहासाचें फारच हित झालें असतें. महाराष्ट्रांत आजपर्यंत जेवढ्या म्हणून बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत, त्या सर्वांत बिनचुकपणाबद्दल हिला अग्रमान देणें रास्त आहे. विश्वासरावाच्या स्वारीसंबंधीं थोडीशी गफलत झालेली दिसते, ती शके १६७२ पासून १६८३ पर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासांतील शेंकडों प्रसंगांचें एक दोन पृष्ठांत वर्णन देण्याच्या घाईनें झालेली आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

ह्या बखरीवरून असें अनुमान करितां येतें कीं, विश्वसनीय इतिहास लिहिण्याचा प्रघात अठराव्या शतकांत महाराष्ट्रांत होता. तसेंच समकालीन बखरनविसांनीं लिहिलेले वृत्तांत स्वाभाविकपणेंच विश्वसनीय असतात असेंहि विधान करण्यास ह्या बखरीच्या आधारानें अवकाश होतो. तेव्हां आपल्याला माहीत असलेल्या बखरींपैकीं जेवढ्या म्हणून बखरी समकालीन बखरनविसांनीं लिहिल्या आहेत, तेवढ्या बऱ्याच विश्वसनीय असाव्या किंवा असल्या पाहिजेत हें उघड आहे. आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालेल्या बखरींपैकीं समकालीन बखरनविसांनीं लिहिलेल्या बखरी म्हटल्या म्हणजे ( १ ) सभासदविरचित शिवछत्रपतींचें चरित्र, ( २ ) चित्रगुप्तविरचित शिवाजीमहाराजांची बखर, ( ३ ) भाऊसाहेबांची बखर, ( ४ ) भाऊसाहेबांची कैफियत, ( ५ ) खर्ड्यांच्या स्वारीची बखर, व ( ६ ) मीं ही आतां छापलेली बखर. ह्या सहा बखरींत समकालीन प्रसंगांचें समकालीन लेखकांनीं विस्तृत किंवा त्रोटक असें वर्णन केलें आहे. विश्वसनीयत्वाच्या दृष्टीनें समकालीन बखरींचा हा पहिला वर्ग होय. ह्या बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात असें जरी म्हटलें आहे, तरी त्यांच्या विश्वसनीयत्वाला कांहीं मर्यादा ही आहेच. अस्सल कागदपत्र मिळाले असतां त्यांतील खुलासेवार मजकुरांत बरीच तफावत दिसून येते असें आढळून आलेलें आहे. तरी अस्सल कागदपत्रांच्या अभावीं ह्या बखरीवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. चित्रगुप्ताची बखर सभासदी बखरीचाच अक्षरशः अनुवाद असल्यामुळें तिचा ह्या वर्गांत समावेश केला आहे. ह्या पहिल्या वर्गांतील बखरींच्या अगदीं उलट

वर्गांतील बखरी म्हणजे कर्णोपकर्णी ऐकिलेल्या वृत्तांताचीं बाडें होत. उदाहरणार्थः—( १ ) सोहनीकृत पेशव्यांच्या बखरीचा बराच भाग, ( २ ) दाभाड्यांची हकीकत, ( ३ ) गायकवाडांची हकीकत, ( ४ ) ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, ( ५ ) गोविंदपंत बुंदेल्यांची कैफीयत, व इतर कैफीयत वगैरे. ह्या वर्गांतील बाडांतून कोणत्याहि प्रसंगाची सालवार हकीकत किंवा कोणत्याहि प्रसंगाचें साद्यंत व मुद्देसूद वर्णन प्रायः दिलेलें नसतें. कारण, ते ते प्रसंग होऊन बराच काल गेल्यावर, म्हणजे निदान शेपन्नास वर्षे लोटल्यानंतर कोण्या अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून किंवा कोण्या दहा पांच लोकांच्या विनंतीवरून, त्या त्या लेखकांनीं हीं बाडें सजविलेलीं आहेत. वृद्ध लोकांच्या माहितीवरून किंवा स्वतः-च्या स्मृतीवरून किंवा एखादद्दुसऱ्या कागदावर भिस्त ठेवून हीं बाडें लिहिलेलीं आहेत. तशांत, हीं बाडें लिहिणाऱ्यांना ऐतिहासिक सत्यासत्याचा निर्णय करून लिहिण्याचा अभ्यास नसल्यामुळें, मिळेल ती माहिती व सुचेल ती क्लृप्ति खरी धरून चालण्याचा त्यांचा भोळा परिपाठ आहे. लहर लागली म्हणजे किंवा बहुशः माहिती नसली म्हणजे सालेंचीं सालें खाण्याची ह्या बखरनविसांना संवय आहे. अत्यंत जुन्या काळची माहिती किंवा शंभर सवाशें वर्षांच्या पूर्वीची माहिती द्यावयाची असतांना ह्या बखरनविसांनीं दाखविलेला भोळा अज्ञपणा एक वेळ क्षम्य झाला असता. वास्तविक पाहिलें तर, ह्या बखरनविसांना किंवा कैफियती लिहिणाऱ्यांना आपल्या वेळची किंवा पांच पंचवीस वर्षे आधींची माहिती नीट, मुद्देसूद व विश्वसनीय अशी देतां आली असती हें स्पष्ट आहे. परंतु ऐतिहासिक माहितीची जुळवाजुळव करण्याचें वळण ह्या लोकांना नसल्यामुळें त्यांच्या हातून हें विश्वसनीय इतिहास लिहून ठेवण्याचें काम अंशतः देखील झालें नाहीं. ह्या बखरींचा उपयोग इतिहास लिहिण्याच्या कामीं अगदींच होणार नाहीं असें नाहीं. जेथें इतर माहिती मुळींच मिळण्यासारखी नाहीं तेथें ह्यांचेंच लिहिणें आधारभूत धरणे प्राप्त आहे. ह्या दोन वर्गांखेरीज बखरींचा आणखी एक तिसरा वर्ग आहे. ह्या तिसऱ्या वर्गां-तलि बखरींत त्यांच्या पूर्वींच्या जुन्या बखरींतील व टिपणांतील माहिती जशीच्या तशीच किंवा कांहीं फेरफार करून इष्ट तेवढी दिलेली असते. ह्या वर्गांत खालील बखरी मोड-तातः—( १ ) चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, ( २ ) शिवदिग्वि-जय ( ३ ) शिवप्रताप, ( ४ ) प्रो. फारेस्ट ह्यांनीं छापिलेलें रायरी येथलि बखरींचें इंग्रजी भाषांतर व ( ५ ) गोविंदराव चिटणीसांनीं लिहिलेली बखर. येणेंप्रमाणें बखरींचे तीन वर्ग आहेत. ह्या सर्व बखरींच्या प्रामाण्याची इयत्ता ठरविण्याचा माझा हेतु आहे. पैकीं पहिल्या दोन वर्गांतलि बखरींची परिक्षा करण्याचें काम पुढें केव्हां तरी करण्याचें आश्वासन देऊन, तिसऱ्या वर्गांतील बखरींची परीक्षा प्रस्तुत स्थळीं करतों. ह्या तिसऱ्या वर्गांतलि बखरींची परीक्षा प्रथम करण्याचें कारण असें कीं, ह्या बखरी मराठ्यांच्या इति-हासाच्या आद्य कालाला अनुलक्षून असल्यामुळें ह्यांनाच अग्रमान देणें रास्त आहे. शिवाय ह्या बखरींच्या प्रामाण्यासंबंधानें जितकी चर्चा व्हावयाला पाहिजे तितकी झाली नसल्या-मुळें त्यांची खरी योग्यता जशी ठरावी तशी अद्याप ठरली नाहीं व त्यांचा जितका उपयोग

त्यांच्याकरितां ही बखर लिहिली असल्यामुळें, अर्थात्च ही अत्यंत त्रोटक आहे. परंतु कालाचा किंवा स्थलाचा किंवा प्रसंगाचा विपर्यास झालेला या बखरींत क्वचित् सांपडेल, किंबहुना सांपडणारच नाहीं. ह्या बखरीच्या एकंदर पांच प्रती मिळाल्याः—पुणें येथील ताई साठी इच्या वंशजांकडून एक, काव्येतिहाससंग्रहकारांच्या दप्तरांतील दोन व वसई येथील दिवेकर यांजकडून दोन.पैकीं साठ्यांची बखर व दिवेकरांची एक बखर पूर्ण आहेत. बाकीच्या तिन्ही बखरी अपूर्ण आहेत. ही बखर शके १७०४ शुभकृत् संवत्सरीं लिहिली. हींत सवाई माधवरावाच्या लग्नाचा ताजा उल्लेख आहे.

ह्या बखरींतील बरेंच प्रसंग बखरनविसानें स्वतः पाहिले असल्यामुळें व ज्यांनीं ते प्रसंग स्वतः पाहिले त्यांच्याकरितां व त्यांच्या आज्ञेवरून ही सजविली असल्यामुळें, ही बखर विश्वासपात्र आहे. अधून मधून पेशव्यांची स्तुति केलेली आहे, ती देखील मर्यादित असून, तींत पक्षपातात्मक किंवा अप्रस्तुत असें एकहि वाक्य आढळावयाचें नाहीं. ही बखर त्रोटक नसून विस्तृत असती म्हणजे इतिहासाचें फारच हित झालें असतें. महाराष्ट्रांत आजपर्यंत जेवढ्या म्हणून बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत, त्या सर्वांत बिनचुकपणाबद्दल हिला अग्रमान देणें रास्त आहे. विश्वासरावाच्या स्वारीसंबंधीं थोडीशी गफलत झालेली दिसते, ती शके १६७२ पासून १६८३ पर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासांतील शेंकडों प्रसंगांचें एक दोन पृष्ठांत वर्णन देण्याच्या घाईनें झालेली आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

ह्या बखरीवरून असें अनुमान करितां येतें कीं, विश्वसनीय इतिहास लिहिण्याचा प्रघात अठराव्या शतकांत महाराष्ट्रांत होता. तसेंच समकालीन बखरनविसांनीं लिहिलेले वृत्तांत स्वाभाविकपणेंच विश्वसनीय असतात असेंहि विधान करण्यास ह्या बखरीच्या आधारानें अवकाश होतो. तेव्हां आपल्याला माहीत असलेल्या बखरींपैकीं जेवढ्या म्हणून बखरी समकालीन बखरनविसांनीं लिहिल्या आहेत, तेवढ्या बऱ्याच विश्वसनीय असाव्या किंवा असल्या पाहिजेत हें उघड आहे. आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालेल्या बखरींपैकीं समकालीन बखरनविसांनीं लिहिलेल्या बखरी म्हटल्या म्हणजे ( १ ) सभासदविरचित शिवछत्रपतींचें चरित्र, ( २ ) चित्रगुप्तविरचित शिवाजीमहाराजांची बखर, ( ३ ) भाऊसाहेबांची बखर, ( ४ ) भाऊसाहेबांची कैफियत, ( ५ ) खर्ड्याच्या स्वारीची बखर, व ( ६ ) मीं ही आतां छापलेली बखर. ह्या सहा बखरींत समकालीन प्रसंगांचें समकालीन लेखकांनीं विस्तृत किंवा त्रोटक असें वर्णन केलें आहे. विश्वसनीयत्वाच्या दृष्टीनें समकालीन बखरींचा हा पहिला वर्ग होय. ह्या बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात असें जरी म्हटलें आहे, तरी त्यांच्या विश्वसनीयत्वाला कांहीं मर्यादा ही आहेच. अस्सल कागदपत्र मिळाले असतां ह्यांतील खुलासेवार मजकुरांत बरीच तफावत दिसून येते असें आढळून आलेलें आहे. तरी अस्सल कागदपत्रांच्या अभावीं ह्या बखरीवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. चित्रगुप्ताची बखर सभासदी बखरीचाच अक्षरशः अनुवाद असल्यामुळें तिचा ह्या वर्गांत समावेश केला आहे. ह्या पहिल्या वर्गांतील बखरींच्या अगदीं उलट

वर्गांतील बखरी म्हणजे कर्णोपकर्णी ऐकिलेल्या वृत्तांताचीं बाडें होत. उदाहरणार्थः—(१) सोहनीकृत पेशव्यांच्या बखरीचा बराच भाग, (२) दाभाड्यांची हकीकत, (३) गायकवाडांची हकीकत, (४) ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र, (५) गोविंदपंत बुंदेल्यांची कैफीयत, व इतर कैफीयत वगैरे. ह्या वर्गांतील बाडांतून कोणत्याहि प्रसंगाची सालवार हकीकत किंवा कोणत्याहि प्रसंगाचें सायंत व मुद्देसूद वर्णन प्रायः दिलेलें नसतें. कारण, ते ते प्रसंग होऊन बराच काल गेल्यावर, म्हणजे निदान शेपन्नास वर्षे लोटल्यानंतर कोण्या अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून किंवा कोण्या दहा पांच लोकांच्या विनंतीवरून, त्या त्या लेखकांनीं हीं बाडें सजविलेलीं आहेत. वृद्ध लोकांच्या माहितीवरून किंवा स्वतः-च्या स्मृतीवरून किंवा एखाददुसऱ्या कागदावर भिस्त ठेवून हीं बाडें लिहिलेलीं आहेत. तशांत, हीं बाडें लिहिणाऱ्यांना ऐतिहासिक सत्यासत्याचा निर्णय करून लिहिण्याचा अभ्यास नसल्यामुळें, मिळेल ती माहिती व सुचेल ती कृति खरी धरून चालण्याचा त्यांचा भोळा परिपाठ आहे. लहर लागली म्हणजे किंवा बहुशः माहिती नसली म्हणजे सालेंचीं सालें खाण्याची ह्या बखरनविसांना संवय आहे. अत्यंत जुन्या काळची माहिती किंवा शंभर सवाशें वर्षांच्या पूर्वीची माहिती द्यावयाची असतांना ह्या बखरनविसांनीं दाखविलेला भोळा अज्ञपणा एक वेळ क्षम्य झाला असता. वास्तविक पाहिलें तर, ह्या बखरनविसांना किंवा कैफियती लिहिणाऱ्यांना आपल्या वेळची किंवा पांच पंचवीस वर्षें आधींची माहिती नीट, मुद्देसूद व विश्वसनीय अशी देतां आली असती हें स्पष्ट आहे. परंतु ऐतिहासिक माहितीची जुळवाजुळव करण्याचें वळण ह्या लोकांना नसल्यामुळें त्यांच्या हातून हें विश्वसनीय इतिहास लिहून ठेवण्याचें काम अंशतः देखील झालें नाहीं. ह्या बखरींचा उपयोग इतिहास लिहिण्याच्या कामीं अगदींच होणार नाहीं असें नाहीं. जेथें इतर माहिती मुळींच मिळण्यासारखी नाहीं तेथें ह्यांचेंच लिहिणें आधारभूत धरणें प्राप्त आहे. ह्या दोन वर्गांखेरीज बखरींचा आणखी एक तिसरा वर्ग आहे. ह्या तिसऱ्या वर्गांतलि बखरींत त्यांच्या पूर्वींच्या जुन्या बखरींतील व टिपणांतील माहिती जशीच्या तशीच किंवा कांहीं फेरफार करून इष्ट तेवढी दिलेली असते. ह्या वर्गांत खालील बखरी मोडतातः—(१) चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र, (२) शिवदिग्विजय (३) शिवप्रताप, (४) प्रो. फारेस्ट ह्यांनी छापिलेलें रायरी येथील बखरींचें इंग्रजी भाषांतर व (५) गोविंदराव चिटणीसांनीं लिहिलेली बखर. येणेंप्रमाणें बखरींचे तीन वर्ग आहेत. ह्या सर्व बखरींच्या प्रामाण्याची इयत्ता ठरविण्याचा माझा हेतु आहे. पैकीं पहिल्या दोन वर्गांतलि बखरींची परिक्षा करण्याचें काम पुढें केव्हां तरी करण्याचें आश्वासन देऊन, तिसऱ्या वर्गांतील बखरींची परीक्षा प्रस्तुत स्थळीं करतों. ह्या तिसऱ्या वर्गांतलि बखरींची परीक्षा प्रथम करण्याचें कारण असें कीं, ह्या बखरी मराठ्यांच्या इतिहासाच्या आद्य कालाला अनुलक्षून असल्यामुळें ह्यांनाच अग्रमान देणें रास्त आहे. शिवाय ह्या बखरींच्या प्रामाण्यासंबंधानें जितकी चर्चा व्हावयाला पाहिजे तितकी झाली नसल्यामुळें त्यांची खरी योग्यता जशी ठरावी तशी अद्याप ठरली नाहीं व त्यांचा जितका उपयोग

करून घ्यावा तितका अद्यापपर्यंत कोणीं करून घेतला नाहीं. परीक्षेच्या अंतीं ह्या बखरीं-च्या महत्त्वाची इयत्ता ठरली जाईल. ह्या परीक्षेच्या संबंधानें सभासदी बखर, चिटणीशी बखर व दलपतरायाची बखर ह्या तीन बखरींचा उल्लेख करणें अवश्य होणार आहे.

[ १ ] सभासदांची बखर, [ २ ] चित्रगुप्ताची बखर, [ ३ ] चिटणीसांची बखर, [ ४ ] शिवदिग्विजय, [ ५ ] शिवप्रताप, [ ६ ] रायरी येथील बखर, व [ ७ ] दलपत-रायाची बखर, ह्या सात बखरींपैकीं चित्रगुप्ताची बखर सभासदी बखरीचा अक्षरशः अनुवाद आहे. सभासदी बखरीचें मूळ येऊन त्यांत चित्रगुप्तानें स्वतः रचिलेल्या कविता अधून मधून घुसडून दिल्या आहेत. व सभासदी बखरांतील एका वाक्याच्या ऐवजींच त्याच अर्थाचीं तीन चार वाक्यें बनविलेलीं आहेत. रघुनाथ यादव चित्रगुप्त याचा चुलत आजा काकाजी प्रभू हा होता. काकाजी प्रभू म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस [उर्फ] चित्रे हा होय. बाळाजी आवजीस संभाजीनें विनापराधें ठार मारिलें हें प्रसिद्ध आहे. बाळाजी आवजीस चिमणाजी व शामजी हे दोन भाऊ होते. ह्या दोघांपैकीं कोणा एका-चा वंशज रघुनाथ यादव असावा हें निश्चित आहे. रघुनाथ यादवाला पुराणिकाच्या थाटावर लिहिण्याची संवय असल्याकारणानें त्यानें आपलें आडनांव चित्रे असें साधें न लावतां पौराणिक थाटावर चित्रगुप्त असें लाविलें आहे. यमाच्या दरबारीं जसा साक्षात् चित्रगुप्त चिटणिशी करी, तशी रघुनाथ यादव कोल्हापूरच्या दरबारीं चित्रगुप्ती किंवा चिट-णिशी करी. थोरल्या राजाराम महाराजांचा पुत्र व प्रसिद्ध जिजाबाईचा नवरा कोल्हापूर येथील जो संभाजी राजा त्याच्या दरबारीं आपल्या वयाच्या बाराव्या किंवा तेराव्या वर्षा-पासून पुढें चाळीस वर्षें रघुनाथ यादवानें चिटणिशी केली. १६८२ त संभाजी राजे वारले. ह्यावरून असें निष्पन्न होतें कीं, रघुनाथ यादव १६३० च्या सुमारास जन्मला असावा व त्यानें चिटणिशी १६४२ च्या सुमारास करण्यास सुरवात केली असावी. संभाजीराजे वार-ल्यावर रघुनाथ यादवाची चिटणिशी दुसऱ्या कोणीं बळकाविली असें दिसतें. तेव्हां चिट-णीस मजकुरांच्या कपाळीं देशोदेशीं भणगतीनें हिंडणें प्राप्त झालें. हिंडतां हिंडतां चिकों-डीस व मनोली ह्या तालुक्यांत राहून शाहूराजाच्या प्रांतांत दंगा करणाऱ्या यशवंतराव शिंद्याचा रघुनाथाला आश्रय मिळाला व त्याच्या पदरी असतांना त्यानें ही बखर लिहिली. रघुनाथ यादवाला परंपरेनें ऐकिलेली शिवाजी महाराजांची व त्यांच्या वेळच्या कर्त्या पुरु-षांची माहिती सडकून होती. सभासदी बखरींत ज्या पुरुषांचीं आडनांवें दिलीं नाहींत, त्यांचीं आडनांवें चित्रगुप्त लिहिण्याच्या झोकांत सहजासहजी देऊन जातो. व कधीं कधीं वर्णनांत सभासदी बखरींत जीं नांवें मुळींच नाहींत तीं हा नव्यानेंच देतो, व आपण वर्णन करीत आहों तें कथानक आपल्याला करतलामकलवत् अवगत आहे, असें मोठ्या डौलानेंच दाखवितो. सारांश, रघुनाथ यादव माहितगार मनुष्य असल्यामुळें शिवाजीचा इतिहास लिहिणाऱ्याला त्याचें मत वेळोवेळीं घेणें जरूर पडेल. फुलचरी, कलकत्ता वगैरे नांवें रघु-नाथ यादवानें आपल्या कवितेंत ज्या अर्थी आणिलीं आहेत व शंभू छत्रपतीच्या पुढें आपण ही बखर लिहिली असें ज्या अर्थी तो स्वतःच लिहितो त्या अर्थी ही बखर १६८२

पासून १६९२ पर्यंतच्या मधील कोणत्या तरी एका वर्षी लिहिली गेली असावी हें स्पष्ट आहे.

सभासदी बखर कृष्णाजी अनंत सभासद ह्यांनीं रचिली. कृष्णाजी अनंत व त्यांचे वंशज नारो कृष्ण यास ज्याअर्थी काव्येतिहाससंग्रहकारांनीं पंत ह्या संज्ञेनें उल्लेखिलें आहे, त्या अर्थी सभासद हे देशस्थ ब्राह्मण असावे असे वरकरणी दिसतें. ह्यांच्या वंशजाकडे कोल्हापूर येथलि चिटणीकडील काम होतें असेंहि संग्रहकार म्हणतात. परंतु चिटणिशी कोणा तरी प्रभू गृहस्थाकडे असली पाहिजे ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे चिटणीसांच्या दप्तरांतील सभासद हे एक सामान्य पिढीजात कारकून असावे असा तर्क करणें जरूर पडतें. खुद्द कृष्णाजी अनंत हे शिवाजीमहाराजापासून राजाराम महाराजांच्या अखेरीपर्यंत छत्रपतींच्या दरबारीं सभासद होते. सभासदांचा दर्जा काय व कामागिरी कोणती हें जरी कोठें स्पष्ट किंवा अस्पष्ट लिहिलेलें आढळत नाहीं, तरी सभासद म्हणजे राजदरबारीं सभेंत बसून सल्लामसलत देणारा शिष्ट पुरुष असावा असा अंदाज आहे. हा जर अंदाज खरा असेल तर अष्ट प्रधानांखेरीज सल्लामसलत देणारे असे छत्रपतींच्या दरबारीं स्वतंत्र सभासदमंडळ असे, असा तर्क करण्यास जागा होते. कृष्णाजी अनंत सभासद यांनीं राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून चंदी येथें आपली बखर ईश्वरनामसंवत्सरीं म्हणजे शके १६१९ त लिहिली. सभासदी बखरीच्या सर्व प्रतींत १६१६ असा एकच पाठ असल्यामुळें, सभासद यांनीं आपल्या बखरीचा प्रारंभ शके १६१६ त केला व तिची समाप्ति शके १६१९ ईश्वरनाम-संवत्सरी केली, अशी संगती जुळवावी लागते. सभासदांनीं बखर लिहिली त्या वेळीं छत्र-पतीच्या खालोखाल महाराष्ट्रांतील कर्ते पुरुष म्हटले म्हणजे प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीलकंठ, संताजी घोरपडे, बहिर्जी घोरपडे, व धनाजी जाधव, हे पांच गृहस्थ होते. शिवाजी महाराजांच्या तोंडीं, मरण समयीं, मोडलें राज्य सांवरणाऱ्या ह्या पांच गृहस्थांचीं नांवें सभासदांनीं दिलीं आहेत. त्याचाच अनुवाद, चिटणिसांनीं आपल्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत प्रल्हाद निराजी ह्या नांवांबद्दल निराजी रावजी असें चुकीचें नांव घालून व बहि-रजी घोरपडे हें नांव वगळून केला आहे. रायरी येथील बखरींत हीं पांच नांवें नाहींत. तसेंच शिवदिग्विजयांत ह्या पांच नांवांचा मुळींच उल्लेख नाहीं. तेव्हां शिवाजी महाराजांच्या तोंडीं, ह्या पांच गृहस्थांना बरें वाटण्याकरितां किंवा राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून ह्या पांच गृहस्थांची कर्तव्यतत्परता उत्तेजित करण्याकरितां, सभासदांनीं हीं नांवें घातलीं असावीं असें वाटतें. संभाजीच्या हातून राज्यकारभार निभणार नाहीं अशा मजकुराचीं वाक्यें मात्र सर्व बखरींतून सांपडतात, त्या अर्थी वरील तर्काला बळकटी येते. सभासदांना शिवाजी महाराजांच्या वेळचीं राजकारणें स्वानुभवानें माहीत आसल्यामुळें त्यांची बखर, काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात त्याप्रमाणें, बहुत विश्वसनीय आहे. सभा-सदी बखरींत उणीव एवढीच आहे कीं, शिवाजीच्या पराक्रमाचें वर्णन त्यांनीं अत्यंत त्रोटक व स्थूल मानानें केलेलें आहे. तसेंच १५८१ मार्गशीर्षाच्या आधींची माहिती म्हणजे शिवाजीच्या पूर्व वयांतील पराक्रमाचें वर्णन सभासदांनीं फारच थोडें म्हणजे बहुतेक

मुळींच दिलें नाहीं. शिवाजीचा इतिहास लिहिणाऱ्याला सभासदी बखरीचा उपयोग फार होईल.

प्रो. फॉरेस्ट यांनीं छापिलेली इंग्रजी तर्जुमा केलेली रायरी येथील बखर कोणीं लिहिली तें समजत नाहीं. कावरी येथील पाटलाच्या विनंतीवरून रायरी येथील कुळकर्णी माणको भिवराव यानें गडावरील दप्तरखान्यांत असलेल्या बखरीची नक्कल करून घेतली, म्हणून ह्या बखरीच्या शेवटीं लिहिलें आहे. ह्या बखरींत शिवाजीच्या राज्याभिषेका-नंतरची माहिती मुळींच नाहीं. इतर वर्षांची माहिती कोठें कोठें बरी व बऱ्याच ठिकाणीं अपूर्ती अशी दिली आहे.ही बखर छोटेखानी असून कांहीं कांहीं ठिकाणीं विशेषनामाचे खरे उच्चार लिहिलेले नाहींत. मूळ मराठींत बखरीचें स्वारस्य जें असेल तें इंग्रजी भाषांतरांत राहिलेलें नाहीं. बायबलांतील यहुदी लोकांच्या कथांप्रमाणें ह्या बखरींतील कथाभाग साधा व चमत्कारिक भासतो म्हणून प्रो. फॉरेस्ट प्रस्तावनेंत म्हणतात त्याचें कारण इंग्रजींत भाषांतर करणाऱ्याची इच्छा होय. मूळ बखरींतील भाषा इतर बखरीप्रमाणेंच साधी, ठसके-दार, संदिग्ध व आखुडती असली पाहिजे. कारण ह्या बखरींतील मजकूर इतर बखरींतील मजकुरांच्या सारखाच बहुतेक आहे.ह्या बखरीचाहि उपयोग थोडाबहुत होण्यासारखा आहे.

दलपतरायाची बखर एकपक्षी म्हणजे शिवाजीच्या विरुद्ध लिहिलेली आहे. प्रति-पक्षाच्या गोटांतील मनुष्यानें ही बखर लिहिली असल्यामुळें, शिवाजीसंबंधीं विरुद्ध पक्षाचें मत हिच्या द्वारें कळेल व तारखांचा व वर्षांचाहि मेळ बसविण्यास हिचा उपयोग होईल.

श्रीशिवाजी-प्रताप ह्या कृत्रिम नांवाची जी बखर बडोदें येथें १८१७ त छापिली गेली तिची किंमत उपयोगाच्या दृष्टीनें फारच थोडी आहे. ही बखर बहुत अपूर्ण असून शिवाजीच्या बालपणाचीहि हकीकत हींत दिली आहे असें नाहीं. दुसऱ्या बखरींत किंवा कैफियतींत ह्या बखरींतल्या पेक्षांहि जास्त माहिती मिळण्यासारखी आहे. तरी शिवाजी संबंधीं कोणतेंहि चिटोरें विचारार्ह असणारच ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन, ह्या बखरीचा आदर केला पाहिजे.

मल्हार रामराव चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र १७३२ त लिहिलें गेलें. शाहू छत्रपती यांनीं राज्याभिषेक १३७ प्रमोदीनाम संवत्सरे ज्येष्ठ बहुल षष्ठी भृगुवासरी हें चरित्र तयार करण्यास आज्ञा केली, असें मल्हार रामराव बखरीच्या प्रारंभीं लिहितो. परंतु दुसरे शाहू छत्रपती इ. स. १८०८ च्या मे महिन्याच्या ४ थ्या तारखेस वारले. शके १७३० वैशाख शु।। ९ बुधवार व चरित्र लिहिण्यास आज्ञा ८ जून १८१० सालीं शके १७३२ जेष्ठ शु।। ६ शुक्रवार झाली हीं दोन विधानें विसंगत आहेत. मल्हार रामरावानें असलें हें विधान कसें केलें याचें आश्चर्य वाटतें व ह्या हलगर्जीपणावरून त्याच्या ऐतिहासिक प्रामाण्याविषयीं मन साशंक होतें. चरित्र केव्हां संपविलें तें बखरींत कोठें लिहिलेलें नाहीं. हें चरित्र ग्रांट डफनें पाहिलें होतें. विष्णुपुराण, दंडनीति, राजधर्म, राज-मयूख, रमलशास्त्र, वडिलार्जित कारकीर्दी, दिनचर्या, वगैरे पाहून चिटणिसांनीं आपली बखर सजविली. वडिलार्जित कारकीर्दी, दिनचर्या, शिवाजीनें पाठविलेलीं व शिवाजीला

आलेलीं अस्सल पत्रें व नकला ह्यांचा उपयोग मल्हार रामरावानें केला होता. परंतु सामुग्रीच्या महत्त्वाच्या मानानें मल्हाररावानें शिवछत्रपतींचें चरित्र मोठें नामांकित लिहिलें आहे असें नाहीं. ह्याचें कारण, महाराष्ट्रांतील त्या वेळच्या विद्येचें मान होय. प्रमाण काय, अप्रमाण काय, मिळालेल्या साधनांचा यथास्थित, चोख व साद्यंत उपयोग कसा करून घ्यावा व कां करून घ्यावा वगैरे गोष्टींच्या अज्ञानामुळें, मल्हार रामरावाचें चरित्र जसें वठावें तसें वठलें नाहीं. ग्रांट डफ मल्हाररावाच्या चरित्राला Voluminous म्हणून विशेषण देतो. परंतु माझ्या मतें हें चरित्र बरेंच त्रोटक आहे. अशी जरी या चरित्राची योग्यता आहे, तरी ग्रांटडफच्या ग्रंथांतहि न सांपडणाऱ्या अशा कांहीं गोष्टी मल्हाररावाच्या चरित्रांत सांपडतात. मल्हाररावांच्या जवळ असलेल्या कारकीर्दी, दिनचर्या व पत्रें बोरगांवीं त्यांच्या वंशजांजवळ थोडीबहुत आहेत. तीं तपासून त्यांचा उपयोग पुन्हां करून घेतला पाहिजे. सातारा जिल्ह्यांत राहणाऱ्या छत्रपतींच्या अष्टप्रधानांकडून मल्हाररावानें बरींच पत्रें व टिपणें मिळविलीं होतीं, असें बोरगांव येथील चिटणिसांच्या तोंडून कळतें. मल्हार रामराव चिटणीसकृत चरित्राचा इतिहासकाराला बराच उपयोग होईल ह्यांत संशय नाहीं. निदान ह्या चरित्रापासून नाना प्रकारच्या शंका घेण्यास अवकाश होईल हें खास आहे.

शिवदिग्विजय नांवाची बडोदें येथें छापिलेली बखर शके १७४० त लिहिली आहे. ह्या बखरीच्या पहिल्या पृष्ठावरील शके १६४० बहुधान्यनाम संवत्सर व संवत् १७७५ विरोधीनाम संवत्सर ह्याबद्दल अनुक्रमें शके १७४० विरोधीनाम संवत्सर व संवत् १८७५ बहुधान्यनाम संवत्सर असें पाहिजे आहे. तिसऱ्या पृष्ठावरील संवत् १७७५ व शके १६४० ह्याबद्दल संवत् १८७५ व शके १७४० असें पाहिजे आहे; चवथ्या पृष्ठावरील १८७० बद्दल संवत् १८७५ पाहिजे; व पांचव्या पृष्ठावरील शके १६४० बद्दल शके १७४० पाहिजे; म्हणजे कलिवर्ष ४९१९ त शक १७४० संवत् १८७५ व फसली १२२८ बरोबर येतात. प्रसिद्ध ज्योतिर्विद रा० शंकर बाळकृष्ण दीक्षित ह्यांनीं ही चूक, ही बखर छापिली त्या वेळीं दाखवून दिली होती. ज्या अर्थी ही बखर शके १७४० त लिहिली आहे त्या अर्थी तिचें कर्तृत्व वरपांगी तरी खंडो बल्लाळ चिटणीस यांजकडे जात नाहीं हें उघड आहे. चिटणीसांच्या बडोदें येथील घराण्यापैकीं कोणी तरी ही बखर लिहिली असावी असा अंदाज आहे, किंवा लिहिली असें म्हणण्याच्या ऐवजीं उतरून किंवा नक्कल करून किंवा जुळवाजुळव करून घेतली असेंहि म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. कां कीं, ह्या बखरींतील भाषा रा० नंदुरवारकर व रा० दांडेकर म्हणतात त्याप्रमाणें, शके १७४० तल्या सारखी बिलकुल दिसत नसून तिजवर अठराव्या शतकाच्या पूर्वार्धाची झांक मारीत आहे. मल्हार रामराव चिटणीस ह्यांनीं शके १७३२ त लिहिलेल्या शिवाजीच्या चरित्राची भाषा ह्या बखरींहून अत्यंत भिन्न आहे. इतकेंच नव्हे, तर शके १६८५ त लिहिलेल्या भाऊसाहेबांच्या बखरींतल्या पेक्षांहि ह्या बखरीची भाषा जुनाट दिसते. ह्यावरून असा तर्क काढण्यास हरकत दिसत नाहीं कीं, यद्यपि ही बखर शके १७४० त आहे ह्या रूपानें प्रसिद्ध केली

गेली तत्रापि, हिच्यांतील मजकूर पूर्वीच्या एखाद्या जुन्या बखरींतून घेतला असावा. बारनिशी, दाखले, पत्रें व जुने ग्रंथ ह्यांच्या आधारानें आपण लिहीत आहों, असें हा बखरनवीस आपल्या बखरीच्या १४८ व्या, १८८ व्या व ३८१ व्या पृष्ठांवर वारंवार म्हणतो त्यावरून वरील विधानाला दुजोरा येतो. ३८१ व्या पृष्ठावर संतावजयाचा या बखरनविसानें उल्लेख केला आहे त्यावरून महीपतीच्या कालानंतर ही बखर लिहिली गेली अशी शंका कोणी घेतल्यास, तिनें वरील विधानाला प्रत्यवाय येत नाहीं. बखर आहे, ह्या रूपानें १७४० त प्रसिद्ध झाली, परंतु आंतील बहुतेक मजकूर जशाचा तसाच किंवा फेरबदल करून एकाद्या जुन्या बखरीवरून घेतला असावा, व जुन्या बखरीच्या नंतरच्या कालांत झालेल्या ग्रंथाचा व स्थलांचा क्वचित् प्रसंगीं उल्लेख केला असावा. ही बखर ग्रांट डफला मिळालेली नव्हती. हिच्यांत डफच्या ग्रंथांत नाहीं अशी माहिती बरीच सांपडते.

ह्या सात बखरींचें स्वरूपवर्णन स्थूलमानानें वर दिल्याप्रमाणें आहे. ह्या सर्व बखरी आपापल्या परीनें उपयोगाच्या आहेतच. परंतु त्यांतल्या त्यांत सभासदी बखर, मल्हार रामरावकृत चरित्र व शिवदिग्विजय ह्या तीन बखरी फार महत्त्वाच्या आहेत. इतर बखरींप्रमाणें ह्याहि बखरींतून कालविपर्यास, प्रसंगलोप, नायकाच्या महताचें अज्ञान, संगतवार व तपशीलवार माहितीचा अभाव, वगैरे दोष सडकून आहेत. अशी जरी ह्या बखरीची स्थिति आहे, तत्रापि त्यांचा उपयोग जितका होईल तितका करून घेतला पाहिजे. बखरी लिहिणारे गृहस्थ समजूतदार असून शिवाजीच्या पराक्रमांचें वर्णन करावें अशी त्यांची मनापासूनची इच्छा होती. आपण जें कांहीं लिहीत आहों, तें जाणूनबुजून खोटें लिहीत नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री होती. असंबद्ध,परस्परविरुद्ध, संदिग्ध किंवा सध्यांच्या कालीं अविश्वसनीय भासणारीं विधानें त्यांच्या बखरींतून सांपडतात, तीं त्यांनीं मुद्दाम लिहून ठेविलीं असा प्रकार नाहीं. तेव्हां असलीं विधानें जेथें जेथें भेटतील तेथें तेथें तत्कालीन समजुतीकडे, लिहिणाऱ्यांच्या शास्त्रीय ज्ञानाच्या अभावाकडे व त्यांच्या प्रामाणिकपणाकडे लक्ष देऊन त्या विधानांतील अर्थाचा स्फोट करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. सकृद्दर्शनीं सदोष वाटणाऱ्या प्रत्येक वाक्याची व शब्दाची अर्थपरिस्फुटता केल्याशिवाय पुढें जातां कामा नये. आपले विचार नीट रीतीनें व्यक्त करण्याच्या कठिण कलेचा अभ्यास ह्या बखरनविसांनीं केला नसल्यामुळें, त्यांचें लिहिणें आपल्याला परस्परविरोधी व संदिग्ध वाटण्याचा संभव आहे. हीहि गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. ह्या बखरकारांनीं केलेलीं कांहीं कांहीं विधानें तर केवळ असंभाव्यहि वाटण्याचा संभव आहे. तेव्हां ह्या सकृद्दर्शनीं दुष्ट भासणाऱ्या विधानांचा मुळापर्यंत छडा लाविल्यावांचून त्यांची ग्राह्याग्राह्यता ठरविणें, अशास्त्र झाल्याविना राहणार नाहीं. ह्या गोष्टी लक्षांत ठेऊनच ह्या बखरींची परीक्षा मी करणार आहें. परंतु परीक्षेला प्रारंभ करण्यापूर्वी दुसऱ्या एका गोष्टीचा उल्लेख करणें येथें इष्ट आहे. ह्या बखरींमधून आढळणारा संदिग्धपणा व परस्परविरोध सर्वस्वीं बखरनविसांच्या माथ्यावरच मारणें योग्य होणार नाहीं. ह्या दोषांचा वाटा अंशतः ह्या बखरी छापून प्रसिद्ध करणाऱ्या संपादकांच्याहि पदरी पडतो हेंहि लक्षांत

घेतलें पाहिजे. जुन्या लेखांतील मजकूर निरनिराळीं पाठांतरें देऊन व शास्त्ररीत्या शुद्ध करून छापलेला असा माझ्या पहाण्यांत फारच थोडा आलेला आहे. जुन्या बखरींच्या मूळ प्रती शोधून काढून त्या छापण्याचा प्रयत्न बहुतेक झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल. हातीं येतील तीं तीं बाडें दुसऱ्या तिसऱ्यांदा नक्कल केलेलीं, अर्थात् दुष्ट झालेलीं अशींच, छापिलीं गेलीं आहेत. मिळालीं तींच बाडें महत्प्रयासानें मिळालीं, ही सबब ह्या आक्षेपावर आणितां येईल. परंतु ती काढून टाकितां आली नसतीच असें नाहीं. बखरींच्या ह्या हस्तोहस्तीं झालेल्या नकलांतून असणाऱ्या संदिग्ध व दुर्बोध स्थलांचा छडा लावून अर्थ केलेलाहि फारच थोड्या ठिकाणीं पहाण्यांत येतो. बहुशः अशीं स्थलें टाकून दिलेलींच फार आढळतील. कित्येक ठिकाणीं दुर्बोधपणा केवळ मोडी वाचण्याचा नीट प्रयत्न न केल्यामुळें झालेला आहे. सारांश, संपादकांच्या हयगयीमुळें, अज्ञानामुळें व शिक्षणाभावामुळें जेवढा म्हणून दुर्बोधपणा ह्या बखरींतून आलेला असेल,तेवढा वगळून बाकी राहिलेल्या दोषांची जबाबदारी सर्वस्वीं ह्या बखरनविसांच्या माथीं मारणें न्याय्य होईल. आजपर्यंत मराठींत जुने गद्य व पद्य ग्रंथ जितके म्हणून छापले गेले आहेत,त्यांत सशास्त्र रीतीनें छापलेले असे ग्रंथ फारच विरळा आहेत. रा० शंकर पांडुरंग पंडित ह्यांनीं शके १७९१ त छापलेली तुकारामाची गाथा, त्यांच्या त्यावेळच्या माहितीप्रमाणें, सशास्त्र तयार केलेली आहे. अलीकडे इतकी जाडी विद्वत्ता जुने ग्रंथ प्रकाशित करण्याच्या कामीं उपयोजिलेली माझ्या पाहण्यांत नाहीं. रा० मोडक व रा० ओक ह्यांच्या काव्यसंग्रहाचाहि ह्या बाबतींत पंडितांच्या गाथेच्या खालींच नंबर लागतो. जुन्या गद्य ग्रंथांच्या म्हणजे बखरींच्या प्रकाशनाच्या कामीं जो अव्यवस्थितपणा दृष्टोत्पत्तीस येतो, तो तर सांगतां पुरवत नाहीं. खरें म्हटलें असतां, जुन्या बखरी छापण्यांत वैदिक लोकांचा वेदपठणाच्या कामीं दिसून येणारा निष्ठुर शुद्धपणा अनुकरणें अत्यंत अवश्य आहे. आपल्या राष्ट्राच्या, समाजाच्या व महापुरुषांच्या जीवनचरित्राचीं साधनें प्रकाशित करण्यांत शुद्धपणाकडे जितकें लक्ष द्यावें तितकें थोडेंच होणार आहे.

येणेंप्रमाणें तिसऱ्या वर्गांतील बखरींची परीक्षा चोख होण्याकरितां त्यांच्या भोंवतालची जागा साफसूफ करून घेणें जरूर पडलें. परीक्षेकरितां घेतलेल्या सात बखरींतून सभासदी बखर, चिटणिशी बखर व शिवदिग्विजय ह्या तीन बखरी परीक्षेकरितां प्रथम काढून घेणें जरूर आहे. कां कीं इतर बखरींतून येणाऱ्या बहुतेक सर्व गोष्टी ह्या तीन बखरींतून आलेल्या असून, शिवाय अवांतर जास्त माहितीहि ह्या बखरींतून दिलेली आहे. तशांत सभासदी बखर समकालीन लेखकानें प्रत्यक्ष माहितविरून लिहिलेली आहे. आणि चिटणिशी बखर व शिवदिग्विजय ह्या दोन बखरी तर त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या म्हणजे सभासदीपूर्वी होऊन गेलेल्या जुन्या कागदपत्रांच्या,बखरींच्या व टिपणांच्या आधारानें रचिलेल्या आहेत. ह्याच कारणाकरितां मल्हार रामराव चिटणिसकृत शिवाजीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र व शिवदिग्विजय ह्या बखरींच्या परीक्षेला प्रथम प्रारंभ करतों व त्यांच्या अनुषंगानें इतर बखरींचेंहि पृथक्करण करितों.

ह्या दोन्ही बखरींत प्रारंभीं युधिष्ठिरापासून पिठोर राजापर्यंत वंशावळी दिल्या आहेत. युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंतची वंशावळ बहुतेक विष्णुपुराणांतल्याप्रमाणें दिलेली आहे. कोठें कोठें एखादुसरें नांव गाळलेलें आढळतें व पुष्कळ ठिकाणीं अशुद्ध नांवेंहि छापलेलीं आहेत. आधीं पुराणांतून जीं नांवें दिलेलीं असतात त्यांच्या शुद्धतेसंबंधीं रास्त संशय आलेला आहेच. तशांत ह्या बखरनविसांनीं व बखरी छापणाऱ्यांनींहि ह्या अशुद्धतेला सहाय्य करण्याचा बराच प्रयत्न केलेला पाहून मनुष्यमात्राच्या हलगर्जीपणाची कींव येते व स्वदेशाच्या इतिहासाची जोपासना करण्याच्या कामीं दाखविलेल्या अनास्थेबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो. खरें म्हटलें असतां ह्या बखरींत सृष्टीच्या उत्पत्तीपासून राजांचीं नांवें यावयाचीं; परंतु त्या नांवांची मालिका लांबच लांब असल्यामुळें व त्यांच्या संबंधीं माहिती पुराणांतही विशेष नसल्यामुळें ती बहुशः दिली नसावी. युधिष्ठिराचा संपूर्ण इतिहास महाभारतांत दिला असल्याकारणानें त्या बखरनविसांनीं आपल्या इतिहासाची सुरवात युधिष्ठिराच्या नांवापासून केली आहे. कलियुगाला प्रारंभ युधिष्ठिरापासून होतो हीहि गोष्ट बखरनविसांच्या ध्यानांत असावी असें दिसतें. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें "ब्रह्मपुत्रस्थ यो योनिः" व "यदेव भगवान् विष्णोः" वगैरे श्लोक, अशुद्ध कां होईनात, परंतु कसेतरी दिले आहेत, ह्यावरून व मल्हाररामराव स्वतःच तसें म्हणतो म्हणून ह्या दोघा बखरनविसांनीं साक्षात् विष्णुपुराण पाहिलें होतें, ह्यांत संशय नाहीं. शिवाय "युगसंखेची याद" व "हस्तनापुरच्या राजांची याद" म्हणून ज्या बखरी प्रसिद्ध आहेत व ज्यांचा उल्लेख चिटणीशी बखरींच्या उपोद्घातांत कीर्तन्यांनीं केला आहे, त्यांचाहि उपयोग ह्या दोघांनीं केला होता असें माझ्याजवळ ज्या युगसंख्येच्या वगैरे यादी आहेत त्यांच्याशीं ह्या बखरींतलि मजकूर ताडून पाहतां, स्पष्ट दिसतें. माझ्याजवळील युगसंख्येच्या व राजांच्या यादींत सृष्टिक्रमापासून तों महमद बहादूरशहापर्यंत शके १७५९ वंशावळी आणून सोडिल्या आहेत. आद्यन्तांची थोडीफार छाटाछाट करून ह्या बखरींतहि तोच मार्ग स्विकारलेला आहे. ज्या चुका व जो घोटाळा माझ्या जवळील यादींत झालेला आहे त्याच चुका व तोच घोटाळा ह्या बखरींतून झालेला आहे. तेव्हां बखरींतील वंशावळी बहुशः ह्या यादींवरून उतरून घेतल्या आहेत हें उघड आहे व ह्या यादी बखरींच्याहून जुन्या आहेत हें त्याहून उघड आहे. ह्या यादी केव्हां लिहिल्या गेल्या त्याचा खुलासा मी पुढें करणार आहें.

युगसंख्येच्या यादींतलि, व अर्थात् ह्या बखरींतलि युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंतच्या वंशावळी पुराणांतून घेतल्या म्हणून वर सांगितलेंच आहे. आतां शूरसेनापासून पिठोरेराजापर्यंतच्या वंशावळी कोठून घेतल्या तेंहि सांगितलें पाहिजे. ह्या वंशावळी बहुशः कांहीं पुराणांतून व कांहीं रजपुताच्या राजावलींतून घेतलेल्या असाव्या असा अंदाज आहे. युधिष्ठिरापासून पिठोरराज्यापर्यंत दिलेल्या यादींसंबंधानें एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, हस्तनापूर व दिल्ली येथें राज्य करणाऱ्या राजांचींच तेवढीं नावें देण्याचा प्रयत्न ह्या यादींत केलेला आहे. पुढल्या राजाचा मागल्या राजाशीं, पितापुत्र संबंध

सदा असतोच असा प्रकार नाहीं. उदाहरणार्थ. राजा पिठोर याच्या पाठीमागच्या राजाचें नांव चनपाळ किंवा चेनपाळ असें दिलेलें आहे. हा चनपाळ अथवा चेनपाळ म्हणजे राजा अनंगपाळ होय. पिठोर चव्हाणवंशी असल्यामुळें व अनंगपाळ तुवरवंशीं असल्यामुळें ह्यांचा पितापुत्र संबंध नाहीं. हाच प्रकार वंशावळींतील इतर राजांसंबंधींहि दाखवितां येईल. वंशावळींतील कित्येक राजांनीं हस्तनापूर किंवा दिल्ली येथें राज्य केलेलें आहेच असेंहि समजतां कामा नये. यादी बनविणाराचा मुख्य हेतु सार्वभौमत्व ज्या राजांनीं केलें त्यांचींच तेवढीं नांवें दाखल करण्याचा होता.

शहाबुद्दिनपासूनच्या पुढील वंशावळी यवनांच्या तवारिखांतून घेतलेल्या आहेत. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें यवनांच्या तवारिखा पाहिल्या होत्या, किंवा खरें म्हटलें असतां, ज्या यादींवरून त्यानें आपला मजकूर तयार केला, त्या यादींच्या कर्त्यांनीं तवारिखा पाहिल्या होत्या असें म्हटलें जास्त असतां शोभेल. यवनी वंशावळींतहि सर्व राजांचीं नांवें एका पाठीमागून एक अशीं बिनचूक दिलेलीं नाहींत.

वंशावळींत दिलेल्या सार्वभौम राजांपैकीं एक दोन वंशांतील राजाखेरीज महाराष्ट्राच्या इतिहासांशीं बाकीच्यांचा साक्षात् संबंध कांहींएक नाहीं. असें असतां, वंशावळी देण्याच्या खटपटींत बखरनवीस कां पडले, असा प्रश्न साहजिक उद्भवतो. पुराणांतील पद्धतीला अनुसरून ह्या वंशावळी यादीकारांनीं व बखरनविसांनीं दिल्या असाव्या, हें एक उत्तर आहेच. तसेंच ज्या कालीं ह्या यादी लिहिल्या गेल्या, त्याकालीं दिल्लीपतीचें महत्त्व महाराष्ट्रांत फार झालें होतें. दिल्लीपती म्हणजे पृथ्वीपति; तेव्हां ज्यांना राज्य कमाविण्याची महत्त्वाकांक्षा असेल त्यांनीं दिल्लीकडे दृष्टी फिरविली पाहिजे, ह्या मुद्यावर यादीकारांनीं विशेष भिस्त ठेविली असावी, हें दुसरें एक उत्तर आहे. माझ्या मतें मुख्य उत्तर निराळेंच असावें. शिवाजीचा वृत्तांत देतांना शिवाजीच्या वंशाची उत्पत्ति रजपुतांच्या छत्तीस कुळांतील आहे, व ह्या छत्तीसकुळीच्या द्वारें शिवाजीचा संबंध युधिष्ठिरापर्यंत जाऊन पोहोंचतो ही गोष्ट ह्या बखरनविसांना मुख्यतः सांगावयाची आहे. यवनांनीं रजपुतांचीं कित्येक कुळें धुळीस मिळविलीं, त्यांपैकीं कांहीं रजपूत दक्षिणेकडे आले व त्यांतच भोसल्यांचे पूर्वजहि आले, वगैरे प्रसंगांचें त्यावेळच्या माहितीला धरून, संगतवार व समाधानकारक वर्णन देतांना ह्या पौराणिक व मध्ययुगीन वंशावळींचा प्रवेश बखरींतून स्वाभाविकपणेंच झाला. ह्या वंशावळी देण्यांत एक मुख्य हेतु व दोन गौण हेतु, मिळून एकंदर तीन हेतु बखरनविसांच्या मनांत होते असें दिसतें:—( १ ) युधिष्ठिरापासून शिवाजीपर्यंत एकसारखी परिनालिका दाखवून द्यावयाची हा पहिला हेतु, ( २ ) युधिष्ठिरापासून औरंगझेबादि मोंगलापर्यंत सार्वभौम राजांची मालिका दाखवून द्यावयाची हा दुसरा हेतु, व ( ३ ) दिल्ली येथील सार्वभौम मोंगलांची सत्ता तरवारीच्या जोरावर बसविलेली होती व त्यांना दिल्लीच्या गादीला पिढीजात हक्क कांहींएक नव्हता, हें दृष्टोत्पत्तीस येऊन शिवाजीला सार्वभौम सत्ता प्रस्थापित करण्याचा हक्क पिढीजात प्राप्त झाला होता, हेंहि वाचकांच्या ध्यानांत यावें, हा तिसरा हेतु. अशा त्रिविध हेतूनें प्रोत्साहित

ह्या दोन्ही बखरींत प्रारंभीं युधिष्ठिरापासून पिठोर राजापर्यंत वंशावळी दिल्या आहेत. युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंतची वंशावळ बहुतेक विष्णुपुराणांतल्याप्रमाणें दिलेली आहे. कोठें कोठें एखादुसरें नांव गाळलेलें आढळतें व पुष्कळ ठिकाणीं अशुद्ध नांवेंहि छापलेलीं आहेत. आधीं पुराणांतून जीं नांवें दिलेलीं असतात त्यांच्या शुद्धतेसंबंधीं रास्त संशय आलेला आहेच. तशांत ह्या बखरनविसांनीं व बखरी छापणाऱ्यांनींहि ह्या अशुद्धतेला सहाय्य करण्याचा बराच प्रयत्न केलेला पाहून मनुष्यमात्राच्या हलगर्जीपणाची कींव येते व स्वदेशाच्या इतिहासाची जोपासना करण्याच्या कामीं दाखविलेल्या अनास्थेबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो. खरें म्हटलें असतां ह्या बखरींत सृष्टीच्या उत्पत्तीपासून राजांचीं नांवें यावयाचीं; परंतु त्या नांवांची मालिका लांबच लांब असल्यामुळें व त्यांच्या संबंधीं माहिती पुराणांतही विशेष नसल्यामुळें ती बहुशः दिली नसावी. युधिष्ठिराचा संपूर्ण इतिहास महाभारतांत दिला असल्याकारणानें त्या बखरनविसांनीं आपल्या इतिहासाची सुरवात युधिष्ठिराच्या नांवापासून केली आहे. कलियुगाला प्रारंभ युधिष्ठिरापासून होतो हीहि गोष्ट बखरनविसांच्या ध्यानांत असावी असें दिसतें. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें "ब्रह्मपुत्रस्थ यो योनिः" व "यदेव भगवान् विष्णोः" वगैरे श्लोक, अशुद्ध कां होईनात, परंतु कसेतरी दिले आहेत, ह्यावरून व मल्हाररामराव स्वतःच तसें म्हणतो म्हणून ह्या दोघा बखरनविसांनीं साक्षात् विष्णुपुराण पाहिलें होतें, ह्यांत संशय नाहीं. शिवाय "युगसंखेची याद" व "हस्तनापुरच्या राजांची याद" म्हणून ज्या बखरी प्रसिद्ध आहेत व ज्यांचा उल्लेख चिटणीशी बखरींच्या उपोद्घातांत कीर्तन्यांनीं केला आहे, त्यांचाहि उपयोग ह्या दोघांनीं केला होता असें माझ्याजवळ ज्या युगसंख्येच्या वगैरे यादी आहेत त्यांच्याशीं ह्या बखरींतलि मजकूर ताडून पाहतां, स्पष्ट दिसतें. माझ्याजवळील युगसंख्येच्या व राजांच्या यादींत सृष्टिक्रमापासून तों महमद बहादूरशहापर्यंत शके १७५९ वंशावळी आणून सोडिल्या आहेत. आद्यन्तांची थोडीफार छाटाछाट करून ह्या बखरींतहि तोच मार्ग स्विकारलेला आहे. ज्या चुका व जो घोटाळा माझ्या जवळील यादींत झालेला आहे त्याच चुका व तोच घोटाळा ह्या बखरींतून झालेला आहे. तेव्हां बखरींतील वंशावळी बहुशः ह्या यादींवरून उतरून घेतल्या आहेत हें उघड आहे व ह्या यादी बखरींच्याहून जुन्या आहेत हें त्याहून उघड आहे. ह्या यादी केव्हां लिहिल्या गेल्या त्याचा खुलासा मी पुढें करणार आहें.

युगसंख्येच्या यादींतलि, व अर्थात् ह्या बखरींतील युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंतच्या वंशावळी पुराणांतून घेतल्या म्हणून वर सांगितलेंच आहे. आतां शूरसेनापासून पिठोरेराजापर्यंतच्या वंशावळी कोठून घेतल्या तेंहि सांगितलें पाहिजे. ह्या वंशावळी बहुशः कांहीं पुराणांतून व कांहीं रजपुताच्या राजावलींतून घेतलेल्या असाव्या असा अंदाज आहे. युधिष्ठिरापासून पिठोरराज्यापर्यंत दिलेल्या यादींसंबंधानें एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, हस्तनापूर व दिल्ली येथें राज्य करणाऱ्या राजांचींच तेवढीं नांवें देण्याचा प्रयत्न ह्या यादींत केलेला आहे. पुढल्या राजाचा मागल्या राजाशीं, पितापुत्र संबंध

सदा असतोच असा प्रकार नाहीं. उदाहरणार्थ, राजा पिठोर याच्या पाठीमागच्या राजाचें नांव चनपाळ किंवा चेनपाळ असें दिलेलें आहे. हा चनपाळ अथवा चेनपाळ म्हणजे राजा अनंगपाळ होय. पिठोर चव्हाणवंशी असल्यामुळें व अनंगपाळ तुवरवंशीं असल्यामुळें ह्यांचा पितापुत्र संबंध नाहीं. हाच प्रकार वंशावळींतील इतर राजांसंबंधींहि दाखवितां येईल. वंशावळींतील कित्येक राजांनीं हस्तनापूर किंवा दिल्ली येथें राज्य केलेलें आहेच असेंहि समजतां कामा नये. यादी बनविणाराचा मुख्य हेतु सार्वभौमत्व ज्या राजांनीं केलें त्यांचींच तेवढीं नांवें दाखल करण्याचा होता.

शहाबुद्दिनपासूनच्या पुढील वंशावळी यवनांच्या तवारिखांतून घेतलेल्या आहेत. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें यवनांच्या तवारिखा पाहिल्या होत्या, किंवा खरें म्हटलें असतां, ज्या यादींवरून त्यानें आपला मजकूर तयार केला, त्या यादींच्या कर्त्यांनीं तवारिखा पाहिल्या होत्या असें म्हटलें जास्त असतां शोभेल. यवनी वंशावळींतहि सर्व राजांचीं नांवें एका पाठीमागून एक अशीं बिनचूक दिलेलीं नाहींत.

वंशावळींत दिलेल्या सार्वभौम राजांपैकीं एक दोन वंशांतील राजाखेरीज महाराष्ट्राच्या इतिहासांशीं बाकीच्यांचा साक्षात् संबंध कांहींएक नाहीं. असें असतां, वंशावळी देण्याच्या खटपटींत बखरनवीस कां पडले, असा प्रश्न साहजिक उद्भवतो. पुराणांतील पद्धतीला अनुसरून ह्या वंशावळी यादीकारांनीं व बखरनविसांनीं दिल्या असाव्या, हें एक उत्तर आहेच. तसेंच ज्या कालीं ह्या यादी लिहिल्या गेल्या, त्याकालीं दिल्लीपतीचें महत्त्व महाराष्ट्रांत फार झालें होतें. दिल्लीपती म्हणजे पृथ्वीपति; तेव्हां ज्यांना राज्य कमाविण्याची महत्त्वाकांक्षा असेल त्यांनीं दिल्लीकडे दृष्टी फिरविली पाहिजे, ह्या मुद्यावर यादीकारांनीं विशेष भिस्त ठेविली असावी, हें दुसरें एक उत्तर आहे. माझ्या मतें मुख्य उत्तर निराळेंच असावें. शिवाजीचा वृत्तांत देतांना शिवाजीच्या वंशाची उत्पत्ति रजपुतांच्या छत्तीस कुळांतील आहे, व ह्या छत्तीसकुळीच्या द्वारें शिवाजीचा संबंध युधिष्ठिरापर्यंत जाऊन पोहोंचतो ही गोष्ट ह्या बखरनविसांना मुख्यतः सांगावयाची आहे. यवनांनीं रजपुतांचीं कित्येक कुळें धुळीस मिळविलीं, त्यांपैकीं कांहीं रजपूत दक्षिणेकडे आले व त्यांतच भोसल्यांचे पूर्वजहि आले, वगैरे प्रसंगांचें त्यावेळच्या माहितीला धरून, संगतवार व समाधानकारक वर्णन देतांना ह्या पौराणिक व मध्ययुगीन वंशावळींचा प्रवेश बखरींतून स्वाभाविकपणेंच झाला. ह्या वंशावळी देण्यांत एक मुख्य हेतु व दोन गौण हेतु, मिळून एकंदर तीन हेतु बखरनविसांच्या मनांत होते असें दिसतें:—( १ ) युधिष्ठिरापासून शिवाजीपर्यंत एकसारखी परिनालिका दाखवून द्यावयाची हा पहिला हेतु, ( २ ) युधिष्ठिरापासून औरंगझेबादि मोंगलापर्यंत सार्वभौम राजांची मालिका दाखवून द्यावयाची हा दुसरा हेतु, व ( ३ ) दिल्ली येथील सार्वभौम मोंगलांची सत्ता तरवारीच्या जोरावर बसविलेली होती व त्यांना दिल्लीच्या गादीला पिढीजात हक्क कांहींएक नव्हता, हें दृष्टोत्पत्तीस येऊन शिवाजीला सार्वभौम सत्ता प्रस्थापित करण्याचा हक्क पिढीजात प्राप्त झाला होता, हेंहि वाचकांच्या ध्यानांत यावें, हा तिसरा हेतु. अशा त्रिविध हेतूनें प्रोत्साहित

होऊन बखरनविसांनीं ह्या वंशावळी दिल्या आहेत. पुराणें, राजावळी, तवारिखा वगैरे साधनांच्या सहाय्यानें मूळ यादीकारांनीं ह्या वंशावळी बनविल्या व त्यांवरून बखरनविसांनीं त्या उतरून घेतल्या.

एक दोन घराण्यांखेरीज ह्या वंशावळींतील राजांपैकीं बाकींच्या राजांचा महाराष्ट्राच्या इतिहासाशीं साक्षात् संबंध यत्किंचित्हि नाहीं. शालिवाहन, अल्लाउद्दिन, शहाजहान, व औरंगझेब, वगैरे पांच चार नांवांचा मात्र निर्देश ह्या वंशावळींत केला आहे. परंतु तो दिल्लीचे सार्वभौम ह्या नात्यानें झाला असून, महाराष्ट्राच्या इतिहाससंबंधानें बिलकुल झालेला नाहीं. अल्लाउद्दिन, शहाजहान व औरंगझेब ह्यांची माहिती सर्वत्र थोडी बहुत असल्यामुळें, त्यांच्या संबंधानें मला येथें विशेष कांहींच लिहावयाचें नाहीं. शालिवाहन ह्या नांवासंबंधानें मात्र इतका उदासीपणा दाखवितां येत नाहीं. शालिवाहन अथवा शातवाहन हें नांव आपल्याला माहित असलेल्या महाराष्ट्रांतील राजांच्या वंशावळींतील आद्यतम म्हणून समजलें जातें. पैठणिक, राष्ट्रिक, महाभोज हीं महाराष्ट्रांतलि निरीनराळ्या प्रांतांतलि लोकांचीं नांवें अशोकाच्या वेळींहि प्रसिद्ध होतीं हें जरी खरें आहे, तरी महाराष्ट्रांतील राजकुलांपैकीं अत्यंत पुरातन असें आपल्याला माहीत असलेलें नांव म्हटलें म्हणजे हें शालिवाहनाचेंच होय. शातवाहन हें कुल आंध्र असल्याकारणानें शातवाहनाच्यावेळचे मराठे पैठण येथलि आंध्र राजांच्या परकीय अमलांखालीं होते असें म्हणावें लागतें. ह्या आंध्रराजांच्या विरुद्ध त्या वेळच्या कांहीं महारथींनीं म्हणजे मराठ्यांनीं क्षत्रपांच्या दरबारीं खटपट करून आंध्रराजांच्या ताब्यांतील जुन्नर वगैरे कांहीं प्रांत क्षत्रपांच्या हातीं दिले, असें आंध्रांच्या व क्षत्रपांच्या नाशीक व कार्ले येथील शिलालेखांवरून अनुमान होतें. महाराष्ट्रांतलि जुन्नर प्रांतावर राज्य करणाऱ्या नहपान क्षत्रपानें खहराट असा किताब धारण केला. शिलालेखांतील नहपान या शब्दाच्या अगोदर येणाऱ्या खहराट ह्या शब्दाचा अर्थ अद्यापपर्यंत कोणीं दिलेला नाहीं. माझ्या मतें षाहरट ह्या शब्दाचा अपभ्रंश षच्या बद्दल ख घेऊन खहराट असा झालेला असावा. षाहरट म्हणजे ह्यांचा राजा, रट्ट म्हणजे मराठे. षाहजहान ह्या शब्दाप्रमाणें षाहरट ह्या शब्दांतलि षष्ठीच्या ईचा लोप होऊन षाह व रट्ट ह्या दोन शब्दांचा समास झालेला आहे. पैठण येथील आंध्रांना हिणवावयाकरितां खहराट हा किताब नहपातानें घेतलेला असावा. अथवा आंध्रांच्या शातकर्णी या बिरुदाप्रमाणें नहपानानें खहराट हें आपलें बिरुद केलें असावें. खहरट नहपान हा, शक किंवा पल्हव कुलांतलि असावा, असें डॉ० भांडारकर यांचें म्हणणें आहे. नहपान शक असो किंवा पल्हव असो, क्षत्रपांचें राज्य महाराष्ट्रांत आंध्र म्हणजे शातवाहन राज्यांच्या वेळीं कांहीं ठिकाणीं कांहीं काळपर्यंत होतें हें स्पष्ट आहे. म्हणजे शुद्ध मराठी राजांच्या अमलाखालीं महाराष्ट्र आतांप्रमाणें त्यावेळींहि म्हणजे अठराशें वर्षांपूर्वींहि नव्हतें असा सिद्धान्त निघतो. आंध्रांच्या व क्षत्रपांच्या दोघांच्याहि पदरीं मोठमोठे ब्राह्मण मुत्सद्दी व मराठे सरदार असावे असें नाणे घाटांतील श्री शातकर्णीच्या लेखांतील मराठा वीरांच्या उल्लेखावरून व जुन्नर येथील नहपानाच्या लेखांतील अय्यमाच्या उल्लेखा-

वरून, दिसतें. आंध्र राजे शूद्र असून द्रविड शाखेंतील असतांहि व क्षत्रप तर बोलून चालून परदेशीय असतांहि, त्यांची शासनें ज्या अर्थी संस्कृतप्राकृतमिश्रित अशा भाषेत आहेत त्या अर्थी त्यावेळीं जिंकणारे जिंकलेल्यांचीच भाषा वापरीत असत व जिंकलेल्यांची भाषा संस्कृतप्राकृतमिश्र अशी असे हें उघड आहे. आंध्रांना व क्षत्रपांना दोघांनाहि गोब्राह्मणांचा व श्रमणकभिक्षूंचा समाचार सारखाच घ्यावासा वाटे. गौतमीपुत्र, वाशिष्ठीपुत्र, माद्रीपुत्र, हारीतीपुत्र अशीं नांवें आंध्रराजांनीं लाविलीं असल्यामुळें स्त्रियांचें प्राधान्य आंध्रकुलांत विशेष असे व बापाचें नांव न लावितां आईचें नांव आंध्र लोक लावीत, असें स्पष्ट दिसतें. ह्या सर्व गोष्टी आंध्र व क्षत्रप राजांसंबंधीं झाल्या. खुद्द मराठ्यांच्या संबंधीं माहिती म्हटली तर, ह्या शिलालेखांतून अनुमानानेंहि काढण्यासारखीं अशीं फारच स्वल्प आहेत; कदाचित् मुळींच नाहींत. इ० स० पूर्वी एक शतकापासून तों इसवी सनानंतर दोन शतकांपर्यंत शातवाहनकुलांतलि राजांनीं महाराष्ट्रांत व तेलंगणांत राज्य केल्याचे दाखले पुराणांतून, शिलालेखांतून व नाण्यांतून सांपडतात. ह्यावरून एवढें सिद्ध आहे कीं, शालिवाहनांच्या नांवानें जो शक सध्यां प्रचारांत आहे, त्याचा प्रारंभ शातवाहन कुलांतील राजे राज्य करूं लागल्यापासून झाला नाहीं. आपल्याला माहित असलेल्या शातवाहन कुलांतील मधल्या एका राजानें म्हणजे इ. स. ७८ त राज्य करणाऱ्या एकाद्या शातवाहन राजानेंहि हा शक सुरू केला नाहीं. कां कीं, नाशिक येथील गौतमीपुत्र शातकर्णी व पुळुमायी ह्यांच्या शिलालेखांत पुळमायींच्या राज्याभिषेकापासून झालेल्या वर्षांचे आंकडे दिलेले आहेत व शकांचे आंकडे दिलेले नाहींत. म्हणजे शातवाहनांच्या अमदानींत वर्षांची गणना शकानें होत नसे हें उघड आहे. नहपानाचा जांवई जो उषवदात त्याच्या शिलालेखांत वर्षांची गणना शकानें केली आहे, असें पौराणिकांचें मत आहे. त्यावरून असें म्हणणें भाग पडतें कीं, वर्षांची गणना क्षत्रप राजे शकानें करीत व आंध्र राजे मोगल राजांप्रमाणें किंवा शिवाजीप्रमाणें स्वतःच्या राज्यारोहणापासून करीत. शकानें वर्षे मोजण्याचा प्रघात ज्या अर्थी शातवाहन राजांचा नसे त्या अर्थीं शातवाहनानें विक्रमाला जिंकून दक्षिणेंत शातवाहन शक सुरू केला व नर्मदेच्या उत्तरेस विक्रम संवत् चालता राहिला वगैरे दंतकथा शके १२२ पर्यंत म्हणजे इ. स. २०० वर्षेपर्यंत राज्य करणाऱ्या शातवाहनांच्या संबंधानें तरी निराधार आहेत असें म्हणावें लागतें. महाराष्ट्रांतील पुरातन कालचें मोठें शहर जे पैठण, तेथील मराठे राजे जे शातवाहन अथवा शालिवाहन त्यांनीं दक्षिणेंत आपला शक सुरू केला असा जो अभिमान बखरनविसांच्या लिहिण्यांत व कित्येकांच्या बोलण्यांत दिसून येतो, तो केवळ भ्रामक व निराधार आहे, हें वरील विवरणावरून ध्यानांत येईल. क्षिप्रकापासून पुलोमार्चिषापर्यंत आंध्रराजांची वंशावळ विष्णुपुराणांत दिली आहे. शिवदिग्विजयांत क्षिप्रकापासून इवीलकापर्यंत आंध्रकुल राज्य करीत होतें असें सांगून नंतर हलापासून पुलोमार्चिषापर्यंत विक्रमाच्या वंशांतील राजांनीं राज्य केलें म्हणून म्हटलें आहे व नंतर शालिवाहन राजाचा शक सुरू झाला म्हणून स्पष्टीकरण केलें आहे. परंतु इसवी सनापूर्वी एक शतक व नंतर दोन शतकें आंध्रराजे राज्य करीत होते असे डॉ. भांडारकरां-

च्या दक्षिणच्या इतिहासावरून ( 1884 ) किंवा पुलमायी वाशिष्ठी पुत्रानें शके ५७ पासून शके ८५ पर्यंत व श्रीयज्ञयातकर्णी गौतमीपुत्रानें शके १०० पासून १२२ पर्यंत राज्य केलें असें धरून शेवटल्या पुलमायीनें सुमारें शके २२२ पर्यंत राज्य केलें असें धरल्यास इ० सना नंतर तीन शतकें आंध्रराजे राज्य करीत होते असें मि० व्ही. ए. स्मिथ यांच्या म्हणण्यावरून ( In Antiquary for Feb. 1889 ) बखरकाराचें स्पष्टीकरण चुकलें आहे असें म्हणावें लागतें. शकाच्या प्रारंभापासून शालिवाहनाचें राज्य दक्षिणेंत सुरू झालें हें मत आज कित्येक शतकें ह्या देशांत प्रचलित झालें आहे, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली तर, बखरनविसानें केलेली चूक मोठी आश्चर्यजनक आहे असें वाटण्याचें कांहींएक कारण नाहीं. हलापासून पुलोमार्चिषांपर्यंतचें राजे विक्रमाच्या वंशांतील होते ही माहिती शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें कोठून आणिली असेल तें कळत नाहीं.

शालिवाहन शकांत झालेल्या राजांची माहिती दोघाहि बखरनविसांनीं मोठी विचित्र दिली आहे. हस्तनापूर किंवा दिल्ली ह्या दोन शहरीं राज्य करणाऱ्या सार्वभौम राजांची मालिकाच तेवढी देण्याचा ह्या लेखकांचा संकल्प असल्यामुळें शालिवाहनांच्या पुढें दक्षिणेंत कोण राजे झाले तें सांगण्याच्या खटपटींत हे लोक पडलेच नाहींत. बाकी पडले असते तर त्यांत त्यांना फारसें यश आलें असतें असें क्वचित्च झालें असतें. हस्तनापूर व दिल्ली येथील हिंदुराजांची मालिका पिठोर राजापर्यंत आणून शके ५१२ त यवनांनीं पिठोराचा पराभव केला म्हणून हे बखरकार सांगतात ह्या सांगण्याचा अर्थ असा होतो कीं, शके ५१२ म्हणजे इ० स० ५९० पर्यंत दिल्ली येथें हिंदूराजांनीं राज्य केलें व त्या वर्षी पिठोराचा यवनांनीं पराभव केला. पिठोर राजाचा पराभव यवनांनीं ११९५ त केला, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. शालिवाहन शके इ० स० ७८ त सुरू झाला त्याअर्थी ११९५ वर्षांचा हिशोब, खरें पाहिलें तर, ह्या बखरनविसांनीं दिला पाहिजे होता. तसें न करतां ५९० वर्षांचा, व तोहि चुकीचा असा मजकूर ह्या बखरनविसांनीं देऊन बाकीच्या ५२५ वर्षांची माहिती अजीबात गाळून टाकिली आहे. हीं वर्षे त्यांनीं मुद्दाम गाळून टाकिलीं आहेत असें नाहीं. इ० स० ५९० त म्हणजे शके ५१२ त हिंदूंचें राज्य नष्ट झालें अशीं त्यांची बालंबाल खात्रीं झालेली होती असें दिसतें. का कीं, शके ५१२ पासून शके १६३० पर्यंतच्या म्हणजे औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंतच्या कालचा, शहाबुद्दीनापासून औरंगजेबापर्यंतच्या वंशावळी देऊन त्यांनीं, आपल्या मताप्रमाणें, चोख हिशोब देऊन टाकिला आहे. खरें पाहिलें तर, शहाबुद्दीनाच्या काळापासून म्हणजे शके १११५ पासून औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १६२९ पर्यंत ५१४ वर्षांचा अवधि जातो. ह्या बखरनविसांनीं तर शके ५१२ पासून शके १६३० पर्यंतच्या म्हणजे १११८ वर्षांचा हिशोब दाखवून दिला आहे. तो ६०४ वर्षांनीं खरे अवधीहून जास्त आहे. समकालीन राजे व ह्या अवधींत मुळींच न झालेले राजे, अशांचा वंशावळींत समावेश करून, ही आगंतुक वर्षे बखरनविसांनीं भरून काढिलीं आहेत. पिठोर राजाचा खरा काळ माहीत नसल्यामुळें, त्याच्या पूर्वीच्या हिंदूराजांच्या यादी उपलब्ध नसल्यामुळें, व त्याच्या नंतरच्या मुसलमान पातशाहांच्या कारकीर्दीचें यथास्थित ज्ञान नस

त्यामुळें ह्या बखरनविसांच्या हातून ही गफलत झालेली आहे. युधिष्ठिर शक ३०४४ वर्षें चालल्यानंतर विक्रम शक १३५ वर्षें चालला व त्यानंतर शालिवाहन शक सुरू होऊन ५१२ वर्षांची व्यवस्था ह्या बखरनविसांच्या मतें नीट लागली. शकाच्या ५१२ व्या वर्षी पिठोराचा यवनांनीं पराभव केला व तेव्हांपासून यवनांचा अंमल जो सुरू झाला, तो औरंगझेबाच्या मृत्यूपर्यंत अव्याहत चालला, अशी समाधानकारक खात्री होऊन, आपण चुकत आहोंत अशी ह्या बखरनविसांना शंकाच आली नाहीं व ती येण्याला कांहीं कारणहि नव्हतें. युधिष्ठिरापासून औरंगझेबाच्या मृत्यूपर्यंतच्या कालाची संगतवार व्यवस्था लागलेली दिसत होती, तेव्हां त्यांना शंका आली नाहीं, हें रास्तच झालें. यवनांनीं पिठोर राजाचा पराभव शके १११५ त केला, हें पक्कें माहीत असल्यामुळें, आधुनिक इतिहासकाराला मात्र इतकें निःशंक राहतां येत नाहीं. बखरनविस चुकले आहेत, हें इतिहासज्ञ पुर्तेपणीं जाणतो व ते कसे चुकले ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याचा प्रयत्न करतो.

गोविंद खंडेराव चिटणीस, मल्हार रामराव चिटणीस व शिवदिग्विजयाचा कर्ता ह्यांनीं ही चूक युगसंख्येच्या व हस्तनापूरच्या राजांच्या यादींतून जशीच्या तशीच उतरून घेतली आहे. शके ५१२ त साधारणनाम संवत्सर होता, अशी मल्हार रामरावानें जास्त माहिती दिली आहे. शके ५१२ त साधारण संवत्सर नव्हता त्या अर्थी ही जास्त माहिती चुकीची आहे, हें उघडच आहे. यादीकारांनीं शके ५१२ हा आंकडा कोठून घेतला हें पहाण्यासारखें आहे. यादीकारांनीं हा आंकडा एका रमलशास्त्राच्या पोथीवरून घेतला आहे. रमलशास्त्रांतील वचन येणेंप्रमाणें बखरनविसांनीं दिलें आहे:—

अर्कबाणे च शाके च शालिवाहनकः शकः ।
पैगंबरादि विख्यातो प्रारंभो यवनोदयः ॥

हा अशुद्ध श्लोक मजजवळील यादीकारांनीं, मल्हार रामरावानें व शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें आपापल्या पुस्तकांत दिला आहे व ५१२ शकांत यवनांचा उदय झाला म्हणजे पिठोराचा यवनांनीं पराभव केला असा अर्थ ह्या श्लोकाचा ह्या सर्वांनीं केला आहे. अर्क = १२ व बाण = ५, मिळून ५१२ होतात, हें या यादीकारांना ठाम माहीत होतें व अर्कबाणे ह्या एवढ्या एवट्याच पदावर ५१२ त पिठोराचा यवनांनीं पराभव केला व तेव्हांपासून यवनांचा उदय झाला वगैरे इमारत ह्यांनीं उठवून दिली आहे. पिठोराच्या वेळेस पैगंबरादींचा उदय झाला, असेंहि ह्या यादीकारांचें मत होतें. पैगंबरानें व सुलतान रुकनुद्दिनानें एक विचार करून पिठोराचा पराभव केला, असें मल्हार रामराव म्हणतो. पैगंबर व रुकनुद्दीन ह्याबद्दल फकीर व शहाबुद्दीन अशीं नांवें शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें दिलीं आहेत. सारांश, ५१२ शकांत ( १ ) पिठोर राजाचा पराभव झाला, ( २ ) रुकनुद्दीन किंवा शहाबुद्दीन ह्यांनीं तो पराभव केला व ( ३ ) पैगंबराचा म्हणजे महंमदाचा उदय ह्या वर्षी झाला, ह्या तीन गोष्टी ह्या श्लोकाच्या आधारानें ह्या लेखकांनीं काढिल्या आहेत. आतां ह्या तिन्ही गोष्टी ५१२ त झाल्या नाहींत हें सुप्रसिद्ध आहे. ( १ ) पिठोर राजाचा पराभव शके १११५ त झाला, ( २ ) तो १११५ त शहाबुद्दीनानें केला, व

( ३ ) शके ५१२ त म्हणजे इ. स. ५९० त हिजरीसनाला प्रारंभहि झाला नव्हता. येणेंप्रमाणें शके ५१२ त ज्या गोष्टी झाल्या म्हणून हे बखरकार किंवा यादीकार सांगतात त्या, त्या शकांत मुळींच झाल्या नाहींत हें सिद्ध आहे. परंतु ५१२ ह्या आंकड्याचा अर्थ काय ह्याचा ह्या सिद्धीनें कांहीं उलगडा झाला नाहीं व तो तर होणें अत्यंत इष्ट आहे. हा उलगडा बखरकारांनीं दिलेल्या रमलशास्त्रांतील श्लोकाचा नीट अर्थ लागल्यास कदाचित् झाला तर होईल. परंतु नीट अर्थ लागण्यास मूळ श्लोक जशाचा तसाच मिळाला पाहिजे. श्लोक कोणत्या रमलशास्त्रांतून घेतला त्याचा उल्लेख बखरनविसांनीं केला नाहीं. आनंदाश्रमांतील रमलशास्त्राच्या पंधरा वीस पोथ्या मीं तपासून पाहिल्या; परंतु त्यांत हा श्लोक कोठें सांपडत नाहीं. प्रत्यक्ष हाच श्लोक सांपडत नाहीं तत्रापि ह्याचाच सारखा एक श्लोक आनंदाश्रमांतील ६२४३ नंबरच्या रमलरहस्याच्या पोथीच्या ६३५ पृष्ठावर, मला सांपडला. तो श्लोक असाः—

संवत्सरःपंचगुणेंदुहीनः १३५ शाकोभवेद्विक्रमराज्य या- ।। शाकेविर्हीने कुकु पंच ५११ शेष मोहर्म्मादौ हिजरीती सन्नः ।। १ ।।

विक्रमशकांत १३५ वजा केले म्हणजे शालिवाहन शक येतो व शालिवाहन शकांत ५११ वजा केले म्हणजे हिजरी सन येतो, असा ह्या श्लोकाचा अर्थ आहे. रमलरहस्य हा ग्रंथ शके १६२३ त लिहिला असें ह्या पोथींत लिहिलें आहे. त्या शकांत हिजरी सन १११२ होता. शके १६२३ त ५११ वजा केले म्हणजे हिजरी १११२ येतात म्हणजे शके १६२३ त शालिवाहन शकांत व हिजरी सनांत अंतर ५११ होतें असें ह्यावरून ठरतें. शके १५९० त हिजरी सन १०७८ होता व त्या दोहोंत अंतर ५१२ होतें. शके १५६० त हिजरी सन १०४७ होता व त्या दोहोंत अंतर ५१३ होतें. येणेंप्रमाणें शकांत व हिजरी सनांत दर ३३ वर्षांनीं एकेक वर्ष अंतर जास्त किंवा कमी पडत जातें. अर्थात् शके १६२३ त लिहिलेल्या रमलशास्त्राच्या ग्रंथांत हिजरी सन काढण्याकरितां वजा करण्यास जो आकडा दिला असेल त्यापेक्षां शके १५९० तल्या ग्रंथांत वजा करण्याची रक्कम एकानें जास्त होईल. बखरनविसांनीं दिलेल्या रमलशास्त्रातील श्लोकांत " अर्कबाणे " म्हणजे ५१२ हा आकडा शालिवाहन शकांतील व हिजरी सनांतील त्या वेळचें अंतर दाखवितो. श्लोक बखरकारांनीं दिला आहे त्याप्रमाणेंच जर मुळांत असेल तर बखरकारांना अर्कबाणे ह्या पदापासून कोणत्या अर्थाची निष्पत्ती होते व हें पद कोणत्या विधानासंबंधानें कोणीं प्रथम उपयोजिलें ही गोष्ट बिलकुल माहीत नव्हती असें दिसतें. बखरनविसांनीं दिलेला श्लोक बहुत अशुद्ध आहे. तेव्हां मूळ श्लोक कसा असेल तें ठाम सांगतां येत नाहीं. परंतु एवढें मात्र विधान निश्चयानें करितां येतें कीं, हा श्लोक रमलशास्त्राच्या ज्या ग्रंथावरून घेतला तो ग्रंथ शालिवाहन शक व हिजरी सन ह्यांत ५१२ अंतर जेव्हां होतें तेव्हां केव्हां तरी लिहिला गेला असावा. बखरनविसांनीं दिलेल्या श्लोकाची पहिली ओळ—

अर्कबाणविहीने च शालिवाहनके शके ।

अशी असावी असा तर्क आहे. ह्या पहिल्या ओळीच्या व "पैगंबरादि विख्याताः" वगैरे दुसऱ्या ओळीच्या मध्यें दोन ओळी मूळांत आणखी आसाव्या असें वाटतें. शकांत ५१२ वजा केले म्हणजे हिजरी सन येतो व त्या हिजरीच्या प्रारंभीं पैगंबर वगैरेंचा उदय झाला; अशा अर्थाचा मजकूर त्या दोन ओळींत असावा. ह्यामधील दोन ओळी गहाळ झाल्यामुळें मूळ यादीकारांना व बखरकारांना आडनीड राहिलेल्या बाकीच्या दोन ओळींचा अर्थ बराबर लागला नाहीं. त्यामुळें त्यांच्या हातून वर सांगितलेली चूक झाली व पिठोराचा पराभव शके ५१२ त झाला असें वाटून पुढील बाराशें वर्षांचा हिशोब मुसलमान पादशहांची कशी तरी याद देऊन चुकता करून टाकावा लागला. ह्या ५१२ च्या प्रकरणावरून एक विचार सुचतो. तो हा कीं, बखरी छापणाऱ्यांनीं बखरींचें मूळ, एक कानामात्राहि न सोडून देतां, जशाचें तसेंच छापून काढावें व मुळाशीं ताडून पाहण्यास दुसऱ्या आणीक प्रती मिळाल्यास त्यांतील पाठभेद मोठ्या काळजीनें द्यावे. एकादे वेळीं एकादें पाठान्तर असें असूं शकेल कीं, त्याच्या आधारावर आजपर्यंत ध्यानींमनींहि नसतील अशा शंका उद्भवतील व त्या शंकांच्या निरसनार्थ शोधकांचे प्रयत्न जारीनें सुरू होतील. कीर्तन्यांनीं छापिलेली मल्हाररामरावाची बखर वाचतांना ह्या ५१२ बद्दल मला शंका आली होती, परंतु त्या बखरींत असणाऱ्या इतर चुकांप्रमाणें हीहि संपादकाच्या हलगर्जीपणाची चूक असेल असें त्या वेळीं मला वाटलें. परंतु पुढें शके १८१७ त बडोदें येथें छापिलेल्या शिवदिग्विजयांतहि ५१२ हा आकडा जेव्हां पाहिला व तो मजजवळ असलेल्या यादींतूनहि जेव्हां आढळला, तेव्हां ५१२ हा आंकडा संपादकाच्या नजरचुकीनें आला नसून तो १७ व्या शतकांतील यादीकारांना व त्या यादी वाचणाऱ्यांनाहि खरा वाटत होता असें मला दिसलें व बखरींतून ५१२ आंकडा कसा आला ह्याचा वर दाखविल्याप्रमाणें खुलासा करण्याचा प्रयत्न करावा अशी अवश्यकता भासली.

बखरनविसांनीं ज्या यादींवरून ५१२ हा आंकडा उतरून घेतला त्या यादी रमलशास्त्राच्या ग्रंथाच्या समकालीन म्हणजे शके १५९० च्या सुमाराच्या असाव्या. ५१२ चा उल्लेख ज्यांत केला आहे अशा यादींपैकीं मजजवळ एक याद आहे; तींत ( १ ) युगसंख्येची याद, ( २ ) हस्तनापुरच्या राजाची याद, ( ३ ) मुसलमान पादशहांची याद, ( ४ ) साधुसंतांची याद व ( ५ ) हेमाडपंती बखर अशीं पांच प्रकरणें दिलीं आहेत. ह्या यादींत तालीकोटची लढाई शके १४८६ वैशाख वद्य १० इंदुवारीं म्हणजे ६ मे १५६४ त झाली म्हणून लिहिलें आहे. ह्या यादीवरून असें अनुमान करावें लागतें कीं, शके १५९० च्या सुमारास म्हणजे शिवाजी महाराजांच्या वेळेस महाराष्ट्रांत बखरी लिहिण्याचा व अर्थात् वाचण्याचा प्रघात जारीनें चालू होता. तालिकोटच्या लढाईची तीथ दिली आहे. त्यावरून यादवांच्या पुढें झालेल्या दक्षिणेंतील मुसलमान पातशहांच्या बखरी त्या वेळीं लिहिल्या गेल्या असाव्या. ह्या यादींत विजयनगर येथें राज्य करणाऱ्या किरीटी रामराजाचें नांव दिलें आहे त्यावरून असें वाटतें कीं, विजयानगर अथवा अनागोंदी येथील राजांचाहि इतिहास त्या वेळीं महाराष्ट्रांत मशहूर होता. सारांश, दिल्लीच्या पातशहांचा, राजपुतान्यांतील रजपुतांचा,

दक्षिणेंतील पातशहांचा व अनागोंदी येथील राजांचा इतिहास शिवाजीच्या वेळीं महाराष्ट्रांत बखरींच्या रूपानें माहीत होता असें यादीतील उल्लेखांवरून निःसंशय ठरतें. शिवाजीच्या वेळच्या ह्या बखरी पुढें मागें सांपडण्याचा किंचित् संभव आहे.

पिठोर राजाचा दोन दोन तीन तीन वेळां उल्लेख करून, भोसल्यांचे मूळ पुरुष राजपुतान्यांत प्रथम कोठें होते व व नंतर ते दक्षिणेंत केव्हां आले वगैरे मूळपीठिका बखरनविसांनीं दिली आहे. ती देतांना मल्हाररामरावानें दोन कथा, गोविंद-खंडेरावानें तीन कथा व शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें दोन कथा नमूद केल्या आहेत. मल्हाररामरावाच्या दोन कथांपैकीं चितोडच्या एकलिंगजीची कथा बप्प रावळाच्या संबंधाची आहे. चितोडचे राणे एकलिंगजीचे दिवाण ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. बप्प रावळ इसवी सनाच्या आठव्या शतकांत उदयास आला. (Tod's Rajasthan, chap, II and Ind. Ant. for December 1887 ). बप्पानें एकलिंगजीची आराधना केल्याची गोष्ट पिठोर राजांच्या पूर्वी घडून आली म्हणून मल्हाररामराव म्हणतो तें खरें आहे. परंतु पिठोराचा रुक्नुद्दिनानें पराभव केला म्हणून जें तो म्हणतो तें मात्र अविश्वसनीय दिसतें. अमीर रुकनुद्दीन याचें नांव टॉडच्या ग्रंथात पहिल्या खंडाच्या चवथ्या परिशिष्टांत दिलेल्या लेखांत आलें आहे. तो लेख ६६२ हिजरींत म्हणजे शके ११८७ त लिहिलेला असल्यामुळें रुक्नुद्दिनाचा पिठोराशीं सामना होणें अशक्य भासतें. मल्हाररामरावानें दिलेली दुसरी कथा पद्मिणीसंबंधाची आहे. चितोडचा लक्ष्मणसिंह शके १०१२त राज्यारूढ झाला म्हणून टॉड म्हणतो (Tod's Rajasthan chap. VI ). ह्या वेळीं भीमसिंग चितोडाच्या गादीवर बसला म्हणून रा. सरदेसाई लिहितात तें बराबर नाहीं. ( हिं. अ. इतिहास पृष्ठ९९ ). लक्ष्मणसिंह अज्ञान असल्यामुळें त्यांचें पालकत्व भीमसिंगाकडे आलें होतें. चितोडच्या नौबतीची कथा तिन्हीं बखरनविसांनीं दिली आहे. शिवदिग्विजयाचा कर्ता काकाजीची कथा देतो ती सजणसिंहासंबंधाची आहे. शिवप्रतापांत ही काकाजीची कथा, नौबतीची कथा वगैरे कथा आहेत. हा काकाजी किंवा सजणसिंह भोसल्यांचा मूळपुरुष असावा असा सार्वत्रिक ग्रह आहे. तो कितपत खरा आहे तें पाहिलें पाहिजे.

भोसल्यांच्या वंशावळींची ताळेसूद व्यवस्था लावण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला आहे. परंतु त्या प्रयत्नापासून विशेष निष्पत्ति झाल्याचें दिसून येत नाहीं, व पुढेंहि केव्हां दिसून येईल किंवा कसें ह्याविषयीं संशय वाटतो. कांकीं सातारकर महाराजांच्या दप्तरांतील, चिटणीसांच्या दप्तरांतील किंवा रजपुतान्यांतील दप्तरांतील वंशावळी तपासून हें काम भागण्यासारखें नाहीं. ह्या सर्व वंशावळी एकाच मूळाच्या निरनिराळ्या प्रती आहेत; व खुद्द मूळाच्या विश्वसनीयत्वाबद्दलच संशय आहे. ह्या वंशावळींचें मुख्य मूळ म्हटलें म्हणजे मेवाडच्या वंशावळी व रासाग्रंथ होत. मेवाडच्या भाटांच्या रासाग्रंथांत शिवाजीची वंशावळ दिली आहे, म्हणून टॉड म्हणतो (Tod's Rajasthan , chap. VI). अजयसिंहाचा पुत्र सजणसिंह दक्षिणेंत शके १२२५ च्या सुमारास आला म्हणून तो म्हणतो. सजण, दिलीपसिंहजी व भोसाजी एकामागून एक सोंधवाड्यास राज्य करीत असतां त्यापैकीं भोसाजी शके १२००

बहुधान्य संवत्सरीं म्हणजे इ. स. १२७८ त दक्षिणेंत आला म्हणून मल्हार रामराव म्हणतो. अल्लाउद्दीनानें चितोड शके १२२५ त घेतलें व त्या वेळीं सजणसिंह हयात होता. त्याच्यापासून चौथा पुरुष जो भोसाजी तो शके १२०० त दक्षिणेंत आला हें जें मल्हार रामराव म्हणतो तें अर्थात् अविश्वसनीय ठरतें. काकाजी उर्फ सजणसिंह दक्षिणेंत दौलताबादच्या पातशहाच्या आश्रयास जाऊन राहिला म्हणून शिवदिग्विजयांत व शिवप्रतापांत लिहिलें आहे. परंतु १२२५ त दौलताबादेस पातशाही झाली नव्हती. दौलताबादेस यवनी अम्मल शके १२३४ त सुरु झाला. येणेंप्रमाणें बखरनविसांच्या लिहिण्यांत विश्वसनीयत्वाचा भाग फार थोडा आहे हें उघड दिसतें. आतां खुद्द मेवाडच्या रासाग्रंथांतील वंशावळीसंबंधीं विचार करावयाचा. टॉडनें मेवाडच्या इतिहासाचा बराच भाग पृथुराजरासा व खोमानरासा ह्या दोन ग्रंथांवरून मुख्यतः घेतलेला आहे. पैकीं पृथुराजरासांत शाहाबुद्दीनाच्या हस्तें पिठोराचा पराभव होई तोंपर्यंत म्हणजे शके १११५ पर्यंतची कथा आहे. त्यांत शिवाजीची वंशावळ येणें अशक्य आहे. खोमानरासा हा ग्रंथ अलीकडचा आहे म्हणून टॉड आपल्या प्रस्तावनेंत म्हणतो. शिवाजीचा उदय झाल्यावर त्याचा संबंध मेवाडच्या घराण्याशीं लावण्याकरितां चिटणिसांच्या घराण्यांतील एक पुरुष राजपुतान्यांत गेला होता ( शिवदिग्विजय पृष्ठ ४११ ). वर्ष सहा महिने खटपट करूनहि शिवाजीचा मेवाडच्या घराण्याचीं संबंध लागेना व गागाभट्टादि मंडळी शूद्राला छत्रसिंहासनाचा अधिकार नाहीं, हें म्हणणें सोडीतना, तेव्हां बाळाजी आवजी चिटणीसानें दक्षिणेंतून रामचंद्र बाबाजीस उत्तरेस पत्र पाठविलें कीं, " उदेपूरचा व यांचा संबंध आहे. " बाळाजी आवजीच्या ह्या सूचनेवरून शिवाजीचा व मेवाडच्या घराण्याचा संबंध शिवराजाच्या कीर्तीच्या व दराऱ्याच्या जोरावर युक्तीनें बसविण्यांत आला व राजपुतान्यांतील भाटांच्या वंशावळींत शिवाजीची वंशावळ नव्यानेंच दिसूं लागली. खुद्द शिवाजी महाराजांना ह्या आगंतुक संबंधाचें फारसें महत्त्व वाटत नव्हतें. " ज्याचे आंगीं सामर्थ्य तो राजा; कित्येक नीच होत्साता राज्यवैभव भोगतात कीं नाहीं ? हे क्षत्रियान्वय कोठें आहेत ? " असे महाराजांचे स्वतःचे या वेळचे उद्गार आहेत. ( शिवदिग्विजय ४१२ ). शिवाजीचा मेवाडच्या घराण्याशीं संबंध जोडण्यांत आला तो केवळ बाळाजीच्या स्वामीभक्तीचा प्रताप होय. गागाभट्टादि कर्मठ ब्राह्मणांचा किंतु घालविण्याकरितांच चिटणिसांनीं ही मेहनत केलेली आहे. धन्याचें न्यून असें भासवून द्यावयाचें नाहीं ह्या सदिच्छेनें बाळाजी आवजीनें हें गौडबंगाल केलें तेव्हां तें एका दृष्टीनें यद्यपि श्लाघ्य आहे तत्रापि आधुनिक इतिहासकाराला तें खरें धरून चालणें श्रेयस्कर होणार नाहीं. नेपोलियनाच्या राज्यरोहणाच्या वेळींहि असेंच एक गौडबंगाल रचण्यांत आलें. नेपोलियन कोर्शिकांतील एका सामान्य गृहस्थाचा मुलगा असून त्याच्या घराण्याचा संबंध कांहीं खटपटी लोकांनीं युरोपांतील एका अत्यंत पुरातन राजांच्या वंशावळीशीं जोडून दिला. त्या वेळीं नेपोलियनानें शिवाजीसारखेच उद्गार काढिले आहेत. (Alisons History chap. XX, प्रारंभ). सारांश माझ्या मतें शिवाजीचा म्हणजे भोसल्यांचा मेवाडच्या शिसोद्यांच्या घराण्याशीं कांहीं. एक संबंध नाहीं. ह्याला पुरावा भर-

दक्षिणेंतील पातशहांचा व अनागोंदी येथील राजांचा इतिहास शिवाजीच्या वेळीं महाराष्ट्रांत बखरींच्या रूपानें माहीत होता असें यादींतील उल्लेखांवरून निःसंशय ठरतें. शिवाजीच्या वेळच्या ह्या बखरी पुढें मागें सांपडण्याचा किंचित् संभव आहे.

पिठोर राजाचा दोन दोन तीन तीन वेळां उल्लेख करून, भोसल्यांचे मूळ पुरुष राजपुतान्यांत प्रथम कोठें होते व व नंतर ते दक्षिणेंत केव्हां आले वगैरे मूळपीठिका बखरनविसांनीं दिली आहे. ती देतांना मल्हाररामरावानें दोन कथा, गोविंद–खंडेरावानें तीन कथा व शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें दोन कथा नमूद केल्या आहेत. मल्हाररामरावाच्या दोन कथांपैकीं चितोडच्या एकलिंगजीची कथा बप्प रावळाच्या संबंधाची आहे. चितोडचे राणे एकलिंगजीचे दिवाण ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. बप्प रावळ इसवी सनाच्या आठव्या शतकांत उदयास आला. (Tod's Rajasthan, chap, II and Ind. Ant. for December 1887 ). बप्पानें एकलिंगजीची आराधना केल्याची गोष्ट पिठोर राजांच्या पूर्वी घडून आली म्हणून मल्हाररामराव म्हणतो तें खरें आहे. परंतु पिठोराचा रुकनुद्दिनानें पराभव केला म्हणून जें तो म्हणतो तें मात्र अविश्वसनीय दिसतें. अमीर रुकनुद्दीन याचें नांव टॉडच्या ग्रंथात पहिल्या खंडाच्या चवथ्या परिशिष्टांत दिलेल्या लेखांत आलें आहे. तो लेख ६६२ हिजरींत म्हणजे शके ११८७ त लिहिलेला असल्यामुळें रुकनुद्दिनाचा पिठोराशीं सामना होणें अशक्य भासतें. मल्हाररामरावानें दिलेली दुसरी कथा पद्मिणीसंबंधाची आहे. चितोडचा लक्ष्मणसिंह शके १०१२त राज्यारूढ झाला म्हणून टॉड म्हणतो (Tod's Rajasthan chap. VI ). ह्या वेळीं भीमसिंग चितोडाच्या गादीवर बसला म्हणून रा. सरदेसाई लिहितात तें बराबर नाहीं. ( हिं. अ. इतिहास पृष्ठ९९ ). लक्ष्मणसिंह अज्ञान असल्यामुळें त्यांचें पालकत्व भीमसिंगाकडे आलें होतें. चितोडच्या नौबतीची कथा तिन्ही बखरनविसांनीं दिली आहे. शिवदिग्विजयाचा कर्ता काकाजीची कथा देतो ती सजणसिंहासंबंधाची आहे. शिवप्रतापांत ही काकाजीची कथा, नौबतीची कथा वगैरे कथा आहेत. हा काकाजी किंवा सजणसिंह भोसल्यांचा मूळपुरुष असावा असा सार्वत्रिक ग्रह आहे. तो कितपत खरा आहे तें पाहिलें पाहिजे.

भोसल्यांच्या वंशावळींची ताळेसूद व्यवस्था लावण्याचा किल्येकांनीं प्रयत्न केला आहे. परंतु त्या प्रयत्नापासून विशेष निष्पत्ति झाल्याचें दिसून येत नाहीं, व पुढेहि केव्हां दिसून येईल किंवा कसें ह्याविषयीं संशय वाटतो. कांकीं सातारकर महाराजांच्या दप्तरांतील, चिटणीसांच्या दप्तरांतील किंवा रजपुतान्यांतील दप्तरांतील वंशावळी तपासून हें काम भागण्यासारखें नाहीं. ह्या सर्व वंशावळी एकाच मूळाच्या निरनिराळ्या प्रती आहेत; व खुद्द मूळाच्या विश्वसनीयत्वाबद्दलच संशय आहे. ह्या वंशावळींचें मुख्य मूळ म्हटलें म्हणजे मेवाडच्या वंशावळी व रासाग्रंथ होत. मेवाडच्या भाटांच्या रासाग्रंथांत शिवाजीची वंशावळ दिली आहे, म्हणून टॉड म्हणतो (Tod's Rajasthan , chap. VI). अजयसिंहाचा पुत्र सजणसिंह दक्षिणेंत शके १२२५ च्या सुमारास आला म्हणून तो म्हणतो. सजण, दिलीपसिंहजी व भोसाजी एकामागून एक सोंधवाड्यास राज्य करीत असतां त्यापैकीं भोसाजी शके १२००

बहुधान्य संवत्सरीं म्हणजे इ. स. १२७८ त दक्षिणेंत आला म्हणून मल्हार रामराव म्हणतो. अल्लाउद्दीनानें चितोड शके १२२५ त घेतलें व त्या वेळीं सजणसिंह हयात होता. त्याच्यापासून चौथा पुरुष जो भोसाजी तो शके १२०० त दक्षिणेंत आला हें जें मल्हार रामराव म्हणतो तें अर्थात् अविश्वसनीय ठरतें. काकाजी उर्फ सजणसिंह दक्षिणेंत दौलताबादच्या पातशहाच्या आश्रयास जाऊन राहिला म्हणून शिवदिग्विजयांत व शिवप्रतापांत लिहिलें आहे. परंतु १२२५ त दौलताबादेस पातशाही झाली नव्हती. दौलताबादेस यवनी अम्मल शके १२३४ त सुरु झाला. येणेंप्रमाणें बखरनविसांच्या लिहिण्यांत विश्वसनीयत्वाचा भाग फार थोडा आहे हें उघड दिसतें. आतां खुद्द मेवाडच्या रासाग्रंथांतील वंशावळीसंबंधीं विचार करावयाचा. टॉडनें मेवाडच्या इतिहासाचा बराच भाग पृथुराजरासा व खोमानरासा ह्या दोन ग्रंथांवरून मुख्यतः घेतलेला आहे. पैकीं पृथुराजरासांत शाहाबुद्दीनाच्या हस्तें पिठोराचा पराभव होई तोंपर्यंत म्हणजे शके १११५ पर्यंतचीं कथा आहे. त्यांत शिवाजीची वंशावळ येणें अशक्य आहे. खोमानरासा हा ग्रंथ अलीकडचा आहे म्हणून टॉड आपल्या प्रस्तावनेंत म्हणतो. शिवाजीचा उदय झाल्यावर त्याचा संबंध मेवाडच्या घराण्याशीं लावण्याकरितां चिटणिसांच्या घराण्यांतील एक पुरुष राजपुतान्यांत गेला होता ( शिवदिग्विजय पृष्ठ ४११ ). वर्ष सहा महिने खटपट करूनहि शिवाजीचा मेवाडच्या घराण्याचीं संबंध लागेना व गागाभट्टादि मंडळी शूद्राला छत्रसिंहानाचा अधिकार नाहीं, हें म्हणणें सोडीतना, तेव्हां बाळाजी आवजी चिटणीसानें दक्षिणेंतून रामचंद्र बाबाजीस उत्तरेस पत्र पाठविलें कीं, " उदेपूरचा व यांचा संबंध आहे. " बाळाजी आवजीच्या ह्या सूचनेवरून शिवाजीचा व मेवाडच्या घराण्याचा संबंध शिवराजाच्या कीर्तीच्या व दराऱ्याच्या जोरावर युक्तीनें बसविण्यांत आला व राजपुतान्यांतील भाटांच्या वंशावळींत शिवाजीची वंशावळ नव्यानेंच दिसूं लागली. खुद्द शिवाजी महाराजांना ह्या आगंतुक संबंधाचें फारसें महत्त्व वाटत नव्हतें. " ज्याचे आंगीं सामर्थ्य तो राजा; कित्येक नीच होत्साता राज्यवैभव भोगतात कीं नाहीं ? हे क्षत्रियान्वय कोठें आहेत ? " असे महाराजांचे स्वतःचे या वेळचे उद्गार आहेत. ( शिवदिग्विजय ४१२ ). शिवाजीचा मेवाडच्या घराण्याशीं संबंध जोडण्यांत आला तो केवळ बाळाजीच्या स्वामीभक्तीचा प्रताप होय. गागाभट्टादि कर्मठ ब्राह्मणांचा किंतु घालविण्याकरितांच चिटणिसांनीं ही मेहनत केलेली आहे. धन्याचें न्यून असें भासवून द्यावयाचें नाहीं ह्या सदिच्छेनें बाळाजी आवजीनें हें गौडबंगाल केलें तेव्हां तें एका दृष्टीनें यद्यपि श्लाघ्य आहे तत्रापि आधुनिक इतिहासकाराला तें खरें धरून चालणें श्रेयस्कर होणार नाहीं. नेपोलियनाच्या राज्यरोहणाच्या वेळींहि असेंच एक गौडबंगाल रचण्यांत आलें. नेपोलियन कोर्शिकांतील एका सामान्य गृहस्थाचा मुलगा असून त्याच्या घराण्याचा संबंध कांहीं खटपटी लोकांनीं युरोपांतील एका अत्यंत पुरातन राजांच्या वंशावळीशीं जोडून दिला. त्या वेळीं नेपोलियनानें शिवाजीसारखेच उद्गार काढिले आहेत. (Alisons History chap. XX, प्रारंभ). सारांश माझ्या मतें शिवाजीचा म्हणजे भोसल्यांचा मेवाडच्या शिसोद्यांच्या घराण्याशीं कांहीं. एक संबंध नाहीं. ह्याला पुरावा भर-

भक्कम देतां येतो. ( १ ) भोसल्यांचे व शिसोद्यांचे धर्माचार व कुळदैवत एक नाहींत. ( २ ) शहाण्णव कुळींतील चाळके, माने, कदम, कचरे, जाधव, शाळुंके, मोरे, रठ्ठे, शिरके, मालुसरे, गुजर, पवार, वगैरे घराण्यांचा रजपुतांशीं जसा बिलकुल संबंध नाहीं, तसाच भोसल्यांचाहि नाहीं. चालुक्य, मानव्य, कदंब, कलचुरी, यादव, सोलांकी, मौर्य, रठ्ठे, श्रीक, मल्लसूर, गुर्जर, ह्या महाराष्ट्रांतील पुरातन लहानमोठ्या घराण्यांच्या नांवांचे वर दिलेल्या आधुनिक मराठ्यांचीं नांवें केवळ अपभ्रंश आहेत. त्याप्रमाणेंच भोज, भोजक ह्या पुरातन मराठी नांवाचा भोसले हा शब्द अपभ्रंश आहे. भोजें हें आडनांव मराठे लोकांत अद्यापहि ऐकूं येतें. भोज, भोजे, भोसके, भोसले, अशा परंपरेनें भोसलें हें आडनांव आलें असावें. ( ३ ) मराठ्यांचे रजपुतांशीं शरीरसंबंध होत नाहींत. परंतु भोसल्यांचे मोरे, शिरके, पवार, जाधव ह्यांच्याशीं संबंध झाले आहेत. मोरे, जाधव हीं अस्सल मराठा कुळें होत. हीं कुळें महाराष्ट्रांत आज हजारों वर्षे आहेत. ह्यांचा संबंध रजपुतांशीं कोणत्याहि प्रकारें लावतां येत नाहीं. शिवाजीचा शिसोद्यांच्या कुळाशीं संबंध लाविल्यापासून मात्र महाराष्ट्रांतील ह्या शुद्ध घराण्यांतील लोकांनींहि आपल्या कुळांचा संबंध रजपुतांशीं लावण्याचा प्रयत्न केला आहे. ( ४ ) मराठ्यांच्या व रजपुतांच्या शरीरांच्या ठेवणींत जो ढळढळीत भेद दिसून येतो त्यावरून ह्या मराठ्यांचा रजपुतांशीं कांहीं एक वांशिक संबंध नाहीं असेंच म्हणणें भाग पडतें. महाराष्ट्रांतील ब्राह्मण, प्रभु, मराठे, शेणवई, कुणबी वगैरे अठरा पगड जातींतील लोकांच्या शरीराची ठेवण एका विशिष्ट प्रकारची आहे. त्या ठेवणीवरून हिंदुस्थानांतील इतर लोकांतून मराठ्यांना ओळखून काढतां येतें.

शिवाजी जातिवंत मराठा होता व त्याच्या घराण्याचा संबंध रजपुतांच्या घराण्यांशीं लावण्याला ऐतिहासिक, शारीरिक व वांशिक हरकती अनेक येतात हें वरील विवेचनावरून स्पष्ट आहे. रजपूत व मराठे हे दोघेहि आर्यच होत. परंतु देशपरत्वें ह्या दोघांत शरीराच्या ठेवणीसंबंधानें भेद झाले आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. आतां मराठे रजपूत नाहींत ह्या विधानानें थोडासा गैरसमज होण्याची भीति आहे. मराठे रजपूत नाहींत, ह्यांत तर संशयच नाहीं, पण तेवढ्यानें ते क्षत्रिय नाहींत असें मात्र बिलकुल म्हणतां येत नाहीं. दोन अडीच हजार वर्षांपूर्वी जेव्हां प्रथम आर्य नर्मदेच्या दक्षिणेंतील प्रांतांत वसाहत करण्यास आले तेव्हां ते आपली चातुर्वर्ण्याची संस्था घेऊन आलेच असले पाहिजेत. त्या वेळचे जे क्षत्रिय तेच सध्यांचे मराठे होत. क्षत्रियांची जात महाराष्ट्रांत नष्ट झाली असा जो एक प्रवाद ऐकूं येतो तो वरील विधानाच्या पुढें फिक्का पडून जातो. ब्राह्मणाची जात जर अद्याप महाराष्ट्रांत आहे तर क्षत्रियांचीच जात महाराष्ट्रांत गुप्त कां व्हावी तें समजत नाहीं. अलीकडील अडीच हजार वर्षांत असा कोणता प्रळय झाला कीं तिनें क्षत्रियांचा लोप व्हवा ? महाराष्ट्रांतील क्षत्रियकुलांची परिनालिका अशोकाच्या कालापासून ह्या वेळपर्यंत एकसारखी चालत आलेली स्पष्ट दाखवून देतां येते. ह्या परिनालिकेंत संकर जातींचा समावेश करतां येत नाहीं. अस्सल मराठा क्षत्रियांचा शूद्रादि जातींशीं शरीरसंबंध होऊन जी संतती झाली तिला क्षत्रियांच्या गोटांतून वगळणें रास्त आहे. परंतु ह्या

अव्यवस्थित संबंधापासून झालेली संतती अमकीच असें दाखवून देणें अनेक कारणास्तव दुरापास्त आहे.

वखरनविसांनीं दिलेली वंशावळ अविश्वसनीय कां मानावी ह्यालाहि अशीं कारणें आहेत. सजणसिंहापासून कर्णसिंहापर्यंतची वंशावळ केवळ कृत्रिम भासते. ह्या कृत्रिम वंशावळींत सजणसिंहापासून बाबाजीपर्यंत १५ पुरुष दिले आहेत. बाबाजी शके १४५५ विजयनाम संवत्सरीं म्हणजे इ० स० १५३३ त जन्मला दर पिढीला २६ वर्षें धरिलीं तर सजणसिंहाचा काल शके १०६२ च्या सुमाराला येतो व दर पिढीला २० वर्षें धरिलीं तर शके ११५२ येतो. परंतु सजणसिंह शके १२२५ च्या सुमाराला हयात असल्यामुळें वरील दोन्ही सन त्याला लागू पडत नाहींत. अर्थात्, ह्या वंशावळीवर विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. शिवाजीचें मूळ रजपूत घराण्याशीं जोडून दिलें नाहीं तरी त्याचें क्षत्रियत्व कांहीं नाहींसें होत नाहीं. शिवाजीची आई जिजाबाई शिंदखेडच्या जाधवांची मुलगी होती. शिंदखेडचे जाधव म्हणजे देवगिरी येथें तेराव्या शतकाच्या प्रारंभीं राज्य करणाऱ्या जाधवांचेच वंशज होत. तेव्हां मातृपक्षाकडून शिवाजी मराठा क्षत्रिय होता हें निःसंशय सिद्ध आहे. भोंसल्यांचें कूळ महाराष्ट्रांतील पुरातन क्षत्रियांपैकीं होतें हें मागें सिद्ध करून दाखविलें आहे. त्याअर्थीं पितृपक्षाकडूनहि शिवाजीचें क्षत्रियत्व पूर्णपणें ठरतें. गागाभट्टादि मंडळींस शिवाजीच्या क्षत्रियत्वासंबंधानें शंका आली तिचें कारण त्या मंडळीचें पूर्वापर इतिहासाचें अज्ञान होय. तें अज्ञान आधाराला घेऊन कृत्रिम वंशावळी खऱ्या मानण्याच्या भरीस आपण कां पडावें तें समजत नाहीं.

ह्या कृत्रिम वंशावळीचें लटांबर काढून टाकिलें म्हणजे ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय अशा जागेवर उभे राहिल्यासारखें वाटून पुढील कांहीं भागाचें परीक्षण विशेष भरंवशानें करतां येतें. बाबाजी भोंसल्याचा जन्म शके १४५५ विजय नाम संवत्सरीं म्हणजे इ. स. १५३३ सालीं झाला म्हणून बखरकार जें सांगतात तें विश्वसनीय आहे.कां कीं,ही माहिती वखरनविसांनीं स्वदेशांतील टिपणांवरून घेतली असून वंशावळीप्रमाणें परदेशांतील कृत्रिम टिपणांवरून घेतली नाहीं. बाबाजीच्या बापाचें नांव संभाजी म्हणून होतें. बाबाजीला मालोजी व विठोजी हे दोन पुत्र अनुक्रमें शके १४७२ साधारण नाम संत्वसरीं व शके १४७५ प्रमादीनाम संत्वसरीं म्हणजे इ. स.१५५० त व १५५३ त झाले. मालोजीला जगदंबेचा दृष्टान्त शके १५१५ विजयनाम संवत्सरीं माघ शुद्ध १५ रविवारीं झाला म्हणून शिवदिग्विजयकार म्हणतो तें खरें आहे. त्यावर्षीं माघ शुद्ध १५ ला रविवारच होता. मल्हार रामराव दृष्टान्त शके १५२५ त म्हणजे इ. स. १६०३ त झाला म्हणून म्हणतो तें अर्थात् टाकाऊच धरिलें पाहिजे. ग्रांटडफनें ही गोष्ट शके १५२१ नंतर झाली असें धरून कांहीं विसंगत विधानें केलीं आहेत. जाधरावानें आपली मुलगी शहाजीला देण्याचें नाकारल्यामुळें मालोजी ह्रास पेटला व आपली स्थिति सुधारण्याकरितां तो दरवडे घालून पैसा जमवूं लागला व दृष्टान्तानें पैसा मिळाला हें केवळ मालोजीचें ढोंग होतें वगैरे विधानें डफनें केलीं आहेत. परंतु तीं बरावर नाहींत. मालोजीला भुमिगत द्रव्य शके

१५१५ त सांपडलें. त्याच्या जोरावर दोन चार हजार घोडीं ठेवून तो जाधवरावांची बरा-बरी करूं लागला. शके १४९९ त आपल्या वयाच्या २७ साव्या वर्षी ( डफ म्हणतो त्याप्रमाणें २५ व्या वर्षी नव्हे ) लुकजी जाधवरावाच्या पदरीं मालोजीनें शिलेदारी कर-ण्याचें आरंभिलें, तें शके १५२१ च्या रंगपंचमीच्या पुढें त्यानें सोडून दिलें. एका स्वतंत्र पथकाचा तो धनी बनला व जाधवरावाच्या विरुद्ध कामें करूं लागला. आपला मेव्हणा जगपाळ नाईक निंबाळकर याच्या सहाय्यानें मालोजीनें दौलताबादेजवळील एका मशि दींत मेलेलीं डुकरें नेऊन टाकिलीं. जाधवराव यवनांचा मनसबदार, तेव्हां यवनांचा द्वेष करणाऱ्या पक्षांत मिळणें किंवा त्या पक्षाचा पुढाकार करणें मालोजीला त्या वेळीं हिताचें दिसलें. ही हकीकत १५२३, १५२४ च्या सुमाराला झाली असावी. त्या वेळीं निजाम-शाही अगदीं डबघाईस आलेली होती. अकबराच्या सरदारांनीं अहमदनगर १५२२ त घेऊन बहादूरशहास सालेरीस कैदेंत ठेविलें, चांदबिबी मरून गेली; व निजामशाहा दौल-ताबादेस पळून गेला. तेथेंहि अकबराच्या सरदारांनीं दुसऱ्या मूर्तिजाशहास शह देण्यास कमी केलें नाहीं. अशा वेळीं मालोजीनेंहि पुंडावा आरंभिलेला पाहून, त्याला आपल्या बाजूला ओढून घेणें दौलताबादच्या मुत्सद्यांस जरूर पडलें. जाधवरावांचें व मालोजीचें त्यांनीं सख्य करून दिलें, मालोजीचा मुलगा शहाजी यास जाधवरावाची मुलगी शके १५२५ च्या वैशाखमासीं अथवा जेष्ट शुद्ध दशमीस ( शिवप्रताप २४ ) म्हणजे इ. स. १६०४ च्या एप्रिल महिन्यांत देवविली व खुद्द मालोजीस पंचहजारी मनसबदाराचीं वस्त्रें लग्नाच्या आधीं त्याच वर्षाच्या चैत्र वद्य ५ स म्हणजे २६ मार्च १६०० त दिलीं. मालोजी ह्या वेळेपासून खराखुरा पातशाही मनसबदार झाला. फौजेच्या खर्चाकरितां त्याला कांहीं ठाणीं व किल्ले नेमून दिलेले होते ( शिवदिग्विजय ४४ ). सध्यांचे पुणें, नाशीक, अहमदनगर व खानदेश इतक्या जिल्ह्यांतून हीं ठाणीं पसरलेलीं होतीं. पैकीं खानदेशांत १५२२ च्या आधींच अकबराचा थोडासा अंमल झालेला होता व पुणें, नाशिक ह्या जिल्ह्यांतलि डोंगराळ प्रदेशांत पुंडांनीं अस्वस्थता माजविली होती. नगरहि अकबराच्या ताब्यांतच होतें. सारांश, मालोजीला मिळालेलीं जहागीर बहुतेक मोंगलांच्या ताब्यांतलि प्रांतांतून किंवा प्रांताच्या सरहद्दीच्या शेजारीं अशीच होती. असली जहागीर जतन कर-ण्यास मालोजी सारखाच उपद्व्यापी व पराक्रमी मनुष्य पाहिजे होता. मालोजीच्या परा-क्रमांचा प्रताप आपल्या प्रांतांतून दृष्टोत्पत्तीस न येतां मोंगलांच्या प्रांतांतून दृग्गोचर व्हावा असा हेतु, ही असली जहागीर मालोजीला देण्यांत दौलताबाद येथील मलिकंबरादि मुत्सद्यांचा असावा हें स्पष्ट आहे. मोंगलांशीं झगडण्यांत मालोजीचें मलिकंबराला बरेंच साहाय्य झालें असावें असें दिसतें. उत्तरेस अशेर व ऱ्हाणपूर ह्या ठाण्यापासून दक्षिणेस पेडगांवांपर्यंत म्हणजे मोंगलांच्या हद्दीपासून विजापूरच्या आदिलशाहीच्या हद्दीपर्यंत मालोजीची जहागीर सैरावैरा पसरली असल्यामुळें, निजामशाहाच्या प्रत्येक लढाईंत मालो-जीचा कांहींना कांहीं तरी हितसंबंध असे. कांहीं वऱ्हाडांतलिहि परगणे मालोजीच्या जहागिरींत होते म्हणजे खुजिस्ते बुनियाद अथवा दौलताबाद प्रांतांच्या भोंवतीं उत्तरेस,

पूर्वेस, व दक्षिणेस मालोजीची जहागीर पसरली होती. ही जहागीर मोंगलांच्या, विजापूरकरांच्या व पुंडांच्या तडाक्यांतून सुरक्षित ठेवणें मालोजीस प्राप्त होतें. ह्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेंत मालोजीचें बहुतेक आयुष्य गेलें व तींतच भोसल्यांच्या राज्यलक्ष्मीचा प्रथमोदय झाला. मालोजीच्या ह्या जहागिरीकडे ग्रांट डफादि इतिहासकारांचें लक्ष्य गेलेलें नाहीं. पुणें व सुपें हे दोन प्रांत मालोजीला जहागीर मिळाले एवढें सांगून ते स्वस्थ बसतात. त्यांना शिवदिग्विजयांतील यादीकडे दृष्टी फेकण्यास अवकाश झाला असता तर मालोजीच्या जहागिरीचें स्वरूप पृथक्करणांतीं त्यांच्या लक्ष्यांत निःसंशय आलें असतें. मालोजीला जहागीर शके १५२६ त मिळाली. तिचा उपभोग १५ वर्षें घेऊन तो शके १५४१ त वारला. कांकीं शके १५४१ त शहाजीला मनसबदारीचीं वस्त्रें मिळालीं असें, इतर अव्यवस्थित माहिती देतांना, मल्हार रामराव सांगतो.(मल्हार रामराव, चरित्र २१). वजिरीचीं वस्त्रें शहाजीस मिळालीं म्हणून मल्हारराव म्हणतो, परंतु १५४१ त मलिकंबर वजीर असल्यामुळें शहाजीस मनसबदारीचींच तेवढीं वस्त्रें मिळालीं असावीं हें उघड आहे. शहाजीचा जन्म शके १५१६ जयनाम संवत्सरीं चैत्र शुक्र पंचमीस म्हणजे १८ मार्च १५९४ त झाला. तेव्हां शके १५४१ त तो २५ वर्षांचा असावा. शहाजीचें मलिकंबरापाशीं वजन बरेंच असावें असें बखरींतील लिहिण्यावरून व शहाजीच्या जहागिरीच्या स्वरूपावरून दिसतें. शके १५४२ त मलिकंबराचें व मोंगलांचें खानदेशाच्या उत्तर सरहद्दीवर युद्ध झालें त्यांत शहाजी प्रमुख होता. ( Grant Duff chap. II ). युद्धांत प्रमुखत्व मिळाल्यावर दरबारच्या मसलतींतहि शहाजीचें वजन अतोनात झालें. तें जाधवरावादि जुन्या सरदारांना साहेना. तेव्हां शके १५४३ त ती मंडळी मोंगलांना जाऊन मिळाली. शके १५४५ त शहाजीला जिजाबाईचे पोटीं प्रथम पुत्र संभाजी नामें झाला. शके १५४२ पासून शके १५४८ पर्यंत मलिकंबरी कारकीर्दींत शहाजीचीं पांच वर्षें मोठ्या थाटांत गेलीं. मलिकंबर व मूर्तजा निजामशहा हा शके १५४८ त वारल्यावर राज्यांत चतुर साबाजी व शहाजी हे दोघे मुत्सद्दी तेवढे कायते नामांकित असे उरले होते. मलिकंबराचा मुलगा फत्तेखान ह्याच्या मनांत आपल्याला वजिरी मिळावी असें होतें. जाधवरावादि मंडळीस शहाजीचा पूर्वीपासूनच द्वेष वाटत होता. दौलताबादचा शहा लहान असल्यामुळें शहाजीच्या हातांत राज्याचीं सर्व सूत्रें बहुतेक गेल्यासारखीं होतीं. तेव्हां ही सर्व मंडळी एक होऊन त्यांनीं शहाजीची दौलताबादेहून उचलबांगडी केली. दौलताबादकरांचें व मोंगलांचें युद्ध चाललेंच होतें. मोंगलांकडे फत्तेखानानें आंतून सूत्र बांधिलें व जाधवरावादि मंडळी तर राजरोस त्यांना कित्येक वर्षें आधींच जाऊन मिळाली होती. मोंगलांच्या सैन्यांपुढें सरकत सरकत शहाजी जुन्नर प्रांतांत शिरला व आपली बायको जिजाऊ हीस तेथील स्वतंत्र अंमलदार श्रीनिवास म्हणून होता त्याच्या स्वाधीन करून, अहमदनगरच्या पश्चिमेकडील प्रांतांत जाऊन राहिला. ह्या गोष्टी शके १५४९ च्या प्रारंभीं घडल्या. मोंगल आंगावर चालून आले तेव्हां शहाजी नाशिकाच्या पश्चिमेकडील घाटानें कोंकणांत माहुली किल्ल्यापाशीं उतरून तेथून नाणें घाटानें जुन्नरास आला असावा

१५१५ त सांपडलें. त्याच्या जोरावर दोन चार हजार घोडीं ठेवून तो जाधवरावांची बरा-बरी करूं लागला. शके १४९९ त आपल्या वयाच्या २७ साव्या वर्षी (डफ म्हणतो त्याप्रमाणें २५ व्या वर्षी नव्हे) लुकजी जाधवरावाच्या पदरीं मालोजीनें शिलेदारी करण्याचें आरंभिलें, तें शके १५२१ च्या रंगपंचमीच्या पुढें त्यानें सोडून दिलें. एका स्वतंत्र पथकाचा तो धनी बनला व जाधवरावाच्या विरुद्ध कामें करूं लागला. आपला मेव्हणा जगपाळ नाईक निंबाळकर याच्या सहाय्यानें मालोजीनें दौलताबादेजवळील एका मशिदींत मेलेलीं डुकरें नेऊन टाकिलीं. जाधवराव यवनांचा मनसवदार, तेव्हां यवनांचा द्वेष करणाऱ्या पक्षांत मिळणें किंवा त्या पक्षाचा पुढाकार करणें मालोजीला त्या वेळीं हिताचें दिसलें. ही हकीकत १५२३, १५२४ च्या सुमाराला झाली असावी. त्या वेळीं निजामशाही अगदीं डबघाईस आलेली होती. अकबराच्या सरदारांनीं अहमदनगर १५२२ त घेऊन बहादूरशहास सालेरीस कैदेंत ठेविलें, चांदबिबी मरून गेली; व निजामशाहा दौलताबादेस पळून गेला. तेथेंहि अकबराच्या सरदारांनीं दुसऱ्या मूर्तिजाशहास शह देण्यास कमी केलें नाहीं. अशा वेळीं मालोजीनेंहि पुंडावा आरंभिलेला पाहून, त्याला आपल्या बाजूला ओढून घेणें दौलताबादच्या मुत्सद्यांस जरूर पडलें. जाधवरावांचें व मालोजीचें त्यांनीं सख्य करून दिलें, मालोजीचा मुलगा शहाजी यास जाधवरावाची मुलगी शके १५२५ च्या वैशाखमासीं अथवा जेष्ठ शुद्ध दशमीस (शिवप्रताप २४) म्हणजे इ. स. १६०४ च्या एप्रिल महिन्यांत देवविली व खुद्द मालोजीस पंचहजारी मनसवदाराचीं वस्त्रें लग्नाच्या आधीं त्याच वर्षाच्या चैत्र वद्य ५ स म्हणजे २६ मार्च १६०० त दिलीं. मालोजी ह्या वेळेपासून खराखुरा पातशाही मनसबदार झाला. फौजेच्या खर्चाकरितां त्याला कांहीं ठाणीं व किल्ले नेमून दिलेले होते (शिवदिग्विजय ४४). सध्यांचे पुणें, नाशीक, अहमदनगर व खानदेश इतक्या जिल्ह्यांतून हीं ठाणीं पसरलेलीं होतीं. पैकीं खानदेशांत १५२२ च्या आधींच अकबराचा थोडासा अंमल झालेला होता व पुणें, नाशिक ह्या जिल्ह्यांतलि डोंगराळ प्रदेशांत पुंडांनीं अस्वस्थता माजविली होती. नगरहि अकबराच्या ताब्यांतच होतें. सारांश, मालोजीला मिळालेली जहागीर बहुतेक मोंगलांच्या ताब्यांतलि प्रांतांतून किंवा प्रांताच्या सरहद्दीच्या शेजारीं अशीच होती. असली जहागीर जतन करण्यास मालोजी सारखाच उपद्व्यापी व पराक्रमी मनुष्य पाहिजे होता. मालोजीच्या पराक्रमांचा प्रताप आपल्या प्रांतांतून दृष्टोत्पत्तीस न येतां मोंगलांच्या प्रांतांतून दृग्गोचर व्हावा असा हेतु, ही असली जहागीर मालोजीला देण्यांत दौलताबाद येथील मलिकंबरादि मुत्सद्यांचा असावा हें स्पष्ट आहे. मोंगलांशीं झगडण्यांत मालोजीचें मलिकंबराला बरेंच साहाय्य झालें असावें असें दिसतें. उत्तरेस अशेर व बऱ्हाणपूर ह्या ठाण्यापासून दक्षिणेस पेडगांवांपर्यंत म्हणजे मोंगलांच्या हद्दीपासून विजापूरच्या आदिलशाहीच्या हद्दीपर्यंत मालोजीची जहागीर सैरावैरा पसरली असल्यामुळें, निजामशाहाच्या प्रत्येक लढाईंत मालोजीचा कांहींना कांहीं तरी हितसंबंध असे. कांहीं वऱ्हाडांतीलहि परगणे मालोजीच्या जहागिरींत होते म्हणजे खुजिस्ते बुनियाद अथवा दौलताबाद प्रांतांच्या भोंवतीं उत्तरेस,

पूर्वेस, व दक्षिणेस मालोजीची जहागीर पसरली होती. ही जहागीर मोंगलांच्या, विजापूरकरांच्या व पुंडांच्या तडाक्यांतून सुरक्षित ठेवणें मालोजीस प्राप्त होतें. ह्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेंत मालोजीचें बहुतेक आयुष्य गेलें व तींतच भोसल्यांच्या राज्यलक्ष्मीचा प्रथमोदय झाला. मालोजीच्या ह्या जहागिरीकडे ग्रांट डफादि इतिहासकारांचें लक्ष्य गेलेलें नाहीं. पुणें व सुपे हे दोन प्रांत मालोजीला जहागीर मिळाले एवढें सांगून ते स्वस्थ बसतात. त्यांना शिवदिग्विजयांतील यादीकडे दृष्टी फेकण्यास अवकाश झाला असता तर मालोजीच्या जहागिरीचें स्वरूप पृथक्करणांती त्यांच्या लक्ष्यांत निःसंशय आलें असतें. मालोजीला जहागीर शके १५२६ त मिळाली. तिचा उपभोग १५ वर्षें घेऊन तो शके १५४१ त वारला. कांकीं शके १५४१ त शहाजीला मनसबदारीचीं वस्त्रें मिळालीं असें, इतर अव्यवस्थित माहिती देतांना, मल्हार रामराव सांगतो.(मल्हार रामराव, चरित्र २१). वजिरीचीं वस्त्रें शहाजीस मिळालीं म्हणून मल्हारराव म्हणतो, परंतु १५४१ त मलिकंबर वजीर असल्यामुळें शहाजीस मनसबदारीचींच तेवढीं वस्त्रें मिळालीं असावीं हें उघड आहे. शहाजीचा जन्म शके १५१६ जयनाम संवत्सरीं चैत्र शुक्ल पंचमीस म्हणजे १८ मार्च १५९४ त झाला. तेव्हां शके १५४१ त तो २५ वर्षांचा असावा. शहाजीचें मलिकंबरापाशीं वजन बरेंच असावें असें बखरींतील लिहिण्यावरून व शहाजीच्या जहागिरीच्या स्वरूपावरून दिसतें. शके १५४२ त मलिकंबराचें व मोंगलांचें खानदेशाच्या उत्तर सरहद्दीवर युद्ध झालें त्यांत शहाजी प्रमुख होता. ( Grant Duff chap. II ). युद्धांत प्रमुखत्व मिळाल्यावर दरबारच्या मसलतीतहि शहाजीचें वजन अतोनात झालें. तें जाधवरावादि जुन्या सरदारांना साहेना. तेव्हां शके १५४३ त ती मंडळी मोंगलांना जाऊन मिळाली. शके १५४५ त शहाजीला जिजाबाईचे पोटीं प्रथम पुत्र संभाजी नामें झाला. शके १५४२ पासून शके १५४८ पर्यंत मलिकंबरी कारकीर्दींत शहाजीचीं पांच वर्षें मोठ्या थाटांत गेलीं. मलिकंबर व मूर्तजा निजामशहा हा शके १५४८ त वारल्यावर राज्यांत चतुर साबाजी व शहाजी हे दोघे मुत्सद्दी तेवढे कायते नामांकित असे उरले होते. मलिकंबराचा मुलगा फत्तेखान ह्याच्या मनांत आपल्याला वजिरी मिळावी असें होतें. जाधवरावादि मंडळीस शहाजीचा पूर्वीपासूनच द्वेष वाटत होता. दौलताबादचा शहा लहान असल्यामुळें शहाजीच्या हातांत राज्याचीं सर्व सूत्रें बहुतेक गेल्यासारखीं होतीं. तेव्हां ही सर्व मंडळी एक होऊन त्यांनीं शहाजीची दौलताबादेहून उचलबांगडी केली. दौलताबादकरांचें व मोंगलांचें युद्ध चाललेंच होतें. मोंगलांकडे फत्तेखानानें आंतून सूत्र बांधिलें व जाधवरावादि मंडळी तर राजरोस त्यांना कित्येक वर्षें आधींच जाऊन मिळाली होती. मोंगलांच्या सैन्यांपुढें सरकत सरकत शहाजी जुन्नर प्रातांत शिरला व आपली बायको जिजाऊ हीस तेथील स्वतंत्र अंमलदार श्रीनिवास म्हणून होता त्याच्या स्वाधीन करून, अहमदनगरच्या पश्चिमेकडील प्रांतांत जाऊन राहिला. ह्या गोष्टी शके १५४९ च्या प्रारंभीं घडल्या. मोंगल आंगावर चालून आले तेव्हां शहाजी नाशिकाच्या पश्चिमेकडील घाटानें कोंकणांत माहुली किल्ल्यापाशीं उतरून तेथून नाणें घाटानें जुन्नरास आला असावा

व रस्त्यांत जिजाबाई जाधवरावांच्या हातांत सांपडण्याचा प्रसंग येण्याचीं चिन्हें सडकून दिसलीं असावीं. परंतु एकंदरींत ती जाधवांच्या हातीं पडली नाहीं असें दिसतें. श्रीनिवासरावाचा व शहाजीचा स्नेह असल्यामुळें जिजाबाईला शहाजीनें शिवनेरीस ठेविलें. मोंगलांनीं माहुलीच्या किल्ल्याला वेढा दिला तो शके १५४९ दिला नसून पुढें दहा पांच वर्षांनीं दिलेला आहे. दौलताबादच्या निजामशाहाची वजिरी व पालकत्व करण्याचा शके १५४९ त शहाजीनें घाट घातला होता त्याचा हा असा विपरीत परिणाम झाला. दौलताबादची वजिरी करण्याचा प्रसंग शहाजीस दोनदां आला:—शके १५४९ त पहिल्यांदा व शके १५५५ त दुसऱ्यांदा. शके १५४९ तील वजिरीचा ग्रांट डफनें उल्लेख केला नाहीं. तसेंच शके १५५५ पर्यंत जिजाऊ जाधवांच्याकडे होती, म्हणून ग्रांट डफ म्हणतो ( Duff. chap. III ), त्यालाहि कांहीं आधार दिसत नाहीं. जुन्नरास अंमल श्रीनिवासरावाचा असल्यामुळें तेथें जाधवांचा रिघाव होणें कठिणच होतें. शिवाय, आपल्या वयाचीं पहिलीं पांच वर्षें शिवाजीनें शिवनेरीस घालविलीं म्हणून शिवदिग्विजयाच्या शेवटीं लिहिलें आहे ( शिवदिग्विजय, ४६९ ), त्या अर्थी शके १५४९ पासून शके १५५५ पर्यंत जिजाऊ जाधवांकडे नसून शहाजीच्या जहागिरींत शिवनेरीसच होती हें स्पष्ट आहे.

शके १५४१ पासून शके १५४९ पर्यंत शहाजीच्या हालचालींचा वृत्तांत कसाबसा थोडाबहुत दिला आहे. आतां शके १५४९ पासून शके १५५९ पर्यंत त्यानें काय केलें तेंहि बखरींच्या आधारानें सांगितलें पाहिजे. परंतु त्या वेळची हकीकत सांगतांना बखरकारांनीं जो घोटाळा केला आहे तो सांगतां पुरवत नाहीं. शहाजी, मलिकंबर, मुरार जगदेव व चतुर साबाजी ह्यांचीं नांवें पुनः पुन्हा उच्चारण्यापलीकडे बखरींतून जास्त व व्यवस्थित अशी माहिती यत्किंचित्हि दिलेली नाहीं. मलिकंबर शके १५४८ त वारला असून त्याचें नांव पुढें हे बखरनवीस कसे घेतात ह्याचेंच आश्चर्य वाटतें. परंतु ह्याचें फारसें आश्चर्य वाटावयास नको. कां कीं खुद्द शिवाजी महाराजांच्या जन्माची जी तीथ व जो दिवस ह्या लोकांनीं दिला आहे व जो आजपर्यंत खरा म्हणून धरला गेला आहे तो देखील बहुशः चुकला असावा असें वाटतें. मल्हार रामराव व शिवदिग्विजयाचा कर्ता हे शिवाजी शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे वैशाख शुद्ध २ गुरुवारीं रोहिणी नक्षत्रीं जन्मला म्हणून लिहितात. परंतु शके १५४९ च्या वैशाख शुद्ध द्वितीयेस गुरुवार नसून शनिवार आहे, ह्या अर्थी ह्या मित्तीवर विश्वास ठेववत नाहीं. प्रो० फारेस्ट यांनीं छापिलेल्या रायरी येथील बखरींत शिवाजीचा जन्मशक १५४८ म्हणून दिला आहे. रायरी येथील बखरीच्या मजजवळ असलेल्या मराठी प्रतींत शिवाजीचा जन्म शके १५४८ क्षयनाम संवत्सर वैशाख शुद्ध पंचमी चंद्रवार असा दिला आहे. परंतु शके १५४८ च्या वैशाख शुद्ध पंचमीस चंद्रवार नाहीं; तेव्हां हीहि मित्ती विश्वसनीय नव्हे, असें म्हणणें भाग पडतें. काव्येतिहाससंग्रहकारांकडे १८०१ सालीं धारेहून रा. काशिनाथ कृष्ण लेले यांनीं पाठविलेल्या एका जंत्रींत शिवाजीचा जन्मशक १५४९ प्रभवनाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी सोमवार म्हणून दिला

आहे. शके १५४९ च्या वैशाख शुद्ध पंचमीस सोमवार सरतां सरतां रोहिणी नक्षत्र असावें असें वाटतें. तेव्हां ह्या शेवटल्या मित्तीस म्हणजे शके १५४९ प्रभव संवत्सर वैशाख शुद्ध पंचमी सोमवार रोहिणी नक्षत्रावर शिवाजीचा जन्म झाला हें विश्वसनीय दिसतें. १५४९ च्या वैशाख शुद्ध पंचमीला इसवी सन १६२७ च्या एप्रिलची १० तारीख होती. शिवाजी १६२७ च्या मेंत जन्मला म्हणून डफ म्हणतो तें अर्थात् बराबर नाहीं. मल्हार रामरावानें व शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवार ही तीथ कोणत्या हेतूनें दिली हें पाहणें थोडेसे अगत्याचें आहे. राजा म्हटला म्हणजे त्याला जन्मस्थ बहुत ग्रह उच्चीचे असले पाहिजेत ही समजूत फार पुरातन आहे. वैशाख शुद्ध पंचमीस सोमवारीं तसा कांहीं योग नसल्यामुळें वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवार हीच तीथ पसंत करावी लागली. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें तीन श्लोक दिले आहेत व त्या तिन्ही श्लोकांत वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवार ही अक्षरें स्पष्ट दिलीं आहेत. यद्यपि त्यानें व मल्हार रामरावाने बनावट तिथी देण्यास कमी केलें नाहीं, तत्रापि बनावट पुरावा जितका बेमालूम करावा तितका करण्याचें त्यांना किंवा त्यांनी ज्या आधारावरून उतारा घेतला त्या मूळ श्लोककारांना साधलें नाहीं. बनावट पुरावा तयार करणाऱ्यांना आपलें काम बेमालूम करण्याइतकें शास्त्रज्ञान प्रायः नसतें हें तरी मनुष्यमात्राचें सुदैवच समजलें पाहिजे ! बनावट तिथी देणाऱ्या मूळ श्लोककारांच्या किंवा टिप्पणकारांच्या मजकुरांत ह्या बखरनविसांनीं आपलें आणीक शहाणपण मिरविलें नाहीं, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे !

१५४९ पासून १५५९ पर्यंत शहाजीचा इतिहास मराठी बखरींत सांपडण्यासारखा नसून तो प्रायः मुसलमानी तवारिखांतून येणाऱ्या उल्लेखांवरूनच रचिला पाहिजे. काव्येतिहाससंग्रहांत ४३८ नंबरची यादी शहाजीची कैफियत म्हणून दिलेली आहे. परंतु तींत शहाजीच्या व शिवाजीच्या नांवांचा उल्लेख अधूनमधून मात्र केला असून त्यांच्यासंबंधीं विशेष माहिती फारशी दिलेली नाहीं. तींत शहाजहान व अवरंगजेब यांच्या पराक्रमांचें त्रोटक वर्णन असल्यामुळें ती काफीखानाच्या इतिहासाचा सारांश असावा असें वाटतें. शिवाजीचा इतिहास देणाऱ्या जशा दहा पांच छापलेल्या व न छापलेल्या बखरी उपलब्ध आहेत, तशा शहाजीचा वृत्तांत देणाऱ्या बखरी मुळींच नसल्यामुळें शहाजीच्या संबंधीं ठाम अशीं विधानें दहापांचाहून जास्त करतां येत नाहींत. १५४९ च्या पुढें शहाजी बंडखोरांत निवडला गेल्यामुळें, त्याच्या अमलाखालीं ज्या प्रांतांत तो असे त्या प्रांताला सोडून जास्त प्रांत नव्हता हें स्पष्टच आहे. अशेरीपासून पेडगांवापर्यंत त्याची जहागीर सैरावैरा पसरलेली होती. तींतून सह्याद्रीच्या लगत्याचे प्रांत, विशेषतः पुणें व सुपे हे प्रांत, १५४९ च्या पुढें त्याच्या हातांत राहिलें असावे. जहागीला तोडण्यांत फत्तेखानानें मोठेसें शहाणपण केलें असें नाहीं. त्या तोडण्यानें निजामशाहीचा एक वाली गेला व सरहद्दीवरील मुलखांवर स्वाऱ्या करण्यास मोंगलांस उत्तम सोय झाली. शहाजी ह्यापुढें बहुतेक स्वतंत्र असाच राहूं लागला व त्याचा कित्ता दौलताबादच्या इतर सरदारांनीहि गिरविला. शिद्दी रेहानानें सोलापूर, शहाजीनें भीमगड, श्रीनिवासरावानें जुन्नर, खिद्दी साया सैफखानानें तळकोंकण

व शिद्दी अंबरानें जंजिरा, असे प्रांत निरनिराळ्या किल्लेदारांनीं व जमीदारांनीं वाटून घेतले. ( का. पत्रें व यादी ४३८ ). १५५० त शहाजहानानें दौलताबादेवर स्वतः स्वारी केली, त्या वेळीं शहाजीनें खानजहान लोदीचा पक्ष घेतला. पुढें १५५१ त लोदीचा पक्ष दुर्बळ वाटल्यावरून शहाजी शहाजहानाचा बेत्रिसहजारी मनसबदार झाला. ह्या सुमारास विजापूरकरांचा व शहाजहानाचा निजामशाही वाटून घेण्याचा करार झाला, त्यांत शहाजींचें आंग होतें. १५५५ त मुरार जगदेव व शहाजी ह्यांनीं दौलताबादेवर म्हणजे मोंगलावर स्वारी केली; ह्याच स्वारींत कोरेगांवानजीक तुळापुरीं त्यांना सोमवारीं सूर्यग्रहण पडलें. ह्या पर्वकालाची तीथ मल्हार रामरावानें शके १५५५ श्रीमुखनाम संवत्सर भाद्रपद वद्य ३० सोमवार म्हणून दिली आहे व ती बरोबर आहे. १६३३ च्या २३ सप्टेंबरीं सोमवारीं सूर्यग्रहण हिंदुस्थानांत दिसत होतें. १५५४ च्या फाल्गुनांत दौलताबाद मोहोबतखानाच्या हातीं पडल्यामुळें शहाजी व मुरारपंत यांनीं फत्तेखानाच्या ऐवजीं मोंगलांच्या विरुद्ध खटपट चालविली. ह्याच खटपटींत असतां वर उल्लेख केलेलें ग्रहण तुळापुरास त्यांस पडलें. १५५६ त मोहोबतखान व सुलतान सुजा पातशहाच्या बोलण्यावरून दिल्लीस गेले व दौलताबादचा मुलूख मोकळा पडला. ही संधि साधून शहाजीनें मूर्तजा नांवाचा निजामशाही वंशांतील कोणी मुलगा कोंकणांत श्रीवर्धनास जाऊन राहिला होता त्यास भीमगडीं तख्तावर बसविलें व पुणें, औरंगाबाद, जुन्नर, अहमदनगर, नाशिक वगैरे बालेघाटापर्यंत प्रांत पुनः निजामशाहीच्या अमलाखालीं आणिले. शिद्दी साया सैफखान भिवंडीस, सिद्दी अंबर जंजिऱ्यास व श्रीनिवासराव जुन्नरास पुंडावा करून स्वतंत्र राहूं लागले होते त्या सर्वांस शहाजीनें मोडून काढिलें व निजामशाही सत्ता पुन्हा सुरळीत चालू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं ( का. पत्रें व यादी ४३८ ). श्रीनिवासराव ह्याला धरण्याच्या वेळीं शहाजीनें जिजाबाई व शिवाजी ह्यांस शिवनेरीहून काढून गांडापुरानजीक वैजापूर येथें नेऊन ठेविलें होतें. शके १५५५ त दौलताबाद घेतल्यावर निजामशाही बुडाली असें शहाजहान पातशहास वाटत होतें. परंतु एका वर्षाच्या आंत दौलताबादेभोंवतालचा प्रांत शहाजीनें काबीज केला व एका नव्या सुलतानाची भिमगडीं स्थापना केली. ही वार्ता ऐकून खानदौरान व खानजमान ह्या दोन सरदारांस शहाजहानानें दक्षणचा बंदोबस्त करण्यास पाठवून दिलें, व त्यांच्या पाठोपाठ आपणहि येऊन दाखल झाला. १५५७ पासून १५५९ पर्यंत निजामशाहीचा कड घेऊन भांडणाऱ्या शहाजीला व विजापूरच्या बाजूनें लढणाऱ्या रणदुल्लाखानाला खानजमान व खानदौरान ह्यांनीं बराच त्रास दिला. शेवटीं शहाजहानाचा व विजापूरच्या महमद आदिलशहाचा तह ठरला, शहाजीला विजापूरकरांच्या आश्रयास जावें लागलें व जिच्या प्रीत्यर्थ शहाजीनें पांच वर्षें इतकी मेहनत घेतली ती बहिरी निजामशाही कायमची लुप्त झाली. निजामशाही मुलखापैकीं भीमेच्या दक्षणचा सर्व मुलूख व वसईपासून कल्याणपर्यंतचा कोंकणप्रांत महमद आदिलशहाच्या वाट्यास आला. आणि बाकीचा सर्व बहिरी निजामशाही मुलूख मोंगलांच्या ताब्यांत गेला. मालोजीनें शके १५२६ त दौलताबादच्या दरबारीं जी मनसब व जहागीर पैदा केली ती

१५५९ त शहाजीनें मोठ्या मिनतवारीनें व साहसानें घालविली. ही जहागीर गेल्यानें शहाजीचें वजन यत्किंचितहि कमी झालें नाहीं. त्याचें शौर्य, त्याचें धोरण व त्याचें सामर्थ्य विजापूरच्या मुत्सद्यांस माहीत झालें होतें. त्यांनीं त्याच्याकडे पुणे व सुपें हे दोन प्रांत पहिल्याप्रमाणेंच ठेवून दिले व शिवाय दक्षिण कर्नाटकांतील प्रांतांत अंमल करवेल तितका करावा असा त्याला हुकूम केला. भीमेच्या उत्तरेकडील प्रांत मोंगलाकडे गेल्यामुळें शहाजीचें जें नुकसान झालें होतें तें कर्नाटकांतले कांहीं नवीन प्रांत काबीज करून त्यानें भरून काढिलें. ह्या कर्नाटकांतील मोहिमांसंबंधानें कनकगिरीच्या विजयराघवाचें, अप्पाखानाचें, शहाजीचा वडील मुलगा संभाजी याचें व अफझुलखानाचें वगैरे व्यक्तींचीं नांवें बखरकार देतात, परंतु ह्या उल्लेखांपासून व्यवस्थित विधानांचा उद्गम संभवत नसल्यामुळें व प्रस्तुत स्थळीं विस्तृत इतिहास लिहिण्याचा मनोदय नसून बखरींची परीक्षाच करण्याचा हेतु असल्यामुळें शहाजीच्या १५५९ च्या पुढील कर्नाटकांतील आयुष्यक्रमाचा विचार करण्याचें येथें प्रयोजन नाहीं. १५५९ त विजापूरच्या दरबारीं गेल्यापासून तों १५७१ त बाजीराव घोरपड्यानें दगा करी तोंपर्यंत बारा वर्षें शहाजी विजापूरीं व कर्नाटकांत काय करीत होता ह्याचा बिलकूल पत्ता नाहीं. तसेंच १५७१ पासून १५८४ पर्यंतचा शहाजीचा इतिहास बहुतेक अज्ञातच आहे. सारांश १५५९ पासून १५८४ पर्यंतचा शहाजीचा वृत्तांत यथास्थित बसविण्यास बखरींचा कांहींएक उपयोग नाहीं. विजापूरच्या इतिहासांत थोडीबहुत माहिती सांपडते; परंतु ती इतकी त्रोटक व तुटक आहे कीं खुद्द कर्नाटकांतील अक्कलकोटपासून तंजावरपर्यंतच्या मुलखांतील जुन्या पेढीवाल्यांचीं, संस्थानिकांचीं, पाळेगारांचीं व जमीनदारांचीं दप्तरें नीट तपासून त्यांतील माहितीच्या आधारें ही उणीव भरून काढिली पाहिजे. परंतु हा प्रयत्न फारच खर्चाचा असल्यामुळें व्यक्तिमात्राच्या हातून हें काम झेंपण्यासारखें नाहीं. ह्या संबंधानें भागानगर येथील कुतुबशाहीचा व विजयानगर येथील हिंदुराजांचा व त्यांच्या मांडलिकांचाहि इतिहास नव्यानेंच शोधून काढावयाचा आहे. विजयानगर येथील राजांची नाममालिका ताम्रपटांवरून लागलेली आहे, परंतु त्या राजांच्या कारकीर्दींतील प्रसंगांची माहिती बहुतेक शून्य आहे. सारांश, तालीकोटच्या लढाईपासून म्हणजे १४८६ पासून म्हणजे मालोजीच्या उमेदवारीपासून तों १५५९ पर्यंतचीं इतिहासाचीं साधनें अद्याप हुडकून काढावयाचीं आहेत. तीं कमजास्त प्रमाणानें सापडण्यासारखीं आहेत, हें मला सांपडलेल्या सोळाव्या शतकांतील कांहीं लेखांवरून संभवनीय दिसतें.

येथपर्यंत शहाजीचा इतिहास बखरींतून कितपत सांपडण्यासारखा आहे ह्या गोष्टीची मीमांसा झाली. ह्या मीमांसेपासून इतकें निष्पन्न झालें कीं मलिकंबराच्या पाठीमागें निजामशाहीची पडती बाजू सावरण्यास दौलताबादेस शहाजीखेरीज दुसरा कोणी सरदार समर्थ नव्हता. त्याचा पराभव जेव्हां होई तेव्हां निजामशाही बुडाल्यासारखें दिसे व त्याचा जय होई तेव्हां तरल्यासारखी भासे. म्हणजे शहाजी व निजामशाही ह्या दोन वस्तूंचें १५४८ पासून १५५९ पर्यंत केवळ तादात्म्य झालेलें होतें. अर्थात् ह्या बारा वर्षांत शहाजी म्हणजेच निजामशाही होती. शहाजीचें सामर्थ्य शहाजनाच्या मानानें फार

अल्प होतें. व आदिलशाहीच्या मानानेंहि फारसें बरोबरीचें नव्हतें. तरी ह्या दोन्ही पातशहांना दक्षिणेंतील व्यवस्था लावतांना शहाजीचा विचार करावा लागेल हे तत्कालीन इतिहासावरून स्पष्ट आहे. १५५८ त शहाजहानाचा व महमदशहाचा तह झाला त्या वेळीं यद्यपि शहाजीजवळ वरपांगी टीचभरहि जागा राहिली नव्हती, तत्रापि त्याच्याजवळ पंचवीस तीस हजार सैन्य असल्यामुळें शहाजहानाला व महमदशहाला दोघांनाहि त्याची भीति वाटत होती. निजामशाहींतलि प्रांतांपैकीं महमदशहाच्या वाट्यास आलेल्या प्रांतांतील पुणें व सुपें हे प्रांत वस्तुतः शहाजीच्या ताब्यांत होते. १५५९ च्या पुढें शहाजीनें मनांत आणिलें असतें व आदिलशहांनीं त्याला आश्रय दिला नसता तर आदिलशाही प्रांतांतील कांहीं प्रांत बळकावून बसण्याचें सामर्थ्य त्याच्या आंगीं नव्हतें असें नाहीं. परंतु शहाजीचा स्वभाव एकदेशीय व उतावळा नसून, अव्यवस्थित पुंडपणा करण्यापेक्षां कोणत्याहि पादशहाची व्यवस्थित मनसबदारी करणें व अबूनें राहणें त्याला पसंत पडलें. शिवाय आदिलशाहाच्या दरबारीं शहाजीचें वजन निजामशाही दरबारांतल्या प्रमाणेंच अतोनात होण्याचा निश्चित संभव होता. निजामशाहींत असतां जाधवांच्या मत्सर्याचा विषय भोसले होऊन बसले. आदिलशाहींत गेल्यावर घोरपड्यांच्या व तत्रस्थ कांहीं मुसलमान सरदारांच्या द्वेषास शहाजी पात्र झाला. ह्यावरून असें दिसतें कीं जेथें तेथें शहाजी जाई तेथें तेथें त्याचें वजन अतोनात वाढे. हा सर्व प्रभाव त्याच्या जवळील सैन्यबलाचा होय. शिवाजीच्या उदयासंबंधीं विचार करतांना शहाजीच्या ह्या उच्च स्थितीचाहि अंदाज करून घेणें अगत्याचें आहे.

शके १५४९ पासून १५६२ पर्यंत शिवाजी कोठकोठें रहात होता ह्याचा तपशील निश्चयानें सांगतां येत नाहीं. १५४९ पासून १५५२ पर्यंत शिवाजी शिवनेरीस होता. १५५२ पासून १५५५ पर्यंत गांडापूर, वैजापूर, माहुली किल्ला, वगैरे ठिकाणीं तो होता. १५५५ पासून १५५९ पर्यंत तो शिवनेरीस होता. १५५९ पासून १५६२ पर्यंत पुण्यास दादोजी कोंडदेवापाशीं होता. पुण्यास असतांना शके १५६२ विक्रम संवत्सरीं वैशाख शुद्ध पंचमीस म्हणजे १६४० च्या १६ एप्रिलास शिवाजीचा लग्नसंबंध शिर्क्यांच्या सईबाईशीं झाला. सदर शिर्क्यांचें ठिकाण पुणें प्रांतांत मूळचें आहे. १५६३ पासून १५६५ पर्यंत शिवाजी पुन्हां विजापुरास गेला असावा. त्याच वेळीं पातशहाला मुजरा न करणें कसायांची खोड मोडणें, गोब्राह्मणांचा विशेष आदर करणें, वगैरे बालिश परंतु स्तुत्य व उद्दाम कृत्यांच्या योगें शिवाजीचा मूळ स्वभाव दृष्टोत्पत्तीस येऊं लागला. कुरणूस न करितां शिवाजीनें रामराम केला, म्हणून कांहीं बखरकार लिहितात. परंतु रामराम करण्याचा प्रघात रामदासांनीं पुढें पाडिला, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे रामरामाच्या ऐवजीं शिवाजीनें जोहार केला असावा असें वाटतें. ह्या संबंधानें मुजरा हा शब्द शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें वापरला आहे तो योग्य आहे. विजापुरास असतांना शिवाजीचें दुसरें लग्न पादशहाच्या आग्रहावरून सोयराबाईशीं झालें. सभासदी बखरीच्या चवथ्या परिशिष्टांत ( पृष्ठ ८७ ) सईबाई निंबाळकरांची कन्या होती व तिच्याशीं शिवाजीचा

विवाह १५५९ त झाला व सोयराबाई शिर्क्यांची मुलगी होती, अशीं विधानें ग्रांट डफच्या आधारावर ( मुंबई प्रत, पृष्ठ १३३ ) केलीं आहेत, तीं कालविपर्यासाच्या बाजूनें तरी दुष्ट आहेत ह्यांत संशय नाहीं. इ० स० १६३७ त म्हणजे शके १५५९ त शिवाजीचा सईबाईशीं विवाह झाला हें ग्रांट डफ, मल्हार रामरावाच्या आधारावर लिहितो ( मल्हाररावकृत चरित्र पृष्ठ २८ ). सईबाई शिर्क्यांची कन्या होती असें मल्हारराव म्हणतो, तें डफला पसंत नव्हतें. बाकी शिवदिग्विजयांत सईबाई शिर्क्यांच्या कुलांतील होती असें पुनः पुनः म्हटलें आहे ( शिवदिग्विजय, पृष्ठ ९९, २०५ ) व मल्हाररावांचेंहि तेंच म्हणणें आहे. ह्यावरून ग्रांट-डफ चुकीचा ठरतो. ग्रांट डफला एखादें अस्सल पत्र सांपडलें असल्यास ह्या बहुमताचा कांहींच उपयोग नाहीं, हें मला कबूल आहे. परंतु ग्रांट डफची बहुतेक माहिती बखरींवरून रचलेली आहे. प्रस्तुत प्रश्नासंबंधींच्या माहितीचा विशिष्ट आधार त्यानें दिला नाहीं, व शिवदिग्विजय हा ग्रंथ त्याला माहीत नव्हता, ह्या गोष्टी लक्षांत घेतल्या असतां माझेंच म्हणणें जास्त विश्वसनीय ठरतें. ह्या ठिकाणीं कोणता आधार विश्वसनीय व कोणता आधार अविश्वसनीय ह्याविषयीं वाद उत्पन्न होण्याचा संभव आहे. तेव्हां ऐतिहासिक प्रमाण व अप्रमाण ह्यासंबंधीं माझीं मतें काय आहेत तें स्पष्ट सांगितल्यास पुष्कळ उलगडा होईल असें वाटतें. ( १ ) समकालीन व्यक्तींनीं समकालीन प्रसंग साक्षात् घडत असतांना परमार्थानें लिहिलेलें किंवा लिहविलेलें अस्सल पत्र किंवा त्याची नक्कल सर्वांशीं जातीनें प्रमाण होय. ( २ ) समकालीन व्यक्तींनीं आपल्या हयातींतील गतकालीन प्रसंगासंबंधीं लिहिलेले लेख किंवा उल्लेख पहिल्या वर्गांतील प्रमाणांच्या प्रातिकूल्याच्या अभावीं जातीनें प्रमाण होत. ( ३ ) विषमकालीन व्यक्तींनीं गतकालासंबंधीं लिहिलेले लेख ( अ ) पंचायतीपुढें प्रामाणिक साक्षीच्या रूपानें दिलेले असल्यास आणि ( ब ) बखरी म्हणून योग्य आधारानें लिहिले असल्यास, केवळ स्मृतीवर भरंवसा ठेवून लिहिलेले नसल्यास, व आपल्या कामाचें योग्य शिक्षण मिळून लिहिलेले असल्यास जातीनें प्रमाण समजावे. ह्या तीन प्रकारच्या लेखांखेरीज करून बाकी सर्व लेख कमजास्त प्रमाणानें अविश्वसनीय होत. प्रस्तुत ज्यांची परीक्षा चालली आहे त्या बखरी ह्या तिन्ही वर्गांतील कोणत्याहि एका वर्गांत अंतर्भूत होत नाहींत. सभासदी बखर केवळ स्मृतीवर हवाला ठेवून लिहिलेली आहे. मल्हार रामरावानें जुन्या टिपणांचा व अस्सल पत्रांचा उपयोग केला आहे. परंतु योग्य शिक्षण त्याला मिळालें नसल्यामुळें याची बखर प्रमाणभूत समजणें योग्य नाहीं. शिवदिग्विजयांत जुन्या टिपणांचा व पत्रांचा उपयोग केलेला दिसतो व मल्हाररामरावांच्या बखरींतल्यापेक्षां ऐकीव व लेखी अशी जुनी माहिती तींत बरीच सांपडते. परंतु कर्त्याला योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें तिचें प्रामाण्य मल्हार रामरावाच्या बखरीहून जास्त धरतां येत नाहीं. येणेंप्रमाणें ह्या तिन्ही बखरींचें प्रामाण्य अव्वल प्रतीचें नाहीं; म्हणजे ह्या बखरी जातीनें प्रमाण नाहींत हें उघड आहे. ह्या बखरी जातीनें प्रमाण नाहींत ह्या विधानाची जास्त फोड करून सांगितली पाहिजे. जो लेख जातीनें प्रमाण असेल त्यांतील मजकूर ( १ ) एकाच ऐतिहासिक

प्रसंगाला अनुलक्षून असेल. किंवा ( २ ) अनेक प्रसंगांच्या संततीला अनुलक्षून असेल. प्रथमपक्षीं प्रसंगाचा काल व स्वतः प्रसंग निश्चित झालेला असतो व द्वितीय पक्षींहि प्रसंग-संततीच्या कालाचें पौर्वापर्य व स्वतः प्रसंग निश्चित झालेले असतात. जातीनें प्रमाण जे असतात, त्यांत कालाचें पौर्वापर्य निश्चित असल्यामुळें प्रसंगाची संततीहि निश्चितच असते. हा निश्चितपणा बखरींतील मजकुरासंबंधीं खात्रीनें करतां येत नाहीं, इतकेंच नव्हें तर, प्रसंगाचें वर्णनहि जसा तो घडला असेल तसा असेलच असेंहि सांगतां येत नाहीं. दहा पांच वर्षांत घडून येणाऱ्या प्रसंगांची गफलत ह्या बखरींत इतकी कांहीं केलेली आढळते कीं, बखरींतील प्रसंगाची संतती व पौर्वापर्य जसें बखरींत नमूद केलें असेल तसें हटकून असेलच असा निश्चय नसतो. ह्या बखरी व्यक्तिशः अविश्वसनीय आहेतच; परंतु समुच्चयानें किंवा बहुमतानेंहि त्यांना विश्वसनीय धरतां येत नाहीं. मराठी बखरींना मुसलमानी तवारिखांचीं प्रत्यंतरें देऊन मग प्रसंगांची निश्चितता खात्रीनें सांगतां येईल असाहि भाग नाहीं. कां कीं, मुसलमानी तवारिखा मराठी बखरींच्याहून जास्त विश्वसनीय आहेत असें नाहीं. कारण ह्या तवारिखा मूळ प्रसंग होऊन बऱ्याच कालानें लिहिलेल्या असून, लेखकाच्या समकालीन व्यक्तींच्या तोंडून मिळविलेल्या माहितीवरून किंवा बखरीवरूनच लिहिल्या गेल्या आहेत. तेव्हां मुसलमानी तवारिखांच्या प्रत्यंतर पुराव्यानें बखरींतील अमूक मजकूर खरा आहे असें विधान करणेंहि धोक्याचेंच आहे. तात्पर्य, व्यक्तिशः, समुच्चयानें, बहुमतानें किंवा तवारिखांच्या पुराव्यानें देखील बखरींतील मजकुराचें प्रामाण्य ठरणें कठीण आहे. हे चारहि प्रकारचे पुरावे बखरींतील मजकुराच्या प्रामाण्याला जर लागू पडत नाहींत, तर मग बखरींतील मजकुराचा खरेखोटेपणा ठरवावयाचा तरी कसा, असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं, मराठी, पारशी, कानडी, इंग्रजी व पोर्तुगीज, अस्सल पत्रें, त्या कालीं लिहिलेलीं अशीं, जर सांपडलीं तरच बखरींतील मजकुराचा खरेखोटेपणा ठरवितां येईल. अन्यथा हें काम मनाजोगतें व निश्चयात्मक होणार नाहीं. अशीं अस्सल पत्रें आजपर्यंत फारच थोडीं उपलब्ध झालीं आहेत. शहाजहानानें व औरंगझेबानें शहाजीस व शिवाजीस पाठविलेलीं पत्रें, सुरत येथील दप्तर, व अवांतर पांच चार पत्रें एवढाच कायतो अस्सल पुरावा आजपर्यंत मिळाला आहे. ह्या अस्सल पुराव्याच्या जोरावर ग्रांट डफनें शिवाजीच्या चरित्रांतील कांहीं प्रसंगांच्या कालाचा व प्रसंगांच्या मजकुराचा निश्चय करून टाकला आहे. बाकीचा बहुतेक सर्व मजकूर बखरींच्या आधारावर व काफीखानाच्या प्रत्यंतर पुराव्यावर भिस्त ठेवून रचिला आहे. शिवाजीच्या मराठी इतिहासकारांना तर हीं अस्सल पत्रेंहि मिळालेलीं नाहींत. त्यांनीं ग्रांट डफवर सर्व भिस्त ठेवून आपला कार्यभाग उरकून घेतला आहे. असो. तेव्हां ह्या कम-अस्सल बखरींच्या मालिकेंत ग्रांट डफला व त्याच्या अनुयायांनाहि गोंवणें जरूर आहे. येणेंप्रमाणें हीं अस्सल पत्रें फारच थोडीं असून त्यांचा उपयोग शिवाजीचा व औरंगझेबाचा संबंध दाखविण्यापुरताच असल्यामुळें व नवीन पत्रें अद्याप बाहेर यावयाला अवकाश असल्यामुळें, बखरींतील बऱ्याच मजकुराच्या सत्यासत्यतेची कसोटी आपल्याजवळ नाहीं.

तेव्हां प्रकृत स्थळीं निव्वळ ह्या बखरींतून जेवढें निष्पन्न होईल तेवढ्यावरच निर्वाह करून घेणें भाग आहे. अस्सल पत्रांसारख्या बहिःप्रमाणांच्या अभावीं ही निष्पत्ति अंतःप्रमाणांवरून थोडीच व्हावी असें वाटतें. बखरींतील मजकुराच्या सत्यासत्यतेचा अंतःप्रमाणांवरून निर्णय करण्यापूर्वी एक मोठें संकट आड येतें. तें हें कीं,बखरींत लिहिलेल्या प्रत्येक गोष्टीचा, संदिग्ध शब्दाचा व मित्तीचा शेवटपर्यंत छडा लावीत गेलें पाहिजे. सभासदी बखर, मल्हाररावाची बखर, शिवदिग्विजय व बाकीच्या बखरी, ह्या सर्वांत जेवढा म्हणून मजकूर आला आहे, तेवढा सगळा विचारांत घेतला पाहिजे; त्यांतील एक ओळही सोडून देतां कामा नये. हा सगळा मजकूर विचारांत घेतल्यावर, प्रथम कालानुक्रमाप्रमाणें त्या मजकुराचें वर्गीकरण केलें पाहिजे. मुख्य संकट जें येतें तें हें कालानुक्रमवार वर्गीकरण करण्यांतच येतें. वर्गीकरण झाल्यावर त्या त्या प्रसंगासंबंधींच्या मजकुराचे निरनिराळे पाठ, त्यांतील कमजास्त विशेषनामें हीं सर्व पाहून मग त्या प्रसंगासंबंधीचा मजकूर कांहीं एका अंशानें ग्राह्य धरिला पाहिजे. बहिःप्रमाणांच्या अभावीं निव्वळ अंतःप्रमाणांवरून बखरींतील बहुतेक मजकुरावर विश्वास अंशमात्रानेंच ठेवितां येईल, सर्वांशीं किंवा बव्हंशीं ठेवितां येणार नाहीं. ह्या अल्पांशानें विश्वसनीय मजकुराला बहिःप्रमाणांचा दुजोरा मिळाला म्हणजे त्याजवर पूर्णपणें विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. असो. शिवाजीच्या लग्नासंबंधीं विचार चालला असतांना हा वाद मध्येंच उपस्थित झाला. शिवाजीला [ १ ] सईबाई [ २ ] सोयराबाई [ ३ ] पुतळाबाई, वगैरे चार बायका होत्या म्हणून ग्रांट डफ म्हणतो [डफ १३३]. सईबाई, निंबाळकरांची व सोयराबाई शिरक्यांची मुलगी होती असें बखरकारांच्या विरुद्ध त्याचें म्हणणें आहे. चवथ्या बायकोचें नांव त्याला माहीत नव्हतें. तें नांव कदाचित् सगुणाबाई असावें [ श्रीरामदास स्वामी यांचें चरित्र प्रकरण ५ ]. शिवाजीस तीन मुख्य स्त्रिया व दोन उपस्त्रिया होत्या असें रामदासाच्या चरित्रावरून दिसते [ कित्ता ]. सईबाईखेरीज शिवाजीला इतर सहा बायका होत्या म्हणून सभासद म्हणतो [सभासदी बखर ५६]. सईबाई निंबाळकरांची कन्या [ सभासदी बखर ९ ]. व सोयराबाई मोहित्यांची कन्या [ सभासद ५६ ] होती असें सभासद लिहितो. सभासदी बखरीच्या चवथ्या परिशिष्टांत सोयराबाई शिरक्यांची कन्या होती म्हणून डफच्या आधारावर विधान केलें आहे. सईबाई मोहित्यांची कन्या म्हणून चित्रगुप्त म्हणतो [ चित्रगुप्त ८९ ]. येणेंप्रमाणें शिवाजीच्या घरांतील माहिती बिनचूक अशी फारच थोडी आहे व जी कांहीं थोडीबहुत उपलब्ध आहे ती सर्व किंवा अंशतः खरी आहे असेंहि म्हणवत नाहीं. अमूक एका बखरींतील मजकूर खरा आहे असेंहि निश्चयानें सांगतां येत नाहीं व खोटा आहे असेंहि बिनधोक म्हणतां येत नाहीं. सारांश, या बखरींच्या आधारांवर निश्चयात्मक असें विधान कांहींच करतां येत नाहीं; प्रत्येक गोष्टीविषयीं संदेहवृत्तीचाच परिपाक विशेष होतो व आजपर्यंत जे शिवाजीचे वृत्तांत आपण वाचिलेले आहेत ते फक्त कल्पित कथांच्यापेक्षां जास्त विश्वसनीय आहेत हें पाहून इतर अस्सल पुराव्याची व रचनेची अपेक्षा उत्पन्न होते. जोंपर्यंत अस्सल पुराव्याचीं साधनें उपलब्ध झालीं नाहींत तोंपर्यंत ह्या बखरींचा उपयोग

शंकास्थानें उत्पन्न करण्याचाच तेवढा होण्यासारखा आहे; कोणतीहि एखादी नवी बखर सांपडली व ती वर सांगितलेल्या तीन अस्सल वर्गांपैकीं नसली म्हणजे शंकांची मात्र जास्त जोड होण्याचा अवश्य संभव असतो. शिवाजीच्या गृहस्थितीबद्दल शंका काय काय उद्भवतात ह्याचा प्रपंच वर केला आहे. आतां शके १५६५ पासून १६०२ पर्यंतच्या शिवाजीच्या चरित्रासंबंधीं बखरींतलि एक दोन शंकास्थानें काढून दाखवून हें प्रकरण आटोपतें घेतों.

पहिलें व दुसरें शंकास्थान निरनिराळ्या बखरींतील मजकुराच्या अनुक्रमासंबंधानें आहे. हीं शंकास्थानें वाचकांच्या स्पष्ट ध्यानांत यावीं म्हणून प्रत्येक बखरींतलि मजकुराच्या अनुक्रमाचे तक्ते खालीं देतों व नंतर त्यांतलि संगती व विसंगती ह्याबद्दल दोन शब्द लिहितों.

---

# [ १ ] शिवदिग्विजयांतील मजकुराचा अनुक्रम.

| पृष्ठ. | शक. | प्रसंग. |
|---|---|---|
| ११४–११८ | १५६२ | शिवाजी रायगड घेतो |
| ११९ | | बाजी मोहित्याचा पाडाव |
| १२० | | फिरंगोजी नरसाळा चाकण घेतो |
| १२१ | | शिवाजी पुरंदर घेतो |
| १२३ | | माणकोजी दहा तोंडे शिद्दी बिलालापासून विसापूरचा किल्ला घेतो |
| १२३–१२८ | | पठाण लोक चाकरीस येतात |
| १२८–१३२ | १५६२ | मोऱ्यांचा पाडाव |
| १३२ | | प्रतापगडस्थापन |
| १३३–१४७ | | शहाजीचा बंदिवास |
| १४७ | | रणदुल्लाखान रहिमतपुरास मरतो |
| १४८ | | शिवाजी तळाघोसाळा घेतो |
| १४८–१५४ | | किल्ल्यांची याद |
| १५५ | | भवानी तरवारीची कथा |
| १५६ | १५७० | राजापूर घेतो |
| १५७–१७१ | १५८१ | अफजुलखान प्रकरण |

| | | |
|---|---|---|
| १७२–१७३ | | बाळाजी आवजी महाराजांच्या चाकरीस रहातो |
| १७४ | | शिवाजी मालवण बांधतो |
| १७५ | | शृंगारपूरच्या दळव्यांचें पारपत्य |
| १७५–१८१ | | व्यूहरचना |
| १८२–१८३ | | फाजलखान रांगण्याजवळ बाजी देशपांड्यास गाठतो |
| १८३–१८६ | | फाजलखानी प्रकरणाची समाप्ती |
| १८६–१८८ | | कारकुनांची यादी |
| १८८–१८९ | | प्रबळ किल्ला व यवनी स्त्री |
| १९०–१९६ | | अहद कोंकण तहद गोवा |
| १९७ | १५८४ | मोरोपंत पिंगळे पेशवा होतो |
| १९८ | | चिटणीस पत्र वाचण्याचा बहाणा करतो |
| १९९ | | बाजी घोरपड्याचा नाश |
| २००–२०५ | | शहाजी शिवाजीस भेटतो |
| २०५ | १५७९ | संभाजीचा जन्म |
| २०६–२०७ | १५८६ | शहाजीचा मृत्यु |
| २०८–२१० | | बिदनूरची स्वारी |
| २११ | | बिलालाशीं लढाई |
| २११ | | पिंगळे आंवढापट्टा घेतो. औरंगझेबाशीं युद्धप्रारंभ |
| २१२–२१४ | | रायबागीणप्रकरण |
| २१४–२१५ | | महकुमासिंगाचा पराभव |
| २१६–२१८ | | नरसाळा चाकण मोगलास देतो |
| २१८–२२४ | १५७८ | शास्ताखान प्रकरण |
| २२५ | १५८३ | राजारामाचा जन्म |
| २२६–२३५ | | रामदासाची भेट |
| २३६–२४२ | | मिर्झा राजे व दलेलखान यांची स्वारी. |
| | | मुरारबाजी प्रकरण |
| २४३–२५४ | | शिवाजी दिल्लीस जातो |
| २५५–२५७ | | संभाजी दिल्लीहून परत येतो |
| २५८–२६० | | शाहाजादा विजापुरावर चालून येतो. त्याचा पराभव शिवाजी करतो |
| २६०–२६४ | | किरकोळ |

| | | |
|---|---|---|
| २६५–२६९ | | संभाजीचा फितवा |
| २७०–२७८ | | मोंगलाशीं लढाई |
| २७८–२८७ | | मोंगलाशीं लढाई कोशल प्रांतांत |
| २८७ | | राजारामाचें लग्न |
| २८८–३३५ | | चंजीचंजावर प्रकरण |
| ३३५–३४६ | | इसुफखान, मायणा व साबाजी यांशीं कर्नाटकांत युद्ध |
| ३४७–३५० | | दादजी प्रभू व सावित्रीबाई |
| ३५१ | | मलवाई देसाईण |
| ३५२–३५३ | | इनामप्रकरण |
| ३५४–३५६ | | औरंगझेबाचे विचार |
| ३५७–३६३ | | व्यंकोजीची उदासीनता |
| ३६३–३७३ | | शिवाजी व बाळाजी आवजी प्रभू |
| ३७३–३९७ | | संतांच्या भेटी व उपदेश |
| ३९८–३९९ | | मिरा नाइकवाडी व धारराव |
| ४००–४०१ | | विक्रमशा व बहलोलखान |
| ४०२–४०६ | | संभाजी व रामदास |
| ४०६–४३९ | | राज्याभिषेक |
| ४३९–४४२ | | हेमाडपंतांचें उपाख्यान. हेमाडपंत लंकेहून शके ११९३ त आले. |
| ४४२–४४५ | १५९९ | सईबाईचा मृत्यु |
| ४४५— | १५९९ | संभाजीला करवीर प्रांताचा सुभदार केला मोरोपंताला खानदेशाचा कारभार दिला |
| ४४६–४४८ | | मोरोपंत पिंगळे |
| ४४९–४५४ | | जिजाबाईचा मृत्यु |
| ४५४–४६९ | | अंतकालाचे दिवस |


---

## [ २ ] सप्तप्रकरणात्मक चरित्रांतील मजकुराचा अनुक्रम.


| पृष्ठ | कलम | शक | प्रसंग. |
|---|---|---|---|
| ३०, | [१] | १५६२ | तोरणा घेतो |
| ३०, | [२] | | राजगड घेतो |

| | |
|---|---|
| ३१, [१] | दादाजी कोंडदेवाचा मृत्यु.<br>फिरंगोजी नरसाळा चाकण देतो.<br>बिलाल पाग्या निघून जातो. |
| ३२, [१] | बांदल देशमूख रोहिडा देतो |
| ३२, [२] १५६८ | सोडवळकर व कोडवेलकर यांच्या बोलावण्या-<br>वरून तळा घोसाळा घेतो |
| ३३, [१] १५६८ | दळव्यांचा पराभव, रायगड घेतो<br>कल्याण शिद्दिमुलाणापासून घेतो |
| ३३, [२] १५७० | पन्हाळा प्रांत घेतो<br>बाळाजीची चिटणिशी |
| ३४, [१] | शृंगारपूरच्या सुरव्यांचा पराभव<br>चेऊल घेतो |
| ३४–३५ | शहाजीला घोरपडे धरतो<br>रायबागीण |
| ३६ | तानाजी मालुसरे प्रसिद्धगड घेतो |
| ३७, [१] | शिवाजी नगर लुटतो |
| ३८ | पुरंधर घेतो |
| ३८, [१] | कल्याणची सुंदर यवनी |
| ३८, [२] १५७७ | चंद्रराव मोऱ्यांचा पराभव |
| ३९, [१] १५७९ | जुन्नर लुटतो, संभाजीचा जन्म |
| ३९—४४ १५७१ | रामदास व तुकाराम यांची भेट |
| ४५—५२ | अफझलखान प्रकरण |
| ५३ | फाजलखान पन्हाळ्यावर चालून<br>जातो बाजी प्रभू |
| ५४ | अबदुल करीमखान व बहलोलखान<br>यांचा पन्हाळ प्रांतीं पराभव. बाजीराव<br>पासलकर जंजिऱ्याच्या हबशाचा<br>पराभव करतो |
| ५५, [२] | हबशाचा बंदोबस्त |
| ५६, [१] | बाजी घोरपड्याचा नाश |
| ५६, [२] | लखम सांवताचा पराभव |
| ५७, [१] | मालवणचा किल्ला बांधला |
| ५७, (२) | बसनूर व बिदनूर प्रांतावर स्वारी |

| | | |
|---|---|---|
| ५७, ( २ ) | १५८३ | राजारामाचा जन्म |
| ५९, ( १ ) | | सुरत मारिली |
| ५९, ( २ ) | | रायबागीण |
| ६०, ( १ ) | | प्रबळगड घेतो |
| ६०, ( २ ) | | महक्रूबसिंगाचा नगरास पराभव. औरंगाबाद व जालना लुटली |
| ६१—७० | | अंतर्व्यवस्था |
| ७१— | | भुखान कवीचें वृत्त |
| ७४—७५ | | शिवाजी व शहाजी यांची भेट |
| ७६—७९ | | शास्ताखानाचा पराभव |
| ८०, ( १ ) | १५८३ | शहाजीचा मृत्यु |
| ८१—८२ | | जयसिंग दाक्षिणेवर स्वारी करतो |
| ८२, ( २ ) | | दिलेलखान व मुरारबाजी |
| ८३—८५ | | जयसिंगाची भेट |
| ८६—९४ | १५८८ | शिवाजी दिल्लीस जातो |
| ९५, ( १ ) | | चिटणीस लुटपटीचें पत्र वाचतो |
| ९५, ( २ ) | | शिवाजी वऱ्हाड प्रांतीं स्वारी करतो— करंजें शहर लुटतो |
| ९६—९७ | | शाहाजादा दक्षिणेंत येतो |
| ९८— | | सालेरची लढाई |
| ९९— | | बावसे नवरीची लढाई |
| १००—१०२ | | नीती प्रकरण |
| १०३—११० | | चंजावर प्रकरण |
| ११०,( २ ) | | गौडा देसाई व मलवाई देसाईण |
| १११—११३ | | हुसेनखान माईणा व लोधीखान |
| ११४— | | चंजावर प्रकरण |
| ११४—११५ | | राज्याभिषेकाचा विचार |
| ११५—११६ | | रणथंबे इलाची बेग घेतो |
| ११६—११८ | | कारकून व सरदार यांची यादी. |
| ११९—१२८ | १५९६ | किल्ल्यांची यादी |
| १२९,( १ ) | १६०० | राज्याभिषेक |
| १३०— | | जिजाबाईचा मृत्यु |
| १३१— | | संभाजीचा फितवा |
| | | दिलेलखानाचा पराभव जालना-पूरची लूट |

| | | |
|---|---|---|
| १३२,( २ ) | | दिलेलखान विजापुरावर चालून येतो |
| १३३,( १ ) | | पिंगळे अहिवंत किल्ला घेतो |
| १३४— | | दिलेलखानाचा पराभव, कर्नाटकांत |
| १३५,( १ ) | | चंजावर प्रकरण |
| १३५,( २ ) | १६०१ | राजारामाचें लग्न |
| १३६–१३७ | १६०२ | मृत्यु |


## ( ३ ) सभासदी बखरींतील मजकुराचा अनुक्रम.


| पृष्ठ | शक अथवा सन | प्रसंग |
|---|---|---|
| ६— | १६३९ | शिवाजी बेंगरुळास जातो, व येऊन बारा मावळें काबीज करतो, दादाजी कोंडदेवाचा मृत्यु संभाजी मोहित्यास कैद करितो |
| ७— | | जुन्नर शहर मारतो कोंडाणा घेतो पुरंदर घेतो कल्याण भिवंडी मारतो माहुली किल्ला घेतो राजगड बांधतो |
| ८— | | चंद्रराव मोऱ्यास मारतो बाबाजीरावास कैद करतो शृंगारपुरच्या सुर्व्यास पिटाळतो |
| ९— | | नवीन राज्याची बंदोबस्ती संभाजीचा जन्म शहाजीस तंबी |
| १०—१९ | | अफजुल प्रकरण |
| २० | | प्रतापगडास भवानीची स्थापना |
| २१ | | तळकोकण काबीज करतो बालेघाटीं स्वारी करतो औरंगाबादचा पुरा मारतो |
| २२—२५ | | किल्ल्यांची व्यवस्था |
| २६—२९ | | शास्ताखानप्रकरण |
| ३० | | मिर्झा राजा जयसिंग व दिलेलखान दक्षिणेंत येतात |
| ३१ | | भवानीचा दृष्टान्त |

| | |
|---|---|
| ३२ | जयसिंग पुरंदर व कोंडाणा ह्यांच्यामध्यें बसतो शिवाजी जयसिंगाकडे वकील पाठवितो |
| ३३—३४ | मुरार बाजी पुरंदर राखतो |
| ३५—३६ | शिवाजी दिलेल्खानास भेटतो |
| ३७–४३ | शिवाजी दिल्लीस जातो |
| ४३–४४ | तानाजी सिंहगड घेतो संभाजी देशीं येतो |
| ४५ | हुजूर पथकांची व्यवस्था |
| ४६ | शिद्दी जोर पन्हाळा वेढतो |
| | दिल्लीचा शहाजादा शहाजहान दक्षिणेंत येतो |
| ४७ | दिल्लीपतीशीं सल्ला |
| ४८ | औरंगजेबास शिवाजीचा संशय येतो |
| ४८ | रुस्तुमजमा रांगण्यावर येतो |
| ५० | सुरत मारतो. वणीदिंडोरीची लढाई. रायबागीण |
| ५१ | हबशाशीं युद्ध |
| ५२ | पासलकराचें व काय सांवतांचें युद्ध |
| | शहाजीचा मृत्यू |
| ५३ | हबशाशीं युद्ध |
| ५४ | लखम सांवताशीं लढाई |
| ५५ | बसनूर मारिलें. कारंजें शहर मारिलें |
| ५६ | रायगड बसविला. राजारामाचा जन्म |
| ५७ | इखलासखान व बेलोलखान अहिवंत किल्ल्यावर येतात. कणेरगडची लढाई |
| ५८ | सालेरचीं जंगी लढाई |
| ५९ | बहादूरखान कोका दाक्षिणेंत येतो |
| ६० | वाई, सातारा, कऱ्हाड, शिरोळ, कोल्हापूर, रायबाग प्रांत घेतलें, व त्यांवर मोरो त्रिंबक, अण्णाजी दत्तो व दत्ताजी वाकनीस नेमिले. |

६१ बेलोलखानाचा पराभव दोनदां होतो प्रतापराव गुजर रणांत पडतो
६२ हंसाजी मोहिता सरनौबत होतो हणमंते जंजावराहून रायगडास येतो
६३ हुसेनखान मायण्याचा पराभव बहादूरखान व दिलेलखान चालून येतात. गुजराथ, वऱ्हाड, जालनापूर लुटतो.
६४–६६ सिंहासनारोहण
६७–६९ कर्नाटकांत जातांना शिवाजी भागानगरास जातो.
७०–७२ चंदीवर स्वारी, मलवाई देसाईण
७३ संभाजीचा फितवा
७४–८१ कारखाने, खजिना, कारकून व गडकोट यांची याद
८२–८४ मृत्यु.

---

## ( ४ ) चित्रगुप्ती बखरींतील मजकुराचा अनुक्रम.

| पृष्ठ. | सन. | प्रसंग. |
|---|---|---|
| ३ | ७ | शिवाजी बेंगरुळास जातो. येऊन बारा मावळे काबीज करतो. दादार्जा कोंडदेवाचा मृत्यु. संभाजी मोहित्यास कैद करतो. जुन्नर व नगर मारतो. कोंडाणा घेतो. पुरंदर घेतो. |
| ४–५ | | कल्याण भिवंडी मारतो. शृंगारपूरच्या सुर्व्यास पिटाळतो. नवीन राज्याची बंदोबस्ती. |
| ६ | | संभार्जाचा जन्म |
| ७—३३ | | अफजुलप्रकरण |
| ३४ | | प्रतापगडीं भवानीची स्थापना |

| | |
|---|---|
| ३५ | तळकोकण काबिज करतो. बालें-घाटी स्वारी करतो. औरंगबादचा पुरा मारतो. |
| ३६—३९ | किल्ल्यांची व्यवस्था |
| ४०—४५ | शास्ताखान प्रकरण |
| ४६—४७ | मिर्झा राजा व दिलेलखान येतात |
| ४८ | भवानीचा दृष्टान्त |
| ४९—५८ | जयसिंग पुरंदर व कोंडाणा यांच्या मध्यें बसतो. शिवाजी जयसिं-गाकडे वकील पाठवितो. मुरार-बाजी पुरंदर राखतो. शिवाजी दिलेलखानास भेटतो. |
| ५९—७४ | शिवाजी दिल्लीस जातो |
| ७५—७८ | तानाजी सिंहगड घेतो. |
| ७८ | संभाजी परत येतो. हुजूर पथ-कांची व्यवस्था |
| ७९ | शाहाजादा शहाजहान दक्षिणेत येतो. |
| ८० | दिल्लीपतीशीं सल्ला. औरंगझेबाला शिवाजीचा संशय येतो. |
| ८१ | रुस्तुमजमा रांगण्यावर चढाव करतो. |
| ८२ | सुरत लुटतो. सडे केडासची लढाई. रायबागीण. |
| ८३—८५ | हबशाशीं लढाई. शहाजीचा मृत्यु |
| ८६ | हबशाशीं लढाई. |
| ८७ | बाजी घोरपड्याचा नाश. सांव-ताशीं युद्ध. |
| ८८ | उसनूर शहर मारतो. कारंजें लुटतो रायगड वसवितो. |
| ८९ | राजारामाचा जन्म. एखलासखान व दिलेलखान दक्षिणेंत येतात |
| ९०—९२ | कणेरगडची लढाई. सालेरची जंगी लढाई |

| | |
|---|---|
| ९३ | बहादूरखान दक्षिणेंत येतो. वाई, सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर, रायबाग प्रांत घेतो व त्यांवर मोरो त्रिमळ, अण्णाजी दत्तो व दत्ताजी वाकनीस यांस नेमितो |
| ९४ | बहलोलखानाचा दोनदा पराभव. प्रतापराव नसेरीच्या युद्धांत पडतो अनसाजी मोहिता सरनोबत होतो. |
| ९५ | जालनापूर लुटतो |
| ९६–१०९ | सिंहासनारोहण |
| ११०–११५ | शिवाजी भागानगरास जातो |
| ११५–११७ | चंदीवर स्वारी |
| ११८ | लालबी देसाईण |
| ११९ | संभाजीचा फितवा |
| १२०–१२२ | कारखान्याच्या व कारकुनांच्या यादी |
| १२३ | प्रभू लोकांविषयीं |
| १२४–१२५ | सांवत व फिरंगी ह्यांशीं लढाई |
| १२६–१३१ | सरदार व गड यांच्या यादी |
| १३२–१३७ | सिंधुदुर्ग बांधतो |
| १३८–१३९ | संभाजीस उपदेश |
| १४०–१६१ | उपदेशांचीं पद्यें |
| १६२ | राजारामाचें लग्न |
| १६३–१६८ | मृत्यु |
| १६९ | चित्रगुप्ताची स्वताची रडकथा |


## ( ५ ) श्रीशिवाजीप्रतापांतील मजकुराचा अनुक्रम.


| पृष्ठ. | शक. | प्रसंग. |
|---|---|---|
| ७६ | | रायगड वगैरे घेतो |
| ७७–७८ | | शहाजीस तंबी |
| ७९–८९ | १५८१ | अबदुलाखान प्रकरण |
| ९० | | रणदुल्लाखान व शास्ताखान दक्षिणेंत येतात |

| | |
|---|---|
| ९१–९३ | मुरार बाजी प्रभू |
| ९१–४४ | शास्ताखान व औरंगझेब याविषयीं निव्वळ गप्पा |
| ९५ | झुल्फुकारखानाची गप्प |
| ९६ | शिवाजीची शिस्त |
| ९७–१०० | शास्ताखानप्रकरण बाबाजी राम |
| १०१–१०४ | रामदासस्वामींची भेट |
| १०५–११७ | मुरारबाजी, शहाजी, रणदुल्ला वगैरे-विषयीं असंबद्ध गप्पा |
| ११८–१२३ | शिवाजीची व शहाजीची भेट |
| १२४–१२५ | माल्वण किल्ला बांधतो |
| १२६ | बाळाजी आवजी विषयीं गप्पा |
| १२७ | सिद्दी बिलाल दिल्लीस जातो वगैरे गप्पा |
| १२८–१३१ | औरंगजेबाची अस्वस्थता |
| १३२–१३४ | औरंगजेब दक्षिणेंत येण्याचा विचार करतो |
| १३५ | औरंगझेब दक्षिणेंत आला वगैरे गप्पा |
| १३६–१३८ | राज्याभिषेक मुंजीची तीथ |
| १३९ | मृत्यु |


---

## ( ६ ) रायरी येथील बखरींतील मजकुराचा अनुक्रम.


| पृष्ठ. | शक. | प्रसंग. |
|---|---|---|
| ७ | | मार्तंड देव व होनाप्पा देशपांडे पुण्याचे रहाणार, पुंडाई करून चाकण किल्ला घेतात. दादाजी कोंडदेव मार्तंड देवाच्या सल्ल्यानें मावळची व्यवस्था करतो |
| ८ | | औरंगजेब औरंगाबाद बसवितो |
| ९ | | औरंगझेब विजापुरावर स्वारी करतो. दादोजीचा मृत्यु. शिद्दी हिलालाला शिवाजी शहाजीकडे पाठवि- |

| | | |
|---|---|---|
| | | तो. औरंगझेब दिल्लीस जातो. शिवाजी निळोजीपासून पुरंदर घेतो. |
| १० | | फिरंगोजी नरसाळा चाकण देतो. पिंगळे राजगड, पद्मावती, संजीवनी व थुसुवेथुसा किल्ले बांधतो |
| ११ | | चंद्रराव जावळकराला शिवाजी दस्त करतो |
| १२ | १५७२ | अफजुलखानाचा वध |
| १३ | | फाजीलखान व बाजी प्रभू |
| १४ | | प्रतापराव महकूमसिंगाचा पराभव करतो. शिवाजी सिंधुदुर्ग बांधतो हबशाशीं लढाई. शिवाजी कल्याणभिवंडीपासून सोंध्यापर्यंत प्रांत घेतो. शास्ताखान चाकण घेऊन पुण्यास येतो. मलखेडची लढाई ( शके १५७९. ) |
| १५– | | शाहिस्तेखानावर पुण्यास शिवाजी छापा घालतो. मिर्झा राजा व दिलेरखान चालून येतात |
| १६–१७ | | शिवाजी दिल्लीस जातो |
| १९ | | हुसूर लुटतो, बिदनूर लुटतो. बाजी घोरपडे शहाजीला धरतो. शहाजी व शिवाजी यांची भेट. |
| २० | | शहाजीचा मृत्यु. शिवाजी भागानगरास जातो. कर्नाटकांत जातो |
| २१ | | चंजीवर स्वारी. |
| २२ | | हुसेनखानाचा पराभव. सिंहासनारोहण. शिवाजी जालनापूर लुटतो. मृत्यू. |

येणेंप्रमाणें ह्या सहा बखरींतील मजकुराचा अनुक्रम आहे. एका बखरींतील अनुक्रमाचा मेळ दुसऱ्या बखरींतील अनुक्रमाशीं बसत नाहीं हें वरवर पहाणाऱ्यालाहे दिसून येईल. पैकीं शिवाजीप्रतापांतील मजकूर अगदींच तुटपुंजा व अपुरा असून गप्पांनीं भरला आहे. चित्रगुप्तानें सभासदी बखरींतील मजकूर बहुतेक जशाचा तसाच उतरला आहे.

रायरी येथील बखरींत कोणत्याच प्रसंगाचा सविस्तर वृत्तांत नाहीं व शेवटीं शेवटीं तर बखरनविसानें मजकुराचा फारच संक्षेप व लोप केला आहे. बाकी राहिलेल्या तीन बखरींचा म्हणजे सप्तप्रकरणात्मक चरित्र, सभासदी बखर व शिवदिग्विजय ह्यांचाच तेवढा येथें विचार कर्तव्य आहे. ह्या तीन बखरींत मोठी उणीव म्हटली म्हणजे बहुतेक प्रसंगाचा शक ह्या बखरींत दिलेला नाहीं. 'नंतर' 'पुढें', वगैरे शब्दांनींच प्रसंगांचें पौर्वापर्य निश्चित करावयाचें आहे. वस्तुतः प्रसंग जसजसे घडले तसतसें वर्णन ह्या बखरनविसांनीं केलें असतें म्हणजे 'नंतर'; 'पुढें', वगैरे शब्दांपासूनहि कालाचा बोध, दोन चार महिन्यांच्या चुकीनें, करून घेतां आला असता. परंतु पूर्वापार संगतीनेंच प्रसंग ह्या बखरींत वर्णिले आहेत असें निश्चयानें म्हणवत नसल्यामुळें प्रसंगांच्या कालाचें पौर्वापर्य केवळ अंतःप्रमाणावरून निश्चित करतां येत नाहीं. तेव्हां पत्रें, यादी वगैरे बहिःप्रमाणांचा आधार घेऊन जो कालनिर्णय होईल तेवढाच खरा मानून स्वस्थ बसलें पाहिजे, व ह्या कालनिर्णयाच्या आधारावर मागील व पुढील प्रसंगांचा धरमधोक्यानें कालनिर्णय केला पाहिजे. पुढें इतर विशिष्ट बहिःप्रमाण सांपडल्यास ह्या धरमधोक्यानें ठरविलेल्या कालनिर्णयांत थोडाफार फेरबदल होण्याचा संभव असतो. परंतु, बखरींतील मजकुराच्या कालनिर्णयासंबंधीं निश्चयात्मक, चोख व विश्वसनीय विधानें करण्याची ही अशी अडचण असल्यामुळें, प्रसंगांच्या कार्यकारणभावाचा अर्थात् कांहींच निर्णय करतां येत नाहीं. प्रसंगांचा कार्यकारणभाव व पौर्वापर्य अनिश्चित राहिल्यामुळें त्या प्रसंगांची उपयुक्तता व महत्त्व हीहि नीट ध्यानांत येत नाहींत. बखरींतील मजकुरापासून ऐतिहासिक बोधहि वाचकांना करून देतां येत नाहीं व तो करून देण्याचा आव घातला तर असंभाव्य गप्पांचें समर्थन केल्याचें श्रेय मात्र पदरीं पडतें. ह्या दोषाला शिवाजीचा प्रत्येक मराठी इतिहास व चरित्र पात्र झालेलें आहे हें तर स्पष्टच आहे; परंतु खुद्द ग्रांट डफचा इतिहास ह्या दोषाला अपवादक होईल असेंहि खात्रीनें सांगतां येत नाहीं. कां कीं (१) बखरींची नीट परिक्षा करून ग्रांट डफनें आपला इतिहास लिहिला नाहीं. (२) पत्रें यादी वगैरे खेरीज करून प्रसंगांचा कालनिर्णय त्यानें फारशी तवारिखांच्या प्रत्यंतर पुराव्यावरून केला आहे व प्रत्यंतर पुरावा बखरीच्या इतकाच अविश्वसनीय आहे; (३) व मिळालेल्या पत्रें यादी वगैरेंचाहि जसा उपयोग करून घ्यावा, तसा त्यानें करून घेतला नाहीं. ह्या तीन दोषांमुळें बखरींप्रमाणेंच डफचा इतिहासहि थोडाफार अविश्वसनीय आहे. शिवाजीचा इतिहास ग्रांटडफनें खालील लेखांच्या आधारानें लिहिला :—(१) सभासदी बखर, (२) मल्हार रामरावकृत सप्तप्रकरणात्मक चरित्र. (३) मोऱ्यांच्या जवळील शिवाजीची बखर, (४) टॉमस कोट यानें भाषांतर केलेली बखर, (५) सर बारी क्लोजनें भाषांतर केलेली बखर, (६) कोल्हारच्या कुळकर्ण्याजवळील बखर, (७) खटावच्या देशपांड्याजवळील बखर, (८) काफीखान, (९) विजापूरच्या बखरी, (१०) व इंग्रजी, पोर्तुगीज, मराठी व फारशी पत्रें यादी वगैरे. दहाव्या वर्गांतील साधनांखेरीजकरून बाकींच्या साधनांच्या आधारानें लिहिलेला कोणताहि इतिहास फारसा

विश्वसनीय नसतो हें मी वारंवार सांगत आलोंच आहे. तशीच ह्या बखरींची सूक्ष्म परीक्षा करून, डफनें आपला इतिहास लिहिला नसल्यामुळें त्याच्या ग्रंथाला बहुत अपूर्णता आली आहे. ती कशी आली आहे ह्याचें दिग्दर्शन मागें शिवाजीच्या वायकांसंबंधींचा विचार चालला असतांना थोडेंबहुत झालेंच आहे. ह्यापुढें हें दर्शन जास्त विस्तृत करून, ग्रांट-डफच्या ग्रंथाची व बखरींची न्यूनता कित्येक शंकास्थानांत दाखवून देतों म्हणजे शिवाजीचा इतिहास विश्वसनीय असा लिहितां येण्यास अद्याप किती तरी सामुग्री जुळावयाची आहे, हें वाचकांच्या स्पष्ट ध्यानांत येईल व बखरींचें प्रामाण्याप्रामाण्य योग्य रीतीनें व्यक्त होईल.

---

## शंकास्थान पहिलें.

ह्या शंकास्थानांत शिवाजी पुण्यास दादोजी कोंडदेवाकडे रहाण्यास आल्यापासून तोरणा किल्ला घेईतोंपर्यंत शिवाजीच्या चरित्रांतील प्रसंगांचा सालवार इतिहास बखरींतून कसा दिला आहे व डफच्या ग्रंथांत त्याचें सालवार वर्गीकरण कोणत्या भक्कम आधारावर रचिलें आहे तें पहावयाचें आहे. आपल्या वयाच्या १२ व्या वर्षी शिवाजी शहाजीस बेंगरुळास भेटण्यास गेला होता असें सभासद [ पृष्ठ ६ ] लिहितो, म्हणून शके १५६० हें साल शिवाजीच्या हालचालीच्या प्रारंभाचें असावें असें मी गृहीत धरतों. १५५८ त शहाजहान व महमद आदिलशहा ह्यांचा तह झाल्यावर शहाजी विजापूरकरांचा मनसबदार बनला त्यावेळीं शिवाजी शहाजीबरोबर कदाचित् विजापुरास गेला असेल असा अंदाज करतां येईल. १५५९ त शहाजी कर्नाटकच्या स्वारीस गेला असतां, शिवाजी दादोजी कोंडदेवाकडे पुण्यास आला असें वाटतें. व पुण्यास वर्ष सहा महिने राहून १५६० त शिवाजी शहाजीस भेटण्यास बेंगरुळास गेला असें सभासद म्हणतो, तें कदाचित् खरें असेल असें म्हटलें तर चालण्यासारखें आहे. दादोजी कोंडदेवाकडे पुण्याकडील कारभाराचें जोखीम असल्यामुळें, दादोजी शिवाजीला घेऊन पांच सहा महिन्यांनीं पुण्यास परतला असावा. व पुण्यास आल्यावर शहाजीच्या सांगण्याप्रमाणें दादोजीनें शिवाजीचें पहिलें लग्न शके १५६२ च्या वैशाखांत पुण्यांतच केलें. [ शिवदिग्विजय पृष्ठ ९९ ]. बेंगरुळाहून पुण्यास येतांना शहाजीनें शिवाजीबरोबर, शामराव निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, सोनोपंत डबीर, व रघुनाथ बल्लाळ सबनीस, हे कारकून लोक दिले होते. [ सभासद ६, चिटणीस ३०, चित्रगुप्त ३ ]. बाळकृष्णपंत नारोपंताचा चुलता होता व बाबुराव मुजुमदारहि शिवाजीबरोबर आला म्हणून चित्रगुप्त म्हणतो, परंतु बाबुरावाचें नांव चित्रगुप्तानें पुढील पारिग्राफांत गाळलें आहे, व त्यावरून हें पांचवें नांव आगंतुक असावें असें वाटतें. शिवाजीचें पहिलें लग्न झाल्यानंतर म्हणजे अर्थात् दुसरा पावसाळा सुरू होण्याच्या पूर्वी [ शिवदिग्विजय पृष्ठ १११ ], म्हणजे १५६३ च्या वैशाख-जेष्ठांत शहाजी विजापुरास आला व पातशाहाच्या आग्रहास्तव त्यानें शिवाजीचें दुसरें लग्न केलें आणि चार महिने पावसाळा विजापुरास काढून, व शिवाजीला पुण्यास पाठवून

देऊन आपण कर्नाटकांत चालता झाला. येणेंप्रमाणें शिवाजी शके १५५८ त पहिल्यांदा व शके १५६३ दुसऱ्यांदा असा दोन वेळां विजापुरांत जाऊन राहिला असावा. पहिल्या खेपेस शिवाजी आठ वर्षांचा असल्यामुळें त्याच्या हातून कसायाचें पारिपत्य व पातशहाची बेअदबी झाली असेल हें संभवत नाहीं. तेव्हां दुसऱ्या खेपेस म्हणजे शके १६६३ त चौदा वर्षांचा असतांना शिवाजीच्या हातून हा वरकरणी दिसणारा उद्दामपणा झाला असावा असा तर्क आहे. हा उद्दामपणा न्याय्य होता हें दाखवून देण्याकरितां बखरनवीस मुसलमानी न्यायाचे दोन मासले देतात. पैठण येथील एका स्त्रीस एका मुसलमान छाकट्यानें बाटविण्याचा प्रयत्न केल्यासंबंधींचा पहिला मासला आहे [ शिवदिग्विजय १००—१०१ ], व दुसरा चतुर साबाजीनें केलेल्या सांको पांझी न्यायासंबंधींचा आहे [ शिवप्रताप पृष्ठ ३९ ते ४२ ]. मुसलमानी राज्यांत न्याय अपवादात्मक असे, असा झोंक ह्या बखरनविसांच्या लिहिण्याचा आहे. स्त्रियांवर बलात्कार करणें, हिंदूंचा खून करणें व देव फोडणें, गाई मारणें, धर्म बाटविणें, वगैरे अनन्वित प्रकार मुसलमानी राज्यांत हरहमेश होत व बहुशः जिरत असत. कोंकणांत व देशावर केळकर, पद्मसकर, पिसाळ, जाधव, दसपुत्रे वगैरे शेंकडों ब्राह्मण व मराठे, यवनी धर्माची दीक्षा जुलमानें किंवा लालुचीनें घेऊन चुकले होते. देशप्रिय व धर्मप्रिय लोकांना हा प्रकार अर्थातच निंद्य वाटे. शिवाजीला व त्याच्या बरोबरच्या इतर अनुयायांनाहि तो प्रकार निंद्यच वाटला असावा हें उघड आहे. त्याचेंच प्रदर्शन हा उद्दामपणा होय. शके १५६३ च्या हिंवाळ्यांत शिवाजी पुण्यास आला तो पुन्हां विजापूरच्या दरबारीं सेवक या नात्यानें गेला नाहीं. विजापूरचा तिटकारा येण्याला शिवाजीला यवनांच्या धर्माचा द्वेष तर कारण झालाच. परंतु इतरहि आणीक कारणें पुष्कळच झालीं. [ १ ] महाराष्ट्र हें आपलें स्वराज्य असें त्याच्या उपदेशकांना वाटत होतें. [ चिटणीस २८ ]. [ २ ] पुणें व सुपें हे प्रांत निजामशाहींतील विजापूरकराकडे नव्यानेंच गेल्यामुळें त्यांवर आदिलशहांची जितकी गच्च मिठी बसावी तितकी बसली नव्हती. [ ३ ] शहाजीच्या तर्फे पुण्याचे जवळील ओसाड मावळांची लावणीसंचणी दादोजीनें स्वतः करविल्यामुळें तेथें आदिलशाही अम्मल साक्षात् दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. ( ४ ) पुणें व सुपें प्रांतांतील व इतरत्र शके १५२२ पासून १५५८ पर्यंत होनाप्पा देशपांडे, मोरो तानदेव, ( रायरी येथील बखर ) श्रीनिवासराव वगैरे पुंडांनीं बंडाळी करण्याचा अभ्यास सुरू केला होता. ( ५ ) जुन्नरापासून पन्हाळ्यापर्यंतचे शितोळे, ढमढेरे, बांदल, शिरके, निंबाळकर, जाधव, घाटगे, घोरपडे, वगैरे देशमुख व त्यांच्या बरोबरीचे देशपांडे एकमेकांशीं सदा कांहीं तरी कुरापत काढून झुंजत असत. त्यामुळें महाराष्ट्राच्या पश्चिम भागीं सर्वत्र गोंधळ माजून राहिला होता. ( ६ ) विजापूरच्या दरबारांतील मुत्सद्दी मंडळांत व सरदार मंडळांतहि बेबनाव बहुत झाला होता ( शहाजीची बखर, का. ). ( ७ ) दिल्लीच्या मोंगलांनीं विजापूरकरांच्या राज्यांत बखेडा व फितूर करण्यास तत्रस्थ प्रजेला उत्तेजन दिलें होतें. ( ८ ) दादोजी कोंडदेव, शहाजी

च इतर कारकून मंडळी विजापूरच्या सत्तेचे मोठेसे भक्त होते असें नव्हतें. ( ९ ) संतमंडळीचाहि एकंदर मनोदय यवनांच्या सत्तेच्या विरुद्ध होता. ( १० ) विजापूरचे पातशहाहि नरम होऊन त्यांच्यांतील कडवें यवनत्व नाहींसें झालें होतें. विजापूरच्या खुद्द आरकांत दत्तात्रयाचें देऊळ बांधिलें होतें, म्हणजे राम व रहीम एक आहेत अशी विचारी मुसलमानांची खात्री झाली होती. ( ११ ) शहाजीच्या पदरीं चालतें बोलतें सैन्य होतें. ( १२ ) फलटणचे निंबाळकर, शिरकाणांतील शिरके, कोंकणांतील सोंडवळकर व कोडवळकर वगैरे मंडळींना आपापलीं वैरें साधून घेण्याला शिवाजीला मदत करणेंच अवश्यक झालें होतें. हीं अशीं अनेक सामान्य कारणें शिवाजीला प्रोत्साहित करण्यास साहाय्यभूत झालीं होतीं. शहाजीनें शिवाजीला बेंगरुळाहून पुण्यास पाठविलें त्यावेळीं पेशवे, मुजुमदार, डबीर व सबनीस अशी मुत्सद्दी मंडळीं भावी संस्थानाच्या उपयोगी पडण्याजोगी शिवाजीबरोबर होती. ह्यावरून असें अनुमान होतें. कीं, मावळांत स्वतंत्र राज्य स्थापावें अशी शहाजीची दादोजी कोंडदेवाच्या सल्यानें मसलत झाली होती. ही मसलत करण्यास शहाजीला कारण असें झालें कीं, कर्नाटकांत अफजलखान, मालोजी घोरपडे वगैरे विजापूरचे सरदार द्वेषानें शहाजीचें पाऊल स्थिर करूं देतना. तेव्हां स्वदेशांत म्हणजे सह्याद्रीच्या बंधाऱ्याच्या लगत्यास साधल्यास कोठें तरी स्वतंत्र सत्ता स्थापित करावी म्हणजे दाहीं दिशांनीं जन्मभर वणवण करीत हिंडण्याचा प्रसंग पुनःपुनः येणार नाहीं, असा शहाजीचा विचार झाला होता असें दिसतें. स्वतंत्र संस्थान स्थापण्याचें शहाजीनें स्वतःच्या शिरावर न घेतां शिवाजीच्या व दादोजी कोंडदेवाच्या शिरावर टाकण्याचें कारण असें कीं, दादोजी कोंडदेवाला यश आलें नाहीं तर त्यांची बाजू सावरण्यास आपण विजापूरच्या दरबारीं चिकटून असावें शके १५६३ च्या हिंवाळ्यांत पुण्यास आल्यावर शिवाजीनें लवकरच स्वतंत्र राज्याधिकार चालविण्यास सुरवात केली असें म्हणण्यास आधार आहे. शिवदिग्विजयाच्या १८६ व्या पृष्ठावर शामराज निळकंठ राझेकर यांस पेशवाई पुणें मुक्कामीं सुभानुनाम संवत्सरीं म्हणजे शके १५६५ त शिवाजीनें दिली असें म्हटलें आहे. शामराज निळकंठ शिवाजीबरोबर बेंगरुळाहून शके १५६० तच आला होता. परंतु पेशवाईची सनद म्हणजे राजपत्र त्याला शके १५६५ त मिळालें. ह्यावरून असें निष्पन्न होतें कीं, पुणें व सुपे ह्या दोन प्रांतांवर अम्मल करीत असतांना, अथवा खरें म्हटलें असतां केवळ पुणें प्रांतांवर अम्मल करीत असतांना ( कारण सुपें प्रांत संभाजी मोहित्याकडे होता ), शिवाजीला पेशवाईच्या अधिकारावर अंम्मलदार नेमण्याची आवश्यकता भासली. शके १५६५ त शिवाजीचें वय १६ वर्षांचें होतें. त्यावेळीं महाराष्ट्रांत जी कांहीं विद्या मिळण्यासारखी होती ती शिवाजीला मिळाली होती. शिवाजी लिहिणें वाचणें वगैरे सर्व कांहीं व्यावहारिक विद्या शिकला असून त्याला संस्कृताचीहि व्युत्पत्ति सामान्यशी येत होती. ह्या गोष्टीचा विस्तृत उल्लेख शिवदिग्विजयांत व मल्हाररामरावकृत चरित्रांत यथास्थित केला आहे. रामदासानें शिवाजीला जें पत्र पाठविलें आहे, त्यांत त्याला त्यानें 'जाणता', 'सर्वज्ञ' वगैरे विशेषणें दिलीं आहेत. तुकारामानेंहि शिवाजीस जें

पत्र पाठविलें आहे त्यांतहि शिवाजीला असाच बहुमानपुरस्सर गौरव केला आहे. वामनपंडितांनीं तर 'शिवनिर्विशेषं' ह्या पदाचा उपयोग करून शिवाजीचें व रामदासाचें ज्या अर्थी तादात्म्य वर्णिलें आहे त्या अर्थी शिवाजी सुशिक्षित होता हें कबूलच करावें लागतें. शिवाजीच्या दरबारीं शास्त्री, पंडित, वैदिक वगैरे विद्वान् लोक असत, असेंहि रामदास म्हणतो. भूषणकवि शिवाजीच्या पदरीं होता, म्हणून तुकारामानें आपल्या पत्रांत म्हटलें आहे. स्वतः शिवाजीनें कांहीं अभंग व पदेंहि रचिलीं होतीं ( रामदासाचें चरित्र पृष्ठ २९५ ). न्यायमनसुबीचीं कामें शिवाजी स्वतः पाही, असें वांई येथील तात्यासाहेब पंताच्या दफ्तरांतील कांहीं कागदांवरून म्हणतां येतें. सारांश, शिवाजी अक्षरशून्य होता म्हणून ग्रांट डफ म्हणतो तें अगदीं निराधार आहे, असें मला वाटतें. शिवाजीनें केलेल्या पदांत उर्दू शब्द बरेच आहेत ह्यावरून शिवाजीस कदाचित् फारशी व निखालस उर्दू येत होतें असेंहि विधान करण्यास अवकाश होतो. पुराणांतील कथा व वेदान्त, तसेंच गायन व अश्वशिक्षा, ह्या विद्याहि शिवाजीला अवगत होत्या. तात्पर्य, पृथ्वीवरील इतर कित्येक महापुरुषांप्रमाणेंच शिवाजीहि विद्यासंपन्न होता ह्यांत संशय नाहीं. शिवाजीनें रायगडावर हिराजीच्या हातून शंकराचें भव्य देवालय बांधविलें आहे; त्याच्या देवडीवर दोन श्लोक लिहिले आहेत ते संस्कृतांत आहेत, ह्यावरून शिवाजीला संस्कृताचा अभिमान होता व ती भाषा तो जाणत असे असें दिसतें. शिवाजी संस्कृतज्ञ होता हें त्याच्या आज्ञेवरून राज्यव्यवहारकोश निर्मिला गेला ह्या एका गोष्टीवरूनच सिद्ध आहे. मराठे लोकांना लिहिणेंवाचणें आपल्या इभ्रतीला शोभण्यासारखें नाहीं असें वाटे, म्हणून ग्रांट डफ लिहितो तें तो काय म्हणून लिहितो तें कळत नाहीं. मराठे लोक शास्त्रीपंडितांसारखे गाढे विद्वान् नाहींत ही गोष्ट कबूल आहे. परंतु सामान्य लिहिणेंवाचणें व हिशेब ठेवणें त्यांच्यापैकीं पुष्कळ लोकांना सध्यां येतें व पूर्वींहि येत होतें ही सर्वमान्य गोष्ट आहे. मराठे म्हणजे कुणबी नव्हत हें येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे. कुणबी प्रायः अक्षरशून्य असतात हें सर्वत्र महशूर आहे. परंतु अस्सल मराठे क्षत्रिय जे आहेत त्यांना स्नानसंध्या व लिहिणेंसवरणें अवश्य मानिलेलें आहे. तानाजी मालुसऱ्याच्या पवाड्यांत गुंजाळ नदीवर तानाजी माध्यान्ह संध्या करावयास गेला म्हणून तुळसीदासानें म्हटलें आहे. शिवाजीच्या विद्यासंपन्नतेसंबंधीं हा इतका वाद बस आहे. शामराज निळकंठ यास शके १५६५ त पेशवाई सांगितली त्यावेळीं सोनोपंत डबीरीवर व बाळकृष्णपंत मजमूवर होते. शके १५६७ त सोनोपंत वारल्यावर किंवा घरीं बसल्यावर, सोनोपंताचा मुलगा निळो सोनदेव यास पार्थिवनाम संवत्सरीं म्हणजे शके १५६७ त मजमू सांगितली ( शिवदिग्विजय १८६ ). बाळकृष्णपंत वारल्यावर किंवा घरीं बसल्यावर त्याच वेळीं हशमांची सबनिशी रघुनाथ बल्लाळ कोरडे याजकडे होती. शिवाजीजवळ ह्या वेळीं घोडदळ बहुतेक नसल्यासारखेंच असल्यामुळें घोडदळाची सबनिशी अद्याप अस्तित्वांत आलीच नव्हती. पायदळावरच समाधान मानून शिवाजीला शके १५६८ पर्यंत रहावें लागलें असें वाटतें. येणेंप्रमाणें शके १५६८ पर्यंत शिवाजीनें आपल्या हाताखालील हुद्देदारांची व्यवस्था कशी

लाविली त्याचें थोडेंबहुत स्पष्टीकरण झालें. आतां शके १५६८ पर्यंत शिवाजीनें जे हे इतके हुद्दे निरनिराळ्या कर्त्यासवर्त्या पुरुषांना दिले ते निव्वळ डामडौलाकरितां व मुसलमानी दरबारच्या अनुकरणेच्छेनेंच दिले नसून वेळोवेळीं त्या त्या हुद्देदारांची अवश्यकता भासली असावी म्हणूनच दिले असले पाहिजेत, हें उघड आहे. कोणीहि विचारी पुरुष मुख्य प्रधान,अमात्य, युक्त्यभिज्ञ व सेनालेखक, असे राजपुरुष आपल्या पदरीं बाळगूं लागला म्हणजे तो कांहीं तरी राजकारणांत गुंतला असावा असा निश्चयानें तर्क करावा लागतो. सैन्य असल्याशिवाय सबनीस येत नाहीं. बाहेर कांहीं राजकारण उत्पन्न झाल्याशिवाय युक्त्यभिज्ञ म्हणजे डबिराची गरज नाहीं; जमाखर्च असल्यावांचून अमात्याची जरूर नाहीं; व स्वारीशिकारीशिवाय मुख्य प्रधानाचेंहि कांहीं काम नाहीं. तेव्हां शके १५६८ पूर्वी शिवाजीनें किंवा शिवाजीच्या मसलतगारांनीं कांहीं तरी राजकारण उपस्थित केलें असलें पाहिजे. ग्रांट डफ शिवाजीच्या पराक्रमाचा प्रारंभ शके १५६८ पासून करतो, व त्याच्या आधीं शिवाजी कोंकणांत दरवडे घालीत असावा, असा निसटता उल्लेख करून पुढें जातो. तेव्हां त्याच्या ग्रंथांत शके १५६८ पूर्वीची शिवाजीसंबंधीं माहिती बिलकुल मिळावयाची नाहीं, हें स्पष्टच आहे. बाकी शके १५६८ पूर्वी शिवाजीनें राजकारण करण्यास सुरवात केली होती ह्यांत काडीमात्र संशय नाहीं. सभासदी बखरींत ह्या शके १५६८ पूर्वीच्या राजकारणासंबंधीं उडता उल्लेख आहे. "येतांच बारा मावळें काबीज केली," म्हणून सभासद लिहितो ( सभासद ६ ). "शके १५६२ यांत या मसलतीचा आरंभ करिते झाले," असें मल्हार रामराव म्हणतो ( मल्हार रामराव ३० ). 'येतांच' म्हणजे बेंगरुळाहून येतांच, बारा मावळें काबीज केलीं असा सभासदाचा आशय आहे. बेंगरुळाहून शिवाजी शके १५६० च्या शेवटीं आला व शके १५६२ सालच्या अखेरीपर्यंत तो पुण्यास होता, हें मागें दाखवून दिलेंच आहे. ह्या वर्षदीडवर्षाच्या अवधींत शिवाजीनें बारा मावळें काबीज करण्याचा उपक्रम केला, तीं कशीं काबीज केलीं ह्याचा खुलासा सभासदानें व मल्हार रामरावानें केला आहे. "मावळे देशमूख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यांस मारिलें," असा सभासदाचा खुलासा आहे. "मावळे सरदारांस मसलतींत घेऊन, त्यांस अनुकूल करून घ्यावें, त्यांस पत्रें लिहावीं व भेटावें, असें करूं लागले," म्हणून मल्हार रामराव लिहितो ( पृष्ठ ३० ). मावळांतील जे देशमूख शिवाजीला अनुकूल झाले त्यांस त्यानें बांधिलें म्हणजे आपल्याला बांधून घेतलें, जे प्रतिकूळ होते त्यांस नरम केले, व जे केवळ पुंडाई करून होते त्यांस जिवें मारिलें. बारा मावळें काबीज करण्याचा हा असा प्रकार होता. देशमुखांना अनुकूल करून घेण्यांत ज्या राजकार्यकुशल मुत्सद्याचा उपयोग झाला, त्याला डबीरीचा हुद्दा देणें अवश्य झालें. ज्या हुद्देदारानें त्यांस दस्त केलें त्यास मुख्य प्रधानकी मिळाली; आणि ज्या लहानशा सैन्याच्या जोरावर पुंडांना जमिनदोस्त केलें त्या सैन्याची व्यवस्था ठेवण्याकरितां एक सबनीस नेमावा लागला. येणेंप्रमाणें बारा मावळें काबीज करतांना, हे हुद्देदार साहजिकपणेंच अस्तित्वांत आले. हीं बारा मावळें काबीज करण्याचें काम शके १५६० च्या अखेरीस सुरूं झालें. तें चाललें असतांना, शिवाजी शके

१५६३ त विजापुरास गेला व तेथें असतांना पातशहाशीं उद्दामपणाची बालिश वर्तणूक त्याच्या हातून झाली. शके १५६० त जें उद्दाम कृत्य मावळांत सुरू झालें होतें, त्याचीच दर्शक ही विजापुरांतील शिवाजीची वर्तणूक होती, हें मनुष्यस्वभावाच्या व विशेषतः बालस्वभावाच्या अनुरूपच होतें. मुख्य प्रधान, अमात्य, युक्त्यभिज्ञ व सेनालेखक ह्या चार हुद्देदारांचा दर्जा केवळ लष्करी होता हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. मुलकी व न्याय-खात्यांतील हुद्दे उत्पन्न करण्याची आवश्यकता शिवाजीला शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत भासली नाहीं. तसेंच किल्ल्यांवरील नामजाद लोक ठेवण्याचीहि जरूरी अद्यापपर्यंत पडली नव्हती. कारण, शिवाजीच्या ताब्यांत हा काळपर्यंत एकहि किल्ला आला नव्हता. किल्ल्यांखेरीजकरून बाकीचा बारा मावळांतील बहुतेक प्रांत शिवाजीनें काबीज केला:—काबीज केला म्हणजे बारा मावळांतील देशमुखांना कांहीं अटीनें बांधून घेतलें. आतां हीं बारा मावळें कोणतीं हें नीट समजून घेतल्यानें ह्या विवेचनावर जास्त प्रकाश पडणार आहे. “ बारा मावळ पुण्याखालीं, बारा मावळ जुन्नराखालीं ” असें तानाजी मालुस-याच्या पवाड्यांत म्हटलें आहे. हिरडस मावळांतील बांदल देशमुखांच्या शके १५३६ तील एका सनदपत्रांत बारा मावळें हे दोन शब्द मीं भोर येथें रा० रा० भाऊराव भिडे यांच्या येथें वाचले आहेत. ह्यावरून जुनरापासून चाकणापर्यंत बारा मावळें व पुण्यापासून शिर-वळापर्यंत बारा मावळें अशीं एकंदर चोवीस मावळें शिवाजीच्या वेळीं प्रसिद्ध होतीं असें दिसतें. जुनरापासून चाकणापर्यंत असलेलीं १ शिवनेर, २ जुनेर, ३ मिननेर, ४ घोडनेर, ५ भीमनेर, ६ भामनेर, ७ जामनेर, ८ पिंपळनेर, ९ पारनेर, १० सिन्नर, ११ संगमनेर, १२ अकोळनेर, अशीं बारा नेरे, नहरे किंवा मावळें प्रसिद्ध आहेत. येथें जुन्नर ह्या नांवां-संबंधानें संक्षिप्त उल्लेख करणें जरूर आहे. दक्षिणच्या इतिहासांत डॉ. भांडारकर म्हणतात कीं जुन्नर हा शब्द जुन्नर, जुननेर, जूर्णनगर व जीर्णनगर, अशा परंपरेनें जीर्णनगर म्हणजे जुनें नगर ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. माझ्या मतें जुन्नर, हा शब्द शिवनेर, भीमनेर वगैरे शब्दाप्रमाणें जुन्नर, जुन्नेर, जिवनेर, व जीवनीर अशा परंपरेनें जीवनीर ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. जीव हें जुन्नराजवळील एका ओढ्याचें पुरातन नांव असावें. जुन्नराच्या पश्चिमेस व नाणे घाटाच्या दक्षिणेस जीवधन नांवाचा एक किल्ला आहेच. जीवधन हा किल्ला व जीवनीर हें गांव ह्यांना जीव नदीपासून नामाभिधान प्राप्त झालें असावें. वर दिलेलीं नांवें जुन्नराखालीं मोडणाऱ्या बारा मावळांचीं होत. पुण्याखालील बारा मावळें म्हटलीं म्हणजे १ अंदरमावळ, २ नाणेमावळ, ३ पवनमावळ, ४ घोटणमावळ, ५ पौड खोरें, ६ मोसेंमावळ, ७ मुठेंमावळ, ८ गुंजणमावळ, ९ वेळवंडमावळ, १० भोरखोरें, ११ शिवतरखोरें, १२ हिरडसमावळ. हीं बारा होत. हीं बारा मावळें म्हणजे उत्तरेस राजमाची व चाकण ह्या स्थानांपासून दक्षणेस रायरेश्वराचा डोंगर, अंबेडाखिंड खांबटकीचा घांट, ह्या स्थानांपर्यंतचा मुलूख होय. ह्या मुलखापैकीं राजमाचीचा किल्ला कल्याणभिंवडी येथील मुलाणा अहमदाकडे होता; लोहगडावरून बिलाल हपशी अंदर, नाणें व पवन ह्या मावळांचा बंदोबस्त ठेवी; चाकणचा किल्ला फिरंगोजी नरसाळ्याकडे होता; घोटणमावळ, पौडखोरें,

मोसेमावळ व मुठेंमावळ त्या त्या देशमुखांच्या ताब्यांत होतीं; गुंजणमावळ तोरण्यावरील किल्लेदाराच्या देखरेखीखालीं होतें; वेळवंड व भोर हीं तेथील देशमुखांच्या अधिकारांत होतीं; हिरडसमावळांत बांदल देशमुख नांदत होते; व शिवतरखोरें बाबाजी कोंडदेवाच्या ताब्यांत होतें. ( चित्रगुप्त ५ ). मावळांच्या पूर्वेकडील मुलुखांत पुणें व सिंहगड दादोजी कोंडदेवाकडे होतें; पुरंदर किल्ला निळो निळकंठ नाइकवाडी यांच्या ताब्यांत होता व सुपें प्रांतावर शहाजीचा मेहुणा संभाजी मोहिता होता. येणेंप्रमाणें शके १५६० च्या सुमारास राजमाची, लोहगड, चाकण, पुरंदर, तोरणा व रोहिडा ह्या किल्ल्यांच्या मध्यें पुणें प्रांतांत शिवाजीची स्थापना झाली होती. पुणें प्रांताची हद्द उत्तरेस इंद्रायणी, दक्षिणेस बनेश्वर, कापूरहोळ, व पाद्याघाट, पूर्वेस सुपें प्रांत व पश्चिमेस लोहगड व तुंग तिकोना अशी होती. ह्या लहानशा मध्य प्रांतांत राहून शिवाजीला, अथवा खरें म्हटलें असतां, त्याच्या मुत्सद्यांना बाहेरच्या लगत्याच्या प्रांतांत आपला अंमल बसवावयाचा व पसरावयाचा होता. ह्या खटपटीचा उपक्रम शके १५६० पासून शके १५६८ पर्यंतच्या अवधींत बारा मावळांतील देशमुखांना दस्त करून व बांधून ह्या मुत्सद्यांनीं केला. हा उपक्रम चालू असतांना शिवाजीच्या मुत्सद्यांनीं शहाजीच्या जहागिरींत दोन प्रकारची राज्यव्यवस्था ठेविली होती असें म्हणण्यास आधार आहे. विजापूरच्या पातशाहीखालीं शहाजीची जहागीर असल्यामुळें सदर जहागिरींत अंमलदार लोक शिवाजीच्या मुत्सद्यांनीं निराळे ठेविले व शिवाजीच्या नांवानें नवीन उपस्थित केलेल्या सत्तेच्या दिमतीनें अधिकार मिळालेले अंमलदार निराळे ठेविले. म्हणजे पुणें प्रांतांतील सुभेदार, काजी, मुजुमदार, हवालदार, मोकदम वगैरे पातशाही अंमलदार अगदीं भिन्न असून, नवीन राज्य संपादण्याच्या कामीं मेहनत करणारे मुजुमदार, सबनीस, डबीर, पेशवे वगैरे अधिकारीहि भिन्न होते. काव्येतिहाससंग्रहकारांच्या दप्तरांतील दादोजी कोंडदेवाचा एक महजर माझ्याजवळ आहे. हा महजर शके १५६८ व्ययनाम संवत्सरे सु॥ सबा आर्बैन व अलफ छ २५ रबिलाखर म्हणजे ज्येष्ठ व॥ १२ स लिहिलेला आहे. सदर मितीस भरलेल्या पुणें येथील हुजूर हजीर मजालसींत खालील पातशाही अम्मलदार होतेः—१ काजी अबदुला बिन काजी इस्मायल नख काजी, प्रांत पुणें; २ राजश्री दादाजी कोंडदेव सुभेदार नामजाद, किल्ले कोंढाणा, महालनिहाय, प्रांत पुणें; ३ गोमाजी हवालदार, प्रांत पुणें; ४ नारो सुंदर मुजुमदार, प्रांत पुणें; ५ म्हालोजी झांबरा, मोकदम कसबे पुणें; ६ मालोजी नरसिंगराव व विठाजी नाईक शितोळे देशमुख, प्रांत पुणें. शहाजीचा मुख्य प्रधान अथवा सुभेदार दादोजी कोंडदेव होता; शिवाजीचा मुख्य प्रधान शामराव निळकंठ होता. शहाजीचा मुजुमदार नारो सुंदर होता; शिवाजीचें बाळकृष्णपंत व निळो सोनदेव हे होते. शहाजीचा म्हणजे पातशहाच्या तर्फेचा हवालदार म्हणजे प्रांतांतील सैन्याचा अधिकारी गोमाजी होता; शिवाजीचा सेनापती खुद्द शिवाजीच होता, स्वतंत्र असा कोणीच अद्याप नव्हता. येणेंप्रमाणें पातशहाचें व शिवाजीचें अधिकारी अगदीं निरनिराळे होते. पातशाही सुभेदार दादोजी कोंडदेव ह्याचा संबंध शिवाजीच्या नवीन राज्यव्यवस्थेशीं वरकरणी बिलकुल नव्हता. बाकी अंतस्थ रीतीनें शिवाजीच्या नवीन

राज्याची उभारणी पुणें प्रांतांत दादोजीच करीत असला पाहिजे हें उघड आहे. शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत होऊं घातलेल्या ह्या नवीन राज्याचें स्वरूप विचार करण्यासारखें आहे. राज्याचें लक्षण म्हटलें म्हणजे त्याला विशिष्ट देश, विशिष्ट प्रजा व विशिष्ट राजा अशीं तीन अंगें अवश्य हावीं. परंतु शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत होऊं घातलेल्या शिवाजीच्या राज्याला पाहिलीं दोन अंगें मुळींच नव्हतीं. चाकणापासून रोहिड्यापर्यंतच्या देशमुखांना शिवाजीनें बांधून घेतलें होतें खरें; परंतु त्या प्रदेशांतील एक हातभरहि जागा--पातशाहाची नसून केवळ शिवाजीची अशी म्हणण्यासारखी नव्हती. शिवाजीची सत्ता देशमुखांच्या हृदयांत दहशतीच्या रूपानें व देशमुखांच्या प्रजेच्या मनांत प्रीतीच्या रूपानें वसत होती. शिवाजी व शिवाजीचें मंत्रीमंडळ राजसत्तेचें स्वरूप धारण करून बसलें होतें. येणेंप्रमाणें शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत शिवाजीचें राज्य विशिष्ट देशावांचून व बाह्यतः विशिष्ट प्रजेवांचून आस्तित्वांत येत होतें. शिवाजीच्या मनांत सामान्यतः देशमुखांविषयीं जी अढी कायमची बसली तिचें कारण मावळच्या देशमुखांचें व देशपांड्यांचें व शिवाजीचें ह्या वेळचें दळणवळण होय. देशमुखांच्या सत्तेचा मुख्य उगम विजापूरच्या पातशहाच्या सत्तेंत असल्यामुळें, शिवाजसारख्या नव्या राजपुरुषाला त्यांनीं अडथळा करावा हें योग्यच होतें. पुण्यापासून दहा वीस कोसांच्या आंत जेवढे म्हणून देशमुख होते, तेवढे प्रथम पादाक्रांत करणें शिवाजीला अवश्य झालें. कांकीं पातशाही सत्तेचे अगदीं शेवटले असे सामर्थ्यवान् प्रतिनिधी म्हटले म्हणजे हे देशमुखच होते. तेव्हां प्रथम नवीन राज्य स्थापित करण्याच्या अवाढव्य कामीं मावळच्या देशमुखांची व्यवस्था लावणें शिवाजीला भाग पडलें तें रास्तच होतें. कोणत्या देशमुखाला शिवाजीनें केव्हां दस्त केलें किंवा बांधून घेतलें हें सांगतां येण्यास अद्याप कांहींच आधार सांपडलेला नाहीं. इतकें मात्र खास आहे कीं, शके १५६० पासून पुढें पांच सहा वर्षें हा उपक्रम चालला होता. मावळांतील देशमुखांना दस्त करण्याचें कृत्य शके १५६८ त संपूर्ण झालें असावें. निश्चयानें ह्याच वर्षाच्या सुमारास झालें असें मात्र विधान करण्यास कांहींच विश्वसनीय आधार नाहीं. ग्रांट डफ कोणत्या तरी बखरीच्या आधारावर शके १५६८त शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला असें लिहितो, त्या अर्थीं देशमुखांना दस्त करण्याचें काम शिवाजीनें शके १५६८ च्या सुमारास कदाचित् संपविलें असावें असें मीं संदिग्ध विधान केलें आहे. शके १५६८ त शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला हें विधान कोणत्या विशिष्ट बखरीच्या आधारावर आपण करतों ह्याचा खुलासा ग्रांट डफनें केला नाहीं. मला उपलब्ध असलेल्या कोणत्याहि बखरींत तोरणा किल्ला घेतल्याचा शक किंवा फारशी सन दिलेला नाहीं. यद्यपि ग्रांट डफच्या जवळ असलेल्या बखरींत हा शक किंवा सन दिलेला असला तरी तो इतर अस्सल प्रमाणांच्या अभावीं खरा कां धरावा हा माझा ग्रांट डफच्या लिहिण्यावर आक्षेप आहे. येथें बहिःप्रमाणांच्या अभावीं बखरींतील शक किंवा सन कोणत्या रूपानें दिला असल्यास विश्वसनीय मानावा, ह्यासंबंधीं विचार करणें योग्य दिसतें. बखरींतून एखाद्या प्रसंगाचा नुसता सन किंवा शक दिलेला असेल तर तो शक किंवा सन

खरा धरून चालणें प्रायः उपयोगाचें नाहीं. सन आणि शक दिला असेल तर तो काल त्या प्रसंगाचा बव्हंशीं खरा मानावा. सन किंवा शक, अथवा सन आणि शक देऊन शिवाय तिथी किंवा चंद्र अथवा तिथी आणि चंद्र, दिला असला तर ती मित्ती बिनहरकत खरी मानावी. वरच्या सर्व बाबी देऊन, शिवाय वारहि दिला असेल तर ती मित्ती हटकून खरी आहे असें धरून खुशाल चालावें. हा विचार बखरींतील सन व शक ह्यासंबंधीं झाला. महजरांतील साक्षींत नुसता सन किंवा नुसता शक दिला असल्यास तो विश्वसनीय धरावा लागतो. महजरांचा उल्लेख ह्या स्थलीं करण्याचें कारण असें कीं, सतराव्या व सोळाव्या शतकांतील अनेक प्रसंगांच्या कालाचा निर्णय त्या वेळच्या महजरांतून दिलेल्या साक्षींतील मजकुरावरूनच प्रायः व्हावयाचा आहे, असा कित्येक महजर पाहून माझा ठाम ग्रह झालेला आहे. सतराव्या शतकांतील इतिहासासंबंधीं बखरींतील मजकुराच्या हकीकतीची व कालाची विश्वसनीयता ताडून पहाण्यास जीं बहिःप्रमाणें आणावीं लागतात, त्यांत ह्या महजरांची मातब्बरी विशेष आहे. अठराव्या शतकांतील इतिहासाची निश्चितता ठरविण्यास जें सहाय्य अस्सल पत्रांचें होत असतांना आपण पहात आहों तेंच सहाय्य सतराव्या व सोळाव्या शतकांतील इतिहासाला अस्सल पत्रांच्या अभावीं ह्या महजरांतील मजकुरापासून अंशतः होणार आहे. आतां तोरणा किल्ला घेतल्याचें साल ग्रांट डफनें वरील प्रमाणें लावून ठरविलेलें आहे असें दिसत नाहीं; व ह्याच कारणाकरितां तें मी खरें मानीत नाहीं. बाकी दादोजी कोंडदेवाच्या मृत्यूच्या अगोदर तोरणा किल्ला घेतला गेला असावा, हें निश्चित आहे. परंतु, तोरणा अगोदर घेतला किंवा रायगड अगोदर बांधला हें पहाण्यासारखें आहे. शिवदिग्विजयांत राजगड अगोदर बांधला म्हणून म्हटलें आहे. मल्हार रामराव तोरणा प्रथम घेतला असें लिहितो. शके १५६० त मावळांतील देशमुखांस दस्त करण्याची कल्पना जेव्हां प्रथम निघाली तेव्हां व पुढें एखादा तरी किल्ला हातांत असावा असें त्या वेळच्या मुत्सद्यांना साहजिक वाटलें असावें. देशमुखांना दस्त करीत असतांना मुरबाडच्या डोंगरांतील दुरजादेवीच्या पर्वतावर किल्ला बांधण्याचा उपक्रम चार पांच वर्षें चालला असावा असें दिसतें. कां कीं कोणताहि किल्ला वर्ष सहा महिन्यांत नवीन असा बांधून निघणें दुरापास्त आहे. नवीन किल्ला तयार करण्यास चार पांच वर्षें निदान लागावी असा अदमास दिसतो. तेव्हां तोरणा किल्ला घेण्याच्या सुमारास राजगडचा किल्ला संपूर्ण होत आला असावा व राजगड संपूर्ण होतांना तोरणा स्वाधीन करून घेण्याची आवश्यकता भासली असावी असें वाटतें. मावळांतील दस्त केलेल्या व दस्त करूं घातलेल्या देशमुखांना दहशत पडण्याकरितां एखादा किल्ला हातांत असणें जरूर होतें. जर प्रथम तोरणा किल्ला शिवाजीच्या हस्तगत झाला असता, तर राजगड नवीन बांधित बसण्याच्या खटपटींत पडून शिवाजीनें मेहनतीचा व पैशाचा व्यर्थ व्यय केला नसता. प्रांताचें संरक्षण करण्याकरितां एखादा किल्ला असावा अशी जेव्हां प्रथम कल्पना निघाली तेव्हां आसपासच्या किल्लेदारांना वश करण्याचा प्रयत्न झाला असावा. तो प्रयत्न सफल होत नाहीं असें पाहून नवीन किल्ला बांधण्याची खटपट करावी लागली. राजगड बांधलेला पाहून तोरण्याची दुराधिगम्यता नष्ट झाली व तो

किल्ला शिवाजीच्या हातांत पडला. येणेंप्रमाणें राजगड बांधण्याचें व तोरणा घेण्याचें काम परस्परावलंबी होतें. व बखरनविसांच्या साध्या भोळ्या लिहिण्याप्रमाणें सोपें नव्हतें हें उघड आहे. राजगड बांधण्यास व तोरणा घेण्यास शिवाजीला एक विशिष्ट कारण होतें. तें हें कीं राजगडच्या व तोरण्याच्या दक्षणेस रोहिड खोऱ्यांत बांदल देशमूख रहात असत. त्यांना अद्याप शिवाजीनें दस्त केलें नव्हतें किंवा बांधूनहि घेतलें नव्हतें. बांदलांसारख्यांना दस्त करण्यास एखादा किल्लाच हातांत असणें जरूर होतें व ही जरूरी भागवण्याकरितां राजगड बांधला व तोरणा काबीज केला. येणेंप्रमाणें पुण्याखालील बारा मावळें काबीज करतांना हे दोन किल्ले शिवाजीनें आपल्या ताब्यांत आणिले. किल्ले व महाल असा संगीन प्रदेश शिवाजीला प्राप्त झाला; महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ भक्कम रोविली गेली; व राज्याचीं सर्व अंगें म्हणजे विशिष्ट देश, विशिष्ट प्रजा व विशिष्ट राजा—सिद्ध झालीं. हा प्रकार केव्हां व कोणत्या वर्षीं झाला, हें समजण्यास विश्वसनीय आधार नाहीं, हें सांगितलेंच आहे. व तोरणा घेईपर्यंत शिवाजीच्या चरित्राचा सामान्य इतिहास हा असा असावा असें दिसतें. शके १५६८ पर्यंतचें व तदनंतर कांहीं वर्षांचें शिवाजीचें चरित्र नीट समजत नाहीं असे उद्गार ग्रांट डफनें आपल्या इतिहासाच्या तिसऱ्या भागाच्या शेवटीं काढिले आहेत. त्यांचें कारण " बारा मावळें पुण्याखालीं व बारा मावळें जुनराखालीं " ह्या पोवाड्यांतील वाक्याची यथास्थित फोड त्याला करतां आली नाहीं हें आहे. शके १५६८ पर्यंतचा इतिहास लिहितांना ग्रांट डफनें बखरींखेरीज इतर कोणताहि विश्वसनीय आधार घेतला नाहीं. शके १५६० पासून शके १५६८ पर्यंतचा बखरींतील मजकूर बहुत तुटपुंजा, धरसोडीचा व अपुरा असा आहे. त्याच्यापासून आविश्वसनीय अशी मित्तीवार माहिती फारशी मिळण्याचा संभव नाहीं. बहिःप्रमाणांचें जर सहाय्य मिळालें तरच बखरींतील मजकुराचें कालानुक्रमानें वर्गीकरण करण्याची सोय होणार आहे, व बखरींतलि लहानमोठ्या वाक्यांचा अर्थ विस्तारानें ध्यानांत येणार आहे. ही गोष्ट, शके १५६० पासून तोरणा घेईतोंपर्यंतचा शिवाजीचा जो थोडासा पूर्वेतिहास मीं रचिला आहे, त्यावरून ध्यानांत येणार आहे. ह्या पूर्वेतिहासाची रचना करण्यास [ १ ] पुण्याखालील व जुन्नराखालील मावळांची कच्ची माहिती, [ २ ] तेथें त्या वेळीं असणाऱ्या देशमुखांचीं नांवें, ( ३ ) निरानिराळ्या देशमुखांचे परस्पर संबंध व शिवाजीशीं व पातशाहाशीं दळणवळण, ( ४ ) शिवाजीनें नेमलेल्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या सनदांचीं सालें, वगैरे बहिःप्रमाणें जर मला मिळालीं नसतीं तर " येतांच बारा मावळें काबीज केलीं " ह्या सभासदी वाक्याची विस्तारानें फोड करतां खचित आली नसती. शेवटलीं तीन बहिःप्रमाणें त्या वेळच्या महजरांखेरीज इतरत्र मिळणें दुरापास्त आहे. अधिकाऱ्यांना मिळालेल्या सनदांच्या सालांखेरीज, एक दोन मित्या वगळल्या असतां, बखरींतील बाकीच्या बहुतेक मित्या फारशा विश्वसनीय नाहींत. ह्या वगळलेल्या मित्यांत शिवाजीच्या पहिल्या लग्नाची मित्ती समाहृत करण्यासारखी आहे असें मला वाटतें. कां कीं त्या मित्तीस शक दिला असून शिवाय महिना व तीथ ही

दिली आहे. बखरकार, महिना, दिवस, तिथि वगैरे बारीक माहिती जेव्हां देतात तेव्हां ती ते प्रायः जुन्या टिपणांतून देतात, व हीं जुनीं टिपणें बरींच विश्वसनीय असतात. बारीक तिथि, वार वगैरे माहिती देतांना बखरकार कधीं चुकत नाहींत, असें मात्र समजण्यांत अर्थ नाहीं. शिवाजीच्या जन्मतिथीसंबंधीं बखरकारांनीं काय काय गफलती करून ठेविल्या आहेत त्यांची फोड मागें मीं केली आहे त्यावरून वरील विधानाची सत्यता दिसून येईल. सारांश शके १५६० पासून तोरणा किल्ला घेईतोंपर्यंतचा इतिहास रचतांना केवळ बखरकारांच्या लिहिण्यावर भिस्त ठेवून काम भागण्यासारखें नाहीं. बहिःप्रमाणांचा पाठिंबा ह्या वेळच्या इतिहासरचनेस अतिशय हवा. ह्या शंकास्थानांत शके १५६० पासून तोरणा घेईतोंपर्यंतच्या इतिहासाचें ठोकळ स्वरूप कसें असेल ह्याचा ओबडधोबड नकाशा मीं काढिला आहे. ह्या इतिहासांतील प्रत्येक प्रसंगाची मित्ती देतां आली नाहीं हें तर स्पष्टच आहे. परंतु प्रसंगांची जी विस्तृत म्हणून माहिती दिली आहे, ती निःसंशय अत्यंत कोती आहे. तोरणा किल्ला घेईतोंपर्यंत विजापूरच्या दरबाराकडून, मावळांतील देशमुखांकडून, व शिवाजीच्या जवळच्या माणसांकडून शिवाजीला काय काय त्रास पोहोंचला असेल ह्याची कल्पना वाचकांस करतां येण्यासारखी आहे. ह्या त्रासाचा यत्किंचित्‌हि उल्लेख करतां येण्यास बखरींतून आधार मिळाला नाहीं. व बाकी ह्या त्रासाचें खरें स्वरूप कळल्यावांचून त्या त्या वेळच्या इतिहासाची व शिवाजीवर आलेल्या प्रसंगांची व्यवस्थित कल्पना होणार नाहीं. येणेंप्रमाणें शिवाजीच्या चरित्रांचा बखरकारांनीं वर्णिलेला पूर्वेतिहास शंकांनीं पदोपदीं घेरला आहे, हें उघड आहे. तोरणा किल्ला घेण्याच्या नंतरचा इतिहासहि असाच शंकाग्रस्त आहे हें पुढील शंकास्थानावरूनच स्पष्ट होईल.

---

## शंकास्थान दुसरें.

ज्या वेळीं शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला, त्या वेळीं शहाजी कोठें होता व काय काय करीत होता किंवा करण्याचा बेतांत होता हें शोध करण्यासारखें आहे. ह्या वेळीं शहाजी विजापूरास होता असें मल्हार रामराव चिटणीस (पृष्ठ३०) व शिवदिग्विजयाचा कर्ता ( पृष्ठ ११६ ) म्हणतात. ह्याला प्रत्यंतर पुरावा " विजापूरच्या पातशहांची बखर " ह्या ग्रंथांत आहे. ह्या ग्रंथाचे कांहीं भाग भारतवर्ष मासिक पुस्तकांत छापले आहेत. त्यांत ह्या ग्रंथाचें भाषांतरकर्तृत्व भारतवर्षकार सातारा येथील प्रभू पारसनवीस यांस देतात. काव्येतिहाससंग्रहकारांच्या दप्तरांतील ह्याच ग्रंथाची एक प्रत मजजवळ आहे. तिच्या शेवटीं हा ग्रंथ शके १७४४ च्या श्रावण व॥ ४ स पांडुरंग वासुदेव मामलतदार, पेठ विजापूर, ह्यांनीं मूळ फारशीवरून भाषांतरित केला असें स्पष्ट लिहिलेलें आहे; त्याअर्थी भारतवर्षकारांचें लिहिणें साधार नसावें अशी शंका येते. ह्या फारशी बखरींत "हिजरी सन १०५७

सालीं मुस्तफाखा याणें सारे अमीर बराबर घेऊन फौजसुद्धां कर्नाटकची स्वारी केली; तीन तुकड्या करून साऱ्याचें पुढें शहाजी राजे व असदखा होते, " असें म्हटलें आहे. काव्येतिहाससंग्रहांतील ४३८ व्या यादींत म्हणजे शहाजीच्या बखरींत " हिजरी सन १०५७ त मुस्तफाखान यास फौज देऊन कर्नाटकास रवाना केलें. पेशजी शहाजी महाराज व असदखान यांस रवाना केलें, " असें लिहिलें आहे. हिजरी सन १०५७ शके १५६८ च्या माघांत सुरू होतो, त्याअर्थी शहाजीस शके १५६८ च्या पावसाळ्यानंतर कर्नाटकांत पाठविलें असावें असें " पेशजी " ह्या शब्दावरून ठरतें. अर्थात् शके १५६८ च्या सप्टेंबरच्या अगोदर शहाजी विजापुरास असावा असें कबूल करणें भाग पडतें. शहाजी विजापुरास असतांना तोरणा किल्ला घेतल्याची कागाळी त्याजकडे आली, त्याअर्थी तोरणा किल्ला शके १५६७ च्या शेवटीं किंवा शके १५६८ च्या आरंभीं शिवाजीनें घेतला असावा, हें जें ग्रांट डफ म्हणतो त्याला किंचित् बळकटी येते. पहिल्या शंकास्थानांत उल्लेखिलेल्या दादोजी कोंडदेवाचा महजर शके १५६८ च्या वैशाखांत लिहिला गेला त्याअर्थी तोरणा किल्ला घेण्याच्या वेळीं व शिवाजीची कागाळी शहाजीच्या कानीं जाण्याच्या वेळीं दादोजी कोंडदेव जिवंत होता व तो शके १५६८ तच मेला असल्यास त्या वर्षाच्या शेवटीं मेला असावा असा तर्क करावा लागतो. शिवदिग्विजयांत ( पृष्ठ ११९ ) दादोजी शके १५६२ विक्रमनामसंवत्सरीं वारला म्हणून म्हटलें आहे. परंतु शके १५६२ त विक्रम संवत्सर नव्हता व शके १५६८ त दादोजीनें एक महजर लिहिला त्याअर्थी ही मित्ती खोटी आहे. खरी मित्ती शके १५७२ विकृति नाम संवत्सर म्हणजे इ. स. १६५० असल्यास नकळे. शहाजी कर्नाटकच्या स्वारीस गेल्यावर त्याचें व नवाब मुस्ताफाखा याचें वांकडें पडून युद्ध झालें. त्यांत शहाजीचा मोड होऊन बाजी घोरपडे यानें हिजरी १०५७ च्या १५ रजबी (विजापूरच्या पातशहांची बखर, प्रकरण सहावें ) म्हणजे शके १५६९ च्या श्रावण व॥ २ स शहाजी महाराजाला धरून मुस्तफाखाच्या स्वाधीन केलें. शहाजीचा मित्र शिद्दी रेहान याचें व मुस्तफाखा याचें वाकडें असल्यामुळें शहाजीचें व मुस्तफाखाचेंहि वांकडेंच होतें. शिवाजीनें तोरणा किल्ला घेतल्यावर लवकरच शहाजी कर्नाटकच्या स्वारीस निघून गेला. परंतु शिवाजीच्या बंडाला शहाजीची फूस, कदाचित् मदत, असावी, अशी जी शंका शहाजी विजापुरास असतांना आली ती शके १५६९ त तरी अगदीं सत्यप्राय भासूं लागली. कारण इकडे शिवाजीनें ज्याप्रमाणें राजरोस बंडाचा झेंडा उभारला होता त्याप्रमाणें तिकडे कर्नाटकांत शहाजीनेंहि नवाब मुस्तफाखाशीं भांडण सुरूं केलें होतें, अर्थात् शहाजीला कैद करणें विजापूरच्या मुत्सद्यांना भाग पडलें. शहाजीला शके १५७१ त कैद केलें, असें ग्रांट डफ म्हणतो त्याला त्यानें कांहींच विशिष्ट आधार दिला नाहीं. तोरणा किल्ला घेतल्यावर सुप्याच्या संभाजी मोहित्यास शिवाजीनें फाल्गुनांत दस्त केलें, असें ज्याअर्थी सभासद म्हणतो त्याअर्थी शके १५६८ च्या फाल्गुनांत शिवाजीनें मोहित्याला दस्त केलें असावें व शके १५६८ च्या फाल्गुनाच्या आधीं तोरणा किल्ला शिवाजीनें घेतला असावा असें म्हणावें लागतें. निळकंठराव नाईकवाड्यांच्या पुत्राच्या सहाय्यानें दिवाळींत शिवाजीनें

पुरंदर किल्ला घेतला असें ज्याअर्थी शिवदिग्विजयकार म्हणतो ( पृष्ठ १२१ ) त्याअर्थी शके १५६८ च्या कार्तिकांत हें कृत्य झालें असावें असा अंदाज होतो. फिरंगोजी नरसाळ्याकडून चाकणहि शके १५६८ तच घेतलें असावें असें वाटतें. येथपर्यंत सालांचा धरमधोक्यानें कांहीं थोडाबहुत पत्ता लाविल्यासारखा भास होतो. ह्यापुढें शिवदिग्विजयांत, मल्हार खंडेराव चिटणीस यांच्या सप्तप्रकरणात्मक चरित्रांत व सभासदी बखरींत अफझलखानाच्या वधापर्यंत जो मजकूर दिला आहे त्याचा एकाचा मेळ दुसऱ्याला बसत नाहीं. तसेंच ग्रांट डफनें कोणत्या आधारावर शके १५६९ पासून शके १५८१ पर्यंतच्या ऐतिहासिक मजकुराची व्यवस्थित मांडणी केली, तेंहि कळण्यास पूर्ण मार्ग नाहीं. सप्तप्रकरणात्मक चरित्रांत शके १५६८ पासून शके १५८१ पर्यंतच्या प्रसंगांचा सूक्ष्म अनुक्रम येणेंप्रमाणें आहे. बाजी मोहिल्याकडून सुपें घेतल्यावर, ( १ ) कांगोरी, तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुवारी, भोरप, घनगड, केळणा हे किल्ले घेतले; ( २ ) बांदल देशमुखांचा रोहिडा किल्ला घेतला; ( ३ ) विजापुराहून आलेल्या पांचशें पठाणांस चाकरीस ठेविलें; ( ४ ) सोडवळकर व कोडवेळकर यांच्या बोलावण्यावरून कोकणांतील तळाघोसाळा घेतला व बिरवाडीजवळ खाचीमेट किल्ला बांधिला; ( ५ ) गोवेळकर सांवतापासून भवानी तरवार मिळविली; ( ६ ) हरिहरेश्वरास जाण्यांत जंजिऱ्याचें व राजापूरचें राजकारण पक्कें न दिसल्यामुळें माघारे फिरले; ( ७ ) बाळाजी आवजी कर्ज फिटल्यावांचून महाराजांचे पदरीं राहीना; ( ८ ) वर घाटीं येतां दळवी मोडिले; ( ९ ) शके १५६८ त रायगड घेतला व लिंगाणा बांधिला; ( १० ) आबाजी सोनदेवानें कल्याण प्रांत घेतला; ( ११ ) मुलाणा हयातीची सून सोडून दिली; ( १२ ) आबाजी सोनदेवाच्या हस्तें जंजिरे येथील राजकारण सांगितलेप्रमाणें न झालें म्हणून मोरो त्रिमळ पिंगळे यांस पेशवाई काढून दिली; ( १३ ) बाळकृष्णपंतास मजमू, अनाजी दत्तोस सुरनिशी, गंगो मंगाजीस वाकनिशी, नेताजी पालकरास सरनोबती, राघो बल्लाळास सबनिशी, एसाजी कंकास पायेलोकांची सरनोबती वगैरे अधिकार दिले; ( १४ ) चंदनवंदन, केळणा, पांडवगड, नांदगिरी, हे किल्ले घेऊन साताऱ्यास आले; ( १५ ) परळी, पन्हाळा, शिराळें, पावनगड, विशाळगड, बावडा, रांगणा घेतले; ( १६ ) राजापूर लुटलें; ( १७ ) जंजिऱ्यांत ठाणें वसविलें; ( १८ ) शके १५७० त बाळाजी आवजीस चिटणिसी सांगितली; ( १९ ) शृंगारपूरच्या सुर्व्यांस त्रस्त केलें; ( २० ) प्रभाकरभटाचे पुत्रांस उपाध्येपण सांगितलें; ( २१ ) चेऊल लुटलें; ( २२ ) बाजी शामराज शिवाजीस महाडास धरावयास आला; ( २३ ) बाजी घोरपड्यानें शहाजीस धरिलें; ( २४ ) दिल्लीस येण्याविषयीं पत्रें आलीं; ( २५ ) औरंगझेब दिल्लीस जाऊन तक्तावर बसतो; ( २६ ) माहूरच्या देशमुखिणीस रायबागीण किताब मिळाला; ( २७ ) शहाजी महाराजास भिंतींत चिणून कोंडिलें; ( २८ ) रणदुल्लाखान, मुरारपंत व सर्ज्याखान यांच्या रदबदलीनें शहाजी सुटला; ( २९ ) सुलतान शिकंदर वारला; ( ३० ) मुरारपंताला मारिलें; ( ३१ ) शिवाजीनें किल्ला कोसाणा तानाजी मालुसरे याजकडून घेवविला; ( ३२ ) त्याचें प्रसिद्धगड नांव ठेविलें; ( ३३ )

नगर शहर मारिलें; ( ३४ ) निळो निळकंठापासून पुरंदर घेतला; ( ३५ ) जेजुरींत वाडा बांधिला; ( ३६ ) सुंदर स्त्रीस सासऱ्याकडे पाठविलें; ( ३७ ) मोरो त्रिमळास नाशिक प्रांतीं पाठविलें; ( ३८ ) शके १५७७ त मोऱ्यांस मारिलें; ( ३९ ) प्रतापगड बांधिला; ( ४० ) बेदरावर स्वारी केली; ( ४१ ) जुन्नर मारिलें व चाकण घेतलें; (४२) शके १५७९ ज्येष्ठ शुद्ध १२ स संभाजी जन्मला; ( ४३ ) तुकारामाची भेट झाली; (४४) शके १५७१ त रामदास स्वामींची भेट झाली; ( ४५ ) अफजलखानप्रकरण. येणेंप्रमाणें सप्तप्रकरणात्मक चरित्रांतील मजकुराचा अनुक्रम आहे. ( १ ) मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टी कवींना कधीं तरी घडल्या हें खरें आहे. ( २ ) परंतु ज्या अनुक्रमानें त्या नमूद केलेल्या आहेत त्याच अनुक्रमानें घडल्या किंवा कसें ह्यासंबंधीं संशय आहे. ( ३ ) तसेंच मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टींतील बारीक तपशील जसा दिला आहे तसाच असेल असेंहि खात्रीनें सांगवत नाहीं. पहिल्या कलमाचें समर्थन करण्यास विशेष पुरावा पाहिजे असें नाहीं. मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टी शिवाजीच्या चरित्रांत घडल्या, हें मराठ्यांच्या सतराव्या शतकांतील इतिहास जाणणाऱ्यांस माहीत आहे. दुसऱ्या कलमाचें समर्थन करण्यास खालील पुरावा देतां येतो. बाजी मोहित्याच्या हातचा सुपें महाल घेतल्यावर कांगोरी वगैरे किल्ले घेतले, मावळें सारीं घेतलीं व देशमुख ममतेंत घेतलें. नंतर थोड्याच दिवसांनीं शके १५६८ त कोंकणांत उतरून रायगड किल्ला घेतला व कल्याणावर आबाजी सोनदेवाकडून स्वारी करविली. पुढें लवकरच पांडवगड, चंदनवंदन, नांदगिरी, सातारा, परळी, पन्हाळा वगैरे बावड्यापर्यंतचे सर्व किल्ले घेऊन शके १५७० त राजापूर लुटलें व बाळाजी आवजीस चिटणीशी सांगितली. बाळाजी आवजीस चिटणीशी शके १५७० त मिळाली हें बरेंच विश्वसनीय आहे. शके १५६८ त रायगड घेतला हेंहि तितकेंच विश्वसनीय आहे. रायगड घेतल्यावर कल्याणावर स्वारी करून मुलाणा अहमद ह्याचा खजिना लुटून त्याला विजापुरास पाठविलें. मुलाणा अहमद विजापुरास गेल्यावर नंतर शके १५६९ च्या वैशाखांत शहाजी धरला गेला असेल, हें खरें मानलें—खोटें तरी कां मानावें तें समजत नाहीं—तर मुलाणा अहमदाला लुटणें, रायगड घेणें, भवानी तरवार मिळविणें, कांगोरी वगैरे किल्ले घेणें हे पराक्रम शके १५६८।६९ त घडले असले पाहिजेत. हे जर पराक्रम शके १५६८।६९ त घडले असे गृहीत धरलें, तर त्यांच्या पाठीमागें, सुपें, पुरंदर, तोरणा, राजगड वगैरे स्थलें शिवाजीनें शके १५६८ च्या अगोदर घेतलीं असलीं पाहिजेत. ह्याच कारणाकरितां तोरणा शके १५६८ त घेतला असें जें ग्रांट डफ म्हणतो, त्यावर माझा विश्वास नाहीं. मुलाणा अहमदाला शके १५७० त शिवाजीनें लुटलें असें जें ग्रांट डफ म्हणतो तेंहि मला साधार वाटत नाहीं. कां कीं, शके १५६९ च्या वैशाखांत शहाजी धरला जाण्यास शके १५६९ च्या आधीं मुलाणा अहमद विजापुराला पोहोंचला पाहिजे. तसेंच रामदास स्वामीच्या चरित्रांत लिहिलेलें आहे कीं, स्वामींनीं चाफळास श्रीरघुपतीचें देऊळ शके १५७० त बांधलें व शिवाजीराजे शके १५७१ च्या वैशाख शुद्ध ४ स मंदवारीं चाफळास स्वामीस भेटण्यास आले. राजांची व स्वामींची भेट वैशाख शुद्ध ९ स गुरुवारीं झाली.

शके १५७१ च्या वैशाख शुद्ध ४ स मंदवार व ९ स गुरुवार होता, त्याअर्थी वरील मित्या खऱ्या आहेत हें स्पष्ट आहे. सध्यां रामदासस्वामींची जी बखर महाराष्ट्रांत छापील अशी प्रसिद्ध आहे, ती हनुमंतस्वामींनीं शके १७१५ त समर्थांचे पुतणे रामचंद्र बाबा यांचे चिरंजीव गंगाधरस्वामी यांनीं शके १६४० त सांगितलेल्या चरित्राच्या आधारें; लिहिलेली आहे. गंगाधरस्वामींनीं शके १६४० त सांगितलेल्या चरित्राची मूळ प्रत पहावयास सांपडेल तर इतिहासाचें फारच हित होईल. तिच्या आधारें १७१५ त लिहिलेली बखर जर खरी असेल तर तिच्यांतील मित्यांवर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. वर नमूद केलेल्या दोन्ही मित्या तीथ व वार यांसहित दिल्या असल्यामुळें व त्या जंत्रीवरून मोजून पाहातां खऱ्या असल्यामुळें स्वामींची व शिवाजीची भेट शुक्ल ९ स गुरुवारीं झाली हें विश्वसनीय दिसतें. ह्या भेटीस समर्थांनीं जो शिवाजीस इतिहासप्रसिद्ध उपदेश केला त्यांत 'तुमचें देशीं वास्तव्य केलें ॥ परंतु वर्तमान नाहीं घेतलें ' हीं वाक्यें आहेत. ह्यावरून सातारा, परळी व चाफळ हीं स्थळें शके १५७१ च्या व शके १५७० च्या आधीं शिवाजीच्या हातांत पडलीं असावीं असा अंदाज होतो. हा अंदाज जर खरा असेल तर शके १५७० त राजापुरावर कोंकणांत उतरून बाळाजी आवजीला चाकरीस ठेवणें, शके १५६९ त पांडवगड, सातारा, वगैरे किल्ले घेणें, शके १५६८ त कल्याणावर स्वारी करणें, हरिहरेश्वरास जाणें वगैरे कृत्यें त्या त्या शकांत झालीं असावीं, व ग्रांट डफचा शके १५६८ पासून शके १५७२ पर्यंतचा मजकूर बराच चुकला असावा व त्याच्याप्रमाणें मल्हार रामरावाचाहि अनुक्रम चुकला असावा असें वाटतें. शके १५७० त बाळाजी आवजीस चिटणीशी मिळाल्यानंतर शृंगारपूरच्या दळव्याचें पारिपत्य शिवाजीनें केलें व नंतर म्हणजे शके १५७१ त शहाजीला घोरपड्यानें धरलें असा मल्हार रामरावाचा अनुक्रम आहे. शके १५७१ त शहाजीला धरिलें म्हणून डफहि म्हणतो. आतां विजापुरच्या पातशहाच्या बखरींतील हिजरी सन १०५७ जर खरा असेल तर मल्हार रामराव व ग्रांट डफ हे दोघेहि चुकीचे ठरतात. शृंगारपूरच्या दळव्यांचें पारिपत्य शिवाजीनें शके १५८३ त केलें म्हणून ग्रांट डफ लिहितो. शहाजीला धरल्यानंतर व औरंगजेब तक्तावर बसल्यानंतर निलकंठ हैबतरावाच्या मुलांच्या साहाय्यानें शिवाजीनें पुरंधर किल्ला घेतला असा मल्हाररावाचा अनुक्रम आहे. तसेंच शके १५७८ त औरंगझेब तक्तावर बसल्याचा वृत्तांत दिल्यानंतर शके १५७७ त चंद्रराव मोऱ्याला शिवाजीनें दस्त केलें व १५७१ त तुकारामाची व रामदासाची आणि शिवाजीची गांठ पडली, असा मल्हाररामरावाचा अनुक्रम आहे. तात्पर्य, मल्हाररामरावानें कालानुक्रमानें आपला मजकूर लिहिला नाहीं, असें पूर्णपणें सिद्ध होतें. अफजलखानी प्रकरणाला प्रारंभ होईतोंपर्यंत सभासदानें तर कालानुक्रमाचा केवळ चुथडा केला आहे. सुपें घेतल्यावर जुन्नर व अहमदनगर शिवाजीनें मारिलें म्हणून तो बिनदिक्कत म्हणतो. नगर मारिल्यानंतर पुरंधर घेतला व नंतर कल्याण, भिवंडी मारिली असा सभासदी अनुक्रम आहे. सारांश, अफजलखानाच्या प्रकरणापर्यंत सभासद अगदीं टाकाऊ आहे. शिवदिग्विजय तर अफजलखानी प्रकरणापर्यंत लक्ष देण्यासारखाहि नाहीं. सारांश, ह्या तिन्ही बखरी

नगर शहर मारिलें; ( ३४ ) निळो निळकंठापासून पुरंदर घेतला; ( ३५ ) जेजुरींत वाडा बांधिला; ( ३६ ) सुंदर स्त्रीस सासऱ्याकडे पाठविलें; ( ३७ ) मोरो त्रिमळास नाशिक प्रांतीं पाठविलें; ( ३८ ) शके १५७७ त मोऱ्यांस मारिलें; ( ३९ ) प्रतापगड बांधिला; ( ४० ) बेदरावर स्वारी केली; ( ४१ ) जुन्नर मारिलें व चाकण घेतलें; (४२) शके १५७९ ज्येष्ठ शुद्ध १२ स संभाजी जन्मला; ( ४३ ) तुकारामाची भेट झाली; (४४) शके १५७१ त रामदास स्वामींची भेट झाली; ( ४५ ) अफजलखानप्रकरण. येणेंप्रमाणें सप्तप्रकरणात्मक चरित्रांतील मजकुराचा अनुक्रम आहे. ( १ ) मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टी कधींना कधीं तरी घडल्या हें खरें आहे. ( २ ) परंतु ज्या अनुक्रमानें त्या नमूद केलेल्या आहेत त्याच अनुक्रमानें घडल्या किंवा कसें ह्यासंबंधीं संशय आहे. ( ३ ) तसेंच मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टींतील बारीक तपशील जसा दिला आहे तसाच असेल असेंहि खात्रीनें सांगवत नाहीं. पहिल्या कलमाचें समर्थन करण्यास विशेष पुरावा पाहिजे असें नाहीं. मजकुरांत नमूद केलेल्या गोष्टी शिवाजीच्या चरित्रांत घडल्या, हें मराठ्यांच्या सतराव्या शतकांतील इतिहास जाणणाऱ्यांस माहीत आहे. दुसऱ्या कलमाचें समर्थन करण्यास खालील पुरावा देतां येतो. बाजी मोहित्याच्या हातचा सुपें महाल घेतल्यावर कांगोरी वगैरे किल्ले घेतले, मावळें सारीं घेतलीं व देशमुख ममतेंत घेतलें. नंतर थोड्याच दिवसांनीं शके १५६८ त कोंकणांत उतरून रायगड किल्ला घेतला व कल्याणावर आबाजी सोनदेवाकडून स्वारी करविली. पुढें लवकरच पांडवगड, चंदनवंदन, नांदगिरी, सातारा, परळी, पन्हाळा वगैरे बावड्यापर्यंतचे सर्व किल्ले घेऊन शके १५७० त राजापूर लुटलें व बाळाजी आवजीस चिटणीशी सांगितली. बाळाजी आवजीस चिटणीशी शके १५७० त मिळाली हें बरेंच विश्वसनीय आहे. शके १५६८ त रायगड घेतला हेंहि तितकेंच विश्वसनीय आहे. रायगड घेतल्यावर कल्याणावर स्वारी करून मुलाणा अहमद ह्याचा खजिना लुटून त्याला विजापुरास पाठविलें. मुलाणा अहमद विजापुरास गेल्यावर नंतर शके १५६९ च्या वैशाखांत शहाजी धरला गेला असेल, हें खरें मानलें—खोटें तरी कां मानावें तें समजत नाहीं—तर मुलाणा अहमदाला लुटणें, रायगड घेणें, भवानी तरवार मिळविणें, कांगोरी वगैरे किल्ले घेणें हे पराक्रम शके १५६८।६९ त घडले असले पाहिजेत. हे जर पराक्रम शके १५६८।६९ त घडले असे गृहीत धरलें, तर त्यांच्या पाठीमागें, सुपें, पुरंदर, तोरणा, राजगड वगैरे स्थलें शिवाजीनें शके १५६८ च्या अगोदर घेतलीं असलीं पाहिजेत. ह्याच कारणाकरितां तोरणा शके १५६८ त घेतला असें जें ग्रांट डफ म्हणतो, त्यावर माझा विश्वास नाहीं. मुलाणा अहमदाला शके १५७० त शिवाजीनें लुटलें असें जें ग्रांट डफ म्हणतो तेंहि मला साधार वाटत नाहीं. कां कीं, शके १५६९ च्या वैशाखांत शहाजी धरला जाण्यास शके १५६९ च्या आधीं मुलाणा अहमद विजापुराला पोहोंचला पाहिजे. तसेंच रामदास स्वामीच्या चरित्रांत लिहिलेलें आहे कीं, स्वामींनीं चाफळास श्रीरघुपतीचें देऊळ शके १५७० त बांधलें व शिवाजीराजे शके १५७१ च्या वैशाख शुद्ध ४ स मंदवारीं चाफळास स्वामीस भेटण्यास आले. राजांची व स्वामींची भेट वैशाख शुद्ध ९ स गुरुवारीं झाली.

शके १५७१ च्या वैशाख शुद्ध ४ स मंदवार व ९ स गुरुवार होता, त्याअर्थी वरील मित्या खऱ्या आहेत हें स्पष्ट आहे. सध्यां रामदासस्वामींची जी बखर महाराष्ट्रांत छापील अशी प्रसिद्ध आहे, ती हनुमंतस्वामींनीं शके १७१५ त समर्थांचे पुतणे रामचंद्र बाबा यांचे चिरंजीव गंगाधरस्वामी यांनीं शके १६४० त सांगितलेल्या चरित्राच्या आधारें, लिहिलेली आहे. गंगाधरस्वामींनीं शके १६४० त सांगितलेल्या चरित्राची मूळ प्रत पहावयास सांपडेल तर इतिहासाचें फारच हित होईल. तिच्या आधारें १७१५ त लिहिलेली बखर जर खरी असेल तर तिच्यांतील मित्यांवर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं. वर नमूद केलेल्या दोन्ही मित्या तीथ व वार यांसहित दिल्या असल्यामुळें व त्या जंत्रीवरून मोजून पाहातां खऱ्या असल्यामुळें स्वामींची व शिवाजीची भेट शुक्र ९ स गुरुवारीं झाली हें विश्वसनीय दिसतें. ह्या भेटीस समर्थांनीं जो शिवाजीस इतिहासप्रसिद्ध उपदेश केला त्यांत 'तुमचें देशीं वास्तव्य केलें ॥ परंतु वर्तमान नाहीं घेतलें ' हीं वाक्यें आहेत. ह्यावरून सातारा, परळी व चाफळ हीं स्थळें शके १५७१ च्या व शके १५७० च्या आधीं शिवाजीच्या हातांत पडलीं असावीं असा अंदाज होतो. हा अंदाज जर खरा असेल तर शके १५७० त राजापुरावर कोंकणांत उतरून बाळाजी आवजीला चाकरीस ठेवणें, शके १५६९ त पांडवगड, सातारा, वगैरे किल्ले घेणें, शके १५६८ त कल्याणावर स्वारी करणें, हरिहरेश्वरास जाणें वगैरे कृत्यें त्या त्या शकांत झालीं असावीं, व ग्रांट डफचा शके १५६८ पासून शके १५७२ पर्यंतचा मजकूर बराच चुकला असावा व त्याच्याप्रमाणें मल्हार रामरावाचाहि अनुक्रम चुकला असावा असें वाटतें. शके १५७० त बाळाजी आवजीस चिटणीशी मिळाल्यानंतर शृंगारपूरच्या दळव्याचें पारिपत्य शिवाजीनें केलें व नंतर म्हणजे शके १५७१ त शहाजीला घोरपड्यानें धरलें असा मल्हार रामरावाचा अनुक्रम आहे. शके १५७१ त शहाजीला धरिलें म्हणून डफहि म्हणतो. आतां विजापुरच्या पातशहाच्या बखरींतील हिजरी सन १०५७ जर खरा असेल तर मल्हार रामराव व ग्रांट डफ हे दोघेहि चुकीचे ठरतात. शृंगारपूरच्या दळव्यांचें पारिपत्य शिवाजीनें शके १५८३ त केलें म्हणून ग्रांट डफ लिहितो. शहाजीला धरल्यानंतर व औरंगजेब तक्तावर बसल्यानंतर निलकंठ हैबतरावाच्या मुलांच्या साहाय्यानें शिवाजीनें पुरंधर किल्ला घेतला असा मल्हाररावाचा अनुक्रम आहे. तसेंच शके १५७८ त औरंगझेब तक्तावर बसल्याचा वृत्तांत दिल्यानंतर शके १५७७ त चंद्रराव मोऱ्याला शिवाजीनें दस्त केलें व १५७१ त तुकारामाची व रामदासाची आणि शिवाजीची गांठ पडली, असा मल्हाररामरावाचा अनुक्रम आहे. तात्पर्य, मल्हाररामरावानें कालानुक्रमानें आपला मजकूर लिहिला नाहीं, असें पूर्णपणें सिद्ध होतें. अफजलखानी प्रकरणाला प्रारंभ होईतोंपर्यंत सभासदानें तर कालानुक्रमाचा केवळ चुथडा केला आहे. सुपें घेतल्यावर जुन्नर व अहमदनगर शिवाजीनें मारिलें म्हणून तो बिनदिक्कत म्हणतो. नगर मारिल्यानंतर पुरंधर घेतला व नंतर कल्याण, भिवंडी मारिली असा सभासदी अनुक्रम आहे. सारांश, अफजलखानाच्या प्रकरणापर्यंत सभासद अगदीं टाकाऊ आहे. शिवदिग्विजय तर अफजलखानी प्रकरणापर्यंत लक्ष देण्यासारखाहि नाहीं. सारांश, ह्या तिन्ही बखरी

बहुतेक, कदाचित् येथून तेथून, कालानुक्रमाच्या संबंधानें अफजलखानी प्रकरणापर्यंत फारशा विश्वासपात्र नाहींत. मल्हार रामरावानें दोन चार ठिकाणीं जेथें जेथें शक दिले आहेत तेथें तेथें तेवढा मजकूर कदाचित् खरा धरल्यास चालेल. बखरींतील शकयुक्त मजकूर खरा धरून ह्या शंकास्थानांतील प्रारंभींची रचना मीं केली आहे, व ती रचना खरी मानली म्हणजे ग्रांट डफ बहुतेक स्थलीं चुकला आहे असें दिसतें. तोरणा किल्ला घेतल्याचा जो ग्रांट डफनें सन दिला आहे, त्यासंबंधीं तर मला शंका आहेच; परंतु शके १५६८ पासून शके १५८१ पर्यंतचाहि इतिहास त्यानें मुद्देसूद व कालानुक्रमानें दिला आहे असें म्हणवत नाहीं. शके १५६९ सालचा, शके १५७२ पासून शके १५७५ सालचा व शके १५७६ सालचा मजकूर ग्रांट डफनें बहुतेक कांहींच दिला नाहीं. शके १५७१ त शहाजीला धरलें. ह्याला आधार शहाजहानाचें शिवाजीला पाठविलेलें पत्र टिपेंत उल्लेखिलें आहे. ह्या पत्राची तारीख व महिना डफनें दिला नाहीं. त्यावरून शहाजीला शके १५७१ च्या प्रारंभीं धरिलें किंवा शेवटीं धरिलें तें स्पष्ट होत नाहीं. शके १५७१ त शिवाजीचें पत्र दिल्लीस जावयाचें व त्याचें उत्तर यावयाचें व एकंदर दोन चार पत्रें जाऊन राजकारण संपावयाचें म्हटलें म्हणजे शहाजीला शके १५७१ च्या अगोदर धरलें असलें पाहिजे. म्हणजे बहुशः विजापूरच्या पातशहांच्या बखरींत लिहिल्याप्रमाणें शहाजीला शके १५६९ च्या वैशाखांतच धरिलें असलें पाहिजे. जेथें अस्सल पत्राचा आधार डफ देतो तेथें तेथें साल व मजकूर कायम झालें हें खरें आहे. आतां शके १५६८ पासून शके १५७५ पर्यंत अस्सल पत्राचा आधार डफनें तीनदां दिला आहे. हे तिन्ही आधार शहाजीच्या सुटकेसंबंधींचे आहेत. शके १५७१ त शहाजी अटकेंत होता हें ह्या पत्रांवरून ठरतें. परंतु शहाजी शके १५७५ तच सुटला असें मात्र बाजी घोरपड्याच्या शहाजीच्या करारावरून खास म्हणतां येत नाहीं. करार जर शके १५७५ त झाला असेल तर शहाजी शके १५७४ त सुटला असावा अशी शंका आणितां येईल. शके १५६८ पासून शके १५७५ पर्यंतच्या मजकुराला डफनें टीपा दिल्या आहेत त्या सदां बरोबरच असतात असेंही नाहीं. एका टिपेंत रणदुल्लाखान शके १५६५ त वारला म्हणून डफ लिहितो परंतु खानमजकूर बहुशः हिजरी सन १०५९ त मेला असावा ( सातारा गझेटीयर पृ० ५४९). हिजरी सन दहाशें एकुणसाठ शके १५७० च्या माघ शु॥ ३ स सुरू झाला. तेव्हां शके १५७० च्या माघ शु॥ ३ नंतर रणदुल्लाखान वारला हें उघड आहे. रणदुल्लाखानाच्या पाठीमागून अफजलखान वांई प्रांताचा सुभा झाला. अफजुलखानाचा एक हुकूमनामा सु॥ खमसैन १८ जमादिलाखरचा म्हणजे शके १५७१ च्या अधिक आषाढ व॥ ५ चा मजजवळ आहे. त्यावरून रणदुल्लाखान शके १५७० चा माघ व शके १५७१ चा आधिक आषाढ यांच्या दरम्यान कधीं तरी वारला हें स्पष्ट आहे. सातारा गझेटीयरांत शके १५७२ हें जें साल दिलें आहे तें बिलकुल चुकलें आहे. कां कीं हिजरी सन १०५९ शके १५७० च्या माघ शु॥ ३ पासून शके १५७१ च्या पौष शु॥ १ पर्यंतच होता. रणदुल्लाखानाच्या मृत्यूच्या मित्तीसंबंधानें डफनें हा असा घोटाळा करून ठेविला आहे. ग्रांट डफची इतर

माहितीहि मोठ्याशा चवकशीनें लिहिलेली असते असें नाहीं. उदाहरणार्थ, पुण्यास तुकोब्बाच्या कथेला शिवाजी शके १५८५ त हजर होता म्हणून डफ आपल्या इतिहासाच्या सहाव्या भागांत लिहितो, परंतु तुकाराम शके १५७१ त वारला हें प्रसिद्ध आहे. ( शंकर पांडुरंगांनीं छापिलेली गाथा, प्रस्तावना, पृष्ठ ७५ ). मालवण उर्फ सिंधुदुर्ग शके १५८४ त बांधला म्हणून डफ म्हणतो. परंतु काव्येतिहाससंग्रहांतील ४२१ व्या महजरांत सिंधुदुर्ग सन खमस सितैनांत १४ जमादिलावलीं म्हणजे मार्गशीर्ष बहुल द्वितीयेस बांधावयास प्रारंभ केला म्हणून म्हटलें आहे. रामदासस्वामींना शिवाजीनें शके १५८३ त गुरू केलें म्हणून डफचें म्हणणें आहे ( डफचा इतिहास भाग पांचवा ). परंतु शके १५७१ तच शिवाजीची व समर्थांची गांठ पडली होती हें प्रसिद्ध आहे; शहाजी महाराज शके १५८६ च्या पौषांत वारले म्हणून डफनें लिहून ठेविलें आहे, परंतु काव्येतिहाससंग्रहांतील ४१० व्या यादींत व मल्हाररामरावकृत सप्तप्रकरणात्मक चरित्रांत ( पृ० ८० ) शहाजी शके १५८३ प्लवनाम संवत्सरे माघ शुद्ध ५ स म्हणजे १६६२ च्या १५ जानेवारीस वारला असें लिहिलें आहे. सारांश, डफनें जो शके १५३८ पासून शके १५८१ पर्यंतचा शिवाजीचा इतिहास लिहिला आहे, तो मोठ्या चवकसपणानें किंवा सूक्ष्म दृष्टीनें लिहिला आहे असें नाहीं. इतर बखरींहून कोठें कोठें विश्वसनीय माहिती त्यानें दिली आहे. परंतु इतर बखरींप्रमाणें कित्येक ठिकाणीं तो चुकला आहे व कित्येक ठिकाणीं त्यानें माहिती इतर बखरींत असूनहि आपल्या बखरींत उतरून घेतली नाहीं. येणेंप्रमाणें सुमारें शके १५८१ पर्यंतची बखरींची व ग्रांट डफची व्यवस्था आहे. त्या दोहोंत बहुत दोष आहेत हें कोणीहि कबूल करील. दोष काढून टाकून नवीन साधार व सविस्तर रचना कशी करतां येईल हाच पुढील दहावीस वर्षांतील प्रश्न आहे.

येथपर्यंत बखरींतील मजकुराच्या अनुक्रमासंबंधीं शंका काय काय येतात त्यांचें स्वरूप शके १५८१ पर्यंतच्या मजकुराच्या अनुक्रमाचें परीक्षण करून, दाखवून दिलें आहे. शंकांचें स्वरूप दाखवितांना कोठें कोठें अज्ञात इतिहासाची प्रसंगानें रचना करावी लागली, परंतु इतिहासाची रचना करण्याचा प्रस्तुत स्थळीं मुख्य हेतु नसून बखरींचा अनुक्रम विश्वसनीय नाहीं हें सिद्ध करण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे. शंकांची सिद्धि व इतिहासाची रचना करतांना, बखरींतील शक व मित्या कोणत्या प्रमाणांनीं पारखून घ्याव्या हेंहि प्रसंगोपात्त सांगितलें आहे. तसेंच बखरींतील अनुक्रम तपासतांना ( १ ) ग्रांट डफच्या इतिहासांतील कित्येक सन बरोबर नाहींत, ( २ ) त्याच्या इतिहासांतील मजकूर त्रोटक व तुटक आहे, ( ३ ) बखरींत दिलेल्या पुष्कळ मजकुराचा समावेश आपल्या इतिहासांत त्याला करून घेतां आला नाहीं, व ( ४ ) अस्सल पत्रांचा जितका बारीक तारतम्यानें उपयोग करून घ्यावा तितका करून घेण्याचें प्रयोजन त्याला दिसलें नाहीं, वगैरे गोष्टींचाहि उल्लेख झाला आहे. शिवाय अस्सल पत्रें, महजर व इतर पहिल्या प्रतीचे लेख मिळाल्यावांचून शिवाजी महाराजांच्या अद्‍भुत इतिहासाची रचना करतां यावयाची नाहीं, ह्या महावाक्याचाहि वारंवार उच्चार झाला आहे. हे सर्व विचार कालानुक्रमाच्या

बहुतेक, कदाचित् येथून तेथून, कालानुक्रमाच्या संबंधानें अफजलखानी प्रकरणापर्यंत फारशा विश्वासपात्र नाहींत. मल्हार रामरावानें दोन चार ठिकाणीं जेथें जेथें शक दिले आहेत तेथें तेथें तेवढा मजकूर कदाचित् खरा धरल्यास चालेल. बखरींतील शकयुक्त मजकूर खरा धरून ह्या शंकास्थानांतील प्रारंभींची रचना मीं केली आहे, व ती रचना खरी मानली म्हणजे ग्रांट डफ बहुतेक स्थलीं चुकला आहे असें दिसतें. तोरणा किल्ला घेतल्याचा जो ग्रांट डफनें सन दिला आहे, त्यासंबंधीं तर मला शंका आहेच; परंतु शके १५६८ पासून शके १५८१ पर्यंतचाहि इतिहास त्यानें मुद्देसूद व कालानुक्रमानें दिला आहे असें म्हणवत नाहीं. शके १५६९ साल्चा, शके १५७२ पासून शके १५७५ साल्चा व शके १५७६ साल्चा मजकूर ग्रांट डफनें बहुतेक कांहींच दिला नाहीं. शके १५७१ त शहाजीला धरलें. ह्याला आधार शहाजहानाचें शिवाजीला पाठविलेलें पत्र टिपेंत उल्लेखिलें आहे. ह्या पत्राची तारीख व महिना डफनें दिला नाहीं. त्यावरून शहाजीला शके १५७१ च्या प्रारंभीं धरिलें किंवा शेवटीं धरिलें तें स्पष्ट होत नाहीं. शके १५७१ त शिवाजीचें पत्र दिल्लीस जावयाचें व त्याचें उत्तर यावयाचें व एकंदर दोन चार पत्रें जाऊन राजकारण संपावयाचें म्हटलें म्हणजे शहाजीला शके १५७१ च्या अगोदर धरलें असलें पाहिजे. म्हणजे बहुशः विजापूरच्या पातशहांच्या बखरींत लिहिल्याप्रमाणें शहाजीला शके १५६९ च्या वैशाखांतच धरिलें असलें पाहिजे. जेथें अस्सल पत्राचा आधार डफ देतो तेथें तेथें साल व मजकूर कायम झालें हें खरें आहे. आतां शके १५६८ पासून शके १५७५ पर्यंत अस्सल पत्राचा आधार डफनें तीनदां दिला आहे. हे तिन्ही आधार शहाजीच्या सुटकेसंबंधींचे आहेत. शके १५७१ त शहाजी अटकेंत होता हें ह्या पत्रांवरून ठरतें. परंतु शहाजी शके १५७५ तच सुटला असें मात्र बाजी घोरपड्याच्या शहाजीच्या करारावरून खास म्हणतां येत नाहीं. करार जर शके १५७५ त झाला असेल तर शहाजी शके १५७४ त सुटला असावा अशी शंका आणितां येईल. शके १५६८ पासून शके १५७५ पर्यंतच्या मजकुराला डफनें टीपा दिल्या आहेत त्या सदां बरोबरच असतात असेंही नाहीं. एका टिपेंत रणदुल्लाखान शके १५६५ त वारला म्हणून डफ लिहितो परंतु खानमजकूर बहुशः हिजरी सन १०५९ त मेला असावा ( सातारा गझेटीयर पृ० ५४९). हिजरी सन दहाशें एकुणसाठ शके १५७० च्या माघ शु॥ ३ स सुरू झाला. तेव्हां शके १५७० च्या माघ शु॥ ३ नंतर रणदुल्लाखान वारला हें उघड आहे. रणदुल्लाखानाच्या पाठोमागून अफजलखान वांई प्रांताचा सुभा झाला. अफजुलखानाचा एक हुकूमनामा सु॥ खमसैन १८ जमादिलाखरचा म्हणजे शके १५७१ च्या आधिक आषाढ व॥ ५ चा मजजवळ आहे. त्यावरून रणदुल्लाखान शके १५७० चा माघ व शके १५७१ चा आधिक आषाढ यांच्या दरम्यान कधीं तरी वारला हें स्पष्ट आहे. सातारा गझेटीयरांत शके १५७२ हें जें साल दिलें आहे तें बिलकुल चुकलें आहे. कां कीं हिजरी सन १०५९ शके १५७० च्या माघ शु॥ ३ पासून शके १५७१ च्या पौष शु॥ १ पर्यंतच होता. रणदुल्लाखानाच्या मृत्यूच्या मित्तीसंबंधानें डफनें हा असा घोटाळा करून ठेविला आहे. ग्रांट डफची इतर

माहितीहि मोठ्याशा चवकशीनें लिहिलेली असते असें नाहीं. उदाहरणार्थ, पुण्यास तुकोब्बाच्या कथेला शिवाजी शके १५८५ त हजर होता म्हणून डफ आपल्या इतिहासाच्या सहाव्या भागांत लिहितो, परंतु तुकाराम शके १५७१ त वारला हें प्रसिद्ध आहे. ( शंकर पांडुरंगांनीं छापिलेली गाथा, प्रस्तावना, पृष्ठ ७५ ). मालवण उर्फ सिंधुदुर्ग शके १५८४ त बांधला म्हणून डफ म्हणतो. परंतु काव्येतिहाससंग्रहांतील ४२१ व्या महजरांत सिंधुदुर्ग सन खमस सितैनांत १४ जमादिलावलीं म्हणजे मार्गशीर्ष बहुल द्वितीयेस बांधावयास प्रारंभ केला म्हणून म्हटलें आहे. रामदासस्वामींना शिवाजीनें शके १५८३ त गुरू केलें म्हणून डफचें म्हणणें आहे ( डफचा इतिहास भाग पांचवा ). परंतु शके १५७१ तच शिवाजींची व समर्थांची गांठ पडली होती हें प्रसिद्ध आहे; शहाजी महाराज शके १५८६ च्या पौषांत वारले म्हणून डफनें लिहून ठेविलें आहे, परंतु काव्येतिहाससंग्रहांतील ४१० व्या यादींत व मल्हाररामरावकृत सप्तप्रकरणात्मक चरित्रांत ( पृ० ८० ) शहाजी शके १५८३ प्लवनाम संवत्सरे माघ शुद्ध ५ स म्हणजे १६६२ च्या १५ जानेवारीस वारला असें लिहिलें आहे. सारांश, डफनें जो शके १५६८ पासून शके १५८१ पर्यंतचा शिवाजीचा इतिहास लिहिला आहे, तो मोठ्या चवकसपणानें किंवा सूक्ष्म दृष्टीनें लिहिला आहे असें नाहीं. इतर बखरींहून कोठें कोठें विश्वसनीय माहिती त्यानें दिली आहे. परंतु इतर बखरींप्रमाणें कित्येक ठिकाणीं तो चुकला आहे व कित्येक ठिकाणीं त्यानें माहिती इतर बखरींत असूनहि आपल्या बखरींत उतरून घेतली नाहीं. येणेंप्रमाणें सुमारें शके १५८१ पर्यंतची बखरींची व ग्रांट डफची व्यवस्था आहे. त्या दोहोंत बहुत दोष आहेत हें कोणीहि कबूल करील. दोष काढून टाकून नवीन साधार व सविस्तर रचना कशी करतां येईल हाच पुढील दहावीस वर्षांतील प्रश्न आहे.

येथपर्यंत बखरींतील मजकुराच्या अनुक्रमासंबंधीं शंका काय काय येतात त्यांचें स्वरूप शके १५८१ पर्यंतच्या मजकुराच्या अनुक्रमाचें परीक्षण करून, दाखवून दिलें आहे. शंकांचें स्वरूप दाखवितांना कोठें कोठें अज्ञात इतिहासाची प्रसंगानें रचना करावी लागली, परंतु इतिहासाची रचना करण्याचा प्रस्तुत स्थळीं मुख्य हेतु नसून बखरींचा अनुक्रम विश्वसनीय नाहीं हें सिद्ध करण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे. शंकांची सिद्धि व इतिहासाची रचना करतांना, बखरींतील शक व मित्या कोणत्या प्रमाणांनीं पारखून घ्याव्या हेंहि प्रसंगोपात्त सांगितलें आहे. तसेंच बखरींतील अनुक्रम तपासतांना ( १ ) ग्रांट डफच्या इतिहासांतील कित्येक सन बरोबर नाहींत, ( २ ) त्याच्या इतिहासांतील मजकूर त्रोटक व तुटक आहे, ( ३ ) बखरींत दिलेल्या पुष्कळ मजकुराचा समावेश आपल्या इतिहासांत त्याला करून घेतां आला नाहीं, व ( ४ ) अस्सल पत्रांचा जितका बारीक तारतम्यानें उपयोग करून घ्यावा तितका करून घेण्याचें प्रयोजन त्याला दिसलें नाहीं, वगैरे गोष्टींचाहि उल्लेख झाला आहे. शिवाय अस्सल पत्रें, महजर व इतर पहिल्या प्रतींचे लेख मिळाल्यावांचून शिवाजी महाराजांच्या अद्भुत इतिहासाची रचना करतां यावयाची नाहीं, ह्या महावाक्याचाहि वारंवार उच्चार झाला आहे. हे सर्व विचार कालानुक्रमाच्या

अनुषंगानें करावे लागले. खुद्द मजकुराच्या तपशिलासंबंधीं वरील दोन्ही शंकास्थानांत विशेष कांहींच लिहिलें नाहीं. तेव्हां ह्या तपशिलाचा विचार पुढील शंकास्थानांत करणें योग्य आहे.

---

## शंकास्थान तिसरें.

शके १५८१ पर्यंत तपशिलानें ज्याविषयीं माहिती बखरींतून दिली आहे असे प्रसंग म्हटले म्हणजे ( १ ) शिवाजीची व तुकारामरामदासांची भेट, ( २ ) चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य व ( ३ ) अफझुलखानाचा मोड, हे तीन होत. ह्या तीन प्रसंगांत जो तपशील दिलेला आहे तो कितपत विश्वसनीय आहे, व त्या तपशिलांपासून विशेष ऐतिहासिक माहिती काय मिळण्यासारखी आहे हें ह्या शंकास्थानांत पहावयाचें आहे.

तुकारामबोवांच्या भेटीचा जो वृत्तांत सप्तप्रकरणात्मक चरित्रांत दिला आहे त्यावरून असें दिसतें कीं, ( १ ) बोवाच्या कथेला पुण्यास शिवाजी एकदां गेला होता व त्यावेळीं चाकणच्या दोन हजार पठाणांनीं शिवाजीला धरण्याचा प्रयत्न केला, व ( २ ) रामदासस्वामींचें स्वप्नांत दर्शन झाल्यावर तुकोबाला शिवाजीनें पत्र पाठविलें व त्या पत्रांत तुकोबानें रामदासाला गुरु करा असा शिवाजीस उपदेश केला. रामदासानें शिवाजीस उपदेश शके १५७१ च्या वैशाख शु॥ १० स केला हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां तुकारामाला पत्र शके १५७१ च्या वैशाखाच्या आधीं कधीं तरी पाठविलें असलें पाहिजे. तुकाराम शके १५७१ च्या माघ व॥ ६ स वारले, त्या अर्थीं तुकारामाला शिवाजीनें शके १५७१च्या वैशाखाच्या आधीं कधीं तरी पत्र पाठविलें असेल हें संभवतें व बखरकार कांहीं संभवनीय व विश्वसनीय हकीकत सांगत आहे असा मनाचा ग्रह होतो. बखरकारानें तुकारामाचें उत्तरहि आपल्या बखरींत दिलें आहे. त्या उत्तरांतील मजकूर ऐतिहासिक संभवनीयतेच्या कसोटीला कितपत जुळतो तो पाहूं. बखरींत जें सबंध पत्र छापिलें आहे तें तुकारामाच्या गाथेंतून घेतलें आहे. त्या पत्रांत इतक्या गोष्टींचा उल्लेख केला आहे:— ( १ ) शिवाजीला भूपति हें विशेषण दिलें आहे; ( २ ) शिवाजीला छत्रपति म्हणून म्हटलें आहे; ( ३ ) प्रतिनिधि, मुजुमदार, पेशवे, सुरनीस, चिटणीस, डबीर, राजाज्ञा, सुमंत, सेनापती, पंडितराय, वैद्यराज, इतक्या अधिकाऱ्यांचीं सामान्यनामें उच्चारिलीं आहेत; व ( ४ ) भूषणकवीचा उल्लेख केला आहे. ह्या पत्रांत शिवाजीला भूपति हें विशेषण दिलें आहे तें रास्तच आहे. शके १५७१ च्या वैशाखाच्या आधीं शिवाजी छत्रपती ह्या नांवानें प्रसिद्ध होता किंवा कसें हें मात्र शोध करण्यासारखें आहे. शके १५७१ त रामदासानें शिवाजीस वांई मुक्कामीं पाठविलेल्या पत्रांतहि छत्रपति हा शब्द आलेला आहे, ( माडगावकरांनीं छापिलेले स्वामींचे समग्र ग्रंथ, पृष्ठ ७७० ); तेव्हां हीं जर पत्रें खरीं असतील, तर शके १५७१ च्या वैशाखाच्या आधीं शिवाजीला छत्रपति ही संज्ञा निदान साधुमंडळांत तरी लावूं लागले होते एवढें म्हणणें भाग पडतें. छत्रपति ही संज्ञा त्या

वेळीं शिवाजीला लावली जात होती ही गोष्ट एकदां मनावर ठसवून घेतली म्हणजे प्रतिनिधि, राजाज्ञा वगैरे अधिकारी अथवा अष्टप्रधान शके १५७१ च्या वैशाखाच्या आधीं शिवाजीनें नेमिले होते, ह्या विधानाचा अंगीकार करावा लागतो. व शेवटीं शके १५७१ अगोदर भूषणकवि शिवाजीच्या पदरीं राहिला होता हीहि गोष्ट संभवनीय व विश्वसनीय मानावी लागते. ह्या तिन्ही गोष्टी विश्वसनीय मानल्या म्हणजे शके १५७१ त शिवाजीची शक्ति किती वाढली होती ह्याचा अंदाज होतो व विजापूरकरांच्यासारख्या गचाळ व गैदी दरबारांतहि शिवाजीच्या पारिपत्याची विवंचना त्या वेळीं सुरू झाली ती रास्त होती असें कबूल करावें लागतें. पुण्यास झालेल्या तुकारामाच्या कथेच्या वेळीं चाकणहून दोन हजार पठाणांच्या स्वारीचा काल अदमासानें बसवतां येण्यासारखा आहे. फिरंगोजी नरसाळ्यानें चाकणचें ठाणें शिवाजीच्या स्वाधीन करण्याच्या पूर्वीं ही गोष्ट झाली असावी. रामदासाच्या व तुकारामाच्या पत्रांतून वर लिहिल्याप्रमाणें ऐतिहासिक माहिती सांपडते. हीं पत्रें देतांना बखरकारांनीं जी स्वतःची मखलाशी केली आहे ती मात्र वारंवार बहुत चुकीची असते. उदाहरणार्थ, चाफळास स्वामींचें दर्शन प्रथम झालें नाहीं तेव्हां शिवाजी प्रतापगडास निघून गेला म्हणून बखरकार निर्धास्तपणें सांगतात. परंतु शके १५७१ त प्रतापगड मुळीं अस्तित्वांतच नव्हता हें लक्षांत आणिलें असतां बखरकार ह्या ठिकाणीं निव्वळ बरळत आहेत असें म्हणावें लागतें. तात्पर्य, बखरकारांच्या मजकुरांतील तपशील अस्सल पत्रांच्या किंवा जुन्या ग्रंथांतील उताऱ्यांच्या रूपानें जेवढा दिला असेल तेवढाच खरा मानावा. बाकीचा तपशील खरा कां मानावा हें दाखवून देणें कठीण आहे.

( २ ) परीक्षणाकरितां घेतलेला दुसरा ऐतिहासिक प्रसंग चंद्रराव मोऱ्याच्या पारिपत्यासंबंधींचा आहे. ( अ ) सभासदी बखरींत ह्यासंबंधीं मजकूर येणेंप्रमाणें आहे. ( १ ) रघुनाथ बल्लाळ सबनीस याला चंद्ररावाकडे हेजिबीस पाठविलें. ( २ ) त्यानें चंद्रराव व सूर्याजीराव मोरे यांस स्वतः मारिलें. ( ३ ) संभाजी कावजीनें चंद्ररावाचा भाऊ हणमंतराव मोरे यांस मारिलें.

( ब ) सप्तप्रकरणात्मक चरित्रांत ह्यासंबंधीं मजकूर असा आहेः— ( १ ) राघो बल्लाळ सबनीस यास चंद्ररावाकडे हेजिबीस पाठविलें. ( २ ) त्यानें चंद्रराव व त्याचा भाऊ सूर्यराव यांस मारिलें. ( ३ ) संभाजी कावजीनें मोरे यांचे कारभारी हनुमंतराव यास मारिलें. ( ४ ) चंद्ररावाचे लेक बाजीराव व कृष्णराव यांस पुणें येथें निमजग्यांत नेऊन मारिलें. ( ५ ) चंद्ररावाचे कबिले सोडून दिले.

( क ) शिवदिग्विजयांत येणेंप्रमाणें मजकूर आहेः- ( १ ) रघुनाथपंत चंद्ररावाचा भाऊ व त्याचा कारभारी जो हणमंतराव त्याजकडे हेजिबीस गेला. ( २ ) रघुनाथपंतानें हणमंतरावास मारिलें. ( ३ ) रघुनाथपंत शिवाजीस भेटण्यास पुरंधरास आला. ( ४ ) मग शिवाजीनें व रघुनाथपंतानें चंद्ररावावर स्वारी करून, लढाई देऊन मारिलें. ( ५ ) बाजीराव मोरे व कृष्णराव मोरे, चंद्ररावाचे लेक, यांस पुण्यांत निमजग्यांत आणून ठेविलें.

( ड ) ग्रांट डफचा मजकूर असा आहेः-(१)राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांना

चंद्रावाकडे हेजिबीस पाठविलें. ( २ ) राघो बल्लाळानें चंद्ररावास व संभाजी कावजीनें त्याच्या भावाला मारिलें. ( ३ ) जावलीच्या लढाईत हिंमतराव मारला गेला व चंद्ररावाचे पुत्र कैद केले गेले.

( ई ) चित्रगुप्ती बखरींत मजकूर येणेंप्रमाणें आहे:– ( १ ) रघुनाथराव सबनिसाला चंद्ररावाकडे हेजिबीस पाठविलें. ( २ ) त्यानें चंद्रराव व त्याचा भाऊ सुरेराव यांस ठार मारिलें. ( ३ ) चंद्ररावाचा भाऊ हणमंतराव चतुर्बेटांत होता त्याला संभाजीनें शरीरसंबंधाचें मिष करून मारिलें.

(फ) प्रो. फारेस्ट यांनीं छापिलेल्या रायरी येथील बखरींत मजकूर असा आहे:–

( १ ) चंद्रराव मोऱ्याचा दिवाण हणमंतराव मोरे महाबळेश्वरीं होता.( २ ) त्याजकडे शरीरसंबंधाचें बोलणें करण्याकरितां शिवाजीनें रघुनाथ बल्लाळ सबनीस यास एकशे पंचवीस स्वार देऊन पाठविलें. ( ३ ) त्यानें हणमंतरावास ठार मारिलें. ( ४ ) नंतर तो शिवाजीकडे पुरंधरास आला. (५) शिवाजी निसणीच्या दारानें व रघुनाथ बल्लाळ रडतोंडीच्या घाटानें जावळीस आले. ( ६ ) तेथें लढाई होऊन चंद्रराव व त्याचे भाऊ बाजीराव व कृष्णराव व त्यांचे कबिले या सर्वांस कैद केलें.

येणेंप्रमाणें ह्या सहा बखरींतलि कैफियती आहेत. जावळीची लढाई ज्यांनीं साक्षात् मारिली त्या शिवाजीची, राघो बल्लाळाची व संभाजी कावजीची प्रत्यक्ष जबानी मिळाली असती, तर ती पूर्ण प्रमाण म्हणून अवश्य मानावी लागली असती. चंद्रराव मोऱ्यांकडील जबानी मिळाली असती, तर प्रतिपक्षाकडील म्हणणें काय आहे तें ऐकून घेतां आलें असतें. परंतु मुख्य वादी व प्रतिवादी ह्यांच्या अस्सल जबान्या म्हणजे अस्सल पत्रें, हकीकती वगैरे कांहींच उपलब्ध नसल्यामुळें केवळ बखरकारांच्या लिहिण्यावरून निकाल देण्याचा प्रसंग आला आहे. बखरकार झालेल्या प्रसंगांचे प्रत्यक्ष द्रष्टे नसून केवल कर्णोपकर्णीं व कदाचित् जुने दाखले वगैरे पाहून हकीकती सजविणारे लेखक आहेत. त्यांतल्या त्यांत मल्हार रामराव व शिवदिग्विजयाचा कर्ता ह्या दोघांनीं कांहीं जुने लेख पाहिले असावे असा संशय येतो. चंद्ररावाचे पुत्र बाजीराव व कृष्णराव ह्यांस पुण्यांत दाक्षिणेकडील निमजग्यांत आणून ठेविलें म्हणून हे दोघे बखरकार सांगतात. ही तपशीलवार माहिती मुख्य हकीकतीला विशेष पोषक नसून जातां जातां सहजासहजीं लिहून ठेविलेली आहे. तेव्हां ती ह्या बखरकारांनीं कोणत्या तरी एका जुन्या बाडांतून घेतली असावी असा अंदाज होतो. ह्या दोघां बखरकारांनीं बाकीची जी ह्या प्रसंगाची हकीकत दिली आहे ती परस्परविरोधी व विसंगत आहे. इतरहि बखरकारांचें एकाचें म्हणणें एकाला जुळत नाहीं. तेव्हां आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, ह्या प्रसंगाची खरी हकीकत काय असावी व ग्रांट डफनें जी हकीकत दिली आहे ती कोणत्या आधारावर दिली असावी? ह्या प्रश्नाला, माझ्या मतें उत्तर असें पडतें कीं, ह्या प्रसंगाची खरी हकीकत उपलब्ध बखरींतून निश्चयात्मक अमकीच असेल असें सांगणें कठीण आहे व ग्रांट डफनें जी दिली आहे ती निराधार असून बखरींच्या इतकीच विश्वसनीय आहे. अस्सल पत्रें व हकीकती पुढें आल्यावांचून

अमक्या बखरींतील मजकूर खरा व अमकींतील खोटा, असें निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं. तात्पर्य, ह्या प्रसंगाची खरी हकीकत सजविण्यास निवळ बखरींचा व तवारिखांचा कांहीं उपयोग होईल असें वाटत नाहीं. शके १५७७ त केव्हां तरी शिवाजीनें मोऱ्यांस जिंकिलें, चंद्रराव कोणत्या तरी कारणानें मेला, त्याचे पुत्र पुण्यांत निमजग्यांत कैदेंत होते, राघो बल्लाळ व संभाजी कावजी ह्या मोहिमेंत प्रमुख होते, हें मोऱ्यांचें प्रकरण निदान चार महिने तरी चाललें होतें, व तें शके १५७७ च्या पावसाळ्याखेरीज कोणत्या तरी ऋतूंत घडून आलें, ह्या पलीकडे जास्त गोष्टींवर विश्वास ठेवण्यास जागा नाहीं. सारांश, अस्सल आधार कांहीं तरी असल्याशिवाय ह्या बखरींतील तपशिलावर विशेष विश्वास ठेवून चालणें उपयोगाचें नाहीं.

( ३ ) तपशिलासंबंधानें तिसरें प्रकरण अफजलखानाच्या पराभवाचें आहे. अफजलखानाच्या पराभवाचा वृत्तांत सर्व बखरींतून दिलेला आहे. शिवाय आक्वर्थ व शाळिग्राम ह्यांनीं छापिलेल्या पोवाड्यांतहि ह्या प्रसंगाचें वर्णन आहे. खानमजकुराच्या पराभवाचा इतिहास त्या वेळीं व पुढेंहि सर्व पृथ्वींत महशूर झाल्यामुळें व तो प्रसंगहि अघटित असल्यामुळें त्याचें वर्णन सर्व बखरींतून व पोवाड्यांतून विशेष खुलाशानें दिलेलें असतें, व तें इतर वृत्तांतापेक्षां जास्त विश्वसनीय दिसतें. अफजलखानाचा वध शके १५८१ विकारीनाम संवत्सरीं मार्गशीर्ष शुद्ध ५ भृगुवारीं झाला असें मल्हार रामराव सांगतो. " शुद्ध १३ स अफदुलखानाचा सरंजाम आणिला " म्हणून शिवदिग्विजयकार लिहितो, त्यावरून मल्हाररामरावाची अफजलखानाच्या वधाची मित्ती खरी ठरते. आतां शंका अशी येते कीं, ज्या मुसलमान सरदारास शिवाजीनें शके १५८१ च्या मार्गशीर्षांत मारिलें त्याचें नांव अफजलखान कीं अफजुलखान कीं अबदुलाखान, कीं अबदुलखान ? पोवाड्यांत व शिवदिग्विजयांत ह्या सरदाराला अबदुलखान म्हणून म्हटलें आहे, मल्हार रामराव त्याला अफजलखान म्हणून म्हणतो; व ग्रांट डफ अफझुलखान असें लिहितो. खरें नांव काय असावें तें ठरविण्यास त्या वेळच्या अस्सल पत्रांखेरीज सोय नाहीं. वांई येथील चित्राव यांच्या दप्तरांतील अफजलखानाचे ११ हुकुमनामे मजजवळ आहेत. त्यांत त्याचें नांव अफजलखान असें लिहिलेलें आहे. पैकीं एका हुकुमनाम्याचा शिरोभाग येथें देतोः—

> अज् रफ्तखाने खोदायवंद खाने अलीशान खाने अफजलखान
> महमदशाही खुलीदयाम दौलतहू बजाने व कारकुनानी हालवा
> इस्तकबल वा देशमुखाने प॥ वाई बिदानंद. सु॥ सन खमसैन
> अलफ. दरींविले.........................................

तेरीख १८ जमादिलाखर.

ह्या उताऱ्यावरून एवढें खास आहे कीं, शिवाजीनें मारिलेल्या सरदाराचें खरें नांव अफजलखान होतें. हा अफजलखान विजापूरच्या महमद आदिलशहाचा दासीपुत्र असावा, असें वरील उताऱ्यांतील " महमदशाही " ह्या पदावरून वाटतें. याची आई भटारीण असावी, असें अफजलखानाच्या पोवाड्याच्या २९ व्या कडव्यांतील " तूं तर भटारनीका

छोरा " ह्या ओळीवरून व चित्रगुप्ताच्या " भटारीच्या पोरा परम कपटीया " ह्या ओळीवरून ( चित्रगुप्त पृष्ठ २७ ) स्पष्ट दिसतें. मजजवळील अफजलखानाच्या ११ हुकुमनाम्यांपैकीं अगदीं अलीकडला हुकुमनामा मार्गशीर्ष शु॥ १५ शके १५८० चा आहे व अगदीं पलीकडला शके १५७१ तील वैशाख व॥ ३ चा आहे. मिळालेल्या लेखांवरून, व तेवढ्याच पुरतें, असें म्हणावें लागतें कीं, रणदुल्लाखान शके १५७१ च्या चैत्राच्या आधीं वारल्यावर वांईची सुभेदारी अफजलखानास मिळाली. ती सुभेदारी शके १५८० च्या मार्गशीर्षापर्यंत व, अर्थात् वध होईपर्यंत त्याजकडेसच होती. शके १५८० च्या मार्गशीर्षाच्या सुमारास शिवाजीनें रेटल्यामुळें अफजलखान विजापुरास तक्रार करण्यास गेला, तो सैन्य घेऊन शके १५८१ च्या आश्वीनांत शिवाजीवर स्वारी करण्यास सिद्ध झाला. बखरींतून अफजलखानाला वजीर म्हटलें आहे तें अर्थात्, अविश्वसनीय दिसतें. वजिरी करण्यास शके १५७१ पासून शके १५८१ पर्यंत अफजलखान सतत विजापुरीं कधींच नव्हता. विजापूर, तुळजापूर, माणकेश्वर, करकमभोसें, शंभू महादेव, रहिमतपूर, वांई, रडतोंडी, प्रतापगड अशा टप्प्यांनीं अफजलखान प्रतापगडापर्यंत गेला. वांईस आल्यावर वांईचा कुळकरणी कृष्णाजी भास्कर म्हणून होता त्याला त्यानें शिवाजीकडे पाठविलें. सध्यांच्या वांईच्या कुळकर्ण्यांचा कृष्णाजी भास्कर हा पूर्वज होय. अफजलखान वांईस सुभेदार असल्यामुळें कृष्णाजी भास्कर कुळकर्ण्यांचा व अफजलखानाचा परिचय विशेष होता हें उघड आहे. कृष्णाजी भास्कर शिवाजीकडे गेल्यावर पंताजी गोपीनाथ यास शिवाजीनें अफजलखानाकडे पाठविलें. पंताजी गोपीनाथ हा शिवाजीच्या पदरचा कारकून होता. सातारा येथील बहिरोपंत पिंगळे यांच्या कुळकर्णाच्या दप्तरांत पंताजी गोपीनाथ सरसुभेदार हें नांव एका हुकुमनाम्यावर आहे. हा हुकुमनामा यद्यपि शके १५८१ नंतरचा आहे, तत्रापि पंताजी गोपीनाथ शिवाजीच्या पदरचा होता हें खास आहे. कृष्णाजी भास्कराच्या निरोपावरून व पंताजी गोपीनाथाच्या शिष्टाईवरून अफजल प्रतापगडास गेला व तेथें कृतकर्माचा झाडा देतां झाला. येणेंप्रमाणें अफजलखानी प्रकरणाचा खरा इतिहास आहे. सभासदी बखरींतील व मल्हाररामरावाच्या चरित्रांतील आशय मी म्हणतों असाच आहे. पवाड्यांतीलहि हकीकत बहुतेक माझ्या म्हणण्याला पोषकच आहे. अस्सल कागदपत्रांचा उपयोग करतां आला नसतां, तर हा खरा इतिहास देतां आला नसता. नुसत्या बखरींतील तपशिलावर इमारत रचण्याचा प्रयत्न करण्यास गेलें असतां रा. कार्कारियाप्रमाणें व्यर्थ जलताडन करीत बसण्याचें श्रेय मात्र पदरीं येतें. मीं दिलेल्या वरील वृत्तांतावरून कोणत्या बखरींतील मजकूर खरा आहे, व कोणत्या बखरींतील खोटा आहे, हें सहज समजण्यासारखें आहे.

तपशिलाच्या विश्वसनीयत्वासंबंधानें मला जें कांहीं दाखवून द्यावयाचें होतें, तें वर स्पष्ट झालें आहे. अनुक्रमासंबंधानें विचार दुसऱ्या शंकास्थानांत केलाच आहे. त्यावरून अस्सल कागदपत्रांच्या कसोटीखेरीज कोणत्याहि बखरींतील मजकूर खरा धरून चालूं नये असा सिद्धांत ठरतो. अस्सल पत्रांच्या साहाय्याखेरीज वादविवाद करणें अगदींच निरुपयोगी आहे असेंच केवळ माझें म्हणणें नाहीं; वादविवादानें तपशिलांतील शंकास्थानें

कोणतीं व अस्सल पत्रें कोणत्या मुद्यावर हावींत, ह्याचा उलगडा होण्यासारखा असतो. तेव्हां तो तर हवाच आहे. परंतु मुख्य धोरण अस्सल पत्रें शोधून काढण्याकडे असलें पाहिजे. त्यावांचून इतिहासाची फोड यथास्थित व मनाजोगती कदापि होणें नाहीं.

येणेंप्रमाणें बखरींतील मजकुराच्या कालानुक्रमासंबंधानें व तपशिलासंबंधानें शंका काय येतात त्यांचें निरूपण झालें. ( १ ) सभासदी बखर, ( २ ) चित्रगुप्ताची बखर, ( ३ ) चिटणीसांची बखर, ( ४ ) शिवदिग्विजय, ( ५ ) शिवप्रताप, ( ६ ) रायरी येथील बखर व ( ७ ) दलपतरायाची बखर, अशा सात बखरी परीक्षणार्थ निवडल्या होत्या. पैकीं सभासदी बखर, चिटणीसांची बखर, व शिवदिग्विजय ह्या बखरींनाच विशेष महत्त्व देणें भाग पडलें. सभासदांची बखर केवळ स्मृतीवर हवाला ठेवून दूर प्रांतीं लिहिली असल्यामुळें तींत कालानुक्रमाची व्यवस्था राहिली नाहीं. परंतु लेखकानें शिवाजीची कांहीं कारकीर्द स्वतः अनुभविली असल्यामुळें ज्या प्रसंगाची हकीकत त्यानें दिली आहे ते प्रसंग खरोखरीच घडले, एवढें कबूल करावें लागतें. हकीकतींतील तपशील तसा दिला आहे तसाच असेल किंवा कसें, ह्यावद्दल मात्र संशय येतो. मल्हार रामराव चिटणीसाच्या बखरींत जुन्या टिपणांचा उपयोग केला आहे, कोठें कोठें मितयाहि दिल्या आहेत व एक दोन स्थलीं जुन्या ग्रंथांतील उतारे दिले आहेत. हाच प्रकार शिवदिग्विजयांतहि विशेष झालेला दिसून येतो. त्यावरून शिवाजीच्या चरित्रांतील कित्येक प्रसंगांसंबंधानें असें विधान करतां येतें कीं, ह्या दोन बखरींतील कांहीं वाक्यें सभासदी बखरींहून जुनीं आहेत. बाकी शिवाजीच्या चरित्रांतील पुष्कळ प्रसंगांचा कालानुक्रम व हकीकतींचा तपशील सभासदी बखरीप्रमाणें ह्याहि दोन बखरींत संशययुक्त आहे. चित्रगुप्ताच्या बखरीसंबंधीं माझें म्हणणें काय आहे तें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. बाकी राहिलेल्या तीन बखरी अधून मधून बघण्यासारख्या आहेत. अलीकडे भारतवर्षांत शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर छापिली आहे, तिच्यासंबंधीं विशेष कांहीं सांगण्यासारखें आहे असें नाहीं. येथें आक्वर्थ व शाळिग्राम यांनीं छापिलेल्या पोवाड्यांसंबंधीं व रा. मुजुमदार यांनीं छापिलेल्या प्रभुरत्नमालेसंबंधीं दोन शब्द लिहिणें प्रासंगिक दिसतें. आक्वर्थ व शाळिग्राम यांनीं छापिलेल्या पोवाड्यांपैकीं तीन पोवाडे शिवाजीसंबंधानें आहेत. पैकी अफजलखानाचा व बाजी पासलकराचा पोवाडा अस्सल आहे. अर्थात् ते ते प्रसंग झाल्यावर लागलेच लिहिलेले आहेत. परंतु तानाजी मालुसऱ्याच्या पोवाड्यांतील कांहीं भाग तो जगप्रसिद्धच प्रसंग झाल्यावर लगेच लिहिला नाहीं,हें खात्रीनें सांगतां येतें. कां कीं, सिंहगड किल्ला औरंगझेबाच्या हातून शिवाजीनें घेतला असें असून तो विजापूरकरांच्या हातून शिवाजीनें घेतला असें दाखविण्याचा शाईराचा रोख दिसतो. पहिल्या कडव्यांत मोगल हा शब्द योजून पुढें त्याच कडव्यांत विजापूरचें नांव कवीनें घेतलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, ह्या कडव्यांत तानाजी मालुसऱ्याच्या एका जुन्या पोवाड्यांतील कांहीं ओळींचा कोण्या नवीन तत्कालीन इतिहास माहीत नसणाऱ्या कवीनें आपल्या कवितेशीं जोड बनविला आहे, तसेंच ह्या पोवाड्याच्या २६ व्या कडव्यांत ' ग्याट ' हा शब्द योजिला आहे, त्यावरून तर ह्या कडव्यांतील ही

ओळ क्षेपक असावी, असें निःसंशय ठरतें. शिवाय, ह्या पोवाड्याच्या शेवटल्या कडव्यांत " हजार रुपयांचा तोडा । हातामधीं घातला । त्यारे तुळशीदास शाहीराच्या " अशी तुळशीदास शाहीराहून निराळ्या अशा तिसऱ्याच कवीची उक्ति आहे. सारांश तुळशीदास कवीच्या मूळ पोवाड्यांत नवीन भर घालून हा पोंवाडा तयार केलेला आहे. पोवाड्यांना टीपा दिल्या आहेत. त्याहि पुष्कळ ठिकाणीं चुकलेल्या आहेत. उदाहरणार्थ, ' साखरें हें गांव कुलाबा जिल्ह्यांत आहे. ' म्हणून एक टीप ३३ व्या पृष्ठावर दिली आहे. साखरें हें येल्याच्या पेठेच्या जवळ राजगडासमोर मावळांत आहे, कोंकणांत नाहीं. तात्पर्य, सदर पोवाडे पारखून व तपासून काळजीनें छापिलेले नाहींत. प्रभुरत्नमालेंतील परिशिष्टांखेरीज बाकीचा मुख्य भाग पुनरुक्त, अतिशयोक्त, अप्रमाण व बालिश असा आहे. परिशिष्टांत यद्यपि अस्सल असे लेख छापिले आहित तरी त्यांत अशुद्ध असा भाग बहुत आहे. उदाहरणार्थ, चवथ्या परिशिष्टांतील " सु. सितैन सबैन अलफ " हीं अक्षरें चुकलेलीं आहेत. पांचव्या परिशिष्टांत बहुल चतुर्दशीला २१ चंद्र दिला आहे तो अर्थात् चुकला आहे. कारण, वद्य १४ ला २१ वा चंद्र कधींच नसतो. तसेंच ह्याच परिशिष्टांत राज्याभिषेक शक २९ ला संवत्सर सर्वजित् सांगितला आहे, व राजा शाहू दिला आहे! तात्पर्य, प्रभुरत्नमाला हें पुस्तक बहुत स्थळीं अप्रमाण आहे. पोवाडे व प्रभुरत्नमाला ह्या पुस्तकांची परीक्षा ह्या स्थळीं अशाकरितां केली कीं, दोन्ही पुस्तकांतील कांहीं भाग शिवाजीच्या कारकीर्दींतलि प्रसंगांना अनुलक्षून आहेत.

ह्या तीन शंकास्थानांत बखरींतील कांहीं भागांची परीक्षा करून दाखविली आहे, त्यावरून बखरींतील मजकुराच्या अनुक्रमाच्या व तपशिलाच्या विश्वसनीयतेची इयत्ता सांहाजिकच कळून येईल. सर्व बखरींतील सर्व मजकुराची परीक्षा करण्याचें विशेष प्रयोजन नसल्यामुळें व प्रकृत स्थळ त्या कामाला अपूर्तें असल्यामुळें ह्यासंबंधीं जास्त विस्तार येथें करीत नाहीं.

---

## शंकास्थान चवथें.

मानवी इतिहास काल व स्थल ह्यांनीं बद्ध झालेला आहे. कोणत्याहि प्रसंगाचें वर्णन द्यावयाचें म्हटलें म्हणजे, त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. प्रसंगांचा परिष्कार कालानें व स्थलानें विशिष्ट कसा झाला आहे, हें दाखवितांना त्या कालीं व त्या स्थळीं कोणत्या व्यक्ती प्रामुख्यानें पुढें येतात हेंहि इतिहासकाराला स्वाभाविकपणेंच सांगावें लागतें. सारांश, काल, स्थल व व्यक्ती ह्या त्रयींची जी सांगड तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देतां येते. कोणत्याहि बखरींत किंवा इतिहास हें प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रंथांत जेथें ह्या त्रयींतील एकाची किंवा सर्वांची गफलत अगर लोप केलेला असतो तेथें ऐतिहासिक प्रसंगाची यथास्थित व सशास्त्र मांडणी झाली नाहीं असें म्हणावें लागतें. परीक्षेकरितां घेतलेल्या बखरींत व इतिहास हें

प्रौढ नांव धारण करणाऱ्या ग्रांट डफच्या ग्रंथांत योग्य आधार न मिळाल्यामुळें किंवा योग्य आधार मिळविण्याची खटपट न केल्यामुळें, किंवा शिक्षणाभावामुळें किंवा केवळ अज्ञानामुळें वर सांगितल्या त्रयींतील एकाचा किंवा अनेकांचा लोप वेळोवेळीं झालेला वाचकांच्या नजरेस आणून दिला आहे. ज्यांनीं प्रसंग घडवून आणिले, त्या व्यक्तींच्या नांवांचा लोप किंवा गफलत, जेव्हां प्रसंग घडले त्या कालचा लोप किंवा गफलत, व जेथें प्रसंग घडले त्या स्थलांचा लोप किंवा गफलत बखरकारांच्या बखरींत व ग्रांट डफच्या इतिहासांत अनेक प्रसंगीं झाल्याकारणानें प्रसंगांचा कालानुक्रम, त्यांचें व्यक्तिमाहात्म्य, व त्यांचें स्थलवैशिष्ट्य व्यवस्थित रीतीनें ध्यानांत येणें मुष्कील होतें व इतिहासाच्या अस्तित्वाचें मुख्य प्रयोजन व हेतू निष्फल होतात. व्यक्तींच्या हातून विशिष्ट कालीं व विशिष्ट स्थलीं घडलेल्या अनेक प्रसंगांचें मुद्देसूद, तपशीलवार, व व्यवस्थित वर्णन देतां देतां विशिष्ट कालीं व विशिष्ट देशांत कोणत्या महाविचाराची कशी उत्क्रान्ति झाली व काय परिणाम झाले, हें वर्तमान व भावी पिढ्यांना दाखवून देण्याचें भूत व वर्तमान इतिहासाचें मुख्य प्रयोजन आहे. हें प्रयोजन मराठी व मुसलमानी बखरींतील व ग्रांट डफच्या ग्रंथांतील मजकुरांवरून व्हावें तसें साध्य होत नाहीं. ह्याला मुख्य कारण ह्या ग्रंथांत कालाचा, स्थलांचा किंवा व्यक्तींचा योग्य व व्यवस्थित निर्देश झाला नाहीं हें होय. अर्थात् इतिहास व तज्जन्य उपदेश ह्या बखरींतील व इतिहासांतील मजकुरापासून उद्भूत होत नाहींत. विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तींचें विशिष्ट आचरण ह्या तीन घटकांचा संघात झाला असतां प्रसंग ही वस्तू बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणतां येईल तिची निर्मिती होते. ही निर्मिती होत असतां अनेक कालांशांनीं घटित जो कालाचा महाभाग—ज्यास epoch, age, मन्वंतर वगैरे संज्ञा देतात, त्यांत कोणत्या विचाराचें प्राधान्य आहे हें सहज समुद्भूत होतें. ह्या विचारापासूनच वर्तमान व भावी पिढ्यांना गतकालीन पिढ्यांच्या कर्मसंततीचें ज्ञान होतें. कोणती कर्मसंतती घेऊन आपला समाज जन्माला आला आहे व कोणत्या दिशेचें आचरण ठेविलें असतां, वर्तमान व भावी समाजाचा कर्मलोप होऊन समाज आत्यंतिक सुखाचा वाटेकरी, कालान्तरानें का होईना, पण होईल हेंहि ह्या गतकालीन विचारापासून अंशतः कळूं लागतें. गतकालीन पिढ्यांच्या कर्मांचें जें ज्ञान—ज्यास युगमाहात्म्य, Spirit of the age, Esprit d'epoc, वगैरे निरनिराळ्या भाषांतून समानार्थक संज्ञा आहेत—त्यासच इतिहासाचा आत्मा म्हणतात, किंवा इतिहासाचा आत्मा अशी औपचारिक भाषा योजण्यापेक्षां, त्यासच इतिहास हा व्यपदेश सामान्येंकरून देतात. हें युगमाहात्म्य, हें कालमाहात्म्य, ह्या इतिहासाचा आत्मा दाखवून देण्याचें अवघड काम अद्यापपर्यंत महाराष्ट्रांत कोण्याहि इतिहासकारानें यथास्थित केलें नाहीं. कां कीं, वर निर्दिष्ट केलेल्या घटकत्रयीचा पत्ता क्रमवार ह्या इतिहासकारांना लागला नाहीं. घटकत्रयीचा संघात कसा झाला, हें त्यांना कळलें नाहीं व अर्थात् महाराष्ट्राच्या इतिहासाच्या आत्म्याची ओळख त्यांना बिलकुल झाली नाहीं. घटकत्रयीचा पत्ता नीट न लागल्याकारणानें आत्मिक इतिहासाची ओळख

ह्या इतिहासकारांना झाली नाहीं एवढेंच नव्हे, तर अर्थात् तत्कालीन लहानमोठ्या व्यक्तींच्या चरित्रांतील अनेक गोष्टींचें अज्ञान त्यांचें ठायीं कायम राहिलें. राष्ट्रांतील मोठमोठ्या व्यक्तींचीं चरित्रें म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होतो, असें एक विधान आहे व तें बव्हंशीं खरें आहे. व्यक्ती ह्या समाजाच्या घटक होत व मोठ्या व्यक्ती समाजाचे मोठे घटक होत. अर्थात्, मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें कांहींएका अंशानें समाजाचा इतिहास होत. लहान व्यक्तींचीं चरित्रें व मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो. समाजांत मोठ्या व्यक्ती केव्हांही थोड्या असल्यामुळें मोठ्या व्यक्तींच्या इतिहासाला लहान व्यक्तींच्या म्हणजे बहुजनसमाच्या इतिहासाचा जोड द्यावा लागतो. केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्रानें समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाहीं, हें पक्कें समजून पाश्चात्य इतिहासकार बहुजनसमाजस्थितिसंबंधीं देववेल तितकी सशास्त्र व सप्रमाण माहिती आपापल्या इतिहासांतून देत असतात. मराठी बखरकारांना व ग्रांट डफला मोठमोठ्या व्यक्तींच्या चरित्रांतील बहुतेक प्रत्येक प्रसंगाची माहिती अपुर्ती, त्रोटक, तुटक व अव्यवस्थित देऊन समाधान मानणें जेथें भाग पडलें, तेथें त्यांच्या ग्रंथांतून तत्कालीन बहुजनसमाजाच्या स्थितीचें वर्णन वाचण्याची अपेक्षा करणें म्हणजे अयोग्य स्थलीं अपेक्षित वस्तूचा शोध करण्याचा व्यर्थ परिश्रम करण्यासारखेंच आहे. बखरकारांच्या व ग्रांट डफच्या ग्रंथांची यद्यपि अशी स्थिति आहे, तत्रापि इतिहासकाराच्या उच्च कर्तव्याचें स्मरण अधूनमधून त्यांना झालेलें दृष्टोत्पत्तीस येतें. अशीं स्थलें फार नाहींत, थोडींच आहेत, परंतु आहेत. ह्या स्थलांचा प्रस्तुत शंकास्थानांत विचार कर्तव्य आहे. पहिल्या तीन शंकास्थानांत मजकुराच्या अनुक्रमासंबंधीं व तपशिलासंबंधीं, म्हणजे काल, स्थल व व्यक्ती ह्यांच्या संबंधीं, ह्या लेखकांनीं काय काय गफलती व दोष केले आहेत ते दाखवून कैफियत देण्याच्या व रचण्याच्या कामीं हे ग्रंथकार किती पंगू आहेत ह्या बाबीचा खल झाला. आतां ह्या व पुढील शंकास्थानांत ऐतिहासिक सामान्य सिद्धांत स्पष्टपणें सांगण्याच्या व मोठमोठ्या व्यक्तींचें स्वभाववर्णन करण्याच्या कामीं ह्या ग्रंथकारांची ऐपत कितपत आहे, त्याची परीक्षा करतो.

सामान्य सिद्धांत सांगण्याचा प्रयत्न शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें, मल्हार रामराव चिटणिसानें व ग्रांट डफनें स्वतंत्र असा फारच थोड्या स्थलीं केला आहे, व इतर बखरकारांनीं मुळींच केला नाहीं. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें व मल्हार रामरावानें सतराव्या शतकाच्या पहिल्या व दुसऱ्या पादांत हिंदुधर्माच्या दैन्यावस्थेचा उल्लेख कोठें कोठें प्रसंगोपात्त केला आहे. ह्या पलीकडे समाजाला सजीव करणाऱ्या महाकारणांचा उल्लेख ह्या बखरनविसांनीं केला नाहीं. ग्रांट डफला तर इतक्या खोल पाण्यांत शिरण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकताच भासली नाहीं. सतराव्या शतकांत महाराष्ट्रांतील मोठमोठ्या व्यक्तींना ज्या महाविचारानें हलवून सोडिलें, त्यांचें सविस्तर किंवा संक्षिप्त प्रतिपादन बखरनविसांनीं केलें नाहीं हें खरें आहे; परंतु त्या महाविचाराचा द्योतक जो शब्द त्याचा उच्चार वारंवार त्यांनीं केलेला आहे. ग्रांट डफला ह्या महाशब्दाची ओळखहि नव्हती. ज्याला तत्कालीन प्रसंगांची व्यवस्थित, मुद्देसूद व सविस्तर हकीकत देण्याची अडचण

पडली, त्याला तत्कालीन महाविचार व तद्वाचक शब्द धुंडाळीत बसण्याला अवकाश नव्हता हें रास्तच झालें. "बाकी ज्या मल्हार रामरावाच्या आधारानें ग्रांट डफनें आपल्या बखरीची रचना केली त्या मल्हाररावाच्या बखरींत ह्या महाशब्दाचा उल्लेख झालेला आहे. हा महाशब्द न्यायमूर्ती रानडे व प्रो० राजारामशास्त्री भागवत ह्यांच्या लेखांनीं आधुनिक वाचकांस प्रथम माहीत झाला. इतकेंच कीं ह्या महाशब्दाचा खरा अर्थ ह्या दोघांहि इतिहासज्ञांच्या ध्यानांत जसा यावा तसा आला नाहीं. ह्याचें कारण असें झालें कीं ह्या दोघांहि शोधकांना हा शब्द प्रथम समर्थांच्या दासबोधांत प्रमुखत्वानें उच्चारलेला सांपडला व तेवढ्यावरच समाधान मानून ह्या शब्दाचा अर्थ करण्यास ते लागले. शिवाय ह्या शब्दाचा अर्थ करतांना, ह्या दोघांहि शोधकांच्या धर्मसमजुतीची पूर्वग्रहात्मक छटा ह्या शब्दाच्या अर्थावर आपला ठसा प्राबल्येंकरून उठविती झाली. सोळाव्या शतकांत पश्चिम यूरोपांत क्याथोलिक धर्माविरुद्ध जी क्रांति झाली तिचे वृत्तांत वाचून ह्या शोधकांचीं मनें तल्लीन झालेलीं आहेत. व उत्तर हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत दहाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जी भागवत-धर्माची किंवा भक्तिमार्गाची लाट उसळली ती सनातन धर्माच्या विरुद्ध क्रांतीच होती, असें ह्या शोधकांचें मत आहे. हें मत खरें आहे किंवा खोटें आहे, हें पारखण्याचें हें स्थळ नव्हें. येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, युरोपांतील प्रोटेस्टंट धर्मांत व महाराष्ट्रांतील भक्तिमार्गांत कांहीं, कदाचित् बरेंच, साम्य आहे असें ह्या शोधकांस वाटलें. क्याथोलिक धर्माविरुद्ध क्रांती करूं भासणाऱ्या धर्मास भागवत धर्म, भक्तिमार्ग, उपासना मार्ग, वगैरे एकाहून जास्त संज्ञा असतां, महाराष्ट्रधर्म हा नवीन शब्द भेटतांच तोहि ह्या क्रांतिरूप धर्मकल्पनेचा वाचक असावा, अशी ह्या शोधकांनीं आपली समजूत करून घेतली. महाराष्ट्रधर्म ह्या शब्दाचा वास्तविक अर्थ बखरकारांच्या व रामदासाच्या म्हणण्याप्रमाणें काय आहे तें पाहिलें असतां व ऐतिहासिक परंपरेनें ह्या शब्दाचा अर्थ काय होतो हें लक्षांत घेतलें असतां, न्यायमूर्ती रानडे व प्रो० भागवत ह्यांनीं केलेला ह्या शब्दाचा अर्थ बरोबर नाहीं, हें स्पष्ट होईल.

धर्म ह्या शब्दाचे अर्थ मराठी भाषेंत चार आहेतः--( १ ) धर्म म्हणजे गुण, ( २ ) धर्म म्हणजे कर्तव्य, ( ३ ) धर्म म्हणजे दान, व ( ४ ) धर्म म्हणजे आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्गपैकीं चवथा अर्थ महाराष्ट्रधर्म, ह्या शब्दांतील धर्म ह्या पदाचा करून महाराष्ट्रधर्म म्हणजे सनातन धर्माच्या विरुद्ध असा एक धर्मपंथ असावा अशी ह्या दोघा इतिहासज्ञांनीं आपली समजूत करून घेतली आहे. परंतु रामदासाची व बखरकारांची तशी समजूत नव्हती. रामदासानें क्षात्रधर्म, सेवाधर्म, राजधर्म, स्त्री-धर्म, पुरुषधर्म, वगैरे जे शब्द योजिले आहेत त्यांत धर्म ह्या शब्दाचा अर्थ कर्तव्य असा स्पष्ट आहे. तोच प्रकार महाराष्ट्रधर्म ह्या शब्दाचा आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे सर्व महाराष्ट्राच, सर्व मराठा समाजाचें कर्तव्य असा रामदासाचा आशय आहे. 'मराठा तेवढा मेळवावा, महाराष्ट्र-धर्म वाढवावा,' ह्या वाक्यांत रामदासानें आपला आशय स्पष्ट करून दाखविला आहे. भारतवर्षांत मराठा म्हणून जेवढा असेल--मग तो महाराष्ट्रांत असो किंवा महाराष्ट्राच्या

बाहेर असो, शिवाजीच्या पदरीं असो, किंवा विजापूर, भागानगर, अमदाबाद, किंवा दिल्ली, येथील यवनांच्या सेवेंत असो,--तेवढा सर्व एक करून' महाराष्ट्रधर्माची व्याप्ती सर्व मराठमंडळांत करावी, असा रामदासाचा उपदेश होता. महाराष्ट्रधर्मांत मराठा जेवढा असेल तेवढयाचीच व्याप्ती करावी, असा रामदासाचा कटाक्ष होता. महाराष्ट्रधर्म हा राजकीय उन्नतीचा मार्ग नसून धर्मोन्नतीचा जर पंथ असता, तर त्यांत भारतवर्षातील इतर हिंदूचाहि समावेश करावा असा रामदासांनीं स्पष्टोल्लेख केला असता. संतमंडळींचा जो भक्तिमार्ग, त्यांत हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, अतिशूद्र, वाटेल तो खपत असे. परंतु मराठ्यांचा जो महाराष्ट्रधर्म त्यांत अस्सल मराठा जो असेल तोच सामावला जाई. धर्म, धर्मस्थापना, हिंदुधर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत, तेथें तेथें धर्म हा शब्द दुःखध्वंसाचा मार्ग ह्या अर्थीच योजिलेला आहे. परंतु सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, महाराष्ट्रधर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत, तेथें तेथें धर्म ह्या शब्दाचा अथ कर्तव्य असा बिनचूक आहे. " Saints and prophets of Maharashtra " म्हणून जो ऐतिहासिक निबंध न्यायमूर्ती रानड्यांनीं लिहिला आहे, त्यांत " मराठा तेवढा मिळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा, " ह्या वाक्याचें भाषांतर, " Unite all who are Marathas together and propogate the Dharma (Religion) of Maharashtra," असें दिलें आहे. धर्म ह्या शब्दाचा 'आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्ग' म्हणून जो चवथा अर्थ आहे, तो न्यायमूर्तींनीं स्वीकारिला आहे, व तो अर्थात् चुकलेला आहे. सतराव्या शतकाच्या शेवटल्या पादांत महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा उपदेश रामदासानें संभाजीला केला व त्या वेळीं महाराष्ट्रधर्म हा शब्द रामदासानें प्रथमच योजिला, असेंहि सुचविण्याचा न्यायमूर्तींचा कटाक्ष दिसतो. परंतु तोहि निराधार आहे. शके १५७१ त शिवाजीला रामदासानें जें पत्र पाठविलें आहे, त्यांत " महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं, तुह्मांकरितां " म्हणून रामदासानें स्पष्ट म्हटलें असल्याकारणानें, महाराष्ट्रधर्म हा शब्द शके १५७१ तच रामदासानें बनविला असें म्हणावें लागतें. अर्थात् महाराष्ट्रधर्माचें नामकरण शके १६०३ त प्रथम झालें अशी गोष्ट नसून, तें चाळीस वर्षांपूर्वी म्हणजे शके १५७१ तच झालें होतें. शिवाजीच्या वेळीं झालेल्या राज्यक्रांतीचें मूळ तत्कालीन धर्मसमजुतींत होतें, हें मला कबूल आहे. परंतु न्यायमूर्ती रानडे जी धर्मक्रांती म्हणतात, तिचा वाचक महाराष्ट्रधर्म हा शब्द नव्हता, हें मला मुख्यतः सांगावयाचें आहे. तसेंच शिवकालीन धर्मसमजुतीला न्यायमूर्ती धर्मक्रांती म्हणून संज्ञा देतात; परंतु तेंहि निराधार आहे. एका धर्माचा लोप होऊन दुसरा धर्म स्थापिला गेला असतां धर्मक्रांती होते; किंवा एकाच धर्मांतील एकाच शाखेच्या दुष्ट मतांचा नाश करून दुसऱ्या शाखेच्या मतांची जी स्थापना होते, तिलाहि धर्मक्रांती म्हणून म्हणतां येईल. ह्या दोन्ही प्रकारच्या धर्मक्रांतींपैकीं, एकींतहि शिवाजीच्या वेळच्या धर्मसमजुतींचा अंतर्भाव होत नाहीं. शिवकालीन धर्मसमजुतींचें स्वरूप न्यायमूर्ती म्हणतात त्याहून अगदींच निराळें होतें. हिंदुधर्म, सनातनधर्म, भक्तिमार्ग, उपासनामार्ग, ह्यांचा पंधराव्या शतकापेक्षां सतराव्या शतकांत मराठ्यांना अत्यंत

उत्कट अभिमान उत्पन्न झाला, तो इतका उत्कट झाला कीं, हिंदुधर्माचा, सनातनधर्माचा, भक्तिमार्गाचा पूर्ण द्वेष्टा जो यवनांचा महमदीधर्म तो हाकून लावण्यास मराठ्यांना तिनें उद्युक्त केलें. सनातनधर्माच्या विरुद्ध भक्तिमार्गाचा उदय होऊन मराठ्यांच्या मनाचा कोतेपणा नाहींसा झाला व तेणेंकरून चोहोंबाजूनें स्वतंत्र होण्याची उत्कट इच्छा मराठ्यांच्या मनांत बाणली व मराठ्यांनीं स्वराज्य स्थापिलें, अशी कार्यपरंपरा न्यायमूर्तींनीं जोडिली आहे; परंतु ती मुळापासून अशास्त्र आहे असें मला वाटतें. ही कार्यपरंपरा अशास्त्र कशी आहे तें स्पष्टपणें सिद्ध करण्यास भक्तिमार्गाच्या उत्पत्तीचा व प्रगतीचा इतिहास संक्षेपानें सांगितला पाहिजे.

बौद्ध धर्माचें प्राबल्य उत्कट होऊन सर्व भारतवर्ष त्या धर्माच्या आवरणानें गुरफटून जात असतां, श्रीमच्छंकराचार्यांचा उदय होऊन सनातन धर्माची स्थापना इसवी सनाच्या सहाव्या, सातव्या व आठव्या शतकांत हिंदुस्थानाच्या व महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत झाली. ह्या तीन शतकांत भारतवर्षांतून बौद्ध धर्माचें निष्कासन यद्यपि बहुतेक झालें, तत्रापि बौद्ध धर्मासारखाच जो जैनधर्म तो गुजराथेच्या उत्तरेस व महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर वगैरे प्रांतांत दहाव्या व अकराव्या शतकापर्यंत बराच प्रबल होता. बाराव्या शतकाच्या सुमारास जैनधर्माच्या विरुद्ध लिंगायतांचा पंथ व मानभावांचा पंथ महाराष्ट्रांत सुरू झाला. जैनांच्या, लिंगायतांच्या व मानभावांच्या संसर्गानें सनातन धर्माच्या गोटांतील लोकांच्याहि मनावर कांहीं परिणाम झाले, व त्यांपैकीं कांहींनीं भक्तिमार्ग, उपासनामार्ग, ह्या नांवाखालीं मोडणारी सनातनधर्माची एक निराळीच शाखा स्थापिली. ह्याच शाखेला संतमंडळीचा अथवा संताळ्याचा भक्तिपंथ म्हणून म्हणतात. जैन, लिंगायत व मानभाव ह्यांच्यांत कमजास्त प्रमाणानें जातिभेद व्यवहारांत मानीत नाहींत. संताळ्यांत विठोबाच्या मंदिरांत तेवढा जातिभेद मानीत नाहींत, व्यवहारांत मानतात. ह्या भक्तिपंथाची स्थापना महाराष्ट्रांत तेराव्या शतकांत झाली. संताळ्याची ही स्थापना झाल्यावर कांहीं कालानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तीनशें वर्षें, म्हणजे शके १२४० त देवगिरी घेतल्यापासून शके १५४० अहमदनगरची मनसबगिरी शहाजीला मिळेतोंपर्यंत, बहुतेक अव्याहत चालली. ह्या तीन शतकांत संताळ्याचेंच प्राबल्य महाराष्ट्रांत फार होतें. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको, एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदुःखें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, त्याच्यांत मन घालणें संताचें काम नव्हे. इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं. असल्या ह्या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन, महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिलें. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांती केली तिचें स्वरूप हें असें होतें. ह्या धर्मक्रांतीनें धर्मोन्नती राष्ट्रोन्नती होण्याचें एकीकडेच राहून उलटी धर्मावनती, राष्ट्रावनती मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून,

बाहेर असो, शिवाजीच्या पदरीं असो, किंवा विजापूर, भागानगर, अमदाबाद, किंवा दिल्ली, येथील यवनांच्या सेवेंत असो,--तेवढा सर्व एक करून' महाराष्ट्रधर्माची व्याप्ती सर्व मराठमंडळांत करावी, असा रामदासाचा उपदेश होता. महाराष्ट्रधर्मांत मराठा जेवढा असेल तेवढयाचीच व्याप्ती करावी, असा रामदासाचा कटाक्ष होता. महाराष्ट्रधर्म हा राजकीय उन्नतीचा मार्ग नसून धर्मोन्नतीचा जर पंथ असता, तर त्यांत भारतवर्षांतील इतर हिंदूंचाहि समावेश करावा असा रामदासांनीं स्पष्टोल्लेख केला असता. संतमंडळींचा जो भक्तिमार्ग, त्यांत हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, अतिशूद्र, वाटेल तो खपत असे. परंतु मराठ्यांचा जो महाराष्ट्रधर्म त्यांत अस्सल मराठा जो असेल तोच सामावला जाई. धर्म, धर्मस्थापना, हिंदुधर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत, तेथें तेथें धर्म हा शब्द दुःखध्वंसाचा मार्ग ह्या अर्थींच योजिलेला आहे. परंतु सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, महाराष्ट्रधर्म हे शब्द जेथें जेथें दासबोधांत योजिले आहेत, तेथें तेथें धर्म ह्या शब्दाचा अर्थ कर्तव्य असा बिनचूक आहे. " Saints and prophets of Maharashtra " म्हणून जो ऐतिहासिक निबंध न्यायमूर्ती रानड्यांनीं लिहिला आहे, त्यांत " मराठा तेवढा मिळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा, " ह्या वाक्याचें भाषांतर, " Unite all who are Marathas together and propogate the Dharma (Religion) of Maharashtra," असें दिलें आहे. धर्म ह्या शब्दाचा 'आत्यंतिक दुःखध्वंसाचा मार्ग' म्हणून जो चवथा अर्थ आहे, तो न्यायमूर्तींनीं स्वीकारिला आहे, व तो अर्थात् चुकलेला आहे. सतराव्या शतकाच्या शेवटल्या पादांत महाराष्ट्रधर्म वाढविण्याचा उपदेश रामदासानें संभाजीला केला व त्या वेळीं महाराष्ट्रधर्म हा शब्द रामदासानें प्रथमच योजिला, असेंहि सुचविण्याचा न्यायमूर्तींचा कटाक्ष दिसतो. परंतु तोहि निराधार आहे. शके १५७१ त शिवाजीला रामदासानें जें पत्र पाठविलें आहे, त्यांत " महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं, तुह्मांकरितां " म्हणून रामदासानें स्पष्ट म्हटलें असल्याकारणानें, महाराष्ट्रधर्म हा शब्द शके १५७१ तच रामदासानें बनविला असें म्हणावें लागतें. अर्थात् महाराष्ट्रधर्माचें नामकरण शके १६०३ त प्रथम झालें अशी गोष्ट नसून, तें चाळीस वर्षांपूर्वीं म्हणजे शके १५७१ तच झालें होतें. शिवाजीच्या वेळीं झालेल्या राज्यक्रांतीचें मूळ तत्कालीन धर्मसमजुतींत होतें, हें मला कबूल आहे. परंतु न्यायमूर्ती रानडे जी धर्मक्रांती म्हणतात, तिचा वाचक महाराष्ट्रधर्म हा शब्द नव्हता, हें मला मुख्यतः सांगावयाचें आहे. तसेंच शिवकालीन धर्मसमजुतीला न्यायमूर्ती धर्मक्रांती म्हणून संज्ञा देतात; परंतु तेंहि निराधार आहे. एका धर्माचा लोप होऊन दुसरा धर्म स्थापिला गेला असतां धर्मक्रांती होते; किंवा एकाच धर्मांतील एकाच शाखेच्या दुष्ट मतांचा नाश करून दुसऱ्या शाखेच्या मतांची जी स्थापना होते, तिलाहि धर्मक्रांती म्हणून म्हणतां येईल. ह्या दोन्ही प्रकारच्या धर्मक्रांतींपैकीं, एकींतहि शिवाजीच्या वेळच्या धर्मसमजुतींचा अंतर्भाव होत नाहीं. शिवकालीन धर्मसमजुतीचें स्वरूप न्यायमूर्ती म्हणतात त्याहून अगदींच निराळें होतें. हिंदुधर्म, सनातनधर्म, भक्तिमार्ग, उपासनामार्ग, ह्यांचा पंधराव्या शतकापेक्षां सतराव्या शतकांत मराठ्यांना अत्यंत

उत्कट अभिमान उत्पन्न झाला, तो इतका उत्कट झाला कीं, हिंदुधर्माचा, सनातनधर्माचा, भक्तिमार्गाचा पूर्ण द्वेष्टा जो यवनांचा महमदीधर्म तो हाकून लावण्यास मराठ्यांना तिनें उद्युक्त केलें. सनातनधर्माच्या विरुद्ध भक्तिमार्गाचा उदय होऊन मराठ्यांच्या मनाचा कोतेपणा नाहींसा झाला व तेणेंकरून चोहोंबाजूनें स्वतंत्र होण्याची उत्कट इच्छा मराठ्यांच्या मनांत बाणली व मराठ्यांनीं स्वराज्य स्थापिलें, अशी कार्यपरंपरा न्यायमूर्तींनीं जोडिली आहे; परंतु ती मुळापासून अशास्त्र आहे असें मला वाटतें. ही कार्यपरंपरा अशास्त्र कशी आहे तें स्पष्टपणें सिद्ध करण्यास भक्तिमार्गाच्या उत्पत्तीचा व प्रगतीचा इतिहास संक्षेपानें सांगितला पाहिजे.

बौद्ध धर्माचें प्राबल्य उत्कट होऊन सर्व भारतवर्ष त्या धर्माच्या आवरणानें गुरफटून जात असतां, श्रीमच्छंकराचार्यांचा उदय होऊन सनातन धर्माची स्थापना इसवी सनाच्या सहाव्या, सातव्या व आठव्या शतकांत हिंदुस्थानाच्या व महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत झाली. ह्या तीन शतकांत भारतवर्षांतून बौद्ध धर्माचें निष्कासन यद्यपि बहुतेक झालें, तत्रापि बौद्ध धर्मासारखाच जो जैनधर्म तो गुजराथेच्या उत्तरेस व महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर वगैरे प्रांतांत दहाव्या व अकराव्या शतकापर्यंत बराच प्रबल होता. बाराव्या शतकाच्या सुमारास जैनधर्माच्या विरुद्ध लिंगायतांचा पंथ व मानभावांचा पंथ महाराष्ट्रांत सुरूं झाला. जैनांच्या, लिंगायतांच्या व मानभावांच्या संसर्गानें सनातन धर्माच्या गोटांतील लोकांच्याहि मनावर कांहीं परिणाम झाले, व त्यांपैकीं कांहींनीं भक्तिमार्ग, उपासनामार्ग, ह्या नांवाखालीं मोडणारी सनातनधर्माची एक निराळीच शाखा स्थापिली. ह्याच शाखेला संतमंडळीचा अथवा संताळ्याचा भक्तिपंथ म्हणून म्हणतात. जैन, लिंगायत व मानभाव ह्यांच्यांत कमजास्त प्रमाणानें जातिभेद व्यवहारांत मानीत नाहींत. संताळ्यांत विठोबाच्या मंदिरांत तेवढा जातिभेद मानीत नाहींत, व्यवहारांत मानतात. ह्या भक्तिपंथाची स्थापना महाराष्ट्रांत तेराव्या शतकांत झाली. संताळ्याची ही स्थापना झाल्यावर कांहीं कालानें देवगिरी येथील मराठ्यांचें राज्य नष्ट झालें व यवनांची सत्ता महाराष्ट्रांत तीनशें वर्षे, म्हणजे शके १२४० त देवगिरी घेतल्यापासून शके १५४० अहमदनगरची मनसबगिरी शहाजीला मिळेतोंपर्यंत, बहुतेक अव्याहत चालली. ह्या तीन शतकांत संताळ्याचेंच प्राबल्य महाराष्ट्रांत फार होतें. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणें नको, पिणें नको, वस्त्र नको, प्रावरण नको, कांहीं नको, एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व कांहीं मिळालें. ऐहिक सुखदुःखें, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार, त्याच्यांत मन घालणें संताचें काम नव्हें. इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचें कांहीं नाहीं असल्या ह्या संतमंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन, महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिलें. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांती केली तिचें स्वरूप हें असें होतें. ह्या धर्मक्रांतीनें धर्मोन्नती राष्ट्रोन्नती होण्याचें एकीकडेच राहून उलटी धर्मावनती, राष्ट्रावनती मात्र झाली. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून,

मराठ्यांचे डोळे उघडले, ह्या पंगू संताळ्यांचा त्यांना वीट आला, आणि सनातन धर्माकडे, गो–ब्राह्मण प्रतिपालनाकडे व चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं पुन्हां धाव घेतली. ह्या उपरतीच्या वेळीं, रामदासस्वामी, रंगनाथस्वामी, मोरया देव वगैरे सनातनधर्माभिमानी विचारी साधू पुरुष झाले व ते महाराष्ट्रास महाराष्ट्रधर्माचा उपदेश करते झाले. ह्या सनातन धर्माभिमानी साधुपुरुषांच्या वेळीं संताळे आपला संथ मार्ग आक्रमीतच होते. परंतु इहलोकीचे अर्थ साधण्यास संताळ्याचा उपयोग कांहीं नाहीं हें तुकाराम पूर्णपणें जाणून होता. शिवाजी तुकारामाकडे उपदेश घेण्याकरितां गेला असतां त्या प्रामाणिक साधूनें आपल्यासारख्या पंगू माणसाकडे न येतां समर्थांच्याकडे जाण्यास शिवाजीस उपदेश केला. संताळ्यांतील पंगुत्वाला उपरोधूनच समर्थ हें नांव अस्तित्वांत आलें, हें लक्षांत घेतलें असतां, तुकारामाच्या उपदेशाचें महत्त्व व त्यानें स्वतः स्वीकारलेल्या पंथाचें लघुत्व कळून येईल. संताळ्याच्या उपदेशानें महाराष्ट्रांत नवीन जोम आला म्हणून न्यायमूर्ती रानडे म्हणतात तो खरा प्रकार नसून, समर्थांनीं काढिलेल्या नवीन रामदासी पंथाच्या उपदेशानें तो चमत्कार घडून आलेला आहे. निवृत्तीकडे ज्यांचे डोळे लागले त्या संतांच्या हातून हें प्रवृत्तिपर कृत्य व्हावें कसें ? "समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळीं कोण आहे !" असली धमकी देणाऱ्या समर्थांच्याच महोपदेशाचा तो परिणाम होय.

समर्थांनीं नवीन बनविलेल्या महाराष्ट्रधर्म या शब्दाचा नीट अर्थ न कळल्यामुळें, न्यायमूर्तींनीं रामदासांच्या महाराष्ट्रधर्माची व संतांच्या भक्तिमार्गाची तद्रूपता कल्पिली व एकाच्या गुणाचा आरोप दुसऱ्यावर केला. ह्या अवस्त्वारोपामुळें न्यायमूर्तींची कार्यपरंपरा चुकली व असमर्थ कारणापासून समर्थ कार्याची उत्पत्ति झाली असें चमत्कारिक विधान त्यांच्या हातून पडलें गेलें. श्रीमदाचार्यप्रणीत सनातनधर्माच्या कठोर आचाराला कंटाळून त्याच्या विरुद्ध झालेली जी धर्मक्रांती ती संताळ्याचा भक्तिमार्ग होय. ह्या पंगू भक्तिमार्गाच्या किंचित् विरुद्ध झालेली जी धर्मशुद्धि ती समर्थांच्या प्रवृत्तिपर महाराष्ट्रधर्माच्या साहाय्यानें पुनरुज्जीवित झालेला सनातनधर्म होय. ( १ ) श्रीमदाचार्यप्रणीत सनातनधर्म ( २ ) संतप्रणीत भक्तिमार्ग, व ( ३ ) श्रीसमर्थप्रणीत महाराष्ट्रधर्मोज्जीवित सनातनधर्म, अशी खरी परंपरा आहे. प्रवृत्तिपर धर्माला सोडून मराठ्यांनीं निवृत्तिपर भक्तिमार्गाचा अवलंब जेव्हां केला तेव्हां त्यांची राज्यावनति झाली; व निवृत्तिपर भक्तिमार्ग किंचित् सोडून प्रवृत्तिपर सनातन धर्माला पुन्हां येऊन मिळण्याचा प्रयत्न जेव्हां त्यांनीं केला तेव्हां त्यांची राज्योन्नति झाली; असा ह्या परंपरेचा अर्थ आहे. संतमार्गानें मराठ्यांच्या आंगीं राजकीय जोम येणें अशक्य होतें हें अन्य तऱ्हेनेंहि सांगतां येण्यासारखें आहे. तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत संताळ्याच्या ऐन उमेदींत महाराष्ट्रांत गाई होत्या, ब्राह्मण होते, सनातनधर्म होता, वर्णाश्रम होते, सर्व कांहीं होतें. एकच गोष्ट मात्र नव्हती. ह्या वस्तूंविषयीं आस्था, उत्कट अभिमान नव्हता. सहिष्णुता हें संतांचें व्रत पडलें. तेव्हां गाईंचा वध झाला, ब्राह्मणांचा छल झाला, धर्माचा उच्छेद झाला, तरी संतांची सहिष्णुता कांहीं चळली नाहीं. सर्वस्वाचा नाश झाला तरी आपलें

कांहींही गेलें नाहीं ही संतांची बालंबाल खात्री. अशांच्या हातून राष्ट्राची राजकीय उन्नति व्हावी कशी ? तोच समर्थांचा उदय होण्याच्या सुमारास काय प्रकार झाला तो पहा. आपल्याला कांहीं मिळवावयाचें आहे, गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें आहे, सनातनधर्म स्थापावयाचा आहे, स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे, असे प्रवृत्तिपर विचार लोकांचें मनांत उत्कटत्वेंकरून बाणूं लागले व राजकीय उन्नति होण्यास प्रारंभ झाला. ह्या राज्यक्रांतीला समर्थांनीं उपदेशिलेला महाराष्ट्रधर्म कारण झाला, संतांचा निवृत्तिमार्ग कारण झाला नाहीं.

न्यायमूर्ती रानड्यांनीं व प्रो० भागवतांनीं बखरींचें नीट परीक्षण केलें असतें तर महाराष्ट्र धर्म हा Religion वाचक शब्द नसून Duty, Patriotism वाचक शब्द आहे हें त्यांच्या लक्षांत आलें असतें. "राज्य साधून,म्लेंछाचें पारिपत्य करून महाराष्ट्रधर्म रक्षणें. तेव्हां ज्यास जसें आपलें होतील तसें करणें, विपरीत दिसल्यास पारिपत्य करणें, " हें वाक्य मल्हार रामरावाच्या सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या ३२ व्या पृष्ठावर आहे ( प्रथमावृत्ति ). ह्या वाक्यांत ( १ ) स्वराज्य साधणें, ( २ ) यवनांचें पारिपत्य करणें, ( ३ ) मराठ्यांची एकी करणें, व( ४ )विरुद्ध दिसतील त्यांचें पारिपत्य करणें,ही महाराष्ट्रधर्माचीं "चार अंगें सांगितलीं आहेत. एवढ्यानेंच महाराष्ट्रधर्माची व्याप्ती झाली असें नाहीं. " ( शत्रु ) हत म्हणजे नष्ट न झाला तरी वृकयुद्ध किंवा चित्याचें युद्ध, महाराष्ट्रधर्मीं युक्त योजना केली, " हें वाक्य शिवदिग्विजयाच्या १८२ व्या पृष्ठावर आहे. ह्या वाक्यांत शत्रू नष्ट न झाला तर लांडग्यासारखें किंवा चित्यासारखें युद्ध करावें अशी महाराष्ट्रधर्माची अनुज्ञा आहे असें सांगितलें आहे. युद्ध कसें करावें ह्याचाहि निर्देश महाराष्ट्रधर्मांत होतो हें ह्या वाक्यावरून अनुमानितां येतें. " रायबागीन सरकारकाम नेकीनें बजावून राहिली, तिची सेवा कराल तरी महाराष्ट्रधर्म तुमचा, नाहीं तर ठीक नाहीं, " हें वाक्य शिवदिग्विजयाच्या २१४ व्या पृष्ठावर आहे. ह्यांत, सशास्त्र स्त्रीची युद्धसेवा करणें महाराष्ट्रधर्माला वंद्य आहे, म्हणून स्पष्ट म्हटलें आहे. ह्या तीन उतार्‍यांवरून महाराष्ट्रधर्म म्हणजे संताळ्याचा भक्तिमार्ग नव्हे हें उघड आहे. " स्वामित्व करण्याचे धर्म म्हणजे अधिकारी, इमानदार, जमीनदार, रयत जेथें असेल तेथून त्यास आणून, ज्याची वृत्ति जी असेल ती त्याजला सोपून, आपण स्वामित्व ठेवून वर्तवावें ( शिवदिग्विजय, पृ. २१३ )," ह्या वाक्यावरून सेव्यसेवकधर्माचाहि महाराष्ट्रधर्मांत अंतर्भाव होतो असें दिसतें. दासबोधांत तर महाराष्ट्रधर्माच्या निरूपणार्थ चार सहा अध्याय समर्थांनीं लिहिले आहेत. क्षात्रधर्म, सेवाधर्म, युद्धधर्म, राजधर्म वगैरे धर्मांवर व्याख्यानें देऊन समर्थांनीं महाराष्ट्रधर्माचें स्वरूप स्पष्ट उलगडवून दाखविलें आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे संताळ्याचा भक्तिमार्ग नव्हे हें सिद्ध करण्यास आणीक एक पुरावा आहे. रामदासाच्या आधीं झालेल्या संतांच्या ग्रंथांत व मागून झालेल्या संतांच्या ग्रंथांत महाराष्ट्रधर्म हा शब्द बिलकूल सांपडत नाहीं. समर्थांच्या आधीं तर ह्या शब्दाची कल्पनाच ह्यांच्या डोक्यांत नव्हती; परंतु समर्थांनीं उच्चस्वरानें ह्या शब्दाचा घोष सारखा चाळीस वर्षें केला असतांहि ही

कल्पना संताळ्याच्या मस्तकांत शिरली नाहीं. सारांश, संताळयांची व महाराष्ट्रधर्माची जी सांगड न्यायमूर्तींनीं जोडून दिली आहे ती निराधार व अवास्तव आहे, व महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनासंबंधानें संतांचे जे गोडवे न्यायमूर्तींनीं गायिले आहे ते पायाशुद्ध नाहींत.

येथपर्यंत महाराष्ट्रधर्माच्या अर्थासंबंधीं विचार झाला.आतां महाराष्ट्रधर्माची मांडणी बखरकारांनीं कशी केली आहे तें सांगावयाचें आहे. महाराष्ट्रधर्मावर स्वतंत्र व्याख्यान असें बखरकारांनीं कोठेंच दिलें नाहीं. त्यांच्या ग्रंथांत हा शब्द इतर गोष्टींचें कथन करतांना सहजासहजीं येऊन गेलेला आहे. ह्या सहज उल्लेखांवरून व दासबोधावरून महाराष्ट्रधर्माचा होईल तितका स्पष्ट अर्थ करण्याचा प्रयत्न मीं केला आहे. वास्तविक पाहिलें असतां महाराष्ट्रधर्माच्या अर्थाची व्याप्ती किती आहे ह्याचा अंदाज बखरकारांच्या उल्लेखावरून व रामदासाच्या लिहिण्यावरून व्हावा तितका होत नाहीं. शंकेला जागा पुष्कळच रहातें. तात्पर्य, बखरकारांचें सर्व लिहिणें अपुरें व संशयग्रस्त असतें, ह्या पलीकडे त्यांच्या सामान्य सिद्धान्त निरूपण करण्याच्या ऐपतीसंबंधीं विशेष कांहीं एक सांगण्यासारखें नाहीं. पुढील शंकास्थानांत मोठमोठया व्यक्तींच्या स्वभाववर्णनाची व्यवस्था बखरकारांनीं कशी केली आहे त्यांचें संक्षेपानें निरूपण करतों.

---

## शंकास्थान पांचवें.

शिवाजीखेरीज इतर कोणत्याहि व्यक्तीचें स्वभाववर्णन बखरकारांनीं केलेलें आढळत नाहीं. व्यवस्थित विभाग व योग्य वर्गीकरण करून लिहिण्याचें वळण बखरकारांस नसल्यामुळें त्यांच्या ग्रंथांत असल्या स्वतंत्र सदराची अपेक्षा करणें अप्रस्तुत आहे. आतां यद्यपि शिवाजीच्या स्वभाववर्णनाचें स्वतंत्र सदर ह्या बखरकारांनीं दिलेलें नाहीं, तत्रापि त्यांच्या ग्रंथांतून शिवाजीच्या स्वभाव वर्णनाचे व कर्तृत्ववर्णनाचे चुटके वेळोवेळीं आढळून येण्यासारखे आहेत. हे सर्व चुटके एकत्र केले असतां शिवाजीचा स्वभाव व त्याचें कर्तृत्व ह्यांची इयत्ता थोडीबहुत ठरवितां येण्याजोगी आहे. बखरकार, पोवाडे रचणारे शाहीर व इतर ग्रंथकार ह्या सर्वांचे लेख व उल्लेख लक्षांत घेतले तर ह्या महात्म्याच्या स्वभावाचीं व कर्तृत्वाचीं निरनिराळीं अंगें नानाप्रकारांनीं दृष्टोत्पत्तीस येतात. ( १ ) बालपण, ( २ ) तारुण्य, ( ३ ) प्रौढपण, ( ४ ) अंतकाळ, ( ५ ) मित्रवात्सल्य, ( ६ ) मातृप्रेम, ( ७ ) पितृप्रेम, ( ८ ) बंधुप्रेम, ( ९ ) स्त्रीप्रेम, ( १० ) पुत्रप्रेम, ( ११ ) देशप्रीति, ( १२ ) धर्मश्रद्धा, ( १३ ) गुरुभक्ति, ( १४ ) धर्मसंस्थापनार्थ उद्योग, ( १५ ) महाराष्ट्रधर्मपालना, ( १६ ) विद्याव्यासंग, ( १७ ) कवित्वशक्ति, ( १८ ) शूरसंभावना, ( १९ ) विद्वत्संभावना, ( २० ) सभ्यता, ( २१ ) वीरश्री, ( २२ ) साहस, ( २३ ) श्रमसाहिष्णुता, ( २४ ) कार्यबाहुल्य, ( २५ ) शिष्टाई, ( २६ ) राजकारणधुरंधरता,

( २७ ) कानूनसाक्षी, ( २८ ) नीति, ( २९ ) औदार्य, ( ३० ) गुणग्राहिता, ( ३१ ) समयसूचकता, ( ३२ ) नम्रता, ( ३३ ) औद्धत्य, ( ३४ ) ऐश्वर्य, ( ३५ ) सेनानीत्व, वगैरे शिवाजीच्या शेंकडों गुणांचे दाखले थोडे फार बखरींतून व इतरत्र सांपडतात. ह्या दाखल्यांवरून शिवाजीच्या आंगीं असलेल्या गुणगणांचा अंदाज अंशतः होण्यासारखा आहे. ( १ ) रामदासासारख्यांशीं नम्रत्व, ( २ ) अवरंगझेबासारख्यांशीं औद्धत्य, ( ३ ) तानाजी मालुसऱ्यांसारख्यांशीं स्नेह, ( ४ ) श्रीशैलमल्लिकार्जुनाच्या देवालयांत दाखविलेलें साहस, ( ५ ) वर्षोनवर्षे चारी ऋतूंत सारखें सुरू असलेलें उद्योगपरायणत्व, वगैरे गुणांचें सोदाहरण निरूपण करण्याचें हें स्थल नसल्यामुळें केवळ दिग्दर्शनावरच येथें समाधान मानून राहिलें पाहिजे. वेळ्या खेळांपैकीं सोंगट्यांचा गडबड्या, धांदल्या, व ठोकाठोकीचा खेळ शिवाजी कधीं कधीं खेळत असे. ( तानाजी मालुसऱ्याचा पोवाडा ); पंताजी काका, तानाजी मालुसरे, वगैरे घरोब्यांतील मंडळीशीं थट्टामस्करी शिवाजी कधीं कधीं करीत असे ( तानाजीचा पोवाडा ); अफजलखानाला बत्तीस दातांचा बोकड, व अवरंगझेबाला सैतान व शिखानष्ट, अशीं उपपदें द्वेषजन्य थट्टेनें व तिरस्कारानें नवीन बनविण्याची कला शिवाजीला माहीत होती; राजाराम पालथा जन्मला असतां तो अपशकून शुभशकून आहे असें ठरविण्याची समयसूचकता शिवाजीच्या आंगीं होती, वगैरे नाजूक व मासलेवाईक चुटके बखरकारांनीं अधूनमधून दिले आहेत. ह्या सर्वांचा संग्रह भावी इतिहासकाराला बखरकारांच्या लेखांतून आयता तयार असलेला मिळणार आहे. आतां ह्या लहानसहान गोष्टी बखरकार मोठ्या महत्त्वाच्या मानीत नाहींत हें खरें व वाजवी आहे. बखरकारांचा मुख्य कटाक्ष शिवाजी शंकराचा अवतार होता; व धर्मसंस्थापना हें शिवाजीचें मुख्य कार्य होतें, वगैरे महत्त्वाचे मुद्दे सांगण्याकडे विशेष आहे व तो यथायोग्य आहे. शिवाजी ईश्वरांश होता ह्या मुद्यावर विशेष कटाक्ष असल्यामुळें, शिवाजीची तुलना बखरकार समकालीन किंवा दोनचारशें वर्षांअलीकडच्या सामान्य राजांशीं करीत नाहींत. रघू, दिलीप, धर्म, शिबी, श्रियाळ, विक्रम, शालिवाहन, भोज, नैषध, कर्ण, अर्जुन वगैरे असामान्य पौराणिक राजांचीं नांवें शिवाजीच्या बरोबर घ्यावीं असा बखरकारांचा रोख आहे. हा किती वास्तव आहे, ह्याचें प्रत्यंतर आधुनिक लेखकांच्या लिहिण्यांत अत्युत्कृष्ट रीतीनें भासमान होतें. बखरकार ज्याप्रमाणें शिवाजीची तुलना लोकोत्तर अशा पौराणिक राजांशीं करतात, त्याप्रमाणेंच आधुनिक महाराष्ट्रलेखक त्याची तुलना युरोपांतील प्राचीन व अर्वाचीन अशा लोकोत्तर वीरांशीं करतात. अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन, शार्लमान्य, क्रामवेल, वाशिंग्टन, इत्यादि पाश्चात्य महापुरुषांचीं नांवें शिवाजीच्या संबंधानें सुचविलेलीं वारंवार वाचण्यांत येतात. शिवाजीचें कर्तृत्व व महत्त्व लक्षांत घेतलें असतां ह्या पाश्चात्य पुरुषांना शिवाजीच्या बरोबरीनें गणणें सामान्य घरसोडीच्या लेखांत अश्लाघ्य होईल असें नाहीं. परंतु परीक्षात्मक ऐतिहासिक लेखांत साधार अशा पायावरच तुलना झाली असतां खपली जाते. सबब प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधानें ह्या विधानाची सत्यता सिद्ध करण्याकरितां, शिवाजीच्या स्वभावाचें व कर्तृत्वाचें मेजमाप घेणें जरूर आहे.

शिवाजी ही विभूति महाराष्ट्रांत कोणतें कार्य साधण्याकरितां अवतीर्ण झाली? लोकांच्या स्वातंत्र्याचा अपहार करून दिग्विजय करण्याकरितां शिवाजी उत्पन्न झाला? किंवा स्वराज्य व स्वधर्म ह्यांचें संरक्षण करण्याकरितां त्याचा अवतार होता? स्वराज्य व स्वधर्म ह्यांचें संरक्षण करण्याचा उच्च, उदात्त व पवित्र हेतु मनांत धरून शिवाजीचे प्रयत्न चालले होते हें सर्वत्र मान्य आहे. तेव्हां परकीय लोकांचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या, अर्थात् एका नीच, दुष्ट व अपवित्र हेतूनें प्रोत्साहित झालेल्या अलेक्झांडर, सीझर किंवा नेपोलियन ह्या दिग्विजयी पुरुषांशीं शिवाजीची तुलना करणें अयोग्य आहे. धैर्य, शौर्य, पराक्रम, कर्तृत्वशक्ति, इत्यादि गुणांसंबंधानें शिवाजीशीं ह्या पुरुषांची तुलना केली असतां चालेल. परंतु हेतूच्या पवित्रतेसंबंधीं जेथें विचार करावयाचा असेल, तेथें ह्या दिग्विजयी व दुष्ट पुरुषांची डाळ शिजणार कशी? अशा ठिकाणीं स्वातंत्र्यार्थ खटपट करणाऱ्या पवित्र महापुरुषांचाच तेवढा प्रवेश होणें योग्य आहे. हालंडचा वुइल्यम दि सायलेंट किंवा युनायटेड स्टेटस्‌चा वाशिंग्टन ह्या पुरुषांची तुलना शिवाजीशीं केली तर एकवार चालण्यासारखें आहे. आतां पाश्चात्य महापुरुषांशीं तुलना केल्यानेंच म्हणजे शिवाजीच्या महत्त्वाची इयत्ता ठरणार आहे असा प्रकार बिलकूल नाहीं. शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे. अलेक्झांडराप्रमाणें शिवाजीनें आपल्या स्नेह्यासोबत्यांस ठार मारिलें नाहीं; सीझराप्रमाणें आपल्या बायकोस सोडून दिलेलें नाहीं; बोनापार्टनें डफ डांगियाचा जसा अन्यायानें वध केला तसा शिवाजीनें कोणाचा केला नाहीं; क्रामवेलनें ऐरिश लोकांस सरसहा ठार मारिलें, त्याप्रमाणें शिवाजीनें कोण्या प्रांतांतील लोकांची कत्तल उडविली नाहीं; फ्रेडरिक दि ग्रेटप्रमाणें शिवाजीच्या आंगीं नीच दुर्गुण नव्हते. शिवाजीचें वर्तन न्यायाचें, नीतीचें, पराक्रमाचें, स्वधर्मपरायणतेचें व परधर्मसहिष्णुतेचें होतें. दोन चारशें लढाया मारून त्यांत विजयी होणें; तीन चारशें किल्ले मैदानांत, डोंगरावर व समुद्रतीरावर बांधणें; नवीन सैन्य तयार करणें; नवीन आरमार निर्मिणें; नवे कायदे करणें; स्वभाषेला उत्तेजन देणें; स्वतः पद्यरचना करणें; कवींना आश्रय देणें; नवीं शहरें वसाविणें; स्वधर्माचें संरक्षण करणें; गोब्राह्मणांचा प्रतिपाल करणें, सारांश, स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणें; ह्या लोकोत्तर कृत्यांनीं जर कोण्या पुरुषानें ह्या भूमंडळाला अक्षय ऋणी करून ठेविलें असेल तर तें शिवाजीनेंच होय. शिवाजीची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते कीं, त्याच्याशीं तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ती घ्यावी ती ती, ह्या नाहीं त्या गुणानें शिवाजीहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषासंबंधीं लिहितां लिहितां समर्थ म्हणतात " तयाचे गुणमहत्त्वासी तुलना कैची? यशवंत, कीर्तिवंत, व सामर्थ्यवंत, नीतिवंत, जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ति, निश्चयाचा महामेरु, अखंड निर्धारी, राजयोगी, " अशीं नानापरींचीं विशेषणें शिवाजीला रामदासांनीं लाविलीं आहेत. निस्पृही व स्पष्टवक्त्या अशा समकालीन ग्रंथकारानें हें गुणवर्णन केलेलें आहे हें लक्षांत घेतलें असतां शिवाजीच्या अंगीं असलेल्या जाज्वल्य गुणांच्या इयत्तेचा अंदाज सहजासहजीं करतां येतो व कित्येक इंग्रज व मुस-

लमान बखरकारांनीं ह्या महापुरुषाची निंदा केलेली पाहून त्यांच्या परगुणासहिष्णुतेबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो व त्यांच्या हृदयांतील कुत्सितपणाचा ठाव घेण्यास संधी मिळते. कुत्ता, मूसक, सैतान, गनीम वगैरे अपशब्द योजिणाऱ्या मुसलमान तवारिखकारांचे लेख प्रस्तुत कोणी फारसे वाचीत नाहीं, तेव्हां त्यांच्याबद्दल येथें कांहीं लिहिलें नाहीं तरी चालण्यासारखें आहे. इंग्रज लेखकांसंबंधीं मात्र इतकें औदासीन्य दाखवितां येत नाहीं. शिवाजी अक्षरशून्य होता येथपासून सुरवात करून, ( २ ) त्यानें दरोडे, ( ३ ) लुटारूपणा,(४) खून, वगैरे अनुचित पापें केलीं असें सांगण्याचा इंग्रज लेखकांचा मुख्य रोख आहे. पैकीं पहिला आरोप निराधार आहे हें मागें दाखवून दिलें आहे. बाकीचे तीन आरोपहि अज्ञानानें व कुत्सित बुद्धीनें केलेले आहेत हेंहि साधार सिद्ध करतां येतें. शके १५६० पासून शके १५६८ पर्यंत कोकणांत कांहीं ठिकाणीं यवनांच्या विरुद्ध लहानसान बंडें झालीं व यवनांच्या बाजूच्या लोकांचीं घरेंदारें लुटलीं गेलीं. ह्या लहानसान बंडांना मुसलमान तवारिखकार दरोडे म्हणून संज्ञा देतात. दरोडे हा शब्द मूळ कोणत्या अर्थी योजिलेला आहे, हें इंग्रज लेखकांना न कळल्यामुळें, या शब्दाचा वाच्यार्थ खरा धरून हे लोक समाधान मानितात. ग्रांट डफनें आपल्या पुस्तकाच्या अकराव्या भागांत कृष्णराव खटावकरांचे एक पत्र टिपेंत दिलें आहे. त्यांत दहा हजार स्वारांच्या सेनापतींना चोर, लुटारू, दरोडेखोर, वगैरे अपशब्द लाविले आहेत. ते ज्याप्रमाणें अज्ञानमूलक आहेत त्याप्रमाणेंच शिवाजीला दरोडेखोर हा अपशब्द लाविणें अज्ञानव्यंजक होय. सतराव्या शतकांत मुसलमान लोक मराठ्यांना चोर, दरोडेखोर हे अपशब्द द्वेषानें चरफडून लावीत असत. हा असला पोरकट व भागूबाईपणाचा प्रकार युरोपांतील इतिहासांतहि कित्येक ठिकाणीं झालेला दृष्टीस येतो. स्पेनच्या दुसऱ्या फिलिपाच्या विरुद्ध डच लोकांनीं बंड केलें व त्यांत ते विजयी झाले. बंड होत असतांना डच लोकांना स्प्यानिश लोकांनीं thieves, robbers, चोर, दरोडेखोर हे अपशब्द लाविले. तोच प्रकार महाराष्ट्रांत झाला. डच robbers नीं स्प्यानिश लोकांची जशी खोड मोडली त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतील दरोडेखोरांनीं मुसलमानांचीं नाकें कापून त्यांच्या हातांत दिलीं. ह्या अपमानानें चिरडीस जाऊन मुसलमान लोक मराठ्यांना व शिवाजीला दरोडेखोर म्हणत तें योग्यच होतें. परंतु इंग्रज लोकांनीं मुसलमान लोकांच्या लिहिण्याचा वाच्यार्थच तेवढा घेऊन कां मानावें तें समजत नाहीं. सदर लेखकांनीं समर्थांचा दासबोध पाहिला असतां तर खरे दरोडेखोर व बंडवाले कोण होते तें त्यांना कळून चुकलें असतें. शिवाजीराजाला नीतीचा उपदेश करतांना समर्थ म्हणतात " प्रस्तुत यवनांचें बंड " झालेलें आहे. तसेंच यवनांच्या शिवऱ्या स्वभावाला अनुलक्षून समर्थ लिहितात, " दुष्ट भाषणें करिती नाना परी जाचती, रघुपतीसी नावडती, म्हणूनी ( तुमची ) योजना केली. " असो. दरोडेखोर या शब्दाची ही अशी मीमांसा आहे. लूट व वध या शब्दांचीहि मीमांसा याहून निराळी नाहीं. " मोठ्या प्रमाणावर मालमत्ता फरारी करणें " असा, लुटणें ह्या शब्दाचा अर्थ ग्रांट डफादि मंडळी करतात. परंतु सतराव्या व आठराव्या शतकांतील बखरकारांच्या ग्रंथांत, लुटणें ह्या शब्दाचा अर्थ

फारच निराळा आहे. " लढाई देऊन शत्रूची मालमत्ता राजरोस रीतीनें व हक्कानें नेणें, " असा लुटणें ह्या शब्दाचा अर्थ बखरकार समजतात. प्रस्तुत ग्रंथांत छापलेल्या " पेशवाई-च्या अखेरच्या अखबारींत " लुटणें ह्या शब्द इंग्रजांच्या संबंधानें वारंवार योजिलेला आहे. तेथें जो लुटणें ह्या शब्दाचा अर्थ करणें जरूर आहे तोच अर्थ शिवाजीच्या बखरीं-तील लुटणें ह्या शब्दाचा केला पाहिजे. दुसरा अर्थ करणें अशास्त्र आहे. शिवाजीनें सुरत लुटली म्हणजे शिवाजीनें शत्रूच्या प्रांतांवर स्वारी करून त्याची मालमत्ता लढाईच्या हक्कानें नेली, असा अर्थ करावा लागतो. शिवाजीनें सुरत लुटली म्हणजे शिवाजीनें सुरतेवर दरवडा घातला असा अर्थ मराठी भाषा ज्यांस समजत नाहीं त्यांखेरीज इतर कोणी कर-णार नाहीं. लूट ह्या शब्दाप्रमाणेंच वध या शब्दाचाहि अर्थ ह्या लेखकांस नीट समजला नाहीं. आपल्या इतिहासाच्या नवव्या भागाच्या शेवटीं शिवाजीच्या कृत्यांची व स्वभा-वाची मीमांसा करतांना Afzool Khan was murdered असा वाक्यांश लिहून ग्रांट डफनें शिवाजीवर खुनाचा चोरून प्रहार केला आहे. लक्ष्मणराव चिपळोणकर ह्यांनीं आपल्या इतिहासांत ग्रांट डफच्या इतर आक्षेपांना मुद्देसूद उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अफजलखानी प्रकरणाची मुख्य हकीकत देण्यांत डफप्रमाणें चिपळोणकरहि चुकले असल्यामुळें त्यांच्या उत्तरांत जितका जोर यावा तितका आला नाहीं. तशांत त्यांच्या लक्षांतून वर नमूद केलेला वाक्यांश चुकून राहिल्यामुळें ग्रांट डफ त्यांच्या कैचींतून अजीबात सुटून गेला आहे. " अफजलखान शिवाजीला मोकळ्या मनानें शिष्टाचाराप्रमाणें जों भेट देतो तों शिवाजीनें त्याच्या पोटांत वाघनख खुपसलें " असें वर्णन डफनें आपल्या इतिहासाच्या चवथ्या भागांत केलें आहे. " इतुकिया उपरि अबदुल मनीं खवळला पुरा। कव मारिली अबदुल्यानें । सरजा गवसून धरला सारा । चालविली कटयार " ही हकीकत अगीनदासानें पोंवाड्यांत दिली आहे. अफजलखानाचा पोवाडा बहुतेक पूर्णपणें विश्व-सनीय असल्यामुळें त्यांत दिलेली हकीकत खरी मानणें प्राप्त आहे. अफजलखानानें प्रथम कटयार चालविली, तेव्हां शिवाजीनें स्वसंरक्षणार्थ खानाच्या पोटांत बिचवा खुपसला, अशी खरी कार्यपरंपरा आहे. ह्या स्वसंरक्षणाच्या कृत्याला बखरकार वध ही संज्ञा देतात. ग्रांट डफनें योजिलेला murder हा शब्द वध ह्या शब्दाहून अर्थानें निराळा आहे. वध म्हणजे righteous killing व murder म्हणजे unrighteous killing. अफजलखानी प्रकरणाची खरी हकीकत माहीत नसल्यामुळें, बखरकारांनीं अफजलखाना-च्या वधासंबंधानें शिवाजीची जी तारीफ केली आहे तिचाहि ग्रांट डफनें विपरीतच अर्थ केला आहे. " राजकीय कारणाकरितां खून करणें न्याय्य आहे असें मराठे लोक समज-तात. " म्हणून डफनें मराठ्यांची विनाकारण निंदा केलेली आहे. ती किती अवास्तव व कोत्या बुद्धीची किंवा कुबुद्धीची दर्शक आहे हें वरील उद्घाटन वाचून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. शिवाजीनें खून केला ही गोष्ट कबूल करून तिचें मुख्य कारण मरा-ठ्यांची त्या वेळची नीतिमत्ता होय असा राष्ट्रापमानकारक व व्यक्तिगुणापकर्षक पुरावा रा० चिपळोणकर यांनीं दिला आहे व ग्रांट डफनें केलेली शिवाजीची व भूत व वर्तमान

मराठ्यांची निंदा कांहीं कारण नसतां, कबूल केली आहे; परंतु असला अयोग्य प्रकार करण्याचें कांहींएक कारण नव्हतें. अफजलखानाला मारण्यापेक्षां अफजलखानास कैद करणें शिवाजीच्या जास्त हिताचें होतें ही गोष्ट लक्षांत घेतली असतां, वध करण्यास अफजलखानानें शिवाजीला भाग पाडलें हीच हकीकत विश्वसनीय दिसतें. त्या काळच्या चाली प्रमाणें दोघेहि हत्यारबंद होते. अफजलखानानें प्रथम शस्त्र चालविल्यावर शिवाजीनें गप्प कां बसावें तें सांगणें कठीण आहे. कुत्ता ह्या शब्दाचीहि फोड रामदासांनीं मोठी नामी केली आहे. " धर्मद्वेष्टे तेवढे कुत्ते " म्हणून ते दासबोधांत लिहितात. असो. बखरकारांचा व तवारिखकारांचा आशय नीट समजून न घेतल्यामुळें इंग्रज ग्रंथकारांच्या हातून ज्या अनेक चुका व जे अनेक गैरसमज झाले आहेत त्यांपैकीं कांहींचें दिग्दर्शन वर केलें आहे. शिवाजीचें स्वभाववर्णन बखरकारांनीं व रामदासांनीं कसें केलें आहे तें दाखवून देतांना हा उपवाद मध्येंच उपस्थित झाला. मराठा वीरपुरुषांवर परकीय लेखकांनीं लादलेले दोष अलीकडील दहावीस वर्षांत महाराष्ट्रांत कोणी खरें मानतो म्हणून हा वाद उपस्थित केला अशांतला भाग नव्हे. ज्या अर्थी परकीय लेखकांनीं मराठ्यांवर नसते दोष लादण्याचे श्रम घेतले आहेत त्या अर्थी त्यांचें निरसन करण्याची मेहनत कोणी तरी करणें अवश्यच झालें होतें म्हणून ही लहानशी झटापट सहजासहजीं आटपून घेतली आहे. शिवाजीचें गुणवर्णन करण्यांत कालस्थलादि निर्बंधांनीं बखरकार विशेष बांधले गेले नसल्यामुळें, त्यांच्या हातून हें काम बरेंच चांगलें साधलें गेलें आहे. आतां तें त्यांच्या हातून सशास्त्र साधलें गेलें नाहीं हें तर उघडच आहे. परंतु शिवाजीच्या आयुष्यांतलि प्रसंगांच्या वर्णनापेक्षां त्याच्या गुणांचें वर्णन ह्या बखरकारांनीं जास्त विस्तृत केलें आहे, त्यामुळें इतिहासजिज्ञासूंचें समाधान सापेक्ष दृष्टीनें अर्थात् जास्त होतें. बाकी हाहि भाग शंकांनीं बहुत ठिकाणीं ग्रस्त झालेला आहे. शिवाजीच्या शीलासंबंधीं, दानतेसंबंधीं, स्वभावासंबंधीं व कर्तृत्वासंबंधीं जी कांहीं थोडीफार माहिती ह्या बखरकारांनीं दिली आहे त्यापेक्षां आणखी माहिती मिळाल्याशिवाय इतिहासजिज्ञासूंची भूक तृप्त होणार नाहीं. ही माहिती ह्यापुढें बखरींतून मिळणें अशक्य आहे. शिवकालीन पत्रव्यवहार मुबलक सांपडल्याखेरीज माहितीची उपलब्धि व्हावी तशी, किंवा थोडी देखील, होणें असंभाव्य आहे. ह्या कालांतील पत्रव्यवहार जो थोडा मला मिळाला आहे त्यावरून असें अनुमान करतां येतें कीं, कालांतरानें व प्रयत्नानें शिवाजी महाराजांचा इतिहास मुद्देसूद, तारीखवार व सविस्तर जुळवितां येईल. मात्र अठराव्या शतकांतील पत्रव्यवहार मिळण्यास जितकें सोपें जात आहे तितकेंच सतराव्या शतकांतील पत्रव्यवहार मिळण्यास कठीण जाणार आहे.

---

# उपसंहार.

काल, स्थल, व्यक्ति व सामान्य सिद्धान्त ह्यासंबंधीं बखरींची परीक्षा मागील पांच शंकास्थानांत झाली. परीक्षेकरितां घेतलेल्या बखरींपैकीं ( १ ) सभासदी बखर, ( २ ) सप्तप्रकरणात्मक चरित्र व ( ३ ) शिवदिग्विजय ह्या तीन बखरींना विशेष प्राधान्य दिलें होतें. यद्यपि सभासदी बखर समकालीन लेखकानें लिहिलेली आहे तत्रापि तींतील शके १५८१ पर्यंतची हकीकत धरसोडीची, त्रोटक, तुटक व कालविपर्यस्त अशी असून, पुढील हकीकत यद्यपि कोठेंकोठें जास्त विस्तृत आहे तत्रापि रसभरित नसून प्रायः कोरडी अशी आहे. माफक व त्रोटक उत्तर देणाऱ्या साक्षीदारापासून खटल्यांतील उपांगाची जशी माहिती होणें अशक्य असतें तद्वत्च सभासदी बखरीची गोष्ट आहे. सप्तप्रकरणात्मकचरित्र व शिवदिग्विजय या दोन बखरींचा प्रकार सभासदी बखरीहून निराळा आहे. साक्ष देतांना अवांतरहि मागली पुढली माहिती वावदूकपणें सांगण्याची खोड ह्या दोन बखरकारांना कमजास्त प्रमाणानें आहे. शिवाय साक्ष देतांना, एकाद्या जुनाट गृहस्थाप्रमाणें, ह्या दोन्ही बखरींना जुने दाखले देण्याची हौस आहे. ही हौस सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या कर्त्यापेक्षां शिवदिग्विजयाच्या कर्त्याला विशेष जडलेली आहे. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें ( १ ) युगसंख्येची याद,(२) हस्तनापूरच्या राजांची याद, (३) हेमाडपंथी बखर, (४) विष्णुपुराण, (५)संगीत शास्त्र.(६)मुसलमानांच्या तवारिखा,(७) हंसगीता,(८) दासबोध,(९)रामदासाची बखर, ( १० ) शिवाजीचीं पत्रें, ( ११ ) सुभाषित श्लोक, ( १२ ) वृद्धांच्या तोंडची परंपरागत माहिती, ( १३ ) कहाण्या, ( १४ ) शिवाजीच्या वेळचीं जुनीं टिपणें, इतक्या निरनिराळ्या उगमांपासून आपली माहिती जुळविलेली आहे व ती प्रायः वाटेल तितकी,जशाच्या तशीच दिली आहे ! ह्याच कारणाकरितां शिवदिग्विजयांतील मजकूर सर्वांत जुना आहे असें मागें मीं म्हटलें आहे. सप्तप्रकरणात्मकचरित्रांतहि शिवदिग्विजयांतल्याप्रमाणें जुन्या माहितीचा उपयोग केल्याचीं बरींच चिन्हें आहेत, परंतु विशेष प्रौढपणें लिहिण्याचा मल्हाररामरावाचा मनोदय असल्यामुळें, शिवदिग्विजयाच्या इतका वावदूकपणा त्याला करतां आला नाहीं. कृष्णाजी अनंत सभासद, मल्हाररामराव, शिवदिग्विजयाचा कर्ता हे तिन्ही गृहस्थ महाराष्ट्रांतील प्रख्यात अशा चांद्रसेनीय प्रभुज्ञातींतील आहेत. ह्या गृहस्थांच्या पूर्वजांनीं व स्वजातीयांनीं स्वराज्य स्थापण्याच्या कामीं शिवछत्रपतींची सेवा करून आपला क्षात्रधर्म जसा खरा करून दाखविला, त्याप्रमाणेंच ह्या तिन्ही गृहस्थांनीं व त्यांच्या इतर सजातीयांनीं शिवछत्रपतींचीं, त्यांच्या वंशजांची व त्यांच्या देशबांधवांचीं चरित्रें लिहून आपला कायस्थ धर्महि कायम ठेविला. लेखणी व तरवार ह्या तीक्ष्ण प्रकृतीच्या जोडीला सारख्याच सामर्थ्यानें वागविणाऱ्या ह्या राजकार्यकुशल ज्ञातीचें महाराष्ट्र बरेंच ऋणी आहे.

ह्या प्रभू लेखकांनीं शिवाजीचे इतिहास कसे कां असेनात, लिहून ठेविले नसते तर आज मितीला महाराष्ट्रराज्याच्या संस्थापकाची माहिती आपल्याजवळ फार कोती राहिली असती; ह्या तीन बखरकारांखेरीज गोविंद खंडेराव चिटणीस ह्यानेंहि एक शिवाजीची बखर लिहिलेली आहे व तिचा उल्लेख ह्या प्रस्तावनेच्या आरंभीं मीं केला आहे. ही बखर साताऱ्यांतील एका गृहस्थाकडून मला कांहीं वेळ वाचावयाला मिळाली होती. परंतु पुढें काय कारण झालें असेल तें असो, सदर बखर हरवली असें तिच्या मालकाकडून मला उत्तर मिळालें. वर दिलेल्या तिन्ही बखरींपेक्षां ह्या बखरींतील मजकूर बऱ्याच ठिकाणीं जास्त व निराळा असून शिवदिग्विजयाहून ती मोठी आहे. प्रस्तावनेला प्रारंभ करतांना ही बखर मजजवळ होती व हिचीहि परीक्षा करावी ह्या हेतूनें प्रस्तुत प्रस्तावनेच्या प्रारंभीं मीं तिचा नामनिर्देश केला होता. परंतु पुढें ऐन प्रसंगीं ही बखर हातांतून गेल्यामुळें पहिल्या नामनिर्देशापलीकडे तिच्या संबंधीं मला कांहीं एक जास्तकमी लिहितां येईना. असो. सवाई माधवरावांकरितां लिहिलेल्या बखरीच्या अनुषंगानें शिवकालीन बखरींची परीक्षा करण्याचा प्रसंग आला व त्या परीक्षेंत बखरींच्या प्रामाण्याची इयत्ता ठरविण्याचा थोडाबहुत प्रयत्न केला. हा प्रयत्न जितक्या प्रमाणावर व्हावा, तितक्या प्रमाणावर विस्तारभयास्तव करतां आला नाहीं. खरें म्हटलें असतां शिवकालीन बखरींतील एकोनएक वाक्यांचें पृथक्करण, वर्गीकरण व एकीकरण करून ह्या त्रिविध करणींनें ऐतिहासिक सत्याची कशी निष्पत्ति होते, काय सिद्धांत उत्पन्न होतात, काय शंका निघतात, हें बारीक तपशीलवार असें दाखवून देणें जरूर आहे. परंतु शिवकालीन अस्सल ऐतिहासिक लेख मिळण्याची थोडीबहुत आशा जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत हा प्रयत्न करणें अप्रस्तुत, कदाचित् अनवश्यक, आहे असें वाटल्यावरून प्रस्तुत स्थलीं बखरींतील व ग्रांट डफच्या इतिहासांतील कांहीं शंकाग्रस्त स्थानें काढून दाखविण्यावरच समाधान मानून रहाणें भाग पडलें. अस्सल पत्रें मिळण्याची आशा जर निष्फळ झाली अथवा थोडीफार पत्रें मिळून तेवढ्यानें जर यथास्थित काम भागलें नाहीं, तर पुढेंमागें वरील प्रयत्न साद्यन्त करणें जरूर होईल. बखरींतील शंकाग्रस्त स्थानांची यथास्थित निवृत्ति करावयाला अस्सल पत्रांचाच तोडगा पाहिजे आहे. तो जर मिळाला नाहीं, तर कितीहि वर्गीकरण, कितीहि पृथक्करण व कितीहि एकीकरण केलें, तरी मनाचें समाधान होणार नाहीं. फारच मजल मारिली, तर आद्यतन ग्रीक किंवा रोमन इतिहासापेक्षां शिवकालीन मराठ्यांचा इतिहास जास्त विश्वसनीय होईल, इतकेंच. ह्यापलीकडे ह्या त्रिविध करणीपासून जास्त फलप्राप्ती होणार नाहीं. प्राचीन ग्रीस देशाचा इतिहास, कवींच्या कविता, आख्यायिका, ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उल्लेख, वगैरे गौण आधारांच्या साहाय्यानें रचिलेला आहे. साक्षात् तीच गती नाहीं, तरी बहुतेक त्याच्या सारखीच गती बखरकारांच्या लिहिण्याचा मेळ घालण्याच्या कृतीनें आपल्या इकडे होणार आहे. बखरकारांच्या लिहिण्याचा मेळ घालण्याचा खटाटोप करणें म्हणज अप्रमाण साक्षीदारांच्या कैफियतींची संगती लावण्याच्या निष्फळ उद्योगा-

# उपसंहार.

काल, स्थल, व्यक्ति व सामान्य सिद्धान्त ह्यासंबंधीं बखरींची परीक्षा मागील पांच शंकास्थानांत झाली. परीक्षेकरितां घेतलेल्या बखरींपैकीं ( १ ) सभासदी बखर, ( २ ) सप्तप्रकरणात्मक चरित्र व ( ३ ) शिवदिग्विजय ह्या तीन बखरींना विशेष प्राधान्य दिलें होतें. यद्यपि सभासदी बखर समकालीन लेखकानें लिहिलेली आहे तत्रापि तींतील शके १५८१ पर्यंतची हकीकत धरसोडीची, त्रोटक, तुटक व कालविपर्यस्त अशी असून, पुढील हकीकत यद्यपि कोठेंकोठें जास्त विस्तृत आहे तत्रापि रसभरित नसून प्रायः कोरडी अशी आहे. माफक व त्रोटक उत्तर देणाऱ्या साक्षीदारापासून खटल्यांतील उपांगाची जशी माहिती होणें अशक्य असतें तद्वतच सभासदी बखरीची गोष्ट आहे. सप्तप्रकरणात्मकचरित्र व शिवदिग्विजय या दोन बखरींचा प्रकार सभासदी बखरीहून निराळा आहे. साक्ष देतांना अवांतरहि मागली पुढली माहिती वावदूकपणें सांगण्याची खोड ह्या दोन बखरकारांना कमजास्त प्रमाणानें आहे. शिवाय साक्ष देतांना, एकाद्या जुनाट गृहस्थाप्रमाणें, ह्या दोन्ही बखरींना जुने दाखले देण्याची हौस आहे. ही हौस सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या कर्त्यापेक्षां शिवदिग्विजयाच्या कर्त्याला विशेष जडलेली आहे. शिवदिग्विजयाच्या कर्त्यानें ( १ ) युगसंख्येची याद,(२) हस्तनापूरच्या राजांची याद, (३) हेमाडपंथी बखर, (४) विष्णुपुराण, (५)संगीत शास्त्र.(६)मुसलमानांच्या तवारिखा,(७) हंसगीता,(८) दासबोध,(९)रामदासाची बखर, ( १० ) शिवाजीचीं पत्रें, ( ११ ) सुभाषित श्लोक, ( १२ ) वृद्धांच्या तोंडची परंपरागत माहिती, ( १३ ) कहाण्या, ( १४ ) शिवाजीच्या वेळचीं जुनीं टिपणें, इतक्या निरनिराळ्या उगमांपासून आपली माहिती जुळविलेली आहे व ती प्रायः वाटेल तितकी,जशाच्या तशीच दिली आहे ! ह्याच कारणाकरितां शिवदिग्विजयांतील मजकूर सर्वांत जुना आहे असें मागें मीं म्हटलें आहे. सप्तप्रकरणात्मकचरित्रांतहि शिवदिग्विजयांतल्याप्रमाणें जुन्या माहितीचा उपयोग केल्याचीं बरींच चिन्हें आहेत, परंतु विशेष प्रौढपणें लिहिण्याचा मल्हाररामरावाचा मनोदय असल्यामुळें, शिवदिग्विजयाच्या इतका वावदूकपणा त्याला करतां आला नाहीं. कृष्णाजी अनंत सभासद, मल्हाररामराव, शिवदिग्विजयाचा कर्ता हे तिन्ही गृहस्थ महाराष्ट्रांतील प्रख्यात अशा चांद्रसेनीय प्रभुज्ञातींतील आहेत. ह्या गृहस्थांच्या पूर्वजांनीं व स्वजातीयांनीं स्वराज्य स्थापण्याच्या कामीं शिवछत्रपतीची सेवा करून आपला क्षात्रधर्म जसा खरा करून दाखविला, त्याप्रमाणेंच ह्या तिन्ही गृहस्थांनीं व त्यांच्या इतर सजातीयांनीं शिवछत्रपतीची, त्यांच्या वंशजांची व त्यांच्या देशबांधवांचीं चरित्रें लिहून आपला कायस्थ धर्महि कायम ठेविला. लेखणी व तरवार ह्या तीक्ष्ण प्रकृतींच्या जोडीला सारख्याच सामर्थ्यानें वागविणाऱ्या ह्या राजकार्यकुशल ज्ञातीचें महाराष्ट्र बरेंच ऋणी आहे.

ह्या प्रभू लेखकांनीं शिवाजीचे इतिहास कसे कां असेनात, लिहून ठेविले नसते तर आज मित्तीला महाराष्ट्रराज्याच्या संस्थापकाची माहिती आपल्याजवळ फार कोती राहिली असती; ह्या तीन बखरकारांखेरीज गोविंद खंडेराव चिटणीस ह्यानेंहि एक शिवाजीची बखर लिहिलेली आहे व तिचा उल्लेख ह्या प्रस्तावनेच्या आरंभीं मीं केला आहे. ही बखर साताऱ्यांतील एका गृहस्थाकडून मला कांहीं वेळ वाचावयाला मिळाली होती. परंतु पुढें काय कारण झालें असेल तें असो, सदर बखर हरवली असें तिच्या मालकाकडून मला उत्तर मिळालें. वर दिलेल्या तिन्ही बखरींपेक्षां ह्या बखरींतील मजकूर बऱ्याच ठिकाणीं जास्त व निराळा असून शिवदिग्विजयाहून ती मोठी आहे. प्रस्तावनेला प्रारंभ करतांना ही बखर मजजवळ होती व हिचीहि परीक्षा करावी ह्या हेतूनें प्रस्तुत प्रस्तावनेच्या प्रारंभीं मीं तिचा नामनिर्देश केला होता. परंतु पुढें ऐन प्रसंगीं ही बखर हातांतून गेल्यामुळें पहिल्या नामनिर्देशापलीकडे तिच्या संबंधीं मला कांहीं एक जास्तकमी लिहितां येईना. असो. सवाई माधवरावांकरितां लिहिलेल्या बखरीच्या अनुषंगानें शिवकालीन बखरींची परीक्षा करण्याचा प्रसंग आला व त्या परीक्षेंत बखरींच्या प्रामाण्याची इयत्ता ठरविण्याचा थोडाबहुत प्रयत्न केला. हा प्रयत्न जितक्या प्रमाणावर व्हावा, तितक्या प्रमाणावर विस्तारभयास्तव करतां आला नाहीं. खरें म्हटलें असतां शिवकालीन बखरींतील एकोनएक वाक्यांचें पृथक्करण, वर्गीकरण व एकीकरण करून ह्या त्रिविध करणींनें ऐतिहासिक सत्याची कशी निष्पत्ति होते, काय सिद्धांत उत्पन्न होतात, काय शंका निघतात, हें बारीक तपशीलवार असें दाखवून देणें जरूर आहे. परंतु शिवकालीन अस्सल ऐतिहासिक लेख मिळण्याची थोडीबहुत आशा जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत हा प्रयत्न करणें अप्रस्तुत, कदाचित् अनवश्यक, आहे असें वाटल्यावरून प्रस्तुत स्थलीं बखरींतील व ग्रांट डफच्या इतिहासांतील कांहीं शंकाग्रस्त स्थानें काढून दाखविण्यावरच समाधान मानून रहाणें भाग पडलें. अस्सल पत्रें मिळण्याची आशा जर निष्फळ झाली अथवा थोडीफार पत्रें मिळून तेवढ्यानें जर यथास्थित काम भागलें नाहीं, तर पुढेंमागें वरील प्रयत्न साद्यन्त करणें जरूर होईल. बखरींतील शंकाग्रस्त स्थानांची यथास्थित निवृत्ति करावयाला अस्सल पत्रांचाच तोडगा पाहिजे आहे. तो जर मिळाला नाहीं, तर कितीहि वर्गीकरण, कितीहि पृथक्करण व कितीहि एकीकरण केलें, तरी मनाचें समाधान होणार नाहीं. फारच मजल मारिली, तर आद्यतन ग्रीक किंवा रोमन इतिहासापेक्षां शिवकालीन मराठ्यांचा इतिहास जास्त विश्वसनीय होईल, इतकेंच. ह्यापलीकडे ह्या त्रिविध करणीपासून जास्त फलप्राप्ती होणार नाहीं. प्राचीन ग्रीस देशाचा इतिहास, कवींच्या कविता, आख्यायिका, ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उल्लेख, वगैरे गौण आधारांच्या साहाय्यानें रचिलेला आहे. साक्षात् तीच गती नाहीं, तरी बहुतेक त्याच्या सारखीच गती बखरकारांच्या लिहिण्याचा मेळ घालण्याच्या कृतीनें आपल्या इकडे होणार आहे. बखरकारांच्या लिहिण्याचा मेळ घालण्याचा खटाटोप करणें म्हणज अप्रमाण साक्षीदारांच्या कैफियतींची संगती लावण्याच्या निष्फळ उद्योगा-

प्रमाणेंच अल्पफलप्रद आहे. बखरकार एकेक दोन दोन वेळाच तेवढे चुकलेले असते तर त्यांच्या प्रामाण्याची इयत्ता बरीच चढली असती. परंतु दुर्दैवानें प्रत्येक बखरकार शेंकडों वेळां शेंकडों ठिकाणीं चुकला असल्याकारणानें त्या प्रत्येकाच्या प्रामाण्याची इयत्ता शून्यलब्धपिर्यंत खोल गेलेली आहे. अनेक प्रसंगांची एका ठिकाणीं गफलत करणें, वर्णनाचा एकच मासला अनेक प्रसंगांत आणणें, कालाचा व स्थलांचा बरोबर किंवा मुळींच निर्देश न करणें, व्यक्तींच्या नांवांचा अजीबात लोप करणें, अस्पष्ट व पुसटतीं विधानें करणें, कालाचा व स्थलाचा विपर्यास करणें, असे बहुतेक सर्व प्रकारचे दोष ह्या बखरींतून झालेले आहेत. ह्यामुळें बखरकारांनीं लिहिलेल्या खऱ्या गोष्टीहि, इतर बहिःप्रमाणांच्या अभावीं, खऱ्या धरून चालणें धोक्याचें काम आहे अशी मनाची प्रवृत्ति होते. ह्या प्रवृत्तीचा परिणाम असा होतो कीं बखरींतील खऱ्या गोष्टींपासून खोटया गोष्टी निवडून काढितां येत नाहींत व बखरींतलि अमुक मजकूर निश्चयानें खरा असें म्हणण्याचें धाडस सहसा करवत नाहीं. ग्रांट डफची जा मोठी चूक झाली आहे ती हीच होय कीं, बखरींतील जो तपशीलवार मजकूर निश्चयानें खरा आहे असें म्हणवत नाहीं तो, तो खरा धरून चालण्याचें धाडस करतो. शिवाजीनें तोरणा किल्ला शके १५६८ त घेतला, शहाजी शके १५७१ त अटकेंत पडला, चंद्रराव मोऱ्याच्या पराभवाचा अमकाच वृत्तांत खरा, अफजलखानी प्रकरणाचें आपण देतों तेंच वृत्त विश्वसनीय, शिवाजीला चार बायका होत्या, शहाजी शके १५८६ त वारला, वगैरे जो मजकूर डफनें लिहिला आहे तो अविश्वसनीय आहे, ह्याचें कारण ग्रांट डफचें उपरिनिर्दिष्ट धाडसच होय. मिळाल्या होत्या त्या बखरींतलि अमुक एक प्रकरणासंबंधीं अमुक एक मजकूर संभाव्य असला म्हणजे खरा धरून चालावें असला धोपट व अंधळा मार्ग ग्रांट डफनें स्वीकारलेला आहे. पद्धतवार प्रमाणें लावून आपला मजकूर त्यानें पारखून व निवडून घेतलेला नाहीं. अर्थात् ग्रांट डफच्या बखरींवर बिनधोक विश्वास ठेवण्यांत तात्पर्य नाहीं. बखरी व ग्रांट डफ विश्वसनीय आहेत असा पक्का ग्रह करून घेऊन एका मराठा ग्रंथकारानें अन्योन्याश्रयत्वाचा आपल्यावर दोष आणून घेतला आहे. ( १ ) ग्रांट डफ विश्वसनीय आहे, ( २ ) मराठी बखरी बहुतेक विश्वसनीय आहेत, ( ३ ) बखरींतील मजकूर डफच्या बखरींतल्यासारखाच आहे, ( ४ ) तेव्हां डफ विसश्वनीय आहे, व बखरीहि बहुतेक विश्वसनीय आहेत, व ( ५ ) ग्रांट डफनें नवीन कांहीं करावयाचें ठेविलें नाहीं, असा कोटिक्रम ह्या ग्रंथकाराचा आहे ( लक्ष्मणराव चिपळोणकरकृत मराठ्यांचा इतिहास, प्रस्तावना ). मराठी बखरींतून उतारे घेऊन, विशेष पूसतपास न करतां ग्रांट डफनें आपला ग्रंथ बनविला, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली म्हणजे वरील कोटिक्रमांतील पांच वाक्यें एकाच वाक्याचीं निरनिराळीं रूपें आहेत हें स्पष्ट होईल. लक्ष्मणराव चिपळोणकरांची मोठी चूक हीच आहे कीं ते बखरी व डफ विश्वसनीय समजतात. वास्तविक पाहातां, दोन्ही विश्वसनीय नाहींत. दोन्ही पदोपदीं संशयांनीं ग्रस्त झालेलीं आहेत. येणेंप्रमाणें बखरकारांच्या व ग्रांट डफच्या ग्रंथांच्या प्रामाण्याची इयत्ता आहे.

परीक्षा करतांना, बखरींचें प्रामाण्य व ह्या प्रामाण्याची इयत्ता ह्यासंबंधीं मीं जीं विधानें केलीं आहेत तीं संकलित येथें देतों.

( १ ) बखरकारांनीं कालविपर्यासाचा दोष केला आहे.
( २ ) त्यांनीं स्थलविपर्यासाचा दोष केला आहे.
( ३ ) त्यांनीं व्यक्तिविपर्यासाचा दोष केला आहे.
( ४ ) त्यांनीं ह्या तिहींचा प्रत्येकीं व सामग्र्यानें लोप करण्याचा दोष केला आहे.
( ५ ) त्यांना कोणत्याच प्रकारचें शास्त्रीय शिक्षण नव्हतें.
( ६ ) त्यांना आपले विचार नीट प्रगट करितां येत नाहींत.
( ७ ) व त्यांना सामान्य सिद्धांत स्पष्टपणें सांगण्याची ऐपत नाहीं.

ह्या सात दोषांचें शोधन करण्यास खालील तोडगे मीं सांगितले आहेतः—

( १ ) शक, सन, महिना, तीथ, वार, नक्षत्र, करण, इत्यादि जसजशी जास्त तपशिलवार माहिती दिली असेल तसतशी तिची विश्वसनीयता जास्त धरावी. हा तोडगा कालापुर्ताच तेवढा प्रमाण आहे.

( २ ) स्थलांचा किंवा व्यक्तींचा लोप किंवा विपर्यास झाला आहे, असा संशय आला असतां, व ह्या दोहोंसंबंधीं निरनिराळ्या बखरींत निरनिराळा मजकूर असल्यास, अमकाच अस्सल मानण्याच्या भरीस पडूं नये. अशा बाबतींत बहिःप्रमाणांचेंच साहाय्य पाहिजे.

( ३ ) बखरी अस्सल प्रमाण नाहींत. परंतु त्यापैकीं कांहीं भाग कोठें कोठें अस्सल प्रमाण असूं शकेल. तो तसा कोठें असूं शकेल हें बहिःप्रमाणांच्याच साहाय्यानें समजणार आहे.

( ४ ) बखरींतील प्रत्येक वाक्याचें कोठें ना कोठें तरी योग्य स्थळ आहे. परंतु कोणत्या विशिष्ट वाक्याचें कोणतें विशिष्ट स्थल असावें हें बहिःप्रमाणांच्याच साहाय्यानें ठरणार आहे.

( ५ ) कित्येक बखरींत सबंद प्रसंगाचा लोप झालेला आहे हें मुसलमानी तवारिखाशीं ताडून पाहतां समजून येईल. मुसलमानी तवारिखांत जो प्रसंग जास्त दिला असेल त्याला मराठी किंवा मुसलमानी अस्सल पत्राचा आधार असल्याशिवाय तो खरा धरून चालूं नये.

( ६ ) परमार्थानें लिहिलेल्या अस्सल पत्रांतील सर्व मजकूर व महजरांतील बहुतेक सर्व मजकूर प्रमाण समजावा.

( ७ ) ग्रांट डफचा इतिहास बहुत ठिकाणीं अप्रमाण आहे. त्याचीहि तोडजोड बखरींच्या प्रमाणेंच कमजास्त प्रमाणानें करावी. अस्सल पत्रांच्या आधारानें जेवढा मजकूर किंवा मजकुराचा भाग लिहिला असेल तेवढा खरा मानावा.

( ८ ) समर्थांचा दासबोध व तुकारामाचे अभंग पूर्णपणें प्रमाण आहेत.
( ९ ) पोवाडे बखरींपेक्षां जास्त प्रमाण आहेत.
( १० ) रामदासस्वामींची बखर इतर बखरींहून क्वचित् स्थळीं जास्त प्रमाण आहे.
( ११ ) महाराष्ट्राचें भूज्ञान हें बहिःप्रमाणांचेंच एक अंग आहे.

( १२ ) बखरींचें बहुमत किंवा एकमत प्रमाण नाहीं.

( १३ ) तोंडी पुरावा प्रमाण नाहीं.

( १४ ) सुरत येथील व्यापाऱ्यांचे लेख प्रमाण नाहींत; त्यांना वळा बातमी मिळत नसे म्हणून व जी बातमी मिळत असे ती सदा खरींच असे, असें नसे म्हणून, तपशिलाचे संबंधीं येथें विचार कर्तव्य आहे हें ध्यानांत धरलें पाहिजे.

( १५ ) गोवें येथील पोर्तुगीज सरकाराच्या दप्तरांतील लेख इंग्रज व्यापाऱ्यांच्या लेखांपेक्षां जास्त विश्वसनीय समजावें. कारण, सुरतेंतील इंग्रजांपेक्षां गोवें येथील त्या वेळचे अधिकारी जास्त सुशिक्षित व व्यवस्थित होते.

( १६ ) भूषणकवीच्या काव्यांतील उल्लेख बहुतेक अस्सल प्रमाण समजावे.

( १७ ) संभाव्यतेचें प्रमाण इतिहासाचें शोधन करण्याच्या कामीं बहुतेक अगदीं निरुपयोगी आहे. ऐतिहासिक संभाव्यता दोन प्रकारची असूं शकेलः--

( १ ) एक ऐतिहासिक प्रसंगाची व ( २ ) दुसरी ऐतिहासिक प्रसंगाच्या तपशिलाची. अमूक एक प्रसंग शिवाजीच्या हातून किंवा हयातींत किंवा आसपास होणें संभाव्य आहे किंवा नाहीं,ह्या प्रकारचा प्रश्न उद्भवला असतां संभाव्यतेच्या प्रमाणानें तो प्रसंग संभाव्य आहे किंवा नाहीं हें सांगतां येईल. परंतु तो प्रसंग साक्षात् घडला किंवा नाहीं हें सांगतां येणार नाहीं. प्रसंगाच्या तपशीलासंबंधीं प्रश्न उद्भवला असतां अमुक व्यक्ति, अमुक स्थळीं, व अमक्या कालीं अमुक तऱ्हेनें, वागल्या किंवा नाहीं हें सांगणें संभाव्यतेच्या प्रमाणानें होणार नाहीं. हा तपशील निश्चयानें सांगण्यास अस्सल पत्रांचेंच प्रमाण पाहिजे.

( १८ ) पूर्वग्रहानें आविष्ट होऊन, किंवा मनोदेवतेचें प्राबल्य होऊन पूर्वीचे दोष झांकण्याकरितां, किंवा राष्ट्रीय अभिरुचीला पसंत पडावें ह्या इच्छेनें, किंवा परकीय लोकांच्या मताला मान देण्याच्या खोडीनें, ऐतिहासिक प्रामाण्याची कसोटी दूषित होण्याचा संभव असतो. ही कसोटी जितकी शुद्ध ठेवितां येईल तितका ऐतिहासिक सत्यतेचा उद्गम जास्त होईल.

( ४ ) " पेशवाईच्या अखेरची अखबार " हें ह्या खंडांतील तिसरें प्रकरण आहे. पुणें येथाल रामाजीनाइक भिडे यांच्या दप्तरांतील हें प्रकरण आहे. ह्यांतील विषय त्याच्या नांवावरूनच कळून येण्यासारखा आहे. बाहेरगांवच्या सरदारांना, दरखदारांना व सावकारांना पुण्यास जें जें कांहीं होईल त्याची बातमी देणारे अखबरनवीस असत; त्यांपैकीं एकानें ही अखबार सजविली आहे. अखबारी बखरींचें पूर्वरूपच होत. ही अखबार पूर्णपणें विश्वसनीय आहे.

( ५ ) " रमास्वयंवर " हें ह्या खंडांतील चवथें प्रकरण होय. ह्याचा कर्ता कोण तें सांगतां येत नाहीं. कदाचित् बाळ सदाशिव वाळिंबे हा ह्या त्रोटकाचा कर्ता असावा असें उपसंहारावरून वाटतें. ह्यांत सवाईमाधवरावाच्या लग्नाचें लहानसें प्रास्ताविक वर्णन आहे. हें काव्य पुणें येथील श्रीमंत तुळशीबागवाले ह्यांच्या दप्तरांतील आहे. काव्य जसें लिहिलें होतें तसेंच छापलें आहे. शुद्धाशुद्ध पहाण्यास दुसरी प्रत मिळणें बहुशः अशक्य असल्यामुळें हा मार्ग स्वीकारला आहे.

( ६ ) " शके १७३८ सालांतील हकीकत " हें ह्या ग्रंथांतील पांचवें प्रकरण आहे. ह्याचा कर्ता कोण तें समजत नाहीं.

( ७ ) " पेशव्यांची वंशावळ " हें ह्या ग्रंथांतील सहावें व शेवटलें प्रकरण आहे. ह्याचा कर्ता कोण तें माहीत नाहीं.

ह्या खंडांत छापिलेल्या सहा प्रकरणांपैकीं पहिलें व चवथें खंड वगळलें असतां, बाकी जीं चार प्रकरणें राहतात तीं बखर ह्या सदराखालीं मोडण्यास हरकत नाहीं. ह्या बखरी अस्सल पत्राप्रमाणें पूर्णपणें विश्वसनीय आहेत व म्हणूनच त्या मीं येथें छापिल्या आहेत. ( १ ) पेशवाईचा इतिहास जातीनें माहीत असणाऱ्या अशा थोर व बहुश्रुत लोकांपुढें ती बखर जावयाची असल्यामुळें व ती सवाई माधवरावाकरितां लिहिलेली असल्यामुळें तींत विश्वसनीय अशीच माहिती दिलेली आहे. ( २ ) " शके १७३८ सालांतील हकीकत " दफात्यावरून उतरून घेतली असल्यामुळें ती विश्वसनीय आहे. ( ३ ) ' पेशवाईच्या अखेरची अखबार " समकालीन लेखकानें आपल्यासमोर होत असलेल्या रोजच्या प्रसंगाची हकीकत म्हणून लिहिली असल्यामुळें विश्वसनीय आहे. ( ४ ) " पेशव्यांची वंशावळ " मोठ्या काळजीनें दफात्यांतून जुळविली असल्यामुळें पूर्णपणें विश्वसनीय उतरली आहे. विश्वसनीय बखरी कशा निर्माण होतात ह्याचे ह्या चार बखरी मासलेच आहेत. समकालीन तज्ज्ञ लोकांपुढें समकालीन योग्य लेखकानें समकालीन गोष्टींचें वर्णन स्वदृष्टीनें पाहून केलें असल्यास विश्वसनीय ठरतें, किंवा योग्य लेखकानें योग्य आधारावरून अफरातफर न करतां मजकूर जुळविला असल्यास तो विश्वसनीय उतरतो. ही कसोटी शिवकालीन बखरींना लाविली असतां त्या विश्वसनीय कां नाहींत, हें समजून येणार आहे. शिवकालीन बखरींत विश्वसनीय अशी मानिली जाणारी बखर म्हटली म्हणजे सभासदी बखर होय. तिच्यांत मुख्य गोम ही आहे कीं ती केवळ स्मृतीवर हवाला देऊन लिहिलेली आहे. शिवाजीची जेवढी कारकीर्द सभासदानें प्रत्यक्ष पाहिली

होती तिचें वर्णन त्यानें जरासें विस्तृत केलें आहे, व जी कारकीर्द त्याला समजूं लागल्याच्या अगोदर संपली तिचें वर्णन त्यानें अत्यंत त्रोटक केलें आहे. केवळ स्मृतीवर हवाला ठेवल्यामुळें विस्तृत वर्णनाचा भाग व त्रोटक वर्णनाचा भाग, दोन्हीहि अविश्वसनीय व संशयित उतरलेले आहेत. केवळ स्मृतीवर हवाला ठेवून मुद्देसूद व क्रमवार हकीकत लिहिली जाणें बहुतेक अशक्य असतें. मानवी स्मृतींत सामान्य गोष्टींचीं टिपणें टांचलीं जातात. क्रमवार, तपशीलवार, मुद्देसूद व तारीखवार हकीकतीचा बोजा सहन करण्याचा व वर्षोनवर्षे वहाण्याचा जोम मानवी स्मृतींत नाहीं. सभासदी बखर बहुत स्थलीं अविश्वसनीय आहे त्याचें कारण हेंच आहे. इतर शिवकालीन बखरकार विषम कालीन असल्यामुळें, जुन्या टिपणांचा उपयोग करून घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नसल्यामुळें, दफातीं व पत्रें जितकीं मूबलक मिळावीं तितकीं त्यांना मिळालीं नसल्यामुळें व कोणत्याहि प्रकारच्या शास्त्रीय शिक्षणानें त्यांची बुद्धि कसली गेली नसल्यामुळें, त्यांच्या हातून हे असले अर्धवट लेख उतरले गेले आहेत. केवळ जुन्या टिपणांचे उतारे देऊन हे बखरकार स्वस्थ बसले असते तर तें बरेंच विश्वसनीय ठरतें. परंतु, जुन्या टिपणांच्या उताऱ्यांत आपली वेडीवागडी मखलाशी करण्याची आवश्यकता बखरकार ह्या नात्यानें त्यांना अपरिहार्य झाल्यामुळें अद्भूत प्रसंगांनीं तुडुंब भरलेल्या शिवाजी महाराजांच्या चरित्राचें रूप आधुनिक वाचकांना ह्या कुलेखकांनीं कोरडें ठणठणीत असें करून दाखविलें आहे.

# प्रस्तावना ( खंड ५

ह्या खंडांत माधवराव नारायण पंत प्रधान यांचे हैद॰ - राव कृष्ण काळे यांचीं नाना फडणीसांस व पंत प्रधानांस आलेलीं पत्रें छापावयाचीं आहेत. गोविंदराव कृष्ण काळे यांचे वंशज श्रीमंत रा. रा. बापूसाहेब काळे, बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं आपल्या बारामती येथील दफ्तरांतील सुमारें दहा बारा हजार पत्रें माझ्या स्वाधीन केलीं. हीं पत्रें १७८६ पासून १७९८ पर्यंतच्या अवधींतील बहुतेक आहेत. नाना फडणीसांस व पंत प्रधानांस पाठविलेल्या पत्रांचें जावक गोविंदराव कृष्ण यांनीं सेक्शन बांयडिंगनें बांधून, सुरेख, वळणदार व टपोऱ्या अक्षरांनीं लिहून, फार सुरक्षित असें आपल्या दफ्तरखान्यांत ठेविलें होतें. गोविंदराव कृष्ण यांच्या मृत्यूनंतर ८० वर्षेपर्यंत हीं जावकें अंधारांत लोळत पडून सुमारें दोन वर्षापूर्वी श्रीमंत बापूसाहेब यांच्या हस्तें त्यांची झाडपूस झाली. उंदीर, पाऊस, घुशी, वाळवी, कोळी, वारा आणि आळशी व अज्ञ कारकून ह्यांच्या तडाक्याखालीं ह्या जावकपत्रांच्या पुस्तकांच्या निवळ भाकरी बनून गेल्या होत्या. कित्येक जावकें आरपार पोखरून गेलीं होतीं; व कित्येकांचा तर मिसर देशांतील ममीप्रमाणें भुगा होऊन गेला होता. ह्या शेवटल्या दुर्दैवी भुग्याची आशाच सोडावी लागली. आरपार पोखरून हैराण झालेलीं पुस्तकें थंड पाण्याच्या घड्यांच्या नाजूक उपचारानें पुन्हां थोडीं बहुत बोलूं लागलीं. व पहिल्या वर्गांतील भाकऱ्यांवरील चिकटा अधणाच्या वाफाऱ्यानें धुवून काढल्यावर, आंतील पत्रें पुनः ताजींतवानीं झालीं. अशा मोठ्या दुर्धर प्रसंगांतून हीं पत्रें सोडविलेलीं आहेत. जुन्या कदीम, रियासतेंतील हीं अवशेषें आहेत. त्यांचा सत्कार महाराष्ट्रांतील इतिहासज्ञ अत्यंत आदरानें करतील अशी खात्री आहे.

प्रस्तुत पत्रांचा सत्कार करण्याचें काम महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांवर सोंपविल्यामुळें, इतर जनांचा क्वचित् रोष होण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक प्रकार जो आहे तो बोलून दाखविला पाहिजे. इतिहास व चरित्रें लिहिण्याची ज्यांची इच्छा आहे, इतिहासशास्त्राचा ज्यांनीं अभ्यास केला आहे, जे ह्या विषयांत अधिकारी झालेले आहेत, त्यांच्याखेरीज इतरांना ह्या पत्रांच्या वाचनापासून काडीचाहि उपयोग नाहीं. स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन कित्येक लोक हीं पत्रें वाचतात ही आनंदाची गोष्ट आहे; परंतु इतिहासाची रचना करण्याच्या हेतूनें किंवा त्यांतील मर्म समजून घेण्याच्या इच्छेनें जे कोणी थोडे लोक सध्यां प्रोत्साहित झाले आहेत किंवा पुढें होतील, त्यांच्याकरितां विशेषतः हा प्रयत्न आहे. नवी नवी चीज आहे तोंपर्यंत इतिहासज्ञेतर लोक ह्या पत्रांचें कौतुक करतील; परंतु त्यांचें हें आगंतुक प्रेम लवकरच थिजून जाईल असा मला संशय येतो. इति-

होतीं तिचें वाचनानें स्वदेशप्रीति उत्पन्न होते, ह्या आशेनें कित्येक उतावीळ वाचक ह्या
त्यान्च्या सेवन करतील; परंतु त्यांच्या ह्या खोट्या आशेवर माझी बिलकुल भिस्त नाहीं.
हवा त्रीनें हेहि लोक मला लवकरच सोडून जातील. ज्यांच्या वाचनानें स्वदेशप्रीति उत्पन्न होते, ज्यांच्या निदिध्यासानें राष्ट्रांचा उद्धार होतो, तीं हीं पत्रें नसून, ह्या पत्रांपासून उत्पन्न झालेला जो इतिहास तो होय. इतिहासापासून मिळणारें फळ ऐतिहासिक पत्रांपासून कदापि मिळणार नाहीं. सारांश, हे दोन्ही प्रकारचे लोक माझ्या ह्या प्रयत्नाला लवकरच कंटाळतील. सध्यां कोठें चार खंडें छापून झालीं आहेत नाहींत तोंच अशा प्रकारचा ध्वनि क्वचित् कोठून कोठून ऐकूं येतो. मला तर अद्याप शंभर दीडशें खंडें छापावयाचीं आहेत. तेव्हां शेवटपर्यंत तग धरणारा, स्तुतिनिंदेला न जुमानणारा, लोकांच्या औदासिन्याला भीक न घालणारा, बौद्धमत्सरानें दूषित न होणारा, असा वाचकसमूह जवळ केल्यावांचून तरणोपाय नाहीं. इतिहासज्ञांच्या समानशील समाजाव्यतिरिक्त असा वाचकसमूह इतरत्र कोठें मिळणार आहे? इतरत्र कोठेंही मिळणार नाहीं अशी पक्की खात्री होऊन, ह्या पत्रांचा सत्कार करण्याची विनंति महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांस मी करीत आहे. श्रीमंत, गरीब, परीक्षित, अपरीक्षित, नोकर, स्वतंत्र अशा सर्व समाजांत इतिहासाच्या साधनांचा संग्रह करणारे थोडे थोडे लोक आहेत, त्यांच्या जोरावर हें काम चालावयाचें आहे. त्यांनीं जर ह्या प्रयत्नाचें अगत्य धरिलें नाहीं, तर हीं पत्रें सांपडलीं आणि न सांपडलीं सारखींच आहेत.

शिवाय महाराष्ट्रांतील इतिहासजिज्ञासूंनाच संबोधण्याचें एक विशेष कारण आहे. इतर देशाप्रमाणें आपल्या ह्या महाराष्ट्राची स्थिति नाहीं. कलकत्ता, मद्रास, मुंबई येथील १७ व्या व १८ व्या शतकांतील इंग्रेजी चिटणिशी दफ्तरांतील राजकारणीं पत्रें छापण्यास प्रो. फारेस्टसारख्यांस इंग्रज सरकार पगार व खर्च देतें. वाशिंग्टन, वेलिंग्टन, नेपोलियन, फ्रेडरिक वगैरे पुरुषांचे पत्रव्यवहार शोधण्यास, निवडण्यास व छापण्यास त्या त्या देशांतील सरकारें केवळ उत्सुक असतात. आपल्या ह्या देशांतील प्रकार मात्र अगदीं वेगळा आहे. मराठी दफ्तरें छापण्याचा खर्च देण्यास सार्वभौम किंवा मांडलिक सरकारें सध्यांच कोणी तयार होतील असा अद्याप तरी रंग दिसत नाहीं. तेव्हां हें काम आपलें आपणच केलें पाहिजे.

प्रस्तुत खंडांत खर्ड्याच्या लढाईनंतर मराठे व निजाम ह्यांच्यामध्यें तहप्रकरणीं जीं बोलणींचालणीं झालीं त्यांचा वृत्तांत आहे. नाना फडणीसांच्या कारकीर्दींत परदरबारीं मराठ्यांचे वकील केवढ्या इभ्रतीनें, डौलदारीनें व तालेदारीनें बोलणें करित असत, ह्याचा मासला ह्या पत्रांत उत्तम पहावयास मिळतो. प्रस्तुत खंडांत छापिलेलीं पत्रें नाना फडणीसांच्या मेणवली येथील दफ्तरांत असलेल्या अस्सल पत्रांच्या नकला आहेत. अशीं हीं पत्रें मजजवळ सुमारें दहा बारा हजार आहेत. अर्थात् मेणवली येथील दफ्तराचा एक तृतीयांश काळे यांचें दफ्तर छापलें म्हणजे छापल्यासारखाच आहे.

# प्रस्तावना. ( खंड सहावा. )

१. आठवा खंड १९०३ सालीं संपला. पुढें दोन वर्षांनीं हा सहावा खंड संपत आहे. विलंबाचें कारण असें कीं, ह्या खंडांत इतर कोणत्याहि खंडांतल्यापेक्षां मजकूर जास्त आहे. शिवाय, तंजावर वगैरे स्थलीं प्रवास करण्यांत फार वेळ गेल्यामुळें, मजकूर देण्याला वेळोवेळीं दिरंगाई झाली. वांई, सातारा व नासिक येथील दोघा तिघा गृहस्थांनीं मजकूर तयार करण्याचें जर मनावर घेतलें नसतें, तर इतर कामें संभाळून, तो देतां आला असता किंवा कसें, याचीच शंका आहे. खरें पाहिलें तर, काम वेळच्या वेळीं उठण्यास, दोन चार स्वतंत्र मनुष्यांची योजना पाहिजे आहे. तशांत मनुष्यें नुसतीं स्वतंत्र असून उपयोगीं नाहीं, तर तीं तज्ज्ञ असलीं पाहिजेत. म्हणजे मूळ शुद्ध व विश्वसनीय लिहून निघून, मजकूरहि वेळेवर तयार होत जाईल. परंतु, असला सुदिन उगवे तोंपर्यंत जसें लिहून निघेल तसें घेतलें पाहिजे; आवडनिवड करण्याची सोय नाहीं.

२. आवडनिवड करावयाची म्हटली म्हणजे तज्ज्ञ माणसें व भरपूर पैसा पाहिजे. मूळ कागद वाचून तो नीट बाळबोधींत लिहून काढावयाचें काम वरवर पहाणाऱ्याला वाटतें तितकें सोपें नाहीं. शक १६२२ पासून शक १७६० पर्यंतच्या ऐतिहासिक पत्राचें मोडी अक्षर वस्तुतः प्रत्येक सुशिक्षित महाराष्ट्रीयाला वाचतां यावें. परंतु, अनुभवाची गोष्ट आहे कीं, हें आधुनिक मोडीहि बहुतेकांना नीट वाचतां येत नाहीं. याचें मुख्य कारण स्वदेशाच्या इतिहासाचें व भाषेचें जितपत सशास्त्र ज्ञान असावें, तितपत सध्यांच्या इंग्रजी व मराठी शिकलेल्या एतद्देशीय लोकांना असत नाहीं. मुसलमानी नांवें, जुनीं मराठी नांवें, जुने मराठी शब्द, स्थलनामें, वगैरे कधींहि कानावरून गेलीं नसल्यामुळें, संशयित व असंशयित अशा दोन्ही ठिकाणीं ह्या लोकांच्या चुका होतात; व ह्यांना नकला करावयाला सांगण्यापेक्षां आपण स्वतःच लिहून काढणें जास्त सोयस्कर वाटूं लागतें. ही कथा १६२२ पासून १७६० पर्यंतच्या लेखांची झाली. शक १६२२ च्या पलीकडील तीन चारशें वर्षांचे जे लेख आहेत, ते तर ह्या लोकांना मुळीं वाचतांच येत नाहींत. जुने ताम्रपट व शिलालेख वाचणें, ह्या लोकांना जितकें कठिण जाईल तितकेंच हे लेख वाचणेंहि कठीण जातें. ही अडचण इंग्रजी शिकलेल्या नवीन लोकांनाच भासते असें नाहीं. तर मोठमोठ्या जुन्या फड्यां कारकुनांचीहि ह्या जुन्या लिखितांपुढें बोबडी वळलेली मीं पाहिली आहे. श्रीमंत बावडेकर यांचें दफ्तर तपासतांना अशा एका जुनाट कलमबहादराची व माझी गांठ पडली. पत्रें शिवाजी महाराजांच्या वेळचीं होतीं. त्यांतील एखाददुसरें अक्षर हे गृहस्थ अधून-मधून लावूं शकत. कोणतेंहि एक वाक्य सबंद लावण्याची ह्यांना मुष्कील पडे. शब्द, प्रयोग, रूपें, वगैरे सर्वच प्रकार जुना पडल्यामुळें, ह्या कारकुनाला वाचण्याची अडचण पडे, असा तर प्रकार होताच. परंतु त्याला मुख्य अडचण जी पडे ती तत्कालीन मोडी अक्षरें ओळख-

होती तिचें वाचनानें स्वदेशाठीं बनलेले फारशी शब्द ह्या पत्रांतून फार असल्यानें अशा अनल्याच्या सेवन करतील. ाठीं पंचाईत पडते. सबब स्वेतिहासाच्या प्रेमानें जुना किंवा नवा हवाग्रीनें हेहि लोकत्त मनुष्य ह्या पत्रांच्या नकला करून देण्याला सिद्ध झाला, तर त्याला - होते, ज्यांच्या करून घेण्याची सोय नाहीं, असें निरुपायानें सांगावें लागतें. आतां सर्व लेख उत्पन्न झाले लिहूं जावें, तर तेंहि अशक्य आहे. कितीहि उत्साह असला, तरी मानवी बोटांनीं पासून न करण्याची कांहींतरी मर्यादा आहेच आहे.

लव ३. जुन्या मोडी लेखांच्या नकला अनभ्यस्त लेखकांकडून करून घेण्यांत किती त्रास पडतो, हें येथपर्यंत संक्षेपानें सांगितलें. आतां जुन्या मराठी बाळबोधी पोथ्यांच्या नकला करून घेण्यांत काय काय अडचणी येतात तें सांगतों. एकवार, जुन्या संस्कृत पोथ्या लेखकाला उतरावयाला सांगितल्यास चालेल. परंतु, जुन्या मराठी पोथ्या लेखकांकडे देणें निव्वळ पाप होय. मराठी पोथ्यांतील जुने शब्द, जुनीं रूपें, जुनी भाषा व जुनीं अक्षरें अवगत नसल्यामुळें, शब्द तोडून लिहावयाचें ह्या लेखकांना कळत नसतें तें नसतेंच; उलट आधुनिक शुद्धलेखनाची संवय झाल्यामुळें जेथें त्यांना पोथींतील भाषा समजतें असें वाटतें, तेथें तें मूळ पोथींतील शुद्धलेखन बदलून, नूतन शुद्धलेखनाचा आश्रय करतात व मूळाचें सर्व स्वारस्य घालवितात. एखादा जुना शब्द नीट कळला नाहीं, तर आपल्या पदरचें अक्षर घुसडून देऊन जुळतें करून घेतात; आणि कधीं कधीं तर मूळ पोथींत चूक झाली आहे असें वाटल्यास, तीहि सुधरावयाला कमी करीत नाहींत. एवंच, अशा लेखकांना जुन्या मराठी पोथ्या नकल करण्यास देणें नाना प्रकारांनीं धोक्याचें आहे. सर्वच जुन्या पोथ्या स्वतः लिहूं जाणें अशक्य आहे, हें वर सांगितलेंच आहे.

४. सारांश, जुने लेख व जुन्या पोथ्या उतरून काढण्याचें काम जरा अवघडच आहे, इतकेंच नव्हे तर, बरेंच जोखमीचें आहे. उठला सुटला कोणीहि कारकून किंवा इंग्रजी पदवीधर हें काम बिनबोभाट करीलच, असा भरंवसा नाहीं. आतां बिनबोभाट काम उरकण्याला एकच उपाय आहे. तो हा कीं, इतिहासाचा नाद असणारा एखादा चणचणीत मनुष्य वर्ष दोन वर्षे जुने लेख वाचण्याकरितां व नकल करण्याकरितां उमेदवारीस ठेविला पाहिजे व संन्याशी नसल्यास, त्याला इंग्रजसरकारच्या हफीसांतून त्याच्याचसारख्या लोकांना मिळणाऱ्या पगाराइतका पगार दिला पाहिजे. असे दहा पांच लोक तयार केल्याविना, लेखप्रकाशनाचें वाढतें काम जसें समर्पक चालावें तसें चालणार नाहीं.

५ प्रतिलेखक योग्य व तज्ज्ञ मिळत नाहींत, ही एक लेखप्रकाशनाला प्रतिबंधक गोष्ट झाली. दुसरा प्रतिबंध छापखान्यांचा. जुने ऐतिहासिकलेख यथाशास्त्र छापावयाचे म्हटले म्हणजे चार चार पांच पांच वेळां कच्चीं मुद्रितें तपासलीं पाहिजेत व संपादक जाग्यावर नसल्यास तो असेल तेथें पाठवितां आलीं पाहिजेत. आपल्या देशांतले एकोनएक छापखाने पाहिले तर त्यांचा कारभार किती तुटपुंजा असतो तें प्रसिद्धच आहे. चार चार पांच पांच वेळां कच्चीं मुद्रितें संपादक असेल तेथें पाठविण्याची व्यवस्था सोडूनच द्या. पण एकच कच्चें मुद्रित तपासून दिलें असतां, तें वेळेवर शुद्ध छापून निघालें, म्हणजे गंगेंत घोडे

म्हाले; असा प्रकार सर्वत्र आहे. शिवाय, जुने ऐतिहासिक किंवा काव्यलेख जसेचे तसे छापण्यास, कधींकधीं नवे ठसे पाडणें जरूर असतें. शिक्यांत एखादे ठिकाणीं उलटा न छापावयाचा असल्यास, किंवा एखादा अष्टकोनी शिक्का हवा असल्यास, किंवा लेखांच्या प्रारंभींचा दकार काढावयाचा असल्यास, किंवा बीत रेघ दाखवावयाची असल्यास, नवीन ठसा संपादक स्वतः कोठून तरी पाडून आणील तेव्हां काम चालावयाचें. तात्पर्य, जुने लेख यथाशास्त्र प्रकाशण्यास, वाकबगार लेखक दोन दोन वर्षें फुकट पोसून तयार केले पाहिजेत, व ठसे वगैरे जें जें कांहीं नवीन सामान हवें असेल, तें तें संपादकानें स्वतः निर्माण केलें पाहिजे, आणि ही दुहेरी सामग्री सिद्ध होईपर्यंत, नाना तऱ्हेचीं व्यंगें निमूटपणें सोशीत राहिलें पाहिजे. आवडीनिवडीचे चोचले करावयाचे मनांत आणलें म्हणजे हा इतका व्याप करणें अवश्य आहे.

६. हा व्याप झेंपण्याचा प्रयत्न एकदम जरी नाहीं, तरी आस्ते आस्ते होत आहे. इतिहासाची गोडी महाराष्ट्रांत आज दोनतीनशें वर्षांपासूनची आहे; व त्याचीं साधनें प्रकाशित करण्यापासून कांहीं फायदा आहे, असें मत अलीकडे सार्वत्रिक झालें आहे. परंतु, प्रकाशनाच्या कामीं येणारा खर्च सोसण्यास लोक जितपत तयार असले पाहिजेत, तितपत नाहींत, असें, ऐतिहासिक पुस्तकांच्या व मासिकांच्या तुटपुंज्या खपावरून, म्हणावें लागतें. पण ही बाब सामान्य लोकांची झाली. असामान्य लोक म्हणजे शिक्षणाच्या अत्युच्च शिखराप्रत जाऊन पोहोंचलेले लोक पहावे, तर तेहि लेखप्रकाशनाला कांहीं मदत करतात, असें दिसत नाहीं. सामान्य लोकांत शंभर वर्गणीदार जर मिळाले, तर ह्या असामान्य लोकांत एकहि मिळण्याची मारामार पडते. म्हणजे वस्तुतः अशिक्षित लंगोट्यांची व ह्या सुशिक्षित पाटलोण्यांची योग्यता [illegible]क सारखीच आहे. अत्यंत अशिक्षित व अत्यंत सुशिक्षित अशा ह्या निरुपयोगी लोकांना सोडून दिलें, म्हणजे बाकी राहिलेला जो आमच्यासारखा सामान्य लोकांचा वर्ग, तोच ह्या कामाला कांहीं उपयोगी पडला तर पडेल. आतांपर्यंत जें प्रकाशन झालें आहे, तें याच लोकांच्या सहानुभूतीनें व आश्रयानें झालेलें आहे, आणि पुढें व्हावयाचें तें याच लोकांच्या मदतीनें होईल अशी उमेद आहे. इतकेंच कीं, ह्या लोकांच्यापुढें आपली फिर्याद यथास्थित रीतीनें मांडली पाहिजे. राष्ट्ररचनेंत इतिहासाची कामागिरी काय, व त्याच्या साधनांचें कार्य कोणतें, हें जर ह्या सारासारविचारी पंचापुढें मांडलें, तर ते या कामाला हळूंहळूं खात्रीनें साहाय्य करतील, अशा प्रेमळ आशेनें पुढील विवरण करण्याचें योजिलें आहे. ह्या विवरणांत, इतिहासाचें खरें स्वरूप काय सध्यां आपल्या देशांत तो कोणत्या रूपानें दाखविला जातो व वस्तुतः तो कोणत्या रूपानें दाखविणें जरूर आहे, ह्या तीन प्रकरणांचा विचार कर्तव्य आहे.

७. इतिहासाचें खरें स्वरूप काय, ह्या मुद्याला हात घालण्यापूर्वीं एका कच्च्या इंग्रजी कल्पनेला कांट देणें जरूर आहे. History is past politics and politics is present history, असें विधान कित्येक इंग्लिश इतिहासकार करतात. इतिहास म्हणजे गतराजकारण व राजकारण म्हणजे वर्तमान इतिहास, हें इतिहासाचें लक्षण

सर्वस्वीं अपुरें आहे. मानवसमाजाच्या चरित्रांत राजकारणाखेरीज इतर अनेक व्यवहारांचा समावेश होत असतो. धर्म, आचार, विद्या, व्यापार, वगैरे अनेक व्यवहारांच्या घडामोडी राष्ट्रांत होत असतात आणि त्यांचा समावेश समाजाच्याच रित्रांत करणें अत्यावश्यक असतें. केवळ राजकारणाचाच तेवढा विचार करून इतिहासाला थांबतां येत नाहीं. केवळ राजकारणावरच उदरनिर्वाह करणाऱ्या इंग्लंडसारख्या देशांतल्या इतिहासकारांना इतिहासाचें व राजकारणाचें समानाधिकरण भासत असेल. परंतु, इतर देशांतलि इतिहासकारांना तें तसें भासत नाहीं, ही निर्विवाद गोष्ट आहे. इतर देशांत राजकारणाला फारसें महत्त्व देत नाहींत, अशांतला भाग नव्हे. तर राजकारणाप्रमाणेंच, धर्मकारण, व्यापारकारण, समाजकारण, वगैरे अनेक कारणांचें महत्त्व त्या देशांतील इतिहासकारांना सारखेंच वाटतें. सबब, इतिहास म्हणजे राष्ट्रांचें सर्व तऱ्हेचें गतकालीन चरित्र व सर्वप्रकारचें वर्तमान चरित्र म्हणजे वर्तमान इतिहास, असें लक्षण स्वीकारणें अपरिहार्य आहे. इंग्लिश इतिहासकारांच्या ध्यानांत हें व्यापक लक्षण येऊं लागलें नाहीं असें नाहीं. परंतु, तें ध्यानांत ठेऊन, नांव घेण्यासारखा इंग्लंडचा इतिहास इंग्लिश इतिहासकारांकडून अद्याप लिहिला गेलेला आढळांत नाहीं. इंग्लंडच्या इतिहासावर सर्व तऱ्हेनें व्यापक असा विचार जर्मन व फ्रेंच इतिहासज्ञांकडूनच थोडाफार झालेला आहे. १८६० पासून १८८० पर्यंत इंग्लिश इतिहासकारांतला प्रमुख असा जो फ्रीमन तो History is past politics हें वचन सिद्धान्तवत् मानी.

८. ह्या दूषित इंग्लिश लक्षणापेक्षां आपल्या आर्य पूर्वजांनीं हजारों वर्षांपूर्वीं इतिहासाचें जें लक्षण ठरविलें आहे, तें अगदीं निर्दोष आहे. ताटस्थ्यवृत्तीनें दोषरहित लक्षणें करण्यांत त्यांचा हातखंडाच असे. इति ह आस, असें झालें, असें होतें, हें इतिहासाचें लक्षण आर्यांचें होय. मानवसमाजाच्या गतचरित्रांतला अमुक भाग इतिहास नाहीं, व अमुक भाग इतिहास आहे, असें हें लक्षण सांगत नाहीं. तर जें जें कांहीं झालें, तें तें सर्व इतिहास होय, असें साध्या तीन शब्दांनीं तें जाहीर करीत आहे. ह्या लक्षणांत समाजांतील सर्व हालचालींचा अंतर्भाव होतो. इतिहासाचें हें आपलें वडिलोपार्जित लक्षण दोषरहित असल्यामुळें, शिरसा मान्य करण्यांत मोठा अभिमान वाटतो.

९. इति ह आस, ह्या लक्षणांत समाजाच्या गतचरित्राचाच तेवढा समावेश केलेला आहे, वर्तमान चरित्राचा केलेला नाहीं, अशी शंका आणितां येईल. परंतु, किंचित् सूक्ष्म विचार करून, शास्त्रीयरीत्या पहातां वर्तमान म्हणून ज्याला म्हणतां येईल असें या जगतांत काय आहे? ज्या क्षणाला वर्तमान म्हणावें, तो क्षण बोलतांबोलतांच गत होऊन इति–ह–आस–पदवीला जाऊन पोहोंचतो. तेव्हां वर्तमान इतिहास, वर्तमान जग, वगैरे जे शब्दसमूह आपण योजतों, ते सर्व परस्परविरोधी आहेत, हें उघड आहे. आपल्या डोळ्यांसमोर नुकत्याच होऊन गेलेल्या ज्या गोष्टी, त्यांच्या वर्णनाला आपण वर्तमान इतिहास म्हणून परस्परविरोधी नांव देतों इतकेंच. वस्तुतः तें वर्णन गतगोष्टींचेंच असतें. एवढेंच कीं, ह्या गतगोष्टी इतर दूरच्या गतगोष्टींहून कमीजास्त अलीकडच्या असतात. तात्पर्य, Present

history, present politics, हे जे शब्द यूरोपियन लेखक योजतात, ते सर्व भ्रामक व अशास्त्र होत. त्यांच्या लेखांतील Present ह्या शब्दाचा अर्थ ' नुकतेंच होऊन गेलेलें, ' असा वस्तुतः असतो. Present ह्या शब्दाच्या ऐवजीं Immediate past, recent past, हे शब्द जर यूरोपियन इतिहासकार योजतील, तर योग्य अर्थाच्या उद्बोधनार्थ योग्य शब्दाची योजना केली, असें होईल आणि Politics is present history, वगैरे विरोधात्मक वाक्यरचना होणार नाहीं.

१०. एवंच, समाजाच्या चारित्रांतील गत गोष्टींची जी हकीकत ती इतिहास होय; मग ती गोष्ट होऊन एक दिवस झालेला असो किंवा हजार वर्षें झालेलीं असोत. गतकाल हाच तेवढा इतिहासाचा सशास्त्र प्रांत असून, वर्तमानकाल केवळ क्षणमात्रावस्थायी असल्यामुळें, वर्णनाचा किंवा हकीकतीचा विषयच होऊं शकत नाहीं. हा असा विभाग यथास्थित न केल्यामुळें वर्तमानकाळचा इतिहास लिहिणें धोक्याचें, नाजूक व अतएव अशक्य, निदान अहितकारक आहे, असें विधान पाश्चात्य इसिहासकार वारंवार करतांना दृष्टीस पडतात. वस्तुतः पाहतां ज्याला ते वर्तमानकाळ म्हणतात, तो भूतकाळ होऊन गेलेला असतो, व त्याच्यावर हजारों लेख व विचार येऊन गेलेले असतात व येत असतात. हे विचार व हे लेख ज्याला ते वर्तमानकाळ म्हणतात, त्यांचेच अपूर्ण इतिहास असतात. मात्र, इतिहास म्हणून संभावित नांव त्यांना दिलेलें नसतें. इतिहासलेखनाचा राजरोस धंदा करणारे जे आहेत, ते मनांत मांडे खात असतात कीं, वर्तमानकाळचा इतिहास अद्याप लिहिला गेला नाहीं, व लिहिला जाणारहि नाहीं. परंतु, हा त्यांचा केवळ भ्रम असतो. अंतर्हितकाळांतील ज्या मोठमोठ्या व्यक्ती हयात असतात, त्यांचा उपमर्द होईल, त्यांचीं गुह्यें फुटतील, व त्यांचा रोष होईल, या भावनेनें संभावित इतिहासकार ह्या वर्तमान म्हणून समजलेल्या काळाचा इतिहास लिहीत नाहींत. वस्तुतः पहातां दूरच्या भूतकालीन इतिहासाशीं ज्यांचा गाढ परिचय झाला, त्यांना जवळच्या भूतकालीन इतिहासावर विचार प्रकट करण्याचा सर्वतोपरी अधिकार आलेला असतो. त्या अधिकाराचा त्यांनीं योग्य कालीं उपयोग न करतां स्तब्ध बसावें, ही गोष्ट निव्वळ, त्यांच्या हट्टाची व अज्ञानाची दर्शक होईल. त्यांनीं इतिहास लिहिला नाहीं म्हणून इतर लोक तो लिहावयाचा थोडाच सोडतील !

११. History is past politics and politics is present history हें भ्रामक सूत्र तोडून टाकलें, म्हणजे इतिहासाचा विषय काय व प्रांत कोणता, तें यथाशास्त्र कळण्याचा मार्ग खुला होतो; आणि मानवसमाजाचें अखिल चरित्र हा इतिहासाचा विषय व वर्तमान क्षणाच्या पाठीमागील सर्व गतकाल हा त्याचा प्रांत, अशी व्यापक दृष्टि स्वीकारावी लागते. राजकीय उलाढाली घ्यावयाच्या व सामाजिक सोडावयाच्या, किंवा हजार वर्षांपलीकडील हकीकत द्यावयाची, व पांच वर्षांअलीकडील टाकावयाची, असा संकुचित भेदभाव रहात नाहीं. तसेच वर्तमानकाळ क्षणमात्रावस्थायी असल्यामुळें, वर्तमान इतिहास ह्या शब्दांपासून कांहीं एक बोध होत नाहीं; आणि भविष्यकाल

अनागत असल्यामुळें, भविष्येतिहास हा शब्द वायफळः ठरतो. सारांश, मानवसमाजांत गतकालीं घडलेल्या उलाढालींची हकीकत देण्याचें काम इतिहासाचें आहे, हा सिद्धान्त ग्रहण करणें अवश्यक होतें.

१२. इतिहासाचा विषय व इतिहासाचा काल यांचा निर्बंध ठरल्यावर, आणीक एका महत्त्वाच्या बाबीचा खल करणें अपरिहार्य होतें. ती बाब स्थलाची होय. एकंदर मानवसमाजाचें वसतिस्थान ही विस्तीर्ण पृथ्वी आहे. तेव्हां, त्याच्या इतिहासाच्या कक्षेंत पृथ्वीवरील सर्व समाज आले पाहिजेत, मग ते समाज पूर्वेकडील असोत किंवा पश्चिमेकडील असोत. तत्त्वतः हें विधान सर्व इतिहासकारांना मान्य असतें. परंतु, कृतींत फारच फरक दिसतो. जगाचा इतिहास लिहितांना अथवा इतिहासाच्या तत्त्वाचें प्रणयन करतांना पौर्वात्य व पाश्चात्य असे सर्व समाज जमेंत घेण्याचा आव हे इतिहासकार घालतात आणि साक्षात् कृतींत पहावें, तर जुन्या व नव्या दहा पांच पाश्चात्य राष्ट्रांच्या इतिहासापलीकडे जात नाहींत. The east is stationary and the west alone is progressive, असें एक ह्या इतिहासकारांचें सूत्र आहे; आणि ह्याच्या जोरावर आपल्या एकदेशीपणाचा हे लोक बचाव करूं पहातात. पूर्वात्य समाज स्थाणु असल्यामुळें, त्यांना इतिहासच नाहीं, अर्थात्, त्यांना प्रागतिक देशांच्या इतिहासांत गणतां येत नाहीं, असा कोटिक्रम ह्या लोकांनीं लढविलेला प्रसिद्ध आहे. ह्या कोटिक्रमांत तथ्यांश कितपत आहे, तें अवश्यमेव पाहिलें पाहिजे.

१३. सदर कोटिक्रमाची मुख्य मदार प्रगति ह्या शब्दावर आहे. तेव्हां, पाश्चात्य इतिहासकारांच्या मतें ही प्रगति म्हणजे काय तें सांगितलें पाहिजे. गति दोन प्रकारची असते—अधम किंवा उत्तम. पैकीं उत्तम जी गति तिला प्रगति म्हणतात. समाजाची उत्तम गति म्हणजे आत्यंतिक नीतिमत्तेकडे, आत्यंतिक बुद्धिमत्तेकडे व आत्यंतिक संपन्नतेकडे समाजाची जी प्रवृत्ति ती. ह्या तीन मत्तेकडे जो समाज जात असतो, तो समाज प्रागतिक व जो जात नाहीं तो अप्रागतिक. प्रागतिक अवस्था संपादन करण्याला मुख्य साधनें, पाश्चात्य समाजांत दोन मानिलीं जातातः—एक युयुत्सुता व दुसरें सुयंत्र राज्यव्यवस्था. हीं दोन साधनें ज्या समाजानें संपादिलीं नाहींत, त्या समाजाला प्रगतीच्या मार्गाला लागतां येत नाहीं; अर्थात्, त्याला प्रागतिक म्हणतांहि येत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर, Morality, Rationalism and Affluence, fostered and realised under constitutionalism pushed by Militarism अशी आधुनिक यूरोपीयन इतिहासकारांची प्रागतिक अवस्थेची व्याख्या आहे. Morals, Rationalism, Wealth, Constitutionalism व Militarism ह्यांवर यूरोपांत जे इतिहास झालेले आहेत, ते पाहिले असतां, मीं दिलेलें हें लक्षण बरोबर आहे असें दिसून येईल.

१४. ही व्याख्या भारतवर्षांतील लोकांना कांहीं अश्रुतपूर्व नाहीं. राज्ययंत्र उत्तमोत्तम ठेवून व सैन्याच्या जोरावर अंतस्थ व बहिःस्थ शत्रूंचा नाश करून, धर्म, न्याय,

नीति व स्वास्थ्य ह्यांचा लाभ करून घेण्याकरितां, चातुर्वर्ण्याची पद्धत भारतीय आर्यांनीं काढिली, हें सुप्रसिद्ध आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी ही पद्धत भारतवर्षांत इतकी नामी सुरूं झाली होती कीं, ग्रीस देशांत अल्पातून नामक जो तत्त्ववेत्ता झाला, त्याला ती सर्वतोपरी अनुकरणीय वाटली. अल्पातूनानें Republic ऊर्फ सुराज्य नामक जो ग्रंथ लिहिला, त्यांत अथपासून इतिपर्यंत चातुर्वर्ण्याचेच गोडवे गाईलेले आहेत. क्षत्रियांनीं व ब्राह्मणांनीं सैन्याच्या जोरावर अंतस्थ व बहिःस्थ शत्रूंचा नाश करून राज्ययंत्र कांहीं काल इतकें सुव्यवस्थित ठेविलें कीं, सर्व शास्त्रांत गहन विचार करणारे तत्त्ववेत्ते आणि अखिल प्राणिमात्राला समबुद्धीनें लेखणारे स्थितप्रज्ञ ह्या पवित्र भूमींत उत्पन्न होऊन ऋद्धि व सिद्धि साक्षात् अवतीर्ण झाल्या. समबुद्धीचा प्रकर्ष आर्यभूमींत त्या कालापासून इतका झाला कीं, शत्रु व मित्र ह्यांशीं एकसारखें वागण्याचें वळण देशांतील सर्व लोकांना लागलें. असुर, यवन, पल्लव, शक, मुसलमान, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज वगैरे नाना प्रकारचे अन्नाकरितां हपापलेले म्लेंछ लोक अपहारबुद्धीनें आले असतां, त्यांच्याशींहि एतद्देशीयांनीं सात्विक भावानें समबुद्धि ठेविली. अमेरिकेंतील तांबड्या इंडियनांच्या किंवा आफ्रिकेंतील निग्रोंच्या अज्ञानोज्जृंभित अनास्थेहून आर्यांची ही सात्विक समबुद्धि निराळी आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. नाहींतर, इंडियनांच्याप्रमाणें किंवा नीग्रोंच्याप्रमाणें भारतीय आर्य दोन हजार वर्षांपूर्वीच नामशेष झाले असते. Liberty, Fraternity व Equality, ह्या त्रिगुणात्मक समबुद्धीनें फ्रेंच लोकांनीं जसें आपलें नुकसान वारंवार करून घेतलें आहे, तसेंच भारतीय आर्यांनींहि शत्रुमित्रांशीं सात्विक समबुद्धि ठेविल्यानें अपरिमित नुकसान करून घेतलें आहे. परंतु, सर्पाला दूध पाजून, थोर नीतिमत्तेचा, अचाट बुद्धिमत्तेचा व अपार संपन्नतेचा घात होत आहे असें अनुभवास आलें, म्हणजे, निरुपायानें असल्या कृतघ्न सर्पाचे दांत पाडावयाला आर्यांनीं कमी केलेलें नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वी जुनरास पन्नास शंभर वर्षें राज्य करणाऱ्या शकांची, तीनशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत सुलतानी गाजविणाऱ्या मुसलमानांची, दीडशें वर्षांपूर्वी उत्तरकोंकणांत अन्याय करणाऱ्या रानटी पोर्तुगीजांची, किंवा निजामाच्या राज्यांत आगंतुकी करणाऱ्या फ्रेंचांची, मराठ्यांनीं कायमची उचलबांगडी केली, ती वरील विधानाचें सत्यत्व स्थापित करण्यास पुरे आहे. ( १ ) महाराष्ट्रांतील आर्य लोक परकीय लोकांशीं प्रथम समबुद्धीनें वागतात; ( २ ) नंतर नीतीला एकीकडे सारून कृतघ्नपणानें आगंतुक लोक शिरजोर झाले म्हणजे आश्चर्यानें चकित होतात; ( ३ ) पुढें, ह्या शिरजोर व नीतिभ्रष्ट नराधमांच्या मनाची व हेतूंची संथपणें पुरती परीक्षा करितात; ( ४ ) आणि शेवटीं लत्ताप्रहार करून त्यांचें निष्कासन करितात; असा चतुर्विध सिद्धान्त निळकंठराव कीर्तने व माधवराव रानडे यांनीं हिराबागेंतील एका व्याख्यानांत प्रतिपादिलेला प्रसिद्ध आहे. सारांश, उत्तम गतीकडे म्हणजे प्रगतीकडे जाण्याचे जे पाश्चात्य लोकांचे आधुनिक मार्ग आहेत, त्यांहून बरेच निराळे परंतु अत्यंत उदात्त मार्ग पूर्वेकडील भारतीय आर्यांचे व विशेषतः मराठ्यांचे फार पुरातन कालापासूनच आहेत हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली बौद्ध संस्कृति ज्यांच्या अंगांत भिनली आहे, त्या जपानी लोकांनीं तर

यूरोपीयन लोक ज्याला Militarism म्हणतात त्याच्या जोरावर " प्रगतीचा " मार्ग अलीकडे फारच सुधारलेला आहे. आणि अशी जर वस्तुस्थिति आहे, तर जगाच्या इतिहासाचा खोल विचार करतांना पूर्वात्य देशांतील इतिहासाची गणना केल्याशिवाय इतिहासशास्त्राला संपूर्णता येणार कशी व इतिहासाचें समग्र तत्त्वदर्शन होणार कसें ?

१५. येथें कित्येक लोक अशी एक शंका आणतात कीं, पूर्वात्य समाजाला प्रगतीच्या मार्गाला जाण्याचे अधूनमधून झटके मात्र येतात, सातत्यानें प्रगतीचा मार्ग अव्याहत क्रमण्याचा अभ्यास त्या समाजाच्या अंगवळणीं पडलेला नाहीं. यूरोपीयन समाज आज दोन हजार वर्षें प्रगतीचा व स्वातंत्र्याचा हव्यास धरून जसा चालला आहे तसा पूर्वात्य समाज चाललेला दिसत नाहीं. ह्या शंकेला उत्तर एकच आहे. तें हें कीं, हा कोटिक्रम निव्वळ खोटा आहे. अथेन्सचीं शंभर वर्षें व रोमचीं दीडशें वर्षें चांगल्या प्रगतीचीं गेलीं. पुढें हजार बाराशें वर्षें यूरोपांत जो काळाकुट्ट अंधार पडला त्यांतून यूरोपांतील कांहीं अर्वाचीन राष्ट्रें बाहेर पडून नुकतीं कोठें तीन सवातीनशें वर्षें झालीं आहेत. प्रगतीचें अव्याहत सातत्य येथें तर शेंकडों वर्षें अजीबात नाहींसें झालेलें दिसतें. अलीकडील तीनशें वर्षांतहि प्रगतीची संतति यूरोपांत अगदीं अव्याहत चालली आहे, असेंहि निश्चयानें म्हणतां येत नाहीं. रशिया तर अजून देखील प्रगतीच्या विरुद्धच आहे. ग्रीस, इटली, जर्मनी, हे देश राष्ट्राच्या पदवीला पोचून पन्नास पाऊणशेंहि वर्षें अद्याप लोटलीं नाहींत. रुमेनिया, बल्गेरिया, वगैरे राष्ट्रें तर निव्वळ रडतराऊ घोड्यावर बसविल्यासारखीं आहेत आणि आस्ट्रिया हंगारीशीं भांडण्यांत हैराण आहे. डेन्मार्क, स्वीडन नार्वे, स्वीत्सर्लंड, बेल्जम, हॉलंड, हीं छोटेखानी राष्ट्रें इतर वड्या राष्ट्रांच्या परस्परमत्सरानें व दयार्द्रबुद्धीनें अद्याप जीव धरून आहेत. रहातां राहिलें इंग्लंड व फ्रान्स. पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीपर्यंत इंग्लंड जुलमी राजांच्या अमलाखालींच होतें. अलीकडील अडीचशें वर्षांत मात्र तें प्रगतीच्या मार्गाला थोडेंबहुत लागल्यासारखें दिसतें. वस्तुतः पहातां इंग्लंडांतदेखील न्याय, नीति किंवा स्वतंत्रता ह्यांचा फैलाव राष्ट्रांतील सर्व लोकांत झाला आहे, असें म्हणतां येत नाहीं. इंग्लंडांतील राज्ययंत्र पंधरा सोळा महाजनांच्या हातीं असून, परदेशाशीं जें कांहीं राजकारण करावयाचें, तें हे लोक आपल्याच जबाबदारीवर करतात, पार्लमेंटचा किंवा लोकांचा ह्या बाबीसंबंधानें त्यांच्यावर वस्तुतः फारसा दाब असतो असें नाहीं. इंग्लंडांतील गृहनीति पहावी, तर आयर्लंडाचे निर्दय हाल करण्यांत तें आज पांचशें वर्षें दंग झालेलें आहे. कानडा, दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान, वगैरे भागांत दहा दहा वीस वीस वर्षांनीं बंडें होतातच आहेत आणि पुढें किती होतील याचा अंदाज नाहीं. इंग्लंडच्या प्रगतीची ही अशी कथा आहे. फ्रान्सकडे पहावें तर त्याचा एक लचका जर्मनीनें तोडला असून, बहुतेक दरवर्षाला प्रधानमंडळ बदलण्याचा प्रसंग येत असल्यामुळें राज्ययंत्राची प्रकृति अगदीं काटेतोल झालेली आढळते. शिवाय १७९३, १७९५, १७९९, १८०३, १८१४, १८१५, १८३०, १८४८, १८५२, १८७०, ह्या दहा प्रसंगीं राजक्रांत्या झाल्याकारणानें फ्रेंच राज्ययंत्र बरेंच खिळखिळीत झालेलें दिसतें. स्पेन व पोर्तुगाल ह्या जुनाट व मागासलेल्या

( लढण्याच्या कामांत ) देशांना तर सध्यां कोणी विचारांतसुद्धां नाहीं. त्यांना एशिआ-टिक समजत नाहींत हेंच महद्भाग्य! पोलंड, फिन्लंड, आयर्लंड, आल्सेस लॅरेन्स, होल्स्टेन, वगैरे देशांतील समाजांचा राष्ट्रनाश होऊन प्रगतीचा मार्ग कायमचा बंद झालेला आहे. सारांश, यूरोपांतहि अशी दंगल चाललेली आहे; व तटस्थ प्रेक्षकाला तींत दारूनें झिंगलेल्या कातकऱ्यांच्या समाजांतल्यापेक्षां जास्त प्रगति दिसून आली नाहीं, तर कांहीं मोठेसें नवल नाहीं.

१६. हा प्रतिकोटिक्रम कित्येक लेखकांना मान्य आहे.परंतु त्यांच्या मतें, यूरोपीयन समाजाच्या एका अंगाचें म्हणजे बहिरंगाचेंच तेवढें हें वर्णन आहे. दुसऱ्या अंगाचें म्हणजे अंतरंगाचें परीक्षण केलें असतां, प्रगतीचा जो बारीक धागा विनतूट दिसून येतो, त्याच्या-कडे लक्ष देण्यास हे लेखक विनंति करतात. ही विनंति कोणाहि सारासारविचारी मनु-ष्याला मान्य होईल. पण ती मान्य करतांना तो अशी प्रतिविनंति करील कीं, यूरोपीयन प्रगतीचा बारीक धागा शोधून काढावयास जसें अंतरंगाचें परीक्षण करणें जरूर आहे, तसेंच भारतीय व महाराष्ट्रीय प्रगतीचा बारीक धागा पहावयास अंतरंगाचीच परीक्षा केली पाहिजे. अंतरंगाची परीक्षा केली असतां त्यांना असें दिसून येईल कीं, धर्म, नीति, सत्य, व स्वास्थ्य, ह्यांच्याप्रीत्यर्थ भारतीय व महाराष्ट्रीय आर्यांचे आज आठ दहा हजार वर्षें प्रयत्न चालले आहेत आणि अधूनमधून होणारे दंगेधोपे.व राजक्रांत्या·हिंवाळ्यांतील अभ्रा-प्रमाणें क्षणमात्रावस्थायी आहेत. यूरोपांतील अनेक समाज परकीयांच्या अमलाखालीं होते व आहेत. परंतु, तेवढ्यावरून जगाच्या इतिहासांत केवळ अप्रागतिक म्हणून त्यांची गणना करण्याचें कोणी मनांत आणीत नाहीं. त्याचप्रमाणें महाराष्ट्राच्या इतिहासाची व परंपरेनें भारतवर्षाच्या इतिहासाची गणना प्रागतिकांत होणें अत्यवश्यक आहे. हाच न्याय पूर्वेकडील इतर कित्येक समाजांच्या इतिहासांनाहि कमजास्त प्रमाणानें लागू आहे.

१७. तात्पर्य, पृथ्वीवरील सर्व समाजांची जानपछान अखिल मानवजातीच्या इति-हासाला असली पाहिजे. जीं राष्ट्रें आज स्वतंत्र आहेत, त्यांतील इतिहासकारांनीं हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आजमित्तीस जीं राष्ट्रें परतंत्र दिसतात, त्यांच्या चरित्रांत स्वतंत्र राष्ट्रांच्याहि चरित्रांत दिसून येणार·नाहींत अशीं प्रगतीचीं प्रौढ रूपें विद्यमान असण्याचा बळकट संभव आहे. प्रगतीचीं असलीं प्रौढ रूपें पूर्वात्य राष्ट्रांत असलेलीं यूरोपीयन इति-हासकारांच्या प्रत्ययास अलीकडील शंभर वर्षांत आलेलीं आहेत. शंभर दीडशे वर्षांपूर्वी सर्व भाषांचा उगम हिब्रू भाषेंत असावा व पश्चिम यूरोपांतील इंग्रजी, फ्रेंच वगैरे भाषा फारच प्रौढ दशेप्रत पावलेल्या आहेत, असा समज यूरोपांत प्रचलित होता. परंतु, संस्कृत भाषेशीं जसजसा यूरोपीयन इतिहासकारांचा जास्त जास्त परिचय होत गेला, तसतसा हिब्रू भाषेशीं आंग्ल, फ्रेंच वगैरे भाषांचा कांहींएक संबंध नाहीं, आपलें मूळ आर्यभाषेच्या जवळपास कोठेंतरी आहे व आपल्या भाषांपेक्षांहि प्रौढतर भाषा आहेत, असा त्यांचा ग्रह झाला. हा समज कितपत खराखोटा आहे, हा प्रश्न अलाहिदा; परंतु, मानवसमा-जाच्या भाषाविषयक इतिहासांत यूरोपीयन लोकांची समजूत ही अशी फिरली हें निर्विवाद

आहे. असाच फेरबदल राजकीय, धार्मिक, व सामाजिक बाबतींतहि होण्याचा फार संभव आहे. भारतवर्षीय आर्यांच्या व विशेषतः महाराष्ट्रीयांच्या राजकीय, धार्मिक, व सामाजिक इतिहासाचें अध्ययन जसजसें वाढेल, तसतसें प्लेटोप्रमाणें आधुनिक यूरोपीयन लोकांच्या असेंहि प्रत्ययास येईल कीं, आपल्यांतल्यापेक्षां उत्कृष्ट समाजव्यवस्था व उत्कृष्ट राजकीय हेतू जगतांतलि कांहीं देशांत विद्यमान आहेत.

१८. विषय, काल व स्थल, ह्यांच्यासंबंधानें ज्या दोन चार क्लृप्त्या पाश्चात्य इतिहासकारांच्या लेखांतून आढळण्यांत येतात व ज्यांचा पोरकट व क्षुल्लक अनुवाद इकडील कित्येक परभृत व परदेशाभिमानी लेखक वारंवार करतात, त्यांची व्यवस्था लाविल्यावर, आतां मुख्य प्रश्न जो इतिहासाचें वास्तव रूप त्याच्याकडे वळूं. वर सांगितलेंच आहे कीं, वर्तमानक्षणाच्या पाठीमागील गतकाळीं पृथ्वीवरील नव्या व जुन्या दरोबस्त सर्व समाजांच्या सर्व तऱ्हांच्या उलाढालींची जी साद्यन्त व विश्वसनीय हकीकत, ती इतिहास होय. असला साद्यन्त व विश्वसनीय इतिहास पृथ्वीवरील कोणत्याहि भाषेंत अद्यापपर्यंत लिहिला गेला नाहीं. समाजाच्या साद्यंत चरित्राचा, हर्डर, हेल्मोल्ट, क्लेअर, रिडपाथ, वगैरे लोकांनीं असला इतिहास लिहिण्याचा यत्न केला आहे. परंतु, ह्यांपैकीं प्रत्येकाचा इतिहास त्याच्या त्याच्या स्वदेशाभिमानाच्या रंगानें चितारला गेल्यामुळें, इतर देशांतील इतिहासज्ञांच्या पसंतीस सहजच उतरत नाहीं. जो तो आपापला देश त्रिभुवनाचा केंद्र समजून, तत्प्रवण सर्व देशांचीं चरित्रें होत आहेत, असें चित्र काढण्याचा, निःपक्षपातीपणाची प्रतिज्ञा करूनहि, प्रयत्न करीत असतो. ह्या स्वदेशाभिमानाखेरीज, प्रत्येकाचें कांहीं ना कांहीं तरी वैयक्तिक खूळ असतेंच. कोणी केवळ भूगोलदृष्ट्या, कोणी केवळ काळदृष्ट्या, कोणी शास्त्रदृष्ट्या, कोणी निव्वळ व्यापारदृष्ट्या, व कोणी स्वदेशसंस्कृतिदृष्ट्या जगाच्या इतिहासाची अजमावणी करीत असतात. अशीं नाना प्रकारचीं व्यंगें ह्या इतिहासकारांच्या ग्रंथांत दृष्टीस पडतात. असा प्रकार असल्यामुळें, समाजाच्या चरित्राचें खरें स्वरूप काय, त्याचें केंद्र कोठें आहे, तें प्रागतिक आहे, किंवा अधोगतिक आहे, किंवा स्तब्ध आहे, वगैरे प्रश्नांचा जसा समाधानकारक निकाल लागावा, तसा लागत नाहीं. तेव्हां, वैयक्तिक मतें एकीकडे सारून व स्वदेशाभिमानाचा दर्प बाजूला ठेवून, हें काम केलें, तरच शुद्ध व विमल तत्त्व हस्तगत होण्याचा संभव आहे. हेल्मोल्ट म्हणतो त्याप्रमाणें, निर्लेप व निरंजन होऊन, इतिहासाचा विचार करूं जाणें, दुर्घट आहे, ह्यांत संशय नाहीं. परंतु, निरहंकारबुद्धीनें ब्रह्मविचार करण्यांत लीन होणारे जे आर्य ऋषि, त्यांच्या पद्धतीचें अनुकरण केलें असतां, ही दुःसाध्य वस्तु प्राप्य होण्याचा संभव जास्त आहे, असें वाटतें.

१९. निर्लेप व निरहंकारपणानें इतिहासाचा विचार करावयाला लागणें, ही इतिहासाचें खरें स्वरूप जाणण्याच्या मार्गाला लागण्याची पहिली पायरी आहे. ह्या मार्गाला लागण्याची दुसरी पायरी सर्व प्रकारचे अर्धवट ग्रह सोडून देणें, ही होय. उदाहरणार्थ, यूरोपीयन इतिहासकारांचा आजवर असा एक ग्रह आहे कीं, मनुष्यसमाज एके कालीं

रानटी स्थितींत म्हणजे वन्यावस्थेंत होता, आणि त्या अवस्थेंतून तो आस्ते आस्ते संस्कृत होत चालला आहे. परंतु, हा समज सर्वस्वीं निराधार आहे. सर्व मनुष्यसमाज कोणच्याहि एकाकाळीं रानटी स्थितींत होता, असा इतिहासाला मुळीं काळच आढळून आलेला नाहीं. दक्षिण अमेरिकेंतील पाटेगोनियन लोक वन्यावस्थेंत आहेत, तर ब्रिटिश लोक बरेच संस्कृत होत चालले आहेत: ब्रिटिश लोक वन्यावस्थेंत आहेत, तर रोमन व ग्रीक लोक कांहींसे संस्कृत होत चालले आहेत; रोमन व ग्रीक लोक वन्यावस्थेंत आहेत, तर मिसर, असुर व बबुल लोक सुधारत चालले आहेत; बबुल लोक वन्यावस्थेंत आहेत तर सुमेर व चिनी लोक मोठमोठीं नगरें वसवीत आहेत; चिनी लोक वन्यावस्थेंत आहेत तर आर्य लोक सुधारणेच्या शिखराला पोहोंचले आहेत असा प्रकार आढळून येतो. आर्य लोकांच्या वेदांना आर्यांच्या पूर्वस्थितीविषयीं विचारावयाला जावें तर ते सांगतात कीं, उत्तर ध्रुवाकडे म्हणजे मेरुपर्वताकडे दहा हजार वर्षांपूर्वी बर्फाचा मोठा प्रळय होऊन देव नांवाच्या पूर्वप्रलयीन लोकांची संस्कृति सफा बुडून गेली व त्यांतून सुदैवानें किंवा दुर्दैवानें सुटून जीं हजार पाचशें माणसें निसटलीं त्यांनीं आम्हांला वांचविलें. सारांश, हिमप्रळयाच्या पूर्वींहि कांहीं मनुष्यसमाज सुसंस्कृत होतेच व त्या कालींहि पश्चिम यूरोपांत कांहीं वन्यावस्थ मनुष्यसमाज होतेच. एकंदरींत, एखादा सुसंस्कृत मनुष्यसमाज पृथ्वीच्या पाठीवर कोठें तरी सदोदित आहे व दुसरा कोणतातरी समाज त्या समाजाचा धागा धरून संस्कृतावस्थेंत येत आहे, अशी स्थिति पूर्वप्रलयीन कालापासून दृष्टीस पडते. विमानांतून अंतरिक्षांत गमन करणारे व सूर्यचंद्रादि तारालोकांत प्रवास करणारे हे देव भौतिक व आत्मिक संस्कृतीच्या पराकोटीला गेलेले होते, अशीं ह्या लोकांचीं वर्णनें सांपडतात. विमानांतून गमन करण्याची व चंद्रशुक्रांची भेट घेण्याची हांव धरणारे प्रस्तुत कालीं देखील कांहीं शास्त्रज्ञ आहेत. तेव्हां, अखिल मनुष्यसमाज एके काळीं रानटी अवस्थेंत होता व पुढें आस्ते आस्ते तो संस्कृत होत चालला, हा समज टाकून देणें भाग आहे; आणि इतिहासाला माहीत असणाऱ्या ह्या दहा पंधरा हजार वर्षांत मनुष्यसमाज कोठें ना कोठें तरी सुसंस्कृत असलेला आढळतो व ह्या सुसंस्कृत समाजाच्या बरोबरीला येण्याचा प्रयत्न पृथ्वीवरील इतर रानटी समाज एका पाठीमागून एक करीत आहेत, असा सिद्धान्त ग्रहण करणें अपरिहार्य होतें.

२०. युरोपीयन इतिहासकारांचा दुसरा एक अर्धवट ग्रह असा आहे कीं, कोणताहि मनुष्यसमाज अनंतकाल राहूं शकणार नाहीं. अलीकडील दहा हजार वर्षांतील पश्चात्प्रलयीन सर्व राष्ट्रें प्रत्येकीं फारतर हजार हजार दीड दीड हजार वर्षें गोंधळ घालून अस्त पावलेलीं आहेत व कोणताहि समाज पूर्वप्रलयीन कालापासून आतांपर्यंत शुद्ध टिकलेला आढळून येत नाहीं; तेव्हां, झाडून सर्व समाज भंगुर आहेत, असा ह्या इतिहासकारांचा समज आहे. परंतु लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा ध्रुवसिद्धान्त जर साधार मानला— निराधार मानण्याला सबळ कारण दिसत नाहीं,—तर पृथ्वीच्या पाठीवर पूर्वप्रलयीन कालापासून वर्तमानकालापर्यंत अव्याहत टिकलेले कांहीं मनुष्यसमाज आहेत, असें कबूल करावें

लागतें. सामान्यतः प्रस्तुतचा भारतवर्षांतील आर्यसमाज व विशेषतः ब्राह्मणसमाज आज बारा पंधरा हजार वर्षें अव्याहत चालत आला आहे. तसेंच, जरदुष्ट्रप्रणीत धर्माचें अवलंबन करणारा इर्यसमाज पूर्वप्रलयीन कालापासून आतांपर्यंत आधुनिक मुम्बापुरस्थ पारसीकांच्या रूपानें अंशमात्रेंकरून हयात आहे. भारतवर्षीय आर्यांच्या मानानें हा इर्य समाज अतिच क्षुद्र आहे; परंतु तो हयात आहे, ही बाब निर्विवाद आहे, ह्या दोन समाजांखेरीज, पूर्व-प्रलयीन कालापासून आतांपर्यंत ज्यांची अव्याहत परंपरा नाममात्रेंकरून स्थूल मानानें दाखवितां येईल,असे यूरोपांतीलहि कांहीं समाज आहेत.देवांचें शत्रु जे दनु,दस्यु,रक्षस्,यातु, ओह, वगैरे अनार्य त्यांचेच वंशज Danes, Deutsch, Russie, Jutse, Angles वगैरे असावेत, अशी कल्पना धांवते. आतां ह्या यूरोपीयन अनार्य लोकांत बेटीव्यवहारानें बहुत संकर झालेला आहे. परंतु याचें मूळ पाहूं गेलें असतां, तें त्यांच्या वेदकालीन नांवांत सांपडण्यासारखें आहे, असें वाटतें. भारतीय आर्यांच्या प्रमाणें हे पाश्चात्य समाज शुद्ध राहिले नाहींत, याचें कारण असें आहे कीं, त्यांच्यांत चातुर्वर्ण्याची बेमालुम पद्धत नव्हती व ते आचारहीन होते. सारांश, ज्याअर्थीं भारतीय आर्यांचा समाज पूर्वप्रलयीन काला-पासून आतांपर्यंत जशाचा तसाच शुद्ध राहिलेला असून कोट्यावधि व्यक्तींनीं भरलेला आहे, त्याअर्थीं No people may hope to live eternally हा जो Helmolt चा सिद्धान्त (The World's History) तो निराधार आहे, असें विधान करणें प्राप्त आहे. हेल्मोल्टचा सिद्धान्त अनार्य राष्ट्रांना लागू होतो. परंतु चातुर्वर्ण्यानें व आचारानें राहणाऱ्या आर्यांना गतकालासंबंधानें तर तो बिलकुल लागू पडत नाहीं. भविष्यकालासंबंधानें निश्च-यात्मक भाकित करण्याचा अधिकार पाश्चात्य किंवा पूर्वात्य इतिहासज्ञांपैकीं कोणा-लाच नाहीं.

२१. यूरोपीयन इतिहासकारांचा तिसरा एक ग्रह असा आहे कीं, Danes, Deutsche, Russie, juts, Angles, वगैरे यूरोपांतील प्राचीन व अर्वाचीन समाज आर्य आहेत. हा ग्रह प्रामुख्येंकरून भाषासाम्यावर बांधलेला आहे. परंतु, केवळ भाषेवरून जाति-निर्णय करणें फारच भ्रामक असतें. युद्धांत पराभव पावून अंकित झालें असतां, मनानें व समाजशक्तीनें दुर्बल असे रानटी लोक त्यांची भाषा स्वीकारतांना दृष्टीस पडलेले आहेत; इतकेंच नव्हे तर, विजयी रानटी लोक जिंकलेल्या संस्कृत लोकांची भाषा स्वीकारतांनाहि आढळून येतात. सारांश, भाषेवरून जातिसंबंध निश्चयानें ठरवितां येत नाहीं. ऋक्संहि-तेंतील उल्लेखावरून असें दिसतें कीं, दनु, दस्यु, रक्षस् व यातु हे देवांचे पूर्वप्रलयीन काला-पासून शत्रु आहेत. पूर्वप्रलयीन कालीं मेरुपर्वतावर अथवा उत्तर ध्रुवावर नांदत असतां, देवांच्या शेजाराला हे दनु वगैरे लोक होते. वारंवार घसट पडल्यामुळें देवांचे शब्द व भाषा ह्या रानटी दनु, दस्यु, वगैरे लोकांनीं उचलली असावी. दस्यु वगैरे शब्द ऋक्संहितेंत हिंदुस्थानांतील भिल्ल, खोंड वगैरे रानटी लोकांस आर्य लोक लावीत, असें यूरोपीयनांचें म्हणणें आहे, परंतु, दनु, दस्यु, रक्षस् व यातु ह्या नांवाचे लोक केव्हांहि भारतवर्षांत होते असें म्हणतां येत नाहीं. भिल्ल, कोळ, खोंड यांना दनु, दस्यु, रक्षस् हीं नांवें जर आठ हजार

वर्षांपासून लाविलीं जातीं, तर तीं आतांहि त्यांच्या नांवांत बदल होऊन आढळून येतीं. परंतु, त्यांचा हिंदुस्थानांतील रानटी लोकांच्या भाषांत बिलकुल पत्ता लागत नाहीं. तेव्हां दनु, दस्यु, रक्षस् हीं नांवें यूरोपांतल्या आधुनिक राष्ट्रांच्या पूर्वप्रलयीन पूर्वजांचींच असावीं. हे चारी लोक पूर्वप्रलयीन कालीं उत्तरध्रुवाच्या आसपास आर्यांच्या म्हणजे देवांच्या शेजारीं रहात असावे. देव वर्णानें गोरे असून त्यांच्या मानानें हे दनु, रक्षस् वगैरे आचारहीन लोक घामट, मलिन व काळे होते. ऋक्संहितेंत असुरांचाहि उल्लेख आहे. हे असुर म्हणजे निनेवे येथें पुढें ज्यांनीं इ०स० पूर्वी १५०० वर्षांच्या सुमारास राज्य स्थापिलें तेच होत. ह्यांचा पूर्वेतिहास अद्याप सांपडला नाहीं. परंतु, हे लोक युद्धप्रिय, कज्जेदलाल व रात्रीचे छापे घालणोर होते, असें जें ऋग्वेदांत म्हटलें आहे तें त्यांच्या पुढील इतिहासावरूनहि संस्थापित होतें. इर्यं अथवा ऐर्याण लोक आर्यांच्या अगदीं शेजारींच उत्तरध्रुवापाशीं असावे. त्यांचें आणि आर्यांचेंहि पूर्वीपासून वितुष्ट होतें; तें इतकें कीं, देव म्हणजे दुष्ट व असुर म्हणजे सुष्ट, असें मानण्यापर्यंत ह्यांची पुढें पुढें मजल गेली होती. पूर्वप्रलयीन कालीं आर्यांच्या शेजाराला असणारे व आर्यसंस्कृतीचा जबरदस्त छाप बसलेले असे हे दनु, दस्यु, रक्षस्, यातु, अहि, नराशंस, ऐर्याण व असुर लोक असावे. देवांची भाषा यांनीं बरीच उचललेली दिसते. परंतु जातीनें, आचारानें व धर्मानें हे सर्व लोक देवांच्याहून निराळे दिसतात. अर्थात् आर्यकुळांत यांची गणना करणें सयुक्तिक नाहीं. Deutsche, Russie, Juts, Angle, Norse ऐर्याण व Assur यांच्या ऐतिहासिक व्युत्पत्त्याहि त्या त्या भाषांत समाधानकारक दिलेल्या आढळत नाहींत. ऋग्वेदांतील दनु वगैरे शब्दांवरून त्या बऱ्याच समाधानकारक तऱ्हेनें लागतात, असें दिसतें. सारांश, ह्या लोकांची अनार्यांत गणना करणें जास्त प्रशस्त आहे.

२२. युरोपीयन इतिहासकारांना आणीक एक मोठी विलक्षण खोड आहे. ती ही कीं, पुरातन व उत्तम असें जें जें कांहीं आढळेल, त्यांशीं आपल्या समाजाचा कांहींतरी बादरायण संबंध लावण्याची ते हांव धरतात. ग्रीस देशाच्या इतिहासापलीकडे जोंपर्यंत त्यांची माहिती गेली नव्हती, तोंपर्यंत ट्रॉय शहराशीं आपला संबंध लावून, हेलन नामक स्त्रीचें आपण वंशज आहों, असें प्रतिपादन करण्यांत त्यांना फुशारकी वाटे. कांहीं काळपर्यंत यहुदी लोकांना ते आपले पूर्वज मानीत. आणि अलीकडे संस्कृत भाषेशीं परिचय झाल्यापासून ते आपली गणना आर्यकुळांत करूं लागले आहेत. आर्यकुळाला सोडून, आपली स्थापना स्वतंत्ररीतीनें करूं पहाण्याचीहि कित्येकांची थोडथोडी प्रवृत्ति होत चालल्याचीं चिन्हें अलीकडे दिसूं लागलीं आहेत. ह्या बादरायण पद्धतीचा परिणाम असा होतो कीं, दर दहा वर्षांनीं त्यांचे ऐतिहासिक सिद्धान्त बदलत असतात. सारांश सत्यापेक्षां, स्वजातिगौरवाकडे या लोकांचें लक्ष विशेष असतें. हा दोष कोणत्याहि देशांतील निर्लेप इतिहासकारांनीं टाळला पाहिजे.

२३. ह्या चार दोषांहून निराळा असा एक दोष यूरोपीयन इतिहासकारांच्या लेखांतून दृष्टीस पडतो. भविष्यकालांत विशिष्ट प्रसंगांसंबंधानें काय होईल, याचें विशिष्ट भाकित

करणें, इतिहासाच्या प्रांताबाहेरचें आहे; अशी प्रतिज्ञा करून, अधूनमधून तशीं भाकितें करण्याची आपली नैसर्गिक चटक ह्या लोकांना आवरतां येत नाहीं. यूरोपियन लोक सर्व पृथ्वी पादाक्रांत करणार, इतर समाज त्यांच्यापुढें नामशेष होणार, अशीं विशिष्ट विधानें यूरोपीयनांनीं लिहिलेल्या कोणत्याहि समाजाच्या इतिहासांत हटकून सांपडतात. आतां, हें सांगावयाला नकोच कीं भविष्यकाळीं काय काय चमत्कार होतील, हें सांगूं जाणें शुद्ध वेडेपण आहे. आपल्याला माहित नाहींत अशा प्रेरणा सध्यां इतक्या आहेत व पुढें इतक्या नव्या होण्याचा संभव आहे कीं, प्रस्तुतचीं कोणचीं हीं विशिष्ट भाकितें भविष्यकाळीं खरीं ठरण्यास फारच थोडी कूस राहते. तेव्हां, जगाचा इतिहास लिहूं जाणाऱ्या इतिहासकारांनीं ह्या विशिष्ट भाकित करण्याच्या हांवेपासून अलग राहिल्या-विना, निर्मळ सत्य निष्पन्न होणें अत्यंत दुरापास्त आहे. विशिष्ट भाकितें म्हणजे एकप्रकारचे आपल्याला संमत असे पूर्वग्रहच होत.

२४. येणेंप्रमाणें अनेक प्रकारचे पूर्वग्रह टाकून, समाजाचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला पाहिजे. झाडून सर्व पूर्वग्रह टाकून देणें मनुष्यस्वभावाला तर निसर्गतःच अशक्य आहे. जो ज्या संस्कृतींत वाढला असतो त्या संस्कृतीनें त्याचें मन बनलें असतें, आणि अमुक विचार, विकार, किंवा संस्था इष्ट व अमुक अनिष्ट, हा भेद तो त्या वना-वाच्या अनुरोधानें करीत असतो. एखादा नीग्रो ज्या दृष्टीनें जगाकडे पाहील, तीहून निराळ्या दृष्टीनें एखादा यूरोपियन मनुष्य जगाच्या इतिहासाचा विचार करील, हें उघड आहे. हिंदूंचा व मुसुलमानांचा इतिहासाचा अंदाज भिन्न ठरेल, हेंहि स्पष्टच आहे. सारांश, प्रत्येक समाजाची, कालाची, व व्यक्तीची जगाच्या इतिहासाकडे पहाण्याची तऱ्हा एकसारखी असूं शकत नाहीं. ह्या भिन्न दृष्टीचा परिणाम असा होतो कीं, एका काळीं व एका समाजाला जीं विधानें सिद्धान्तवत् भासतात, तींच दुसऱ्या काळीं व दुसऱ्या सामाजाच्या अश्रद्धचे विषय होतात. ह्या विरोधाचें कारण असें आहे कीं, विकार व विचार यांनीं खळबळून जाणाऱ्या व्यक्तींशीं व समाजांशीं मानवइतिहासाला कर्तव्य असतें. ज्या निर्विकार दृष्टीनें दगडाकडे किंवा वनस्पतीकडे मनुष्य पाहूं शकतो तिचा उपयोग मनुष्यसमाजावर करतां येत नाहीं. कारण, निर्विकार दृष्टीचा उपयोग करूं पहाणारी व्यक्ति स्वतः विकारवश असते व ज्या समाजावर दृष्टीचा प्रयोग करावयाचा ते समाजहि विकारवश असतात. ज्यांतील दोन्हीं पदें चल आहेत असें हें समीकरण सोडविणें, अर्थातच फार दुर्घट आहे. स्वतःचे विकार अजीबात दावून, समाजाच्या विकारांचें व विचारांचें वर्णन व परीक्षण ताटस्थ्यानें करणारा इतिहासकार कधीं जन्मेल तो जन्मो. असा इतिहास लिहिणारा कोणी सिद्ध झालाच तर त्याला लौकिकरीत्या पहिली अडचण अशी पडेल कीं, विकारांचें व विचारांचें अधमोत्तमत्व ठरवावयाला स्थिर मान कोणतें घ्यावें ? उदाहरणार्थ, जगांतील प्राचीन व अर्वाचीन स्त्रीजातींचा इतिहास द्याव-याचा आहे, अशी कल्पना करा. एकाच नवऱ्याला जन्मभर धरून रहाणाऱ्या, दररोज नवा नवरा करणाऱ्या, दुबळ्या नवऱ्याला सोडणाऱ्या, सबळ नवरा मेल्यावर दुसरा कर-

णाऱ्या, मुळींच नवरा न करणाऱ्या, एकाच किंवा अनेक नवऱ्यांशीं सपत्नीकत्वानें नांद-णाऱ्या, आणि अनेक नवऱ्यांची एकच बायको होणाऱ्या, अशा नाना प्रकारच्या स्त्रियांच्या समाजांत नैतिक समाज कोणता व भ्रष्ट समाज कोणता, हें निश्चयानें ठरविणें दुरापास्त आहे. ब्राह्मणांत आजन्मैकपतित्वाची चाल आहे, इंग्रजांत पुनर्विवाहाची चाल आहे, मोर्मोन लोकांत अनेकपत्नीत्वाची चाल आहे, व मलबारांत इच्छापतित्वाची चाल आहे, आणि हे सर्व समाज सुधारलेले आहेत. ताटस्थ्यवृत्तीनें ह्या चालींचें परीक्षण करूं जातां, अमुक चाल नैतिक व अमुक अनैतिक हें ठरविण्यास स्थिर मान कोणतें घ्यावयाचें ? व्यक्ति-स्वातंत्र्याचे कैवारी इच्छापतित्वाची चाल पसंत करतील, असें म्हणावें तर व्यक्तिस्वातं-त्र्याचे कट्टे पुरस्कर्ते जे आधुनिक यूरोपीयन लोक त्यांना ती बिलकुल आवडत नाहीं. आज-न्मैकपतित्वाची चाल शास्त्रसिद्ध आहे, असें प्रख्यात पाझिटिव्हिस्ट ऑगस्ट कोंटे म्हणतो, तर ब्राह्मणांतलि कांहीं सुधारकांना ती चाल मोडून इंग्रजांची पुनर्विवाहाची चाल पत्क-रावीशी वाटते. इंग्रजांना एकाच वेळीं एकच बायको करणें सशास्त्र वाटतें, तर त्यांचेच बंधू जे मोर्मोन लोक ते अनेकपत्नीत्वाचे कट्टे भक्त झालेले दिसतात. सारांश, अमुक एक चाल उत्तम, असें निश्चयानें विधान करण्याची कांहीं सोयच राहिली नाहीं. हाच अनिश्चय राज्यसंस्था, धर्मसंस्था, विद्यासंस्था वगैरे संबंधानें असाच कायम आहे.

२५. वरील संक्षिप्त विवेचनावरून इतकें स्पष्ट आहे कीं, मानवसमाजाची हकीकत देतांना, संस्थांचें किंवा कृत्यांचें अधमोत्तमत्व ठरविण्याला स्थिरमान असूं शकत नाहीं. असूं शकतें, असें म्हणणें म्हणजे एका पूर्वग्रहांचाच आश्रय करणें आहे. आणि पूर्वग्रहाचा आश्रय करणें म्हणजे इतिहासाच्या सशास्त्र परिशीलनाला सर्वस्वी घातक आहे. बरें, वाईट; शुभ, अशुभ; वगैरे नीतिशास्त्रांतले जे अर्थ आहेत, ते गृहीत करून ऐतिहासिक प्रसंगांची, समाजांची व संस्थांची परीक्षा करणें, म्हणजे ठरीव नीतिशास्त्रांतल्या अर्थांच्या पली-कडे जाण्यांत मानवसमाजाला अटकाव करण्यासारखेंच आहे. तेव्हां इतिहासाचें परिशी-लन करतांना, ह्या नैतिक पूर्वग्रहांना बिलकुल रजा दिली पाहिजे. अशी रजा दिली म्हणजे स्वमतप्रदर्शन हे शब्द जगाच्या इतिहासांतून विसरून जावे लागतात, आणि History is the record of progress alone हें वाक्य निरर्थकतेच्या धुक्यांत विरून जातें. तात्पर्य, प्रगति झालेली आहे किंवा अधोगति झालेली आहे, हें पहाण्याचें काम नीतिशास्त्राचें आहे; इतिहासाचें नाहीं. शुभ, अशुभ; बऱ्या, वाईट; प्रगत, अधोगत अर्थांची जर इतिहास निवड करूं लागेल, तर त्याला नीतीतिहास असें नांव द्यावें लागेल. हानीची गोष्ट आहे कीं, असल्याच इतिहासांची बहुतेक सर्व भाषांत रेलचेल आहे.

२६. सूक्ष्मतेनें पहातां, निर्भेळ इतिहास म्हणून ज्याला म्हणतां येईल, त्याचें काम फक्त झालेल्या प्रसंगांची विश्वसनीय हकीकत देण्याचें आहे. कालाचें पौर्वापर्य लावून व प्रसंगाचें कार्यकारणत्व सिद्ध करून, भूत गोष्टी अशा अशा सातत्यानें झाल्या, इतकें सांगि-तलें म्हणजे इतिहासाची कामगिरी आटोपली. भूत गोष्टींचें कथन करतांना, नीतिदृष्ट्या ज्यांना आपण दुर्गुण म्हणतों त्या क्रौर्य, कौटिल्य वगैरे गुणांच्या जोरावर लढवय्ये लोक

अल्पकालीन साम्राज्यें उभारतांना सांपडोत किंवा ज्यांना आपण सुगुण म्हणतों त्या दया, क्षमा, शांति वगैरे गुणांच्या जोरावर साधुपुरुष सनातनधर्माचें अनंतकालीन राज्य स्थापितांना आढळोत, इतिहासाचें काम आवडनिवड किंवा स्तुतिनिंदा न करतां,झाली गोष्ट जशीची तशी नमूद करून ठेवण्याचें आहे. न जाणों, ज्यांना एके काळीं दुर्गुण म्हणून लोक समजतात, त्यांनाच पुढेंमागें ते सुगुण म्हणून कशावरून समजणार नाहींत? आज जो साधु दिसला, तो कालान्तरानें भोंदू ठरलेला, लोकांनीं पाहिलेला आहे; आणि क्रौर्याला शौर्य व कौटिल्याला मुत्सद्देगिरी हीं नामांतरें मिळालेलीं आहेत! असें सांगतात कीं, पूर्वीच्या एका राज्यांत, वादीप्रतिवाद्यांच्या खटल्याची हकीकत—जशी घडली असेल तशी—नमूद करून, तिचा स्पष्ट, मुद्देसूद व विश्वसनीय सारांश देण्याचें काम एका कामगाराकडे असे, आणि तो सारांश पाहून नीति व धर्मशास्त्रांच्या आधारें, शिक्षा ठोठावण्याचें काम दुसऱ्याच एका अधिकाऱ्याकडे सोंपविलेलें असे. तसाच कर्मविभाग इतिहासाचा व नीतिशास्त्राचा आहे. इतिहास भूतवृत्ताचा विश्वसनीय सारांश देतो व नीतिशास्त्र त्याचें उत्तमाधमत्त्व ठरवितें. इतिहासाचें खरें रूप म्हणतात तें हेंच. पीनलकोड ज्या वर्तनाला आज गुन्ह्यांत काढतें, त्यालाच शंभर वर्षांनीं पुढें सद्गुण समजतें. निःपक्षपातानें काढिलेला सारांश मात्र, यावच्चंद्रदिवाकरौ अजरामर राहतो.

§ २७. जगाच्या इतिहासाचें खरें रूप कसें असावें, तें वरील विवेचनावरून स्पष्ट झालें आहे. (१) वर्तमान क्षणापर्यंतचा सर्व भूतकाल हा त्याचा काल; (२) पृथ्वीवरील सर्व देश त्याचें स्थल; (३) आणि नष्ट व विद्यमान सर्व मानवसमाज त्याचे विषय समजले पाहिजेत. तसेंच, (४) स्वतःच्या किंवा समाजाच्या किंवा दिशेच्या किंवा स्वकीय कालाच्या अभिमानाला पडून, कोणत्याहि प्रकारच्या पूर्वग्रहांना थारा देतां उपयोगी नाहीं. शिवाय, नीति, धर्म वगैरे शास्त्रांतील चलग्रहांच्या अनुरोधानें शुभाशुभ किंवा इष्टानिष्ट मतांचें आधिष्ठान मनांत कल्पून हकीकतविर अभिप्राय देण्याच्या किंवा हकीकत इष्टानिष्ट भासविण्याच्या खोटया भरीस पडतां कामा नये. (५) निर्मत्सर, तटस्थ, निरहंकार व निर्लेप वृत्तीनें झाली असेल ती हकीकत प्रामाणिकपणानें दिली पाहिजे. असल्या हकीकतीला खरा व विश्वसनीय इतिहास म्हणतात. जगाचा असा इतिहास यूरोपियन इतिहासकारांच्या हातून अद्याप लिहिला गेला नाहीं. चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी इंग्लंडांत राइट नांवाच्या मनुष्यानें Universal History म्हणून एक जगाचा इतिहास लिहिला. त्यांत Sacred, Prophane, Ancient, Modern वगैरे इतिहासाचे भेद सांगून, स्थलोस्थलीं पूर्वग्रहात्मक असतील नसतील तितके सर्व दोष केलेले आहेत. चाळीस वर्षांपूर्वी इंग्लंडांत इतिहासाची अशी रानटी स्थिति होती. तींतून सुटण्याचा कांहीं जर्मन इतिहासकार अलीकडे प्रयत्न करीत आहेत. अगदीं अलीकडला असा जगाचा इतिहास हेल्मोल्ट नामक जर्मन गृहस्थाचा होय. याच्या इतिहासांत व राइटच्या इतिहासांत यद्यपि जमीनअस्मानाचें अंतर आहे, तत्रापि, तोहि पूर्वग्रहाच्या दोषांपासून अगदीं आलिप्त नाहीं. शिवाय, इतिहासलेखनप्रारंभीं त्याला व त्यांच्या साहाय्यकर्त्यांना टिळकांचा ध्रुवासिद्धान्त

माहीत नसल्यामुळें त्याचाहि इतिहास सध्यांच जुनाट झाल्यासारखा आहे. टिळकांच्य ध्रुवासिद्धान्तानें इतिहासांत फारच मोठी क्रांति झालेली आहे. ( १ ) मानवसमाजाचा ऐतिहासिक काल प्रलयाच्या मागें गेला. त्यामुळें रोम, ग्रीस, इजिप्त, बाबिलोन, असुरिया, सुमेर, इलम, वगैरे देशांचे इतिहास केवळ अर्वाचीन भासूं लागले. ( २ ) पूर्वप्रलयीनकालीं कांहीं मानवसमाज सुसंस्कृत होते, असें म्हणणें प्राप्त झालें. त्यामुळें, मनुष्यांची मूळची वन्यावस्था होती, वगैरे पूर्वग्रह-जे यूरोपीयन इतिहासकार सत्य मानीत-खोटे ठरले. ( ३ ) यूरोपांतील रशियन, द्रय, देन, नॉर्स, वगैरे समाज मूळ कोठून आले असावे, हा जो संशय होता तो फिटण्याच्या मार्गाला लागला. पूर्वप्रलयीनकालीं यूरोपांतील हे समाज आर्यांच्या मेरु पर्वताभोंवतालील प्रांतांत रहात असून, ह्यांचें व आर्यांचें म्हणजे देवांचें वितुष्ट असे, असा सिद्धान्त करण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. ( ४ ) हिमप्रलयाच्या वेळीं आर्यांप्रमाणें ह्याहि अनार्य समाजांतील कांहीं लोक पश्चिमेकडे निसटून गेले. ( ५ ) पूर्वप्रलयीनकालीं भूमीची रचना सध्यांच्याहून निराळी असावी. कदाचित् पुराणांत वर्णिल्याप्रमाणें भूमि सप्तद्वीपात्मक असावी. ( ६ ) अमेरिकन, इंडियन, फिजियन व आस्ट्रेलेशियन लोक प्रलयामुळें तुटून एकीकडे पडले. अशी नाना प्रकारची दुरुस्ती इतिहासाच्या कल्पनांत ध्रुवसिद्धान्ताच्या प्रणयनानें अवश्य होणार आहे. इतर शास्त्रांत काय काय दुरुस्त्या कराव्या लागतील तें सागण्याचें हें स्थल नसल्यामुळें, त्यांचा प्रपंच येथें करीत नाहीं.

२८. अखिल मानवसमाजाच्या इतिहासाचें वास्तवरूप कोणतें ह्या प्रश्नाचा उलगडा करतां करतां जग, विश्व, World, Universe, वगैरे शब्द योजावे लागले आहेत. परंतु, ज्या अर्थाच्या विवक्षेनें हे शब्द योजिले, त्याची उपलब्धि व्हावी तशी ह्या शब्दांपासून होत नाहीं. History of the World किंवा History of the Universe ह्या वाक्यांतील World व Universe ह्या शब्दांचा अर्थ " आखिल मानवसमाज " असाच केवळ नाहीं. World या इंग्रजी शब्दाचा अर्थ आपण रहातों ती पृथ्वी किंवा संपूर्ण ब्रह्मांड असाहि आहे. Universe ह्या शब्दाचाहि असाच व्यापक अर्थ आहे. History of the World किंवा Universe लिहूं पहाणाऱ्यांच्या मनांत पृथ्वीचा किंवा ब्रह्मांडाचा इतिहास लिहिण्याचा कांहीं विचार नसतो; फक्त पृथ्वीवरील मनुष्यजातीचाच तेवढा इतिहास लिहिण्याचा आशय असतो. World म्हणजे मनुष्यकोटी असाहि एक अर्थ होतो; परंतु त्याच्याबरोबरच ब्रह्मांडाचीहि कल्पना मनांत उद्भवते. मराठींतील जग व विश्व, हेंहि शब्द असेच भ्रामक आहेत. तेव्हां असले हे भ्रामक शब्द काढून टाकून, " जगाचा किंवा विश्वाचा इतिहास, " असे बडे बडे शब्द न योजतां " मानवेतिहास " असे सार्थ शब्द योजणें प्रशस्त दिसतें. ह्या योजनेनें पुष्कळ निरर्थक संदेह नाहींसे होतील व इष्ट अर्थाला योग्य शब्द वापरल्यासारखें होईल. परंतु, बाब विशेष महत्त्वाची आहे, असें नाहीं.

२९. मानवेतिहासाचें वास्तव रूप निवडल्यावर तो लिहिण्याची सशास्त्र पद्धति कोणती, तें पहाणें ओघासच येतें. कारण, वेडावांकडा कां इतिहास होईना, तो कोणत्या

तरी पद्धतीनें लिहिला पाहिजे, मग ग्रंथकर्त्याच्या मनांत पद्धतीचा स्फोट झाला असो किंवा नसो. अगदीं गचाळ मानवेतिहास सोडून दिले व मान्य तेवढेच जमेस धरले, तर असें दिसून येतें कीं, व्यवस्थितपणें मानवेतिहास लिहिण्याच्या यूरोपियन लोकांच्या तीन पद्धति आहेतः—( १ ) कालानुक्रमिक पद्धति; ( २ ) दैशिक पद्धति; व ( ३ ) कौलिक पद्धति. ऐतिहासिक कालाच्या प्रारंभापासून दरवर्षी किंवा दर शंभर वर्षांत पृथ्वीवर काय काय वृत्तें घडलीं, त्यांची कालानुक्रमानें हकीकत देण्याची जी पद्धति तिला कालानुक्रमिक पद्धति म्हणतात. तोडून घेतलेल्या वर्षीं किंवा वर्षसंख्येंत मानवसमाजाच्या निरनिराळ्या जातींनीं निरनिराळ्या देशांत काय उद्योग केला, तें कालानुक्रमानें सांगण्याचा ह्या पद्धतीचा हेतु असतो. परंतु घेतलेल्या वर्षसंख्येंत कित्येक जाती लोपून गेलेल्या असतात, कित्येक जातींचे उद्योग व उलाढाली अर्धवट संपलेल्या असतात व कित्येकांनीं देशान्तरें केलेलीं असतात. त्यामुळें होतें काय कीं, कित्येक जातींचे वृत्तांत मध्येंच कोठेंतरी संपतात. कित्येकांचे मध्येंच सोडून द्यावे लागतात व कित्येकांचे धागे पुनः पुढल्या वर्षसंख्येंत धरणें प्राप्त होतें. वारंवार असेंहि होतें कीं, एका काळीं मानवसमाजाची चळवळ मूळचीच फार थोडी असल्यामुळें किंवा तिची माहितीच थोडी असल्यामुळें, लिहावयाला मुळींच हकीकत नसते; किंवा असलीच तर अतिच थोडी असते. उलट कधीं कधीं असाहि प्रसंग येतो कीं, शेंकडो जातींच्या एकाच काळीं हालचाली सुरू होतात व त्यांच्या हकीकतीची व्यवस्था लावतां लावतां पुरे-पुरेसें होतें. कालानुक्रमिक पद्धतींत हा असा गोंधळ माजत असल्याकारणानें मानवेतिहास-लेखनाला ती फारशी प्रशस्त नाहीं. दैशिकपद्धतींत देखील असेच दोष आहेत. वस्तुतः पहातां देश म्हणून देशांना असा इतिहास मुळींच नसतो. पृथ्वीच्या पाठीवरील निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या जातींनीं शेंकडों वर्षें कायमची वस्ती केल्यावर तत्तज्जातिविशिष्ट देशांचा म्हणजे त्या देशांतील लोकांचा इतिहास लिहिण्याची शक्यता उत्पन्न होते. प्रलयाच्या अलीकडील प्राचीन काळीं अमुक देश अमक्याचा अशी व्यवस्था नसल्यामुळें किंवा माहीत नसल्यामुळें कधीं कधीं अनेक प्रांत सोडून देणें भाग पडतें व अर्वाचीन काळाच्या जसजसें जवळ येत जावें,तसतशी प्रत्येक देशाची माहिती फुगत जाते. शिवाय, एकाच देशांत एकापाठीमागून एक अशा अनेक लोकांचीं राज्यें होत जात असल्यामुळें, दैशिक पद्धतीनें हकीकतीचा धागा सुसंगत रहात नाहीं. एका जातीचीं शंभर वर्षें इराणच्या, तर पन्नास वर्षें स्पेनच्या व पाऊणशें वर्षें पंजाबच्या इतिहासांत द्यावीं लागतात, आणि सुसंगत हकीकतीचें सामग्र्य म्हणून ज्याला म्हणतात, तें नष्ट होतें. अमुक देश, अमुक लोकांचा, असें कायमचें ठरल्यावर दैशिक पद्धतीचा उपयोग चांगला होतो. परंतु, पंधरा हजार वर्षांचा मानवेतिहास लिहिण्याला ही पद्धति बरीच निरुपयोगी होते. कालानुक्रमिक व दैशिक ह्या दोन्ही पद्धति गोंधळाच्या व निरुपयोगी होतात, ह्याचें कारण उघड आहे. इतिहास निव्वळ कालाचाहि लिहावयाचा नसतो किंवा देशाचाहि लिहावयाचा नसतो. इतिहास लोकांचा म्हणजे मानवसमाजाचा लिहावयाचा असतो. आतां हें खरें आहे कीं, मानवसमाज देशकालावच्छिन्न असतो. तत्रापि, इतिहासाचा मुख्य कटाक्ष मनुष्यसमाजावर असतो, हें कांहीं विसरतां येत नाहीं.

तेव्हां मनुष्यसमाजाच्या धोरणानेंच इतिहास लिहिला असतां, तो सुबोध, सुसंगत, व स्पष्ट होईल, हें उघड आहे. आतां, पूर्वप्रलयीन कालापासून असें आढळून आलें आहे कीं, मनुष्यसमाजांत निरनिराळीं कुलें आहेत, व निरनिराळ्या कुलांच्या चाली, रीति, भाषा, धर्म, हेतु व नीति कमीजास्त मानानें भिन्न आहेत. हीं निरनिराळीं कुलें अंतःप्रवृत्तीनें किंवा कुलान्तरांच्या स्पर्शानें वाढलीं कशीं, सुसंस्कृत झालीं कशीं, मेलीं कशीं, जगलीं कशीं, स्तब्ध राहिलीं कशीं, आणि मिश्र किंवा शुद्ध बनलीं कशीं, 'हें पहावयाचें म्हणजे ह्या कुलांचा इतिहास अथपासून आतांपर्यंत दिला पाहिजे. ह्यालाच मराठींत कौलिक व यूरोपीयन भाषांत Ethnographic पद्धति म्हणतात. यूरोपीयन भाषांत केवळ कौलिक पद्धतीवर लिहिलेला असा एकहि इतिहास नाहीं. कारण उघड आहे. कुलशास्त्र व कौलिक-पद्धति युरोपांत उद्भवून फार वर्षे झालीं नाहींत. तेव्हां कौलिक पद्धतीनें लिहिलेला इतिहास इतक्यांतच निर्माण होणार कोठून ? कौलिक पद्धतीनें आपण मानवसमाजाचा इतिहास लिहीत आहों, असें हेल्मोल्ट आपल्या इतिहासाच्या दुसऱ्या तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनांत म्हणतो. परंतु त्याचा मूळसंकल्प दैशिक पद्धतीनें लिहिण्याचा होता, हें त्याच्या ग्रंथांतील व्यवस्थेवरूनच दिसत आहे. भारतवर्षांतील आर्यांचा इतिहास दुसऱ्या खंडांत देऊन, तिसऱ्या खंडांत इराणांतील आर्यांचा, व पांचव्या खंडांत युरोपीयन आर्यांचा त्यानें समावेश केला आहे. म्हणजे आर्यकुळीचा कौलिक पद्धतीनें एके ठिकाणीं इतिहास देण्याचें सोडून, दैशिक पद्धतीनें निरनिराळ्या देशांचा इतिहास पूर्व दिशेनें प्रारंभ करून पश्चिम दिशेला समाप्ति करण्याच्या इराद्यानें, तो देतो हें उघड आहे. येणेंप्रमाणें कौलिकपद्धति तो घेत नाहींच; परंतु जी घेत आहे म्हणून म्हणतो, तीहि बरोबर आहे, असें म्हणतां येत नाहीं. कारण, ध्रुवसिद्धान्तानें मानवसमाजाची जी नवीन कुलव्यवस्था करणें अपरिहार्य होणार आहे, तींत सध्यां ज्यांना यूरोपीयन आर्य म्हणतात, त्यांपैकीं बरेच समाज अनार्य ठरण्याचा संभव आहे. Ethnographic म्हणजे कौलिकपद्धतीनें महाराष्ट्रांतील कोणा गृहस्थाला मानवेतिहास लिहिण्याची इच्छा झाली तर, आर्यकुल कोणतें व अनार्य कुलें कोणतीं, तें पाहून, मग त्यानें आपल्या कामाला लागावें, अशी सध्यां स्थिति आहे. मानवकुलांचें प्रस्तुतचें यूरोपीयन वर्गीकरण मागें पडण्याचा संभव फार दिसतो.

३०. कालाच्या विशिष्ट भागांत समानकालीन समाजांच्या पृथ्वीच्या पाठीवर काय उलाढाली चालल्या आहेत, तें पहाण्यास कालानुक्रमिक पद्धतीचा चांगला उपयोग होतो. पृथ्वीच्या विशिष्ट भागांत एक किंवा अनेक समाजांचे एकदम किंवा अनुक्रमानें काय उद्योग चालले आहेत, तें दैशिक पद्धतीनें कळतें. आणि सर्व पृथ्वीभर सर्व गतकालीं मानवसमाजाच्या सर्व कुळींनीं काय काय कृत्यें केलीं, तें समजणें कौलिक पद्धतीनें सुलभ होतें. अर्थात्, अखिल मानवसमाजाचा इतिहास लिहिण्यास ही कौलिक पद्धतीच उत्तम ठरते. ह्या पद्धतीनें इतिहास लिहावयाचा म्हणजे मानवसमाजाच्या मुख्य कुलांच्या व उपकुलांच्या उलाढालींची अथपासून आतांपर्यंत विश्वसनीय हकीकत द्यावयाची. मानवसमाजाचीं बहुतेक सर्व उपकुलें ऐतिहासिक ऊर्फ पश्चात्प्रलयीन कालांत उद्भवलीं असून, स्थलोस्थलीं कांहीं काल

स्थिर होऊन बरेंच सामर्थ्य आल्यावर, पृथ्वीवरील इतर भागांत पसरत आहेत. अमुक देश अमक्या उपकुलाचा आहे, असें विधान हजार पांचशें वर्षांपुरतेंच तेवढें खरें असतें. पुढें पहावें, तर दुसरेंच उपकुल त्या देशांत वास्तव्य करून नांदत आहे, असें आढळून येतें. ही हालचाल अद्याप चाललीच आहे; व पृथ्वीवरील ज्या देशांत इंग्लिश, फ्रेंच, वगैरे लोक सध्यां नांदतांना आपण पहात आहों, त्यांत हजार पांचशें वर्षांनंतर दुसरींच कोणी उपकुलें नांदतांना दृष्टीस पडल्यास तत्कालीन इतिहासकारांस आश्चर्य वाटण्याचें फारसें कारण नाहीं. ह्या नियमाला अपवादक असें एक मात्र कुल आज आठ दहा हजार वर्षें एकाच स्थलाला चिकटून राहिलेलें दिसत आहे. तें भारतवर्षातील आर्यकुल होय; हें कुल इतर उपकुलांप्रमाणें पश्चात्प्रलयीन नसून, पूर्वप्रलयीन कालापासून संस्कृत झालेलें आढळतें. ह्या थोर कुलानें मानवसमाजांतील इतर सर्व उपकुलांचीं बाल्यावस्थेपासूनचीं सर्व स्थित्यंतरें पाहिलीं आहेत; त्यांची प्रत्येकाची अनुक्रमानें दाट ओळख करून घेतली आहे; त्यांपैकीं अनेकांना दुर्बल किंवा नष्ट झालेलें देखिलें आहे; आणि इतकेंहि करून, म्लेंच्छसंकर होऊं न देतां, शुद्ध वंशाचें बरेंच रक्षण केलें आहे. आर्यकुलाचें हें अलौकिक चरित्र अनार्यांच्या जसें मत्सरास तसेंच कौतुकासहि कारण झालेलें आहे.

३१ कौलिक पद्धतीचें ग्रहण केल्याविना अखिलमानवसमाजाच्या शाखांच्या व उपशाखांच्या जाळ्याची गुंतागुंत यथास्थित उलगडत नाहीं, ही तळहातींच्या आवळ्याप्रमाणें स्पष्ट गोष्ट आहे. अखिल मानवसमाज सोडून एकेकट्या उपशाखांचा किंवा उपकुलांचा इतिहास तर जात्याच कौलिक असतो. इंग्रजांचा इतिहास म्हणजे इंग्रज उपकुलाचा इतिहास व मराठ्यांचा इतिहास म्हणजे मराठा उपकुलाचा इतिहास मूळांतच कौलिक असल्यामुळे. एकेकट्या कुलाचा इतिहास लिहितांना कौलिक पद्धति घ्यावी किंवा न घ्यावी हा वादच रहात नाहीं. कुलाची शहानिशा झालेलीच असते व झाली नसल्यास, झाली आहे असें समजून चालावें लागतें. इंग्रज आर्य असोत वा अनार्य असोत, त्यांचें राष्ट्रीय चरित्र त्यांच्यापुरतें सदा खरेंच असतें. राष्ट्रीय चरित्र गातांना आपण कोणत्या कुलाचा पवाडा रचित आहों अशी विवक्षा आली, अर्थात् मानवसमाजाच्या कोणत्या कुलाचा उत्कर्ष होत आहे असा प्रश्न आला, म्हणजे दृष्टींत फरक होऊं लागतो व आर्यानार्यत्वानें मानवेतिहासाचें सत्यासत्यत्व भासमान होऊं लागतें. अशा प्रसंगीं केवळ राष्ट्रीय इतिहास सोडून सार्वकौलिक इतिहासाच्या प्रांतांत आपण प्रवेश करीत आहों, हें उघड आहे. तेव्हां, एकेकट्या कुलाचा व तें कूल ज्या देशाला ज्या काळीं आपला म्हणत असतें त्या तत्कालविशिष्ट ५ देशाचा इतिहास रचतांना कौलिक पद्धतीचा स्वीकार झालेलाच असतो, अर्थात् तिच्या ग्राह्याग्राह्यत्वाची फारशी आवश्यकता रहात नाहीं. बिलकुल आवश्यकता रहात नाहीं, असें मात्र समजण्यांत हांशील नाहीं. कारण एकेकटें उपकुल जरी झालें तरी त्याला इतर उपकुलांचा स्पर्श अगदीं होत नाहीं, असें आजपर्यंत झालें नाहीं. सध्यांच्या इंग्लिश उपकुलाचा इतिहास घ्या. पूर्वप्रलयोनकुल, केल्टकुल, ब्रिटिशकुल, डानिशकुल, साक्सनकुल, व नार्मन फ्रेंचकुल, या सर्वांच्या झगड्यानें सध्यांचें इंग्लिश उपकुल बनलें आहे व तें वेल्श,

स्कॉच, व आयरिश उपकुलांना खाऊन व जिरवून टाकण्याचा हल्लीं प्रयत्न करीत आहे, ह्याचा अर्थ असा कीं, इंग्लिश उपकुलाचा अथवा प्राधान्यानें इंग्लंडचा इतिहास देतांना उपरिनिर्दिष्ट कुलांचाहि इतिहास देणें भाग पडतें. फार काय सांगावें, ब्रिटिश बेटांचा अंतस्थ इतिहास म्हणजे बऱ्याच अंशानें ह्या सर्व उपकुलांच्या भांडाभांडींचा इतिहास आहे. पृथ्वीवरील इतर राष्ट्रांशीं इंग्लंडचा जो संबंध येतो तेवढ्यापुरतें मात्र ह्या परस्पर भांडणाऱ्या उपकुलसंघाला इंग्लंड अथवा इंग्लिश उपकुल अशी संज्ञा सोईखातर देतात. सारांश, एकेकटें राष्ट्र म्हणून ज्याला आपण नांव देतों, त्याचा इतिहास लिहितांनाहि कौलिक पद्धतीला सोडून देतां येत नाहीं. जोंपर्यंत पृथ्वीतलावर कुलभेद आहे, तोंपर्यंत कौलिक पद्धतीनें इतिहास लिहिणें अपरिहार्य आहे.

३२ कौलिक, कालानुक्रमिक व दैशिक ह्या तिन्ही पद्धतींचा इतिहासलेखनांत कमजास्त उपयोग करून घ्यावा लागतो. ऐतिहासिक प्रसंग म्हटला म्हणजे काल, देश व कुल ह्या त्रयीचा उद्धार केल्यावांचून गत्यंतर नसतें. किंबहुना, काल, देश व कुल किंवा कुलांतील व्यक्ती, हे तीन ऐतिहासिक प्रसंगाचे घटक होत. अर्थात् ह्यांच्या अनुरोधानें इतिहास लिहिणें केवळ स्वाभाविक होय. ज्या घटकाला कांहीं कारणानें प्राधान्य दिलें जातें, त्याची पद्धत तेवढ्यापुरती विशेष ग्राह्य व सोयस्कर समजतात एवढेंच. त्यांतल्यात्यांत एका घटकाला विशेष प्राधान्य देतात. इतिहास कोणाचा ! असा प्रश्न केला असतां, कालाचा किंवा देशाचा अथवा दिशेचा, म्हणून कोणी उत्तर देत नाहीं. तर मनुष्याचा किंवा मानवसमाजाचा किंवा मानवकुलांचा, असें उत्तर देतात. याचें तात्पर्य असें कीं, इतिहासांत मुख्य पात्र मनुष्य आहे आणि काल व दिशा ह्यांचे त्याला बेमालुम आवरण मात्र आहे. History of the Primitive times, History of the Middle Ages, History of the Modern Times, History of the East आणि History of the West ह्या प्रयोगांत मुख्य नायकाचा नामनिर्देश केलेला नाहीं खरा:परंतु, तो प्रामुख्यानें लक्षित आहे, हें सांगावयाला नकोच. लक्षणेचा व आलंकारिक भाषेचा यूरोपीयन लोक किती उपयोग करतात, त्याचे हे मासले आहेत. शास्त्रयांच्या भपक्यापुढें शास्त्र बिचारें लोपून गेलें ! काल व दिशा ह्यांच्या धबडग्याखालीं माणूस चिरडून गेलें व प्राचीन काळाचा व पूर्व दिशेचा किंवा पौर्वात्य देशांचा इतिहास, असे प्रयोग प्रचारांत आले. विवक्षित मानवकुलाखेरीज काळाला व दिशेला इतिहासांत कांहीं किंमत नाहीं, हें कोणींच लक्षांत घेईना ! नाहींतर कालानुरोधानें इतिहास लिहावा किंवा देशानुरोधानें लिहावा, हा वाद उपस्थितच झाला नसता

३३. एवंच, दिक्कालांच्या आवरणाखालीं मानवकुलांच्या हालचालींची जी विश्वसनीय हकीकत ती इतिहास होय. सकल मानवकुलांच्या सामग्र्यानें जो इतिहास, त्याला मानवेतिहास म्हणतात; व एकाच कुलाचा, उपकुलाचा, राष्ट्रांचा लोकांचा. वर्गाचा किंवा व्यक्तींचा जो इतिहास, त्याला व्यक्तिचरित्र, वर्गेतिहास, लोकेतिहास, राष्ट्रेतिहास, उपकुलेतिहास किंवा कुलेतिहास व्युत्क्रमानें म्हणतात. व्यक्ति, वर्ग, लोक, राष्ट्र, उपकुल व

कुल यांच्या हालचाली दोन प्रकारच्या असतातः—अंतःस्थ म्हणजे खासगी व बहिःस्थ म्हणजे बाहेरल्या. व्यक्तींची जी घरगुती हालचाल ती त्याच्या खासगी चरित्रांत मोडते व लौकिक बहिःस्थ चरित्रांत समावते. वर्गाची केवळ वर्गातल्या वर्गातली जी चळवळ ती वर्गाच्या अंतःस्थ इतिहासांत समाविष्ट होते व इतर वर्गांशीं जी घसट, ती बहिःस्थ इतिहासांत अंतर्भवते. महाजन, सामान्यजन, ब्राह्मण, शूद्र, जैन, क्याथोलिक, प्रोटेस्टंट हे जे व्यक्तिसंघ त्यांना वर्ग किंवा जाति म्हणतात. त्यांचा आपापल्या वर्गातला अंतस्थ जो व्यवहार त्याचा अंतर्भाव अंतस्थ इतिहासांत होतो; व इतर वर्गांशीं व्यवहार बहिःस्थ इतिहासांत मोडतो. History of the Aristocracy in England or the Democracy in France, or the Oligarchy in Venice हीं वर्गेतिहासाचीं उदाहरणें आहेत. ज्या कोटींत मनुष्यांचे अनेक वर्ग आहेत परंतु राज्ययंत्राभावामुळें जे राष्ट्रत्वाप्रत पावलेले नाहींत, त्या कोटीला लोक म्हणतात. शंभर वर्षांपूर्वी मराठ्यांचें राष्ट्र होतें, सध्यां स्वराज्ययंत्राभावामुळें त्यांची गणना केवळ लोककोटींत करणें भाग आहे. ग्रीस व इताली ह्यांची सध्यां राष्ट्रांत गणना आहे; पन्नास पाऊणशें वर्षांपूर्वी त्यांची नामना लोककोटींत होत असे. ह्या लोककोटीलाहि अंतःस्थ व बहिःस्थ इतिहास असतो. लोककोटीच्या पोटसमाजांची जी चळवळ, ती अंतःस्थ व जुलमानें राज्य करणाऱ्या परकी राष्ट्रांशीं जी हमरातुमरी, ती बहिःस्थ इतिहासांत पडते. राष्ट्र, उपकुल व कुल ह्यांच्याहि इतिहासाची अशीच द्विविध परंपरा आहे. उदाहरणार्थ, इंग्लंड हें राष्ट्र, इंग्लंड+वसाहती हें उपकुल, आणि सर्व ख्रिश्चन राष्ट्रें, हें कुल समजण्यास कांहीं फारशी हरकत नाहीं. इंग्लंडचा अंतस्थ इतिहास त्या बेटांतल्या चळवळींपुरता असतो; आणि इंग्लंडचा इतर राष्ट्रांशीं, लोकांशीं, वर्गांशीं व इंग्रजेतर व्यक्तींशीं जो व्यवहार तो त्याच्या बहिःस्थ इतिहासांत गणला जातो. ख्रिस्ती राष्ट्रांतला आपापल्यांतला जो व्यवहार तो त्यांचा अंतःस्थ व्यवहार व ख्रिस्तेतर राष्ट्रांशीं व लोकांशीं जो व्यवहार तो त्यांचा बहिःस्थ व्यवहार मोजला जातो. ख्रिस्ती राष्ट्रांचे आपापल्यांतले अन्योन्यव्यवहाराचे कायदे निराळे व ख्रिस्तेतर राष्ट्रांशीं व लोकांशीं वागण्याचे कायदे निराळे, अशी व्यवस्था प्रसिद्ध आहे. अर्थात् एक ख्रिस्तीराष्ट्रकुल मिनतवारीनें ईषद् व्यवस्थित रूपाप्रत येत आहे हें उघड आहे. दानव, असुर, मोगल, आर्य, आफ्रिकन, अमेरिकन, व पालिनेशियन अशीं सात प्रमुख कुलें सध्यां पृथ्वीवर आहेत. पैकीं कांहीं दुर्बल व कांहीं सबल आहेत. त्यांचे अंतःस्थ व अन्योन्य जे व्यवहार ते समग्रमानवेतिहासांत मोडतात. सजातीय अशी तदितर कोटी नसल्यामुळें, अखिल मानवेतिहासाला बहिःस्थ बाजू असूं शकत नाहीं.

३४. कौलिकपद्धतीनें इतिहासाचे येणेंप्रमाणें विभाग पडतातः—

## समग्र

## ७ मानवेतिहास ( कालिक ).

१ कुलेतिहास ( अंतस्थ व बहिःस्थ ) ( आर्य, असुर, मोगल, दानव वगैरे. )

२ उपकुलेतिहास ( ” ” ) { इंग्लंड—कानडा, आस्ट्रोलिया, केपकॉलनी वगैरे. फ्रान्स—गायना, मोरीको, कोर्चीन, चायना वगैरे. }

३ राष्ट्रेतिहास ( ” ” ) ( शंभर वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड वगैरे. )

४ लोकेतिहास ( ” ” ) ( सध्याचें महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, तार्किस्थान वगैरे. )

५ वर्गेतिहास ( ” ” ) ( जाति, महाजन, सामान्यजन, धर्मबंधु वगैरे. )

६ व्यक्तिचरित्र ( खासगी व लौकिक ) ( शिवाजी, बाजीराव, रामदास वगैरे. )

भारतवर्षांतील पूर्वप्रलयीन ऋषींच्या वंशाला आर्य; अरब, ज्यू, बाबिलोनियन, असुरियन, मिसर वगैरे नष्ट व हयात लोकांना असुर; Danes, Deutsche, English, वगैरे लोकांना दानव व दस्यु; आणि चिनी, मोगल, जपानी वगैरे लोकांना मोगल; अशा संज्ञा मी देतों. कित्येक आर्यांनीं द्राविड भाषा, कित्येक असुरांनीं मोगलभाषा; कित्येक मोगलांनीं असुरभाषा व कित्येक दानवांनीं आर्य व यवन भाषा स्वीकारलेल्या आहेत. तसेंच कित्येक आर्यांनीं ख्रिस्ती व असुर धर्म, कित्येक असुरांनीं बौद्धधर्म, कित्येक दानवांनीं असुरधर्म अंगीकारिला आहे. परंतु प्रत्येक मनुष्यांत एका कोणत्यातरी कुळीचें प्राधान्य दिसून येतें यांत संशय नाहीं. एक आर्यकुल मात्र निर्मळ व शुद्ध राहिलें आहे. आर्येतर लोकांचें कुळ मूळ कुळाच्या चिन्हप्राधान्यावरून ठरवावयाचें असतें. ह्या प्रकरणाचा सूक्ष्म विचार मानवकुलशास्त्रांत करणें प्रशस्त होय, येथें केवळ त्रोटक दिग्दर्शन केलें आहे.

३५. अखिल मनुष्यजातीचे कुल, उपकुल, राष्ट्र, लोक, वर्ग, व्यक्ति वगैरे विभाग केले म्हणजे त्या जातीच्या इतिहासाला व्यवस्थितपणा ऊर्फ पद्धतशीरपणा येतो, आणि मनुष्यजाति आपआपसांत एका प्रकारचा अव्यवस्थित गोंधळ घालीत आहे, असें जें आजपर्यंत वाटे तें जाऊन, कांहींतरी व्यवस्थित हालचाल चालली आहे, असा ग्रह उत्पन्न होतो. अखिल मनुष्यजातींच्या इतिहासाचें विशद दर्शन व्हावें, एतदर्थ ज्याप्रमाणें कौलिक पद्धतीचें अवलंबन करणें इष्ट आहे, त्याप्रमाणेंच राष्ट्र, लोक, वर्ग, व्यक्ति वगैरेंचाहि इतिहास विशद होण्याकरितां इतर पद्धतींचा आश्रय करावा लागतो. व्यक्तीचा इतिहास किंवा चरित्र द्यावयाचें म्हणजे त्याच्या कुलगोत्राचा छडा लाविल्यावर, ज्याप्रमाणें त्याच्या शरीरयंत्राच्या दुर्बलत्वाची किंवा सबलत्वाची हकीकत द्यावी लागते, त्याप्रमाणेंच वर्ग, लोक, राष्ट्र इत्यादींच्याहि इतिहासांत त्यांच्या शरीरयंत्राची माहिती द्यावी लागते. वर्ग, लोक, राष्ट्र यांच्या हालचालींचा जसजसा कमजास्त मगदूर असेल, तसतशा त्यांच्यांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, वगैरे निरानिराळ्या संस्था उत्पन्न होतात. ह्या संस्थांचा इतिहास व्यवस्थित देतां येण्यास, ह्यांच्या शरीरयंत्राचें साद्यन्त वर्णन करणें जरूर असतें. अशाकरितां कीं, शरीरयंत्रांत जर यत्किंचित् व्यंग असलें किंवा फरक झाला, तर ह्या संस्थांच्या द्वारा होणाऱ्या कार्यांत व्यंगें व फरक दिसूं लागतात. समाज व संस्था ह्यांच्या शरीरयंत्राची हकीकत देण्याच्या पद्धतीला शरीरक पद्धति म्हणतात. उदाहरणार्थ, राष्ट्रांतील राज्यसंस्था घ्या. राष्ट्रांतील व्यक्तींशीं, वर्गांशीं व लोकांशीं व राष्ट्राबाहेरील व्यक्तींशीं, वर्गांशीं, लोकांशीं व राष्ट्रांशीं, संबंध ठेवण्यास जी राज्यसंस्था राष्ट्रांत किंवा लोकांत किंवा वर्गांत निर्माण झाली, तिचें शरीरयंत्र कोणत्या प्रकारचें आहे, हें पहाणें अगत्याचें आहे. कारण, मानवसमाजाच्या अस्तित्वाची व हालचालींची अटच अशी आहे कीं, कोणत्याहि कर्माला त्यानें प्रवृत्त व्हावयाचें म्हणजे त्याला अगोदर आपलें शरीर निर्माण केलें पाहिजे. वासना, शरीर व कर्म अशी मानवसंस्थांच्या चरित्रांची त्रिविध परंपराच आहे. प्रथम, कर्म करण्याची वासना उत्पन्न होते, नंतर कर्म ज्याच्या द्वारा करावयाचें, तें शरीरयंत्र निर्माण होतें, आणि शेवटीं कल्पिलेलें कर्म सिद्ध होण्याच्या मार्गाला लागतें. वासना-शरीर-कर्म ही त्रयी जशी

भवचक्राच्या भ्रमणाला कारण आहे. तशीं तीं भवचक्राचीं लहानगीं रूपें जीं व्यक्ति, वर्ग, राष्ट्र, त्यांच्याहि भ्रमणाला कारण होतें. ज्या वर्गांच्या किंवा लोकांच्या राज्यवासना अस्पष्ट, त्या वर्गांचें किंवा लोकांचें राज्यशरीर अथवा राज्ययंत्रहि अस्पष्टच असावयाचें. ज्यांच्या राज्यवासना स्पष्ट, प्रबळ व व्यवस्थित, त्यांचें राज्यशरीर अथवा राज्ययंत्रहि स्पष्ट, प्रबळ किंवा व्यवस्थित असतें. धर्मयंत्र, शिक्षणयंत्र, समाजयंत्र, वगैरे इतर शरीरांचाहि हाच प्रकार असतो. तदंतर्गत राज्य, धर्म, वगैरे संस्थांच्या शरीरावरून, वर्ग. लोक, राष्ट्र इत्यादींच्या वासना व कर्म काय असूं शकतात व असतात, ह्याचा निश्चय करतां येतो. सबब, वर्गादींच्या इतिहासाला ही शरीरक पद्धति अत्यंत उपयुक्त आहे. खेडेगांवांतील ग्रामसंस्थापासून तों राष्ट्रांतील राष्ट्रसंस्थापर्यंत राज्यशरीर, धर्मशरीर, इत्यादींचा व्याप असतो. ह्या प्रचंड व्यापांत शरीराचीं निरनिराळीं इंद्रियें परस्परांना पोषक किंवा मारक कसकशीं आहेत, हें पहाण्याला शरीरक पद्धतीनें मदत होते. एकाच राष्ट्रांतील एकेक संस्थेच्या शरीराचा उदय, वृद्धि व क्षय कालान्तरांत कसा झाला, हें वर्णन करण्याचें काम ह्या पद्धतीचें आहे.

३६. प्राधान्यानें संस्थांच्या शरीराच्या उत्पत्तीचें कारण तद्‌घटक व्यक्तींच्या वासना होत. पोषण, संरक्षण, प्रजोत्पादन व प्रजाशिक्षण ह्या व्यक्तींच्या मुख्य वासना असतात व तत्सिध्यर्थ ते संघ करतात. शेतकी, व्यापार, गिरण्या, भौतिकशास्त्रें, ह्या सर्वांचा मुख्य हेतु शरीरपोषण आहे. कुटुंब, गोत्र, कुल ह्यांची स्थापना प्रजोत्पादनाच्या वासनेमुळें होते, हें प्रसिद्ध आहे. तसेंच शरीरपोषणाचे धंदे अव्याहत चालावे म्हणून शिक्षणसंस्था उभाराव्या लागतात. यूरोपांतील अत्यंत सुधारलेल्या देशांतहि नव्याण्णव हिस्से शिक्षण हें शरीरपोषणाचें धंदे नीट येण्याकरितां दिलें जातें, असें सूक्ष्म अवलोकनानीं दिसून येतें. पोषण, उत्पादन व शिक्षण हीं अप्रतिबंध चालावीं एतदर्थ संरक्षणार्थ राज्यसंस्था व धर्मसंस्था निर्माण कराव्या लागतात. आंतील व बाहेरील दृश्य शत्रूंपासून राज्यसंस्थेनें रक्षण होतें; व गंधर्व, पिशाच्च वगैरे अदृश्य शक्तींपासून धर्मसंस्था रक्षण करते. दानव, असुर, मोंगल व हिंदु ह्यांच्यांत जे लौकिकधर्म आहेत, त्यांचा हेतु, गंधर्व, पिशाच्च, सैतानें, भूतें वगैरेंचा क्षोभ शमवून, अज्ञ व्यक्तींच्या मनाचें कसेंतरी समाधान करण्याचा आहे. दानवादि अनार्यांतले व हिंद्वादि आर्यांतले जे कोणी थोडे कट्टे वेदान्तमार्गी किंवा संशयवादी किंवा अज्ञेयवादी आहेत, त्यांना मात्र ह्या अदृश्य शक्तींचें भय वाटत नाहीं. परंतु, त्यांच्या ह्या कल्पनांचा उगम वासनांपेक्षां विचारांत फार असल्यामुळें व त्यांच्यांपैकीं बहुतेकांनीं तत्प्रसारार्थ मोठमोठ्या संस्थाहि यंत्रिल्या नसल्यामुळें त्यांचा विचार येथें करण्याची जरूर नाहीं. सारांश, आजपर्यंत मनुष्यजातीनें ज्या ज्या म्हणून संस्था निर्माण केल्या आहेत, त्यांपैकीं बहुतेकांचें मूळ मनुष्यमात्राच्या वासना आहेत. ह्या वासना संस्थायंत्रांच्याद्वारा फलद्रूप व्हावयाच्या असतात. तेव्हां ह्या यंत्रांकडेच बहुतेक वासनोपहत राष्ट्रांची एकाग्र दृष्टि असते. ती इतकी कीं, वासनांची फलद्रूपता प्रसंगीं एकीकडे राहून यंत्राच्या रचनेकडे व स्वामित्वाकडेच सर्व लक्ष दिलें जातें. यूरोपांतील अलीकडील तीनशें वर्षांतल्या राष्ट्रांचा बहुतेक सर्व

खटाटोप राज्ययंत्र व धर्मयंत्र यांची सुधारणा, सुरचना व स्वामित्व कोणत्याप्रकारें कोणीं करावें ह्यासंबंधीं झालेली आहे. इंग्लंडचें " राजा व पार्लमेंट " नावाचें जें मुख्य राज्ययंत्र आहे, त्याच्या रचनेच्या, सुधारणेच्या व स्वामित्वाबद्दलच्या झटापटीची जी हकीकत, तिलाच मुख्यत्वेंकरून इंग्लंडचा अंःतस्थ राजकीय इतिहास म्हणतात. यूरोपांतील इतर कित्येक राष्ट्रांनींहि आपापलीं राज्ययंत्रें इंग्लंडच्या धर्तीवर सुधारलीं आहेत आणि फ्रान्स तर ह्या कामीं इंग्लंडच्याहि पुढें गेलेलें आहे. इंग्लंडच्या व यूरोपियन राष्ट्रांच्या मोठेपणाचें हें बीज जपानी लोकांनीं ओळखून, त्यांनीं आपलेंहि राज्ययंत्र कांहीं वर्षांपूर्वी सुधारून घेतलें आणि यूरोपीयन राष्ट्रांच्या बरोबरीनें वागण्यास आरंभ केला. आशिआंतील ज्या कोणा लोकांना स्वातंत्र्याची वासना उत्पन्न होईल, त्यांनीं तत्साधनार्थ, सोय असेल त्याप्रमाणें, गुप्त किंवा प्रगट रीतीनें, स्वातंत्र्यवासनेचा बळकट धागा अव्याहत चालविणारें एखादें राज्ययंत्रच उभारलें पाहिजे. सद्वासना किंवा असद्वासना फलद्रूप करण्यास यंत्र व यंत्रणा ह्यांच्या निर्माणाखेरीज दुसरा उपाय नाहीं.

३७. वासना–यंत्रणा–व साधना, किंवा इच्छा–शरीर–व कर्म, अशी मानवसमाजाच्या चळवळीची त्रिविध परंपरा आहे. ह्या त्रिविध परंपरेची हकीकत देणें म्हणजेच इतिहास लिहिणें होय. कोणत्या वासनेकरितां संस्थायंत्राचें कोणतें इंद्रिय निर्माण झालें, त्या इंद्रियानें इष्टकार्य कितपत होतें, व तें इंद्रिय सबंध यंत्राच्या अनुरोधानें चालतें किंवा प्रतिरोधानें चालतें, ही हकीकत देण्याचें काम शरीरकपद्धतीचें असतें. वस्तुतः पाहतां संस्थांच्या शरीरांपेक्षां शरीराच्याद्वारा झालेलें जें काम त्याच्यांशीं इतिहासाचें मुख्य कर्तव्य आहे. परंतु, काम सिद्ध व्हावयाला शरीराची अपेक्षा असल्यामुळें व शरिराच्या सिद्ध्यर्थ समाजाची झटपटाहि विशेष असल्यामुळें, किंबहुना शरीराची रचना व सुधारणा हेंच कांहीं काल किंवा सर्वकाल राष्ट्राचें मुख्य कर्तव्य होऊन बसल्यामुळें, शरीर,शरीररचना व शरीरसुधारणा, हाच इतिहासाचा एक मुख्य विषय झाला आहे. History of English Parliamentary institutions, History of English Constitutional Government, History of French Parliamentary procedure, History of German Religious, Social, Moral, educational legal and bellicose institutions, वगैरे इतिहास त्या त्या संस्थांच्या शरीररचनेचे आहेत. असले इतिहास लिहिण्याला शरीरक पद्धतीचा उपयोग होतो. असल्या इतिहासांत वासना, तात्सिद्ध्यर्थ उत्पन्न झालेलें संस्थायंत्र व त्या यंत्रानें केलेलें कार्य, ह्यांची हकीकत येते. बहुतेक सर्व जगाचें चरित्र व विशेषतः असुर, दानव व मोगल, ह्या कुलांचें चरित्र उत्कटत्वानें वासनोत्पन्न आहे. तेव्हां, ह्या पद्धतीला वासनिक पद्धति म्हटलें असतांहि चालेल. यूरोपियन लोक हिला Morphological व Physiological पद्धति म्हणतात. Morphological पद्धति केवळ संस्थाशरीराचें वर्णन देते व Physiological पद्धती शरीरेंद्रियांचीं लक्षणें देते. शरीर व शरीराचीं लक्षणें दिल्यावर, शरीरानें केलेल्या कार्याची हकीकत जें देणें त्याला Resultant पद्धती असें

नांव द्यावें लागेल. तर्कशास्त्रदृष्ट्या पहातां, ही तिसरी पद्धती यूरोपियन इतिहासकारांनीं काढावयाला पाहिजे होती! परंतु ती त्यांनीं निराळी काढिली नाहीं. संस्थाशरीराचा ऊहापोह करतांनाच ते तत्कृतकार्यांची हकीकत देतात. ह्याचा अर्थ असा कीं, वासना–शरीर–व कार्य, ही त्रयी इतकी एकजीव आहे कीं, तिचें पृथक्करण करण्यापासून विशेष सौकर्य नाहीं. वासनेचा निर्देश केल्यावांचून शरीर निर्माण कां झालें तें सांगतां येत नाहीं व कार्याचा निर्देश केल्यावांचून शरीराचीं लक्षणेंहि ठरवितां येत नाहींत. ही अडचण लक्षांत घेऊन, शरीरक म्हणून एकच पद्धती मीं स्वीकारिली आहे. शरीरक शब्द शारीरक शब्दापासून भिन्न समजावा. शरीरासंबंधीं जें तें शरीरक; व शरीराचा चालक जो आत्मा तत्संबंधीं जें तें शारीरक, असा अर्थ घेतला आहे.

३८. कौलिक पद्धतीनें कुल, उपकुल, राष्ट्र, लोक, वर्ग, व्यक्ति वगैरे विभाग पाडून, शरीरक पद्धतीनें वर्ग, लोक, राष्ट्र, वगैरेंतील संस्थांच्या वासनांचें, शरीरांचें व कार्यांचें वर्णन दिक्कालावच्छेदानें दिलें म्हणजे इतिहासाची कामगिरी संपली. अशा वर्णनांत मनुष्यसमाजाच्या सर्व प्रकारच्या हालचालींची हकीकत येते.

३९. पृथ्वीवरील निरनिराळ्या नष्ट व हयात समाजांची तुलना करण्यानें जी कांहीं सिद्धान्त–परंपरा बनते तिला समाजशास्त्र म्हणतात. निरनिराळ्या नष्ट व हयात राष्ट्रांतील राज्ययंत्रांची तुलना करून जी सिद्धान्तपरंपरा बनते तिला राज्ययंत्रशास्त्र अशी संज्ञा आहे. शासनशास्त्र, धर्मशास्त्र, स्थानिकराज्ययंत्रशास्त्र, राज्यनीतिशास्त्र, भाषाशास्त्र, आचारशास्त्र, वगैरे शास्त्रें तुलनापद्धतीनें निर्माण होतात. समाजशास्त्र किंवा राज्ययंत्रशास्त्र म्हणजे समाजांचा किंवा राज्ययंत्रांचा इतिहास नव्हे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. कित्येक इतिहासकार आपापलीं समाजशास्त्रीय, राज्ययंत्रशास्त्रीय, राज्यनीतिशास्त्रीय, किंवा नीतिशास्त्रीय परिपक्व किंवा अपरिपक्व मतें व्यक्ति, वर्ग, राष्ट्र इत्यादींच्या इतिहासांत देत असतात व अशा इतिहासांना Reflective history, philosophical history, इत्यादि नामाभिधानें मिळत असतात. असले इतिहास खुशालचेंद वाचकांस कितीहि मनोरंजक वाटोत किंवा लेखकाच्या अवलोकनशक्तीची किंवा विचारशक्तीची कितीहि महती वाढवोत, त्यांना निर्भेळ इतिहास हें नांव देतां येत नाहीं. त्यांना Ethics of history हें नांव उत्तमोत्तम शोभतें.

४०. कित्येक इतिहासांना Critical असें विशेषण लावतात. असल्या इतिहासांत हकीकत देतांना प्रसंगांची, तारखांची, मतांची, किंवा संस्थायंत्रांची विवेचक दृष्टीनें जागजागीं छान करून दाखविलेली असते. येथें एवढें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, प्रसंगांची, तारखांची, मतांची, किंवा संस्थायंत्रांची विवेचक दृष्टीनें छान करणें म्हणजे इतिहास लिहिणें नव्हे. इतर ग्रंथकारांशीं वाद घालणें म्हणजेहि इतिहास लिहिणें नव्हे. ही इतिहास लिहिण्याच्या पूर्वींची तयारी होय. विवेचक पद्धतीचा उपयोग प्रत्यक्ष इतिहास लिहितांना करावयाचा नसतो. तर साधनें व सामग्री तपासून व छान करून घेतांना ह्या उत्कृष्ट पद्धतीचा उपयोग व्हावयाचा असतो. नवीन इतिहास लिहितांना सिद्धार्थ मूळांत

घालणें व सिद्धार्थाची सिद्धि ज्या विवेचनपद्धतीनें केली, ती टीपांत देणें सोईस्कर व सशास्त्र असतें. प्रयोग दाखविण्याच्या रंगभूमीवर, नेपथ्यांतील सजवासजव व कुजबुज अप्रस्तुत व ग्राम्य होय. ह्या विवेचक किंवा Critical पद्धतीलाच Logic of History असें नांव आहे.

४१. आर्य, दानव, असुर, मोगल वगैरे लोकांचे म्हणजे अखिल मनुष्यजातीचें चरित्र उत्कटत्वानें वासनेकजन्य असतें, असें विधान येथपर्यंत वारंवार करीत आलों आहें. ह्या वासना दोन प्रकारच्या असतात:-विकारोद्भूत वासना व विचारोद्भून वासना. ह्या दोन्ही प्रकारच्या वासनांच्या फलद्रूपतार्थ संस्थायंत्रें निर्मिलीं जातात. यंत्रणाचा उपयोग विकारांच्या समाधानार्थ जसाजसा वारंवार झालेला दृष्टीस पडतो, तसाच विचारांच्या समाधानार्थहि कधीं कधीं झालेला आढळून येतो. शत्रुत्वबुद्धीनें किंवा अन्नार्थ मनुष्य, पशु, पक्षी ह्यांची हत्या करण्याकरितां, किंवा परदेश, परधन, परदारा अपहरण करण्याकरितां जशीं राज्य, सैन्य, वगैरे यंत्रें हमेश बनविलीं जातात, तसें कधीं कधीं मनुष्य, पशु, पक्षी वगैरेंचे जीव वांचविण्याकरितांहि अस्पष्ट प्रयत्न होत असतात. शरीराच्या पोषणार्थ, संरक्षणार्थ व उपभोगार्थ पदार्थ तयार करण्याकरितां जशा शिक्षणसंस्था स्थापिल्या जातात, तशाच, केवळ आंतर व बाह्य सृष्टीचें ज्ञान मिळविण्याकरितां देखील, लहानसहान सोई करण्याकडे मनुष्यसमाजाची प्रवृत्ति असते. आतां इतकें कबूल केलें पाहिजे कीं, समाजसंरक्षणार्थ किंवा समाजपोषणार्थ जशा प्रचंड संस्था निर्मिल्या जातात, तशा सदयता, सभ्यता व ज्ञानसंपन्नता यांच्या प्रत्यर्थ निर्मिल्या जात नाहींत. ह्या दोन प्रकरणांत अशी जरी भेदबुद्धि आहे, तत्रापि संरक्षक व पोषक संस्थांच्या निर्माणांतहि विचाराचा अंश दिसून येतो. संस्था निर्माण करणें म्हणजे अव्यवस्था मोडून व्यवस्थेचा पाया घालणें आहे. आणि व्यवस्था म्हणजे विचाराचीच एक बाजू आहे. तेव्हां विकारांच्या समाधानार्थ निर्मिलेल्या संस्थांतहि विचाराचा अंश कमजास्त मानानें असतोच. हा जो विचाराचा अंश त्याच्याकडेच तेवढी दृष्टि देऊन कित्येक लोक इतिहास लिहीत असतात. History of Rationalism in Europe, History of Morals in England, Histoty of Civilization in France, वगैरे इतिहास सुवासनोद्भूत स्वतंत्र विचाराचा संग्रह ऐतिहासिकरीत्या करीत असतात. असले इतिहास म्हणजे त्या त्या देशांतील Irrationalism, Immorality व Barbarism ह्यांची प्रखर व प्रचंड निंदाच होय. ह्यांना Histories of ideas म्हणून म्हणतात. असले इतिहास समाजाच्या चरित्राच्या एकाच धाग्याचा छडा लावीत असल्यामुळें जात्याच एकदेशी असतात. ते एका दृष्टीनें यद्यपि अत्यंत महत्वाचे आहेत, तत्रापि एकदेशीयत्वाच्या दोषानें लिप्त असल्यामुळें, असमाधानकारकच म्हटले पाहिजेत. खरा, समग्र व विश्वसनीय इतिहास म्हटला म्हणजे तो, कीं ज्यांत Rationalism व irrationalism Morality व immorality आणि Civtlization व Barbarism, ह्यांची हकीकत, आवडीनिवडीचा कांटा कोणीकडेहि यत्किंचित् झुकूं न देतां. झाली असेल तशी साद्यंत नमूदली जाते. Rationalism, Barbarism वगैरे तत्वाच्या इतिहासाप्रमाणेंच, Mi-

llitarism, Marerialism,Socialism, Anarchism, Science, Literatuae, वगैरे तत्त्वांचे इतिहास Histories of ideas या सदराखालीं मोडतात. असल्या इतिहासांत एकेका कल्पनेच्या उगमाची, वृद्धीची, अपकर्षाची, उत्कर्षाची व झाला असल्यास नाशाची हकीकत दिलेली असते. कल्पनांचे इतिहास म्हणजे त्यांचीं चरित्रेंच होत.

४२. कल्पनांचा किंवा तत्त्वांचा इतिहास व त्यांचें शास्त्र ह्या दोन बाबी भिन्न आहेत. उदाहरणार्थ गणित घ्या. गणितशास्त्र निराळें व गणिताचा इतिहास निराळा. संख्येच्या कल्पनेची उत्पत्ति, बाल्यावस्था, वृद्धि, अपकर्ष, उत्कर्ष ह्या प्रकरणांची हकीकत गणिताच्या इतिहासांत येते; आणि संख्येचे यच्चयावत् नियम गणितशास्त्रांत प्रतिपादिले जातात. कोणत्याहि कल्पनेच्या चरित्राचा वृत्तान्त इतिहासांत येतो आणि विवक्षित कालीं त्या कल्पनेची जी गति व स्थिति तिचा सोपपत्तिक परिष्कार शास्त्र करतें. शास्त्र व इतिहास ह्यांचीं हीं लक्षणें मनुष्यसमाजाला लावलीं म्हणजे मानवसमाजाचा इतिहास मानव समाजाच्या शास्त्रापासून भिन्न आहे, हें स्पष्ट होतें. मानवसमाजाच्या चरित्राचा जो वृत्तान्त तो इतिहास होय, व त्या मानवसमाजाच्या गतिस्थितीच्या कार्यकारणांची जी नियमपरंपरा तिला मानवसमाजशास्त्र म्हणतात. ह्या मानवसमाजशास्त्रालाच कित्येक यूरोपीयन लोक Science of History अशी संज्ञा देतात आणि ह्या चुकलेल्या संज्ञेच्या जोरावर नानाप्रकारचे अनर्थ करतात. Science of History म्हणजे इतिहासाचें शास्त्र असा वास्तविक शब्दार्थ आहे. परंतु तो ह्या लोकांना विवक्षित नाहीं. Science of History,ह्या शब्दसमूहांत History ह्या पदाचा अर्थ ते "मनुष्यसमाजाची चळवळ" 'मनुष्यसमाजाचें चरित्र' असा करतात. वस्तुतः History म्हणजे चरित्राची भाषेंत दिलेली हकीकत होय. येणेंप्रमाणें 'चरित्र' व चरित्राची हकीकत ह्या दोन अर्थांचा घोटाळा करून Science of History हे शब्द यूरोपीयन लोक योजतात. Science of History ह्या शब्दाचा दुसरा एक अर्थ आहे. Method of history म्हणून ज्याला म्हणतात, त्यालाहि हे लोक Science of History च म्हणतात. Historical Method नें एखाद्या विषयाचा, वस्तूचा किंवा कल्पनेचा विचार करावयाचा म्हणजे आदिपासून आतांपर्यंत त्या विषयाच्या, वस्तूच्या, किंवा कल्पनेच्या चरित्राचा विचार करावयाचा. म्हणजे कालानुक्रमिक पद्धतीनें जो विचार करावयाचा, त्यालाच ऐतिहासिक पद्धति म्हणावयाचें असें होतें. ऐतिहासिक पद्धति म्हणजे इतिहास लिहिण्यांत ज्या पद्धतीचा प्राधान्यान उपयोग करतात ती. कालाशिवाय इतिहास नाहीं. तेव्हां ऐतिहासिक पद्धती म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं, कालानुक्रमिक पद्धतीच आहे. यूरोपीयन लोकांनीं लिहिलेल्या इतिहासांत Science of History हें एक मोठें बंड आहे. परंतु, ह्या शब्दांना कांहींएक अर्थ नाहीं. हे शब्द यूरोपियन इतिहासकारांच्या लिहिण्यांतून जितके लवकर जातील तितके उत्तम.

४३. Science of History हे भ्रामकशब्द टाकून देऊन मानवसमाजशास्त्र हे शब्द योजले म्हणजे दृष्टि विमल होते. 'एकः शब्दः सम्यग्युक्तः कामधुग् भवति'। गति व

स्थिति ह्या दोन अर्थांच्या अनुरोधानें मानवसमाजशास्त्राचे दोन भाग होतातः—(१) मानवसमाजगतिशास्त्र व (२) मानवसमाजस्थितिशास्त्र. अन्वयव्यतिरेकादि ज्या तर्कपद्धति आहेत त्यांच्या अनुसंधानानें मानवसमाजाच्या गतिस्थितीची नियमपरंपरा ठरवावयाची असते. वन्यावस्थेंतून संस्कृतावस्थेंत येत असतां, मनुष्यसमाज मुळीं साधा व बिनभानगडीचा जो होता, तो सध्यां पराकाष्ठेचा गुंतागुंतीचा व भानगडीचा झाला आहे, हें ज्ञान यूरोपीयन शास्त्र्यांना ह्या नियमपरंपरेपासून झालें आहे. परंतु, पुरातनकाळीं मानवसमाज वन्य व रानटी होता, हें विधान सिद्धान्तवत् नाहीं. कारण, अगदीं अलीकडे जे नवीन शोध झालेले आहेत, ते जमेस धरतां, असें म्हणणें प्राप्त होतें कीं, हिमप्रलयाच्याहिपूर्वी जिला वन्य म्हणतां येणें मुष्कील आहे अशी ज्या अर्थी एक मानवसमाजाची शाखा होती, त्याअर्थी वन्यावस्था अशी अखिल मानवसमाजाची कल्पना निराधार आहे. केवळ पश्चात्प्रलयीन यूरोपीयनसमाज जर घेतला—व तोच यूरोपीयन समाजशास्त्री घेतात—तर ही कल्पना खरी आहे.आर्यांच्या समाजाचा इतिहास पहातां, ही कल्पना टाकून द्यावी लागेल व इतिहासाला माहीत असलेल्या कोणत्याहि काळीं कोठें ना कोठें तरी आर्यसमाज सुसंस्कृतावस्थेंत होता, आणि इतर समाज संस्कृतावस्थेप्रत येत आहेत, असें व्यापक विधान करावें लागतें. अलीकडील नवे शोध लागण्याच्यापूर्वी यूरोपीयन शास्त्र्यांनीं जी नियमपरंपरा सिद्धान्तवत् मानिली, ती सध्यां निराधार वाटावी, हें रास्तच आहे. मानवसमाजगतिशास्त्राचा असा हा दुहेरी सिद्धान्त प्रस्थापित केल्यावर, त्या समाजाच्या स्थितिशास्त्राकडे वळणें ओघासच येतें. कोणत्याहि काळीं मानवसमाजाची स्थिति म्हणजे मानवसमाजाच्या निरनिराळ्या घटकांचा नैकविध परस्परसंबंध कोणत्या नियमांनीं नियंत्रित झाला आहे तें स्थितिशास्त्रापासून कळतें. ह्या द्विमुख समाजशास्त्राची येथेंच गति थांबते. ह्या पुढील विचार दुसऱ्या एका शास्त्रानें सांगण्याचा पत्कर घेतला आहे, त्याचा निर्देश करतों.

४४. मानवसमाजाचा प्रारंभ केव्हां झाला व समाप्ति केव्हा होणार, हें इतिहासाला माहीत नाहीं. अलीकडील दहा पांच हजार वर्षांची थोडी फार हकीकत इतिहास जाणतो. गीतेंत म्हटल्याप्रमाणें व्यक्तमध्य असा जो प्रपंच, त्याची मधली माहिती तेवढी प्रस्तुतकालीन मनुष्यांना मिळणें शक्य आहे. प्रपंचाचा आदि व अंत मनुष्यकल्पित शास्त्रांना उपलभ्य नाहीं. प्रपंच आला कोठून व जातो कोठें, ह्याचा निर्णय, आदि व अंत यांची निश्चित कल्पना नसल्यामुळें, शास्त्राला करतां येत नाहीं. जो थोडासा मधला तुवा प्रत्यक्ष आज किंवा इतिहासानें कालपासून माहीत झालेला आहे, त्याची लांबी रुंदी मोजण्यांतच शास्त्र गुंतलें आहे. ही मोजणी करून, प्रगति झाली व अधोगति झाली, वगैरे विधानें शास्त्र करतें. जेथें प्रपंच निघाला कोठून व जातो कोणत्या स्थळाला, हें निश्चयानें ठाऊक नाहीं, तेथें, पुढें गेलों किंवा पाठीमागें आलों, हें ठरावयाचें कसें, तेंच समजत नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें, काल जेथें होतों तेथें आज नाहीं, काल जसा होतों तसा आज नाहीं, आणि वर्तमानक्षण गतक्षणाहून भिन्न आहे, ह्यापेक्षां जास्त वैशद्य विचारांत येणें दुरापास्त होते. अफाट व अज्ञात समुद्रांत सांपडलेल्या दुर्बल होडग्यांतील माणसांची जशी दिशाभूल व्हावी,

तशी स्थिति मानवसमाजशास्त्राची आहे. होडग्यांतील चार माणसें वल्ही मारीत आहेत, दोन माणसें ओरडून वक्तृत्व करीत आहेत, व एक माणूस स्तब्ध बसलेला आहे, असा एकदां प्रकार इतिहासाला दिसत आहे. फिरून कांहीं वेळानें पहावें तर, सर्व माणसें एकमेकांशीं भांडत आहेत, व कांहीं माणसें मरून पडलीं आहेत, असा देखावा उघडकीस येतो. किंचित् थांबून पुनः पहावें तों, होडग्यांतील माणसांत तट पडून प्रत्येकजण दुसऱ्याच्या विरुद्ध वल्हवीत आहे, आणि प्रत्येकाला आपलें वल्हवणें उत्तमोत्तम वाटत आहे, असा चमत्कार दृष्टीस पडतो. इतक्यांत समुद्रांत भयंकर वादळ होऊन, वक्तृत्व, वल्हवणें, तट, भांडण व माणसें पार नाहींशीं झालीं आणि समुद्र, होडी व वल्हीं मात्र शिल्लक राहिलीं, असा प्रळय होऊन गेलेला नजरेस येतो. पुनः मात्कयान् क्षणार्धानें पहावें, तर, समुद्र शांत आहे आणि होडींत माणसें पूर्वीप्रमाणें गजबज करीत आहेत व जोरानें वल्हवीत आहेत, असें पहिलेंच चित्र डोळ्यापुढें उभें रहातें. आणि हे सर्व चमत्कार पहाणारा व अनुभवणारा इसम कोण, तर होडींतल्या इसमांपैकींच एक ! होडींतल्या माणसांची प्रगति झाली किंवा अधोगति झाली, हें तों सांगणार व बाकीचे तें मानणार किंवा कदाचित् न मानणार !

४५. व्यक्तमध्य प्रपंचाच्या चरित्राची अशी असमाधानकारक स्थिति आहे. ती आजचीच आहे अशांतला प्रकार नाहीं. फार पुरातन काळापासून ती अव्याहत चालू आहे. आलों कोठून व जाणार कोठें, हा प्रश्न सोडवल्यावांचून, चाललें आहे काय, ह्या प्रश्नाचा उलगडा करतां येत नाहीं. आणि हा उलगडा केल्याविना विचारी मनुष्याची चित्तशांति होत नाहीं. प्रपंच म्हणजे काय, हा शोध आज हजारों वर्षांपासून चालला आहे; व शेकडों शोधकांनीं शेकडों उपपत्त्या काढिल्या आहेत. परंतु, सांगण्यास दुःख वाटतें कीं, त्यांपैकीं एकहि उपपत्ति वर्तमानक्षणीं मनाला समाधान देणारी नाहीं. "आप एव ससर्जादौ" पासून "तत्त्वमसि" पर्यंत शेकडों साध्या व भानगडीच्या उपपत्त्या यूरोपांत व भरतखंडांत मागें निघाल्या होत्या व सध्यां निघत आहेत. परंतु, त्यांत गृहीत गोष्टींचा भाग बहुत व प्रमाणबद्ध पद्धतीचा अंश अत्यल्प आहे, असा संशय येतो. अशी संशयित स्थिति वर्तमानक्षणीं यद्यपि आहे, तत्रापि त्या त्या कालीं त्या त्या उपपत्तीनें मनुष्यमात्राचें समाधान झालेलें आहे, ह्यांत संशय नाहीं. मागील सर्व उपपत्त्या संशयग्रस्त आहेत, असें वर्तमानक्षणीं असणारें जे आपण त्यांना भासतें, इतकेंच. परंतु, भूतकालीन लोकांचा प्रपंच, ह्या उपपत्त्या प्रमाणसिद्ध आहेत. असें निश्चयात्मक मत गृहीत धरून, चालला होता, हें इतिहासानें सिद्ध आहे. सृष्टि निर्माण झाली कशी, तींत मनुष्याची स्थापना कोणत्या स्थलीं आहे, मानवसमाज कोणीकडे जात आहे, व व्यक्तिमात्राचें पर्यवसान कोठें होणार आहे, वगैरे बाबींचा निश्चयात्मक ऊहापोह ह्या उपपत्त्यांत केलेला असतो. तो सदा सशास्त्र व प्रमाणसिद्ध असतोच, अशांतला प्रकार नाहीं. परंतु, त्याच्यावर तत्कालीन लोकांचा कांहीं काळ पूर्ण विश्वास बसलेला असतो, ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. ह्या विश्वासाचा अर्थ असा कीं, ह्या उपपत्यांवर मानवसमाजाच्या गतीचें व स्थितीचें धोरण अंशतः अवलंबून असतें. कां कीं, व्यक्तिमात्राचें व मनुष्यसमाजाचें आचरण त्याला जीं मतें विश्वास्य

व अतएव उत्तमोत्तम वाटतात त्यांच्या अनुरोधानें चालत असतें. सारांश, ह्या तात्त्विक उपपत्त्या यद्यपि कमजास्त संशयित आहेत असें आपल्याला सध्यां वाटतें, तत्रापि त्यांच्या अनुरोधानें मानवसमाज चालतो, हें सिद्ध आहे. तत्त्वज्ञानाचा प्रपंचाशीं संबंध कसा जडलेला आहे, तें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें.

४६. प्रपंचांतील प्रसंगांना तत्त्वज्ञानाच्या सांच्यांत बसविलें म्हणजे मानवसमाजाची घडपड व्यवस्थित रीतीनें चालली आहे, अशी मनाची समजूत होते. व ही समजूत करण्याकरितां प्रपंचाचें तत्त्वज्ञान अथवा Philosophy of History उदयास येतें. शास्त्रांत व व्यवहारांत स्थलोस्थलीं व वेळोवेळीं कांहीं कल्पित गोष्टी गृहीत करून चालल्याशिवाय नीट संगति बसत नाहीं. Jhon Doe व Riehard Roe ची कल्पना इंग्लिश कायद्यांत खरी धरून कांहीं व्यवहार सत्य मानतात; किंवा गतिशास्त्रांत घर्षणाचा अभाव कल्पितात, त्याप्रमाणेंच, व्यक्तमध्य अशा समाजाच्या तत्त्वज्ञानांत कांहीं कल्पित गोष्टी गृहीत कराव्या लागतात व ह्या ग्रहणापासून त्या त्या वेळेपुरती चित्तशांति होत असते आणि प्रपंचाचें रहाटगाडगें आनंदानें, उत्साहानें व हुरूपानें फिरूं लागतें. समाजशास्त्राला समाजाचा आदि व अंत माहीत नसतो, तो तत्त्वज्ञानाला माहीत असतो. समाज आला कोठून व जातो कोठें, ह्या बिकट प्रश्नाचें उत्तर तत्त्वज्ञान देतें तें उत्तर शास्त्रीय प्रमाणांनीं समर्थित, अर्थात्, नसतें. कारण तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत शास्त्रीय प्रमाणें म्हणून ज्यांना प्रायः ह्मणतात त्यांहून निराळ्या प्रमाणांची मातबरी असते. अन्वयव्यतिरेकाच्या खटपटींत शास्त्र सदा घुटमळत असतें. तत्त्वज्ञान जें आहे तें असल्या भिकार बाजारांत हिंडत नाहीं. आप्तांचीं वाक्यें, धर्मग्रंथांचीं प्रमाणें, मनोरचित कल्पना, ह्यांच्या जोरावर अदृश्य वातावरणांत अनिरुद्ध संचार करून, पृथ्वीतलांवरील भिकार बाजार कोठें आहे, तें तत्त्वज्ञान गंभीर स्वरानें व शहाणपणाच्या मुद्रेनें सांगत असतें आणि भिकार बाजारांतील भावडीं, दुःखीकष्टी व भोंदू माणसें भक्तिभावानें ऐकत असतात. काल्पनिक सृष्टींत स्वैर संचार करणारें तत्त्वज्ञान अन्वयव्यतिरेकाच्या बंधनांनीं नियमित नसल्यामुळें त्याचीं स्वरूपें नानाप्रकारचीं आहेत. वडारांच्या गुरवापासून तों ब्राह्मणांच्या ज्ञानेश्वरापर्यंत व रानटी लोकांच्या भटांपासून तों युरोपांतील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांतील क्यांटप्रभृति तत्त्वज्ञान्यांपर्यंत प्रपंचाचा अर्थ म्हणजे तत्त्वज्ञान सांगणारे पुरुष कमींतकमी शंभर दीडशें झालेले आहेत आणि त्यांतील प्रत्येकाचें तत्त्वज्ञान दुसऱ्याच्या तत्त्वज्ञानाहून भिन्न आहे. अर्थात् मानवसमाजाच्या धडपडीचा अर्थ जो तो आपापल्या तत्त्वज्ञानाच्या धोरणानें करीत आहे. जेथें प्रमाणांचें बंधन नाहीं व निव्वळ कल्पनेचाच स्वैर संचार आहे, तेथें ज्याचा त्याचा अर्थ ज्याच्या त्याच्यापुरताच व खराच आहे. ज्यांची श्रद्धा ज्या तत्त्वज्ञान्यावर असेल, त्यांनीं त्याचा अर्थ स्वीकारावा आणि प्रपंच नेटानें व उत्साहानें चालवावा किंवा आलस्यानें किंवा औदासिन्यानें टाकून द्यावा जसें ज्याचें तत्त्वज्ञान तसा त्याचा प्रपंच, हा सिद्धान्त आहे. विवक्षित काळीं कोणताहि समाज घ्या, त्यांत कोणतें तत्त्वज्ञान नांदत आहे, एवढें कळलें, म्हणजे त्याचें चरित्र कोणत्या प्रकारचें आहे व कोणत्या स्वरूपाचें होईल, ह्याचें स्थूल अनुमान बांधतां येतें. 'यो यच्छ्रद्धस्स एव सः' ।

४७ तत्त्वज्ञानाचा अथवा तात्त्विक कल्पनांचा व प्रपंचाच्या अथवा मानवसमाजाच्या चरित्राचा संबंध बिंबप्रतिबिंबरूप आहे. जें तात्त्विक बिंब मनांत उत्पन्न झालें असेल त्याचें प्रतिबिंब समाजांत प्रतिफलित होतें. उदाहरणार्थ भरतखंडांतील आर्यसमाज घ्या. ( १ ) ऋक्संहितेंत भोग्य वस्तूंची प्राप्ति करून देणाऱ्या व शत्रूंचा नाश करणाऱ्या देवतांचें म्हणजे कल्पनांचें स्तवन केलेलें आहे. त्यावरून तत्कालीन समाजांत भोगप्राप्ति व शत्रुनाश हीं दोन तत्त्वज्ञानाचीं अंगें होतीं असें दिसतें; व तीं कालांतरानें आर्यसमाजांत प्रतिफलित झालीं, असें इतिहास सांगतो. ( २ ) बुद्धाच्या तत्त्वज्ञानांत भूतदया व निर्वाण हे दोन मुख्य सिद्धान्त आहेत. त्यांचें पर्यवसान संन्यास व दौर्बल्य या दोन रूपांनीं समाजांत प्रतिबिंबित झालें. दुष्टांवरहि दया करण्याचा जेथें निश्चय झाला व मरणोत्तर शून्यप्राप्ति होणार अशी जेथें खात्री झाली, तेथें शकयवनकिरातादि रानटी परंतु बुभुक्षु लोकांनीं ज्ञानसंपन्न संस्कृत लोकांवर राज्य करावें व संस्कृत लोकांनीं निरिच्छ भिक्षु व श्रमण बनून समाजाच्या प्रपंचाचा चुथडा करावा, हें ओघासच येतें. ( ३ ) भगवद्गीतेंत बुद्धभिक्षुप्रमाणें कर्माचा न्यास करणें म्हणजे संन्यास नव्हे व क्लैब्याचा अवलंब करून रानटी शत्रूंचा पगडा बसवून घेणें म्हणजे भूतदया ऊर्फ शांति नव्हे, असा सिद्धान्त केलेला आहे. ह्या सिद्धान्ताचें प्रतिबिंब तत्कालीन आर्यसमाजावर पडून, शकयवनादि म्लेंच्छराजांना आर्यांनीं हाकून दिलें व शातवाहनादि हिंदूराज्यांची स्थापना भरतखंडांत झाली. बुशिडो धर्माप्रमाणें सध्याचे जपानी लोक अपमानाचें निर्यातन प्राण देऊन व घेऊन ज्याप्रमाणें करतात, त्याप्रमाणें चालुक्यांच्या वेळचे मराठे अपमानाचें निर्यातन प्राण देऊन व घेऊन करीत असत, असें शातवाहनाच्या सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत प्रवास करणारा व्हानसंग लिहितो. "If any one insult them, they will risk their lives to wipe out that insult," ( Bhandarkar's Dekkhan ). कृष्णानें अर्जुनाला सांगितलेलें तत्त्वज्ञान येथें बरेंच प्रतिबिंबित झालेलें उत्कृष्ट दृष्टीस पडतें. ह्यालाच महाराष्ट्र धर्म म्हणतात. ( ४ ) हा महाराष्ट्रधर्म शातवाहनाच्या बाराव्या शतकाच्या अंतापर्यंत चालून, पुढें ज्ञानेश्वर आले. त्यांनीं भावार्थदीपिकेंतून इतर अनेक उत्कृष्ट तत्त्वांबरोबर खालील तत्त्व शिकविलें, व त्याचाच पगडा दुर्दैवानें किंवा सुदैवानें महाराष्ट्रांतील समाजावर उत्कटत्वानें बसला:—

उत्तमातें धरिजे । अधम तरि अव्हेरिजे ।
हें कांहींच नेणिजे । वसुधा जेवीं ॥ १ ॥
गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं ।
ऐसें नेणेंचि गा करूं । तोय जैसें ॥ २ ॥

पाणी, माती वगैरे अचेतन भूतांप्रमाणें बऱ्यावाईटाचें ग्रहण सचेतन मनुष्यप्राण्यांनीं सुखदुःखाकडे लक्ष न देतां उदासीनबुद्धीनें करावें, असें तत्त्वज्ञान ज्या देशांत नांदूं लागलें, आणि,

मीं हें भाष नेणं । माझें कांहींचि-न म्हणे ।
सुख दुःख जाणणें । नाहीं जेथें ॥ ३ ॥

अशी भगवद्भक्तांची ममत्वरहित अचेतन वृत्ति झाली, तेथें मुसलमानांसारख्या रानटी परंतु बुभुक्षु लोकांनीं राज्य करावें व सर्वस्वापहार करावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं. ह्यालाच वारकऱ्यांचा एकदेशी भागवतधर्म ऊर्फ संताळें म्हणतात. गीतेंतील " मा स्म क्लैब्यं गमः पार्थ, " ह्या वचनांत सांगितलेल्या सचेतन भागवतधर्माहून हा अचेतन भागवतधर्म भिन्न आहे. " योगः कर्मसु कौशलं, " हें गीतातत्त्व जर संतमंडळी नीट ध्यानांत ठेवती, तर भगवंतांचा उपदेश ते यथास्थित समजते. हा एकदेशी अतएव पंगू भागवतधर्म एकनाथांपर्यंत चालून, कांहीं कालानें ( ५ ) रामदासस्वामी अवतीर्ण झाले. त्यांनीं दासांच्या म्हणजे महाराष्ट्रांतील गुलाम बनलेल्या लोकांच्या बोधार्थ दासबोधनामक इतिहास तत्त्वनिरूपक ग्रंथाची रचना केली. त्यांतील तत्त्वज्ञान गीतेंतील तत्त्वज्ञानासारखें सर्वदेशी व व्यापक आहे.

मराठा तेवढा मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
मारतां मारतां मरावें । मारुनि आपण उरावें ॥

वगैरे स्पष्टोक्तया समर्थांच्या प्रसिद्ध आहेत. व्हानसंगानें वर्णिलेला चालुक्यांच्या वेळचा महाराष्ट्रधर्म रामदासांनीं पुनः उज्जीवित केला. त्याचा प्रभाव महाराष्ट्रसमाजांत कोणत्या प्रकारें झाला तें सर्वश्रुत आहे. ( ६ ) पुनरुज्जीवित महाराष्ट्रधर्म सुमारें शतक दीड शतक चालून, अचेतन भागवतधर्माची लाट कांहीं काल दबली होती ती महाराष्ट्रावर पुनः उसळली. ब्रह्मेंद्रस्वामी, रामजोशी सोलापूरकर, भाऊ महाराज, वगैरे एकदेशी लोक ह्या लाटेचे द्योतक होत. अचेतन भागवतधर्माच्या ह्या शैथिल्योत्पादक लाटेनें समाजांत औदासिन्य उत्पन्न होऊन, भोगलोलुप व बुभुक्षु पाश्चात्यांचें राज्य ह्या देशांत झालें. ( ७ ) तें चालू असतां महाराष्ट्रांत विष्णू कृष्ण चिपळोणकर व महादेव गोविंद रानडे ह्यांनीं अलीकडील चाळीस वर्षांत महाराष्ट्रधर्माच्या प्रस्तावनेची प्रस्तावना किंचित् करण्याचा आरंभ केला आहे. ह्या दोघाचें तत्त्वज्ञान गीता व दासबोध ह्या दोन ग्रंथांतील तत्त्वज्ञानांशीं बरेंच जुळतें आहे. त्यांतल्या त्यांत, रानड्यांना अचेतन व शिथिल अशा भागवतधर्माचे जे कैवारी संत त्यांची परीक्षा यथास्थित करतां आली नाहीं, असें म्हणणें अपरिहार्य आहे. परंतु सामाजिक सुधारणेवरील त्यांच्या इंग्रजी व्याख्यानांत व निबंधांत Organisation, discipline, वगैरे जे शब्द येतात, त्यावरून गीतेचें व दासबोधाचें वारें त्यांना कळत किंवा नकळत लागलेलें आहे, असें दिसतें. असो. ( ८ ) ह्या दोघांच्या तत्त्वज्ञानाला विरोधी असा एक पंथ सध्यां आर्यावर्तांत कांहीं पाश्चात्य मंडळींनीं काढला आहे. त्या पंथाचा गूढ प्रवर्तक कोणी असो, परंतु त्याच्या हेतूची परीक्षा तत्पंथीयांच्या सामान्यतः भाषणांवरून व विशेषतः कृतीवरून यथास्थित करतां येते. मनुष्याच्या ठायीं कांहीं अदृश्य शक्त्या आहेत व त्यांच्या जोरावर तो अद्भुत चमत्कार करूं शकतो, हें ह्या पंथाचें मुख्य तत्त्व आहे. हें अजब तत्त्व पुरातन आर्य लोकांचें असून, वर्तमान आर्यांच्या पुनरुज्जी-

वनार्थ तें आपण हिंदुस्थानांत पुन. जाहीर करीत आहों, असें ह्या पाश्चात्य लोकांचें म्हणणें आहे. ह्या अद्भुत शक्त्यांच्या जोरावर हिंदुस्थान पुनः उदयास येईल असेंहि हे लोक प्रतिपादितात. हवेंतून उडणें, पाण्यावरून चालणें, हजारों कोसांवरून पहाणें, वगैरे अमानुष सामर्थ्य पुरातन ऋषींच्या ठायीं जें होतें अशी कल्पना आहे, तें वर्तमान हिंदूंना अभ्यासानें येणें शक्य आहे; वगैरे थापा, हे लोक गंभीरपणानें मारीत असतात व इकडील कित्येक मंदबुद्धि व आळशी "सुशिक्षित" लोक परम भक्तीनें त्या ऐकत असतात. या अद्भुत लोकांना "थिआसोफिस्ट" ही संज्ञा आहे. ह्यांचें तत्त्वज्ञान जर आधुनिक हिंदुसमाजांत प्रचलित झालें, तर अद्भुत शक्त्यांनीं व हटयोगानें पाश्चात्य प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव आपल्याला सहज करतां येईल, अशी भावना हिंदुसमाजांत उत्पन्न होईल आणि उद्योग व भौतिक शास्त्रें यांकडे दुर्लक्ष होऊन, आलस्य व मांद्य यांचें साम्राज्य वाढेल. यूरोपियन यंत्रशास्त्राचा पाडाव थियासोफिस्टांच्या मंत्रशास्त्रानें होईल, ही कल्पना खोटी आहे. पाश्चात्य लोकांना मंत्रशास्त्रानें हाणून पाडण्याचा खुळा उद्योग, दुसरा बाजीराव, महादजी शिंदे, दौलतराव शिंदे, टिपु सुलतान, वगैरे लोकांनीं केला होता. अद्याप ग्वालेर, इंदोर, नागपूर, बडोदें वगैरे स्थलीं जीं द्राविड मंत्रशाऱ्यांचीं घरें आहेत, तीं मंत्रशास्त्रानें यजमानाचा उत्कर्ष व शत्रूचा अपकर्ष होत नाहीं, असें स्पष्ट सांगत आहेत. थियासोफिस्टांच्या मंत्रशास्त्रांच्या सोडतींत उद्योगाचें मातेरें खात्रीनें होईल, असें पूर्वानुभव सांगत आहे. ( ९ ) थियासोफिस्टांच्या तत्त्वज्ञानाखेरीज, खिस्ती तत्त्वज्ञान, सरकारी तत्त्वज्ञान, वगैरे आणीक दहापांच तत्त्वज्ञानें सध्यां हिंदुस्थानांत प्रचलित आहेत. त्यांची परीक्षा करण्याचें काम विस्तरभयास्तव वाचकांकडेसच सोंपवितों.

४८ मानवसमाजाच्या चरित्रावर तत्त्वज्ञानाचा परिणाम काय होतो आणि तत्त्वज्ञानाचा व मानवसमाजचरित्राचा बिंबप्रतिबिंबरूप संबंध कसा आहे,तें येथपर्यंत संक्षेपानें सांगितलें. समाजशास्त्र, ज्याला कित्येक यूरोपियन लोक Science of History अशी भ्रामक संज्ञा देतात,तें, जोंपर्यंत निर्माण झालें नव्हतें,तोंपर्यंत तत्त्वज्ञानाचा पगडा समाजाच्या चरित्रावर अप्रातिबद्ध चालत होता. परंतु ही स्थिति ह्यापुढें अशीच टिकणें अशक्य आहे. नियमांनीं बद्ध अशा शास्त्राचा जसजसा उदय होत जाईल, तसतसा स्वैर संचार करणाऱ्या अनियमित तत्त्वज्ञानाचा अस्त कालान्तरानें झालाच पाहिजे, हा सिद्धान्त जसा स्पष्ट मनांत उतरावा तसा कित्येक यूरोपियन ग्रंथकारांच्या मतांत न उतरल्यामुळें, ते Philosophy of History व Science of History ह्या दोन वस्तू एकच समजतात. Philosophy of History व Science of History ह्या दोन शब्दसमूहांत समाज शब्दाच्या ऐवजीं इतिहास ह्या शब्दाचा चुकीनें उपयोग हे लोक करतात, एवढेंच नव्हे; तर Science व Philosophy ह्याहि शब्दाचा घोटाळा ह्यांच्या ग्रंथांत पदोपदीं होतो. इसवी सन १८७४ त राबर्ट फ्लिंट नामक गृहस्थानें Philosophy of History in Europe हा ग्रंथ लिहिला. ह्याचें प्रारंभीचें वाक्य असें:-One result of this inquiry should be to afford a clear view of what the Phi-

losophy or Science of History is. हा गृहस्थ उत्कटत्वानें ख्रिस्ताभिमानी असून, प्रत्येक तत्त्वज्ञाचे दोष काढण्यांत ह्याचा हातखंडा आहे. परंतु, Philosophy व Science ह्या दोन वस्तू हा टीकाकार एक मानतो, हा ह्याचा मुख्य दोष आहे. अन्वयव्यतिरेकादि नियमांना धरून चालणारें जें तें शास्त्र व अन्वयव्यतिरेकाच्या साहाय्यानें शास्त्राची जेथें गति चालत नाहीं त्या प्रांतांत स्वैर वावरणारें जें तें तत्त्वज्ञान, हा भेद हा दोषैकदृष्टि टीकाकार अजबात विसरतो. व्यक्तमध्य समाजाच्या चरित्रांतील ज्या गोष्टींची संगति लागावी अशी उत्कट इच्छा असते, ती संगति तत्त्वज्ञानानें लागली, असा भास होतो खरा, व ह्या भासाचा परिणाम समाजाच्या चरित्रावर अनिवार होतो, हेंहि खरें; परंतु, एवढ्यानें तत्त्वज्ञान शास्त्राप्रमाणें नियमबद्ध आहे, असें मात्र बिलकुल म्हणतां येत नाहीं. लहान पोर अंधारांत भुताला भितें, हेंहि खरें, व पोराच्या चरित्रावर भुताच्या भासाचा परिणाम होतो, हेंहि खरें; परंतु, एवढ्यानें भुताचें अस्तित्व सिद्ध होतें, असें म्हणणें मात्र बिलकुल टिकणारें नाहीं. भूत ही गोष्ट मानसिक कल्पना किंवा Psychological fiction आहे; तिला व्यावहारिक सत्यत्व नाहीं. त्याप्रमाणेंच, समाजाच्या आद्यन्तांची माहिती सांगून व्यक्तमध्य प्रपंचाची संगती लावून दिल्याचा भास उत्पन्न करणारें तत्त्वज्ञान केवळ एक प्रचंड Psychological fiction आहे; त्याला व्यावहारिक सत्यत्व नाहीं. शास्त्राचा, तर, मुख्य बाणा व्यावहारिक सत्यत्वावर आहे. तत्त्वज्ञानाच्या राज्यांतील एक एक वस्तु शास्त्र दिवसेंदिवस हस्तगत करीत व त्याला व्यावहारिक सत्यत्वाचें रूप आणीत चाललें आहे आणि असा एक समय हजारों वर्षांनीं येईल कीं, जेव्हां तत्त्वज्ञानाचा सर्व प्रांत शास्त्र आक्रमून टाकील. तोंपर्यंत शास्त्र व तत्त्वज्ञान ह्यांचे प्रांत नीट आखून भिन्न केले पाहिजेत, हें उघड आहे ! नाहीं तर पारमार्थिक व काल्पनिक विधानांना व्यावहारिक सत्यत्व दिलें जाईल आणि व्यवहारांत पदोपदीं पराभव होत जाईल. उदाहरणार्थ, ख्रिस्ती तत्त्वज्ञान घ्या. ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचें व पुराण इतिहासाचें मुख्य पुस्तक जें बायबल त्यांत, ( १ ) मनुष्यसमाज ईश्वरानें आठ हजार वर्षांपूर्वी आदम नांवाचा मनुष्य उत्पन्न करून चालू केला, ( २ ) एन्जल नांवाचे देवदूत मनुष्याचें रक्षण करीत असतात, ( ३ ) सैतान नांवाचा एन्जल मनुष्याला भ्रष्ट करतो, ( ४ ) ख्रिस्तानें सर्व भूत, भविष्य व वर्तमान ख्रिस्ती मानवप्राण्यांचें पाप स्वतः प्रक्षाळून टाकलें आहे, ( ५ ) ईश्वर स्वर्गात रहातो, ( ६ ) मृत मनुष्यें पुढें एकदां एकदम सदेह पुनरुज्जीवित होणार आहेत व त्यावेळीं पापपुण्यांचा झाडा होणार आहे, वगैरे शेकडों कल्पित, खुळीं व रानटी विधानें केलेलीं आहेत. तीं जर यूरोपीयन ख्रिस्तीसमाज खरी धरून चालेल, तर ज्याला सध्यां इतिहास, मानवशास्त्र, तर्कशास्त्र, भूस्तरशास्त्र वगैरे म्हणतात त्यांचें प्रणयन अशक्य होईल. वस्तुस्थिति अशी आहे कीं बायबलांतील हीं निराधार व काल्पनिक विधानें तिरस्कारानें एकीकडे ठेवून, यूरोपांत इतिहास व शास्त्र यांची निर्मिति चालली आहे. वर्तमान यूरोपांतील सर्व व्यवहार बायबलांतील काल्पनिक व निराधार विधानांच्या विरुद्ध चालला आहे. अनेक भ्रामक विधानांचें भांडारगृह जें बायबल तें समुद्रांतील दीपगृहाप्रमाणें धर्मपुस्तक करून, त्याच्या आसपास बिलकुल विश्वास ठेवाव-

याचा नाहीं, व अन्वयव्यतिरेकादि तर्कपद्धतीच्या जोरावर जें खरें असेल तें शास्त्र व तेवढें प्रमाण मानावयाचें, असा प्रकार यूरोपांत प्रस्तुतकालीं चालला आहे. आणि तो सर्वथा स्तुत्य व उपयोगी आहे. बायबलांतील तत्त्वज्ञानानें मानवसमाजाच्या आद्यन्तांचा छडा लागल्याची समजूत वाटेल त्यानें खुशाल करून घ्यावी, परंतु व्यवहारांत त्याची मातबरी व सत्यता काडीमात्र नाहीं हें उघड आहे. हीच विचारसरणी इस्लामी, बौद्ध व मूर्तिपूजक वगैरे सर्व तत्त्वज्ञानांना लाविली पाहिजे. तात्पर्य, Philosophy व Science ह्यांचे प्रांत भिन्न आहेत, हें पक्कें ध्यानांत ठेऊन चाललें पाहिजे. मग, तें तत्त्वज्ञान धार्मिक ग्रंथांतून प्रतिपादलेलें असो किंवा दर्शनांच्या रूपानें आविर्भूत होवो. कोणत्याहि रूपानें तें जन्मास येवो, त्याला शास्त्राप्रमाणें व्यावहारिक सत्यत्व नाहीं.

४९. शास्त्र व तत्त्वज्ञान, यांचे प्रांत भिन्न केले, म्हणजे यूरोपीयन व भारतीय "Philosophy of History" चा परिचय करून घेण्याचा मार्ग खुला होतो. युरोपांतील ऐतिहासिक तत्त्वज्ञांच्या दोन शाखा आहेत. एक शाखा विवेचकपद्धतीनें हजारों ऐतिहासिक प्रसंगांची छान करून अनुनयनपद्धतीनें सदर प्रसंगांची कार्यकारणपरंपरा शोधीत सामान्य कारणांपर्यंत येऊन ठेपते, व एवढ्यानें आपलें कार्य संपलें असें समजते. मानवसमाजाच्या चरित्राच्या आद्यन्तांचा शोध लावण्याचा किंवा लागल्याचा बाणा ही शाखा धरीत नाहीं. ह्या शाखेला A posteriori व inductuctive असें नामाभिधान दिलें असतां शोभण्यासारखें आहे. दुसरी शाखा तत्त्वज्ञांनीं स्वतंत्र रीतीनें कल्पिलेल्या सर्वसामान्य आदिकारणाचा स्वीकार करून त्याचा परिष्कार मानवसमाजाच्या चरित्रांतील प्रसंगसमूहावर व प्रत्येक प्रसंगावर कसा झाला आहे तें निर्णयपद्धतीनें करून दाखविण्याची ईर्षा बाळगते. मानवसमाजाचा आद्यन्त तर्कदृष्ट्या व तत्त्वदृष्ट्या आपल्याला माहीत आहे व अखिल मानवसमाजाच्याच नव्हे तर अखिल सृष्टीच्या आदिकारणांशीं आपला परिचय आहे, असा अभिमान ह्या शाखेला आहे. ह्या शाखेला A priori व deductive ही संज्ञा मतैक्यानें लाविली जाते. स्पेन्सर, हक्स्ले, कोंटे वगैरे भौतिक शास्त्रज्ञ अनुनयनपद्धतीचे कैवारी आहेत; आणि प्लेटो, क्यांट, हेगेल, वगैरे बडीं बडीं धेंडें निर्णयनपद्धतीचे वाली आहेत. ह्या निर्णायक तत्त्वज्ञांच्या विचारांचाच पगडा समाजाच्या चरित्रावर फार झालेला आहे. भौतिकशास्त्रांची जी अनुनयनपद्धती—जिची उत्पत्ति व वृद्धि अलीकडील तीनशें वर्षांतली आहे—तिच्याविरुद्ध यद्यपि ही तात्त्विक व निर्णायकपद्धति आहे, तत्रापि प्रपंचाचा सामग्र्यानें अर्थ कळण्याचा मार्ग ह्या पद्धतीनें सुकर होऊन, मनाला शांति व समाधान प्राप्त होतें. हेंच ह्या पद्धतीच्या साम्राज्याचें बीज आहे. प्रपंचाच्या दाहानें संतप्त व उद्विग्न व्यक्तींच्या समाजाला शांत व समाधायक आश्रय मिळवून देण्याचें आश्वासन निर्णायक तत्त्वज्ञांनीं घेतल्यामुळें त्यांचें वजन मानवसमाजावर पडावें, हें रास्तच आहे. परंतु, विवेचक व अनुनायक दृष्टीनें पाहिलें तर, निश्चयानें अमुक गोष्ट साधार व अमुक निराधार आहे, ही फोड अनुनायक शास्त्रज्ञांच्या द्वारांच होण्यासारखी आहे. निर्णायकपद्धती समाजाच्या स्थैर्याला पोषक आहे व अनुनायकपद्धती समाजाच्या

नतीला अनुमोदक आहे, कोणत्याहि जिवंत समाजांत ह्या दोन्ही पद्धतींचा कमीजास्त मानानें अंश सांपडतो. सारांश, जोंपर्यंत अज्ञेय सृष्टि अस्तित्वांत आहे व तिला ज्ञेय रूप देण्याचा प्रयत्न चालू राहील, तोंपर्यंत ह्या दोन्ही पद्धतींचा अवलंब समाजांत जारीनें चालू राहील. इतकें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, अनुनायक पद्धतीचा अवलंब करणारे समाजशास्त्रज्ञ होत व निर्णायक पद्धतीचा अवलंब करणारे केवळ काल्पनिक तत्त्वज्ञ होत. पहिले पायाकडून अज्ञेय शिखराकडे जात आहेत व दुसरे काल्पनिक शिखराकडून पायाकडे येत आहेत. व्यावहारिक सत्य पहिल्यांच्या बाजूला आहे व तात्त्विक सत्य दुसऱ्यांच्या पक्षाला आहे. दोघांचाहि हेतु सत्याचा पाठलाग करण्याचा आहे. बहुशः सत्याची पारध या अधऊर्ध्व गतींतील भेटींत संपण्याचा संभव आहे.

५०. यूरोपांत ऐतिहासिक तत्त्वज्ञानाच्या ज्या अनुनायक व निर्णायक नांवाच्या दोन शाखा आहेत, त्यांपैकीं अनुनायक पद्धतीचा उदय भारतवर्षांत व महाराष्ट्रांत अद्याप झाला नाहीं. निर्णायक अथवा A priori अथवा deductive अथवा पूर्वग्रहात्मक पद्धतीचेंच राज्य या देशांत आज दोन हजार वर्षें चालू आहे. भारतवर्षांतील ऐतिहासिक निर्णायक पद्धतीच्या दोन शाखा आहेत. सर्व चराचर सृष्टीशीं समबुद्धि ठेवून चालणारी एक शाखा आहे. ह्या शाखेंत लोष्ठ, अश्म, कांचन, पशु, पक्षी, मनुष्य, गंधर्व, यक्ष, ईश्वर व ब्रह्म ह्यांचें तादात्म्य कल्पून व्यक्तिमात्राचें आचरण चालावें असा उपदेश केलेला असतो. प्रपंचांत जन्मावें लागतें, त्याला उपायच नाहीं. परंतु, जन्म हें एक महद्दुःख कल्पून व प्रपंचाचा म्हणजे समाजाचा स्पर्श अपरिहार्य मानून, देहाचा त्याग करून ब्रह्मांत विलीन होण्यांत पुरुषार्थ आहे, अशी ह्या शाखेची समजूत आहे. म्हणजे प्रपंच, संसार, समाज, समाजाची धडपड, राष्ट्र, राज्ययंत्र, धर्मयंत्र, युद्धयंत्र, व्यक्तिस्वातंत्र्य, समाजस्वातंत्र्य वगैरे सर्व संस्थांचा व व्यवहारांचा पूर्ण तिटकारा ह्या शाखेच्या मनांत भरलेला असतो. ह्या शाखेचे पक्के, अर्धे, चौथाईचे, असे अनेक भेद आहेत. ब्रह्मांत विरून जाण्याला सर्व चराचर सृष्टीशीं समबुद्धि ठेवणें म्हणजे व्यक्तित्वाचा अत्यंत लोप करणें आहे. व्यक्तित्वाचा अत्यंत लोप म्हणजे समाजत्वाचाहि अत्यंत लोपच होय. कारण, समाज म्हणजे व्यक्तींचा समुदाय होय. ह्या शाखेला ममत्वबुद्धि आत्म्याच्याहि ठायीं राहिलेली नसते. ज्ञान व अज्ञान ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच सिद्ध व असिद्ध हे लोक मानतात. फार कांय सांगावें, सिद्धि व असिद्धि ह्या परस्परविरोधी वस्तु हे लोक एकच समजतात. ह्या मताचा कट्टा पुरस्कर्ता महाराष्ट्रांत ज्ञानेश्वर झाला. त्याच्या अमृतानुभवांत अज्ञानखंडनाप्रमाणेंच ज्ञानाचेंहि खंडन केलेलें आहे. शिष्य म्हणजे गुरु व गुरु म्हणजे शिष्य, बायको म्हणजे आई व आई म्हणजे बायको, पुरुष म्हणजे प्रकृति व प्रकृति म्हणजे पुरुष, आपण म्हणजे ईश्वर व ईश्वर म्हणजे आपण, इतकी व्यष्टि व समष्टि ह्यांची जेथें तादात्म्यास्थिति झाली, तेथें प्रपंच कसला आणि इतिहास कसला! हें तत्त्वज्ञान किंवा ह्याचा अल्पहि अंश ज्यांच्या डोक्यांत भरला, त्यांना समाजहि नाहीं व राष्ट्रहि नाहीं. पूर्णत्वाची, शून्यत्वाची, समत्वाची, अमृतत्वाची, कल्पना ज्या विचारांत परिपूर्ण भरली

तो विचार विचाराभावाच्या रूपाला पोंचला. त्याला विचार, आचार, उच्चार करण्याची जरूरच राहिली नाहीं. अखंडैकरसांत, आत्मस्वरूपांत, स्वसंवेद्यत्वांत, अनाद्यनन्तांत निमग्न झाल्यावर आणखी निमग्न तें कशांत व्हावयाचें ? वस्तीचें गांव गांठल्यावर प्रवास कोठें करावयाचा ? असली ही विलक्षण शाखा आहे. चिरंजिव, जीवन्मुक्त, संन्यस्त, व उदासीन असल्या लोकांना समाज व संसार व प्रपंच व इतिहास व तत्त्वज्ञान, हीं काय करावयाचीं ? ह्या लोकांचें व्यक्तिस्वातंत्र्य अथवा ममत्व इतक्या प्रकर्षाला पोंचलें कीं, समाजापासून पूर्णपणें विलग होण्यापर्यंत त्यांची मजल गेली. अथवा ज्यांना समाज नाहीं-सारखा मानण्यांत पुरुषार्थ वाटला त्यांना ममत्व तरीं कोठें राहिलें ? ममत्व ही वस्तु समाजत्वाच्या तुलनेनेंच भासमान होणारी आहे. तात्पर्य, ममत्व व ममत्वाभाव, अहंता व अहंताभाव, मृतत्व व अमृतत्व, अशा परस्परविरुद्ध स्थितिप्रत ही मंडळी जाऊन पोंचली. अशांचें तत्त्वज्ञान जसें प्रपंचाला तसेंच परमार्थालाहि परम बाधक होय. ह्यांना प्रपंचहि नाहीं व परमार्थहि नाहीं. कारण, परमार्थाला आपण जाऊन पोंहोंचलों व प्रपंचाला सोडून दिलें, अशी ह्यांची भावना असते. ह्या शाखेच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम महाराष्ट्रांत दोन चार वेळां झालेला आहे व जेव्हां जेव्हां झाला आहे तेव्हां तेव्हां राष्ट्रत्वाचा लोप होऊन गेला आहे. जीवन्मुक्त, संन्यस्त, व विरक्त ह्यांनीं प्रपंच सोडलेलाच असतो; तेव्हां त्यांची कांहीं हानि व्हावयाची राहिलीच नसते. ज्यांनीं प्रपंच सोडला नाहीं, त्यांची मात्र ह्या तत्त्वज्ञानानें पुरी फजिती होते. व्यक्तींचा समुदाय जो समाज किंवा राष्ट्र त्यांच्या प्रपंचाला व परमार्थ मार्गाला तर हें तत्त्वज्ञान अत्यंत घातक असतें. समाज किंवा राष्ट्र ह्यांना समाजाचा किंवा राष्ट्राचा तिटकारा करावयास शिकविणें म्हणजे समाजाला किंवा राष्ट्राला नाशाच्या पंथासच लावणें आहे. शिवाजीच्या हत्तींना, रथांना व घोड्यांना व जनसमूहाच्या मताला धाब्यावर बसविणारा तुकाराम, ज्ञानेश्वराचाच शिष्य होय. ही ग्यानबा-तुकारामांची जोडी महाराष्ट्रांतील समाजाच्या व राष्ट्राच्या प्रपंचाला बहुत घातक झालेली आहे. जर्मनींत इसवीसनाच्या अठराव्या शतकांत असाच प्रकार झाला. लेसिंग, गेटी, शिलर, हेगेल, फिश्ट, वगैरे जिवनमुक्तांच्या तत्त्वज्ञानानें राष्ट्राचा व प्रपंचाचा अभिमान कर्त्या व विचारी लोकांना वाटेनासा झाला व नेपोलियनाच्या मगरमिठींत जर्मन लोक सांपडले. * जगांतील माणसापुरतीच असणारी ही जर्मनींतलि समबुद्धि जर्मन राष्ट्राच्या

---

* History itself soon began to teach the Germans the superficiality of their notions on these subjects in a severe and bitter but effective way. They had come to fancy the principle of true culture to be the enthusiasm of humanity, a passionate vague love of man as man, in which patriotism and other particular affections are absorbed and lost. Many even of the men who did most to found German nationality regarded national feeling as but another name for an irrational prejudice. Frederick the

[ पुढें चालू ]

नाशास कारण झाली. अखिल चराचर सृष्टीची समबुद्धि ठेवणारी महाराष्ट्रांतील Cosmopolitanism महाराष्ट्राच्या नुसत्या राष्ट्रनाशासच तेंवढी कारण झाली असें नाहीं; तर ह्या राक्षसीच्या उपदेशानें कला, संपत्ति, संतति, वगैरे सर्व संस्कृतीचा लोप झाला.

विद्यापि खेदकलिता विमुखी बभूव !

आणि मोक्षाची व परमार्थाची प्राप्ति एकीकडेच राहून, स्वतःच्या घरांत गुलामाप्रमाणें राबून परक्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा दुर्घट व लाजिरवाणा प्रसंग मात्र आला !!!

५१. भारतवर्षांतील ऐतिहासिक निर्णायक पद्धतीच्या एका शाखेचें रूप असें आहे. दुसरी जी शाखा तिला पहिलींतील गोम कळून चुकली आहे. अखिल कर्माचा किंवा समाजाचा त्याग करणें संन्याशाला किंवा मनुष्यमात्राला अशक्य असल्यामुळें, ह्या अशक्य स्थितीचा निषेध ही शाखा कंठरवानें करते. “ आये दुःखं व्यये दुःखं धिगर्थान्दुःखकारिणः ” “ मांसपांचालिकायास्तु स्त्रियः किमिव शोभनं ” वगैरे समाज व समाजाच्या धडपडीचा द्वेष करण्यास शिकविणाऱ्या विद्यारण्यांच्या संन्यस्त कल्पऱ्या ह्या शाखेला बिलकूल मान्य नाहींत. “ नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते । मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ।” “ दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत्। स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत्; ॥” वगैरे मतें ह्या शाखेला मान्य आहेत. समाजांत देहधारण करून प्रपंच नियत म्हणून यथास्थित केलाच पाहिजे; मोहानें त्याचा त्याग करणें तामस होय; संपत्तीपासून किंवा पोराबाळापासून म्हणजे समाजापासून दुःख होतें म्हणून तो टाकणें

---

Great did so; Lessing confessed he could not understand what patriotism meant; Goethe and Hegel were devoid of it; Schiller said it was chiefly of importance for unripe nations and the youth of the world, but that throughful men could not grow warm over a particular nation, except in so far as its fortunes influence the progress of the species; and Fichte, very shortly before the battle of Jena, declared that only a mere earthborn man would mourn over the fall of his country, and that a man of true culture would ever regard the nation whose culture was highest as the real fatherland and home of his spirit. But the shame of actual national humiliation and the discipline of national suffering taught the Germans the shallowness of their cosmopolitanism and its culture, and the value of national feeling and life; taught them to study themselves, to seek to know and be themselves, to get down to the roots of their weakness that they might root them out, and to the roots of their strength that they might understand how to develop them. And the whole world knows how amply they have profited by the teaching.

भयावह आहे, असें तत्त्व ही शाखा मानते. " प्रपंच साधुनी परमार्थाचा लाभ ज्यानें केला, तो नर भला, " असा उत्तमोत्तम सिद्धान्त या शाखेचा आहे. ह्या शाखेचें ऐतिहासिक निर्णायक तत्त्वज्ञान स्थूलत्वानें असे. केव्हांहि व कोठेंहि कोणत्याहि मनुष्यसमाजाच्या शाखेंतील लोकांचे चार प्रकार असतात. प्रपंचाचा अर्थ न कळतां प्रपंचाच्या गोंधळांत अज्ञानानें बद्ध होऊन गेलेल्या माणसांचा पहिला वर्ग. प्रपंचाचा अर्थ कळून घेण्याची इच्छा गुरुकृपेनें म्हणजे सिद्ध म्हणजे ज्ञाते यांच्या कृपेनें ज्यांना होते त्या मुमुक्षूंचा म्हणजे प्रपंचाचा व परमार्थाचा संबंध काय आहे तें समजून घेऊन परमार्थाकडे प्रपंचांतून सुटून जाऊं इच्छिणारांचा जो वर्ग तो दुसरा वर्ग होय. प्रपंचाचा अर्थ कळण्याची नुसती इच्छाच नव्हे, तर अर्थ कळून तदनुसार आचारण ठेवण्याचा अभ्यास करणाऱ्यांचा जो वर्ग तो तिसरा वर्ग. ह्या वर्गाला साधकांचा वर्ग म्हणतात. आणि प्रपंच व परमार्थ, वस्तु व आभास, तत् व त्वं यांचा तादात्म्यबुद्धीनें ज्यांना अर्थ कळला व तदनुसार ज्यांचें सहज आचरण होतें त्या सिद्धांचा जो वर्ग तो चवथा व शेवटला. असे मनुष्यांचे चार वर्ग आहेत. अत्यंत कमी संस्कृत समाजाप्रमाणें अत्यंत जास्त संस्कृत समाजांतहि हे चारी वर्ग निरनिराळ्या प्रमाणानें सांपडतात. मानसशास्त्राच्या अनुरोधानें हे चार वर्ग केलेले आहेत, कालानुक्रमानें केलेले नाहींत, हें ध्यानांत धरलें पाहिजे. म्हणजे, दहा हजार किंवा वीस हजार वर्षांपूर्वी प्रथम सर्व लोक बद्ध होते, पुढें पांच हजार वर्षांनीं मुमुक्षू झाले, नंतर चार हजार वर्षांनीं साधक झाले व आतां सिद्ध होत आहेत, असा प्रकार नाहीं. तर जेव्हां केव्हांपासून मानवसमाजाचा इतिहास कळूं लागला, तेव्हांपासून हें चार वर्ग समाजांत दृष्टोत्पत्तीस येतात. इतकेंच कीं कधीं मुमुक्षूंच्या मानानें बद्धांची संख्या जास्त असते व कधीं कमी असते. बद्धांची संख्या जेव्हां जास्त असते, तेव्हां धार्मिक, सामाजिक, राजकीय व मानासिक बंधन, दास्य, अथवा गुलामगिरी समाजांत जास्त आविर्भूत होते. आणि कमी असेल तेव्हां धार्मिक, सामाजिक, राजकीय व मानासिक स्वातंत्र्य समाजांत नांदूं लागतें. असा ह्या शाखेचा मुख्य ऐतिहासिक सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त श्रीसमर्थ रामदासस्वामी यांणीं दासबोधांत बऱ्याच विस्तारानें प्रपंचिला आहे व तो प्रपंच ग्रंथमालेंतील "रामदास" ह्या निबंधांत मीं स्पष्ट करून सांगितला आहे. सबब त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. येथें रामदासी तत्त्वज्ञानांत व संन्यस्त तत्त्वज्ञानांत इतिहासाच्या अथवा प्रपंचाच्या अथवा समाजाच्या दृष्टीनें भेद कोणता आहे, तें मात्र सांगतों. बद्ध, मुमुक्षु व साधक यांना संन्यस्तांचें तत्त्वज्ञान प्रपंच म्हणजे समाज सोडून देण्याचा अशक्य उपदेश करतें. हा अशक्य उपदेश रामदासी व नैतिक तत्त्वज्ञान सांगत नाहीं. कारण, नरदेह धारण करणाऱ्यांना—मग ते बद्ध असोत किंवा सिद्ध असोत—प्रपंच व समाज सहज असून कदापिहि सुटण्यासारखे नाहींत. प्रपंचांत राहूनच, प्रपंच उत्तमोत्तम करूनच, परमार्थाचें साधन करावयाचें आहे. परमार्थाचें साधन करण्यास, परमार्थाची सिद्धि होण्यास, प्रपंच हाच एकटा अनन्य मार्ग आहे. प्रपंच सोडल्यावर, परमार्थ ही वस्तूच रहात नाहीं. प्रपंच आहे तोंपर्यंतच परमार्थ ह्या वस्तूंत हांशील आहे. सारांश, प्रपंच साधून परमार्थाचा लाभ करून

घेणें, हाच परम पुरुषार्थ होय. तेव्हां, बद्धांना व मुमुक्षूंना सन्याशाचें एकदेशी तत्त्व अमलांत आणावयास सांगणें केवळ मौर्ख्य आहे. प्रपंच सुटावयाचा नाहीं व संन्यास साधावयाचा नाहीं, अशी त्रिशंकुवत् अवस्था असल्या गुरुशिष्यांची अवश्य व्हावयाची. अशी दुरवस्था आर्य समाजाची अनेक वेळां झालेली आहे. तींतून सोडविण्याचा प्रयत्न भगवद्गीता व दासबोध या दोन ग्रंथांनीं केला आहे. ह्या दोन ग्रंथोत्तमांतल्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा यथास्थित व सर्वांगांनीं खुलासा करण्यास आणि त्याची तुलना यूरोपांतील पन्नास शंभर ऐतिहासिक तत्त्वज्ञानांशीं करून दाखविण्यास, एखादा स्वतंत्र ग्रंथच लिहिणें जरूर आहे. भगवद्गीतेंत वेदान्तापेक्षां इतिहासाचें म्हणजे प्रपंचाचें म्हणजे समाजाचें तत्त्वज्ञान स्पष्ट करून दाखविण्याचा विशेष कटाक्ष आहे, हें बीज महाराष्ट्रांतील लोकांच्या जितकें जास्त ध्यानांत येईल तितकें जास्त हिताचें होईल.

५२. इतिहासाचें खरें स्वरूप काय, सध्यां आपल्या देशांत तो कोणत्या रूपानें दाखविला जातो व वस्तुतः तो कोणत्या रूपानें दाखविला जाणें जरूर आहे, ह्या तीन प्रकरणांचा विचार करण्याची प्रतिज्ञा मागें केली होती. पैकीं इतिहासाचें खरें स्वरूप काय, ह्या प्रश्नाचें उत्तर येथपर्यंत दिलें. पूर्वप्रलयीन कालापासून आतांपर्यंत पृथ्वीवरील सर्व देशांतील अखिल मानवसमाजाचें इत्थंभूत जें चरित्र तें इतिहास होय. कौलिक पद्धतीनें मानवसमाजाचें वर्गीकरण करून, प्रत्येक शुद्ध व भ्रष्ट शाखेचें चरित्र कालानुक्रमानें व देशपरत्वें दिल्यानें इतिहासलेखनाला सौकर्य येतें. समाजाच्या चरित्रांतील शेकडों व हजारों प्रसंग केवळ नमूद करून इतिहासाचें काम भागत नाहीं; तर प्रसंगांचें पौर्वापर्य व कार्यकारणसंबंध दाखवून, ऐतिहासिक कारणपरंपरा सिद्ध करावी लागते. ह्या कारणपरंपरेलाच मानवसमाजशास्त्र अशी संज्ञा आहे. मानवसमाजशास्त्र व्यक्तमध्य अशा प्रपंचाचा म्हणजे समाजाचा विचार करतें; समाजाच्या आद्यन्ताचा शोध लावून, प्रपंच व परमार्थ ह्यांची संगति करण्याचा पत्कर तें घेत नाहीं. हा पत्कर तत्त्वज्ञान घेतें. मायोपाधिक आत्म्याच्या निरनिराळ्या वृत्तींचा परिष्कार अथपासून आतांपर्यंत व अंतांपर्यंत प्रपंचरूपानें कसा झाला आहे व कसा होईल, वगैरे भूत, भविष्य व वर्तमान समाजचरित्राची संगति लावून दिल्याचा तत्त्वज्ञान बहाणा करतें व ह्या बहाण्याचा त्या त्या काळीं समाजाच्या चरित्रावर अनिवार परिणाम होतो. येथपर्यंत केलेल्या विवेचनाचा हा असा इत्यर्थ आहे. इतिहास, समाजशास्त्र व ऐतिहासिक तत्त्वज्ञान, ह्यांचें खरें स्वरूप काय, तें स्थूलमानानें दाखविण्याचा अल्प प्रयत्न केलेला आहे. त्यावरून समाजाच्या सुस्थितीला ज्ञानाच्या ह्या त्रिविध शाखेचा उपयोग काय होतो, तें सूक्ष्मदृष्टीनें मनन करून पहावाचें आहे.

५३. इतिहासाचें खरें स्वरूप काय, हा प्रश्न सोडविला म्हणजे स्वदेशांत तो कोणत्या रूपानें दाखविला जाणें जरूर आहे, हा प्रश्न सोडविल्यासारखाच आहे. खरा इतिहास कोणत्याहि काळीं व कोणत्याहि देशांत एकाच स्वरूपाचा असतो. इतिहास लिहिण्याची जी पद्धति यूरोपांत सशास्त्र समजली जाते, तीच पद्धत हिंदुस्थानांत तितकीच सशास्त्र समजली जाते. इतिहास राजकीय असो, धार्मिक असो, सामाजिक असो किंवा सांपत्तिक असो; विद्या, युद्ध,

संस्कृति, वन्यावस्था, अनीति किंवा असद्विचार इत्यादि ( एकेका ) कल्पनांचा इतिहास असो; किंवा ह्या कल्पना अमलांत आणणाऱ्या संस्थायंत्राचा असो; तो प्रामाणिकपणें व सशास्त्र लिहिण्याच्या पद्धती सर्व देशांत सर्व कालीं एकच असल्या पाहिजेत. प्रामाणिकपणा व सशास्त्र पद्धती हे दोन इतिहासाचे केवळ प्राण होत. त्यांतल्यात्यांत एक वेळ अशास्त्रता निभावून घेतां येईल. कारण, तिच्यामुळें विषयाची फार झाली तर, व्यवस्थित मांडणी व्हावयाची नाहीं. परंतु, अप्रामाणिकपणा इतिहासप्रणयनाला सर्वस्वीं घातक होय. स्वतःच्या पक्षाच्या किंवा मताच्या किंवा देशाच्या किंवा सत्तेच्या किंवा मतलबाच्या मंडनार्थ एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाच्या किंवा गोष्टीच्या वास्तविक रूपाचा मनास मानेल त्याप्रमाणें जाणून बुजून विपर्यास किंवा भंग किवा लोप करणें म्हणजेच इतिहासप्रदर्शनांत अप्रामाणिकता करणें होय. असल्या अप्रामाणिक इतिहासांनाच इतिहासविकृति अशी संज्ञा आहे. असतें एक व दाखवावयाचें दुसरेंच, हा ह्या अवास्तव इतिहासांचा मुख्य मतलब असतो. असले इतिहास म्हणजे तल्लेखकांच्या मतलबी मतांचीं प्रदर्शनेंच होत. एका समाजानें दुसरा समाज जिंकला म्हणजे जेते लोक असले अप्रामाणिक इतिहास नाना तऱ्हांच्या मतलबांच्या सिद्ध्यर्थ लिहीत असतात. सध्यां इंग्रजींत जे हिंदुस्थानाचें किंवा महाराष्ट्राचे इतिहास किंवा बखरी किंवा निबंधवजा ऐतिहासिक टिपणें किंवा राजकीय, सामाजिक अगर धार्मिक विषयांवर लेख येतात, त्यांपैकीं अनेक अप्रामाणिक व विकृत असतात. अशा लेखांवर भोळेपणानें विश्वास ठेवणाऱ्या लोकांसारखे हतभागी इसम जगाच्या पाठीवर दुसरे कोणी नसतील. परदेशाभिमानाला स्वदेशाभिमान, गुलामगिरीला स्वतंत्रता, परधर्माभिमानाला स्वधर्माभिमान व परभाषाभ्यासाला उदार विद्या, अशीं विकृत नामाभिधानें विकृत इतिहासांत व राजकीय निबंधांत व प्रबंधांत दिलेलीं असतात आणि जित राष्ट्रांतील साध्या भोळ्या तरुणांच्या मतिभ्रंशाला कारण होतात. मतिभ्रंश करणें हा विकृत इतिहासाचा मुख्य मतलब असतो. हे इतिहास लिहिणाऱ्याला लांछनास्पद व वाचणाऱ्याला लज्जास्पद होत.

५४. तेव्हां ह्या विकृत इतिहासाला फार जपलें पाहिजे. परभाषांतून किंवा स्वभाषांतून लिहिलेल्या किंवा लिहिवलेल्या असल्या इतिहासांचा दुष्ट परिणाम टाळावयाला एकच उपाय आहे. तो हा कीं, सशास्त्र पद्धतीनें प्रामाणिक इतिहास स्वभाषेंत स्वदेशांतील तज्ज्ञांनीं लिहिला पाहिजे. परदेशांतील लोक स्वेतर देशाचा इतिहास निःपक्षपातबुद्धीनें लिहितील ही गोष्ट अनेक कारणांस्तव अशक्य असते. एक तर, जो ज्या देशांत जन्मला, वाढला व शिकला, तो त्या देशच्या संस्कृतीनें भारून जाऊन, इतर देशांची संस्कृति कमी दर्जाची साहजिकपणेंच मानूं लागतो. स्वतःचा देश व स्वतःची संस्कृति पृथ्वीवरील सर्व संस्कृतींहून अत्युत्तम व सर्व संकृतीचा केंद्र आहे, असा अभिमान प्रत्येक देशांतील बहुतेक सर्व लहानमोठ्या इतिहासकारांचा असतो. गिझो, फ्रेंचराष्ट्र, व्हिको, इतालियन राष्ट्र, हेगेल, जर्मनराष्ट्र,व बकल,इंग्लिश राष्ट्र पृथ्वीवरील सर्व संस्कृतींचें केंद्र समजतो. आतां प्रत्येक राष्ट्र एकाच वेळीं पृथ्वीवरील सर्व संस्कृतींचें केंद्र असूं शकणार नाहीं, हें स्पष्ट आहे. कोणतें तरी एक

राष्ट्र केंद्र असणें संभवनीय आहे. कदाचित् निरनिराळ्या गुणांचें प्रामुख्यानें अधिष्ठान एकेका राष्ट्राच्या ठायीं असण्याचा संभव व शक्यता आहे. अशी स्थिति असून स्वतःचें राष्ट्र सर्व गुणांचें अधिष्ठान आहे, असें मतप्रदर्शन अभिमानानें व ममत्वानें तत्तद्देशीय इतिहासकार करतात. जिंकलेल्या राष्ट्रावर तर सर्वांचीच इतराजी असते. तशांत तें राष्ट्र पूर्वेकडील असल्यास, पुसावयालाच नको. त्याच्या माथीं असतील नसतील ते सर्व दोष मारण्यांत पाश्चात्य इतिहासकार एकमेकावर चढाओढ करतात. हिंदुस्थानासंबंधानें, तर, त्यांचें ग्रह फारच विपरीत व विपर्यस्त झालेले आहेत. रानटी, पोरकट, खुळा, म्हातारचळ लागलेला, अर्धवट सुधारलेला, भटाभिक्षुकांनीं नाडलेला, दास्यांत डुबलेला, खोटा धर्म पाळणारा, विलासी, संन्यस्त, जादूनें भारलेला, भोळा, लुच्चा, खोटा, खरा, अशीं नाना प्रकारचीं विसंगत विशेषणें हिंदुस्थानाला लावण्यांत पाश्चात्य इतिहासकार मोठा प्रामाणिकपणा समजतात. सर्व चराचर सृष्टीशीं समबुद्धि ठेविल्यानें शक, यवन, किरात, म्लेंछ, मुसुलमान, इंग्रज, फ्रेंच, डच, फिरंगी, वगैरे पश्चिमेकडील अर्धपोटीं, बुभुक्षु, व असंस्कृत समाजांना हिंदुस्थानांत पाय घालता आला, हें कोणीच लक्षांत घेत नाहीं. अत्युत्कट कोटीप्रत पावलेलीं Cosmopolitanism हिंदुस्थानाला राष्ट्रत्वाच्या दृष्टीनें घातक झालेली आहे, हें तत्त्व विसरणें, ह्या लोकांना सध्यां सोईचें दिसतें. पाश्चात्यांचीं हीं आपमतलबी विधानें स्वदेशांतील तज्ज्ञ इतिहासकारांनीं स्वदेशाचा स्वभाषेंत इतिहास लिहून खोडून टाकिलीं पाहिजेत. इतकेंच नव्हे तर, पाश्चात्यांचे हे आपमतलबी विचार स्वदेशांतील साध्याभोळ्या तरुणांच्या अपरिपक्व मनावर बेमालूम ठसण्याचा जो कल दिसत आहे, तोहि वेळींच काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाश्चात्यांचे मतलबी अपविचार व स्वदेशीयांचे तदुद्भूत भ्रष्ट विचार खोडून टाकण्याचा हा प्रयत्न दोन तऱ्हांनीं केला पाहिजे. सशास्त्र पद्धतीनें प्रामाणिक इतिहास एतद्देशीयांतील तज्ज्ञांनीं लिहिल्यानें पहिलें कार्य साधणारें आहे. दुसरेंहि कार्य ह्याच प्रयत्नानें साधेल; परंतु त्याची व्याप्ति स्वदेशीय समाजाच्या अत्यंत संकुचित प्रदेशावर होणार आहे. सूक्ष्म पृथक्करणानें लाखों बाबींचा ज्यांत विस्तृत खल झाला आहे, असले व्यापक इतिहास राष्ट्रांतील फारच थोड्या व्यक्तींच्या उपयोगाचे होतात. इतिहासाचें सूक्ष्म व खोल परिशीलन करण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या व्यक्ती कोणत्याहि कालीं कोणत्याहि राष्ट्रांत फारच थोड्या असतात. व्यक्ति, वर्ग, राष्ट्र, लोक व अखिल मानवसमाज इत्यादींच्या गुणावगुणांचें व स्वभाववैचित्र्याचें ज्या मुत्सद्यांना व विचारवंतांना सूक्ष्म ज्ञान करून घ्यावयाचें असतें, त्यांना हे विस्तृत व गहन इतिहास बहुमोल होत. स्वराष्ट्राच्या व मानवसमाजाच्या इतिहासाचें स्थूल ज्ञान झालें म्हणजे ज्यांची ज्ञानभूक शांत होते, अशा लोकांना हे इतिहास फारसे उपयोगाचे नसतात; आणि असल्याच लोकांचें प्रमाण कोणत्याहि राष्ट्रांत अधिक असतें. अशा लोकांना—स्वराष्ट्राच्या व परराष्ट्रांच्या—इतिहासाचें ज्ञान करून देणें अनेक कारणांस्तव राष्ट्रचालकांना इष्ट असतें. पाठशालांतील व शालांतील विद्यार्थी, शेती, उदीम व व्यापार करणारे धंदेवाले, आणि इतर सामान्य स्त्रीपुरुष, यांना स्वदेशाच्या व परदेशाच्या इतिहासाचें योग्य ज्ञान झाल्यास,

राष्ट्रीय हेतु सफल होण्यास फार साहाय्य होतें. स्वदेश, स्वधर्म, स्वराज्य, स्वभाषा, स्वसंस्कृति वगैरेंचें स्थूल ज्ञान सामान्य जनांना झाल्यास, त्यांच्या ठायीं स्वदेशादिकांच्यासंबंधानें यथार्थ प्रेम सहज वृद्धिंगत होतें आणि स्वसमाजाशीं ताडून पहातां, परसमाज कोणत्या बाबींत समविषम आहेत, तें कमजास्त प्रमाणानें स्पष्ट कळूं लागतें. इतिहासाच्या स्थूल ज्ञानापासून असे नाना प्रकारचे महत्त्वाचे फायदे असल्यामुळें, इतिहास व विशेषतः स्वेतिहास लोकप्रिय करण्याकडे राष्ट्रांतील विचारवंत पुढाऱ्यांची स्वाभाविक व अत्युकट इच्छा असते. ही सदिच्छा सफल करणारीं जीं इतिहासाचीं पुस्तकें त्यांना इतिहासज्ञानप्रसारक हें विशेषण यथास्थित शोभतें.

५५. प्रसारक वर्गांतील कित्येक इतिहास विशिष्ट मतांच्या किंवा संस्थांच्या पक्षपातानें मुद्दाम लिहिलेले असतात. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृति सर्व जगांत श्रेष्ठ आहेत व परदेश, परधर्म वगैरे कनिष्ठ आहेत, असें प्रतिपादन करण्याची असल्या इतिहासाची प्रतिज्ञा असते. परदेश जिंकण्याची व स्वदेशाला उत्कर्षाप्रत नेण्याची हांव धरणाऱ्या राष्ट्रांत बहुतेक प्रसारक इतिहास स्वदेश, स्वधर्म, स्वभाषाभिमानी असतात. स्वदेशाभिमानी लेखकांच्या हातून असला प्रकार होणें रास्तच आहे. कोंवळ्या व अपरिपक्व बुद्धीच्या माणसांच्या ठायीं स्वदेशादिकांबद्दल प्रेम उत्पन्न करावयाला स्वदेशाभिमानीच इतिहास हवा असतो. स्वदेश भिकार, स्वराष्ट्र कुचकामाचें, स्वभाषा दरिद्री, स्वधर्म खोटा, स्वजन लुचे, व स्वतःचे आईबाप अडाणी, असें वर्णन स्वदेशाच्या ज्या इतिहासांत केलेलें असतें, तें वाचून कोंवळ्या व अपरिपक्व बुद्धीच्या माणसांना स्वदेशादिकांविषयीं प्रेम कसें बरें उत्पन्न होईल ? परंतु असलेहि इतिहासकलंक कित्येक देशांत प्रत्यक्ष देशांतल्या लोकांच्या हातून निर्माण होतात ! असल्या इतिहासांना स्वदेशावमानी इतिहास अशी संज्ञा आहे. स्वदेशावमानी इतिहास लिहिणारेच स्वशालोपयोगी परदेशाभिमानी इतिहास लिहित असतात. स्वदेशावमानी व परदेशाभिमानी अशा इतिहासकाराधमांची ही दुक्कल स्वतंत्र राष्ट्रांत क्षणभरदेखील टिकत नाहीं; त्यांची वाढ परतंत्र राष्ट्रांतच शक्य असते. हे अभिमानी इतिहास नाना प्रकारचे असतात. कित्येकांत राज्ययंत्राचा अभिमान, कित्येकांत राजाचा अभिमान, कित्येकांत महाजनांचा अभिमान, कित्येकांत सुधारणेचा अभिमान व कित्येकांत स्वजातीचा अभिमान ओतप्रोत दाखविलेला असतो. अशा हेतूनें कीं, अजाण वाचकांना इष्ट व्यक्तीचा, वर्गाचा किंवा मताचा योग्य व क्वचित फाजिलहि अभिमान उत्पन्न व्हावा. हे अभिमानी इतिहास केवळ इतिहास नव्हत, तर मतलबी लोकांच्या मतांचीं प्रसरणद्वारेंहि होत. वाईट मतलबाप्रमाणें चांगल्या मतलबाच्याहि सिद्धीला असल्या विकृत इतिहासांचा उपयोग होतो. प्रसारक इतिहासांचे अनेक प्रकार आहेत; पैकीं कांहींचा येथें निर्देश करतों:—

( १ ) शालोपयोगी इतिहास.
( २ ) पाठशालोपयोगी इतिहास
( ३ ) स्वदेशाभिमानी इतिहास.

( ४ ) स्वदेशावमानी इतिहास.
( ५ ) परदेशाभिमानी इतिहास.
( ६ ) परदेशावमानी इतिहास.
( ७ ) स्वराज्याभिमानी इतिहास.
( ८ ) लोकाभिमानी इतिहास.
( ९ ) महाजनाभिमानी इतिहास.
( १० ) धर्माभिमानी इतिहास.
( ११ ) व्यक्त्यभिमानी इतिहास.
( १२ ) सुधारणाभिमानी इतिहास.
( १३ ) स्वजात्यभिमानी इतिहास.
( १४ ) स्वभाषेंत लिहिलेला स्वदेशाचा इतिहास.
( १५ ) स्वदेशांतील लोकांकरितां परभाषेंत लिहिलेला स्वदेशाचा इतिहास. वगैरे, वगैरे, वगैरे.

चवथ्या, पांचव्या व पंधराव्या नंबरचे प्रसारक इतिहास स्वतंत्र राष्ट्रांत असूं शकत नाहींत; परतंत्र राष्ट्रांत असूं शकतात. कारणें खोल नसल्यामुळें, त्यांचा निर्देश करून जागा अडवीत नाहीं.

५६. निःपक्षपात व निरहंकार बुद्धीनें इतिहास लिहिणें म्हणजे काय, खऱ्या व निर्भेळ इतिहासाचें रूप कसें असतें, तो लिहिण्याच्या सशास्त्र पद्धती कोणत्या, प्रसारक इतिहास कशाला म्हणावें, अभिमानी इतिहास कशाकरतां लिहितात, व इतिहासविकृति म्हणजे काय चीज आहे, वगैरे प्रकरणांचें संक्षिप्त दिग्दर्शन येथपर्यंत केलें. आतां महाराष्ट्रांत इतिहासलेखनाची हालहवाल कशी काय आहे, तें पाहूं.

५७. संस्कृत भाषेंत इतिहास व मराठी भाषेंत बखर ज्याला म्हणतात तो सारस्वताचा प्रकार संस्कृतांत व मराठींत फार पुरातन कालापासून असावा, हें ह्या दोन शब्दांच्या अस्तित्वावरून अनुमानतां येतें. संस्कृत इतिहासाचा विचार प्रस्तुतस्थलीं कर्तव्य नसल्यामुळें, प्राकृत व मराठी भाषांतील बखरींपासून महाराष्ट्रांतील इतिहासलेखनाचा इतिहास देण्यास प्रारंभ करणें सयुक्तिक आहे. बक=बकणें, बोलणें, ह्या धातूपासून बखर शब्द मराठींत निपजला आहे. ह्यावरून असें अनुमान करावें लागतें कीं, फार पुरातन कालीं बखरी तोंडानें बोलत असत, हातानें लिहीत नसत. तोंडानें बखरी बोलण्याचा हा काल दोन अडीच हजार वर्षांपलीकडील असावा. कारण, अलीकडील अडीच हजार वर्षांत जेव्हां लेखनकला माहित नव्हती, असा काळ महाराष्ट्रांत आढळत नाहीं. जींत इतिहासाचा कांहीं अंश सांपडतो अशी अत्यंत जुनी मराठी बखर म्हटली म्हणजे शालिवाहनाची बखर होय. ह्या बखरीच्या सध्यां ज्या पोथ्या सांपडतात, त्यांची भाषा लेखकांनीं परंपरेनें आधुनिक करून टाकिली आहे. परंतु, मूळ फार जुनें असावें यांत संशय नाहीं. शालिवाहनाच्या बखरीपुढील जुन्या बखरी मानभावांनीं लिहिलेल्या सिंघणादि यादवांच्या आहेत. ह्या

बखरींपैकीं कांहींचीं पानें मीं पाहिलीं असून, ह्यांची भाषा जुनी आहे. यादवांच्या बखरींच्या बरोबरीचीच हेमाडपंताची बखर समजावी लागते. हिचीहि भाषा लेखकांनीं आधुनिक केली आहे. हेमाडपंतांच्या बखरीच्यापुढील बखर राक्षसतागडीची आहे. ही मुळीं शक १४८८ त लिहिली असून भाषा बरीच तत्कालीन आहे. शक १४८८ च्या नंतर पांचपंचवीस वर्षांनीं भोसल्यांचें कुळ महाराष्ट्रांत उदयास आलें व स्वराज्याचा पाया घातला गेला. तेव्हांपासून शक १७४० पर्यंतच्या अडीचशें वर्षांत ह्या देशांत दोन अडीचशें बखरी मराठ्यांच्या इतिहासांतील निरनिराळ्या प्रसंगांवर लिहिल्या गेल्या. ह्या अडीचशें बखरींत पांचपंचवीस ओळींच्या त्रोटक टिपणापासून हजार हजार पानांच्या बाडापर्यंत संक्षिप्त व विस्तृत इतिहास आले आहेत. टिपणें, रोजनिशा, शकावली, वंशवेल, हकीकती, कुळकट, आत्मचरित्र, राजावलि, अखबारा, दंतकथा, लोककथा, पवाडे, प्रशस्त्या, घराण्यांचीं वर्णनें, युद्धांचीं वर्णनें, मोहिमांचीं वर्णनें, राजनीति, स्मरणवह्या, ताम्रपट, शिलालेख, शिलशिले, दफातीं, निवाडे, ऐतिहासिक लेखसंग्रह, संतचरित्रें, बखरी व इतिहास, अशीं इतिहासाचीं जीं नाना अंगें व उपांगें तीं ह्या काळांत निर्माण झालीं. त्यांपैकीं कित्येक अत्यंत वक्तृत्वप्रचुर असून, कित्येकांत प्रसंगांचें कथन साध्या व सोप्या भाषेंत फार हृदयंगम केलें आहे. ह्या सर्व बखरींत व हकीकतींत असा एक मोठा अद्वितीय गुण आहे कीं, प्रायः झाल्या प्रसंगाची हकीकत सांगतांना सत्याचा अपलाप जाणूनबुजून कोठेंहि केलेला नाहीं. त्यांचीं कांहीं विधानें जर सध्यां अविश्वसनीय भासूं लागलीं, तर त्याचें कारण लेखकांचा असत्याभिमान नसून, त्यांचें अज्ञान किंवा गैरसमजूत आहे, असें आढळून येतें. लेखकांच्या ज्ञानाच्या व्याप्तीच्या प्रमाणें लेखांतील माहिती नाना प्रकारची आहे. प्रत्यक्ष व कर्णोपकर्णी जी माहिती जशी मिळाली, तशी ती टिपून ठेविलेली ह्या बखरींतून आढळते. यूरोपांतील राष्ट्रांच्या अडीचशें वर्षांपूर्वील ज्या बखरी, हकीकती वगैरे आहेत त्यांच्यापेक्षां ह्या बखरी सरस असून विश्वसनीयतेच्या बाबतींत जास्त मान्य आहेत. तीनशें वर्षांपूर्वी यूरोपांतील राष्ट्रांतील जी स्थिति होती, तीपेक्षां शंभर वर्षांपूर्वी महाराष्ट्रदेशाची स्थिति बऱ्याच बाबतींत श्रेष्ठ होती, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां, ह्या बखरींच्या गुणोत्कर्षाचें कारण निराळें धुंडाळावयास नको.

५८. झाली हकीकत, समजली तशी, आपल्या ज्ञानाच्या आंवाक्याप्रमाणें, लिहून ठेविणारे बखरकार शंभर वर्षांपूर्वी आपल्या देशांत झाले, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. परंतु ह्या सर्व बखरकारांच्या ज्ञानाची व्याप्ति अत्यंत संकुचित होती, हीहि गोष्ट सांगितल्याशिवाय गत्यंतर नाहीं. झाली हकीकत, जशीची तशी, सर्वांगांनीं संपूर्ण, अशी देणें मोठें बिकट कृत्य आहे. एखाद्या वैदूला राष्ट्रसभेची जी हकीकत देतां येईल, त्यापेक्षां विस्तृत हकीकत एखादा दशग्रंथी ब्राह्मण देईल; आणि दशग्रंथी ब्राह्मणापेक्षां विस्तृत व कदाचित् कार्यकारणभावसंबंधक हकीकत एखाद्या आधुनिक विद्याधराला देतां येईल. परंतु, यूरोपांतील राज्ययंत्राचा ज्यानें आजन्म अभ्यास केला आहे आणि यूरोपीयन व आशिआटिक अशा अनेक संस्था, शास्त्रें व समाज ह्यांचें पृथक्करण करण्यांत ज्यानें वर्षेंच्या वर्षे

घालविलीं आहेत, अशा एखाद्या चतुरस्र इतिहासज्ञानें जर राष्ट्रसभेचें चरित्र लिहिण्याचें मनांत आणिलें, तर हजारों स्थूल व सूक्ष्म, प्रसिद्ध व गुप्त, क्षुल्लक व महत्त्वाच्या प्रसंगांचें योग्यायोग्यत्व, लघुत्वमहत्त्व व कार्यकारणत्व दाखवून तो जी हकीकत साध्या व समर्पक भाषेनें सांगेल तिच्यांत व उपरिनिर्दिष्ट तिघांच्यांत केवढें थोरलें अंतर पडेल ! चौघांनाहि द्यावयाची आहे झालेली हकीकतच. परंतु ज्याच्या त्याच्या अवांतर ज्ञानाच्या विस्तारामुळें प्रत्येकाच्या हकीकतीचें वैचित्र्य निरनिराळ्या दर्जाचें उठेल, हें उघड आहे. हेंच अवलोकन–वैचित्र्य इतिहासलेखनांतहि दृष्टोत्पत्तीस येतें. ज्या देशांतील लोक देशोदेशीं प्रवास करतात, देशोदेशींचे समाज, धर्म, सारस्वत, संस्था; संस्कृति व इतिहास पाहून तुलनात्मक विचार करण्याची जेथें संवय झाली व देशांतल्या देशांत भौतिक शास्त्रांचें जेथें प्रणयन चाललें आहे, त्या देशांतील इतिहासकार झालेली हकीकत पद्धतशीर तऱ्हेनें ज्या वैचित्र्यानें लिहितील तें वैचित्र्य परदेशांना बहिष्कार घालणाऱ्या व परदेशियांना अस्पर्श समजणाऱ्या देशांतील इतिहासकारांच्या हकीकतींत कसें येईल ? अलीकडील पन्नास वर्षांतल्या किंवा शेंदीडशें वर्षांतल्या यूरोपीयन इतिहासकारांशीं मराठी बखरकारांची मी तुलना करीत नाहीं; तर दीडशें वर्षांपलीकडील यूरोपीयन इतिहासकारांशीं करीत आहे. हे दीडशें वर्षांपलीकडले पाश्चात्य इतिहासकार मोठे नामांकित होते, अशांतला भाग नाहीं. कालानुक्रम कशाशीं खावा, ऐतिहासिक सत्य म्हणजे काय, पद्धती म्हणजे काय चीज आहे, वगैरे गूढें तत्कालीन पाश्चात्य इतिहासकारांना उकलली नव्हती, हें खरें आहे. ह्या इतिहासकारमन्यांची बकलनें उडविलेली टर सर्वश्रुतच आहे. सध्यांच्या मानानें पहातां तत्कालीन यूरोपीयन इतिहासकारांची यद्यपि इतकी निकृष्ट दशा होती, तत्रापि इतकें कबूल केलें पाहिजे कीं, तत्कालीन मराठी बखरकारांपेक्षां त्यांची दृष्टि जास्त विस्तृत झालेली होती. स्वदेशाच्या पलीकडे पृथ्वीवर अन्य देश आहेत व त्यांचे इतिहास लिहिल्याशिवाय मानवसमाजाचा साद्यन्त इतिहास लिहितां यावयाचा नाहीं, हा सिद्धान्त त्यांना कळून चुकला होता. हा सिद्धान्त मराठी बखरकारांच्या स्वप्नींहि आलेला नव्हता. शक १७४० पर्यंत ज्या दोन अडीचशें लहानमोठ्या बखरी झाल्या, त्यांत परदेशाची किंवा परसमाजाची नांवाला देखील एक बखर नाहीं. महाराष्ट्रांतील मुसुलमानी राजांच्या दोन चार बखरी आहेत. परंतु त्या बहुतेक हिंदुरिवाज ग्रहण केलेल्या मुसुलमानांच्या आहेत. अहिंदु समाज सोडून, हिंदुस्थानांतील सधर्मीय जे बंगाली, पंजाबी, गुजराथी, रजपूत, द्राविड वगैरे समाज, त्यांचा जरी इतिहास लिहिण्याचा प्रयत्न तत्कालीन मराठ्यांनीं केला असता, तरी देखील तुलनाबुद्धि त्यांच्यांत निपजली असती आणि पद्धती व शास्त्र यांची निश्चित कल्पना त्यांना आली असती. इंग्रज, फ्रेंच, डच, फिरंगी वगैरे ताम्रमुखांचा संसर्ग मराठ्यांना बराच झाला होता. त्यांची एखादी लहानशी तरी बखर तत्कालीन बखरींत सांपडेल, अशी माझी फार दिवसांची अपेक्षा होती. परंतु, ती अद्याप सफल झाली नाहीं. बहुशः अशी बखर नसावी, असेंच कबूल करणें भाग पडतें. येणेंप्रमाणें परदेशांतील समाज, संस्कृति व शास्त्र यांची तुलना स्वदेशांतील समाज, संस्कृति व शास्त्र यांशीं करावयाला न सांपडल्या-

मुळें, मराठी बखरकारांच्या इतिहासलेखनांत पद्धती व शास्त्र यांचा तर अभाव आहेच. परंतु दुसरीहि एक मोठी उणीव आहे. झाल्या प्रसंगाची हकीकत नाना बाजूंनीं कशी द्यावी, यांची कल्पना त्यांना आली नाहीं. त्यामुळें होतें काय कीं व्यक्ति, काल व स्थल बदलून पाहिलें असतां, सर्व बखरींचें रूप सारखें एका मासल्याचें दिसतें. अवलोकन, पृथक्करण, टीका, व पद्धती ह्यांचा मागमूसहीं या बखरींतून नाहीं. तुलनेच्या अभावामुळें हा दोष होतो. ह्याच्याशिवाय दुसरा दोष म्हणजे संशोधनाभाव होय. आपल्यापूर्वीं कोणीं काय लिहिलें आहे, आपण ज्या लोकांचा इतिहास लिहीत आहों, त्यांचा पूर्व व प्राचीन इतिहास काय आहे व त्याचीं साधनें कशीं मिळतील, ही विवंचना ह्या बखरकारांना पडलीच नाहीं. कारण, स्वदेशाचा पूर्व किंवा प्राचीन इतिहास लिहिण्याच्या भानगडींत ते शिरलेच नाहींत. कित्येक बखरींच्या प्रारंभीं पुराणांतील व तवारिखांतील राजांच्या व पातशाहांच्या अर्ध्याकच्च्या यादी दिलेल्या आढळतात. परंतु त्यांना इतिहास हें बडें नांव देण्याचें धाष्टर्य करवत नाहीं. सारांश, देश व काल ह्या दोन्ही दृष्टींनीं हे बखरकार पंगू होतें, असें म्हणणें प्राप्त होतें. दिशाभूल झाल्यामुळें परदेशांच्या इतिहासांचें अज्ञान कायम राहिलें व कालभूल झाल्यामुळें स्वदेशाचाहि प्राचीन इतिहास समजण्याला मार्ग राहिला नाहीं. स्वतःचा पूर्वेतिहास किंवा परकीयांचा प्राचीन व समकालीन इतिहास ह्यांच्या परिशीलनानें व तुलनेनें दृष्टीला वैशद्य, बुद्धीला प्रागल्भ्य व मनाला विचक्षणत्व जें येतें, तें शक १७४० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील बखरकारांना आलें नाहीं. स्वदेशाचें स्वकालीन चरित्र स्वतःच्या प्रत्यक्ष किंवा ऐकीव माहितीनें जेवढें लिहितां येण्याजोगें होतें, तेवढें मात्र त्यांनीं सत्यापलाप न करतां लिहिलें. ह्या संकुचित एकदेशीयत्वाचा परिणाम कूपमंडुकन्यायानें बुद्धिमांद्याच्या रूपानें फळास आला. सकलमानवजातीच्या घटनेंत व भ्रमणांत आपली स्थिति दिक्कालावच्छेदानें कोठें आहे, हें सूक्ष्म दृष्टीनें वारंवार पाहिल्यानें अवलोकनाची व तुलनेची मर्यादा विस्तार पावते आणि स्वदेशाच्या व स्वसमाजाच्या चरित्राचें अनेक अंगांनीं वर्णन करण्याचें सामर्थ्य येतें. सारांश, तुलनेच्या साहाय्यानें अवलोकनाच्या बाबी वाढतात, ही गोष्ट ह्या बखरकारांच्या मनांत बिलकुल उतरली नव्हती.

५९. ऐंशी वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत इतिहासाची ही अशी संकुचित स्थिति होती. तुलनेचा जेथें अभाव होता, तेथें मानवसमाजशास्त्र उदयास येणें दुरापास्तच होतें. कालपरत्वें देशपरत्वें नाना समाजांच्या नैकविध चरित्रांचें जेव्हां सूक्ष्म अवलोकन करावें, तेव्हां समाजशास्त्राची निर्मिति होण्याचा संभव असतो. यूरोपांत देखील समाजशास्त्र हें नांव निर्माण होऊन साठ सत्तर वर्षे लोटलीं नाहींत. तेव्हां, ऐंशी वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत त्या शास्त्राचा उदय झाला नाहीं, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट नाहीं. तत्रापि, समाजशास्त्रापैकीं राजनीति म्हणून जी शाखा आहे, तिच्यावर शक १६२२ च्या सुमारास एक ग्रंथ झालेला प्रसिद्ध आहे. तो रामचंद्रपंत अमात्य यांनीं रचिलेला राजनीतिवरील प्रबंध होय. ह्यालाच "संभाजी राजाची राजनीति" असें दुसरें नांव आहे. ह्यांत राजनीतीचें पद्धतशीर व सशास्त्र विवेचन आहे, असें नाहीं. परंतु, अनेक महत्त्वाच्या व कुशलतेच्या राजनैतिक सूचना

ह्या ग्रंथांत सांपडतात. न्याय व नीति हीं राज्याचीं मुळें आहेत, इंग्रजादि जलचरांना राज्यांत रहाण्यास कायमची जागा देऊं नये, वांशिक अस्सलाई लक्षांत घ्यावी, वगैरे अनुभवोत्पन्न शेकडों सूचना मोठ्या मार्मिक आहेत. महाराष्ट्रीय राजनीतीवर जो कोणी ऐतिहासिक पद्धतीनें ग्रंथरचना करूं इच्छील, त्याला हा ग्रंथ अत्यंत उपयोगीं पडेल. राजनीतिवर दुसरा ग्रंथ नानाफडणीसानें सवाई माधवरावाकरितां रचिलेला "नारायणशिक्षा" ह्या होय. यद्यपि हा सूत्ररूप आहे, तत्रापि ह्यांत अनेक अनुभविक व मार्मिक सूचना आहेत. तिसरा मराठी राजनैतिक ग्रंथ म्हटला म्हणजे चिटणीसकृत राजनीति हा होय. ह्यांत नारद, कणिक, वगैरेंच्या नीतिप्रबंधांतली सटरफटर माहिती एकत्र जुळविलेली आहे. अमात्यांचा किंवा फडणिसांचा अनुभव चिटणिसांना नसल्यामुळें, त्यांचा ग्रंथ महाराष्ट्रीय नीतिशास्त्राच्या परिशीलनाला फारसा पोषक होण्याचा संभव नाहीं. राजनीतिखेरीज समाजशास्त्राच्या दुसऱ्या कोणत्याहि शाखेवर किंवा उपांगांवर मराठी ग्रंथरचना त्याकालीं झाली नाहीं.

६०. समाजयंत्र व राज्ययंत्र ह्यांच्यासंबंधीं धर्मशास्त्रांतून व कामंदक्यादि नीतिशास्त्रांतून जी व्यवस्था सांगितलेली आहे, तीच कालदेशवर्तमानानुसार त्या कालीं मान्य समजली जात असे. पुरातन आर्यसमाजयंत्रांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी चतुर्वर्णात्मक विभागणी असे, तिच्या ऐवजीं ब्राह्मण व शूद्र अशी द्विवर्णात्मक पद्धति शक १२२२ पासून १५२२ पर्यंत मान्य समजूं जाऊं लागली. शेटे, महाजन, वगैरे वैश्य जाति यादवांच्या राज्यापासून महाराष्ट्रांतील ग्रामसंस्थांत व नगरसंस्थांत चालू होत्याच. परंतु, त्यांचा धंदा मारवाड व गुजराथ या दोन प्रांतांतील वाण्यांनीं, मुसुलमानी अमलांत आक्रमून टाकिला. त्यामुळें, महाराष्ट्रांतील शेटे, महाजन वगैरे लोक शेतीवर उदरनिर्वाह करूं लागले. महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचें विवेचन करतांना, वैश्यजातींच्या धंद्यांत झालेल्या ह्या क्रांतीचा विचार करणें अत्यवश्यक आहे. मुसुलमानी अमलांत क्षत्रियांचाहि धंदा लुप्त झाल्याकारणानें, तेहि लोक शेतीवरच निर्वाह करूं लागले आणि त्यांच्यापैकीं बऱ्याच कंगाल लोकांचा अंतर्भाव शूद्रादिवर्गांत चुकीनें व संकरानें होऊं लागला. ब्राह्मणांपैकीं बऱ्याच पोटजाती शूद्रादिकांचा व्यवहार करूं लागल्या आणि त्यांचाहि समाहार भ्रष्ट अथवा पतित ब्राह्मणांच्या वर्गांत होण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला. अशा संकटसमयीं शहाजी व शिवाजी राजे भोसले आणि रामदास, दादोजी कोंडदेव, निळो सोनदेव, वगैरे क्षत्रिय व ब्राह्मण यांनीं स्वधर्माचें म्हणजे स्वतःच्या कर्तव्याचें पुनरुज्जीवन करून महाराष्ट्रांतील चातुर्वर्ण्य बरेंच पुनरुज्जीवित केलें. समाजयंत्राचे पुरातन विभाग मुसुलमानी अमलांत जे लुप्त होऊं पहात होते, ते पुनः उदयास आले आणि पुरातन धर्मशास्त्रांचा व व्यवहाराचा पुनः मेळ बसूं लागला. ह्या मेळाचा परिणाम असा झाला कीं, समाजयंत्र व राज्ययंत्र ह्यांच्यासंबंधींच्या पुरातन कल्पनाच त्या कालीं यथास्थित पटल्या गेल्या आणि नवीन धर्मग्रंथ मराठींत करण्याचें कारण पडलें नाहीं. कायद्याचे जे निरनिराळे विभाग आहेत, ते रूढि व शास्त्र ह्यांच्या पायांवर उभारले गेले आणि प्राचीन व अर्वाचीन

समाजव्यवस्थेची एकवाक्यता झाली. शक११००पासून शक१७२२पर्यंत महाराष्ट्रांतील कायदे-पंडितांनीं शेंदीडशें धर्मग्रंथ त्या त्या स्थितीला व रूढीला अनुलक्षून पुरातन श्रुतिस्मृतींना न सोडतां रचिलेले आहेत. सारांश, समाजयंत्र व राजयंत्र यांना अनुलक्षून११००पासून शक १७२२ पर्यंत बराच ग्रंथसमूह संस्कृतांतून व मराठी पंचायतींतून झालेला आहे. ह्या विस्तृत व प्रचंड सारस्वताचें पृथक्करण व एकीकरण कुशल व विद्वान् कायदेपंडितांची व इतिहासज्ञांची प्रतीक्षा करीत आहे. धर्मग्रंथांचें व पंचायतींचें प्रथक्करण व एकीकरण झाल्यावांचून, महाराष्ट्रीय समाजयंत्राचीं गुह्यें नीट उलगडणार नाहींत.

६१. समाजचरित्र व समाजशास्त्र यांचा विचार झाल्यानंतर, महाराष्ट्रांतील तत्कालीन सामाजिक ऊर्फ ऐतिहासिक तत्त्वज्ञानाकडे वळणें जरूर आहे. ज्ञानेश्वरापासून भाऊमहाराजापर्यंत जे शेकडों ग्रंथकार महाराष्ट्रांत झाले त्या सर्वांचे ग्रंथ अध्यात्म तत्त्वज्ञानानें ओतप्रोत भरलेले आहेत. ते इतके कीं, महाराष्ट्र सारस्वताचा शेकडा पंचाहत्तर भाग तत्त्वज्ञानात्मक आहे. भगवद्गीता, योगवासिष्ठ, पंचीकरण, उपनिषदें, द्वैत, अद्वैत, पंचमहाभूतें, वगैरे तात्त्विक विषयावर मराठींत अतोनात ग्रंथ झालेले आहेत. ह्याच ग्रंथांना कित्येक लोक धार्मिक अशी संज्ञा देतात. व कित्येक लोक भक्तिमार्गी म्हणतात. परंतु ह्या दोन्ही संज्ञा केवळ भ्रामक होत. हे ग्रंथ केवळ तत्त्वज्ञानाचे आहेत. विठोबा, राम, दत्त वगैरे देवतांची स्तुति अभंगांमधून आढळते, त्यावरून हे ग्रंथ भक्तिमार्गाचे असावे, असा वरवर पहाणाराचा समज होतो. परंतु, परमात्म्याच्या ऐवजीं विठोबा, राम, दत्त वगैरे नांवें या ग्रंथकारांनीं योजिलेलीं आहेत, हें त्या अभंगांतील मजकुराचें पृथक्करण केलें असतां दिसून येतें. शिवाय सामान्य जनांना निर्विकार व निर्लेप अशा परब्रह्माचें आकलन होत नाहीं, सबब नामरूपांकित देवतांची कल्पना करून, त्यांची वृत्ति परब्रह्माकडे वळविण्याचा ज्ञानेश्वरादि तत्त्वज्ञांचा हेतु उघड दिसून येतो. ज्ञानदेव, नामदेव, दासोपंत, एकनाथ, तुकाराम, वगैरे साधु ग्रंथकारांनीं हा हेतु स्पष्ट शब्दांनीं बोलूनहि दाखविलेला आहे. धर्माचें मुख्य तत्त्व जो आचार त्याच्यासंबंधानें या साधु ग्रंथकारांच्या व तत्त्वज्ञांच्या ग्रंथांत फारसा नव्हे, मुळींच विचार केलेला नाहीं. आचारासंबंधानें विवेचन करण्याचें काम धर्मशास्त्री संस्कृतांतून करीत तेव्हां ती आगंतुक कामगिरी तत्त्वज्ञांनीं आपल्या शिरावर घेतली नाहीं, हें रास्तच होतें. गुरुचरित्रादि ग्रंथांत आचाराची तुरळक माहिती क्वचित् दिलेली आहे परंतु, असले अपवादात्मक ग्रंथ फारच थोडे आहेत. साधू-ग्रंथकारांचा मुख्य कटाक्ष तत्त्वावर आहे. आणि असाच प्रकार होणें रास्त होतें. ऑगस्ट कोंटेनें म्हटल्याप्रमाणें मनुष्यसमाजाचे विचार तीन पायऱ्यांनीं उद्भूत होत असतात; प्रथम धार्मिक विचारांचा उदय होतो. तो झाल्यावर नंतर तात्त्विक विचारांचें साम्राज्य होतें; आणि शेवटीं शास्त्रीय ज्ञानाचें राज्य होतें. पैकीं ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत महाराष्ट्रांत तत्त्वज्ञानाचें म्हणजे तात्त्विक विचारांचें साम्राज्य होतें. धार्मिक, तात्त्विक, व शास्त्रीय ह्या संस्कृत शब्दांना ऑगस्ट कोंटे Religious, Metaphysical and positive स्वभाषेंत शब्द योजतो. मनुष्यसमाजाच्या ह्या तीन स्थिति एकापाठीमागून एक येतात

व दुसरी आली म्हणजे पहिलीचा समूळ लोप होतो, असा अर्थ समजावयाचा नाहीं. तर, विवक्षित काळांत एकेका स्थितीचें विशेष प्राबल्य असतें, इतकाच अर्थ विवक्षित आहे. तात्त्विक विचारांचा राष्ट्रावर पगडा बसला, म्हणजे धार्मिक अगर शास्त्रीय विचारांचा अत्यंत लोप झालेला असतो असा भाग नाहीं; तर हे दोन विचार त्या वेळेपुर्ते गौण समजले जातात, एवढेंच सांगण्याचा मुद्दा आहे. कोणत्याहि काळीं कोणत्याहि समाजांत ह्या तिन्ही स्थिति विद्यमान असतात. इतकेंच कीं कोणत्यातरी एका स्थितीचा एकाकालीं विशेष वर्चष्मा असतो. त्याप्रमाणें ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत तात्त्विक ऊर्फ तत्त्वज्ञानात्मक स्थितीचा पगडा महाराष्ट्रावर बेसुमार बसलेला होता. त्यामुळें शास्त्रीय ज्ञानाचा मुख्य आधारस्तंभ जो इतिहास त्याचा उदय ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतच्या काळांत झाला नाहीं. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या, असें मत उराशीं बाळगणारें जें तत्त्वज्ञान त्याला जगत् जो संसार अथवा प्रपंच अथवा समाज त्याचें चरित्र जाणून घेण्यांत कोणता फायदा आहे? परब्रह्माची, विठोबाची प्राप्ति करून घेण्यांत ज्यांनीं तनु, मन व धन अर्पण केलें, त्यांना संसाराची व समाजाची वास्तपुस्त करण्याला सवडच राहणें अशक्य आहे. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंतचें तत्त्वज्ञान हें असें इतिहासाला म्हणजे समाजाला म्हणजे प्रपंचाला सोडून होतें. अर्थात्, ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा म्हणजे प्रपंच व परमार्थ ह्यांच्या एकवाक्यतेचा उदय त्या कालीं होणें अशक्य होतें. तो उदय रामदासांच्या हस्तें झाला. धार्मिक, तात्त्विक, भक्तिमार्गी, वगैरे सर्व लोकांच्या मंडळ्या करून, म्हणजे त्यांना लोकसंग्रहाच्या यंत्रांत घालून, राज्ययंत्राचीं निर्मिति करावी आणि धर्म, तत्त्वज्ञान व प्रपंच यांचें रक्षण करावें, असें समर्थांचें तत्त्वज्ञान होतें. प्रपंच साधूनच परमार्थाचा लाभ होतो, हा उपदेश समर्थ पदोपदीं करीत आहेत. ह्या उपदेशाचा परिणाम त्या कालीं राष्ट्रीभवनांत झाला. परंतु पन्नास पाऊणशें वर्षें लोटत आहेत नाहींत, तों पुनः धार्मिक व तात्त्विक विचारांनीं महाराष्ट्रांत उचल खाल्ली. रामदासकालीं धर्म व तत्त्वज्ञान ह्यांचा लोप फारसा झालेला नव्हता. फक्त त्यांचा पगडा इतिहास, शास्त्र, प्रपंच, समाज व राष्ट्र याच्या पगड्याच्या मानानें बराच कमती झालेला होता. तो पुनः कालान्तरानें वरचढ झाला. पुनः प्रपंच व समाज ह्यांच्यापासून लोकदृष्टि परावृत्त झाली आणि "दों दिवसांची तनु हे साची," असलें तत्त्वज्ञान लावण्यांतूनहि फडकूं लागलें. ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत तत्त्वज्ञानाला दारिद्र्यामुळें सौम्य व कंगाल नीतीची संगति होती. शक १६८० पासून १७३९ पर्यंत कदाचित् शक १७७९ पर्यंत तत्त्वज्ञानाला संपत्ति, विलास, व तज्जन्य आलस्य ह्यांची जोड मिळाली. ही जोड मिळाली असतां शास्त्रीय स्थितींत असणाऱ्या परम व्यवहारज्ञ अशा पाश्चात्य शत्रूंशी तत्त्वज्ञानी, विलासी व शिथिल अशा मराठ्यांची गांठ पडली. सारांश, शक १२३९ पासून १७७९ पर्यंत ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा ऊहापोह करणारा रामदासाखेरिज दुसरा तत्त्वज्ञ महाराष्ट्रांत झाला नाहीं. इतर जे शेंकडों साधुसंत झाले ते प्रपंचाचे म्हणजे इतिहासाचे द्वेष्टे आणि नामरूपातीत किंवा नामरूपांकित परब्रह्माचे एकदेशी भक्त होते. प्रपंचाला शून्य समजून परब्रह्माच्या पाठीमागें लागलेल्या तत्त्वज्ञांच्या व

वारकऱ्यांच्या पंथांचा आणि प्रपंच व परमार्थ ह्यांची योग्य किंमत करून एकवाक्यता करणाऱ्या रामदासाचा व रामदासीयांचा विरोध असलेला जगत्प्रसिद्ध आहे. बाकी, समाजाला सोडून, विस्खलित, पंगू व असमर्थ बनलेल्या ह्या तत्त्वज्ञांना, साधूंना व त्यांच्या वारकरी अनुयायांना मुसुलमानांच्या जुलमांतून समर्थांनीं व रामदासाभिमान्यांनींच सोडविलेलें आहे.

६२. शक १२३९ पासून १७३९ पर्यंत, इतिहास, समाजशास्त्र व सामाजिक तत्त्वज्ञान ह्यांची हालहवाल महाराष्ट्रांत कशी काय होती, त्याचा संक्षिप्त उल्लेख येथपर्यंत केला. आतां शक १७३९ पासून आतांपर्यंत म्हणजे शक १८२२ पर्यंत ह्या तिन्ही शाखांची स्थिति महाराष्ट्रांत कोणत्या प्रकारची आहे, तें सांगतों.

६३. शक १७३९ पासून १८२२ पर्यंतच्याकाळाचे दोन भाग केले पाहिजेत. पहिला भाग शक १७७९ त संपतो. ह्या भागांतील चाळीस वर्षांत महाराष्ट्र पूर्वीप्रमाणेंच तत्त्वज्ञानी, संन्यस्त, हटयोगी, विलासी व आलस्यमग्न होतें. अर्थात्, समाजाच्या स्थितीचें व चरित्राचें सूक्ष्म अवलोकन, पृथक्करण, एकीकरण किंवा परिशीलन करण्याचें अवश्यकत्वच त्या कालीं कोणाला भासलें नाहीं. शक, १५७९ पासून १७३९ पर्यंत साध्या बखरी अथवा समाजाचे साधे इतिहास लिहिण्याचा जो व्यासंग मराठ्यांनीं स्वीकारला होता, तोहि ह्या कालांत लुप्तप्राय आला. ह्या कालांत तंजावर, सातारा, इंदूर, धार, ग्वालेर, बडोदें, पुणें, कोल्हापूर, नागपूर, बुंदेलखंड, वगैरे स्थलीं असणाऱ्या संस्थानांत मोठमोठ्या क्रांत्या झाल्या; कित्येक संस्थानें सपशेल बुडून गेलीं; कित्येकांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आलें; आणि कित्येक निव्वळ जमीनदारीच्या स्थितीला येऊन पोचलीं. महाराष्ट्रांतील लोकस्थितींतहि मोठें परिवर्तन झालें. लढवय्ये लोक घरीं बसले; प्रजा निःशस्त्र झाली; पांढरपेशा लोकांचा धंदा गेला; व्यापारीवर्गाचा व्यापार बुडत चालला; शिल्प्यांचा रोजगार बसत चालला; सोनें पश्चिमेकडे धांव घेऊं लागलें; शेतीवर सर्व लोकांचा उदरनिर्वाह होण्याचा दुर्धर प्रसंग आला, भटाभिक्षुकांची मिळकत बंद झाली; शास्त्रिपंडित निराश्रित झाले; सारांश, सर्व दर्जाच्या लोकांत चलबिचल झाली. परंतु, समाजांत होत चाललेल्या ह्या अफाट क्रांतीची परीक्षा करून ती थोपविण्याचें कोणींच लक्ष्यांत आणिलें नाहीं. तत्कालीन समाजाचें चरित्र, समाजाच्या धडपडीचा कार्यकारणसंबंध अथवा समाजाचें शास्त्र, व समाजाचें तत्त्वज्ञान, ह्यापैकीं एकाचाहि पत्ता ह्या चाळीस वर्षांत नव्हता. विचारी व तत्त्वजिज्ञासु जे एकदेशी साधुसंत व विरक्त ते संन्यासाच्या अभ्यासांत गर्क झालेले होते; आणि प्रपंचाची धडपड करणारे राजे, संस्थानिक, व्यापारी, उद्मी, मुत्सदी, व कारकून, तत्कालीन धडपडीचा अर्थ न कळल्यामुळें, कोठें तरी व कसें तरी मोहानें अंध होत्साते प्रपंचाचें व समाजाचें व राष्ट्राचें गाडें हाकीत होते. 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः' ! आपण करतों आहों काय व चाललों आहों कोठें, ह्याचा ज्यांना नीट उलगडा करण्याची अवश्यकता भासली नाहीं, त्या मोहान्ध लोकांना राष्ट्र कोठलें, प्रपंच कसचा, व इतिहास काय करावयाचा ! ! !

६४. अशी स्थिति शक १७७९ पर्यंत होती. तिचा अंत शक १७७९ व १७८० तलि ज्वालामुखीसदृश धडपडीनें झाला. ही धडपड संन्यस्त, तत्त्वज्ञानी व अविचारी हिंदुमुसलमान पुढारी यांनीं बंगाल्यांतील शिपायांच्या साहाय्यानें केली. काल्पनिक तत्त्वज्ञानाचा व सुयंत्रित शास्त्राचा हा झगडा होता. पहिल्याचे पुरस्कर्ते जुने हिंदुमुसलमान पुढारी होते व दुसऱ्याचे पाश्चात्य लोक होते. त्यांत सुयंत्रित शास्त्राचा विजय झाला. ही धडपड चालली असतां हिंदुस्थानांतील, पंजाबांतील, व कर्नाटकांतील राजेरजवाडे, महाजन, व सामान्य लोक साशंक वृत्तीनें कांहीं काल तटस्थ राहून, शेवटीं विजयी पक्षाला मिळाले. हलक्या, कुलहीन, व उपटसुंभ अशा लहानमोठ्या शिक्षित व अल्पशिक्षित पांढरपेशा परराज्यसेवकांचा जो नवीन वर्ग बनला, किंवा, खरें म्हटलें असतां, बनविला होता, तो विजयी होणाऱ्या व झालेल्या सुयंत्रपक्षाकडेच प्रथमपासून होता. त्यांच्या शिक्षणांत स्वराष्ट्र, स्वसमाज, वगैरे शब्दच नव्हते. बंगाल, रजपुताना व महाराष्ट्र ह्या तीन प्रांतांतील तत्कालीन कित्येक बडे नोकरलोक असें सांगतात कीं, शक १७७९ तील ह्या प्रचंड धडपडीचा अर्थच कळण्याची आपली ताकत नव्हती; मग स्वपक्ष किंवा परपक्ष घेण्याची किंवा टाकण्याची बाब दूरच राहिली ! जुन्याच्या अभिमानानें व स्मरणानें येणारा सहज त्वेषहि ह्या कुलहीन, राष्ट्रहीन व समाजहीन लोकांच्या ठायीं नव्हता. भाऊ दाजी, विनायकराव वासुदेवजी, नाना मोरोजी, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळोणकर, केरो लक्ष्मण छत्रे, ईश्वरचंद्र विद्यासागर, दिनकरराव रानडे, सालरजंग, टी. माधवराव, विश्वनाथ नारायण मंडलीक, विश्राम रामजी घोले, वगैरे कारकुनी पेशाची राष्ट्रहीन आंग्लशिक्षित शेकडो मंडळी ह्याच युगांतील होत. तरुण दादाभाई नौरोजी ह्या राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगीं लंडनांत स्वदेशीयाकरितां नोकऱ्या मागण्याच्या अर्जदारींत गुंतले होते. असल्या मंडळीला स्वदेश, स्वसमाज, व स्वेतिहास ह्यांची मातबरी काय होय ! स्वदेशाच्या इतिहासाचा नांव घेण्यासारखा एकहि ग्रंथ ह्या चाळीस वर्षांत झाला नाहीं. मॉरिसूक्त स्वेतिहासाची निंदा व डफ्कृत स्वेतिहासविकृति ह्या कालांत सर्वत्र मान्य झालेली होती!

६५. शक १७८० पासून १८२२ पर्यंतचा जो दुसरा भाग त्यांत शास्त्रिय स्थितीच्या ओनाम्याला किंचित् प्रारंभ झाल्यासारखा दिसत आहे. परंतु अद्यापिहि तात्त्विक स्थिति निःशेष संपली, असें निखालस म्हणतां येत नाहीं. अदृश्य व अचिंत्य शक्ति आणून देण्याच्या थापा मारणाऱ्या थियासोफीकडे अद्यापि पुष्कळ समंजस लोकांचा ओढा आहे. समाजाला सोडणाऱ्या संन्यासस्थितीकडे व जगन्मिथ्यात्व प्रतिपादणाऱ्या एकदेशी तत्त्वज्ञानाकडे अद्यापि बऱ्याच लोकांचें मन धांवतें. तत्रापि शास्त्रीय स्थितीची छाप समाजावर आस्ते आस्ते बसत चालली आहे, ह्यांत बिलकुल संदेह नाहीं. अन्वयव्यतिरेकोत्पन्न अनुनयन व निर्णयन पद्धतींच्या जोरावर सद्यःकालीन समाजचरित्रावर निर्भीड टीका होऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. सद्यस्क चळवळीवर चिपळोणकरांच्या निर्भीड टीका आणि सामाजिक, धार्मिक व राजकीय विषयांवर रानड्यांचे निबंध शास्त्रीय स्थितीच्या आगमनाचे द्योतक आहेत. परंतु, टीका जितक्या खोल, विस्तृत, सूक्ष्म व व्यापक असा-

वयास पाहिजेत तितक्या अद्यापि होऊं लागल्या नाहींत. अद्यापि सर्वच प्रकार स्थूल व स्फुट असाच आहे. आणि असाच प्रकार असणें प्रथमारंभीं शक्य आहे. शास्त्रीय स्थितीचें आगमन संभाव्य होण्यास मुख्य कारण जी समाजाच्या नानाविध चरित्राची इत्थंभूत हकीकत तिचीं साधनें प्रसिद्ध होण्यास नुकता कोठें आरंभ झाला आहे. हीं साधनें झालीं आहेत त्याहून शंभरपट प्रसिद्ध झाल्यावांचून व त्यांची विवेचक दृष्टीनें छाप झाल्यावांचून इतिहासाची व समाजशास्त्राची निर्मिति होणें शक्य नाहीं. १७८० पासून १८२२ पर्यंतच्या बेचाळीस वर्षांत इतिहास, समाजशास्त्र किंवा ऐतिहासिक तत्त्वज्ञान यांवर नांव घेण्यासारखा एकहि ग्रंथ मराठींत किंवा महाराष्ट्रांत निर्माण झाला नाहीं. लक्ष्मणराव चिपळोणकर व रा० रा० गोविंदराव सरदेसाई यांनीं शिवकालीन इतिहास लिहिले आहेत; परंतु, स्वतंत्र साधनांच्या अभावामुळें, ते नाना प्रकारांनीं व्यंग आहेत. शिवाय, ह्या दोघांहि लेखकांनीं लिहावयाला घेतलेल्या कालाचें मर्म जसें जाणावें तसें जाणलें नाहीं. चिपळोणकरांनीं केवळ डफच्या बखरीचा मराठींत उतारा केला आहे; व डफ जे मराठ्यांचे दोष काढतो ते गुण भासविण्याचा अभिमानी प्रयत्न केला आहे. सरदेसायांनीं ब्राह्मणांना व पेशव्यांना निराधार नांवे ठेवण्याचा प्रयत्न करून, ज्याची खाली पोळी त्याची टाळी वाजविण्याचा अप्रस्तुत उद्योग केलेला आहे. तत्कालीन समाजस्थितीचें पृथक्करण दोघांतून एकानेंहि केलेलें नाहीं. समाजयंत्राच्या किल्ल्या सूक्ष्म पृथक्करण व व्यापक संशोधन केल्याविना सांपडत नाहींत. व त्या जर सांपडल्या नाहींत तर तत्कालीन समाजचरित्राचा संगतवार व सबीज पट यथाभूत चितारतां येत नाहीं, महाराष्ट्र सारस्वताची व ग्रंथकारांचीं जी त्रोटक माहिती सरदेसायांनीं दिली आहे ती अपूर्ण, चुकलेली व असंबद्ध आहे; आणि मुसुलमानांच्या पूर्वींची जी हकीकत दिली आहे, तींत तत्कालीन राज्ययंत्र, समाजयंत्र, व्यापारयंत्र वगैरेंची माहिती व बीजें देण्याचा कलहि दाखविलेला नाहीं. डॉ० भांडारकरांच्या दख्खनच्या टिपणवजा निबंधावरून कांहीं राजांच्या यादी देण्यापलीकडे ह्या इतिहासांत जास्त कांहीं एक दिलें नाहीं. तत्कालीन धर्मग्रंथ. जैनग्रंथ, वेदान्तग्रंथ, काव्यग्रंथ पाहून तत्कालीन समाजाचें चरित्र बरेंच लिहितां येण्याजोगें आहे. हाच धरसोडीचा प्रकार मुसुलमानांच्या अमदानीसंबंधानें व शिवाजीच्या रियासतीसंबंधानें झालेला आहे. यद्यपि स्वतंत्र साधनें अद्यापि प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत, तत्रापि इतर जीं अनुषंगिक शेकडों साधनें मुसुलमानांच्या व शिवाजीच्या कालासंबंधानें उपलब्ध आहेत, त्यांचा यथास्थित परामर्श घेतला असतां, सध्यांदेखील तत्कालीन समाजचरित्र व त्याची कार्यकारणपरंपरा समाधानक तऱ्हेनें सजवितां येण्यासारखी आहे. परंतु, इतका खटाटोप करण्यास दहा वीस वर्षें एकनिष्ठपणानें सतत खपलें पाहिजे. हे परिश्रम न केल्यामुळे, सरदेसायांची मराठी रियासत शास्त्रीय दृष्ट्या फारशी उपयोगाची नाहीं. सरदेसायांच्यापेक्षां रानड्यांनीं इंग्रजींत रचिलेला शिवाजीचा इतिहास अधिक योग्यतेचा आहे. कारण, त्यांत शिवकालीन समाजाची पूर्वकारणपरंपरा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजाच्या चरित्रांतील शेकडों बाबी प्रामाणिकपणे देणें कोणाहि मेहनती विद्वानाला शक्य आहे. परंतु, शेकडों बाबी सामान्य निय-

मांच्या म्हणजे कारणांच्या सूत्रांत गोवून सुसंगत पद्धतीनें वाचकांपुढें मांडण्यास व्यापक बुद्धि व उच्च अधिकार लागतात. रानड्यांनीं महाराष्ट्रसमाजचरित्राच्या नवीन शेकडों बाबी संशोधून काढिल्या अंशांतला प्रकार नाहीं. ज्या बाबी ग्रांटडफादि मंडळीनें व मराठी बखरकारांनीं चुकल्यामाकल्या नमूद करून ठेविल्या होत्या, त्यांना संतचरित्रांतील स्थूल बाबींचा जोड देऊन, रानड्यांनीं मनांत शिवपूर्वकालीन व शिवकालीन समाजचरित्राचा पट तयार केला आणि यूरोपीयन इतिहासाच्या विस्तृत व व्यापक वाचनानें सुचलेल्या सामान्य कारणांच्या धोरणानें त्या बाबींना आधारभूत कांहीं नियमित कारणपरंपरा असावी असा सिद्धान्त बसविला. ग्रांट डफ मराठ्यांच्या समाजचरित्राला कांहीं नियम नाहीं असें जें म्हणत असे तें रानड्यांनीं बऱ्याच अंशानें खोडून काढिलें. रानड्यांचा इतिहास प्रसिद्ध होण्यापूर्वीं मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या पहिल्या खंडांत इसवी सन १७५० पासून १७६० पर्यंतच्या महाराष्ट्रसमाजाच्या चरित्रासंबंधानें मीहि असाच सिद्धान्त नमूद केलेला आहे. ह्या सामान्य सिद्धान्ताच्या पलीकडे जाऊन विशेष कारणांचें कथन करण्याच्या कामीं रानड्यांच्या इतिहासांत बरींच भ्रामक विधानें नमूदलीं गेलीं आहेत. संतांची परीक्षा रानड्यांना यथास्थित करतां आली नाहीं, हें मी वारंवार सिद्ध करीत आलों आहे. महाराष्ट्रधर्माची व्याख्याहि त्यांना नीट बसावितां आली नाहीं. शिवाजीच्या अष्टप्रधानात्मक राज्यपद्धतीसंबंधानेहि त्यांचीं विधानें धरसोडीचीं झालेलीं आहेत. समाजचरित्राचें जितकें सूक्ष्म पृथक्करण केलें पाहिजे तितकें न केल्यामुळें, त्यांच्या सिद्धान्तरचनेंत हे दोष राहिले आहेत, हें उघड आहे. तत्रापि मराठ्यांच्या समाजचरित्राला अव्याहत कारणपरंपरा आहे, हा सिद्धान्त त्यांच्या ग्रंथानें कायमचा प्रस्थापित केला आहे, ह्यांत संशय नाहीं. "मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं टिपणें" हा तेलंगांचा निबंधहि समाजशास्त्राच्या तयारीचा पूर्वसूचक आहे. नांवाजण्यासारखे हे दोन लेख—रानड्यांचा इतिहास व तेलंगांचीं टिपणें—गेल्या बेचाळीस वर्षांत इतिहासावर महाराष्ट्रांत झाले आहेत. सटरफटर चरित्रें अधिकारी लेखकांनीं लिहिलेलीं पांचपन्नास झालेलीं आहेत. परंतु, त्यांत नांवाजण्यासारखें एकहि नाहीं. शक १७३९ पासून १७७९ पर्यंत इतिहासग्रंथ मुळींच झाला नव्हता, त्यापेक्षां १७७९ पासून १८२२ च्या काळांत इतिहासलेखनांत रानड्यांच्या व तेलंगांच्या उद्योगानें थोडी तरी प्रगति झाली आहे, हें मात्र नाकबूल करतां यावयाचें नाहीं. ऐतिहासिक तत्त्वज्ञानावर किंवा समाजशास्त्रावर स्वतंत्र असा ग्रंथ महाराष्ट्रांत अद्यापि झालेला नाहीं. महाराष्ट्रसमाजाचें चरित्रहि अद्यापि एकहि निमाण झालें नाहीं. परसमाजांचा स्वतंत्र इतिहासहि मराठींत अजून एकहि नाहीं. गाइकवाडसरकारच्या आज्ञेनें कांहीं अल्पस्वल्पप्रमादक इंग्लिश इतिहासांचीं गचाळ भाषांतरें झालेलीं आहेत. परंतु तीं स्वतंत्र नसल्यामुळें जमेस धरण्यासारखीं नाहींत. ऐतिहासिक नकाशांची इकडे अद्यापि कल्पनासुद्धां नाहीं. सारांश, रानड्यांचा स्थूल इतिहास व तेलंगांचा चिमकुला निबंध याखेरीज इतिहासाच्या प्रांतांत गेल्या बेचाळीस वर्षांत स्वतंत्र व नांवाजण्यासारखें कांहीं एक झालेलें नाहीं. आणि

दुःखाची गोष्ट कीं हे दोन्ही लेख इंग्रजींत आहेत. * लिहिणारे महाराष्ट्रांत जन्मले म्हणून त्यांची गणना येथें करावी लागली आहे.

६६. समाजचरित्र, समाजशास्त्र व समाजतत्त्वज्ञान यांच्यावर यद्यपि एकहि सर्वमान्य ग्रंथ मराठींत नाहीं; तत्रापि तो सिद्ध होण्याला लागणारी पूर्वव्यवस्था, मात्र गेल्या चाळीस वर्षांत सुरू झाली आहे. कीर्तने, चिपळूणकर, साने, खरे वगैरे लोकांनीं इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध करण्याची जी परंपरा घातली ती अद्यापि चालू आहे. आणि अशी उमेद आहे कीं, ती परंपरा कित्येक शतकें अशीच चालू राहील. आर्यांचें चरित्र दहाहजार वर्षांपलीकडचें आहे. अर्थात्, त्याचें संशोधन शतकेंच्याशतकें चालूं राहील, हें स्पष्ट आहे. एखादादुसरा माणूस दमेल; परंतु संशोध्य विषय संपावयाला दीर्घ अवधि लागेल. अर्थात्, संशोधनाची अपेक्षाहि दीर्घ कालपर्यंत राहील.

६७. इतिहासाच्या उपांगांपैकीं पौराणिक म्हणून जो भाग आहे, त्यावर भाऊ दाजी, भगवानलाल इंद्राजी, राजेंद्रलाल मित्र, डॉ० भांडारकर. रा. रा. देवदत्त रामकृष्ण भांडारकर, तेलंग, मंडलिक, प्रो. पाठक व लोकमान्य टिळक यांनीं आंग्लोइंडियन व यूरोपीयन विद्वानांच्या अनुषंगानें किंचित् व्यासंग गेल्या ऐंशी वर्षांत केला आहे. परंतु हा सर्व व्यासंग परभाषाद्वारा झालेला आहे. पुराणेतिहासाचीं साधनें व त्याच्यावर टीका अद्यापि मराठींत प्रसिद्ध होऊं लागल्या नाहींत. ग्रंथमालेच्या द्वारां कांहीं सटीक मराठी शिलालेख व ताम्रपट मीं मराठींतून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला आहे.

६८. स्थापत्य, कायदा, राज्ययंत्र, समाजयंत्र, धर्म, आचार, रूढि, कालगणन, कुलशास्त्र, अखिलमानवसमाजचरित्र, समाजशास्त्र, ऐतिहासिक तत्त्वज्ञान, तत्त्वेतिहास, संस्थेतिहास, वगैरे इतिहासाच्या अंगांवर एकहि ग्रंथ मराठींत नाहीं. अर्थशास्त्र, विनिमय, नीतिशास्त्र, आंकडेशास्त्र, वगैरे उपांगांवरहि मराठींत ग्रंथरचना नाहीं. पद्धतीवर देखील एकहि ग्रंथ नाहीं. सारांश, सर्वत्र नकाराचा पाढा वाचण्याचा प्रसंग आहे. इंग्रज सरकारनें स्थापिलेल्या विश्वविद्यालयांतील विद्वत्तेची खरी किंमत काय तें ह्या नकाराच्या पाढ्यावरून यथास्थित कळून येण्यासारखें आहे. ही शोचनीय स्थिति होतां होईल तों लवकर बदलली पाहिजे अन्यथा तात्त्विक स्थिति जाऊन, शास्त्रीय स्थितीचें राज्य महाराष्ट्रावर होण्यास अमर्याद विलंब लागेल, व अखंड गुलामगिरींत कुचंबणें अपरिहार्य होईल.

६९. प्रस्तावनेच्या प्रारंभीं केलेल्या प्रतिज्ञेंतील तीन्ही प्रकरणांचा संक्षिप्त विचार हा असा आहे. समाजचरित्राच्या हकीकतीचा म्हणजे इतिहासाचा उपयोग काय तें ह्या विचारावरून कळण्यासारखें आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तेव्हां समाजाच्या धडपडीचा इतिहास कळून घेण्याची इच्छा त्याचेठायीं स्वाभाविक आहे. विष्णुशास्त्री चिपळोणकर म्हणतात त्याप्रमाणें उच्च प्रतीची करमणूक हाच केवळ इतिहासाचा उपयोग

* हे दोनीही महाराष्ट्रूरूपानें ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाले असून एकत्र पुस्तकरूपानें विक्रीस तयार आहेत.

नाहीं. स्वसमाजाचें सबीज व सकारण चरित्र कळलें असतां, सामाजिक गुणदोष दृष्ट्युत्पत्तीस यतात आणि दोषांचा त्याग व गुणांचा परिपोष करण्याकडे प्रवृत्ति होते. दोषत्याग व गुणपरिपोष हा इतिहासज्ञानाचा मुख्य उद्देश आहे. परसमाजांचें चरित्र कळलें असतां, त्याच्यापासूनहि गुणदोषविवेचनद्वारां बोध घेतां येतो. उदाहरणार्थ, शक १२०० पासून १७७९ पर्यंतचें महाराष्ट्रसमाजचरित्र पाहिलें व तदाश्रयभूत कारणांचा शोध केला म्हणजे असें कळून येतें कीं, हीं ५७९ वर्षे महाराष्ट्रसमाज तात्त्विक स्थितींत आहे आणि त्याची गांठ परस्वापहरण करणाऱ्या पाश्चात्यांशीं पडली आहे. संन्यासप्रवण व समाजद्वेष्ट्या तात्त्विक स्थितींत राष्ट्रीभवन व शत्रुनिर्दलन अशक्य होतें. ह्या दोन गोष्टी साधण्यास प्रपंचप्रवण व समाजसाधक अशा रामदासी तत्त्वज्ञानाचा उपयोग फार होतो. परंतु, शास्त्रीय स्थितींत असलेल्या शत्रूंचें उच्चाटन करण्यास स्वतःचा समाज शास्त्रीय स्थितीप्रत नेला पाहिजे. असे अनेक बीजभूत सिद्धान्त समाजचरित्र, समाजशास्त्र व समाजतत्त्वज्ञान यांच्यापासून होत असतें. समाजचरित्राचीं बीजें कळलीं नाहींत, म्हणजे समाजहित साधण्याची बुद्धि असूनहि समाजहित साधतां येत नाहीं. उघडच आहे, रोगस्थान कळल्याशिवाय औषधोपचार कोठें करावयाचा व शक्तिस्थान कळल्याशिवाय तिची वृद्धि कोठून व्हावयाची ? इतिहासज्ञानापासून हा एकच फायदा एवढा मोठा आहे कीं तत्प्रीत्यर्थ देशहितकर्त्यांनीं वाटेल ती घस सोसण्यास तयार व्हावें. समाजचरित्राची मुख्य सुत्रें तद्घटक व्यक्तींच्या मनोरचनेंत आहेत. ही मनोरचना कळली असतां, समाजिक शरीरावर विवक्षित कार्य घडवून आणण्याची शक्यता विशेष असते. उदाहरणार्थ, पैशाला खोट न पडतां, इतर कोणताहि अपमान सहन करावा, अशी वाणी लोकांची मनोरचना आहे. अशा वणिक्समाजाला हातीं धरण्यास, त्यांच्या द्रव्याचा अपहार करण्याची किंवा न करण्याची ताकद आपल्या जवळ आहे, हें कार्यकर्त्या मुत्सद्यानें त्यांच्या निदर्शनास आणून दिलें म्हणजे कार्यभाग होण्यासारखा आहे. दुसऱ्याच्या भानगडींत न पडतां व विकतश्राद्ध न घेतां, आपला संसार आपण करून स्वस्थ असावें, अशी सध्यांच्या तात्त्विक हिंदूंची संन्यस्त मनोरचना आहे. ही मनोरचना लक्ष्यांत घेऊन, शेजारचें घर, शेजारची इस्टेट, शेजारचें संस्थान किंवा शेजारची बायको लुटण्याची जर कोणा मतलबी व शिरजोर पुरुषाला इच्छा झाली, तर त्यानें लुटल्या जाणाऱ्या इसमाच्या शेजाऱ्याला त्रास न देण्याची हमी घ्यावी म्हणजे त्याचें काम बिनबोभाट व यथासांग उरकेल. तात्त्विक हिंदूंची ही संन्यस्त मनोरचना यूरोपीयन लोकांनीं उत्तमोत्तम पारखली आहे. किंबहुना, ब्रिटिशसरकारच्या राज्यकर्तृत्वाची सर्व मदार ह्या एका पारखीवर आहे. हिंदूंची ही संन्यस्त मनोरचना हिंदुसमाजाच्या सर्व जातींतून, वर्गांतून व पेशांतून दिसून येते. शिपाईलोकांचा वर्ग घ्या. हिंदु शिपायांच्या तात्त्विक धर्माच्या आड आलें नाहीं, म्हणजे ज्याचें मीठ तो पोटाला खाईल त्याची चाकरी तो कुत्र्याप्रमाणें एकनिष्ठपणें करील, इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष सोदर भावावरहि शस्त्र उपसावयाला मागेंपुढें पहाणार नाहीं. मात्र, त्याची भाकर त्याला बिनबोभाट मिळाली पाहिजे. हिंदू कारकून वाटेल

त्या पाश्चात्याची—मग तो फ्रेंच असो, फिरंगी असो, इंग्रज असो, किंवा मोंगल असो—खर्डे-घासी व कारभारीपणा करील, प्रसंगीं स्वजनाच्या विरुद्धहि वागेल, फक्त त्याची ओली-कोरडी भाकर व तात्त्विक धर्म हीं दोन त्याला बिनबोभाट मिळालीं पाहिजेत. हिंदू वाणी वाटेल त्या देशांत—आफ्रिका, अरबस्तान, चीन, जपान, यूरोप—जाऊन व हिंदुस्थानांत राहून वाटेल त्या परदेशस्थाची दलाली व मुकदमी करील, मात्र त्याचा धर्म व त्याचा नफा त्याला बिनबोभाट मिळाला पाहिजे. हीच कथा हिंदू भिक्षुक, हिंदू सटरफटर लेखक, हिंदू शेतकरी, वगैरे सर्व लोकांची आहे. तात्त्विक धर्माच्या आड आलें नाहीं, म्हणजे हिंदू-च्या संन्यस्त मनोरचनेचा वाटेल त्या मतलबी लोकांनीं फायदा घ्यावा. मनोरचना संन्यास-प्रवण असल्यामुळें, स्वजातीयांच्या सुखदुःखाशीं समानशील होऊन एकोप्यानें समाजकार्य, शिपाईगिरी, मुत्सद्दीपणा, व्यापारधंदा किंवा शेती करून, उरकण्याची बुद्धि सवस्क हिंदूंना होत नाहीं व पोटाची खळी भरण्याकरितां—संन्यासप्रवण झाला तरी ती कशीतरी भर-लीच पाहिजे—दुसऱ्याची गुलामगिरी पतकरणें प्राप्त होतें. तेव्हां देशभक्त व कार्यकर्त्या मुत्सद्यांनीं हिंदूलोकांची ही तात्त्विक संन्यासप्रवण मनोरचना बदलण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे, अशी सल्ला इतिहासाचा समाजमनोरचनात्मक जो भाग आहे तो सांगतो. मनो-रचनेचें दुसरें एक उदाहरण घेतों. इंग्रज लोकांचा हिंदुस्थानांतील स्वभाव दीर्घद्वेषी, खुनशी, संशयी, द्रव्यलोभी व सत्यापलापी आहे, असें त्यांच्या हिंदुस्थानांतील गेल्या तीनशे वर्षांच्या चरित्रावरून दिसून येतें. Honi sua que mali panse अशी त्यांची प्रतिज्ञाच आहे. तेव्हां, त्यांच्या समाजावर जर कोणास कांहीं कार्य घडवून आणावयाचें असेल, तर त्यानें आपली इच्छा ह्या स्वभावाला स्पर्श न होईल अशा बेतानें तडीस नेली पाहिजे किंवा विरोधभक्तीनें त्याला चिडवून सामर्थ्य असल्यास चेपीत व चापीत गेलें पाहिजे. सारांश, समाजरचनात्मक जो इतिहासाचा भाग त्याच्या परिशीलनापासून कार्य-कर्त्या मुत्सद्यांना फार फायदा करून घेतां येण्याजोगा आहे. समाजचरित्राच्या निरनिराळ्या इतर भागांच्या परिशीलनापासूनहि असेच महत्त्वाचे फायदे आहेत. उद्योगी, विचारवंत व महत्त्वाकांक्षी राजे जेव्हां कमिशनें नेमतात, रिपोर्ट मागवितात, सद्यःस्थिति दोन दोन चार चार वर्षांनीं जोखून पहातात, लोकसंख्या मोजतात, सांपत्तिक स्थिति अजमावतात, ग्रंथकर्तृत्व परीक्षून पहातात, तेव्हां ते एकाप्रकारें समाजाचें चरित्र ऊर्फ इतिहासच तयार करून मनन करीत असतात. अशा हेतूनें कीं अंमलाखालील समाजांवर व पोटसमाजांवर व समाजांतील चळवळ्या व्यक्तींवर इष्ट कार्य घडवून आणण्याचीं साधनें माहीत असावीं. स्वपरसमाजचरित्राच्या सूक्ष्म व व्यापक परिशीलनापासून असे बहुमोल फायदे आहेत. त्यांची प्राप्ति करून घेण्याकरितां, नानातऱ्हेच्या स्वपरेतिहाससाधनांच्या शोधास, संग्रहास, रक्षणास व प्रसिद्धीस कोण कार्यकर्ता योग्य सहाय्य केल्यावांचून राहील ?

७० साहाय्य कोणत्या प्रकारचें पाहिजे ? द्रव्यसाहाय्य पाहिजे, कीं मनुष्यसाहाय्य पाहिजे, कीं सानुभूति पाहिजे किंवा केवळ भरपूर स्तुति पाहिजे ? असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. पैकीं उत्तराला प्रारंभ करतांना, स्तुति व च्युति ह्या दोन जखिणींची

नाहीं. स्वसमाजाचें सबीज व सकारण चरित्र कळलें असतां, सामाजिक गुणदोष दृष्ट्युत्पत्तीस यतात आणि दोषांचा त्याग व गुणांचा परिपोष करण्याकडे प्रवृत्ति होते. दोषत्याग व गुणपरिपोष हा इतिहासज्ञानाचा मुख्य उद्देश आहे. परसमाजांचें चरित्र कळलें असतां, त्याच्यापासूनहि गुणदोषविवेचनद्वारां बोध घेतां येतो. उदाहरणार्थ, शक १२०० पासून १७७९ पर्यंतचें महाराष्ट्रसमाजचरित्र पाहिलें व तदाश्रयभूत कारणांचा शोध केला म्हणजे असें कळून येतें कीं, हीं ५७९ वर्षें महाराष्ट्रसमाज तात्त्विक स्थितींत आहे आणि त्याची गांठ परस्वापहरण करणाऱ्या पाश्चात्यांशीं पडली आहे. संन्यासप्रवण व समाजद्वेष्ट्या तात्त्विक स्थितींत राष्ट्रीभवन व शत्रुनिर्दलन अशक्य होतें. ह्या दोन गोष्टी साधण्यास प्रपंचप्रवण व समाजसाधक अशा रामदासी तत्त्वज्ञानाचा उपयोग फार होतो. परंतु, शास्त्रीय स्थितींत असलेल्या शत्रूंचें उच्चाटन करण्यास स्वतःचा समाज शास्त्रीय स्थितीप्रत नेला पाहिजे. असे अनेक बीजभूत सिद्धान्त समाजचरित्र, समाजशास्त्र व समाजतत्त्वज्ञान यांच्यापासून होत असतें. समाजचरित्राचीं बीजें कळलीं नाहींत, म्हणजे समाजहित साधण्याची बुद्धि असूनहि समाजहित साधतां येत नाहीं. उघडच आहे, रोगस्थान कळल्याशिवाय औषधोपचार कोठें करावयाचा व शक्तिस्थान कळल्याशिवाय तिची वृद्धि कोठून व्हावयाची? इतिहासज्ञानापासून हा एकच फायदा एवढा मोठा आहे कीं तत्प्रीत्यर्थ देशहितकर्त्यांनीं वाटेल ती घस सोसण्यास तयार व्हावें. समाजचरित्राचीं मुख्य सुत्रें तद्घटक व्यक्तींच्या मनोरचनेंत आहेत. ही मनोरचना कळली असतां समाजिक शरीरावर विवक्षित कार्य घडवून आणण्याची शक्यता विशेष असते. उदाहरणार्थ, पैशाला खोट न पडतां, इतर कोणताहि अपमान सहन करावा, अशी वाणी लोकांची मनोरचना आहे. अशा वणिक्समाजाला हातीं धरण्यास, त्यांच्या द्रव्याचा अपहार करण्याची किंवा न करण्याची ताकद आपल्या जवळ आहे, हें कार्यकर्त्या मुत्सद्यानें त्यांच्या निदर्शनास आणून दिलें म्हणजे कार्यभाग होण्यासारखा आहे. दुसऱ्याच्या भानगडींत न पडतां व विकतश्राद्ध न घेतां, आपला संसार आपण करून स्वस्थ असावें, अशी सध्यांच्या तात्त्विक हिंदूंची संन्यस्त मनोरचना आहे. ही मनोरचना लक्ष्यांत घेऊन, शेजारचें घर, शेजारची इस्टेट, शेजारचें संस्थान किंवा शेजारची बायको लुटण्याची जर कोणा मतलबी व शिरजोर पुरुषाला इच्छा झाली, तर त्यानें लुटल्या जाणाऱ्या इसमाच्या शेजाऱ्याला त्रास न देण्याची हमी घ्यावी म्हणजे त्याचें काम बिनबोभाट व यथासांग उरकेल. तात्त्विक हिंदूंची ही संन्यस्त मनोरचना यूरोपीयन लोकांनीं उत्तमोत्तम पारखली आहे. किंबहुना, ब्रिटिशसरकारच्या राज्यकर्तृत्वाची सर्व मदार ह्या एका पारखी-वर आहे. हिंदूंची ही संन्यस्त मनोरचना हिंदुसमाजाच्या सर्व जातींतून, वर्गांतून व पेशां-तून दिसून येते. शिपाईलोकांचा वर्ग घ्या. हिंदु शिपायांच्या तात्त्विक धर्माच्या आड आलें नाहीं, म्हणजे ज्याचें मीठ तो पोटाला खाईल त्याची चाकरी तो कुत्र्याप्रमाणें एकनिष्ठ-पणें करील, इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष सोदर भावावरहि शस्त्र उपसावयाला मागेंपुढें पहा-णार नाहीं. मात्र, त्याची भाकर त्याला बिनबोभाट मिळाली पाहिजे. हिंदू कारकून वाटेल

त्या पाश्चात्याची—मग तो फ्रेंच असो, फिरंगी असो, इंग्रज असो, किंवा मोंगल असो—खडें-घासी व कारभारीपणा करील, प्रसंगीं स्वजनाच्या विरुद्धहि वागेल, फक्त त्याची ओली-कोरडी भाकर व तात्त्विक धर्म हीं दोन त्याला बिनबोभाट मिळालीं पाहिजेत. हिंदू वाणी वाटेल त्या देशांत—आफ्रिका, अरबस्तान, चीन, जपान, यूरोप—जाऊन व हिंदुस्थानांत राहून वाटेल त्या परदेशस्थाची दलाली व मुकदमी करील, मात्र त्याचा धर्म व त्याचा नफा त्याला बिनबोभाट मिळाला पाहिजे. हीच कथा हिंदू भिक्षुक, हिंदू सटरफटर लेखक, हिंदू शेतकरी,वगैरे सर्व लोकांची आहे. तात्त्विक धर्माच्या आड आलें नाहीं,म्हणजे हिंदू-च्या संन्यस्त मनोरचनेचा वाटेल त्या मतलबी लोकांनीं फायदा घ्यावा. मनोरचना संन्यास-प्रवण असल्यामुळें, स्वजातीयांच्या सुखदु:खाशीं समानशील होऊन एकोप्यानें समाजकार्य, शिपाईगिरी, मुत्सद्दीपणा, व्यापारधंदा किंवा शेती करून, उरकण्याची बुद्धि सवयस्क हिंदूंना होत नाहीं व पोटाची खळी भरण्याकरितां—संन्यासप्रवण झाला तरी ती कशीतरी भर-लीच पाहिजे—दुसऱ्याची गुलामगिरी पतकरणें प्राप्त होतें. तेव्हां देशभक्त व कार्यकर्त्या मुत्सद्यांनीं हिंदूलोकांची ही तात्त्विक संन्यासप्रवण मनोरचना बदलण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे, अशी सल्ला इतिहासाचा समाजमनोरचनात्मक जो भाग आहे तो सांगतो. मनो-रचनेचें दुसरें एक उदाहरण घेतों. इंग्रज लोकांचा हिंदुस्थानांतील स्वभाव दीर्घद्वेषी, खुनशी, संशयी, द्रव्यलोभी व सत्यापलापी आहे, असें त्यांच्या हिंदुस्थानांतील गेल्या तीनशें वर्षांच्या चरित्रावरून दिसून येतें. Honi sua que mali panse अशी त्यांची प्रतिज्ञाच आहे. तेव्हां, त्यांच्या समाजावर जर कोणास कांहीं कार्य घडवून आणावयाचें असेल, तर त्यानें आपली इच्छा ह्या स्वभावाला स्पर्श न होईल अशा बेतानें तडीस नेली पाहिजे किंवा विरोधभक्तीनें त्याला चिडवून सामर्थ्य असल्यास चेपीत व चापीत गेलें पाहिजे. सारांश, समाजरचनात्मक जो इतिहासाचा भाग त्याच्या परिशीलनापासून कार्य-कर्त्या मुत्सद्यांना फार फायदा करून घेतां येण्याजोगा आहे. समाजचरित्राच्या निरनिराळ्या इतर भागांच्या परिशीलनापासूनहि असेच महत्त्वाचे फायदे आहेत. उद्योगी, विचारवंत व महत्त्वाकांक्षी राजे जेव्हां कमिशनें नेमतात, रिपोर्ट मागवितात, सद्यःस्थिति दोन दोन चार चार वर्षांनीं जोखून पहातात, लोकसंख्या मोजतात, सांपत्तिक स्थिति अजमावतात, ग्रंथकर्तृत्व परीक्षून पहातात, तेव्हां ते एकाप्रकारें समाजाचें चरित्र ऊर्फ इतिहासच तयार करून मनन करीत असतात. अशा हेतूनें कीं अंमलाखालील समाजांवर व पोटसमाजांवर व समाजांतील चळवळ्या व्यक्तींवर इष्ट कार्य घडवून आणण्याचीं साधनें माहीत असावीं. स्वपरसमाजचरित्राच्या सूक्ष्म व व्यापक परिशीलनापासून असे बहुमोल फायदे आहेत. त्यांची प्राप्ति करून घेण्याकरितां, नानातऱ्हेच्या स्वपरेतिहाससाधनांच्या शोधास, संग्रहास, रक्षणास व प्रसिद्धीस कोण कार्यकर्ता योग्य सहाय्य केल्यावांचून राहील ?

७० साहाय्य कोणत्या प्रकारचें पाहिजे ? द्रव्यसाहाय्य पाहिजे, कीं मनुष्यसाहाय्य पाहिजे, कीं सानुभूति पाहिजे किंवा केवळ भरपूर स्तुति पाहिजे ? असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. पैकीं उत्तराला प्रारंभ करतांना, स्तुति व च्युति ह्या दोन जखिणींचीं

बिऱ्हाडें जवळजवळ आहेत, हें प्रस्तुत लेखक जाणून आहे. तेव्हां, ह्या, चरम साहाय्याची तो अपेक्षा करीत नाहीं. बाकीच्या तिन्ही प्रकारच्या साहाय्याची दिवसेंदिवस फारच अवश्यकता भासमान होत आहे. ती कशी तें सविस्तर नमूद करण्याची परवानगी घेतों.

७१. शक १८१० त काव्येतिहाससंग्रहादि साधनांची व ग्रांटडफादिरचित पाश्चात्य बखरकारांची मीं तुलना केली. तीवरून अशी खात्री होत चालली कीं, डफादि मंडळीच्या लेखांतून येणाऱ्या अपविचारांची व अपविधानांची दुरुस्ती विश्वसनीय साधनें शोधून करणें जरूर आहे. शक १८१२ पासून अस्सल व विश्वसनीय साधनें शोधण्याच्या खटपटीस प्रारंभ करून १८२० त साधनांचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. हा खंड तीनदां छापला गेला. पहिली प्रत पुण्यास श्रीविठ्ठल छापखान्यांत १८१९ सालीं छापली, ती सबंद श्रीविठ्ठल छापखान्याबरोबर अग्नयेस्वाहा झाली. तिचा सर्व खर्च केवळ अंगावर पडला. सुमारें एक हजार रुपयाचें नुकसान झालें. पैकीं छपाईचें नुकसान छापखान्याच्या मालकांनीं सोसलें व कागदाचें नुकसान माझें माझ्या अंगावर राहिलें. तें अद्याप तसेंच आहे. दुसरी प्रत पाव अष्टमांश सापकराच्या छापखान्यांत छापिली; परंतु अशुद्ध फार निघूं लागली म्हणून रद्दीच्या भावानें वाण्याला विकली. तिसरी प्रत वांईस भाऊशास्त्री लेल्यांच्या मोदवृत्तांत छापिली व प्रथम प्रसिद्ध केली. तिच्या छापणावळीस श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांनीं चारशें रुपयांची देणगी दिली. बाकीचा सहाशें सातशें रुपये खर्च विक्रींतून काढला. हा खंड छापीत असतां शोधनाचें काम चालूंच होतें व अद्यापिही चालूं आहे. पहिला खंड छापल्यानंतर चौथा खंड चित्रशाळेचे मालक रा० रा० वासुदेवराव जोशी यांनीं आपल्या जबाबदारीवर प्रसिद्ध केला. दुसरा, तिसरा, पांचवा, सहावा व आठवा असे पांच खंड प्रो० विजापूरकर यांनीं ग्रंथमालेंतून स्वतःच्या खर्चानें छापून काढिले. पैकीं ग्रंथकाराच्या मेहनतीचा अल्पस्वल्प मोबदला म्हणून ग्रंथमालाकार प्रत्येक खंडाच्या पन्नास प्रति मला देतात. त्या विकून शोधनाचा व प्रवासाचा खर्च मोठ्या काटकसरीनें मी करतों. ह्या पुस्तकविक्रीपासून आजपर्यंत सरासरी सहाशें रुपये प्राप्ति मला झालेली आहे. ह्या अवधींत सुमारें ५०० रुपये श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर, रा० रा० पांडोबा शिराळकर, रा० रा० रावजी भिडे ह्या तीन मंडळींनीं आपखुषीनें व उदारपणानें दिले. शिवाय दोघा तिघा स्नेह्यांकडून प्रवासाकरितां सहाशें रुपये मीं कर्ज काढले, मिळून आजपर्यंत स्वतःच्या खर्चानें व लोकांच्या देणग्यांनीं मीं सुमारें ३६०० रुपये ह्या कामीं खर्चिले आहेत. पैकीं देण्यांचे व पुस्तकविक्रीचे २१०० रुपये वजा जातां सध्यां मला १५०० कर्ज आहे. सुमारें ९०० रु० वासुदेवराव जोशांचे, २०० रुपये प्रो० विजापूरकरांचे, ३०० रुपये रा० रा० जनार्दन नीळकंठ पेंडसे यांचे व ४५ रुपये कै० सदाशिवराव परांजपे यांचें कर्ज आहे. पैकीं वासुदेवराव जोशी यांचे मूळचे कागदाचे ५०० किंवा ६०० रुपये होते, ते व्याजानें आठनऊ वर्षांत ९०० झालेले आहेत. इतर लोक व्याज घेत नाहींत. हें कर्ज पुढील खंडांच्या विक्रीनें फेडावयाचें आहे मी प्रवासखर्च व चरितार्थ बिनबोभाट कसा चालवितों हें पुष्कळ लोक मला विचारतात. त्यांच्या

समाधानार्थ हा कंटाळवाणा तपशील दिला आहे. माझे धनको माझ्यावर बहुत प्रेम करीत असल्यामुळें, त्यांच्या अडचणींच्या प्रसंगींहि त्यांनीं मला फारशी कधीं निकड लाविली नाहीं, हें खरें आहे. परंतु, कर्ज आहे, ही कठोर बाब विसरतां येत नाहीं.

७२. प्रो० विजापूरकरांनीं जे पांच खंड छापून काढिले त्यांना सरासरी २१०० रुपये खर्च पडला आहे आणि वासुदेवराव जोशांनीं चवथा खंड छापला त्याला ३०० रुपये लागले असावे. पूर्वींचे ३६०० व हे २४०० मिळून आजपर्यंत ५००० रुपये माझे व लोकांचे खर्चून सुमारें ३२०० पृष्ठें ऐतिहासिक मजकूर प्रसिद्ध झाला आहे. शिवाय महाराष्ट्रसारस्वत मासिकपुस्तकद्वारां दासोपंत नामक कवींचीं ५०० पृष्ठें वाईस प्रसिद्ध केलीं. त्या मासिकाला केवळ ५०।६० च वर्गणीदार मिळाल्याकारणानें, तें बंद करावें लागलें. ह्याखेरीज सुमारें साठ सत्तर ऐतिहासिक मुद्यांवर सुमारें ७०० अष्टपत्री पृष्ठें मीं ऐतिहासिक निबंधांत विवेचन केलें आहे. सारांश, इतिहासाचीं साधनें, सारस्वताचीं साधनें, व ऐतिहासिक टीका ह्या तीन रूपांनीं ५००० रुपयांत ४४०० पृष्ठें नवीन मजकूर शोधून व विवेचून मीं प्रसिद्ध केला आहे. ह्या स्तुत्य उठाठेवींत १५०० रुपये कर्ज म्हणजे नुकसान झालेलें आहे.

७३. हें एवढेसें काम करावयाला जर १५०० रुपये कर्ज झालें, तर शंभरपट काम अद्याप व्हावयाचें आहे, त्याला सुमारें दीड लाख रुपये कर्ज होईल व पांच लाख रुपये खर्च लागेल, असा साधा हिशोब दिसतो. कारण, सध्यां मजजवळ हजार बाराशें अप्रसिद्ध ग्रंथ व सुमारें ४०।५० हजार महत्त्वाचीं ऐतिहासिक पत्रें जमा झालीं आहेत. त्यांपैकीं बराच भाग प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. इतिहाससाधनभूत अस्सल लेख देशांतील सर्व लोक वाचीत नाहींत, इतकेंच नव्हे तर कटाकटी तीन चारशें लोक त्यांच्यावर विहंगमदृष्टि फिरवितात व फार झालें तर, इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास करणारे वीस पंचवीस लोक त्यांचा आस्थेनें परामर्ष घेतात, अशी ज्याअर्थीं वस्तुस्थिति आहे, त्याअर्थीं पांचपन्नास हजार पत्रें छापण्याच्या खटाटोपांत न पडून आपल्याला व आपल्या भिडेच्या स्नेह्यांना व्यर्थ नागवून घेऊं नये, अशी कित्येक गृहस्थांची सल्ला आहे. परंतु ती व्यापक विचार करून दिलेली नसून, केवळ एकदेशी आहे, असें मला वाटतें. तात्त्विक हवेच्या संन्यासप्रवण व मांद्योत्पादक दाबाखालीं चिरडून गेल्यामुळें, प्रपंचाची म्हणजे इतिहासाची हेळसांड करण्याकडे लोकांचा आत्मघाती जो कल आहे, तो घालविण्यासाठीं इतिहासज्ञानप्रसाराची व तत्साधनप्रसिद्धीची अवश्यकता सध्यां विशेषच आहे, असें माझें ठाम मत आहे. काल, देश व कुल ह्या त्रिविध दृष्टीनें भारतवर्षाच्या व महाराष्ट्राच्या नानाविध चरित्राचा अफाट विस्तार पहातां, आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं साधनें जलाशयांतून एकाद्या बेडकानें मोठ्या प्रयासानें आपल्या क्षुद्र ओंजळींत वाहून आणलेल्या बिंदूप्रमाणें आहेत; त्या बिंदुमात्रानें संन्यासप्रवणतेचीं मलिन पटलें धुवून जाणार कशीं ? हें मालिन्य साफ नाहींसें करावयाला जलाशयांतून शेकडों मोठमोठे पाट फोडून संन्यासप्रवणतेवर सतत सोडून दिले पाहिजेत. रूपक सोडून देऊन, स्पष्टार्थानें इतिहाससाधनप्रसिद्धीची मर्यादा सांगितली असतां, बराच गैरसमज दूर होईल, असें वाटतें. भारतवर्ष व महाराष्ट्र यांच्या दहा हजार वर्षांच्या चरि-

त्रांतील इतक्या लाखों बाबी संशोधून व विवेचून सिद्ध झाल्या पाहिजेत कीं, त्यांच्यापासून कार्यकारणरूपी सामान्य नियमांचा पत्ता लागून आर्यसमाजशास्त्र व आर्यसमाजतत्त्वज्ञान निर्माण करणें संभाव्य होईल. ही संभाव्यता शक्यतेच्या कक्षेंत येईतोंपर्यंत लाखों साधनांचें प्रकाशन, विवेचन व संशोधन झालें पाहिजे. भारतवर्षांच्या वर्तमानक्षणापर्यंतच्या गतकालीन चरित्राची सूक्ष्म व व्यापक परीक्षा करण्याचा हा दीर्घ उद्योग नेटानें, धिमेपणानें व एकनिष्ठेनें कित्येक वर्षें लाखों रुपये खर्चून शेकडों तज्ज्ञानीं तडीस नेण्यास झटलें पाहिजे. ह्याचा अर्थ असा कीं, ज्या भावी कालापर्यंत भारतवर्षांतील आर्यसमाजाचें चरित्र चालू राहील, तोंपर्यंत हांहि उद्योग चालूच राहील. हा भावी काल सामान्यतः अनंत समजण्यास कोणतीच हरकत नाहीं! वाटल्यास अनंताच्याऐवजीं अमर्याद शब्द वापरावा म्हणजे नेमस्त व शास्त्रीय भाषा वापरल्यासारखें होईल.

७४. हें प्रचंड व दीर्घकालावर्ती कृत्य साधणार कसें? कोणचा उपाय योजला असतां व कोणतें यंत्र निर्मिलें असतां, हें कार्य तडीस लागण्याच्या मार्गाला लागेल? आमच्यासारख्या एकट्यादुकट्या भुकेवंगालाच्या जीवापाड परिश्रमानें ह्या कामाचा प्रारंभही झाला म्हणणें हास्यास्पद आहे. कीर्तन्यांनीं सहा महिने खपून दोन बखरी, सान्यांनीं बारा वर्षें खपून चाळीस बखरी, खऱ्यांनीं वीस वर्षें खपून दोन हजार पृष्ठें व मीं पंधरा वर्षें खपून चवेचाळीसशें पृष्ठें प्रसिद्ध केलीं. ह्या सर्वांनीं केलेलें काम, एखाद्या राजानें, महाराजानें किंवा सार्वभौमानें दोन रखेल्यांचा वर्षाभराचा मेहनताना ह्या कामीं खर्चिण्यानें मनांत आणिलें असतें तर, पंधरा हजार रुपयांच्या व्ययानें सहा महिन्यांत सहज आटोपलें असतें. पण बेलिफाचें शिक्षण मिळालेलें व पोलीस शिपायाचे विलास भोगूं इच्छिणारे नृपाधम जोंपर्यंत गाद्यावरून लोळत आहेत, तोंपर्यंत त्यांच्यापासून प्रोत्साहन राहूंद्याच, सामान्य साहाय्यहि मिळण्याची आशा करणें व्यर्थ आहे. बेलिफांनीं न्यायमीमांसा व पोलीस शिपायांनीं राजनीति कशाशीं तोंडीं लावावयाची? राजांचा खालचा जो जमीनदार, इनामदार वगैरेंचा वर्ग तोहि अद्यापि निद्रापद भोगीत आहे. शेतकरी, उदमी, कारकून व पंतोजी हे बोलूनचालून काबाडकष्ट करणारे लोक त्यांच्यापासून ह्या कामाला साहाय्य कसें मिळणार? रहातां राहिले आंग्लशिक्षित लोक, मास्तर, वकील, हायकोर्ट वकील, मुन्सफ, जज्ज, इंजिनेर, डॉक्तर, वगैरे जे बूटपाटलोणवाले बडे बडे महंत आहेत, त्यांची तर ह्या कृत्यावर बहुत खपा मर्जी झालेली दिसते. बड्या बड्या विद्वानांचें व महान् महान् देशहितकर्त्यांचें निवासस्थान जें मुंबई शहर त्या राजधानींत पांच पन्नास पृष्ठांचें एखादें ऐतिहासिक मासिक पुस्तक सहज चालेल ह्या आशेनें आमच्या एका हायकोर्ट वकील मित्रानें एक मासिकपुस्तक मोठ्या उत्साहानें सुरू केलें. महंतांच्या व ऋषींच्या कर्णपथापर आरंभिलेल्या कार्याची वार्ता आदळली व कित्येक विद्वद्रत्नांकडून द्रव्यसाहाय्याचीं आश्वासनेंहि मिळविलीं. आणि एवढा थोरला कडेकोट बंदोबस्त होऊन, ह्या मासिकाला सात महिन्यांतच गाभाटावें लागलें? पुरे शंभरहि वर्गणीदार मिळाले नाहींत, आणि जे मिळाले त्यांपैकीं शेकडा नव्वद भिडेखातर

मिळाले. केवळ स्वदेशाच्या चरित्रप्रेमानें झालेला वर्गणीदार ह्या संतमहंतांतून एखाद-दुसरा झाला असल्यास, न कळे. विद्वान् व देशहितकर्ते म्हणून ज्यांना म्हणतात त्यांची कळकळ असली आहे. केवळ ज्ञानार्जनांतच नव्हे, तर खाण्यापिण्यांत व वस्त्रप्रावरणांत सुधारेल्या पाश्चात्यांचें सर्वस्वीं अनुकरण करण्याचा बाणा बाळगणाऱ्या ह्या मुंबईंतलि देशभक्तांनाहि औदासिन्यानें व संन्यासप्रवणतेनें सोडलें नाहीं. प्रपंच, इतिहास, समाज ह्यांचें हित करण्याचा उपदेश ज्यांनीं पाश्चात्यांपासून घेतला त्यांनीं स्वसमाजाच्या चरित्राच्या प्रसिद्धीकरणार्थ वर्षांतून शांपेनच्या एका अर्ध्या बोतलचीहि किंमत देऊं नये ? परंतु, स्वार्थाचा त्याग करण्याला ज्यांना पाश्चात्यांनीं शिकविलें त्यांनीं स्वेतिहासाचा व स्वत्वाचा त्याग करूं नये तर काय करावें ! येणेंप्रमाणें समाजांतील बहुतेक सर्व वर्ग–आंग्लभाषाकोविद व अकोविद–औदासिन्यानें घेरलेला आहे. तेव्हां, आतां, हें काम व्हावें कसें ?

७५. एकेकट्याच्या सान्निपातिक तडफेनें काम फार तुटपुंजें, असमाधानकारक व कनिष्ठ प्रतीचें होतें, ही गोष्ट अलीकडील चाळीस वर्षांच्या अनुभवानें कायम ठरल्यासारखी आहे. तेव्हां संघशक्तीचा आश्रय करण्यावांचून दुसरा उपाय नाहीं. कलौ संघः प्रकीर्तितः. संघशक्ति अनेक प्रकारांनीं योजतां येईल. इतिहासाचें आस्थापूर्वक परिशीलन करणारे जे पांचपन्नास लोक सध्यां देशांत आहेत, त्यांनीं पंचवीस किंवा पन्नास रुपये वार्षिक वर्गणी प्रत्येकीं देऊन हजार दोन हजारांची रक्कम आपसांत उभारावी व प्रकाशन, संग्रहण व शोधन करावें. ज्या विषयाची देशांतील लहानथोर लोकांना गोडी नाहीं, त्याविषयाचीं साधनें व पुस्तकें प्रकाशण्यास यूरोपांत असले तज्ज्ञसमाज स्थापिले जातात यूरोपांत पाली सोसायटी अशाच प्रकारची आहे. पाली भाषेचीं पुस्तकें व साधनें प्रसिद्ध व्हावीं, अशी ज्या पन्नास शंभर तज्ज्ञांची इच्छा आहे, त्यांनीं एकदोन गिनी वार्षिक वर्गणी देऊन, हा पालीसमाज स्थापिला आहे. असल्या तज्ज्ञसमाजापासून एक फायदा असतो. तो हा कीं, मारूनमुटकून कोण्या अतज्ज्ञाला भागीदार केला नसल्यामुळें पाली पुस्तकें छापून काय होणार आहे, छापलेलें पुस्तक गचाळ आहे, वगैरे अज्ञ व अर्धवट टीका होण्यास जागा रहात नाहीं. संघशक्ति योजण्याचा दुसरा प्रकार ह्याहून किंचित् निराळा आहे. दहा पांच तज्ज्ञांनीं स्वतःच्या भिडेनें श्रीमंत व सामान्यलोक ह्यांच्याकडून देणग्या व वर्गण्या घेऊन मंडळी स्थापावयाची व कमिटीद्वारां इष्टकार्य संपादावयाचें ह्या प्रकारांत श्रीमंत व सामान्य लोक यांना इष्ट विषयाची थोडीबहुत गोडी आहे व अवश्यकता वाटते, असें गृहीत धरून चालावें लागतें किंवा अशी वस्तुस्थिति असते. तिसरा प्रकार दहापांच तज्ज्ञांच्या मंडळीनें अज्ञ व तज्ज्ञ अशा लाखों लोकांकडून पैपैसा वर्गणीनें लाखो रक्कम जुळवून इष्टकार्य तडीस न्यावयाचें ह्या प्रकारांत लोकांचा तज्ज्ञांवर विश्वास असावयाला हवा असतो. एकाच धनाढ्य व तद्विषयासक्त मनुष्यानें दहापांच लाखांची कायमची देणगी देऊनहि असल्या मंडळ्या किंवा संस्था चालूं शकतात. आपल्या इकडे पुण्यांतील आनंदाश्रम असल्याच प्रकारची संस्था आहे. एखाद्या सरकारनें जर ही गोष्ट करावयाची मनांत आणली तर ती

त्याला सहज करतां येण्याजोगी आहे. हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारनें फॉरेस्ट वगैरे लोकांना लाखो रुपये पगार देऊन इतिहाससाधनें प्रसिद्ध केलेलीं महशूर आहेत. इतिहाससाधनें छापण्याकरितां हें पांचहि प्रकार इंग्लंडांत सध्यां चालू आहेत व पांचपंचवीस वर्षांपूर्वी चालू होते. Rolls series व Record commission ( सरकार ), Maitlaced Club, Parker Society ( धनाढ्य ), Hardy's descriptive catalogue of Historical Mss. ( व्यक्तिमात्र ), English Historical Society ( मंडळी ), Pali Society ( तज्ज्ञसमाज ), असे अनेक प्रकार यूरोपांत आहेत. पैसाफंड मात्र ह्या कामीं योजलेला दिसत नाहीं. त्याच्याद्वारां आपल्या इकडील औदासिन्याच्या हवेंत काम चांगलें होईल असें दिसतें. शिवाजी फंडाचे २०।२५ हजार रुपये केसरीकर्त्यांच्या प्रोत्साहनानें सहज जमा झाले. सारांश, ह्या पांचहि उपायांपैकीं एकाचें किंवा साधल्यास सर्वांचें अवलंबन करून एक इतिहासमंडळ स्थापिलें पाहिजे. मंडळासारखा अव्याहतपणें काम चालण्यास दुसरा उपाय नाहीं. गेल्या वर्षांत पांचपंचवीस गृहस्थ मला असे भेटले कीं ज्यांना इतिहासमंडळ स्थापण्याचें अगत्य वाटूं लागलें आहे व तत्प्रीत्यर्थ अल्पस्वल्प द्रव्य खर्चण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे. अशा अगत्यवान तज्ज्ञ व तदभिमानी लोकांनीं एखादें इतिहासमंडळ स्थापिलें व पैपैसाफंडद्वारां द्रव्य जमविलें तर कार्यभाग होणार आहे. इतिहासाभिमानी लोकांच्या मननार्थ इष्ट कार्याचा विस्तार केवढा आहे व तत्साधनार्थ द्रव्य किती पाहिजे त्याचा माझ्या मतें अंदाज येणेंप्रमाणें आहे.

७६. कार्यभागाचीं मुख्य अंगें तीनः—( १ ) इतिहाससाधनसंशोधन, ( २ ) साधनसंग्रह, ( ३ ) साधनप्रकाशन. मराठ्यांच्या व हिंदुस्थानांतील इतर समाजांच्या इतिहासाचीं साधनें हिंदुस्थानांत शेंकडो स्थलीं व यूरोपांतील पांचचार राजधान्यांत सांपडण्यासारखीं आहेत. तीं शोधून काढावयास प्रथमारंभीं निदान दहा तज्ज्ञ गृहस्थ लावले, तर प्रत्येकीं अन्नखर्च व प्रवासखर्च मिळून वर्षाला ६०० रुपये धरल्यास ६००० रुपये पाहिजेत. अशा दहा लोकांच्या सतत व अविश्रांत खटपटीशिवाय हें अवाढव्य काम समाधानकारक रीतीनें उरकणार नाहीं. शोधून आणिलेल्या साधनांचा संग्रह करण्यास इमारत पाहिजे. तिचा खर्च सुमारें १०,००० रुपये. आणि दरवर्षाला १०,००० अष्टपत्री पृष्ठें ऐतिहासिक अस्सल साधनें प्रकाशण्यास १०,००० रुपये. मिळून, प्रथम इमारतीप्रीत्यर्थ कायम बुडित खर्च— १०,००० रुपये.

दरवर्षास संशोधनास व प्रकाशण्यास—१६,००० रुपये.

इमारत व साधनसंग्रह यांच्या व्यवस्थेस लागणाऱ्या एका कारकुनाचा व एका हमालाचा वार्षिक पगार १५ व १० रुपये दरमहाप्रमाणें— ३०० रुपये.

आणि सादिलवार खर्च दिवा, बत्ती, कागद वगैरे–५०० रुपये.

एकूण १६,८०० रुपये वार्षिक चालता खर्च व १०,००० रुपये बुडित खर्च लागणार आहे. चालक मंडळीनें व तज्ज्ञांनीं साधनें व प्रकाशनार्थ तयार करण्याचें काम फुकट करावयाचें आहे. प्रका: तर १०,००० रुपये अर्थात् लागणार नाहींत. केवळ ६८०० रुपये व्यवस्था व संरक्षण यांच्याकरितां लागतील. हा सर्व अंदाज स्थूल ३ . ाभ- मानी मंडळीच्या सल्ल्याप्रमाणें यांत योग्य फेरफार करणें जरूर पडेल.

७७. प्रस्तुत हें सर्व मनोराज्य आहे. पंधरावीस हजारांची रक्कम दरवर्षास खर्च-णारी स्वतंत्र लोकसंस्था कांग्रेसखेरीज दुसरी या देशांत नाहीं. कांहीं खासगी शाळा वगैरे संस्था वीस पंचवीस हजारांचा विनियोग करणाऱ्या आहेत. परंतु पांच दहा हजार रुपयां-करितां त्या सरकारच्या भिंध्या अतएव लोकहितदृष्ट्या निरुपयोगी बनल्या आहेत. तसा प्रकार ह्या भावी संस्थेचा होऊं नये, अशी सर्वांची इच्छा आहे. कर्ता करविता स्वदेशांतील अभिमानी समाज आहे.

---

# खंड ८ वा.

१. इतिहासाचीं साधनें अव्वल व दुय्यम अशीं दोन प्रकारचीं असतात. स्थूल-मानानें अस्सल लेख अव्वल प्रतीचे व त्याव्यतिरिक्त लेख दुय्यम प्रतीचे. अस्सल लेखांत पत्रें, याद्री वगैरेंचा व तव्यातिरिक्तांत बखरी, टिपणें वगैरेंचा समावेश होतो. नीळकंठराव कीर्तन्यांनीं नुसत्या बखरी छापिल्या. काव्येतिहाससंग्रहकारांनीं दोन्ही प्रकारचीं साधनें निरनिराळीं छापिलीं, प्रभू लोकांच्या इतिहासाच्या साधनकारानीं दोन्ही साधनांचा अव्य-वास्थित संग्रह केला. प्रो० फारेस्ट यांनींहि तोच मार्ग स्वीकारिला आहे. ज्या ग्रंथांत शिवा-जीची एक गबाळ बखर त्यांनीं प्रसिद्ध केली त्यांतच इतर अस्सल लेखांचाहि समावेश झालेला आहे; व प्रस्तावनेंत अस्सल लेखांपेक्षां सदर गबाळ बखरीला जास्त महत्त्व दिलेलें आहे. सदर बखरीची योग्यता काय हें न कळल्यामुळें हा प्रकार झाला हें उघड आहे. रा० पारसनिसांच्या भारतवर्षांत अस्सल पत्रांपेक्षां बखरी व कैफियती ह्यांचाच भरणा जास्त आहे. पारसनिसांचा ब्रह्मेंद्राचा पत्रव्यवहार, व रा० खरे ह्यांचें पटवर्धनी दफ्तर हीं मात्र निर्भेळ अस्सल लेखांचीं भांडारें आहेत. मीं छापिलेलीं पहिलें, तिसरें, पांचवें व आठवें खंड हींहि ह्याच वर्गांत मोडतात. माझ्या दुसऱ्या व चवथ्या खंडांत दोन्ही प्रका-रांची क्वचित् भेसळ आहे.

२. अलीकडील तीस वर्षांत छापिलेल्या ह्या दोन्ही प्रकारच्या साधनांत एक विशेष आहे. तो हा कीं, तीं जशीं सांपडलीं तशींच छापिलीं जात असतात. त्यांत संक्षेप किंवा विस्तार करण्याची बुद्धि कोणालाहि झाली नाहीं. हीं बुद्धि जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यं-तच साधनाचें खरें स्वरूप कायम राहून, पुढें होणाऱ्या इतिहासचिकित्सकांना मराठ्यांच्या इतिहासाचा निःशंक अभ्यास करतां येणार आहे.

३. हीं साधनें लोकांपुढें मांडतांना निरनिराळ्या गृहस्थांनीं निरनिराळे मार्ग स्वीका-रिलेले आहेत. कोणी ह्या साधनांना अर्थनिर्णायक टीपा देतात; कोणी लहानशी परि-चायक प्रस्तावना लिहितात; व कोणी ह्यांपैकीं कांहीं एक न करितां नुसतीं उघडीं बोडकीं साधनेंच लोकांच्या सेवेस हजर करितात. कोणी ह्या तिघांच्याहि पुढें जाऊन ह्या साध-नांपासून मिळणारी संगतवार हकीकत आपल्या पुस्तकाला जोडतात. कित्येक असेहि आहेत कीं जे वाटतील तीं निराधार विधानें ह्या हकीकतींत घुसडून देतात. सारांश, अ-व्यवस्थित रीतीनें मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें प्रकाशन, मंडण व संकलन आज-पर्यंत होत आलें आहे. खरें पाहिलें तर, ह्या साधनांचें प्रकाशन बऱ्याच निराळ्या प्रका-

रानें झाले पाहिजे. केवळ उघडीं बोडकीं साधनें लोकांपुढें मांडणें यद्यपि प्रकाशकाला अनेक तऱ्हांनीं सकृद्दर्शनीं निरुपद्रवी असतें, तत्रापि तें आस्थेनें अभ्यास करणाऱ्या मंडळींस अनेक कारणांनीं बराच वेळ फसवणुकेचें होतें व वरवर वाचून अनुमानें काढणाऱ्यांस तर कायमचें फसवतें. उदाहरणार्थ रा० वाड ह्यांनीं तयार केलेल्या व रा० पारसनीस ह्यांनीं पर्वा छापिलेल्या शाहू महाराजांच्या रोजनिशींतील वेंचे घ्या. ह्या पुस्तकाला सूचना, विनंति, उपोद्घात किंवा प्रस्तावना ह्यांपैकीं कांहींच नसल्यामुळें, ( १ ) मूळ रोजनिशी किती व कोण्या कारकुनांनीं लिहिली, ( २ ) मूळ रोजनिशीचा आकार अथ पासून इतिपर्यंत एक सारखा आहे किंवा लहान मोठा आहे, ( ३ ) मूळ रोजनिशी सुटी आहे किंवा बांधलेली आहे, ( ४ ) मूळ रोजनिशींतलि कांहीं कागद गहाळ, फाटलेले अगर भिजलेले आहेत किंवा तीं सबंद शाबूत आहे, ( ५ ) रोजनिशी मूळ आहे किंवा नक्कल आहे, वगैरे तपशील कळण्याला कांहींच मार्ग रहात नाहीं. हा खुलासा झाला असता, म्हणजे हीं रोजनिशी अव्वल महत्त्वाची आहे किंवा दुय्यम महत्त्वाची आहे हें ठरवितां आलें असतें. सदर रोजनिशी ज्या स्वरूपानें बाहेर आली आहे, त्यावरून ती अस्सल नसावी अशी शंका उत्पन्न होते. कां कीं, ह्या छापील रोजनिशींतलि एकाच मुसलमानी वर्षांतलि पुष्कळ कलमें अनुक्रमवार लागलेलीं नाहींत उदाहरणार्थ, १२ व्या पृष्ठापासून १५ व्या पृष्ठापर्यंत दिलेलें समान अशरीन मया व अलफ हें साल घेतो. ह्या सालचीं २९ पासून ४० पर्यंत व सुद्धां १२ कलमें दिलेलीं आहेत. समान अशरीन साल १४ सवालीं म्हणजे २५ मे १७२७ स सुरूं झालें व २४ सवाल म्हणजे २३ मे १७२८ स संपलें. अर्थात् ह्या सालांतील पहिलें कलम २९ न देतां ३९ दिलें पाहिजे; व मूळ रोजनिशींत तें तसेंच असेल ह्यांत संशय नाहीं. कारण २९ वें कलम इ. स. १७२७ च्या अक्टोबरांतील आहे व ३९ वें कलम १७२७ च्या जूनांतील आहे. महिन्यांच्या अनुक्रमानें पाहिलें म्हणजे मूळ रोजनिशींत छापील रोजनिशींतील २९ पासून ४० पर्यंतच्या कलमांचा अनुक्रम ३९, ३२, ४०, ३३, २९, ३०, ३१, ३४, ३५, ३६, ३७, ३८, असा असला पाहिजे. छापील रोजनिशींतील १०७ पृष्ठापासून ११९ पृष्ठापर्यंतच्या सलास खमसैन सालांतलि कलमेंहि अशींच उलट लागलेलीं आहेत. २४७ पासून २५९ पर्यंतचीं कलमें २२८ पासून २४६ पर्यंतच्या कलमांच्या अगोदर पाहिजेत. तेव्हां ज्या रोजनिशींत, तारखांचा अनुक्रम तर राहूंद्याच, परंतु महिन्यांचाहि अनुक्रम असा वाकडातीकडा झाला आहे ती रोजनिशी अस्सल कशी समजावयाची ? मूळ रोजनिशी म्हटली म्हणजे तींत हा असला गवत्या गोंधळ कसा असूं शकेल ? अर्थात् ज्या रोजनिशीवरून ही छापील रोजनिशी बनली गेली, ती अस्सल नसून जुन्या अस्सलावरून व इतर माहितीवरून बनविलेली संक्षिप्त नक्कल असावी, असा संशय येतो. हा संशय दुसऱ्या एका बाबीवरून दृढ होतो; ती बाब ही. अमात्यांची माहिती देतांना ७३ व्या पृष्ठाच्या प्रारंभीं हें वाक्य आहे:—"प्रतापसिंह महाराज यांचे खासगी दप्तरांत याद आहे त्यावरून दाखल केलें." ह्या वाक्यावरून असें निष्पन्न होतें कीं इ. स. १८४८ त सातारचें राज्य गेल्यावर प्रतापसिंहाचें खासगी दफ्तर इनाम कमिशनाच्या

हातीं आलें व त्यावरून ही रोजनिशी—जिच्यावरून छापील रोजनिशी छापिली गेली—बनली गेली. अर्थात्, वर्तमान छापील रोजनिशी शाहू महाराजांच्या मूळ अस्सल रोजनिशींतील वेंचे घेऊन तयार केली असा जर कोणाचा विश्वास असेल, तर त्याला बिलकुल आधार नाहीं हें स्पष्ट होतें व वर घेतलेला संशय निश्चयाच्या पदवीला पोहोंचण्याच्या लायकीचा होतो. खरा प्रकार बहुशः असा असावा कीं १८४८ नंतर इनाम कमिशनच्या दफ्तरांतून पेशव्यांच्या राशियतीची एक रोजनिशी बनविण्याचा मुंबई सरकारचा हुकूम सुटला असावा व त्या हुकमाबरहुकूम ही पंचवीस हजार लेखी पानांची रोजनिशी तयार झाली असावी. अशी ह्या रोजनिशीसंबंधानें कच्ची हकीकत असावी, अथवा बहुशः आहे. ही रोजनिशी इनाम कमिशनच्या पुणें येथील दफ्तरांत तीस चाळीस वर्षें अज्ञात पडल्यावर तिच्याकडे कांहीं मंडळीची दृष्टि गेली व तिचें पुनरुज्जीवन होण्याची वेळ आली. अशी जरी ह्या रोजनिशीची कथा असावी असें वाटतें, तथापि तींत बरीच अस्सल माहिती असावी अथवा आहे ह्यांत फारसा संशय नाहीं. तरी देखील, हा अस्सलपणा निर्भेळ आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण, प्रतापसिंहाच्या खासगी दफ्तरांतील बऱ्याच सटरफटर यादी ह्या रोजनिशींत घुसडल्या आहेत. ह्या यादींतील पुष्कळ कलमें अस्सल कागदपत्रांच्या आधारानें तयार केलेलीं नाहींत, इतकेंच नव्हे, तर कित्येकांना श्रुतीखेरीज दुसरा आधार नाहीं. कित्येक कलमें ग्रांट डफच्या इतिहासावरून घेतलीं आहेत. उदाहरणार्थ, ७७ व्या पृष्ठावरील जयसिंग जाधवाचें कलम पहा. “जयसिंग जाधव कधीं नेमले ती तारीख समजत नाहीं, परंतु सन १७०९ यांस सेनापति असें लिहिलें आहे.” प्रतापसिंहाच्या यादींत इसवी सन यावा हें आधीं पहिलें आश्चर्य! जयसिंग जाधव व धनाजी जाधव ह्या दोन भिन्न व्यक्ति होत्या हें ह्या यादींत म्हटलें आहे हें दुसरें आश्चर्य? आणि हें कलम विश्वासार्ह आहे असें रा. वाडांस वाटलें हें तिसरें आश्चर्य! परंतु सर्वांत मोठें आश्चर्य हें कीं शाहू राजाच्या रोजनिशींत अवांतर महिती व तीहि चुकीची घालण्याची बुद्धि वाडांस व्हावी व आपण चूक करीत आहों हें ह्या विद्वानांस न कळावें! येणेंप्रमाणें अस्सल कागदपत्र जसेच्या तसेच न छापतां त्यांत अवांतर माहिती घालून विस्तार करण्याची बुद्धि संपादकांना झाली, हें ह्या रोजनिशींतील पहिलें व्यंग आहे. तसेंच ह्या रोजनिशींत संक्षेपाचेंहि व्यंग आहे. (१) मूळ शाहू राजाची अस्सल रोजनिशी, (२) तीवरून तयार केलेली इनामकमिशनची रोजनिशी, (३) व तींतून वेंचून काढिलेली ही छापील रोजनिशी, अशी ही तीनदां पिळून काढलेली निःसत्त्व रोजनिशी आहे. ह्या रोजनिशींतहि संपादकांनीं खेळखंडोबा थोडाथोडका केलेला नाहीं. महिनेवार व तारीखवार तर कलमें लाविलीं नाहींतच. परंतु वेंचे काढतांना आपण ते कोणत्या धोरणावर काढतों ह्याचाहि नियम राखिलेला नाहीं. अनेक कलमांचा कित्ता या शब्दानें प्रारंभ झाला आहे. परंतु हा कित्ता कोणत्या मूळाचा त्याचा पत्ता नाहीं. सर्व कलमें मूळांतल्याप्रमाणें दिलेलीं आहेत किंवा नाहीं ह्याचा खुलासा नाहीं. मूळ रोजनिशी केवळ जावक पत्रांची आहे, हें छापील रोजनिशीचीं सर्व कलमें तपाशिलीं असतां स्पष्ट होतें. मूळपत्रांचा जावकांत कारकुनांनीं

संक्षेप किती केला ह्याचा सापेक्ष तपशील संपादकांनीं दिला नाहीं. तसेंच मूळरोजनिशींतून व इनाम कमिशनाच्या रोजनिशींतून कोणतीं कलमें गाळलीं व तीं कोणत्या धोरणावर गाळलीं ह्याचाहि खुलासा झाला नाहीं. अशा नाना प्रकारच्या शंका ह्या रोजनिशीसंबंधानें उद्भवतात. एकंदरींत ही रोजनिशी पाहून माझें असें मत झालें आहे कीं, शाहू छत्रपतीची मूळ रोजनिशी जशीची तशीच छापिली असती व त्यांत संक्षेप किंवा विस्तार यत्किंचित्‌हि केला नसता, तर फार उतम गोष्ट होती. जे जे कोणी ही छापील रोजनिशी साक्षेपानें वाचतील व इतरत्र उपलब्ध झालेल्या अस्सल माहितीशीं ती ताडून पाहतील त्यांना मूळ रोजनिशी जशीची तशी छापिली नाहीं, ह्याबद्दल फार खेद वाटेल. ह्या रोजनिशीला अर्थनिर्णायक म्हणून एक कोश ! दिला आहे. त्यांत बऱ्याच शब्दांचे अर्थ चुकले आहेत * व खरोखर कठीण व दुर्बोध अशा शब्दांचा मुळीं उल्लेखच नाहीं. सारांश ऐतिहासिक लेख छापण्याचे बहुतेक सर्व जगन्मान्य नियम ह्या रोजनिशीनें मोडले आहेत.

---

* कोशांतील कित्येक चुकलेले शब्दार्थ व त्यांचा खरा अर्थ खालीं देतों.

| शब्द. | चुकलेला अर्थ. | खरा अर्थ व शब्द |
|---|---|---|
| वजारतमाहा | आंग्र्यांची पदवी. | वजारतमाब, प्रधानस्थान. वजारतमाब ही पदवी इतर सरदारांनाहि असे. |
| माहोना | जासुदाचें नांव | महिन्याचा पगार. |
| कही | बिनी, सैन्याच्या आघाडीचे लोक | सैन्याला लागणाऱ्या सामानाच्या शोधार्थ हिंडणारी लष्करी मंडळी. |
| लब | जासूद | निरोप घेऊन जाणारी, नेण्या-आणण्यास जाणारी मंडळी. |
| गाहा करणें | तयारी करणें | एका जागेवर असणें. |
| स्वस्ताक्षरपणीं | स्वतः लिहिलेला | स्वस्थपणें लिहिलेलें. |
| मजुरा | मजरा ( ? ) | कृतार्थता. |
| गुजरात कुली | आणखी इसमांच्या | हुजरात कुली, सर्व हुजूरची फौज. |
| पैरवी | बंदोबस्त | पाठलाग, शोध. |
| आंगेजणी | पराक्रम | एकी करणें [ आंगेख्तन् to renew a confederacy ]. |
| दिंमत हुद्दे | हिंमत हुद्देकरी ( ? ) | उंट जलदीनें चालवणें=हुद्दा. |
| मुजाहीम | अडथळा ( नाम ) | गैरसोईचें ( विशेषण ). |
| हरोल होऊन | मूळ अर्थ सैन्याची पिछाडी ! सामील होऊन. | जलदी करून. |

४. ही रोजनिशी न्यायमूर्ती रानडे यांच्या अनुमतानें झाली असें ऐकिवांत आहे. न्यायमूर्तींनीं ह्या रोजनिशीवर एक निबंधहि एशिआटिक सोसायटीपुढें वाचलेला प्रसिद्ध आहे. परंतु एवढ्यावरून ऐतिहासिक साधनें कोणत्या पद्धतीनें तयार करावीं व छापावीं ह्याचा तपशिलवार मसुदा त्यांनीं रा० वाड यास करून दिला होता असें म्हणणें मुष्किलीचें आहे. रा० वाड हे बऱ्याच वर्षांचे पदवीधर होते, तेव्हां हें काम ते चोख करतील, असा न्यायमूर्तींचा समज असावा. परंतु रा० वाड ह्यांचा हा व्यासंग नसल्यामुळें ऐतिहासिक साधनांच्या व्याप्तीचा अंदाज करण्याची ताकत त्यांना आली असण्याचा संभव फारच थोडा होता. खरें म्हटलें म्हणजे शाहूमहाराजांची जी मूळ अस्सल रोजनिशी आहे ती संक्षेप किंवा विस्तार न करतां जशीच्या तशीच छापिली पाहिजे होती. एखादें नांव चुकलें, एखादी तारीख वाकडीतिकडी पडली, तर केवढा घोटाळा होतो तो तज्ज्ञांना माहीत आहे. ह्या गोष्टीचा अंदाज डेक्कन ट्रान्सलेशन सोसायटीचे अध्यक्ष जे डॉ० भांडारकर त्यांना उत्तमोत्तम होणार आहे. बारकाईनें प्राचीन लेख तपासण्याच्या व अस्सल व नक्कल ह्यांच्यांत किती अंतर असतें हें पहाण्याच्या पद्धती त्यांना अवगत आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखालीं चालणाऱ्या संस्थेच्या हातून असले गबाळ ग्रंथ बाहेर पडावे, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय.

---

| | | |
|---|---|---|
| धाराईत | उदक सोडून | धारादत्त. |
| निगादास्त | बंदोबस्त | राखण करणें. |
| विशदर्थें | रागानें | स्पष्टपणें. |
| अंगारक | आंग्रे | ताम्र, म्लेच्छ. |
| विजरे | पोर्तुगीज गवर्नर ( ? ) | पोर्तुगीज व्हाइसराय. |
| बेदरका | बेदरकार असा शब्द असावा, याचा अर्थ माणसें वगैरे देऊन | वाटाड्या. |
| बंद धरून नेणें | कैद करणें | गुलाम धरून नेणें. |
| गीर्दनवाई | चहूंकडचे ( ? ) | सैन्याच्या भोंवतालची जागा. |
| जराबाजरा | किरकोळ सामान | यत्किंचित्. |
| आमरफ्ती | व्यापार | आमद्रफ्ती, येणें जाणें. |
| फरातग | विक्री करणें | फरोक्त. |

कोशांतील असे शब्दार्थ आणीकहि चुकलेले आहेत. मूळांत तर वाचनाच्या इतक्या चुक्या आहेत कीं डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीला हें पुस्तक, माझ्या मतें, कायमचें लांछन झालें आहे. शब्दांचे वाटतील ते अर्थ देणें म्हणजे सोसायटींतील सभासद दुधखुळीं पोरें आहेत असेंच ठरविणें आहे ! माहोना हें जासुदाचें नांव आहे हें विद्वद्वर्य रा० पारसनिस यांस कोणत्या कोशांत कळलें तें न कळे. इतका गचाळपणा ज्या सोसायटींत खपला जातो तिला एखाद्या भावी कवीच्या डन्शियाडांत अढळ पद खास मिळेल !

५. माझ्या मतें जुने ऐतिहासिक लेख येणेंप्रमाणें छापावे. ( १ ) प्रथम, लेख जसेचे तसे शुद्ध छापावे. ( २ ) ते मिळाले कोठून, ते अस्सल आहेत किंवा नक्कल आहेत, ते आहेत कोणत्या स्थितींत, वगैरे माहिती पूर्ण द्यावी. ( ३ ) त्यांतील कठिण व दुर्बोध एकोनएक शब्द व वाक्यें छानून तपासावीं व त्यांचा अर्थ द्यावा. ( ४ ) त्यापासून अनुमानें काय निघतात तें मुद्देसूद लिहावें, ( ५ ) व शेवटीं त्यापासून संगतवार वृत्तांत काय निघतो ते दाखवावें.

६. प्रस्तुत खंडांत छापिलेलीं बहुतेक पत्रें अस्सल आहेत. तीं मिळालीं कोठून हें उपोद्घातांत सांगितलेलें आहे. आतां ह्या उपप्रस्तावनेंत दुर्बोध स्थलें विशद करण्याचा व पत्रांतील मजकुरापासून अनुमानें काय निघतात तें दाखविण्याचा मनोदय आहे; व शेवटीं त्यापासून संगतवार वृत्तान्त काय निघतो तें पहावयाचें आहे. पैकीं शिवाजी, संभाजी, राजाराम व धाकटा शिवाजी ह्यांच्यासंबंधीं संगतवार वृत्तांत देण्याचा समय अद्याप आला नाहीं. आणीक एक दोन खंडांत ह्या कारकीर्दीसंबंधानें लेख द्यावयाचे आहेत ते आल्यावर संगतवार वृत्तांत मुख्य प्रस्तावनेंत देतां येईल. बाकी राहिलेल्या कोल्हापूरच्या संभाजीसंबंधानें व बावडेकरांच्यासंबंधानें मात्र संगतवार वृत्तांत येथें देण्यास हरकत नाहीं.

७. ह्या खंडांत शिवाजीचीं एकंदर ३६ पत्रें आहेत. त्यांच्यासंबंधानें पहिली विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे अक्षराची होय. मोडी अक्षर प्रथम इ० स० १२६० पासून १३०९ पर्यंत महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या महादेव व रामदेव जाधव ह्यांच्या कारकीर्दींत दफ्तरदारीचें काम करणाऱ्या हेमाडपंतानें सुरू केलें, अशी एक फार दिवसांपासून चालत आलेली ऐतिहासिक कथा आहे; व ही कथा खरी आहे असें पुढील कारणावरून दिसतें. इ० स० १२६० सालापूर्वीचे एकोनएक लेख शिलांवर, ताम्रपटांवर किंवा ताडपत्रांवर लिहिलेले आढळतात. ह्या तिन्ही जिनसांवर प्रत्येक अक्षर हात थांबविल्यावांचून लिहितां येत नाहीं. अर्थात्, एका हातासरशीं दहापांच अक्षरें जलद लिहिण्याची सोय आपल्या ह्या देशांत बाराव्या शतकापर्यंत माहीत होती असें दिसत नाहीं. त्यावेळीं व्यवहारांतील सामान्य पत्रें ताडपत्रांवर, भूर्जपत्रांवर, कातड्यावर व बऱ्याच वेळां कापडावर लिहून पाठवीत असत असें विधान करण्यास हवा तितका आधार आहे. मजजवळ पर्शराम पंडितानें केलेला भूपालवल्लभनामक ग्रंथाचा सारभूत पर्शरामोपदेश नांवाचा एक यंत्रग्रंथ आहे. त्याच्या परिसमाप्तीचा श्लोक येणेंप्रमाणें:—

श्रीशालिवाहनशकेष्टमुनीद्विचंद्र १२७८।
संख्ये गते सति च दुर्मुखनाम्नि वर्षे ॥
आषाढमाससितयुग्मतिथौ सुरेज्य।
धिष्ण्ये दिने व्यरचयद्द्विजपर्शरामः ॥ ३४ ॥

ह्या श्लोकावरून पर्शरामोपदेश हा ग्रंथ शक १२७८ त म्हणजे इ० स० १३५६ त लिहिला गेला, असें होतें. ह्या ग्रंथांत प्रथम शक १२४८ पासून म्हणजे इ० स० १३२६ पासून प्रभवादि संवत्सरांचीं फलें दिलीं आहेत, व नंतर शेकडो यंत्रांच्या आकृति कशा व कशावर काढाव्या तें सांगितलें आहे.

हरिद्रा तालकशिलामेषमूत्रसमन्विता ।
कोकिकाख्यस्य लेखन्या नीलरक्तपटे लिखेत् ॥ ९६ ॥
कालेयरोचनाचंद्रैर्लज्जालुगजवारिभिः ।
मदनद्रुमलेखन्या यंत्रं भूर्जे लिखेदिदम् ॥ १०५ ॥
रोचनाकुंकुमाभ्यां तु भूर्जपत्रे सुशोभने ।
सुवर्णमयलेखन्या पद्ममष्टदलं लिखेत् ॥ १३२ ॥
व्रणहीने भूर्जपत्रे खरवामाश्ववीसृजः ।
वीतांगारेण संयुक्तः कृष्णोन्मत्तरसेन च ॥ १४३ ॥
विलिखेत् ॥ १४४ ॥
आनयेन्निर्व्रणं भूर्जं ग्रंथिहीनं सुशोभनं ॥ १७० ॥

पर्शरामोपदेशे भूपालवल्लभे मंत्रयंत्रप्रकरणम् ॥

हे श्लोक इ० स० १३२६ पासून १३५६ पर्यंतच्या तीस वर्षांत केव्हां तरी लिहिले आहेत. इ. स. १३१८ त मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत सुरू झालें. १३१८ च्या पूर्वी २५ वर्षें म्हणजे इ. स. १२९३ त अल्लाउद्दिन खिलजीनें यादवांच्या देवगिरीवर पहिली स्वारी केली. १२९३ सनापूर्वी बराबर शंभर वर्षें म्हणजे इ. स. ११९३ त शहाबुद्दिन घोरीनें दिल्लीच्या पृथ्वीराज चव्हाणाला जिंकिलें. इ. स. ११९३ त देवगिरीस म्हणजे महाराष्ट्रांत यादववंशी जैत्रपाळराजा राज्य करीत होता. इ. सन ११९३ पासून १२९३ पर्यंत जैत्रपाळ, सिंघण, कृष्ण, महादेव व रामचंद्र असे पांच राजे देवगिरीस झाले. रामदेव १३०७ व त्याचा मुलगा शंकरदेव १३१२ त वारला. १३१८ त रामचंद्राचा जावई हरपाळ याला सुल्तान मुबारिकानें ठार मारिलें व देवगिरी कायमची घेतली. त्यानंतर आठ वर्षांनीं पर्शरामपंडितानें आपला पर्शरामोपदेश नांवाचा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथांत भूर्जपत्रें व कापडाचे तुकडे यांवर यंत्रें लिहावीं असें अनेक ठिकाणीं म्हटलें आहे.

ह्यावरून एवढें सिद्ध होतें कीं मंत्र व यंत्रें लिहिण्यास भूर्जपत्रें व वस्त्रपट ह्यांचा उपयोग इ. स. १३२६ च्या सुमारास व पूर्वी लोक करीत असत. ज्ञानेश्वरींत चामावर म्हणजे चर्मावर व कापडावर लिहिल्याचा उल्लेख आहे. कायमचीं दानपत्रें तांब्याच्या पत्र्यावर लिहिण्याचा प्रघात इ. स. १३२६ त होता, ह्याला अनेक ताम्रपत्रांचा पुरावा आहे; इतकेंच नव्हे तर १३२६ च्या पुढें तीन चारशें वर्षें ताम्रपत्रांवर लिहिण्याचा प्रघात चालू होता, असें मुसुलमानांच्या व पेशव्यांच्या रियासतींतील बऱ्याच ताम्रपत्रांवरून उघड होतें. सारांश, भूर्जपत्रें, ताडपत्रें, वस्त्रपट, ताम्रपत्रें व चर्मपत्रें, ह्यांवर १३२६ पर्यंत व क्वचित् प्रसंगीं पुढें बरींच वर्षें, लेख लिहिण्याचा महाराष्ट्रांत बराच प्रचार होता. परंतु ह्यासुमारास म्हणजे १३२६ च्या पन्नास साठ वर्षें अगोदर लिहिण्याकरितां दुसरा एक जिन्नस प्रचारांत येऊं लागला. तो जिन्नस कागद हा होय. ह्या कागदावर लिहिण्यासंबंधानें ज्ञानेश्वरींत कांहीं दूरचे उल्लेख आहेत.

हें बहू असो. पंडितू ।
धरूनु बालकाचा हातू ।
वोळी लेहे वेगवंतू ।
आपणचि. ॥ अध्याय १३, ओवी ३०७ ॥
सुखाचीं लिपि पूसिली. ॥ अध्याय ३, ओवी २४६ ॥
दोषांचीं लिहिलीं फाडीं. ॥ अध्याय ४, ओवी ५२ ॥
आखरें पूसिलेया न पुसे
अर्थ जैसा ॥ अध्याय ८ ओवी १७४ ॥

* ह्या उताऱ्यांत "सुखाची लिपि पूसिली" हें वाक्य मोठें अर्थप्रचुर आहे. भूर्जपत्रें, ताडपत्रें, ताम्रपत्रें व वस्त्रपट ह्यांवर काढलेलीं अक्षरें पुसून टाकितां येत नाहींत; फार तर खोडून टाकितां येतात. ताम्रपत्रांवर लोखंडी लेखणीनें काढिलेलीं अक्षरें आडव्या रेघा मारून खोडून टाकितात. भूर्जपत्रें व ताडपत्रें ह्यांवर लोखंडी लेखणीनेंच लिहावें लागतें व तें लिहिणें पुसतां येत नाहीं. ह्यांच्यावरील लिहिणें नाहींसें करावयाचें असल्यास हरताळ वगैरे जिनसांचा उपयोग करावा लागतो. वस्त्रपटावरील लेखांनाहि हरताळाचाच लेप द्यावा लागतो. एकट्या कागदावरील ओल्या अक्षरांना मात्र "पुसून" टाकतां येतें. "दोषांचीं लिहिलीं फाडलीं" हेंहि वाक्य असेंच अर्थप्रचुर आहे. ताम्रपट तर मुदलांतच फाडितां येत नाहींत. भूर्जपत्रें व ताडपत्रें उभीं फाडतां येत नसल्यामुळें त्यावरचीं लिखितें फाडून तुकडे करून टाकितां येत नाहींत. फार झालें, तर त्यांच्या आडव्या चिरफळ्या करतां येतात. आतां रहातां राहिलें वस्त्रपट. वस्त्रपटांवरील लिखितें फाडतां येतील. परंतु ज्ञानेश्वरींत ग्रंथ, पुस्तक वगैरे शब्द आलेले आहेत; व वस्त्रपटांचे ग्रंथ, किंवा पुस्तकें होणें अशक्य आहे. तेव्हां ज्ञानेश्वरांनीं उल्लेखिलेलीं "लिहिलीं" म्हणजे कागदावरील लिखितें होत ह्यांत संशय नाहीं. शिवाय, वर दिलेल्या उताऱ्यांतील पहिल्या ओवींत, पंतोजी जलदीनें वोळी लिहितो असें विधान केलें आहे. आतां, ताम्रपट, भूर्जपत्रें, ताडपत्रें किंवा वस्त्रपट, ह्यांवर जलदीनें वोळी लिहितां येणार नाहींत हें उघड आहे. तेव्हां जलदीनें लिहितां येण्यासारखा ज्ञानेश्वरीला माहित असलेला जिन्नस म्हटला म्हणजे कागदच होय ह्यांत संशय नाहीं. आतां इतकें खरें आहे कीं ज्ञानेश्वरींत कागद हा शब्द कोठेंहि आलेला नाहीं व येणें शक्यहि नाहीं. परंतु कागद ह्या अर्थीं ज्ञानेश्वरानें दुसरा एक शब्द योजिलेला आहे, तो शब्द पाट हा होय.

पाटेयावरिलें आखरें ।
जैसीं पुसतां येतीं करें ॥ अध्याय १८, ओवी १०९९.

येणेंप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या वेळेस लिहिण्याच्या कामीं कागद प्रचारांत येऊं लागले होते, हें स्पष्ट आहे. ही गोष्ट केवळ अनुमानानेंच सिद्ध आहे असें नाहीं. ज्ञानेश्वरांचा

---

* ह्या ओव्या मजजवळील लेखी पोथींतील आहेत.

समकालीन किंवा किंचित् प्राचीन जो मुकुंदराज त्याच्या विवेकसिंधूची मूळ अस्सल प्रत जोगाईच्या आंब्यास मुकुंदराजाच्या शिष्यशाखेकडे आहे व ती कागदावर लिहिलेली आहे. ह्या मूळ प्रतीवरील अक्षरें तेराव्या शतकांतील जाधवांच्या शिलालेखांतील अक्षरांप्रमाणें असून तीं मुकुंदराजाच्या सध्यांच्या शिष्यांना, बाळबोध लिहिलीं असूनहि, वाचतां येत नाहींत, असें सांगतात. ह्यावरून इतकें सिद्ध होतें, कीं मुकुंदराज व ज्ञानेश्वर ह्यांच्या वेळीं लिहिण्याच्या कामीं कागदाचा अंशतः उपयोग लोक करूं लागले होते. ताडपत्रें, भूर्जपत्रें, व वस्त्रपट ह्यांचाहि उपयोग होत होताच. परंतु ह्या नवीन जिन्नसाकडे लोकांची प्रवृत्ति बरीच पडत चालली होती. ही प्रवृत्ति मुकुंदराज व ज्ञानेश्वर ह्यांच्या पूर्वीं, इतकेंच नव्हे तर, हेमाडपंताच्याहि पूर्वीं पांचपंचवीस वर्षें, होत होती. अशावेळी दफ्तरावरील मुख्याधिकारी जो हेमाडपंत त्यानें मोडी लिपी महाराष्ट्रांत नव्यानें सुरू केली. ह्या मोडी लिपीचाहि उल्लेख ज्ञानेश्वरानें वरील उताऱ्यांतील पहिल्या ओवींत केला आहे असें दिसतें. पंतोजी अक्षर वेगानें लिहितो, ह्या वाक्यांतील वेगानें हें पद विचारणीय आहे. बाळबोध अक्षर वेगानें लिहितां येत नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें वेगवंत हा शब्द योजण्यांत कांहीं विशेष अर्थ नव्हता. तो मोडी अक्षराच्यासंबंधानें मात्र सार्थ आहे. ह्यावरून असें दिसतें कीं ज्ञानेश्वरीच्या पूर्वीं मोडी अक्षर प्रचारांत आलें होतें. ज्ञानेश्वरी इ० स० १२९० म्हणज शके १२१२ त लिहिली गेली. त्यापूर्वीं तीस चाळीस वर्षें म्हणजे इ० स० १२६० पासून पुढें हेमाद्रि जाधवांचा दफ्तरदार होता. हेमाद्रि दफ्तरदार होण्याच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मुसुलमानांचें राज्य होऊन ऐंशी नव्वद वर्षें झालीं होतीं. सिंघण राजानें माळवा वगैरे विंध्याद्रीच्या पलीकडील प्रांत जिंकले होते. तेव्हां मुसुलमानांची उर्फ म्लेंछांची ओळख मराठ्यांना झाली होती. ही ओळख होत असतांना, मुसुलमानांची कागद करण्याची कला महाराष्ट्रांत सुरू झाली व ही सुरू झाल्यावर मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीला सुचली. ही मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीनें मुसुलमानांच्या शिकस्ता नामक लेखनपद्धतीवरून घेतली. फारशींत लिहिण्याच्या पद्धती अनेक आहेत. त्यांत नस्ख व शिकस्ता ह्या आपल्या इकडील बाळबोध व मोडी ह्यांच्याशीं जुळतात. नस्ख अक्षर बाळबोधीप्रमाणें स्पष्ट व सुव्यक्त असें लिहितात व शिकस्ता अक्षर मोडून लिहिलेलें असतें. फारशींत शिकस्तन् ह्या क्रियापदाचा अर्थ मोडणें असा होतो. जलदीनें लिहिण्यांत खडें अक्षर मोडून लिहिण्याचें जें वळण त्याला फारशींत शिकस्ता म्हणतात. मोडी हा शब्द फारशी शिकस्ता ह्या शब्दाचें हुबेहुब मराठी भाषांतर आहे. मोडी ह्या अर्थाचा वाचक शब्द संस्कृतांत किंवा महाराष्ट्रींत नाहीं. हा शब्द हेमाडपंतानें फारशी शिकस्ता ह्या शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देऊन मराठींत अक्षर लिहिण्याच्या एका पद्धतीला नव्यानें लागू केला. हेमाडपंतानें अक्षर लिहिण्यांत ही नवी सुधारणा केली. तोंपर्यंत महाराष्ट्रांत सर्व लेखी व्यवहार बालबोध अक्षरांत होत असे. ह्या नवीन सुधारणेवरून ही एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे कीं महाराष्ट्रांतील विचारी पुढारी लोक परदेशस्थांची एखादी चांगली रीती उपयोगी असल्यास ती स्वीकारण्यास फार पुरातन कालापासून तयार असतात.

इ. स. १२५० च्या अगोदर म्हणजे हेमाद्रीच्या पूर्वी सुमारें शंभर दीडशें वर्षें महाराष्ट्राच्या उत्तरेस हिंदुस्थानांत मुसुलमान आले असतां त्यांच्या शिकस्ता लिहिण्याच्या तऱ्हेवरून ब्रज भाषा मोडीनें लिहिण्याचा प्रचार तिकडील विचारी पुरुषांनीं पाडलेला दिसत नाहीं. व महाराष्ट्रांत मोडी लिहिण्याचा प्रघात आज साडेसहाशें वर्षें चालू असतां भरतखंडांतील इतर कोणत्याहि भाषेला हा प्रघात उचलण्याची आवश्यकता दिसली नाहीं. गुजराथी वगैरे इतर भाषांत पत्रें वगैरे रोजच्या व्यवहारांतील लिखाण किसबीड अशा मूळ बिन-ओळीच्या बाळबोध अक्षरांनींच करतात. मोडी हा शब्द फारशी शिकस्ता ह्या शब्दाचें भाषांतर आहे. ह्या प्रमाणाखेरीज फारशी मोडी अक्षरांवरून मराठी मोडी अक्षर घेतलें ह्याला दुसरें एक प्रमाण आहे. मराठी बाळबोध लिपींत प्रत्येक अक्षर निरनिराळें लिहितात, त्याप्रमाणें फारशींत नस्ख म्हणून ठळठळीत अक्षर लिहिण्याची जी एक तऱ्हा आहे ती नवशिक्यांनाहि समजण्यासारखी असते. परंतु ती देखील मराठी बाळबोध अक्षरांपेक्षां जास्त मोडलेली असते व तींत अनेक अक्षरें एकाच झटक्यासरशीं एकदम लिहिलीं जातात. तशांत उत्तम फारशी नस्ख अक्षर जातींचेंच मोडी वळणाचें असतें व त्याच्या मानानें शिकस्ता अक्षर तर अतीच मोडलेलें असून त्यांत नुक्त्यांचा बहुतेक लोप झालेला असतो. सारांश, फारशी अक्षरें लिहिण्याची पद्धत ज्यानें एकदां पाहिली त्याला देवनागरी बाळ-बोध अक्षरें एका झटक्यानें लिहिण्याची क्लृप्ति सुचण्याचा संभव आहे. कागदावर लिहिण्याचा प्रघात पडल्याबरोबर मोडी लिहिण्याचाहि प्रघात महाराष्ट्रांत त्वकरच पडला व हा प्रघात पाडण्याचें प्रथम श्रेय जाधवांचा दफ्तरदार जो हेमाद्रि त्यास विद्वत्तेच्या व अधिकाराच्या वजनावर सहजासहजीं घेतां आलें. आतां, कागदावर लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रांत पडल्यापासून मोडी लिहिण्याची चाल ह्या देशांत सुरू झाली अशी जर वस्तुस्थिति आहे, तर हेमाद्रीनें मोडी लिहिण्याची चाल लंकेहून आणिली अशी जी कथा आहे तींत कितपत अर्थ आहे तें पाहिलें पाहिजे. देवगिरीच्या जाधवांचें साम्राज्य सर्व दक्षिणभर कन्याकुमारीपर्यंत होतें हें प्रसिद्ध आहे. साम्राज्यांतील दफ्तरें तपासण्यास कन्याकुमारी किंवा रामेश्वर ह्या दक्षिणेकडील प्रांतांत जाऊन व कदाचित् लंकेची यात्रा करून परत आल्यावर सर्व दफ्तर मोडींत लिहिण्याचा वटहुकूम हेमाद्रीनें काढिला असावा असें दिसतें. लंकेहून परत येण्याला व हा नवा वट-हुकूम काढण्याला एकच गांठ पडल्यामुळें, लंकेचा व मोडी अक्षराचा लोकांनीं विनोदानें संबंध जोडून दिला असेल असें वाटतें.बाकी लंकेतील त्यावेळच्या सिंहली भाषेचा व मोडी-चा कांहीं संबंध होता ह्याला बिलकुल प्रमाण नाहीं. सिंहली भाषेंत मोडीचा प्रचार अद्यापहि नाहीं व पूर्वींहि नव्हता. अर्थात् मोडीचा प्रघात फारशी लिपी व फारशी कागद ह्यांच्या आगमनानें पडला ह्यांत फारसा संशय नाहीं.तशांत मोडी म्हणजे देवनागरी लिपीहून भिन्न अशा तामीळ, तेलगु, कानडी किंवा सिंहली अक्षरमालिकेपासून घेतलेली आहे असाहि प्रकार नाहीं.मोडी अक्षर देवनागरी अक्षरें मोडून तयार केलेलें आहे, हें चारपांचशें वर्षांचीं जुनीं पत्रें व महजर पाहिले म्हणजे स्पष्ट दिसून येतें. मजजवळ इ० स० १४१६

पासून आतांपर्यंतचे अनेक जुने मोडी लेख आहेत. इ० स० १२५० पासून १४१६ पर्यंतचा मात्र एकहि मोडी लेख अद्यापपर्यंत उपलब्ध झाला नाहीं. १४१६ च्या पुढील कागदपत्रांवरील मोडी अक्षर देवनागरी अक्षराशीं ताडून पाहतां, देवनागरी बालबोध अक्षरें एका झटक्यासरशीं लिहिल्यानें मोडी अक्षर सिद्ध होतें हें नामी कळतें. प्रायः देवनागरी बाळबोध प्रत्येक अक्षर दोन तीनदां हात थांबविल्यावांचून लिहितांच येत नाहीं. उदाहरणार्थ, अ, इ, उ, क वगैरे पाहिजे तें अक्षर घ्या. अ ला चारदां, इ ला दोनदां, उ ला दोनदां, क ला तीनदां किंवा चारदां हात थांबवावा लागतो. हींच अक्षरें हात न थांबवितां लिहिलीं म्हणजे त्यांचीं मोडी रूपें सिद्ध झालीं. आतां जसजसी मोडी पद्धति जास्त प्रचारांत आली व तिचा दरबारांत जास्त प्रवेश झाला, तसतसें मोडी अक्षर जास्त वळणदार, डौलदार, सफाईदार झालें, हें उघड आहे. ज्यांनीं मोडी अक्षराच्या ऐतिहासिक परंपरेकडे लक्ष्य दिलें नाहीं त्यांना मोडींतील कित्येक अक्षरें देवनागरी अक्षरांपासून निघालीं हें विधान बराच विचार केल्यावांचून व माहिती मिळविल्यावांचून खरेंहि वाटणार नाहीं इतका मूळ देवनागरी अक्षरांत व त्यांच्या डौलदार व भपकेदार मोडींत फरक झालेला आहे. उदाहरणार्थ, प्रस्तुतचें मोडी सा हें अक्षर घ्या. ह्याला वरची पोकळ गांठ व मधलें गरगरीत ढेर कोठून आलें हें वरवर पाहणाऱ्याला सांगतां येणार नाहीं. परंतु इ० स० १४१६ पासून आतांपर्यंतच्या मोडी लेखांत सा ह्या अक्षराची मोडी परंपरा कशी होत आली आहे, हें पाहिलें म्हणजे सध्यांचा हा पोकळ गांठीचा व ढेरपोट्या सा मूळ देवनागरी साचेंच रूपांतर किंवा वेषांतर आहे, हें ओळखतां येतें. प्रथम, सा मधील स चें खालचें शेंपूट व र आणि त्याचा पहिला काना ह्यांजमधील आडवी रेघ एकदम लिहूं लागले. त्यामुळें, खालच्या शेपटाला व आडव्या रेघेला जोडणारी एक अर्धकंसाकार वक्र रेषा प्रथम नव्यानें उपयोगांत आली. इ० स० १४१६ पासून १५५० पर्यंतच्या लेखांत हा जोड नुसता साधा वक्र आहे. पुढें वळणदार अक्षरचरणकांनीं ह्या वक्राला पुष्टी आणून त्याचें ढेर बनविलें, व ह्या ढेराला पेलण्यास वरतां एक भली मोठी पोकळ गांठ तयार केली, आणि दोन्ही काने एकदम लिहिण्याची सफाई सुरू केली. येणेंप्रमाणें बनत बनत सध्यांचा अगडबंब सा बनला आहे. ह्या अगडबंब साचेंहि एक दुसरें रूपान्तर झालें आहे. गाठ काढून टाकून व काने पिरगाटून कांहींसा निठव्याप्रमाणें ळकारासारखा एक सा काढीत असतात. ह्या सत व ळत फरक इतकाच कीं, ळचे दोन्ही जुवे घट्ट बसलेले असतात व साचे अगदीं उघडे असतात; आणि ळची उभी रेघ सांत आडवी मारतात. हा दुपोटी सा मूळ देवनागरी सापासून फारच रूपान्तरित आहे. परंतु हें रूपान्तर एकाएकीं मात्र प्राप्त झालेलें नाहीं. ह्याला फार काळ व बरीच मेहनत पडलेली आहे. हें शेवटलें रूप बनवायाला सहाशें वर्षांचा अवधी व अनेक कलमबहादरांची हातचलाखी लागलेली आहे! हाच प्रकार इतर अक्षरांचा आहे. इ० स० १४१६ पासून १८५० पर्यंतच्या पंचवीस तीस मोडी पत्रांचे फोटोझिंको देतां आले असते, तर हें विवेचन जास्त स्पष्ट झालें असतें.

८. शिवाजीच्या पत्रांसंबंधानें दुसरी विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे भाषेसंबंधींची आहे प्रस्तुत खंडांतील पहिला लेखांक विजापुरांतील सर्वश्रेष्ठ कारभारी जो दियानतराव त्यानें निळोपंत बहुतकर यांस पाठविलेला आहे. ह्या दियानतरावाचा उल्लेख काव्येतिहाससंग्रहान्तर्गत पत्रेंयादींतील ४३८ व्या लेखांकांत म्हणजे शहाजी महाराजांच्या कैफियतींत प्रारंभींच आला आहे. हा दियानतराव देशस्थ ब्राह्मण असून दियानतराव हा ह्याचा बहुशः किताब आहे. दियानत् ह्या फारशी शब्दाचा अर्थ धर्म. अर्थात् दियानत-राव म्हणजे धर्मराव किंवा सार्थ धर्माजीराव. आतां धर्मराव किंवा धर्माजीराव ह्या शब्दाचा दियानतराव असा फारशींत तर्जुमा होतो, तेव्हां दियानतराव हा किताब आहे किंवा हुए-न्संग संस्कृत विशेषनामाचे जसे अर्थावरून चिनी तर्जुमे कधीं कधीं करतो, त्याप्रमाणें मूळ मराठी नांवाचा हा फारशी तर्जुमा आहे, हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. हा प्रकार कांहीं असो, इतकें मात्र स्पष्ट आहे कीं, त्या कालीं ब्राह्मणहि फारशी नांवें स्वीकारण्यांत फुशारकी मानीत असत. सर्जेराव, बाजीराव, हैबतराव, जानराव, फिरंगोजीराव, शहाजी-राव, सर्फोजीराव, दर्याजीराव, मलंगोजीराव, गुलबाई वगैरे फारशींतून आलेल्या मराठी नांवांप्रमाणें दियानतराव हेंहि मराठींत त्या कालीं रूढ झालेलें नांव होतें. हा खुलासा पत्र लिहिणाऱ्याच्या नांवासंबंधानें झाला. आतां ह्या पत्रांतील शब्द व प्रयोग ह्यांच्याविषयींचा खुलासा करतों. ह्या लेखांकांत एकंदर ९१ शब्द आहेत, त्यांपैकीं बराबर ३० शब्द फारशी आहेत आणि एकंदर वाक्यप्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर आहेत. ९१ शब्दांपैकीं अस्सल फारशी ३० गाळले असतां, बाकी जे ६१ शब्द राहतात, त्यांतून दोन तीन शब्द खेरीजकरून बाकी सर्व शब्द फारशी शब्दांचे मराठी तर्जुमे आहेत. मायन्यांतील अखंडित-लक्ष्मीप्रसन्न व परोपकारमूर्ति हे शब्द दामदौलतहू व मुश्‌फिक्‌मेहेरबान् ह्या शब्दांचे हुबे-हुब तर्जुमे आहेत; आणि राजमान्य, राजश्री, गोसावी, यांसी, हे चार शब्द शुद्ध मराठी आहेत कोणत्याही फारशी मायन्यांतील शब्दांचें भाषान्तर नाहींत. आतां मायना सोडून देऊन खालील पत्राकडे वळूं. ह्या पत्रांत एकंदर दहा वाक्यें आहेत. पैकीं पहिल्या वाक्यां-तील सेवक हा शब्द बंदा ह्या फारशी शब्दाचें भाषान्तर आहे. संस्कृत नाटकांत जीं कांहीं पांच चार पत्रें सांपडतात, त्यांतील मायन्यांत सेवक हा शब्द कोठें आलेला आढ-ळत नाहीं. हेमाद्रीच्या वेळच्या मराठींतील किंवा त्यांच्या पूर्वींच्या महाराष्ट्रींतील पत्र-व्यवहाराचा एकहि मासला उपलब्ध नसल्यामुळें म्हणजे मुसुलमानांचा प्रवेश महाराष्ट्रांत होण्याच्या पूर्वी मराठांत किंवा महाराष्ट्रींत पत्रांचे मायने कसे लिहित असत तें नक्की सांगतां येत नसल्यामुळें, सेवक हा शब्द मायन्यांत योजण्याचा प्रघात जुन्या मराठीपासून किंवा तत्पूर्वींच्या महाराष्ट्रीपासून चालत आला किंवा नाहीं हें कांहींच ठरवितां येत नाहीं. बाकी फारशी दरबारी पत्रांतील मायन्यांत बंदा हा शब्द योजण्याची ज्या अर्थी फार पुरातनपासूनची चाल आहे, त्याअर्थी प्रस्तुत वाक्यांतील सेवक हा शब्द बंदा ह्या शब्दाचें भाषान्तर आहे, असेंच म्हणणें वाजवी दिसतें. ह्या वाक्यांतील दियानतराऊ हा शब्द अर्धा फारशी व अर्धा मराठी आहे: बाकीचे शब्द शुद्ध संस्कृत आहेत. दुसऱ्या वाक्यांतील

मौजे, किल्ले, माहताजी, नूरखानास व रवान् हे शब्द फारशी आहेत आणि बाकीचे प्रायः सर्व शब्द व प्रयोग फारशी शब्दांचे व प्रयोगांचे तर्जुमे आहेत. एकटा ' गाव ' हा शब्द तेवढा मराठी आहे. " मौजे उझार्डे किल्ले वंदन माहताजी गांव चालत असतां, " ह्या वाक्यांशाचा अर्थ येणेंप्रमाणें:--" ओझर्ड्याचें गांव किल्ले वंदन ह्या प्रांताखालीं चालत असतां. " ह्या वाक्यांत, मौजे उझार्डे व किल्ले वंदन, ह्या दोन स्थलीं इजाफत म्हणजे षष्ठीची इ आहे व ती तशीच मराठींत ठेविली आहे. मौजे उझार्डे= मौजा इ उझार्डे व किल्ले वंदन= किल्ला इ वंदन; म्हणजे ओझर्ड्याचें गांव व वंदनचा किल्ला. शुद्ध मराठी लिहावयाचें म्हटलें म्हणजे ओझर्ड्याचें गांव किंवा ओझर्डे गांव व वंदनचा किल्ला किंवा वंदन किल्ला असें लिहावयाला पाहिजे होतें. परंतु लेखकानें फारशीच पद्धत कायम ठेविली आहे व हीच पद्धत सध्यांच्याही दप्तरांत अशीच चालू आहे. माहताजी हा संयुक्त शब्द आहे. माह् म्हणजे प्रांत व ताज् म्हणजे चालणारा, धांवणारा. प्रांताखालीं चालणारा तो माहताज्. ह्याची एक संख्या दाखवावयाची असली म्हणजे ई प्रत्यय लावून माहताजी असे रूप करतात. तेव्हां माहताजी म्हणजे प्रांताखालीं चालणारा एक. आतां मौजे उझार्डे किल्ले वंदन ह्या स्थलीं ही एक इजाफत आहे. मौजा इ उझार्डे इ किल्ला इ वंदन= वंदन किल्याचें ओझर्डे गांव वंदन= वंदन किल्ल्याखालील ओझर्डे गांव. अर्थात्, ' मौजे उझार्डे किल्ले वंदन माहाताजी गांव चालत असतां= वंदन किल्ल्याखालील ओझर्डे गांव त्या प्रांताखालीं चालणारें एक गांव चालत असतां. येथें वाचकांच्या हें लक्षांत आलेंच असेल कीं उपान्त्य चालत हा शब्द ह्या वाक्यांशांत फाजील आहे. खरें म्हटलें असतां, माहताजी ह्या शब्दाचा अर्थ प्रांताखालीं चालणारें एक असा असल्यामुळें, उपान्त्य चालत हा शब्द येथें नको होता. " मौजे उझार्डे किल्ले वंदन माहताजी गांव असतां " असा वाक्यांश वस्तुतः पाहिजे होता. परंतु दियानतरावासारख्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यानें ज्या अर्थी चालत हा फाजील शब्द योजिला आहे, त्या अर्थी ह्या प्रयोगाची जास्त चिकित्सा करणें अवश्य आहे. " प्रांताखालीं किंवा प्रांतांत गांव चालणें, " हा प्रयोग शुद्ध फारशी आहे. प्रांतांत गांव चालणें, ह्या प्रयोगाचा अर्थ प्रांतांत गांव असणें, असा आहे. ग्रामो गडप्रदेशे अंतर्भवति असा प्रयोग संस्कृतांत होतो. ग्रामो गडप्रदेशे चलति किंवा चरति असा प्रयोग संस्कृतांत नाहीं. असणें ह्या अर्थी चर किंवा चल् ह्या धातूची शक्ति संस्कृतांत नाहीं व जुन्या महाराष्ट्रींतहि नाहीं. आतां फारशींत असा प्रयोग होतो. देहे नूरखानरा रवान् शुद्रा बूद, म्हणजे गांव नूरखानाकडे चालू झाला होता. असा प्रयोग फारशींत करतात. रफ्तन्, चालणें, ह्याचें रवान् चालत हें वर्तमानकालवाचक धातुसाधित रूप आहे. इंग्रजांच्या संसर्गानें सध्यां मराठी बोलण्यांत अशा तऱ्हा पुष्कळ येऊं लागल्या आहेत. तो गार्ड ही लाईन वर्क करीत असतो, असा प्रयोग रेल्वेकडील लोक करतांना आढळतात. तो गार्ड ह्या रस्त्यावर काम करीत असतो, ह्या शुद्ध मराठी प्रयोगाच्या ऐवजीं वरील प्रयोग रेल्वेकडील नोकरलोक करतात. वर काम करणें ह्या अर्थी वर्क हें सकर्मक क्रियापद योजणें रास्त होईल. खरें पाहिलें तर हें वाक्य असें पाहिजेः-- तो गार्ड ही लाईन वर्कतो. परंतु हा

प्रयोग वेडावागडा दिसतो अशी भावना असल्यामुळें, वर्क हें क्रियापद घालून शिवाय करणें ह्या मराठी क्रियापदांचा जोड देतात. हाच प्रकार मुसलमानांच्या कारकीर्दीतहि चालू होता. माहताजी म्हणजे प्रांताखालीं चालणारें असा अर्थ असतां, आणखी चालत हें क्रियापद त्या वेळीं योजीत असत. ही एवढी दुसऱ्या वाक्याची चिकित्सा झाली. आतां तिसऱ्या वाक्याकडे वळूं. ह्या वाक्यांत दहा शब्दांपैकीं सहा शब्द फारशी आहेत आणि मालूम होणें व मोकर्रर करणें हीं संयुक्त क्रियापदें मालूम शूदन् व मोकर्रर कर्दन् ह्या फारशी संयुक्त क्रियापदांचीं शब्दशः भाषांतरें आहेत. चवथ्या वाक्यांत तीनच शब्द शुद्ध मराठी आहेत, व दुंबाला क्रर्दन् ( म्हणणे-कडे देणें ) हें फारशी संयुक्त क्रियापद योजिलें आहे. पांचव्या वाक्यांत, पहिल्यांदा ह्या अर्थी पहिलें हा शब्द योजिला आहे व तो फारशी अव्वल ह्या शब्दाप्रमाणें हुबेहूब योजिला आहे. पुढील पांचही वाक्यांची व्यवस्था म्हणजे लिहिणाऱ्याच्या मनांत मूळ मजकूर प्रथम फारशी शब्दांच्या व प्रयोगांच्या रूपानें येतो व नंतर मूळ फारशी शब्दांपैकीं ठळकठळक शब्द जसेचे तसेच मराठी भाषांतरांत राहून, संयुक्त क्रियापदांचें, शब्दयोगी अव्ययांचे व निपातांचे प्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर दियानतराव विजापूरच्या आदिलशाहाचा दफ्तरदार असल्यामुळें त्याचें मराठी फारशीच्या धर्तीवर जातें अशी येथें शंका आणितां येईल. परंतु ह्याच वेळचीं शिवाजीचीं पत्रें पाहिलीं असतां ही शंका अवास्तव आहे असें दिसून येईल प्रस्तुत खंडांतलि ३६ वा लेखांक इ०स० १६७७ त शिवाजीनें काढिलेलें एक आज्ञापत्र आहे. ह्या लेखांतील १ बिन, २ फिरंगोजी, ३ हवालदार, ४ इमारत, ५ मजकूर, ६ हवाला, ७ सरंजामी, ८ मजमूदार, ९ तैनात, १० तपशील, ११ खासा, १२ सालीना, १३ चाकर, १४ रिवाज, १५ हुजूर, १६ पोता, १७ आसासी, १८ नून, १९ वाा, २० पाा, २१ रास, २२ सदहू, २३ बाकी, २४ वजा, २५ वजावाटा, २६ बेरीज, २७ मजुरा, २८ सुरू, २९ सूद, ३० बार, ३१ व इतके शब्द फारशी आहेत. व ह्यांपैकीं कित्येक शब्द दोनदोनदा तिनतिनदा आले आहेत. हवालदार इ इमारत इ कोट इ उटलूर, हा प्रयोग शुद्ध फारशी आहे. केदारजी बिन फिरंगोजी, इमारतमजकूर, हवाला देणें, सरंजामी करणें, खासा तैनात सालीना, हुजूरपोतापैकीं, रास केले असेत, वजा करणें, वजावटा, बेरीज घेणें, मजुरा असे, सुरू सूद, बार, हे सर्व प्रयोग फारशी आहेत. लेखाच्या प्रारंभींचा मायना तेवढा शिवाजीनें संस्कृत बनविला आहे. परंतु त्यांतहि, यासि आज्ञा केली ऐसी जे, हें ऊरा हुक्म फर्मूद के, ह्या फारशी शब्दांचें भाषांतर आहे. यासि आज्ञा करतो ह्याअर्थी अस्मै आज्ञां करोति, असा प्रयोग संस्कृतांत किंवा महाराष्ट्रींत होत नाहीं; एनं आज्ञापयति, असा होतो. आतां इतकें खरें आहे कीं, दियानतरावाच्या पत्रांतल्यापेक्षां शिवाजीच्या पत्रांत मायन्यांतले शब्द बरेच संस्कृत आहेत. परंतु शिवाजीच्यापूर्वी तीनशें वर्षे फारशी शब्दांचा व प्रयोगांचा जो बेसुमार भरणा मराठींत होत होता तो राजव्यवहारकोशादि साधनांनीं भाषा सुधारणाऱ्या ह्या शककर्त्यालाहि पदोपदीं स्पर्श केल्यावांचून राहिला नाहीं. शिवाजीच्या नंतर मराठ्यांचा व्याप सर्व हिंदुस्थानभर झाल्यामुळें व चोहोंदिशांनीं मुसुल-

मानी संस्थानांशींच व्यवहार करावयाचा असल्यामुळें मराठी भाषेंत रूढ झालेले फारशी शब्द कायम राहून, शिवाय आणीक हजारों फारशी शब्द ह्या भाषेंत सारखे शंभर वर्षें शिरत होते. परंतु अठराव्या शतकांत पेशव्यांच्या अमलांत झालेला हा फारशी शब्दांचा शिरकाव चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांतल्याप्रमाणें मराठीला मागें सारून होत नव्हता, तर मराठीची मर्जी संभाळून होत होता. हा प्रकार कसा होत होता, त्याच्या विशदीकरणार्थ शिवाजीच्या पूर्वींचा एक फारशी--मराठी लेख देतों व नंतरचा पेशवाईतला एक देतों.

## इ. स. १६२८ तला एक लेख.

अज् दीवाणे रख्तखाने खास वजानेबू कारकुनानी व देशमुखानी पा। पुणें व मुकासाईयानी व हुदेदारानी अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे देउळगौ नजदीक आलेगौ कर्याती पाटस पा। मजकूर बिदानद. सु॥ सन तिसा असर अलफ. दामोधरभट बिन नारायनभट व रामेस्वरभट बिन नारायनभट साकिन आरवी मुद्रल बंदगी हजरती माळूम केले जे, आपणियासी इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ नजदीक आलेगौ कर्याती पाटस परगणे मजकूर ब॥ हुज्जती हैबतखान सलाम अलफ आहे. येणेप्रमाणें फर्मान करूनु देणे म्हणोन. रोखा ममलकत मदारी मलक अंबर एकंदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु आहे. फर्मान मऱ्हामती होये. मालूम जालें. बा ई आ ती दिवाण खासा बराये ई रुके ७ देवविले. दामोधरभट बिन नारायनभट व रामेस्वरभट बिन नारायनभट साकिन आरवी मुद्रळ यांसी इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ ना आलेगौ कर्याती पाटस पा मजकूर बा हुज्जती हैबतखान सलास अलफ दिधले आहे, तेणेप्रमाणें करार केले असे. ता सबा असर अलफ जैसा भोगवटा व तसरुफाती चालत असेल तेणेप्रमाणें दुमाला कीजे. दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे. तालीक घेऊन असली फिराऊन दीजे. वा रोखा मा मा मलक अंबर एकंदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० सौवालू प्रा दामोदरभट व रामेस्वरभट सेत दोरी सवा बा सवाद दफ्तर यास मोर्तब सूद. ।

रुजू सूद. रुजू मुजमू. रुजू सुरनवीस.

तेरीख २७ माहे सफर समान इसरैन अलफ.

पा हुजूर.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सप्रसूद | सप्रसूद | सप्रसूद | सप्रसूद | सप्रसूद |
| \| | \| | \| | \| | \| |
| मुश्रीफ | दफ्तरदार | मजमू | न्याबती | सूरनिवीस |
| \| | \| | \| | \| | \| |
| बारसूद | बारसूद | बारसूद | बारसूद | बारसूद |
| \| | \| | \| | \| | \| |
| तालीकसूद | तालीकसूद | | तालीकसूद | तालीकसूद |

हा लेख अहमदनगरच्या निजामशाहींतल्या शहाजी भोसल्यांच्या राजोपाध्यांना इनाम दिल्यासंबंधाचा आहे, व तो साताऱ्यांतील भाऊसाहेब राजोपाध्ये ह्यांच्या दफ्तरांतील आहे. हा दोन भाषांत लिहिला आहे. प्रथम सर्व मजकूर फारशी व नंतर त्याच्या खालीं तोच मजकूर भाषांतर करून मराठींत दिला आहे. मराठी मजकुराची लिपी मोडी आहे. हा मराठी मजकूर जशाचा तसाच वर दिला आहे. हें मराठी सध्यांच्या महाराष्ट्रांतील कोणा फारशी न जाणणाऱ्याला समजेल असें वाटत नाहीं. तरी इ० स० १६२८ त हें मराठी महाराष्ट्रांत सरकारदरबार करणाऱ्या लोकांना समजत असे असें दिसतें. ह्या लेखांत एकंदर २३६ शब्द आहेत. पैकीं विशेषनामें सोडून दिलीं असतां, फक्त ३४ शब्द मराठी आहेत, व तेहि प्रायः तदर्थवाचक फारशी शब्दांचें भाषांतर आहेत.

आतां ह्या इ० स० १६२८ तील लेखाशीं तुलना करावयास इ० स० १७२८ च्या सुमाराचा एक लेख देतों.

श्री. १२ मार्च १७२७

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३ प्लवंग नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं राजश्री अंबाजी त्र्यंबक यांसी आज्ञा केली ऐसी जेः—मनसुब्याचा अर्थ सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस लिहिला आहे त्यावरून कळेल. तरी तुम्हीं पंडित मशारनिल्हेस चार गोष्टी विचाराच्या सांगोन आमित्राचे पिछावरी * * * कृयत फितूर तुटे तो अर्थ करणें. तुम्हीं स्वामीजवळ बोलोन गेला काय, करता काय, हा विचार कळत नाहीं. राजश्री प्रधानाचे व राजश्री सेनापतीचे चित्तीं विचार काय आहे हा तऱ्ही शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून स्वामी निश्चिती मानतील. गुज काढावयाचा विचार चित्तांत येत नसेल तरी इलाज काय? वारंवार लिहावयाची सीमा झाली! परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. याउपरि तरी गुज काढावें. फितूर तुटावा ऐसें चित्तांत असलें तरी पत्रदर्शनीं फौजेनिशी अमित्राचे पिछावर येऊन त्याची वाताहात करणें. बहुत काय लिहीन.

हें काव्येतिहाससंग्रहान्तर्गत पत्रेंयादी वगैरेंतील १६७ वें पत्र आहे. ह्या पत्रांत १ शाहू, २ मनसुबा, ३ बाजीराव, ४ फितूर, ५ इलाज, ६ मशारनिल्हे, ७ फौज आणि ८ व, एवढे ८ च शब्द कायते एकंदर १२७ शब्दांतून फारशी आहेत. म्हणजे,

| इ. स. | फारशी | मराठी | एकंदर | शेंकडा मराठी शब्द |
|---|---|---|---|---|
| १६२८ | २०२ | ३४ | २३६ | १४·४ |
| १७२८ | ८ | ११९ | १२७ | ९३·७ |

ह्या दोहोंशीं प्रस्तुत खंडांतील वर उल्लेख केलेल्या शिवाजीच्या ३६ व्या लेखांतील शब्दांची तुलना केली असतां पुढील फळ येतें:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६७७ | ५१ | ८४ | १३५ | ६२·२ |

ह्याचा अर्थ असा झाला कीं, दरबारी लिहिण्यांत, मुसुलमानांचें राज्य चालू असतां इ. स. १६२८ त शंभर शब्दांतून सरासरीच्या मानानें १४ शब्द मराठी येत; शिवाजीचें

स्वराज्य चालू असतां इ. स. १६७७ त शेकडा ६२ शब्द मराठी येत, आणि शाहू राज्यावर असतां इ. स. १७२८ त शेंकडा ९३ शब्द मराठी येऊं लागले. परराज्याचा भाषेवरती केवढा परिणाम होतो त्याचा हा रोखठोक ताळा आहे!

इ. स. १६२८ पासून १७२८ पर्यंत मराठींतील दरबारी पत्रांत फारशीचा भरणा कोणत्या प्रमाणानें होत होता त्याचा हा तपशील आहे. १६२८ च्या पूर्वी इ. स. १४१६ पर्यंतचे मजजवळ फारशीमराठी लेख आहेत; त्यांतहि १६२८ त्या लेखांतल्याप्रमाणेंच फारशी शब्दांचा भरणा अतोनात आहे. मुसुलमानांच्या राज्यांत दरबारी ह्मणून जेवढें लिहिणें होतें त्या सगळ्यांत फारशी शब्दांचें व प्रयोगांचें प्राधान्य उत्कट असे. ह्या दरबारी लेखांपेक्षां तत्कालीन मराठी कवींच्या लेखांत फारशीचा भरणा आतिच कमी आहे. परंतु त्यांच्या देखील लेखांत फारशी शब्द अधूनमधून घुसल्यावांचून राहिले नाहींत. उदाहरणार्थ, इ. स. १५४८ पासून १६०९ पर्यंत असणाऱ्या एकनाथस्वामींच्या ग्रंथांतील एक उतारा देतों.

## अर्जदास्त.

अर्जदास्त अर्जदार । बंदगी बंदेनवाज<br>
अलेकं सलाम । साहेबाचे सेवेसी<br>
बंदे शरीराकार । जीवाजी शेखदार<br>
बुधाजी कारकून । प्रगणे शरीराबाद<br>
किल्ले कायापुरी । सरकार साहेबांची

आज्ञा घेऊन स्वार जालों तो प्रगणे मजकुरीं येऊन सरकार काम करावयास लागलो. तो प्रगणे मजकूरचे जमेदार दंभाजी शेट्ये व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडी व क्रोधाजी नाईकवाडी ऐसे हरामजादे फार आहेत ते सरकारकामाच कयास चालू देत नाहींत. दंभाजी शेट्या कचेरीस येऊन जोम धरून बसतो. मनीराम देशमुख आपलें काम परभारें करून घेतो. ममताई देशपांडीण इणें तमाम प्रगणा जेरदस्त केला. क्रोधाजी नाईकवाडी याणें तमाम तफरका केला. तो साहेबांपासून जरासंध चोपदार आला. त्यानें खबर केली कीं मागून यमाजीपंताची तलब होणार. त्यास, त्या धास्तीनें तमाम प्रगणा वोस जाला. बितपशील कलम. डोळसवाडीस मात्र कांहीं रुई छुई वस्ती राहिली. कानगांव तो बंद जालें. दोन्ही वेशींचीं कवाडें लागलीं. नाकापुरास वहाव सुटलें. तोंडापूर तो तफरका जालें. दंताळवाडी ओस पडली. दिवेलागणी देखील राहिली नाहीं. केसगांवची पांढर जाली. शिरापूरचा लोक दरोबस्त थरथरा कापतो. हातगांव कसाल्यानें जर्जर जाले. त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं. पायगांवचीं मेटें बसलीं, ढोपरपूरचीं राहिलीं. चरणगांव चाली सरली. गांडापूर वाहूं लागलें. लिंगस्थान भ्रष्ट जालें. उठूं पळूं लागलें. धीर धरवेना. ऐसी प्रगण्यांत कीर्दी बुडाली. यावर सरकारकाम सुरू करीत होतों. तो यमाजीपंताची परवानगी आली कीं, हुजूर येणें, आपणास साहेबाचा आश्रय आहे. एका जनार्दन बंदा । बंदगी रोशन होय । हे अर्जदास्त.

ही अर्जदास्त एकनाथी भजनभारुडांतील आहे. हींत किती फारशी शब्द आहेत, त्याची गणती करण्याचें सोपें काम वाचकांकडेच सोंपवितों. एकनाथस्वामी इ. स. १५४८ जन्मले. त्यानंतर सुमारें ४० वर्षांनीं त्यांनीं भजनीभारूड लिहिलें असें धरल्यास ही अर्जदास्त इ. स. १५८८ च्या सुमारची असावी असें दिसतें. आतां इ. स. १५४१ तील एक व १५५८ तील एक असे दोन जुने मराठी लेख देतों. हे लेख साताऱ्याजवळील निंब येथील ग्रामस्थांनीं एका गोसाव्याला दिलेलीं दानपत्रें आहेत. तीं सातारा येथील रा. रा. तुकारामपंत ठाकूर वकील यांच्याद्वारा मिळालीं.

## श्री.

श्री स्वति श्री सकु १४६३ वीरखे प्लवंग संवत्सरे चैत्र सूध सप्तमी रविदिनें तेदीनि श्री सदानंद गोसावियाचे मठ मौजे निंब परगणे वाई तेथ अन्नदान प्रतीदिनि चालवावेया वृतीपत्र कंठगिरी गोसावी वा सदानंद गोसावी यांसी लिहुनि भीवोजी ++ जी देसाई, व माया पाटेलु, व सेटीया बसव सेटी कसबे मजूकुर, व प्रसोजी आषाडा मौजे आखाडें, व माल पाटेलू मूरुकुटा मौजे राहागौ हे मूख करुनि समस्त देसक परगणे कुडाल लीहुनी दीलें असें जे प्रति वरुशि देणें बीतपसील गळा केली खंडी ४।३।

| जोन्हळ | गहू | तुरी |
|---|---|---|
| २।।।४।।। | ०।।३। | ०।।३। |

भिवोजी व परसोजी
आखाड, निसवत किले
निंब.

कसबा——— ०।१

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| । | ८।। | ८।। |

माळ पाटेलु मुरकटा, राहागौ
८३

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८२ | ८।। | ८।। |

ळागो पाटेलु, ओनवाडी
८२

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

गांगो पाटेलु, खरसी बु।।
८२

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

तुक सेटी, सायेगौ
८२

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

भोज पाटेलु, दरे खु।।
८१।।

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

मौजे किणै, भीऊजी काठिकी.
८२

| जोन्हळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१।। | ८। | ८। |

मौजे मोरघर, मुरकट काळ पाटेलु
८१॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

जाऊजी, बाळवडे
८१॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

सागीर्वी, बातगुडा
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

जाखोजी, दरें बु॥
८२

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१॥ | ८। | ८। |

मौजे करदी, काउजी बादमी
८१॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

मारुळी, धाकोजी
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

जेंदी पाटेलु, आरडे
८२

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१॥ | ८। | ८। |

खोलगौ, जैतोजी
८१॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

काजोसी, ळखमोजी व जाकोजी
८२

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१॥ | ८। | ८। |

आळोडी, बाळाजी
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

मौजे राणीगेघार; डकवणे
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

इंदवडी, मालोजी माळी
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

ब्राह्मणवाडी, कान्हो पाटेलु
८३

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८२ | ८॥ | ८॥ |

सनपनें, भाळेघरा बाबाजी
८२॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१॥ | ८॥ | ८॥ |

भोगवडी, राणोजी
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

साईघर, बाणुवाडा
८१

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥ | ८। | ८। |

पानई, खेळोजी गुजर
८२

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१॥ | ८। | ८। |

आहार्गणी, गाउडा हरी
८१।

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८॥। | ८। | ८। |

अन्याडें, प्रेसाजी
८३

| जोझळ | गहू | तुरी |
|---|---|---|
| ८२ | ८॥ | ८॥ |

आहेघर, वोदुळा
८१॥

| जोझळ | तुरी | गहू |
|---|---|---|
| ८१ | ८। | ८। |

भाळेघर, हरि पाटेलु
८१
जोझळ तुरी गहू
८॥ ८। ८।

वातिगेघर, गोळी भाई पाटेलु
८१
जोझळ तुरी गहू
८॥ ८। ८।

वीवर, रकदेऊ
८१
जोझळ तुरी गहू
८॥ ८। ८।

रोहीघर, सोनोजी
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

काठवडी, भीउजी बोळेय
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

वाहागौ, मुधोजी
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

चारा मुऱ्हें, बाबूजी
८।
जोझळ तुरी गहू
८८ ८८= ८८=

पिंपळी, तेटळा नगोजी
८१।
जोझळ तुरी गहू
८।।। ८। ८।

वहुगौ, कळोजी बादलु
८३
जोझळ तुरी गहू
८२ ८॥ ८॥

सेतें, गोईसेटी
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

राजाणी, जाउजी
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

माहुतर्डी, कानो पाटेलु
८१॥
जोझळ तुरी गहू
८१ ८। ८।

दापोडी, जानोजी हेवा
८१।
जोझळ तुरी गहू
८।।। ८। ८।

वालुनु, पोफळिया कुक पाटेलु
८३
जोझळ तुरी गहू
८२ ८॥ ८॥

सोदनवाडी, आंबोजी
८२॥
जोझळ तुरी गहू
८१॥ ८॥ ८॥

ह्रसवें, दानो पाटेलु
८२॥
जोझळ तुरी गहू
८१॥ ८॥ ८॥

खरसी खु॥, गाउडा
८२
जोझळ तुरी गहू
८१ ८॥ ८॥

सरतळें, जगो पाटेलु
८३
जोझळ तुरी गहू
८२ ८॥ ८॥

ह्या लेखांत प्लव संवत्सराला प्लवंग म्हटलें आहे. ही केवळ लेखकाची चूक आहे. ल्हान शब्दापेक्षां मोठा शब्द योजणें जास्त प्रौढ दिसतें, अशा भ्रमानें ही चूक झाली आहे. ह्या लेखांत १ मौजे, २ व, ३ वा, ४ कसबे, ५ बितपासिल, ६ गल्ला, ७ कैली हे सात शब्द फारशी आहेत. वा हा शब्द व च्या बद्दल योजिला आहे. पाटेलु, बितपसीलु, सकु वगैरे शब्द ज्ञानेश्वरींतील उकारांत शब्दासारखे आहेत. ह्या पत्रांतील भाषेपेक्षां एकनाथाच्या भाषेंत उकारांत शब्द कमी व रामदास वगैरे पेष्तर ग्रंथकारांच्या ग्रंथांत तर त्याहून कमी येतात. ह्या पत्रापेक्षां इ० स० १५५८ तील खालील पत्रांत फारशी शब्द जास्त आहेत.

## श्री.

स्वस्ति श्री ( स )के १४७९ पिंगळ संवत्सरे माघु सुधु त्रयोदसि वारु मंगलु तदींनी प्रीतपित्र इनाम लिहिलें. लीखीते चांगो पाठीलु बीन गोंद्य पाटैलु मोकदम, व काळसेठी बीन रामसेटी गुठालु चौगुळा, व एळबो पाटेलु सुपगुडा बीन परसा पाटेलु, खेळ पाटेलु बीन राघो पाटेलु जें लेकरूं बाबसेठी बीन एकसेठी विगोवी, आपो पाटेलु बीन याको पाटेलु सुपगुडा, हीरो पाटेलु बीन भोया पाटेलु हागवणा, कुलुम सेठी बीन हर्रा सेठी काळोखा, कोयाजी बीन आलोजी मोरीया, जान पाटेलु जाधव, व काळो पाटेलु सुपडा, व माद सेठी सेठिया,व वणगो माळी मेहतरी व चांगो मेहतरी साळी व समस्त मुजेरींप्रजा. व बाजे मोहतर्फा व बलुते व आडाण मौजे निंब प॥ वाई आत्मसुखें सदानंद गोसावी याचे सेवेस प्रीतपित्र इनाम लिहूनु दिल्हें ऐसें जे निमे चावराचा फाळा व पायपोसी व कारकुनु सारा व दमामा व उटआदा व तकदम सारा व बाजे नक्ददाती बी॥

ऐनू आवटु व साणेपालु

व बीजे फरी व वेसळी व गांवखंडी व पाणीपासोडी वा तकसीमा ११ बाद ता॥ ३ बीा दळें, आघाडी, फर्साटे. बाकी तकसीम ८ तालुके, रयानी ८ बी॥ त॥ सुतळी, पान, मद, लोह, गवतकडबी, सीरडीबकरा, व आर्गतनिर्गत, वेठीवजे, सीवाबिन्हाड दिल्हे आहे. हें पारंपार चालवूनु लेकुरांचा लेकुरीं आवलादी व आफलादी चालऊन हें सत्य. यास जो चुके तो सदानंद गोसाव्याचा द्रोही. चंद्रसूर्यी तपे तववरी खर्वां पचे. हा नीमु करुनु समर्पिलें. हें कार्या वाचामा जए सत्य.

ह्या इ. स. १५५० च्या सुमारच्या दोन लेखांत फारशी शब्द बरेच आहेत. परंतु दियानतरावाच्या पत्रांतल्याप्रमाणें मराठी प्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर केले नाहींत. चुके, तपे, पचे, समर्पिलें, करुनु, वगैरे क्रियापदांचे प्रयोग शुद्ध जुने मराठी आहेत. वणगो, चांगो, आपो, हीरो, माघु, सकु, वारु, मंगलु, पाटेलु, वगैरे नामेंहि जुन्या मराठींतल्याप्रमाणें ओकारान्त व उकारान्त आहेत. इतकेंच नव्हे तर बीतपसीलु, ऐनु, कारकुनु वगैरे फारशी शब्द देखील उकारान्तच योजिले आहेत. हा लेख लिहिणाऱ्यांना फारशी येत नसल्यामुळें, व्यवहारांत रूढ झालेल्या फारशी शब्दांखेरीज जास्त फारशी शब्द किंवा प्रयोग त्यांनीं योजिले नाहींत हें उघड आहे. मराठींचें जुनें रूप ह्या दोन लेखांत बरेंच पहावयास सांपडतें.

इ. स. १५५० च्या अगोदरचे म्हणजे इ. स. १४९५, १४७१, १४१६ वगैरे सालांतीलहि दरबारी फ़ारशी-मराठी लेखांत फारशी शब्द बरेच आढळतात. जेथें जेथें म्हणून मुसुलमानांचें राज्य कायम झालें होतें, तेथें तेथें दरबारांतील सर्व मराठी लिहिण्यांत फारशी शब्दांचा भरणा विशेष असे. दरबारापासून दूर अशा गांवीं व सरकारी अधिकाऱ्यांचा जेथें संबंध नाहीं अशा गांवकीच्या किंवा धर्माच्या किंवा गोतकीच्या खटल्यांत जे कागदपत्र होत, त्यांत फारशी शब्दांची संख्या कमी असे. परंतु त्यांतहि फारशी शब्द बिलकुल नसत अशी मात्र गोष्ट नव्हती. इ. स. १४१६ च्या सुमारास मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत होऊन बराबर ९८ वर्षे झालीं होतीं व मुसुलमानी भाषेचा देशांत इतका प्रचंड संचार झाला होता कीं दरबारापासून अलिप्त राहणाऱ्या मनुष्याच्याहि बोलण्यांत व लिहिण्यांत फारशी शब्द नकळत येत. आतां मराठीचें बिनफारशी असें निर्भेळ शुद्धरूप पाहिजे असल्यास, जेथें मुसुलमानांचा अंमल भासला नव्हता, तेथील लेख पाहिले पाहिजेत. मुसुलमानांचा अंमल नव्हता असे इ. स. १४१६ च्या सुमारास नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व पश्चिमसमुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत महाराष्ट्रांत दहा पांच प्रांत होत, इ० स० १४०० च्या सुमारास उत्तर व दक्षिण कोंकणांत राणे, दारणे, शिर्के, सावंत, वगैरे कांहीं मराठे स्वतंत्र राहिले होते. त्यांच्यापैकीं सावंत ह्यांच्या राज्यांतील एका गांवीं असलेला एक लेख देतों. वेंगुर्ल्यापासून चार मैलांवर मठ म्हणून एक गांव आहे. तेथें वाडीच्या सांवतांच्या पूर्वजांचीं देवळें आहेत. त्या देवळांतील देवाच्या प्रभावळीवर शके १३१९ त लिहिलेले तीन मराठी लेख आहेत. पैकीं एक लेख येणेप्रमाणें:—

स्वस्ति श्री सालीवान सकु कु १३१९ वरीसे चीत्रभानु संवत्सर आदीक बाहुळ ३ गुरुवारी चांदगडाडुजीपती नऱ्यसी देवाचा दळवै यानें याचा पीता भाम सावंतु तदोद्दीसी उपभोगासी देण वीडा धुणा तेला द्रेया उपभोगासी दत्त रौप्य टांके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी देउळाच्या कामाया वेचू द्राम १५०० दळवैपणोचे जाले दीनु आर्थे एखंधर यांची ला दीनु नींची वेचू द्राम १००० आखेरतोपी सासु उफरासी भामसावता वेळाचा दळवै यदोद्दीसी भूमी भऱ्यया २ मडायी मेव ओंयू व्ययी मेरं नेयी मेर नडे खडीचे यी मेर आंभऱ्ययी.

ह्या लेखांत शके १३१९ ला चित्रभानु संवत्सर दिला आहे तो वर्तमान असून बार्हस्पत्य संवत्सरपद्धतीचा आहे. ह्या संवत्सराला अधिक मास पंचांगांत नाहीं. परंतु पुढील सुभानु संवत्सराला ज्येष्ठ आधिक आहे. तो अधिक कदाचित् त्यावेळच्या कोंकणांतील ज्योतिषांनीं चित्रभानु संवत्सराला आणिला असल्यास न कळे. मूळ लेखांतील शक कदाचित् १३१७ असाही वाचतां येईल, परंतु १३१७ ला विक्रम संवत्सर असून चित्रभानु नाहीं. लेखांतलि संवत्सर कांहीं असो, साल १३१७ किंवा १३१९ ह्यांपैकीं कोणतें तरी एक आहे ह्यांत संशय नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं कालनिर्णयापेक्षां भाषास्वरूपाकडे विशेष लक्ष असल्यामुळें इ. स. १३९५ किंवा १३९७ च्या सुमारास मराठी भाषेचें स्वरूप का होतें तें पहावयाचें आहे. ह्या लेखांतील अक्षरें जाधवांच्या तेराव्या शतकांतील अक्षरां-

सारखीं आहेत. ह्या लेखांत सकु, सावंतु, दीनु, हे शब्द जुनें मराठी धर्तीचे आहेत. दळवै [ सेनापति ], आखर [ अक्षर ], टाक, द्राम, वरीसें, हेहि शब्द जुने मराठी आहेत. ह्या लेखांत फारशी शब्द किंवा प्रयोग एकहि नाहीं. ह्यावरून शके १३१९ त म्हणजे इ० स० १३९७ त दक्षिण कोंकणांत सावंतांच्या राज्यांत शुद्ध मराठी भाषा चालत होती असें दिसतें. आतां ह्या इ. स. १३९७ च्याहि मागें जाऊन इ. स. १३५६ तील एक मराठी लेख देतों. पूर्वी पर्शरामपंडितकृत पर्शरामोपदेश नांवाच्या ग्रंथाचा उल्लेख केला होता. ह्या ग्रंथाच्या शेवटीं खालील मराठी वाक्यें आहेतः—

गत तिथि दुणा ॥
वारु चतुर्गुणा ॥
नक्षत्र मेळविजे ॥
ध्रुवक ४ मेळविजे ॥
तिहिं भागु ॥
उरलेये शेषे लोह पाहिजे ॥
एकें जल ॥
दाहो स्थल ॥
शून्य आकाश ॥
स्थलीं सावली ॥
जलीं आडाउ ॥
आकाशीं साबलीये ॥
आडाउ तीर दार ॥
हे जयेति ॥
आड वार ॥
आदित्या पासौनु ॥
नक्षत्रें ९ उत्तमें ॥
दाहावें मध्यम ॥
तयापुढील २ उत्तमें ॥
वरिला तिहिं खेळु पाडुं १७ उत्तमें ।
वीसा ठायीं च लोह निर्वचैल ॥
२२॥ लोह होईल ॥
पूर्ण यश पाविजैल ॥
हातीयेरें सांडिती ॥
पल होईल ॥
आदित्यवारी ॥
शनिवारी ॥

वृषभ, कन्या, मकर, मिथुन, तूल, कुंभ हे खोचिति ।।
सोमवारिं, बृहस्पतवारिं मिथुन, तूळ कुंभा पडती ।।
कर्क, वृश्चिक, मीन हे खोंचती ॥
मंगळवारीं ।।
शुक्रवारीं ।।
कर्क, वृश्चिक, मीनु, धनु, सिंहु, मेषु हे सा ६ राशी मरती ॥
वृषभकन्यामकरु हे खोंचती ।।
बुधवारिं वृषभ, कन्या, मकर पडती ॥
मिथुन, तूल, कुंभ हे खोंचती ॥
तिथिवारु जे दिशे यात्रा किजे ।।
ते दिशा येकत्र किजे ॥
तिंहिं भागु दिजे ॥
उरे शेष तो ध्रुवक राशीचें जीव-नक्षत्र ॥
२ ने गुणिजे ॥
ध्रुवक मेळविजे ।।
तिंहिं भागु दिजे ॥
शेष उरे तो ग्रहो जाणिजे ।।
जयाचे राशीवरि बुध, गुरु बैसती तिये राशिचेयांकरवी ॥
यात्रा कर्विजे ॥
दुर्गयात्रा बुध जया विये ॥
राशीवरि बैसे ।।
तया कर्वि कर्विजे ।।
आउ । नि । पू । वा । द । ई । प ।
सूर्योदयाचीये ठाउनु येणे क्रमें चौ घडिये भ्रमण जाणावें ॥
जयाचिये पाठि पडे तो जयो पावे ॥ ६ ॥
इति श्रीभूपाळवल्लभः ॥ समाप्तिमुपागमत् ॥

ह्या उताऱ्यांतील सर्व वाक्यें शुद्ध बावनकशी जुनीं मराठी आहेत व त्यांना फारशीचा बिलकुल गंध नाहीं. ह्या वाक्यांची भाषा बहुतेक हुबेहुब ज्ञानेश्वरींतील भाषेसारखी आहे. बहुतेक म्हणण्याचें कारण असें कीं इ. स. १२९० त लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या भाषेंत व इ. स. १३५६ त लिहिलेल्या ह्या वाक्यांच्या भाषेंत साठ वर्षांचा अवधि गेल्यामुळें किंचित् फरक पडणें साहाजिक आहे. तयापुढील व जयाचिये हे जे दोन शब्द ह्या वाक्यांत आले आहेत त्यांचीं ज्ञानेश्वरींत तेयापुढील व जेयाचिये अशीं रूपें सांपडतात, तेयापुढील व जेयाचिये हीं रूपें एकनाथस्वामींनें शुद्ध केलेल्या प्रतीवरून झालेल्या लेखी किंवा छापील ज्ञानेश्वरींत सांपडावयाचीं नाहींत. हीं रूपें एकनाथस्वामीच्या पूर्वीच्या ज्ञानेश्वरीच्या

प्रतींत सांपडतात. बालेघाटावरील बीड शहरीं पाटांगण नावाचें एक देवस्थान आहे, तेथील दफ्तर तपाशीत असतां एकनाथस्वामींच्या पूर्वींची एक ज्ञानेश्वरीची प्रत मला मिळाली. कुंट्यांनीं छापिलेल्या ज्ञानेश्वरींतल्यापेक्षां ह्या ज्ञानेश्वरींत ओव्यांची संख्या बरीच कमी असून, हींतील भाषाहि कुंट्यांच्या प्रतींतल्याहून जुनी आहे. शिवाय, ह्या पाटांगणांतलि प्रतींतील अक्षरें तेराव्या किंवा चवदाव्या शतकांतलि महाराष्ट्रांतील ताम्रपटांवरील अक्षरांसारखीं आहेत. वरील लेखांशीं ताडून पहाण्याकरितां व ज्ञानेश्वरीची मूळ खरी भाषा काय होती तें दाखविण्याकरितां ह्या प्रतींतील निरनिराळ्या प्रयोगांच्या ओव्या देतों.

( १ ) मातियेचा वीटु । घेउनि काइ करी घटु ।
केउतें ताथू पटु । सांडतलि ते ॥
अध्याय १८, श्लोक ११, ओवी १७.

( २ ) तैसा शरीराचेनि आभासें । नांदतु जवं असे ।
तवं कर्मत्यागाचें पीसें । काइसें तऱ्हीं ॥
अध्याय १८, श्लोक ११, ओ० २०.

( ३ ) ऐसें व्यापक ज्ञान भलें । जेयांचेया ऱ्हदया आलें ।
तेयांची समदृष्टि बोलें । विशेषू काई ॥
अ० ५ श्लोक० १६, ओ० ८७.

( ४ ) मग मशकु हा गजु । कां श्वपचू हा द्विजू ।
पैल इतरु हा आत्मजु । हें उरैल कें ॥
अ. ५, श्लो. १८, ओ. ९२.

( ५ ) जरि विषइं विषयो सांडिजैल । तरि महादोषिं कें वसिजैल ।
आणि हा संसारशब्दु नव्हैल । लटका जगीं ॥
अ. ५, श्लोक २३, ओ. २३.

( ६ ) हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्यानि धरिसी मानसीं ।
तरि तेंचि आतां परिसें । विवेचना ॥
अ. ७, श्लो. ४, ओ. १७.

( ७ ) किं तो पार्थु मनीं । आशुइं धाणि न मनीं ।
अधिकाधिक उतान्हीं । वाढवितु असे ॥
अ. १३, श्लो. ३४, ओ. ११३१.

( ८ ) हे बहु असो. पंडितु । धरुनु वालकाचा हातु ॥
अ. १३, श्लो. ७, ओ. ३०७.

( ९ ) नाहीं माझेनि पाडें वाडु । मी चि सर्वज्ञ एकु रूढु ।
ऐसा शिवमुष्टिगंडु । घेउनु ठाके ॥
अ. १३, श्लो. ११, ओ. ७०७.

( १० ) रसु न्हव्हावा अतिमात्रु । हा घेता सिकोवे मंत्रु ।
तरि अवंतुनु शत्रु । करितासि गा ! ॥
अ. १३, श्लो. ११, ओ. ६२५.

( ११ ) किंवहुना पूंसा । पांजरेयामाझि जैसा ।
वेदाज्ञेसि तैसा । भिउनु असे ॥
अ० १३, श्लो० ९, ओ० ५८८.

( १२ ) ह्मणे पूयगर्ते रिगाला । मूत्र-रंध्रौनि निघाला ।
कटारे मिया चाटिला । कुचस्वेदु ॥
अ० १३, श्लोक० ८, ओ० ५३८.

( १३ ) तिये कडौनु येतु वारा । देखौनु धावे सामोरा ।
आडपडे ह्मणे घरा । बीजें कीजे ॥
अ० १३, श्लो० ७, ओ० ३७५.

( १४ ) ज्ञानदेओ ह्मणे, तुम्हीं । संत वोळगावेति, हें मीं ।
पढाविलां स्वामीं । निवृत्तिनाथें. ॥
अ. १२ श्लो. २०, ओ. २४१.

( १५ ) तिये गीतेचा कलशु । संपूर्ण हा अष्टादशु ।
म्हणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥
अ. १८, श्लोक ७८, ओ. १७९०.

ह्या ओव्या कुंट्यांच्या प्रतींतील ओव्यांशीं व वर दिलेल्या भूपाळवल्लभांतील वाक्यांशीं ताडून पाहतां, बीड येथील पाटांगणांत सांपडलेल्या प्रतींतील ओव्या, नामें, क्रियापदें व शब्दयोगी अव्ययें यांच्यासंबंधानें, कुंट्यांच्या प्रतींतील ओव्यांपेक्षां भूपाळवल्लभांतील वाक्यांशीं जास्त जुळतात. व ही गोष्ट ह्या प्रतीच्या पुराणत्वाच्या सिद्धीला उत्तम प्रमाण आहे. इ. स. १२९० त लिहिलेल्या ज्ञानेश्वरींची भाषा १३२६ पासून १३५६ पर्यंत लिहिलेल्या ग्रंथाच्या भाषेप्रमाणें असलीच पाहिजे, इतकेंच नव्हे तर ह्या ग्रंथाच्या भाषेहूनहि ती किंचित् जुनाट असली पाहिजे. उदाहरणार्थ, वर दिलेल्या ओव्यांतील तांथू हा शब्द घ्या. तंतू ह्या संस्कृत शब्दाचें हें जुनें मराठी रूप आहे. तांतू म्हणजे अनंताचा दोरा, कोळी नांवाच्या प्राण्याच्या जाळ्याचा दोरा, बारीक दोऱ्यासारखे जंत ह्या अर्थी मराठींत अद्यापहि वापरतात. तसेंच, बकऱ्याचें आतडें पिरगाळुन व वाळवून बनविलेल्या दोराला ह्या तांतूपासून निघालेला तांत शब्द लावतात. तेव्हां ज्ञानेश्वरींत हें जुनें रूप येणेंच रास्त आहे. तसेंच मृत्तिकेचा ह्याबद्दल मातियेचा हें रूप ज्ञानेश्वरींत इष्ट आहे. ‘ काय ’ बद्दल काइ हें रूप माझ्या ह्या पाटांगणांतील प्रतींत हमेश सांपडतें. केउते तांथु पटु सांडतील ते, ह्या शुद्ध वाक्याच्या ऐवजीं कुंट्यांच्या प्रतींत—केउते तंतू पट सांडील तो—असें अशुद्ध वाक्य आहे. केउतें ह्यांत मूळ शब्द केउत आहे. केउता, केउतें, केउती, हीं ह्या शब्दांचीं तिन्ही लिंगीं एकवचनी रूपें आहेत. केउते, केउतें किंवा केउतीं, केउती

हीं तिन्ही लिंगी अनेकवचनी रूपें आहेत. ह्या वाक्यांत केउतें तंतूचें विशेषण आहे. तंतू पुल्लिंगी असल्यामुळें केउता असें विशेषणाचें रूप पाहिजे होतें. परंतु केउते हे पुल्लिंगी अनेकवचनी रूप जुन्या प्रतींतून असलेलें कुंटयांच्या प्रतींत तसेंच ठेविलेलें आहे व त्याचा तंतू ह्या पुल्लिंगी एकवचनाशीं संबंध लागेना तेव्हां अनुस्वार देऊन क्रियाविशेषण बनविलें आहे. ते तांथू पटु केउते सांडतील, असा मूळ अन्वय होता. अशीच दुसऱ्या वाक्यां-- चीहि मीमांसा करतां येईल. परंतु ज्ञानेश्वरींतील भाषेची मीमांसा इतरत्र करण्याचा विचार असल्याकारणानें येथें तत्संबंधीं विस्तार करीत नाहीं. येथें फक्त कुंटयांच्या प्रतींत वर दिलेल्या ओव्यांतील कित्येक शब्दांचीं रूपें कशीं आहेत तें दाखवितों.

| पाटांगण | कुंटे |
|---|---|
| नांदतु | नांदत |
| जवं | जंव |
| तवं | तंव |
| तऱ्हीं | तरी |
| जेयांचेया | जयांचिया |
| तेयांचीं | तयांचीं |
| बोले | बोलें |
| विशेषू | विशेषू |
| उरैल | उरले |
| विषइं | विषयीं |
| सांडिजैल | सांडिजेल |
| नव्हैल | नव्हेल |
| परिसैं | परियेसीं |
| आझुइं | अझुनी |
| धाणि | तृप्ती |
| वाढावितु | वाढवीत |
| धरुनु | धरूनि |
| मूत्ररंध्रौनि | मूत्ररंध्रें |
| कडौनु | कडोनि |
| कीजे | कीजो |
| स्वामीं | स्वामी. |

कुंटयांच्या प्रतींतील चवदावी ओवी तर अत्यंत अशुद्ध आहे. असो. प्रस्तुतचा मुख्य मुद्दा ज्ञानेश्वरींतील जुनी मराठी भाषा कशी असते हें दाखविण्याचा आहे. ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी आपल्या वेळच्या मराठींत जशी लिहिली तशी सध्यांच्या कोणत्याहि छापील

पुस्तकांत ती उपलब्ध नाहीं हें स्पष्ट करण्याच्या हेतूनें—कोणती तरी छापील ज्ञानेश्वरी तुलनेला घ्यावयाचीच होती तेव्हां—कुंटयांच्या प्रतीचा उल्लेख केला. दुसऱ्या कोणत्याहि छापील प्रतीचा उल्लेख केला असता तरी चाललें असतें. खरी गोष्ट अशी आहे कीं, आज सहाशें वर्षें मराठी भाषेचीं जीं निरनिराळीं रूपें होत आहेत त्यांचा ठसा ज्ञानेश्वरीच्या त्या त्या वेळीं झालेल्या प्रतींत गोचर होत आहे. ज्ञानेश्वरींतील भाषा तेराव्या शतकांतील मराठी भाषा होय. एकनाथानें शके १५१२ त म्हणजे बरोबर तीनशें वर्षांनीं ज्ञानेश्वरीची पोथी शुद्ध केली; शुद्ध केली म्हणजे आपल्या वेळच्या लोकांना समजेल अशी केली. मूळ ज्ञानेश्वरींतील जीं रूपें एकनाथाच्या वेळीं केवळ आर्ष भासूं लागलीं होतीं तीं एकनाथानें बहुशः गाळलीं; व त्याच्या नंतरच्या प्रती करणाऱ्यांनीं तर तींत वाटतील ते बदल व अपपाठ घुसडून दिले. ही दशा एकट्या ज्ञानेश्वरीचीच झाली आहे असें नाहीं. चौदाव्या शतकांतला ज्यास आपण सध्यां समजतों त्या नामदेवाच्या अभंगाचीहि हीच व्यवस्था लागलेली आहे. चौदाव्या शतकांतलें मराठी कोणत्या प्रकारचें होतें तें भूपालवल्लभांतील वर दिलेल्या वाक्यांवरून सहज समजण्यासारखें आहे. नामदेवाच्या मूळ अभंगांतील शब्दांचीं रूपें ह्या वाक्यांतील शब्दांच्या रूपासारखीं असलीं पाहिजेत. परंतु सध्यांच्या नामदेवाच्या छापील गाथेंतील शब्दांचीं व प्रयोगांचीं रूपें, फार झालें तर, सोळाव्या शतकांतल्या रूपांसारखीं दिसतात. ज्ञानेश्वराचे, सोपानदेवाचे व मुक्ताबाईचे म्हणून जे अभंग सध्यां प्रचलित आहेत तेहि असेच अर्वाचीन दिसतात. नामदेवानें मराठींत भारत लिहिलें म्हणून महिपति भक्तविजयाच्या प्रारंभीं म्हणतो. हें नामदेवाचें भारत मजजवळ आहे व त्याची भाषा सोळाव्या शतकांतील आहे. नामदेवाचे अभंग तोंडीं म्हणण्याची चाल फार असल्यामुळें त्यांत निरनिराळ्या काळीं म्हणणाऱ्यांच्या रोजच्या बोलण्याच्या पद्धतीप्रमाणें न कळत बदल होण्याचा संभव आहे. परंतु, ह्या भारताच्या भाषेंत फारसा बदल होण्यासारखा नाहीं. कितीहि फेरबदल झाला तरी तो कोणत्याहि ग्रंथांत इतका होत नाहीं कीं चौदाव्या शतकांतील भाषा सोळाव्या शतकांतील भाषेसारखी हुबेहूब दिसावी. खुद्द ज्ञानेश्वरींतहि फेरफार झालेला आहे. कान्हा, मात्रा, उकाराबद्दल अकार, ऐकाराबद्दल एकार, ऐयाबद्दल इया, ओकाराबद्दल अकार, असे बरेच बदल ज्ञानेश्वरींत झालेले आहेत. परंतु ज्ञानेश्वरी दासबोधासारखी किंवा एकनाथी रामायणासारखी झालेली नाहीं. ह्यावरून अभंग रचणारे ज्ञानदेव व नामदेव चौदाव्या शतकांतल्यापेक्षां पंधराव्या शतकाच्या शेवटीं व सोळाव्याच्या प्रारंभीं झाले असावे असा तर्क करावा लागतो. ह्या तर्काला तीन साधे पुरावे देतों. ( १ ) ज्ञानेश्वरींत फारशी शब्द एकहि नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत बरेच आहेत. ( २ ) ज्ञानेश्वरींत चतुर्थीचा किंवा द्वितीयेचा ला प्रत्यय बिलकूल नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत आहे. हा ला प्रत्यय फारशी द्वितीयेचा प्रत्यय जो रा त्यापासून आलेला आहे. ( ३ ) ज्ञानेश्वरींत व हें उभयान्वयी अव्यय नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत आहे. भिंगारकरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीवरील लेखांत निशाण वगैरे शब्द फारशी आहेत असें म्हटलें आहे. पण तसा प्रकार नाहीं. हे सर्व शब्द अस्सल जुने मराठी आहेत.

असो. इ० स० १५४१ च्या व १४१६ च्या लेखांत फारशी शब्द सांपडतात. ह्या सालांच्या पाठीमागें वीस पंचवीस वर्षे गेलें म्हणजे सांवतांच्या राज्यांतील इ० स० १३९७ तील लेखांत, पर्शरामोपदेशांतील १३५६ तील लेखांत व १२९० तील ज्ञानेश्वरींत एकहि फारशी शब्द सांपडत नाहीं. येणेंप्रमाणें, शिवाजीच्या वेळच्या दरबारी लेखांतील भाषेचें परीक्षण करतां करतां तींत फारशी शब्द व प्रयोग कसे व केव्हांपासून आले ह्या गोष्टींचा शोध लावण्याच्या मिषानें आपण ज्ञानेश्वरीपर्यंत येऊन ठेपलों. मराठी भाषेच्या शब्दरचनेंत व वाक्यरचनेंत फारशी भाषेचें कार्य कोणतें, हा प्रस्तुत विवेचनाचा विषय असल्यामुळें ज्ञानेश्वरीच्या पलीकडे आपल्याला जाण्याची जरूर नाहीं. महाराष्ट्रीपासून ज्ञानेश्वराच्या वेळची मराठी कशी निघाली, ह्या प्रकरणाचा विचार प्रस्तुत कर्तव्य असता तर इ. स. सातशेंपासून तेराशेंपर्यंतचे मराठी लेख पहाणें जरूर होतें. ज्ञानेश्वरानें ज्या अर्थी मराठींत एवढा मोठा ग्रंथ १२९० त लिहिला त्याअर्थी त्याच्यापूर्वी मराठींत कांहीं तरी ग्रंथ-रचना झाली असली पाहिजे हें उघड आहे. विवेकसिंधु व विवेकामृत, असे दोन शब्द ज्ञानेश्वरींत सहजासहजीं आलेले आहेत. त्यावरून मुकुंदराज ज्ञानेश्वराच्या समकालीन किंवा किंचित् अगोदर झाला असावा असें वाटतें. विवेकसिंधूच्या सध्यांच्या ज्या छापील प्रती आहेत त्या जोगाईच्या आंब्यास असणाऱ्या दुर्बोध मूळप्रतीवरून साक्षात् केलेल्या नसून, विवेकसिंधूची वाचतां येण्यासारखी व अर्थात् अर्वाचीन लोकांस समजण्यासारखी दुसरी एक प्रत आंब्यास आहे तीवरून केलेल्या आहेत, असें सांगतात. विवेकसिंधूखेरीज ज्ञानेश्वरापूर्वी मराठींत दुसरी ग्रंथरचना झाली होती हें सिद्ध करण्यास एक साधन आहे. ज्ञानेश्वरानें निवृत्तिनाथ, गयणीनाथ, गोरखनाथ, मछंद्रनाथ अशी आपली गुरुपरंपरा दिली आहे. पैकीं गोरखनाथाची गोरखमत ह्या मथळ्याखालीं कांहीं वाक्यें कित्येक पंचांगांत देत असतात. गोरखनाथाची एक शकुनवंतीहि प्रसिद्ध आहे. प्रत्येक गुरुशिष्यांत २५ वर्षांचें अंतर धरल्यास गोरखनाथ इ. स. ११०० च्या सुमारास असावा असें होतें. ह्या ११०० च्या शंभर दीडशें वर्षे अगोदरचे मराठी ग्रंथ म्हटले म्हणजे मानभावांचे गुप्त-लिपींत लिहिलेले कांहीं जुने ग्रंथ होत. मानभावी जुने ग्रंथ जसेचे तसे छापून बाहेर पडल्याशिवाय ज्ञानेश्वराच्या पूर्वीच्या मराठीसंबंधानें विशेष कांहीं लिहितां येणार नाहीं. मानभावांच्या अगोदर मराठींत कांहीं ग्रंथ होते कीं नव्हते वगैरे विधान करण्यास प्रस्तुत लेखकाला कांहींच आधार माहीत नाहीं.

शिवाजीच्या वेळेपासून ज्ञानेश्वराच्या वेळेपर्यंतचे जे हे लेख दिले त्यांपासून ( १ ) १२९० पर्यंत सर्व महाराष्ट्रांत, व १३९५ पर्यंत, कदाचित् पुढेंहि कांहीं काळापावेतों, महाराष्ट्राच्या ज्या भागांत स्वराज्य होतें तेथें, शुद्ध निर्मळ मराठी भाषा बोलण्यांत व लिहिण्यांत येत असे; ( २ ) १२९० पासून १६५६ पर्यंत, म्हणजे शिवाजीचा अंमल सुरू होईपर्यंत, फारशी शब्दांचें मराठींत प्राधान्य होतें; ( ३ ) १६५६ पासून १७२८ पर्यंत फारशी शब्द जलदीनें कमी होत गेले; आणि त्यापुढें ( ४ ) १७२८ पासून १८१८ पर्यंत मुसुलमान संस्थानांशीं झालेला पत्रव्यवहार व सरकारी दफ्तर ह्यांखेरीज इतरत्र

फारशी शब्द फारसे उपयोगांत नव्हते: असे चार सिद्धान्त निष्पन्न झाले. पैकीं फारशीचा अप्रतिहत प्रवेश मराठी भाषेंत १२९० पासून १६५६ पर्यंतच्या काळांत जारीनें झाला.इ. स. १२९० पासून १३१८ पर्यंत महाराष्ट्रांत यादवांचेंच राज्य असल्यामुळें, फारशीचा प्रवेश मराठींत कांहींच झाला नसावा. १३१८ पासून मुसुलमानांकडे राज्याचीं सूत्रें गेल्यावर मात्र फारशी शब्द मराठींत येण्यास सुरुवात झाली.व ह्या आगमनाची अखेर इ. स.१६५६ त झाली. म्हणजे सुमारें ३३८ वर्षे फारशीचें मराठीला निकट सान्निध्य होतें. ह्या सान्निध्याच्या कचाटींत मराठी भाषेची हालहवाल कशी काय होती त्याचा वृत्तांत पुढें देतों.

इ. स. १३१८ पासून १३४७ पर्यंत महाराष्ट्राचा कारभार दिल्लीहून होत असे. १३४७ त दिल्लीशीं संबंध तोडून हसंग गांगो ब्राह्मणानें दक्षिणेंत ब्राह्मणीराज्य स्थापन केलें तें इ. स. १४९२ पर्यंत बेदरास, १४८४ पर्यंत वऱ्हाडांत, १४८९ पर्यंत अहंमदनगरास, १४८९ पर्यंत विजापुरास, व ९५१२ पर्यंत गोवळकोंड्यास चालू होतें, ह्या सालानंतर दक्षिणेंत बरीदशाही, इमादशाही, निजामशाही, आदिलशाही व कुत्बशाही अशा निरनिराळ्या शाह्या १६५६, १५७२, १६३७, १६८६ व १६८७ पर्यंत अनुक्रमें चालल्या. ह्या सालांनंतर किंवा ह्या सालांच्या सुमारास मराठ्यांनीं सर्व महाराष्ट्र आक्रमिण्याचा प्रयत्न केला. इ. स. १४५० च्या सुमारास खानदेशच्या बाऱ्यांत निकम, ठाण्यास बिंबदेव राणे यांचे वंशज, कोळवणांत कोळी, रामनगरास राणे, सोनगड व रायरी प्रांतांत तेथील राजे, शिरकाणांत शिरके, खेळण्यास शंकरदेव, वाडीस सावंत, बेळगांवास कर्णराज, मोरगिरीस मोऱ्ये, असे अनेक लहान लहान मराठे. संस्थानिक स्वतंत्रपणें राज्य करीत होते. ह्या लहान लहान संस्थानांत १४५० पर्यंत अस्सल मराठीचाच प्रचार असे. हे प्रांत सोडून बाकीच्या महाराष्ट्रांत फारशी शब्दांचा प्रचार अतोनात झाला. १४५० नंतर हीं लहान राज्यें समूळ नष्ट झालीं किंवा ब्राह्मणी पातशाहांच्या अंकित झालीं. तेव्हांपासून शिवाजी स्वराज्यस्थापन करी तोंपर्यंत महाराष्ट्रांत सर्वत्र फारशी शब्दांचा प्रचार होता. येणेंप्रमाणें काळ व स्थळ ह्यासंबंधानें फारशी शब्दांची व्याप्ति मराठींत व महाराष्ट्रांत कशी होत गेली, त्याची हकिकत आहे.

आतां मराठींत कोणत्या प्रकारचे फारशी शब्द विशेष शिरले तें पाहूं. ब्राह्मणी राज्याच्या पहिल्या अमदानींत महाराष्ट्रांत मुसुलमान सरासरी एक लाखापेक्षां जास्त नसावे. देशांत शांतता राखण्याकरितां आणिलेलें सैन्य बहुतेक मुसुलमानांचेंच होतें. तसेंच काजी, मुन्सफ, कमार्वीसदार, दिवाण वगैरे दरबारी, मुलकी व दिवाणी हुद्देदार मुसुलमानच होते. शिवाय कांहीं निरनिराळ्या धंद्यांचे म्हणजे तबीबी, सराफी, मुजावरी, वगैरे धंद्यांचेहि लोक मुसुलमानच होते. अशी ही मुसुलमानांची छावणी देशांतील राज्यकारभार चालविण्यास, शांतता ठेवण्यास व स्वकीयांच्या लहान मोठ्या गरजा भागविण्यास एक लाखापेक्षां फारशी जास्त नसावी.

ह्या एक लाख लोकांपैकीं सत्तर ऐंशी हजार आडमुठे शिपाई व खालच्या दर्जाचे सेवक वगळले म्हणजे बाकी राहिलेले जे वीस पंचवीस हजार वरिष्ठ प्रतीचे संभावित मुसु-

लमान त्यांना महाराष्ट्रांत राज्य चालवावयाचें होतें. राज्य चालवावयाचें म्हणजे जमीन व धंदे ह्यांच्या वरील कर गोळा करावयाचा, आणि तत्प्रीत्यर्थ न्याय द्यावयाचा व बंदोबस्त ठेवावयाचा होता. न्याय देणें व बंदोबस्त ठेवणें हीं दोन कामें कर उकळण्याच्या मुख्य कृत्याला केवळ आनुषंगिक होतीं. ह्या कर गोळा करण्याच्या कृत्याशिवाय दुसरें मोठें कृत्य जें मुसुलमानांना करावयाचें होतें व जें आपल्या येण्याचें तें मुख्य कारण सांगत—तें हिंदुलोकांना बाटविण्याचें होतें. ह्या व्यतिरिक्त तिसरें काम ह्या म्लेच्छ लोकांना कोणतेंच कर्तव्य नव्हतें. वस्तुस्थिति अशी होती कीं, त्या वेळच्या हिंदुलोकांची संस्कृति मुसुलमान लोकांच्या संस्कृतीहून श्रेष्ठ होती. मुसुलमान लोकांना माहीत नव्हते असे धंदे, कला, शास्त्रें, विद्या ह्या देशांत अनेक होत्या. आचारानें ह्या देशांतील लोक मुसुलमानापेक्षां स्वच्छ व श्रेष्ठ होते. तर्कशास्त्र, ज्योतिषविद्या, वेदान्त, वगैरे विचाराच्या प्रदेशांतहि मुसुलमानांच्या वर मराठ्यांची कडी होती. फलज्योतिषावर मराठ्यांचा जितका विश्वास होता तितकाच मुसुलमानांचाहि होता. एका मात्र बाबींत मराठ्यांचा मोठा कमीपणा होता. यादवांच्या अमदानींत म्हणजे इसवीच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठ्यांचें सर्व लक्ष परमार्थाच्या नांवावर ऐहिक उपभोग घेण्याकडे लागलें होतें. तेराव्या शतकांतील अत्यंत मोठा असा मानिलेला ग्रंथ म्हटला म्हणजे हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि हा होय. ह्या ग्रंथात दर दिवसाला व दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें सांगितलीं आहेत व त्या त्या व्रताला कोणत्या देवाचीं कोणतें पक्वान्न करून व किती ब्राह्मण घालून प्रीति संपादन करावी ह्याचा, स्मृति, श्रुति व पुराणें ह्यांतून उतारे देऊन, गंभीरपणें निर्णय केला आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडावरून पहातां वर्षाच्या ३६५ दिवसांची एकंदर २००० व्रतें व्हावीं असा अंदाज होतो. लोकांचीं व्रतें करण्याकडे, ब्राह्मण-भोजनें घालण्याकडे, पक्वान्नें खाण्याकडे व तद्वारां मोक्ष मिळतो अशा मताकडे अतोनात प्रवृत्ति असल्याविना हमाद्रीनें हीं व्रतें, केवळ पांडित्य दाखविण्याकरितां किंवा करमणूक करण्याकरितां, सांगितलीं असतलि, हें संभवत नाहीं. तेव्हां व्रतें करणें व पक्वान्नें खाणें ह्या दोन गोष्टी लोकांच्या आंगवळणीं त्याकालीं फार पडल्या होत्या हें निश्चित आहे. पक्वान्न आणि व्रत ह्यांची फारकत हेमाद्रीनें एकाहि ठिकाणीं केली नाहीं. एवढीं दोन हजार व्रतें ज्या ग्रंथांत सांगितलीं आहेत असा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत कोणत्याहि काळीं एकहि ग्रंथ अद्यापपर्यंत निर्माण झाला नाहीं ! व्रतें करण्याकडे ज्याअर्थी महाराष्ट्रांतील लोकांची तेराव्या शतकांत एवढी बेसुमार प्रवृत्ति झाली होती त्याअर्थीं त्यापासून दोनच अनुमानें स्थूलमानानें करणें रास्त आहे. एक, लोकांजवळ पैसा अतोनात झाला होता, व दुसरें, व्रतांप्रीत्यर्थ खर्चिण्यास लोकांजवळ मुबलक वेळ होता. ह्या दुसऱ्या अनुमानाचा अर्थ असा होतो कीं, राष्ट्रांतील सुखवस्तू लोकांना व त्यांचें लहान प्रमाणावर अनुकरण करणाऱ्यांना कष्टप्रचुर असे मर्दुमकीचे, यातायातीचे, मेहनतीचे, लष्करी व इतर धंदे करण्यास फुरसत नव्हती. अशी वस्तुस्थिति असल्यावर, म्हणजे परशत्रूपासून व अंतःशत्रूंपासून संरक्षण होण्यास कराव्या लागणाऱ्या मेहनतीपासून लोक परावृत्त झाल्यावर आणि अशा व्रतैकदृष्टि किंवा

सुखैकदृष्टि लोकांच्या हातीं मुबलक पैसा असल्यावर, त्यांच्याकडे बुभुक्षु, मेहनती, साहसी, व निर्धन अशा लोकांचें लक्ष जावें ह्यांत अजब असें कांहींच नाहीं. ही अशी वस्तुस्थिति नसती, तर संस्कृतीनें कोणत्याहि प्रकारें श्रेष्ठ नसणाऱ्या मुसुलमानांना त्यावेळीं मराठ्यांना जिंकतांच आलें नसतें. मराठे जातीचे शूर नव्हते अशीहि स्थिति नव्हती. मराठ्यांच्याकडून माळव्यापासून रामेश्वरापर्यंतचे प्रांत इसवी सन १२४० च्या सुमाराला सिंघणानें जिंकविले. सतराव्या शतकांत जसा शिवाजी तसा तेराव्या शतकांत हा सिंघण झाला. सिंघणाला मरून ५० वर्षे झालीं नाहींत तों मुसुलमानांच्याकडून मराठ्यांचा पराजय होतो अर्थात् हा असा चमत्कार होण्यास मराठ्यांच्या शीलांत व चालीरीतींत कांहीं विलक्षण फरक पडला असला पाहिजे. हा फरक कोणता तें हेमाद्रीच्या व्रतखंडावरून स्पष्ट ओळखतां येतें. सिंघणादि वीरांच्या विजयानें लोक अत्यंत धनसंपन्न होऊन, व्रतें, उद्यापनें करण्याच्या मिषानें सुखैकपरायण व विलासनिमग्न झाले. मराठ्यांच्यापेक्षां मुसुलमानांजवळ कांहीं निराळीं हत्यारें होतीं किंवा मराठ्यांना माहीत नव्हत्या अशा व्यूहरचना मुसुलमान करीत असत, असें म्हणण्यालाहि कांहीं एक प्रमाण नाहीं. दोघांहि जवळ सारखींच हत्यारें होतीं. अशी ज्या अर्थीं स्थिति होती त्याअर्थीं सुखैकपरायणता व विलासमग्नता हींच मराठ्यांच्या नाशाचीं तेराव्या शतकांत करणें होतीं. परमार्थाच्या नावाखालीं ही जी सुखैकपरायणवृत्ति नांदत होती तिचा फायदा घेऊन मुसुलमानांनीं मराठ्यांचा पराभव केला.

इसवी सन १३१८ त अशी वस्तुस्थिति असल्यामुळें मुसुलमानांजवळ मराठ्यांना शिकविण्यासारखें कांहींच नव्हतें. ते राज्याधिकारी होते व त्यांची भाषा फारशी होती, तेव्हां व्यवहार चालण्याकरितां फारशीचा उपयोग दरबारांत होऊं लागला. पहिलीं पांच पन्नास वर्षे कोण्याहि ब्राह्मणानें, मराठ्यानें, किंवा कुणब्यानें ह्या मुसुलमान अधिकाऱ्यांची खासगी किंवा सरकारी कसलीही नोकरी केली नाहीं. मुसुलमानांची खासगी नोकरी चातुर्वर्ण्यांतील मनुष्याकडून होणें अशक्यच होतें. परंतु द्वेषानें व अभिमानानें सार्वजनिक नोकरीहि कोणी करीत नसत. ह्याचमुळें मुसुलमानी अमलांत वेठीची जुलमी पद्धत अमलांत आली. वाटेल तें सार्वजनिक काम पाहिजे तेव्हां हव्या त्या माणसांकडून जुलमानें करून घ्यावयाचें हा वेठ ह्या शब्दाचा अर्थ आहे. ही वेठ जेव्हां सुरू झाली तेव्हां संभावित ब्राह्मण व मराठे कालान्तरानें व निरुपायानें सरकारी नोकरी करूं लागले, व अर्थात् फारशी शब्दांचीहि ओळख करून घेऊं लागले. ह्यावेळीं महाराष्ट्रांतील तालुक्यांच्या कमाविसदारांजवळ दुभाषांचें काम हिंदुस्थानांतील कायस्थ लोक करीत. इसवी सन १४१६ तील जे फारशी—मराठी कागद आहेत त्यांवर ह्या कायस्थ दुभाषांचीं नांवें आहेत. महाराष्ट्रांत हे मुसुलमान आले ते येथें कायमचे राहिले व त्यांनीं शंभर दीडशें वर्षांत बरेच लोक बाटवून मुसुलमान केले. शेवटीं ह्या बाटविण्याची मर्यादा इतकी वाढली कीं प्रत्येक खेडें, ओढा व डोंगराचें शिखर ह्याच्या आंत, जवळ किंवा वर मस्जीद, दर्गा किंवा पीर स्थापन झाला. हिंदूंचीं देऊळें व मुसुलमानांचे तक्ये एकमेकाला येऊन भिडले.

बाव्यांच्या, मुसुल्मानी अधिकाऱ्यांच्या, व फकिरांच्या तोंडून निघालेले फारशी शब्द महाराष्ट्रांतलि सर्व लहानमोठ्या जातींतील लोकांच्या कानावरून हमेश जाऊं लागले व व्यवहारांत जिकडे तिकडे फारशी शब्दांचा सुळसुळाट झाला. शास्त्र, धर्म, नीति, आचार, इत्यादि महत्त्वाच्या प्रांतांत फारशी शब्द मुळींच शिरले नाहींत. बल्के, बाजार, दरबार, फौज, अदालत, सराफी, जमीन, जुमला, सावकारी, वगैरे कारभाराच्या जागीं बोलल्या जाणाऱ्या जबानींत फारशी शब्दांचा अंमल मामूर झाला. उदाहरणार्थ, घरासंबंधींचे कांहीं फारशी शब्द देतों. खाना, दार, सराई, इमारत, जनाना, दिल्ली दरवाजा, दरवाजा, दालन, हौद, दिवाणखाना, ओसरी, महाल, ऐनेमहाल, रंगमहाल, संदुकखाना, मुदबखखाना, आतषखाना, दिवाळ, देवळी, कप्पा, कप्पी, घुमट, जमीन, फारशी, तक्त, तक्तपोशी, हलका, कुलुप, खलवतखाना, किल्ली, छपर, आरक, घुसलखाना, तालीमखाना, तावदान, खजीना, अंबार, कारंजें, आबदारखाना, फवारा, बुरूज, गच्ची, चुनेगच्ची, पिंजरा, पलंग, खुर्ची, मेज, वगैरे. बाजार, दरबार, फौज, जमीन, वगैरे संबंधानेंहि असेच शेंकडों फारशी शब्द देतां येतील. ते कोणच्याहि फारशी किंवा मराठी कोशांत सांपडण्यासारखे आहेत. मराठींत फारशी शब्द शिरले आहेत हें जगजाहीर आहे. परंतु ते कोणत्या बाबीसंबंधानें विशेष शिरले आहेत. त्याचा तपशील वर दिला आहे.

फारशी बोलणाऱ्या मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रावर ३५० वर्षें होतें. त्याअर्थी मराठींत फारशी शब्द यावे ही सामान्य गोष्ट आहे. फारशीच्या व मराठीच्या सान्निध्यांत विशेष जो आहे तो निराळाच आहे. तो विशेष हा. मराठींत बरेच विशिष्ट प्रयोग फारशीवरून आलेले आहेत. शफथ खाणें असा एक प्रयोग मराठींत करतात. शपथं गृह् असा प्रयोग संस्कृतांत आहे. शफथ घेणें असा मूळचा मराठी प्रयोग पूर्वी होता व सध्यां चालू आहे. परंतु खाणें ह्या क्रियापदाचा शफथेशीं जोड देण्याची कल्पना फारशी प्रयोगावरून मराठींत आली आहे. फारशींत कसम् खुर्दन् असा प्रयोग असतो. कसम् = शफथ; खुर्दन = खाणें. हाक मारणें असा एक मराठी प्रयोग आहे. ह्याला जुन्या मराठींत बोलावणें व संस्कृतांत निमंत्र् असे शब्द आहेत. उच्चैःनिमंत्रणं कृ असाहि संस्कृत प्रयोग होईल. परंतु निमंत्रणं मारयति किंवा प्रहरति असा प्रयोग संस्कृतांत नाहीं. बांग जदन् म्हणून फारशींत प्रयोग आहे त्यावरून मराठींत हाक मारणें असा प्रयोग घेतलेला आहे. बांग = हाक किंवा आरोळी; जदन् = मारणें. तसेंच याद राखणें असें मराठी संयुक्त क्रियापद आहे. तें याद दाष्तन् ह्या फारशी प्रयोगापासून घेतलें आहे. याद = आठवण; आणि दाष्तन् = राखणें. असे शेंकडो प्रयोग फारशीवरून मराठींत घेतलेले आहेत. उदाहरणार्थ खालीं कांहीं प्रयोग देतों.

रोघन् मालीदन् = रोगण चोळणें.

खाली कर्दन् = ( घर ) खाली करणें.

राह् दादन् = रस्ता देणें.

माफ् कर्दन् = माफ करणें.

हल्ल कर्दन् = हल्ला करणें.

रद्द कर्दन् = रद्द करणें.

जमा शूदन् = जमा होणें.

सई कर्दन् = सई करणें, प्रयत्न करणें.

बाजू गिरफ्तन् = बाजू घेणें.

दोस्ती दाष्तन् = दोस्ती ठेवणें, मैत्री करणें.

तुहमत् जदन् = माथीं मारणें.

सुहबत् दाष्तन् = सोबत राखणें.

सुहबत् रफ्तन् = सोबत जाणें.

किलीद दादन् = किल्ली देणें.

दूर कर्दन् = दूर करणें, काढणें.

तमाशा नमूदन् = तमाशा दाखविणें.

पुष्तक् वर्दाष्तन् = उडी टाकणें.

पुष्तक् जदन् = उडी मारणें.

हजमित् कर्दन् = हजामत करणें, कडक बोलणें.

मना कर्दन् = मना करणें.

जेर कर्दन् = जेर करणें.

बामैदान आवर्दन् = मैदानांत आणणें. जाहीर करणें.

कमर बस्तन = कंबर बांधणें.

दम् जदन् = दम मारणें.

नाखुन् गिरिफ्तन = नखें काढणें.

जाहीर साख्तन् = जाहीर करणें.

जबर शूदन् = जबर होणें.

पेष आमदन् = पुढें येणें.

शबीना कष्तन् = छबीना काढणें.

दस्त् दादन् = हात देणें, मदत करणें.

दम दरकषीदन = दम धरणें.

आणीक अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. फारशीतून सबंद प्रयोगाचे प्रयोग घेण्याव्यतिरिक्त मराठी व फारशी ह्यांच्या सान्निध्यांत दुसरा एक विशेष आहे. तो हा कीं, कित्येक उद्गारवाचक शब्द, उभयान्वयी अव्ययें, शब्दयोगी अव्ययें, क्रियाविशेषणें व सर्वनामें मराठीनें फारशीतून घेतलीं आहेत.

उद्गारवाचक शब्द.

१ बस, २ हां, ३ अलबत, ४ बेशक, ५ बेलाशक, ६ खूप, ७ वाहवा, ८ छे, ९ छी, १० अफसोस, ११ शाबास, १२ खुश, १३ फू, १४ बेदाद.

उभयान्वयी अव्ययें.

१ वा, २ व, ३ मगर, ४ अगर, ५ बल्के, ६ या, ७ कीं, ८ बाकीं, ९ चुनाचे, १० सबब, ११ लेकिन.

शब्दयोगी अव्ययें.

१ दर ( दरदिवस, दररोज ).
२ बे ( बेदील ).
३ देखील ( देखील इनाम = इनामासुद्धां ).
४ ते, ( चाळीस ते पन्नास ).
५ गैर ( गैरचाल ).
६ सवाई { सवाई माधवराव = माधवरावाच्या योग्यतेचा; सवाई बाजीराव = बाजीरावाच्या योग्यतेचा; सवाई शिकंदर = शिकंदराच्या योग्यतेचा }
७ बाजद ( बाजद बरसात ).
८ अज् ( अज् रख्तखाने ).
( अज् तागाईत ).
९ बमय ( बमय फौज ).
१० ला ( लाइलाज ).
११ बिला ( बिलाकसूर ).

हीं शब्दयोगी अव्ययें शब्दाच्या पाठीमागें लागतात. शब्दांच्या पुढें येणाऱ्या फारशी शब्दयोगी अव्ययांपैकीं कांहीं पुढें देतों.

१ बद्दल, २ ऐवजीं, ३ बरोबर, ४ शिवाय, ५ नजदीक, ६ रूबरु, ७ माफक, ८ बरहुकूम, ९ बाबत, १० बमोजिब.

मराठींत फारशी क्रियाविशेषणें शेकडों आहेत. त्यांपैकीं दहापांच पुढें देतों:—

हमेश, बिलकुल, वारंवार, एकवार, बेहत्तर, छान, बितपशील, जल्द, शिताबीनें, दरवक्त, मुष्कील, हरवजा, लाशक अलाहिदा, वगैरे, पेष्तर, वापस, नवर्दागर, वुलीं, तमाम, गुदस्तां, यंदा, एकटा, दुकटा, कांहींच, नाहींच, अव्वल, दुय्यम, सिय्यम, देखील.

खालील सर्वनामें मराठींत फारशींतून आलीं आहेत:—

१ खुद ( मी खुद तेथें आहे ).
२ फलाणा ( फलाणा माणूस ).
३ हर ( हर जिन्नस ).
४ हरएक ( हरएक माणूस ).
५ कसचे ( तें कसचें येतें ? )
६ जण ( सहा जणीं बाया )

७ हरकसा ( हरकसा,-कशी,-कसें )
८ चें ( कसचें, कोणचें, )
९ दरएक ( दरएक माणूस )

फारशीच्या व मराठीच्या सान्निध्याचा पहिला विशेष प्रयोगांच्या ग्रहणाचा आहे. ह्या विशेषानें कित्येक नामांना कित्येक क्रियापदें फारशीच्या धर्तीवर लावण्याचा प्रघात पडला. इंग्रजीच्या धर्तीवरहि आपण कित्येक प्रयोग सध्यां असेच करूं लागलों आहों. To take advantage of ह्या इंग्रजी प्रयोगाचें मराठींत चा फायदा घेणें असें भाषान्तर करतात व हा प्रयोग मराठींत सध्यां रूढ झाला आहे. ह्या परदेशी प्रयोगांच्या मुळें भाषेच्या रूपांत तर फरक होतोच; परंतु मुख्य फरक कल्पनेच्या प्रांतांत होतो. उदाहरणार्थ, उडी मारणें, हा प्रयोग घेऊं. संस्कृतांत उड्डयते ह्या क्रियापदानें ह्या प्रयोगाचा अर्थ प्रदर्शित होतो. अगर, उड्डाणं कुरुते, असाहि संस्कृत प्रयोग होतो. जुन्या मराठींत उड्डाण करतो असा प्रयोग आहे. उडी घेणें असाहि मराठींत एक प्रयोग आहे. परंतु, उडी मारणें हा प्रयोग फारशीचें मराठीला सान्निध्य होईतोंपर्यंत माहीत नव्हता. उडी म्हणजे उड्डाण ह्या कर्माचा मारणें म्हणजे प्रहार करणें ह्या क्रियेशीं संबंध जोडविण्याचा प्रघात फारशी प्रयोगांशीं परिचय होईतोंपर्यंत मराठींत नव्हता. तो फारशीवरून आपण मराठींत घेतला आहे. फारशींत हा प्रयोग कसा आला ह्या प्रश्नाचा शोध अलाहिदा असल्यामुळें, ह्यांत जास्त खोल शिरत नाहीं.

मराठी व फारशी ह्यांच्या सान्निध्याचा दुसरा विशेष उद्गारवाचक शब्द, उभयान्वयी अव्ययें, पाठीमागें व पुढें लागणारीं शब्दयोगी अव्ययें, क्रियाविशेषणें व सर्वनामें, ह्यांच्यासंबंधांचा आहे. ह्या विशेषानें भाषेच्या रूपांत वरच्याहिपेक्षां जास्त फरक झाला आहे. फारशींतून जे उद्गारवाचक शब्द मराठींत घेतले आहेत, त्यांनीं मराठींतील पूर्वींच्या अबब, अहा, हरहर, धन्य, जी, इत्यादि उद्गारांत जास्त भर पडली आहे व त्यांच्यामुळें अनेक उद्गारांचे वारीक बारीक भेद पूर्वींपेक्षां जास्त सफाईनें व सूक्ष्मपणें प्रदर्शित करतां येतात. फारशी क्रियाविशेषणापासूनहि मराठीला हाच फायदा झाला आहे. परंतु नामांच्या पाठीमागें लागणाऱ्या फारशी शब्दयोगी अव्ययांच्या योगानें मराठी भाषेच्या स्वभावांत बदल झाला आहे. दर साल दर सद्दे किंवा दर शेकडा पांच टक्के व्याज सुटतें, ह्या वाक्यांचा अर्थ सालांत शंभर रुपयांमागें पांच टक्के व्याज सुटतें, असा आहे. दर म्हणजे आंत हें शब्दयोगी अव्यय फारशींत इतर शब्दयोग्यांप्रमाणें नामाच्या पाठीमागें लागतात. दर रोज म्हणजे रोजीं; दर बाजार म्हणजे बाजारीं; असा प्रयोग फारशींत होतो. दर रोज तीन आणे मजुरी देतों किंवा रोजीं तीन आणे मजुरी देतों, असे दोन्ही प्रयोग मराठींत होतात. दर रोज ह्याबद्दल संस्कृतांत, महाराष्ट्रींत व मराठींत दिवसे, दिसम्मि, दिवशीं असे प्रयोग होतात; म्हणजे सप्तमीचा प्रत्यय नामाच्या पुढें लागतो, मागें लागत नाहीं. इंग्रजींत किंवा फारशींत in किंवा दर हीं शब्दयोगी अव्ययें नामाच्या पाठीमागें लागतात. येणेंप्रमाणें, शब्दयोगी अव्ययें योजण्याची मराठींत जी सार्वत्रिक चाल आहे तिच्या विरुद्ध दर हें

शब्दयोगी अव्यय मराठींत योजिलें जाऊं लागलें आहे. हीच कथा ता ह्या फारशी शब्दयोगी अव्ययाची आहे. ता ह्या शब्दयोगी अव्ययाचा अर्थ फारशींत पर्यंत असा होतो. अज् मुंबई ता पुना, ह्या फारशी शब्दांचा अर्थ, मुंबईपासून पुण्यापर्यंत, असा आहे. ह्या ताचें ते, तों अशीं रूपें मराठींत योजिलीं जातात. मुंबई ते पुणें पांच रुपये भाडें पडतें; ह्या पुस्तकाचे एक ते पांच भाग छापिले जातील; ह्या वाक्यांत ते ह्या शब्दयोग्याचा अर्थ पर्यंत असा आहे व तें ता ह्या फारशी शब्दयोग्याचा अपभ्रंश असून, फारशींतल्याप्रमाणें नामाच्या मागें लागतें. फारशींतील बे चीहि अशीच तऱ्हा आहे. बेदिल, बेवकूब, बेभरंवशाचा, बेइमानी, बेअक्कली. ह्या शब्दांत बे हें शब्दयोगी त्या त्या शब्दांच्या मागें फारशींतल्याप्रमाणें येतें. तो मनुष्य सवाई शिकंदर आहे किंवा सवाई बिलंदर आहे, ह्या वाक्यांचा अर्थ, तो मनुष्य शिकंदरासारखा किंवा बिलंदरासारखा आहे, असा होतो. येथें सवाई हें शब्दयोगी अव्यय फारशींतल्याप्रमाणें योजिलें आहे. देखील, बाजत, बमय, गैर, ला, बिला, हीं अव्ययेंहि अशींच फारशींतल्याप्रमाणें जुन्या मराठी दरबारी लेखांत व सध्यांहि योजितात. दर व ता ह्या पूर्वगामी अव्ययांचा मराठींत दुसऱ्या एका तऱ्हेनें फाजील उपयोग होत असतो. मी दर दिवशीं चार कोस चालतों. ह्या वाक्यांत दर हें पूर्वगामी अव्यय योजून शिवाय दिवस ह्या शब्दाची सप्तमी योजिली आहे. पुण्यापासून तो मिरजेपर्यंत अडीचशें मैल अंतर आहे, येथें तो हें पूर्वगामी व पर्यंत हें पश्चाद्गामी अशीं दोन्ही शब्दयोगी अव्ययें आलीं आहेत. ह्या ठिकाणीं तो व दर ह्या शब्दांची शक्ति काय आहे व त्यांचा मूळ प्रयोग कसा करीत असत, हें माहीत नसल्यामुळें बोलणारानें फारशी व मराठी अशीं दोन्हीं अव्ययें योजिलीं आहेत. फारशी प्रयोग अत्यंत रूढ झाल्यानें तो सोडवेना व मूळ मराठींतल्याप्रमाणें बोलण्याचा स्वभाव सुटेना, असा चमत्कार ह्या फाजील प्रयोगांत झाला आहे. परंतु ह्या फाजील प्रयोगांत एक मोठें गूढ इंगित सांठलेलें आहे. तें हें कीं, इंग्रजीप्रमाणें किंवा फारशीप्रमाणें पूर्वगामी शब्दयोगी अव्ययांचा मराठीला जातीचाच कंटाळा आहे. शब्दांचें सामान्य रूप करून पश्चाद्गामी शब्दयोगी अव्यय त्या सामान्यरूपापुढें लटकावून देण्याचा मराठीचा आनुवंशिक स्वभाव आहे. परंतु ह्यालाहि एक अपवाद आहे. मराठींत भर म्हणून एक शब्दयोगी अव्यय फारशींतून आलेलें आहे. फारशींत बर म्हणून एक पूर्वगामी शब्दयोगी आहे; त्यापासून हें मराठी भर अपभ्रंशानें आलें आहे. ह्या भर अव्ययाचा, शब्दाचें सामान्यरूप न होतां, उपयोग होतो. जसें घरभर, गुडघाभर, पायलीभर, हौदभर, इत्यादि.

मी, तूं, तो, हा, असा, कसा, जसा, तितका, तेवढा, एवढा, जेवढा, केवढा, तितकाला, स्वतः, अमुक, आपण, काय, वगैरे सर्वनामें मराठींत इतर कोणत्याहि भाषेपेक्षां जास्त आहेत. तशांत, वर दिलेल्या आणीक नउ दहा फारशी सर्वनामांची त्यांत भर पडल्यामुळें मराठींत सर्वनामांच्या योगानें जे नानाप्रकारचे बारीक बारीक सूक्ष्म भेद दाखवितां येतात ते इतर कोणत्याहि भाषेंत एकेका शब्दानें दाखवितां येत नाहींत. तो कसचा येतो ? केवढाले हे आंबे ! वगैरे वाक्यांतील कसचा, केवढाले, ह्यांचीं इंग्रजींत एकेका

सर्वनामांनें भाषांतरें होत नाहींत. कसचा ह्याचें यथार्थ भाषांतर इंग्रजींत तर होत नाहींच; परंतु is there any the smallest chance of his coming? अशा-सारखा एखादा लांबच लांब प्रयोग करून इंग्रजीला हें काम कसेंबसें भागवून घ्यावें लागतें. खुद, फलाणा, हर वगैरे फारशी सर्वनामांसंबंधानें विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं. परंतु कस व चे ह्या सर्वनामांना नुसतें जाऊं देतां कामा नये. चे हें फारशींत प्रश्नार्थक सर्वनाम आहे व त्याचा मराठींत कोठचें व कसचें ह्या संयुक्त सर्वनामांत उपयोग होतो. ज्ञानेश्वरींत कोठचें व कसचें हीं प्रश्नार्थक रूपें नाहींत. हरकसा हें रीतिदर्शक सर्वनाम हर व कस ह्या दोन फारशी सर्वनामांचा जोड करून बनविलेलें आहे. हरकशाहि युक्तीनें ये, असा ह्या शब्दाचा प्रयोग होतो. दरएक हें हरएक ह्या सर्वनामाचें अनुकरण करून आणि हर व दर ह्या दोन फारशी शब्दांचा घोटाळा करून बनलेलें रूप आहे. हर हें सर्वनाम आहे व दर हें शब्दयोगी अव्यय आहे, हें मूळ प्रयोगकर्त्यांना माहीत नव्हतें. जण हें सर्वनाम जन् ह्या फारशी नामावरून घेतलें आहे. जन् म्हणजे बायको. मराठींत किती जण, किती जणी, अशीं पुल्लिंगी व स्त्रिलिंगी रूपें योजितात. येथें कांहींच व नाहींच ह्या क्रियाविशेषणांविषयीं किंचित् उल्लेख करतों. हें दोन्ही शब्द फारशी कहींच व नहींच ह्या सकरणरूपी व अकरणरूपी क्रियाविशेषणांपासून आलेले आहेत. कहींच हें क्रियाविशेषण के आणि हींच व नहींच हें न आणि हींच ह्या दोन सर्वनामांपासून झालेलें आहे. कहींच म्हणजे कांहींहि आणि नहींच म्हणजे न कांहीं असा अर्थ आहे. इंग्रजींत कहींच म्हणजे something व नहींच म्हणजे nothing असा अर्थ होतो. तो कांहींच बोलत नाहीं, तो नाहींच येत, असे प्रयोग ह्या शब्दांचे होतात. एकटा व दुकटा हीं संख्यावाचक विशेषणें फारशींतील एकता, दुता, ह्या विशेषणांवरून आलेलीं आहेत.

सर्वनामाप्रमाणें फारशींतून मराठींत उभयान्वयी अव्ययेंहि बरींच आलीं आहेत. संस्कृतांतील च व इंग्रजींतील and ह्या उभयान्वयी अव्ययांच्या अर्थीं मराठींत व व आणि अशीं दोन अव्ययें आहेत. कीं हें अव्यय फारशी के ह्या अव्ययावरून मराठींत घेतलें आहे. ज्ञानेश्वरींत नियमानें व ऐतिहासिक पत्रांत विकल्पानें जे हें रूप येतें.

मराठीच्या व फारशीच्या सान्निध्यासंबधानें आतांपर्यंत जे हे विशेष सांगितले त्याहूनहि एक विशेष बराच संस्मरणीय असा फारशीच्या संसर्गानें मराठींत आला आहे. तो विशेष चतुर्थीच्या किंवा द्वितीयेच्या **ला** प्रत्ययासंबंधाचा आहे. हा प्रत्यय फारशी द्वितीयेचा प्रत्यय जो **रा** त्यापासून आला आहे. फारशींत राम ह्या शब्दाची द्वितीया राम्‌रा अशी होते. मराठींत राम, ह्या शब्दाची द्वितीया ज्ञानेश्वराच्या वेळीं राम, रामा, रामासी, रामातें, रामाप्रति, अशी होत असे. पुढें फारशीच्या सान्निध्यानें रामाला अशी द्वितीया विकल्पानें होऊं लागली. राम् राम्‌रा; राम रामाला ( राम + आ + ला ). अहमदनगर, अहमदनगररा ह्या फारशी द्वितीयेबद्दल अहमदनगर, अहमदनगरला किंवा अहमदनगराला अशी मराठी द्वितीया होऊं लागली. हा ला प्रत्यय कोठून आला, ह्या-विषयीं, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळोणकर व कृष्णशास्त्री गोडबोले ह्यांना गूढ

पडलें होतें ( दादोक्त मोठें व्याकरण, दहावी आवृत्ति, पृष्ठ ६५; चिपळोणकरकृत व्याकरणावरील निबंध, पृष्ठ ७३, गोडबोलेकृत व्याकरण ). ज्ञानेश्वरींत हा ला प्रत्यय नसतांना पुढें तो एकाएकीं कोठून आला ? नामदेवाच्या अभंगांत हा ला प्रत्यय प्रथम आढळतो. ज्ञानेश्वर व नामदेव हे जर समकालीन होते, तर नामदेवाच्या ग्रंथांतच तेवढा ला प्रत्यय आढळावा आणि ज्ञानेश्वराच्या ग्रंथांत बिलकुल नसावा, हें आश्चर्य आहे. खरा प्रकार असा आहे कीं, ज्याचे अभंग आपण सध्यां वाचतों तो नामदेव सोळाव्या शतकांत होऊन गेला; व सोळाव्या शतकांत २०० वर्षांच्या घसटीनें ला प्रत्यय मराठींत रूढ होऊन नामदेवाच्या अभंगांत आला. आतां लग् धातूपासून निघालेल्या लागून, लागीं, लगीं, ह्या रूपांचा द्वितीयेचा ला प्रत्यय अपभ्रंश आहे असें प्रतिपादन कोणी ग्रंथकार करितात.

जॉन बीम्स् ह्यानें आपल्या Comparative Grammar नामक ग्रंथांत हेंच मत स्वीकारिलें आहे. लग् धातूपासून निघालेल्या लागीं ह्या शब्दाचा शेवटली गी लुप्त होऊन ला हा द्वितीयेचा प्रत्यय झाला असें बीम्स्चें म्हणणें आहे. ह्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ तो असें कारण देतो कीं, जुन्या मराठींत ( ? ) लागीं व लागून अशीं रूपें होतीं तीं जाऊन हा ला प्रत्यय वर्तमान मराठींत राहिला आहे. परंतु बीम्स्चें हें म्हणणें १२९० पासून १८९० पर्यंतची ऐतिहासिक परंपरा पाहिलीं असतां खरें आहे असें म्हणतां येत नाहीं. आधीं जुन्या मराठींतील लागीं व लागून हीं रूपें प्रस्तुत काळापर्यंत लुप्त झालीं नसून सध्यांहि चालू आहेत. ज्याला मरून नुकतींच शंभर वर्षें झालीं, त्या महिपतीनें हा शब्द योजिला आहे.

नक्र बोलला तुज लागोन । तुझें नाम पतितपावन ।
आणि माझा अव्हेर करून । जासी घेवोन गजेंद्रा ॥

भक्तिविजय

ज्ञानेश्वर ( इ. स. १३०० ), मुक्ताबाई ( १५५० ), एकनाथ ( १६०० ), नामदेव ( १६०० ), मुक्तेश्वर ( १६४० ), वामन ( १६६० ), श्रीधर ( १७०० ), मोरोपंत ( १७७० ), महीपति ( १७९० ), वगैरे ग्रंथकारांनीं आज सहाशें वर्षे हा शब्द योजण्याचा क्रम सारखा ठेविला आहे. तेव्हां हा शब्द अलीकडील काळांत केव्हांहि लुप्त झाला नाहीं, हें उघड आहे. बीम्स्चें म्हणणें खरें नसण्याला दुसरें कारण असें आहे कीं, कोणच्याहि शब्दयोगी अव्ययाला विभक्तिप्रत्ययाचें रूप येण्याला, तें शब्दयोगी अव्यय लोकांच्या बोलण्यांतून व लिहिण्यांतून हळूहळू कमी आलें पाहिजे. ह्या नियमाप्रमाणें पाहिलें असतां, ला हा द्वितीयेचा प्रत्यय ज्या मराठी ग्रंथकाराच्या लेखांत प्रथम दिसतो, त्याच्या लेखांत लागीं, लागून हीं रूपें क्वचित् आलीं पाहिजेत व त्याच्यानंतरच्या ग्रंथकारांच्या लेखांत मुळींच येतां कामा नाहींत. आतां नामदेवाच्या ग्रंथांत ला हा प्रत्यय प्रथम दृष्टीस पडतो; परंतु लागीं हें शब्दयोगी अव्ययहि त्याच्या अभंगांत व भारतांत अनेक वेळां आलें आहे. तसेंच नामदेवाच्यानंतर झालेल्या एकनाथादि ग्रंथकारांच्या ग्रंथांतहि तें हमेशा येतें. तेव्हां बीम्सची क्लृप्ति खरी नाहीं असें म्हणणें प्राप्त होतें. आतां

मुसुलमानांच्या ऐन अमदानींत वाढलेल्या नामदेव, मुक्ताबाई वगैरेंच्या ग्रंथांत फारशी रा पासून निघालेला ला हा द्वितीयेचा प्रत्यय जसा कित्येक ठिकाणीं योजिलेला दृष्टीस पडतो तसा प्रस्तुत खंडांत छापिलेल्या शिवाजीच्या पत्रांत दिसत नाहीं. सह्याद्रीच्या पूर्वेकडील मावळांत व पश्चिमेकडील तळकोंकणांत फारशी भाषेचा संचार केव्हांहि फारसा नसल्यामुळें तेथील लोकांच्या बोलण्यांत फारशींतून घेतलेला द्वितीयेचा ला प्रत्यय बिलकूल येत नसून प्रायः स प्रत्यय येत असे. शिवाजीचे ब्राह्मण मुत्सद्दी एकोनएक मावळांतील किंवा तळकोंकणांतील होते व ते स प्रत्ययाचा हमेश उपयोग करीत. जर लागीं किंवा लागून ह्या शब्दयोगी अव्ययापासून ला प्रत्यय निघाला असतां, तर महाराष्ट्रांतील सर्व भागांत ह्या लाचा उपयोग, निदान नामदेवानंतर शंभर दीडशें वर्षांनीं तरी, सर्व महाराष्ट्रांत व्हावयाला पाहिजे होता परंतु तसा प्रकार झालेला नाहीं. ला प्रत्यय शिवाजीच्या वेळेस मावळांत व तळकोंकणांत फारसा लावीत नसत हें तर काय, पण, दादोबा पांडुरंग व कृष्णशास्त्री चिपळोणकर ह्यांच्या वेळींहि ला प्रत्यय कोंकणांत फारसा योजीत नाहींत व देशांत हमेशा योजतात, असा भेद भासत होता ( दादोक्त मोठें व्याकरण, दहावी आवृत्ति, पृष्ठ ६५ व चिपळोणकरांचे व्याकरणावरील निबंध, पृष्ठ ७३ ). येणेंप्रमाणें बीम्सची ही क्लृप्ति केवळ निराधार आहे असें मला वाटतें. ज्ञानेश्वरींत आ, स, सीं, ते, हे द्वितीयेचे किंवा चतुर्थीचे प्रत्यय होते. लागीं, लागौनी, लाग, लागा, अशीं लाग ह्या नामाचीं व क्रियापदाचीं रूपें ज्ञानेश्वरींत व तिच्या पुढील सर्व ग्रंथांत येतात. हें घर माझ्या लागीं नाहीं, अशा वाक्यांत लाग शब्दाची जशी सप्तमी सध्यां आपण योजतों, तशीच ज्ञानेश्वरींतहि योजीत असत. ह्यासंबंधीं विशेष विवेचन ज्ञानेश्वरींतील भाषेचा विचार अन्यत्र करावयाचा आहे त्यावेळीं करतां येईल.

फारशींत कित्येक शब्दांचें अनेकवचन आन् हा प्रत्यय लाऊन करतात. त्याचें अनुकरण जुन्या ऐतिहासिक पत्रांत अनेक स्थलीं केलेलें दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, राजश्री वाड ह्यांच्या शाहू छत्रपतीच्या रोजनिशीच्या १८५ व्या पृष्ठावर मोकदमानि हा शब्द आलेला आहे. मूळ फारशी शब्द मोकदम व त्याचें अनेकवचन मोकदमान्. मोकदमान् ह्या रूपाला मौजा ह्या शब्दाशीं जोडण्याकरितां षष्ठीची फारशी ई जोडून मोकदमानी मौजा असा प्रयोग केला आहे. मोकदमान् ई मौजा ह्याचा अर्थ गावचे मोकदम असा होतो. हा षष्ठीचा ई प्रत्यय द्वितीयेच्या रा प्रत्ययाप्रमाणें मराठींत रूढ झाला नाहीं. फक्त मौजा, नजदीक वगैरे कांहीं शब्दांच्यापुढें मात्र सध्यां आलेला आढळतो. ही षष्ठीची ई मराठींत रूढ न होण्याचें कारण असें आहे कीं, ही ई ज्याची षष्ठी करावयाची, त्या नामाच्या पूर्वी लागते. इंग्रजींत जसें of शब्दयोगी अव्यय नामाच्या पाठीमागें लागतें तशी ही फारशी ई नामाच्या पाठीमागें लागते. विभक्तीचा प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय नामाच्या मागें लावण्याचा मराठीचा स्वभाव नाहीं. तेव्हां ही षष्ठीची ई मराठींत टिकली नाहीं. परंतु रा हा द्वितीयेचा प्रत्यय फारशींत मराठीप्रमाणें नामाच्यापुढें लावतात. तेव्हां तो मराठीच्या स्वभावाला जुळण्यासारखा असल्यामुळें मराठी विभक्तिप्रत्ययांत कायम

होऊन बसला आहे. इतकेंच कीं, द्वितीयेचा रा प्रत्यय लागतांना फारशींत नामाचें सामान्यरूप होत नाहीं, व मराठींत, त्या भाषेच्या नियमाप्रमाणें होतें. उदाहरणार्थ, गोविंद ह्या नामाचें फारशी पद्धतीनें गोविंद्रा असें द्वितीयेचें रूप होईल; परंतु मराठींत गोविंदाला असें रूप होतें.

भाषेचें स्वरूप बदलणारा दुसरा एक फेरफार फारशीच्या संगतीनें मराठींत आला आहे. तो उच्चारासंबंधानें आहे. इंग्रजींतल्याप्रमाणें फारशींत बरेच शब्द व्यंजनांत उच्चारतात. उदाहरणार्थ, रोघन्, माफ्, सुहूवत्, इमारत्, दूर्, हजीमत्, मेहनत्, मैदान्, अलबत्, खूप्, अफ्सोस्, वगैरे फारशी शब्द घ्या. हे शब्द महाराष्ट्रांतील लोकहि मुसुलमानांप्रमाणेंच उच्चारूं लागले; व ह्या उच्चाराची लकब जातिवंत मराठी शब्दांनाहि ते नकळत लावूं लागले. उपयोग्, गड्बड्, सांगून्, म्हण्तात्, आप्णास्, लांवचा, आठ्वण्, नांदत्, वगैरे मराठी शब्द येथें लिहिले आहेत त्याप्रमाणें व्यंजनान्त उच्चारण्याची संवय मराठ्यांनीं मुसुलमानापासून घेतली असें म्हणण्याला कारणें आहेत. पैकीं एक हें कीं, ज्ञानेश्वरींत नियमानें हे शब्द व्यंजनान्त उच्चारत नसून स्वरान्त उच्चारले जातात. दुसरें कारण असें आहे कीं, मोरोपंताच्या कवितेंत स्वरान्त लिहिलेलें अक्षर व्यंजनान्त उच्चारिलेलें प्रायः माझ्या वाचण्यांत एकहि आलेलें नाहीं. जर व्यंजनान्त अक्षरें उच्चारण्याची पद्धति मराठींत शुद्ध व संस्कृत मानिलेली असती, तर मात्रावृत्तें व गणवृत्तें बनविण्यास मराठी कवींना फार सोपें जातें. तिसरें कारण असें आहे कीं, ज्ञानेश्वराच्या वेळीं व त्याच्या पूर्वी प्रायः सर्वस्वीं सर्व वाक्यगत मराठी शब्द स्वरान्त असत व तो स्वर फारच थोड्या स्थलीं अ असे. उपयोग वगैरे वर जे मराठी शब्द दिले आहेत, ते ज्ञानेश्वराच्या वेळीं उपेगु, गाडवड्य, सांगौनु, म्हणती, आपणासी, लांवु, आठवणी, नांदतु, असे लिहीत व उच्चारीत असत. परंतु ह्या अंत्य इकारांचा व उकारांचा लोप होऊन हे शब्द प्रायः अकारान्त झाले व हें रूपान्तर होत असतांना त्यांना फारशीचा संसर्ग झाला. त्यामुळें त्यांचे उच्चारहि फारशीच्या धर्तीवरच होऊं लागले. अलीकडे इंग्रजीच्या संसर्गानेंहि असाच प्रकार होऊं लागला आहे. मी सर्क्स्ला गेलों होतों, प्रस्तुत मद्रास्नें आघाडी मारली आहे, ह्या वाक्यांतलि सर्क्स्ला, मद्रास्नें वगैरे प्रयोग व उच्चार इंग्रजीच्या धर्तीवर आहेत. उच्चाराची हीच तऱ्हा मुसुलमानी अमलांत चालू होती. ती रूढ होऊन उच्चाराप्रमाणें लेखनहि व्यंजनान्तच प्रचारांत येतें कीं काय, हें पुढलि पांचशें वर्षांत कळून येईल.

फारशीच्या संसर्गानें मराठीला आणीक एक खोड लागली. ती ही कीं, फारशींतील शब्दसिद्धीचे प्रत्यय मराठी स्वीकारूं लागली. ये ( उच्चार ई ) प्रत्यय लागून फारशींत भाववाचक किंवा धंदावाचक नाम होतें, जसें, दोस्त, दोस्ती. ह्या धर्तीवर मराठींतील नामें अशीं होतः—वैद्यक, वैद्यकी; एक, एकी; दु, दुही; बेक, बेकी; मांत्रिक, मांत्रिकी; वैदिक, वैदिकी; मधुकर, माधुकी; वगैरे. फारशी प्रत्यय शुद्ध मराठी शब्दांना लावल्याचीं उदाहरणें कांहीं देतों, म्हणजे हा प्रकार जास्त विशद होईल.

| फारशी प्रत्यय. | फारशी उदाहरण | मराठी उदाहरण. |
| --- | --- | --- |
| गी | बंदा, बंद्गी | पोट, पोटगी: देणगी |
| वान् | फील्, फील्वान् | गाडी, गाडीवान् |
| दार् | सर्, सरदार्. | छडी, छडीदार; रूप, रूपदार. |
| बाज् | आतष्, आतष्बाज् | रंडी, रंडीबाज |
| जी | बोस्तान्, बोस्तानजी | घड्याळ, घड्याळजी. |
| दान | कलम्, कलम्दान् | धूप, धूपदान; दीप, दीपदान. |
| खाना | कार, कारखाना | गाडी, गाडीखाना; हत्ती, हत्तीखाना. |
| यक | नीम्, नीम्यक् | नीम्कें, सवाकें, पावकें, दीडकें. |
| बार | एक ,एकबार | एक, एकबार; दोन, दोनबार. |
| वार | उमेद, उमेदवार | माणूस, माणूसवार. |

फारशीवरून मराठींत दोन चार समास करण्याच्याहि नवीन पद्धती आल्या. फारशींत दोन शब्दांच्यामध्यें अलीफ म्हणजे आ येऊन एक समास होतो; जसें बराबर. ह्याच धर्तीवर मराठींत पटापट, सटासट, सरासर, धराधर वगैरे सामासिक शब्द होतात. फारशींत कित्येक शब्दांच्यामध्यें वाव म्हणजे उ किंवा ओ येऊन समास होतो; जसें, दार उ दार, घर उ घर, रान् उ रान=दारोदार, घरोघर, रानोरान वगैरे. फारशी जेव्हां महाराष्ट्रांत सर्वत्र पसरली, त्यावेळी लोकांच्या तोंडांत एकाच अर्थाचे फारशी व मराठी असे दोन शब्द एकदम येऊं लागले. उदाहरणार्थ घरदार, चीजवस्त, कागदपत्र, शेतजमीन, देहेगाव, दानधर्म, भेटमुलाकत, सरदारमानकरी, प्रांतमुलूख, वेळवखत वगैरे. येथें दार, चीज, कागद, जमीन, देह, दान, मुलाकत, सरदार, मुलूख व वखत ह्यांचा अर्थ घर, वस्तु, पत्र, शेत, गांव, धर्म, भेट, मानकरी, प्रांत व वेळ असा अनुक्रमें आहे. एकाच अर्थाचे दोन फारशी शब्द ह्याच वेळीं प्रचारांत आले; जसे, जमीनजुमला, शिपाई-प्यादा, नक्दपैसा, बंदागुलाम, खबरअफवा, वगैरे. फारशी शिकतांना हे शब्द प्रथम कित्ये-कांच्या तोंडीं बसले व नित्य वापरण्यानें ते समाजांत प्रचलित झाले. हे मराठी–फारशी मिश्र शब्द पौनःपौन्य किंवा अतिशय किंवा जोरदारपणा दर्शवायाचा असल्यास मराठींत योजतात. हे चारी प्रकार ज्ञानेश्वरींत नाहींत हें सांगावयाला नकोच.

येथपर्यंत सांगितलेल्या विशेषांपेक्षांहि एक चमत्कारिक विशेष आतां सांगावयाचा आहे. तो विशेष फारशींतून मराठींत रूढ झालेल्या विशेषनामांसंबंधाचा आहे. सामान्या-

र्थवाचक शब्द परभाषेंतून घेण्यानें स्वभाषेंत थोडाथोडका बदल होतो असें नाहीं. परंतु परभाषेंतील विशेषनामें स्वभाषा स्वीकारूं लागली, म्हणजे ती बोलणाऱ्या लोकांच्या भ्रष्टपणाची कमाल झाली म्हणून समजावें. अबा, बाबा, अबू, अमा, मामा, अमी, मामी, नाना, नानी, ननी, काका, काकी, चिच्या, वगैरे मराठींतील टोपण नांवें फारशी आहेत. तसेंच सुलतानराव, जानराव, बाजीराव, रुस्तुमराव, शहाजीराव, शाहू, फिरंगोजीराव, दियानतराव, सर्जेराव, हैबतराव, सर्फोजीराव, गुलबाई, दर्याजीराव, वगैरे विशेषनामेंहि मुसलमानी अमलांत प्रचारांत आलीं. सौदागर, मुश्रीफ, सराफ, चिटणीस, फडणीस, पोतनीस, हेजीबराव, दिवाण, पेशवे, वाकनीस, दफ्तरदार, वगैरे फारशी आडनांवेंहि मराठींत रूढ झालीं. बिन्न ह्या फारशी शब्दानें पितापुत्रांचा संबंध दाखविण्यापर्यंत ज्या देशांतील भटाभिक्षुकांचीहि मजल जाऊन पोंहोचली, त्या देशांतील भाषेच्या भ्रष्टपणाबद्दल जास्त काय लिहावयाचें आहे ?

मराठींत विशेषण प्रायः विशेष्याच्या आधीं येतें; फारशींत आधींहि येतें व मागूनहि येतें. विशेषण विशेष्याच्या पुढें घालण्याची चाल मराठीनें कित्येक स्थलीं फारशीपासून उचलली आहे. इसम मजकूर, पंडित मशारनिले, राव अजम, वडगांव बुद्रुक, नांदगाव खुर्द, बिरादरबुजुर्ग, आंग्रे वजारतमाब, गायकवाड सेनाखासखेल, इंग्रज बहादर, इष्ट्र फाकडा, शिकंदर सानी, सालगुदस्त, वतनदरोबस्त, हुजरात कुली, वगैरे प्रयोगांत विशेष्य आधीं व विशेषण मागून घालण्याची चाल मराठींत अगदीं रूढ होऊन गेली आहे. ती इतकी कीं, ह्या प्रयोगांत विभक्तिप्रत्यय व सामान्यरूपाचें विकरण विशेष्यास न लागतां विशेषणास लागतात; जसें इसम मजकुरास, सालगुदस्तां, इंग्रज बहादरास, वगैरे ज्या दोन शब्दांच्या मध्यें षष्ठीची ई असते, त्या दोन शब्दांस विभक्तिप्रत्यय लावावयाचा असल्यास दुसऱ्या शब्दास तो लावला जातो. जसें, बंदर ई सुरत, बंदर सुरतेस; बंदर ई राजापूर, बंदर राजापुरीं: शहर ई पुणें, शहर पुण्यास; वगैरे.

मुसुलमान पातशहांच्या अमदानींत इ. स. १३१८ पासून इ. स १६५६ पर्यंत फारशी भाषेच्या संसर्गानें मराठी भाषेच्या रूपांत काय काय फेरफार झाले, त्याचा वृत्तांत हा असा आहे. ह्या अवधींत व्यवहारांतील शेकडों फारशी शब्दांनीं मराठींत कायमचें ठाणें दिलें. नामांचे व क्रियापदांचे जोड बनविण्याच्या ज्या फारशी पद्धती आहेत, त्यांच्या धर्तीवर शेकडो प्रयोग मराठींत रूढ झाले. कित्येक फारशी सर्वनामें, क्रियाविशेषणें, उभयान्वयी अव्ययें व उद्गारवाचक शब्द मराठीशीं एकजीव बनून गेले जीं शब्दयोगीं अव्ययें मराठींतील पश्चाद्गामी शब्दयोगी अव्ययाप्रमाणे योजतां येण्यासारखीं होतीं, तीं मराठींत राजरोसपणें प्रविष्ट झालीं. तसेंच, जीं शब्दयोगी अव्ययें पूर्वगामी होतीं, त्यांनाही मराठीनें अद्यापि कांहीं संकुचित प्रदेशांत वावरण्याच्या बोलीवर, राहूं दिलें आहे दोन फारशी विभक्त्या मराठींत येऊं पहात होत्या. पैकीं फारशी षष्ठीच्या ईला प्रायः कायमची गचांडी मिळाली असून, द्वितीयेच्या ला ( रा ) ला मराठीनें उदार आश्रय दिला आहे. शिवाय, व्यंजनान्त शब्द उच्चारण्याची दुष्ट खोडहि मराठीनें फारशीच्या संगतीनें उचलली आहे.

आन् प्रत्यय लावून शब्दांचे अनेकवचन करण्याचाहि बेत मराठीचा होता. परंतु शिवाजी व रामदास यांनीं वेळींच दावल्यामुळें, हें एक आणखी लचांड तिनें लावून घेतलें नाहीं. जर आणखी तीनशें वर्षें म्हणजे इ० स० १९०० पर्यंत मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत रहातें, तर मराठी येथून तेथून सर्व फारशी पेहरावच करती यांत संशय नाहीं. ह्या विधानाची सत्यता कोणाच्या हृदयाला कदाचित् जशी भासावी तशी भासणार नाहीं. म्हणून साडेतीनशें वर्षांच्या अवधींत पृथ्वीवरील इतर कित्येक भाषांची परराज्याखालीं दैना काय झाली त्याची हकीकत देतों.

परराज्याखालीं भाषेची दैना काय होतें हें पहावयाचें असल्यास फार दूर जावयाला नको. इंग्लंडांत इसवीच्या दहाव्या शतकांत साक्सन लोक रहात होते; त्यांच्या भाषेला आंग्लोसाक्सन् असें नांव आहे. ह्या साक्सन लोकांना नार्मन लोकांनीं इ० स० १०६६ त जिंकिलें. नार्मन लोक फ्रेंच भाषा बोलत असत. इंग्लंडांत नार्मन लोकांचें राज्य झाल्यापासून सरकारदरबारांत फ्रेंच भाषा सुरू झाली. कायदे, कानू, वगैरे सर्व लिहिणें फ्रेंच भाषेंत होऊं लागलें व आंग्लोसाक्सन भाषा मागें पडली. इंग्लंडांत ह्या फ्रेंच भाषेचा अंमल तीनशें वर्षें होता. तेवढ्या अवधींत साक्सन भाषा अगदीं बदलून गेली. नार्मन शब्दांच्या दडपणाखालीं साक्सन भाषा केवळ दडपून गेली एवढेंच नव्हे, तर तिचें अंतःस्वरूपहि छिन्नभिन्न झालें. विभक्तिप्रत्यय प्रथम नाहींसे होऊं लागले. नंतर अंत्यस्वरांनीं पोबारा केला. क्रियापदांचीं निरनिराळ्या काळांचीं रूपें नष्ट झालीं. साक्सन भाषेंत अंतःस्वर बदलून अनेकवचनें होत असत, तीं तशीं व्हावयाचीं थांबलीं. विशेषणांवर विभक्तिकार्य होइनासें झालें. is किंवा es प्रत्यय लावून षष्ठीचें एकवचन होत असे, तें नुसतें s लावून होऊं लागलें व त्यांचेंहि बहुतेक सर्व कार्य of किंवा to ह्या शब्दयोगी अव्ययांच्या योगेंच साधण्याची पद्धति पडली. ene प्रत्यय लागून षष्ठीचें अनेकवचन पूर्वीं होत असे, तें ह्या तीनशें वर्षांत अजीबात बंद झालें. लिंगवचनांत, उच्चारांत वगैरे सर्व बाबींत जमीनअस्मानाचे फेरफार झाले. ते इतके कीं, १०६६ च्या पूर्वींची साक्सन भाषा १३६६ त मुळीं राहिलीच नाहीं. तिच्या जागीं निराळीच साक्सन व फ्रेंच ह्या भाषांच्या मिश्रणानें बनलेली अशी इंग्लिश भाषा अस्तित्वांत आली. ह्या इंग्लिश भाषेंत साक्सन भाषेंतील कांहीं शब्द तेवढे राहिले आहेत. बाकी साक्सन भाषेंत व सध्यांच्या इंग्रजींत फारसें साम्य नाहीं. साक्सन शब्दहि इंग्रजींत फ्रेंच किंवा लॅटिन शब्दापेक्षां कमी आहेत वेब्स्टर व राबर्टसन ह्यांच्या कोशांतील शब्द मोजून, रा० टॅम्रेल ह्या गृहस्थानें असें सिद्ध केलें आहे कीं, एकंदर ४३,५६६ शब्दांपैकीं २९,८५३ शब्द फ्रेंच किंवा लाटीन, व १३,२३० शब्द साक्सन, इंग्रजींत आहेत. म्हणजे एक शब्द जर साक्सन असेल तर अडीच शब्द फ्रेंच किंवा लाटीन असतात. येणेंप्रमाणें नार्मन लोकांच्या दडपणाखालीं साक्सन भाषा अगदीं चिरडून गेली. ह्यासंबंधानें *Race and Language* ह्या पुस्तकांत M. Andre' Lefe'vre म्हणतो:—

French was for nearly three hundred years ( i. e. from 1066 A. D to 1366 A. D. ) the official language in England. William

the Conqueror had conquered England not merely to govern the English, but to dispose of its wealth. He distributed land, offices, and honours to his ( Norman ) vassals, so systematically that the whole country was enveloped in a close net-work of which every knot represented a barony, a county, a Norman domain. In each town, each rural district, the proprietor, the judge, the civil or military chief and his vassals constituted a French centre. Towards the end of the twelth century the Saxon had accepted a few French words. In the fifty-eight thousand lines of Layamon's *Brut* there are eighty words of French origin. At the end of the thirteenth century we find a hundred (words) in the first five hundred lines of Robert of Gloucester. Nor is this all; the grammatical structure is modified. The case endings are beginning to disappear; the final vowels changed into *e* mute, are no longer pronounced. The conjugation loses a few more of its shades. The plural terminations of persons are dropped. The noun loses the plurals formed by the weakening of the vowel, as *foot*, *feet*, its genetive plural in *ene*. The genetive singular in *is*, *es*, soon reduced to *s*, alternates with the prepositions *of* and *to*. The adjective is still declined and often forms its plural in *e*, but the insignificance of thes termination cause it to be soon lost &c. &c, In counting all the words in the dictionaries of Webster and Robertson, M. Thommerel has shown that out of 43,566 words, 29,853 come from the classical languages, 13,230 from the Teutonic.

नार्मन-फ्रेंच भाषेच्या दडपणाखालीं साक्सन भाषेची तनिशें वर्षांत काय दशा झाली, त्याची ही अशी कथा आहे. फ्रेंच भाषेच्या दडपणाखालीं बास्क भाषा, किंवा रूसच्या दडपणाखालीं पोलीश भाषा, किंवा संस्कृत भाषेच्या दडपणाखालीं भिल्ल, खोंड, वगैरेंच्या भाषा, किंवा लॅटिनच्या दडपणाखालीं एट्रुस्कन भाषा, ह्यांचाहि इतिहास वरच्याप्रमाणेंच आहे. म्हणजे जिंकणाऱ्या लोकांच्या भाषेपुढें जिंकलेल्या लोकांची भाषा नष्टप्राय होते, असा जगांत इतरत्र कोठें कोठें अनुभव आहे. हा अनुभव मराठीला १३१८ पासून १६५६ पर्यंत येत होता. नुसते शब्द व प्रयोग जोंपर्यंत येत होते, तोंपर्यंत मराठीच्या अंतःस्वरूपाला फारसें भय नव्हतें. परंतु उभयान्वयी व शब्दप्रयोगी अव्ययें घेण्याचा आणि विभक्तिप्रत्यय व उच्चार फारशीच्या धर्तीवर बदलण्याचा जेव्हां मराठींत क्रम सुरू झाला, तेव्हांच तिचें अंतःस्वरूप बदलण्यास प्रारंभ झाला. हा बदल सतराव्या शतकांत मराठ्यांनीं स्वातंत्र्यार्थ जे प्रयत्न केले त्यामुळें जास्त व्हावयाचा थांबला. नाहींपेक्षां, जर मराठ्यांची राज्यक्रांति न होती, तर थोड्याच दिवसांत मराठी उर्दू झाली

असती. महाराष्ट्रांत जशी सतराव्या शतकांत क्रांति झाली, तशी उत्तर हिंदुस्थानांत मुसुलमानी रियासतीच्या अव्वलीपासून अखेरीपर्यंत म्हणजे १२ व्या शतकापासून १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत केव्हांहि न झाल्यामुळें, हिंदी भाषेची उर्दू बनली. व्यवहाराकरतां उर्दू भाषा मुद्दाम बनविली, असा कित्येकांचा समज आहे. परंतु तो खोटा आहे. मुद्दाम भाषा बनविणें व ती बनवून प्रचारांत आणणें, ह्या गोष्टी मानवी इतिहासांत अशक्य आहेत. कोणतीहि भाषा आपोआप बनत जाते व ती बनण्याचीं कारणें तद्बाह्य असतात. आतां येथें कोणी असा प्रश्न करील कीं, हिंदीची जर उर्दू बनली, तर अद्याप हिंदी भाषा चालू कशी राहिली ? तर त्याला उत्तर आहे. उर्दू भाषा बनत बनत जों जोमांत येते व हिंदी मागसत जाते तों मराठ्यांच्या राज्यक्रांतीनें मुसुलमानांच्या सत्तेला, संस्कृतीला व भाषेला जबरदस्त खो बसला व यच्चयावत् सर्व हिंदुस्थानांतील भाषा बंधमुक्त झाल्या सिंधी, पंजाबी, हिंदी, मारवाडी, बंगाली, भोजपुरी, रांगडी, गुजराथी, मैथिली, ओढिया, वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील भाषा मुसुलमानांचें राज्य जर आजपर्यंत रहातें, तर निःसंशय मरणाच्या पंथास लागत्या. सारांश, मराठ्यांनीं जुलमी फारशी व उर्दू ह्यांना उखडून पाडल्यामुळें, हिंदुस्थानांतील देशी भाषांना जीवदान मिळालें.

मुसुलमानांच्या अमदानींत मराठी भाषेवरती केवढें घोर संकट आलें होतें त्याची यथार्थ कल्पना उतरण्यास एक अलीकडील प्रत्यंतर देतों. इंग्रजींचा मराठीला संसर्ग होऊन आज बरोबर पंचायशीं वर्षे झालीं. ह्या अवधींत मराठीनें इंग्रजी शब्द व प्रयोग त्रेस्त घेतले. ह्या प्रतिग्रहानें मराठीचें अंतःस्वरूप अद्यापि बदललें नाहीं व तिच्या स्वभावांतहि बिलकुल फेर पडला नाहीं परंतु समजा कीं, and व that हीं उभयान्वयी अव्ययें, किंवा of, to, for, वगैरे पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें. मराठींत योजिलीं जाऊं लागलीं, आणि इंग्रजी धर्तीवर मिशनरी लोकांप्रमाणें वेडेबागडे उच्चार व स्वर मराठी बोलण्यांत आपण आणूं लागलों. असा प्रकार अद्यापि झाला नाहीं व पुढेंहि होईल असें चिन्ह दिसत नाहीं. परंतु, समजा कीं, दुर्दैवानें असा प्रकार झाला. तर मराठी भाषेची जी स्थिति होईल असें आपणास वाटतें, तीच मुसुलमानी अंमलांत साक्षात् होण्याची वेळ आली होती. of, to, for, by, हीं पूर्वगामी अव्ययें मराठी शब्दांच्या पाठीमागें योजावयाचीं म्हणजे विभक्तिप्रत्ययांना फांटा दिला पाहिजे. विभक्तिप्रत्ययांना फांटा दिला म्हणजे शब्दांचें सामान्यरूप करण्याची जरूर राहिली नाहीं सामान्यरूप लुप्त झालें व विभक्तिप्रत्यय गमावले म्हणजे वाक्यरचना व क्रियापदप्रयोगहि बदलले पाहिजेत. असे एक ना दोन,शेंकडो बदल भाषेंत होऊन,मूळ भाषा कोणत्या थरावर जाईल, ह्याचा पत्ताच राहणार नाहीं. जी दशा नार्मन—फ्रेंच भाषेच्या दपटशाखालीं साक्सन भाषेची झाली, म्हणजे विभक्ति, वचन, लिंग, वगैरेंच्या प्रत्ययांचा लोप होऊन, सध्यांची इंग्रजी जशी तुटक भाषा झाली, तशी मराठी होईल. सारांश असा प्रकार झाला असतां मराठीचा मराठीपणा जाईल व इंग्रजांच्या साक्सन भाषेची अधोगति तसि प्राप्त होईल. ही अधोगति चवदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत मराठीला येत होती: व ती अनेक कारणांनीं टळली. ह्या कारणांचा निर्देश खालीं करतो

( १ ) वर अनेक स्थलीं उल्लेख केल्याप्रमाणें फारशीच्या संसर्गानें होणारी मराठीची अधोगति सतराव्या शतकांत झालेल्या व सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊं घातलेल्या राज्यक्रांतीनें टळली. मराठी भाषेवर येऊं घातलेल्या संकटांचीं जीं अनेक निवारक कारणें आहेत, त्यांपैकीं हें कारण मोठें महत्त्वाचें असून शेवटचें होतें.

( २ ) फारशीची व्याप्ति मराठीवर होऊं लागली असतां, मराठीनेंहि आपली छाप फारशी शब्दांवर ठेवून दिली. वर इसवी सन १५४१ व १५५८ तील दोन लेख दिले आहेत. त्यांत बीतपसील, नीमु, ऐनु, कारकुनु, अशीं मराठी रूपें बितप्सील्, नीम्, ऐन्, कारकून् ह्या फारशी शब्दांना दिलेली आहेत. फारशी व्यंजनान्त शब्दांना उ हा प्रत्यय महाराष्ट्रांतील लोक लावीत. उ हा प्रत्यय मराठींतून जसजसा जात चालला, तसतसा अ हा प्रत्यय फारशींतील व्यंजनान्त शब्दांना मराठींत लागूं लागला. उदाहरणार्थ, कारकून् हा फारशी व्यंजनांत शब्द, उ प्रत्ययाचा लोप झाल्यानंतर, कारकून असा लिहिण्याचा प्रघात पडला. कारकून हा शब्द अकारान्त आहे. हें त्याला विभक्तिकार्य होत असतांना स्पष्ट होतें. जर कारकून हा शब्द मराठींत व्यंजनांत असता, तर त्याचें चतुर्थीचें रूप कारकुनाला असें न होतां कारकून्ला [ रा ] असें झालें असतें. इंग्रजींतील जे व्यंजनांत शब्द मराठींत रूढ झाले आहेत, त्यांनाहि मराठींत घेण्यापर्वी हा अ प्रत्ययाचा शिक्का मिळत असतो; जसें, बुक, बुकाला [ बुक्‌ला नव्हे ].

( ३ ) वर सांगितल्याप्रमाणें फारशी शब्द मराठींत घेतल्यावर, त्याला दुसराहि एक संस्कार घडत असे. स्त्री–पुरुषवाचक शब्दांखेरीज फारशींत इंग्रेजी किंवा कानडी ह्या भाषांप्रमाणें इतर शब्द नपुंसकलिंगी असतात. मराठीचा प्रकार जर्मन किंवा संस्कृत ह्या भाषांप्रमाणें फारशीहून निराळा आहे. प्रत्येक शब्दाची प्रथम जात ठरवून, व त्याला स्त्रीलिंगी, पुल्लिंगी, किंवा नपुंसकलिंगी बनवून, नंतर त्याच्याशीं विभक्तीचा व्यवहार करावयाचा, असा मराठीचा कायदा आहे. फारशींतलि नपुंसकलिंगी हजामत्, सफर, नजर हे शब्द मराठींत स्त्रीलिंगी ठरवले गेले. तसेंच बाग, पायपोस, खुर्दा, वगैरे नपुंसकलिंगी फारशी शब्द मराठींत पुल्लिंगी बनविले गेले. हा दुसरा शिक्का मिळविल्यावर कोणताहि फारशी शब्द बहुतेक संव्यवहार्य झाला, अशी व्यवस्था होती.

( ४ ) परंतु हे दोन शिक्के घेतल्यावर सगळेच शब्द संव्यवहार्य होत असें नसे. ज्या फारशी शब्दांत ह्यु, खय्, अयन्, घयन् व काफ ह्या अक्षरांचे कंठ्य उच्चार येत त्यांना देवनागरी ह, ख, अ, व घ उच्चारांची दीक्षा देऊन मग मराठींत घेत. हलवाई, खरीफ, काफला, घारत, कत्तल, अयनेमहाल, ह्या फारशींतून मराठींत आलेल्या शब्दांत ह्य्, खय्, अयन्, घयन्, व काफ् ह्या अक्षरांचे उच्चार मूळ फारशी शब्दांतल्याप्रमाणें नाहींत. हीं अक्षरें फारशींत घशांतून उच्चारतात. मराठींत वर लिहिल्याप्रमाणें उच्चारीत. मीवह्, खरबूजह् ह्या शब्दांचा मराठींत मेवा, खरबूज असा आकारांत व अकारांत उच्चार करीत; क्वचित् खरबुजि असाहि उच्चार होत असे.

( ५ ) फारशींतील कित्येक भारदस्त शब्दांचा मान न राखतां वाटेल तसा उच्चार करून ते मराठींत घेत. पाच्छा, पैजार, माया [ पैसा ], अबळा, पैरण, खर्चवेच, तक्क्या, बबर्ची हे मराठी शब्द फारशी शब्दांच्या उच्चारांच्या हालअपेष्टा करून घेतले आहेत.

मराठीनें हे जे आपले संस्कार फारशी शब्दांवर चालविले त्यांच्यामुळें ह्या फारशी शब्दांचा नूर उतरून गेला व ते इतर मराठी शब्दांप्रमाणें वापरले जाऊं लागले. जिंकणाऱ्या लोकांची फारशी भाषा असतांहि मराठीचें माहात्म्य रहाण्याला मराठीचे व मराठ्यांचे कांहीं गुण कारण झाले. ते गुण येणेंप्रमाणें:—

( ६ ) मुसुलमानी अंमल सुरू झाला तेव्हां प्रथम कांहीं वर्षें सरकारी दफ्तर फारशींत लिहीत असत. परंतु गांवें, पुरुष, स्त्रिया, शेतें, वगैरेंचीं विशेषनामें फारशींत लिहिल्यानें त्यापासून फार घोटाळा होऊं लागला. फारशी अक्षरमालिका इंग्रजी अक्षरमालिकेप्रमाणेंच अत्यंत अपूर्ण आहे. तींत कांहीं उच्चारांना फाजील अक्षरें आहेत व बऱ्याच उच्चारांना अक्षरेंच नाहींत. शिवाय, फारशींत हा एक मोठा दोष आहे कीं, तिच्या अक्षरमालिकेंत अ, इ, उ, ऋ, ऐ, वगैरे स्वरांना अक्षरें नाहींत. त्यामुळें फारशी शिकस्ता नांवाच्या मोडी म्हणजे जलद लिहिण्यांत कोणत्या अक्षराला कोणता स्वर लावावयाचा, हें ठरवितां येत नाहीं. हा दोष परभाषेंतील विशेषनामें फारशींत लिहितांना तर फारच भासमान होतो. उदाहरणार्थ, सफर अशीं तीन अक्षरें जर फारशींत काढलीं व त्याचा एक शब्द बनविला, तर त्याचे सफर, सिफर, साफिर, सुफर, सफुर, सिफिर, सुफिर, सिफुर, सुफुर, असे अनेक उच्चार होतील. ही अडचण मराठी विशेषनामें लिहिण्यांत फार येऊं लागल्यामुळें, दरबारी जाहीरनामे, पुराशिसा, चकनामे, निवाडे, दानपत्रें, वगैरे लिहिण्यांत वर फारशी व खालीं मराठी भाषेचा उपयोग होऊं लागला. मराठीची लिपि देवनागरी असल्याकारणानें, तिचें श्रेष्ठत्व फारशीहून जास्त भासूं लागलें; व दरबारी लिहिण्यांतहि मराठीचा प्रवेश झाला. दरबारी लिहिण्यांत मराठीचा प्रवेश झाल्यामुळें, तींत पुष्कळ फारशी शब्द शिरले हें खरें आहे. परंतु दरबारांत शिरल्यापासून तिला एक फायदा झाला. तो हा कीं, ती एकीकडे कुजत पडावयाची राहून, तिच्यांत केव्हां तरी उर्जित होण्याची शक्यता राहिली. शिवाय, दरबारांत शिरल्यापासून मराठीला दुसरा एक फायदा झाला. मराठ्यांनीं सतराव्या शतकांत स्वराज्य स्थापिलें व सर्वत्र मराठींत लिहिणें सुरू केलें. त्यावेळीं दरबारांतील सर्व लिहिणें मराठींत लिहितां येण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. कारण, सर्व दरबारी शब्द व पद्धती सतराव्या शतकाच्या सुमाराला मराठींत रूढ झाल्या होत्या. दरबारी लिहिण्याचे शब्द मराठींत नाहींत, अशी अडचण शिवाजीच्या वेळेस पडली नाहीं. तर फारशीच्या संसर्गानें मराठींत जे फारशी शब्द दुहेरी झाले होते. ते काढून कसे टाकावे, ही अडचण त्यावेळीं पडली. ही अडचण दूर करण्याकरितां राजव्यवहारकोश तयार करावा लागला.

( ७ ) दरबारांत मराठी भाषा प्रचलित रहाण्याला दुसरें कारण देशस्थ ब्राह्मणांची फर्डी कारकुनी होय. प्रथम जेव्हां महाराष्ट्रांत मुसुलमानी झाली, तेव्हां जाधवांच्या राजवटींतील सर्व पद्धती मुसुलमान अधिकाऱ्यांना ब्राह्मण कारकुनांपासून शिकाव्या लागल्या. मजजवळ जमाखर्च लिहिण्याच्या व वसूलबाबींच्या यादीच्या कांहीं जुन्या हेमाडपंती पद्धती आहेत. त्या जुन्या मोडींत लिहिलेल्या आहेत. हें हेमाडपंताचें दफ्तर ब्राह्मण कारकुनांकडून मुसुलमान अधिकाऱ्यांना समजून घ्यावें लागे. पुढें पुढें तर अशी स्थिति झाली कीं, ही जुनी पद्धत समजून घेण्याची व हिशेब ठेवण्याची यातायात मुसुलमान अधिकाऱ्यांनीं ब्राह्मण कारकुनांकडेसच सोंपविली अहमदनगर व विजापूर येथील मुख्य दफ्तरदार ब्राह्मण होते. येणेंप्रमाणें फारशीच्या बरोबर मराठी भाषा दरबारांत अंशतः प्रचलित करण्यास ब्राह्मणांची फर्डी कारकुनी कारण झाली. ही महाराष्ट्रांतील कारकुन मंडळीला मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

( ८ ) फारशीनें मराठीला नेस्तनाबूत केलें नाहीं, ह्याला तिसरें एक कारण झालें. महाराष्ट्रांतील कोट्यवधि लोकसंख्येंत राज्यकर्त्या मुसुलमानांचें प्रमाण शेंकडा एकहि नव्हतें. बाट्यांची संख्या वाढल्यावर हें प्रमाण किंचित् वाढलें. परंतु त्याबरोबर बाट्यांच्या बोलण्यांतील मराठी शब्दांच्या वैपुल्याचाहि परिणाम अस्सल मुसुलमानांवर झाला. ह्या परिणामाची मर्यादा पुढें पुढें तर इतकी वाढली कीं, दक्षिणेंतील मुसुलमान पादशहा व त्यांचें अधिकारीमंडळ फारशी बोलावयाचें सोडून दक्षिणी उर्दू बोलूं लागलें. दक्षिणी उर्दू म्हणजे जींत मराठी शब्द पुष्कळ आहेत अशी उर्दू भाषा.

( ९ ) फारशीच्या जबरदस्तीनें मराठी भाषा छिन्नभिन्न न होण्याला चवथें कारण म्हटलें म्हणजे चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत झालेले मराठी ग्रंथकार होत. दरबारांत व व्यवहारांत जी मराठी भाषा चाले, तींत यद्यपि फारशी शब्द व प्रयोग बेसुमार शिरले. तत्रापि मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांत जेवढे म्हणून कमी फारशी शब्द प्रयोग येतील, तितके आले आहेत. जो शब्द किंवा प्रयोग सामान्यजनसमूहाच्या वापरण्यानें अत्यंत रूढ होऊन गेला, तोच तेवढा ह्या ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत येऊं दिला. आणि तोहि नियमानें येतच असे, असा प्रकार नाहीं. **ला** हा फारशी प्रत्यय नामदेवाच्या ग्रंथांत कित्येक ठिकाणीं आलेला आहे; परंतु एकनाथाच्या ग्रंथांत ह्याचा प्रयोग क्वचित्त्व होतो. मागें एकनाथाची अर्जदास्त दिली आहे. तींत अत्यंत रूढ झालेले फारशी शब्द व प्रयोग आले आहेत, हें वाचकांच्या लक्षांत येईल. शिवाय, नरदेहाच्या शक्त्यांवर रूपक करण्याच्या ओघांत, एकनाथानें तत्कालीन लहानमोठ्या मुसुलमान अधिकाऱ्यांचें स्वभाववर्णन केलेलें आहे व हें स्वभाववर्णन करतांना त्याला त्या त्या अधिकाऱ्याचें फारशी नांव आणणें जरूर पडलें. एकनाथाच्या भागवतांत किंवा रामायणांत त्याच्या अर्जदास्तींतल्या प्रमाणें फारशी शब्द नाहींत. दासोपंत, मुक्ताबाई, मुंतोजीबोवा, उद्धवचिद्घन वगैरे तत्कालीन ग्रंथकारांच्याहि ग्रंथांत फारशी प्रयोग व शब्द अत्यंत कमी आहेत. ह्या सर्व ग्रंथकारांची भाषा जुनी मराठी आहे. आतां कालान्तरानें प्रत्येक भाषेंत सहजपणानें

दर शंभर वर्षांत जो फेरफार होत जातो तो ह्या तीनशें वर्षांतील निरनिराळ्या काळीं झालेल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत झाला आहे. परंतु फारशीपासून जितकें अलिप्त रहावेल तितके हे ग्रंथकार राहिले आहेत. ह्याचा परिणाम असा झाला कीं मराठी भाषेंत आतल्याआंत दोन भाषा झाल्या, एक साधुग्रंथकारांची बिनफारशी भाषा व दुसरी व्यवहारांतील फारशीशब्दमिश्रित भाषा. उदाहरणार्थ, शिवाजीच्या वेळच्या किंवा पूर्वीच्या दरबारी पत्रांतील भाषा घ्या व ती तुकारामाच्या किंवा वामनाच्या किंवा रामदासाच्या भाषेशीं तोलून पहा, म्हणजे ही ग्रंथकारांची मराठी भाषा एक निराळीच होती हें लक्ष्यांत येईल. तत्कालीन मराठी ग्रंथकारांची भाषा दरबारी मराठी भाषेहून भिन्न होण्याचें कारण असें होतें कीं, ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचे विषय, दरबारांतील किंवा व्यवहारांतील विषयाहून निराळे होते. ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचे विषय प्रायः धर्म, वेदान्त व पुराणेतिहास, ह्यांपैकीं कोणता तरी एक किंवा सर्व असत. ह्या विषयांत फारशी शब्दांचा व प्रयोगांचा उपयोग करण्याची जरूर नसे. त्यांचें जगच निराळें असे. त्यामुळें ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत मराठीचें मूळ, अस्सल व शुद्ध असें रूप कायम राहिलें. हे ग्रंथकार मुळीं झालेच नसते तर फारशी शब्दांचें व प्रयोगांचें जींत संख्याधिक्य आहे अशी मराठी राहिली असती. अशा मराठीस मराठी ही संज्ञा राहती किंवा नाहीं हाच प्रश्न आहे. साक्सनची फ्रेंचमुळें जशी इंग्रजी बनली किंवा हिंदीची फारशीमुळें जशी उर्दू बनली तशी मराठीची एखादी निराळीच भाषा बनती. आणि निराळी भाषा बनल्यावर मराठ्यांचें राष्ट्र असे शब्द वापरतां आले नसते. इतकेंच नव्हे, तर हे ग्रंथकार न होते, तर सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत झालेली स्पृहणीय राज्यक्रांति झालीच नसती.

मराठी भाषा फारशीच्या कचाटींतून शाबूत राहण्याला हे ग्रंथकार व त्यांच्या ग्रंथांतील विषय कारण झाले म्हणून वर प्रतिपादन केलें आहे. हा प्रकार कसा झाला त्याचा पुढें खुलासा करतों. कोणत्याहि देशावर परराज्य आलें म्हणजे त्या देशांतील लोकांचें चरित्र नानाप्रकारें संकुचित होतें. हा संकोच लौकिक म्हणून जे सर्व व्यवहार आहेत त्यांत भासूं लागतो. सार्वजनिक बोलणें, सार्वजनिक लिहिणें, सार्वजनिक कृत्यें करणें ह्या सर्व बाबतींत राज्यकर्त्यांच्या भाषेचा व कृत्यांचा संचार होतो. तो इतका उत्कट होतो कीं देशी भाषेंत बोलणें व देशी तऱ्हेनें चालणें गौण, लाजिरवाणें व तिरस्करणीय आहे असें देशांतीलच लोकांपैकीं कांहींस वाटूं लागतें; व ते स्वदेशांतील चांगल्याहि संस्थांना वाईट समजूं लागतात. स्वदेशांतील पोषाकाची तऱ्हा, स्वदेशांतील घरें बांधण्याची तऱ्हा, स्वदेशांतील भाषेची तऱ्हा, स्वदेशांतील धर्माची तऱ्हा, स्वदेशांतील काव्यांची तऱ्हा, वगैरे सर्व गोष्टी त्यांना त्याज्य वाटतात व परकीय राज्यकर्त्यांच्या वाईट व चांगल्या अशा सर्वच तऱ्हा संग्राह्य भासूं लागतात. उघडच आहे, राज्यकर्त्यांनीं राज्य मिळविलेलें असतें, तेव्हां त्यांच्यांत चांगले गुण असल्यावांचून तें त्यांना मिळवितां आलें नसावें असा सिद्धांत लोक सहज करतात. तसेंच, देशांतील लोकांनीं राज्य घालविलेलें असतें, तेव्हां त्यांच्यांत वाईट गुण असल्यावांचून तें त्यांनीं गमाविलें नसलें पाहिजे, असाहि

दुसरा सिद्धान्त सहज उत्पन्न होतो. व ह्या दोन सिद्धान्तांची सांगड घालून देशांत कित्येक कुधारक निपजत असतात. ह्या कुधारकांचा समज असा असतो कीं राज्यकर्त्यांची भाषा, धर्म, पोषाक, व इतर संस्था स्वीकारल्या असतां, आपण राज्यकर्ते, निदान राज्यकर्त्यांप्रमाणें तरी, होऊं. ह्या खोट्या समजावर वाहवत जाऊन, हे लोक देश, धर्म व भाषा ह्या तिहींची अवनति करण्यास कारण होतात. असले कुधारक ह्या देशांत इ० स० १३१८ पासून १६५६ पर्यंत बहुत निर्माण झाले. फारशी भाषा लिहिण्यांत व बोलण्यांत मुसलमान लोकांनाहि ते मागें टाकूं लागले. मुसलमानी धर्मांत मूर्तिपूजा नाहीं, चातुर्वर्ण्य नाहीं, अनेक दैवतें नाहींत, तेव्हां तीं आपल्या देशांतील धर्मांतहि नसावीं असें या लोकांस वाटूं लागलें व त्याप्रमाणें ते उपदेशहि करूं लागले. चातुर्वर्ण्य नाहींसें झालें पाहिजे, मूर्तिपूजा मोडली पाहिजे व सर्वत्र एकेश्वरी मत प्रचलित झालें पाहिजे, म्हणजे आपला हा देश वर येईल, असा टाहो त्यांनीं फारशी भाषेंत चालविला. आपला हा देश वर यावा, हा बोलण्याचा पेंच मात्र त्यांनीं कधीं सोडिला नाहीं; बाकी सर्व कृति त्यांनीं अशी ठेविली कीं, त्यानें भाषा, धर्म व आचार समूळ नष्ट व्हावे. स्वभाषेच्या, स्वधर्माच्या, व स्वाचाराच्या निंदेनें भरलेलीं भाषणें फारशींतून करण्यानें त्यांना एक वैयक्तिक फायदा असे. तो हा कीं मुसुलमान राज्यकर्त्यांना हे लोक आपल्या मताचे आहेत व कधीं काळीं आपल्या धर्माचेहि होतील, निदान आपल्या राज्याच्या चिरस्थायित्वाचे स्तंभ होतील, असा भ्रम पडे. आणि ह्या भ्रमावर ते त्यांना दरबारीं लहानमोठ्या नोकऱ्या देत. दरबारांत मानमान्यता झाल्यामुळें, देशांतील लोकांनाहि त्यांचा वचक वाटे. असले कांहीं चमत्कारिक कुधारक त्या काळीं फार पिकले होते. दादो नर्सो काळे, दियानतराव, गांगो बाहमणी, वगैरे नांवें ह्या तीनशें वर्षांत जीं मुसुलमानी कागदपत्रांतून व तवारिखांतून अधूनमधून चमकतात तीं ह्या कुधारकांचींच होत. फारशी पेहराव, फारशी शब्द, फारशी पीर, फारशी कल्पना, ह्यांचा जो प्रादुर्भाव महाराष्ट्रांत त्यावेळीं झाला, त्याला ह्या कुधारकांची मदत बरीच झाली. परंतु, कुधारकांच्या ह्या मेहनतीनें देश वर यावयाचा तो दिवसेंदिवस खालींच जाऊं लागला. पडता काळ आला असतां राष्ट्रत्वाचीं प्रधान अंगें जीं स्वभाषा, स्वधर्म व स्वाचार त्यांचें संगोपन व वर्धन करणें हेंच परराज्याखालीं राष्ट्रत्वाचीं बीजें कायम रुचत ठेवण्याचें मुख्य इंगित आहे. स्वभाषा, स्वधर्म व स्वाचार ह्यांच्या पवित्र नांवाखालीं लोकांत जो सुखैकप्रियतेचा, आलस्याचा, विभक्ततेचा व देशकार्यपराङ्मुखतेचा संचार झालेला असतो व ज्याच्यामुळें देश प्रथम हातचा गेलेला असतो त्या संचाराला तोडगा करणें सर्वथा योग्य व इष्ट आहे. परंतु, संचाराला तोडगा न करतां मूळ धर्माला व आचाराला दुखापत करणें केव्हांहि गुणकारक नसतें. त्यावेळच्या कुधारकांचा व राज्यकर्त्यांचा, मूळ धर्माला, मूळ भाषेला व मूळ आचाराला नष्ट करण्याचा विचार होता. तो महाराष्ट्रांतील सुधारकांनीं, साधूंनीं व ग्रंथकारांनीं हाणून पाडिला. मूर्ति म्हणजे ईश्वराच्या प्रतिमा आहेत, चातुर्वर्ण्यांतील सर्व लोक देव आणि धर्म ह्यांच्यापुढें सारखे आहेत, एकत्र ब्रह्म सर्वत्र पसरलें आहे, ह्या तीन सिद्धांतांचें निरूपण ह्या सुधारक साधूंनीं

च ग्रंथकारांनीं योग्य तऱ्हेनें केलें. हे तिन्ही सिद्धान्त आपल्या हिंदुधर्माचे मुख्य स्तंभ आहेत, हें त्यांनीं नानाप्रकारांनीं लोकांच्या मनावर बिंबविले. जात मोडून सबगोलंकार करावा, मूर्ति फोडून झुगारून द्याव्या, देवळें जमीनदोस्त करावीं, वगैरे वात्रट विचार त्यांच्या लेखांत कोठेंहि नाहींत. जात मोडून टाकावी, दगडाचे देव फेकून द्यावे, महाराशीं ब्राह्मणांनीं अन्नव्यवहार करावा, वगैरे अपसिद्धान्तांचे आरोप ह्या साधूंवर कैलासवासी म० गो० रानडे यांनीं आपल्या इतिहासांत केले आहेत. परंतु ह्या वेळची सामाजिक, धार्मिक वगैरे स्थिति रानड्यांस जशी कळावी तशी प्रायः कळली नव्हती. ह्या साधूंचे ग्रंथ मीं लक्ष्यपूर्वक वाचले आहेत. हिंदुधर्माला सोडण्याचा त्यांचा विचार होता, असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसत नाहीं. दगड म्हणून दगडाला भजणें, किंवा महार म्हणून माणसाला छळणें, किंवा ब्राह्मण म्हणून इतर वर्णांचा धिःकार करणें मनुष्यमात्राला सर्वथा लाजिरवाणें आहे, असें या ग्रंथकारांनीं इतर संस्कृत ग्रंथकारांप्रमाणेंच म्हटलें आहे. परंतु रानडे म्हणतात तसली सुधारणा त्यांच्या ग्रंथांत कोठें दिसत नाहीं. ह्या साधूंना देव, धर्म, देवळें, जाती, व स्वभाषा, हीं बिलकुल सोडावयाचीं नव्हतीं. व प्रस्तुतच्या कित्येक विद्वान् देशाभिमान्यांप्रमाणें परभाषेंत ग्रंथ व भाषणें करून स्वदेश वर नेण्याचें ढोंगहि करावयाचें नव्हतें. रानड्यांच्या ग्रंथांतील हें संतांवरील विवेचन अगदीं निराधार व शोधकपणास अयोग्य असें झालेलें आहे; महाराष्ट्रधर्माचा खरा अर्थहि त्यांच्या ध्यानांत आला नाहीं; व संतांच्या स्वप्नींहि नव्हते ते विचार त्यांच्यावर लादले गेले आहेत. संतांचे मूळ ग्रंथ विचारी लोक जसजसे सखोल बुद्धीनें वाचतील तसतसें माझ्यासारखेंच त्यांचेंहि मत होईल अशी माझी खात्री आहे.

ह्या साधु व ग्रंथकार सुधारकांनीं तत्कालीन राज्यकर्त्यांचे व कुधारकांचे विचार हाणून पाडण्यास खालील मार्ग स्वीकारले. मुसुलमानांच्या करड्या अमलाखालीं राजकीय लेख लिहिण्याची किंवा राजकीय कृत्यें करण्याची सोयच नव्हती. पूर्वींचे जे जाधव राजे त्यांचे इतिहास व बखरीहि लिहून काम भागण्यासारखें नव्हतें. जाधवांचें राज्य मुसुलमानांच्या हातीं गेलें तें राष्ट्रांत सुखैकपरायणता, आलस्य, मत्सर, हलगर्जीपणा, बेसावधपणा, वगैरे दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला असल्याविना गेलें नाहीं हें उघड आहे. जाधवांच्या राजवटीच्या शेवटल्या पांचपन्नास वर्षांचा इतिहास यथातथ्य लिहावयाचा म्हणजे हे सर्व दोष उघड करून दाखविले पाहिजेत. आणि हे दोष उघड करून दाखविले म्हणजे त्या उघडकीनें शहाणपणा शिकावयाचा सोडून देशांत कित्येक प्राणी असे असतात कीं अन्योन्य द्वेष करण्यासच त्या उघडकीचा त्यांना उपयोग होतो. स्वदेशाच्या इतिहासाचें सूक्ष्मपणें मनन करून व त्यांत दाखविलेल्या गुणदोषांतून गुणांचे ग्रहण व दोषांचा त्याग करून, स्वदेशाच्या कल्याणाचा मार्ग न स्वीकारितां, दोषांकडेच तेवढी दृष्टि देऊन, आपले पूर्वज मूर्ख होते व ते एकमेकांचा मत्सर करीत होते, तेव्हां आपणहि हाच मत्सर असाच पुढें चालविला पाहिजे, अशी कुढी व देशबुडवी भावना कित्येक कलिपुरुषांच्या मनांत प्रादुर्भूत होते. तेव्हां जाधवांच्या बखरी किंवा चरित्रें लिहिण्याच्याहि भरीस ते प्रायः पडले

नाहींत. राज्यकर्त्यांत व आपणांत जातिसंबंधानें व आचारासंबंधानें ज्या बाबींत विशेष भेद मूळापासूनच होता त्या धर्माची कास ह्या साधुग्रंथकारांनीं धरली. आचारानें व धर्मानें राज्यकर्त्यांसारखे होऊन व त्यांच्याशीं तादात्म्य पावून राष्ट्रत्व नष्ट होतें हें ते पक्केपणीं जाणत होते. तेव्हां धर्माच्या बाबतींत जित व जेते ह्यांत मूळचा जमीनअस्मानाचा भेद होताच, तो त्यांनीं आपल्या ग्रंथांत आणून स्वराष्ट्रत्व कायम ठेविलें. इ० स० १३१८ पासून १६५६ पर्यंतच्या ग्रंथकारांनीं धर्मसंबंधीं ग्रंथरचना मराठींत कां केली त्याचें हें रहस्य आहे. तसेंच बखरी व इतिहास न लिहितां त्यांनीं भारत, भागवत व रामायण ह्यांचेच अनेक अनुवाद केले. त्याचें कारण असें आहे कीं, त्यापासून राष्ट्रांतील कुधारकांना परस्पर उखाळ्यापाखाळ्या काढण्यास तर संधि मिळत नाहीं आणि इतिहासाच्या अध्ययनापासून जो नैतिक फायदा व्हावयाचा तो तर बराच होतो. महाराष्ट्रांत १६५६ च्या पुढें बखरी निर्माण कां झाल्या व त्याच्या आधीं भारत व रामायण ह्यांतील कथाच मराठींत प्रचलित कां होत्या, त्याचें कारण हें आहे. भारत, रामायण व धर्म ह्यांवर झालेले मराठी ग्रंथ महाराष्ट्रांत गांवोगांव वाचीत आणि त्यांतील भाषा व्यवहारांतील फारशीमिश्रित मराठी भाषेला आवरून धरी. सारांश, साधुसंतांचे ग्रंथ म्हणजे त्यावेळच्या फारशीमिश्रित घेडगुजरी मराठी वडबडीवर केवळ रामबाण औषध होतें.

(१०) फारशीच्या संसर्गानें बिघडण्यापासून मराठी भाषेला हिंदुधर्मानेंहि राखिलें. जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, येथील गोंधळी, बाळसंतोष, भाट, चित्रकथी, व भुत्ये, तसेच गांवोगांवचे पुराणिक, हरदास, व ललितकार, ह्यांची भाषा शुद्ध मराठी असे. महाराष्ट्रांतील खालच्या प्रतीच्या रंगेल लोकांची एकच वाङ्मयात्मक करमणूक म्हटली म्हणजे शृंगारिक व भेदिक लावण्या म्हणण्याची व ऐकण्याची. त्यांचीहि भाषा त्यावेळीं शुद्ध मराठी असे. बायकांच्या कहाण्या व पुरुषांच्या भूपाळ्या ह्यांच्यासारखी शुद्ध मराठी तर दुसऱ्या कोठेंच नाहीं. संभावित लोक व वारकरी लोक अभंग व पदें म्हणत व तीं बरींच शुद्ध असत. सामान्य लोकांचें धार्मिक व इतर वाङ्मय हें असें शुद्ध जुन्या मराठींत सांठलें गेल्यामुळें, व्यवहारांत जो त्यांच्या तोंडाला फारशीचा विटाळ होत असे तो बराच धुतला जाई.

इ. स. १३१८ पासून १६५६ पर्यंत फारशीच्या सान्निध्यानें मराठी भाषेंत जे फेरफार झाले त्यासंबंधीं येथपर्यंत चार शब्द सांगितले. आतां, ह्या सान्निध्यापासून मराठीला तोटा झाला किंवा नफा झाला हें पाहणें फार हिताचें आहे. कारण दैवगतीनें मराठीची सध्यां एका यूरोपियन भाषेशी गांठ पडली आहे. तेव्हां त्या गांठींतून रूपभंग न होतां ती कशी निभावून नेतां येईल ह्याचा अंदाज ह्या पहाण्यापासून थोडाबहुत होणार आहे.

फारशीच्या सान्निध्यापासून मराठीला तोटा झाला किंवा नफा झाला हें पहावयाचें म्हटलें म्हणजे, ह्या दोन भाषांच्या मूळ स्वभावाची परीक्षा केली पाहिजे; इ. स. १३१८ पासून १६५६ पर्यंतच्या काळांत ह्या दोन्ही भाषा, भाषांच्या प्रगतीचे जे चार वर्ग

आहेत, त्यांपैकीं कोणत्या वर्गांत होत्या हें पाहिलें पाहिजे; आणि ह्या दोन्ही भाषा बोलणाऱ्या लोकांची संस्कृति कोणत्या दर्जाची होती हीहि बाब हिशेबांत घेतली पाहिजे.

भाषांच्या प्रगतीच्या चार पायऱ्या भाषाशास्त्रज्ञांनीं स्थूलमानानें ठरविलेल्या आहेत; ( १ ) विश्लिष्टाक्षरात्मक, ( २ ) श्लिष्टाक्षरात्मक, ( ३ ) विकृतिक्षम व ( ४ ) त्यक्तविकृति. ह्यांना ( १ ) Monosyllabic ( २ ) agglutinative, ( ३ ) inflected, आणि ( ४ ) analytical, अशीं अनुक्रमिक नांवें युरोपियन लोकांनीं दिलेलीं आहेत. विश्लिष्टाक्षरात्मक भाषांत सर्व शब्द एकाक्षरी ( monosyllabic ) असतात. उदाहरणार्थ, चिनी भाषा. श्लिष्टाक्षरात्मक भाषांत अनेक एकाक्षरी शब्द दोन एकाक्षरी शब्दांच्या मध्यें घालून एक शब्द बनविला जातो. जशी, तुर्की भाषा. ह्या भाषांत शब्दांना विकृति किंवा प्रत्यय लागत नाहींत. सबंद शब्दांचा प्रत्ययाप्रमाणें उपयोग होतो. विकृतिक्षम भाषांत मूळ शब्दांस अनेक विकृति करण्याचा व शब्दांच्या अन्त्याक्षरांचा लोप होऊन बनलेल्या प्रत्ययांचा उपयोग करण्याचा प्रघात असतो; अशा संस्कृत, आरबी, लाटीन, ग्रीक वगैरे. ह्या विकृतीचा आस्ते आस्ते त्याग करण्याकडे कित्येक भाषांची प्रवृत्ति असते. उदाहरणार्थ, फारशी, मराठी, इंग्रजी, फ्रेंच, हिंदी, बंगाली वगैरे. ह्या चवथ्या वर्गांतलि ज्या भाषा सांगितल्या त्यांनीं शब्दांना विकृति करण्याचें अजीबात सोडून दिलें आहे असें नाहीं. त्यक्तविकृति अशी संज्ञा ह्या भाषांना देण्यांत मतलब इतकाच आहे कीं, विकृतिकार्य सोडण्याकडे ह्या भाषांची आस्ते आस्ते प्रवृत्ति होत आहे. ह्या त्यक्तविकृति भाषांपैकीं कित्येक भाषा विकृतित्यागाच्या कामीं बऱ्याच पुढें गेल्या आहेत व कित्येक तितक्या पुढें गेल्या नाहींत. उदाहरणार्थ, मराठींत अद्यापि सात विकृत विभक्त्या आहेत, फारशींत चारच आहेत, आणि इंग्रजींत विकृति होऊन होणारी विभक्ति म्हटली म्हणजे s प्रत्यय लावून होणारी षष्ठीच कायती एक उरली आहे व तिचेंहि बहुतेक कार्य अलीकडे of, to वगैरे शब्दयोगी अव्ययेंच करतात. उदाहरणार्थ, राम ह्या शब्दाच्या विभक्त्या तिन्ही भाषांत चालवून दाखवितों:—

| | मराठी. | फारशी. | इंग्रजी. |
|---|---|---|---|
| प्रथमा | राम | राम् | राम् |
| द्वितीया | रामाला, राम. | राम्रा | (to) राम् |
| तृतीया | रामानें | ( अज् ) राम् | (by) राम् |
| चतुर्थी | रामातें | बराम् | (to) राम् |
| पंचमी | रामाहून | ( अज् ) राम् | (from) राम् |
| षष्ठी | रामाचें | इराम् | (of) राम् or राम्'s |
| सप्तमी | रामांत | ( दर ) राम् | (in) राम |
| संबोधन | ( अरे ) राम, रामा | ( अय् ) रामा | (oh) राम् |

येथें मराठींत प्रथमेला बिलकुल विकृति झाली नाहीं; व अविकृत असें द्वितीयेचें व संबोधनाचें राम रूप होतें. बाकीच्या सर्व विभक्त्यांत राम हा शब्द विकृत होतो.

फारशींत, राम्‌रा, बराम्‌, इराम्‌ व रामा अशीं द्वितीया, चतुर्थी, षष्ठी व संबोधन, ह्या चार विभक्त्यांत विकृत रूपें होतात. आणि इंग्रजींत राम् s असें षष्ठीचें एकच विकृत रूप आहे व त्याचाहि क्वचित्‌च उपयोग करतात. ह्यावरून विकृतींचा त्याग करण्यांत इंग्रजीचा पहिला, फारशीचा दुसरा व मराठीचा तिसरा, असे नंबर लागतात. जुन्या मराठींत रामू किंवा रामो अशीं विकृत रूपें होत असत. तीं अर्वाचीन मराठीनें सध्यां सोडून दिलीं आहेत.

आतां वर्तमानकालीं तिन्ही भाषांत एकार्थक क्रियापदें चालवितों.

अनिश्चितार्थी, पुसणें ( मराठी ), पुर्सीदन् ( फारशी ), to ask ( इंग्रजी )..

| | मराठी. | फारशी. | इंग्रजी. |
|---|---|---|---|
| प्रथम पुरुष | मी पुसतों–तें–तें | मीपुर्सम् | ask. |
| | आम्हीं पुसतों | मीपुर्सेम् | ask. |
| द्वितीय पुरुष | तूं पुसतोस–तेस–तेंस | मीपुर्सी | askest. |
| | तुम्हीं पुसतां | मीपुर्सेद | ask. |
| तृतीय पुरुष | तो पुसतो–ते–तें | मीपुर्सद | asks. |
| | ते पुसतात | मीपुर्संद | ask. |

येथें मराठींत पुस धातूला तिन्ही पुरुषांत, दोन्ही वचनांत व तिन्ही लिंगांत विकृति होते. फारशींत तिन्ही पुरुषांत व दोन्ही वचनांत विकृति होते; लिंगांत होत नाहीं. इंग्रजींत द्वितीय पुरुषीं एकवचनीं व तृतीय पुरुषीं एकवचनीं मात्र विकृति होते; बाकी पुरुषांत, वचनांत व लिंगांत होत नाहीं. येथेंहि विकृतीचा त्याग करण्यांत इंग्रजीचा पहिला, फारशीचा दुसरा व मराठीचा तिसरा नंबर लागतो.

ह्याच क्रियापदांचीं भूतकालीं रूपें अशीं होतात.

| | मराठी. | फारशी. | इंग्रजी. |
|---|---|---|---|
| प्रथम पुरुष | म्यां पुसलें–ला–ली | पुर्सीदम् | asked |
| | आम्हीं पुसलें–ला–ली | पुर्सीदेम् | asked. |
| द्वितीय पुरुष | त्वां पुसलें–ला–ली | पुर्सीदी | askedst |
| | तुम्हीं पुसलें–ला–ली | पुर्सीदेद् | asked. |
| तृतीय पुरुष | त्यानें पुसलें–ला–ली | पुर्सीद् | asked. |
| | त्यांनीं पुसलें–ला–ली | पुर्सीदंद् | asked. |

येथें तीन्ही भाषांत क्रियापदांना विकृति झाली आहे. मराठींत पुस धातूला लें प्रत्यय लागण्यापलीकडे पुरुष व वचन ह्यासंबंधानें जास्त विकृति झाली नाहीं; लिंगा-

संबंधानें मात्र झालीं आहे. फारशींत पुरुष व वचन ह्या दोन्हींसंबंधानें विकृति झाली आहे. आणि इंग्रजींत ed प्रत्यय लागून द्वितीय पुरुषी एकवचनी st प्रत्यय आणीक लागलेला आहे. येणेंप्रमाणें तिन्ही भाषांत मूळ क्रियापदाला भूतकाळीं विकृति होते. येथें विकृति-राहित्याच्या बाबींत अमुक भाषा पहिली व अमुक दुसरी अशी नंबरवारी लावतां येत नाहीं.

येणेंप्रमाणें मराठी, फारशी व इंग्रजी ह्या तिन्ही भाषा विकृतीला सोडून चालण्याच्या विचारांत आहेत. त्यांत इंग्रजीनें विकृतीला बरेंच सोडिलें आहे. तिच्या खालोखाल फारशीचा नंबर लागतो. व मराठीनेंहि विकृतीपासून दूर रहाण्याचा कांहींसा अभ्यास केला आहे. परंतु फारशी किंवा इंग्रजी ह्यांच्या इतकी सटकसीतारामी अद्यापि तिनें पत्करिली नाहीं. आतां, १३१८ पासून १६५६ पर्यंत मराठीची फारशीशीं गांठ पडली होती. त्या अवधींत विकृति सोडण्याच्या कामीं फारशीची मराठीला कांहीं मदत झाली कीं काय तें पहावयाचें आहे. द्वितीयेचा ला प्रत्यय, किंवा षष्ठीचा ई उपसर्ग, किंवा अनेकवचनाचा आन् प्रत्यय मराठीला फारशीनें देण्याचा घाट घातला तेव्हां जास्त विकृति मात्र मराठीला फारशीपासून प्राप्त झाली. ह्यापलीकडे अविकृत होण्याला फारशीची मराठीला बिलकुल मदत झाली नाहीं. मराठींतील लिंगें, वचनें, पुरुष ह्यांच्या रूपावर फारशीचा काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं. ह्याचें कारण असें कीं, फारशींतलि पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें मराठींत रुजून तिचें स्वरूप बदलण्याला सतराव्या शतकांतील राज्यक्रांतीनें वेळ राहिला नाहीं. फारशींतील ग्रंथसमूह व शास्त्रेंहि अशीं नव्हतीं कीं त्यांच्यापुढें तत्कालीन मराठी वाङ्मयानें दिपून व हतप्रभ होऊन मरून जावें. शिवाय मराठीला त्या तीन शतकांत असे कांहीं कट्टे ग्रंथकर्ते मिळाले कीं त्यांना, कवडीचीहि अपेक्षा न करितां, केवळ कर्तव्य म्हणून मराठींत ग्रंथरचना करणें अगत्याचें वाटलें. ह्या अनेक कारणांनीं फारशीला मराठी भाषेचें अंतःस्वरूप प्रायः बदलतां आलें नाहीं. ज्ञानेश्वरापासून आतांपर्यंत म्हणजे १२९० पासून १९०३ पर्यंत मराठी भाषा हळूहळू विकृतीपासून परावृत्त होत आहे, परंतु ती तशी आपल्याच छंदानें होत आहे. ज्ञानेश्वरीसंबंधानें विवेचन करतांना ह्या स्वच्छंदवृद्धीचा वृत्तान्त देण्याचा विचार आहे.

वरील उद्घाटनावरून एवढें निष्पन्न झालें कीं, फारशी भाषेच्या अंतःस्वरूपाचा मराठी भाषेच्या अंतःस्वरूपावर म्हणण्यासारखा परिणाम घडला नाहीं. तीनशें वर्षांच्या जबरदस्तीनें मराठीचें अंतःस्वरूप वस्तुतः बदलावयाचें; परंतु हा बदल होण्याचा ओघ चार कारणांनीं थांबला. ( १ ) मराठी भाषेचा स्वतःचा स्वभाव, ( २ ) मराठी ग्रंथकारांचें प्रयत्न, ( ३ ) महाराष्ट्रांतील हिंदुधर्म, व ( ४ ) मराठ्यांनीं सतराव्या शतकांत केलेली राज्यक्रांति. आतां यद्यपि मराठीचें अंतःस्वरूप फारशीच्या सान्निध्यानें बदललें नाहीं, तत्रापि तिच्या बहिःस्वरूपावर ह्या सान्निध्याचा बराच परिणाम झालेला आहे. उभयान्वयी अव्ययें, शब्दयोगी अव्ययें, उद्गारवाचक अव्ययें, सर्वनामें, विशेषनामें, क्रियाविशेषणें, विभक्तिप्रत्यय, इतर हजारों शब्द आणि प्रयोग, फारशींतून मराठींत आले.

आहेत. हा परिणाम फारशी संस्कृतीचा मराठी संस्कृतीवर ठळक असा झाला आहे. मुसुलमान लोकांची संस्कृति महाराष्ट्रांतील लोकांच्या संस्कृतीहून त्यावेळीं बरींच कमी दर्जाची होती. त्यामुळें धर्म, शास्त्रें, कायदे, कविता, साहित्य, वगैरे सरस्वतीच्या प्रांतांत फारशीचा शिरकाव म्हणण्यासारखा झाला नाहीं. व्यवहारांत मात्र फारशी शब्दांचा भरणा फार झाला. व त्याचा ठसा मराठीवर इतका बेमालूम बसला आहे कीं, जोंपर्यंत मराठी भाषा ह्या भूमंडळावर बोलली जाईल, तोंपर्यंत मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रावर कांहीं शतकें होतें, हें तींतील फारशी शब्द, प्रयोग व विभक्तिप्रत्यय ह्यांवरून कळून येईल.

ह्या तीनशें वर्षांच्या गुलामगिरीनें मराठीला फायदा काय झाला ? एकंदर विचार केला असतां म्हणण्यासारखा फायदा कांहींच झाला नाहीं. मराठींत एकाच अर्थाचे अनेक शब्द आले आणि तिची अर्थप्रदर्शक शक्ति व्यवहाराच्या प्रांतांत जास्त वाढली. ह्यापलीकडे मराठी भाषेला फारशीच्या सान्निध्यानें जास्त फायदा कांहीं झाला नाहीं. मोडी लिहिण्याची पद्धति हेमाडपंतानें मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत होण्याच्यापूर्वींच सुरू केली होती आणि बखरी लिहिण्याची पद्धति मुसुलमानांचें राज्य अस्तंगत झाल्यानंतर म्हणजे १६५६ नंतर प्रचारांत आली. खुद्द मुसुलमानांचें राज्य असतांना ह्या दोन्ही पद्धती अस्तित्वांत आल्या नाहींत. तेव्हां त्यांचें श्रेय मुसुलमानांना देतां येत नाहीं.

आतां इंग्रजी भाषेच्या सान्निध्यानें मराठी भाषेची काय स्थिति झाली आहे व होईल तें पाहूं.

केवळ ह्या दोन भाषांच्या अंतःस्वभावाकडे पाहिलें असतां, इंग्रजीपेक्षां मराठी विकृतिक्षम जास्त आहे व पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें योजण्याची पद्धति तिच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. तेव्हां ह्या दोन भाषांचा गुण्यागोविंदानें जोड बनणें प्रायः अशक्य आहे. इंग्रजीच्या सान्निध्यानें मराठींत इंग्रजी शब्द व प्रयोग येतील एवढेंच. म्हणजे मराठींत इंग्रजी शब्दांचें व प्रयोगांचें मिश्रण होईल.

परंतु इंग्रजीच्या सान्निध्यानें मराठींत इंग्रजी शब्द व प्रयोग ह्यांचें मिश्रण होईल, ही गोष्ट फारशी उद्वेगजनक नाहीं. ह्या बाबतींत काळजी निराळ्याच तऱ्हेची आहे. ती ही कीं ह्या देशांत इंग्रजीची व्याप्ति इतकी भयंकर होत चालली आहे कीं मराठी मिश्र होण्यापेक्षां नष्ट होण्याचा संभव जास्त आहे.

गेल्या शतकांत ग्वालेरीपासून तंजावरापर्यंत मराठी भाषा प्रचलित होती. नानाफडणिसांचीं हैदर व टिप्पू यांस पत्रें मराठींत जात व महादजी शिंद्यांचा रजपूत राजांशी व्यवहार मराठींत होई. तसेंच ग्वालेरीपासून तंजावरापर्यंत खासगी व सार्वजनिक दफ्तरें मोडींत व मराठींत लिहिलीं जात. मराठीची ही व्याप्ति जाऊन तिची जागा आतां इंग्रजीनें घेतली आहे. आतां निव्वळ महाराष्ट्राखेरीज मराठी इतरत्र कोठें चालत नाहीं. म्हणजे मराठीच्या व्याप्तीचा महाराष्ट्राच्या बाहेर संकोच झाला आहे.

मराठीचा संकोच महाराष्ट्राच्या बाहेर तर झालाच आहे. परंतु, खुद्द महाराष्ट्रांतहि मराठीचा संकोच अतोनात होत आहे. गेल्या शतकांत महाराष्ट्रांत सरकारीं व दरबारीं मराठी भाषा विराजत होती. आतां तिच्या जागीं सर्वत्र इंग्रजी झाली आहे.

सरकारी दरबारीं मराठीला मज्जाव झाला ही तर लांछनाची गोष्ट आहेच, परंतु उच्च व मध्यम प्रतींच्या शाळा व पाठशाळा ह्यांतूनहि मराठीचें निष्कासन झालें आहे.

आतां शाळा व पाठशाळा परकीय सरकारच्या ताब्यांत असल्यामुळें तेथें मराठीचा रिघाव नसल्यास कोणाचा उपाय नाहीं. परंतु, सार्वजनिक सभा, खासगी सभा, पुस्तकालयें, प्रांतिक सभा, पेढ्या, ह्यांचेंहि सर्व लिहिणें इंग्रजींतच होऊं लागलें आहे. ह्या ठिकाणीं कोणीं मराठींत लिहूं व बोलूं नये असा कोणाचा प्रतिबंध नाहीं. पण देशहिताच्या कल्पना सध्यां इतक्या विपरीत झाल्या आहेत कीं त्याचें स्वरूप काय असतें ह्याचाहि विसर सर्वत्र पडल्यासारखा दिसतो.

पेढ्या, सभा, व पुस्तकालयें सार्वजनिक संस्था पडल्याकारणानें तेथें कोणाचा पायपोस कोणाच्याहि पायांत नाहीं अशी स्थिति असते व इंग्रजी लिहिण्याचा व बोलण्याचा सहजासहजीं प्रघात त्या ठिकाणीं पडत गेला असतो, अशी समजूत कोणी काढील. परंतु भाऊबहीण, बापलेक, स्नेहीसोबती ह्यांच्यांतील खासगी पत्रव्यवहारहि इंग्रजींतच चालतो. ह्या स्थलीं सार्वजनिक सबब आणतां येणार नाहीं. परंतु इतकें मात्र कदाचित् म्हणतां येईल कीं, ह्या लोकांना विचारी लोकांत गणतां येत नाहीं; इंग्रजी लिहिण्याचें ह्या अज्ञ लोकांना कौतुक वाटतें व राष्ट्रहित कशांत आहे हें कळण्याची त्यांना ऐपत नसते, म्हणून असा प्रकार होतो.

परंतु राष्ट्रहित कशांत आहे हें ज्यांस कळतें अशी आपली कल्पना आहे तेहि विद्वान् लोक इंग्रजीच लिहितात व बोलतात. इंग्रजाशीं किंवा सरकारशीं व्यवहार करण्यांत हे लोक इंग्रजींत बोलून थांबते तर ती गोष्ट केवळ न्यायाची होती. पण आश्चर्य हें कीं स्वजनाशीं व्यवहार करतांनाहि हे लोक इंग्रजीच वापरतात. डॉ० भांडारकरांना स्वधर्माविषयीं किंवा सामाजिक सुधारणेविषयीं मुंबईंत बोलावयाचें असलें, किंवा न्यायमूर्ति रानड्यांना बकलच्या इतिहासावर नगरास व्याख्यान द्यावयाचें असलें, किंवा रा. कुंट्यांना स्वदेशाभिमानाविषयीं खुद्द पुण्यांत भाषण करावयाचें असलें, किंवा प्रो० गोखल्यांना कोल्हापूरच्या मराठ्यांपुढें इंग्लंडची हकीकत सांगावयाची असली, कीं इंग्रजीचा आश्रय केल्याविना बोलण्यास त्यांना उमेदच येत नाहीं.

परंतु, बोलणें हें क्षणिक व तात्पुरतें असतें, तेव्हां तपेच्या तपें जिचा व्यासंग केला ती इंग्रजी समयीं जिव्हाग्रावर नाचूं लागली, तर त्यासंबंधीं नांवें ठेवूं नयेत, अशी या मंडळीच्या तर्फे कोणी विनंति करील, तेव्हां ह्या विनंतीला मान देणें सभ्यपणाला अनुचित होणार नाहीं. पण, ज्यांची रचना करण्यास अनेक वर्षांचा अवधि लागतो व ते कोणत्या भाषेंत लिहावे हें ठरविण्यास हवा तितका वेळ असतो, ते ग्रंथ किंवा निबंध लिहिण्याच्या कामीं इंग्रजीचा उपयोग देशाभिमानी विद्वान् लोक करूं लागले म्हणजे त्यांनाहि देशाभिमानाची व राष्ट्रत्वाची व्याप्ति कोठपर्यंत असते हें कळत नाहीं असें विधान करणें प्राप्त होतें. असें नसतें, तर त्यांनीं आपले ग्रंथ देशी भाषांत लिहिले असते. भाषा विचाराचें साधन आहे तेव्हां स्वभाषा स्वदेशांतील विचारी पुरुषांच्या विचारांचें साधन

असावें हें उचित होय. हे विचारी लोक परभाषेंत आपले विचार प्रकट करूं लागले तर त्यांनीं स्वभाषेचा मोठा अक्षम्य अन्याय केला असें होतें. घरच्या गरीब माणसांची उपासमार करून बाहेरच्या श्रीमंतांना मेजवानी करणारा इसम स्वकीयांच्या व परकीयांच्या उपहासास मात्र पात्र होतो. असे गृहस्थ आपल्या देशांत गेल्या पंचायशी वर्षांत बरेच झाले. पैकीं कित्येकांची नांवनिशी त्यांनीं केलेल्या कांहीं ग्रंथ व निबंध यांसह पुढील पिढ्यांच्या स्मरणार्थ येथें देतों:—

| नांव. | इंग्रजी ग्रंथ व लेख. | मराठी ग्रंथ व लेख. |
|---|---|---|
| १ बाळशास्त्री जांभेकर | दोन तीन ताम्रपटांवर निबंध. | लहान मराठी व्याकरण, इतिहासाचें भाषांतर, वगैरे. |
| २ दादोबा पांडुरंग | स्वीडनबुर्गच्या मतांवर विचार. | मोठें व्याकरण व त्याची पूरणिका. |
| ३ विश्वनाथ नारायण मंडलिक | पौराणिक विषयांवर इंग्रजी निबंध. | सवईवर मराठी निबंध, एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर. |
| ४ महादेव मोरेश्वर कुंटे | आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, ऋा पूर्वमीमांसेचें भाषांतर, एक इंग्र वर्तमानपत्र व अनेक व्याख्या | पूर्वमीमांसेचें भाषान्तर, शिवाजी काव्य व व्याख्यानें. |
| ५ शंकर पांडुरंग पंडित | वेदाचें भाषान्तर, नाटकांवर टी दोन चार ताम्रपटांवर निबंध. | तुकारामावर निबंध, वेदाचें भाषान्तर. |
| ६ काशीनाथ त्र्यंबक तेलंग | ताम्रपटांवर निबंध, रामायणावर निबंध, गीतेचीं गद्य व पद्य भाषांतरें, अर्थशास्त्रावर निबंध, पौराणिक विषयांवर निबंध, राजकीय व सामाजिक व्याख्यानें, म त्यांच्या इतिहासावर निबंध. | शहाणा नेथन (भाषान्तर), इतर एक दोन व्याख्यानें व भाषान्तरें. |
| ७ महादेव गोविंद रानडे | राजकीय, धार्मिक, सामाजिक, शै व इतर विषयांवर व प्रसंगांवर शे व्याख्यानें व निबंध. मराठ्यांचा कं; डों हास. | शेंकडा व्याख्यानें |

| | | |
|---|---|---|
| ८ डॉ० भांडारकर | दख्खनचा निबंधवजा इतिहास. ताम्रपटांवर निबंध, पतंजलीवर निबंध, महाराष्ट्री व मराठी भाषांवर निबंध, धार्मिक व सामाजिक व्याख्यानें | प्रार्थनासमाजांतील प्रार्थना व कीर्तनें. |
| ९ रा. बाळ गंगाधर टिळक | अग्रहायण व आर्यांचें मूलस्थान; मराठा वर्तमान पत्रांतील कांहीं क्षणिक किंमतीचे निबंध आणि व्याख्यानें. | केसरींतील लेख व व्याख्यानें. |
| १० पंडिता रमाबाई | हिंदू विधवा, वगैरे दोन चार लहान मोठीं मध्यम पुस्तकें. | एक दोन मराठी पुस्तकें. |
| ११ दिवाण रघुनाथराव | धार्मिक, सामाजिक व राजकीय टिपणें. | कांहीं क्षुल्लक मराठी कविता व वाक्यें. |
| १२ सर त्रावणकोर माधवराव | सामाजिक धार्मिक व राजकीय टिपणें. | कांहीं आर्या. |
| १३ महाराज सयाजीराव गायकवाड | गिबनच्या इतिहासाचा सारांश, कांहीं निबंध व व्याख्यानें. | आज्ञेनें झालेले शेकडों मराठी लहान मोठे ग्रंथ. |
| १४ डॉ. रणछोड कीर्तिकर | वनस्पतींवर एक दोन निबंध. | काव्यें व निबंध. |

वर दिलेल्या सर्व गृहस्थांची जगांतील कोणत्याहि देशांत विचारवंतांत गणना होईल व एकदोघांची तर कदाचित् प्रतिभासंपन्न पुरुषांत गणना करावी लागेल. ह्या गृहस्थांनी मराठींत ग्रंथरचना किंवा विचारप्रदर्शन काय केलें व इंग्रजींत काय केलें, हें पाहिलें असतां, मराठीपेक्षां इंग्रजीकडेच ह्यांचा कल विशेष आहे हें दिसून येईल. ह्या सर्व गृहस्थांच्या लेखांत ग्रंथ ह्या संज्ञेस अंशतः पात्र अशीं चारच पुस्तकें आहेत; (१) कुंट्यांचीं आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, (२) रानड्यांचा मराठ्यांचा इतिहास, (३) डॉ० भांडारकरांचा दख्खनचा इतिहास, व (४) रा० टिळकांचें आर्यांचें मूलस्थान. ह्या चारी पुस्तकांत विचार व कल्पना ह्यांचें बरेंच प्रदर्शन झालें आहे. आतां, इतकें खरें आहे कीं त्या त्या शाखेंत युरोपांत जे पहिल्या प्रतीचे उत्तमोत्तम ग्रंथ झाले आहेत त्यांच्याशीं ह्या ग्रंथांच्यानें बरोबरी करवणार नाहीं. परंतु त्या त्या शाखेंतील बऱ्याच ग्रंथांत ह्यांची गणना करावी लागेल हें उघड आहे. उदाहरणार्थ, डॉ० भांडारकरांचा दख्खनचा इतिहास घ्या. ह्या इतिहासाची योग्यता डॉ० फ्लीट्कृत कर्नाटकांतील राजघराणीं ह्या पुस्तकापेक्षां किंचित् जास्त आहे. डॉ० भांडारकरांचें पुस्तक ताम्रपटें व शिलालेख ह्यांच्याशीं ज्याचा परिचय झाला आहे असा कोणीही गृहस्थ लिहिता. एक दोन कल्पना मात्र डॉ० भांडारकरांनीं ह्या पुस्तकांत नवीन काढिलेल्या आहेत. टॉलेमीचा Baleoeuros व कोल्हापूरचा विळिवायकूर हे एकच पुरुष होत, ही डॉक्टरांची कल्पना मोठी अपूर्व आहे व तिचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. अशा स्वतंत्र कल्पना व कोड्या ह्या चारी पुस्तकांत आहेत. परंतु ह्या कल्पना व कोड्या ह्या देशांतील भाषेस काय होत ? हे चारी ग्रंथ इंग्रजींत लिहिलेले आहेत च ह्यांचा उपयोग महाराष्ट्रांतील लोकांपेक्षां युरोपांतील लोकांना जास्त होणार आहे. हेच ग्रंथ ह्या लोकांनीं मराठींत लिहिले असते, तर त्यांच्या अपूर्वतेमुळें परकी लोकांना ते भाषान्तर करून समजून घ्यावे लागते व मराठींत चार विचारप्रचूर ग्रंथांची भर पडती. मराठींत लिहिले जाते तर हे ग्रंथ यूरोपांतील विद्वानांना कळावयास अवधि लागता इतकेच. त्यापेक्षां मराठींत लिहिण्यापासून जास्त तोटा नव्हता. परंतु मराठीचा संकोच होण्याची चोहोंकडून जर सध्यां वेळ आलेली आहे, तर त्याच्या आड ह्या पुढारी मंडळीनें तरी काय म्हणून यावें ? आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, हा ग्रंथ बक्षिसाकरितां लिहिला होता, अशी कुंट्यांच्या तर्फेनें सबब आणतां येईल. परंतु ऋषि हें काव्य व इंग्रजी वर्तमानपत्र कुंट्यांनीं इंग्रजींत कशाकरतां लिहिलें तें समजत नाहीं. तसेंच, महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांनीं गिबनचा सारांश इंग्रजींत लिहिल्यानें, त्यांना स्वतःला इंग्रजी लिहिण्याचा चांगला सराव झाला, ह्यापलीकडे इंग्रजांच्या किंवा मराठ्यांच्या विचारावरती ह्या सारांशाचा कांहीं परिणाम झाला आहे असें दिसत नाहीं. टिळकांनीं आपले दोन्ही ग्रंथ मराठींत लिहिले असते तर काय बिघडतें ? ह्या ग्रंथांना जर कांहीं किंमत असती–व ती आहे ह्यांत संशय नाहीं. तर कांहीं युरोपियन लोकांना जरूर असल्यास कदाचित् मराठी शिकावें लागतें इतकेंच. हीच टीका इतर गृहस्थांच्याहि इंग्रजी लेखांसंबंधानें करतां येईल. ह्या सर्व लोकांना काय भुरळ पडलें असेल तें असो. इंग्रजींत लिहिणें म्हणजे कांहीं अजब चमत्कार करणें आहे

असें ह्यांना निःसंशय वाटत असावें असें दिसतें. खरें म्हटलें असतां इंग्रजी लिहिण्यापासून ह्यांना वरकरणी फायदा किती असला तरी वस्तुतः कांहीं फायदा आहे असें वाटत नाहीं. श्रेष्ठ इंग्रज ग्रंथकाराप्रमाणें आंग्लभाषाप्रभुत्व ह्यांच्यापैकीं एकालाहि येणें दुरापास्त आहे. तेव्हां विलायती सरस्वतीपुत्रांत ह्यांना उत्तम इंग्लिश ग्रंथकार म्हणून कोणी मान देतों असा बिलकुल प्रकार नाहीं. एकप्रकारचें तकलादु व बटबटीत इंग्रजी हे लोक लिहितात, असाच अभिप्राय ह्यांच्या इंग्रजीवर इंग्रज टीकाकारांकडून प्रायः पडला जातो. जिवापाड मेहनत करून परभाषेंत लिहावें आणि तत्रस्थ लोकांनीं फार तर intelligent म्हणून सर्टिफिकेट द्यावें, ह्यांत ह्यांना काय अभिमान वाटत असेल न कळे ! हें ह्या लोकांच्या इंग्रजीभाषेसंबंधानें झालें. ह्यांच्या ग्रंथांतील विचारासंबंधानें पहातां, यूरोपांतील मोठमोठ्या पट्टीच्या शास्त्रज्ञांच्या विचारांच्या तोडीचे सिद्धान्त ह्यांच्याकडून निर्माण झाले आहेत असें क्वचित्च म्हणतां येईल. केन्, ब्राडला वगैरेंचे विचार जितपत प्रगल्भ व खोल असतात तितपतच ह्या लोकांचे असतात. ग्लाडस्टन्, हक्सले, बन्सेन, मूलर, हंबोल्ट, ह्यांच्यापासून केन, व ब्राडला, जितके दूर आहेत त्यापेक्षां आपल्याइकडील ही पुढारी मंडळी वरील मंडळीच्या फारशी जवळ नाहींत. येणेंप्रमाणें भाषाप्रभुत्व किंवा विचारसामर्थ्य वस्तुतः इतर राष्ट्रांतील लोकांना थक्क करून टाकण्यासारखें नसतांना, परभाषेंत लिहून तींतील लहानमोठ्या ग्रंथांच्या व चोपड्यांच्या गर्दींत गडप होऊन जाण्यांत काय पुरुषार्थ असेल तो असो ! ही कृति केवळ तळ्याच्या पाण्यांत पडणाऱ्या धुळींच्या कणाच्या मासल्याची दिसते ! कोटश्चैं कीटायते ! परंतु जेथें सर्वत्र उलटा प्रकार झालेला दिसत आहे. तेथें राष्ट्रांतील पुढारी म्हणून नांवाजली जाणारी मंडळीहि कांहींशी भांबावत जावी, ही सरळच गोष्ट आहे. सध्याच्या काळाचा महिमाच असा आहे कीं स्वधर्म टाकावा, स्वदेश सोडावा व स्वभाषा विसरावी असें विचारवंतांना व देशाभिमान्यांनाहि वाटावें !

असा मराठीचा संकोच सध्यां चोहोंकडून होऊं लागला आहे. सरकार परदेशीं पडल्यामुळें तें ह्या भाषेला वाऱ्यालाहि उभें राहूं देत नाहीं. व एतद्देशीय विद्वान् लोकांच्या स्वदेशाभिमानाच्या कल्पना कांहीं अपूर्व झाल्यामुळें, गंभीर ग्रंथरचनेच्या कामीं इंग्रजी भाषा वापरल्यानें मराठीचा आपण कांहीं गुन्हा करतों, हें त्यांच्या गावींहि नसतें. येणेंप्रमाणें इंग्रजांच्या अमलाखालील महाराष्ट्रांत मराठीचा संकोच अत्यंत झालेला आहे. दहा पांच मोठीं मराठी संस्थानें आहेत, तेथीलहि दरबारी भाषा अलीकडे इंग्रजीच बनत चालली आहे. अशीच स्थिति शंभर दीडशे वर्षें चालली, तर मराठी निःसंशय—मिश्र नव्हे—भ्रष्ट नव्हे—तर अजीबात नष्ट होईल.

मुसुलमानांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून कनिष्ठ असतां व फारशी ग्रंथसमूह मराठींतल्यापेक्षां संपन्न नसतां, आणि मराठींतील ग्रंथकारांनीं स्वभाषेला उचलून धरिली असतां, तिनशें वर्षांत फारशीनें मराठीला गिळंकृत करण्याचा जर घाट घातलेला आपण इतिहासावरून पहातों, तर जेथें राज्यकर्त्यांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून कांहीं बाबतींत निःसंशय श्रेष्ठ आहे, जेथें इंग्रजी ग्रंथसमूह मराठी ग्रंथसमूहाहून सहस्रपट मोठा आहे

व जेथें देशांतील विद्वानांनींहि स्वभाषेला सोडल्यासारखेंच आहे, तेथें तीनशेंच्या ऐवजीं शंभर दीडशें वर्षांतच स्वभाषेचा अंत झाल्यास नवल कसचें ? मी म्हणतों ह्या विधानांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं. चालली आहे अशीच जर स्थिति शंभर दीडशें वर्षे चालेल, तर मराठी भाषेचें दुसरें तिसरें काय होईल ?

आणि स्वभाषा नष्ट होणें म्हणजे देशावर केवढी घोर आपत्ति येणें आहे ! गेलीं पंचायशीं वर्षें तर आपण बहुतेक फुकट घालविलीं. त्या सगळ्या अवधींत ज्याला प्रतिभा-संपन्न म्हणतां येईल असा मराठींत एकच ग्रंथकार उदयास आला आणि तोहि दहा पांच निबंध लिहून भर तारुण्यांत मावळून गेला. ह्यापुढें गमाविलीं गोष्ट पुनः साधावयाची असेल व बुडालों आहों त्याहून जास्त बुडावयाचें नसेल, तर स्वभाषेला, म्हणजे स्वतंत्र विचाराला, म्हणजे स्वदेशाला, कायेनें, वाचेनें व मनानें आपण शब्दशः वाहून घेतलें पाहिजे. नाहींतर, प्रसंग कठिण आहे !

फारशी भाषेचें साम्राज्य झालें असतां, मराठी वाचविण्याला व वाढविण्याला जे उपाय पूर्वी योजिले गेले तेच उपाय सध्यांहि योजिले पाहिजेत. भाषेचा संकोच म्हणजे आपल्या हालचालींचा संकोच, हें लक्षांत घेतलें पाहिजे. जसजशा आपल्या हालचाली संकुचित मर्यादेंत येऊं लागल्या, तसतसा मराठी भाषेचा संकोच झाला. तेव्हां मराठी भाषेचा विकास करण्याला आपल्या राष्ट्रीय हालचाली वाढविल्या पाहिजेत. हालचाली न वाढवितां भाषेचा विकास करूं पहाणें म्हणजे तद्बाह्य शक्ति न लावितां एखादी वस्तू हालवूं जाण्यासारखें आहे. धार्मिक, सामाजिक, व्यापारिक, राजकीय, राष्ट्रीय, लौकिक, शास्त्रीय, वगैरे सर्व प्रांतांत पुनः नव्यानें जेव्हां आपण जोरानें हालचाल करावयास लागूं तेव्हां त्या त्या प्रांतांत मराठी भाषेचा उपयोगहि आपल्याला सहजगत्या करावा लागेल. भाषेंत शास्त्रीय ग्रंथसंपत्ति व्हावी ह्या सदिच्छेनें कोणी प्राणिशास्त्राच्या गूढ सिद्धांताचें प्रणयन मराठींत केलें, तर तो त्याचा प्रयत्न व्यर्थ जाईल. कारण राष्ट्रीय हालचालींची मर्यादा प्राणिशास्त्रांच्या सिद्धांतांचें प्रणयन अवश्य वाटण्यापर्यंत गेलेली नाहीं. मनुष्याची कर्तबगारी नमूद करण्याचें साधन भाषा होय. जेथें कर्तबगारी नाहीं तेथें भाषेनें नमूद तरी काय करावें ? मुसुलमानी अमलांत मराठ्यांच्या सर्व राजकीय हालचाली बंद झाल्या. त्याबरोबर राजकीय वाङ्मयहि मराठींत व्हावयाचें बंद झालें. अशा अडचणीच्या प्रसंगीं महाराष्ट्रांतलि साधुसंतांनीं हालचालीचें एक निराळेंच स्थान उत्पन्न केलें. तें स्थान धर्म व भक्ति ह्यांचें होतें. ह्या स्थानांत राष्ट्रांतील सर्व लोकांचें एकीकरण करण्याचा त्यांनीं प्रचंड उद्योग केला; व हा उद्योग लोकांना समजून देण्याकरितां मराठी भाषेचा उपयोग केला म्हणजे मराठींत ग्रंथरचना केली. पंचवीस वर्षांपूर्वी विष्णुशास्त्री चिपळोणकरांनींहि हाच मार्ग स्वीकारला. विष्णुशास्त्री हालचाल करणारा मनुष्य होता; व जी हालचाल करण्याचा त्याचा मनोदय होता ती समजून देण्याकरितां मराठींत लिहिणें त्याला जरूर वाटलें. मराठी भाषेला उर्जितदशेला आणणें ह्या प्रयोगाचा अर्थ कांहींतरी राष्ट्रहिताची हालचाल करणें हा आहे; दुसरा कांहीं नाहीं. जेव्हां आपल्या इकडील कोणी गृहस्थ

इंग्रजींत लिहितो किंवा बोलतो तेव्हां स्वदेशाच्या हालचालीशीं त्या बोलण्याचा किंवा लिहिण्याचा साक्षात् संबंध नसतो किंवा असल्यास फारच दूरचा असतो, असें म्हणणें ओघास येतें. रा० रा० टिळकांनीं आर्यांचें मूलस्थान हें पुस्तक इंग्रजींत लिहिलें ह्याचा अर्थ असा होतो कीं, ह्या पुस्तकांतील विषयाचा उपयोग इकडील लोकांना नसून तिकडील लोकांना आहे. म्हणजे हें पुस्तक तिकडील हालचालींच्या हितार्थ लिहिलेलें आहे, हें उघड आहे. रानड्यांनीं मराठ्यांचा इतिहास इंग्रजींत लिहिला ह्याचाहि अर्थ हाच आहे; व इंग्लिश लोकांचीं मतें महाराष्ट्रासंबंधानें नीट करण्याकरितां हें पुस्तक आपण लिहितों, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलेंहि आहे. तेव्हां स्वदेशाचें हित व स्वभाषेचा उपयोग हे समानार्थक शब्द होत हें स्पष्ट आहे. जेथें स्वदेशाचें हित नाहीं, तेथें प्रायः स्वभाषेचेंहि हित नाहींच. ह्यासंबंधानें येथें आतां जास्त पाल्हाळ करावयाला वेळ नाहीं. हें प्रकरण एखाद्या स्वतंत्र निबंधाचाच विषय होण्याच्या योग्यतेचें आहे.

( ९ ) शिवाजीच्या पत्रांच्या अनुषंगानें मोडी अक्षर व फारशीच्या सान्निध्यानें मराठी भाषेचें स्थित्यंतर, ह्या दोन बाबींचा येथपर्यंत ऊहापोह झाला. आतां शिवाजीच्या पत्रांसंबंधानें तिसरी विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे स्त्रीपुरुषांच्या नांवांची होय.

इ० स० १२९० पासून १६५६ पर्यंत महाराष्ट्रांत चातुर्वर्ण्यांतील निरनिराळ्या वर्णांच्या नांवांपुढें निरनिराळे विशिष्ट शब्द येतात. राजांच्या नांवांपुढें देव किंवा राज, राऊ, राव, असे शब्द येतात; जसें, सिंघणदेव, कृष्णदेव, रामदेव, बिंबदेव, वगैरे. कधीं कधीं हे दोन्ही शब्द नांवापुढें जोडले जात, जसें रामदेवराव. क्षत्रियांच्या नांवांपुढें सिंग, राऊ, किंवा जी हे प्रत्यय लागत; जसें, मानसिंग, विकटराऊ, अमृतराऊ, धनाजी, शिवाजी, शहाजी, वगैरे. कधीं कधीं हे दोन्ही प्रत्यय लागले जात; जसें शिवाजीराऊ, धनाजीराऊ. ब्राह्मणांच्या नांवांपुढें गृहस्थ असल्यास देव, पंत, पंडित किंवा जी असे प्रत्यय लागत; जसें, ज्ञानदेव, नारोपंडित, नारोपंत किंवा नारोजी, ब्राह्मण भिक्षुक असल्यास, त्याच्या नांवापुढें भट्ट हें पद लागे; रामभट, गुंडभट वगैरे. वैद्य, शास्त्री किंवा ज्योतिषी असल्यास, नांवापुढें तदर्थवाचक शब्द लागत; जसें, बाळज्योतिषी, नरसिंहवैद्य, कृष्णशास्त्री, रामाचार्य, इत्यादि. सामान्य ब्राह्मणांना हे प्रत्यय लावीत नसत; जसें मोरो त्रिमळ, केसो नारायण, काशी त्रिमळ, विसा मोरो, दादो नर्सो, वगैरे. वैश्यांना सेठी, देव हीं उपपदें लावीत; जसें, नामदेऊ, दामासेठी, रामसेठी, हरिसेठी, वगैरे. शूद्रांस नुसत्या सौम्य नांवानें ओळखत व अतिशूद्रांस आ किंवा या प्रत्यय लावून हाका मारीत; जसें, ह्ऱ्या मांग. राम्या महार, वगैरे. स्त्रियांस देवी, बाई, आउ, अवा, ई, वगैरे प्रत्यय लावले जात; जसें, देवळदेवी, चांगुणाबाई, रमाऊ, रमाव्वा, रमाई, रमी, इत्यादि. ब्राह्मणांचीं एकेरी नांवें जुन्या मराठींतल्याप्रमाणें प्रायः ओकारान्त असत; जसें, केसो, राघो, मोरो, वगैरे. मायेच्या बोलण्यांत हीं नांवें उकारान्त होत, जसें केसु, राघु, मोरु, शाहु, शिऊ, वगैरे. ह्या नांवांना बहुमानार्थी बा हा प्रत्यय लागत असे; जसें केसोबा, ज्ञानोबा, तुकोबा, इत्यादि. क्षत्रि-

यांच्या नांवांना बहुमानार्थी जी हा प्रत्यय ओकारान्त, अकारान्त, आकारान्त किंवा उकारान्त मूळ नांवांपुढे लागे; जसें, झादोजी, झादजी, महादाजी, झादूजी. हा जी प्रत्यय संस्कृत आर्य, महाराष्ट्री अज्ज, पासून आला आहे. महादेवार्य, महादाज्ज, महादाजी, महादोजी, महादजी, महादूजी. उत्तरादाखल इंग्रजी sir ह्या अर्थी जी शब्द महाराष्ट्रांत उच्चारतात तो आर्य, अज्ज, जी अशा परंपरेनें बनला आहे. नायकिणींच्या नांवांपुढें जी प्रत्यय येतो तो अज्झा नामक प्राकृत शब्दापासून आला आहे. स्त्रियांच्या नांवांपुढील आऊ, आई, आवा, हे प्रत्यय अग्नि, अव्वा, वगैरे प्राकृत शब्दांपासून निघाले आहेत.

ह्या मराठी नांवांत कांहीं शब्द ( १ ) शुद्ध संस्कृत आहेत, ( २ ) कांहीं महाराष्ट्रींतून जुन्या मराठींत आले आहेत, ( ३ ) कांहीं शुद्ध देशी आहेत,( ४ ) कांहीं फारशींतून आले आहेत, ( ५ ) व कांहीं तेलंगी, कानडी वगैरे द्राविड भाषांतून आले आहेत. (१) नारायण, (२) कान्होजी, (३) दगडू, (४) फिरंगोजी, व (५) तिमाजी, हीं ह्यांचीं अनुक्रमें उदाहरणें होत. आडनांवांचाहि असाच पंचविध प्रकार आहे. पिंगळे, सावंत, मराठे, काळे, शिर्के, गोरे, साळुंके, भोसले, फर्जंद, पटवर्धन, वैसास, महाराव, यादव, जाधव, निंबाळकर, पोवार, मोहिते, चिटणीस, पोतनीस, आचार्य, वगैरे आडनांवांत, संस्कृत, महाराष्ट्री, देशी, फारशी व कानडी तऱ्हेचीं आडनांवें आहेत. ह्या आडनांवांपैकीं संस्कृत शिलालेखांतील व ताम्रपटांतलि आडनांवांव्यातिरिक्त जुन्यांत जुनें असें मराठी लेखांतील आडनांव म्हटलें म्हणजे वाडीकर सावंत यांचें होय. मठ येथील देवालयांतलि इ. स. १३९७ तील लेखांत नऱ्यसीदेव व भामसावंत अशीं सावंतांचीं दोन नांवें आलीं आहेत. नऱ्यसीदेव ज्याअर्थी इ. स. १३९७ त हयात होता व त्यानें ज्याअर्थी आपला बाप भामसावंत ह्याच्याप्रीत्यर्थ मठ येथील देऊळ बांधिलें, त्याअर्थी १३९७ च्या आधीं दोन चार वर्षें भामसावंत वारला असावा. म्हणजे भाममावंताची हयात इ. स. १३६० पासून १३९७ पर्यंत सरासरी असावी. सावंतांचें मूळ आडनांव भोसले. भामसावंताचें आडनांव सावंत होण्यास त्याच्यापूर्वी दोन चार पिढ्या त्याचे पूर्वज कोणातरी चक्रवर्ती राजाचे मांडलिक असले पाहिजेत. त्याशिवाय भोसले हें आडनांव जाऊन सावंत हें आडनांव पडावयाचें नाहीं. अर्थात्, १३६० च्या पूर्वी शंभर वर्षें सावंतांचें कूळ कोंकणांत सावंत ह्या नांवानें महशूर होतें असें दिसतें. म्हणजे इ. स. १२६० च्या सुमारास हे भोसले आडनांवाचे सावंत हयात होते हें उघड आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, इ. स. १२६० मध्यें भोसले हें आडनांव कोंकणांत प्रसिद्ध होतें. हे सावंतवाडीचे भोसले सातारकर भोसल्यांचे संबंधी आहेत. ह्याला पुरावा प्रस्तुत खंडांतील १३८ वा व ६२ वा लेखांक यांचा आहे. १३८ व्या लेखांकांत मनाबाई सरदेसाईणीनें कोल्हापूरच्या संभाजी महाराजांस काका ह्या शब्दानें गौरविलें आहे. व ६२ व्या लेखांकांत दुसऱ्या शिवाजीनें सावंतांना भोसले हें आडनांव लाविलें आहे. तेव्हां हें भोसल्यांचें कुळ इ. स. १२६० पासून महाराष्ट्रांत आहे हें पूर्णपणें सिद्ध आहे. आतां सातारचे छत्रपति भोसले चितोडच्या वंशांपैकीं आहेत

अशी जी गप्प आहे तिच्याशीं ह्या सिद्धीचा कितपत मेळ बसतो तो पाहूं. साताऱ्याची बनावट वंशावळ येणेप्रमाणें:—

राणा लक्ष्मणसिंह चितोडकर ( इ. स. १२७५–१३०३ ).

|

अजयसिंह

|

सुजनसिंह

( हा सन १३१० च्या सुमारास चितोडच्या दक्षिणेस सोंधवाड्यास आला ).

|

दिलीपसिंह

|

भोसाजी

( ह्याच्या नांवावरून भोसावंत उर्फ भोसले हें नांव निघालें ).

|

देवराजजी

( हा प्रथम दक्षिणेंत आला ).

|

इंद्रसेनजी

|

शुभकृष्णजी

|

रूपसिंहजी

|

भूमींद्रजी

|

धापजी

|

बरडजी

|

संभाजी — खेळोजी

संभाजी

|

बाबजी ( जन्म इ. स. १५३३ )

|

मालोजी ( १५५०–१६१९ )
|
शहाजी ( १५९४–१६६४ )
|
शिवाजी ( १६२७–१६८० )

ह्या वंशावळींत देवराजजी प्रथम दक्षिणेंत आला असें म्हटलें आहे. ज्याअर्थी राणा लक्ष्मणसिंह चितोडकर इ० स० १२७५–१३०३ पर्यंत हयात होता व देवराजजी त्याच्यापासून सहावा पुरुष होता, त्याअर्थी दर पिढीस २२ वर्षे धरिल्यास, देवराजजी इ० स० १४१३ पासून १४३५ पर्यंत हयात होता असें दिसतें. म्हणजे सातारकर भोसल्यांचे पूर्वज इ० स० १४१३ पासून १४३५ च्या अवधींत केव्हांतरी दक्षिणेंत आले असें होतें. परंतु सातारच्या घराण्याशीं संबद्ध असलेल्या सावंतवाडीच्या सावंतपैकीं नऱ्यसी देव इ० स० १३९७ त व भामसावंत १३६० पासून १३९७ पर्यंत हयात होते व त्यांचे पूर्वज इ० स० १२६० च्या सुमारास कोंकणांत होते असें वर सिद्ध केलें आहे. तेव्हां राणा लक्ष्मणसिंह चितोडकराच्या पूर्वी सावंतवाडीकर भोसले कोंकणांत प्रसिद्ध होते असा ह्या सिद्धीचा अर्थ होतो. म्हणजे भोसले हें आडनांव लक्ष्मणसिंहाच्या अगोदरचें आहे असें म्हणावें लागतें; परंतु सातारच्या बनावट वंशावळींत भोसाजीपासून भोसले हें आडनांव पडलें असें म्हटलें आहे. म्हणजे भोसले हें आडनांव इ० स० १३९० पासून १४१३ पर्यंतच्या अवधींत केव्हां तरी पडलें, असा ह्या विधानाचा अर्थ होतो. परंतु इ० स० १३६० पासून १३९५ पर्यंत राज्य करणाऱ्या सावंतवाडीच्या भामसावंताचें आडनांवहि भोसलेच होतें. म्हणजे भोसले हें आडनांव ज्या कालीं पडलें असें बनावट वंशावळ सांगते, त्याच्या अगोदर तीस वर्षे भोसले हें आडनांव सावंतवाडीकरांना लावीत होते, अशी निष्पत्ति होते. अर्थात् ह्या दोहोंपैकीं कोणतें तरी एक विधान खोटें असलें पाहिजे. येथें कोणतें विधान खरें असावें ह्यासंबंधीं वादाला जागाच नाहीं. मठ येथील शिलालेखापेक्षां बनावट वंशावळींतील मजकूर अविश्वसनीय असावा असेंच म्हणणें भाग पडतें.

सातारकर भोसल्यांची म्हणून जी वंशावळ प्रसिद्ध झाली आहे ती बनावट आहे, हें मठ येथील ह्या शिलालेखावरून उत्तम सिद्ध होतें. भोसले हें आडनांव शिर्के, मोहिते, मोरे, जाधव, वगैरे आडनांवांप्रमाणें महाराष्ट्रांत फार जुनें आहे. तसेंच शिर्के, मोरे ह्यांच्या-प्रमाणेंच भोसल्यांचें कुळ महाराष्ट्रांतील अस्सल आहे. त्याचा संबंध चितोडच्या रजपुतांशीं लावूं जाणें अशास्त्र आहे. शहाण्णव कुळींतील मराठे ज्यांना म्हणतात, ते जातिवंत क्षत्रिय होत. व ह्यांनाच मी मराठा किंवा महाराष्ट्र क्षत्रिय असें विशेषण मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत दिलें आहे. ज्याप्रमाणें मराठा ब्राह्मण म्हणजे महाराष्ट्रांतील ब्राह्मण त्याप्रमाणेंच मराठा क्षत्रिय म्हणजे महाराष्ट्रांतील क्षत्रिय, असा अर्थ समजावा. ह्या महाराष्ट्र क्षत्रियांनीं रजपुतान्यांतील रजपुतांशीं संबंध जोडण्यास धावूं नये कारण जातिनिर्णायक असे जे संस्कृत ग्रंथ आहेत त्यांत रजपूत

म्हणजे क्षत्रियांची एक कनिष्ठ प्रकारची जात आहे असें म्हटलें आहे. तेव्हां त्यांच्याशीं तादात्म्य पावण्याची उत्कंठा इकडील कांहीं महाराष्ट्र क्षत्रियांनीं यद्यपि दाखविली व उपजातींचें एकीकरण करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला तत्रापि त्यानें भोसल्यांचें कुळ चितोडच्या घराण्यापासून निपजलें, ह्या म्हणण्याला आश्रय मिळणें ऐतिहासिक रीत्या दुरापास्त आहे. शिवाय चितोडच्या घराण्याचें गोत्र, कुलदैवत, वगैरे पुष्कळ बाबी भोसल्यांच्याहून भिन्न आहेत, ही कथा निराळीच आहे.

महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व आडनांवें ( १ ) धंद्यावरून, ( २ ) खोडीवरून किंवा लकबीवरून, व ( ३ ) गांवावरून पडलीं आहेत. कित्येक आडनांवें गोत्रावरूनहि पडलीं आहेत. शिवाजीच्या वेळेस जे लाखो नवीन धंदे देशांतील लोकांना मिळाले त्यांवरून मराठी, संस्कृत व फारशी नवीं व जुनीं आडनांवें प्रचारांत आलीं. मंत्री, डबीर, झुंझार, वगैरे आडनांवें शिवाजीच्या वेळेपासून नवीन घराण्यांना पडलीं आहेत. मागें इ० स० १५४१ व १५५८ तील दोन लेख दिले आहेत त्यांत खालील नांवें व आडनांवें येतातः—

| | |
|---|---|
| १ माळ पाटेलु मुरकुटा | ३० बाबूजी |
| २ बांगो पाटेलु | ३१ नगोजी |
| ३ भोज पाटेलु | ३२ कळोजी |
| ४ ळिंगो पाटेलु | ३३ गाईसेठी |
| ५ तुक सेठी | ३४ जानोजी हेवा |
| ६ भिउजी काठिकी | ३५ कुक पाटेलु पोफळिया |
| ७ काळ पाटेलु मुरकट | ३६ आंबोजी |
| ८ जाउजी + + + | ३७ दानो पाटेलु |
| ९ + + + बातगुडा | ३८ जगो पाटेलु |
| १० जाखोजी | ३९ चांगो पाटीलु |
| ११ काउजी | ४० गोंद्य पाठीलु |
| १२ धाकोजी | ४१ काळ सेठी |
| १३ कान्हो पाटेलु | ४२ राम सेठी गुठाळु |
| १४ बाबाजी भाळेघरा | ४३ एळबो पाटेलु सुपगुडा |
| १५ राणोजी | ४४ परसा पाटेलु |
| १६ + + + बाणुबाडा | ४५ खेळ पाटेलु |
| १७ खेळोजी गुजर | ४६ राघो पाटेलु |
| १८ हरि गाउडा | ४७ बाबसेठी |
| १९ जैदी पाटेलु | ४८ एकसेठी बिगोवी |
| २० जैतोजी | ४९ आपो पाटेलु |
| २१ ळखमोजी | ५० पाको पाटेलु |
| २२ बाळोजी | ५१ हरि पाटेलु |

२३ + + + डकवणे
२४ मालोजी
२५ प्रसोजी
२६ भाई पाटेलु
२७ रकदेऊ
२८ सोनोजी
२९ मुधोजी
५२ भोया पाटेलु
५३ कुलुम सेठी काळोखा
५४ कोयाजी
५५ आलोजी मोरिया
५६ जान पाटेलु जाधव
५७ काळो पाटेलु सुपडा
५८ माद सेठी सेठीया
५९ वणगो माळी मेहतर्रा

ही याद ब्राह्मणेतर लोकांच्या नांवांची झाली. पुढील याद ब्राह्मणाच्या नांवांची आहे.

श्री

श्रीसद्गुरु बाळकृष्णस्वामी प्रसन्न ।। श्रीसत्यपूर्णगुरुभ्यो नमः ।। अथ मूळपुरुषविचारः ।। तालीख ।। श्रीमूळपुरुष लक्ष्मीधरभट्ट ॥ गोत्र उपमन्य वसिष्ठ ॥ कुळदेवता भैराळलिंग मंगसोळी ।। कोल्हापूर महालक्ष्मी ।। वरदेवता भुवनेश्वरी ॥ आराधि देवता सिद्धबिडेश ।। मंडपदवता शमी ॥ पुरोहित मंचभट्टी अन्योन्य ।। स्थळदेवता रामलिंग ।। मिर्जेला परमेश्वरी ।। श्रीशमनामीर ग्रामदेवता ॥ अडीशेरी कोठीस ॥ लक्ष्मीधर त्याचा पुत्र मंचिभट्ट ॥ त्याशि पुत्र २ दोघ ।। मूळवृत्ति ॥ तास १ बेडग ज्योतिष अष्टाधिकारी ॥ २ तार्दाळ, ३ तंदलगे, ४ कुलकरण देश हुकेरी ॥ वज्रचंडे पटेलकी देश मुर्तजाबाद ।। एकवाटा ।। दुसरा वाटा ।। ज्योतिष्य अष्टाधिकारी मुर्तजाबाद ॥ हवेली खेडीं १० ।। गृहस्ताचीं घरें ॥ इनामें ॥ आतां वाटा ।। वडील पुत्र बिडंभट्ट त्याशि मृगनहळ्ळीस ठेविलें ।। त्याचा वाटा पुरातन जाहला असे ॥ मृगनहळ्ळी ज्योतिष ।। हवेली ज्योतिष ।। इनामें गृहस्ताचीं घरें ।। इतुका वाटा ।। अथ यादि पुरुष ॥

१ लक्ष्मीधरभट्ट
|
२ मंचभट्ट
|
३ बिडाडिभट्ट
|
४ पद्मनाभिभट्ट
|
५ महिपतिभट्ट
|
६ सिद्दिभट्ट गोरे
|

## दुसरा वांटा.

१ लक्ष्मीधरभट्ट
|
२ मंचभट्ट
|
३ कायभट्ट
|
४ भैरंभट्ट
|
५ मायभट्ट
|
६ बापोबा
|

| | |
|---|---|
| ७ मल्लिभट्ट वृद्ध ७० | ७ कायभट्ट |
| ८ पिल्लंभट्ट | ८ मायभट्ट |
| ९ महिपतिभट्ट | ९ भैरंभट्ट |
| १० शिद्धिभट्ट | १० मायभट्ट |
| ११ नर्शिभट्ट | ११ गिरिभट्ट |
| १२ नामदेभट्ट | १२ तिंमणभट्ट |
| १३ तिंमणभट्ट | १३ रुक्माजी |
| १४ नामदेवभट्ट | १४ भानु |
| १५ रघुनाथभट्ट | १५ तिमप्पा |
| १६ हरिभट्ट | १६ नंदोबा |
| १७ रघुभट्ट | १७ डोंगरोबा |
| | १८ सावाजी |
| | १९ माणिकभट्ट |
| | २० रायभट्ट |

रघुनाथभट्ट बिन्न नामदेवभट्ट यानें सुलतान महंमद पादशाह सदर मेहर्बानी केली ॥ हक्क ॥ ०।० जमीन पाव चावर ॥ फरकी ॥ तेल ॥ नमक ॥ तसरीफ ॥ मुढा व दिवाली प्रताप तनखा चावडी रोज पैसे ४ चवुतरा कोतवाली ॥ पंचोत्री पैसे २ ॥

ही याद इ० स० १६२७ पासून १६५६ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महंमद आदिलशहाच्या वेळची आहे. त्यावेळीं रघुनाथभट्ट बिन्न नामदेवभट्ट, ज्योतिषी मिरजकर, हयात होता व त्याची मूळपुरुषापासून पंधरावी पिढी होती. म्हणजे रघुनाथभट्टाचे मूळ पुरुष, २२ वर्षे दर पिढीस धरिलीं असतां, इ० स० १३०० च्या सुमारास हयात होता असें दिसतें. त्यावेळेपासून १६५६ पर्यंतचीं ब्राह्मणांचीं कांहीं नांवें ह्या यादींत आहेत. ह्या

यादींत ( १ ) संस्कृत लक्ष्मीधर, ( २ ) महाराष्ट्री पिल्लंभट्ट, ( ३ ) देशी डोंगरोबा, व ( ४ ) कानडी तिमप्पा, हीं नांवें आलीं आहेत.

महाराष्ट्रांतील मराठ्यांचीं व ब्राह्मणांचीं नांवें १३०० पासून १६५६ पर्यंत कशीं होतीं त्याचा मासला वरील दोन यादींवरून पहातां येतो. त्यावरून असें दिसतें कीं ब्राह्मणांचीं नांवें ह्या तीन साडेतीनशें वर्षांत अंतररूपानें फारशी बदललीं नाहींत, बाह्य रूपानें मात्र किंचित् बदललीं आहेत. गांगो पाटेलु, राघो पाटेलु ह्याऐवजीं सध्यां आपण गंगू पाटील, राघू पाटील असें ह्मणतों. गांगो व राघो ह्या जुन्या रूपांचीं भाषेंतील इतर शब्दांप्रमाणें गंगू व राघू अशीं रूपें सध्यां झालीं आहेत. मोरो, विसाजी, वगैरे रूपें अद्यापहि प्रचलित आहेत. तेव्हां विशेषनामांची परंपरा १३०० पासून आजपर्यंत विनतूट चालत आली आहे हें स्पष्ट आहे.

आतां इ.स.१३००च्या पाठीमागें विशेषनामांची परंपरा अशीच विनतूट आहे कीं काय तें पाहूं. एतदर्थ मुसुलमानांच्या पूर्वी महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या जाधवांच्या वंशावळींतील नांवें खालीं देतों व त्यांची मुसुलमानी अमलाच्या वेळच्या नांवांशीं तुलना करतों.

## जाधवांची वंशावळ.

दृढप्रहार [ इ. स. ८५० ]
|
सेवणचंद्र
|
१ धाडियप्पा
|
१ भिल्लम
|
राजगी उर्फ श्रीराज
|
वाडुगि उर्फ वड्डिग
|
२ धाडियप्पा — २ भिल्लम [ शक ९२२, इसवी १००० ]
|
१ वेसुगि
|
३ भिल्लम [ शक ९४८, इसवी १०२६ ]
|
२ वाडुगि
|

२ वेसुगि
|
४ भिल्लम
|
२ सेवणचंद्र [ शक ९९१, इसवी १०६९ ]
|
परम्मदेव — १ सिंघण
१ सिंघण
|
मल्लुगि
|
अमरगांगेय — अमरमल्लुगि — ५ भिल्लम [ शक ११९३; इ. ११९१ ]

अमरगांगेय
|
गोविंदराज

अमरमल्लुगि
|
बल्लाळ
[ ५ भिल्लम ]
|
१ जैत्रपाळ ऊर्फ जैतुगि [ इ. स. ११९१–१२१० ]
|
२ सिंघण [ इ. स. १२१०–१२४७ ]
|
२ जैत्रपाळ ऊर्फ जैतुगि
|
कृष्ण ऊर्फ कन्हार ऊर्फ कंधार [ १२४७–१२६० ] — महादेव [ १२६०–१२७१ ]

कृष्ण ऊर्फ कन्हार ऊर्फ कंधार [ १२४७–१२६० ]
|
रामचंद्र ऊर्फ रामदेव [ १२७१–१३०९ ]
|
शंकर [ १३०९–१३१२ ]
|
मेहुणा हरपाळ [ १३१२–१३१८ ]

महादेव [ १२६०–१२७१ ]
|
आमण

ह्यांपैकीं रामचंद्र, शंकर, महादेव, गोविंद, बल्लाळ हीं नांवें अद्यापहि चालतात. जैत्रपाळ ह्याचें ऱ्हस्व जैतु, जैतुगि वर दिलेल्या मराठ्यांच्या नांवांपैकीं विसावें नांव जें जैतोजी त्याच्याशीं जुळतें. जैतोजी हें जैतो ह्या नांवाचें बहुमानार्थीरूप आहे. जैतुगि ह्या

शब्दांतील गि हा, जी बद्दल अपपाठ नसल्यास, बहुमानार्थी प्रत्यय तर खास आहे. प्रस्तुत खंडांतील पहिल्या लेखांकांतील कोनेरी हें नांव व ह्या वंशावळींतील कन्हार हें नांव एकच आहे. ब्राह्मणांच्या नांवांच्या यादींतील[६] सातवें नांव मल्लिभद्र व यादवांच्या वंशावळींतील मल्लुगि हे दोन्ही शब्द मल्ल, मल्लो, मल्लूपासून निघाले आहेत. राजगि हें अर्वाचीन रायजी, राजजी, राजाजी, ह्यांचें प्राचीन रूप आहे. वेसुगि व वाडुगि हीं वेसु व वाडु ह्यांचीं बहुमानार्थी रूपें आहेत. ह्यांचीं येसूजी व वाडोजी अशीं अर्वाचीन-रूपें व चा य होऊन होतात. गांगेय ह्याचें गांगो हें रूप प्रसिद्ध आहे. सिंघण, सेउण, वाडियप्पा, परम्मदेव व भिल्लम ह्या शब्दांचीं अर्वाचीनरूपें मात्र फारशी सध्यां प्रचलित नाहींत. ब्राह्मणांच्या यादींत विडाडि हें नांव आलें आहे. तें वीडाद्रि ह्या नांवाचें प्राकृतरूप आहे. हेमाद्रि ह्या शब्दाचें जसें हेमाडि, हेमाड, असें रूप होतें तसेंच हेंहि होतें. मराठ्यांच्या यादींतील चांगो व तेराव्या शतकांतील चांगदेव हीं नांवें एकच आहेत. सारांश, महाराष्ट्रांतील विशेषनामांची परंपरा नवव्या शतकापर्यंत जाऊं शकेल. रामदासस्वामींची वंशावळ नवव्या शतकापर्यंत गेलेली प्रसिद्ध आहे. तसेंच पटवर्धन, घैसास, वगैरे आडनांवेंहि अशींच जुनीं आहेत. तेव्हां विशेषनामांच्या प्रदेशांत मराठ्यांच्या इतिहासाचा प्रवाह आज एक हजार वर्षे सारखा अप्रतिहत चालत आला आहे. मुसुलमानी अमलांत मेहरबान्, अजम, वगैरे उपपदें ब्राह्मण व मराठे ह्यांच्या नांवांपाठीमागें लागत, परंतु मराठशाही पुनः झाल्यावर राजश्री, राजमान्य, हे जुने मायने पुन्हां उदयास आले. प्रस्तुतकाळीं मिस्टर, सर, वगैरे शब्द महाराष्ट्रांतील लोकांच्या नांवां-मागें हमेश लागलेले दिसतात. कांहीं फारशी विशेषनामें घेण्यापलीकडे विशेषनामाच्या प्रदेशांत मुसुलमानी अमलांत म्हणण्यासारखी ढवळाढवळ झाली नाहीं. परंतु कांहीं फारशी नांवें प्रचारांत आलीं ही लहानसान गोष्ट नव्हे. उद्यां एखाद्या भटानें आपल्या मुलाचें नांव टॉमस किंवा वुइल्यम ठेविलें तर तें जितकें विलक्षण दिसेल तितकींच फिरंगु, दर्याजी, वगैरे नांवें प्रथम ठेवतांना दिसलीं असतील. हीच टीका आडनांवांनाहि अशीच लागू करतां येईल.

( १० ) प्रस्तुत खंडांत छापिलेल्या पत्रांसंबंधानें चवथी विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे गांवें, खेडीं, प्रदेश, नद्या, प्रांत, तालुके, इलाखे, थडी, देश, ह्यांच्या नांवाची आहे. मुसुलमानांच्या पूर्वी व वेळीं ह्यांचीं नांवें कशीं होतीं व ह्यांच्या हद्दी कोठवर होत्या, ह्याचा विचार इतका महत्त्वाचा आहे कीं, महाराष्ट्राचा मध्ययुगीन व शिवकालीन इतिहास त्याच्या शिवाय दुर्बोध राहील. परंतु, पुढील एक दोन खंडांत कांहीं फारशी लेख यावयाचे आहेत ते छापून झाल्यावर ह्या मनोरंजक व बोधप्रद प्रकरणावर खुलाशानें लिहिण्यास सोईचें पडेल.

( ११ ) शिवकालीन पत्रव्यवहारासंबंधीं सामान्य विचार येथपर्यंत झाला. आतां ह्यापुढें प्रस्तुत खंडांत छापिलेल्या शिवाजीच्या प्रत्येक पत्रासंबंधानें बाकींच्या कांहीं बाबी-विषयीं विशेष माहिती नमूद करितों.

[ लेखांक १ व २ ]. हे दोन्हीं लेखांक अस्सल आहेत. ह्या दोहोंतहि शिक्का व मोर्तब फारशी आहेत. षाहनूरगादअली दियानतराव असा शिक्क्याचा पाठ मीं छापील पत्रांत दिला आहे, परंतु तो चुकला आहे. खरा पाठ दियानतराव बंदेहईआली आदिलशाह् असा आहे. ह्या दुसऱ्या पाठाचा अर्थ आली आदिलशाहाचा सेवक दियानतराव असा होतो. मुसुलमानांची ही शिक्क्याची फारशी पद्धत शिवाजीनें उचलली. शिवाजी व त्याचे कामगार ह्यांनीं फारशीच्या ऐवजीं मराठी व संस्कृत भाषा वापरली इतकेंच. महंमद आदिलशाहा १५ नोव्हेंबर १६५६ त वारला. व त्याचा मुलगा आली आदिलशहा गादीवर आला. ह्या दोघांच्या कारकीर्दीत दियानतराव विजापुरास दफ्तरदारीच्या कामावर होता. ह्याची जन्मभूमि चंदन किल्ल्याजवळील ओझर्डे गांव होतें. हें गांव महंमद आदिलशहानें आपल्या मर्जीतला जो नूरखान त्यास दिलें. तें चंद्रराव मोरे ह्याचें राज्य घेतल्यावर शिवाजीनें चंद्ररावाच्या राज्यांतील गांव म्हणून काबीज केलें. ही खबर दियानतरावास कळतांच त्यानें हें गांव आपलें वतनस्थळ आहे म्हणून निळो सोनदेवास पत्रें लिहिलीं. हीं पत्रें १६५६ च्या नोव्हेंबरांत महंमदशहा वारल्यावर लिहिलीं. ह्यावरून चंद्रराव मोऱ्यांचें राज्य शिवाजीनें घेऊन १६५६ च्या नोव्हेंबरांत थोडेच महिने झाले होते असें दिसतें. चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत चंद्रराव मोऱ्यावर शिवाजीनें १६५५ च्या एप्रिलपासून १६५६ च्या मार्चापर्यंत केव्हांतरी स्वारी केली, असें मीं लिहिलें आहे. आतां ह्या पत्रांवरून असें नक्की म्हणतां येतें कीं १६५६ च्या मार्चांत शिवाजीनें चंद्ररावाचें राज्य घेतलें. १६५५ च्या नोव्हेंबरापर्यंत महाबळेश्वरास सडकून पाऊस असतो व त्या सुमारास तें स्थान मोहीम करण्यास अशक्य असतें. १६५५ च्या नोव्हेंबरानंतर उघाड झाल्यावर शिवाजीनें मोऱ्यावर स्वारी केली व त्याचा सर्व प्रांत १६५६ च्या मार्च एप्रिलपर्यंत काबीज केला. येणेंप्रमाणें ह्या पत्रांवरून शिवाजीच्या एका मोहिमेचा काळ पक्का ठरला.

महंमद आदिलशाहा ४ नोव्हेंबर १६५६ त वारला, असें डफ म्हणतो. परंतु ज्याअर्थीं तो २६ मोहरम १०६७ हिजरीस वारला, त्याअर्थीं १५ नोव्हेंबर १६५६ हीच त्याच्या मरणाची खरी तारीख समजली पाहिजे. ग्रांट डफनें २६ मोहरम बद्दल १६ मोहरम तवारिखेंत वाचलें असें दिसतें.

ह्या पत्रांवरून विजापूरचे आदिलशाहा, जाउलीचा चंद्रराय मोरे व शिवाजी राजे भोसले, ह्या तिघांचा १६५६ त कोणत्या प्रकारचा संबंध होता तें समजतें. जाउलीचा चंद्रराय मोरे वस्तुतः विजापूरच्या आदिलशाहांचा मांडलिक होता. शिवाजी राजे भोसले हा आदिलशाहाचा सरदार जो शहाजी राजे भोसले त्याचा मुलगा असून, ह्यानें इ० स० १६४३ पासून १६५६ पर्यंत घाटमाथ्यावर स्वतंत्र सत्ता स्थापण्याचा उपक्रम केला होता. ही सत्ता पुण्यापासून रोहिडखोऱ्यापर्यंत स्थापिल्यावर शिवाजीच्या प्रांताची हद्द चंद्रराय मोऱ्याच्या राज्याच्या हद्दीला येऊन भिडली. चंद्रराय मोरे दिसण्याला यद्यपि आदिलशाहाचा मांडलिक होता, तत्रापि अलीकडील दहा पांच वर्षांत शिवाजीचें व इतर बंडखोरांचें अनुकरण करून तोहि स्वतंत्रपणेंच वागूं लागला होता चंद्ररायाचें हें स्वतंत्र वागणेंच

त्याच्या नाशाला कारण झालें. शिवाजी बोलून चालून स्वतंत्र बंडखोर बनला होता आणि त्याच्या प्रांताला भिडून दर्शनी परतंत्र व वस्तुतः स्वतंत्र अशा चंद्ररायाचा प्रांत होता. स्वतंत्रपणें वागण्याचा उपक्रम केल्यामुळें व आदिलशाहीशीं संबंध अजीबात तोडून न टाकल्यामुळें चंद्ररायाची स्थिति अगदीं निराश्रित अशी झाली होती. अशा निराश्रित स्वातंत्र्येच्छु संस्थानिकाची शिवाजीशीं गाठ पडून, विजापुरांतील बलिष्ठ सत्तेचा आश्रय तुटल्यामुळें, चंद्ररायाचा नाश झाला. त्यामुळें विजापुरांतील आदिलशाहांना राग किंवा दुःख बिलकूल झालें नाहीं. उलटें, एक शिरजोर स्वातंत्र्येच्छु संस्थानिक नष्ट झाला हें पाहून, त्यांना प्रायः समाधानच वाटलें. नाहींतर विजापुरांतील सर्वश्रेष्ठ कारभारी जो दियानतराव तो शिवाजीला चंद्ररायासंबंधानें असें शांततेचें पत्र न लिहिता. विजापुरचा मांडलिक व संस्थानिक जो चंद्रराय मोरे त्याचा प्रांत शिवाजीनें घेतला, ह्या कृत्याचा अर्थ विजापूरच्या पातशाहीवर शिवाजीनें हल्ला केला असा वस्तुतः होतो. हा हल्ला झाला असतां, विजापुरानें शिवाजीवर चालून जाऊन त्याला नेस्तनाबूद करावयाचें. परंतु तसें कांहीं एक न करतां, चंद्ररायाचा नाश झाला असतां, शिवाजीनें घेतलेल्या प्रांतांतील कोणते गांव चंद्ररायाचे व कोणते विजापुरकरांचे ह्या विषयीं विजापुरचा सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी जो दियानतराव तो शिवाजीचा मुजुमदार जो निळो सोनदेव त्याशीं वाटाघाट करतो. ह्या सामोपचाराच्या वाटाघाटीवरून असें अनुमान निघतें कीं, शिवाजीची स्वतंत्र सत्ता विजापुरकरांना ह्या वेळीं मान्य झाली होती व विजापुरच्या शिरजोर संस्थानिकांना शिवाजीनें मारिलें असतां विजापुरकरांना त्याचें कांहींच वाटत नसे. ते शिवाजीच्या हालचालीकडे लक्ष एवढ्यापुरतेंच देत कीं त्यानें आपल्या प्रांतांत कांहीं गडबड करूं नये. १६५६ पर्यंत शिवाजीनें मावळांत व कोंकणांत जी धामधूम चालविली होती ती बंद करण्याला विजापूरकरांनीं म्हणण्यासारखी कांहींच खटपट कां केली नाहीं त्याचें बिंग हें आहे. अहमदनगरची निजामशाही बुडाल्यावर तिची वांटणी दिल्ली व विजापूर येथील पातशाहांनीं केली. पैकीं विजापूरच्या वांटणीस मावळांतील व कोंकणांतील जो नवीन प्रांत आला त्यांत १६५६ पर्यंत शिवाजीनें खबडब चालविली होती. ह्या प्रांतावर विजापूरचा जसा अम्मल बसावा तसा बसला नव्हता व तेथील संस्थानिक व अधिकारी विजापूरच्या अंकित जसे व्हावे तसे झाले नव्हते. ह्या बेबंद संस्थानिकांना, किल्लेदारांना व अधिकाऱ्यांना शिवाजीनें नेस्तनाबूद केलें, हें विजापूरच्या मुत्सद्यांना एका प्रकारें इष्टच वाटलें. बेबंद व शिरजोर संस्थानिकांचा व किल्लेदारांचा शिवाजीनें नाश केल्यावर, शिवाजीची व्यवस्था लावतां येईल असा ह्या मुत्सद्यांचा अंतस्थ हेतू होता. ह्यामुळें १६५६ पर्यंत शिवाजीच्या विरुद्ध मोहीम करण्याचा उपक्रम विजापूरच्या मुत्सद्यांनीं केला नाहीं. परंतु १६५६ नंतर विजापूरच्या मुळच्या वांई, कऱ्हाड वगैरे प्रांतांत जेव्हां शिवाजी शिरूं लागला, तेव्हां अफजलखानाला शिवाजीवर पाठविणें विजापूरकरांना अवश्य झालें. अफजलखानाच्या मोहिमेचा काय परिणाम झाला हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. ह्या १६५६ पर्यंतच्या हालचालीवरून असें दिसतें कीं विजापूरच्या मुत्सद्यांचीं मनें शिवाजीनें उत्तमोत्तम पारखिलीं होतीं.

( लेखांक ३, ४, ५, ६, ७, १४, १५, १६, १७, ५४, ५५, ५६, ५७, ७७, ७८, ७९, ८० ). शहाजी, शिवाजी, व शाहू ह्यांस पाठविलेलीं हीं पत्रें अस्सल नाहींत; नक्कल आहेत व मूळ नसून भाषांतर आहेत. हीं भाषांतरें शिवाजीच्या वेळेस केलेलीं नसून, अलीकडे कोणी तरी केलेलीं आहेत हें ह्या पत्रांच्या भाषेवरून स्पष्टच होतें. शिवाय मूळ फारशींचीं हीं बरावर भाषांतरें आहेत असेंहि नाहीं, मुसुलमानधर्मरक्षक हें विशेषण भाषांतरकारानें शिवाजी व शाहू यांस दिलें आहे. परंतु तें वस्तुतः दिल्लीच्या पातशाहांचें विशेषण आहे. भाषांतरकारांस ही गोष्ट समजली नव्हती, कारण हा भाषांतरकार प्रायः इसवीच्या एकोणिसाव्या शतकांतला असून, तो विशेष चिकित्सक नव्हता. ह्या सर्व पत्रांत दिलेल्या जुलुसी सनांवर व तारखांवर माझा यत्किंचित्‌हि भरंवसा नाहीं. तेव्हां ह्या पत्रां-संबंधानें येथें जास्त कांहीं लिहीत नाहीं. मूळ फारशी पत्रें साताऱ्यास आहेत म्हणून कळतें तीं उपलब्ध झाल्यावर त्यांच्यासंबंधीं जें बोलावयाचें तें बोलावें हें इष्ट आहे.

( लेखांक ८ ) हें पत्र अस्सल आहे व हें १६६८ नंतर लिहिलें आहे. कारण, सुरतेस फ्रेंच लोकांनीं आपली पहिली वखार १६६८ त स्थापिली. शिवाजीनें १६७० त सुरतेवर स्वारी केल्यानंतर म्हणजे १६७० च्या अक्टोबरानंतर १५ रबिलावलीं म्हणजे १६७१ च्या जुलईत हें पत्र लिहिलें आहे. मुशे डुरो म्हणजे Monsieur Duroc ह्यावेळीं सुरतेच्या फ्रेंच वखारीचा मुख्य एजंट होता. ह्या पत्रावरून असें दिसतें कीं, त्या वेळचे फ्रेंच व्यापारी शिवाजीशीं सलोख्यानें वागत. ह्याच कारणास्तव सुरतेच्या स्वारींत शिवाजीनें फ्रेंच लोकांना स्नेहानें वागविलें व फ्रेंचांनींहि शिवाजीच्या लोकांशीं स्नेहाचें वर्तन केलें. फ्रेंच लोकांनीं शिवाजीच्या लोकांशीं उद्धटपणा केला नाहीं ह्याबद्दल ग्रांट डफ फ्रेंचांना दोष देतो. " The French purchased an ignominious neutrality by permitting Sivajee's troops to pass through their factory. ( duff Chap. VIII ). शिवाजीचा फ्रेंच लोकांना आश्रय होता म्हणून फ्रेंचांनीं शिवाजीच्या बाजारबुणग्यांशीं व सैनिकांशीं तक्रार केली नाहीं, ही गोष्ट डफला माहीत नव्हती. शिवाय, हिंदुस्थानासारख्या परराष्ट्रांत येऊन फ्रेंचांनीं मराठ्यांशीं भांडलें पाहिजे होतें, असा जो डफनें ध्वनि काढला आहे, त्याला कोणत्याहि नीतीचा आधार डफने दिला नाहीं. एकंदरींत न्याय आणि नीति ह्यांना सोडून डफनें हें विधान केलें आहे, हें उघड आहे. डफनें मराठ्यांचा इतिहास निःपक्षपातानें लिहिला आहे, असें समजणाऱ्यांनीं ह्या विधानाचा विचार करावा.

फ्रेंच कंपनीचीं ह्यावेळचीं दफ्तर मराठ्यांच्या इतिहासाला कांहींशीं उपयोगी पडतील. पारिसांत मराठ्यांच्या संबंधींचे कागदपत्र आहेत असें कळतें.

ह्या लेखांत, ( १ ) अज् जाबती कपीतानें फ्रांशेश्, ( २ ) मुक्काम पेठ रायबाग, ( ३ ) बंदर ( ई ) राजपूरी व ( ४ ) बंदर ( ई ) सुरतेसी, हे शब्दप्रयोग ( १ ) फ्रेंच कप्तानाच्या अधिकाराखालीं असणारा कलाल, ( २ ) रायबागच्या पेठेंत रहाणारा, ( ३ ) राजापूरच्या बंदरांत, व ( ४ ) सुरतेच्या बंदरास ह्यांबद्दल योजिले आहेत. तसेंच,

सराफराजनामा व वर्तणूक हीं नामें नपूंसकलिंगी योजिलीं आहेत. साहेब वैभव लेहावया आज्ञा केली पाहिजे हें फारशींचें हुबेहूब भाषांतर आहे व साहेब हा प्रथमांत कर्ता फारशी-तल्याप्रमाणेंच योजिला आहे. ( १ ) शीरदीदे ठेवणें, ( २ ) सरफराज होणें, ( ३ ) रवाना करणें, ( ४ ) आरीफ असणें, हे प्रयोगहि फारशी आहेत. सातव्या पृष्ठाच्या पहिल्या ओळींतील पहिलें हा शब्द पूर्वीं ह्याअर्थीं अव्वल ह्या फारशी शब्दाबद्दल घातला आहे.

पहिल्या व दुसऱ्या लेखांचें मोडी अक्षर जाड ढोबळ आहे. फारशी दप्तरांत मराठी मोडी अक्षर असेंच ढोबळ लिहीत. ह्या आठव्या लेखांकाचें मोडी, कानडी लोक मराठी मोडी लिहीत त्या प्रकारचें आहे. हें मोडी ढोबळ नसून वेलांट्यांच्या फरफाट्या ह्यांत अतोनात आहेत. ह्या पत्रांत म्हणोनु, होउनु, वगैरे शब्द आहेत. ह्या पत्रावर रुपेरी बेग-डांचे ठिपके आहेत. ह्या पत्रांतील सालीं सोमनाथपंत डबीर ह्याचा मुलगा निळो सोमनाथ डबीरीवर होता असें दिसतें.

( लेखांक ९ ) हें पत्र अस्सल आहे. अक्षर पहिल्या लेखांकांतल्यासारखें जाडें घोस-दार आहे. निळो सोनदेउ व रखमाजी शिवदेऊ शिवाजीला साहेब ह्या शब्दानें संबोधतात. त्याअर्थीं व इतर पत्रांत हाच शब्द योजिला असल्यानें, शिवाजीचे कारभारी शिवाजीस साहेब या संज्ञेनें संबोधीत असत हें उघड आहे. साहेब म्हणजे His Majesty.

ह्या लेखांकाची तारीख ठरविणें बरेंच घोटाळ्याचें आहे. ह्यासंबंधीं विस्तारानें विवे-चन मुख्य प्रस्तावनेंत करावयाचें आहे. हें पत्र खबरनविसाच्या दप्तरांतील आहे.

( लेखांक १० ) हें पत्र अस्सल आहे. हें पत्र सरंजामी म्हणजे ज्याला सध्यां रेव्हेन्यू म्हणतात त्या दप्तरांतील आहे. अफजलखान व फाजलखान ह्यांना पराजित केल्याच्या सुमारास शिवाजीनें नवे कारभारी केले. त्याच वेळीं निळो सोनदेवास मजमूदार नेमिले.

१६६० च्या नोव्हेंबराच्या पूर्वीं मोरोपंत पेशवे त्रिंबक व शिवनेर हे औरंगझेबाचे किल्ले घेण्यांत गुंतला होता. तसेंच, ह्या सुमारास सुरगिरी म्हणजे देवगिरी म्हणजे दौलता-बाद म्हणजे औरंगाबाद घेण्याचा शिवाजीचा विचार होता.

हें पत्र बावडेकरांच्या दप्तरांतील अत्यंत महत्त्वाचें आहे. निळो सोनदेव यास मजमू-दार नेमिल्याचा हा तह म्हणजे निश्चयलेख आहे. डफ आपल्या इतिहासाच्या सातव्या भागांत अबाजी सोनदेव यास मजमू दिली म्हणून म्हणतो. परंतु तें ह्या पत्रावरून निराधार आहे असें दिसतें.

( लेखांक ११ ) हें पत्र अस्सल आहे. ह्यांत अफजलखान अशीं अक्षरें स्पष्ट आहेत. अबदुल, अबदला वगैरे अफजलखानाचीं नांवें बखरींतून व पवाड्यांतून आढळतात तीं अपभ्रष्ट आहेत.

हिंदू व मुसुलमान ह्यांचीं इनामें जशींचीं तशीं चालवावीं असें ह्या पत्रांत म्हटलें आहे.ह्यावरून जिंकलेल्या प्रांतांतील हिंदूंच्याप्रमाणेंच मुसुलमानांचीं इनामें शिवाजी चालवी असें दिसतें.

हें पत्र सरंजामीपैकीं आहे. ह्यावर श्रीकार नाहीं.

( लेखांक १२ ) हें पत्र अस्सल आहे. मसहुल हजरती=मशहूर अल्हजरत्. मशर=प्रसिद्ध, मान्य. अल्=चा. हजरत्=राजा, स्वामी, साहेब. मशहुरल हजरत=राजमान्य. येणेंप्रमाणें ह्या पत्रांत राजमान्य हा अर्थ एकदां मराठींत व एकदां फारशींत असा दोनदां व्यक्त झाला आहे. मराठींतील राजमान्य राजश्रीप्रमाणें मशहुरल हजरत् हा फारशींतील मायना आहे. तो तीन साडेतीनशें वर्षे प्रचारांत असल्यामुळें, मराठी राजमान्य हीं अक्षरें घालून शिवाय तोहि घालीत असत. ह्या शब्दांचा अर्थ प्रायः सर्व लोकांना कळत नसे. शब्द योजण्याचा मात्र सर्वत्र परिपाठ होता.

१६६३ च्या एप्रिलांत शाहिस्तेखान चाकण घेऊन पुण्यास येऊन राहिला होता. पुण्यास आल्यावर शाहिस्तेखानानें सिंहगडास फितुर केला. ही बातमी शिवाजीस कळतांच, त्यानें मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार ह्यांस राजगडाहून सिंहगडास जाण्यास हुकूम केला व बरोबर तान्हाजी मालुसऱ्यास नेण्यास सांगितलें. नंतर थोडक्याच दिवसांत शिवाजीनें शाहिस्तेखानावर पुण्यांत छापा घातला. शाहिस्तेखान पुण्यांत येण्याच्या पूर्वी शिवाजी कोंकणांत नामदारखानावर जाणार होता. परंतु सिंहगडीं फितवा झाल्यामुळें तो बेत तकूब करावा लागला.

ह्या पत्राला जी टीप दिलेली आहे, ती बावडेकरांच्या एका जुन्या पिढीजाद कारकुनानें मूळ पत्राच्या पाठीवर लिहिली आहे. तींत ह्या पत्राचें अक्षर निळोपंताचें असावें असें म्हटलें आहे. परंतु, निळोपंताला शिवाजीनें पाठविलेलें पत्र निळोपंताच्या हातचें कसें असूं शकेल ? निळोपंताच्या वळणावर दुसरें कोणाचें अक्षर असेल.

( लेखांक १३ ) पत्र अस्सल आहे. ह्या पत्राच्या सहाव्या ओळींत "पाठवणें" ह्या शब्दाच्यापुढें "व आणखी कांहीं नवल अपूर्व वर्तमान असेल तेंहि लेहोनु पाठवणें," हें वाक्य घालावें.

जगन्नाथपंत व त्रिंबक वेंकटेश हे हुजूरचे कारकून होते. जगन्नाथपंताचें नांव शिवाजीच्या बखरींत एक दोन स्थळीं आलेलें आहे.

हें पत्र दिल्लीस जाण्याच्या अगोदर लिहिलें आहे. शिवापट्टण म्हणजे पुण्याजवळचें शिवापूर. मिर्जा राजा जयसिंग पुरंधराखालीं होता व त्याच्या पश्चिमेस शिवाजी शिवापुरास होता.

पत्राला श्रीकार नाहीं.

( लेखांक १८ ) हें पत्र अस्सल आहे. शिवाजी विठ्ठल दत्तो सुभेदारास "दंडवत" लिहितो, रामराम लिहित नाहीं. सरनोबत=सेनापति. पत्राला श्रीकार नाहीं.

( लेखांक १९ ) लेख अस्सल आहे. श्रीकार नाहीं. दिवाळ=भिंत. चिंतामणी=गणपति. जो कोट घेण्याचा ह्या पत्रांत तह केला आहे त्याचें नांव दिलें नाहीं. गणपतीचे देवळास व कुणबिणींच्या घरांस भिंती व कोनाडे करून कोट घेऊन द्यावा, असा पत्राचा आशय आहे. परंतु कोटाच्या नांवाचा उल्लेख केला नाहीं.

( लेखांक २० ) हें पत्र अस्सल आहे. ह्यावर जिजाबाईचा फारशी शिक्का आहे, तो बहुशः "जिजाआऊ वालिदा इ राजा सीवाजी," असा असावा.

( लेखांक २१ ) पत्र अस्सल आहे. दस्तुर निळो सोनदेवाचें आहे. शिक्का अष्टकोनी असून त्यांत कोठेंहि चंद्रसूर्य नाहींत. शिक्क्याच्या ओळी पांच आहेत व अक्षरें अगदीं स्पष्ट आहेत. जाबिता तह=आज्ञापत्र.

( लेखांक २२ ) वरीलप्रमाणें.

( लेखांक २३ ) पत्र अस्सल आहे. कृष्णाजी त्रिमळ, काशी त्रिमळ, विसाजी त्रिमळ व ह्या त्रिवर्गांची मातुश्री ह्यांच्याजवळ आग्र्याच्यापुढें मथुरेस शिवाजीनें संभाजीस ठेविलें. कृष्णाजी त्रिमळ शिवाजीबरोबर आधींच आला. काशी त्रिमळ व त्याची आई संभाजीला घेऊन आली. आणि विसाजी मथुरेसच राहिला. विश्वासराऊ हा किताब कृष्णाजीपंताला शिवाजीनें दिला असें दिसतें. बखरींत एक लाख होन बक्षीस दिलें म्हणून म्हटलें आहे तें अतिशयोक्त आहे. वर्क सनद बक्षीस रक्षखाना=खजीन्यांतून पैशाचें बक्षीस देण्याची सनद. श्रीकार नाहीं.

( लेखांक २४ ) लेख अस्सल आहे. मध्यें कित्येक ठिकाणीं फाटला आहे. श्रीकार नाहीं.

( लेखांक २५ ) लेख अस्सल आहे. फाटला आहे. श्रीकार नाहीं.

( लेखांक २६ ) लेख अस्सल आहे. शिवाजीनें नारळ व सुपारी ह्यांचा मक्ता केलेला होता असें दिसतें. श्रीकार नाहीं.

( लेखांक २७ ) लेख अस्सल आहे. शिवाजीच्यावेळीं मिठाचा सरकारी मक्ता होता. ह्या पत्राच्या पाठीवर खालील पद बाळबोधींत आहे:—

दारें आडकुनी गौळनी । विकु गेली सांजवणी ।
मागें कृष्णाची करणी । काये करीता जाला ।.
सवे दोनी चारी मुलें । त्यासी हळुहळु बोले ।
लोनी खाल तरी यारे मज सांगातें ।
येसें विचारून हरी । प्रवेसला येके घरीं ।
नेणो कवणिये कुसीभीतरीं । संचरला ।
द्वारें तैसींचि कवाडें आपण भीतर लेकडे ।
धुंडाळीतु असे डेरे खाई गोरसाचे ।
कृष्ण चोरटा गे माये चोरटा गो ।
ऐसा चोरटा श्रीपति । जो नकळे वेदा श्रुती ।
तो म्या लोनी खाता निऊता देखिला सये ॥ १ ॥
पायी होत्या घागरिया । सोडुनिया ठेविल्या ।
अटु वहुने केले । वाजती म्हणुनी हळुचि घालिती पाउलें
कवणु कवणासी नो बोले । लोनियाचे माथुलें ।

आणिती पाठे वाटी । तूप होतें अळसले ।
दूध पीती त्रिरजलें । ठेविती झाकुनि । आजि बरवें फावलें ।
बहुता दिसी पोट धाले । अवघें कृष्णासी मानवलें ।
तुझा बरवा सगु कृष्णु ! ॥ २ ॥
शिंका होतिया घागरिया । त्या ठेविल्या माजघरीं ।
जेथ आळमाळू अंधारी तेथ ठेवितातु ।
दयावरील स्वीळरी । हळुचि काढिती कुसरी ।
तें घालिती कृष्णाकरीं । हरि स्वीकारी जो ।
मग बैसोनि येकवटा । काये बोलले सुभट ।
घास घेती मटमटा । खदखदा हासतां ।
अजी बरवें फावलें । बहुता दिसीं पोट धालें ।
अवघें कृष्णासी मानवलें । तुझा बरवा सगु ! ॥ ३ ॥
मग ते अळी । झडकारुनी हाकारिलीया ।
गौळणी माते येस्वदा धात्रोनि पाचारिलें तेथें ।
तुं जर म्हणसी लटिकें । आपुले पुत्राचे कौतुकें ।
अजी वहुतेका दिसा । हरि सापडले ।
सवें वडजा वाकुडा । पेंदा सुदामा रोकडा ।
वाळो दोंदिल बोवडा । आणि आठवा कृष्णु ।
ऐसे बोलिली गोळणी । ते अइकिलें चक्रपाणी ।
साता जणा तेथ घेऊनी । गेला कवणीकडे ॥ ४ ॥
मग तीं कुडुपें उघडुनि । भीतर आलिया गौळणी ।
भोवते पहाती भवनीं । तेथ तव न दीसे कृष्णु ।
खांबीं पुसिले हात । तेथें लागलें नवनीत ।
येरी ऱ्हुदयीं विस्मित । चमत्कारु जाहाला ।
मग ती बोलिली येस्वदा । कोठें देखिलें गोविंदा ।
येरी भ्याली तिच्या शब्दा । कांहीं उत्तर नेदी ॥ ५ ॥
बोलिली गौळणी बाळा । प्रौढ साजणी त्या वो म्हणती ।
राजनि ! लोनी न समाये तुझे उतरडी ।
हांडोरी ती भली । तोंडवरी पानियाच्या घागरी । तेथें नवनीत ।
पानी तावनार डेरा । तो वा सांडतो सामोरा ।
तयावरील दुसरा । त्यासी जतन करीं ।
तुझे अंगणीचा आडू । क्षीरसागराचा पाडू ।
तो अमृताहूनि गोडू । दुधें भरला असे । कृष्णु चोर ॥ ६ ॥
मग त्या बोलिल्या चतुरा । दैव आलें तुझ्या घरा ।

कैसा येक खरा । केला वाडगाचि । तुझी नांदणुक पैसी ॥
चोरटे केले गे कृष्णासी । सांगे वेडिये नेणसी ।
तुज म्हणो वो काये ? ! जेव्हां हरिमुखीं अर्पिलें ।
म्हणुनि बहुत विस्तारलें । इतुकें कशानें साचलें ।
हें तु विचारी सये ।
कमळाकराचा दातारु । ने घे कवणाचा आभारु ।
कोटी शतगुणे विस्तारु । देतु असे ॥ ७ ॥

ह्या पदाचा कर्ता कोणी कमळाकर कवि आहे व ह्याची भाषा पंधराव्या शतकांतील किंवा सोळाव्याच्या पूर्वार्धांतील दिसते.

( लेखांक २८ ) लेख नक्कल आहे. परंतु शुद्ध आहे. मशरुल अनाम=लोकमान्य. मशहुरल हजरत=राजमान्य.

( लेखांक २९ ) लेख नक्कल आहे व अविश्वसनीयहि आहे.

( लेखांक ३० ) लेख नक्कल आहे.

( लेखांक ३१ ) नक्कल आहे, शुद्ध आहे. ग्रांट डफ ज्याला दर्यासागर म्हणतो त्याचें खरें नांव दर्यासारंग होतें.

( लेखांक ३२ ) अस्सल आहे.

( लेखांक ३३, ३४, ३५, ३६ ) अस्सल आहेत. ३४ व्या लेखांकांत यशवंतराव शहाजी हें नांव आलें आहे. यशवंतराव शिवाजीच्या समकालीन होता व त्याच्या बापाचें नांव शिवाजीच्या बापाप्रमाणेंच शहाजी होतें. शहाजी हें फारशी–मराठी नांव सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत रूढ झालें होतें.

शिवाजीनें पाठविलेल्या व शिवाजीला पाठविलेल्या ह्या ३६ पत्रांपैकीं लेखांक २८ अत्यंत महत्वाचा आहे. ह्या लेखांकांतील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत. हें पत्र शिवाजीनें सांगितलें व बाळाजी आवजीनें लिहिलें. ह्या पत्राची भाषा कारकुनी नसून साहेबी आहे. शिपाई लोकांनीं अमुक रीतीनें कां वागावें व अमुक रीतीनें कां वागू नये ह्याची फोड शिवाजीनें शिपायास करुन दाखविली आहे. हें पत्र केवळ आज्ञापत्र नाहीं. पत्रांत जरब अतोनात दाखविली आहे; परंतु ती शिपायांच्या हिताची आहे असें आंतील मजकूर वाचून शिपायांनाहि वाटावें असा ह्या पत्राचा रोख आहे. हा हुकूम कारकुनाचा नसून खुद्द साहेबाचा म्हणजे शिवाजीचा असल्यामुळें, सैनिकांच्या आदरास तो विशेष पात्र झाला असेल हें उघड आहे. ह्या पत्रांत मराठा व कुणबी असा भेद

( लेखांक ३७ ) नक्कल. कयाळनिशी=मापाऱ्याची कारकुनी.

( लेखांक ४० ) नक्कल. अस्सलांत प्रधानांचे शिक्के आहेत. शिवाजीचा जसा भूखनक्वी होता तसा संभाजीचा महेसदाम होता. छंदोगामात्य ही पदवी संभाजीनें ज्या इसमास दिली होती त्याचें मूळ नांव कविकलश होतें. छंदोगामात्य ह्या शब्दाबद्दल ग्रांट

डफ छंदगोमात्य असें लिहितो व ह्या शब्दाचा अर्थ Expounder of the Vedas, असा टापित करतो. परंतु ह्या दोन्ही गोष्टी चूक आहेत. शुद्ध शब्द छंदोगामात्य आहे व त्याचा अर्थ सामवेदाध्यायी प्रधान असा आहे. छंदोगामात्य म्हणजे सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी. छंदोगामात्य म्हणजे Expounder of the Vedas हा अर्थ डफनें कोठून आणिला ईश्वर जाणे ! ह्या जाड्या विद्वानांना अडचण म्हणून कोठेंच पडत नाहीं. ह्या इसमाची दुसरी पदवी कबिकलश होती असें डफ म्हणतो. ह्या शब्दांतील कलश ह्या शब्दावरून तत्कालीन मराठ्यांनीं कलुशा हें प्रख्यात विशेपनाम निर्माण केलें. फारशींत व उर्दूत कलुशा म्हणजे कुंटण असा अर्थ आहे. कविकलश ह्या नांवांतील कवि हीं अक्षरें गाळून कलश ह्या शब्दाचा कलुशा असा उच्चार थट्टेखोर व मत्सरग्रस्त लोक करूं लागले. कबिकलस हा काश्मीरी ब्राह्मण होता. विक्रमांकदेवचरितांत बिल्हणानें आपल्या पूर्वजांची राजकलस, ज्येष्ठकलस, मुक्तिकलस अशीं नांवें दिलेलीं आहेत. त्याच धर्तीचें हें कबिकलस नांव आहे. डफ म्हणतो त्याप्रमाणें ही पदवी नाहीं. येणेंप्रमाणें कविकलस व छंदोगामात्य ह्या दोन्हींसंबंधानें डफचीं विधानें निराधार व अज्ञानव्यंजक आहेत. कबिकलसाला पंडितराई दिली म्हणून डफ म्हणतो तेंहि निराधार आहे. कारण ह्या लेखांकाच्या खालील पहिली सही मोरेश्वर पंडितरायाची आहे. ह्या पत्रांत बाटविला हा शब्द आला आहे. भ्रष्ट=बाट्ट=बाट अशा परंपरेनें बाट हा शब्द मराठींत आला.

( लेखांक ४२ ) पत्र अस्सल आहे. १६९१ त संताजी घोरपडे सेनापति होता, मानसिंग मोरे हफ्त हजारी होता. धनाजी जाधव व हंबीरराव मोहिते हेहि सैन्यांत बड्या हुद्यावर होते. मल्हार दादाजी सरसुभेदार हें नांव मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. अमृतराव बिन तुकोराम निंबाळकर शिवाजीचा नातू होय. विठ्ठल गोपाळ सुभेदार प्रांत जाऊली, हा पुरुष त्यावेळच्या कुशल मुत्सद्यांत गणला जात असे. ह्याच्या शिक्क्यांत विठ्ठलस्य महाबुद्धेः अशीं अक्षरें आहेत.

( लेखांक ४९ ) याद नक्कल आहे. ह्या यादींतील हिंदु व मुसुलमान राजांचीं नांवें हव्या त्या अनुक्रमानें, हव्या त्या प्रांतांतील, हवीं तितक्या वर्षांचीं दिलेलीं आहेत. युधिष्ठिरापासून १७०७ पर्यंत कशी तरी याद आणून भिडविली आहे. मोगल बादशाहांची–बाबरापासून अवरंगझेबापर्यंतची–याद बिनचूक आहे, परंतु भोगवट्याचीं वर्षें चुकलीं आहेत ह्या यादीच्या शेवटीं अवरंगझेबाचें राज्य जाणार असें भाकीत त्यावेळीं हिंदुस्थानांत प्रचलित झालें होतें तें नमूद केलें आहे. ह्या लेखांकांतील हा भाग इतिहासकाराला अत्यंत महत्त्वाचा आहे.

( लेखांक ५३ ) १७०५ त धनाजी जाधव सेनापति, हंबीरराव मोहिते सरलष्कर, खंडोजी निकम समशेरबहादर, संताजी पांढरे, शरफन्मुलूख व नेमाजी शिंदे, असे सैन्यांतील बडे हुद्देदार होते. लेख अस्सल आहे.

( लेखांक ६०–६६ ) हे सात लेखांक अस्सल असून ह्यांत दुसऱ्या शिवाजीनें शाहूराजाच्या फितव्याचा प्रतिरोध करण्याची खटपट कशी केली तें लिहिलें आहे.

कैसा येक सरा । केला वाडगाचि । तुह्मी नांदणुक पैसी ॥
चोरटे केले गे कृष्णासी । सांगे वेडिये नेणसी ।
तुज म्हणो वो काये ? ! जेव्हां हरिमुखीं अर्पिलें ।
म्हणुनि बहुत विस्तारलें । इतुकें कशानें साचलें ।

कमळाकराचा दातारु । ने घे कवणाचा आभारु ।
कोटी शतगुणे विस्तारु । देतु असे ॥ ७ ॥

ह्या पदाचा कर्ता कोणी कमळाकर कवि आहे व ह्याची भाषा पंधराव्या शतकांतील किंवा सोळाव्याच्या पूर्वार्धांतील दिसते.

( लेखांक २८ ) लेख नक्कल आहे. परंतु शुद्ध आहे. मशरुल अनाम=लोकमान्य. मशहुरल हजरत=राजमान्य.

( लेखांक २९ ) लेख नक्कल आहे व अविश्वसनीयहि आहे.

( लेखांक ३० ) लेख नक्कल आहे.

( लेखांक ३१ ) नक्कल आहे, शुद्ध आहे. ग्रांट डफ ज्याला दर्यासागर म्हणतो त्याचें खरें नांव दर्यासारंग होतें.

( लेखांक ३२ ) अस्सल आहे.

( लेखांक ३३, ३४, ३५, ३६ ) अस्सल आहेत. ३४ व्या लेखांकांत यशवंतराव शहाजी हें नांव आलें आहे. यशवंतराव शिवाजीच्या समकालीन होता व त्याच्या बापाचें नांव शिवाजीच्या बापाप्रमाणेंच शहाजी होतें. शहाजी हें फारशी-मराठी नांव सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत रूढ झालें होतें.

शिवाजीनें पाठविलेल्या व शिवाजीला पाठविलेल्या ह्या ३६ पत्रांपैकीं लेखांक २८ अत्यंत महत्वाचा आहे. ह्या लेखांकांतील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत. हें पत्र शिवाजीनें सांगितलें व बाळाजी आवजीनें लिहिलें. ह्या पत्राची भाषा कारकुनी नसून साहेबी आहे. शिपाई लोकांनीं अमुक रीतीनें कां वागावें व अमुक रीतीनें कां वागूं नये ह्याची फोड शिवाजीनें शिपायास करुन दाखविली आहे. हें पत्र केवळ आज्ञापत्र नाहीं. पत्रांत जरब अतोनात दाखविली आहे; परंतु ती शिपायांच्या हिताची आहे असें आंतील मजकूर वाचून शिपायांनाहि वाटावें असा ह्या पत्राचा रोख आहे. हा हुकूम कारकुनाचा नसून खुद्द साहेबाचा म्हणजे शिवाजीचा असल्यामुळें, सैनिकांच्या आदरास तो विशेष पात्र झाला असेल हें उघड आहे. ह्या पत्रांत मराठा व कुणबी असा भेद केला आहे.

( लेखांक ३७ ) नक्कल. कयाळनिशी=मापाऱ्याची कारकुनी.

( लेखांक ४० ) नक्कल. अस्सलांत प्रधानांचे शिक्के आहेत. शिवाजीचा जसा भूखनवीस होता तसा संभाजीचा महेसदाग होता. छंदोगामात्य ही पदवी संभाजीनें ज्या इसमास दिली होती त्याचें मूळ नांव कविकलश होतें. छंदोगामात्य ह्या शब्दाबद्दल ग्रांट

डफ छंद्गौमात्य असें लिहितो व ह्या शब्दाचा अर्थ Expounder of the Vedas, असा टीपेत करतो. परंतु ह्या दोन्ही गोष्टी चूक आहेत. शुद्ध शब्द छंदोगामात्य आहे व त्याचा अर्थ सामवेदाध्यायी प्रधान असा आहे. छंदोगामात्य म्हणजे सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी. छंदोगामात्य म्हणजे Expounder of the Vedas हा अर्थ डफनें कोठून आणिला ईश्वर जाणे ! ह्या जाज्ज्व विद्वानांना अडचण म्हणून कोठेंच पडत नाहीं. ह्या इसमाची दुसरी पदवी कविकलश होती असें डफ म्हणतो. ह्या शब्दांतील कलश ह्या शब्दावरून तत्कालीन मराठ्यांनीं कलुशा हें प्रख्यात विशेषनाम निर्माण केलें. फारशींत व उर्दूत कलुशा म्हणजे कुंटण असा अर्थ आहे. कविकलश ह्या नांवांतील कवि हीं अक्षरें गाळून कलश ह्या शब्दाचा कलुशा असा उच्चार थट्टेखोर व मत्सरग्रस्त लोक करूं लागले. कविकलस हा काश्मीरी ब्राह्मण होता. विक्रमांकदेवचरितांत बिल्हणानें आपल्या पूर्वजांची राजकलस, ज्येष्ठकलस, मुक्तिकलस अशीं नांवें दिलेलीं आहेत. त्याच धर्तीचें हें कविकलस नांव आहे. डफ म्हणतो त्याप्रमाणें ही पदवी नाहीं. येणेंप्रमाणें कविकलस व छंदोगामात्य ह्या दोन्हीसंबंधानें डफचीं विधानें निराधार व अज्ञानव्यंजक आहेत. कविकलसाला पंडितराई दिली म्हणून डफ म्हणतो तेंहि निराधार आहे. कारण ह्या लेखांकाच्या खालील पहिली सही मोरेश्वर पंडितरायाची आहे. ह्या पत्रांत बाटविला हा शब्द आला आहे. भ्रष्ट=बाड्=बाट अशा परंपरेनें बाट हा शब्द मराठींत आला.

( लेखांक ४२ ) पत्र अस्सल आहे. १६९१ त संताजी घोरपडे सेनापति होता, मानसिंग मोरे हफ्त हजारी होता. धनाजी जाधव व हंबीरराव मोहिते हेहि सैन्यांत बड्या हुद्यावर होते. मल्हार दादाजी सरसुभेदार हें नांव मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. अमृतराव बिन तुकोराम निंबाळकर शिवाजीचा नातू होय. विठ्ठल गोपाळ सुभेदार प्रांत जाऊळी, हा पुरुष त्यावेळच्या कुशल मुत्सद्यांत गणला जात असे. ह्याच्या शिक्क्यांत विठ्ठलस्य महाबुद्धेः अशीं अक्षरें आहेत.

( लेखांक ४९ ) याद नक्कल आहे. ह्या यादींतील हिंदु व मुसुलमान राजांचीं नांवें हव्या त्या अनुक्रमानें, हव्या त्या प्रांतांतील, हवीं तितक्या वर्षांचीं दिलेलीं आहेत. युधिष्ठिरापासून १७०७ पर्यंत कशी तरी याद आणून भिडविली आहे. मोगल बादशाहांची—बाबरापासून अवरंगझेबापर्यंतची—याद बिनचूक आहे, परंतु भोगवट्याचीं वर्षे चुकलीं आहेत. ह्या यादीच्या शेवटीं अवरंगझेबाचें राज्य जाणार असें भाकीत त्यावेळीं हिंदुस्थानांत प्रचलित झालें होतें तें नमूद केलें आहे. ह्या लेखांकांतील हा भाग इतिहासकाराला अत्यंत महत्त्वाचा आहे.

( लेखांक ५३ ) १७०५ त धनाजी जाधव सेनापति, हंबीरराव मोहिते सरलष्कर, खंडोजी निकम समशेरबहादर, संताजी पांढरे, शरफन्मुल्ख व नेमाजी शिंदे, असे सैन्यांतील बडे हुद्देदार होते. लेख अस्सल आहे.

( लेखांक ६०–६६ ) हे सात लेखांक अस्सल असून ह्यांत दुसऱ्या शिवाजीनें शाहूराजाच्या फितव्याचा प्रतिरोध करण्याची खटपट कशी केली तें लिहिलें आहे.

( लेखांक ७१ ) ह्या लेखांकांत जातिवंत मराठ्यांचीं कुळें प्रारंभीं दिलीं आहेत. ह्या कुळांतील लोक आपल्या नांवापुढें राजे ही पदवी लावतात.

( लेखांक १६९, १७०, १७१ ) ह्या अस्सल लेखांत रामराजाची हकीकत आहे.

इतर लेखांविषयीं सध्यां विशेष कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. त्यांचा उपयोग संकलित वृत्तांत लिहितांना व इतर स्थलीं होणार आहे.

( १२ ) लेखांची विशेष माहिती दिल्यावर, आतां बावडेकरांची कुळकथा द्यावयाची. परंतु हें काम बावडे येथील मराठी शाळेचे हेडमास्तर रा० गोरे हे विस्तारानें स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें करणार असल्यामुळें, तें येथें न करणें हेंच इष्ट आहे.

---

# उपोद्घात.

आतांपर्यंत 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे' पांच खंड छापून प्रसिद्ध झाले. १८९८ सालीं पहिला खंड मीं स्वतःच्या खर्चानेंच छापून काढिला. पुढें लवकरच पुणें येथील चित्रशाळेच्या मालकांनीं चवथा खंड छापून प्रसिद्ध केला. मध्यंतरीं ग्रंथमाला-मासिकपुस्तकांतून दुसरा व तिसरा असे दोन खंड प्रसिद्ध झाले, व ते संपूर्ण झाल्यावर पांचवा खंडहि नुकताच पुरा झाला. आतां ह्या अंकापासून ८ व्या खंडास प्रारंभ करावयाचें योजिलें आहे. मधले दोन खंड म्हणजे सहावा व सातवा—दोघा तिघा सद्गृहस्थांनीं स्वतःच्या खर्चानें छापून प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. सहावा खंड श्रीमंत माधवराव विनायक किबेसाहेब व रा. रा. श्री. वि. आठल्ये ह्या दोन गृहस्थांनीं प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे व सातवा खंड प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानू यांनीं हातीं घेतला आहे. सहाव्या खंडांत इ. स. १७६१ पासून १७९६ पर्यंतचे व सातव्या खंडांत इ. स. १७४० पासून १७६१ पर्यंतचे लेख प्रसिद्ध होतील. हे सात खंड प्रसिद्ध झाले म्हणजे मराठ्यांच्या इतिहासांतील १७२८ पासून १७९६ पर्यंतचा भाग बराच व्यवस्थित झाला असें म्हणतां येईल. बाकी ह्या अवधींतील मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांची यथासांग पूर्तता होण्यास बराच काल लागेल हें उघड आहे. रा. रा. वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं लाविलेलीं मिरज मळ्यांतील पत्रें अद्याप बरींच छापून निघावयाचीं आहेत. तसेंच पुण्यांतील इनाम कमिटीच्या दप्तरांतील रा. ब. वाड यांनीं काढलेले वेंचे अजून बाहेर पडावयाचे आहेत. शिवाय मेणवली येथील नाना फडणीस यांचें दप्तर अद्याप जसेंच्या तसेंच अस्पृष्ट आहे. सारांश, १७२८ पासून १७९६ पर्यंतचा मराठ्यांचा इतिहास निःशंकपणें समाधानानें लिहितां येण्यास अद्यापि बरीच सामग्री जगापुढें आणण्याची

तजवीज केली पाहिजे. ही सामग्री बरीच, इतकेंच नव्हे तर, सडकून आहे हें तर सर्व-श्रुत आहे. तसेंच, सामग्रीच्या वैपुल्याच्या मानानें तिच्या प्रसिद्धीकरणाचें मान फारच कोतें आहे हेंहि तितकेंच सर्वश्रुत आहे. १८९८ पासून १९०२ पर्यंतच्या अवधींत मराठ्यांच्या इतिहासाच्या अश्रुतपूर्व साधनांचे एकंदर दहा भाग प्रसिद्ध झाले:—रा. रा. खरे यांचे माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीसंबंधाचे चार भाग; रा. रा. पारसनिस यांच्या ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रव्यवहाराचा एक भाग; व मीं छापिलेले पांच खंड. सबंद पांच वर्षांत इतकी थोडी सामग्री बाहेर यावी, ही कांहीं समाधानकारक स्थिति नाहीं. अज्ञात सामग्रीचे निदान पंचवीस तीस भाग तरी प्रसिद्ध झाले असते, म्हणजे इतिहासजिज्ञासूंचें कांहींसें समाधान झालें असतें. आतां इतकें खरें आहे कीं लिहिणें सोपें असतें व करणें तितकेंच कठिण असतें. ग्रंथ छापून काढावयाचे म्हणजे पैसे लागतात, व ग्रंथाची छपाईदेखील निघण्यापुरते ग्राहक मिळत नाहींत, ही मुख्य ओरड आहे. व ही ओरड सर्वस्वीं खरी आहे. परंतु ही ओरड हजार पांचशें वर्षांत मिटेल असा संभव क्वचित् दिसतो. इतिहासाच्या सामग्रीचे ग्रंथ कोणत्याही देशांत हजारोंनें किंवा लाखोंनें खपले आहेत असा प्रकार माझ्या तरी ऐकण्यांत किंवा वाचण्यांत कोठें आला नाहीं. तेव्हां आपलें हें महाराष्ट्रच तेवढें ह्या महासिद्धान्ताला अपवादक होत नाहीं; म्हणून मनाला वृथा शीण करून घेण्यांत अर्थ कोणता? मराठ्यांचा इतिहास सशास्त्र बनला पाहिजे हा जर मुख्य हेतु आहे, तर तो साध्य करून घेतांना कोणतीही अडचण जुमानतां कामा नये. पैसे नाहींत, गिऱ्हाईक नाहीं, गुणग्राहक नाहींत, अशी वस्तुस्थिति यद्यपि असली तत्रापि साध्य हेतूच्या आड ती कां यावी हा प्रश्नच आहे. सबंद महाराष्ट्रांत ऐतिहासिक साधनांचे भोक्ते जर दोन तीनशेंच आहेत, तर तेवढ्यापुरत्याच तीनशें प्रती काढल्या म्हणजे विशेष खर्चांतही येण्याचें कारण नाहीं. तात्पर्य, कसेंहीकरून व वाटेल ती तजवीज योजून मराठ्यांच्या इतिहासाची सामग्री होईल तितकी लवकर प्रसिद्ध झाली पाहिजे.

ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून प्रो. विजापूरकर यांणीं मराठ्यांच्या इतिहासाचीं हीं साधनें प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. आतांपर्यंत इ. स. १७२८ च्या पुढील काळचीं साधनें थोडींबहुत लोकांपुढें मांडिलीं. यापुढें हजार पांचशें पृष्ठें इ. स. १७२८ च्या पाठीमागील काळच्या म्हणजे शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम व दुसरा शिवाजी ह्यांच्या कारकीर्दीसंबंधींच्या माहितीनें भरून काढण्याचा मनोदय आहे. इ. स. १५५० पासून १७२८ पर्यंतच्या अवधींतील जेवढे म्हणून इतिहासोपयोगी लेख जमा झाले, तेवढे सर्व पुढील दोन तीन खंडांत छापून काढावयाचे आहेत. १७२८ च्या पुढील काळच्या इतिहासासंबंधीं शंभर लेख मिळविण्यास जितकी मेहनत लागते तितकी किंवा त्याहूनही जास्त मेहनत १७२८ च्या पूर्वीच्या इतिहासाच्यासंबंधाचें एक एक चिटोरें मिळविण्यास पुरेशी होत नाहीं. हीं चिटोरीं फार अस्ताव्यस्त पसरलीं असून त्यांच्यावर इतर आधुनिक दप्तरांचीं अनेक दडपणें बसलीं आहेत. कृष्णेच्या पूर्वेस व उत्तरेस औरंगाबादेपासून हरिहर व रायचूर या स्थानांच्या दिशेनें थेट तंजावरापर्यंत शाहाजी महाराजासंबंधींचे कागदपत्र

फारशी व मराठी असे सांपडतात. कृष्णेच्या पूर्वेस, पश्चिमेस, उत्तरेस व दक्षिणेस, देशांत, मावळांत व कोंकणांत शिवाजी महाराजांसंबंधीं कागदपत्र आढळतात. १७२८ च्या पूर्वीच्या बाकींच्या छत्रपतींचेही लेख थोडे फार अनेक ठिकाणीं आहेत. हे लेख व्यवस्थितपणें शोधून काढण्यास द्रव्यसाहाय्य व अंगमेहनत सध्यांपेक्षा बरीच जास्त असण्याची अपेक्षा आहे.

प्रस्तुत खंडांत श्रीमंत गगनबावडेकर यांच्या दप्तरांतील इ. स. १७२८ पर्यंतचे लेख येतील. पैकीं कांहीं लेख **थोरले शिवाजी महाराज ह्यांच्या कारकीर्दी**तील आहेत. बावडेकर यांचे पूर्वज सोनोपंत, निळो सोनदेव व रामचंद्र नीळकंठ ह्या तिघांच्या हयातींत शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम, दुसरा शिवाजी व कोल्हापूरचा संभाजी इतक्या पुरुषांच्या कारकीर्दी येतात; व ह्या तिघांनीं ह्या सर्व छत्रपतींच्या अमदानींत मोठमोठीं हुद्यांचीं व जोखमींचीं कामें केलेलीं आहेत. तेव्हां श्रीमंत बावडेकर ह्यांचें दप्तर मूळचें मोठें महत्त्वाचें असेल ह्यांत संशय नाहीं. परंतु इतरत्र जो प्रकार पहाण्यांत येतो त्याला अनुसरूनच ह्या दप्तरांतीलही बहुत किंवा बहुतेक जुने कागदपत्र अजीबात गहाळ होऊन गेलेले आहेत. त्यांतून जे कांहीं थोडेसे शाबूत राहिले होते ते सध्यां प्रसिद्ध होत आहेत. प्रसिद्ध होत असलेल्या ह्या पत्रांत महदानंदाची गोष्ट इतकीच कीं, शिवाजी महाराजांचीं कांहीं अस्सल पत्रें प्रथमतः जगापुढें आणण्याचें श्रेय ह्या आपल्या पिढीला मिळत आहे. आजपर्यंत शिवछत्रपतींचीं दोन तीन पत्रेंच काय तीं छापलीं गेलीं होतीं. त्यामुळें बखरींतून व मुसलमानी तवारिखांतून दिलेलें शिवाजीचें चरित्र अजमावून व पडताळून पहाण्यास बहुतेक कांहींच साधन नव्हतें. श्रीमंत बावडेकर ह्यांच्या दप्तरांतील पत्रांवरून व इतरत्र मिळालेल्या लेखांवरून हें साधन आतां—संपूर्ण किंवा समाधानकारक तर नव्हेच—परंतु थोडेंबहुत सिद्ध होण्याच्या रंगास आलें आहे. ह्या खंडांतील हीं पत्रें व पुढील एक दोन खंडांतील पत्रें मिळून शिवकालीन राज्यपद्धतीवर व लोकस्थितीवर बराच प्रकाश पडेल असा अजमास आहे. ह्या पत्रांचे जर फोटोझिंको काढतां आले असते तर सतराव्या शतकांतील मोडी लिहिण्याचाहि मासला वाचकांना पहावयास मिळता; व हेमाडपंतानें महाराष्ट्रांत मोडी लिहिण्याचा प्रघात मूळ पाडला तेव्हांपासून आतांपर्यंत ह्या लिहिण्यांत काय काय फेरबदल होत आले तेही कळण्यास मार्ग झाला असता. परंतु अनेक गोष्टींच्या अभावामुळें तसें सध्यां करतां येत नाहीं. हा व पुढील एक दोन खंड ह्यांची मिळून एकच प्रस्तावना लिहिण्याचा संकल्प केला असल्याकारणानें प्रस्तुत खंडांतील पत्रांना अर्थनिर्णायक, प्रसंगविवेचक व अवांतर टीपा देण्याच्या भानगडींतहि सध्यां पडत नाहीं. मुख्य प्रस्तावनेंतच एकंदर सर्वप्रकारचा उलगडा करण्याचा मनोदय आहे. कां कीं प्रस्तुत छापिलीं जाणारीं पत्रें आतांपर्यंत छापिलेल्या इतर पत्रांहून फारच निराळ्या प्रकारचीं आहेत. ज्या काळीं महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ झाला, शिवस्वरूपी प्रौढप्रतापदिनकराच्या तेजानें हा देश देदीप्यमान झाला, आणि श्रीमत् समर्थादि थोर विभूतींच्या अरुणोदयानें ह्या देशांतील सर्व समाज खडबडून जागा आला, त्या

काळच्या पत्रव्यवहाराचा परिचय मोठ्या पूज्यभावानें व अदबीनें केला पाहिजे. मनुष्य-प्राण्याच्या इतिहासांत अत्यंत जुने ग्रंथ म्हटले म्हणजे वेद हे होत. त्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या आधुनिक राजकीय इतिहासाचे अत्यंत जुने व महत्वाचे दाखले म्हटले म्हणजे प्रस्तुतचे हे लेख होत. अर्वाचीन महाराष्ट्राच्या संस्कृतीचें सर्व बीज ह्या लेखांच्या मार्मिक अध्ययनापासून कळणारें आहे. तेव्हां ह्या लेखांसंबंधीं किंवा ह्या लेखांवरतीं जें कांहीं व्याख्यान करावयाचें असेल तें, मिळण्यासारखी जेवढी म्हणून माहिती मिळवितां येईल तेवढी सर्व एकत्र संकलित केल्यानंतर, अत्यंत दक्षतेनें व जपून करणें जरूर आहे. केवळ दहा पांच तुटक लेख घेऊन त्यावर टीपा देण्यानें प्रस्तुत प्रसंगीं काम भागणार नाहीं. भाषा, व्यवहार, राजकारण, विद्या, कला, कारखाने, दरबार, पद्धती, मायने, किल्ले, लष्कर, लढाया, तह, वगैरे अनेक बाबींसंबंधीं ह्या पत्रांवरून किती अनुमानें निघतील, किती शंका उद्भवतील व कदाचित् किती वाद माजतील ह्याचा अंदाज सध्यांच करतां येत नाहीं. तेव्हां हीं पत्रें व पुढील एक दोन खंडांतील पत्रें प्रसिद्ध होऊन मर्मज्ञ टीकाकारांचें त्यांवर काय म्हणणें पडतें हें पाहिल्यानंतर त्यासंबंधीं जें कांहीं व्याख्यान करावयाचें तें करावें असा बेत आहे. निरनिराळ्या ठिकाणांहून मिळालेले निरनिराळे लेख स्वतंत्र छापावयाचे आहेत. अर्थात् दर एक ठिकाणचीं पत्रें कालानुक्रमानें निराळ्या संचानें छापिलीं जातील.

---

# खंड १० वा.

१. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे आजपर्यंत दहा खंड होऊन, आतां हा अकरावा खंड प्रसिद्ध होत आहे. पूर्वीचे दहा खंड छापतांना, कांहीं किरकोळ लेख छापावयाचे राहिले होते. त्यांचा समावेश ह्या लहानशा संकीर्ण खंडांत केला आहे.

२. आजपर्यंत मासिकपुस्तकद्वारां व स्वतंत्र ग्रंथरूपानें साधनांची प्रसिद्धि केली. प्रस्तुत खंड वर्तमानपत्रद्वारां प्रसिद्ध झाला आहे. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, दिवसेंदिवस इतिहासाच्या अभ्यासाची गोडी महाराष्ट्रांतील मध्यम स्थितींतील लोकांच्या ठायीं वाढत्याप्रमाणानें वृद्धिंगत होत आहे. निवृत्तिमार्गापासून प्रवृत्तिमार्गाकडे म्हणजे प्रपंचाकडे लोकांची विचारप्रवृत्ति आस्ते आस्ते कलत चालली आहे.

३. ही प्रपंचप्रवृत्ति उसनी नसून, जातिवंत आहे. ह्यांत बिलकुल संशय नाहीं. इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध करण्याची माझी एकट्याचीच इच्छा असती व इतरांची नसती, तर दहा खंड राहूं द्या परंतु एकही खंड छापला जातांना. तशांत, हे दहाही खंड लोकांच्या पैशानें छापिले आहेत. माझ्या पदरचा एक छदामही खर्च झाला नाहीं; इतकेंच नव्हे, तर छापून काढण्याचें प्रथमामंत्रण इतरांनीं मला केलेलें आहे. मी इतरांच्या गळीं पडलों नाहीं. तात्पर्य, स्वचरित्र जाणून घेण्याची इच्छा मध्यम स्थितींतील महाराष्ट्राला झाली आहे. इतिहास म्हणजे गतचारित्राची स्मृति. ती राष्ट्राला होत चालली आहे. आणि ज्या पक्षीं स्मृतीचा उदय होतो आहे, त्या पक्षीं मोहाचा नाशही उदयाच्या प्रमाणानेंच होत असला पाहिजे यांत संदेह नाहीं.

४. परंतु, यद्यपि स्मृतीचा उदय निःसंशय होत आहे, तत्रापि तो व्हावा तितक्या झपाट्यानें होत नाहीं, फारच मंदगतीनें होत आहे. सरासरीनें दरवर्षी लहान मोठा असा एखादा खंड लोक-साह्यानें मी प्रसिद्ध करतों. तीन वर्षांत एक खंड रा० रा० वासुदेवशास्त्री खरे काढतात, आणि पांच वर्षांत एखाद अर्धा खंड रा० रा० पारसनीस निर्माण करतात. तसेंच डेक्कन व्हन्यार्क्युलर ट्रा० सोसायटीनें गेल्या १५ पंधरा वर्षांत पांच खंड प्रसिद्ध केले. आणि इतर एखादा गृहस्थ जीवबादादा बक्षी यांच्या पत्रव्यवहारा सारखा एखाद दुसरा साधन-ग्रंथ पांच पंचवीस वर्षांत प्रसिद्ध करितो. सारांश, गेल्या १५ पंधरा वर्षांत सरासरी साधनांचे पंचवीस * एक खंड प्रसिद्ध झाले आहेत. साधनांची प्रचंड सामग्री पाहतां, प्रसिद्धीचें काम फार मंद गतीनें चाललें आहे, असें म्हणावें लागतें.

---

| | | |
|---|---|---|
| * माझे | ११ | खंड |
| खऱ्यांचे | ५ | खंड |
| पारसनिसांचे | ३ | खंड [भारतवर्ष २ वर्षे व ब्रह्मेंद्रस्वामींचा १ खंड] |
| डे० व्ह० सो० चे | ५ | खंड |
| जीवबादादा बक्षींचा | १ | खंड |

५. साधनांची प्रचंडता महाराष्ट्रांतील लोकांच्या लक्षांत आणून देण्याकरितां आज पर्यंत उपलब्ध झालेल्या साधनांसंबंधानें ठोकळ माहिती देतों. सध्या रा० रा० पारसनीस यांजजवळ नाना फडणिसांचें समग्र अवशिष्ट दप्तर आहे. त्यांत कमींत कमी वीस हजार पत्रें आहेत. वासुदेवशास्त्री खरे यांजपाशीं अद्याप पटवर्धनी दप्तरांतून निवडून काढलेलीं अडीच तीन हजार पत्रें आहेत. आणि स्वतः माझ्यापाशीं पन्नास हजारांवर पत्रें आहेत. हे तीन साठे छापून काढावयाचे म्हटल्यास, दर खंडास पांचशें पत्रें ह्याप्रमाणें सुमारें १४३ खंड छापले पाहिजेत. ही कथा फक्त उपलब्ध अशा ऐतिहासिक पत्रांसंबंधानें झाली. अनुपलब्ध ऐतिहासिक सामग्री उपलब्ध ऐतिहासिक सामग्रीच्या निदान दसपट तरी आहे. म्हणजे पांच पांचशें पत्रांचा एक एक खंड या मानानें अनुपलब्ध सामग्रीचे निदान १५०० खंड व्हावे. हे इतके खंड छापावयाचे कसे व केव्हां ? आणि छापले तर विकत घ्यावयाचे कोणीं ? सध्यांची परिस्थिति पहातां, ह्या शेवटल्या प्रश्नाला उत्तर **लोकांनीं** म्हणून द्यावें लागेल. स्वराष्ट्राच्या इतिहासाची चाड राष्ट्रांतील लोकांस असणार, राष्ट्रबाह्य लोकांस असणें शक्य नाहीं. तेव्हां हें प्रचंड काम पार पाडण्यास महाराष्ट्रांतील उत्साही लोकांनीं कंबरा बांधल्या पाहिजेत. गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवावरून पाहतां, हें एवढें प्रचंडही काम ह्या देशांतील लोकांच्या हातून लवकरच पार पडेल, अशीं चिन्हें दिसतात.

६. उदाहरणार्थ, रा. पारसनीस यांचीच गोष्ट घ्या. शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी ह्या भाटिया गृहस्थांच्या सहाय्यानें रा. पारसनीस यांनीं **इतिहाससंग्रह** नामक ऐतिहासिक मासिकपुस्तकाच्या द्वारां नानांचें दप्तर प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला आहे. मावजी शेट यांना हिंदुस्थानच्या इतिहासाचा उत्कट अभिमान असून, मराठ्यांच्या इतिहासाशीं तर त्यांचें इतकें विलक्षण तादात्म्य झालेलें आहे कीं, महाराष्ट्रवीरपुरुष जो शिवाजी त्याच्या चरित्राचा त्यांनीं केवळ निदिध्यास धरला आहे. घरीं, दारीं, स्वप्नांत व जागृतींत ते शिवाजीइतकी दुसऱ्या कोणत्याच वस्तूची भक्ति करीत नाहींत. अशा निःसीम देशभक्ताचें सहाय्य रा. पारसनीस यांस मिळालें आहे. रा. खरे ह्यांना यद्यपि दुसऱ्या कोणाचें सहाय्य नाहीं. तत्रापि त्यांचा स्वतःचाच निर्धार इतका खंबीर आहे कीं, स्वतःच्या जवळील सर्वस्वाचाही खर्च करून पटवर्धनी दप्तर प्रकाशण्याचा त्यांचा आज कित्येक वर्षांपासूनचा निश्चय आहे. माझी स्वतःची गोष्ट पुसाल तर ती थोडी फार माहीतच आहे. सुधारकउद्धारक, गरीबश्रीमंत, ब्राह्मणक्षत्रिय, वैश्यशूद्र, सर्व जातींचे, पंथांचे, मतांचे व चालींचे मध्यम वर्गांतील स्त्रीपुरुष, द्रव्यद्वारां, साधनद्वारां, व प्रोत्साहनद्वारां मला मदत करीत आहेत. त्यांच्या सहाय्याच्या मानानें माझ्या हातून जसें काम उठावें तसें उठत नाहीं, हे पाहून, मात्र मला क्षणोक्षणीं खेद होतो. ह्या आपल्या थोर देशांत सहाय्याची व सहानुभूतीची कमतरता नाहीं. कमतरता योग्य काम योग्य सामर्थ्यानें वठविणाऱ्या कर्तबगार कामकऱ्यांचीच आहे. कर्तबगार कामकरी मिळाले म्हणजे देशबंधूंच्या व देशभगिनींच्या सहाय्याचें चीज होईल आणि मंदगतीचा जुलूम संपून शीघ्रगतीचें सुराज्य सुरू होईल.

७. कर्तबगार कामकरी म्हणजे कोण, असा प्रश्न येथें येतो. देशाच्या सध्यांच्या विपन्न स्थितींत कर्तबगार कामकरी तो कीं जो इतरांना द्रव्याची बिलकुल तोशीस न लावतां, देशाची सेवा करण्यांत स्वतःच्या उत्तमोत्तम शारीरिक सामर्थ्याची व बौद्धिक सामर्थ्याची पराकाष्ठा करून सुखानें असतो. स्पष्टीकरणार्थ एक काल्पनिक कर्तबगार व्यक्ति घेतों व त्यानें इतिहाससाधनांच्या संशोधनार्थ व प्रकाशनार्थ काय खटपट करावी, तें सांगतों. समजा कीं एखाद्या बी. ए. किंवा एम्. ए. पदवीधरास मराठ्यांच्या इतिहासाचा उद्धार करण्याची चुकून उत्कट इच्छा झाली. समजा कीं, त्या उज्जिहीर्षु गृहस्थाजवळ अठराविश्वे दारिद्र्य आहे. अशा गृहस्थानें इतिहाससाधनांचा उद्धार कसा करावयाचा ? तर, प्रथम, ज्या अर्थी तो अठराविश्वे दरिद्री आहे, व देशांतील लोकही त्याच्याइतकेच हलक आहेत, त्या अर्थी त्यांना त्यानें होईल तितकी थोडी तोशीस दिली पाहिजे. म्हणजे टाकलाच तर केवळ उदरनिर्वाहापुरता त्यांच्यावर त्यानें भार टाकिला पाहिजे. स्पष्ट शब्दांनीं सांगावयाचें म्हटलें म्हणजे, ओली किंवा कोरडी भिक्षा मागून इतिहाससाधनसंशोधनाचें व इतिहासलेखनाचें काम त्यानें जोरानें व उत्साहानें चालविलें पाहिजे. हा मार्ग कांहीं नवीन नाहीं. आपल्या ह्या भारतवर्षांत हा अनादिपासूनचा आहे. ' ॐभवति या पक्षा राखिलें पाहिजे. ' बरें! असेंही कांहीं नाहीं कीं ॐभवति पक्षाला धरून प्राणधारण केलें असतां, उच्चविचार किंवा शास्त्रसंशोधन किंवा अकटोविकट शारीरिक व मानसिक श्रम करतां येत नाहींत. कदाचित्, असेंही म्हणतां येईल कीं, ॐभवति या पक्षाचा आश्रय केला असतां, हीं सर्व कार्यें उदरनिर्वाहार्थ इतर धंद्यांचा आश्रय करण्यांतल्यापेक्षां, जास्त एकाग्रतेनें व कौशल्यानें साधतां येतात. ह्या समाजांतलि एकंदर लोकांचें मत पाहतां, तेंही भिक्षावृत्तीच्या विरोधी नाहीं; उलट अशा भिक्षावृत्तीचा समाजांत आदरच होतो. समाजाकडून अत्यंत निकृष्ट वेतन घेऊन, समाजाची अत्यंत उत्कृष्ट सेवा करण्यास जो प्रवृत्त झाला, त्याची उपेक्षा समाज काय म्हणून करील ? इतकें मात्र खरें कीं, महत्कार्यचिकीर्षु भिक्षेकरी सध्यां बहुतेक नाहींतशासारखे झाल्यामुळें आळशी, व्यसनी व दुष्ट लोकांच्या हातांत चौपदरीचें वतन गेलें आहे, व त्यामुळें तें लोकांच्या तिरस्कारास पात्र झालें आहे. परंतु अनधिकाऱ्यांच्या हातून हें वतन अधिकाऱ्यांनी हिसकावून घेतलें पाहिजे व आपलें त्यावरील स्वामित्व शाबीद केलें पाहिजे. तात्पर्य, दरिद्री विद्वानाला ह्या देशांत निर्वाहापुरतें अन्न मिळण्याची सोय आज शेंकडों वर्षांपासून वाडवडिलांनीं करून ठेविली आहे. तिचा फायदा आपल्या इकडील महत्त्वाकांक्षी विद्वानांनीं यथेष्ट घेतला पाहिजे.

८. कर्तबगार कामकऱ्याची उदरनिर्वाहाची सोय येणंप्रमाणें लागल्यावर, त्यानें मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह पराकाष्ठेचा केला पाहिजे. कनक व कान्ता ह्या दोहोंचा मोह मोठा कठिण आहे. ॐभवतिपक्षीय विद्वानानें स्वतःच्या चैनाकरितां एका पैचाही संग्रह करतां कामा नये; आणि लहानापासून थोरापर्यंत सर्व स्त्रियांना मातुःश्रीप्रमाणें लेखिलें पाहिजे. या दोन मोहांपासून अलिप्त राहणें म्हणजे ब्रह्मचर्याचा निव्वळ ओनामा होय.

तो साधल्यानें चित्तवृत्ति अकलंक राहून, ज्ञानज्योतीचें निर्लेप स्फुरण होईल आणि वाटेल त्या व्यवसायांत व शास्त्रांत अपूर्व गति होण्याचा मार्ग खुला होईल. परंतु हा योग कांहीं सोपा नाहीं. प्रथम प्रथम अज्ञ लोकांकडून टीका होण्याचा संभव असतो. कोणी अशा विद्वानाला एककल्ली म्हणेल, कोणी भ्रांतचित्त म्हणेल, कोणी ढोंगी म्हणूनही म्हणण्याला कमी करणार नाहीं. पण ह्या वटवटीला भीक घालतां कामा नये. स्वतः जे भ्रांत आहेत. त्यांना सरळ रस्ता तिरपगडाच दिसतो, हें लक्षांत घेऊन, आपलें व्रत एकनिष्ठेनें चालविलें पाहिजे, अशा हेतूनें कीं कालांतरानें लोकांना सत्यमार्गाची ओळख पटावी.

९. कर्तबगार कामकऱ्याची इतकी तयारी झाली, म्हणजे त्यानें संशोधनाच्या कामाला लागावें. हें काम जितकें नाजूक तितकेंच श्रमाचें आहे. मराठ्यांच्या साम्राज्यांत ग्वाल्हेरपासून तंजावरपर्यंत व रजपुतस्थानापासून कलकत्त्यापर्यंत असें एकही गांव नाहीं कीं, जेथें कांहींना कांहीं तरी ऐतिहासिक सामग्री नाहीं. कोठें कागदपत्रांचीं दप्तरें आहेत; कोठें महारांचांभारांजवळ ताम्रपत्रें आहेत; कोठें भटांभिक्षुकांजवळ पोथ्यापुस्तकें आहेत; कोठें व्यापाऱ्याउदम्यांजवळ नाणीं आहेत; कोठें देवळांमशिदींत शिलालेख आहेत; आणि कोठें पुरातन इमारती आहेत. इतकेंच नव्हे तर शहरें व गांवें सोडून संशोधक जर अरण्यांत व डोंगरांत भटकला तर तेथें मोडलेलीं शहरें व गांवें आणि किल्ले व लेणीं त्याची वाट पहात आहेत. अद्याप डोंगरांडोंगरांच्या शेंकडों गुहा शोधावयाच्या आहेत आणि जमिनींत गाडलेलीं शहरें उकरावयाचीं आहेत. संशोधक जर पाणवुड्या असेल, तर जुन्या पुष्करण्या, तलाव व कुंडें, जुन्या संस्कृतीचीं अवशिष्ट भांडारें, त्याच्यापुढें खुलीं करण्यास सज्ज आहेत. अशी ही इतिहाससामग्री अपरंपार आहे. तिशीं सामना करण्यास, बिचाऱ्या दरिद्री संशोधकाच्या पायाचे घोडे खंबीर पाहिजेत; तक्रार बिलकुल उपयोगाची नाहीं. माहिती मिळाली कीं, इष्ट स्थानाला जाण्यास ताबडतोब घोडे जुंपले पाहिजेत. इष्ट स्थळीं धडकल्यावर, घोड्यांची कामगिरी संपली. यापुढें मनोरथाच्या दोऱ्या तंग कराव्या लागतात. कारण कधीं कधीं मिळालेली माहिती पोकळ असते आणि जिच्या आशेनें इतकी पायपीट केली ती सामग्री त्या स्थळीं मुळींच नसते, किंवा असलीच तर ती मोठ्या दिरंगाईनें व मिनतवारीनें मिळावयाची असते. इष्ट स्थळीं ज्या गृहस्थाकडे इतिहाससामग्री असते त्याची ओळख संशोधकाला सदाच असते असें नाहीं. सबब त्या त्या प्रांतांतील कोण्या ओळखीच्या संभावित गृहस्थाला त्याच्याकडे ओळख पटविण्याकरितां घेऊन जावें लागतें. संभावित गृहस्थ आधुनिक तऱ्हेनें शिकलेला असला, तर तो वेळांत वेळ काढून. संशोधकाबरोबर येण्यास उत्सुक असतो. नसला तर दुसरा एखादा संभावित मिळविणे भाग पडतें. मिळालेल्या संभावित गृहस्थांतही कांहीं लोकसंग्राहक गुण असावे लागतात. तो नुसता इतिहासाची उपयुक्तता जाणणारा असून चालत नाहीं, तर तो कीर्तीनें प्रामाणिक व सत्यसंध असावा लागतो. अशा संभाविताच्या नुसत्या चिठ्ठीनेंही जसें काम व्हावें तसें होत नाहीं. कागदाची चिठ्ठी व साक्षात् माणूस ह्यांत महदंतर पडतें. सुदैवानें स्वतः संभावित बरोबर आला, म्हणजे एक मोठें काम झालें. त्याच्या येण्यानें एक कार्य होतें. आपण

इतिहाससाधनांचा उद्धार करण्याच्या कामीं संशोधकाहूनही ते आस्थेवाईक असतात. मुद्दा एवढाच कीं, संशोधकाच्या कार्यांत आर्जव हा गुण बहुमोल आहे. येथें 'आर्जव' हा शब्द गीतेंतल्या अर्थानें योजिला आहे. क्वचित् प्रसंगीं फाटकी खरडीं, फुटके दगड, मोडकीं देवळें व गुळगुळीत नाणीं मिळविणाऱ्या संशोधकाचा उपहासही होण्याचा संभव असतो. परंतु हा प्रकार सामग्रीवाल्यांच्या कोत्या समजुतीचा असल्याकारणानें, त्याकडे कानाडोळा करणें इष्ट असतें. क्वचित् स्थळीं कठोर बोलणही होते. परंतु महाराष्ट्रांतील सुजन मंडळींत हा प्रकार अत्यंत विरळ आढळतो.

११ साधनोपलब्धीच्या कामीं पडणाऱ्या शारीरिक श्रमाची हकीकत एथपर्यंत झाली. परंतु दुसऱ्या एका तयारीचें वर्णन अद्याप करावयाचें आहे. हें वर्णन संशोधकाच्या स्वतःच्या बौद्धिक तयारीचें आहे. संशोधनाचें काम चोख होण्यास, संशोधकाला आपल्या कामाची व्याप्ति कळली पाहिजे. ती विवक्षित विद्वत्ता असल्यावांचून कळणार नाहीं. प्रथम, इतिहासाचा प्रांत कोणता व केवढा त्याची अटकळ संशोधकास पाहिजे. ह्या संसारांत प्रवृत्तीच्या ऐलथडीपासून निवृत्तीच्या पैलथडीपर्यंत व्यक्ति, कुल, समाज, देश, राष्ट्र व मानवजाति यांच्या सर्व प्रकारच्या ज्या असंख्य घडामोडी, त्यांची कालदेशावाछिन्न जी व्यवस्थित हकीकत तिचें नांव 'इतिहास' आणि सदर घडामोडींचीं जीं फुटकळ प्रमाणें त्यांचें नांव 'इतिहासाचीं साधनें.' त्या साधनांचा शोध करणें हें संशोधकाचें काम. घडामोडी असंख्य असतात. त्यांचें व्यवस्थित आकलन व्हावें, म्हणून वर्गीकरण करणें जरूर होतें. कांहीं घडामोडी धर्मसंबंधीं असतात; कांहीं राजकारणविषयक असतात; कांहीं केवळ समाजविषयक असतात; कांहीं विद्याविषयक असतात; कांहीं कलाविषयक असतात; आणि कांहीं केवळ व्यापारविषयक असतात. ह्या सहा मुख्य वर्गांचे पुन्हां शेकडों उपवर्ग आहेत. त्या सर्वांवर शोधकाची दृष्टि असली पाहिजे. राजकारणविषयक साधनें तेवढीं घ्यावयाचीं व इतर सोडावयाचीं असें करून चालावयाचें नाहीं. मानवी संसारांत—व्यक्तीच्या, राष्ट्राच्या व अखिलजगाच्या—जे जे लहानमोठे व्यवहार घडतात, त्यांत्यांवर प्रकाश पाडणाऱ्या एकनएक मिळतील तेवढ्या सर्व साधनांचा संग्रह करण्याची तयारी व दक्षता संशोधकाला असली पाहिजे. ही दक्षता व्यापक दृष्टि असल्यावांचून येणार नाहीं. मिळेल त्या सगळ्यांचा संग्रह करावयाचा, असा परिपाठ ठेवल्यानें प्रायः संग्रह करण्याच्या कामांत दोष रहावयाचा नाहीं. हा फारच स्थूल नियम झाला. तत्रापि, अनुभवान्तीं तोच श्रेयस्कर आहे, अशी खात्री झाली आहे.

१२. साधनांचा संग्रह करतांना, संशोधकाला एक चमत्कार दिसून येईल. तो असा कीं इतिहासाच्या ज्या शाखेचीं किंवा प्रसंगाचीं साधनें मिळविण्याच्या इच्छेनें तो विवक्षित स्थळीं जातो, तेथें इष्ट साधनें मिळून किंवा न मिळून, निराळीच एखाद्या कालाचीं साधनें उपलब्ध होतात. पेशवाईच्या इतिहासाचीं साधनें मिळवावयाला जावें आणि शिवाजीच्या इतिहासाचीं साधनें उपलब्ध होतात. किंवा व्यापाराच्या इतिहासाचीं साधनें हुडकण्याच्या बुद्धीनें जावें आणि चालुक्यांचा किंवा सिरियन यहुदी लोकांचा ताम्र-

कोण, कोठील, काय, यांची सविस्तर हकीकत सामग्रीवाल्यास परस्पर कळते व संभाविताची भीडही त्याला मोडतां येत नाहीं. परंतु एवढयानें किल्ला सर झाला, असें उतावीळपणें समजूं नये. अद्याप गडाच्या पायथ्याशींच आपण आहोंत, हें नीट लक्षांत वाळगावें. महाराष्ट्रांत असा कोण महापुरुष आहे कीं, ज्याचे भाऊबंदकीचे तंटे नाहींत ? तेव्हां सामग्रीवाल्याला अशी शंका येते कीं, हा नवखा दिसणारा लुच्चा, प्रतिपक्षांकडून आपलीं छिद्रें धुंडाळावयाला तर आला नाहींना ? अर्थात्, या शंकेचें निराकरण झालें पाहिजे. तें व्हावयाला कमींत कमी एक दोन दिवस लागतात. मग सचोटीचें कूळ आहे, अशी खात्री झाली म्हणजे गोड बोलण्याला सुरुवात होते, व मग उद्यां दफ्तर किंवा कागद किंवा ताम्रपट किंवा पोथ्या किंवा जें कांहीं असेल तें दाखवूं म्हणून आश्वासन मिळतें. उद्या जावें तों असें कळतें कीं समन्स लागल्यामुळें बुवा तालुक्याच्या कचेरीस पहांटेच निघून गेले; ते दोन दिवस यावयाचे नाहींत. पुन्हां दोन दिवसांनीं जावें, तों बुवांच्या घरीं श्राद्ध निघतें व संशोधकाचें काम पुन्हां उद्यांवर ढकललें जातें. पुन्हां दुसऱ्या दिवशीं नेमलेल्या वेळीं जाऊन बसावें, तों अशी सबब निघते कीं दप्तरें माळ्यावर अडगळींत पडलीं आहेत तीं काढलीं पाहिजेत, तेव्हां उद्यां येण्याची तसदी मेहेरबानीं करून घ्या. मेहेरबानीची तसलमात संशोधकाजवळ अलबत असतेच. तिच्यावर वरात काढून, संशोधक दुसऱ्या दिवशीं हजर होतो, तों इनामदारांचा शिपाई नाहींसा होतो. संशोधक व संभावित ह्यांच्यासारख्या थोर माणसांपुढें धुरळ्यानें व कोळिष्टकांनीं भरलेलीं दप्तरें कशीं टाकावींत ? तेव्हां आणखी एक दिवस गम खावी लागते. पुन्हां दुसऱ्या दिवशीं जावें तों गडी नसतोच. मग संशोधक व संभावित असा सवाल करितात कीं, इनामदारसाहेब ! धुरळा अंगावर पडला तरी चालेल, आम्हींच दप्तरें काढतों व तपासून होतांच तशीं ठेवून देतों. इनामदारांच्या चालीरीति पडल्या दरबारी. पाहुण्यांना इतकी तोशीस देणें त्यांच्या जिवावर येतें. परंतु निरुपायास्तव ते परवानगी देतात. इतके दिवस व एवढे गोते खाल्ल्यावर दप्तर एकदाचें खुलें होतें. जर करतां संशोधक किंवा संभावित आधेमधें यत्किंचित् गरम झाला, तर काम हटकून फसतें. दप्तर काढलें, झाडलें, लकतऱ्या सोडवल्या, कागद तपासले, निवडले, तों दोन चार दिवस लागतात. शेवटीं अमुक अमुक कागद किंवा पोथ्या आमच्या उपयोगाच्या आहेत, त्या आम्हीं कायमच्या देत असलां तर घेऊन जातों किंवा परत बोलीनें नेतों; असा प्रश्न केला, म्हणजे मालक मोठ्या विचारांत पडतो. द्यावें कीं न द्यावें ? वडिलांचे कागद, शेंकडों वर्षांपूर्वीची पैदास्त, कायमचे द्यावे कसे ? असा प्रश्न उद्भवून येथेंच काय लिहून घ्यावयाचें तें घ्या, म्हणून उत्तर येतें. शेंकडों कागद असले तर लिहून घेणें अशक्य असतें. मग संभाविताच्या भिडेखातर व संशोधकांवर उपकार म्हणून, एक दोन दिवसांनीं कागद हस्तगत होतात. इतका प्राणायाम एकेक दप्तर मिळविण्याला करावा लागतो. तोंपर्यंत मनोनिग्रहाची चांगलीच परीक्षा होते

१० येणेंप्रमाणें क्रोधादि मनोविकार संशोधकानें चांगलेच जिंकले पाहिजेत. अशीं कुळें सदाच भेटतात, असें नव्हे. कधीं कधीं कित्येक स्त्रिया व पुरुष असे भेटतात कीं,

इतिहाससाधनांचा उद्धार करण्याच्या कामीं संशोधकाहूनही ते आस्थेवाईक असतात. मुद्दा एवढाच कीं, संशोधकाच्या कार्यांत आर्जव हा गुण बहुमोल आहे. येथें 'आर्जव' हा शब्द गीतेंतल्या अर्थानें योजिला आहे. क्वचित् प्रसंगीं फाटकीं खरडीं, फुटके दगड, मोडकीं देवळें व गुळगुळीत नाणीं मिळविणाऱ्या संशोधकाचा उपहासही होण्याचा संभव असतो. परंतु हा प्रकार सामग्रीवाल्यांच्या कोत्या समजुतीचा असल्याकारणानें, त्याकडे कानाडोळा करणें इष्ट असतें. क्वचित् स्थळीं कठोर बोलवणही होते. परंतु महाराष्ट्रांतील सुजन मंडळींत हा प्रकार अत्यंत विरळ आढळतो.

११ साधनोपलब्धीच्या कामीं पडणाऱ्या शारीरिक श्रमाची हकीकत एथपर्यंत झाली. परंतु दुसऱ्या एका तयारीचें वर्णन अद्याप करावयाचें आहे. हें वर्णन संशोधकाच्या स्वतःच्या बौद्धिक तयारीचें आहे. संशोधनाचें काम चोख होण्यास, संशोधकाला आपल्या कामाची व्याप्ति कळली पाहिजे. ती विवक्षित विद्वत्ता असल्यावांचून कळणार नाहीं. प्रथम, इतिहासाचा प्रांत कोणता व केवढा त्याची अटकळ संशोधकास पाहिजे. ह्या संसारांत प्रवृत्तीच्या ऐलथडीपासून निवृत्तीच्या पैलथडीपर्यंत व्यक्ति, कुल, समाज, देश, राष्ट्र व मानवजाति यांच्या सर्व प्रकारच्या ज्या असंख्य घडामोडी, त्यांची कालदेशावच्छिन्न जी व्यवस्थित हकीकत तिचें नांव 'इतिहास' आणि सदर घडामोडींचीं जीं फुटकळ प्रमाणें त्यांचें नांव 'इतिहासाचीं साधनें.' त्या साधनांचा शोध करणें हें संशोधकाचें काम. घडामोडी असंख्य असतात. त्यांचें व्यवस्थित आकलन व्हावें, म्हणून वर्गीकरण करणें जरूर होतें. कांहीं घडामोडी धर्मसंबंधीं असतात; कांहीं राजकारणविषयक असतात; कांहीं केवळ समाजविषयक असतात; कांहीं विद्याविषयक असतात; कांहीं कलाविषयक असतात; आणि कांहीं केवळ व्यापारविषयक असतात. ह्या सहा मुख्य वर्गांचे पुन्हां शेकडों उपवर्ग आहेत. त्या सर्वांवर शोधकाची दृष्टि असली पाहिजे. राजकारणविषयक साधनें तेवढीं घ्यावयाचीं व इतर सोडावयाचीं असें करून चालावयाचें नाहीं. मानवी संसारांत—व्यक्तीच्या, राष्ट्राच्या व अखिलजगाच्या—जे जे लहानमोठे व्यवहार घडतात, त्यांत्यांवर प्रकाश पाडणाऱ्या एकानेएक मिळतील तेवढ्या सर्व साधनांचा संग्रह करण्याची तयारी व दक्षता संशोधकाला असली पाहिजे. ही दक्षता व्यापक दृष्टि असल्यावांचून येणार नाहीं. मिळेल त्या सगळ्यांचा संग्रह करावयाचा, असा परिपाठ ठेवल्यानें प्रायः संग्रह करण्याच्या कामांत दोष रहावयाचा नाहीं. हा फारच स्थूल नियम झाला. तत्रापि, अनुभवान्तीं तोच श्रेयस्कर आहे, अशी खात्री झाली आहे.

१२. साधनांचा संग्रह करतांना, संशोधकाला एक चमत्कार दिसून येईल. तो असा कीं इतिहासाच्या ज्या शाखेचीं किंवा प्रसंगाचीं साधनें मिळविण्याच्या इच्छेनें तो विवीक्षत स्थलीं जातो, तेथें इष्ट साधनें मिळून किंवा न मिळून, निराळींच एखाद्या कालाचीं साधनें उपलब्ध होतात. पेशवाईच्या इतिहासाचीं साधनें मिळवावयाला जावें आणि शिवाजीच्या इतिहासाचीं साधनें उपलब्ध होतात. किंवा व्यापाराच्या इतिहासाचीं साधनें हुडकण्याच्या बुद्धीनें जावें आणि चालुक्यांचा किंवा सिरियन यहुदी लोकांचा ताम्र-

पट सांपडावा, असा चमत्कार होतो. अशा आकस्मिक उपलब्धींकडे संशोधकानें दुर्लक्ष करूं नये. तसेंच ऐतिहासिक कागद पाहतांना, संस्कृत व मराठी पोथ्या असल्यास त्यांचा संग्रह मुद्दाम करावा. बाडें, तर बिलकुल वगळूं नयेत. एखाद्या बाडांत हजार हजार, पांच पांचशें वर्षांच्या जुन्या पोथ्यांचे प्राकृत भाषांचे उतारे असतात, किंवा इतिहासप्रसंगांच्या मित्त्या दिलेल्या असतात, किंवा पुरातन गुरुशिष्यपरंपरा लिहिलेल्या असतात. तेव्हां शोधस्थलीं व्यापकदृष्टीप्रमाणेंच सूक्ष्मदृष्टिही ठेवणें अवश्य आहे.

१३. येणेंप्रमाणें व्यापक व सूक्ष्मदृष्टीनें शोध करून संग्रह केल्यावर, संशोधकानें उपलब्ध संग्रहाच्या प्रामाण्याप्रामाण्यासंबंधानें चौकशी करावी. ही चवकशी करावयाची म्हटली म्हणजे इतिहासपद्धतीची चांगली ओळख त्याला असली पाहिजे. जशा इतर शास्त्रांना व कलांना पद्धती आहेत, तशीच इतिहासशास्त्राला पद्धति आहे. प्रमाण काय, अप्रमाण काय, अव्वल प्रमाण कोणतें, दुय्यम प्रमाण कोणतें, तिय्यम प्रमाण कोणतें, ह्याची त्याला माहिती असली पाहिजे. ही माहिती पद्धतिग्रंथांचे अवलोकन केल्यानें सहजांत होईल. केवळ स्वानुभवानें स्वतःच पद्धति बनवितां येणार नाहीं, असें नाहीं; तत्रापि, आपल्या आधीं ज्या पद्धति विद्वन्मान्य झालेल्या आहेत, त्यांचा उपयोग संशोधकानें प्रथम करून घ्यावा. उपलब्ध पद्धतिग्रंथांत कांहीं वैगुण्यें असण्याचा संभव असतो. त्यांचीं टिपणें करून, आपणास पद्धतिशास्त्रांत ज्या सुधारणा सुचवावयाशा वाटतात, त्या जाहीर कराव्या म्हणजे आपल्या मागून येणाऱ्या संशोधकांना त्यांचा उपयोग होईल. इतिहाससाधनांच्या प्रामाण्याप्रामाण्यासंबंधानें पद्धतिग्रंथ इंग्रजी भाषेंत प्रायः नाहींच. इंग्रजांचा संशोधनाचा मार्ग फारसा पद्धतशीर नाहीं. धरमधक्क्यानें परंतु बऱ्याच जोरानें ते कोणतेंही काम करतात; परंतु शास्त्रीय पद्धतीनें बिनचूक काम बठविण्याचा त्यांचा प्रघात जसा असावा तसा नाहीं. सशास्त्र व पद्धतशीर संशोधन करण्याच्या कामीं फ्रेंच, जर्मन, व अमेरिकन लोक इंग्रजांच्या बरेच पुढें गेलेले आहेत. त्यांतल्या त्यांत, जर्मन लोक सूक्ष्मदृष्टि असून व्यापक शोध करणारे आहेत; अमेरिकन लोक शास्त्राचें गूढ अवडंबर न करतां सर्व-सामान्य लोकांस कळेल अशा विस्तारानें, कदाचित् अतिविस्तारानें लिहिणारे आहेत; आणि फ्रेंच लोक आटोपशीर व नीटनेटकी मांडणी करणारे आहेत. इतिहाससाधनांच्या प्रामाण्याप्रामाण्याच्या पद्धतीवर महाराष्ट्रांतील संशोधकांना उपयोगी पडेल असा एक ग्रंथ फ्रेंच भाषेंत Seignobos and Langlois यांचा Introduction to the study of History हा आहे. ह्याचें इंग्रजींत शिरस्त्याप्रमाणें भाषांतर झालेलें आहे. इतर युरोपियन भाषांत एखादा उपयुक्त किंवा नामांकित ग्रंथ किंवा शोध झाला म्हणजे त्याचें भाषांतर किंवा रूपांतर करून घेण्यास इंग्रज लोक अतिउत्सुक असतात. इंग्रजांचा हा 'स्पंजी' गुण मराठ्यांनीं बिनतकार उचलण्याजोगा आहे. तज्ज्ञ माणसें प्रत्येक राष्ट्रांत सदा सारखींच निपजतात असें नाहीं. तेव्हां, एखादा तज्ज्ञ एखाद्या राष्ट्रांत उद्भवला तर त्याच्या ज्ञानाचा इतर राष्ट्रांनीं भाषांतरद्वारां उपयोग करून घेण्यांत कोणताही कमीपणा नाहीं.

१४. ऐतिहासिक प्रमाणपद्धतीनें साधनांच्या सत्यासत्यतेची छान करतांना कालसंकलनासंबंधानें मोडकांची जंत्री व Dixit and Sewell यांचें Indian Calendar संशोधकाला फार उपयोगी पडेल. मोडकांच्या जंत्रींत दिलेल्या तिथि आणि वार कोठें कोठें एकेक दिवसाच्या अंतरानें चुकलेल्या आहेत. परंतु सर्वसाधारण दृष्टीनें शक १६५१ पासून शक १८०० पर्यंतच्या सर्व तिथि आणि वार या संदर्भग्रंथांत दिलेल्या आहेत. शक १३०० पासून शक १६५१ पर्यंतच्या तिथि, वार व तारखा ज्यांत दिलेल्या आहेत, असा एक संदर्भग्रंथ अद्याप तयार होणें आहे. ह्या कालसंदर्भग्रंथाच्या सहाय्यानें साधनांचा कालानुक्रमिक वर्ग केला म्हणजे साधनें प्रसिद्ध करण्याच्या स्थितीला यावयाला आणखी एका संस्काराची जरूर आहे. तो संस्कार म्हणजे देशानुक्रमानें व प्रसंगानुक्रमानें साधनांचें वर्गीकरण. एकाच कालीं निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या राज्यांत निरनिराळे प्रसंग घडत असतात. तेव्हां त्या त्या प्रांताला तीं तीं समकालीन साधनें लावून देणें सोईचें होतें. हें वर्गीकरण झालें, म्हणजे प्रसिध्यर्थ साधनें सिद्ध झालीं.

१५. मराठ्यांच्या इतिहासाचीं किंवा महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें संस्कृत, प्राकृत, फारसी, कानडी, गुजराथी, मराठी, हिंदी, बंगाली, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज या भाषांत सांपडतात. तेव्हां या भाषा संशोधकाला अवगत असल्यास, त्याचें काम चांगलेंच व्यापक होईल, हें उघड आहे. अन्यथा, जी लिपि कळत नाहीं त्या लिपींत लिहिलेल्या लेखांकडे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. ह्याशिवाय आंकड्यांच्या व अक्षरांच्या कांहीं गुप्त लिपींतही कांहीं पत्रे सांपडतात. त्यांचाही संशोधकानें साक्षेपानें संग्रह करावा. मानभाव लोक आपले गुह्यग्रंथ तर गुप्तलिपींतच सर्व लिहितात.

१६. संशोधकाला काय काय माहिती असावी, त्याची ठोकळ हकीकत येथपर्यंत दिली. आजपर्यंत आपल्या इतिहासाच्या कोणत्या साधनांचा कितपत शोध झालेला आहे व पुढें व्हावयाचा राहिला आहे, तें सांगतों. कीर्तने, साने खरे, पारसनीस वगैरे शोधकांच्या श्रमानें शक १६५१ पासून शक १७२२ पर्यंतच्या ७१ वर्षांच्या राजकीय इतिहासाचीं अस्सल साधनें बरींच उपलब्ध झालेलीं आहेत. शक १७२२ पासून १७८० पर्यंतच्या अस्सल साधनांचा व शक १२०० पासून शक १६५१ पर्यंतच्या अस्सल साधनांचा अद्याप पत्ता बिलकुल लागलेला नाहीं. सर्व अंधेर आहे. १६५१ पासून १७२२ पर्यंतच्या साधनांतही मोठमोठीं खिंडारें आहेत. ह्या ७१ वर्षांतील मराठी भाषेंतील तेवढा राजकीय पत्रव्यवहार उपलब्ध झालेला आहे. परंतु तोही अपुराच आहे. अद्याप हैदराबाद, ग्वाल्हेर, बुंदेलखंड, राजपुताना, इंदूर, बडोदें, अयोध्या, श्रीरंगपट्टण, दिल्ली, नागपूर वगैरे संस्थानांतील राजकीय पत्रव्यवहार शोधावयाचा राहिलाच आहे. जो कांहीं थोडाबहुत शोध झाला आहे, त्याची व्याप्ति नाशिकापासून साताऱ्यापर्यंतच्या प्रदेशाच्या पलीकडे गेलेली नाहीं. साताऱ्यापासून नाशिकापर्यंतचा प्रांतही वरवरच ओरखडला आहे, त्याची कसून बारीक तपासणी झालेली नाहीं. इतिहाससाधनांचा शोध व्हावयाला लागून सुकतीं कोठें सात वर्षे झालीं; आणि शोधकांची संख्याही एका दोहोंहून जास्त कधींच नव्हती. तेव्हां

सर्वच काम तांत्रिक व्हावें, यांत नवल नाहीं. ह्यावरून ऐतिहासिक शोधाची साक्षेप दृष्टीनें, फारच शोचनीय जरी नव्हे तरी अपूर्ण स्थिति आहे, हें तद्धितेच्छूंच्या ध्यानांत येईल. शक १२०० पासून १६५१ पर्यंतच्या राजकीय इतिहासाचीं अस्सल साधनें बिलकुल शोधिलीं गेलीं नसून, दुय्यम व तिय्यम प्रतीचीं साधनें-तवारिखी, तहनामे, वाके, वगैरे—फक्त फारसी भाषेंतून असलेलीं उपलब्ध आहेत. शक ५०० पासून शक १२०० पर्यंतचें एकही अस्सल पत्र उपलब्ध नाहीं. शक १२०० नंतरची मराठी व फारसी अस्सल पत्रें बारीक शोध केला असतां मिळतील असा अंदाज आहे.

१७. ही कथा राजकीय साधनांची झाली. सामाजिक, धार्मिक, वैय्यापारिक वगैरे साधनांचा अद्याप कांहींच पत्ता लागलेला नाहीं. तीं मुळीं नाहींतच म्हणून पत्ता लागला नाहीं, असा प्रकार नाहीं. प्रकार निराळाच आहे. तत्संबंधीं शोध करण्यास विद्यमान जे दोन तीन शोधक आहेत त्यांना फुरसत झालेली नाहीं. अर्वाचीन राजकीय इतिहासाचीं मिळालेलीं व मिळण्यासारखीं साधनें शोधण्याच्या, लावण्याच्या, तपासण्याच्या व प्रसिद्ध करण्याच्या खटपटींतच त्यांचा सर्व वेळ जातो. यामुळें इतर साधनांचा शोध करण्यास त्यांना फुरसत मिळत नाहीं. ही अडचण निघून जावयाला एकच मार्ग आहे. जास्त मंडळींनें संशोधकाचें काम अंगीकारलें पाहिजे. पदवीधर व बिनपदवीधर असे बरेच लोक दरवर्षी तयार होत आहेत. त्यांपैकीं कांहींच्या मनांत ह्या उद्योगांत दारिद्र्य, हालअपेष्टा व कष्ट सोसून पडण्यानें येईल काय ?

१८. येथें कोणी अशी शंका आणील कीं सध्यां जे दोन तीन संशोधक आहेत त्यांच्या खटपटीनें जीं साधनें मिळालीं आहेत त्यांचेच कमींत कमी १४६ खंड व्हावयाचे आहेत आणि तेच छापतां छापतां कित्येक वर्षे जातील; मग आणखी संशोधक ह्याच कामांत पडले तर त्यांनीं जमविलेली सामग्री छापावयाची कोणीं ? तर ह्या शंकेला उत्तर आहे. सध्यां देशांत जीं साधनें सुदैवानें विद्यमान आहेत तीं आणखी कित्येक वर्षांनीं मुळींच नाहींशीं होऊन जातील. बरींच साधनें आजपर्यंत नाहींशीं झालींच. आतां तरी जीं कांहीं राहिलीं आहेत तीं वांचविलीं पाहिजेत. हें वांचविण्याचें काम दोघे तिघे गृहस्थ आज दहा पंधरा वर्षे करीत आहेत. परंतु त्यांना अनुभवान्तीं असें कळून आलें आहे कीं त्यांचें सामर्थ्य असलेलीं सर्व साधनें हुडकून काढण्याइतकें नाहीं. त्यांना सहकाराची जरूर आहे. जसजसें मागें मागें जावें तसतसें असें आढळून आलेलें आहे कीं जुनीं जुनीं साधनें एकेकटीं अशीं गांवगन्ना पसरलीं आहेत. त्या एकेकट्यांचा परामर्ष घेण्यास सध्यांच्या संशोधकांना सामर्थ्य नाहीं. व फुरसत नाहीं. एतदर्थ नवे संशोधक प्रांतोप्रांतीं हवे आहेत. शंकेच्या पहिल्या भागाचा हा विचार झाला. दुसऱ्या भागासंबंधानें एवढेंच सांगावयाचें कीं सर्वच साधनें एकदम प्रसिद्ध थोडींच करावयाचीं आहेत ! शिवाय, जसजसे संशोधक वाढतील तसतसे ते प्रकाशनाचे आपापले मार्ग काढतीलच काढतील. तशांत, छापण्याचें काम अद्याप व्यक्तिमात्राच्याच बळावर चाललें आहे. आनंदाश्रमासारखी जर छापण्याची स्वतंत्र सोय झाली, तर सर्व साधनें प्रकाशणेंही सुलभ होण्यासारखें आहे. तात्पर्य, सुदैवानें जीं साधनें राहिलीं आहेत,

तीं वांचविलींहि पाहिजेत आणि प्रकाशिलींहि पाहिजेत. प्रकाशण्याचा हेतु असा कीं इतिहासाचीं-स्वदेशाच्या इतिहासाचीं-साधनें सर्वांच्या सहज आटोक्यांत येऊन, अनेकांना इतिहासाच्या निरनिराळ्या शाखांवर लिहिण्यास सोयीचें व्हावें.

१९. साधनें प्रकाशण्यासंबंधानें एक चमत्कार आज कित्येक वर्षे मी निमूटपणें पहात आहें. तो असा कीं, शिंदे, होळकर, गायकवाड, आंग्रे, पटवर्धन, विंचूरकर, पवार, राजेबहादर, कोल्हापूरकर, तंजावरकर, फडणीस, प्रतिनिधि, फलटणकर, भोरकर, जतकर, हैदराबादकर, जयपूरकर, जोधपूरकर, सागरकर व इतर लहान मोठे संस्थानिक, जहागीरदार, इनामदार, देवस्थानवाले व पूर्वींचे मुत्सद्दी हे अद्यापपर्यंत काय करीत आहेत ? त्यांचीं दप्तरें किंवा त्यांच्यासंबंधाचे कागदपत्र आमच्यासारख्या भिकारड्यांनीं शोधण्याचा व छापण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांच्यासारख्या श्रीमंतांनीं अगदींच उदासीन व निश्चिंत असावें. हा कोठला न्याय ! काय, त्यांचे पूर्वज त्यांचे कोणी नव्हत ? पूर्वजांनीं संपादिलेल्या जहागिरी व राज्यें भोगण्यास राजी आणि त्यांचे पराक्रम व इतिहास जाणण्यास गैरराजी, हा न्याय पृथ्वीवर इतर कोठेंहि पहावयास मिळावयाचा नाहीं. वासुदेवशास्त्री खऱ्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धनी दप्तर छापावें आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर ह्यांनीं खुशाल झोंपा काढाव्या. शिवाजीमहाराज, दमाजी गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आह्मां संशोधकांचे आजे पणजे आहेत आणि संस्थानिकांचे कोणी नाहींत, असेंच म्हणण्याची पाळी आली. संस्थानिकांची व इनामदारांची आपल्या प्रत्यक्ष पूर्वजांसंबंधानें केवढी ही विस्मृति ! केवढा हा अपराध ! ही भरतभूमि पितृपूजेविषयीं प्रख्यात आहे. तींत प्रस्तुत काळीं पितरांची अशी बोळवण व्हावीना ?

२०. असो. राजे निजले आहेत, जहागीरदार डुलक्या घेत आहेत, आणि इनामदार झोंपा काढीत आहेत. ते जागे होई तावत्कालपर्यंत, जागे झालेले मध्यम स्थितींतील जे आपण, त्यांनीं राष्ट्राच्या या पितरांचें स्मरण कायम ठेविलें पाहिजे. आपलें सामर्थ्य यद्यपि जुजबी आहे, तत्रापि ह्या पुण्यकर्माच्या प्रीत्यर्थ तें खर्चिलें पाहिजे.

# खंड ११ वा.

१ राष्ट्राच्या सर्व तऱ्हेच्या गतचारित्राचें कालानुक्रमिक व संगतवार स्मरण म्हणजे इतिहास. तो दोन प्रकारचा. तोंडी व लेखी. पैकीं दुसऱ्या प्रकारच्या इतिहासाच्या तयारीकरितां साधनांचा हा दहावा खंड आहे.

२ ज्या लोकांची स्वचरित्रांची स्मृति हारपली, ते लोक मृतवत् असून पहावें तेव्हां सदाच मूढावस्थेंत असल्यासारखे दिसतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील भिल्ल, खोंड, कातकरी वगैरे लोक घ्या. हिंदुस्थानांत ह्या लोकांची वस्ती आपणां आर्यांच्याहि पूर्वींची आहे. तेव्हां ते ज्या मूढावस्थेंत होते त्याच अवस्थेंत ते सध्यांही बहुतेक आहेत. कारण, आपल्या गतचरित्राची स्मृति त्यांना नाहीं. स्मृति जाज्वल्य तऱ्हेनें जागृत असली, म्हणजे गतचरित्रांचा आढावा घेतां येतो; आढावा घेतां आला, म्हणजे आपले राष्ट्रीय गुणदोष कळूं लागतात; आणि गुणदोष कळले, म्हणजे दोषांचा वीमोड करून गुणांचा परिपोष करण्याकडे सहज प्रवृत्ति होते.

३ राष्ट्राचा इतिहास म्हणजे राष्ट्रांतील सर्व लोकांच्या संकलित चरित्राची हकीकत. ती लोकांपुढें मांडिली असतां, सर्व लोकांना समानस्मृतित्वामुळें ऐक्याची व बंधुप्रेमाची भावना होते. ती उत्कटत्वानें व्हावी, एतदर्थ प्रस्तुत खंड प्रसिद्ध करण्याचें ग्रंथकारांच्या संमेलनानें ठरविलें.

४ ह्या खंडांतील अर्धीं अधिक पत्रें इंदूरचे श्री. माधवराव किबे व रा. आठल्ये ह्या दोन सद्गृहस्थांनीं पांच सहा वर्षांपूर्वीं प्रसिद्ध करण्याचें मनांत आणिलें होतें. परंतु व्यवसायबाहुल्यामुळें पत्रांच्या नकला करण्यापलीकडे त्यांच्या हातून प्रसिद्धीचें काम होईना. सबब, मूळ पत्रें व नकला घेऊन व त्यांत आणीक बऱ्याच पत्रांची भर घालून, प्रस्तुत खंड बनवला आहे. पैकीं पांच पन्नास पत्रें रा. आठल्ये यांनीं स्वतः मिळविलेलीं आहेत.

५ येथें पानिपतच्या प्रसंगापासून दुसऱ्या बाजीरावाच्या अखेरीच्या पर्यंतच्या काळांतील पत्रें घेतलीं आहेत. पांच दहा पत्रें तदनंतरचीं आहेत. त्यांचा उद्देश, सरदार घराण्यांचा ऱ्हास उत्तरोत्तर होऊन तो कोणत्या थराप्रत पोहोंचला, तें स्पष्ट करण्याचा आहे. अर्धीं अधिक पत्रें वांई येथील रा. रा. नानासाहेब वैद्य यांच्या दप्तरांतील असून, बाकीचीं इतरत्र किरकोळ मिळविलेलीं आहेत.

६ ग्रांट डफच्या बखरींतल्या तारखा, प्रसंग व तपशील प्रस्तुत खंडांतील मितींशीं, प्रसंगांशीं व तपशिलाशीं ताडून पाहिला असतां स्थलोस्थलीं चुकांचा व विपरीत दिसेल, हें महाराष्ट्रांतील लोकांस नवीं सांगण्याचें आतां कारण उरलें नाहीं. रा. खरे, रा. पारसनीस व मी ह्यांनीं ही बाब आजपर्यंत इतक्या वेळां सांगितली आहे व स्वजनांनीं इतक्या वेळां ऐकिली आहे कीं तिचा पुनरुच्चार करणें ह्यापुढें केवळ कंटाळवाणें होणार आहे.

ग्रांट डफ्ला ह्या देशांत आतां कोणी प्रमाण मानीत नाहींत. इंग्लिश लोक मात्र त्याला अद्याप प्रमाण म्हणून समजतात. परंतु, तो निव्वळ अज्ञानाचा प्रकार होय. निदान ह्या एका बाबींत तरी इंग्रजांच्या आपण पुढें आहोंत, ही समाधानाची गोष्ट आहे.

७ तारखा, प्रसंग व तपशील ह्यासंबंधानें ग्रांट डफनें ज्या चुक्या केल्या व जे विपरीत ग्रह उत्पन्न केले, त्याहून निराळ्या तऱ्हेच्या विपरीत ग्रहांचा बींमोड करण्याचा काळ आतां आला आहे. हे विपरीत ग्रह जाणूनबुजून केलेले असोत किंवा अज्ञानतः केलेले असोत, त्यांमुळें पुष्कळ जाणतेसवरते लोक देखील वारंवार फसतात; मग अजाण लोक फसले तर त्यांत कांहीं नवल नाहीं. अशा एक दोन दुष्ट ग्रहांचा स्पष्टीकरणार्थ येथें उल्लेख करतों. रजपूत व जाट लोकांतलि कांहीं किंवा सर्व कुळ्या अहिंदु जे शक व तुरुष्क लोक ते हिंदु बनून त्यांच्यापासून झाल्या, असा विपरीत सिद्धांत गेलीं पन्नासपाऊणशें वर्षें बहुतेक सर्व इंग्रज व युरोपियन लोक ठोकून देत. इंग्रज व युरोपियन लोक पडले चौकसपणानें सशास्त्र विवेचन करणारे, तेव्हां, त्यांचे विपरीत दिसणारेहि सिद्धांत प्रमाणवत् मानून, आपल्या इकडील कित्येक विद्वन्मन्य हवे तसे वरळावयाला लागले. हे विद्वन्मन्य आपल्या साध्याभोळ्या परंतु कुलधर्मनिष्ठ स्वजनांना असा उद्धट सवाल करूं लागले कीं, 'शहाणे हो! पूर्वी अहिंदु जे शक लोक ते हिंदु बनून जातिवंत रजपूत म्हणजे क्षत्रिय समजले जात व त्यांचें पुरोहितत्व सोंवळ्यांतले सोंवळें जे कोणी ब्राह्मण असत ते करीत, अशी सशास्त्र वस्तुस्थिति आहे; तेव्हां शुद्धजातित्वाच्या गप्पा कशाला मारतां?' विद्वन्मन्यांचे हे उच्छिष्ट व निरर्गल प्रलाप धर्मनिष्ठांना कवडीमोल भासत, हें सांगावयाला नकोच. परंतु, ते कवडीमोल आहेत अशी खात्री ह्या विद्वन्मन्य लोकांची कशी व्हावी? कोण्या युरोपियन शास्त्रयानें तसे सांगितल्याशिवाय त्यांच्या मूर्ख मतांचा कवडीमोलपणा त्यांना कधीं पटावयाचाच नाहीं. हें जाणून एका इंग्रज मानववंशशास्त्रयाचें रजपूतवंशासंबंधानें शास्त्रविचारान्तीं आतां काय मत झालेलें आहे तें देतों. तो म्हणतोः—

Of the Scythian people themselves all traces seem to have vanished, and the student who inquires what has become of them finds nothing more tangible than the modern conjecture that they are reprsented by the Jats and Rajputs. But the grounds for this opinion are of the flimsiest description, and consist mainly of the questionable assumption that the people who are called Jāts or Jats at the present day must have something to do with the people who were known to Herodotus as Getae. Now apart from the fact that resemblances of names are often misleading—witness the Roman identification of these very Getae with the Goths—we have good historical reasons for believing that the Scythian invaders of India came from a region occupied exclusively by broad-headed races and must themselves have belonged to the type. It seems, therefore, unlikely that their descendents should be found among tribes who are essentially of the long—headed type. Still less probable is it that waves

of foreign conquerors, entering India at a date when the Indo-Aryans had long been absorbed by them so completely as to take rank among their most typical representatives, while the form of their heads, the most persistent of racial distinctions, was transformed from the extreme of one type to the exteme of another without leaving any trace of transitional forms in the process. Such are the contradictions which beset the attempt to indentify the Scythian with the Jats and Rajputs.

Chap. VI, Ethnology and Caste, pp. 306-307.

by Mr. H. S. Risley ( Imperial Gazetteer of India, Vol I. )

ज्याच्या आधारावरती हिंदूंच्या शुद्ध जातीला वर सांगितलेले विद्वान् नांवें ठेवीत होते व सबगोलंकार करण्यास उत्तेजन देत होते,तो सिद्धान्त flimsy self-contradictory व कवडीमोल आहे, असें सर रिस्ले म्हणतात.हे सर रिस्ले मानववंशशास्त्राचे व जातिज्ञानाचे मोठे ज्ञाते आहेत, असें हिंदुस्थानसरकार समजतें. त्या सरकारच्या आज्ञेवरून प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांत रजपुतांचे शाकवंशीयत्व ज्याअर्थी अशास्त्र व असत्य ठरविलेलें आहे, त्याअर्थी तें तसें मानणें उच्छिष्ट विचार व सिद्धान्त यांवर स्वजनांच्या उरावर पाय देऊन उपजीविका करणाऱ्या लोकांना अत्यंत अपरिहार्य आहे. बाकी धर्मनिष्ठ जे आहेत त्यांना शाकवंशजत्वाची व लंबशिरस्कत्वाची अशा दोन्हीही उपपत्त्या एकाच किंमतीच्या वाटतात. रजपूत वंशानें हिंदु आहेत, क्षत्रिय आहेत, व आर्य आहेत, हा सिद्धान्त, कितीही पोषक किंवा मारक अशा पाचकळ उपपत्त्या निघाल्या तत्रापि, धर्मनिष्ठांना त्रिकालाबाधित वाटत राहील, ह्यांत संशय नाहीं.

८ आतां दुसऱ्या एका कवडीमोल दुष्ट ग्रहाचा उल्लेख करतों. तो वरच्याच्या सारखा जुना नाहीं; अगदीं अलीकडला कोराकरकरीत आहे. हा कालपर्यंत रजपूत Scythians आहेत, अशी कंडी पिकवून, अनेक अर्धवट लोकांना यानें माकडचेष्टा करावयास लावल्या. आतां रजपुतांवरची संक्रांत उठून मराठ्यांवर ती बसूं पहात आहे, नव्हे साक्षात् बसलीच आहे. आतां असें मत निघालें आहे कीं, महाराष्ट्रांतील मराठे लोक वंशानें शाक म्हणजे Scythian आहेत. सर रिस्ले म्हणतातः—

Is it not conceivable that the Scythians, who first occupied the great grazing country of the Western Punjab, and then, pressed upon by later invaders and finding their progress eastwards blocked by the Indo-Aryans, turned towards the south, mingled with the Dravidian population, and became the ancestors of the Marathas ? The physical type of the people of this region accords well with this theory, while the agruments derived from language and religion do not seem to conflict with it. For, after entering India, the Scythians readily adopted an Aryan language, written in the Kharosthi character, and accepted Buddhism as their religion. Their Prakrit speech would have developed into Ma-

rathi, while their Buddhistic doctrines would have been absorbed in that fusion of magic and metaphysics which has resulted in popular Hinduism. On this view the wide-raging forays of the Marathas their guerilla methods of warfare, their unscrupulous dealings with friend and foe, their genius for intrigue and their consequent failure to build up an enduring dominion, might well be regarded as inherited from their Scythian ancestors.

Chap. VI, Ethnology and Cast, pp. 307–308.

by H. S. Risley. Imperial Gazetteer of India, Vol. I

मराठ्यांना शाक ऊर्फ Scythians ठरविल्यावर रिस्ले पुढें म्हणतातः—

The highest class of Marathas is supposed to consist of ninety-six families, who profess to be of Rajput descent and to represent the Kshattriyas of the traditional system. They wear the sacred thread, marry their daughters before puberty,and forbid widows to marry again.But their claim to kinship with the Rajputs is effectually refuted by the anthropometric data now published &c.

येणेंप्रमाणें, महाराष्ट्रांतील मराठे आर्य नाहींत, असा रिस्लेचा नवीन शोध आहे. महाराष्ट्रांतील ब्राह्मण आर्य नाहींत, असें बरळण्यापर्यंत अद्याप मजल पोहोंचली नाहीं. परंतु, तोहि प्रसंग पुढें मागें आल्याशिवाय रहाणार नाहीं. असो. सध्यां ब्राह्मणांशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. फक्त मराठ्यांच्या वंशाचा विचार करावयाचा आहे. सर रिस्ले यांना आमचा असा सवाल आहे कीं, रजपूत Scythians नाहींत, हें ठरविण्याला जीं प्रमाणें त्यांनीं नमूद केलीं आहेत, तींच प्रमाणें मराठे Scythians नाहींत, हें ठरविण्याला समर्पक आहेत. Scythians उर्फ शक काठेवाड, गुजराथ व जुन्नर ह्या स्थलीं केव्हां आले व किती दिवस राहिले, हें इतिहासप्रसिद्ध आहे. ते जुन्नरास राज्य करीत होते, त्या वेळीं व त्यांच्या पूर्वीं महाराष्ट्रांतील समाज चातुर्वर्ण्यघटित होऊन पूर्ण सुयंत्र झाला होता. अशा समाजांत अहिंदु जे शक ते ( हिंदु म्हणून ) समावले जाऊन, महाराष्ट्रांत ज्यांना क्षत्रिय म्हणतात, त्यांच्यांत प्रमुखत्वानें मोडले जावे, हें रजपुतस्थानांतल्याप्रमाणेंच महाराष्ट्रांतहि सर्वस्वीं अशक्य आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांतील मराठ्यांना शककुलोत्पन्न करून टाकण्यांत रिस्ले यांचें तर्कशास्त्र सपशेल तोंडघशीं पडलें आहे.

९ अशा नाना प्रकारच्या विपरीत क्लृप्त्या इंग्रज व युरोपियन लेखकांनीं वेळोवेळीं प्रपादल्या आहेत. त्यांच्या मुळाशीं एक मनोविकृति असते. ती ही. इंग्रज, फ्रेंच, जर्मन, वगैरे पाश्चात्य समाजांत शरीरसंबंध वाटेल त्या धर्मबाह्य व लोकबाह्य समाजाशीं होत असल्यामुळें, त्या समाजांतलि लोकांचें बीज व रक्त अत्यंत भेसळ झालेलें आहे. त्यामुळें होतें काय कीं, हिंदुस्थानांतील चातुर्वर्ण्यघटित समाजांतही आपल्यासारखीच रक्ताची व

बीजाची खिचडी झाली असली पाहिजे, हें यद्वातद्वा सिद्ध करण्याचा मोह ह्या लोकांतील विद्वानांना साहजिक पडतो. परंतु त्यांनीं हें पक्कें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील जातिवद्ध लोक, शरीरसंबंध करण्याच्या कामांत बौद्धधर्म प्रचलित होण्याच्या पूर्वीपासून फार चिकित्सक आहेत. तेव्हां त्यांच्या वंशासंबंधानें बोलतांना फार जपून बोललें पाहिजे. यूरोपांतील उपमानें हिंदुस्थानाला लावण्यांत बिलकुल अर्थ नाहीं. शक, यवन, किरात, पल्हव, पुंड्र वगैरे अनार्य कुलांशीं आर्यांचा शरीरसंबंध होणें केवळ असंभाव्य आहे. उदाहरणार्थ, प्रस्तुतचा मुसुलमानांचा—अस्सल व बाटचे—समाज घ्या. हा समाज आज कमींत कमी बाराशें वर्षे हिंदुस्थानांत वावरत आहे. परंतु, कोणी मुसुलमान शरीरसंबंधानें किंवा धर्मांतरानें हिंदु झाला व तो क्षत्रियांत मोडूं लागला, असा एकहि दाखला नवसालासुद्धां मिळावयाचा नाहीं. तात्पर्य युरोपियनांचे एतद्विषयक प्रलाप निव्वळ बाष्कळ आहेत.

१० वांशिक पद्धतीनें इतिहास लिहावयाचा म्हटला म्हणजे त्या त्या देशांतील लोकांची वंशपरीक्षा करणें अपरिहार्य होतें. मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें विचार करावयाचा म्हटला म्हणजे मराठ्यांचा वंश कोणता, तें ठरविणें अवश्य होतें. मराठे शकवंशीय आहेत, असें रिस्ले प्रपादतात. ते खोटें व निराधार आहे, असें मी म्हणतों. रिस्लेचा प्रत्येक शब्द असत्य व डळमळीत आहे, असें मला वाटतें. मराठे कोठून आले केव्हां आले, कसे आले, एतत्संबंधीं रिस्लेची माहिती कोती, असंबद्ध, निराधार पोरकट व शास्त्रशून्यतेला साजेल अशी आहे. शकांनीं आपली मूळ शाक भाषा टाकून दिली, आर्य प्राकृत भाषा स्वीकारली व तिच्यापासून वर्तमान मराठी झाली, असा रिस्लेचा विचित्र कोटिक्रम आहे. बोलण्याला आधार कशाचाही नाहीं. नुसता Wild and ignorant conjecture आहे. ह्याला सशास्त्र पद्धत म्हणतात ! व हिंदुस्थान सरकार हें भारूड छापण्याकरितां पैसे खर्चतें ! लेखकाच्या सशास्त्र पद्धतीचें कौतुक विशेष करावें किंवा हिंदुस्थान सरकारच्या पारखेचें कौतुक विशेष करावें, ह्याचें मला गूढ पडलें आहे !

११ असो. असले विपरीत सिद्धांत युरोपियन लेखकांच्या लेखांत पदोपदीं आढळतात. जशी वेळ पडेल व लहर लागेल, त्याप्रमाणें हे सिद्धांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत बदलत असतात. मोगलांना चिरडून हिंदुस्थान इंग्रजांनीं मिळविलें, असें एक लेखक लिहितो; तर मराठ्यांपासून हिंदुस्थान इंग्रजांनीं हिसकून घेतलें, असें दुसरा लेखक प्रपादतो. हिंदुस्थानच्या विचित्र हवेंत शारीर व मानसिक श्रम युरोपांतल्याप्रमाणें होत नाहींत, असें एक शहाणा बरळतो, तर दुसरा होतात म्हणून त्याचा निषेध करतो. असे नाना प्रकारचे परस्परविरुद्ध ग्रह युरोपियन लोक आपल्या सुपीक डोक्यांतून, मन मानेल तसे, प्रसवत असतात. त्यामुळें होत आहे काय की, ह्या पाश्चात्यांच्या कोणत्याच बोलावर इकडील विचारी लोकांचा विश्वास बसत नाहींसा झालेला आहे. अशा स्थितींत एकच मार्ग सुरक्षित भासतो. आपलीं मतें यथासत्य बनविण्यास आपणच उद्योग केला पाहिजे; दुसऱ्याच्या दुटप्पी बोलण्यावर भिस्त ठेवून बसण्यांत तात्पर्य नाहीं, हीच गोष्ट लक्ष्यांत

घेऊन, मराठ्यांचा यथासत्य इतिहास निपजण्याकरितां, मराठ्यांच्या इतिहासाचीं अस्सल साधनें प्रसिद्ध करण्याचा प्रस्तुत लेखकानें उपक्रम केला आहे. त्या कामीं प्रस्तुत प्रसंगीं **महाराष्ट्र साहित्य परिषदेनें** साहाय्य केलें, ही बाब मतैक्याची सूचक आहे.

१२ ह्या दहाव्या खंडांत माधवराव बल्लाळ, नारायणराव बल्लाळ, सवाई माधवराव व बाजीराव रघुनाथ ह्या चार पेशव्यांच्या कारकीर्दींतील पत्रव्यवहार आला आहे. पैकीं माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दींतील ७९ लेख आहेत. त्यांतला २१ वा लेखांक शक १६८५ श्रावण शुद्ध ५ चा असून, त्यांत दोन्हीं सैन्यें मिळून पांच सहा हजार लोक रणास आले, असें खुद्द माधवराव लिहितो. ह्या राक्षसभुवनाच्या लढाईंत मोंगलांचे दहा हजार लोक पडले, असें डफ म्हणतो व आधार बखरीचा देतो. कोणत्याहि बखरीपेक्षां खुद्द माधवरावाच्या पत्रावर जास्त विश्वास ठेवला पाहिजे, हें उघड आहे. अस्सल पत्रापेक्षां बखरीवरच डफनें विशेष निर्वाह केला होता, हें सांगावयाला नकोच. ही तपशिलासंबंधाची बाब झाली. परंतु; निजामाशीं चाललेल्या ह्या मोहिमेंत दुसरीच एक बाब इतिहासदृष्ट्या व राजनीतिदृष्ट्या महत्वाची आहे. ती बाब ही. मोरोबा फडणवीस, गोपाळराव पटवर्धन, सदोबा शेणवी, गमाजी मुतालिक, भवानराव प्रतिनिधी, वगैरे मराठे मुख्यसत्तेला सोडून शत्रुपक्षाला मिळाले, तें राजनीतिच्या दृष्टीनें कितपत न्याय्य होतें ? स्वतंत्र संस्थानांतलि कोणीहि माणूस युद्धप्रसंगीं किंवा शांततेच्या कालीं शत्रूच्या संस्थानाच्या विरुद्ध कोणत्याहि प्रकारें संस्थानाच्या जाणून उपयोगीं पडल्यास, तो संस्थानद्रोही होऊन देहान्तशिक्षेस पात्र होतो, असा सर्व राष्ट्रांचा नियम आहे. त्या नियमाच्या दृष्टीनें पहातां गोपाळराव पटवर्धन वगैरे सरदार संस्थानद्रोही ठरतात. हा नियम त्या कालीं महाराष्ट्रांत प्रचलित नव्हता, असेंहि नाहीं. तोतयाचें बंड झालें तेव्हां नाना फडणिसांनीं हजारों लोकांचीं त्यांच्या त्यांच्या अपराधांच्या मानानें शासनें केलेलीं आहेत ( पत्रांक ३०७ ). संस्थानांतील सामान्य माणसें शत्रूच्या सेवेस गेलीं असतां, त्यांचीं घरेंदारें जप्त करण्याचीहि वहिवाट त्या कालीं होती ( पत्रांक ६६ वगैरे ). शिवाजी तर अशा माणसांना शत्रु समजून शासन करीत असे ( म. इ. सा. खंड ८ ). रघुनाथरावाचें व माधवरावाचें इतकें बिनसलें असतां, रघुनाथरावाच्या विरुद्ध माधवराव निजामाला जाऊन कधींहि मिळालेला नाहीं. असा दंडक त्या वेळीं प्रचलित होता. मुख्य सत्ता शिरजोर असतां हा नियम लागू असतो, व कमजोर झाली असतां नसतो, असें तर बिलकूलच म्हणतां येत नाहीं. मुख्य सत्ता कोणत्याही कारणानें कमजोर होऊं लागली असतां, तिच्याशीं एकनिष्ठेनें रहाणें इतकेंच नव्हे, तर तिला शिरजोर करण्याकरितां जिवापाड मेहनत करणें संस्थानांतील प्रत्येक माणसाचा स्वभावसिद्ध धर्म आहे. तो धर्म न पाळला, तर संस्थानाचें स्वातंत्र्य त्या मानानें नष्ट होतें. संस्थानाचें स्वातंत्र्य जसजसें नष्ट होतें, तसतसें ज्या धर्म, नीति, व संस्कृती यांच्या संरक्षणाकरितां स्वतंत्र संस्थान निर्माण झालेलें असतें, त्यांचा नाश होतो. त्या नाशाबरोबर संस्थानांतलि प्रत्येक व्यक्तीचेंहि स्वातंत्र्य नष्ट होतें. अशी भयंकर आपत्ति संस्थानद्रोहानें येते. तेव्हां, संस्थानद्रोह्यांना मोठी शिक्षाच योग्य

असते. अशी शिक्षा न देणारा संस्थानाधिकारीहि संस्थानाच्या नाशास कारण होतो. ह्या दृष्टीनें पहातां, संस्थानहितार्थ माधवराव बल्लाळानें गोपाळराव पटवर्धनादि मंडळींचें यथायोग्य शासन केलें पाहिजे होतें. गोपाळरावादि मंडळी फौजबंद पडल्यामुळें व संस्थानाधिकारी कमजोर पेंचांत पडल्यामुळें, माधवरावाच्या हातून शासन करण्याचा धर्म यथास्थित अमलांत आला नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, देशांतील राजधर्म व प्रजाधर्म ढिला पडला; ह्यापुढें प्रत्येक सरदार हरहमेष संस्थानच्या शत्रूशीं कधीं गुप्तपणें व कधीं उघडपणें मित्रत्व करूं लागला. पानिपतच्या लढाईनंतर संस्थानद्रोहाचें पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे हें गोपाळरावादि मंडळींचें होय. ह्याचा कडक बंदोबस्त तावडतोब व्यवस्थित रीतीनें त्याच वेळीं झाला असता, तर सर्व सरदारांना भयंकर वचक बसला असता व मराठ्यांचें स्वतंत्र संस्थान अजरामर झालें असतें. ह्या प्रकरणाचा येथें विशेष उल्लेख करण्याचें कारण असें कीं मराठ्यांचें पुढील सर्व चरित्र ह्या एका संस्थानद्रोहाच्या पातकानें लिप्त होऊन गेलेलें आहे. ह्या संस्थानद्रोहाचा मूळ उगम रघुनाथराव पेशवा होता. त्याचा निकाल यथायोग्य शासनानें माधवरावानें लावून टाकिला असता, म्हणजे द्रोहाचें बीजच नष्ट झालें असतें. शक १६९० च्या ज्येष्ठ शुद्ध १० स धोडपच्या लढाईंत रघुनाथरावदादाचा माधवरावानें रेंच मात्र उतरला ( पत्रांक ४९ ); परंतु, संस्थानद्रोहाबद्दल त्याचें करावें तसें शासन न करतां, कीड तशीच राहूं दिली. ह्या किडीच्या आश्रयानें संस्थानांतील सरदारांना संस्थानाच्या विरुद्ध वागण्यास अवसर मिळाला. ही कीड नाहींशी केली असती, म्हणजे सरदाराचें पृथक् होण्याचें एकच साधे खूळ राहिलें असतें. व तें कालांतरानें जमीनदोस्त करतां आलें असतें.

१३ नारायणराव बल्लाळाच्या कारकीर्दींतलि पत्रें थोडीं म्हणजे फक्त ४ आहेत. माधवराव नारायणाच्या कारकीर्दींतील पत्रें ३०२ आहेत. पैकीं पत्रांक २७४ पर्यंतचीं पत्रें रघुनाथरावदादांच्या संस्थानद्रोहाच्या हकीकतीनें भरलीं आहेत. शक १६८३ पासून शक १७०४ पर्यंत जीं २१ वर्षें गेलीं, त्यांचा इतिहास म्हणजे रघुनाथरावदादांच्या संस्थानद्रोहाचा इतिहास. त्याची समाप्ति पत्रांक २७४ त झाली आहे. रघुनाथरावाच्या द्रोहाचा सांसर्गिक झटका गायकवाड, पटवर्धन, भोंसले, होळकर, शिंदे, कोल्हापूरकर वगैरे अनेक सरदारांस बसल्या कारणानें पत्रांक २७४ पर्यंतच्या पत्रांत ह्या सरदारांच्याहि संस्थानद्रोहाची हकीकत आलेली आहे. शक १७०४ पासून शक १७१८ पर्यंतचीं म्हणजे सवाइ माधवरावांच्या मृत्यूपर्यंतचीं पत्रें आहेत, त्यांत, सर्व मराठा सरदारांचें एकीकरण करण्याचा जो नाना फडणिसानें प्रयत्न केला, त्याची हकिकत पहावयास सांपडेल. ह्या एकीकरणाच्या हकीकतीची समाप्ति पत्रांक ४१५ त झाली आहे. तदनंतर रावबाजींच्या कारकीर्दींचीं पत्रें लागतात. त्यांत बाजीरावाचा कमकुवतपणा. सरदारांचा द्रोह, पेंढाऱ्यांचे दंगे, स्त्रियांची नागवण, व लोकांची दैना, ह्यांचीं वर्णनें वाचावयास मिळतील. शक १६८३ पासून रघुनाथराव व गोपाळराव यांनीं जो संस्थानद्रोह सुरू केला व ज्याचें पारिपत्य यथास्थित झालें नाहीं, तो परिपाकास येऊन सत्ताधीश, सरदार, सामान्य

प्रजा, स्त्रिया, व धर्माधिकारी यांस कसा भोंवला, तें शक १७२२, शक १७२३ व शक १७२४ या तीन सालांतील पत्रांवरून तपशीलवार कळेल. स्वतंत्र संस्थान म्हणजे काय वा संस्थानद्रोह म्हणजे काय, स्वसंस्थानाला सोडून, शत्रूची सेवा करणें म्हणजे केवढें पातक आहे, प्रत्येक जाणत्या माणसाला राजकीय भावना किती जाज्वल्य असली पाहिजे, वगैरे गोष्टी ज्या वाचकांना माहीत असतील, ते ह्या तीन सालांतील पत्रांचे बहूत मनन करतील. शक १७२४ नंतरचीं रावबाजीच्या कारकीर्दीतील पत्रें आपापली हकीकत सांगतच आहेत तेव्हां, त्यांसंबंधानें येथें जास्त लिहीत नाहीं.*

---

* टीप ( पृ. ४६४–७१ ) प्रस्तावना खंड १० ची आणि तसेंच पृ.४५४–४६३ ही प्रस्तावना खंड ११ ची आहे, म्हणजे ११ वी चुकीनें आधीं घेतली गेली.

पुरातत्त्वभूषण इतिहासाचार्य

# राजवाडे-खंड-प्रस्तावना-सूचि

( शं. ना. जोशी, वाईकर. )

**खुलासा**—अक्षरानुक्रमांत श्रीकार प्रारंभीं घेतला असून अनुस्वाराची स्वतंत्र बाराखडी समजून अनुस्वारांकित शब्द अ,आ इत्यादि औ च्या पुढें दिले आहेत. आणि नंतर जोडाक्षरें घेतलीं आहेत. सूचींतील व्यक्तिनाम अथवा स्थलनाम शक्य तोंवर कालासह देण्याचा प्रयत्न केला आहे. हे कालनिर्देश कंसांत दर्शविले असून मूळ लेखांतल्याप्रमाणें तो काल श०=शकांत अथवा स०=सनांत दाखविला आहे व्यक्तिनामापुढें ती व्यक्ति कोणाकडील हें समजण्याकरतां म्हणजे शि. स.= शिवाजीकडील सरदार; नि स =निजामशाही स; अ.स.= अदिलशाही स;= ता. स.=ताराबाईकडील स.; शा.=शाहूकडील; पे.=पेशवे इ० असा संक्षेप योजिला आहे. सूचींतील निर्देश त्या त्या पृष्ठांत एकापेक्षां अधिक वेळां व निरनिराळ्या हेतूनें आलेला असल्यामुळें आंकड्यानें दर्शविलेलें पृष्ठ सबंध वाचावें. कंसांत दिलेले नुसते आंकडे हे त्या पृष्ठांतील परिच्छेदाचे समजावें.


### श्री

श्रीनिवासराव--जुन्नर नि. स. ( श. १५४९ ) २३५,२३६;(श.१५५२–५८) २५८

श्रीनिवासराव प्रतिनिधी, शामळावर स्वारी १६१

—व सिद्दीसात ( श.१७३२ए.८ ) १६२,१६७

श्रीरंगपट्टण–सं. स्थल ७

—मार्ग पुण्याहून १०६

—स्वारी व डफाविवेचन ( स. १७२६ ) १४३, १४४

—स्वारी(स.१७५३,–५७)१२,१३,६४

श्रीवर्धन २३८

—मार्ग पुण्याहून १०५

श्रेष्ठ पुरुष १८३, १८४

### अ

अकलकोट सं. स्थल ७

अकबर २३४

अकलूज ( स. १७१४ ) ३४

अकोळनेर सं. स्थल ७

अखबार–प्रामाण्य २९९

अठरा टोपीवाले ९६

अताईखान अ. स. गो. बुंदेल्यास मारतो —( स. १७६० डि. २२ ) ८४

अदिलशाही ( स. १६८६ ) ३९७

अद्वैतेंद्र २०६

अनुपशहर–अबदलीमुकाम (स. १७६१ ) ६१, ६८

अनूपसिंग (स. १७३३) १३२, १३६

अनंगपाळ–चेनपाळ तुवरवंश २२३

अन्याडें–सातारा ( श. १४६३ ) ३८६

अप्पाजी थोरात ता. स. (स. १७०७)१२७

अफगाणिस्तान सं. स्थल ६

अफजलखानाचें नांव ४४

—चा मार्ग २७८

—प्रकरण (श. १५८१ मार्ग. शु. ५ २७७, ७८

अबदली ( स. १७५१,-५७) ५६

(अबदली चालू)
–ची कोंडी ७९–८०
–चें डावपेंच विवेचन ८८
–व दिलीतख्त ७७
–ची दुःस्थिती ७५, ७६, ८२
–लाहोरास जातो ५९
–व मराठे ३८, (स. १७५१,-५७)५६
–व सुजा उद्दौला ७५
–स्वारांचा हेतु ७५, ७६
अबदुल्ला इस्मायल काजी–पुणें (श. १५६८) अ. स. २६३
अमरगांगेय यादव ४३९
अम्मर मलकुगी जाधव ४३९
अमृतराव कदम बाड शा. स. (स. १७०७) १२८
अमृतराव तुकाराम निंबाळकर– —शिवाजीचा नातू ४४९
अयोध्या–सं स्थल ७
अरुण–खेचिवाडा (स. १७६० ) ६८
अलजपूर सं. स्थल ७
अलम अलीखान–सय्यद हुसेन व १ ले बाजीराव (स. १७२० ) १३२
अलाउद्दीन खिलजीची देवगिरीवर १ ली स्वारी (स. १२९३ ) ३७४
अलिगड सं. स्थ. ७
अलिगोहर–दिल्लीपातशहा ७६, ७७
अलिबाग सं. स्थ. ७, (स. १७३९)१७५
अशेरी (स. १७३९ ) १७३
अश्राधार–कोंकण (स. १७३३ मे ) १६६
असदखान अ. स. (श. १५६८ ) २६८
असुर लोक ३१५,-संज्ञा, जाती ३२६
अमोले-कोंकण १६३
अष्टप्रधान पद्धती–१०३, १०४
अष्टमी-कोंकण (स. १७३३ मे ) १६६
अहमदनगर सं स्थ. ७.—मार्ग पुण्याहून १ ६,—(स. १४८९ ) ३९७, —(श. १५२२ ) मोंगल घेतात २३४ —चा किल्ला पेशव्यांकडे येतो (स. १७५९ आक. १० ) ६२
अहमदखान बंगष-पराभव (स. १७४९ मार्च ३० ) १३३, (स. १७५१ ) ६५
अहमदशा अबदली–अबदली पहा.
अहमदाबाद-सं. स्थ. ७
अहमद मुलाणा–राजमाची किल्लेदार (श. १५६० ) २६२
अहिरांचें बंड (स. १७६० ) ६८

आ

आखाडें–सातारा (श. १४६३ ) ३८५
आडनांवें आधीं लिहून मग व्यक्ति नाम-लेखन. (श. १४६३) ३८६, ३८७; ४३२, ४३५
आनेवाडी–सातारा (श. १४६३ )३८७
आनंदराव राम यादव हो. स.(स. १७६१) ६१
आनंदराव रास्ते ११५
आनंदराव सोमवंशी–अंजनवेलवर स्वारी (स. १७३३ ) १६४
आनंदवल्ली सं. स्थ. ७
आनंदाश्रम पुणें ३६५
आण्णाजी मानाजी आंग्रे २०७
आपो पाटेलु–(श. १४७९ ) ३८८, ४३५
आपो याक्री पाटील-निंब (श. १४७९ ) ३८८
आबाजी सोनदेव–कल्याण स्वारी (श. १५६८ ) २७०; ४४४
आमण यादव–४३९
आमस्टर्डाम–सं. स्थ. ६
आरडें सातारा (श. १४६३ ) ३८६
आरवी–(स. १६२८ ) ३८२
आरळे ८४
आर्यकुल स्थैर्य–३२२
—दाक्षिणेंत आगमन व चातुर्वर्ण्य ३३२
—प्रगतिमार्ग (चतुर्विध ) ३०९
—समाज (ऋक्सं. काल ) ३३५
—संज्ञा ३२६
आलेगांव कर्यात पाटस (स. १६२८)३८३
आलोजी मोरिया–४३६
आवजी कवडे–(स. १७३९ ) १३४

आह्मार्गणी-सातारा ( श. १४६३ ) ३८६
आहेघर-सातारा ( श. १४६३ ) ३८६
आळेडी-सातारा ( श. १४६३ )३८६

इ

इचलकरंजी-सं. स्थ. ७
इटावें शहर- ( स. १७६० ) ६८
—स नजीब० व जहानखान वेढा (स. १७६० जून) ६९
इतिहास-२८१,-८२, ४५४
—अध्ययन ४५३
—अवलोकनवैचित्र्य व ज्ञानसंकोच ३४९,-५०,-५१,
—ची आधारचिकित्सा व प्रामाण्याप्रामाण्य ।। २४१, २७३;-स्थिति ३०१;-चे आधारांत पोर्तुगीज व इंग्रजीपत्रें २९८,-महजरांचें महत्व २६५,-६६;-आंग्लभाषा ३६४
—उद्योगाची दीर्घता ३६४,
—( ऐतिहासिक शब्द पहा. )
—काराधमाची दुकल ३४७
—कार्य ( २६ ) ३१७, ३१८;-स सहाय्य ३६१, ३६२
—काल पश्चात्प्रलयीन ३२१
—कोणाचा कोणीं लिहावा ३४५,३४६
—कलंक ३४७
—क्रांति व लो. टिळकांचा ध्रुवसिद्धान्त ( २७ ) ३१९
—ग्रँटडफ ३५६
—जिज्ञासूचें काम ६
—दृष्टि तऱ्हा व तिचें कारण ( २४ ) ३१६, ३१७
—नीतिशास्त्र (२५, २६ ) ३१७,३१८
—निर्णायक पद्धति व महाराष्ट्र ३४०, ३४१
—निर्विकार लेखन ३१६
—पोटभेद ६ व त्यांची द्विविधता(३३) ३२३-३२५
—पौराणिक भाग व त्यावरील ग्रंथ३५९
—प्रकार २ व त्याचें फल ४६४
—प्रयोजन २८१
—प्रसार व त्यांचे प्रकार ३४७, ३४८
—प्रामा० १४३० भविष्यकथन३१५,-१६
—महत्व ४५३
—महाराष्ट्र समाज १९५;-मॉरिस ३५६
—युनिव्हर्सिटीपूर्वी १
—राजकीय २७,
—लेख इ. स. १२६० पूर्वींचे ३७३:व इ. स १२२६ पूर्वींचे ३७४;-बार करण ३८२
—लेखन हेतु १९३-चा पूर्व तयारी ३२९;-च्या बाजू २८१, २८२; च्या ३ पद्धती ३२०, ३२१;-कौलिकपद्धती श्रेष्ठ ।। ३२१, ३२३: ३४४-गुण ३२१;-लेखनाची अडचण ३१६, ३१७,-महाराष्ट्रस्थिति ३४८, ३४९,-संधी व प्रकार १०१-१०३, १०४
—लेखभाषा व कारणें २
—लेखसाधनें व छपाई (नियम ५)३७३
—साधन प्रकार व स्वरूप ३६८
—राष्ट्रीय हेतु सफलतादि फायदे ३४६, ३४७
—विकृति व बुद्धिभ्रंश ३४५
—व्याख्या, पाश्चात्य ३०५ ३३०; पौर्वात्य ३०६:३४४ ४५९, ४६०
—शरीरयंत्र व परंपरा ३२६,-२७,-२८
—शास्त्रभिन्नता ३३१
—शास्त्रीयज्ञानाचा आधार ३५४
—साधनप्रासिद्धे ३६२, ३६३; ३६६ ३६७; ४५०, ४५१, ४५३
—संस्थानिक इत्यादि ३६४.३६५;४६३
—संशोधन १०१;३५९,-स्थलें ६, ७,
—संज्ञा ३३०, ३०८
—स्थिति ( स. १८६७ ) १, २
—स्वरूप, ओळखण्याचे मार्ग३१२,३१३
—ज्ञान -पेशवेकालीन ९६, ९७
—ज्ञानप्रसार ३६३;-उपयोग ३६०
इब्राइमखान गार्दी-९७, पेशव्यांचा नोकर बनतो (स.१७५८) ६३
इमादशाही-( स. १५७२ ) ३९७

इराण–सं. स्थ. ६
इर्यसमाज=पारसी ३१४, ३१५
इसलामपूर–( स. १७१७ ) १२५
ईश्वरविद्यासागर–३५६

उ

उज्जनी सं. स्थ. ७,–मार्ग पुण्याहून १०६
उदगीर मार्ग–पुण्याहून १०६
—लढाई (स. १७५९,–६०) १३,१४; ६३, ६४
उदाजी चव्हाण–मिरज. ता.स.(स.१७०७) १२७
उदाजी पडवळ–सागरगडचा बंदरदार १५२
उदाजी पवार–( स. १७३३ अक्टो.) १७०
—शिद्दी अंबरला मारतो ( स. १७३४ १६९
उर्दू–दाक्षिणी ४१६; भाषा ४१३
उदेपूर–सं स्थ. ७
—संबंध व स्वतःशिवाजी २३१
उमियाशंकर याज्ञिक–इतिहासकार १
उषवदात–नहपानाचा जावई २२५

ए

एकनाथस्वामी–(स.१५४८–१६०९) ४१६,
—व मराठी भाषा ३८४
—कृत ज्ञानेश्वरी ( श. १५१२)३९५
एकसेष्ठी त्रिगोत्रि ४३५
एळबो परसो पाटील–सुपगुडा, निंब ( श. १४७९ ) ३८८,४३५

ऐ

ऐतिहासिक आधार–लेखाची विश्वसनीयता २९९
—कागद छपाई ४२ ( टीप ), व वतनदारादिकांचें हित ७, ८; २१०–२११
—तत्त्वज्ञान ३५४,–च्या दोन शाखा. २३९
—नकाशे ३५८
—पत्रें २१०, २११
—प्रसंग १२६, २८०, २८१;–चे घटक ३२३
—लेख छपाई ३०५,–महत्व व अध्ययन ४५३–संग्रह व एक देशीय इति० ६,–तील मित्या १२१–१२२
—शब्दकोश ११
—साधन प्राप्ति परिश्रम ४५७,४५८;–स्थल ४५७,–बद्दल शंका ४६२, ४६३;–चें वर्गीकरण व भाषा ४६१
प्राप्ति आतांपर्यंतची ४६१, ४६२
—साधन प्रसिद्धि ४५४
—सामग्री प्रकार ४५७
ऐवजखान १३६;–चा पराभव (स.१७२२) १३२
ओझर्डे–वाई सं. स्थ. ७, ४४१
औरंगजेब मृत्यु ( स.१७०७ फे. २०)१२७
औरंगाबाद सं. स्थ. ७, ( स १७४०,–५१,–५२)११, २०–खु० बु.४४४
—मार्ग पुण्याहून १०६
अंजनवेली (स. १७३२) १६२, व संभाजी आंग्रे ( स. १७३५ जाने. ) १६८;
–मराठ्यांच्यास्वाधीन १६९
अंत प्रभु देशमूख–असोले १६३, १६७
अंताजी माणकेश्वर ( स. १७५५–५७ ) ५२, ५७, ११२
अंबाजी त्रिंबक ( स. १७३० ) ३८३
आंग्रे १७८, १७९;–आंगरवाडी १४९; व कोंकण ( स. १६८०–१८४० ) १४८,–व डफ १५१,–व ब्रह्मेंद्रस्वामी, छत्रपती व बाजीराव १८२, १८३
—व फारेस्ट वंशावळ १५१
—वंशावळ ( स. १६०२–१७६० ) १५०
—शिंदे भांडण ( स. १७१३ ) १३०
आंतोणे–कोंकण ( स. १७३३ मे ) १६६
आंध्रराज वंशावळ २२५
—शातकर्णी, शूद्रराजे २२४–२५
आंबे–जोगाईचें ३७६
इंग्रज कुल व अंतस्थ इतिहास ३२३, ३२८
—कोंकण ( स. १६३८ ) १४९; (स. १७१५ ) १५२
—खांदेरी ( स. १७१९ ) १५३
—गुण ३६१, ४६०

( इंग्रज चालू )
—पेशवे ( स. १७३९ ) १७५
—पोर्तुगीज १७४
—मनोविकृति ४६७, ४६८
—मराठ्यांचा गृहकलह १६८
—राजकीय इतिहास ३२८
—विजयदुर्ग ( स. १७१७ ) १५३
—हिंदुस्थानवासी व स्वभाव ३६१
इंचबर्ड, मुंबई–चिमाजीआपा १७५
इंदवडी–सातारा ( श. १४६३ ) ३८६
इंदूर सं. स्थ. ७ मार्ग–पुण्याहून १०६
उंदेरी बंदर १५२, ( स १७३३ ) १६४, ( स. १७३६ ) १७०
उंब्रज–( स १७३० फे. ) १३३
ओंकार–सं. स्थ. ७
औंध–सं. स्थ. ७

क

कठसिंग कदमराव–खानदेश (स. १७०७) १२७
कडाप्पा सं. स्थ. ७
कमरुद्दीन वजीर (स. १७३५) १३४
कमळाकर कवि–गौळणगीत ४४८
कमिशनें व समाजचरित्र–३६१
करदी–सातारा (श. १४६३) ३८६
कराच्या बावी–(२४) (श. १४७९) ३८८
करीमबेग–नि. स. (स. १७२१) १३२
कर्णसिंह–२३३
कर्नोल–सं. स्थ. ७
कऱ्हाड–सं. स्थ. ७
कल्याण सं. स्थ. ७
कल्याणभिवंडी–(स. १७१४) ३४
कविकलश ४४८, ४४९
कळोजी वादळू–वहुगांव (श. १४६३) ३८७
काऊजी बा॰मी–करदी (श. १४६३) ३८६
कागद–३७४-७६
कागल–सं. स्थ. ७
काजोसी–(श. १४६३) ३८६
काठवडी–सातारा (श. १४६३) ३८७
कादरगंज–(स. १७५१) ६५,
—ची लढाई १४
कानिटकर (स. १७५७) ५४
कानो पाटेलू–माहुतर्डी (स. १४६३) ३८७
कान्होजी आंग्रे–(स. १६०२-१६५१) १५०
—व इंग्रज जहाजें(स.१७१७-२७,)१५३
—उदय (स. १६८० पूर्वी) १५२
—कोंकण ता. स (स. १७०७) १२७
—डच (स. १७१७-२७)१५३
—तह शाहुछत्रपति (स. १७१३) १३० १५२
—पोर्तुगीज (स. १७१७–२७) १५३
—ब्रह्मेंद्रस्वामी (स १७२९) १५९,– स शपथ१५६,पत्र व पारसनीस१५७-५८
—मृत्यु ( स १७२९ जुलै) १३६
—हाल चाली १३७
—शाहु १५२०–ची आज्ञा १५३
—ची बेपर्वाई (स. १७२६) १५४
—चा शिक्का २०९
—शिद्दी युद्ध (स. १६९८), तह ( स. १७१५ ) १५२
—साताऱ्यावर चाल (स. १७१३)१३०
—हबसी शामळ १५४
कान्होजी आंग्रे २रा (स. १७३६--१७३९) १५०
कान्हो पाटलू–ब्राह्मणवाडी(स.१४६३)३८६ ४३५
कान्होजी भोसले–१७८, (स.१७२६) १३३
—व शाहू (स. १७१४) ३५
कायगांव–सं. स्थ. ७
कायभट्ट–ज्योतिषी–मिरज ४३६, ४३७
कायस्थ–दुभाषीपणा ३९९
कायमखा बंगष पराभव (स. १७२९ मे ४) १३३
काव्येतिहाससंग्रह पत्रवर्गवारी ५, ६;—
—पत्रांच्या मित्या ११०–१२०
काशीराज–( पानपतबखर, अग्राह्यभाग चुका १० ) १०७, १०८
काशी त्रिमल व संभाजी राजे ४४६
काशी बंदर ( स. १७३२ ) १६७
काशी सं. स्थ. ७,–क्षेत्र ६९;( स १७५४–५७,–५९) ६५, व मराठे ३८,३९

कासेगांव–( स. १७१४ ) ३४
काळदुर्ग–मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७) १७१
काळपाटील–मुरकट ( श. १४६३ ) ३८६, ४३५
काळबोवा पुणें १९३
काळशेटी रामशेटी गुठाळु चौगुला निंब– ( स. १४७९ ) ३८८, ४३५
काळेगांव– सं. स्थ ७
काळो पाटील–सुपडा, निंब ( श. १४७९ ) ३८८, ४३६
कितूर–सं. स्थ. ७
किन्हई–किणै–सातारा ( श. १४६३ ) ३८५,
कुक पाटील, पोफळीया–वाळुज (श.१४६३) ३८७, ४३५
कुडाळ प्रांत–( श. १६५९ ) ३३
कुडाळ–सातारा ( श. १४६३ ) ३८५
कुतुबशाही–( स. १६८७ ) ३९७
कुधारक व विचार–४१७, ४१८
कुल्म हरि सेटी, काळोखा–निंब ( श.१४-७९ ) ३८८, ४३६
कुलाबा बंदर १५२, १६८, ( स १७३५ ए. )– मराठ्यांचे स्वाधीन १७९
कुलें–प्रमुख सात ३२४
कुस्तुंतुनिया=रुमशाम ( स. १७३०–५४ ) ९६
केरो लक्ष्मण छत्रे–३५६
केरौली–शिंदेहोळ० मुक्काम ( स. १७६१ ) ६१
केशवराव पानशी ९७
केळकर–यावनीधर्मस्वीकार २५८
केळवें–( स. १७३९ ) १७३
कोंकण व आंग्रे ( स १६८० ) १४८
—प्रांतावरील अंमल १४९;
—भोसले ( स. १६४० ) १४९
—चे ५ सत्ताधारी ( स. १७१५ )१५२
कोंकणस्थ कऱ्हाडे भांडण–काशी ( स. १७६० ) ६९
कोटपुतळी–( स. १७६० ) ६०, ६१
कोटा–सं. स्थ. ७
कोपरगांव–सं. स्थ. ७
कोयाजी आलोजी मोरिया–निंब(श.१४७९) ३८८
कोरेगांव सं. स्थ. ७,–सलाबतजंग मु. ( स. १७५१ मार्च ) २०
कोल्हापूर सं स्थल ७;–कोंकण भाग ( स. १७१५ ) १५२
—मार्ग पुण्याहून १०६
कोहज किल्ला– पिलाजी जाधव घेतो (स.१७-३०) १६१
कोहाळा–मराठ्यांचे स्वाधीन(स.१७३५ए.) १६९
कोळवण–कोळी ( स. १४५० ) ३९७
कंठगिरी गोसावी–निंव ( श. १४६३ ) ३८५
कंठाजी कदम बांडे–पे. स. गुजराथ (स. १७२६ ) ११६, ११७
कंवरजखान १३३;–चा पराभव ( स. १७२४) व हैद्राबादकर१३३;
कांगोरी किल्ला २७०
कुंजपुरा मराठे घेतात (स. १७६० आक्टो.) ५८, ५९; ७८, ७९
कुंटे म. मो.–४२८
कोंडवळकर–कोंकण २५९
कृष्ण ऊर्फ कन्हार–कंधार यादव —( स. १२४७–६० ) ३७४, ४३९
कृष्ण जोशी संगमेश्वर व अवदलीची दुःस्थीत वर्णन ८२;- मृत्यु (स. १७६० नोव्हेंबर ) ८३
कृष्णराव खटावकर–साताऱ्यावर चाल व पराभव ( स. १७१३ ) १३०
कृष्णराव चंद्रराव मोरे ( श. १५७७)२७५, —२७६
कृष्णशास्त्री गडबोले–प्रा. व म. इतिहास १
कृष्णशास्त्री चिपळोणकर–३५६
कृष्णंभट देशमूख असोले १६७
कृष्णंभट देसाई–ब्र स्वा. १६३
कृष्णाजी अनंत सभासद–( स. ब. कर्ता श- —१६१९ )२१७

कृष्णाजी त्रिमल-शि.स.(पदवी विश्वासराव)
—४४६
कृष्णाजी भास्कर-वाई कुलकर्णी अफ०( श. १५८१ ) २७८

### ख

खटाव ( स १७१४ ) ३४
खडीच्या सडका-( स. १७८० ) १०६
खतल डी ( स १७३९ ) १७३
खरसी बुा-सातारा ( श. १४६३ ) ३८५ ३८७
खरेशास्त्री मिरज ४५४, ४५५
खान जहान लोदी मों. स. ( श. १५५० ) २३८
खानदेश २३४,-निकम ( स. १४५० ) ३९७
खान दौरान व० जमान, मों. स २३८,
—वरील स्वारी ( स. १७३४ ) १३६, १३७
खेचि वाडा- अरुण ( स. १७६० ) ६८
खेड-सं स्थ. ७
खेमसावंत व शिवाजी तह ( स. १६५९ ) ३३
—ता. स. ( स. १७०७ ) १२७
खेळणा-शंकरदेव ( स. १४५० ) ३९७
खेळ राघो पाटेलु-निंव ( श. १४७९ ) ३८८, ४३५
खेळोजी गुजर-पानई ( श. १४६३ )३८६ ४३५
खंड-इतिहासाचे, प्रसिद्धी ४५०
—१ मधील पत्रांची सालवारी व विषयवारी इ. ९. १०
खंडेराव दाभाडे-गुजराथ ( स. १७०७ ) १२७,
—शा. स. १२८; ( स. १७०८-१० ) १२९
—सेनापती ( स. १७१७ ) १३१
—मृत्यु ( स. १७२९ ) १३३;ग्रंटडफ १३५-३६
खंडोजी निकम-समशेर बहादर ४४९
खंडोजी माणकर-साष्टी ( स. १७३६-३७) १७१, १८२
खंबायत युद्ध-कदम व गायकवाड (स. १७२६ ) ११७
खांदेरी बंदर १५२, ( स. १७३५ ए. ) मराठ्यांच्या स्वाधीन १६९
ख्रिस्ती तत्त्वज्ञान ३३८

### ग

गमाजी मुनालीक ४६९-४७०
गणेश संभाजी खांडेकर ८६
गणोर ७९
गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी(स.१७०८)१२९
गढेकोट १६१
गनिमाई ३४
गल्हार व मराठे सरहिंद लढाई ५९
गाई सेटी ( श. १४६३ ) ३८७, ४३५
गाजुद्दीन वजीर ( स १७५८ )६०
गाडदी लोक व मराठे ( स. १७५० ) ९८
गायकवाड सयाजीराव ४२८
गिरीभट्ट ज्योतिषी मिरज ४३७
गीतेंतील तत्वज्ञान व महाराष्ट्रधर्म ३३५
गुत्ती सं. स्थ. ७
गुलबुर्गा सं. स्थ. ७
गुहागर १६५
गोगटे-चूक ( बाळाजीबाजीराव व भाऊ मृत्यू ) ९०
गोठणें-कोंकण १६३
गोंद पाटेलु ४३५
गोपाळ गणेश बरवे ८६
गोपाळराव गोविंद पटवर्धन ( स.१७५९) ६१; १००; ४६९-४७०
गोमाजी हवालदार प्रांत पुणें अ. स. ( श. १५६८ ) २६३
गोरखनाथकृत गोरखमत ३९६
गोवळकोट-कुलाब्याची स्वारी ( स.१७३५) १३४
—व प्रतिनिधी ( स. १७३२ ) १६२
—मोर्चे ( स. १७३७ ) १६९
गोवळकोंडा-मार्ग पुण्याहून १०६; ( श. १५१२ ) ३९७

गोविंदपंत बल्लाळ खेर, बुंदेले-( स.१७३९) ५२-५५; १०३,
—कामागिरी ६५, ६६; ६८, ६९, ७०, ७१-ऐन वेळची ८०, ८१; बाा विनवणी ७८;-वरून काढून टाकणें ७४
—चारित्र्यनिष्कर्ष ८५
—तक्रार ९ ची याद ५४
—व दत्ताजी शिंदे ६०, ६८
—दिल्लीस आगमन व कारण ( स. १७६० डि. ) ८४
—नजीबखान ५८, ५९
—पैशाचा भरणा ७३
—बुंदेलखंडाची मामलत(स १७४७)५३
—व मल्हारराव होळकर ६१
—मृत्यु ( स. १७६० डिसें. ) ८४
—रसदबंदी ८०, ८१, ८२
—सुजाउद्दौला ५८, ५९
—स्वरूप ६६-६८
गोविंदराज यादव ४३९
गोळी भाई पाटील-बातेघर ( श.१४६३ ) ३८७
गौळणगीत ४४६, ४४८
गंगाजी नाईक-वसई ( स. १७३७ )१७१, १७२
गंगाधर यशवंत चंद्रचूड ( स. १७६१) ६१
गंभीर नदी ( स. १७६० ) ६९
गांगो पाटेलु-खरसी बुा ( श. १४६३ ) ३८५, ४३५
गांगो वहामणी ४१८
गांडापूर-शिवाजी निवास ( श. १५५२-५५ ) २४०
गुंजाळ नदी २६०
गंड्याचा माळ-लढाई ( स. १७५७ )११६ ११७
गृहकलह-आंग्रे व इंग्रज १६८
ग्रँटडफ इतिहास. अपूर्ण व अविश्वसनीय १०२, ४६५
—कागद ६ लेखन ( स. १७२६-४२) १७६, १७७,
—मौतिक बखर २७-२९; रचना १३७, १३८
—इंग्रज १७९
—उणिवा ( ४२ मोहिमांचे अनिर्देश ) २२-२५
—कार्यकारणभाव १४५, १४६
—कान्होजी आंग्रे १५३
—कीर्तने १, २९
—चिटणीस बखर २१८, २१९
—चूक ८९
—जंजिरा प्रकरण १६७
—टीका १
—तुकारामबोवा मृत्यु (श. १५८५ ? ) २७३
—प्रामाण्य ४६५
—बरोबर विधान २४१
—बाजीराव कारकीर्द १२६, १२७, १३६-३७
—बाळाजी बाजीराव १२६, १२७
—बाळाजी विश्वनाथ १२५
—शकावली ( खं. २ ) १२४
—महमदअली मृत्यु ४४१
—रामदास शिवाजी भेट २७३
—लेखन २९१, २९२
—वसई १७३, १७४
—शब्दव्युत्पत्ति ४४९
—शहाजी-मृत्यु२७३;-वजिरी(१५४६, -४९,-५५ ) २३६
—शिवकार्यारंभ ( श १५६८ ) २६१
—शिवाजी इतिहास आधारग्रंथ (१०) २५६;-पत्नी २४१;-व फ्रेंच ४४३
ग्वालेर सं. स्थ. ७;-मार्ग पुण्याहून १०६;
—सदाशिवरावभाऊ मुक्काम ( स. १७६० धमे ) ६९
घोणसाळे ( स १७३७ ) १७१

**च**

चतुरसावाजी नि.स. २३५,२५८
चरई-रेवासजवळ ( स. १७३६ ) १७०
चरखारी-सं. स्थ. ७
चाकण ( स. १७१४) ३४, शिवाजी घेतो.

( श. १५६८ ) २६९
चाफळ सं. स्थ. ७;राममंदीर (श.१५७० )
—शिवाजी ( १५७१ ) २७०
चास-सं. स्थ ७
चिटणीस बखर ११५, ११६
—घराणें २१६
—व सभासदी बखर ( श. १७३२ )
२१७
चितोड-अलाउद्दीन घेतो ( श. १२२५ )
२३१
चित्रगुप्त व सभासद २५५
—मधील प्रसंग ( ६९ ) २५१-२५३
चिनकुलीचखान=निजामुन्मुल्क् १८०
चिपळूण ( स. १७३२ ) १६२
चिपळुणकर इतिहास २९६
चिपळुणकर वि. कृ.व महाराष्ट्रधर्मप्रसार३३६
चिमणाजी आवजी प्रभु २१६
चिमणाजी कृष्ण भागवत मृत्यु व बखरग्रंथ
२०४
चिमणाजी दामोदर-द. वऱ्हाड (स.१७०७)
१२७
—शा स. १२८; ( स. १७०८-१०)
१२९; १७८
चिमाजी आप्पा-कोंकणांत ( स. १७३८-
३९ ) १७२, १७३
—ठाणें घेतो ( स. १७३७ मार्च २७ )
१७१
—मृत्यु ( स १७४१ ) ५३; (१७४०
डिसें. १७ ) २०५
—शाहू ( स. १७४० ) ४०
—सिद्दीसात पराभव ( स. १७३६ ए.
१९ ) १७०
—हालचाली ( प्रसंग १८ ) १३२-
१३४, १३५;
—तक्ता ( १७२०-४० ) १४१
चेऊल ( स. १७३४ जाने. ४ )१६७
चौथाई व तोफा ( स. १७१४ ) ३५
शिवाजी ३४
चौपदरी-४५६
चौल-सं किल्ले ( स. १७१४ ) ३४
—बंदर व शहर माहिती (स.१७३९);
—मराठ्यांचे स्वाधीन १७४, १७५
चंदनवंदन-शाहू घेतो ( स. १७०७ डिसें.)
—१२८, १२९
चंदप्रांत-( स. १७१४ ) ३५
चंद्रराव मोरे-४४१, व शिवाजी ( श.
—१५७७ ) २७५-२७६
चंद्रसेन जाधव-सेनापती ( स. १७१० )
—१२९
चांगो गोंदू पाटील मोकदम- निंब( श.
—१४७९ ) ३८८,४३५
चांगो मेहतरी साळी-निंब ( श. १४७९ )
—३८८, ४३५
चांदवड-स. स्थ. ७
चांभारगोंदे-सं. स्थ. ७
चिंचवड-सं. स्थ. ७

छ

छत्रपती सातारकर व पेशवे धोरण ( स.
—१७१३-६० ) ३९-४५
—संज्ञा ( स. १५७१ ) २७४
छत्रसालची पहिली व दुसरी भेट (स.१७२९
व १७३३ ) १३६
छले-वालुकेश्वर ९७
छंदोगामात्य-४४९

ज

जगजीवनराव प्रतिनिधीपद- (स. १७४६
—डिसें. १६ ) ११३
जगन्नाथपंत-शिवाजीकडील कारकून ४४५
जगपाळ नाईक निंबाळकर-अ. स. ( श.
१५२३-२४ ) २३४
जगो पाटील-सरतळे ( श. १४६३) ३८७,
—४३५
जत-सं स्थ ७
जनकोजी शिंदे-अवदली पराभव ( स.
—१७६० नो. ) हालचाली तक्ता ( स.
१७५०-६१ ) १४-१६, व स्पष्टी-
करण १८-२१; ५८, १०७
जनार्दनपंत लग्न-( स. १७४४ ए. २० )
—२०२

जमीन माप-दोरी ( स. १६२८ ) ३८२
जयगड किल्ला १५५
जयपूर सं स्थ. ७
जयसिंग जांभ्रे ? १६७
जयसिंग पालकर-( स. १७१४ ) ३५
जयाप्पा शिंदे-कामगिरी-धर्मक्षेत्रें ( स. १७५३-५५ )३८
—मृत्यु नागोर ( स. १७५५जून ३० ) १५, २२, ६५;
—हालचालींचा तक्ता (स १७५०-६१) १४-१६,-व त्याचें स्पष्टीकरण १८-२१
जलालाबाद-१८, ५९
जवानबख्त-आलिगोहरचा पुत्र (स. १७६० ) ७७
जव्हार-सं. स्थ. ७
जहानखान-५७
जाऊजी-बाळवडे-( श. १४६३ )३८६
जाटवंश-४६५, ४६६
जातिभेद व पानपत-४७, ८९
जाधव-२३३, २३४,-यावनीधर्म २५८
—वंशावळ (यादव स. ८५०-१३१८) ४३८-४३९
जानपाटील जाधव-निंब ( श. १४७९ ) ३८८, ४३६
जानोजी भोसले-३९: ( स १७५८ )६१
जानोजी हेवा-दापोडी ( श.१४६३ ) ३८७, ४३५
जाफर अलीखान-फडणसुभेदार ६६
जावली प्रांत-( स. १७०४ ) १४८, ४४
जॉन बीम्स-४०६
जिजाई-शिवमाता शिक्षा ४४६
जिवाजी-खंडेराव चिटणीस १६५
जुन्नर-सं स्थ. ७, ३०९;-आंध्र व क्षत्रप २२४: —किल्ले ( स. १७१४ ३४
—श्रीनिवासराव नि. स. २३७-
—संज्ञा २६२
जुलूस सन, ९
जेजुरी-सं. स्थ. ७
जेजुरी-बाजीराव मुक्काम ( स. १७३८ आग. १९ ) १९८
जैत्रपाळ यादव-देवगिरी ३७४
जैत्रपाळ ऊर्फ जैतुगी-१,२ ( स ११९१-१२१० ) ४३९
जैदी पाटील-आरडे ( श. १४६३ ) ३८६, ४३५
जोधपूर-सं. स्थ. ७
जंजिरा-मराठ्यांच्या स्वाधीन १६६
—मोहीम ( स. १७३२-३५ ) १३७; ( स. १७३३ ए. ) १६४, १६५
—शिद्दी अंबर ३८
जंत्री मोडक-१०९, ११०
जिंजी-सं. स्थ. ७


### झ


झिलाडा-प्रांत जयनगर ( स. १७६० )६०


### ट


टकमक-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७) १७१
टिपु सुलतान-३३७
टिळक-बा. गं. ३१९,४२८-४२९
टीका-अनधिकारी १९६
टी. माधवराव ३५६
टोपीवाले-अठरा ९६
टांकणघोडा-पहाडी घोड्याची जात १९७
टेंबुरणी-सं. स्थ. ७
ठाणे कोट-३९७ ( स. १७३६-३७ )१७१
—बिंबदेव राणे ( स. १४५० ) ३९७
—मार्ग पुण्याहून १०५


### ड


डकवणें-३८६,४३६
डच व कान्होजी-( स. १७२४ ) १५३
डभई-( स. १७३१ फे. ) १३४
डहाणू-( स १७३९ ) १७३
डाक व्यवस्था-१०७
डागरोबा भट्ट ज्योतिषी-मिरज ४३७


### त


तत्त्वज्ञान३३८,-चा परिणाम ३४४,
—चें प्रतिबिंब मानवसमाजचारित्र ३३५;
—शास्त्रभिन्नता ३३४
तवारिखा व बखरी-२८२
तळेगांव-सं. स्थ. ७

तळेघोगाळे-(स. १७३३ मे) १६६
ताई साठी-स. माधवरावांची आजी २
तानाजी मालुसरे-पोवाडा २७९, २८०;
—संध्यावंदन २६०
ताम्रपत्रें ३७४
तारदाळ-(स. १६२७-५६) ४३६
तारापूर-(स १७३९) १७३
ताराबाई-राजारामपत्नी-भोसले ४८, ४९
—ची कामगिरी ४३
—पक्षीय मंडळी दहा (स. १७०७) १२७-चें मत १२८
तालीकोट-सं. स्थ ७;-लढाई (श. १४८६ वै व. १०) २२९
तासगांव-सं स्थल ७; ९६
तिमप्पाभट ज्योतिषी-मिरज ४३७
तिमणभट्ट ज्योतिषी-मिरज ४३७
तुकनेटी सायगांव (श. १४६३) ३८५, ४३५
तुकारामबोवा-३५४ अभंग प्रामाण्य २९७
—मृत्यु (श १५७१ माघ व. ६) २७३, २७४
तुळजाजी राजे-तंजावर १४३
तुळाजी आंग्रे-अटक (स. १७३९);
—सुटका (स. १७४०) १७५
—व ब्रह्मेंद्रस्वामी १७६
तुळापूर व शाहुमुक्काम (स. १७०७ मे) —१४८
—सूर्यग्रहण २३८
तेलंग-पौराणिक इ. इतिहास विवेचन ३५९
—मराठ्यांच्या इतिहासावरील टिपणें ३५८
तेलंगण-शातवाहनराज्य २२५
तैमूरशहा-अबदलीचा मुलगा ५७, ५९
तोफा-चवथाई (स. १७१४) ३५
—पेशवेकाल ९७
तोबेयास कुलीखान=नादिरशहा (स. १७३९) ११२
तोरणा किल्ला (श. १५६८) २६४, २६५;-शिवाजी घेतो २६८, २७०
तंजावर-सं. स्थ. ७, १४३
तंदलगे (स. १६२७-५६) ४३६
तांदुळवाडी-मराठ्यांचे स्वाधीन —(स. १७३७) १७१
त्रिंबक-(स. १७१४) ३५; (स.१७५१) १११
त्रिंबक बापूजी-५८; (स. १७५८) पंजाब ५९
त्रिंबकराव दाभाडे-सेनापतित्व (स. १७२९ जाने०) १३३-वर स्वारी (स. १७३० सप्टेंबर) १३४
त्रिंबक वेंकटेश शिवाजी कारकून ४४५
त्रिंबक सूर्याजी-त्रिंबक घेतो (स. १७५१) १११

थ

थळचा कोट-(स. १७३९) १७५
थळची चौबुर्जी-शामळ १६८
थिआसोफी-३५६

द

दत्ताजी कनोजे-ब्र. स्वा चा हस्तक १६०.१६३
दत्ताजी शिंदे-कामगिरी ५८,५९
—गोविंदपंत बुं. (स. १७५८) ५९
—मृत्यु १०८
—हालचालींचा तक्ता, (स १७५०-६१) १४-१६;व स्पष्टीकरण १८-२१
दत्तात्रेय-मंदीर-विजापूरकिल्ला (श. १५६३ सु) २५९
दमाजी थोरात-सातारा १९, १३१;-चा पुंडावा (स १७१५) १३०;
—बार्शीपानगांव (स. १७०७)
—ता. स. १२७, १२८
दयाबहादर-(स १७२८) १३३
दरेखुा व बुा-सातारा (श. १४६३) ३८५, ३८६
दलपतराय बख्र २१८
दस्यू अथवा दास सेना संज्ञा ३२६
दळवई=सेनापती (श १३१९।३८९ ३९०
दक्षणचा इतिहास-डॉ. भांडारकर ४२८
दानो पाटेलु-हैसवें (शके १४६३) ३८७, ४३५

दादाजी कोंडदेव–२५७
—कोकणची वसाहत २५८
—पुणें, शिवतरखोरें, सिंहगड, ( श. १५६० ) २६३
—मृत्यु ( श. १५६८ अखेर ) २६८
दादाभाई नौरोजी ३५६
दादो नर्सो काळे ४१८
दादोबा पांडुरंग ३५६
दापोडी-सातारा ( श. १४६३ ) ३८७
दाभाडे–१७८, १७९
—आंग्रे १६३
दाभोळची देशमुखी–१४७
दामोदर महादेव हिंगणें ५२, ५७
दामोदर नारायण आखीकर–(स. १६२८) ३८२
दासबोध प्रामाण्य–२९७
दिनकरराव रानडे ३५६
दियानतराव–३७९, ४१८, ४४१
दिल्ली–तख्त व अबदली ७७
—नजीब व सुजा ७७.
—पातशहा ७६, ७७
—बाजीराव ( स. १७३४ ) १३४
—मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७६० आगष्ट १ ) ७४, ७५
—मार्ग पुण्याहून १०६
—लूट नादिरशहा (स. १७३९ ) १३४
—सं. स्थ. ७, ७९
दुर्गाबाई–शाहू छ सेवक ( स. १७१४ )३४
देऊळगांव–कर्यातपाटस ( स. १६२८ )
देवगिरी–अल्लाउद्दीनची १ ली स्वारी ( स. १२९३ ) ३७४
देवताप्रकार ६ ( स. १६२७–५६ ) ४३६
देवराजजी भोसले–( स. १४१६–१४३५ ) ४३४
देवास–सं. स्थ. ७
देशहित व इतिहास ३६०
—व सवयस्क हिंदुमनोरचना ३६१
दौलतराव शिंदे ३३७
दौलताबाद=खुजस्तेबुनियाद २३४, २३५
=सुरगिरी किंवा देवगिरी ४४४
दुंदेखान–नजीबखानाचा साथीदार ( स.१७५९ )५८
दृढप्रहार जाधव ( इ. स. ८५० ) ४३८

## ध

धनाजी जाधव शा. स. ( १७०७ )१२७, १२८, २१७, ४४९
—मृत्यु ( स. १७१० जून ) १२९
—सेनापतीपद( स. १७०८ ) १२९
धर्म–क्रांति २८४
—प्रबंधरचना ( श.११००–१७२२ ) ३५२-५३
—संस्था ३२७
—संज्ञार्थ ( ४ ) २८३, २८४
धाडियप्पा जाधव–( १, २ ) ४३८
धार–सं. स्थल ७
धारावी पोर्तु० हल्ला व पराभव(स.१७३७-३८ ) १७२
—बंदर मराठे घेतात ( स. १७३९ ) १७३
धारूर–मार्ग पुण्याहून १०६
धावडशी सं. स्थल ७
—ब्र० स्वामीस शाहूकडून इनाम ( स. १७२१ ) १५९
धार्मिक ऊर्फ तात्त्विक वाङ्मय ( श. १२-१२–१५७५ ) ३५३
धोडपची लढाई ( श. १६९० ज्ये. शु.१० ) ४७०
धोंडजी आंग्रे– प्रांतव्यवस्था १६८
ध्रुवसिद्धान्त व इतिहासक्रांति ( २७) ३१९

## न

नकला–मोडी, बाळबोध ३०३, ३०४
नगोजी तेटला–पिपळी (श.१४६३) ३८७
नजीबखान ५६
—मराठ्यांचे पेचांत सांपडतो(. स. १७-५९) ५८
—सुजाउद्दौला स्नेह (स. १७५९ )६५, ७१
नरसीभट ज्योतिषी–मिरंज ४३७

नरसोबाची वाडी ( स. १७१७ ) १५८
नऱ्यसीदेव सावंत ( स १२९७ ) ४३४
नवद्रे-अलिबाग ( स. १७३५ ) १६९
नहपान क्षत्रप खहराट २२४
नागपूर-सं. स्थल ७
—मार्ग पुण्याहून १०६
नागोठणें-कोंकण ( स. १७३३ मे )१६६
—मार्ग पुण्याहून १०५
नाझरें ( स. १७१४ ) ३४
नातू-इतिहासलेखक १०३
नादिरशहा-( स. १७३९ ) १४४
—तोबेयास कुलीखान ( स. १७३९ ) ११२
—दिल्ली लुटतो ( स. १७३९ ) १३४
नानाफडणिसांचें आत्मचरित्र-(का.सं.५३)५
—व गाडदी ९८
—तोनयाचें बंड ४६९
—दप्तर २११, ४५०, ४५५
—मराठे एकीकरण ४७०
—संग्रह ९७
नाना मोरोजी –३५६
नानासाहेब पेशवेची औरंगाबादेवर स्वारी(स. १७५१ जाने, १७५२ सप्टें.)१९
—कर्नाटक १४५
—ख्याली खुशाली १०७
—जहागिरी पद्धत १३१–१३२
—चें शाहूस पत्र९
—सखाराम बापू १००
—च्या हालचाली तक्ता ( स. १७५०–६१ ) ११–१४ व त्याचें स्पष्टीकरण १८–२१
नामदारखान कोकण ४४५
नामदेव-अभंग, भारत, अभंगभाषा ३९५
नामदेवभट ज्योतिषी-मिरज ४३७
नारगोळा ( स. १७३९ ) १७३
नारायण व्यवहारशीक्षा व हेमाडपंती बखर–२१२, २१३
नारो भगवंत कुलकर्णी–आरळे(पानपतवार्ताकथक ) ८४, ८५
नारो शंकर राजे बहादर ५२, ५७, ७२
—अटक (स. १७१५ )१३०–सुटका ( स १७१७ जून ) १३१
—गो. बुंदेले ८२
—दिल्ली ७९
नारो सुंदर–मुजुमदार पुणें अ. स. (श.१५६८,)२६३
नाशीक-सं. स्थ. ७
—नानासा. सिंहस्थ ( स. १७५५ )१२
—मार्ग पुण्याहून १०५
नासरजंग–( स. १७३९ ) १३४
–बलुचिस्थान बंड १९
–मृत्यु(स.१७५(डिसें.) १९
नांवें–ब्राह्मणांचीं ( स. १३००–१६५६ ) ४३६, ४३७
निकम–खानदेश ( स. १४५० ) ३९७
निजाम व कर्णाटक–(स.१७२६–४०)१४४
—दक्षिण सुभेदारी (स. १७१३) १३०
—पक्ष (स. १७२०–३१ )१३१
—वाजीराव प्रसंग( स. १७ ०–३२) १३२–१३४– मराठे–१४३, १४४
—संभाजी कोल्हापूर. १३१.–फारकत ( स. १७२८ ) १३३–स्वारी ( स. १७५९ ) ६२, ६३
निजामपूर–कोंकण ( स. १७३३ मे) १६६
निजामशाही–( स. १६३७ ) ३९७
निपाणी– सं. ७ वाटणी २३८ स्थल.
निर्मल–सं. स्थल ७
निळो नीळकंठ–नायकवाडी–पुरंदर (श. १५६० ) २६३
नीळकंठराव कीर्तनें–ग्रँटडफ १
निळो सोनदेव–मुजुमदार ( श. १५६७ ) २६०, ४४४, ४५२, शि. स. ( १५६८ ) २३६
निळो सोमनाथ–डबीर ४४४
नूरखान अ. ४४१
नेपोलियन–२३१
नेमाजी शिंदे–शा. स. (स. १७०७)१२८–( स. १७०८–१० ) १२९
नंदोबा भट–ज्योतिषी मिरज ४३७

निंब पा वाई-( श. १४७९ ) ३८८, (स. १५४१,-५८ ) ३८५

**प**

पट्टण-७६
पटवर्धन-गोपाळराव( स. १७५६-६०)१३ —दप्तर ४५५
पडदूर-पेशवे मुकाम ( स. १७६० मार्च ७) ६३
पद्मनाभी भट-मिरज ४३६
पनवेल-मार्ग पुण्याहून १०५
पन्हाळा-सं. स्थ. ७
परम्मदेव-४३९
परराज्य व भाषा ४११-१२ व —लोकचरित्र-संकोच ४१७-४१९
परशुराम १४९, १५६
परशुरामपंडित उपदेश (श. १२७८) ३९० —३७३, ३७४, ३९०
परशुरामपंत प्रतिनिधी- ता. स. (स.१७०७) १२७, १२८, हालचाली ( स.— १७०८-१३ ) १४८
परशरामभाऊ पटवर्धन १०२
परसा पाटेलु-४३५
परसाजी आखाड-निंब ( श. १४६३ ) ३८५
परसोजी भोसले-नागपूर.- शा स ( १७०७ ) १२७, १२८ ( स.१७०८-१०)१२९
पॅरीस-सं स्थ. ६, ४४३
पलुसकर-यावनी धर्मस्वीकार २५८
पाको पाटेलु४३५
पाचाडवाडी-( स. १७३ ५) १६९
पाटस-सं. स्थ. ७
पाटस-कार्यात-( स. १६२८ ) ३८२
पाटांगण देवस्थान-बीड ३९२, ३९३
पाठक प्रो.-पौराणिक व वैदिक इतिहास-विवेचक ३५९
पातशहा-दिल्ली-मराठे तह ( स.१७५०)९
पानई-सातारा ( श. १४६३ ) ३८६
पानशी-माधवराव-बिदनूरस्वारी स. —(स.१७५५ फे. ) १२
पानिपत-सं. स्थ. ७; ( स. १७६०-६१ —१४-दिल्ली ( ५४ मैल ) ७९-पराभव—याचीं कारणें छत्रपती व पेशवे ४८, ४९; जातिभेद ४७, ८९;- ब्राह्मण पोटभेद. ४७, ८९—राष्ट्रियत्व ४७,८९ -मार्ग पुण्याहून १०६;-संबंधीचे बखर-ग्रंथ १०७ लढाईचे परिणाम ९८-१०० —सैन्य मराठी ९१ व त्याची उपास-मार ८३
पापडी-( सं. १७३७ ) १७१
पायागड-१३६
पारसनीस व जंजिराप्रकरण-१६६, १६७ —वसई मिति १७३,१७४ ब्रह्मेंद्र चारित्र १९१, १९० ब्रह्मेंद्र पत्रविवेचन १७७
पाराशर दादाजी-गो. बुं. चा पथकी ( स. १७६० ) ८ —ची चूक ( स. १७६१ जाने० ) ८८
पाल-पेशवे घेतात ( स. १७३९ ) १७५
पालखेड-( स. १७२८ ) १३३
पालगड-कान्होजीस मिळतो ( स. १७२९ ) १५९
पाली-१५२
पाश्चात्य व पौर्वात्यसमाज-(सातत्य, शुद्धि) ३१४
पाळेगार-पुंडावेखोर २; (स. १७५९) ३९
पिठोर-चव्हाणवंशीय २२३-पराभव ( श. ११११५ ) व शि दि. २२६
पिलाजीराव गायकवाड-( स. १७२६ ) ११६, ११७
पिलाजीराव जाधव-कमरुद्दीन वजिरावर स्वारी ( स. १७३५ जुलै ) १३४; १३७;फिरंग्यावर मोहीम १६१ —बाजीराव, सरदारांची तहकुबी १६१
पिल्लंभट-ज्योतिषी मिरज ४३७
पिसाळ-यावनी धर्मस्वीकार २५८
पीतांबर शेणवई-सावंत देसाई कारभारी (स. —१६५९ ) ३३
पुढाऱ्यावरील जबाबदारी-१८३, १८४
पुणें-( श. १५६३ ) २५८;-केंद्र १०५; १०६—परगणा (स. १६२८ )२८३

( पुणें चालू )
—प्रांताची सीमा ( श. १५६० ) २६३
—शिवाजी निवास, बाळपण ( श. १५५९,–६२ ) २४०– सं.स्थल ७
पुरंदर–मार्ग पुण्याहून १०६; ( श.१५६० ) २६३ ( श. १५७७ ) २७५; २७६
—किल्ला, शिवाजी स्वाधीन ( श. १५६८ कार्ति. ) २६९; व पेशवे ( स. १७१५ ) १३०
पुरंदरे–नाना–दमाजी गाइ पराभव(स.१७५१ ए. ) १२–महादोबा, कुकडी लढाई (स. १७५१ डिसें. ), बिदनूरवरस्वारी ( स. १७५५ जाने.) १२
पुलुमायि–वाशिष्ठीपुत्र ( श. ५६–८५ );शेवटला ( श. २२२ )२२६
पुळ्याचा गणपति–( स. १७५९ ) १३
पेडगांव–सं. स्थ. ७; ( स. १७१४ ) ३४
पेण–सं. स्थ. ७
पेशवे–आरमार ९७–इतिहास व भूगोल-ज्ञान ९६, ९७;—इंग्रज तुलना ९६,९७; ( स. १७३९; १७५—तोफखाना) ९७;
—चा दोष ९४–चें कारण ९५
–पंचांग १९९–बखर २१३,२१४ चे शत्रू घरचे व दारचे(स.१७५०–६०) ६२, ६४–च्या सत्तेची भिस्त व प्रीति ९३,९४
पैठण–सं. स्थ.७,आंध्र शालवाहनराजा २२४
पोर्तुगीज–( स. १७३९ ) १७५
—आंग्रे बंधु ( स. १७३४–३७ )१७१
—कोंकण ( स. १५१२ ) १४९; ( स. १७१५ ) १५२
—चा बंडावा व त्यावर स्वारी (स.१७-३६ ) १७०–१७२
—ची वसईनंतर दुर्दशा–१७४
पोवाडे प्रामाण्य२९७
पंचांग-पेशवेसंग्रह १९९
पंढरपूर–मार्ग पुण्याहून १०६
—सं. स्थ ७
पंताजी गोपीनाथ–शि. वकील ( श. १५-८१ )२७८
पांडववाडी–सं. स्थ. ७
पांडुरंग वासुदेव मामलतदार–विजापूर बखर ( श. १७४४ ) २६७
पिंपरी–ब्र. स्वा. इनाम ( स. १७१६) १५८
पिंपळी– सातारा ( श. १४६३ ) ३८७
पृथ्वीराज चव्हाण पराभव–( स. ११९३ ) ३७४
प्रगतीची अवस्था व तिचीं पांच लक्षणें
—पाश्चात्य ३०८
—आर्यांची ३०८, ३०९
—चे झटके व युरोपीयन आणि पौर्वात्य राष्ट्रें ३१०, ३११
प्रतापगड २७५
प्रताप–नाणेंविशेष ४३७
प्रतिनिधी व यमाजी शिवदेव बंड (स.१७-५०–५४) ११
प्रधान कोण १०३
—पद्धति १०४
प्रपंच परमार्थ ३४३, ३४४
—व तत्त्वज्ञानाची जोड ३३३, ३३४
प्रबळगड १५२
प्रभु–चांद्रसेनीय ( लेखणी व तरवारीचें इतिहासकार्य ) २९४, २९५
—रानमाला २८०
प्रवास मार्ग १०५–१०६
प्रल्हाद निराजी २१७
प्राचीन इतिहासलेखक १


फ


फत्तेसिंग भोसले ( स. १७१७ ) १२५
—व कर्नाटक ( स. १७१३–४० ) १४३, १४४
—व जंजिरा मोहिम (स.१७३३ ए. ) १६४, १६५
—व निजाम ( स. १७३२ ) १३४
—व शाहू ( स. १७ ४ ) ३४
—हालचालींचे ४ प्रसंग १३२–१३४, १३५
—हालचालींचा तक्ता ( स. १७१७–४० ) १४२
फत्तेखान मलिकंबर नि. स. २३५
फलटण सं. स्थ. ७

फारशी अक्षरमालिका ४१५
—लिपी नस्ख व शिकस्त ३७६, ३७७
—तर्जुमे व किताब इ; ३७९
—व मराठी भाषा ३७९
फॉरेस्ट–प्रो. अविश्वास्य वंशावळी १५१
फिरंगी व कोंकण, स्वारी १६१
फिलॉसफी व सायन्स ३३८–३३९
फोंडा–मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३९ ) १७३
फ्रेंच वखार–सुरत स्थापना(स.१६६८) ४४३

## ब

बकाजी नाईक–ब्र. स्वा. हस्तक १६०
बकाजी नाईक महाडीक व सिद्दीसात युद्ध ( स. १७३२ ) १६२
—बाणकोट व मंडणगडावरील स्वारी ( स. १७३३) १६४, १६५
बखर—अभिधान ३४८, ३४९
—अस्सल कागद ३, ४
—कारविवेचन ३५०, ३५१
—कालनिर्देश २६४, २६५, २६७
—गोविंदपंत बुंदेले ५९
—ग्रँटडफ इतिहास २९
—ग्रंथ ३, १०२, २०४;–परीक्षणाचा उपसंहार २९४–२९८
—चिटणिशी (वडोदें) २;११५,११६, २६९, २७९
—चित्रगुप्त(श.१६८२-९२)२१६,२१७
—चूक (मोठी) विवेचन २२६, २२९
—छपाई २२१, २२९
—तवारिखा २४२
—दलपतराय २१८
—दादोजी कोंडदेव मृत्यु २६८
—दोष २२०
—निर्मिती २
—निर्वास पेशवेकालीन २
—पानपत ८५
—चें प्रामाण्य जातिशः नाहीं २४१, २४२
—फलित ३००
—भाऊसाहेबांची ५९
—मल्हार रामराव ( श. १७३२ ) २१८, २३९, २७९
—रचना १६६, १६७, ४२४
—रायरी २१८
—लिखाण २, २२९, वाचन २३०
—चे वर्ग २१४
—शहाजी इतिहास( श.१५५९–८४) २३९–शिवजन्मतिथि घोटाळा २३६,२३७
—शिवदिग्विजय २१९, २२०, २६९
—शिवाजीप्रताप २१८
—सभासदी २१७, २६९, २७९
—सालवाईतह ( श. १७०३ ) २
बडोदे सं. स्थ. ७
बदलापूर ( स. १७३७ ) १७१
बदाऊ युद्ध ( स. १७६० जाने ) ६०
बप्परावळ ( इ स. ८ वें श. ) २३०
बरीदशाही ( स. १६५६ ) ३९७
बलवडा प्रांत जयनगर ( स. १७६० ) ६०
बल्लाळ ( = भिल्लम ५ ) ४३९
बसवशेटी–निंब ( श. १४६३ ) ३८५
बळवंत गणपत मेहेंदळे–दिल्ली सर करतात ( स. १७६० ) ७४
बहलोल खान व फत्तेसिंग ( स.१७१४)३४
बहादुरपुरा ( स १७३७ ) १७१
बहादुरभेंड्यावरील स्वारी ( स.१७४७ )६०
बहादुरशहा कैद ( श. १५२२ ) २३४
बहिरजी घोरपडे २१७
बहिरोपंत पिंगळे पेशवाई ( स. १७०८ ) १२९
—कैद व सुटका ( स. १७१३) १३०
बहिरंभट ज्योतिषी–मिरज ( स. १६२७–५६ ) ४३६, ४३७
बहुगांव–सातारा ( श. १४६३ ) ३८७
ब्रह्मणपूर सं. स्थ. ७; (स. १७३८)१७२
—स नानासो ससैन्य येतात ( स १७६० डिसें. ) ८४
—सदाशिवराव भाऊंचा मुक्काम ( स. १७६० ए. ४ ) ६५

बागपत ( दिल्लीपासून २० मैल ) ७९
बाजीराव घोरपडे ( श. १५७१ ) २३९
—व शहाजी करार( श. १५७५ ? ) २७२
बाजीराव चंद्रराव मोरे ( श. १५७७ ) २७५-२७६
बाजीराव बल्लाळ पेशवे १०३, (स.१७२७) ३८३
—चें नांव १११
—व अबदुल रहिमान तह (स १७३३-३६) १६६
—कर्नाटक १४४
—कामगिरी, हिंदुपदपादशाहीसंस्थापक ( १७३१-४० ) ३५; ४०
—कोंकण (स. १७३५ फे.) १६९
—वरील तिहेरी जबाबदारी ९३
—जहागिरीपद्धत १३१, १३२
—जंजिरामोहीम ( स. १७३३ ए. ) १६४, १६५
—जिंकलेले प्रदेश १३५
—पोर्तुगीज ( स. १७३७ ए. ) १७२
—प्रधानपदप्राप्ति (स. १७२० ए. १७) १३२
—फतेसिंग दुर्हा १४४, १४५
—मृत्यु ( स. १७४० ) ५३, १३४
—मानाजी संभाजी आंग्रे ऐक्य १६९
—विरुद्धमंडळी १४३
—व शाहु छत्रपती ३७, १३१
—शिवाजी तूलना १३७
—सरदारमंडळी १३५
—सेखोजी आंग्रे (स. १७३२) १६२, १६३
— स्वाऱ्या ३८ व त्यांचे काल १३२- १३४
—हालचालींचा तक्ता–१३८–१४०
बाजीराव दुसरे १८४, ३३७
बाणकोट ( स. १७३३ ) १६४
—मार्ग पुण्याहून १०५
बातगुडा–सागिर्वा ( श. १४६३ ) ३८६, ४३५
बातिगेघर–सातारा ( श. १४६३ ) ३८७
बादशहा व मराठे ( स. १७५० ) ३८
बाघेलखंड ( स. १७२३ ) १३२, १३६
बापू गोखले १०३
बापू बागल १६३
बापूजी महादेव हिंगणे ५२, ५७
बापोबा ज्योतिषी ४३६
बाबसेटी एकसेटी विगोवी–निंब ( श. १४७९ ) ३८८, ४३५
बावाजी भालेघरा–सनपने ( श. १४६३ ) ३८६, ४३५
बाबाजी भोसले जन्म ( श. १४५५) २३३
बाबासाहेब=यशवंतराव होळकर ( स. १८१२ ) ११३
बाबूजी नाईक बारामतीकर ( स. १७४०–४४ ) ४०, ४१
बाबुराव आंग्रे ( स. १७२२–३५ ) १५०
बाबुराव नरसी–गो. बुंदेल्यांचा पुण्यांतील वकील ५४
बाबुराव फडणीस–कुकडी लढाई (स.१७५१ डि. ) १२
बाबुराव महादेव–( स. १७५४ ) ६५
बाबुराव मुजमदार–चित्रगुप्त २५७
बायबल=दीपगृह ३३८, ३३९
बारामती–सं. स्थल ७, ( स. १७२० आक्टो. ) १३२, १३६
बालबोध लिपी व फारसी नस्खलिपी ३७६, ३७७
बावधन सं. स्थ. ७
बालकृष्णस्वामी ( स. १६२७–५६ ) ४३६
बाळवडे ( श. १४६३ ) ३८६
बाळसदाशिव बाळिंबे–रमास्वयंवरकर्ता २९९
बाळाजी आवजी=काकाजी प्रभु २१६
—स चिटणिशी ( श. १५७०) २७१
बाळकृष्णपंत मुजुमदार ( श. १५६०)२५७
बाळाजी गणेश–चिटणिशी कारकून. पेशवे–बखरलेखक २१३
बाळाजी गोविंद खेर बुंदेले ५४, ५९
—स सदाशिवरावभाऊंचें पत्र ८७

फारशी अक्षरमालिका ४१५
—लिपी नस्ख व शिकस्त ३७६, ३७७
—तर्जुमे व किताब इ; ३७९
—व मराठी भाषा ३७९
फॉरेस्ट-प्रो. अविश्वास्य वंशावळी १५१
फिरंगी व कोंकण, स्वारी १६१
फिलॉसफी व सायन्स ३३८-३३९
फोंडा-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३९ ) १७३
फ्रेंच वखार-सुरत स्थापना(स.१६६८) ४४३

## ब

बकाजी नाईक-ब्र. स्वा. हस्तक १६०
बकाजी नाईक महाडीक व सिद्दीसात युद्ध ( स. १७३२ ) १६२
—बाणकोट व मंडणगडावरील स्वारी ( स. १७३३) १६४, १६५
बखर—अभिधान ३४८, ३४९
—अस्सल कागद ३, ४
—कारविवेचन ३५०, ३५१
—कालनिर्देश २६४, २६५, २६७
—गोविंदपंत बुंदेले ५९
—ग्रँटडफ इतिहास २९
—ग्रंथ ३, १०२, २०४;-परीक्षणाचा उपसंहार २९४-२९८
—चिटणिशी (बडोदें) २;११५,११६, २६९, २७९
—चित्रगुप्त(श.१६८२-९२)२१६,२१७
—चूक (मोठी) विवेचन २२६, २२९
—छपाई २२१, २२९
—तवारिखा २४२
—दलपतराय २१८
—दादोजी कोंडदेव मृत्यु २६८
—दोष २२०
—निर्मिती २
—निर्वास पेशवेकालीन २
—पानपत ८५
—चें प्रामाण्य जातिशः नाहीं २४१, २४२
—फलित ३००
—भाऊसाहेबांची ५९
—मल्हार रामराव ( श. १७३२ ) २१८, २१९, २७९
—रचना १६६, १६७, ४२४
—रायरी २१८
—लिखाण २, २२९, वाचन २३०
—चे वर्ग २१४
—शहाजी इतिहास(श.१५५९-८४) २३९-शिवजन्मतिथि घोटाळा २३६,२३७
—शिवदिग्विजय २१९, २२०, २६९
—शिवाजीप्रताप २१८
—सभासदी २१७, २६९, २७९
—सालवाईतह ( श. १७०३ ) २
बडोदे सं. स्थ. ७
बदलापूर ( स. १७३७ ) १७१
बदाऊ युद्ध ( स. १७६० जाने ) ६०
बप्परावळ ( इ स. ८ वें श. ) २३०
बरीदशाही ( स. १६५६ ) ३९७
बलवडा प्रांत जयनगर ( स. १७६० ) ६०
बल्लाळ ( = भिल्लम ५ ) ४३९
बसवशेटी-निंब ( श. १४६३ ) ३८५
बळवंत गणपत मेहेंदळे-दिल्ली सर करतात ( स. १७६० ) ७४
बहलोल खान व फत्तेसिंग ( स.१७१४)३४
बहादुरपुरा ( स १७३७ ) १७१
बहादुरभेंड्यावरील स्वारी ( स.१७४७ )६०
बहादुरशहा कैद ( श. १५२२ ) २३४
बहिरजी घोरपडे २१७
बहिरोपंत पिंगळे पेशवाई ( स. १७०८ ) १२९
—कैद व सुटका ( स. १७१३) १३०
बहिरंभट ज्योतिषी-मिरज ( स. १६२७-५६ ) ४३६, ४३७
बहुगांव-सातारा ( श. १४६३ ) ३८७
बऱ्हाणपूर सं स्थ. ७; (स. १७३८)१७२
—स नानासाो ससैन्य येतात ( स १७६० डिसें. ) ८४
—सदाशिवराव भाऊंचा मुक्काम ( स. १७६० ए. ४ ) ६५

आगपत ( दिल्लीपासून २० मैल ) ७९
बाजीराव घोरपडे ( श. १५७१ ) २३९
—व शहाजी करार( श. १५७५ ? ) २७२
बाजीराव चंद्रराव मोरे ( श. १५७७ ) २७५-२७६
बाजीराव बल्लाळ पेशवे १०३, (स.१७२७) ३८३
—चें नांव १११
—व अबदुल रहिमान तह (स.१७३३-३६) १६६
—कर्नाटक १४४
—कामगिरी, हिंदुपदपादशाहीस्थापक ( १७३१-४० ) ३५; ४०
—कोंकण (स. १७३५ फे.) १६९
—वरील तिहेरी जबाबदारी ९३
—जहागिरीपद्धत १३१, १३२
—जंजिरामोहीम ( स. १७३३ ए. ) १६४, १६५
—जिंकलेले प्रदेश १३५
—पोर्तुगीज ( स. १७३७ ए. ) १७२
—प्रधानपदप्राप्ति (स. १७२० ए. १७) १३२
• —फत्तेसिंग दुर्रा १४४, १४५
—मृत्यु ( स. १७४० ) ५३, १३४
—मानाजी संभाजी आंग्रे ऐक्य १६९
—विरुद्धमंडळी १४३
—व शाहु छत्रपती ३७, १३१
—शिवाजी तूलना १३७
—सरदारमंडळी १३५
—सेखोजी आंग्रे (स. १७३२) १६२, १६३
—स्वाऱ्या ३८ व त्यांचे काल १३२- १३४
—हालचालींचा तक्ता—१३८-१४०
बाजीराव दुसरे १८४, ३३७
बाणकोट ( स. १७३३ ) १६४
—मार्ग पुण्याहून १०५
बातगुडा—सागिर्वा ( श. १४६३ ) ३८६, ४३५
बातिगेघर—सातारा ( श. १४६३ ) ३८७
बादशहा व मराठे ( स. १७५० ) ३८
बाघेलखंड ( स. १७२३ ) १३२, १३६
बापू गोखले १०३
बापू बागल १६३
बापूजी महादेव हिंगणे ५२, ५७
बापोबा ज्योतिषी ४३६
बाबसेटी एकसेटी विगोवी—निंब ( श. १४७९ ) ३८८, ४३५
बाबाजी भाळेघरा—सनपने ( श. १४६३ ) ३८६, ४३५
बाबाजी भोसले जन्म ( श. १४५५) २३३
बाबासाहेब=यशवंतराव होळकर ( स. १८१२ ) ११३
बाबूजी नाईक बारामतीकर ( स. १७४०-४४ ) ४०, ४१
बाबुराव आंग्रे ( स. १७२२-३५ ) १५०
बाबुराव नरसी—गो. बुंदेल्यांचा पुण्यांतील वकील ५४
बाबुराव फडणीस—कुकडी लढाई (स.१७५१ डि. ) १२
बाबुराव महादेव—( स. १७५४ ) ६५
बाबुराव मुजमदार—चित्रगुप्त २५७
बायबल=दीपगृह ३३८, ३३९
बारामती—सं. स्थल ७, ( स. १७२० आक्टो. ) १३२, १३६
बालबोध लिपी व फारसी नस्खलिपी ३७६, ३७७
बावधन सं. स्थ ७
बालकृष्णस्वामी ( स. १६२७-५६ ) ४३६
बाळवडे ( श. १४६३ ) ३८६
बाळसदाशिव बाळिंबे—रमास्वयंवरकर्ता २९९
बाळाजी आवजी=काकाजी प्रभु २१६
—स चिटणिशी ( श. १५७० ) २७१
बाळकृष्णपंत मुजुमदार ( श. १५६० )२५७
बाळाजी गणेश—चिटणिशी कारकून. पेशवे—बखरलेखक २१३
बाळाजी गोविंद खेर बुंदेले ५४, ५९
—स सदाशिवरावभाऊंचें पत्र ८७

बाळाजी बाजीराव पेशवे नानासाहेब पहा
बाळाजी विश्वनाथ-हेतु व कामगिरी ४०—
—दिल्लीस ( स. १७१८ ) ३५
—पेशवाई ( स. १७१३ नो. १६ ) १३०
—मृत्यु ( स. १७१९ आक्टो. ) ३५— १३१ व ग्रँटडफ १३५;
—शाहूची कामगिरी-याद ३४
—शिंदे तह ( स. १७१५ ) १३०
—सेनाकर्ते ( स. १७११ ) १२९
—हालचाली १२४, २५, २६; ( स. १७११-१७२०; ) १२९,१३१
बाळापूर ( स. १७२० जुलै ) १३२
बिडंभट ज्योतिषी-मिरज ४३६
बिदनूर ( स. १६५९ ) ३३
बिरवाडी-कोंकण ( स. १७३३ मे ) १६६
बिलाल हपशी ३ मावळचा हवालदार ( श. १५६० ) २६२
बीड सं. स्थ. ७, शहर ३९२
बुद्धतत्वज्ञान ३३५
बेडग ( स. १६२७-५६ ) ४३६
बेलापूर-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७ ) १७१
बेळगांव-कर्णराज ( स. १४९५ ) ३९७
बांदल देशमूख हिरडस मा. रो. २६३, २६६
बिंब देवराणे-ठाणे ( स. १४५० ) ३९७
बुंदी सं. स्थ. ७
बुंदेलखंड ( स. १७३३-४६ ) वाटणी ५२, ५३; १३४
ब्रह्मेंद्रस्वामी-३३६
—आंग्रे सरदार १६०, १६८, १७२, १७५, १८२
—इंग्रज १९०, १९१
—कर्नाटक( स. १७२६ ) १५४
ब्रह्मेंद्राचें कारस्थान १६३, १७२
—कोंकणांत गमन ( स. १७२७, २८, २९ ) १५९; ( स. १७३४ ) १६८, १८१
—दहशती १८६
—दाभाडे घराणें १८७
—देशावर आगमन १५६, १५७
—धावडशी ९३
—पेशवे ९३
—प्रवास १५७-१५८
—बाजीराव १६३, १८७, १८८,१८९
—बारामतीकर नाईक १८७
—महाराष्ट्र नाश १८४, १९१
—मानाजी आंग्रे ( स. १७३७) १६८. १७२
—राजकारण १८१
—राजाश्रिया १९०
—रामदासतूलना १९३-१९४
—वसई प्रकरण १८२, १८९
—वार्षिक प्राप्ति १८८
—शाहू छत्रपती १५७, १८७
—शिफारशी १८६
—शिष्य १४७
—सरदाराश्रिया १८६
—सेखोजी आंग्रे १६३
—संभाजी आंग्रे १६०
—समाधिस्थ ( स. १७४५ जुलै २६ ) १७६
—सावंतवाडीकर-१५७, १५८
—स्वभाव १५५
—हबशी हत्तीप्रकरण १५४-१५६
ब्राह्मण कारकून व मराठी भाषा ४१६
ब्राह्मणपदपादशाही ( स. १७५० नंतर)३७-
ब्राह्मणपोटभेद व पानपत पराभव ४७, ८९
ब्राह्मणवाडी-सातारा ( श. १४६३ ) ३८६
ब्रिग्ज-परदेशी ऐ. कागद नेणारा ६


---

## भ


भक्तिमार्ग २८४, २८६
—उत्पत्ति व प्रगति २८५
—वाङ्मय( श. १२१२-१५७५)३५३
भगवानलाल इंद्राजी-पौराणिक ग्रंथविवेचक ३५९
भडबुंज्या मोंगल नि. स. ( स. १७२१ ) १३२

भरतपूर-सं. स्थ. ७
भवानराव प्रतिनिधी ४६९
भविष्यकथन व इतिहास ३१६
भाई पाटेलु-४३६
भाऊ दाजी ३५६-पौराणिक ग्रंथविवेचक ३५९
भाऊमहाराज-३३६
भाऊसाहेबांची कैफियत व बखर १०८
—हालचालींचा तक्ता ११-१४
भागवतधर्म ३३६
भागानगरमार्ग-पुण्याहून १०६
भातखंडे ९७
भानाजी आंग्रे ( स. १६५७-८० ) १५०
भानुभट ज्योतिषी, मिरज ४३७
भाम सावंत-मठ (श.१३१७-१९ ?)३८९, ४३४
भारतवर्ष मा. पत्रविल्हे ६
—तील मित्या १२२-१२३
भालकीची लढाई ( स. १७५२ ) १२,१५
भाषा व जातिसंबंध ३१४, ३१५
—संस्कृत व हिब्रु ३१२
—प्रगति चार पायऱ्या ४२१
—भ्रष्टता ४१०, ४११
—बदल ४१७
—संकोच व वाढ ४३०
भाळेघर-सातारा ( श. १४६३ ) ३८७
भिऊजी काठिकी ४३५,-किन्हई ( श. १४६३ ) ३८५
भिऊजी बोळये-काठवडी ( श. १४६३ ) ३८७
भिल्लम जाधव ( १, २, ३, ४ व ५ वा ) ४३८, ४३९
भिवजी गुजर-कुलाब्याचा बंदरदार १५२
भिवोजी देसाई-निंब ( स. १५४१ ) ३८५
भिवंडी सं. स्थ. ७;
-साया सैफखान मो. स. २३८
भीमगड-शहाजी २३७; नि. २३७, २३८
भीमसिंग-चितोड ( श. १०१२ ) २३०
भुवनेश्वरी-( स. १६२७-५६ ) ४३६
भूखनकवी भूषण पहा
भूगोलज्ञान ( शतक १६, १७ ) ९५
भूपालवल्लभ ग्रंथ-३७३
भूषण कवि २६० ( श. १५७१ ) २७५, २९८, ४४८
भूज्ञान २९७
भेलसा १३७,
-ची स्वारी ( स. १७३७ ) १३४
भोगवडी-सातारा ( श. १४६३ ) ३८६
भोज-निपाणीजवळ ९६
भोजपाटेलु-दरेखुर्द ( श. १४६३ ) ३८६, ४३५
भोपाळ सं. स्थल ७, ( स. १७३८ ) १३४
भोया पाटेलु ४३६
भोर सं. स्थ. ७
भोसले-कोंकण ( श. १६४० ) १४९
-सावत ४३४
—मूळपीठिका व बखर चुका २३०, २३१
—सातारकर व चितोडकर संबंध ४३२-४३५
—संज्ञा ४३२, ४३३
भोसाजी व मल्हारराव चि. २३१
भोसावत वंशावळ ४३४
भांडारकर-डॉ. ३५९,३७२


**म**


मृगनहळ्ळी ( स. १६२७-५६ ) ४३६
मॅकेंझी ६
मट बंदर-मराठे घेतात ( स. १७३९ ) १७३
मठ-वेंगुर्ले ( श. १३१९ ) ३८९
मथुरा-संभाजी मुक्काम ४४६
मदनसिंग शा. ( स. १७१४ ) ३४
मद्रास सं. स्थ ७
मध्ययुगीन इतिहास १
मनोहर-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७ ) १७१
मराठी भाषा-अधोगती टळण्याचीं कारणें ४१४-४१७

( मराठी भाषा-चालू )
—अन्तःस्वरूप न बदलण्याचीं चार कारणें ४२३
—इंग्रजी भाषा ४२४, ४२५, ४२८, ४२९-चा परिणाम ४१३, ४१४
—एकनाथस्वामी ( स. १५४८-१६०९ ) ३८४
—ग्रंथकार ४१६; व राज्यक्रांति ४१७
—दरबार ४१५
—दोन भाषा ४१७
—पत्रलेखन मायने ३७९
—प्रयोग इ. ३८०, ३८१, ४००, ४०१, ४०२, ४०३
—फारसी भाषा (स. १६२८ व १७२८ ) तूलना ३८२-३८४, ४१४, ४२४; सिद्धांत ( ४ ) ( श. १२९०-१८१८ ) ३९६ ३९७
—फारशी भाषेचें कार्य ३९६,-मदत ४२३, ४२४;-खुलासा ४०३-१०; जाती ४००
—रिस्ले मत ४६८
—विद्वानांचे ग्रंथ ४२५-४२७
—शिलालेख-मठ ( श. १२७८, १३१९ ) ३८९, ३९०
—संकोच ४२९-४३०
—स्थिति ( स. १३१८-१६५६ ) ३९७
मराठे व अबदली ३८
—इतिहास २,-प्रकार ( ११ ) राजकीय विभाग ( ८ ) १०५
—उत्कर्षापकर्ष कारणें १३२
—एकछत्री राज्य-सातारा व कोल्हापूर ४४, ४५
—कर्नाटक ( स. १७२६-४० ) १४३, १४४, १४५
—कर्नाटकस्थ ९१
—काटकपणा व स्वभाव ८९, ९०
—कार्य हिंदुस्थानांतील ३१-३९; ९१
—कुणबी २३०, ४४८
—कोंकण ( स. १३१८ पूर्वी )१४९
—गाडदी ( स. १७५१ ) ९८
—गिलचे तूलना ९०, ९१
—ग्रंथ व उणिवा ३५८, ३५९
—जूट ( स. १७०७-८ ) १२७-
—फूट ( स. १७०७-३१ ) १२७
—नाश कारणें ३९८-३९९
—महाराष्ट्र वंश ४६६, ४६७
—मुलुखगिरीचा हेतु व धोरण ३०-३३
—मोहिमा प्रमुख ४२, ( स. १७५०-६१ ) १९-२१
—रजपूत व क्षत्रिय २३२
—रुद्र-महारथी २२४
—राजे व राजकुलें आणि त्यांचा इतिहास ८
—राठोड ९१
—राज्यक्रांति व हिंदुस्थानांतील भाषा ४१३.
—शिद्दी भांडण ( श. १६११ ) १५२
—शीख ९१
—सत्तेची प्राप्ती व स्थिरता ९२-९५
—संस्कृतींतील चार व्यंगें ९७
—स्वराज्यसाधन ३५
—साम्राज्य १८०
—क्षत्रिय व रजपूतसंबंध ४३४, ४३५.
मर्दनगड-मराठ्यांचे स्वाधीन ( स.१७३९ ) १७३
मरोळ बंदर १७४
मलकापूर-सं. स्थ. ७
मलखेड सं. स्थ. ७
मलिकंबर-नि. मालोजी २३४ मोगलयुद्ध ( श. १५४२ ) २३५. ( स. १६२८ ) ३८२
मल्लिभट ज्योतिषी-मिरज ४३७
मल्लुगी यादव ४३९
मल्हारदादाजी सरसुभेदार ४८९
मल्हार रामराव बखर-पिठोर पराभव २२६, २२९

( मल्हार०—चालू )
—( श. १५६८—८१ ), ( प्रसंग ४५ ) २६९, २७० ०
—शकोलेख, व
—शिव प्रसंग ( ७३ ) २४६—२४९
मल्हारराव रास्ते—११५
मल्हारराव होळकर
—गो. बुंदेले तूलना ६१
—दिरंगाई व कुटिलता ५६,५७
—पानपत प्रसंग ८५,८६ लाहोर ५६
—वर्तन ( स. १७६१ ) ६०, ६१
—हालचालींचा तक्ता ( स. १७५०—६१ ) १४—१६, व त्याचें स्पष्टीकरण १८—२१
मवास—पुंडावेखोर २
महमद अदिलशहा २७७ व निजामशाही वाटणी २३८, २४०; ( स. १६२७-५६ ) ४३७
—मृत्यु ( स. १५—११—१६५६ ) व ग्रँटडफ ४४१
महमद सुलतान—रूमशामचा राजा ( स. १७३०—५४ ) ९६
महाड—सं. स्थ. ७
महादजी केशव—माहीम मोहीम, मृत्यु ( स. १७३७ ) पे. स. १७२
महादजी शिंदे चरित्र—नातूकृत चूक ५९, ६१, १०३;३३७
महादजी गदाधर—सुमंत ( स. १७१९ ) १२५
महादेव यादव—देवगिरी; ३७४; ( स. १२६०—७१ ) ४३९
महादोबा पुरंदरे ६४
महानुभव ३९६—सिंघणादि यादव बखरी ३४८
महाबळेश्वर ( श. १५७१ ) २७६
महाराष्ट्र—आर्थिकस्थिति ( श. १२२२—१५२२ ) ३५२
—आंध्र २२४
—इतिहासलेखनसंधी १०२; चार ग्रंथांश ( स. १७७९—१८२२ ) विचार ३५८;—साधनांची अनुपलब्धी ( श. १४८६—१५५९ ) २३९
—व इंग्लंड राज्यपद्धति तूलना १७८, १७९
—तत्त्वज्ञानाची परिस्थिति (श.१७३९—१७७९ ) ३५५;—च्या अवस्था ( श. १२००—१७३९ ) ३५४, ३५५
—पश्चिम,देशमूख व देशपांडे ( श.१५६३ ) २५८
—प्रवास १०७
—व महाराष्ट्रेतर प्रांतस्थिति ९२
—व मुसलमान राज्य ( स. १३१८ ) ३७४;—अमलांतील मराठी भाषा ३८९
—युरोपसंस्कृति तुलना ९६, ९७
—राज्यकारभार (स. १३१८—१६८७) ३९७
—लोकांचे तीन प्रकार ९५
—शास्त्रीयस्थित्यागमन ३५६
—शिक्षणस्थिति ३ प्रकार ९५
—सारस्वत (श.१२१२—१५७५)३५३
—सुधारणा स्वीकार ३७६
—हिंदु व महाराष्ट्रेतर ८९
महाराष्ट्र धर्म ३२—३४
—( श. १५७१ ) २८२—२८४,२८६
—चीं ४ अंगें २८७
—प्रसार ९१, ९२; उत्तर हिं० त ८९
—राज्यप्रसार ४५, ४६
महिपती भट—ज्योतिषी मिरज ४३६, ४३७
महेश्वर—सं. स्थ. ७
महेसदास कवि—संभाजी राजे ४४८
माकाडामा—खडीची सडक—शोधक ( स. १७८० ) १०६
माखजमेट—कान्होजीची चौकी १५५
माणकोजी मराठे—खांदेरी बंदराचा अमलदार १५२
माणको भीवराव—रायरी बखर नकलकार २१८

माणिकपूर–( स. १७३७ ) १७१
माणिक भट्ट–ज्योतिषी मिरज ४३७
मादसेटी–निंब ( श. १४७९ )३८८,४३६
माधवराव बल्लाळ १००
मानव समाज–परंपरा ३२८
--शास्त्र, भेद व इतिहास ( ४३, ४४ ) ३३२, ३३३, ३४४
मानसिंग मोरे उ० व द० पाइन घाट ( स. १७०७ ) १२७, शा. स. १२८
—सप्तहजारी ( श. १६९१ ) ४४९
मानाजी आंग्रे (स १७१५-१७२१)१५०, ( स. १७४० ) १३४
—अंजनवेल, राजमाची ( स. १७-३५ ए. ) १६९
--वजारतमाह, संभाजीऐक्य ( स. १७३५ ) १६९
--कुलाब्याचा आरमारी सुभेदार रेव-दंडा १६८
--वसईस वेढा ( स. १७३९ ) १७३
मामलतदार=सरदार ४९,५०
माया पाटेल मुरुकुटा, निंब ( श. १४६३ ) ३८५
मायभट ज्योतिषी मिरज ४३६, ४३७
मारुळी सातारा ( श. १४६३ ) ३८६
मालवर्ण=सिंधुदुर्ग बांधणी ( श १५८३ ) मार्ग. व. २ ) २७३
मालेगांव सं. स्थ. ७
मालोजी नरसिंगराव सितोळे देशख-पुणें —अ. सं. ( श. १५६८ ) २६३
मालोजी बाबाजी भोसले–जन्म ( श.१४-७२ ),
—जहागिरीचा पसारा २३४-२३५ दृष्टांत ( श १५१५ ) २३३; २३४
--मृत्यु ( श. १५४१ ) २३५
--शिलेदार ( श १४९९–१५२१ ) २३४
मालोजी माळी–इंदवडी ( श १४६३ ) ३८६
मावजी शेट–पुरुषोत्तम विश्राम ४५५
मावळें–बारा २६२
—शिवाजी स्वाधीन (श.१५६०) २६१
माहीमवर मोहीम–मराठे व पोर्तुगीज ( स. १७३७ ) १७२
माहुतर्डी–सातारा ( श. १४६३ ) ३८७
माहुली किल्ला नि ( श. १५४९ ) २३५
—वेढा मोगलाचा ( श. १५५९ ) २३६
—शिवाजी मुक्काम (श. १५५२–५५) २४०
माळपाटेल–मुरकुटा ३८५, ४३५
मिरज–( स.१७१४ ) ४३४
—( स. १३२७–५६ ) ४३६
—सं स्थ. ७.
मिरत ८०
मिरन मृत्यु ( स. १७६० जुलै ) ८५
मीरगड ( स. १७३९ ) पे. स्वाधीन १७५
मुकुंदराज कवि ३७६, ३९६
मुंगी तह–निजाम व बाजीराव (स. १७२८ मार्च ६ ) १३३
मुजफरखान व सदाशिवरावभाऊ(स.१७५९) ६२
—गारदी ९७
मुसफरजंग–मृत्यु (स. १७५१ जाने ) १९
मुद्रणकला व पेशवे ९७
मुधोळ सं. स्थ. ७
मुबारिक सुलतान ( स. १३१८ ) ३७४
मुरदें–फिरंगी पराभव ( स. १७३७ ) १७२
मुरारराव घोरपडे–त्रिचनापल्ली १४३
मुरार जगदेव अ. स. दौलताबादेवर स्वारी ( श. १५५५ ) २३८
मुऱ्हें बारा–सातारा ( श १४६३ ) ३८७
मुलाणा अहमद–( श. १५६८–६९ )२७०
मुशे डुरो–फ्रेंच वखारदार ४४३
मुसलमान व इतिहास २
—कोंकण ( स. १३१८ ) १४९
—ब्राह्मणीराज्य ३६७
—संस्कृति ३९८, ३९९
—हिंदू ४६८
मुसाबुसी–कोरेगांवीं (स. १७५१ ) ६४
—गाड्यांचा मुख्य ९८

( मुमावुसी-चालू )
—पांडेचरीस जातो ( स. १७५८ जून ) ६३
मुस्तफाखान-अ. स. कर्नाटक (श.१५६८) २६८
मूर्तजा निजामशहा २३८
—मृत्यु ( श. १५४८ ) २३५
मूर्तजाबाद ( स. १६२७-५६ ) ४३६
मेकॉले १९२
मेणवली सं.स्थ. ६
मैराळलिंग मंगसोळी ( स. १६२७-५६ ) ४३६
मोंगलसंज्ञा ३२६
मोडी लिपी ३७३,-चा उगम ३७६
—वनाव ३७८
—मुसलमान ४२४
—ज्ञानेश्वरी ३७६
मोरगिरी-मोरे ( स. १४५० ) ३९७
मोरघर सातारा ( १४६३ ) ३८६
मोरो जिवाजी-सेनाखासखेल १४७
मोरोजा शिंदे-वसई ( स. १७३७ ) १७१, १७२; १८२
मोरो तानदेव-सुभे (श.१५५२-५८) २५८
मोरोपंत पेशवे ( स. १६६० नो. ) ४४८
मोरोबा फडणीस ४६९, ४७०
—पुस्तकसंग्रह ९७
मोहिमाबाद=पुणें १०५-१०६
मोहोबतखान मों. स. ( श. १५५४ फा. )
—दौलताबाद घेतो, दिल्लीस गमन ( श. १५५६ ) २३८
मंगसोळी ( स. १६२७-५६) ४३६, ४३७
मंचभट्ट मिरज ४३६
मंडणगड ( स १७३३ ) १६४
—मराठ्यांच्या स्वाधीन ( स. १७३३ मे २५ )१६६
मंगळवेढें ( स. १७१४ ) ३४
मांडवी- मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७ ) १७१
मांडोगड ( स. १७३१ ) १३४: १३६
मुंबई सं. स्थ. ७
—मार्गे पुण्याहून १०५
म्हालोजी झांवरा-मोकदम-पुणें अ. स.(श. १५६८ ) २६३
म्हैसवें-सातारा ( श. १४६३ ) ३८७
म्हैसुर-सं. स्थ. ७: ( स. १७५९ ) ३९

---

## य

यमाजी शिवदेवाचें बंड ( स. १७५० ) ६४
यवन व महाराष्ट्र ३२
यशवंतराव महादेव १६५
यशवंतराव शहाजी ४४८
यशवंतराव होळकर=बाबासो (स. १८१२) ११३
यज्ञयातकर्णी-गौतमीपुत्र ( श. १००-१२२ ) २२६
याकुतखान व ब्रह्मेंद्र स्वामी १५६
याकुबखान ऊर्फ शेखजीपाटील १६५
यादवांचें राज्य ३७७
—वंशावळ ४३८, ४३९
येरंडे-वाई १० ११; ( स.१७५७ ) ५४, ५५ व पानपत प्र. बुंदेले ९९, १००

---

## र

रखमाजी शिवदेऊ ४४४
रघुनाथ नामदेवभट्ट ज्योतिषी मिरज ( स. १६२७-५६ ) ४३७
रघुनाथ बल्लाळ सबनीस ( श. १५६० ) २५७, २६०
रघुनाथ भट्ट ज्योतिषी-मिरज ४३७
रघुनाथ यादव चित्रे २१६:
—पानिपतबखर कर्ता ९६, काल व गुणदोष १०८
रघुनाथराव पेशवे राघोबादादा पहा
रघुनाथ हरि प्रभु-आंग्र्यांचे दिवाण १७६
रघोजी भोसले-कर्नाटक व्यवस्था (स० १७४०) १४४
—पेशवे स्नेह ( स. १७४४ ) ४०,४१
रजपूत २
—व मराठे २३२

( रजपूत-चालू )
—वंश ४६५, ४६६
—संस्थानीक ( स. १७६० ) ६४, ६८
रणदुल्लाखान अ. स. २३८
—मृत्यु ( श. १५६५,-७० ? ) २७२
रतनसा सुमेरसा-बुंदेलखंड ( स. १७३० ) ६९-बंड ७३
रमलशास्त्र २२८, २२९
रमास्वयंवर-सवाई माधवराव लग्न २९९
रसूल याकुदखान माहिती व मृत्यु ( स. १७०६-१७३३ ) १६४
राघोजी आंग्रे ( स. १६८०-१७१५ ) १५०
,, ,, २ रा ( स. १७३९-६० १५०
राघो पाटेल ४३५
राघो बल्लाळ व मोरेप्रकरण ( श १५७७ ) २७५-२७७
राघोबादादा पेशवे ४७०
—कामांची याद ५६, ५७
—खानदेश व गुजराथ मोहीम ( स. १७५०, १७५६ ) ९, १०
—नाकर्तेपणा ५७, ५८; ६३, ६४
—माळवा—( स. १७५७ ) १०
—सदाशिवराव भाऊ तुलना ६४
—स्वाऱ्या चार २२
—हालचालींचा तक्ता ( स. १७५० ६१ ) १६-१८; व त्याचें स्पष्टीकरण १८-२१
राजकारण-दोन रूपें ( स. १७२६-४५ ) १७७-८०
—ब्रह्मेंद्रस्वामी १८०-१८१
राजकीय इतिहास २७
राजकुंवरबाई शिवाजीकन्या व दाभोळ देशमुखी १४७
राजकोट बंदर १५२;-( स. १७३९ ) १७५
राजगड-बांधणी ( श. १५६० सु. ) २६५
राजगी ऊर्फ श्रीराज जाधव ४३८
राजनीति-अमात्य ( श. १६२२ );
—नारायण शिक्षा व चिटणीसी ३५१, ३५२
राजपुरीकर खान व ब्रह्मेंद्रस्वामी १५६
राजमाची-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३५ ए. ) १६९
—मुलाणा अहमद ( श. १५६० ) २६२
राजमान्य संज्ञा ४४५
राजमंडळ-सातारा ४८, ५०
राजापूर लूट-शिवाजी ( श. १५७० ) २७०
राजाराम व वतनें १८७
राजेंद्रलाल मित्र-पुराणेतिहासविवे० ३५९
राजोपाध्ये ३८३
राज्यपद्धति-बाळाजी विश्वनाथ कारकीर्द १७८, १७९
—यंत्रशास्त्रसंज्ञा ( ३९ ) ३२९
—लक्षणें ( ३ ) २६४
—सत्तेच्या केंद्रीभवनाचा उद्योग ( स. १७४०-५३ ) ५०, ५१
—संस्था ३२७ ३२८
राणिगेघार-सातारा ( श. १४६३ ) ३८६
राणे-रामनगर ( स. १४५० ) ३९७
राणोजी शिंदे-वसई मोहिम( स. १७३८ ) १७२
रानडे महादेव गोविंद-३३६, ३७२, ४१९ ४२०
—शिवाजी इतिहास ३५७, ३५८
रामचंद्र ऊर्फ रामदेव यादव ( स. १२७१ -१३०१ ) ४३९
रामचंद्र नीलकंठ अमात्य-ता. स ( स. १७०७ ) १२७, १२८, २१७, ४५२
रामचंद्र बाबा शेणवी ( स. १७५० ) १३, ( स. १७५०-५३ ) ४०
—श्रीरंगपट्टण स्वारी ६४
रामचंद्र बाबाजी-शिववंश शोधक २३१
रामचंद्र मल्हार १०७

रामचंद्र यादव–देवगिरी, मृत्यु ( स. १३०७
३७४
रामचंद्र हरी पटवर्धन–ठाणे मोहीम ( स.
१७३६ ) १७१
—पे. स. माहीमवर स्वारी (स.१७३७)
१७२
रामजोशी–सोलापूर ३३६
रामाजी अनंत ७२;–दाभोळकर अकोळनेर
१२०
रामाजी महादेव–ठाणे मोहीम पे. स. ( स.
१७३७ ) १७१
रामदास स्वामी ३३६
—चीं कामगिरी ९२, ९३, ९४
—चाफळ राममंदीर ( स. १५७० )
२७०
—तत्त्वज्ञान ३४३, ३४४, ३५४
—बखर ( श. १७१५ ) २७१
—शिकवण ३१, ३२, १८४
रामदासपंत मृत्यु ( स. १७५२ ए. ) १११
—सलाबतखानाचा दिवाण (स.१७५१)
११७
रामदुर्ग–सं. स्थल ७
रामनगर–राणे ( स. १४५० ) ३९७
रामनाथ–सं. स्थल ७
रामनारायण–पाटणा ८५
रामराजा छत्रपति–सातारा ४३; ४०–४५,
४८
' रामराम ' २४०
रामसेठी–गुठाळु ४३५
रामेश्वरभट नारायणभट आरवीकर
—शहाजी भों० चे उपाध्ये ( स.
१६२८ ) ३८२
रायगड ( स. १७३३ ) १६४
—मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३३
जून८ ) १६६
—मार्ग पुण्याहून १०५
—शिवाजी घेतो (श. १५६८ ) २७०
—शंकरमंदीर शिलालेख सं. २६०
रायभट्ट ज्योतिषी–मिरज ४३७
रायरी ( स. १४५० ) ३९७;
–बखर२१८; २५६
—प्रसंगानुक्रम २५४–५५
रावरंभा निंबाळकर–मों. फितूर (स.१७१५)
१३०
राष्ट्र–चरित्राची व्याप्ति २६, २७
—त्व ३४१,–चीं प्रधान अंगें ४१८
—चें शरीर यंत्र ३२६, ३२७
—संज्ञा–स्वराज्ययंत्राधिष्ठित लोक-
समाज ३२४
राष्ट्रीयत्व व पानपतपराभव ४७, ८९
—नीतिमत्तेचे घटक १८५
राहागाव–सातारा ( श. १४६३ ) ३८५
राक्षसतागडीची बखर ( श. १४८८ )
३४९
रुक्माजी ज्योतिषी मिरज ४३७
रुमशाम=कुस्तुंतुनिया ( स. १७३०–५४ )
९६
रोहीघर–सातारा ( श. १४६३ ) ३८७

## ल

लखम सावंत व शिवाजी तह (स. १६५९)
३३
लक्ष्मणराव चिपळोणकर इति. ३५७
लक्ष्मण शंकर राजे बहाद्दर ( स. १७४० )
५२, ५३, ५७
लक्ष्मणसिंह. चितोड ( श.१०१२ ) २३०.
( स. १२७५–१३०३ ) ४३४
लक्ष्मीधर भट ज्योतिषी–मिरज ४३६,४३७
लक्ष्मीबाई आंग्रे–कान्होजी पत्नी (स.१७३४)
१५०, १६८
लागो पोटलु–आनेवाडी ( श. १४६३ )
३८५
लिपी बालबोध व मोडी ३७६
लिस्बन–सं. स्थ. ६
लुकजी जाधवराव व मालोजी (श.१४९९–
१५२१ ) २३४
लुकजी जाधवराव व मालोजी (श १४९९–
१५२१ ) २३४
—मोंगलास मिळतो ( श. १५४३ )
२३५

लूट २९२
लोकप्रवृत्ति–सांप्रतची ४५४
लोकमान्य टिळक–वैदिक इति. ४२८
लोकसंस्था–हिंदुस्थानांतील ३६७
—संज्ञा–स्वराज्ययंत्र–विहिनवर्ग ते ३२४
लौकिकधर्म ३२७
लंका व मोडीलिपी ३७७
लंडन सं. स्थ. ६
लिंगो पाटेलु ४३५
लिंब सं. स्थ.७.–( सातारा ) चौविर्हार ( स. १७२१–२५ ) १५८

व

वजाबाई ( स. १७३९ ) १७३
वणगो माळी मेहतरी–निंब ( स. १४७९ ३८८, ४३६
वर्तमानकाल,–संज्ञा,–इति. लेखन ( १० ३०६, ३०७–विषय ( ११ ) ३०८
वध संज्ञा २९२
वन्यावस्था व युरोपीयसमाज आणि आ ३३२
वसई सं. स्थ. ७
—चा मार्ग पुण्याहून १०५
—मराठ्यांचा वेढा (स. १७३९ फे. ६ १७३
—मोहीम व ब्रह्मेंद्र १८२
—मराठ्यांच्या स्वाधीन मितिविवेचन —१७३, २००–२०१
वऱ्हाड ( स. १३४७–१४८४ ) ३९७
वांई–सं स्थ. ७
—परगणा ( श. १४६३ ) ३८५
—मराठ्यांकडे ( स. १७०६ ) १४८
—मार्ग पुण्याहून १०६
वाघोजी खानविलकर पे. स. माहीममोहीम ( १७३७ ) मृत्यु १७२
वाढुगीऊर्फ वडींग ( १, २ ) जाधव ४३
वाफगाव सं. स्थ. ७
वारंगळ सं. स्थ. ७
वासुदेव दीक्षित–कायगांवटोकेकर ९३
वासुदेवराव जोशी चित्रशाळा ३६२, ३६३
वास्को दगामा–हिंदुस्थानास येतो ( स. १४९८ मे. ११ ) ९७
वाहागाव–सातारा ( श. १४६३ ) ३८७
वाळुनु–सातारा ( श. १४६३ ) ३८७
विक्रमवंश व शिवदिग्विजय २२५, २२६
विचारांच्या तीन पायऱ्या व त्यांचा परिणाम ३५३, ३५४
विजयगड ( स. १७३३ ) १६४
विजापूर सं. स्थ. ७, ( स. १४८९ )३९७
विजापूरकर प्रो. ३६२, ३६३
विजापूर बखर ( श. १७४४ ) २६७
विजापूर मार्ग–पुण्याहून १०६
विठ्ठल गोपाळ सुभेदार–जाउली ४४९
विठल छापखाना ( श. १८१९ ) ३६२
विठ्ठल दत्तो सुभेदार शि. ४४५
विठोजी बाबाजी जन्म (श. १४७५ )२३३
विठोजी नाईक शितोळे देशमुख–पुणें अ स. ( श. १५६८ ) २६३
विनायकराव वासुदेवजी ३५६
विरुबाई–शाहूची दासी ( स. १७२१ ) १५८, १५९
विविधज्ञानविस्तार व ऐ. लेख छपाई ६
विशेषनामें ४३१, ४३२, ४४०,
—इतर ४३५, ४३८
—ब्राह्मण ४३६–४३८
विश्राम रामजी घोले ३५६
विश्वनाथ नारायण मंडलीक १ ३५६,३५९
विश्वासराव पदवी–कृष्णराव त्रिमल ४४६
विश्वासराव बल्लाळ ( स. १७६० ) ६४
—दिल्ली तख्त ७७
—हालचाली तक्ता (स. १७५०–६१) ११–१४: स्पष्टीकरण १८–२१
विष्णुपुराण व शिवदिग्विजय वंशावळी २२५
विसाजी कृष्ण बिनीवाले–नगरकिल्ला घेतात ( स. १७५९ आक्टो. १० ) ६२
विसाजी त्रिमल–मथुरा ४४६
वीरवाल्हे सं. स्थ. ७
वीवर–सातारा ( श. १४६३ ) ३८७
वेठीची पद्धत–उगम ३९९

वेसावें-मराठ्यांचे स्वाधीन ( स. १७३७ ) १७१
वेसुगी जाधव ( १. २ ) ४३८, ४३९
वैजापूर-शिवाजी मुक्काम २३८, ( श. १५-५२-५५ ) २४०
वोडसें-भाऊसो मुक्काम ( स. १७६० जून ) ६९
वंशावळ व प्रो. फॉरेस्ट १५१ व बखरी २२२, २२३
वांद्रे-म.स्वाधीन(स.१७३९ मार्च १५)१७३
विंचूर सं. स्थ. ७
व्यंकटराव नारायण घोरपडे-फोंडा व मर्दनगड घेतात ( स. १७३९ ) १७३
व्यक्तित्व लोप ३४०
व्यवहारशिक्षण ९५
व्रतखंड-हेमाद्री ३९८, ३९९

## श

शककालगणन २२५
शकवंश व रजपूत जाट इ. ४६५, ४६७
शकावली खं. २-१२६
शत्रुसेवा व शिक्षा ४६९
शरीरपोषण संस्था ३२७
शहाजहान-कामबक्षपुत्र (स.१७५०-६० ) ७६
शहाजहान-दौलताबादवर स्वारी (श. १५-५० ) २३८
—शहाजीवर स्वारी २३८
शहाजी निंबाळकर ता स. ( स. १७०७ ) १२७, १२८
शहाजी राजे भोसले ( स. १६२८ ) ३८३;
—इतिहाससाधनें २३७,२३९
चीं स्थलें ४५१
—कर्नाटक ( श. १५५९-८४ )२३९
—कैद ( श. १५७१ ) २६८, २७२ ( श १५६९ ) २७०
—खान जहान लोदी ( श. १५५० ) २३८
—जन्म ( श. १५१६ ) २३५
—थोरवी २३९, २४०
—दौलताबाद व वजिरी ( श. १५४६, -४९-५५ ) २३६
—मनसबदारी ( श. १५४१ ) २३५
—मोंगल ( श. १५४९ ) २३५
—मृत्यु ( १५८३ व ८६ श. ?) २७३
—शहाजहान ( श. १५५१ ) २३८
—लग्न ( श. १५२५ ) २३४
—वास्तव्य ( श. १५६८ ? ) २६७, २६८
—शत्रु २४०
—सुटका ( श. १५७५ ? ) २७२
—स्वराज्य ( श. १५६३ ) २५९
शहाजी-यशवंतराव वडील. शि. का. ४४८
शहाबुद्दीन घोरी २२७; ३७४
—दिल्ली ( स.११९३ )
शामजी आवजी प्रभु २१६
शामजी रंगनाथ-स. भाऊंचा वकील (स. १७६० ) ६९, ७१
शामराव निळकंठ पेशवे रांजेकर ( श. १५-६० ) २५७ ( श. १५६५ )२५९, २६० ( श. १५६८ ) २६३
शामळ राजपुरीकर-( स. १७२६ ) १६१
—चा दंगा, निजामु० व शाहू १५४
—संज्ञा १६४
शालिवाहन बखर-३४८
—शक २२५
=शातवाहन २२४
शास्त्र ३३८, ३३९;-निर्मिती ३२९
—ग्रंथ व शिक्षाग्रंथ २१३
शाहिस्तेखान ( स. १६६३ ) ४४५
शाहूछत्रपती (स. १७३७ ) ३८३
—अधिकारमंडळ १२९
—कान्होजीची बेपर्वाई ( स. १७२६ ) १५४
—जहागीरपद्धत १३१-१३२
—पक्ष ( स. १७२०-३१ ) १२७, १२८, १३१
—बाजीराव पहिले १३१
—बाळाजी बाजीरावास ४ आज्ञा ४२, ४३

( शाहू–बाळ )
—मुक्काम (स.१७०८–१०)१२९,१४८
—मोहिमा १२५, १२६
—रोजनिशी ३६९, ३७२
—शिक्षा मृत्यूनंतर ९
—सुटका व परिणाम ( स. १७०७ मार्च ) १२७, १२८
शाहू छत्रपती दुसरे–मृत्यु (स. १८०८ मे४) २१८
शिऊभट साठे–( स. १७६० ) वकील ७७
शिकंदरा ७८
शिद्दी संज्ञा १६४
—अबदला, रसूलवडील मुलगा ( स १७३३ ए. ) मृत्यु १६५
—अबदला रहिमान–१६५, १६६; –मराठ्यांच्या संमतीनें जंजिरा आधिपत्य. ( स. १७३७–४० ) १७०
—अंबर, बिलाल, संबूल जंजिरेकर सुभेदार १६५, १६७, २३८
—अंबर अफवानी मृत्यु ( स. १७३४) १६९
—कान्होजी युद्ध ( स. १६९८ )१५२
—कासीम–याकूदखान ( मृत्यु स. १७०६ ) १६४
—युद्ध १८१, १८२
—दोन पक्ष ( १७३३–३६ ) १६६, १७०
—मराठे भांडण ( स. १६८९ )१५२
—मसूद–सुरत ( स. १७३३ ) १६६
—सत्ता ( स. १७३७ ) १५२
—याकूब १६५,–उंदेरीचा किल्लेदार ( स. १७३६ ) १७०
—रया–सोलापूर २३७
—रहाण ठार १६६
—सात ( स. १७३५ ) १६९
—साया सैफखान–तळकोकण २३७
—हसन जंजिरा १६५
शिरके ( स. १४५० ) ३२७
शिरें सं. स्थ. ७
शिवचरित्र रहस्य ३१
शिवदिग्विजय बखर–प्रसंग ७० अनुक्रम. शकोल्लेख २४४–२४६
—विष्णुपुराण २२५
— हस्तनापूर वंशावळचूक २२६–२७
शिवनेरी–शिवाजीनिवास ( श. १५४९–५२ व १५५५–५९ ) २४०
शिवप्रताप २१३ व गप्पा २५५; मजकूर २५३–५४
शिवराम गोविंद भिडे ( स. १७५१ )११०
शिवाजीमहाराज
—अनुकूल स्थिति १२ प्रकार २५८–५९
—अफझलखान२७७, २२८, ४४२
—अंमलदार ( श. १५६०–६८) २६३
—इतिहाससाधन स्थल ४५२
—इनामें ४४४
—इंग्रज लेखक २९१
—कसाई पारिपत्य ( श. १५६३)२५८
—चाकण ( श. १५६८ ) २६९,
—चाफळ २७४
—चंद्रराव मोरे ( श. १५७७ ) २७५–२७६, ४४१–स्वारी कारण ४४२
—जन्म व बखरींचा घोटाळा २३६, २३७
—तुकारामबोवा २६०, २७४
—तोरणा ( श. १५६८ फा० ) २६८
—थोरवी २८८, २८९ची पाश्चात्यांशी तुलना २९०
—पुरंदर घेणें ( श. १५६८ का. ) २६९
—पोवाडे २७९
—फ्रेंच ४४३
—बालपण निवासस्थलें ५(श.१५४९–६२ ) २४०;–विजापूर २३८; शिवनेरी २३६
—बाजीराव पहिले, तुलना १३७
—बाळाजी बाजीराव व तूलना ९५
—बायका ( ३–६ ) २४३
—मक्का नारळ सुपारी मीठ ४४६
—मराठी भाषा ३८१

( शिवाजी-चालू )
—महाराष्ट्र १७७-१७८
—राजापूर लूट ( शु. १५७० ) २७०
—रामदासभेट ( श. १५७१ वै० शु.९, १० ) २६०, २७०-२७१-चा उपदेश २७४
—रायगड घेतो ( श. १५६८ ) २७०
—लग्नें २ ( श. १५६२-६३ ) २४०, २४१, २५७, २६६
—वामन पंडित २६०
—विजापुरीं जाणें (श. १५५८,-६३) २५७, २५८
—शहाजीभेट-बेंगरूळ ( श. १५६० ) २५७,
—शिक्षण २५९-६०
—सावंत कुडाळ तह( स. १६५९) ३३
—स्वराज्य निर्मिती (श.१५६०-६८) २६४
—हालचालप्रारंभ (श. १५६०)२५७, २६१
शिवाजी शेळ्याजी खराडे हो. स. ( स १७६१ ) ६१
शिवाजी-कोल्हापूरकर १४८
—दंगा ( स, १७०८ ) १२९
—मृत्यु ( स. १७१२ ) १३०
शिवापट्टण=शिवापूर पुणें ४४५
शिसोदे घराणें-भोसले कुल २३१, २३२
शीख २
शुक्रताल ५८, ५९
शेखजी पाटील-गुहाघर १६५
व बाजीराव १६६
शेखमिरे-वांई शा. स. (स. १७०७) १२८
शेखोजी आंग्रे मृत्यु ( स. १७३३ सप्त. ) १३६
शंकरदेव-खेळणा ( स. १४५० ) ३९७
शंकरदेव-यादव ( स. १३०९-१३१२ ) ३७४, ४३९
शंकरभट उपाध्या-मुरुडकर महाजन १६३
शंकराजी नारायण सचीव ता. स. (स १७०७ ) १२७, १२८
—जलसमाध ( स. १७१२ नोव्हें. ) १३०
शंकराजीपंत-वसई ( स. १७३७ ) १७१, १७२
—वेढा वसईस ( स. १७३९ ) १७३
शंकर पांडुरंग पंडित-तुकाराम गाथा ( श. १७९१ ) २२१
शिंदखेडची लडाई ( स. १७५७ ) १३
शिंदे व आंग्रे भांडण ( स. १७१३ ) १३०
—शाहू छ० तह ( स. १७१५ जाने. ३० ) १३०
शृंगारपूर-चे दळवी ( श. १५८३ ) २७२

स

सईबाई निंबाळकर २४०, २४१
सकपाळ-आंग्रे १५०
सकुराबाद प्रांत इटावा ( स. १७६०) ७१ ७२
सखारामबापू ८६, १००
सखो विठ्ठल-न्यायाधिकारी ( स. १७१९) १२५; ( स. १७०८ ) १२९
सजणसिंह=काकाजी २३०, २३१; ( श १२२५ ) २३३
सडक-खडींची शोध ( श. १७८० )१०६
सत्यपूर्ण गुरु ( म. १६२७-५६ ) ४३६
सत्य व स्वजाति गौरव आणि युरोपीय ( २२ ) ३१५
सदानंद गोसावी मठ-निंब ( श. १४६३ ) ३८५
( श. १६७९ ) ३८८
सदाशिव रामचंद्र ( स. १७५६-५७ ) १०
सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब ( स. १७५०-५३ ) ४०
—उद्दामपणाचा आरोप ८८, १०८
—कार्यदिग्दर्शन ( १७५८-६० ) ६१
—डाव १ ला व २ रा ( स. १७६० ) ७२-७६
—दिल्ली पातशाही ७७
—महत्वाकांक्षा ३७
—राजकारणें ७६, ७७

( सदाशिव चिमणाजी–चालू )
—योग्यता ( स. १७४७–६० ) ६४
—रसद व अव. रसद ८३
—वर्तन ८६–८८
—साम्राज्यकल्पना ६१–६२
—हालचाली ( स. १७५०–६१ ) ११–१४ स्पष्टीकरण १८–२१
सदोबा शेणवी ४६९, ४७०
सनपने–सातारा ( श. १४६३ ) ३८६
सफदरजंग वजीर–सुजा०चा बाप (स. १७४८–५४ ) ६५
—मराठ्यांशी करार ५६
सभासद बखर ( श. १६१६,–१९ ) २१७
—प्रसंग ७० अनुक्रम, शकोल्लेख १ २४९–५१
सबळगड ७९
समदरखान अ, स. ची लूट ७८, ७९
समबुद्धि व जर्मन ३४०
—फ्रेंच व युरोपीय ३०९
—महाराष्ट्र नाश ३४०–३४२
—हिंदुस्थान ३४६
समाज–उन्नतावनत स्थिति ( १९ ) ३१३
—चरित्र–कमिशन ३६१
—चार प्रकार ३४३
—प्रजापोषणसंस्था ३२७
—भ्रष्टतेचें एक लक्षण ४१०
—शास्त्र व तत्त्वज्ञान ३३७,–संज्ञा (३९) ३२९
सयाजी कनोजा–ब्रह्मेंद्र० कडील १८५
सय्यद तह,मदत १३१, (श. १७१८) १४८
—बंधु व बाळाजी विश्वनाथ ( स. १७१८ ) १८०
सरकार व इतिहासकार्य ३०२
सरतळे–सातारा ( श. १४६३ ) ३८७
सरदार पेशवे संबंध ४९ ५०
—स्वतंत्रपणा ५०, ५१
सरदेशमुखी–शाहू ( स. १७१४ ) ३५
—शिवाजी ३४
सरदेसाई–रियासतग्रंथ ३५७
सरंजामी सरदार १३२, (१०)१७८, १७९
सलाबतखान व कोरेगांव (स. १७५१)२०–६४
—गाडदी ( स. १७५२ ) ९८
—गादीवर येतो १९
—वर मराठ्यांच्या स्वाऱ्या (स.१७५०–६० ) ३९, ६२, ६३
सह्यपर्वत व कोकणप्रांत १४९
साईघर–सातारा ( श. १४६३ ) ३८६
साक्सन भाषा व नार्मनलोक ४११, ४१२
साखरखेडलें ( स. १७२४ ) १३३
साखरें–मावळ २८०
सागर सं. स्थ. ७
सागरगड ( स. १७३९ ) १७५,–बंदर१५२
साठे २
सातारा सं. स्थ. ७
—मार्ग पुण्याहून १०६
सादुल्लाखान–नजीबाचा साथीदार ( सं. १७५९ ) ५८
साबाजी भट ज्योतिषी–मिरज ४३७
साबाजी शिंदे ५८ ( स. १७५८ ) ५९
सामाजिक ग्रंथनिर्मिती–( श. ११००–१७२२ ) ३५२, ३५३
सायगांव–सातारा ( श. १४६३ ) ३८५
सालरजंग ३५६
सालेरी–( श. १५२२ ) २३४
सावनूर–सं. स्थ. ७
—मार्ग पुण्याहून १०६
—लढाई ( स. १७५६ ) ९२
—स्वारी ( स. १७५५ ) ६४
सावंत–( स. १७१५ ) कोंकणभाग १५२
सावंतवाडी ७ ( स. १४५० ) ३९७
—कर १७०, ४३२
साष्टी बेट ( स. १७३९ ) १७३
सासवड–सं. स्थ. ७
साळासुवे–( स. १७३९ ) १७३
सिद्दीबिडेश ( स १६२७–५६ ) ४३६
शिद्धीभट ज्योतिषी मिरज–४३६, ४३७
सिद्दीसात–परशराम गांव लुटतो ( स. १७२७ फे. ) ९५५
सिहोरा–भाऊसाहेब मुक्काम(स.१७६०ए.)६८

सुजाउद्दौला–५७, ५८, ५९ ( स. १७५९ –६० ) ६५
—अबदाली ६५; ७७, १०८
—नजीबखान ( स. १७६० ) ६०, ७१ ७७
—मल्हारराव होळकर ८६
सुजा–शहाजानचा मुलगा ( स. १५५६ ) २३८
सुपें–सं स्थ. ७; ( श. १५६३ ) २५८
सुभानजी खराटे–राजकोट बंदरदार १५२
सुमंत–महादजी गदाधर ( स. १७१९ ) १२५
सुरजमल जाठ–सवळगड ७९, ८६
सुरगिरी–दौलताबाद ४४४
सुरत सं. स्थ. ७, ( स. १७३३ ) १६६
—फ्रेंच वखार स्थापना ( स. १६६८ ) ४४३
सुवर्ण दुर्ग १६०
सूर्याजी चव्हाण–कोकणराव, गोवळकोट ( स. १७३५ आग. ) १६९
सूर्याजीराव मोरे (श. १५७७) २७५, २७६
सेखोजी आंग्रे ( स. १६५१–५५ ) १५०
—उंदेरी इंग्रजावर स्वारी (स. १७३३) १६४, १६५
—जयसिंग ? १६७; ( स. १७२९ ) १५९, १६० )
—बाजीराव ऐक्य (स. १७३२)१६२
—मृत्यु ( स. १७३३ ) २०७
सेनापती मंडळी ( स. १७६१ ) १८, १९
सेनाखासखेल १४७, १४८
सेवणचंद्र जाधव १ ला व २रा (श. ९९१–१०६९ ) ४३८, ४३९
सोडवळकर–कोंकण २५९
सोदनवाडी–सातारा ( श. १४६७ ) ३८७
सोनगड ( स. १४५० ) ३९७
सोनगाव–सातारा ( श. १४६३ ) ३८६
सोनपत–दिल्लीपासून २६ मैल ७९
सोनोपंत डबीर ( श. १५६० ) २५७
—मृत्यु ( श. १५६७ ) २६०
सोनोपंत बावडेकर ४५२
सोनोरी–सं. स्थ. ७
सोलापूर–सिद्दीरयान २६७
संत २८५, २८६
—व इतिहास वर्ज्यता ४१९ राष्ट्रत्व ४२०
—मराठी भाषा ४१७
—रानडे म. गो. ४१९–२०
—हिंदुधर्म ४१८–४२०
संताजी घोरपडे २१७, सेनापती ( स.१६९१ ) ४४९
संताजी पांढरे ता. स. ( स. १७०७)१२७. ४४९
संन्यस्त तत्त्वज्ञान ३४३, ३४४
संभाजी आंग्रे ( स. १६५५–५७ ) १५०. ( स. १७३९ ) १७५
—ब्रह्मेंद्र १६७, १६८, १७२
—मानाजी व पोर्तुगीज ( स. १७३७ ) १६९, १७१
—मृत्यु ( स. १७४२ ) १७५
—शिक्का १६०
—सरखेल ( १७३३ आक्टो. ) १६७ १६९
—स्वभाव इ. १५९–१६०
संभाजी कावजी–मोरे प्र. ( श. १५७७ २७५–७७
संभाजी कोल्हापूरकर ( स. १७४० ), ४० ४२, ४३, ४८
—निजामन्मुल्क १३१,–फारकत ( स. १७२८ ) १३३
—शाहूशीं तह ( १७३१ ) १३४
संभाजी मोहिते–सुपे २५९
संभाजी भोसले–बाबाजीचा बाप २३३
संभाजी भोसले–शहाजीचा मुलगा ( श. १५४५ ) २३५
संभाजी सेखोजी–वैमनस्य १६०,–सख्य १६१
संभाळकिया–दिल्लीपासून ४५ मैल–७९
संशोधक ४५६, ४५७
—ची बौद्धिक तयारी ४५९
—स्थलें ( ८–११३ ) ६, ७

संस्था-उत्पाति व प्रामुख्य ३२७, ३३०
संस्थानद्रोही ४३९-७१
संस्थानिक व इतिहास ४६३
सांगोले ( स. १७१४ ) ३४
सिंघण यादव-देवगिरी ३७४, (स.१२४०) ३९९
सिंघण १ ला व दुसरा ( स. १२१०-४७) ४३९
सिंधुदुर्ग बांधणी ( श. १५८६ मार्ग.व.२) २७३
सिंहगड ( श. १५६० ) २६३
सिंहली भाषा व मोडी लिपी ३७७
सुंदर तुकदेव १४८
स्त्रीप्राधान्य-आंध्रकुल २२५
स्थलनामें ४४०
स्मृति-इतिहास व गुण ४६४
स्वजनविरोध व पेशवे ९४
स्वदेश व स्वभाषा ४३१
—अभिमान इतिहास ३०१, ३०२
स्वराज्याचीं अंगें २६६
—स्थापनेची त्रिविध तयारी ३२
—हक्क व वसुलीबाब शिवाजी व शाहू ३४, ३५

ह

हकीम रहिमतखान नजीबचा साथ ( स. १७५९ ) ५८
हणमंतराव मोरे ( श. १५७७ ) २७५, २७६
हफीज रहिमतखान नजीबखानाचा साथीदार ( स. १७५९ ) ५८
हबशी व कोंकण ( स. १७३९ ) १७५; ( स. १७१५ ) १५२
—जंजिरेकर व सिद्दीसात १५६
—संज्ञा १६४
हरपाळ ( स. १३१२-१८ ) ३७४, ४३९
हरि गाउडा-आहागेणा ( श. १४६३ ) ३८६, ४३५
हरि पाटील भाळेघर ( श. १४६३ ) ३८७
हरिभट ज्योतिषी-मिरज ४३७
हसन गंगो ब्राह्मणी ३९७
हिरा कोट ( स. १७३९ ) १७५०
हिराजी, रायगडचें शिवालय बांधणारा शि. स. २६०
हिरो भोया पाटील हागवणा-निंब ( श १४७९ ) ३८८, ४३५
हिवरें सं. स्थ. ७
हुएनत्संग ३७९
हुकेरी-( स. १३२७-५६ ) ४३६
हुसने अल्ली ( स. १७१८ ) ३५
हेमाडपंत=हेमाद्री ३७३, ४५२
—चतुर्वर्गचिंतामणी व्रतखंड ३९८
—जमाखर्च पद्धति ४१६
—मोडीलिपी ३७६ प्रसार ३७७
—यादव प्रधान व दप्तरदार ३७३
लंकेहून आगमन ( श. ११९३ ) २४६
हेमोल्ट ३१८, ३२१
हैदर ९८
—तह ( १७७९ ) १२२
हैदराबाद सं. स्थ. ७
हैबतराव निंबाळकर ( स. १७०७ ) १२७;
—शा. स. १५८
—सरलष्कर ( स. १७०८) १२९
—(स. १६२८) ३८२
होनाप देशपांडे-पुणें ( श. १५२२-५८ २५८
होनो अनंत-सेनाकर्ते ( स. १७०८ )१२०
होळी-होन्नुरची स्वारी (स. १७५४ ) ६४
हंबिरराव मोहिते सरलष्कर ४४९
हिंदी भाषा-मराठी राज्यक्रांति ४१३
हिंदु-धर्म महाराष्ट्र व बाह्य ३२, ३३
—भ्रष्टता कोंकण १६५
—पद बादशाही मराठे ३५
—मनोरचना ३६०, ३६१,
—मुसलमानसंस्कृति ३९८, ३९९
—साष्टी व पोर्तु० ( स. १७६६ ) १७१
हिंदुराव घोरपडे-कर्नाटक ( स. १७०७ ) १२७

हिंदुस्थानचा नकाशा ९६
—शोध ( स. १४९८ मे ११ ) ९७
—स्थिति ( १८५७ ) ३५६
हिंमतराव मोरे ग्रंटडफ (श. १५७७) ३५६

क्ष

क्षत्रप-परदेशीय २२५
क्षत्रिय अस्तित्व २३२

# मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

| *खं. | प्रस्तावना पृष्ठें | लेखांक पृष्ठें | प्रसिद्धीचें वर्ष | प्रसिद्धीचें स्थल |
|---|---|---|---|---|
| १ | १२७ | ४१० | इ. स. १८९८ | वाई–मोदवृत्त छा० |
| २ | ३६ | १५९ | १९०० | कोल्हापूर–ग्रंथमाला |
| ३ | ९७ | ५२२ | १९०१ | ,, ,, |
| ४ | १३९ | १८७ | १९०० | पुणें--चित्रशाळा |
| ५ | ४ | २०८ | १९०२ | कोल्हापूर–ग्रंथमाला |
| ६ | ९८ | ६७६ | १९०५ | ,, ,, |
| ७ | ७ | ४३३ | १९०४ | मुंबई–गद्रे घारपुरे राजवाडे |
| ८ | १२७ | २३० | १९०३ | कोल्हापूर–ग्रंथमाला |
| ९ | ० | १०२ | १९०६ | धुळें–प्रभात (तंजावर शिलालेख) |
| १० | ९ | ४९६ | १९०९ | पुणें–म. सा. परिषद |
| ११ | ९ | ८५ | १९०८ | पुणें–ज्ञानप्रकाश. |
| १२ | ० | २३७ | १९१२ | पुणें–भा. इ. सं. मंडळ |
| १३ } | ५ | १६६ | | |
| १४ } | ० | ६६ | १९१८ | पुणें–यशवंत छापखाना |
| १५ | ० | ४८८ | १९१२ | धुळें–आत्माराम छापखाना |
| १६ | ० | ८४ | ,, | मुंबई–निर्णयसागर |
| १७ | ० | ९३ | १९१३ | ,, |
| १८ | ० | ९३ | १९१४ | ,, |
| १९ | ० | १३८ | ,, | ,, |
| २० | ० | ४३६ | १९१५ | पुणें–भा. इ. सं. मंडळ |
| २१ | ० | ३६० | १९१८ | धुळें–इतिहास–ऐतिहासिक |
| २२ | ० | १३७ | १९१७ | मुंबई–निर्णयसागर |

* हे ग्रंथ चित्रशाळा व भा. इ. सं. मं. पुणें, येथें मिळतील.

# राजवाडे लेखसंग्रह—संपूर्ण ग्रंथ.

[ पुणें--भा. इ. सं. मंडळ पुरस्कृतग्रंथमाला क्र. १२----१६

| | | | |
|---|---|---|---|
| भाग | १ | ऐतिहासिक प्रस्तावना | किं. रु. ३ |
| भाग | २ | ऐतिहासिक निबंध | छापत आहे. |
| भाग | ३ | भाषाविषयक निबंध | ,, |
| भाग | ४ | सामाजिक निबंध | ,, |
| भाग | ५ | राजकीय व इतर निबंध | ,, |

REFBK-0003679

३६५८

# ेला निकट

ी



हाग व द० वा पोतदार १९६५